पवित्र कुरआन

मराठी अनुवाद

MARATHI

पवित्र
कुरआन

पवित्र
कुरआन

उर्दु आणि इंग्रजी अनुवाद

मौलाना वहीदुद्दीन खान

मराठी अनुवाद

सौ. ज्योती आफळे

गुडवर्ड बुक्स

This translation of the Quran is copyright free.
First published in 2015
This edition published in 2025

Coordinator
Abdus Samad Khalil Ahmed Shaikh, Pune

Proof Reading Team
Asmita Kulkarni, Shubhangi Enterprises, Pune
Sartaj Moinoddin Siddiqui, Maths Lecturer, Parbhani
Dr. Junaid Shaikh, Mumbai

Goodword Books
A-21, Sector 4, NOIDA-201301, Delhi NCR, India
Tel. +91 120-4314871, Mob. +91-8588822672
email: info@goodwordbooks.com
www.goodwordbooks.com

CPS International
Centre for Peace and Spirituality International
1, Nizamuddin West Market, New Delhi-110013
Mob. +91-9999944119
info@cpsglobal.org, www.cpsglobal.org

Center for Peace and Spirituality USA
2665 Byberry Road, Bensalem, PA 19020, USA
Cell: 617-960-7156
email: kkaleemuddin@gmail.com

Printed in India

अनुक्रमणिका

प्रकरणांची (सूरह) नावे ..... पृष्ठ क्र.

कुरआन परिचय..... ९

पवित्र कुरआनातील घटनांचा कालक्रम २१

१. प्रारंभ (अल्-फातिहा) २३

२. कालवड (अल्-बकरह) २३

३. इमरानचे कुटुंब (आले इमरान) ७४

४. स्त्रिया (अन्-निसा) १०२

५. अन्नाने भरलेले ताट (अल्-माइदा)..... १३०

६. पशुधन (अल्-अनआम) १५२

७. उंच ठिकाण (अल्-आराफ)..... १७६

८. युद्धातील सामग्री (अल्-अनफाल) २०४

९. पश्चाताप (अत्-तौबा) २१३

१०. यूनुस (यूनुस)..... २३३

११. हूद् (हूद्)..... २४८

१२. जोसेफ (अल्-यूसुफ) २६४

१३. मेघगर्जना (अर्-रअद)..... २७९

१४. अब्राहाम (इब्राहीम) २८६

१५. खडकांचा प्रदेश (अल्-हिज्र)..... २९३

१६. मधमाश्या (अन्-नहल)..... ३००

१७. रात्रीचा प्रवास (अल्-इसरा)..... ३१६

१८. गुहा (अल्-कहफ)..... ३३०

१९. मेरी (मरयम) ३४३

२०. ता. हा (ता. हा.) ३५२

२१. प्रेषित (अल्-अंबिया)..... ३६४

२२. हजयात्रा (अल्-हज) ३७५

२३. श्रद्धावंत (अल्-मोमिनून)..... ३८५

२४. प्रकाश (अन्-नूर) ३९४

२५. निकष (अल्-फुरकान) ४०५

२६. कवी (अश्-शुअरा) ४१३
२७. मुंग्या (अन्-नम्ल).....४२५
२८. कथानक (अल्-कसस) ४३५
२९. कोळी (अल्-अन्कबूत) ४४७
३०. रोमन्स (अर्-रूम).....४५५
३१. लुकमान (लुकमान) ४६१
३२. नतमस्तक (अस्-सजदा) ४६५
३३. संघटना (अल्-अहजाब) ४६८
३४. शेबा (सबा).....४७८
३५. निर्माता (फातिर) ४८५
३६. या. सीन. (या. सीन.) ४९२
३७. पंक्तिबद्ध होणारे (अस्-साफ्फात) ४९८
३८. सॉद (सॉद).....५०७
३९. लोकसमूह (अज्-जुमर) ५१४
४०. क्षमादाता (अल्-मोमीन) ५२३
४१. सुस्पष्ट साक्षात्कार (फुज्जीलात).....५३३
४२. सामंजस्य सल्लामसलत (अश्-शूरा).....५४०
४३. सुवर्ण अलंकार (अज्-जुखरुफ) ५४७
४४. धूर (अद्-दुखान) ५५४
४५. गुडघे टेकून (अल्-जासिया).....५५८
४६. वाळूचे टेकाड (अल्-अहकाफ) ५६२
४७. मोहम्मद (मुहम्मद) ५६७
४८. विजय (अल्-फत्ह) ५७२
४९. निवासस्थान (अल्-हुजुरात).....५७७
५०. काफ. (काफ.).....५८०
५१. विखुरणारे वारे (अज्-जारियात) ५८३
५२. सिनाई पर्वत (अत्-तूर) ५८७
५३. अस्ताला जाणारा तारा (अन्-नज्म) ५९०
५४. चंद्र (अल्-कमर) ५९४
५५. दयाळू ईश्वर (अर्-रहमान).....५९७

५६. अटळ प्रसंग (अल्-वाकिआ) ६०१
५७. लोह (अल्-हदीद) ६०५
५८. गाऱ्हाणे (अल्-मुजादला) ६१०
५९. निर्वासित (अल्-हश्र) ६१४
६०. जिची पारख झाली आहे (अल्-मुम्तहिना) ६१७
६१. रांगा (अस्-सफ्फ) ६२०
६२. साप्ताहिक प्रार्थनेचा दिवस (अल्-जुमुआ) ६२२
६३. दांभिक लोक (अल्-मुनाफिकून) ६२४
६४. नफा आणि तोटा (अत्-तगाबून) ६२५
६५. घटस्फोट (अत्-तलाक).....६२८
६६. प्रतिबंध (अत्-तहरीम) ६३०
६७. साम्राज्य (अल्-मुल्क) ६३२
६८. लेखणी (अल्-कलम).....६३५
६९. अटळ वेळ (अल्-हाक्का) ६३८
७०. चढती शिडी (अल्-मआरिज) ६४१
७१. नोहा (नूह) ६४३
७२. जिन्न (अल्-जिन्न).....६४५
७३. चादर गुंडाळलेले (अल्-मुज्जम्मिल) ६४७
७४. चादर पांघरलेला (अल्-मुद्दस्सिर) ६४९
७५. पुनर्निर्माणाचा दिवस (अल्-कियामह) ६५१
७६. माणूस (अल्-इन्सान) ६५३
७७. पुढे पाठवले गेलेले (अल्-मुरसलात) ६५५
७८. सुवार्ता (अन्-नबा) ६५७
७९. उखडणारे (अन्-नाजिआत) ६५९
८०. त्याने आठ्या घालून पाहिले (अबस).....६६१
८१. गुंडाळला जाणारा (अत्-तकवीर).....६६३
८२. फाटलेले आकाश (अल्-इनफितार) ६६४
८३. कमी माप देणारे (अल्-मुतफ्फिफीन) ६६५
८४. फाटण्याचा आवेग (अल्-इनशिकाक) ६६६
८५. तारकापुंज (अल्-बुरूज) ६६८

८६. रात्री प्रकट होणारा (अत्-तारिक).....६६९
८७. परमोच्च (अल्-आला).....६६९
८८. महाभयानक घटना (अल्-गाशियह).....६७०
८९. पहाट (अल्-फज्र).....६७१
९०. नगर (अल्-बलद).....६७३
९१. सूर्य (अश्-शम्स).....६७४
९२. रात्र (अल्-लैल).....६७४
९३. सकाळचा तेजस्वी प्रकाश (अज्-जुहा).....६७५
९४. दिलासा (अल्-इनशिराह).....६७६
९५. अंजीर (अत्-तीन).....६७६
९६. गुठळी (अल्-अलक).....६७७
९७. भाग्यनिश्चितीची रात्र (अल्-कद्र).....६७८
९८. सुस्पष्ट पुरावा (अल्-बय्यिनह).....६७८
९९. भूकंप (अज्-जिलजाल).....६७९
१००. चौखूर उधळलेले घोडे (अल्-आदियात).....६८०
१०१. गर्जत येणारी आपत्ती (अल्-कारिआ).....६८०
१०२. अधिकाची हाव (अत्-तकासुर).....६८१
१०३. सरती वेळ (अल्-अस्र).....६८१
१०४. पाठीमागे निंदानालस्ती करणारे (अल्-हु -म-जह).....६८२
१०५. हत्ती (अल्-फील).....६८२
१०६. कुरैश (कुरैश).....६८३
१०७. लहानसहान गोष्टी (अल्-माऊन).....६८३
१०८. संपन्नता (अल्-कौसर).....६८४
१०९. सत्य नाकारणारे (अल्-काफिरून).....६८४
११०. मदत (अन्-नस्र).....६८४
१११. लहब (अल्-लहब).....६८५
११२. एकमेवता (अल्-इखलास).....६८५
११३. दिवसाची सुरुवात (अल्-फलक).....६८६
११४. लोक (अन्-नास).....६८६

कुरआन परिचय

कुरआन हा ईश्वराचा ग्रंथ आहे. येत्या संपूर्ण काळासाठी तो पूर्णत्वाने जतन करण्यात आला आहे. मूळ ग्रंथ अरेबिक भाषेत लिहिला असला तरी अरेबिक न जाणणाऱ्यांना तो कळावा यासाठी त्याची भाषांतरे केली गेली. ही भाषांतरे मूळ ग्रंथाची जागा घेऊ शकत नाहीत; परंतु बिगर अरेबिक असलेल्यांसाठी मानवतेच्या विस्तीर्ण क्षेत्रापर्यंत ईशवाणी पोहोचवण्याचा हेतू मात्र त्यातून साध्य होतो.

कुरआन अरेबिक भाषेत असले तरी वस्तुतः ते निसर्गाच्या भाषेत आहे. विश्वनिर्मितीच्या वेळेस ईश्वराने समस्त मानवजातीला याच भाषेत संबोधले. मानवतेचे हे दैवी संबोधन मनुष्यप्राण्याच्या जाणीवांमध्ये नेहमीच अस्तित्वात असते, म्हणून विश्वात सगळीकडे कुरआन जाणून घेतले जाते. काहीजण ते जाणतेपणी समजून घेतात, तर काहीजण ते अजाणतेपणी. या वस्तुस्थितीचे वर्णन करताना कुरआनमध्ये म्हटले आहे, "ज्यांना ज्ञान दिले गेले त्यांच्या हृदयातील सुस्पष्ट आविष्कार म्हणजे कुरआन." पुढे या वचनात असे सांगितले आहे, "जे अपराधी किंवा दुष्कर्मी आहेत तेच आमच्या संकेतांना नाकारतात." (२९:४९)

म्हणजेच जागरूकतेच्या पातळीवरून कुरआनमध्ये वर्णिलेली ही दैवी वस्तुस्थिती मानवात अर्धजागृत अवस्थेत अगोदरपासूनच असते. म्हणूनच कुरआनचा संदेश मानवासाठी अपरिचित नाही. मनुष्य आपल्या सहजप्रवृत्तीला जाणतो. या त्याच्या स्वभावधर्माशी सुसंगत दैवी वास्तवाची शाब्दिक अभिव्यक्ती म्हणजे कुरआन. हे स्पष्ट करताना कुरआनमध्ये म्हटले आहे की, नंतरच्या काळात जन्मलेला प्रत्येकजण सुरूवातीला निर्मितीच्या वेळेस जन्माला आला होता आणि त्यावेळेस ईश्वराने या सगळ्या मानवी आत्म्यांशी प्रत्यक्षपणे संवाद साधला होता. या प्रसंगाचा उल्लेख कुरआनमध्ये

अशा प्रकारे केला आहेः ईश्वराने आदमच्या संततीच्या कंबरेतून पुष्कळ संतती निर्माण केली आणि त्यांना स्वतःचे साक्षीदार ठरवित विचारले, "मी तुमचा पालनकर्ता नाही आहे का?" यावर आदमच्या संततीने उत्तर दिले, "होय, तुम्ही आमचे पालनकर्ता आहात याचे आम्ही साक्षीदार आहोत." त्यामुळे 'आम्हाला हे माहीत नव्हते' असे तुम्ही पुनर्निर्माणच्या दिवशी म्हणू शकत नाही. (७:१७२)

ईश्वर आणि मानव यांच्यातील यापुढील संवाद नमूद करताना कुरआनमध्ये म्हटले आहे, "निःसंशयपणे आम्ही आमचा अनमोल ठेवा आकाश, धरती आणि पर्वतांना देऊ केला होता, पण त्याला घाबरून जाऊन त्यांनी त्याचा स्वीकार करण्यास असमर्थता दाखविली. माणसाने मात्र हा ठेवा आपलासा केला. पण मानव अन्यायी व उन्मत्त असल्याचे सिद्ध झाले आहे." (३३:७२)

कुरआन माणसासाठी पूर्णतः अपरिचित गोष्ट नसून त्याचे सार तो आधीपासूनच जाणतो. खरे तर कुरआन म्हणजे मानवी मनाचे उलगडणे आहे. ज्याची सहजप्रवृती जिवंत आहे आणि त्यावर नंतरच्या काळात कोणत्याही प्रक्रिया झाल्या नाहीत अशा व्यक्तीने कुरआनचे वाचन केल्यास त्याच्या मेंदूच्या ज्या पेशींमध्ये ईश्वराचे पहिले संबोधन जतन केले आहे त्या पेशी पुन्हा कार्यरत होतील. हे लक्षात घेतल्यास कुरआनचा अनुवाद म्हणजे ते जाणून घेण्याचे वैध साधन आहे हे समजण्यात फार अडचण येणार नाही.

ईश्वरी संबोधन हा पहिला करारनामा असेल तर कुरआन दुसरा करारनामा आहे. यापैकी प्रत्येकामुळे दुसऱ्या सत्यतेची खात्री पटते. एखाद्याला अरबी भाषा फार थोडी येत असेल किंवा अजिबात येत नसेल तर तो अनुवाद वाचू शकतो. अशावेळी कुरआनचा अर्थ समजण्यात तो अपयशी ठरेल असे त्याने वाटून घेऊ नये. कारण ईश्वरी वाणी मनुष्य नैसर्गिकपणे ग्रहण करू शकतो ही

आधुनिक काळातील वस्तुस्थिती आहे. जनुकशास्त्रीय आणि मानवशास्त्रीय संशोधने या दोहोंनीही या दृष्टिकोनाला पूर्ण पाठिंबा दिला आहे.

ईश्वराची निर्मिती योजना

प्रत्येक ग्रंथाला आपला असा एक उद्देश असतो आणि कुरआनचा उद्देश आहे ईश्वराच्या सृष्टीरूपी नवनिर्मितीची मानवाला माहिती देणे. यामध्ये ईश्वराने विश्व का निर्माण केले? पृथ्वीवर मानवाला वसवण्यामागचा हेतू काय आहे? आणि मृत्यूनंतर त्याला कशाचा सामना करावा लागेल, हे सांगितले जाते. शाश्वत निर्मिती म्हणून मानवाचा जन्म झाला आहे. अशी निर्मिती करताना ईश्वराने माणसाचे आयुष्य दोन कालखंडात विभागले: मृत्युपूर्व जीवन आणि मृत्यूनंतरचे जीवन. मृत्यूआधीचे जीवन हा कसोटीचा कालवधी असून या काळात केलेल्या कामाच्या गुणवत्तेनुसार मृत्यूनंतरच्या जीवनात त्याला बक्षीस मिळते किंवा शिक्षा ठोठावली जाते. यातून माणसाला कायमस्वरूपी स्वर्ग किंवा नरक मिळतो. त्याला या वस्तुस्थितीची जाणीव करून देणे हा कुरआनचा हेतू आहे. जीवनाकडून मृत्यूपश्चात जीवनाकडे जाणाऱ्या संपूर्ण प्रवासात मानवाला मार्गदर्शन करण्याचे कार्य या ईश्वरी ग्रंथाच्या मध्यवर्ती संकल्पनेतून साधले जाते.

मनुष्य जन्मजात जिज्ञासू आहे असे म्हणणे योग्य ठरेल. मी कोण आहे? माझ्या जीवनाचा उद्देश काय आहे? जीवनाचे आणि मृत्यूचे वास्तव काय आहे? माणसाच्या यश आणि अपयशाचे रहस्य काय आहे? इत्यादी प्रश्न प्रत्येकाच्या मनात येतात. कुरआननुसार या सगळ्या प्रश्नांचे उत्तर असे आहे की, वर्तमान विश्व ही परीक्षा भूमी असून मृत्यूआधीच्या जीवनात मिळालेल्या दैवी देणग्या म्हणजे या परीक्षेचाच एक भाग आहे. मृत्यूनंतरचे जीवन हे असे ठिकाण आहे जेथे सर्वश्रेष्ठ ईश्वराकडून या परीक्षेचा निकाल

विचारात घेतला जातो. मृत्यूनंतरच्या जीवनात माणसाला बक्षीस किंवा शिक्षा यापैकी जे काही मिळते ते या जगात केलेल्या कामांशी संसुगतच असते. ईश्वराची सृष्टी निर्मितीची योजना माहीत करून घेणे आणि त्यानुसार आयुष्याची रूपरेखा ठरविणे यातच मानवाच्या या जीवनातील यशाचे गुपित दडले आहे.

दैवी सूचनेचा ग्रंथ

दैवी सूचनेचा ग्रंथ म्हणजे कुरआन. यात उपदेश आणि ताकीद यांचा मिलाफ साधल्याने त्याला शहाणपणाचा, चातुर्याचा ग्रंथ म्हणणे अधिक उचित ठरेल. कुरआनमध्ये पारंपारिक माहितीपर ग्रंथाचे अनुकरण केलेले नाही. खरे तर एखाद्या सामान्य वाचकाने कुरआन उचलून वाचायला सुरुवात केल्यास त्याला तो अपूर्ण विषयांचा संग्रह वाटेल. वरवर पाहता त्याची ही भावना चुकीची नाही. पण यात कोणतीही त्रुटी नसून कुरआनचे मूळ स्वरूप कायम ठेवून वाचकापर्यंत त्यातील सत्याचा संदेश पोहोचवण्याच्या धोरणाशी हे सुसंगत आहे. ग्रंथाचा आस्वाद घेणाऱ्याने एका वेळेस एक पान किंवा एक ओळ किंवा एक वचन वाचले तरी हा हेतू साध्य होतो.

सर्वश्रेष्ठ पालनकर्त्याने दिलेल्या कृपाप्रसादांचे स्मरण हा कुरआनचा सगळ्यात महत्त्वाचा पैलू आहे. मानवाची निर्मिती करताना ईश्वराने त्याला बहाल केलेले अपवादात्मक गुणधर्म ही त्याच्याकडून मिळालेली सगळ्यात महत्त्वाची देणगी! ज्या ग्रहावर मानवी उपयोगासाठी सगळ्या प्रकारच्या आधार व्यवस्था हजर आहेत अशा पृथ्वीवर त्याने मानवाची वस्ती केली, ही त्याने दिलेली आणखी एक महान देणगी. निसर्गाने दिलेल्या देणग्यांचा आनंद लुटताना माणसाने आपल्या उपकारकर्त्याचे सदैव स्मरण करावे, आपल्या निर्मात्याच्या औदार्याची पोच द्यावी, याची निश्चिती करणे हा कुरआनचा हेतू आहे. असे केल्यानेच मनुष्य स्वर्गात प्रवेश मिळवू शकेल.

उलट उपकारकर्त्याचे विस्मरण केल्यास त्याला सरळ नरकात लोटले जाईल. या अनिवार्य वस्तुस्थितीचे स्मरण म्हणजे कुरआन.

कुरआन समजून घेण्यासाठी ज्ञानी व्यक्तींची उपस्थिती अत्यावश्यक आहे असे काहींना वाटते. म्हणजेच अध्यात्मिक व्यक्तीच्या मदतीनेच कुरआनमधील अर्थ प्रकट होऊ शकतो. हे माणूस आणि कुरआन या दोघांचे मूल्य कमी लेखण्यासारखे आहे. कुरआन मानवाच्या मनाला साद घालते आणि मन हे माणसाचे सगळ्यात मोठे सामर्थ्य आहे. त्यामुळे कुरआनचा अर्थ समजण्यासाठी शुद्ध बौद्धिक पातळीवरून कुरआन खरोखरच मुक्त ग्रंथ बनतो, पण जे खालच्या पातळीवरून कुरआनचा वेध घेतात, त्यांनी त्याचा शोध घेतला आहे असे अजिबात म्हणता येणार नाही.

अंतर्गत चैतन्य आणि ईश्वराच्या सत्य स्वरूपाची ओळख

कुरआनचा एक महत्त्वाचा गुण म्हणजे ते आपल्याला फक्त पायाभूत परंतु अत्यावश्यक तत्वेच देते, त्यांचे महत्त्व पटविण्यासाठी ती तत्वे वारंवार सांगते. याउलट, अमूलभूत किंवा फक्त स्वरूपाशी निगडित विषयांना या पवित्र ग्रंथात फार थोडी जागा दिली आहे. स्वरूपाचे महत्त्व पूर्णपणे दुय्यम असल्याने हे तत्व कुरआनच्या योजनेशी समन्वय साधणारे नाही. कुरआनच्या दृष्टीने ज्या समजुती मूलभूत मार्गदर्शकाचे कार्य करतात त्यांनाच महत्त्व दिले जाते. कुरआनचा हा पैलू इतका सुस्पष्ट आहे की वाचकाला त्याला दाद द्यावीच लागते.

इस्लामी व्यक्तिमत्त्वाच्या उभारणीत अंतर्गत चैतन्य सर्वाधिक महत्त्वाचे आहे हे सत्य आहे. एकदा का अंतर्गत चैतन्य जागृत झाले की योग्य स्वरूप त्या पाठोपाठ सहजपणे येईल. पण स्वरूप आपण होऊन अंतर्गत चैतन्य कधीच निर्माण करू शकत नाही. याच कारणाने मानवाच्या गाभ्यात बौद्धिक क्रांतीची सुरुवात करून ती पूर्णत्वाला नेणे हा कुरआनचा उद्देश आहे.

बौद्धिक क्रांतीसाठी कुरआनमध्ये 'मारीफ' (ईश्वराच्या सत्य स्वरूपाची ओळख) ही संज्ञा वापरली आहे. (५:८३)

माणसाने ज्ञानाच्या पातळीवरून सत्याचा शोध घेण्याच्या महत्त्वावर कुरआनने अधिक भर दिला आहे. या पातळीवरून माणूस ईश्वरावरील खरीखुरी निष्ठा मिळवतो. जेथे ज्ञान नाही तिथे निष्ठा नाही.

ईश्वराची वाणी

कुरआन वाचताना तुमच्या लक्षात येईल की हे ईश्वराचे संभाषण आहे, असे त्यात वारंवार सांगितले आहे. वरवर पाहता ही साधी वस्तुस्थिती वाटते, पण संदर्भासहित पाहिल्यास हे एक असामान्य विधान आहे. जगात असे अनेक ग्रंथ आहेत, जे पवित्र मानले जातात. पण कुरआनशिवाय इतर कोणताही धार्मिक ग्रंथ ईश्वराचा संवाद म्हणून आपल्यासमोर येत नाही. कुरआनमध्ये विलक्षणपणे आढळणारे अशा प्रकारचे विधान वाचकाला (भौतिक जगापासून) दूर नेते. माणसाने लिहिलेल्या सामान्य ग्रंथापेक्षा वेगळा, अपवादात्मक ग्रंथ म्हणून नंतर तो त्याचे अध्ययन करतो.

"हे मानवा! तुझा पालनकर्ता तुझ्याशी संवाद करत आहे. त्याचे बोलणे लक्षपूर्वक ऐक आणि त्याप्रमाणे वाग" अशा प्रकारे विधान कुरआनमध्ये वारंवार सापडते. अशा प्रकारची संबोधण्याची शैलीही अगदी अपवादात्मक आहे. अशा प्रकारचे विधान कुरआनमध्ये वारंवार सापडतात. अशी प्रत्यक्ष दैवी ताकीद इतर कोणत्याही ग्रंथात दिसत नाही. याचा माणसावर अमिट ठसा उमटतो. आपला पालनकर्ता प्रत्यक्ष आपल्याशी बोलत आहे असे त्याला वाटते. या भावनेमुळे कुरआनमधील विधानांकडे सर्वसाधारण ग्रंथातील दैनंदिन वाक्ये म्हणून पाहण्याऐवजी त्यांच्याकडे अतिशय गांभीर्याने पाहणे त्याला भाग पडते. कुरआनच्या संकलनाची पद्धतीही अद्वितीय आहे.

माणसांकडून लिहिल्या गेलेल्या पुस्तकातील आशयाची मांडणी विषयानुरूप ए ते झेड अशा क्रमाने केली जाते. कुरआनमध्ये मात्र अशी मांडणी आढळत नाही. त्यामुळे सामान्य माणसाला यात अनुक्रम नसल्यासारखे वाटते. पण बारकाईने पाहिल्यास तो अतिशय संगतवार आणि व्यवस्थित ग्रंथ म्हणून पुढे येतो. त्यातील लेखनशैलीही अगदी अद्‌भुत आहे. कुरआन वाचताना मनात अशी भावना उत्पन्न होते की, याचा लेखक एका अगदी उंच मंचावर असून, तेथून खाली पहात, ज्याविषयी त्याला खास काळजी वाटते अशा समस्त मानवजातीला उद्देशून बोलत आहे. हे संबोधन वेगवेगळ्या मानवी गटांवर केंद्रीत आहे आणि त्याच वेळेस त्या सगळ्यांना सामावून घेणारे आहे.

कुरआनची एक खास बाब म्हणजे वाचक कोणत्याही वेळेस लेखकाशी सल्लामसलत करू शकतो, प्रश्न विचारू शकतो आणि त्याची उत्तरेही मिळवतो. कारण प्रत्यक्ष ईश्वर कुरआनचा लेखक आहे. हा ईश्वर सचेतन आहे. माणसाचा निर्माता असल्याने, तो माणसाची साद प्रत्यक्षपणे ऐकतो आणि त्याला प्रतिसादही देतो.

जिहाद : शांततापूर्ण वैचारिक संघर्ष

फक्त माध्यमांमार्फत कुरआनशी परिचित असणाऱ्यांचे मत सर्वसाधारणपणे असे असते की कुरआन हा जिहादचा ग्रंथ आहे आणि त्यांच्यासाठी जिहाद म्हणजे हिंसेच्या मार्गाने आपले उद्‌दिष्ट साधण्याचा प्रयत्न आहे. हा विचार गैरसमजुतीवर आधारला आहे. स्वतः कुरआन वाचणाऱ्याच्या हे सहजपणे लक्षात येईल की कुरआनमधील संदेशांचा हिंसेशी काहीएक संबंध नाही. कुरआन हा असा ग्रंथ आहे जो सुरूवातीपासून शेवटपर्यंत शांततेचा प्रसार करतो आणि कोणत्याही प्रकारे हिंसेला उत्तेजन देत नाही. कुरआनच्या अनेक शिकवणींपैकी एक म्हणजे 'जिहाद' हे खरेच आहे. पण योग्य अर्थाने

घेतल्यास जिहाद हे कोणत्याही प्रकारच्या हिंसक कृतीऐवजी शांततामय संघर्षाचे नाव आहे.

"कुरआनच्या मदतीने महान जिहाद करा (म्हणजेच अधिक जोमाने प्रयत्न करा)" या वचनातून कुरआनची जिहादची संकल्पना व्यक्त होते. (२५:५२)

कुरआन हे एक शस्त्र नसून, शांततामय संघर्षाच्या दैवी विचाराशी ओळख करून देणारा ग्रंथ आहे हे नक्की! कुरआनला अनुसरून अशा संघर्षाची पद्धत म्हणजे "त्यांच्या अगदी आत्म्यापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांच्याशी बोला." (४:६३) म्हणून कुरआननुसार माणसाच्या जवळ जाण्याचा अपेक्षित मार्ग असा असावा ज्यामुळे माणसाचे मन आणि अंतःकरण हेलावून जाईल. म्हणजेच, लोकांच्या मनाला आवाहन करून कुरआन त्यांचे समाधान करते, कुरआनच्या सत्यतेविषयी त्यांची खात्री पटविते आणि थोडक्यात, त्यांच्यात बौद्धिक क्रांती घडवून आणते. हे कुरआनचे विशेष कार्य आहे आणि हे विशेष कार्य फक्त बुद्धिनिष्ठ मुद्यांच्या मार्गानेच पार पाडणे शक्य आहे. हिंसेच्या किंवा सशस्त्र कृतींच्या सहाय्याने हे लक्ष्य कधीही गाठता येणार नाही.

"जेव्हा ते तुम्हाला सापडतील तेव्हा त्यांना ठार मारा" अशा प्रकारचा हुकूम देणारी काही वचने कुरआनमध्ये आहेत हे खरे आहे. (२:१९१) अशा वचनांचा संदर्भ घेऊन इस्लाम हा युद्धाचा आणि हिंसेचा धर्म आहे असे भासवण्याचा प्रयत्न काहीजण करतात. हे पूर्णपणे असत्य आहे. मर्यादित अर्थाने अशा वचनांचा संबंध ज्यांनी मुस्लिमांवर एकतर्फी हल्ला केला त्यांच्याशी आहे. वरील वचनातून इस्लाममधील सामान्य आज्ञा केली जात नाही.

या विषयातील तथ्य असे आहे की पवित्र कुरआन आज ज्या स्वरूपात

आहे, तशा परिपूर्ण स्वरूपात ते प्रकट झाले नव्हते. २३ वर्षांहून अधिक कालावधीत प्रसंगानुसार ते वेळोवेळी प्रकट झाले. हा कालखंड युद्धाच्या आणि शांततेच्या वर्षांमध्ये विभागल्यास, शांततेचा काळ २० वर्षांचा आहे तर युद्धाचा ३ वर्षे. या शांततेच्या काळातील कुरआनची प्रकटीकरणे म्हणजे इस्लामचे शांततापूर्ण उपदेश होते. ईश्वराच्या साक्षात्कार, आराधना, नैतिकता, न्याय यांच्याशी संबंधित वचनांमधून हा उपदेश आपल्यापर्यंत पोहोचवला जातो.

वेगवेगळ्या वर्गांमध्ये केलेले आज्ञांचे हे विभाजन अगदी नैसर्गिक असून सगळ्या धार्मिक ग्रंथामध्ये ते आढळते. उदाहरणार्थ, गीता हा हिंदुंचा पवित्र ग्रंथ चातुर्य आणि नैतिक मूल्यांशी निगडित आहे. तरीही याच्या बरोबरीने त्यात अर्जुनाला लढायला प्रोत्साहित करणारा कृष्णाचा उपदेशही आहे. (भगवद् गीता ३:३०) गीतेवर श्रद्धा ठेवणाऱ्यांनी नेहेमी युद्धच करावे असा याचा अर्थ नाही. महात्मा गांधींनी आपले अहिंसेचे तत्त्वज्ञान याच गीतेपासून मिळवले होते. ज्या प्रसंगी परिस्थितीमुळे काही पर्यायच उरत नाही अशाच वेळेस गीतेतील युद्धाचा उपदेश लागू होतो. पण सामान्य दैनंदिन परिस्थितीत महात्मा गांधींनी त्यातून जशा सलोखामय आज्ञा मिळवल्या त्याच दिल्या जातात.

त्याचप्रमाणे येशू ख्रिस्तांनी म्हटले आहे, "मी पृथ्वीवर शांतता आणण्यासाठी आलो आहे, असा विचार करू नका. मी शांतता आणण्यासाठी आलो नसून तलवार (शस्त्र) आणण्यासाठी आलो आहे." (मॅथ्यु: १०:३४) ख्रिस्ताने शिकवलेला धर्म हिंसेचा आणि युद्धाचा होता असा निष्कर्ष यावरून काढणे उचित ठरणार नाही. कारण असे उद्‌गार फक्त विशिष्ट प्रसंगांशी निगडीत असतात. त्यामुळे सामान्य आयुष्य विचारात घेता येशू ख्रिस्ताने उत्तम चारित्र्याची बांधणी, परस्परांविषयी प्रेमभाव, गरीब आणि गरजूंना मदत अशा सलोखापूर्ण मूल्यांचीच शिकवण दिली आहे.

कुरआनच्या बाबतीही हेच सत्य आहे. प्रेषित मोहम्मदांनी मक्केतून मदिनेला स्थलांतर केले त्यावेळी मूर्तीपूजक जमाती त्यांच्याविरूद्ध आक्रमक होत्या. पण प्रेषितांनी त्यांच्या हल्ल्याला प्रत्युत्तर देताना नेहेमी संयम दाखवला आणि त्यांना टाळण्याचे धोरण अवलंबले. परंतु काही प्रसंगी मात्र इतर कोणताही पर्याय नसल्याने त्यांना जशास तसे वागावे लागले. त्यामुळे अशा प्रसंगी त्यांना युद्ध करावेच लागले. अशा परिस्थितीतील साक्षात्कार युद्धाशी संबंधित आहेत. या आज्ञा खास करून विशिष्ट परिस्थितीसाठी असल्याने सामान्यपणे त्यांचा काहीच उपयोग नाही. येत्या सर्व काळासाठी त्या वैध मानल्या गेल्या नाहीत. याच कुरआनने प्रेषितांना "समस्त मानवजातीसाठी दयाळू" हा कायमस्वरूपी दर्जा दिलेला आहे. (२१:१०७)

इस्लाम हा शांततेचा धर्म आहे, शांतता या शब्दाच्या संपूर्ण अर्थासह. यातील मार्गाला कुरआनने "शांततेचा मार्ग" म्हटले आहे. (५:१६) समेट हे सर्वोत्तम धोरण असून शांततेत आलेला कोणताही व्यत्यय ईश्वराला तिरस्करणीय असल्याचेही येथे सांगितले आहे (२:२०५, ४:१२८). इस्लाम आणि हिंसा परस्परांविरोधी असल्याचे म्हणण्यात काही अतिशयोक्ती नाही असे आपण म्हणू शकतो. इस्लामिक हिंसा ही संकल्पना निश्चितपणे आधारहीन आहे. वर्तमान जगात हिंसेला मान्यता नाही ही वस्तुस्थिती आहे. हिंसा एक तत्व म्हणून इस्लाममधील गोष्टींच्या योजनेशी अगदी विसंगत आहे. हे सूचित करण्यासाठी ही वस्तुस्थिती पुरेशी आहे. इस्लाम एक शाश्वत धर्म असल्याचा दावा करतो. असे असल्याने काळाच्या कसोटीवर उतरू न शकणारे कोणतेही तत्व मान्य करणे त्याला कधीच परवडण्याजोगे नाही. हिंसेची सांगड इस्लामबरोबर घालणे म्हणजे इस्लाम धर्माच्या शाश्वततेवरच शंका उपस्थित करण्यासारखे आहे. इस्लामी दहशतवाद ही शांततावादी दहशतवादासारखीच परस्परविरोधी संज्ञा आहे. या विषयातील सत्य हे आहे

की इस्लाममधे सगळ्या शिकवणी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शांततेच्या तत्वावर आधारित आहेत.

साक्षात्कारीत ग्रंथ

कुरआन हा प्रेषित मोहम्मदासमोर प्रकट झालेल्या ईश्वराचा ग्रंथ आहे. तो प्रेषितांसमोर संपूर्ण ग्रंथाच्या स्वरूपात प्रकटला नसून २३ वर्षांहून अधिक कालावधीत अनेक भागांमध्ये प्रकट झाला आहे. प्रेषित मोहम्मद मक्केत असताना इ.स. ६१० साली याचा पहिला भाग प्रकट झाला. पाठोपाठ नियमितपणे त्याचे वेगवेगळे भाग प्रकट होऊन मदिनेत असताना या ग्रंथाचा अंतिम भाग प्रकट झाला.

कुरआनमध्ये लहानमोठी एकशे चौदा प्रकरणे आहेत. यातील वचनांच्या संख्या सुमारे ६६०० एवढी आहे. पाठांतराची गरज म्हणून कुरआन ३० भागात विभागले गेले. सरतेशेवटी गॅब्रिएल या देवदूताच्या मार्गदर्शनाखाली या भागांचा अनुक्रम लावण्यात आला. याच देवदूतामार्फत ईश्वराने कुरआनचा साक्षात्कार घडवला.

सातव्या शतकाच्या पहिल्या चतुर्थात कुरआन प्रकट झाले तेव्हा कागदाचा शोध लागला होता. विशिष्ट झाडाच्या धाग्यांपासून 'पॅपिरस' नावाचा हा कागद हाताने तयार केला जाई. कुरआनचा एखादा हिस्सा प्रकट झाल्यावर तो या पॅपिरसवर लिहून ठेवत असत. या प्रक्रियेत ही वचने एकमेव इस्लामी साहित्य आहे जे प्रार्थनेतून पठण केले जाते आणि त्याचबरोबर प्रचार-प्रसाराच्या उद्देशाने वाचलेही जाते. या मार्गाने कुरआन सातत्याने आठवणीत साठवण्याबरोबरच लिहिलेही गेले. प्रेषित मोहम्मदांच्या हयातीत कुरआनच्या जतनाची हीच पद्धत प्रचलीत होती. अशाप्रकारे त्यांच्या हयातीत कुरआन जतन केले गेले.

तिसरे खलीफा (इस्लामी राज्याचे प्रमुख) उस्मान इब्न अफान यांनी कुरआनच्या असंख्य प्रती बनविल्या. त्यांनी त्या वेगवेगळ्या शहरांमध्ये पाठवल्या. तेथील मोठ्या मशिदीत त्या ठेवल्या गेल्या. लोकांनी त्याचे फक्त पाठांतरच केले नाही तर सरकारी देखरेखीत त्याच्या अधिक प्रती तयार केल्या गेल्या.

कागदाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन सुरू होऊन मुद्रणालयांचा शोध लागेपर्यंत कुरआनचे असे लिखाण चालू होते. यासाठी औद्योगिक क्रांतीचे आभारच मानले पाहिजेत, कारण यानंतर कुरआनची छपाई होऊ लागली. छपाईच्या पद्धतीत सुधारणा झाल्या तशी कुरआनची छपाईही सुधारत गेली. कुरआनच्या छापील प्रती हल्ली इतक्या सामान्य झाल्या आहेत की प्रत्येक घरात, मशिदीत, वाचनालयात, प्रस्तकाच्या दुकानात त्या मिळू शकतात. आज जगाच्या कुठल्याही भागात असणाऱ्याला कुरआनची सुंदरशी प्रत मिळू शकते.

– मौलाना वहीदुद्दीन खान
www.mwkhan.com

पवित्र कुरआनातील घटनांचा कालक्रम

- इ.स.५७०: प्रेषित मोहम्मद यांचा जन्म (त्यांच्या जन्मापूर्वी काही महिने त्यांच्या वडिलांचा मृत्यू झाला)
- इ.स.५७६: प्रेषित सहा वर्षाचे असताना त्यांच्या आईचे-अमीनाचे निधन झाले.
- इ.स.५७८: प्रेषितांचे आजोबा अब्दुल मुतालिब यांचे निधन झाले.
- इ.स.५९५: खदिजाहबरोबर प्रेषितांचा विवाह
- इ.स.६१०: मक्केजवळ माऊंट अन्-नूर येथे प्रेषितांना कुरआनचा पहिला आविष्कार घडला.
- इ.स.६१३: पहिला सार्वजनिक उपदेश
- इ.स.६१५: मक्कावासीयांकडून होणारा छळ टाळण्यासाठी प्रेषितांच्या काही सोबत्यांचे अबिसिनिया येथे स्थलांतर
- इ.स.६१६-१९: प्रेषित आणि त्यांच्या कुटुंबियांवर बनु हाशिम यांचा बहिष्कार
- इ.स.६१९: प्रेषितांची पत्नी खदिजाह व चुलते अबु तालीब यांचे निधन
- इ.स.६१९: आधारासाठी प्रेषितांची तैफला भेट, पण तेथील लोकांनी प्रेषितांना अपमानास्पद वागणूक दिली.
- इ.स.६२०: प्रेषितांचा जेरूसलेम येथे रात्रीचा प्रवास आणि तेथून सेव्हन हेवन्सचा प्रवास
- इ.स.६२२: प्रेषितांचे मक्केहून मदिनेस स्थलांतर. या वेळेपासून इस्लामिक कालगणेची सुरूवात झाली.
- इ.स.६२४: बद्रचे युद्ध-मुस्लिमांकडून मूर्तिपूजक मक्कावासीयांचा पराभव
- इ.स.६२५: उहुदचे युद्ध-मुस्लिमांचा मूर्तिपूजक मक्कावासीयांकडून पराभव

- इ.स.६२८: हुदयबिया येथील शांतता करार. मूर्तिपूजक मक्कावासीयांबरोबर दहा वर्षांचा युद्धबंदी करार. इस्लामची शांततापूर्ण उपदेशाला अनुमती. यामुळे अनेकजण इस्लामच्या कक्षेत आले.
- इ.स.६३०: मूर्तिपूजक मक्कावासीयांकडून युद्धबंदी कराराचे उल्लंघन. मक्केची शरणागती – प्रेषितांनी मक्कावासीयांना क्षमा केली आणि सगळ्या समुदायाने इस्लाम स्वीकार केला.
- इ.स. ६३१: अरेबियन जमातींकडून इस्लामचा स्वीकार. ख्रिस्ती आणि यहुदी जमातींबरोबर प्रेषितांचा शांतताकरार
- इ.स.६३२: प्रेषितांची मक्केला सदिच्छा यात्रा
- इ.स.६३२: ८ जून – प्रेषित मोहम्मदांचे मदिना येथे दुःखद निधन झाले.
- इ.स.६३३: दुसरे खलीफा हजरत अबु बकर यांनी एका ग्रंथात कुरआनचे संकलन केले.
- इ.स.६४५: तिसरे खलीफा हजरत उस्मानने कुरआनच्या अनेक प्रती तयार केल्या आणि शेजारील देशांमध्ये त्यांचे वाटप केले.
- इ.स.११५३: कुरआनचे पहिले लॅटिन भाषांतर केले.
- इ.स.१५४३: मार्टिन ल्युथर यांची प्रस्तावना असलेली कुरआनची पहिली छापील प्रत
- इ.स.१६४९: अलेक्झांडर रोसने फ्रेंचमधून इंग्रजीत कुरआनचे भाषांतर केले.
- इ.स.१७३४: जॉर्ज सेल्सकडून कुरआनचे भाषांतर केले.
- इ.स.१९३०: मोहम्मद मार्माड्युक पिकथॉलकडून कुरआनचे भाषांतर केले.
- इ.स.१९३४: अब्दुल युसुफ अलीकडून कुरआनचे भाषांतर केले.
- इ.स.१९८०: मोहम्मद असदकडून कुरआनचे भाषांतर केले.

प्रकरण १ : प्रारंभ
(अल्-फातिहा)

१ आरंभ अल्लाहच्या[अ] नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

२ सगळी स्तुती ईश्वरासाठीच आहे, जो संपूर्ण विश्वाचा पालनकर्ता आहे. ३ तो अत्यंत दयाळू व कृपाळू आहे. ४ तो निवाड्याच्या दिवसाचा अधिपती आहे. ५ आम्ही फक्त तुझीच उपासना करतो आणि मदतीसाठी फक्त तुझीच याचना करतो. ६ आम्हाला सरळ मार्ग दाखव. ७ अशा लोकांचा मार्ग, ज्यांच्यावर तू कृपा केली. अशा लोकांचा मार्ग नको, ज्यांनी तुझा कोप ओढवून घेतला आणि जे वाममार्गाला लागले.

प्रकरण २ : कालवड
(अल्-बकरह)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अलीफ लाम मीम २ हा ईश्वरी ग्रंथ आहे यात काही शंका नाही, ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांसाठी हा ग्रंथ मार्गदर्शन करतो. ३ जे अदृश्यावर विश्वास ठेवतात, नियमित प्रार्थना करतात आणि आम्ही त्यांच्यासाठी

[अ] अरबी भाषेत ईश्वरासाठी अल्लाह हा शब्द वापरलेला आहे. ज्याला फारसीमध्ये खुदा असेही म्हणतात. अल्लाह हा शब्द अल्+इलाह या दोन अरबी शब्दांपासून बनलेला आहे. अल्-हा शब्द इंग्रजी शब्द 'the' प्रमाणेच वापरला जातो. इलाह म्हणजे पूज्य किंवा उपास्य. अल्लाह या शब्दाचा अर्थ एक उपास्य असाही होतो. सकल विश्वाचा निर्माता, पालनकर्ता व मालक असलेल्या एकमेव ईश्वरसाठी 'अल्लाह' हा शब्द वापरला जातो. कुरआनमध्ये सांगितलेले अल्लाह हे ईश्वराचे प्रमुख व निज नाव आहे.

केलेल्या तजवीजीतून (ईश्वरी कार्यात) खर्च करतात. ४ तुम्हाला झालेल्या (कुरआनरूपी) साक्षात्कारावर आणि तुमच्यापूर्वी झालेल्या साक्षात्कारावर ज्यांची श्रद्धा आहे आणि परलोकातील जीवनावर त्यांचा दृढ विश्वास आहे. ५ हे ते लोक आहेत जे सर्वशक्तिमान पालनकर्त्याने आखून दिलेल्या मार्गाचे योग्य रीतीने पालन करत आहेत आणि त्यांनाच (ऐहिक व पारलौकिक) सफलता मिळणार आहे.

६ सत्य नाकारण्याकडे ज्यांचा कल आहे, त्यांना तुम्ही सावध केले काय आणि नाही काय, ते तुमच्यावर विश्वास ठेवणार नाहीत. ७ ईश्वराने त्यांची अंतःकरणे आणि कान बंद केले आहेत आणि त्यांच्या डोळ्यांवरही पडदा ओढला आहे. त्यांना भयंकर शिक्षा मिळेल.

८ "एकाच ईश्वरावर आणि (निवाड्याच्या) त्या अखेरच्या दिवसावर आमचा विश्वास आहे" असे म्हणणारे काहीजण आहेत परंतु ते सच्चे श्रद्धावंत नाहीत. ९ ते ईश्वराची आणि श्रद्धावंतांची फसवणूक करू पाहतात, पण ते फक्त स्वतःलाच फसवत आहेत आणि तरीही त्यांना याची जाणीव नाही. १० त्यांच्या अंत:करणात विकृती असून ईश्वराने त्यात अधिक भर घातली आहे. त्यांना वेदनादायक शिक्षा मिळेल, कारण ते खोटे बोलत राहिले. ११ या भूतलावर अराजकता निर्माण करू नका असे त्यांना सांगितल्यास ते म्हणतात, "आम्ही फक्त शांतीचे पुरस्कर्ते आहोत." १२ ते खरोखर अराजकतेस कारणीभूत ठरत आहेत, तरीही त्यांना त्याची जाणीव नाही. १३ आणि त्यांना जेव्हा सांगितले जाते, "इतरांनी जसा एकेश्वरावर विश्वास ठेवला तसा तुम्हीही ठेवा" तर ते म्हणतात, "मूर्ख विश्वास ठेवतात तसा आम्हीही ठेवावा की काय?" ते निःसंशयपणे मूर्ख आहेत. तरीही त्यांना याची जाणीव नाही. १४ श्रद्धावंतांना भेटल्यावर ते म्हणतात, "आम्ही श्रद्धा ठेवतो." पण

त्यांच्या दुष्ट म्होरक्यांबरोबर एकटे असताना ते म्हणतात, "खरंतर आम्ही
तुमच्याबरोबरच आहोत. आम्ही त्यांची फक्त थट्टा करत होतो."
१५ ईश्वर त्यांच्या या थट्टेची शिक्षा देईल. यासाठी तो त्यांना त्यांच्या
चढेलपणाच्या धुंदीत काही काळ आंधळ्यासारखे भरकटू देईल.
१६ हे असे लोक आहेत ज्यांनी योग्य मार्गदर्शनाऐवजी चुकीचे मार्गदर्शन
अनुसरले आहे, पण त्यांच्या या व्यापारात ना त्यांचा फायदा झाला आहे,
ना त्यांना खरे मार्गदर्शन मिळाले आहे.

१७ त्यांनी उजेडाच्या अपेक्षेने अग्नी प्रज्वलित करावा, त्यामुळे त्यांच्या
सभोवतालचा आसमंत प्रकाशाने उजळून निघावा आणि त्याचवेळी
ईश्वराने त्यांची दृष्टी हिरावून घ्यावी आणि त्यांना खोल काळोखात लोटून
द्यावे अशी त्यांची अवस्था आहे. १८ मुके, बहिरे आणि आंधळे झालेले
हे लोक कधीही (सन्मार्गावर) परतणार नाहीत.

१९ किंवा त्यांची अवस्था अशी आहे – आकाशातून धुंवाधार
पाऊस कोसळत आहे, त्याचवेळेस गर्द काळोखाच्या साथीने ढगांचा
गडगडाट आणि विजांचा कडकडाट होत आहे आणि त्या आवाजामुळे
मृत्यूच्या भयाने त्यांनी कानात बोटे खुपसली आहेत. सत्य नाकारणाऱ्यांना
ईश्वर असे चोहोबाजूंनी घेरतो. २० विजेच्या लखलखाटाने त्यांची दृष्टी
जवळपास हिरावून घेतली आहे. वीज चमकल्यावर त्या प्रकाशात ते
चालू लागतात, पण सभोवती अंधार पसरल्यावर जागच्या जागी खिळून
जातात. ईश्वराच्या मनात आले असते तर त्याने त्यांची दृष्टी आणि
ऐकण्याची क्षमता पूर्णपणे हिरावून घेतली असती; सगळ्या गोष्टींवर
ईश्वराचीच सत्ता आहे.

२१ लोकहो! तुमची आणि तुमच्या पूर्वजांची निर्मिती करणाऱ्या
तुमच्या पालनकर्त्याची उपासना करा, यामुळे तुम्ही सदाचरणी बनाल.

२२ त्याने तुमच्यासाठी धरतीला शय्या आणि आकाशाचे छत बनवले.
तुमच्या उदरनिर्वाहासाठी सर्व प्रकारची अन्ननिर्मिती व्हावी म्हणून त्यानेच
आभाळातून जलवर्षाव केला. हे सगळे माहीत असूनही जाणूनबुजून
कुणाला ईश्वरतुल्य ठरवू नका. २३ आमच्या सेवकाकडे आम्ही पाठवलेल्या
साक्षात्काराविषयी तुम्हाला काही शंका असेल तर तितक्याच गुणवत्तेचा
एखादा तरी अध्याय सादर करा आणि तुमच्यात सच्चेपणा असेल तर या
कार्यात मदतीसाठी ईश्वराव्यतिरिक्त तुमच्या इतर सहाय्यकांना साद द्या.
२४ पण जर तुम्ही हे करू शकला नाहीत आणि कदापि करू शकणार नाही;
तर मात्र सत्याला नाकारणाऱ्यांसाठी धडधडून पेटलेल्या अग्नीपासून आपले
संरक्षण करण्यास सिद्ध व्हा. मनुष्य आणि दगड हे या अग्नीचे इंधन असेल.
२५ (एकेश्वरावर) श्रद्धा ठेवणाऱ्यांना आणि सत्कर्मे करणाऱ्यांना खुशखबर
द्या की त्यांच्यासाठी वाहणाऱ्या नद्यांसहित बगीचे राखून ठेवलेले असतील.
त्यातील फळे खायला दिली असता ते म्हणतील, "अशी फळे आम्हाला
पूर्वी दिली गेली होती." कारण पूर्वी अशाच गोष्टी त्यांना मिळाल्या
होत्या. तिथे त्यांच्यासाठी पवित्र जोडीदार असतील आणि त्यांच्यासह ते
तिथे कायमचे राहू लागतील.

२६ चिलट किंवा तशाच एखाद्या लहानशा कीटकाचे प्रतिकात्मक
उदाहरण देण्यास ईश्वर कधीही संकोचत नाही. आपल्या पालनकर्त्याने
मांडलेले हे सत्य असल्याचे श्रद्धावंत जाणतात. पण सत्य नाकारणारे
विचारतात, "या एवढ्याशा उदाहरणातून ईश्वराला काय साधायचे
असेल?" या छोट्याशा उपदेशात्मक उदाहरणातून ईश्वर अनेकांना
मार्गदर्शन करतो, तर काहींना त्यापासून दूर जाऊ देतो. पण आज्ञा भंग
करणाऱ्यांनाच तो सन्मार्गापासून लांब जाऊ देतो.

२७ ईश्वरापुढे प्रतिज्ञा करूनही वचनभंग करणारे, त्याने जोडायला

सांगितलेले तोडणारे आणि भूतलावर दुर्वर्तन करणारे पराभूत आहेत. त्यांनी खूप काही गमावले आहे. २८ तुम्ही निर्जीव होता, त्यानेच तुम्हाला जीवित केले. असे असताना तुम्ही ईश्वरावर अविश्वास कसा दाखवू शकता? आणखी एकदा तो तुम्हाला निष्प्राण करेल आणि पुन्हा एकदा तुमच्यात प्राण भरेल. त्यानंतर तुम्हाला त्याच्याकडेच परत आणले जाईल. २९ या पृथ्वीतलावरील प्रत्येक गोष्ट त्यानेच तुमच्यासाठी निर्माण केली. त्यानंतर तो आकाशाच्या निर्मितीकडे वळला आणि सप्त (थरांच्या) रूपात आकाशाची मांडणी केली. त्याला सगळ्या गोष्टीचे ज्ञान आहे.

३० तुमच्या पालनकर्त्याने देवदूतांना[अ] सांगितले, ''मी पृथ्वीवर एक वारसदार वसवणार आहे (मानवी वारसा चालवणार आहे).'' यावर देवदूतांनी त्याला विचारले, ''आम्ही तर तुझ्या स्तुतीने तुझे महिमागान करतो आणि तुझ्या पावित्र्याचे गुणगान करतो. पण तेथे अनाचार माजवून रक्तपात घडवणाऱ्या माणसांनाही तू वसवणार आहेस का?'' यावर (ईश्वरने) उत्तर दिले, ''नक्कीच, मला तेही माहित आहे जे तुम्हाला

[अ]कुरआनमध्ये काही विशिष्ट निर्मितींचा उल्लेख आढळतो, जसे मलायका (म्हणजे फरिश्ते, देवदूत किंवा Angels), जिन्न आणि मानव आदि. मलायका किंवा देवदूतः प्रकाशापासून ही अदृश्य निर्मिती आहे. कुरआननुसार ईश्वराची स्तुति करण्याच्या आणि त्याच्या आदेशांचे पालन करण्याच्या उद्देशाने त्यांना मानवापूर्वी निर्माण केले गेले होते. इस्लामिक श्रद्धेनुसार, देवदूत ईश्वराकडून मानवतेला संदेश घेऊन येतात, सैतानांपासून बचाव करतात आणि नैसर्गिक घटना घडवतात. अशा अनेक वेगवेगळ्या भूमिका ते पार पाडत असतात. ते अदृश्य आहेत. तथापि, ते विशेष प्रसंगी स्वतःला मानवासमोर प्रकट करू शकतात. एक उदाहरण म्हणजे देवदूत गॅब्रिएलने प्रेषित मुहम्मद यांच्यासमोर स्वतःला प्रकट केले होते. यांचे वास्तव्याचे ठिकाण स्वर्ग आणि पृथ्वी आहे. जिन्नः अग्नीपासून ही अदृश्य निर्मिती आहे.

माहित नाही.'' ३१ ईश्वरने सगळी नावे आदमला (ऐडमला) शिकवली. नंतर त्याने त्यांना आपल्या देवदूतांसमोर पेश केले आणि त्यांना विचारले, ''तुम्ही सच्चे असाल तर या सगळ्यांची नावे मला सांगा. यांची खरी नावे तुम्हाला ओळखता येतील का?'' ३२ यावर देवदूत म्हणाले, ''तुझा महिमा अगाध आहे! तू आम्हाला शिकवलंस तेवढेच आम्ही जाणतो. त्याच्याव्यतिरिक्त आम्हाला काहीही माहित नाही. तू सर्वज्ञानी, बुद्धिमान आहेस.''

३३ यानंतर ईश्वराने आदमला सांगितले, ''आदम! तू यांना या लोकांची नावे सांग.'' आदमने त्यांची नावे सांगताच ईश्वर देवदूतांना म्हणाला, ''मी तुम्हाला सांगितले नव्हते का आकाशातील आणि पृथ्वीवरील सगळी गुपिते मला माहीत आहेत. तुम्ही काय लपवता आणि काय उघड करता तेही मी जाणतो.''

३४ आम्ही देवदूतांना म्हटले, ''आदमला नम्रपणे वाकून वंदन करा.'' यावर इब्लीस सोडून सगळ्यांनी त्याला वंदन केले. इब्लीसने मात्र अहंकाराने याला नकार दिला आणि तो अश्रद्ध बनला.

३५ आम्ही आदमला सांगितले, ''तुझ्या पत्नीसह स्वर्गात रहा आणि मनमुरादपणे हवे ते खा, पण या झाडाच्या जवळपासही जाऊ नको. असे केल्याने कदाचित तू दुर्वर्तनी ठरशील.'' ३६ पण सैतानाने आदमला व त्याच्या पत्नीला (ईश्वराच्या) सांगण्याप्रमाणे वागू दिले नाही, त्यामुळे त्या दोघांना त्यांचे पूर्वीचे मानाचे स्थान गमवावे लागले. नंतर आम्ही त्यांना सांगितले, ''एकमेकांचे शत्रू म्हणून तुम्ही येथून पृथ्वीवर जा तिथे काही काळ तुमचा निवास राहील आणि उदरनिर्वाहही तिथेच होईल.'' ३७ यावर आदमने ईश्वराकडून (प्रार्थनेचे) काही शब्द शिकून घेतले. पालनकर्त्याने त्याच्या पश्चातापाचा स्वीकार केला. तो क्षमाशील व दयाळू आहे.

३८ आम्ही त्यांना सांगितले, "तुम्ही सर्वजण येथून खाली उतरा. यानंतर
जेव्हा तुम्हाला माझ्याकडून मार्गदर्शन मिळेल, तेव्हा माझ्या मार्गदर्शनानुसार
वागणाऱ्याला काही भीती किंवा दुःख उरणार नाही." ३९ आमचे मार्गदर्शन
अमान्य करून सत्य नाकारण्यावर ठाम असणारे नरकाग्नीचे निवासी
होतील, तिथेच त्यांना कायमचे वास्तव्य करावे लागेल.

४० हे इस्त्राएलच्या मुलांनो! मी तुमच्यावर केलेल्या उपकारांचे स्मरण
ठेवा आणि मला दिलेल्या वचनाची पूर्तता करा. मीही तुम्हाला दिलेले वचन
पाळणारच आहे. फक्त माझेच भय बाळगा. ४१ मी तुमच्यासाठी पाठवलेल्या
संदेशावर विश्वास ठेवा आणि त्यातील सत्य नाकारणाऱ्यांचे अग्रणी होऊ
नका. या संदेशातून मी तुम्हाला आधी दिलेले सत्य प्रमाणित झाले आहे
(ते सत्य म्हणजेच धर्मग्रंथातून वर्तवलेले अंतिम प्रेषितांविषयीचे भाकीत).
क्षुल्लक फायद्यासाठी माझ्या साक्षात्काराचा सौदा करू नका. फक्त माझेच
भय बाळगा. ४२ खऱ्या-खोट्याची सरमिसळ करू नका किंवा सत्य माहीत
असतानाही ते लपवून ठेवू नका. ४३ नियमितपणे प्रार्थना करा, ज़कात
(निश्चित प्रमाणात अनिवार्य दानधर्म) द्या आणि (नमाज़मध्ये) ईश्वराला
वंदन करणाऱ्यांबरोबर तशाच पद्धतीने वंदन करा. ४४ तुम्ही इतरांना चांगले
वागायला निक्षून सांगता आणि स्वतः मात्र तसे वागायला विसरता? तुम्ही
ईश्वरी ग्रंथाचे वाचन करता. तरीही तुम्ही बुद्धीचा वापर करणार नाही का?
४५ संयमाने आणि प्रार्थनेने (ईश्वराकडे) मदत मिळवायचा प्रयत्न करा.
खरोखरच ही कठीण शिस्त आहे, पण विनम्रता अंगी असणाऱ्यांसाठी,
४६ तसेच आपल्याला ईश्वराला भेटायचे आहे आणि त्याच्याकडे परत
जायचे आहे, हे निश्चितपणे जाणणाऱ्यांना मात्र ही शिस्त कठीण वाटणार
नाही.

४७ हे इस्त्राएलच्या मुलांनो! मी तुम्हाला दिलेल्या आशीर्वादांचे स्मरण

ठेवा आणि समस्त जनमाणसांपेक्षा तुम्हाला अधिक मानाचे स्थान दिले होते, हे लक्षात ठेवा. ४८ ज्या दिवशी कुणीही एकमेकांच्या उपयोगी पडणार नाही, कुठलीही मध्यस्थी किंवा मुक्ततेसाठी कोणतीही किंमत स्वीकारली जाणार नाही आणि कसलीही मदत मिळणार नाही, त्या (निवाड्याच्या) दिवसापासून स्वतःचे रक्षण करा. ४९ फारोचे (Pharaoh, फिरऔन) लोक तुमचा भयानक छळ करत होते. तुमच्या मुलांची हत्या करत होते तर फक्त मुलींना जिवंत ठेवत होते. अशा वेळी त्यांच्यापासून आम्ही तुमची सुटका केली होती याचे स्मरण करा. या प्रसंगी तुमच्या पालनकर्त्याने तुमची कठोर सत्वपरीक्षा घेतली होती यात काही शंका नाही. ५० त्याप्रसंगी तुमच्यासाठी समुद्र दुभंगून आम्ही तुम्हाला वाचवले तर तुमच्या डोळ्यांदेखत फारोच्या लोकांना जलसमाधी दिली. ५१ मोझेसला चाळीस रात्रींसाठी आम्ही (सिनाई पर्वतावर) बोलावून घेतले होते. त्याच्या अनुपस्थितीत वासरू पूजनाची प्रथा सुरू करून तुम्ही पापी बनलात. ५२ तरीही त्यानंतर आम्ही तुम्हाला माफ केले, यासाठी तुम्ही कृतज्ञ असले पाहिजे. ५३ तुम्हाला योग्य मार्गदर्शन लाभावे यासाठी आम्ही मोझेसला पवित्र ग्रंथ दिला आणि (चूक-बरोबर यात फरक करण्याची) कसोटी दिली, याचे स्मरण करा. ५४ मोझेसने आपल्या लोकांना सांगितले, "लोकहो! वासराची पूजा करून तुम्ही खरोखरच अपराध केला आहे. तेव्हा तुमच्या निर्मात्यापुढे पश्चाताप व्यक्त करा आणि तुमच्यापैकी जे गुन्हेगार आहेत त्यांना देहांताची सजा द्या. तुमच्या निर्मात्याच्या नजरेत तुमची ही कृती सर्वोत्तम ठरेल." त्यावेळीही ईश्वराला दयेचा पाझर फुटला. तो क्षमाशील आणि दयाळू आहे. ५५ "मोझेस! ईश्वराला स्वतःच्या डोळ्यांनी पाहिल्याशिवाय आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवणार नाही" असे तुम्ही बोलला होता. त्यावेळेस

पाहता पाहता तुमच्यावर विजेचा लोळ पडला होता, तेव्हा तुम्ही पाहतच राहिलात, याचे स्मरण करा. ५६ मृत्युनंतर आम्ही तुम्हाला पुन्हा जीवित केले होते याविषयी कृतज्ञता बाळगा. ५७ यानंतर आम्ही तुमच्यावर सावली धरण्यासाठी ढगांची योजना केली आणि मन्न व सलवाचे खाद्य तुमच्यासाठी पाठवून सांगितले, "तुमच्यासाठी योजलेल्या आरोग्यदायी व पवित्र अन्नाचे सेवन करा". खरोखर, ते आमचे अपराधी नसून स्वतःचेच अपराधी आहेत.

५८ आम्ही तुम्हाला सांगितले होते, "या भूमीत प्रवेश करा आणि मुक्तपणे तुम्हाला हवे ते खा. प्रवेशद्वारातून नम्रतापूर्वक आत जा आणि प्रार्थना करा, 'हे ईश्वर! आमच्या पापांना क्षमा कर,' याचे स्मरण करा. आम्ही तुमच्या पापांना क्षमा करू आणि चांगले कर्म करणाऱ्यांना संपन्नता आणि सुबत्ता देऊ." ५९ पण दुर्वर्तन करणाऱ्यांनी त्यांना सांगितलेल्या ईशसंदेशात भलताच बदल केला. त्यांनी आज्ञाभंग केल्याने या अपराध्यांसाठी आम्ही आकाशातून शिक्षेची पाठवणी केली. ६० मोझेसने आपल्या लोकांना पाणी मिळावे यासाठी प्रार्थना केली असता आम्ही त्याला सांगितले, "या पाषाणावर तुझ्या काठीने प्रहार कर." त्याच्या प्रहारासरशी पाषाणातून बारा कारंजे उसळले. प्रत्येक जमातीला आपली पाणी पिण्याची जागा माहीत होती. आम्ही त्यांना सांगितले, "ईश्वराने देऊ केलेल्या अन्नपाण्याचे सेवन करा, पण या भूमीत दुर्वर्तन करून अनाचार पसरवू नका." ६१ तुम्ही मोझेसला सांगितले, "हे मोझेस! एकाच प्रकारचे अन्न खाऊन आम्हाला कंटाळा आला आहे, तेव्हा पृथ्वीवर पिकणारी पिके – भाज्या, काकडी, गहू, मसूर डाळ, कांदा आमच्यासाठी पाठवण्याची प्रार्थना तुमच्या पालनकर्त्याकडे करा." यावर मोझेसने उत्तर दिले, "तुम्हाला चांगले अन्न सोडून कदान्न हवे आहे का? तर मग एखाद्या

शहरात जा. तिथे तुम्हाला हवे ते सगळे मिळेल.” ते लोक बंडखोर आणि ईश्वराची आज्ञा मोडणारे होते. त्यामुळे त्यांनी ईश्वराचे संकेत नाकारून अन्यायाने त्यांच्या प्रेषिताचा जीव घेतला. या वागण्यामुळे त्यांनी ईश्वराचा कोप ओढवून घेतला. परिणामी त्यांना मानहानी सोसावी लागली आणि दारिद्र्याला तोंड द्यावे लागले.

६२ मुस्लिम, यहूदी, ख्रिस्ती आणि साबियन यांच्यापैकी ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवणाऱ्या सगळ्यांना आणि सत्कर्मे करणाऱ्यांना– त्यांच्या पालनकर्त्याकडून योग्य मोबदला मिळेल. त्यांना कशाचीही भीती असणार नाही, कसलेही दुःख असणार नाही.

६३ (इस्त्राएलच्या मुलांनो!) आम्ही तुम्हाला शब्द दिला होता आणि पर्वत तुमच्यावर तोलून धरला होता. त्या वेळेस आम्ही तुम्हाला सांगितले होते, “आम्ही तुम्हाला दिलेल्या ग्रंथाला अनुसरून वागा आणि त्यातील आशय नीट लक्षात घ्या. यामुळे दुष्कृत्यांपासून तुम्ही स्वतःचे रक्षण करू शकाल.”

६४ या सांगण्यानंतरही तुम्ही ग्रंथाला अनुसरून वागला नाही, त्यापासून दूर गेलात. ईश्वर दयाळू आणि कृपाळू आहे, नाहीतर या अपराधामुळे नक्कीच तुमचे खूप नुकसान झाले असते. ६५ शब्बाथविषयीच्या आमच्या आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांना आम्ही हे सांगितल्याचे तुम्हाला माहीत आहे, “माकडासारखे होऊन जा, नीच, निंदनीय!” ६६ यानंतर आम्ही त्यांची दैवगती अशी केली, जी त्यांच्या येणाऱ्या पिढ्यांसाठी आणि त्यांचे अनुकरण करणाऱ्यांसाठी बोधदायक ठरेल आणि ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांना त्यातून योग्य धडा मिळेल.

६७ मोझेसने आपल्या लोकांना सांगितले, “ईश्वराने तुम्हाला कालवडचा बळी देण्याची आज्ञा केली आहे,” तेव्हा लोकांनी त्याला विचारले,

"आमची थट्टा करता काय?" यावर मोझेस म्हणाला, "इतका अज्ञानी बनण्यापासून ईश्वर माझे रक्षण करो." ६८ यावर लोकांनी त्याला सांगितले, "ती कालवड कशा प्रकारची असावी हे तुमच्या पालनकर्त्याला स्पष्ट करायला सांगा." उत्तरादाखल मोझेसने सांगितले, "ईश्वर म्हणतो की ती फार वयस्क नसावी आणि फार लहान नसावी, मध्यमवयीन असावी." तेव्हा त्याच्या आज्ञेनुसार वागा. ६९ लोकांनी त्याला पुन्हा विचारले, "तिचा रंग कसा असावा हे तुमच्या पालनकर्त्याला विचारून घ्या." त्याने उत्तर दिले, "ईश्वर म्हणतो की ती कालवड नजरेला सुखावणारी, लख्ख पिवळ्या रंगाची असावी." ७० लोकांनी विचारले, "नक्की कुठल्या प्रकारची कालवड असावी हे तुमच्या पालनकर्त्याला स्पष्ट करायला सांगा, कारण सगळ्या कालवड आम्हाला एकसारख्याच दिसतात. ईश्वराने त्याची इच्छा सांगितली तर आम्हाला अचूक मार्गदर्शन मिळेल." ७१ मोझेसने त्यांना उत्तर दिले, "ईश्वर म्हणतो की जमीन नांगरण्यासाठी किंवा शेताला पाणी देण्यासाठी ती नांगराला जुंपलेली नसावी. ती निर्दोष, परिपूर्ण असावी." यावर लोक त्याला म्हणाले, "आता तुम्ही आम्हाला सत्य सांगितलेत" आणि त्यांनी कालवडचा बळी दिला. खरेतर तशी त्यांची इच्छाच नव्हती. ७२ यानंतर जेव्हा तुम्ही (इस्राएलच्या वंशजांनी) एका व्यक्तीचा वध केला आणि त्याच्या मृत्युबद्दल एकमेकांना दोष देऊ लागला तेव्हा तुम्ही लपवलेल्या गोष्टी ईश्वराने प्रकाशात आणल्या. ७३ आम्ही म्हणालो, "(या मृतदेहावर) कालवडच्या एका भागाने आघात करा." अशा प्रकारे ईश्वर मृताला जीवन देतो आणि तुम्हाला आपले संकेत दाखवतो, हे यासाठी की, तुम्ही बुद्धीचा वापर करणारे बना.

७४ (ईश्वराचे स्पष्ट संकेत मिळाल्यावरही) तुमची अंत:करणे पाषाणाइतकी, किंबहुना त्याहूनही कठीण बनली. कारण काही पाषाणांच्या

गाभ्यातून वेगवान पाण्याचे प्रवाह उसळतात तर काही पाषाणांना भेगा पडून त्यातून झरे खळखळू लागतात. काही पाषाण तर ईश्वराच्या भयाने कोसळतात. तुमची कुठलीही कृती ईश्वरापासून लपून राहत नाही.

७५ त्यांच्यापैकी काहींनी ईश्वराचे शब्द आधीपासूनच ऐकले आहेत आणि त्याचा अर्थ समजल्यावरही जाणूनबुजून त्याचा विपर्यास केला आहे. असे असतानाही त्या लोकांनी तुमच्यावर विश्वास ठेवावा असे तुम्हाला वाटते का? ७६ श्रद्धावंत मुस्लिमांना भेटल्यावर ते म्हणतात, "आम्ही श्रद्धावंत आहोत." पण खासगीत ते एकमेकांशी बोलतात, "ईश्वराने आपल्याला काय साक्षात्कार दाखवला आहे हे त्यांना सांगितलेच पाहिजे का? पालनकर्त्यासमोर आपल्याविरुद्ध वादविवाद करण्यापुरताच ते याचा वापर करतील, हे आपल्याला कळत नाही का?" ७७ ते काय लपवतात आणि काय उघड करतात हे सगळे ईश्वर जाणतो. हे त्यांना माहीत नाही का?

७८ त्यांच्यापैकी काहीजण निरक्षर असून त्यांना धर्मग्रंथांचे खरे ज्ञान नाही. वास्तवापेक्षा ते आपल्या काल्पनिक विचारांना अनुसरतात आणि कोणत्याही प्रमाणाशिवाय आपल्या अंदाजानुसार तर्क लावून त्याप्रमाणे वागतात. ७९ जे लोक धर्मग्रंथ स्वतःच्या हाताने लिहितात आणि क्षुल्लक किमतीला त्याचा सौदा करण्यासाठी "हे ईश्वराकडून आले आहे" असे घोषित करतात, त्यांना मोठ्या संकटाला तोंड द्यावे लागेल. त्यांनी आपल्या हाताने जे लिहिले आहे आणि त्यापासून जे कमावले आहे त्यामुळे त्यांचा विनाश होईल. ८० ते म्हणतात, नरकाग्नी आम्हाला स्पर्शही करू शकणार नाही आणि तसे जरी झाले तरी ते फक्त थोड्या दिवसांपुरते असेल. त्यांना विचारा, ईश्वराकडून तुम्हाला तसे वचन मिळाले आहे

का? कारण ईश्वर आपले वचन कधीही मोडत नाही; की तुम्ही तुम्हाला माहीत नसलेल्या गोष्टींचा संबंध ईश्वराशी जोडत आहात? ८१ खरोखर दुष्कृत्ये करणारे आणि आपल्या गैरकृत्यांनी घेरले गेलेले लोक नरकाग्नीचे रहिवासी असतील, तिथे त्यांना कायमचे रहावे लागेल. ८२ पण जे एकाच ईश्वरावर विश्वास ठेवतात आणि सत्कर्मे करतात ते स्वर्गाचे वारसदार असतील, ते कायम तिथेच राहतील.

८३ इस्राएलच्या मुलांनो! आम्ही तुमच्याकडून घेतलेल्या या पवित्र शपथेचे स्मरण करा: तुम्ही फक्त एका ईश्वराचीच प्रार्थना कराल, पालकांशी, नातेवाईकांशी, अनाथांशी आणि गरजवंतांशी चांगले वागाल. लोकांशी प्रेमळपणाने बोलाल. ईश्वराची नित्य प्रार्थना कराल आणि ज़कात (निश्चित प्रमाणात अनिवार्य दानधर्म) कराल. पण फार थोडे जण वगळता इतरांनी तिरस्काराने या शपथेकडे पाठ वळवली आणि दुर्लक्ष केले.

८४ आम्ही तुमच्याकडून वचन घेतले होते की, "तुम्ही एकमेकांचे रक्त सांडणार नाही की लोकांना त्यांच्या घरातून बेघर करणार नाही." तेव्हा तुम्ही याला मान्यता दिली होती आणि तुम्ही याचे साक्षीदार आहात. ८५ तरीही तुम्ही एकमेकांची हत्या करत आहात, आपल्याच काही लोकांना त्यांच्या मायभूमीतून हाकलून देत आहात, त्यांच्याविरुद्ध त्यांच्या शत्रूंची मदत करत आहात, अशाप्रकारे अपराध आणि अन्याय करत आहात. पण बंदिवान म्हणून ते तुमच्यासमोर आले तर मुक्तिदंड देऊन तुम्ही त्यांची सुटका करता. खरेतर त्यांची हकालपट्टी हे नक्कीच तुमचेच बेकायदेशीर कृत्य होते. तुम्ही पवित्र ग्रंथाच्या काही भागावर विश्वास ठेवता आणि काही भाग नाकारता का? तुमच्यापैकी जे असे वागतात त्यांना या जगात अपमानास्पद वागणूक मिळेल तर पुनरुत्थानाच्या दिवशी कठोर शिक्षेचा

सामना करावा लागेल. आणि जे काही तुम्ही करत आहात, त्याबद्दल ईश्वर मुळीच अनभिज्ञ नाही. [८६] हे असे लोक आहेत जे मृत्युपश्चात (अनंतकालीन) जीवनाची किंमत मोजून या जगातले (क्षणभंगूर) जीवन खरेदी करतात. त्यांची शिक्षा सौम्य केली जाणार नाही की त्यांना कुणाची मदत मिळणार नाही.

[८७] मोझेसला आम्ही पवित्र ग्रंथ दिला आणि त्याच्या पाठोपाठ ईश्वरी संदेश देणाऱ्या प्रेषितांना पाठविले. मेरीचा पुत्र येशूला– आम्ही स्पष्ट ईश्वरी संकेत दिले आणि पवित्र चैतन्याने त्याचे सामर्थ्य वाढवले. पण तुमच्या मनाविरुद्ध जाणारे विचार घेऊन जेव्हा कधी ईश्वराचे प्रेषित तुमच्याकडे आले, तेव्हा त्यांच्याशी तुम्ही उर्मटपणे वागलात. त्यांच्यापैकी काहींना खोटारडे ठरवले, तर काहींची हत्या केली. [८८] आणि यहूदी म्हणतात, "आमच्या हृदयावर असे काही अभेद्य आवरण चढले आहे, की तुमचे बोलणे त्यात शिरू शकत नाही." पण त्यांच्या या नकारामुळे ईश्वरानेच त्यांना नाकारले आहे; त्यांच्याकडे श्रद्धेचा अभाव आहे. [८९] आणि आता त्यांच्याकडे असलेले ज्ञान (धर्मग्रंथातील अंतिम प्रेषिताविषयींचे भाकीत) प्रमाणित करणारा ग्रंथ ईश्वराकडून त्यांच्याकडे आल्यावर ते तो नाकारत आहेत. मात्र "अश्रद्धावंतांवर विजय मिळावा" अशी प्रार्थना करताना पूर्वीपासून त्यांनी याचा वापर केला आहे. तरीही, त्यांच्याकडे आलेले सत्य हे ओळखूनही त्यांनी ते स्वीकारले नाही. सत्य नाकारणारे सगळे ईश्वराकडून नाकारले जाण्याच्या पात्रतेचे आहेत. [९०] ज्यासाठी त्यांनी आपल्या आत्म्याचा सौदा केला आहे ते पाप आहे, आपल्या सेवकांपैकी काहीजणांना निवडून त्यांनाच ईश्वराने आपल्या कृपाप्रसादाची प्रचीती द्यावी हे त्यांना रुचलेले नाही. त्यामुळे असूयेपोटी त्यांनी खुद्द ईश्वराचे साक्षात्कार स्वीकारले नाही. त्यांनी एकापाठोपाठ ईश्वरी प्रकोप ओढवून

घेतले आहेत. सत्य नाकारणाऱ्यांना मानहानीकारक शिक्षा वाढून ठेवली आहे.

९१ "ईश्वराने जे प्रकट केले आहे त्यावर श्रद्धा ठेवा" असे सांगितल्यास ते म्हणतात, "आम्हाला जे प्रकट झाले होते त्यावरच आम्ही श्रद्धा ठेवतो." त्यांच्याकडे अगोदरपासूनच असलेल्या ईश्वरी संदेशाला यातून प्रमाण मिळत असते. तरीही त्यानंतर पाठवलेल्या ईश्वरी संदेशांना ते नाकारतात. त्यांना विचारा, "तुम्ही सच्चे श्रद्धावंत होता, तर भूतकाळात ईश्वराच्या प्रेषितांची हत्या का केलीत?" ९२ मोझेस तुमच्याकडे सुस्पष्ट संकेत घेऊन आला होता, पण त्यांच्या अनुपस्थितीत तुम्ही वासराची पूजा केलीत आणि अपराधी ठरलात. ९३ तुमच्यावर पर्वत उंचावून आम्ही तुमच्याकडून एक वचन मागितले होते, "आम्ही तुम्हाला दिलेल्या संदेशाचे दृढपणे पालन करा आणि त्यातील आशयाकडे लक्ष द्या." यावर तुम्ही म्हणाला होता, "आम्ही तुमचा संदेश ऐकू, पण त्याचे पालन करणार नाही." सत्य स्वीकारण्यास नकार दिल्याने त्यांची अंतःकरणे वासराबद्दलच्या प्रेमाने काठोकाठ भरली होती. त्यांना सांगा, "तुम्ही खरेखुरे श्रद्धावंत असाल तर लक्षात घ्या, तुमचा विश्वास तुम्हाला जे करण्याची आज्ञा देत आहे ते भयंकर वाईट आहे." ९४ त्यांना सांगा, "मृत्युपश्चात जीवनातले ईश्वराजवळचे निवासस्थान इतरांना वगळून फक्त तुमचे एकट्याचेच असेल आणि तुम्ही सत्यप्रिय असाल, तर मृत्युची इच्छा धरा." ९५ आपल्याच हातांनी त्यांनी जे काही पुढे पाठवलेले आहे त्यामुळे ते मृत्यूची इच्छा कदापि करणार नाहीत. ईश्वराकडे या पाप्यांची इत्यंभूत माहिती आहे. ९६ इतर कुणाहीपेक्षा अगदी अनेकेश्वरवाद्यांपेक्षाही ते जीवनाला घट्ट कवटाळून बसल्याचे तुम्हाला आढळेल. त्यांच्यापैकी प्रत्येकाला हजार वर्षांच्या आयुष्याची अभिलाषा

असेल, पण इतके प्रदीर्घ आयुष्यही त्यांना आमच्या शिक्षेपासून वाचवणार नाही आणि ते जे करतात ते सगळे ईश्वर पाहतो.

९७ गॅब्रिएलच्या शत्रूंना (पैगंबर तुम्ही) सांगा: "गॅब्रिएल यांनी ईश्वराच्या आज्ञेवरून हा संदेश (कुरआन) तुमच्या अंतःकरणापर्यंत आणला आहे. या आधी आलेला संदेश (पूर्वीच्या ग्रंथात अंतिम प्रेषिताच्या आगमनाचे भाकित) यातून प्रमाणित होत आहे. श्रद्धावंतांना यातून मार्गदर्शन आणि सुवार्ता मिळेल." ९८ जो कुणी ईश्वराचा किंवा त्याच्या दूतांचा किंवा त्याच्या प्रेषितांचा किंवा गॅब्रिएल (जिब्रील) आणि मिखाएल (मिकाईल) यांचा शत्रू असेल, त्याला हे खचितच आढळेल की ईश्वरही सत्य नाकारणाऱ्यांचा शत्रूच आहे. ९९ आम्ही तुमच्याकडे सुस्पष्ट साक्षात्कार पाठवले असून पापी लोक वगळता कुणीही त्यांना नाकारणार नाही. १०० जेव्हा कधी ते दृढ वचन देतात, तेव्हा त्यांच्यापैकी काहीजण ते दूर का सारतात? त्यांच्यापैकी अनेकजण विश्वास ठेवणारे नाहीत. १०१ त्यांच्याकडे अगोदरपासून असलेल्या भाकिताची पूर्तता करणारा जेव्हा कधी ईश्वराचा एखादा प्रेषित त्यांच्याकडे आला, तेव्हा त्याला आढळले की, ज्यांना ईशग्रंथ दिला होता त्यांच्यापैकी काहींनी त्याकडे अशी काही पाठ फिरवली होती की, जणू त्यांना त्याची काही माहिती नसावी.

१०२ आणि ते त्या गोष्टीच्या मागे लागले, जे सैतान शलमोनच्या (सुलेमानच्या) शासनकाळात (खोटेपणाने शलमोनशी) जोडून पठण करीत असत. शलमोन अश्रद्धावंत नव्हता तर हे सैतानी लोक अश्रद्धावंत होते. ते लोकांना जादूटोणा शिकवीत असत आणि ते त्या गोष्टीच्या मागे लागले जे बॅबीलोनमध्ये दोन ईशदूत हारूत व मारूतवर प्रकट करण्यात आले होते. पण त्या दोघांनी आम्ही परीक्षेच्या स्वरूपात नियुक्त आहोत असे सांगण्याशिवाय कोणालाही काहीही शिकवले नाही. ते म्हणत असत

की, तुम्ही (ईश्वरीय मार्गदर्शनाला) नाकारू नका. पण त्या लोकांनी त्यांच्याकडून ती शिकवण घेतली आणि त्याव्दारे पती-पत्नींत मतभेद निर्माण करून (संसार उध्वस्त करायचे), पण ईश्वराच्या अनुज्ञेशिवाय ते त्याद्वारे कोणालाही इजा पोहोचवू शकत नव्हते. उलटपक्षी ते अशा गोष्टी शिकत होते, ज्यामुळे त्यांचे स्वतःचेच नुकसान होईल, पण लाभ मात्र होणार नाही. ते हे चांगल्याप्रकारे जाणत होते की, जो कोणी हे (जादूटोण्याचे) ज्ञान प्राप्त करेल त्याच्यासाठी मृत्युपश्चात जीवनातील (चांगल्या गोष्टीत) कोणताही वाटा असणार नाही. आणि निश्चितपणे ते वाईट आहे, ज्यासाठी त्यांनी स्वतःच्या आत्म्यांना विकले आहे. त्यांना याची जाणीव असती तर किती बरे झाले असते. [१०३] त्यांनी ईश्वरावर श्रद्धा ठेवली असती आणि त्याचे भय बाळगले असते तर त्यांना ईश्वराकडून खूप चांगले प्रतिफल मिळाले असते. त्यांना याची जर जाणीव झाली असती तर किती बरे झाले असते.

[१०४] श्रद्धावंतांनो! प्रेषितांना 'राईना' न म्हणता 'उनझुर्ना' म्हणा आणि दक्ष राहून त्यांचे बोलणे लक्षपूर्वक ऐका. सत्य नाकारणाऱ्यांना वेदनादायक शिक्षा मिळणारच आहे.[अ] [१०५] या आधी पाठवलेल्या ईश्वरी ग्रंथधारकांपैकी किंवा अनेकेश्वरवाद्यांपैकी जे सत्य नाकारणारे आहेत, त्यांना वाटते की तुमच्या पालनकर्त्याकडून कुठलीही कल्याणकारक, हितकारक गोष्ट तुमच्यासाठी पाठवली जाऊ नये. पण ईश्वर आपल्या कृपेचा वर्षाव करण्यासाठी त्याच्या मर्जीला येईल त्याची निवड करतो. तो असीम

[अ] काही लोक प्रेषितांच्या सहवासात बसून शब्दांशी खेळत, त्यांच्या शिकवणीची थट्टा करत असत. उदाहरणार्थ, निःसंदिग्ध अरबी शब्द 'उनझुर्ना' (आपले लक्ष असावे) वापरण्याऐवजी ते म्हणत 'राईना' म्हणजे 'आमचा मेंढपाळ'.

दानशूर आहे. [१०६] आम्ही एखादे वचन रद्द केले किंवा त्याचा विसर पाडला, तर त्याजागी त्यासारखे किंवा त्यापेक्षा चांगले वचन पाठवतो. ईश्वराला सगळ्या गोष्टींवर प्रभुत्व प्राप्त आहे हे तुम्हाला माहित नाही का? [१०७] आकाशाची आणि पृथ्वीची सत्ता त्याच्याकडेच आहे आणि तुमच्यासाठी संरक्षक किंवा मदतनीस त्याच्याशिवाय दुसरा कुणी नाही हे तुम्हाला माहीत नाही का? [१०८] पूर्वी मोझेसला जसे प्रश्न विचारले गेले तसे तुम्हालाही तुमच्या प्रेषिताला प्रश्न विचारायचे आहेत का? जो श्रद्धेचे रूपांतर अश्रद्धेत करतो तो योग्य मार्गापासून दूर गेलेला आहे.

[१०९] ग्रंथधारकांपैकी अनेकजण असूयेपोटी तुम्हाला पुन्हा एकदा अश्रद्धेकडे नेऊ पाहतात. तुम्ही श्रद्धा आपलीशी केली आहे, तसेच सत्य त्यांच्यासमोर निःसंदिग्धपणे स्पष्ट झाले आहे, तरीही तुम्ही त्यांना क्षमा केली पाहिजे आणि ईश्वराने आपली आज्ञा जाहीर करेपर्यंत त्यांच्याशी संयमाने वागले पाहिजे. खरोखर, ईश्वर सर्वशक्तिमान आहे. [११०] नित्यनेमाने नमाज़रूपी प्रार्थना करा आणि ज़कात (नेमून दिलेला दानधर्म) करा. तुम्ही स्वतःसाठी सत्कर्मांचा जो संचय कराल तो ईश्वराकडे तुमच्यासाठी राखून ठेवला जाईल. तुम्ही जे काही करता ते ईश्वर नक्कीच पाहतो. [१११] ते जाहीरपणे सांगतात, "यहूदी किंवा ख्रिस्ती असल्याखेरीज कुणीही कधीही स्वर्गात प्रवेश करू नये." पण तीही त्यांच्या मनाची इच्छा आहे. (हे प्रेषिता!) त्यांना विचारा, "तुम्ही खरे बोलत असाल तर त्याचा पुरावा द्या." [११२] खरोखर, ईश्वरापुढे शरणागती पत्करणाऱ्यांना आणि सदाचाराने वागणाऱ्यांना त्यांच्या पालनकर्त्याकडून प्रतिफल मिळेल; त्यांना कशाचीही भीती वाटणार नाही, त्यांना कशाचाही शोक होणार नाही.

[११३] यहूदी म्हणतात, "ख्रिस्ती लोकांच्या श्रद्धेला कोणताही वैध आधार नाही" तर ख्रिस्ती म्हणतात, "यहूदी लोकांच्या श्रद्धेला कोणताही

वैध आधार नाही.” तरी बरे, दोघेही पवित्र ग्रंथाचे पठण करतात आणि ज्यांच्याकडे पवित्र ग्रंथाचे ज्ञान नाही तेदेखील असेच म्हणतात. पुनरुत्थानाच्या दिवशी ईश्वर त्यांच्यातील वादविवादाचा निवाडा करेल. [११४] ईश्वराची प्रार्थना करण्याच्या ठिकाणी त्याचा नामोच्चार करण्यास प्रतिबंध करणारा आणि त्याचे प्रार्थनास्थळ उध्वस्त करू पाहणारा, यांच्यापेक्षा अधिक दुष्ट कोण असू शकेल? खरे तर अशा लोकांनी अंतःकरणात ईश्वराचे भय बाळगूनच प्रार्थनास्थळी प्रवेश करणे अपेक्षित होते. त्यांच्यासाठी या जगात मानहानी आहे तर पुढच्या जगात भयंकर शिक्षा. [११५] पूर्व आणि पश्चिमवर ईश्वराची मालकी आहे. जिकडे पाहाल तिकडे ईश्वरच दिसेल. तो सर्वव्यापी आहे आणि सर्वज्ञ आहे. [११६] ते म्हणतात, “ईश्वराला एक पुत्र झाला आहे.” असीम आहे त्याचा महिमा! तो अशा गोष्टींपासून पवित्र आहे. आकाश आणि पृथ्वीवरील सगळ्या गोष्टी त्याच्याच आहेत आणि या सगळ्या गोष्टी त्याच्या आज्ञेचे पालन करतात. [११७] तो आकाश आणि पृथ्वीचा उद्गाता आहे. एखादी गोष्ट निर्माण करायचा निर्णय झाल्यावर तो म्हणतो “अस्तित्वात ये” आणि ती गोष्ट अस्तित्वात येते.

[११८] ज्यांच्याकडे ज्ञानाचा अभाव आहे ते विचारतात, “ईश्वर आमच्याशी बोलत का नाही? आम्हाला त्याचे संकेत दाखवत का नाही?” त्यांच्या आधीच्या लोकांनीही अशीच विचारणा केली होती; त्यांचे सगळ्यांचे विचार एकसारखेच आहेत. दृढ विश्वास ठेवणाऱ्यांसाठी आम्ही आमचे संकेत स्पष्ट केलेले आहेत. [११९] आम्ही सत्यासह तुमची पाठवणी केली असून तुमच्यासोबत सुवार्ता आणि सावधानतेचा इशाराही दिलेला आहे. नरकाग्नीत जाणाऱ्या लोकांसाठी तुम्हाला जबाबदार धरले जाणार नाही. [१२०] त्यांच्या मार्गाचे अनुसरण केल्याशिवाय तुम्ही

ना ख्रिस्तींना संतुष्ट करू शकाल ना यहुदींना. त्यांना सांगा, "ईश्वराचे मार्गदर्शन हेच एकमेव सच्चे मार्गदर्शन आहे." ईश्वराकडून आलेले ज्ञान मिळाल्यानंतरही तुम्ही याच लोकांच्या इच्छेनुसार वागलात, तर त्याच्या कोपापासून वाचण्यासाठी तुम्हाला ना कुणी आश्रयदाता मिळेल ना कुणी पाठीराखा मिळेल. १२१ आम्ही ज्यांना हा ईश्वरी ग्रंथ दिला आहे, ते त्याचे तंतोतंत पालन करतात; हे ते लोक आहेत ज्यांचा त्यावर खराखुरा विश्वास आहे, या पवित्र ग्रंथाला नाकारणाऱ्यांचे फार मोठे नुकसान होईल.

१२२ इस्राएलच्या मुलांनो! मी तुमच्यावर केलेल्या उपकारांचे आणि सर्व लोकांवर तुम्हाला दिलेल्या प्रतिष्ठीत स्थानाचे स्मरण करा. १२३ ज्या दिवशी कुणीही एकमेकांच्या उपयोगी पडणार नाही, कुणाच्याहीकडून (कुणाची) सुटका करण्यासाठी काहीही स्वीकारले जाणार नाही, कुणाचीही रदबदली केली जाणार नाही आणि कुणालाही विशेष मदत मिळणार नाही, त्या (निवाड्याच्या) दिवसाला घाबरून रहा. १२४ अब्राहामच्या (इब्राहीमच्या) पालनकर्त्याने त्याची पारख करण्यासाठी त्याला काही आज्ञा दिल्या आणि अब्राहामने त्यांचे तंतोतंत पालन केले. यानंतर त्याच्या पालनकर्त्याने त्याला सांगितले, "मी तुला अखिल मानवजातीचा नायक म्हणून नेमतो आहे." अब्राहामने त्याला विचारले, "आणि माझ्या वंशजांचे काय?" पालनकर्त्याने त्याला उत्तर दिले, "माझ्या आज्ञेचे उल्लंघन करणाऱ्यांना हे वचन लागू पडणार नाही."

१२५ आम्ही या घराला (काबागृहाला) लोकांनी प्रार्थनेसाठी एकत्र येण्याचे ठिकाण व त्यांचे आश्रयस्थान बनवले. आम्ही त्यांना सांगितले, "पूर्वी जिथे अब्राहामचे वास्तव्य होते तिथे प्रार्थनेचे स्थान बनवा." आम्ही अब्राहाम व इश्माएल (इस्माईल) यांना आज्ञा दिली, "या घराभोवती प्रदक्षिणा करणाऱ्यांसाठी, भक्तिभावाने तिथे थांबलेल्यांसाठी, प्रार्थनेत

वाकून नमन करणाऱ्यांसाठी आणि नतमस्तक होणाऱ्यांसाठी, माझे घर पवित्र करा." १२६ तेव्हा अब्राहामने प्रार्थना केली, "हे पालनकर्त्या! या शहराला शांतीचे माहेरघर बनव. इथे निवास करणाऱ्यांपैकी जे ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवतात त्यांच्यासाठी फळांची व्यवस्था कर." यावर ईश्वराने सांगितले, "सत्य नाकारणाऱ्यांनाही मी काही काळासाठी सगळे लाभ देईन पण नंतर मात्र त्यांना नरकाग्नीची शिक्षा भोगायला लावेन, जिथे त्यांना दुरवस्थेत रहावे लागेल."

१२७ अब्राहाम आणि इश्माएल यांनी या काबागृहाची पायाभरणी करताना ईश्वराकडे प्रार्थना केली, "हे पालनकर्त्या! आमच्याकडून ही सेवा स्वीकार कर. तू सर्व ऐकणारा, सर्व जाणणारा आहेस. १२८ हे पालनकर्त्या! आम्हाला तुझा नम्र आज्ञाधारक बनव आणि आमच्या वंशजांचा असा समाज बनव जो तुझ्या आज्ञेत राहील. आम्हाला तुझ्या प्रार्थनेच्या विधींची शिकवण दे आणि आमच्यावर कृपादृष्टी ठेव. तू दयाशील, क्षमाशील आहेस. १२९ हे पालनकर्त्या! लोकांसमोर तुझे संदेश प्रकट करण्यासाठी, त्यांना ईश्वरी ग्रंथाची आणि शहाणपणाची शिकवण देण्यासाठी व त्यांचे चित्त शुद्ध करण्यासाठी त्यांच्यामधूनच पैगंबराची पाठवणी कर. तू सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहे."

१३० निर्बुद्ध सोडला तर दुसरा कोण अब्राहामच्या धर्मापासून दूर जाईल? या जगात आम्ही त्याची निवड केली आणि मृत्युपश्चात जीवनात तो सदाचरणी लोकांमधला असेल. १३१ जेव्हा त्याच्या पालनकर्त्याने त्याला आज्ञा दिली, "शरण ये!" तेव्हा त्याने प्रतिसाद दिला, "या विश्वाच्या स्वामीला मी शरण गेलेलो आहे." १३२ अब्राहामप्रमाणे याकोबनेही (याकूब) आपल्या मुलांना उपदेश केला, "हे माझ्या पुत्रांनो! ईश्वराने तुमच्यासाठी या धर्माची निवड केली आहे, तेव्हा ईश्वरापुढे

संपूर्ण शरणागती पत्करलेल्या अवस्थेतच तुम्हाला मृत्यू येऊ दे.” १३३ याकोबच्या मृत्युसमयी तुम्ही हजर होता का? त्यावेळी त्याने आपल्या मुलांना विचारले होते, “माझ्यानंतर तुम्ही कोणाची आराधना कराल?” यावर त्यांच्या मुलांनी उत्तर दिले, “आम्ही तुमच्या आणि अब्राहाम, इश्माएल आणि इसहाक या तुमच्या पूर्वजांच्या ईश्वराचीच आराधना करू. आम्ही त्यालाच समर्पित झालेलो आहोत.” १३४ त्या लोकांनी आता या जगाचा निरोप घेतला आहे. त्यांचे कर्म त्यांचे आहे, तर तुमचे कर्म तुमचे. त्यांच्या कृत्यांसाठी तुम्हाला जबाबदार धरले जाणार नाही.

१३५ ते म्हणतात, “यहूदी व्हा किंवा ख्रिस्ती व्हा म्हणजे तुम्हाला सन्मार्ग मिळेल.” त्यांना सांगा, “कदापि नाही! अब्राहामच्या श्रद्धेवर आमचा विश्वास आहे, ज्याने स्वतःला एकाच ईश्वराच्या स्वाधीन केले होते. तो अनेकेश्वरवाद्यांपैकी नव्हता.” १३६ त्यांना सांगा, “आमचा ईश्वरावर आणि आमच्यासमोर जे ईश्वरी संदेश प्रकट झाले त्यावर विश्वास आहे. अब्राहाम, इश्माएल, इसहाक आणि याकोब आणि त्यांचे वंशज यांच्यावर जे प्रकट झाले त्यावर आमचा विश्वास आहे, आणि मोझेस व येशूसह इतर प्रेषितांना त्यांच्या पालनकर्त्याकडून जे संदेश दिले गेले त्यावर आमचा विश्वास आहे. त्यांच्यात आम्ही काही भेदभाव करत नाही. आम्ही ईश्वराला समर्पित झालो आहोत.” १३७ तुम्ही जसा विश्वास ठेवलात तसा त्यांनीही ठेवला, तर नक्कीच त्यांना अचूक मार्गदर्शन लाभले आहे; पण त्यांनी याकडे पाठ फिरवली तर समजा ते वैरभावाच्या गर्ते त सापडले आहेत. ईश्वर त्यांच्यापासून तुमचे रक्षण करण्यास नक्कीच समर्थ आहे, कारण तो सर्व काही ऐकणारा, सर्व जाणणारा आहे. १३८ त्यांना सांगा, “आम्ही ईश्वराच्या रंगात रंगून जातो, त्याच्यापेक्षा चांगला रंग कुणाकडे आहे? आम्ही फक्त त्याचीच प्रार्थना करतो.”

१३९ त्यांना विचारा, "ईश्वर आमचाही पालनकर्ता आहे आणि तुमचाही, तरीही त्याच्यावरून आमच्याशी वाद का घालता? आमची कर्मे आमच्यापाशी, तुमची कर्मे तुमच्यापाशी. आम्ही पूर्णपणे त्यालाच समर्पित आहोत." १४० अब्राहाम, इश्माएल, इसहाक, याकोब आणि त्यांचे सगळे वंशज, यहूदी किंवा ख्रिस्ती होते, असा तुमचा दावा आहे का? त्यांना विचारा, तुम्हाला जास्त ज्ञान आहे की ईश्वराला? ईश्वराकडून दिली गेलेली साक्ष (पाठवलेले सत्य) लपवून ठेवणाऱ्यापेक्षा जास्त अन्यायी कोण असू शकतो? तुम्ही जे करता ते ईश्वराला कळल्यावाचून राहत नाही. १४१ ते लोक आता या जगातून निघून गेलेले आहेत. त्यांची कर्मे त्यांची आहेत आणि तुमची कर्मे तुमची. त्यांच्या कर्माचे स्पष्टीकरण तुम्हाला मागितले जाणार नाही.

१४२ मूर्ख लोक विचारतील, "पूर्वी ज्या दिशेला तोंड करून हे लोक (मुस्लिम लोक) प्रार्थना करत असत, ती दिशा त्यांना कशामुळे बदलावी लागली?" त्यांना सांगा, "पूर्व आणि पश्चिम या सगळ्या दिशा ईश्वराच्याच अंकित आहेत. जो इच्छितो त्यालाच सन्मार्ग दाखवतो." १४३ अशा प्रकारे आम्ही तुम्हाला मध्यस्थ समुदाय बनवले. ज्यायोगे तुम्ही मनुष्यजातीसाठी (सत्याचे) साक्षीदार असाल, तर प्रेषित तुमच्यासाठी (सत्याचे) साक्षीदार असतील. ईश्वराच्या प्रेषिताचे सच्चे अनुयायी आणि त्याच्याकडे पाठ फिरवणारे लोक यांच्यातील फरक स्पष्ट करण्यासाठीच तुम्ही पूर्वी ज्या दिशेला तोंड करून प्रार्थना करत होता ती आम्ही नेमून दिली होती. ही खरोखरच सगळ्यांसाठी कठीण परीक्षा होती, पण ईश्वराचे मार्गदर्शन लाभलेल्यांसाठी मात्र ती कठीण नव्हती. ईश्वर तुमची श्रद्धा कधी वाया जाऊ देणार नाही. माणसांसाठी ईश्वर कृपाळू आणि दयाळू आहे.

१४४ आम्ही तुम्हाला वारंवार आकाशाच्या दिशेने चेहरा वळवताना
पाहिले आहे. म्हणूनच प्रार्थनेसाठी आम्ही तुम्हाला आनंददायक वाटेल
त्या दिशेला वळवू. तेव्हा आता पवित्र काबाच्या दिशेला तुमचा चेहरा
वळवा: जिथे कुठे असाल तिथून त्याकडे तुमचा चेहरा वळवा. ज्यांना
ईश्वरी ग्रंथ दिला गेला त्यांना हे त्यांच्या पालनकर्त्याकडून आलेले सत्य
असल्याचे माहीत आहे. ते जे करतात ते ईश्वरापासून लपून राहत नाही.
१४५ ईश्वरी ग्रंथ दिला गेलेल्यांसमोर तुम्ही हरप्रकारचे प्रमाण सादर केलेत
तरीही, ते तुमची प्रार्थनेची दिशा कधीही स्वीकारणार नाहीत, की तुम्ही
त्यांची प्रार्थनेची दिशा स्वीकारणार नाही; तुमच्यापैकी कुणीही एकमेकांची
दिशा स्वीकारणार नाही. तुम्हाला सगळे ज्ञान दिल्यानंतरही तुम्ही त्यांच्या
इच्छेपुढे मान तुकवली तर नक्कीच अपराधी ठराल. १४६ ज्यांना आम्ही हा
ग्रंथ दिला ते आपल्या मुलांइतकेच या ग्रंथालाही जवळून ओळखतात.
पण त्यांच्यापैकी काहीजण जाणूनबुजून सत्य लपवतात. १४७ सत्य ते आहे,
जे तुमच्या पालनकर्त्याकडून येते. त्यामुळे त्यावर शंका घेणाऱ्यांपैकी होऊ
नका.

१४८ प्रत्येक समूहाची आपली एक दिशा असते, जिकडे तो
वळतो: तेव्हा सत्कर्मे करण्यात एकमेकांशी स्पर्धा करा. तुम्ही कुठेही
असा, ईश्वर तुम्हा सगळ्यांना त्याच्यासमोर आणेल. प्रत्येक गोष्टीवर
ईश्वराचेच वर्चस्व आहे. १४९ जिथून कुठून तुम्ही बाहेर पडाल, तिथून
पवित्र काबाच्या दिशेने तुमचा चेहरा वळवा. हे तुमच्या पालनकर्त्याकडून
आलेले सत्य आहे; तुम्ही जे करता त्याविषयी तो अनभिज्ञ नाही.
१५० जिथून कुठून तुम्ही याल तिथून पवित्र काबाच्या दिशेने तुमचा चेहरा
वळवा, तुम्ही कुठेही असा आपला चेहरा त्या दिशेला वळवा म्हणजे
त्यांच्यापैकी अपराधी लोक वगळता इतरांना तुमच्याविरुद्ध काही मुद्दा

मिळणार नाही. त्यांना घाबरू नका. माझे भय बाळगा म्हणजे तुम्हाला माझ्या कृपेचा परिपूर्ण लाभ मिळेल आणि योग्य मार्गदर्शन लाभेल. १५१ अशाप्रकारे आम्ही खुद्द तुमच्यातील एकाला तुमचे प्रेषित म्हणून तुमच्यात पाठवले आहे. तो तुम्हाला आमच्या साक्षात्कारांची प्रचिती देण्यासाठी, तुमचे अंतःकरण निर्मळ करण्यासाठी आणि तुम्हाला आमच्या ग्रंथाची व शहाणपणाची शिकवण देण्यासाठी आलेला आहे. तो तुम्हाला माहीत नसलेल्या गोष्टीही शिकवणार आहे. १५२ तेव्हा माझे स्मरण ठेवा, मीही तुमचे स्मरण ठेवेन. माझ्या उपकारांची जाणीव ठेवा आणि कृतघ्नपणे वागू नका.

१५३ श्रद्धावंतांनो! संयम व प्रार्थनेच्या माध्यमातून ईश्वराची मदत मिळवण्याचा प्रयत्न करा. ईश्वर निःसंशयपणे संयमी लोकांबरोबर आहे. १५४ ईश्वरी कार्यासाठी मृत्यू पत्करणारे मृत झाले आहेत, असे म्हणू नका. ते जिवंत आहेत, पण तुम्हाला याची जाणीव नाही. १५५ भय, भूक आणि संपत्ती, जीवित व पिकपाण्याची हानी या मार्गांनी आम्ही नक्कीच तुमची परीक्षा घेऊ. प्रतिकूल परिस्थितीत टिकाव धरणाऱ्यांना ही सुवार्ता द्या. १५६ संकट आल्यावर जे म्हणतात, "आम्ही ईश्वराचे असून त्याच्याकडेच आम्हाला परतायचे आहे." १५७ हे असे लोक आहेत ज्यांना त्यांच्या पालनकर्त्याकडून आशीर्वाद आणि कृपा लाभेल; हे ते लोक आहेत जे सन्मार्गावर आहेत!

१५८ सफा आणि मरवा ईश्वराने स्थापित केलेल्या संकेतांपैकी आहेत. एखाद्याने पवित्र काबागृहाची हजयात्रा केली किंवा उमराह करीत असताना, (सफा आणि मरवा) यांची परिक्रमा केली, तर यात आक्षेपार्ह काही नाही. स्वेच्छेने सत्कर्म करणाऱ्यांविषयी ईश्वर गुणग्राही आणि सर्वज्ञ आहे. १५९ आम्ही दिलेला सत्याचा पुरावा आणि साक्षात्कारीत केलेले मार्गदर्शन

पवित्र ग्रंथाद्वारे लोकांसमोर स्पष्ट केले आहे. यानंतरही ते दडपून ठेवणारे ईश्वराकडून नाकारले जातील आणि इतर लोकांकडूनही नाकारले जातील. १६० पण पश्चातापदग्ध होऊन जे आपल्या वर्तनात सुधारणा करतील आणि (साक्षात्कारीत) सत्य स्पष्टपणे सांगतील त्यांच्या पश्चातापाचा मी नक्कीच स्वीकार करेन: त्यांच्यासाठी मी नेहमी सौम्य आणि दयाळू आहे. १६१ (आयुष्यभर) सत्य नाकारून जे त्याच अवस्थेत मरतील, त्यांना ईश्वराचा, देवदूतांचा आणि सगळ्या लोकांचा एकत्रित तळतळाट लागेल. १६२ या तळतळाटाच्या प्रभावाखाली ते कायम राहतील. ना त्यांची शिक्षा सौम्य केली जाईल, ना त्यांना यापासून वाचण्याची उसंत मिळेल.

१६३ तुमचा ईश्वर हा एकमेव ईश्वर आहे. त्याच्याशिवाय दुसरे कुठलेही उपास्य नाही. तो कृपावंत, दयावंत आहे. १६४ आकाश आणि पृथ्वीची निर्मिती, दिवस-रात्रीची अदलाबदल, मानवासाठी उपकारक सामग्री घेऊन जलप्रवास करणारी जहाजे, मृतवत् झालेल्या धरतीला पुनरुज्जीवित करण्यासाठी ईश्वराने आभाळातून केलेला जलवर्षाव, पृथ्वीवर हरत-हेच्या प्राण्यांचे वास्तव्य, वाऱ्याचे झोत, पृथ्वी आणि आकाश यांच्यादरम्यान सेवेसाठी धाडलेले नभ, या सगळ्यात बुद्धीचा वापर करणाऱ्यांसाठी खरोखर (संदेश असलेले) संकेत आहेत.

१६५ तरीही असे काहीजण आहेत जे इतरांना ईश्वराच्या बरोबरीचे मानतात आणि त्यांची ईश्वरासारखी भक्ती करतात. पण श्रद्धावंत ईश्वरावरच सगळ्यात जास्त प्रेम करतात. शिक्षेला सामोरे जाताना अशा पाप्यांना जे पहावे लागेल ते त्यांना आधीच पाहता आले असते तर त्यांना कळले असते, सगळ्यावर ईश्वरालाच वर्चस्व प्राप्त आहे आणि शिक्षा देण्याच्या बाबतीत तो अगदी कठोर आहे. १६६ शिक्षेला सामोरे जाताना ज्यांचे अनुसरण केले जात होते ते लोक आपल्या अनुयायांना सोडून

देतील, त्यांच्याबरोबरचे सगळे बंध तोडून टाकतील. [१६७] त्यांचे अनुयायी म्हणतील, "या जगात पुन्हा एकदा येऊ शकलो तर त्यांच्यासारखेच आम्हीही त्यांच्याबरोबरचे सगळे संबंध तोडून टाकू." अशाप्रकारे त्यांची कृती कडवट खेदाचे आणि पश्चातापाचे कारण ठरल्याचे ईश्वर त्यांना दाखवून देईल. नरकाग्नीतून ते कधीही बाहेर पडणार नाहीत.

[१६८] लोकहो! पृथ्वीतलावर जे वैध आणि आरोग्यदायी आहे त्यांचेच सेवन करा. आणि सैतानाच्या पावलावर पाऊल ठेवू नका कारण खरोखर तो तुमचा उघड शत्रू आहे. [१६९] तो तुमच्याकडून फक्त अपकृत्यांची, घृणास्पद कृत्यांची मागणी करतो आणि तुम्हाला ज्याचे ज्ञान नाही अशा गोष्टींचा संबंध ईश्वराशी जोडायला लावतो. [१७०] "ईश्वराने तुमच्यासाठी पाठवलेल्या सत्याला अनुसरून वागा" असे सांगितल्यावर ते म्हणतात, "आम्ही आमच्या वाडवडिलांचाच मार्ग अनुसरू." खरेतर त्यांच्या वाडवडिलांनी बुद्धीचा, विवेकाचा वापर केला नव्हता आणि त्यांना (ईश्वराकडून) मार्गदर्शनही लाभले नव्हते. [१७१] जे सत्य नाकारतात ते जनावरांसारखे आहेत. तुम्ही त्यांना हाक दिली असता त्याचा अर्थ न कळता, त्यांना फक्त आवाज ऐकू येतो. ते मुके, बहिरे आणि आंधळे आहेत. ते बुद्धीचा वापरच करत नाहीत. त्यांना काहीही कळत नाही.

[१७२] श्रद्धावंतांनो! आम्ही तुमच्यासाठी देऊ केलेल्या आरोग्यदायी वस्तूंचे सेवन करा आणि ईश्वराचे खरे उपासक असाल तर त्याचे आभार माना. [१७३] त्याने तुम्हाला मेलेल्या प्राण्यांचे मांस, रक्त, डुकराचे मांस आणि ईश्वराखेरीज अन्य कुणाला तरी वाहिलेले मांस एवढेच खाण्यास मनाई केलेली आहे. तरीही एखाद्याने उत्कट इच्छा म्हणून किंवा ईश्वरी आज्ञेचे उल्लंघन करायचे म्हणून नाही, तर अन्य कोणताही पर्याय नसल्याने अपरिहार्यता म्हणून यातला एखादा पदार्थ खाल्ला तर ते पाप नाही. कारण

ईश्वर क्षमाशील आणि दयाळू आहे. [१७४] ईश्वराने साक्षात्कारीत केलेल्या ग्रंथाचा काही भाग जे क्षुल्लक हेतूंच्या पूर्ततेसाठी लपवतात, ते आपल्या पोटात साक्षात अग्नी भरत आहेत. निवाड्याच्या दिवशी ईश्वर त्यांच्याशी बोलणारही नाही की त्यांची शुद्धीही करणार नाही. त्यांना वेदनादायी शिक्षा मिळेल. [१७५] हे असे लोक आहेत ज्यांनी योग्य मार्गदर्शनाऐवजी वाममार्ग निवडला आहे आणि क्षमेऐवजी शिक्षा ओढवून घेतली आहे. नरकाग्नीला ते अजिबात घाबरत नाहीत वाटतं! [१७६] कारण ईश्वराने या पवित्र ग्रंथाच्या सोबतीने सत्य पाठवले आहे, पण ज्या लोकांनी या ईश्वरी ग्रंथाच्या बाबतीत मतभिन्नता दर्शविली, ते निश्चितच (केवळ) दुराग्रहापोटी सत्यापासून दूर निघून गेले.

[१७७] तुम्ही पूर्वेकडे तोंड करता की पश्चिमेकडे याचा सदाचारात समावेश होत नाही. ईश्वरावर, (निवाड्याच्या) अंतिम दिवसावर, त्याच्या दूतांवर, या धर्मग्रंथावर आणि प्रेषितांवर विश्वास ठेवणे हा खरा सदाचार! संपत्तीवर प्रेम असले तरी ती संपत्ती नातेवाईक, अनाथ, गोरगरीब, प्रवासी, याचक यांच्यात वाटून टाकतात, तसेच त्याद्वारे गुलामांची मुक्तता करतात, नित्यनेमाने नमाजरूपी प्रार्थना करतात, दानधर्म करतात, दिलेले वचन पाळतात आणि कठीण प्रसंग, प्रतिकूलता आणि दुःख अशा वेळीही संयम दाखवतात. ते लोक सदाचारी आहेत. खरे श्रद्धावंत असे असतात. ईश्वराचे भय बाळगणारे असे असतात.

[१७८] श्रद्धावंतांनो, खुनाची घटना घडल्यास ईश्वराने त्याची न्यायिक शिक्षा ठरवून दिलेली आहे : मुक्त माणसासाठी मुक्त माणूस, गुलामासाठी गुलाम आणि स्त्रीसाठी स्त्री. मारल्या गेलेल्या व्यक्तीच्या वारसांनी अपराध्याला काही सूट द्यायचे मान्य केल्यास ठरलेला मोबदला तंतोतंत वसूल करावा आणि योग्य प्रकारे त्याचे वाटप करावे, हा नियम ठरवून ईश्वराने तुमचे काम

हलके केले आहे. तुम्हाला सवलत देऊन तुमच्यावर कृपा केली आहे. यानंतर कुणी या नियमाचे उल्लंघन केल्यास त्याला यातनामय शिक्षा मिळेल. १७९ समजूतदार लोकहो, खुनासाठी (न्यायिक) शिक्षा देण्याच्या या नियमात तुमचे जीवन समावले आहे, यामुळे कदाचित तुम्ही ईश्वराविषयी जागरूक राहाल. १८० जेव्हा तुमच्यापैकी कुणाला मृत्यूची चाहूल लागेल आणि संपत्ती मागे ठेवून या जगाचा निरोप घ्यावा लागेल, तेव्हा त्याने आपले मातापिता आणि नातेवाईक यांच्यासाठी न्याय्य पद्धतीने इच्छापत्र तयार करून ठेवावे, असे ईश्वराने निर्धारित केले आहे. ईश्वराची भीती बाळगणाऱ्यांचे हे कर्तव्य आहे. १८१ इच्छापत्रातील तरतुदी ऐकल्यानंतर कुणी त्यात फेरफार केला तर तो त्याचा गुन्हा मानला जाईल. निःसंशय ईश्वर सगळे ऐकणारा, सगळे जाणणारा आहे. १८२ मृत्युपत्र करणाऱ्याकडून पक्षपात किंवा अन्याय केला आहे, असे कुणाला वाटले आणि त्याने संबंधित पक्षांमध्ये तडजोड घडवून आणली तर तो त्याचा गुन्हा नाही. ईश्वर क्षमाशील आणि दयाळू आहे.

१८३ श्रद्धावंतांनो! तुमच्या पूर्वजांप्रमाणेच तुमच्यासाठी उपवास (रोज़ा) निर्धारित केला आहे, ज्यायोगे वाईट गोष्टींपासून तुम्ही आपले रक्षण करू शकाल. १८४ ठराविक दिवसांचे उपवास करा, पण तुमच्यापैकी कुणी आजारी असेल किंवा प्रवासात असेल तर त्याने तितक्याच दिवसांचा उपवास नंतरच्या काळात करावा. एखाद्याला उपवास करण्यात पराकोटीची अडचण असेल तर त्याच्यासाठी भरपाईचा एक मार्ग आहे– गरजू व्यक्तीला (गोरगरिबाला) भोजन देण्याचा. एखादा स्वेच्छेने चांगला वागेल तर त्याला त्याचे उत्तम प्रतिफल मिळेल. पण तुम्हाला हे समजते का, की तुम्ही स्वतः उपवास करणेच जास्त चांगले आहे? १८५ रमजान हा असा महिना आहे जेव्हा मानवाला मार्गदर्शन देण्यासाठी कुरआन

प्रकट झाले. यात मार्गदर्शनाचे निःसंदिग्ध पुरावे आणि सत्य व असत्य यांच्यात फरक करणारे निकष आहेत. तेव्हा तुमच्यापैकी जो कुणी या महिन्यात योग्य स्थितीत असेल त्याने उपवास करावा. पण जो आजारी असेल किंवा प्रवासात असेल त्याने तितक्याच दिवसांचा उपवास नंतरच्या काळात करावा. ईश्वर तुम्हाला सहजता देऊ इच्छितो, कष्ट नाही. ईश्वराने तुम्हाला मार्गदर्शन दिले यासाठी तुम्ही त्याचे गुणगान करावे आणि त्याच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करावी. म्हणून हा संपूर्ण महिनाभर उपवास करावा, अशी त्याची इच्छा आहे.

१८६ माझ्या सेवकांनी माझ्याविषयी विचारणा केल्यास त्यांना सांगा, मी जवळच आहे. कुणी मला केव्हाही साद दिल्यास मी त्याला प्रतिसाद देतो. त्यांनी माझ्याही आदेशाला प्रतिसाद द्यावा आणि माझ्यावर विश्वास ठेवावा, म्हणजे त्यांना योग्य मार्गदर्शन मिळेल. १८७ उपवासाच्या रात्री पत्नीजवळ जाणे तुमच्यासाठी वैध ठरवण्यात आले आहे: त्या तुमच्या पोषाखाप्रमाणे आहेत आणि तुम्ही त्यांच्या पोषाखाप्रमाणे आहात. तुम्ही स्वतःला फसवत असल्याचे त्याने जाणले आणि आपली कृपादृष्टी तुमच्याकडे वळवून तुम्हाला माफ केले. तेव्हा आता तुम्ही त्यांच्या सहवासात जाऊ शकता आणि ईश्वराने तुमच्यासाठी जे नेमून दिले आहे, ते मिळवू शकता. उपवासाच्या काळात काळोख पडल्यापासून ते तांबडे फुटेपर्यंत (सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंत) तुम्ही खाऊपिऊ शकता. दिवसभर मात्र तुम्ही उपवास करावा. मशिदीतील एकांतवासाच्या काळात रात्री पत्नीच्या सहवासात तुम्ही जाऊ नये. या मर्यादा ईश्वराने घातलेल्या आहेत, तेव्हा त्यांच्याजवळ जाऊ नये. अशा प्रकारे दुष्कृत्ये करण्यापासून माणसाने आपला बचाव करावा, यासाठी ईश्वराने आपल्या आज्ञा स्पष्ट केल्या आहेत. १८८ अन्याय्य मार्गांनी एकमेकांची संपत्ती हडप करू नका

आणि इतरांच्या संपत्तीतला हिस्सा कटकारस्थानाने आणि अन्यायाने पदरात पाडून घेण्यासाठी अधिकाऱ्यांना या संपत्तीतून लाच देऊ नका.

[१८९] ते तुम्हाला चंद्रकलांविषयी विचारतात त्यांना सांगा, "लोकांच्या दैनंदिन व्यवहारांचे नियमन करण्याची आणि हज यात्रेची वेळ निश्चित करण्याची ती साधने आहेत." मागच्या दाराने घरात प्रवेश करण्यात काही पावित्र्य नाही; ईश्वराच्या भीतीने दुष्कृत्ये करण्यापासून स्वतःचा बचाव करणाराच खरा सदाचारी होय. तेव्हा पुढच्या दाराने घरात प्रवेश करा आणि ईश्वराचे भय बाळगा म्हणजे तुमची भरभराट होईल. [१९०] तुमच्याविरुद्ध युद्ध छेडणाऱ्यांशी ईश्वरी हेतूने (रक्षात्मक) लढा द्या, पण त्यांच्यावर (स्वतःहून) आक्रमण करू नका. ईश्वराला आक्रमणकारी आवडत नाही यात काही शंका नाही. [१९१] तुमच्याविरुद्ध लढणारे जिथे कुठे आढळतील तिथे त्यांची हत्या करा. जिथून त्यांनी तुम्हाला हाकलून दिले तिथून त्यांचीही हकालपट्टी करा, कारण (धार्मिक) छळ हा हत्येपेक्षाही वाईट आहे. पवित्र मशिदीत (काबागृहात) त्यांनी युद्ध छेडले तरच लढा, अन्यथा त्या पवित्र स्थानी युद्ध करू नका. त्यांनी तुमच्याशी युद्ध केलेच तर त्यांना ठार करा. सत्य नाकारणाऱ्यांचे हेच प्रतिफल आहे. [१९२] पण ते युद्ध करण्यापासून परावृत्त झाले तर ईश्वर नक्कीच क्षमाशील आणि दयाळू आहे. [१९३] धार्मिक छळ (अधर्म) समूळ नष्ट होईपर्यंत आणि धर्म फक्त ईश्वराचाच होईपर्यंत त्यांच्याशी लढा. पण त्यांनी ते (धार्मिक छळ) थांबवले तर मात्र आक्रमणकाऱ्यांशिवाय इतरांशी वैरभावाने वागू नका.

[१९४] पवित्र महिन्यासाठी पवित्र महिना; (जर विरुद्ध पक्षाने पवित्र महिना पाळत लढाई केली नाही तर तुम्हीपण पवित्र महिना पाळा. दोन्ही गटांनी पवित्र महिन्यात शांतता राखावी.) पण त्यांनी या महिन्यात पावित्र्याचा भंग केल्यास (युद्ध केल्यास) त्याचा योग्य बदला घेणे उचित

आहे. या महिन्यात कुणी तुमच्यावर आक्रमण केले तर त्याच प्रमाणात तुम्हीही त्याचा बदला घेऊ शकता. ईश्वराला घाबरून रहा आणि तो त्याच्याविषयी जागरूक राहणाऱ्यांच्या बरोबर आहे हे लक्षात ठेवा. [१९५] ईश्वरी कार्यासाठी संपत्ती खर्च करा: पण स्वतःच्या हातांनी आपला विनाश ओढवून घेऊ नका. सत्कर्मे करा, सत्कर्मे करणारे ईश्वराला आवडतात.

[१९६] ईश्वरासाठी हज आणि उमराह करा. अशी यात्रा करू न शकल्यास तुम्हाला परवडेल त्या प्राण्याचा बळी द्या आणि हा बळी बलिदानाच्या ठिकाणी जाईपर्यंत डोक्याचे मुंडन करू नका. कुणी आजारी असेल किंवा कुणाला डोक्याचा आजार असेल तर त्याने याची भरपाई उपवासाने, बळी देऊन किंवा दानधर्म करून करावी. शांततेच्या काळात कुणी हज आणि उमराहच्या यात्रा एकत्रितपणे केल्या, तर त्याने जमेल त्या प्राण्याचा बळी द्यावा. पण एखाद्याकडे ही अट पूर्ण करण्याची साधने नसतील, तर त्याने यात्रेच्या काळात तीन दिवसांचा आणि यात्रेवरून परतल्यावर सात दिवसांचा, असा एकूण दहा दिवसांचा उपवास करावा. ज्यांचे कुटुंब पवित्र मशिदीच्या (काबागृहाच्या) जवळ वास्तव्य करत नाही, त्यांच्यासाठी हे बंधनकारक आहे. ईश्वराचे भय बाळगा आणि शिक्षा देण्याच्या बाबतीत तो अतिशय कठोर आहे, हे लक्षात ठेवा. [१९७] निर्धारित महिन्यात ही (हज) यात्रा असते. जो या महिन्यात यात्रा करायचे ठरवेल त्याने यात्रेत असताना असभ्य भाषा, दुर्वर्तन आणि भांडण-तंट्यापासून दूर रहावे. तुम्ही जे सत्कर्म कराल ते ईश्वर जाणतो. प्रवासात लागणारी साधनसामग्री आपल्याबरोबर घ्या, पण ईश्वराची जाणीव ही निःसंशय सर्वोत्तम शिदोरी होय. ज्यांना बुद्धीची देणगी लाभली आहे, त्यांनी सदैव माझे भय बाळगावे.

[१९८] हज यात्रेच्या दरम्यान तुमच्या पालनकर्त्याकडून (आशीर्वादरूपी) कृपा मिळवण्याचा प्रयत्न करणे हा काही अपराध नाही. अराफतहून परतल्यानंतर पवित्रस्थानाजवळ (मशअरे हरमजवळ) येऊन ईश्वराचे आणि त्याने दिलेल्या मार्गदर्शनाचे स्मरण करा. त्याचे मार्गदर्शन मिळण्यापूर्वी तुम्ही योग्य मार्गावरून नक्कीच भरकटलेले होता. [१९९] यानंतर यात्रेकरूंचा जथ्था ज्या मार्गाने जाईल त्याच मार्गाने जा. आणि ईश्वराकडे क्षमायाचना करा. ईश्वर क्षमाशील आणि अतिशय दयाळू आहे. [२००] तुमच्यासाठी हज यात्रेचे ठरवून दिलेले विधी पार पाडल्यानंतर जितक्या उत्साहाने पूर्वजांची स्तुती करत होतात, तितक्याच उत्साहाने किंवा त्याहूनही जास्त कळकळीने ईश्वराची स्तुती करा. काहीजण म्हणतात, "हे पालनकर्त्या! या जगातच आम्हाला संपन्नता दे, विपुलता दे." मृत्युपश्चात जीवनात यांच्या वाट्याला काहीही येणार नाही. [२०१] पण काहीजण असेही आहेत जे प्रार्थना करतात की, "या जगात आणि मृत्यूनंतरच्या जगातही आमचे कल्याण कर आणि नरकाग्नीच्या यातनांपासून आमचे रक्षण कर." [२०२] अशाच लोकांना त्यांनी केलेल्या (कर्मरूपी) कमाईमुळे त्यांना चांगला मोबदला मिळेल. ईश्वर (कर्माचा) हिशेब करण्यात अगदी तत्पर आहे. [२०३] नेमून दिलेल्या दिवसात ईश्वराचे स्मरण करा. कारण यात्रेकरूंपैकी कुणी घाईघाईत दोन दिवसात परत फिरेल तर कुणी जास्त दिवस यात्रा करेल. यात दोघांचाही अपराध नाही, पण त्यांच्या मनात ईश्वराचे भय असले पाहिजे. ईश्वराला घाबरून रहा आणि तुम्हा सगळ्यांना त्याच्यासमोर जमा व्हायचे आहे, हे लक्षात ठेवा. [२०४] असेही काहीजण आहेत ज्यांचे या जीवनातील व्यवहारांविषयीचे दृष्टिकोन तुम्हाला सुखावतील. आपल्या मनातील विचारांसाठीच ते अगदी ईश्वराचीही साक्ष देतील, तरीही ते (निरर्थक) वाद घालणाऱ्यांपैकी सर्वात जास्त वाद घालणारे

लोक आहेत. [२०५] जेव्हा तो (लोकांपासून) आपली पाठ फिरवतो, तेव्हा त्याची सगळी धावपळ पिकांचा, गुराढोरांचा विनाश करत या भूमीवर अनाचार माजवण्यात असते. ईश्वराला असा अनाचार आवडत नाही. [२०६] "ईश्वराचे भय बाळग" असे सांगितल्यास तो दुराभिमानाने यास नकार देतो आणि त्यामुळे गैरकृत्य करण्यास प्रवृत्त होतो. त्याच्यासाठी नरक पुरेसे असेल. किती भयावह विसावा आहे तो! [२०७] पण काहीजण असे आहेत जे ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी आपले जीवन समर्पित करतात. आपल्या सेवकांसाठी ईश्वर कनवाळू आहे.

[२०८] श्रद्धावंतांनो! ईश्वरापुढे संपूर्ण शरणागती पत्करा आणि सैतानाच्या मार्गाने जाऊ नका. सैतान तुमचा उघड शत्रू आहे, यात काही शंका नाही.

[२०९] पण तुमच्याकडे आलेल्या स्पष्ट संकेतानंतरही सत्याकडे पाठ फिरवाल तर लक्षात ठेवा, ईश्वर सर्वशक्तिमान व बुद्धिमान आहे. [२१०] ईश्वराने त्याच्या दूतांसह नभाच्या छताखाली उतरून त्यांच्याकडे यावे म्हणजे सगळ्यांचा सोक्षमोक्ष लागेल, याची ते वाट बघत आहेत का? सगळ्या गोष्टी ईश्वराकडेच परत जाणार आहेत. [२११] (इस्राएलच्या) संततीला विचारा, आम्ही त्यांना किती स्पष्ट संकेत दिले होते. ईश्वराकडून आलेल्या संदेशात फेरफार करणाऱ्याला कळेल, ईश्वर शिक्षा देण्यात किती कठोर आहे. [२१२] सत्य अमान्य करणाऱ्यांना आणि त्यावर विश्वास ठेवणाऱ्यांची खिल्ली उडवणाऱ्यांना आकर्षक वाटावी अशीच या जगाची रचना केली आहे, पण ईश्वराचे भय बाळगणारे लोक निवाड्याच्या दिवशी त्यांच्यापेक्षा उच्चस्थानी असतील: ईश्वराच्या इच्छेला येईल त्यांच्यावर तो भरघोस कृपावर्षाव करतो.

[२१३] एकेकाळी संपूर्ण मानवजात हा एकच समाज होता. (पण नंतर लोकांचे आपसात मतभेद झाले.) पुढे ईश्वराने (चांगल्या मोबादल्याची)

सुवार्ता आणि (कठोर शिक्षेचा) इशारा देण्यासाठी पृथ्वीतलावर प्रेषितांची पाठवणी केली. ईश्वराला त्यांच्यातील मतभेदांचा निवाडा करायचा होता, म्हणून त्याने प्रेषितांबरोबर सत्य सामावलेला ग्रंथही पाठवला. ज्यांना धर्मग्रंथ दिला गेला त्यांना त्यातून स्पष्ट संकेतही मिळाले, पण आपसातील शत्रुत्वामुळे त्यांनीच त्यातील सत्य अमान्य केले. इतरांचे ज्या सत्याविषयी मतभेद होते त्या सत्याकडे जाण्यासाठी श्रद्धावंतांना मात्र ईश्वराने मार्गदर्शन केले. त्याच्या कृपेने ज्याला तो इच्छितो त्यालाच सन्मार्गाने नेतो. २१४ तुमच्या पूर्वजांना सोसाव्या लागल्या तशा हालअपेष्टा सोसल्याविना सहजासहजी स्वर्गात प्रवेश मिळेल, असे तुम्हाला वाटते का? दुःख आणि वेदना यामुळे त्यांच्यावर इतकी आणीबाणीची वेळ ओढवली होती की त्या प्रसंगी उपस्थित असलेले प्रेषित आणि श्रद्धावंत हादरून गेले. त्यांच्या तोंडून असे उद्गार उमटले, "ईश्वराची मदत कधी येईल?" निःसंशय, ईश्वराची मदत जवळच आहे.

२१५ (हे प्रेषित!) ते तुम्हाला विचारतील, त्यांनी इतरांवर कसा खर्च करावा? त्यांना सांगा, "तुम्ही जो खर्च कराल तो मातापिता, जवळचे नातलग, अनाथ, गरजू आणि प्रवासी यांच्यासाठी असावा. तुम्ही जे सत्कर्म करता ते ईश्वर जाणतो." २१६ (संरक्षणात्मक) युद्ध हे तुम्हाला नेमून दिलेले कार्य आहे, कदाचित तुम्हाला त्याचा तिटकाराही असेल. तुमच्यासाठी चांगल्या असलेल्या काही गोष्टी तुम्हाला नापसंत असतील तर वाईट असणाऱ्या काही गोष्टी तुम्हाला आवडत असतील: खरे काय ते फक्त ईश्वरच जाणतो, तुम्ही नाही.

२१७ हे प्रेषित, ते तुम्हाला पवित्र महिन्यात लढण्याविषयी विचारतील. त्यांना सांगा, "पवित्र महिन्यात युद्ध करणे हे वाईट आहे, पण लोकांना ईश्वराच्या मार्गाने जाण्यास आडकाठी करणे, ईश्वराला नाकारणे आणि

लोकांना "पवित्र मशिदीतून (काबागृहातून) बाहेर काढणे, या गोष्टी ईश्वराच्या दृष्टीने त्याहूनही जास्त वाईट आहेत, तर धार्मिक छळ देहदंडापेक्षाही भयंकर आहे". त्यांना शक्य झाले तर तुम्ही ईश्वरावरील विश्वास सोडून देईपर्यंत ते तुमच्याशी लढायचे थांबणार नाहीत. तुमच्यापैकी जो कुणी ईश्वरावरील विश्वासापासून दूर जाईल आणि अश्रद्ध म्हणून मृत्यू पावेल, त्याची इहलोकातील आणि परलोकातील सगळी कर्मे निष्फळ होतील, त्याला कायम नरकाग्नीत रहावे लागेल. [२१८] पण ज्यांनी ईश्वरावर विश्वास ठेवला, त्याच्यासाठी आपल्या मातृभूमीचा त्याग केला आणि ईश्वरी कार्यासाठी अपार कष्ट सोसले, ते ईश्वराच्या दयेची आशा ठेवू शकतात; ईश्वर क्षमाशील आणि दयाळू आहे.

[२१९] (हे प्रेषित!) ते तुम्हाला मादक पदार्थ आणि जुगाराविषयी विचारतात. त्यांना सांगा, "या दोहोंत लोकांना थोडासा फायदा दिसत असला तरी ते फार मोठे पाप आहे. त्याच्या फायद्यापेक्षा त्यातून होणारे नुकसान कितीतरी मोठे आहे." (ईश्वरी कार्यासाठी) कुठला खर्च करावा असे लोक तुम्हाला विचारतात. त्यांना सांगा, "सगळा खर्च वजा जाता तुमच्याकडे अतिरिक्त संपत्ती उरेल त्यातून खर्च करा." ईश्वराने आपल्या आज्ञा स्पष्ट केल्या आहेत, जेणेकरून तुम्ही चिंतन करावे, [२२०] या जगावर आणि मृत्युनंतरच्या जगावर. (हे प्रेषित!) ते तुम्हाला अनाथांविषयी विचारतात; त्यांना सांगा, त्यांचे कल्याण करणे हे फार चांगुलपणाचे कृत्य आहे. त्यांच्याबरोबर राहण्यात तुम्हाला काही नुकसान नाही, कारण ते तुमच्या भावांसारखे आहेत. सुधारक कोण आणि अनाचार माजवणारे कोण, ईश्वर हे चांगले ओळखतो. ईश्वराच्या मनात आले असते तर कष्ट सोसायला लावून त्याने तुम्हाला दुखावले असते. निःसंशय, ईश्वर सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान आहे.

२२१ अनेकेश्वरवादी स्त्रिया जोपर्यंत एकाच ईश्वरावर विश्वास ठेवत नाहीत तोपर्यंत त्यांच्याशी विवाह करू नका. अनेकेश्वरवादी स्त्री तुम्हाला आनंददायी वाटत असली तरी एकेश्वरवादी दासी तिच्यापेक्षा चांगली आहे. तसेच अनेकेश्वरवादी पुरुष जोपर्यंत एकाच ईश्वरावर विश्वास ठेवत नाहीत तोपर्यंत त्यांच्याशी श्रद्धाळू स्त्रियांचे विवाह लावून देऊ नका. अनेकेश्वरवादी पुरुषांपेक्षा एकेश्वरवादी गुलाम नक्कीच चांगला, मग तो तुम्हाला कितीही आवडत असू दे. असे लोक तुम्हाला नरकाग्नीकडे बोलावतात तर ईश्वर तुम्हाला स्वर्गाकडे आणि क्षमाप्राप्तीकडे बोलावतो. लोकांनी आपले संदेश सदैव स्मरणात ठेवावे, यासाठी तो ते लोकांसमोर स्पष्ट करतो. २२२ ते तुम्हाला मासिक पाळीविषयी विचारतात. त्यांना सांगा, "ही एक अस्वच्छ अवस्था आहे, तेव्हा मासिक पाळीच्या काळात स्त्रियांशी (संबंध ठेवण्यापासून) स्वत:ला दूर ठेवा आणि त्या स्वच्छ होईपर्यंत त्यांच्याजवळ जाऊ नका. त्या स्वच्छ व शुद्ध झाल्यावर ईश्वराने नेमून दिल्याप्रमाणे तुम्ही त्यांच्याजवळ जाऊ शकतात. पश्चातापपूर्वक ईश्वराकडे वळणारे आणि स्वतःला स्वच्छ ठेवणारे लोक ईश्वराला आवडतात. २२३ तुमच्या पत्नी तुमच्यासाठी शेतीप्रमाणे आहेत, तुमच्या मर्जीनुसार तुम्ही या शेतात प्रवेश करू शकता. स्वत:करिता (चांगले कृत्य) पुढे पाठवा, ईश्वराचे भय बाळगा आणि तुम्ही त्याला भेटणार आहात हे लक्षात ठेवा. श्रद्धावंतांना चांगल्या वार्ता द्या.

२२४ ईश्वराची शपथ घेतल्यावर त्याची खोटी सबब सांगून सत्कर्मे करण्याचे, सदाचाराने वागण्याचे आणि लोकांमध्ये सलोखा साधण्याचे टाळू नका. ईश्वर सगळे ऐकणारा, सगळे जाणणारा आहे. २२५ तुम्ही निर्हेतूकपणे उच्चारलेल्या शपथांचा जाब ईश्वर तुम्हाला विचारणार नाही, पण तुमच्या अंतःकरणातील हेतूविषयी तुम्हाला जबाबदार धरेल. ईश्वर

अतिशय क्षमाशील आणि संयमी आहे. २२६ ज्यांनी आपल्या पत्नीजवळ न जाण्याची शपथ घेतली आहे, त्यांच्यासाठी चार महिन्यांचा प्रतिक्षाकाळ आहे. या काळात समेट घडवण्यासाठी त्यांनी आपली प्रतिज्ञा मागे घेतली तर ईश्वर त्यांना माफ करेल. तो अतिशय क्षमाशील आणि कृपाळू आहे. २२७ पण त्यांनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला तर ईश्वर सर्व ऐकणारा, सर्व जाणणारा आहे. २२८ पतीपासून विभक्त झालेल्या स्त्रियांनी तीन मासिक पाळ्या पार पडेपर्यंत वाट पहावी. ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर त्यांचा विश्वास असेल तर ईश्वराने त्यांच्या उदरात जी नवनिर्मिती केली आहे ती त्यांनी लपवून ठेवणे न्याय्य नाही. या काळात दोघांना समेट घडवायचा असल्यास पतीला पुन्हा एकदा आपल्या पत्नीचा स्वीकार करण्याचा हक्क आहे. या बाबतीत न्याय्य पद्धतीने पत्नींनाही पतीप्रमाणेच हक्क आहे, पण पुरुषांचा दर्जा त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. ईश्वर सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान आहे.

२२९ दोनदा विभक्त होण्याचा उच्चार करता येईल आणि त्यानंतर सन्मानाने तिचा स्वीकार केला जावा किंवा दयाळूपणे तिची मुक्तता केली जावी. तुम्ही पत्नींना जे काही दिले होते, ते विभक्त झाल्यावर त्यांच्याकडून परत घेणे योग्य नाही. ईश्वराने घालून दिलेल्या मर्यादांचे पालन करणे शक्य होणार नाही अशी भीती दोघांना वाटत असेल तर मात्र या स्थितीला अपवाद असू शकतो. अशा परिस्थितीत त्या स्त्रीने पतीपासून मुक्तता मिळवण्यासाठी त्याला काही देण्याचा पर्याय निवडला तर तो या दोघांचाही अपराध नाही. ज्या मर्यादा ईश्वराने घालून दिलेल्या आहेत, त्यांचे उल्लंघन करू नका. ईश्वराने घालून दिलेल्या मर्यादांचे उल्लंघन करणारे अपराधी आहेत. २३० अखेरीस पती-पत्नी एकमेकांपासून विभक्त झाल्यास, त्या स्त्रीने दुसऱ्या पुरुषाशी विवाह केल्याखेरीज पहिला पती तिच्याशी पुनर्विवाह

करू शकत नाही. दुसऱ्या पतीने तिला घटस्फोट दिल्यावर हे पूर्वीचे पती-पत्नी पुन्हा एकदा एकमेकांकडे परतले तर त्याचा दोष या दोघांना लागत नाही. येथे दोघांनीही ईश्वराने घालून दिलेल्या मर्यादांचे भान ठेवण्याची आवश्यकता आहे. या मर्यादा ईश्वराने निर्धारित केलेल्या आहेत आणि सुज्ञ लोकांसाठी त्या स्पष्टही केल्या आहेत. [२३१] एकदा पत्नीपासून विभक्त झाल्यावर (घटस्फोट झाल्यावर) प्रतिक्षेचा काळ संपला की एकतर सभ्यपणे त्यांचा पुनर्स्वीकार करा किंवा सभ्यतापूर्वक त्यांच्यापासून दूर जा. पण त्यांना इजा पोहोचवण्यासाठी किंवा त्यांच्यावर अत्याचार करण्यासाठी त्यांचा पुनर्स्वीकार करू नका. असे करणारा स्वतःच्या आत्म्याशी प्रतारणा करतो. ईश्वराच्या साक्षात्काराची अशी कुचेष्टा करू नका. ईश्वराच्या उपकारांचे, तुमच्या मार्गदर्शनासाठी व तुम्हाला उपदेश देण्यासाठी त्याने प्रकट केलेल्या ग्रंथाचे आणि तुम्हाला दिलेल्या बुद्धिमत्तेचे स्मरण ठेवा. ईश्वराचे भय बाळगा आणि तो सर्वकाही जाणतो, हे लक्षात ठेवा.

[२३२] पत्नीपासून विभक्त झाल्यानंतर आणि प्रतिक्षेचा काळ संपल्यानंतर स्त्रियांना इतर पुरुषाशी विवाह करण्यास आडकाठी करू नका. त्यांनी घेतलेल्या सन्माननीय निर्णयानुसार त्यांना वागू द्या. ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकासाठी हा हुकूम आहे; हे तुमच्यासाठी फार हितकारक आहे, पवित्र आहे. या वस्तुस्थितीची जाणीव ईश्वराला आहे, पण तुम्हाला नाही. [२३३] (घटस्फोटित) मातांना बाळाला दूध पाजायचा कालावधी पूर्ण करायचा असेल तर त्यांनी पूर्ण दोन वर्षे बाळाला स्तनपान द्यावे. या काळात त्या बालकाच्या पित्याला मातेच्या उचित देखभालीसाठी जबाबदार धरले जाईल. कुणावरही त्याच्या कुवतीबाहेरचे ओझे लादले जात नाही. मातेला व पित्याला त्यांच्या

अपत्यांमुळे त्रास सोसावा लागू नये. (त्या अपत्याच्या पित्याचा मृत्यू झाल्यास) पित्याच्या वारसदारांवर अपत्याची जबाबदारी सोपवली जावी. पण परस्परसंमतीने दोघांनीही अपत्याचे स्तनपान थांबवायचे ठरवले, तर त्या दोघांनाही त्याचा दोष लागणार नाही. विचारविनियम करून त्यांनी अपत्याच्या संगोपनासाठी दूधआई नेमायचे ठरवले, तर तो त्या दोघांचाही गुन्हा नाही. पण यासाठी ठरवून दिलेला मोबदला दूधआईला न्याय्य पद्धतीने दिला जावा. ईश्वराला घाबरून रहा आणि तो तुमचा सगळ्या कृतींचे निरीक्षण करतोय, हे लक्षात ठेवा.

२३४ पती-पत्नीपैकी पतीचा मृत्यू झाल्यास त्याच्या विधवा पत्नीने चार महिने आणि दहा दिवस प्रतीक्षा करावी. हा प्रतीक्षेचा काळ संपल्यावर त्या स्वतःविषयी विवेकाने जो निर्णय घेतील त्यासाठी तुम्हाला दोषी धरले जाणार नाही. तुमच्या वागण्याविषयी ईश्वर जागरूक आहे. २३५ या (विधवा किंवा घटस्फोटित) स्त्रियांसमोर विवाहाचा प्रस्ताव ठेवणे किंवा त्यांना हृदयात स्थान देणे हा तुमचा गुन्हा नाही. तुमच्या मनात त्यांचा विचार येईल हे ईश्वराने जाणले आहे. तुमच्या मनात त्यांच्याविषयी प्रेमभाव निर्माण झाल्याचे तुम्ही सूचकपणे त्यांना सुचवू शकता. पण या पलीकडे जाऊन त्यांच्याशी गुप्तपणे संबंध ठेवू नका. त्यांचा प्रतीक्षा कालावधी संपेपर्यंत त्यांच्याशी विवाह करण्याचे पाऊल उचलू नका. लक्षात ठेवा, तुमचे सगळे विचार ईश्वराला कळतात. तेव्हा काळजीपूर्वक वागा आणि ईश्वर क्षमाशील आणि संयमी आहे, हे ध्यानी ठेवा. २३६ विवाहानंतर पत्नीशी संग करण्यापूर्वी किंवा महरची रक्कम ठरवण्यापूर्वी तुम्ही पत्नीला घटस्फोट दिलात तर (महर न देण्यासाठी) तुम्हाला दोषी धरले जाणार नाही, पण त्यांच्यासाठी योग्य तरतूद करा. गरिबांनी आपल्या ऐपतीप्रमाणे आणि श्रीमंतांनी आपल्या ऐपतीप्रमाणे त्यांची सोय करावी.

सदाचारी लोकांसाठी हे बंधनकारक आहे. [२३७] महरची रक्कम निश्चित झाल्यानंतर, पण पत्नीशी संग करण्यापूर्वी त्यांच्यापासून विभक्त झालात तर ठरलेल्या महरच्या निम्मी रक्कम त्यांना द्या. पत्नीने ही रक्कम माफ केली किंवा ज्याच्या हातात विवाहबंध आहे, त्या पतीने सगळी रक्कम द्यायचे मान्य केले तर चांगलेच आहे. आपला हेका सोडून देणे हा सदाचार आहे. विभक्त झाल्यानंतरही त्यांनी एकमेकांशी भलेपणाने वागण्याची एकही संधी सोडू नये. तुम्ही काय करता याकडे ईश्वराचे संपूर्ण लक्ष आहे.

[२३८] प्रार्थनेविषयी (नमाज़विषयी), विशेषतः मधल्या प्रार्थनेविषयी (नमाज़विषयी) जागरूक रहा आणि ईश्वरासमोर नम्रपणे, समर्पित वृत्तीने उभे रहा. [२३९] पायी चालत असताना किंवा एखाद्या प्राण्यावर सवार झालेले असताना, धोकादायक परिस्थिती उद्भवल्यास त्याच स्थितीत ईश्वराची प्रार्थना करा (नमाज़ पढा). त्या धोक्यातून सहीसलामत बाहेर पडल्यावर पुन्हा एकदा ईश्वराचे स्मरण करा. कारण तुम्हाला माहीत नसलेला धडा त्याने तुम्हाला शिकवला आहे. [२४०] तुमच्यापैकी कुणाचा मृत्यू ओढवला आणि त्याच्या पश्चात त्यांच्या विधवा पत्नी असतील तर त्यांना घराबाहेर न काढता वर्षभरासाठी पोटगीची रक्कम दिली जावी. अशी व्यवस्था मृत्युपत्रातून अगोदरच करून ठेवा. पण त्यांनी विवेकाने स्वतःबद्दल काही निर्णय घेतला आणि स्वमर्जीने घर सोडले तर त्यासाठी तुम्हाला दोषी धरले जाणार नाही. ईश्वर सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान आहे. [२४१] घटस्फोटित स्त्रियांसाठीही उदरनिर्वाहाची न्याय्य व रास्त तरतूद केली जावी. सदाचारी लोकांसाठी हे बंधनकारक आहे. [२४२] अशा रीतीने आपल्या आज्ञा तुम्हाला समजाव्यात यासाठी ईश्वराने तुमच्यासमोर त्या स्पष्ट केल्या आहेत.

[२४३] ज्यांनी मृत्यूच्या भीतीने हजारोंच्या संख्येने आपली घरेदारे सोडली,

त्यांना तुम्ही पाहिले नाही का? त्यावेळेस ईश्वराने त्यांना मरण्याचा आदेश दिला. पण नंतर त्यांना जीवितही केले. ईश्वर मनुष्यजातीसाठी निःसंशय उदार अंतःकरणाचा आहे, पण त्यांच्यापैकी बहुतेकजण कृतघ्न आहेत. २४४ ईश्वरी कार्यासाठी (संरक्षणात्मक) युद्ध करा आणि तो सर्व ऐकणारा, सर्व जाणणारा आहे, हे लक्षात ठेवा. २४५ ईश्वराला निःस्वार्थीपणे कोण कर्ज देईल बरे? ईश्वर त्याची कैकपटींनी परतफेड करेल. तुमच्याकडून हिरावून घेणाराही ईश्वरच आहे आणि तुम्हाला मुबलकतेने देणाराही ईश्वरच आहे. तुम्हा सगळ्यांना त्याच्याकडेच परतायचे आहे.

२४६ इस्राएलच्या वंशजांच्या प्रमुखांनी मोझेसनंतरच्या एका प्रेषिताकडे केलेल्या मागणीविषयी तुम्ही ऐकले नाही का? त्यांनी अशी मागणी केली होती: "आमच्यासाठी एका राजाची नेमणूक करा आणि आम्ही ईश्वरी कार्यासाठी लढू." यावर प्रेषितांनी त्यांना विचारले, "तसे करण्याची आज्ञा दिल्यावर तुम्ही लढायला नकार दिलात तर काय करायचे?" यावर त्यांचे उत्तर होते, "आमच्या घरातून मुलाबाळांपासून हाकलून दिले असताना ईश्वरी कार्यासाठी आम्ही न लढायचे कारणच काय?" पण अखेरीस लढण्याची आज्ञा दिली असता फार थोडेजण वगळता, त्या सगळ्यांनी लढायला नकार दिला. या अपराध्यांना ईश्वर जाणतो. २४७ त्यांच्या प्रेषितांनी त्यांना सांगितले, "ईश्वराने आता तुमचा राजा म्हणून तालूतची नेमणूक केली आहे." पण यावर त्यांनी विचारले, "त्याच्यापेक्षा आम्ही राजेपदासाठी जास्त लायक असताना आणि त्याच्याकडे विपुल संपत्तीही नसताना तो कसा आमचा राजा होऊ शकतो?" प्रेषिताने त्यांना सांगितले, "ईश्वराने तुमचा राजा म्हणून त्याला नेमले आणि त्याला अफाट ज्ञान आणि शारीरिक सामर्थ्य देऊ केले. ईश्वराला जो आवडतो त्याला तो राजेपद देतो. ईश्वर सर्वव्यापी आणि सर्वज्ञ आहे." २४८ त्यांच्या प्रेषिताने

त्यांना असेही सांगितले, "त्याच्या सम्राटपदाचे प्रतीक म्हणून तुमच्याकडे (ईश्वराच्या कराराचा) कोश येईल. त्यात तुमच्या पालनकर्त्याकडून पाठवलेली मनःशांती आणि मोझेस व अहरोनच्या परिवाराचे अवशेष असतील. देवदूत हा कोश घेऊन येतील. तुम्ही श्रद्धावंत असाल तर यात तुमच्यासाठी संकेत आहे."

२४९ तालूत आपल्या सैन्यासह मोहिमेवर निघाला, तेव्हा त्याने आपल्या सैनिकांना सांगितले, "एका नदीवरून ईश्वर तुमची परीक्षा घेणार आहे. जो या नदीतील पाणी पिईल तो माझ्याबरोबर नसेल, तर जे पाणी पिणार नाहीत ते माझ्याबरोबर असतील. फक्त ओंजळभर पाणी पिणाऱ्याला मात्र दोषी मानले जाणार नाही." पण त्यांच्यापैकी मूठभर सैनिक वगळता इतर सर्वजण नदीतील पाणी प्यायले. तालूत आणि त्याच्याबरोबरचे श्रद्धावंत नदी पार करून गेल्यावर हे सैनिक म्हणाले, "आज आमच्यात तालूत आणि त्याच्या सैनिकांबरोबर लढण्याची ताकद नाही." पण आपल्याला ईश्वर भेटेल यावर ज्यांचा विश्वास होता ते सैनिक म्हणाले की, "ईश्वराच्या आज्ञेमुळे कित्येक छोटे गट मोठ्या गटांसमोर प्रबळ ठरले आहेत. ईश्वर खरोखर संयमी लोकांची साथ देतो." २५० जालूत आणि त्याच्या सैन्याची गाठ पडल्यावर या सैनिकांनी प्रार्थना केली, "हे पालनकर्त्या! आमचा संयम टिकून राहू दे, आम्हाला युद्धभूमीवर दृढपणे उभे राहू दे आणि सत्य नाकारणाऱ्यांविरुद्ध लढताना आम्हाला तुझी मदत मिळू दे." २५१ आणि ईश्वराच्या आज्ञेवरून त्यांनी विरोधकांचा पराभव केला. दावीदने (दाऊद) जालूतला ठार केले, ईश्वराने त्याला सम्राटपद, बुद्धिचातुर्य आणि त्याला हव्या असलेल्या सगळ्या गोष्टींचे ज्ञान देऊ केले. ईश्वराने काही लोकांकडून इतरांचा पाडाव केला नसता तर या पृथ्वीवर अनाचार माजला असता. पण आपण निर्माण केलेल्या मानवावर ईश्वराचे असीम उपकार आहेत.

२५२ हे ईश्वराचे साक्षात्कार असून ते आम्ही त्यातील सत्यासह जसेच्या तसे तुमच्यासमोर मांडत आहोत, कारण तुम्ही खरोखर त्याच्या प्रेषितांपैकी एक आहात. २५३ या प्रेषितांना आम्ही एकमेकांपेक्षा काही ना काही अतिरिक्त दिले आहे. काहींशी ईश्वराने प्रत्यक्ष संवाद साधला, तर काहींचा दर्जा उंचावला. मरियमचा पुत्र येशू (ईसा इब्ने मरयम) याला आम्ही स्पष्ट ईश्वरी संकेत दिले आणि पवित्र चैतन्याने त्याचे सामर्थ्य वाढवले. ईश्वराची इच्छा असती तर त्यांच्या नंतर आलेले लोक असे स्पष्ट ईश्वरी संकेत मिळाल्यावर एकमेकांशी लढले नसते. पण त्यांच्यात मतभेद झाले. काहींनी श्रद्धा धारण केली, तर काहींनी सत्य स्वीकारण्यास नकार दिला. तरीही ईश्वराच्या मनात असते, तर ते एकमेकांविरुद्ध लढले नसते. ईश्वर तेच करतो, जशी त्याची इच्छा असते.

२५४ श्रद्धावंतांनो! एक दिवस असा येईल जेव्हा देवाणघेवाण, मैत्री, शिफारस यापैकी काही नसेल. तो दिवस येण्यापूर्वी आम्ही केलेल्या तरतुदीतून चांगल्या कार्यासाठी खर्च करा. निःसंशय, सत्य नाकारणारे मोठे अपराधी आहेत. २५५ ईश्वर : एकमेव, चैतन्यमय, शाश्वत सत्य, त्याच्याशिवाय अन्य कुणीही पूज्य नाही. ना कधी त्याला डुलकी येते, ना झोप येते. आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे त्याच्याच मालकीचे आहे. त्याच्या परवानगीशिवाय त्यात कोण हस्तक्षेप करू शकेल? त्याच्यासमोर आणि माघारी जे काही आहे ते सगळे तो जाणतो. ईश्वराकडे असलेल्या ज्ञानापैकी त्याच्या इच्छेला येईल तेवढेच ज्ञान लोक आत्मसात करू शकतात. आकाशात आणि पृथ्वीवर त्याचेच साम्राज्य पसरले आहे. त्याची देखभाल करताना तो थकत नाही आणि तो उदात्त आहे, सर्वशक्तिमान आहे. २५६ धर्मात कसलीही जबरदस्ती नसावी: अचूक मार्गदर्शन चुकीच्या मार्गदर्शनापासून स्पष्टपणे वेगळे झाले

आहे. सैतानाबरोबर वाहवत जायला नकार देऊन, ईश्वरावर विश्वास ठेवणाऱ्यांनी असा भक्कम आधार कमावला आहे, जो कधीही गमावणार नाही. ईश्वर सगळे ऐकणारा आणि सगळे जाणणारा आहे. २५७ ईश्वर श्रद्धावंतांचा आश्रयदाता आहे. तो त्यांना अंधारातून प्रकाशाकडे घेऊन जातो. याउलट सत्य अमान्य करणाऱ्यांचा पाठीराखा सैतान असून तो त्यांना उजेडातून अंधारात लोटतो. ते नरकाग्नीचे वारसदार आहेत. त्यांना कायम तिथेच वास्तव्य करावे लागेल.

२५८ ईश्वरी कृपेने साम्राज्य मिळवल्यावर अब्राहामबरोबर त्याच्या पालनकर्त्यावरून वाद घालणाऱ्याविषयी तुम्ही ऐकले नाही का? यावेळेस अब्राहामने त्याला सांगितले, "माझा पालनकर्ता असा आहे जो जीवनही देतो आणि ते हिरावूनही घेतो." यावर तो अश्रद्धावंत म्हणाला, "मीदेखील जीवनही देतो आणि मृत्यूही देतो." अब्राहामने सांगितले, "ईश्वर सूर्याला पूर्वेकडून आणतो, तर स्वतः तू त्याला पश्चिमेकडून आण." यावर तो अश्रद्धावंत गडबडून गेला. ईश्वर अपराध्यांना मार्गदर्शन करत नाही.

२५९ घरे उध्वस्त झालेल्या नगरावरून जाणाऱ्याविषयी तुम्ही ऐकले आहे का? त्या नगराकडे पाहून तो उद्गारला, "इतक्या विनाशानंतर ईश्वर हे नगर पुन्हा कसे उभे करेल?" यावर ईश्वराने त्याचा अंत केला आणि शंभर वर्षांनी पुन्हा जीवित करून त्याला विचारले, "या मृत अवस्थेत तू किती वेळ होतास?" त्याने उत्तर दिले, "असेल दिवसभर किंवा काही तास." ईश्वराने त्याला सांगितले, "नाही, या अवस्थेत तू शंभर वर्षे होतास." आता तुझ्या अन्न-पाण्याकडे पहा, ते अजिबात सडलेले, कुजलेले नाही. तुझ्या गाढवाकडेही पहा, तेही जसेच्या तसे आहे. तुझ्या माध्यमातून आम्ही मनुष्यजातीसाठी एक संकेत देऊ इच्छितो; सगळ्या प्राणिमात्रांची हाडे पहा - त्यांची एकत्र जुळणी करून आम्ही

त्यावर मांसाचे कसे आवरण चढवले आहे ते पहा!" हे सगळे स्पष्ट झाल्यावर तो इसम म्हणाला, "सगळ्यावर ईश्वराचीच सत्ता असल्याचे मला आता कळले आहे." २६० एकदा अब्राहाम ईश्वराला म्हणाला, "हे पालनकर्त्या! तुम्ही मृत व्यक्तीला पुनर्जीवित कसे करता ते मला पहायचे आहे." ईश्वराने त्याला विचारले, "तुझा माझ्यावर विश्वास नाही का?" अब्राहामने उत्तर दिले, "आहे, माझा तुमच्यावर खरोखर विश्वास आहे, पण फक्त मनाच्या समाधानासाठी मला ते पहायचे आहे." यावर ईश्वराने त्याला सांगितले, "चार पक्षी निवडून घे आणि त्यांना तुझ्याकडे परत यायचे प्रशिक्षण दे. नंतर त्यांना चार वेगवेगळ्या टेकड्यांच्या माथ्यावर नेऊन ठेव आणि तुझ्याकडे बोलाव, जिथून भरारी घेऊन ते तुझ्याकडे परततील. लक्षात ठेव, ईश्वर सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान आहे."

२६१ ईश्वरी कार्यासाठी आपल्या संपत्तीचा विनियोग करणाऱ्याची तुलना धान्याच्या दाण्याशी करता येईल. प्रत्येक बीज अंकुरले की त्याला सात कणसे लागतात आणि प्रत्येक कणसात शेकडो दाणे लगडतात. ईश्वराच्या इच्छेला येईल त्याला तो असेच कैकपटींनी समृद्ध करतो. ईश्वर अमर्याद आणि सर्वज्ञ आहे. २६२ जे ईश्वरी कार्यासाठी आपल्या संपत्तीचा विनियोग करतात आणि दिलेल्या दानावरून संबंधितांना हिणवत नाहीत, त्यांचा अपमान करत नाहीत, त्यांना त्यांच्या पालनकर्त्याकडून चांगले प्रतिफळ मिळेल. त्यांना ना कशाची भीती असेल ना कशाचा शोक असेल. २६३ आपुलकीचा एक शब्द आणि क्षमाशीलता, दुखावणाऱ्या शब्दांसह केलेल्या दानधर्मापेक्षा श्रेष्ठ आहेत. ईश्वर स्वयंपूर्ण आणि संयमी आहे. २६४ श्रद्धावंतांनो! सतत आठवण करून देऊन आणि लागट बोलून केलेला दानधर्म निष्प्रभ करू नका. असे करणे म्हणजे ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास न ठेवता फक्त लोकांना दाखवण्यासाठी संपत्ती

उधळण्यासारखे आहे: असे लोक मातीने लिंपलेल्या पाषणासारखे आहेत. त्यावर पावसाचे पाणी (पाण्याचा प्रवाह) पडताच आतला कठीण पाषाण सताड उघडा पडतो. त्यांच्या या कर्माचे त्यांना काहीही फळ मिळणार नाही. सत्य अमान्य करणाऱ्यांना ईश्वर मार्गदर्शन करत नाही.

२६५ पण आपली संपत्ती ईश्वराची मर्जी राखण्यासाठी आणि आत्मिक सामर्थ्य वाढवण्यासाठी वापरणारे लोक पठारावरील उद्यानासारखे आहेत. जोमदार वृष्टी झाल्यास त्यातील उत्पन्न दुणावते, तर हलका पाऊस पडला तरी (त्यातील झुडुपांसाठी) पुरेसा ठरतो. तुम्ही जे करता ते ईश्वर पाहतो. २६६ समजा, तुमच्यापैकी एखाद्याकडे खजुराच्या, द्राक्षाच्या आणि इतर हरतऱ्हेच्या फळांचा मळा आहे आणि त्याला पाणीपुरवठा करणारी नदीही आहे. पण तो वार्धक्याकडे झुकला आहे आणि त्याची मुले त्याला आधार द्यायला असमर्थ असल्याने तो असहाय झाला आहे. अशावेळी आग ओकणारे चक्रीवादळ होऊन त्या तडाख्याने त्याचा मळा बेचिराख झाला तर त्याला ते आवडेल? अशा रीतीने तुम्ही चिंतन-मनन करावे यासाठी ईश्वर आपले संकेत तुमच्यासमोर स्पष्ट करतो.

२६७ श्रद्धावंतांनो! अशा चांगल्या वस्तूंचे दान करा, ज्या तुम्ही कमावल्या आहेत आणि आम्ही या भूमीतून तुमच्यासाठी उत्पन्न केल्या आहेत. खुद्द तुम्हीही स्वीकारायला नाखूष असाल अशा निकृष्ट वस्तूंचे दान करू नका. ईश्वर स्वयंपूर्ण आणि स्तुत्य आहे, हे लक्षात ठेवा. २६८ सैतान तुम्हाला संभाव्य दारिद्र्याची भीती दाखवतो आणि गलिच्छ कृत्ये करायची प्रेरणा देतो. ईश्वर मात्र तुम्हाला क्षमेचे आणि औदार्याचे आश्वासन देतो. ईश्वर उदार आणि सर्वज्ञ आहे. २६९ ज्याच्यावर ईश्वराची मर्जी येते त्याला तो विवेकपूर्ण शहाणपण देऊ करतो आणि ज्याला विवेकपूर्ण शहाणपण लाभते त्याला खरोखर विपुल संपत्तीचा लाभ होतो.

पण ज्यांना सुज्ञपणाचे वरदान लाभले आहे, ते सोडून इतर कुणीही सदुपदेश ग्रहण करत नाही.

२७० तुम्ही इतरांसाठी जो खर्च करता आणि जे नवस करता ते सगळे ईश्वर जाणतो, पण अपकृत्य करणाऱ्यांना मात्र कुणीही मदतनीस असणार नाही. २७१ तुम्ही उघडपणे दान दिले तर चांगलेच आहे, पण गरजू व्यक्तींना खाजगीत दान दिले आणि ते गुप्त ठेवले तर अधिकच चांगले. यामुळे तुमच्या काही गैरकृत्यांचे शमन होईल. तुम्ही जे करता ते सगळे ईश्वर जाणतो. २७२ (हे प्रेषित!) त्यांना योग्य मार्गाने जायला लावणे ही तुमची जबाबदारी नाही. ईश्वराला जो आवडतो त्याला तो मार्गदर्शन करतोच. तुम्ही इतरांसाठी खर्च करता, त्यात तुमचाच फायदा आहे, पण हा खर्च फक्त ईश्वराची मर्जी संपादन करण्यासाठीच केलेला असावा. ईश्वरी कार्यासाठी तुम्ही जो खर्च कराल त्याचा तुम्हाला परिपूर्ण मोबदला मिळेल आणि तुमच्यावर कधीही अन्याय होणार नाही. २७३ ईश्वराच्या कार्यात स्वतःला पूर्णपणे वाहून घेतलेली गरजू व्यक्ती चरितार्थाच्या शोधात जागोजागी फिरू शकत नाही. अशा गरजूंना दान द्या. त्यांना कशाची हाव नसते की ते कशाची याचना करत नाहीत. त्यामुळे त्यांची निर्धन स्थिती इतरांच्या लक्षात येत नाही. पण त्यांच्या एकूण आविर्भावावरून आपण त्यांना ओळखू शकतो. ते इतरांकडे आग्रहपूर्वक कसल्याही मागण्या करत नाहीत. अशा लोकांसाठी आपल्या संपत्तीतून तुम्ही जो खर्च करता, ते ईश्वर जाणतो. २७४ रात्रंदिवस उघडपणे आणि गुप्तपणे (ईश्वरी कार्यासाठी) आपल्या संपत्तीचा विनियोग करणाऱ्यांना त्यांच्या पालनकर्त्याकडून योग्य प्रतिफल मिळेल. त्यांना ना कशाची भीती असेल, ना कशाचा शोक असेल.

२७५ सावकारीच्या व्याजावर जगणारे लोक निवाड्याच्या दिवशी

ईश्वरासमोर अशा आविर्भावात उभे राहतील की, जणू सैतानाच्या स्पर्शाने भ्रष्ट झाले आहेत. ते म्हणतील, "खरेदी-विक्री हादेखील व्याजाचा प्रकार आहे." पण ईश्वराने व्यापार कायदेशीर बनवला आहे तर सावकारी बेकायदेशीर. त्यामुळे आपल्या पालनकर्त्याकडून ताकीद मिळाल्यानंतर जे सावकारीपासून परावृत्त होतील, त्यांनी भूतकाळात त्यापासून मिळवलेले धन त्यांचे होऊन जाईल आणि त्यांचा निवाडा ईश्वरावर सोपवला जाईल. जे सावकारीकडेच परत वळतील ते मात्र नरकाग्नीचे रहिवासी असतील आणि त्यांना कायम तिथेच वास्तव्य करावे लागेल. २७६ ईश्वर सावकारीला शाप देतो तर दानशूरपणाला आशीर्वाद देतो. कृतघ्न, अपराधी ईश्वराला आवडत नाहीत. २७७ ईश्वरावर विश्वास ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना, नित्यनेमाने प्रार्थना करणाऱ्यांना (नमाज़ पढणाऱ्यांना) आणि दानधर्म करणाऱ्यांना त्यांच्या पालनकर्त्याकडून योग्य प्रतिफल मिळेल. त्यांना ना कशाची भीती असेल, ना कशाचा शोक.

२७८ श्रद्धावंतांनो! ईश्वराची भीती असू द्या आणि खरे श्रद्धावंत असाल तर अद्यापि सावकारीतून मिळवलेले धन तुमच्याकडे असल्यास त्याचा त्याग करा. २७९ कारण, असे केले नाही तर तुम्ही ईश्वराचे आणि त्याच्या प्रेषितांचे शत्रू बनाल. पण तुम्हाला पश्चाताप झाला तर तुमचे मुद्दल परत घेण्याचा तुम्हाला अधिकार आहे. (इतरांवर) अन्याय करू नका म्हणजे तुमच्यावरही अन्याय होणार नाही. २८० कर्जदार हलाखीच्या परिस्थितीत असेल तर त्याची परिस्थिती सुधारेपर्यंत त्याला कर्जफेडीची मुदत द्या. पहा तुमच्या लक्षात येते का, त्याची कर्जाची रक्कम परोपकार म्हणून माफ करून टाकली तर तुमच्यासाठी फार चांगले आहे. २८१ तुम्हाला ईश्वराकडे परत पाठवले जाईल त्या (निवाड्याच्या) दिवसाची भीती बाळगा. तुम्ही जे काही कमावले आहे त्याची या दिवशी संपूर्ण परतफेड केली जाईल; कुणावरही अन्याय होणार नाही.

२८२ श्रद्धावंतांनो! जेव्हा तुम्ही ठराविक मुदतीचा कर्जाचा करार कराल, तेव्हा तो लिहून ठेवा. यासाठी एका लेखनिकाची नियुक्ती करा आणि तुम्हा दोघांसाठी न्याय्य पद्धतीने त्याचे लेखन करा. कुणा लेखनिकाने अशा लिखाणास नकार देऊ नये, कारण ईश्वराने त्याला लेखनकला शिकवली. देणेकऱ्याने कराराचा मजकूर सांगावा. मजकूर सांगताना त्याने त्याच्या पालनकर्त्याची भीती बाळगावी आणि (कर्जाच्या रकमेत) काही वजावट करू नये. कर्जदार मनाने किंवा शरीराने दुबळा असेल, मजकूर सांगायला असमर्थ असेल, तर त्याच्या पालकाने योग्य पद्धतीने त्याच्या वतीने मजकूर सांगावा. करार करताना तुमच्यापैकी दोन पुरुष साक्षीदारांना बोलावून घ्या. दोन पुरुष साक्षीदार मिळाले नाहीत तर तुम्हाला मान्य असेल अशा एका पुरुषाला आणि दोन स्त्रियांना साक्षीदार म्हणून बोलवा. म्हणजे एक स्त्री विसरली तर दुसरी तिला आठवण करून देईल. साक्षीदारांना बोलावणे पाठवल्यास त्यांनी यायला नकार देऊ नये. कर्जाची रक्कम कमी असो किंवा जास्त, पैसे दिल्याच्या तारखेसह रक्कम लिहून ठेवण्यात हलगर्जीपणा करू नका. ईश्वराच्या नजरेतून हे जास्त योग्य आहे, साक्षीसाठी जास्त विश्वासार्ह आहे आणि तुमच्यात शंका उद्भवण्याला अटकाव होण्याची शक्यता जास्त आहे. तात्काळ व्यवहार होऊन हातोहात देवघेव होणार असेल अशा वेळी मात्र तो लिहून ठेवला नाही तरी तुमचा अपराध मानला जाणार नाही. एकमेकांशी व्यवहार करताना साक्षीदार हजर असू द्यावेत, पण साक्षीदारांना किंवा लेखनिकांना काही अपाय होऊ नये. कारण त्यांना काही अपाय झाल्यास तुम्हाला दोषी धरले जाईल. ईश्वराविषयी जागरूक रहा. तो तुम्हाला शिकवण देतो. त्याला प्रत्येक गोष्टीचे संपूर्ण ज्ञान आहे. २८३ तुम्ही प्रवासात असाल आणि लेखनिक म्हणून कुणी साक्षर व्यक्ती मिळाली नाही, तर एखादी

वस्तू तारण ठेवून व्यवहार करा. व्यवहार करणाऱ्या दोघांपैकी एकाने काही गहाण ठेवल्यास विश्वासाने आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगावे आणि तारण ठेवलेली वस्तू तिच्या मालकाकडे सोपवावी. साक्ष कधीही लपवू नका. कुणी साक्ष लपवलीच तर त्याच्या हृदयात कपट असते. तुम्ही काय करता हे ईश्वराला कळते.

२८४ आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे ईश्वराचे आहे. तुमच्या मनातले विचार तुम्ही लपवून ठेवा की उघड करा, ईश्वर तुम्हाला याचा जाब द्यायलाच लावेल. त्याच्या मर्जीला येईल त्याला तो क्षमा करतो आणि मर्जीला येईल त्याला शिक्षा देतो; सगळ्या गोष्टींवर त्याची सत्ता आहे. २८५ त्याच्या पालनकर्त्याने प्रेषिताकडे जे पाठवले आहे त्यावर प्रेषित विश्वास ठेवतो आणि श्रद्धावंतही त्यावर विश्वास ठेवतात. सगळ्या श्रद्धावंतांचा ईश्वरावर, देवदूतांवर, त्याच्या पवित्र ग्रंथांवर आणि प्रेषितांवर विश्वास आहे. ते म्हणतात, "आम्ही ईश्वराच्या कुठल्याही प्रेषितामध्ये भेदभाव करत नाही. त्यांनी सांगितलेले ऐकतो आणि त्याप्रमाणे वागतो. हे पालनकर्त्या! आम्हाला क्षमा कर, आम्हाला तुझ्याकडेच परतायचे आहे." २८६ ईश्वर कुणावरही त्याच्या कुवतीबाहेरचे ओझे लादत नाही. प्रत्येकाने बरेवाईट जे केले असेल, त्याची परतफेड त्याला करावीच लागते. (श्रद्धावंत ईश्वराची प्रार्थना करतात) "हे पालनकर्त्या! आम्ही काही विसरलो किंवा आमच्याकडून काही चूक झाली तर त्याची शिक्षा आम्हाला देऊ नकोस. हे प्रभू! आमच्या आधी होऊन गेलेल्यांवर जसा भार घातलास, तसा आमच्यावर घालू नकोस. हे प्रभू! जो भार पेलायची ताकद नाही असा भार आम्हाला पेलायला लावू नकोस. आम्हाला माफ कर, क्षमा कर आणि आमच्यावर दया कर. तू आमचा पालनकर्ता आहेस, तेव्हा सत्य नाकारणाऱ्यांविरुद्ध आम्हाला मदत कर."

प्रकरण ३ : इमरानचे कुटुंब (आले इमरान)

आरंभ अल्लाहच्या नावाने जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] अलीफ लाम मीम [२] एका ईश्वराशिवाय दुसरा कुणीही पूज्य नाही. तो चैतन्यमय, आधारदायी आहे. [३] ईश्वराने हा ग्रंथ सत्याच्या सोबतीने तुमच्याकडे पाठवला असून त्यातून त्या आधीच्या धर्मग्रंथातील भाकितांची पूर्तता झाली आहे. त्याने तोराह व बायबल यांची पाठवणी केली होती. [४] पूर्वीच्या काळात मानवाच्या मार्गदर्शनासाठी त्यांची पाठवणी केली होती. असत्यापासून सत्य वेगळे करण्याचे प्रमाणही त्याने पाठवले आहे. ईश्वराचे संकेत नाकारणाऱ्यांना निःसंशय कठोर शिक्षा भोगावी लागेल. ईश्वर सर्वशक्तिमान आणि कर्मांचे प्रतिफल द्यायला समर्थ आहे. [५] पृथ्वीवरील किंवा आकाशातील कुठलीही गोष्ट ईश्वरापासून लपलेली नाही. [६] गर्भात असताना आपल्या मर्जीप्रमाणे तुम्हाला आकार देणारा ईश्वरच आहे. त्याच्याशिवाय दुसरा कुणीही पूज्य नाही. तो सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहे.

[७] हा पवित्र धर्मग्रंथ त्यानेच तुमच्याकडे पाठवला आहे. यातील काही वचने सुस्पष्ट आणि नेमक्या अर्थाची आहेत. ती या ग्रंथाची आधारभूत तत्वे आहेत. या ग्रंथातील इतर वचने रूपकात्मक आहेत. ज्यांच्या अंतःकरणात पाप आहे, असे लोक या रूपकात्मक वचनांचा पाठपुरावा करतात आणि त्यांचा अर्थ स्पष्ट करायचा प्रयत्न करून कलह माजवू पाहतात. पण त्यांचा अर्थ ईश्वराशिवाय कुणालाच माहीत नाही. ज्यांच्या ज्ञानाचा पाया पक्का आहे, ते म्हणतात, "यावर आमचा विश्वास आहे. हे सगळे आमच्या पालनकर्त्याकडून आले आहे." पण शहाणेसुरते

लोकच याकडे लक्ष देतात. [८] हे पालनकर्त्या! तुझे मार्गदर्शन लाभल्यानंतर आमचे अंतःकरण त्यापासून विचलित होऊ देऊ नकोस. आमच्यावर तुझा कृपालोभ असू दे. निःसंशय, तू दानशूर दाता आहेस. [९] हे पालनकर्त्या! निवाड्याच्या दिवशी तू समस्त मानवजातीला नक्कीच एकत्र आणशील. हा दिवस येणार यात काही शंका नाही. ईश्वर आपल्या वचनाची पूर्तता करायला कधीही चुकत नाही.

[१०] सत्य नाकारणाऱ्यांची संपत्ती आणि मुलेबाळे ईश्वराविरुद्ध त्यांची मदत करू शकत नाही. असे लोक नरकाग्नीचे जळण होतील. [११] त्यांचा अंत फारोच्या (फिरऔन) लोकांसारखाच आणि त्यांच्याआधी होऊन गेलेल्यांसारखाच होईल. त्यांनी ईश्वराचे संकेत नाकारले, तेव्हा ईश्वराने त्यांना त्यांच्या पापाची अद्दल घडवली. शिक्षा देण्यात ईश्वर कठोर आहे. [१२] सत्य अमान्य करणाऱ्यांना सांगा, "तुम्हाला नामोहरम करून नरकात हाकलून दिले जाईल; या गलिच्छ ठिकाणीच तुम्हाला रहावे लागेल." [१३] (बद्र येथे) समोरासमोर आलेल्या दोन गटांमध्ये तुमच्यासाठी संकेत होता. एक गट ईश्वरी हेतूने लढणाऱ्यांचा होता तर दुसरा गट सत्य अमान्य करणाऱ्यांचा होता. हा दुसरा गट संख्येने पहिल्या गटाच्या दुप्पट होता. हे श्रद्धावंतांनी स्वतःच्या डोळ्यांनी पाहिले. पण ईश्वराच्या इच्छेला येईल तसे त्याला आपली विशेष मदत देऊन तो सामर्थ्यशाली बनवतो. डोळे असणाऱ्या सगळ्यांसाठी यात घेण्यासारखा धडा आहे.

[१४] स्त्रिया, मुलेबाळे, सोन्याचांदीने शिगोशीग भरलेले खजिने, उमदे घोडे, गायीगुरे आणि जमीनजुमला, या ऐहिक इच्छांची तृप्ती करणाऱ्या गोष्टी लोकांना आकर्षून घेतात. या ऐहिक जीवनाच्या तरतुदी आहेत. पण ईश्वराच्या संगतीत राहणे ही त्यांच्यासाठी सर्वोत्कृष्ट निवासव्यवस्था आहे. [१५] त्यांना विचारा, "त्या सगळ्यांपेक्षा तुमच्यासाठी चांगल्या असणाऱ्या

गोष्टी तुम्हाला सांगू का?" ईश्वराचे भय बाळगून त्याच्या सान्निध्यात राहणाऱ्यांसाठी त्यांच्या पालनकर्त्याच्या सोबतीनेच आल्हाददायक बगीचे आहेत. या बगीच्यांमधून नद्या वाहत आहेत. ईश्वराच्या सदिच्छेसह पवित्र जोडीदारांच्या साथीने ते कायमचे या बगीच्यांमध्ये वास्तव्य करतील. ईश्वर आपल्या सेवकांवर सतत नजर ठेवून असतो. [१६] त्याचे सेवक म्हणतात, "हे पालनकर्त्या! आमचा तुझ्यावर विश्वास आहे. आम्ही केलेल्या पापांसाठी आम्हाला क्षमा कर आणि नरकाग्नीच्या शिक्षेपासून आमचा बचाव कर." [१७] त्याचे हे सेवक संयमी, सत्यप्रिय आणि आज्ञाधारक असून ईश्वरी कार्यासाठी आपल्या संपत्तीचा उपयोग करतात आणि पहाट उगवण्यापूर्वी ईश्वराकडे क्षमायाचनेची प्रार्थना करतात.

[१८] एका ईश्वराशिवाय (अल्लाहशिवाय) इतर कुणीही पूज्य नाही, याचा साक्षीदार स्वतः ईश्वर आहे. त्याचबरोबर देवदूत आणि ज्ञानी लोकही याचे साक्षीदार आहेत. ईश्वर न्यायाचा समर्थक आहे. एका ईश्वराशिवाय दुसरा कुणीही उपास्य नाही (हे त्रिकालाबाधित सत्य आहे). तो सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहे. [१९] ईश्वरापुढे संपूर्ण समर्पण पत्करणे हाच ईश्वराच्या लेखी खरा धर्म होय. ज्यांना ईश्वरी ग्रंथ दिला गेला, त्यांनी (ईश्वरी) ज्ञान मिळाल्यानंतरही केवळ वैरभावाने त्यातील सत्याला मान्यता दिली नाही – ईश्वरी संकेत नाकारणाऱ्यांनी हे लक्षात ठेवावे, ईश्वर तत्काळ हिशेब करतो. [२०] ते तुमच्याशी वाद घालू लागले तर त्यांना सांगा, "मी माझे अवघे अस्तित्व ईश्वराला समर्पित केले आहे आणि माझ्या अनुयायांनीही तेच केले आहे." धर्मग्रंथधारकांना, त्याचप्रमाणे निरक्षरांना विचारा, "तुम्ही स्वतःला ईश्वरापुढे समर्पित केले आहे का?" ते ईश्वराला समर्पित झाले, तर ते योग्य मार्गावर आहेत. नाहीतर मग त्यांच्यापर्यंत निरोप पोचवण्यापुरतेच तुमचे कर्तव्य आहे. ईश्वर त्याच्या

सगळ्या सेवकांवर नजर ठेवून आहे. [२१] जे ईश्वराचे संकेत नाकारतात आणि अन्यायाने प्रेषितांची व न्यायाची कास धरणाऱ्यांची हत्या करतात, त्यांना इशारा द्या– यातनामय शिक्षा त्यांची वाट पाहत आहे. [२२] या जगात त्याचप्रमाणे मृत्युनंतरच्या जगात त्यांची सगळी कृत्ये निष्फळ ठरतील, त्यांना कुणीही पाठीराखा असणार नाही.

[२३] पवित्र ग्रंथाचा काही भाग मिळालेल्यांना तुम्ही पाहिले नाही का? ईश्वरी ग्रंथाचा निवाडा स्वीकारायला बोलावले असता त्यांच्यापैकी एका गटाने तिरस्काराने त्याकडे पाठ फिरवली. [२४] याचे कारण सांगताना ते म्हणतात, "नरकाग्नी आम्हाला थोडे दिवसच स्पर्श करेल." अशा प्रकारे त्यांनी शोधलेल्या चुकीच्या विश्वासांनी धर्माच्या बाबतीत त्यांना चुकवले आहे. [२५] निवाड्याचा दिवस निःसंशय येणार आहे. या दिवशी जेव्हा आम्ही सगळ्यांना एकत्र करू तेव्हा यांची अवस्था कशी असेल? कारण या दिवशी प्रत्येकाला त्याने केलेल्या कर्माचा पुरेपूर मोबदला मिळणारच आहे. त्यांच्यावर कोणताही अन्याय केला जाणार नाही. [२६] ईश्वराची प्रार्थना करा, "हे पालनकर्त्या! तू सगळ्या सत्ताधीशांचा सत्ताधीश आहेस. तुला वाटेल त्याला तू सत्ता देतोस आणि तुला वाटेल त्याच्याकडून ती हिरावून घेतोस. तुला वाटेल त्याला तू सन्मानित करतोस आणि तुला वाटेल त्याला अपमानित करतोस. सगळा चांगुलपणा तुझ्याच हातात सामावला आहे. कुठलीही इच्छा पार पाडण्याचे सामर्थ्य तुझ्याकडे आहे. [२७] तूच दिवसामागून रात्र आणि रात्रीमागून दिवस घडवतोस. तू निष्प्राण झालेल्याला जीवित करतोस आणि जीविताचे प्राण हरण करतोस. तुझ्या इच्छेला येईल त्याला तू भरभरून देतोस."

[२८] ईश्वरावर विश्वास ठेवणाऱ्यांनो! सत्य नाकारणाऱ्या अश्रद्धावंतांना

श्रद्धावंतांपेक्षा प्राधान्य देऊन त्यांच्याशी मैत्री करू नका.[अ] असे वागणारे स्वतःला ईश्वरापासून पूर्ण वेगळे करतील. त्यांच्यापासून बचाव करण्याचा यापेक्षा दुसरा उपाय नसेल तर त्यांच्याशी मैत्री केलेली चालेल. ईश्वर तुम्हाला त्याचे भय बाळगण्याची ताकीद देतो. कारण सगळ्यांना त्याच्याकडेच परतायचे आहे. २९ (हे प्रेषित!) लोकांना उपदेश करा, तुमच्या अंतःकरणातल्या गोष्टी तुम्ही लपवल्यात काय, उघड केल्यात काय; ईश्वर त्या सगळ्या जाणतो. आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे तो जाणतो. सगळ्या चराचरावर त्याचीच सत्ता आहे. ३० निवाड्याच्या दिवशी प्रत्येकाला त्याने केलेल्या भल्याबुऱ्या कर्माचा सामना करावाच लागेल. हा अंतिम दिवस आपल्यापासून दूर जावा असे त्यापैकी बऱ्याच जणांना वाटेल. ईश्वर तुम्हाला त्याचे भय बाळगण्याची सक्त ताकीद देतो. आपल्या सेवकांसाठी तो दयाळू आहे. ३१ लोकांना उपदेश करा, तुमचे ईश्वरावर प्रेम असेल तर माझ्या सांगण्याप्रमाणे वागा. म्हणजे तोही तुमच्यावर प्रेम करेल आणि तुमच्या अपराधांना तो क्षमा करेल. ईश्वर अतिशय क्षमाशील, दयाशील आहे. ३२ (पैगंबर!) लोकांना उपदेश करा, "ईश्वराच्या आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञेचे पालन करा." पण त्यांनी अवज्ञा केली, तर सत्य नाकारणारे ईश्वराला आवडत नाहीत.

३३ ईश्वराने आपण निर्माण केलेल्या सृष्टीतून आदम, नोहा, अब्राहाम आणि इमरानचे कुटुंब यांची प्राधान्याने निवड केली. ३४ ते एकमेकांचे वंशज आहेत. ईश्वर सगळे ऐकतो आणि सगळे

[अ] खरा श्रद्धावंत मुस्लिम आणि बिगर-मुस्लिम असा भेद न करता सर्व मानवाशी न्याय आणि निष्पक्षतेने वागतो. परंतु इस्लामशी युद्ध करणाऱ्या बिगर-मुस्लिमांशी युद्धकाळात मैत्री कायदेशीर नाही.

जाणतो. ३५ (तो प्रसंग आठवा जेव्हा) इमरानच्या पत्नीने प्रार्थना
केली होती, "हे पालनकर्त्या! माझ्या गर्भात असलेला जीव मी तुझ्या
सेवेसाठी वाहिला आहे, त्याचा स्वीकार कर. तू सगळे ऐकणारा, सगळे
जाणणारा आहेस." ३६ प्रसूत झाल्यावर ती म्हणाली, "हे पालनकर्त्या!
मी एका मुलीला जन्म दिला आहे. तिचे नाव मी 'मेरी' ठेवले आहे.
धिक्कारलेल्या सैतानापासून तिचा आणि तिच्या संततीचा बचाव व्हावा
यासाठी तिला तुझ्या संरक्षणात ठेव." तिने कुणाला जन्म दिला होता,
हे ईश्वराला चांगलेच अवगत होते. मुलगा, मुलगी सारखा नसतो.
३७ ईश्वराने मायेने त्या मुलीचा स्वीकार केला आणि उत्तम रीतीने तिचा
सांभाळ केला. तिची काळजी घेण्याची जबाबदारी त्याने जकरियावर
सोपवली. जकरिया तिला भेटायला जाई, तेव्हा प्रत्येक वेळी तिच्या
दालनात त्याला (आध्यात्मिक) आहार असल्याचे दिसायचे. एके दिवशी
त्याने मेरीला विचारले, "मेरी, हा पवित्र आहार तुझ्याकडे येतो कुठून?"
तिने उत्तर दिले, "ही तरतूद ईश्वराने (माझ्यासाठी) केली आहे. त्याच्या
मर्जीला येईल त्याला तो भरभरून देतो." ३८ यानंतर जकरियाने आपल्या
पालनकर्त्याची प्रार्थना केली, "तुझ्या कृपेने मला सद्गुणी संतती लाभू
दे. तू सगळ्या प्रार्थना ऐकणारा आहेस." ३९ आपल्या दालनात तो प्रार्थना
करत होता तोच देवदूतांनी त्याचे लक्ष वेधून घेतले आणि सांगितले,
"ईश्वराने तुझ्यासाठी याह्याची सुवार्ता दिली आहे. तो ईश्वराच्या शब्दाला
खरे ठरवेल आणि सगळ्यांमध्ये ठसठशीतपणे उठून दिसेल. तो अगदी
निष्कलंक असेल आणि सदाचारी लोकांमधला प्रेषित असेल." ४० यावर
जकरियाने विचारले, "हे पालनकर्त्या! मी वयोवृद्ध झालो आहे आणि
माझ्या पत्नीचेही वय उलटून गेले आहे, तर मला या वयात पुत्र कसा
काय होईल?" (देवदूत) उत्तरला, "ही ईश्वराची इच्छा आहे. त्याच्या

इच्छेला येईल ते तो प्रत्यक्षात आणतो.” ४१ जकरियाने प्रार्थना केली, “हे पालनकर्त्या! तुझ्या या इच्छापूर्तीचे मला संकेत दे.” यावर देवदूताने (ईश्वराकडून) निरोप दिला, “तुझा संकेत हा असेल की तीन दिवस तू लोकांशी बोलू शकणार नाहीस. फक्त खाणाखुणांनीच त्यांच्याशी संवाद साधशील. या काळात सतत ईश्वराचे स्मरण कर आणि रात्रंदिवस त्याच्या प्रचंड महानतेचे गुणगान कर.” ४२ देवदूत मेरीला म्हणाले, “मेरी! ईश्वराने तुला निवडून तुझी शुद्धी केली आहे. तुझ्या काळातल्या (सगळ्या) स्त्रियांमधून त्याने तुला निवडले आहे. ४३ तेव्हा हे मेरी! तू पालनकर्त्याची निस्सीम भक्ती कर. त्याच्या उपासनेत स्वतःला वाहून घे आणि प्रार्थनेत त्याच्यासमोर नतमस्तक होणाऱ्यांबरोबर तूही नतमस्तक हो. त्याच्यासमोर वाकून नमन करणाऱ्यांबरोबर तूही नमन कर.” ४४ (हे प्रेषित!) हा अदृश्य गोष्टींचा लेखाजोखा आहे जो आम्ही तुझ्यासमोर प्रकट करत आहोत. मेरीचे पालकत्व कुणाकडे असावे यावरून ते चिठ्ठ्या टाकत होते, तेव्हा तू त्यांच्याबरोबर नव्हतास आणि ते आपापसात भांडत होते, तेव्हा तू त्यांच्याबरोबर नव्हतास.

४५ देवदूतांनी मेरीला सांगितले, “मेरी! तुझ्या पालनकर्त्याने आपल्या वचनाद्वारे तुझ्यासाठी (एक पुत्ररूपी) सुवार्ता आणली आहे; मशीहा, येशू, मेरीचा पुत्र असे त्याचे नाव असेल. इहलोकात आणि परलोकात त्याला सन्मान मिळेल आणि तो ईश्वराच्या निकट सान्निध्यात राहणाऱ्यांपैकी असेल. ४६ आणि (शिशु अवस्थेत असताना) तो पाळण्यातच लोकांशी बोलेल व प्रौढ वयातदेखील बोलेल आणि तो सदाचारी लोकांपैकी असेल. ४७ यावर मेरीने विचारले, “एकाही पुरुषाचा स्पर्श झालेला नसताना मला पुत्र कसा होईल?” उत्तरादाखल देवदूताने सांगितले, “त्याचे असे आहे, ईश्वराला हवे असेल ते तो निर्माण करतो. त्याने

फक्त 'अस्तित्वात ये' म्हणायचा अवकाश, ती वस्तु अस्तित्वात येते." [४८] ईश्वर त्याला पवित्र धर्मग्रंथातून आणि विवेकपूर्ण ग्रंथातून म्हणजे तोराह आणि बायबलमधून सूचना देईल. [४९] ईश्वर त्याला इस्राएलच्या वंशजांकडे प्रेषित बनवून पाठवील. तो त्यांना सांगेल, "तुमच्या पालनकर्त्याचा एक संकेत घेऊन मी तुमच्याकडे आलो आहे. मी तुमच्यासाठी एक मातीचा पक्षी बनवेन आणि त्यात प्राण फुंकेन. मग ईश्वराच्या परवानगीने तो पक्षी जिवंत होईल. ईश्वराच्या परवानगीनेच अंधांना, महारोग्यांना बरे करेन आणि मृतांना जिवंत करेन. तुम्ही काय खाता, घरांमध्ये कुठल्या वस्तुंचा साठा करता, तेही मी तुम्हाला सांगेन." तुम्ही खरे श्रद्धावंत असाल तर यात तुमच्यासाठी नक्कीच एक संकेत आहे. [५०] माझ्या आधी आलेल्या तोराहमधील (प्रेषित आगमनाच्या भाकिताची) सत्यता प्रमाणित करण्यासाठी आणि तुमच्यासाठी वर्ज्य असणाऱ्या गोष्टी कायदेशीर करण्यासाठी तुमच्या पालनकर्त्याकडून एक निशाणी घेऊन मी आलो आहे. तेव्हा ईश्वराचे भय बाळगा आणि माझ्या आज्ञेचे पालन करा. [५१] ईश्वर माझाही पालनकर्ता आहे आणि तुमचाही पालनकर्ता आहे, तेव्हा त्याची उपासना करा. हा जगण्याचा सरळ मार्ग आहे.

[५२] पण येशूला जेव्हा लोकांचा नकार जाणवला, तेव्हा त्याने विचारले, "ईश्वरी कार्यात कोण माझे मदतनीस होतील?" त्याच्या अनुयायांनी उत्तर दिले, "आम्ही ईश्वराचे मदतनीस आहोत, आम्ही त्याच्यावर विश्वास ठेवतो. आम्ही त्याला समर्पित झालो आहोत, याचे तुम्ही साक्षीदार बना. [५३] हे पालनकर्त्या! तू आमच्यासमोर जे अवतीर्ण केलेस त्यावर आमचा विश्वास आहे आणि आम्ही तुझ्या प्रेषिताच्या सांगण्यानुसार वागतो. तेव्हा तू (सत्याचे) साक्षीदारांमध्ये आमची गणना कर." [५४] आणि त्यांनी (ईश्वरावर श्रद्धा न ठेवणाऱ्यांनी येशूविरुद्ध) गुप्त योजना

आखली, पण ईश्वरानेही योजना आखली. ईश्वर सर्वोत्तम योजनाकार आहे. ५५ ईश्वराने आपली योजना येशूला सांगितली, "हे येशू! मी तुला माझ्याकडे बोलावून घेईन आणि माझ्याकडे प्रतिष्ठित स्थान देईन. यामुळे अश्रद्धावंतांनी केलेल्या खोट्यानाट्या आरोपांपासून तुझी मुक्ती करेन. निवाड्याचा दिवस येईपर्यंत तुझ्या अनुयायांना मी सत्य नाकाराणाऱ्यांपेक्षा वरचढ दर्जा देईन. त्यानंतर त्या सगळ्यांना माझ्याकडे परत यावेच लागेल आणि मी तुमच्यातल्या मतभेदांचा निवाडा करेन. ५६ सत्य नाकारणाऱ्यांना या जगात आणि मृत्युनंतरच्या जगातही कठोर शिक्षा मिळेल. त्यांना मदत करायला कुणीही असणार नाही. ५७ सत्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना आणि सत्कर्मे करणाऱ्यांना मात्र त्याचा परिपूर्ण मोबदला मिळेल. दुष्कृत्ये करणारे लोक ईश्वराला आवडत नाहीत. ५८ आम्ही हे जे सांगत आहोत ते सत्याचे प्रकटीकरण आहे आणि सुज्ञ स्मरणपत्र आहे.

५९ ईश्वराच्या लेखी येशू आदमसारखा आहे. आदमला त्याने मातीपासून निर्माण केले आणि आज्ञा केली 'अस्तित्वात ये' आणि आदम अस्तित्वात आला. ६० हे तुमच्या पालनकर्त्याकडून आलेले सत्य आहे, तेव्हा त्यावर शंका घेणाऱ्यांपैकी होऊ नका. ६१ तुम्हाला ज्ञानप्राप्ती झाल्यानंतर त्यातील सत्यावरून तुमच्याशी कुणी वाद घातला तर त्यांना सांगा, "चला, आपण, आपल्या (घरातील) स्त्रिया आणि मुलेबाळे सगळे एकत्र जमूया आणि कळकळीने ईश्वराची प्रार्थना करून त्याला विनंती करूया की, खोटे बोलणाऱ्यांना ईश्वराचा शाप लागो." ६२ हा सत्य वृत्तांत आहे. एका ईश्वराशिवाय दुसरा कुणीही उपासनेयोग्य नाही. तो बलवान, बुद्धिवान आहे. ६३ जर त्यांनी सत्याकडे पाठ फिरवली, तर दुष्ट कृत्ये करणाऱ्यांना ईश्वर ओळखतो.

६४ सगळ्यांना सांगा, "धर्मग्रंथधारकांनो! आपण सगळे मिळून प्रतिज्ञा

करूया की, आम्ही एकाच ईश्वराची आराधना करू. अनेकेश्वरवाद मानणार नाही आणि ईश्वराशिवाय कुणाला आमचा पालनकर्ता मानणार नाही.'' पण त्यांनी हे अमान्य केले तर त्यांना सांगा, ''आम्ही ईश्वराला समर्पित झालो आहोत याचे साक्षीदार बना.'' ६५ धर्मग्रंथधारकांनो! अब्राहामनंतर तोराह आणि बायबल प्रकट केले असताना अब्राहामवरून तुमच्यात मतभेद का होतात? तुम्ही आपली बुद्धी वापरत नाही का? ६६ ज्या वस्तुस्थितीचे तुम्हाला थोडेफार ज्ञान आहे त्यावरून तुमच्यात वाद होतात. पण ज्याचे अजिबातच ज्ञान नाही त्यावरून का वाद घालता? सत्य परिस्थिती फक्त ईश्वर जाणतो, तुम्ही नाही. ६७ अब्राहाम ना यहूदी होता, ना ख्रिस्ती. तो एक प्रामाणिक माणूस होता. तो ईश्वराला समर्पित झालेला होता आणि एकेश्वरवादी होता. (ईश्वराचे भागीदार न मानणाऱ्यांपैकी होता.) ६८ अब्राहामचे अनुसरण करणारे, ह्या प्रेषिताचे (मोहम्मदचे) अनुसरण करणारे आणि त्याच्यावर विश्वास ठेवणारे लोक निश्चितपणे अब्राहाम यांचे निकटवर्तीय आहेत. ईश्वर श्रद्धावंतांचा पालनकर्ता आहे. ६९ (आधीच्या) धर्मग्रंथधारकांपैकी काहीजण तुम्हाला सत्यापासून दूर नेऊ पाहतात. पण तेच सत्यापासून दूर गेलेले आहेत. फक्त त्यांना याची जाणीव नाही. ७० धर्मग्रंथधारकांनो! ईश्वराच्या संकेतांचे साक्षीदार असतानाही तुम्ही ते का नाकारता? ७१ धर्मग्रंथाला मानणाऱ्यांनो! सत्याशी असत्याची सरमिसळ करून तुम्ही सत्य का लपवता?

७२ धर्मग्रंथाला अनुसरणाऱ्यांपैकी काहीजण एकमेकांना सांगतात, ''श्रद्धावंतांवर जे प्रकट झाले आहे त्यावर सकाळी विश्वास ठेवा तर सायंकाळी ते अमान्य करा. म्हणजे ते (मुसलमान) स्वतःच (गोंधळून जाऊन) श्रद्धेचा त्याग करतील.'' ७३ ''फक्त तुमच्या स्वतःच्या धर्माचे अनुसरण करणाऱ्यांवरच विश्वास ठेवा,'' असेही ते सांगतील. त्यांना

सांगा, ईश्वराकडून मिळालेले मार्गदर्शन हेच खरे मार्गदर्शन आहे. (पण तुम्हाला वाटते हे अशक्य आहे की), तुम्हाला जसा साक्षात्कार झाला होता तसा तो इतरांनाही होऊ शकेल किंवा तसा न झाल्यास तुमच्या पालनकर्त्यासमोर ते तुमच्याविरुद्ध युक्तिवाद करतील. त्यांना सांगा, कृपा करण्याचे सामर्थ्य फक्त ईश्वराच्या हातीच एकवटले आहे, त्याच्या मर्जीला येईल त्याच्यावरच तो कृपा करतो. तो अमर्याद, सर्वज्ञ आहे. ७४ ईश्वराला जो आवडतो त्याला निवडून तो कृपेचा प्रसाद देतो. ईश्वर असीम कृपेचा स्वामी आहे. ७५ धर्मग्रंथधारकांपैकी (ज्यू धर्मियांपैकी) काही असे आहेत, ज्यांच्याकडे विश्वासाने सोन्याची रास सोपवलीत तरी ते जशीच्या तशी परत करतील. पण त्यांच्यापैकी काही असे आहेत, ज्यांच्याकडे सोन्याचे एक नाणे जरी दिले तरी सतत मागणी केल्याखेरीज ते परत देणार नाहीत. याचे कारण सांगताना ते म्हणतात, "यहूदी नसणाऱ्यांशी आमची काहीही बांधीलकी नाही." ते हेतूपुरस्सर ईश्वराविषयी खोटी माहिती पसरवतात. ७६ खरोखर ईश्वराला ते प्रिय आहेत जे दिलेला शब्द पाळतात आणि त्याची भीती बाळगतात. सदाचारी लोक ईश्वराला प्रिय आहेत.

७७ क्षुल्लक स्वार्थासाठी ईश्वराला दिलेला शब्द, घेतलेल्या आणाभाका मोडणाऱ्यांना परलोक जीवनात काहीही लाभ होणार नाही. पुनर्निर्माणाच्या दिवशी ईश्वर ना त्यांच्याशी एक शब्द बोलेल, ना त्यांच्याकडे एक कटाक्ष टाकेल, ना त्यांची शुद्धी करेल. या दिवशी त्यांच्यासाठी कठोर शिक्षाच वाढून ठेवली असेल. ७८ त्यांच्यापैकी काहीजण असे आहेत, जे त्यांना मिळालेल्या ईश्वरी ग्रंथाचा विपर्यास करतात. ते जे बोलतात ते धर्मग्रंथातच आहे असा विचार ते तुम्हाला करायला लावतात; जेव्हा की ते तसे नसते. हे ईश्वरानेच सांगितले आहे असे ते म्हणतात; पण ते तसे नसते. अशाप्रकारे जाणीवपूर्वक ते ईश्वराविषयी खोटी माहिती पसरवतात

आणि त्यांना याची जाणीव असते. ७९ ईश्वराने ज्यांना पवित्र ग्रंथ दिला आहे आणि ज्यांना बुद्धिमत्तेचे आणि प्रेषित्वाचे वरदान दिले आहे असे लोक कधीही म्हणणार नाहीत, "ईश्वराऐवजी माझी पूजा करा." उलट ते म्हणतील, "तुम्ही इतरांना पवित्र ग्रंथाची शिकवण दिली आहे आणि तुम्ही स्वतः त्याचा अभ्यासही केला आहे, तेव्हा ईश्वराचे निष्ठावान सेवक बना." ८० "देवदूतांना आणि प्रेषितांना तुमचा पालनकर्ता माना," असा आग्रहही ते तुम्हाला करणार नाहीत. तुम्ही ईश्वराला शरण गेल्यावर, त्याच्यावर विश्वास न ठेवण्याची आज्ञा ते कशी देतील?

८१ प्रेषितांकडून दृढ वचन घेताना ईश्वराने त्यांना विचारले, "मी तुम्हाला पवित्र ग्रंथ दिला असून त्यात सुज्ञपणा भरलेला आहे. या ग्रंथात असलेल्या सत्याचे प्रमाण देण्यासाठी (प्रेषितांविषयीच्या भाकितांची पूर्तता करण्यासाठी) माझा प्रेषित तुमच्याकडे येईल, तेव्हा तुम्ही त्याच्यावर विश्वास ठेवलाच पाहिजे आणि त्याला मदत केलीच पाहिजे. हे मान्य करून तुमच्यावर या अटींसह टाकलेली जबाबदारी स्वीकारायला तुम्ही तयार आहात? यावर ते म्हणाले, "हो, आम्ही तसे वचन देतो." यावर ईश्वराने सांगितले, "तर मग तुम्ही याचे साक्षीदार बना आणि मी तुमचा साक्षीदार बनेन." ८२ आता, यानंतरही त्याकडे पाठ फिरवणारे निश्चितच अपराधी आहेत. ८३ पृथ्वीवरील आणि आकाशातील प्रत्येक गोष्ट ईश्वराला समर्पित झालेली असताना, इच्छेने किंवा अनिच्छेने ते ईश्वराचा धर्म सोडून अन्य धर्माचा शोध घेतात का? त्या सगळ्यांना त्याच्याकडेच परत जायचे आहे. ८४ त्यांना सांगा, "आमचा ईश्वरावर, आमच्यासमोर प्रकट झालेल्या सत्यावर आणि अब्राहाम, इश्माएल, इसहाक, याकोब आणि त्यांच्या वंशजांसमोर प्रकटलेल्या सत्यावर विश्वास आहे. मोझेस, येशू आणि इतर प्रेषितांना त्यांच्या पालनकर्त्याने जे ज्ञान दिले त्यावर आमचा विश्वास

आहे. आम्ही त्यांच्यात काही भेदभाव करत नाही. आम्ही त्याच्यासमोर शरणागती पत्करली आहे.” [८५] कुणी इस्लामव्यतिरिक्त (ईश्वराला समर्पित होण्याव्यतिरिक्त) इतर धर्माचा शोध घेतल्यास ईश्वर त्याचा स्वीकार करणार नाही. मृत्युपश्चात जीवनात ते पराभूत झालेल्यांपैकी असतील. [८६] सत्य आत्मसात केल्यावर, हा ईश्वराचा प्रेषित सच्चा असल्याची साक्ष पटल्यावर आणि सत्याचा सगळा पुरावा हाती आल्यावरही अविश्वासाची निवड करणाऱ्यांना ईश्वर आपले मार्गदर्शन का करेल? कारण ईश्वर अशा पाप्यांना मार्गदर्शन करत नाही. [८७] असे लोक या पापाच्या मोबदल्यात ईश्वराकडून, देवदूतांकडून आणि समस्त मानवजातीकडून धिक्कारले जातील. [८८] याच स्थितीत त्यांना कायम रहावे लागेल. ना त्यांची शिक्षा सौम्य केली जाईल, ना त्यांची यातून सुटका होईल. [८९] नंतरच्या काळात ज्यांना पश्चाताप होईल आणि ज्यांच्या वर्तनात सुधारणा होईल त्यांना या शिक्षेतून सूट मिळेल. ईश्वर क्षमाशील आणि दयाशील आहे. [९०] खऱ्या श्रद्धेचा स्वीकार केल्यानंतरही ती कबूल करण्यास वाढता नकार देणाऱ्यांचा, सत्य नाकारण्याकडे झुकलेल्यांचा पश्चाताप स्वीकारला जाणार नाही. ते सन्मार्गापासून फार दुरावलेल्यांपैकी आहेत. [९१] सत्य नाकारून त्याच स्थितीत मरण पावणाऱ्यांनी याची भरपाई म्हणून संपूर्ण पृथ्वीगोल भरेल इतके सोने देऊ केले, तरी ते वाचणार नाहीत. वेदनादायी शिक्षा त्यांच्यासाठी राखून ठेवली असेल आणि या स्थितीत त्यांना कुणाचाही आधार मिळणार नाही.

[९२] तुम्हाला प्रिय असलेल्या गोष्टींचा उपयोग ईश्वरी कार्यासाठी करेपर्यंत तुम्ही सदाचारी बनणार नाही आणि तुम्ही त्यांचा उपयोग कसा करता हे ईश्वर जाणतो. [९३] या पृथ्वीतलावर तोराहची पाठवणी होण्यापूर्वी इस्राएलने (याकोबाने) स्वतःसाठी जे पदार्थ अवैध ठरवले होते ते वगळता

इतर सगळे अन्नपदार्थ इस्राएलच्या वंशजांसाठी वैध आहेत. त्यांना सांगा, "सत्यप्रिय असाल तर तोराह आणा आणि वाचा." [९४] यानंतरही जे खोट्या गोष्टी रचण्याचे आणि त्यांचा संबंध ईश्वराशी जोडण्याचे सुरूच ठेवतील ते अपराधी आहेत. [९५] त्यांना सांगा, "ईश्वर खरे बोलतो; तेव्हा अब्राहामच्या श्रद्धेचे अनुसरण करा. (त्याच्याप्रमाणे ईश्वरावर श्रद्धा ठेवा). तो प्रामाणिक होता आणि अनेकेश्वरवाद्यांपैकी नव्हता." [९६] माणसासाठी उभे केलेले पहिले प्रार्थनागृह मक्केत आहे. हे पावन स्थळ असून संपूर्ण जगाच्या मार्गदर्शनाचा स्त्रोत आहे. [९७] ही ती जागा आहे जिथे अब्राहाम उभा होता (जिथे अब्राहामचे वास्तव्य होते); या वस्तुस्थितीचे तिथे स्पष्ट संकेत आहेत. या काबागृहात प्रवेश करणारा प्रत्येकजण सुरक्षित ठिकाणी असेल. ज्याला शक्य असेल त्याने या पवित्र काबागृहाची यात्रा करावी, ते ईश्वराप्रतीचे कर्तव्य आहे. सत्य नाकारणाऱ्या प्रत्येकाने लक्षात ठेवावे, ईश्वर त्याने निर्माण केलेल्या कुणावरही अवलंबून नसून स्वतंत्र आहे. [९८] त्यांना विचारा, धर्मग्रंथधारकांनो! तुम्ही जी कर्मे करता त्या सगळ्यांचा ईश्वर साक्षीदार असूनही त्याचे साक्षात्कार का नाकारता? [९९] त्यांना विचारा, "धर्मग्रंथधारकानों! (एकेश्वर) भाविकांना ईश्वराच्या मार्गापासून दूर नेऊन वाममार्गाला का लावू पाहता? त्यांनी धरलेला ईश्वराचा मार्ग म्हणजे सन्मार्ग असल्याचे साक्षीदार असूनही तसे का करता?" तुम्ही जे करता ते ईश्वरापासून लपून राहत नाही.

[१००] श्रद्धावंतानो! पवित्र ग्रंथधारकांपैकी काहींच्या बोलण्यापुढे मान तुकवलीत तर ईश्वरावर श्रद्धा ठेवल्यानंतरही ते तुम्हाला सत्य नाकारायला लावतील. [१०१] पण खुद्द ईश्वराचा प्रेषित तुमच्यात उपस्थित असताना आणि त्याने ईश्वराचे साक्षात्कार तुमच्यापर्यंत आणलेले असताना, तुम्ही सत्य कसे नाकारू शकता? ईश्वरावर दृढ विश्वास ठेवणाऱ्याला खरोखर

सन्मार्गाने जाण्याचे मार्गदर्शन लाभते. [१०२] श्रद्धावंतांनो! ईश्वराचे भय बाळगा, कारण त्याची तशी योग्यता आहे आणि त्याला शरण गेलेल्या अवस्थेशिवाय इतर अवस्थेत तुम्हाला मृत्यू येऊ नये. [१०३] ईश्वराच्या दोरीला घट्ट धरून ठेवा आणि कुणालाही तुमच्यात फूट पाडू देऊ नका. त्याने तुमच्यावर केलेल्या कृपावर्षावाचे स्मरण करा. तुम्ही एकमेकांचे शत्रू असताना त्यानेच तुमचे मनोमिलन केले आणि आज त्याच्या कृपेने तुम्ही भाऊभाऊ आहात. तुम्ही अग्नी विवराच्या तोंडाशी उभे होता आणि त्या संकटातून त्यानेच तुमची सुटका केली. अशा प्रकारे तुम्हाला मार्गदर्शन मिळावे म्हणून ईश्वर तुमच्यासमोर आपले संकेत स्पष्ट करतो.

[१०४] तुमच्यापैकी काहींचा असा एक गट असावा जे इतरांना सत्कृत्ये करायला, उचिततेचा आग्रह धरायला, तर अनुचित गोष्टींना मनाई करायला प्रवृत्त करतील; असे वागणारे लोक यशस्वी होतील. [१०५] अशा लोकांसारखे होऊ नका जे स्पष्ट पुरावा मिळाल्यानंतरही अनेक गटांत विभागले आणि त्यांचे आपापसात मतभेद झाले. भयानक शिक्षा अशांची निश्चितच वाट बघत असते. [१०६] निवाड्याच्या दिवशी काहींचे चेहरे उजळलेले असतील तर काहींचे काळवंडलेले. काळवंडलेले चेहरे असणाऱ्यांना विचारले जाईल, "श्रद्धेचा स्वीकार केल्यानंतरही तुम्ही ती नाकारली का? सत्याला नकार दिलात तर आता या शिक्षेची चवही चाखा." [१०७] पण चमकदार चेहरे असणारे लोक कायम ईश्वराच्या कृपाछत्राखाली राहतील. [१०८] हे ईश्वराचे साक्षात्कार आहेत. आम्ही ते निखळ सत्य स्वरूपात तुम्हाला सांगत आहोत. ईश्वर माणसावर अन्याय करू इच्छित नाही. [१०९] पृथ्वी आणि आकाशातील सगळ्या गोष्टी ईश्वराच्या आहेत. या सगळ्या गोष्टी परत त्याच्याकडेच जाणार आहेत.

[११०] मानवजातीच्या कल्याणासाठी आजवर उदयास आलेल्या समूहांपैकी तुम्ही खरोखर सर्वोत्कृष्ट समूह आहात. तुम्ही चांगल्याचा

आग्रह धरता, वाईटाला मनाई करता आणि ईश्वरावर विश्वास ठेवता. ज्यांना हा ग्रंथ दिला गेला त्यांनी त्यावर विश्वास ठेवला असता तर निश्चितच त्यांचे कल्याण झाले असते. त्यांच्यापैकी काहीजण खरे श्रद्धावंत आहे. पण बहुतेकजण आज्ञाभंजक आहेत. ११११ ते तुमचे फार नुकसान करू शकत नाहीत. त्यांनी तुमच्याशी युद्ध पुकारले तर ते पाठ दाखवतील. यावेळी त्यांना कुणाचीही मदत मिळणार नाही. ११२ त्यांनी ईश्वराला आणि लोकांना दिलेला शब्द पाळला नाही, तर जिथे जातील तिथे त्यांची मानहानी ओढवेल. त्यांनी सातत्याने ईश्वराच्या संकेतांवर अविश्वास दाखवला आहे आणि अन्यायाने प्रेषितांची हत्या केली आहे. यामुळे ईश्वराचा कोप ओढवून ते संपूर्ण नमवले गेले आहेत. त्यांची आज्ञापालन न करण्याची प्रवृत्ती आणि ईश्वरी मर्यादांचे उल्लंघन करण्याची सवय यांचाच हा परिणाम आहे.

११३ तरीही ते सगळे एकसारखे नाहीत. धर्मग्रंथधारकांपैकी काहीजण असे आहेत, जे दिलेला शब्द पाळतात, रात्रीच्या वेळेस ईश्वराच्या संदेश वचनांचे वाचन करतात आणि ईश्वरासमोर (नमाज़मध्ये) नतमस्तक होतात. ११४ जे ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवतात, न्यायाची कास धरतात, वाईटाचा प्रतिबंध करतात आणि चढाओढीने सत्कर्मे करतात ते सदाचारी आहेत. ११५ त्यांनी केलेल्या सत्कर्मांचा मोबदला त्यांना नाकारला जाणार नाही. ईश्वर सदाचारी लोकांना ओळखतो. ११६ सत्य नाकारणाऱ्यांची संपत्ती किंवा संतती ईश्वरी प्रकोपापासून त्यांचा तिळमात्रही बचाव करणार नाही. ते नरकाग्नीचे निवासी असतील. त्यांना कायम तिथेच रहावे लागेल. ११७ ऐहिक गोष्टींचा पाठलाग करण्यात संपत्ती खर्च करणारे लोक बोचऱ्या हिमवादळासारखे आहेत. अशा हिमवादळाच्या तडाख्याने उभे पीक नष्ट व्हावे तसे यांनी स्वतःच्याच हातांनी स्वतःचे

नुकसान ओढवून घेतले आहे. ईश्वराने त्यांच्यावर अन्याय केला नाही, तर त्यांनीच तो स्वतःवर करवला आहे.

११८ श्रद्धावंतांनो! परक्या लोकांना तुमचे जिवलग मित्र बनवू नका, तुमचे नुकसान करण्यात ते काही उणीव सोडणार नाहीत. तुम्हाला त्रास होताना पाहून त्यांना आनंद होतो. त्यांच्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या शब्दांतून त्यांना वाटणारा तिरस्कार उघड होतो. पण त्यांच्या अंतःकरणात लपलेल्या गोष्टी याहून फार दुष्ट आहेत. आम्ही आमचे संकेत तुमच्यासमोर स्पष्ट केले आहेत; तुम्हाला ते कळणारच नाहीत का? ११९ तुम्ही त्यांच्यावर प्रेम करता, पण ते तुमच्यावर प्रेम करत नाहीत. तुम्ही साक्षात्कारीत झालेल्या सगळ्या धर्मग्रंथांवर विश्वास ठेवता. त्यांची गाठ पडल्यावर ते म्हणतात, "आमचाही त्यावर विश्वास आहे." पण एकटे असताना मात्र संतापाने आपल्या बोटांचे चावे घेवू लागतात. त्यांना सांगा, "हा संताप तुमचा घात करेल." तुमच्या अंतःकरणातल्या गोष्टी ईश्वर ओळखतो. १२० तुमच्याबाबतीत काही चांगले घडले की यांना दुःख होते. पण तुमच्यावर संकट कोसळताच ते आनंदित होतात. तुम्ही चिकाटीने सत्कर्म करत राहिलात आणि ईश्वराला घाबरून राहिलात तर त्यांची कारस्थाने तुम्हाला कधी किंचितही अपाय करणार नाहीत. ईश्वर त्यांच्या वागण्याची दखल घेतो.

१२१ श्रद्धावंतांना लढाईतील मोक्याच्या जागा नेमून देण्यासाठी तुम्ही भल्या पहाटे घराबाहेर पडला होता, याचे स्मरण करा – ईश्वर सगळे ऐकतो आणि सगळे जाणतो. १२२ युद्धात तुमच्यापैकी दोन गट दुबळे पडण्याच्या बेतात होते, तेव्हा ईश्वर त्यांचा रक्षक बनला. श्रद्धावंतांनी ईश्वरावर विश्वास ठेवावा. १२३ बद्रच्या युद्धात तुम्ही निर्बल होता, तेव्हा ईश्वराने तुम्हाला मदत केलेलीच आहे. ईश्वराची भीती बाळगा म्हणजे

त्याच्याशी कृतज्ञ राहाल. १२४ याप्रसंगी श्रद्धावंतांना तुम्ही विचारले होते, "आपल्या तीन हजार दूतांना रणांगणावर पाठवून ईश्वर तुमची मदत करतो हे पुरेसे नाही का?" या घटनेचे स्मरण करा. १२५ तुम्ही संयम राखलात आणि ईश्वराचे भय बाळगलेत तर शत्रूने अगदी अचानक जरी हल्ला केला तरी स्पष्ट चिन्हांकित (अतिरिक्त) पाच हजार दूत पाठवून तुमचा पालनकर्ता तुमचे बळ वाढवेल आणि तुमची सहाय्यता करेल. १२६ तुमच्या चित्ताला दिलासा लाभावा यासाठीच ईश्वराने ही सुवार्ता धाडली आहे – मदत फक्त सामर्थ्यवान, बुद्धिमान असलेल्या ईश्वराकडूनच येते. १२७ सत्य अमान्य करणाऱ्यांना जनसमुदायापासून वेगळे करावे किंवा त्यांची मानहानी करावी म्हणजे निराश होऊन ते दुराचारापासून माघार घेतील, यासाठी ईश्वर तुम्हाला मदत करणार आहे. १२८ हे प्रेषिता! ईश्वर त्यांना माफ करेल की शिक्षा देईल या निर्णयात तुमचे मत विचारात घेतले जाणार नाही; ते अत्याचारी आहेत. १२९ आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते ईश्वराचेच आहे. त्याच्या मर्जीला येईल त्याला तो क्षमा करतो तर मर्जीला येईल त्याला शिक्षा देतो. तो अतिशय क्षमाशील, सदा दयाळू आहे.

१३० श्रद्धावंतांनो! आधाशासारखे भरमसाठ व्याज आकारून तुमच्या संपत्तीत भर घालू नका. ईश्वराला घाबरून रहा, म्हणजे तुमची भरभराट होईल. १३१ सत्य नाकारणाऱ्यांसाठी सज्ज केलेल्या अग्नीपासून आपला बचाव करा. १३२ आणि ईश्वराच्या आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञेचे पालन करा, म्हणजे तुम्हाला ईश्वराच्या कृपेचा लाभ होईल. १३३ तुमच्या पालनकर्त्याची क्षमाशीलता मिळवण्यासाठी आणि ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांसाठी बनवलेल्या पृथ्वी आणि अवकाशासारख्या विस्तीर्ण स्वर्गाच्या प्राप्तीसाठी चढाओढीने एकमेकांशी स्पर्धा करा.

१३४ संपन्नावस्थेत आणि विपन्नावस्थेतही ईश्वरी कार्यासाठी संपत्ती
खर्च करणारे, रागावर नियंत्रण ठेवून सोबत्यांशी क्षमाशीलतेने वागणारे
आणि सत्कर्मे करणारे लोक ईश्वराला प्रिय आहेत. १३५ असभ्य वर्तन
केल्यानंतर किंवा स्वतःशीच प्रतारणा केल्यानंतर ईश्वराचे स्मरण करा
आणि अपराधांबद्दल त्याच्याकडे माफी मागा. कारण ईश्वराशिवाय कोण
(तुमचे) अपराध माफ करू शकते? पण त्यानंतर जाणूनबुजून दुर्वर्तन
करत राहू नका. १३६ दुर्वर्तनापासून दूर राहणाऱ्यांना त्याच्या मोबदल्यात
त्यांच्या पालनकर्त्याकडून माफी मिळेल आणि वाहत्या नद्या असणाऱ्या
बगीच्यामध्ये कायमचे वास्तव्य लाभेल. सत्कर्मे करणाऱ्यांना मिळणारा
मोबदला किती उत्कृष्ट असेल! १३७ तुमच्याआधी अनेक समाजातील
लोक होऊन गेले आहेत; पृथ्वीतलावर सगळीकडे फिरा आणि सत्य
नाकारणाऱ्यांचा कसा दुःखद शेवट झाला होता, ते पहा. १३८ हे कुरआन
म्हणजे लोकांना सत्याचा साक्षात्कार देणारा ग्रंथ आहे. ईश्वराचे भय
बाळगणाऱ्यांसाठी यात मार्गदर्शन आणि सद्उपदेश मिळतो.

१३९ तुम्ही हिंमत सोडू नका, दुःखही करू नका. श्रद्धावंत असाल
तर तुम्हीच प्रबळ ठरणार. १४० तुम्हाला इजा झाली असेल तर पूर्वी
त्यांनाही अशीच इजा झाली होती. सगळ्यांवर आळीपाळीने आम्ही अशी
(चांगली-वाईट) वेळ आणतो, म्हणजे त्यातले खरे श्रद्धावंत कोण आहेत
हे कळते आणि (सत्याच्या) साक्षीदारांची निवड करता येते. अन्यायी
लोक ईश्वराला आवडत नाहीत. १४१ लोकांची अशी पारख केल्यामुळे
ईश्वराला श्रद्धावंतांची शुद्धी करता येते आणि सत्याला नाकारणाऱ्यांचा
नाश करता येतो.१४२ तुमच्यापैकी कोण ईश्वरी कार्यासाठी कठोर परिश्रम
करेल आणि प्रतिकूल परिस्थितीत टिकाव धरेल हे ईश्वराने जाणल्याविना
तुम्हाला त्याच्या स्वर्गात प्रवेश मिळेल असे वाटते का? १४३ मृत्यू येण्यापूर्वी

तुम्हाला त्याच्या भेटीची ओढ लागली होती. आता तुम्ही त्याला स्वतः च्या डोळ्यांनी पाहिले आहे.

१४४ मुहम्मद फक्त एक प्रेषित आहेत. त्यांच्याआधी कित्येक प्रेषित होऊन गेले. श्रद्धावंत असूनही त्यांना मृत्यू येतो किंवा त्यांची हत्या होते, तरीही तुम्ही श्रद्धेपासून दूर जाल का? श्रद्धेपासून फारकत घेणाऱ्यांमुळे ईश्वराचे काहीही नुकसान होत नाही. कृतज्ञ असणाऱ्यांना ईश्वर उत्कृष्ट मोबदला देतो. १४५ ईश्वराच्या परवानगीशिवाय आणि नियोजित वेळेशिवाय कुणालाही मृत्यू येत नाही. कुणाला या जगातला मोबदला हवा असेल तर त्याला आम्ही तो देऊ आणि कुणाला मृत्युपश्चात जीवनातला मोबदला हवा असेल तर त्यालाही आम्ही तो देऊ. सदैव कृतज्ञ असणाऱ्यांना आम्ही योग्य मोबदला देऊ. १४६ असंख्य प्रेषितांनी निःस्सीम भक्तांच्या साथीने ईश्वरासाठी लढा दिला आहे. ईश्वरी मार्गात लढा देताना कितीही हालअपेष्टा सोसाव्या लागल्या तरी त्यांनी धीर सोडला नाही. ना ते दुबळे झाले, ना शत्रूला शरण गेले. संयमी लोक ईश्वराला प्रिय आहेत. १४७ त्यांनी ईश्वराला फक्त अशी प्रार्थना केली, "हे पालनकर्त्या! आमचे अपराध आणि आमच्या कृतीत घडलेले अतिरेक माफ कर. आम्हाला खंबीर कर आणि सत्य नाकारणाऱ्यांविरुद्ध लढताना मदत कर." १४८ आणि म्हणून ईश्वराने त्यांना इहलोकात आणि परलोकात दोन्ही ठिकाणी सर्वोत्कृष्ट मोबदला दिला. सत्कर्म करणारे लोक ईश्वराला आवडतात.

१४९ श्रद्धावंतांनो! सत्य नाकारणाऱ्यांना शरण गेलात तर ते तुम्हाला सत्यापासून माघार घ्यायला लावतील आणि मग तुम्ही पराभूत असाल. १५० पण नाही! तुमचे रक्षण करणारा ईश्वर आहे. तो सर्वोत्कृष्ट पाठीराखा आहे. १५१ सत्य नाकारणाऱ्यांवर आम्ही जरब बसवू, कारण त्यांनी

ईश्वरतुल्य अनेक दैवत ठरवले आहेत. अशी कृती करण्याचे त्यांच्याकडे कोणतेही पुरावे नव्हते. नरकाग्नी हे त्यांचे निवासस्थान असेल. अपराध्यांचे हे निवासस्थान खरोखर गलिच्छ आहे. [१५२] ईश्वराने तुम्हाला दिलेले वचन पूर्ण केले, जेव्हा ईश्वराच्या परवानगीने तुम्ही शत्रूचा पराभव करण्याच्या बेतात होता. तुम्हाला हवी असलेली गोष्ट (विजय) त्याने तुमच्या नजरेच्या टप्प्यात आणली होती. पण नंतर तुमचा धीर खचला. प्रेषिताच्या आज्ञेचे पालन करण्यावरून तुमच्यात मतभेद झाले आणि (एकजुटीने राहण्याची) त्याची आज्ञा तुम्ही मोडलीत. तुमच्यापैकी काहींना इहलोकातले कल्याण हवे होते तर काहींना परलोकातले. तुमच्यातील या मतभेदानंतर तुमची परीक्षा घेण्यासाठी त्याने शत्रूवर विजय मिळवण्यापासून तुम्हाला रोखले. पण आता त्याने तुम्हाला माफ केले आहे; श्रद्धावंतांसाठी ईश्वर अतिशय कृपाळू आहे. [१५३] प्रेषित तुम्हाला पाठीमागून पुकारत होता, पण इकडेतिकडे कुणाकडेही न बघता तुम्ही (युद्धभूमीतून) पळ काढत होता. या युद्धात तुम्ही जे गमावले होते आणि तुमच्यावर जी संकटजनक वेळ ओढवली होती, तिच्याविषयी शोक करण्याची सवडही न देता, ईश्वराने तुम्हाला एकामागून एक दुःख दिले. असे करून त्याने त्याच्या अवज्ञेचा बदला घेतला. तुम्ही जे करता, ते ईश्वर जाणतो. [१५४] या दुःखानंतर ईश्वराने गुंगीच्या स्वरूपातील मनःशांती तुमच्याकडे पाठवली. तिने तुमच्यापैकी काहीजणांचा ताबा घेतला. पण तुमच्यापैकी काहीजण असे होते, ज्यांना फक्त स्वतःची काळजी होती. ज्ञान मिळण्यापूर्वीच्या अज्ञानकारी काळात त्यांच्या काही कल्पना होत्या. ईश्वराविषयी काही चुकीचे समज त्यांनी मनात बाळगले होते. ते तुम्हाला विचारतात, "याविषयी मत मांडण्याची संधी आम्हाला मिळणार आहे का?" त्यांना सांगा, "नाही, सगळे काही ईश्वराच्या हातात आहे." आपल्या मनातल्या गोष्टी ते तुमच्यासमोर उघड

करणार नाहीत. ते म्हणतात, या विषयात आमचे मत घेतले असते तर इथे आपल्यापैकी एकही जण मारला गेला नसता. त्यांना सांगा, ज्यांचे मृत्यूचे फर्मान निघाले आहे, असे लोक आपल्या घरातून बाहेर पडून कसेही करून निर्धारित वेळी मृत्युस्थळी पोहोचले असते. ईश्वराला तुमच्या मनातल्या विचारांची पारख करता यावी आणि तुमची मने साफ करता यावीत, यासाठीच ही दुःखद वेळ ओढवली आहे. तुमच्या अंतरंगातल्या विचारांविषयी ईश्वर सजग आहे. १५५ युद्धात दोन विरोधी सैन्य रणांगणावर आमने-सामने झाले, तेव्हा तुमच्यापैकी काहींनी युद्धातून माघार घेतली. त्यांनी केलेल्या काही कृत्यांची परतफेड म्हणून सैतानाकरवी त्यांच्याकडून नकळत काही चुका करवून घेतल्या गेल्या. पण आता ईश्वराने त्यांना माफ केले आहे. ईश्वर क्षमाशील आणि सहनशील आहे.

१५६ श्रद्धावंतांनो! सत्य नाकारण्याकडे झुकलेल्यांसारखे होऊ नका. प्रवासाच्या किंवा युद्धाच्या मोहिमेवर निघाले असता हे लोक आपल्या बांधवांना म्हणतात, "ते आमच्याबरोबर राहिले असते तर त्यांना मृत्यू आला नसता किंवा त्यांची हत्या झाली नसती." त्यांच्या या बोलण्यामागचे कारण म्हणजे जीवनदाता आणि जीवनहर्ता तो ईश्वरच असल्याने, त्यांच्या मनात दुःखद पश्चातापाचा उगम व्हावा. यासाठी ईश्वरच त्यांच्या मनात असे विचार आणतो. तुम्ही जे करता ते सगळे ईश्वर पाहतो. १५७ ईश्वरी कार्य करताना तुम्हाला मृत्यू आला किंवा तुमची हत्या झाली तर निःसंशय तुम्हाला त्याच्या क्षमेचा आणि कृपेचा लाभ होईल. आयुष्यभराच्या संचितापेक्षा हा लाभ खूप मोठा आहे. १५८ कारण, तुमचा स्वाभाविक मृत्यू झाला काय आणि मारले गेलात काय, सगळ्यांना ईश्वरासमोरच जायचे आहे. १५९ ईश्वराच्या कृपेने तुम्ही त्यांच्याशी नरमाईने वागलात, याऐवजी उग्रपणे किंवा कठोरपणे वागला

असतात तर ते नक्कीच तुम्हाला सोडून गेले असते. तेव्हा त्यांच्याशी संयमाने वागा आणि ईश्वराकडे त्यांच्या क्षमेची प्रार्थना करा. महत्त्वाच्या मुद्यांवर त्यांच्याशी सल्लामसलत करा; आणि यानंतर जेव्हा तुमचा कृती कार्यक्रम निश्चित कराल तेव्हा ईश्वरावर भरोसा ठेवा; त्याच्यावर भरवसा ठेवणारे लोक त्याला आवडतात. [१६०] ईश्वराची मदत असेल तर कुणीही तुमच्यावर मात करू शकणार नाही, पण त्यानेच मदत काढून घेतली तर तुम्हाला त्याच्याशिवाय कोण मदत करणार? तेव्हा श्रद्धावंतांनो, ईश्वरावर भरवसा ठेवा.

[१६१] प्रेषिताने ईश्वरी संदेशातले काहीही लपवू नये. असे लपवणाऱ्याला पुनर्निर्माणाच्या दिवशी ते समोर आणावेच लागेल. या दिवशी प्रत्येकाला त्याच्या कृत्याचा पुरेपूर मोबदला मिळेल. कुणावरही अन्याय होणार नाही.

[१६२] ईश्वराची मर्जी राखण्याचा प्रयत्न करणारा ईश्वराचा कोप ओढवून घेणाऱ्यासारखा आणि नरकासारख्या गलिच्छ ठिकाणी राहणाऱ्यासारखा कसा असेल? [१६३] ईश्वराच्या लेखी प्रत्येकाची योग्यता वेगळी आहे आणि तो सगळ्यांच्या हालचालीवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. [१६४] ईश्वराने लोकांना त्याचे साक्षात्कार ऐकवण्यासाठी, त्यांची चित्तशुद्धी करण्यासाठी आणि त्यांना पवित्र ग्रंथाची व शहाणपणाची शिकवण देण्यासाठी त्यांच्यामधूनच एका प्रेषिताला पाठवून श्रद्धावंतांवर फार मोठे उपकार केले आहेत. कारण यापूर्वी ते उघडपणे चुकीच्या मार्गावर होते.

[१६५] एखादा दुर्दैवी प्रसंग ओढवल्यावर तुम्ही विचारता, "हे कसे घडले?" पण या आधी तुमच्या हातून (तुमच्या शत्रूवर) यापेक्षा दुप्पट मोठे संकट आले होते. त्यांना सांगा, "ही तुमची स्वतःची चूक आहे." खरोखर ईश्वराकडे त्याची कुठलीही इच्छा पूर्ण करण्याची सत्ता आहे. [१६६] दोन सैन्ये एकमेकांना भिडली त्यादिवशी तुमच्यावर ओढवलेला

दुर्दैवी प्रसंग ईश्वराच्या मर्जीनेच घडला होता. कारण यातून त्याला (खरे) श्रद्धावंत वेगळे करायचे होते.

१६७ आणि ढोंगी कोण आहेत हे जाणायचे होते. ढोंगी लोकांना सांगितले गेले, "चला, ईश्वरी कार्यासाठी लढा आणि स्वतःचा बचाव करा." यावर त्यांचे उत्तर होते, "युद्ध होणार हे माहीत असते तर आम्ही नक्कीच युद्धात तुम्हाला साथ दिली असती." त्या दिवशी ते श्रद्धेपेक्षाही अश्रद्धेच्या जवळ होते. त्यांच्या तोंडातून बाहेर पडणारे बोल त्यांच्या मनातल्या विचारांशी विसंगत होते. पण त्यांनी लपवलेले विचार ईश्वर चांगलेच जाणतो. १६८ युद्धात पिछाडीवर राहिलेले लोक आपल्या लढणाऱ्या बांधवांविषयी म्हणाले, "त्यांनी आमच्या बोलण्याकडे लक्ष दिले असते तर ते युद्धात मारले गेले नसते." त्यांना सांगा, "तुमचे बोलणे खरे असेल तर आपला मृत्यू टाळून दाखवा."

१६९ ईश्वराचे कार्य करताना हुतात्मा झालेले लोक मेले आहेत असे समजू नका. ते जिवंत आहेत आणि ईश्वराच्या चांगल्या निगराणीत आहेत.

१७० ईश्वराने आपल्या कृपेने त्यांना जे लाभ दिले आहेत त्यामुळे ते आनंदात आहेत. ते ज्यांना मागे सोडून आले आहेत आणि जे त्यांना अजून सामील झालेले नाहीत, त्यांच्याविषयी देखील शुभवार्ता प्राप्त करून ते आनंदी होत आहेत. त्यांना मृत्युनंतरच्या जगात ना कसली भीती आहे, ना कसला शोक. १७१ ईश्वराच्या कृपेमुळे आणि औदार्यामुळे ते आनंदित झालेले आहेत. (त्यांना माहीत आहे,) श्रद्धावंतांना भरघोस मोबदला देण्यात ईश्वर कमी पडणार नाही. १७२ युद्धात जखमी झाल्यावरही ज्यांनी ईश्वराच्या आणि त्याच्या प्रेषिताच्या हाकेला प्रतिसाद दिला, सत्कर्मे केली आणि ईश्वराची भीती बाळगली त्यांना भरघोस मोबदला मिळेल.

१७३ शत्रूने तुमच्याविरुद्ध फार मोठे बळ एकवटले आहे, "तेव्हा त्यांना
घाबरून रहा" असे सांगितल्यावर त्यांचा विश्वास अधिकच दृढ झाला
आणि त्यांनी उत्तर दिले, "ईश्वर आमच्यासाठी पुरेसा आहे. तो सर्वोत्तम
पालनकर्ता आहे." १७४ सैतानाचा स्पर्शही न होता ईश्वराच्या कृपेसह आणि
आशीर्वादासह ते घरी परतले; कारण त्यांनी ईश्वराची मर्जी मिळवण्याचा
प्रयत्न केला. ईश्वराचे औदार्य अमर्याद आहे. १७५ तुमच्या मनात त्याच्या
साथीदारांविषयी भीती निर्माण करणारा सैतान आहे. पण त्यांना घाबरू
नका. सच्चे श्रद्धावंत असाल तर माझी भीती बाळगा.

१७६ सत्य नाकारण्यात एकमेकांशी स्पर्धा करणाऱ्यांमुळे तुम्ही दुःखी
होऊ नये. ते ईश्वराची किंचितही हानी करू शकत नाहीत. मृत्युपश्चात
जीवनात त्यांना ईश्वरी कृपेचा लाभ होऊ नये ही ईश्वराची इच्छा आहे
– तिथे वेदनामय शिक्षा त्यांच्यासाठी तिष्ठत असेल. १७७ विश्वासाचे
मोल चुकवून ज्यांनी सत्य नाकारण्याचा सौदा केला, ते ईश्वराचे काही
नुकसान करू शकत नाहीत. वेदनामय शिक्षा त्यांच्यासाठी वाढून ठेवलेली
असते. १७८ सत्य नाकारणाऱ्यांना आम्ही जी सवड देत आहोत, ती
त्यांच्यासाठी चांगली गोष्ट आहे, असे त्यांनी मानू नये. या सवलतीमुळे
त्यांची आज्ञाभंगाची प्रवृत्ती वाढतच राहणार आहे. अपमानास्पद शिक्षा
त्यांच्यासाठी राखून ठेवली जाईल. १७९ चांगल्यापासून वाईट वेगळे
केल्यानंतर ईश्वर श्रद्धावंतांना सध्याच्या कठीण परिस्थितीत कदापि
ठेवणार नाही. त्यांच्या स्थितीत सुधारणा करेल. सगळ्या अदृश्य गोष्टी
तो तुमच्यासमोर उघडही करणार नाही. पण ईश्वराच्या इच्छेला येईल
त्याच प्रेषिताची तो निवड करतो. तेव्हा ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितांवर
विश्वास ठेवा. तुमचा त्यांच्यावर विश्वास असेल तर दुष्ट प्रवृत्तींपासून
तुम्ही आपला बचाव करू शकाल आणि तुम्हाला याचे महान प्रतिफल
मिळेल.

१८० ईश्वराने उदारपणे जे दिले आहे, त्याबाबतीत कंजूषी दाखवणाऱ्यांनी
हा सोस त्यांच्यासाठी चांगला आहे, असे समजू नये. खरेतर तो
त्यांच्यासाठी फार वाईट आहे. पुनर्निर्माणाच्या दिवशी हाच सोस त्यांच्या
मानेभोवती गळफासासारखा आवळला जाईल. आकाश आणि पृथ्वीचा
वारसाहक्क फक्त ईश्वराचाच आहे; तुम्ही जे करता ते सगळे ईश्वर जाणतो.
१८१ "इकडे लक्ष द्या, ईश्वर गरीब आहे तर आम्ही श्रीमंत आहोत"
असे पुकारणाऱ्यांचे बोल ईश्वराने खरोखर ऐकले आहेत. त्यांच्या या
बोलण्याची आणि अन्यायाने प्रेषितांची हत्या करण्याची आम्ही जरूर नोंद
घेऊ आणि त्यांना सांगू "आता अग्निज्वाळेच्या यातनांची चव चाखा."
१८२ कारण हे सगळे तुम्हीच स्वतःच्या हातांनी ओढवून घेतले आहे.
आपण निर्माण केलेल्या माणसावर ईश्वर कधीच किंचितही अन्याय करत
नाही. १८३ ईश्वराने अशी आज्ञा दिली आहे की, अग्नीत आहुती देता
येईल असा बळी घेऊन येईपर्यंत कुणाही प्रेषितावर विश्वास ठेवू नका
असे म्हणणाऱ्यांना सांगा, "माझ्या आधीचे प्रेषित तुमच्याकडे स्पष्ट
संकेत आणि तुम्ही मागणी करत असलेली गोष्ट घेऊन आले होते. तुम्ही
खरे असाल तर मग त्यांची हत्या का केलीत?" १८४ (हे प्रेषिता!) हे
लोक तुम्हाला नाकारण्याची शक्यता आहे. तुमच्या आधी होऊन गेलेल्या
प्रेषितांना त्यांनी असेच नाकारले होते. त्या प्रेषितांनी आपल्याबरोबर
सत्याचे स्पष्ट संकेत आणि पवित्र, ज्ञानदायी ग्रंथ आणले होते.
१८५ प्रत्येक मनुष्यमात्राला मृत्यूची कसोटी पार करावीच लागेल; प्रत्येकाला
पुनर्निर्माणाच्या दिवशी त्याने केलेल्या कर्माचा परिपूर्ण मोबदला मिळेल.
या दिवशी ज्याला नरकाग्नीपासून दूर ठेवून स्वर्गात दाखल केले जाईल,
तो नक्कीच जेता असेल; कारण या जगातले जीवन हे निव्वळ भ्रामक
सुखोपभोग आहे.

१८६ तुमच्या मालमत्तेवरून, जीवावरून निःसंशय तुमची पारख केली जाईल, तुम्हाला आजमावले जाईल. तुमच्यापूर्वी ज्यांना धर्मग्रंथ दिला गेला त्यांच्याकडून आणि अनेकेश्वरवाद्यांकडून निःसंशय तुम्हाला कटु शब्दही ऐकावे लागतील. पण हे सगळे धैर्याने सोसून स्वतःवर ताबा ठेवलात तर ती खरोखर निश्चयाची बाब आहे. १८७ ज्यांना धर्मग्रंथ दिला गेला त्यांच्याकडून ईश्वराने दृढ वचन घेतले होते की ते या ग्रंथातील ज्ञान लपवून न ठेवता लोकांपर्यंत पोचवतील. पण त्यांनी या वचनाकडे पाठ फिरवली. आणि किरकोळ किंमतीला या ज्ञानाचा सौदा केला – किती दुर्दैवी सौदा केला होता त्यांनी! १८८ आपल्या दुष्कृत्यांमुळे खुश होणाऱ्यांनी आणि न केलेल्या कामाचेही श्रेय लाटणाऱ्यांनी असे समजू नये की शिक्षेपासून त्यांची सुटका होईल. त्यांना घोर शिक्षा सोसावीच लागेल. १८९ आकाशाचे आणि पृथ्वीचे साम्राज्य ईश्वराचे आहे; तो सर्वशक्तीमान आहे.

१९० आकाश व पृथ्वीच्या निर्मितीत आणि दिवस-रात्रीच्या आलटापालटीत सुज्ञ लोकांसाठी संकेत आहेत. १९१ असे सुज्ञ लोक उठलेल्या, बसलेल्या आणि पहुडलेल्या स्थितीत सतत ईश्वराचे स्मरण करतात आणि आकाश व पृथ्वीच्या निर्मितीचे चिंतन करतात. ते ईश्वराची प्रार्थना करतात, हे पालनकर्त्या! या सगळ्या निर्मितीमागे तुझा निश्चित हेतू आहे. तुझा महिमा अगाध आहे. नरकाग्नीच्या यातनांपासून आमचा बचाव कर. १९२ हे पालनकर्त्या! ज्यांना धिक्कारून तू नरकात लोटतोस त्यांची नक्कीच मानहानी झाली आहे. पाप्यांना कुणीही पाठीराखा मिळत नाही.

१९३ हे पालनकर्त्या! खऱ्या विश्वासाकडे बोलावणाऱ्याची हाक आम्ही ऐकली. त्याने आम्हाला सांगितले, तुमच्या पालनकर्त्यावर श्रद्धा ठेवा आणि आम्ही ती ठेवली. हे पालनकर्त्या! आमच्या पापांना क्षमा कर,

आमची दुष्कृत्ये पुसून टाक आणि सदाचारी म्हणून आम्हाला मृत्यू येऊ दे. [१९४] हे पालनकर्त्या! तुझ्या प्रेषिताकरवी आम्हाला जे वचन दिलेस त्याची पूर्तता कर आणि पुनर्निर्माणाच्या दिवशी आमची नाचक्की होऊ देऊ नकोस. निःसंशय तू तुझ्या वचनांची पूर्तता करायला कधीच चुकत नाहीस."

[१९५] त्यांच्या पालनकर्त्याने त्यांच्या प्रार्थनेचा स्वीकार करून त्यांना सांगितले, मी तुमच्यापैकी कुणाही स्त्री-पुरुषाला तुमच्या (कर्माचे) कष्टाचे फळ नाकारणार नाही. तुम्ही सर्व एकमेकांशी संबंधित आहात. ज्यांना आपल्या घरातून हुसकावून लावले गेले, (त्यामुळे) ज्यांनी स्वदेश त्याग केला, माझे कार्य करताना ज्यांना छळ सोसावा लागला, माझ्या कार्यात जे लढले आणि मारले गेले, त्यांचे अपराध मी नक्कीच माफ करून टाकेन. ईश्वराकडून बक्षीस म्हणून वाहत्या नद्या असणाऱ्या बगीच्यांमध्ये मी त्यांना नक्कीच प्रवेश देईन; सर्वोत्कृष्ट मोबदला ईश्वराकडेच आहे. [१९६] पृथ्वीतलावरील सत्य नाकारणाऱ्यांच्या कृत्यांना फसू नका. [१९७] हा फक्त क्षणिक सुखोपयोग आहे. यानंतर नरकासारख्या गलिच्छ जागीच त्यांना वास्तव्य करावे लागेल. [१९८] आपल्या पालनकर्त्याची भीती बाळगणाऱ्यांसाठी वाहत्या नद्या असणारे बगीचे असतील. तिथेच त्यांचे कायमचे वास्तव्य असेल. त्यांच्या पालनकर्त्याकडून तिथे त्यांचे हार्दिक स्वागत होईल. सदाचारी असणाऱ्यांना ईश्वराकडून सर्वोत्कृष्ट प्रतिफल मिळेल. [१९९] काही धर्मग्रंथधारक ईश्वरावर, तुम्हाला साक्षात्कारीत झालेल्या ईश्वरी ग्रंथावर आणि यापूर्वी त्यांच्यासाठी अवतीर्ण झालेल्या ग्रंथावर विश्वास ठेवतात. ते ईश्वरासमोर विनम्र होतात आणि किरकोळ फायद्यासाठी त्याच्या साक्षात्कारांचा सौदा करत नाहीत. त्यांना त्यांच्या पालनकर्त्याकडून उत्कृष्ट मोबदला मिळेल. ईश्वर तात्काळ आपला

हिशेब चुकता करतो. [२००] श्रद्धावंतांनो! सहनशील बना, चढाओढीने संयम बाळगा, आपल्या श्रद्धेवर ठाम रहा आणि ईश्वराची भीती बाळगा, यश तुमचेच आहे.

प्रकरण ४ : स्त्रिया
(अन्-निसा)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] लोकहो! तुमच्या पालनकर्त्याची भीती बाळगा, ज्याने एका आत्म्यापासून तुम्हाला निर्माण केले. त्याने सुरुवातीला या जीवाचा जोडीदार निर्माण केला आणि नंतर या दोघांपासून असंख्य स्त्री-पुरुषांची निर्मिती करून त्यांना जगभर विखुरले. ज्याचे नाव घेऊन तुम्ही एकमेकांना आवाहन करता, त्या ईश्वराची भीती बाळगा आणि नातेसंबंधातील कर्तव्य पार पाडण्यात दक्ष रहा (नातेसंबंध तोडू नका). ईश्वर सतत तुमच्यावर देखरेख करत आहे.[अ २] अनाथांच्या मालकीच्या मालमत्ता त्यांच्या ताब्यात द्या. त्यांच्या चांगल्या वस्तुंच्या मोबदल्यात वाईट वस्तू देऊ नका आणि त्यांच्या संपत्तीची सरळमिसळ आपल्या संपत्तीत करून ती वापरू नका. निःसंशय हा फार मोठा गुन्हा आहे. [३] अनाथांशी उचित व्यवहार करू शकणार नाही अशी भीती वाटल्यास तुम्ही (त्यांच्यासोबत असणाऱ्या) स्त्रियांपैकी तुमच्या पसंतीच्या दोन किंवा तीन किंवा चार स्त्रियांशी विवाह

[अ] सर्व मानव जन्माने एकच आहेत. सरतेशेवटी प्रत्येकजण आई-वडील म्हणून एकाच स्त्री-पुरुषाकडे त्याचे मूळ शोधू शकतो. म्हणूनच सर्व मानवांमध्ये एकमेकांशी आत्मीयतेची भावना असणे आणि एका विस्तारित कुटुंबातील सदस्यांप्रमाणे निष्पक्षतेने आणि सद्भावनेने जगणे आवश्यक आहे.

करू शकता. पण त्यांना समानतेने वागवू शकणार नाही, अशी भीती वाटल्यास एकाच स्त्रीशी विवाह करा किंवा तुमच्या अधीन असणाऱ्या दासीशी विवाह करा. यामुळे तुम्ही अन्याय करण्यापासून दूर रहाल. ४ स्त्रियांना त्यांची महरची रक्कम स्वखुशीने द्या. पण त्यांनी स्वेच्छेने त्यातील काही रक्कम परत केली तर आनंदाने आणि सदिच्छेने तुम्ही तिचा वापर करू शकता.[अ]

५ ईश्वराने उदरनिर्वाहाचे साधन म्हणून देऊ केलेली संपत्ती अपरिपक्व मनाच्या लोकांकडे सोपवू नका. त्यातून त्यांच्या अन्नवस्त्राची तरतूद करा आणि त्यांना चांगला सल्ला द्या. ६ विवाहयोग्य वयाचे होईपर्यंत अनाथांवर काटेकोर लक्ष ठेवा आणि त्यांचे विचार परिपक्व झाले आहेत असे वाटल्यास त्यांची संपत्ती त्यांच्या ताब्यात द्या. ते वयात येईपर्यंत नाहक खर्च करण्यात त्यांची संपत्ती वापरू नका. अनाथांचा पालक धनवान असेल

[अ] महर म्हणजे लग्नात पुरुषांकडून स्त्रीला भेटस्वरूप दिली जाणारी रक्कम, वस्तु आदि. इस्लामने महर हा स्त्रीचा अनिवार्य अधिकार बनवला आहे. विवाह प्रक्रियेत महर अनिवार्य असल्याचे स्पष्ट करून विवाहित जीवनाचे महत्त्व आणि मूल्य वाढवले आहे. हे लग्नाच्या वेळी दिले पाहिजे. पैगंबर मोहम्मद म्हणाले: "जो कुणी महर देणार नाही या हेतूने एखाद्या स्त्रीशी लग्न करतो तो व्यभिचारी आहे" (हदीस). स्त्रियांच्या कौटुंबिक हक्कांच्या रक्षणार्थ, कुरआन पुरुषांना महर अनिच्छेने आणि तिरस्काराने न देता, स्वेच्छेने आणि प्रेमाने देण्यास सांगतो. या श्लोकात महरसाठी वापरण्यात आलेला शब्द नहलहबद्दल एक मनोरंजक गोष्ट म्हणजे 'नहलह' हा शब्द अरबीत मधमाशी या शब्दापासून बनलेला आहे. ज्याप्रमाणे मधमाशी कोणत्याही स्वार्थाशिवाय लोकांना मध देते आणि त्यांच्या तोंडात गोडवा विरघळतो, त्याचप्रमाणे महर हासुद्धा पती पत्नीला देतो, जेणेकरून त्यांच्या जीवनात गोडवा निर्माण होईल. महर ही पत्नीची किंमत नसून पतीने दिलेली भेट आहे आणि पतीचा पत्नीबद्दल असणाऱ्या विश्वासाचे प्रतीक आहे.

तर त्याने त्यांची संपत्ती वापरणे पूर्णपणे टाळावे आणि तो निर्धन असेल तर त्यांच्या संपत्तीतला न्याय्य आणि रास्त हिस्सा स्वतःसाठी वापरावा. अनाथांची संपत्ती त्यांच्या हवाली करताना साक्षीदारांना बोलावून त्यांच्या उपस्थितीत सदर व्यवहार पार पाडावा. हिशेब करण्यात ईश्वर तत्पर आहे. ७ पालकांनी आणि नातलगांनी मागे ठेवलेल्या संपत्तीत पुरुषाचा वाटा आहे आणि स्त्रियांचा वाटा आहे; मग ती संपत्ती कमी असो की जास्त. हे (ईश्वराने) नेमून दिले आहे. ८ त्यांच्या संपत्तीचे वाटप करताना तिथे इतर नातेवाईक, अनाथ किंवा गरजू हजर असतील तर त्यांनाही त्यातला वाटा द्या आणि त्यांच्याशी मायेने बोला. ९ आपल्या निधनानंतर माघारी राहिलेल्या आपल्या अनाथ, निराधार मुलांचे कसे होईल, त्यांच्या नशिबी काय येईल याची चिंता वाटणाऱ्यांनी अनाथांचीही तशीच चिंता करावी. ईश्वराला घाबरून आणि न्यायाला धरून रहावे. १० अन्यायाने अनाथांची संपत्ती हडप करणारे खरंतर आपल्या पोटात अग्नीच भरत आहेत; लवकरच ते उसळत्या अग्निज्वाळेत होरपळून निघतील.

११ तुमच्या संततीविषयी ईश्वराने आज्ञा दिली आहे की तुमच्या वारसदारांपैकी एका पुरुष वारसदाराला स्त्री वारसदारापेक्षा दुप्पट हिस्सा मिळावा. पण स्त्री वारसदार दोनपेक्षा अधिक असतील तर त्यांना दोन तृतीयांश हिस्सा मिळावा. एकच स्त्री वारसदार असेल तर तिला वारस संपत्तीतला निम्मा वाटा मिळावा. मृताला मुलेबाळे असतील तर त्याच्या प्रत्येक पालकाला त्याच्या संपत्तीतला एकषष्ठांश वाटा मिळावा. मृताला मुलेबाळे नसतील आणि वारसदारांमध्ये फक्त पालकच असल्यास, तुमच्या आईला संपत्तीतला एक तृतीयांश वाटा मिळावा. त्याला भाऊ-बहीण असतील तर आईला त्याच्या संपत्तीतला एकषष्ठांश वाटा मिळावा. त्याच्या मृत्युनंतर त्याने इतरांना दिलेली देणगी व वडिलांशी किंवा मुलांशी

संबंधित कर्ज चुकते केले जाईल आणि त्यानंतर त्याच्या संपत्तीची वाटणी केली जाईल. यांच्यापैकी कोण पुढे तुमच्या उपयोगी पडणार आहे, हे तुम्हाला माहीत नाही. पण हे वाटे ईश्वराने निश्चित केले आहेत. तो सर्वज्ञ आणि प्रज्ञावंत आहे. १२ तुमच्या पत्नींच्या निधनानंतर त्यांना संतती नसेल तर तुम्हाला त्यांच्या संपत्तीतला निम्मा वाटा मिळेल. त्यांना संतती असेल तर तुम्हाला त्यातला एक चतुर्थांश वाटा मिळेल. त्यांनी इतरांना दिलेली देणगी आणि त्यांची देणी चुकती केल्यानंतर उरलेल्या संपत्तीची वाटणी केली जाईल. तुम्हाला संतती नसेल तर तुमच्यामागे उरलेल्या संपत्तीतला एक चतुर्थांश वाटा तुमच्या पत्नींना मिळेल. तुम्हाला संतती असेल तर तुमच्या पत्नींना त्यातला एक अष्टमांश वाटा मिळेल. त्यांनी इतरांना दिलेली देणगी आणि त्यांची देणी चुकती केल्यानंतर उरलेल्या संपत्तीची वाटणी केली जाईल. मयत स्त्री-पुरुषाला प्रत्यक्ष वारसदार म्हणजेच संतती किंवा पालक नसतील, पण भाऊ-बहीण असतील तर त्यांच्यापैकी प्रत्येकाला त्यांच्या संपत्तीतला एक षष्ठांश वाटा मिळेल. ते दोनपेक्षा जास्त असतील तर संपत्तीतला एक तृतीयांश वाटा ते आपसात वाटून घेतील. मृताने इतरांना घोषित केलेली देणगी दिल्यानंतर आणि त्याची देणी चुकती केल्यानंतर ही वाटणी केली जाईल. म्हणजे कुणाचे नुकसान होणार नाही. ही ईश्वराची आज्ञा आहे. तो सर्वज्ञ आणि संयमी आहे. १३ या मर्यादा ईश्वराने घालून दिल्या आहेत. ईश्वराच्या आणि त्याच्या प्रेषितांच्या आज्ञांचे पालन करणाऱ्यांना वाहत्या नद्यांनी युक्त बगीचांमध्ये प्रवेश मिळेल आणि तिथे त्यांचे कायमचे वास्तव्य असेल. ही त्यांची सर्वोच्च उपलब्धी असेल. १४ पण ईश्वराच्या आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञांचे पालन न करणाऱ्यांना अग्निविवरात ढकलून दिले जाईल आणि तिथे त्यांचे कायमचे वास्तव्य असेल. त्यांना मानहानीकारक शिक्षा दिली जाईल.

१५ तुमच्या पत्नींपैकी कुणी व्यभिचार केला तर तुमच्यापैकी चार
पुरुष साक्षीदारांची त्यांच्याविरुद्ध साक्ष घ्या. त्यानंतर साक्षीदारांनी त्यांच्या
अपराधाची साक्ष दिली तर मृत्यू येईपर्यंत किंवा ईश्वर अन्य मार्ग दाखवेपर्यंत
त्यांना (त्या स्त्रियांना) घरात कोंडून ठेवा. १६ दोन पुरुषांनी असेच
तिरस्करणीय कृत्य केले तर त्या दोघांनाही शिक्षा द्या. पश्चातापपूर्वक
त्यांनी वागणुकीत सुधारणा केली तर त्यांना मोकळे सोडून द्या. ईश्वर
क्षमाशील, दयाशील आहे. १७ कुणाकडून अजाणतेपणी गैरकृत्य घडले
आणि त्यानंतर लगेचच त्यांना याचा पश्चाताप झाला तरच ईश्वर त्यांच्या
पश्चातापाचा स्वीकार करण्याची जबाबदारी घेतो. ईश्वर त्यांच्यावर दया
करतो, तो सर्वज्ञ आणि बुद्धिवंत आहे. १८ आयुष्यभर सतत गैरकृत्य
करत राहून मृत्यूची चाहूल लागताच "आता मला माझ्या वागण्याचा
पश्चाताप होतो आहे" म्हणणाऱ्यांना आणि सत्य नाकारण्याच्या स्थितीत
मरण पावणाऱ्यांना ईश्वराची क्षमा लाभणार नाही. आम्ही त्यांच्यासाठी
यातनामय शिक्षा तयार ठेवली आहे.

१९ श्रद्धावंतांनो! स्त्रियांच्या इच्छेविरुद्ध त्यांचे वारसदार बनणे उचित
नाही. त्यांना दिलेल्या स्त्रीधनातला काही भाग परत मिळवण्याच्या
उद्देशाने त्यांना ताब्यात ठेवू नका. त्यांनी उघड व्यभिचाराचा गुन्हा केला
असेल तरच तुम्ही त्यांना डांबून ठेवू शकता. पत्नींबरोबर न्यायपूर्ण आणि
प्रेमळ आयुष्य जगा. तुम्हाला त्या आवडत नसतील तर कदाचित असेही
असू शकेल, तुमच्या मुबलक हितासाठी ईश्वराने नेमून दिलेल्या गोष्टी
तुम्हाला अप्रिय आहेत. २० तुम्हाला एका पत्नीचा त्याग करून दुसरी
पत्नी आणायची इच्छा झाली तर महर म्हणून तिला भरपूर संपत्ती दिली
असली, तरी त्यातील काही परत घेऊ नका. तिची निंदानालस्ती करून,
उघड दुष्टपणाने वागून ती परत घ्याल का? २१ शरीराने एकमेकांच्या

जवळ आले असताना आणि तिने तुमच्याकडून पावित्र्याची शपथ घेतली असताना महरची रक्कम तिच्याकडून परत घ्याल का? २२ भूतकाळात घडून गेलेल्या गोष्टी वगळता, तुमच्या वडलांनी ज्या स्त्रियांशी विवाह केले आहेत, त्यांच्याशी विवाह करू नका. हे अतिशय लज्जास्पद, घृणास्पद आणि गैरकृत्य आहे.

२३ तुमच्या माता, मुली, बहिणी, मातृकुलातील व पितृकुलातील मावशी, आत्या, तुमच्या भावांच्या मुली, बहिणींच्या मुली, तुमच्या दूधआई, दूध बहिणी, तुमच्या पत्नीच्या माता, तुमच्या संरक्षणातील सावत्र मुली, ज्यांच्यापासून तुम्ही विवाहसुख घेतले आहे अशा पत्नींच्या मुली यांना पत्नी बनवण्यास तुम्हाला मनाई केली आहे. पण ज्या पत्नीपासून विवाहसुख घेतले नसेल तिच्या मुलीशी विवाह केल्यास तुम्हाला दोष लागणार नाही. तुमच्या मुलांच्या पत्नीशी किंवा एकाच वेळेस दोन बहिणींशी विवाह करणेही तुमच्यासाठी निषिद्ध आहे. भूतकाळात होऊन गेलेले विवाह मात्र यातून वगळले आहेत. ईश्वर नक्कीच सदा क्षमाशील आणि दयाळू आहे. २४ तसेच तुमच्या हाती सोपवल्या गेलेल्या युद्धबंदी स्त्रिया सोडून इतर विवाहित स्त्रियांना पत्नी बनवणेही निषिद्ध आहे. हा ईश्वराने तुम्हाला दिलेला हुकुम आहे. याव्यतिरिक्त अन्य स्त्रियांशी विवाह करणे तुमच्यासाठी कायदेशीर आहे. पण स्वैराचार न करता आपली संपत्ती देऊन आणि प्रामाणिक विवाहबंधन स्वीकारून त्यांना मिळवण्याचा प्रयत्न करावा. पत्नीबरोबर विवाहसुख उपभोगल्यानंतर तिला महरची वाजवी रक्कम देऊ करा. महरची रक्कम ठरवल्यानंतर तुम्ही परस्परसंमतीने जे कराल त्यासाठी तुम्हाला दोषी धरले जाणार नाही. ईश्वर सर्वज्ञ आणि प्रज्ञावंत आहे.२५ मुक्त श्रद्धावंत स्त्रीशी विवाह करणे एखाद्याला परवडत नसल्यास त्याने आपल्या ताब्यातील श्रद्धावंत दासींशी

विवाह करावा. ईश्वर तुमची श्रद्धा चांगलीच जाणतो. तुम्ही एकमेकांचेच आहात, तेव्हा त्यांच्याशी व्यभिचारही करू नका आणि गुप्त संबंधही ठेवू नका, तर त्यांच्या मालकाच्या परवानगीने त्यांच्याशी विवाह करा आणि तिला महरची वाजवी रक्कम देऊ करा. विवाहानंतर त्यांनी स्वैराचार केल्यास मुक्त स्त्रीसाठी ठरवून दिलेल्या शिक्षेची निम्मी शिक्षा त्यांना द्या. आपल्या हातून काही अपराध घडू नये अशी भीती बाळगणाऱ्यांसाठी ही आज्ञा आहे, पण स्वतःवर ताबा ठेवणे हेच अधिक चांगले आहे. ईश्वर अतिशय क्षमाशील, दयाशील आहे.

२६ ईश्वराला सगळ्या गोष्टी तुमच्यासमोर स्पष्ट करायच्या आहेत आणि तुमच्याआधी होऊन गेलेल्या सदाचारी लोकांच्या मार्गाने तुम्हाला घेऊन जायचे आहे. त्याला तुमच्यावर कृपादृष्टी ठेवायची आहे. ईश्वर सर्वज्ञ आणि बुद्धिवंत आहे. २७ त्याला तुमच्यावर कृपादृष्टी ठेवायची आहे, पण स्वतःच्या उत्कट इच्छांना अनुसरून वागणारे तुम्हाला सन्मार्गापासून दूर नेऊ इच्छितात. २८ ईश्वराला तुमचा भार हलका करायचा आहे, कारण त्याने निर्माण केलेला माणूस दुबळा आहे.

२९ श्रद्धावंतांनो! अन्यायाने एकमेकांची संपत्ती हडप करू नका तर परस्पर संमतीने तिच्याद्वारे व्यापार करा. एकमेकांची हत्या करू नका, कारण ईश्वर तुमच्यासाठी खूप दयाळू आहे. ३० कुणी आमच्या आज्ञेचे उल्लंघन करून आणि निषिद्ध असलेल्या गोष्टी केल्या तर आम्ही त्याला अग्नीच्या हवाली करू आणि ईश्वरासाठी हे खूपच सोपे आहे. ३१ तुम्हाला मनाई केलेल्या मोठमोठ्या पापांपासून दूर राहिलात तर तुमच्या किरकोळ चुका आम्ही माफ करू आणि (स्वर्गासारख्या) सन्माननीय ठिकाणी तुम्हाला दाखल करू.

३२ तुमच्यापैकी काही जणांवर ईश्वराने इतरांपेक्षा जास्त कृपा करून काही देणग्या बहाल केल्या आहेत, त्याची हाव धरू नका. त्यापेक्षा

(हे प्रेषिता) ईश्वराकडे त्याच्या कृपेची याचना करा. पुरुषांना त्यांच्या कर्माप्रमाणे आणि स्त्रियांना त्यांच्या कर्माप्रमाणे फळ मिळेल. ईश्वराकडे सगळ्याचे ज्ञान आहे. ३३ मातापित्यांनी आणि जवळच्या नातलगांनी आपल्या माघारी ठेवलेल्या प्रत्येक गोष्टीसाठी आम्ही वारसदार नेमले आहे. त्यामुळे तुम्ही ज्यांच्याशी करार केले आहेत, त्यांना त्यांचा वाजवी हिस्सा द्या. ईश्वर सगळ्याचा साक्षीदार आहे.

३४ पुरुष स्त्रियांचे रक्षक आहेत, कारण ईश्वराने त्यांना स्त्रियांपेक्षा श्रेष्ठ दर्जा दिला आहे आणि ते आपली संपत्ती स्त्रियांसाठी खर्च करतात. यामुळे सदाचारी स्त्रिया पतीच्या आज्ञेत राहतात आणि त्याच्या अनुपस्थितीत ईश्वराच्या देखरेखीखाली आपल्या शीलाची जपणूक करतात. काही पत्नींच्या चारित्र्याची शंका आल्यास सुरुवातीला त्यांना ताकीद द्या. नंतर त्यांची शय्यासोबत नाकारा आणि त्यानंतर त्यांना (सौम्यपणे) मारा. एवढे झाल्यानंतर त्या तुमच्या आज्ञेत राहत असतील तर त्यांच्याविरुद्ध काही कारवाई करू नका. ईश्वर श्रेष्ठ, महान आहे.[अ]

३५ कुणा पती-पत्नीत मतभेद झाल्याची शंका आल्यास दोघांच्या कुटुंबियांपैकी एका मध्यस्थाची पंच म्हणून नेमणूक करा. त्या दोघांनाही त्यांचे संबंध सुरळीत करायचे असतील तर ईश्वर त्यांच्यात समेट घडवेल. तो सर्वज्ञ आणि सदैव जागरूक आहे.

३६ ईश्वराची आराधना करा, त्याच्याबरोबर भागीदार जोडू नका. मातापित्यांशी, नातेवाईकांशी, अनाथांशी, गरजूंशी, नातेवाईक असलेल्या शेजाऱ्यांशी, नातेवाईक नसलेल्या शेजाऱ्यांशी, तुमच्या सोबत्यांशी, वाटसरूंशी आणि हक्काने तुमच्या ताब्यात असणाऱ्यांशी चांगले वागा.

[अ] ही प्रतीकात्मक कृती दर्शवते. कारण ईश्वराच्या सृष्टीला कधीही मारहाण करू नका, असे सांगून पैगंबराने स्त्रीला मारहाण करण्यास मनाई केली होती.

ईश्वराला उद्धट, घमेंडी लोक आवडत नाहीत. [३७] जे स्वतः कंजूष असून इतरांनाही तसेच वागण्याचा आग्रह धरतात आणि ईश्वराने उदारहस्ते त्यांना दिलेली दौलत लपवून ठेवतात, ते लोक ईश्वराला अप्रिय आहेत. सत्य अमान्य करणाऱ्यांसाठी आम्ही अपमानास्पद शिक्षा सज्ज ठेवली आहे. [३८] दिखाऊपणावर संपत्तीची उधळण करणारे आणि ईश्वरावर व अंतिम दिवसावर विश्वास नसणारे लोक ईश्वराला अप्रिय आहेत. ज्याने सैतानाला सोबती म्हणून निवडले आहे त्याने कुकर्माची सोबत घेतली आहे. [३९] ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवून ईश्वराने देऊ केलेल्या संपत्तीतून दान केले तर त्यांचे काय नुकसान होईल? ईश्वर त्यांना चांगले ओळखतो. [४०] ईश्वर कुणावर तीळमात्रही अन्याय करत नाही. आपण सत्कर्म केले तर तो त्याची दुप्पट परतफेड करतो आणि दानशूरपणे भरघोस मोबदला देऊ करतो.

[४१] आम्ही प्रत्येक समाजातून एक साक्षीदार आणला आणि तुम्हाला या लोकांविरुद्धचा साक्षीदार म्हणून उभे केले तर ते काय करतील? [४२] सत्य नाकारण्याकडे झुकलेल्यांना आणि ईश्वराच्या प्रेषिताचा आज्ञाभंग केलेल्यांना निवाड्याच्या दिवशी वाटेल, ही भूमी आपल्याला पोटात घेईल तर किती चांगले होईल! ईश्वरापासून ते काहीही लपवू शकणार नाहीत. [४३] श्रद्धावंतांनो! मद्याच्या नशेत असताना आपण काय बोलतोय याची शुद्ध येईपर्यंत किंवा अपवित्र असताना स्नान करेपर्यंत ईश्वराची प्रार्थना करू नका, याला अपवाद फक्त प्रवासात असतानाचा. प्रवासात किंवा आजारी असाल, शौच करून किंवा स्त्री सहवास करून आलेले असाल आणि स्वच्छतेसाठी पाणी मिळाले नाही, तर स्वच्छ माती घेऊन तिने आपल्या चेहेऱ्याची, हातांची स्वच्छता करा. ईश्वर कृपाळू आणि क्षमाशील आहे.

४४ ज्यांना या ग्रंथाचा काही भाग दिला होता त्यांना तुम्ही ओळखत
नाही का? ते जाणूनबुजून चुका करतात आणि तुमची दिशाभूल करू
पाहतात. ४५ ईश्वर तुमच्या शत्रूंविषयी अगदी दक्ष आहे. तुमचा आश्रयदाता
म्हणून, पाठीराखा म्हणून तो समर्थ आहे. ४६ काही यहूदी शब्दांचा संदर्भ
बदलून म्हणतात, "आम्ही ऐकले आहे, पण आम्ही आज्ञा पाळत नाही,"
किंवा म्हणतात, "आमच्याकडे पहा, आम्ही लक्ष देऊन ऐकत नाही."
धर्माला कमीपणा आणण्यासाठी ते शब्द असे फिरवतात. वास्तविक त्यांनी
म्हणायला हवे होते, "प्रेषिताचे बोलणे आम्ही ऐकले आहे आणि आम्ही
आज्ञा पाळतो. हे प्रभू! आमच्यावर लक्ष ठेव, तुझी कृपा असू दे." हे
त्यांच्यासाठी अधिक चांगले ठरले असते. पण त्यांच्यापैकी मूठभर लोक
वगळता इतरांनी उघडउघड अवज्ञा केल्यामुळे त्यांना ईश्वराने धिक्कारले
आहे. त्यामुळे ते विश्वास ठेवणारच नाहीत.

४७ ग्रंथधारकांनो! शब्बाथचा (सब्तचा) नियम मोडणाऱ्यांना आम्ही जसे
धिक्कारले होते, तसे तुम्हाला पराभूत करण्यासाठी किंवा धिक्कारण्यासाठी
आम्ही तुमची दिशाभूल करण्याआधी, आम्ही पाठवलेल्या सत्यावर
विश्वास ठेवा. या सत्यातून अगोदरपासून तुमच्याकडे असलेले सत्य
(अंतिम प्रेषिताच्या आगमनाचे भाकीत) प्रमाणित होत आहे. ईश्वराची
आज्ञा नेहमी अमलात आणली जाते. ४८ ईश्वराचा संबंध भलत्याच गोष्टींशी
जोडणाऱ्याला तो क्षमा करणार नाही, तर अन्य कुठल्याही अपराधासाठी
त्याच्या इच्छेला येईल त्याला तो माफ करेल. अनेकेश्वरवादावर विश्वास
ठेवतो तो घोर अपराधी आहे. ४९ स्वतःला पवित्र मानणाऱ्यांना तुम्ही
पाहिले नाही का? वस्तुतः ईश्वरच त्याच्या इच्छेला येईल त्याला पवित्र
करतो, तो कुणावरही किंचितही अन्याय करत नाही. ५० पहा, ते आपल्या
कल्पित कथा कसे ईश्वराच्या नावावर खपवत आहेत! वस्तुतः हे कृत्यच
उघडउघड पाप आहे.

५१ या ग्रंथाचा काही भाग ज्यांना दिला गेला त्यांना तुम्ही पाहिले नाही
का? त्यांची मूर्तींवर आणि सैतानांवर श्रद्धा आहे. सत्य नाकारणाऱ्यांविषयी
ते म्हणतात की त्यांना श्रद्धावंतांपेक्षा योग्य मार्गदर्शन मिळाले आहे.
५२ ते ईश्वराने धिक्कारलेल्यांपैकी आहेत. ईश्वराने धिक्कारलेल्यांना मदत
करणारे तुम्हाला कुणी दिसणार नाही. ५३ ईश्वराच्या साम्राज्यात यांचा
वाटा आहे का? तसा तो असता तर यांनी इतरांचा तीळभरही लाभ
होऊ दिला नसता. ५४ ईश्वराने आपल्या कृपेने इतरांना जे लाभ दिले
आहेत त्यासाठी ते त्यांचा मत्सर करतात का? अब्राहामच्या घराण्याला
आम्ही पवित्र ग्रंथ, बुद्धिमत्ता आणि अफाट सत्ता देऊ केली होती.
५५ त्यांच्यापैकी काहींनी या ग्रंथावर विश्वास ठेवला, तर काहींनी त्याकडे
पाठ फिरवली. याचा मोबदला म्हणून भडकत्या ज्वाळेत त्यांना होरपळून
काढायला नरक पुरेसा आहे. ५६ आमचे साक्षात्कार नाकारणाऱ्यांना आम्ही
नरकाग्नीत लोटून देऊ. त्यांच्या जळलेल्या त्वचेच्या जागी आम्ही नवीन
त्वचा आणू म्हणजे शिक्षेची चव त्यांना पुन्हा एकदा चाखावी लागेल.
ईश्वर सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान आहे. ५७ तर आमच्या साक्षात्कारांवर
विश्वास ठेवणाऱ्यांना आणि सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही वाहत्या नद्या
असणाऱ्या उद्यानांमध्ये दाखल करू, तिथे त्यांना कायमसाठी वसवू. तिथे
त्यांना पवित्र जोडीदार मिळतील आणि आमच्या कृपेची घनदाट छाया
लाभेल.

५८ ईश्वराची तुम्हाला आज्ञा आहे की तुमच्या ताब्यातील विश्वास ठेव
(अमानत) योग्य मालकाच्या हाती सोपवा. आणि लोकांचा न्यायनिवाडा
करताना न्यायबुद्धीने वागा. ईश्वराच्या सूचना तुमच्यासाठी उत्कृष्ट
आहेत. तो सगळे ऐकतो आणि सगळे पाहतो. ५९ भाविकांनो! ईश्वराच्या,
त्याच्या प्रेषिताच्या आणि तुमच्यापैकी विश्वासाने अधिकार सोपवलेल्या

व्यक्तींच्या आज्ञेचे पालन करा. ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर खरा विश्वास असेल तर एखाद्या बाबतीत आपसात मतभेद झाल्यास ते सोडवण्यासाठी ईश्वराचा आणि त्याच्या प्रेषिताचा संदर्भ घ्या. हे सदैव सर्वोत्कृष्ट धोरण आहे. ६० तुमच्यावर आणि तुमच्या आधीच्या प्रेषितांवर जे अवतीर्ण झाले त्यावर विश्वास ठेवल्याचा आव आणणाऱ्यांना तुम्ही पाहिले नाही का? त्यांना दुष्ट लोकांचे बोलणे मान्य करू नका, अशी आज्ञा दिली असतानाही ते त्यांच्या मतांची कदर करतात आणि सैतानही त्यांना सन्मार्गावरून दूर नेऊ इच्छितो. ६१ ईश्वराने अवतीर्ण केलेल्या सत्याकडे आणि त्याच्या प्रेषिताकडे या असे सांगितल्यावर ढोंगी लोक त्यापासून दूर गेल्याचे तुम्ही पाहिले आहे. ६२ त्यांच्याच या कर्मामुळे त्यांच्यावर आपत्ती ओढवल्यावर त्यांची स्थिती काय होईल? ते तुमच्याकडे येतील, ईश्वराची शपथ घेतील आणि म्हणतील ते तर फक्त सदिच्छेच्या आणि सलोख्याच्या शोधात होते. ६३ पण त्यांच्या मनात लपलेल्या गोष्टी ईश्वर जाणतो; तेव्हा त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करा, त्यांना ताकीद द्या आणि मनाला स्पर्शून जाईल अशा भाषेत त्यांच्याशी बोला.

६४ आम्ही पाठवलेल्या सगळ्या प्रेषितांची आज्ञा (ग्रंथधारकांनी) पाळावी, अशी ईश्वराची इच्छा होती. पण सत्य नाकारणारे, त्यांच्या हातून एखादा अपराध घडल्यावर क्षमेच्या शोधात तुमच्याकडे आले असते, आणि तुम्ही त्यांच्या वतीने ईश्वराकडे क्षमायाचना केली असती, तर ईश्वर सदैव क्षमाशील आणि दयाशील असल्याचे त्यांना कळले असते. ६५ आपसातील मतभेद सोडवण्यासाठी त्यांनी तुमची मध्यस्थी मागेपर्यंत आणि त्यावर तुम्ही काढलेल्या तोडग्यावर कसलीही शंका न घेता मनापासून तो स्वीकारेपर्यंत तुमच्या पालनकर्त्याच्या लेखी ते सच्चे

श्रद्धावंत असणार नाहीत. ६६ प्राणार्पण करा किंवा घरादाराचा त्याग करा, अशी आज्ञा आम्ही त्यांना दिली असती, तर फार थोडेजण वगळता त्यांनी आमचे आज्ञापालन केले नसते. त्यांनी तसे केले असते तर त्यांचे अधिक चांगले झाले असते आणि त्यांच्या श्रद्धेला अधिक बळकटी आली असती. ६७ आम्ही आमच्याकडून त्यांना याचा भरघोस मोबदला दिला असता. ६८ आणि त्यांना सन्मार्गावर नेले असते. ६९ ज्यांनी ईश्वराचे आणि त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन केले आहे ते त्याच्या कृपेचा लाभ मिळालेल्यांपैकी आहेत. जसे की ईश्वराचे प्रेषित, सत्यप्रिय श्रद्धावंत, सत्याचे साक्षीदार आणि सदाचारी लोक. हे किती उत्कृष्ट सोबती आहेत! ७० ही सगळी त्या ईश्वराची कृपा! त्याचे ज्ञान अमर्याद आहे.

७१ सत्यावर विश्वास ठेवणाऱ्यांनो, योग्य ती खबरदारी घ्या आणि लहान लहान गटात किंवा सगळ्यांनी मिळून आगेकूच करा. ७२ तुमच्यापैकी काहीजण लढाईत मागे राहतील आणि तुमची पिछेहाट झाली तर म्हणतील, "ईश्वराची कृपा, आम्ही त्यांच्याबरोबर नव्हतो." ७३ पण ईश्वराच्या कृपेने तुमची सरशी झाली तर म्हणतील, "आम्ही त्यांच्याबरोबर असतो तर किती तरी यशस्वी झालो असतो." जणूकाही तुमच्यात परस्पर आपुलकीचे संबंध नसल्यानेच ते तुमच्याबरोबर नव्हते! ७४ परलोकातील जीवनासाठी इहलोकातील जीवन समर्पित करण्यास सज्ज असणाऱ्यांनो, ईश्वरी कार्यासाठी लढा. ईश्वरी हेतूने लढणाऱ्याला वीरगती मिळो की विजयश्री लाभो, आम्ही त्याला भरघोस मोबदला देणारच. ७५ हे पालनकर्त्या! पाप्यांच्या बजबजपुरीतून आमची सुटका कर, तुझ्या कृपेने आम्हाला पाठीराखा आणि रक्षणकर्ता लाभू दे, अशी विनवणी करणाऱ्या असंख्य वृद्धांसाठी, बालकांसाठी, महिलांसाठी आणि ईश्वरी कार्यासाठी तुम्ही कसे लढणार नाही? ७६ श्रद्धावंत ईश्वरी कार्यासाठी लढतात तर श्रद्धा

नाकारणारे सैतानासाठी लढतात, तेव्हा तुम्ही सैतानाच्या या सोबत्यांशी लढा; सैतानाचे कारस्थान खरोखर दुबळे आहे.

७७ आपल्या हातांवर (वाईटापासून) ताबा ठेवा, नियमितपणे नमाज़ पठण करा आणि निर्धारित दानधर्म करा असे सांगण्यात आलेल्यांना तुम्ही पाहिले नाही का? त्यांना लढायचा हुकुम दिल्यावर, ईश्वराला घाबरावे तसे किंवा त्याहूनही अधिक ते माणसांना घाबरले. अशा प्रसंगी त्यांनी विनंती केली, "हे पालनकर्त्या! आम्हाला लढायचा हुकुम का दिला? तो थोडा लांबणीवर नाही का टाकता येणार?" त्यांना सांगा, "ईश्वराची भीती बाळगणाऱ्यांसाठी इहलोकातले फायदे क्षुल्लक आहेत, तर परलोकातले फायदे महान आहेत. तुमच्यावर किंचितही अन्याय होणार नाही." ७८ त्यांना सांगा, "तुम्ही कुठेही असा अगदी भक्कम मनोर्यात असा, मृत्यू तुमचा घास घेणारच." चांगला प्रसंग घडला तर ते म्हणतात, "हे ईश्वरामुळे झाले." दुरवस्था ओढवली तर ते म्हणतात, "हे तुमच्यामुळे झाले." त्यांना सांगा, "सगळे काही ईश्वरच करतो." पण या लोकांचे काय बिनसले आहे की ते काही समजावूनच घेत नाहीत? ७९ तुमचे जे काही भले होते ते ईश्वरामुळे आणि जे संकट येते ते तुमच्या स्वतःच्या कर्मामुळे. मानवजातीचा प्रेषित म्हणून आम्ही तुम्हाला पाठवले आहे आणि याचा साक्षीदार म्हणून ईश्वर समर्थ आहे.

८० प्रेषिताच्या आज्ञेचे पालन करणारा ईश्वराच्याही आज्ञाचे पालन करतो. हे प्रेषिता! जे याकडे दुर्लक्ष करतात त्यांची रखवाली करण्यासाठी आम्ही तुम्हाला पाठवलेले नाही. ८१ तुमच्यासमोर ते म्हणतात, "आम्ही तुमच्या आज्ञेत आहोत." पण तुमची पाठ वळल्याबरोबर त्यांच्यापैकी काहीजण एकत्र जमून रात्रभर तुमच्याविरुद्ध कारस्थान रचतील. ईश्वर त्यांच्या या कारस्थानाची नोंद घेतो. तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष करा आणि

ईश्वरावर भरवसा ठेवा. विश्वस्त म्हणून तो पुरेसा आहे. ८२ ते कुरआनचे चिंतन करत नाहीत का? हे ईश्वराशिवाय इतर कुणाकडून आले असते तर त्यात पुष्कळ विसंगती आढळल्या असत्या. ८३ जेव्हा ते एखादी बातमी ऐकतात, ती शांतिकारक की भयकारक ताबडतोब सगळीकडे पसरवतात. त्याऐवजी त्यांनी प्रेषिताकडे किंवा त्यांच्यातील अधिकारी व्यक्तीकडे विचारणा केली असती, तर बातमीचा शहानिशा करणाऱ्यांनी सखोल चौकशी करून त्यातले तथ्य शोधले असते. जर तुमच्यावर ईश्वराची कृपा आणि दया नसती, तर (फार) थोडे लोक वगळता इतर सर्व, सैतानाचे अनुसरण करणारे बनले असते.

८४ श्रद्धावंतांना आग्रहाने सांगा, "ईश्वरी कार्यासाठी लढा. तुम्ही फक्त तुमच्या स्वतःसाठी जबाबदार आहात, इतरांसाठी नव्हे." सत्य नाकारणाऱ्यांची (हिंसक) शक्ती ईश्वर नामोहरम करेल. तो प्रचंड ताकदवान आणि शिक्षा देण्यात कठोर आहे. ८५ सत्कृत्यांसाठी प्रवृत्त होणाऱ्याला ईश्वराचा आशीर्वाद लाभेल तर दुष्कृत्यांसाठी प्रवृत्त होणाऱ्याला त्याच्या परिणामाची जबाबदारी घ्यावी लागेल. कारण, खरोखर ईश्वर सगळ्यावर नजर ठेवून आहे. ८६ कुणी शुभेच्छा दिल्या तर तुम्हीही त्याला शुभेच्छा द्या. किमान सकारात्मक प्रतिसाद तरी द्या. ईश्वर या सगळ्याची नोंद घेतो. ८७ एकच ईश्वर तुमचा उपास्य आहे, त्याच्याशिवाय कुणीही उपासनेयोग्य नाही. पुनर्निर्माणाच्या दिवशी तो तुम्हा सगळ्यांना एकत्र करेल यात काही शंका नाही. कुणाचे शब्द ईश्वरापेक्षा खरे असू शकतील?

८८ त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांबद्दल खुद्द ईश्वरानेच त्यांना पुन्हा एकदा अविश्वासाच्या गर्तेत टाकले आहे. असे असताना या ढोंग्यांवरून तुमच्यात दोन गट पडले आहेत. ईश्वराने ज्यांना मार्गभ्रष्ट केले आहे, त्यांना तुम्हाला मार्गदर्शन करायचे आहे का? ईश्वराने भरकटवलेल्यांना कुणीही

सन्मार्गावर आणू शकत नाही. [८९] तुम्ही सत्य अमान्य करावे असे त्यांना वाटते, म्हणजे तुम्हीही त्यांच्यासारखेच बनाल. ते ईश्वराच्या मार्गावर येईपर्यंत त्यांची मैत्री करू नका. ईश्वराने आखून दिलेल्या मार्गाकडे त्यांनी पाठ फिरवली, तर जिथे सापडतील तिथे ताब्यात घेऊन त्यांची हत्या करा. आणि त्यांच्यापैकी कुणाशी मैत्री करू नका की त्यांच्याकडून कसली मदत घेऊ नका. [९०] पण तुम्ही ज्यांच्याशी तह केला आहे त्यांच्या आश्रयाला येणाऱ्यांचा किंवा तुमच्याशी आणि स्वकीयांशी लढायला त्यांची अंतः करणे तयार नाहीत, म्हणून तुमच्याजवळ येणाऱ्याचा याला अपवाद करा. ईश्वराच्या मनात आले असते तर तुमच्याविरुद्ध शस्त्र उगारता यावे म्हणून ईश्वराने यांना तुमच्यापेक्षा बलवान केले असते. तेव्हा तुमच्याशी लढायचे थांबून त्यांनी शत्रुत्व सोडून दिले आणि तुमच्यासमोर शांततेचा प्रस्ताव ठेवला तर ईश्वर तुम्हाला त्यांना अपाय करायची अनुमती देत नाही. [९१] तुम्हाला असेही काहीजण आढळतील, ज्यांना तुमच्यापासून आणि त्यांच्या स्वकीयांपासून सुरक्षित रहायचे आहे. आणि तरीही तुमचे नुकसान करायची संधी मिळताच ती ते चटकन उचलतात. तेव्हा त्यांनी माघार घेतली नाही, तुमच्यासमोर शांतिप्रस्ताव ठेवला नाही किंवा तुमच्याशी लढायचे थांबले नाहीत, तर जिथे सापडतील तिथे ताबा घेऊन त्यांची हत्या करा. अशांच्या बाबतीत आम्ही तुम्हाला निःसंदिग्ध अधिकार दिले आहेत.

[९२] एका श्रद्धावंताने दुसऱ्या श्रद्धावंताची हत्या करू नये, चुकून असे घडल्यास ते क्षम्य आहे. चुकून श्रद्धाळूंची हत्या करणाऱ्यांने एका श्रद्धाळू गुलामाची मुक्तता करावी आणि बळी पडलेल्याच्या नातेवाईकांना त्याच्या रक्ताची किंमत चुकती करावी. त्याच्या नातेवाईकांनी परोपकार बुद्धीने ही रक्कम माफ केली, तर ठीक आहे. बळी पडलेली व्यक्ती

शत्रुपक्षाची असेल, पण श्रद्धावंत असेल तर त्याच्या हत्येची भरपाई म्हणून एका श्रद्धावंत गुलामाची मुक्तता करावी. ती व्यक्ती तुमच्याशी तह झालेल्यांपैकी असेल तर तिच्या नातेवाईकांना रक्ताची किंमत चुकती करा आणि एका गुलामाला मुक्त करा. भरपाईच्या साधनांची कमतरता असल्यास हत्या करणाऱ्याने दोन महिने सलग उपवास केलाच पाहिजे. हे प्रायश्चित्त ईश्वराने नेमून दिले आहे. तो सर्वज्ञ आणि बुद्धिमान आहे. ९३ पण कुणी जाणूनबुजून श्रद्धावंताची हत्या केली, तर त्या मोबदल्यात त्याला चिरंतन नरकवास भोगावा लागेल. ईश्वर त्याला पापी ठरवेल, धिक्कारेल आणि भयानक शिक्षा त्याच्यासाठी सज्ज ठेवेल.

९४ श्रद्धावंतांनो! ईश्वरी कार्यासाठी वाटचाल सुरू केल्यावर परिस्थितीचे साकल्याने अवलोकन करा आणि शांतीच्या शुभेच्छा देणाऱ्याला, "तू श्रद्धावंत नाहीस," असे म्हणू नका. कारण तुम्ही या जीवनातल्या कल्याणकारी गोष्टींच्या शोधात आहात. ईश्वराकडे कल्याणकारी गोष्टी मुबलक आहेत. पूर्वी तुम्हीही याच (त्यांच्याच) स्थितीत होता. पण ईश्वराने तुमच्यावर विशेष कृपा केली आहे. म्हणूनच परिस्थितीचा छडा लावण्याची काळजी घ्या. नक्कीच तुम्ही जे करता ते ईश्वर जाणतो. ९५ काही विशेष कारण नसताना ईश्वरी कार्यात टाळाटाळ करणारे, तन मन धन वेचून अशा कार्यात खपणाऱ्या श्रद्धावंतांच्या बरोबरीचे नाहीत. सर्वस्वानीशी असे कठोर परिश्रम करणाऱ्यांना ईश्वराने टाळाटाळ करणाऱ्यांपेक्षा श्रेष्ठ दर्जा दिला आहे. ईश्वराने सगळ्यांना चांगला मोबदला देण्याचा शब्द दिला आहे, पण त्याच्या मार्गात राबणाऱ्यांना तो फारच भरघोस मोबदला देतो. ९६ उच्च स्थानाच्या बरोबरीने तो त्यांच्यावर दयेची, कृपेची दृष्टीही ठेवतो. ईश्वर क्षमाशील, दयाशील आहे.

९७ स्वतः होऊन अपराध करणाऱ्यांच्या आत्म्याचा समाचार

घेताना ईश्वराचे दूत विचारतील, "तुम्ही हे दुष्कृत्ये का केलेत?" ते सांगतील, "आम्ही पृथ्वीवर खूपच दुबळे होतो." यावर देवदूत त्यांना विचारतील, "दुसऱ्या एखाद्या ठिकाणी स्थलांतर करायला ईश्वराची धरती तुम्हाला पुरेशी मोठी वाटली नाही का?" हे असे लोक आहेत ज्यांना नरकासारख्या गलिच्छ ठिकाणी कायमचे वास्तव्य करावे लागेल. ९८ दुबळ्या स्त्री-पुरुष आणि बालकांना यातून वगळले जाईल, कारण ते स्थलांतर करायला, तशी योजना आखायला असमर्थ आहेत. ९९ ईश्वर त्यांना माफ करेल, तो माफ करायला, क्षमा करायला तत्पर आहे. १०० ईश्वरी कार्यासाठी स्थलांतर करणाऱ्यांना आश्रयासाठी अनेक जागा मिळतील आणि तिथे त्यांच्या दैनंदिन गरजांची पूर्तता मुबलकतेने होईल. ईश्वरासाठी आणि त्याच्या प्रेषितासाठी ज्यांना घरादारांचा त्याग करावा लागला, त्यांच्यासाठी ईश्वराकडून भरघोस मोबदला मिळेल. ईश्वर खूप क्षमाशील, दयाशील आहे.

१०१ प्रवासात असताना अश्रद्धावंतांकडून इजा होण्याची भीती वाटत असेल तर श्रद्धावंतांनी आपली प्रार्थना थोडक्यात आवरली तरी चालेल. त्यांना याचा दोष लागणार नाही. ते तुमचे उघड उघड शत्रू आहेत. १०२ श्रद्धावंतांसमवेत राहून त्यांच्या प्रार्थनेचे नेतृत्व निभावत असताना, त्यांच्यापैकी काहीजणांना तुमच्यासोबत उभे राहून प्रार्थना करू द्या. यावेळी त्यांनी शस्त्रसज्ज असावे. त्यांची प्रार्थना झाल्यावर पिछाडीवर जाऊन त्यांना पहारा देऊ द्या आणि उरलेल्यांपैकी एका गटाला पुढे येऊन प्रार्थनेसाठी तुमच्याबरोबर प्रार्थना करू द्या. त्यांनीही इतरांप्रमाणेच शस्त्रसज्ज असावे. कारण, तुम्ही शस्त्रास्त्रांच्या, सामानसुमानाच्या बाबतीत हलगर्जीपणा करावा म्हणजे तुमच्यावर अचानक हल्ला चढवता येईल असे सत्य नाकारणाऱ्यांना वाटते. आजारपणामुळे किंवा जोरदार पावसामुळे

शस्त्रास्त्रे उतरवून ठेवलीत तरी तो तुमचा गुन्हा नाही, पण अशा वेळे स्व-रक्षणाची जबाबदारी घ्या. सत्य नाकारणाऱ्यांसाठी ईश्वराने अपमानास्पद शिक्षा सज्ज ठेवली आहे. [१०३] प्रार्थना करून झाल्यावरही उठताना, बसताना, विश्रांती घेताना सतत ईश्वराचे स्मरण करा; सुरक्षित वाटत असेल तेव्हा ठरवून दिलेल्या पद्धतीने प्रार्थना करा. निर्धारित वेळेस प्रार्थना करणे श्रद्धावंतांसाठी बंधनकारक आहे. [१०४] शत्रूचा पाठलाग करण्यात हलगर्जीपणा दाखवू नका. तुमच्यावर कठीण परिस्थिती ओढवली असेल तर ती त्यांच्यावरही ओढवली आहे, पण तुम्ही ईश्वराकडून ज्याची अपेक्षा ठेवू शकता तशी ते ठेवू शकत नाहीत. ईश्वर सर्वज्ञ, प्रज्ञावंत आहे.

[१०५] हा ग्रंथ आम्ही सत्यासह तुमच्याकडे पाठवला आहे, ज्यायोगे आम्ही प्रकट केलेल्या साक्षात्कारांनुसार तुम्हाला माणसांची पारख करता यावी. विश्वासघातक्यांचे समर्थक होऊ नका. [१०६] ईश्वराकडे क्षमेची याचना करा. तो अतिशय क्षमाशील, दयाशील आहे. [१०७] स्वतःशीच अप्रामाणिक असणाऱ्यांची बाजू मांडू नका. विश्वासघातकी, पापी लोक ईश्वराला निःसंशय आवडत नाहीत. [१०८] रात्री-अपरात्री कारस्थाने रचताना, ईश्वराला मान्य नसलेल्या गोष्टी ठरवताना, खरे तर ईश्वर त्यांच्या अवतीभोवतीच असतो. त्याला त्यांच्या सगळ्या कृत्यांची संपूर्ण जाणीव आहे. तरीही त्यांना लोकांसमोर ओशाळवाणे वाटते, ईश्वरासमोर नाही.

[१०९] या जगातल्या जीवनात कदाचित तुम्ही त्यांची बाजू मांडू शकाल, त्यांच्या बाजूने युक्तिवाद करू शकाल, पण पुनर्निर्माणाच्या दिवशी ईश्वरासमोर त्यांची बाजू कोण मांडेल? त्यांचा समर्थक कोण असेल? [११०] तरीही दुष्कृत्ये करणाऱ्याने किंवा स्वतःशी प्रतारणा करणाऱ्याने ईश्वराकडे क्षमायाचना केली तर ईश्वर त्यालाही माफ करेल. त्याच्यावरही दया दाखवेल. [१११] अपराध करणारा खरे तर स्वतःच्या आत्म्याचा

अपराधी असतो. ईश्वर सर्वज्ञ, प्रज्ञावंत आहे. [११२] स्वतः अपराध करून निरपराध व्यक्तीवर आळ घेणाऱ्यास निःसंशय नसते कुंभाड रचल्याबद्दल, उघड-उघड पाप केल्याबद्दल दोषी धरले जाईल. [११३] तुमच्यावर ईश्वराची कृपादृष्टी, दयादृष्टी नसती तर त्यांच्यापैकी काहींनी तुम्हाला मार्गभ्रष्ट करायचा निश्चय केला असता, पण त्यांनी इतरांना नाही, तर स्वतःलाच चुकीच्या मार्गावर नेले आहे. ते तुमचे काही नुकसान करू शकत नाहीत. ईश्वराने तुमच्याकडे हा ग्रंथ आणि शहाणपण पाठवले आहे आणि तुम्हाला माहित नसलेल्या गोष्टी शिकवल्या आहेत. खरोखर ईश्वराने तुमच्यावर फार मोठी कृपा केली आहे.

[११४] परोपकाराचा, सहृदयतेचा आग्रह धरणारे किंवा लोकांमध्ये समेट घडवू इच्छिणारे वगळता त्यांच्या बहुतेकांच्या गुप्त चर्चांमध्ये चांगल्याचा लवलेश नसतो. ईश्वराची मर्जी संपादन करण्यासाठी जो चांगुलपणाने वागेल त्याला आम्ही भरघोस मोबदला देऊ. [११५] ईश्वराने दिलेले मार्गदर्शन स्पष्ट झाल्यावरही प्रेषिताला विरोध करणाऱ्यांना आणि श्रद्धावंतांचा मार्ग सोडून इतर मार्ग चोखाळणाऱ्यांना आम्ही त्यांनी निवडलेल्या मार्गाने जाऊन देऊ आणि त्यांना नरकासारख्या गलिच्छ ठिकाणी लोटून देऊ.

[११६] निःसंशय, ईश्वर अनेकेश्वरवाद्यांना कधी माफ करणार नाही, याव्यतिरिक्त इतर कोणत्याही गोष्टीसाठी तो त्याच्या मर्जीला येईल, त्याला माफ करतो. अनेकेश्वरवाद मानणारे खरोखर सरळ मार्गापासून खूप भरकटले आहेत. [११७] ते अनेकेश्वरवादी स्त्री देवतांची आळवणी करतात आणि इतर कुणाला नाही, तर सैतानाला एका बंडखोराला आवाहन करतात, [११८] ज्याला ईश्वराने धिक्कारले आहे. हा सैतान ईश्वराला म्हणतो, "मी तुझ्या अनेक सेवकांचा कब्जा घेईन. [११९] आणि त्यांना सन्मार्गापासून दूर नेईन. त्यांच्या मनात निरर्थक कल्पना भरून देईन आणि त्यांना गुरांचे

कान चिरण्याचे आदेश देईन. मी त्यांना ईश्वराच्या निर्मितीत ढवळाढवळ करायला लावेन.'' आश्रयदाता म्हणून ईश्वराला सोडून सैतानाला निवडणारे अक्षरशः उध्वस्त झाले आहेत. [१२०] सैतान त्यांना निरर्थक वचने देतो आणि त्यांच्या मनात नाहक कल्पना भरवतो; पण त्याची वचने म्हणजे निव्वळ भ्रम आहेत. [१२१] नरक हे त्यांचे निवासस्थान असेल, त्यातून त्यांची सुटका होणारच नाही. [१२२] एकाच ईश्वरावर विश्वास ठेवणाऱ्यांना आणि सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही वाहत्या नद्या असणाऱ्या उद्यानांमध्ये घेऊन जाऊ आणि तिथे त्यांना कायमचे वसवू. हा ईश्वराचा शब्द आहे, त्याच्या शब्दाशिवाय कुणाचा शब्द सत्य आहे?

[१२३] ना तुमची इच्छा प्रबळ ठरेल, ना ग्रंथधारकांची इच्छा प्रबळ ठरेल. कुकर्म करणाऱ्यांना त्यानुसारच फळ मिळेल. ईश्वराव्यतिरिक्त कुणीही त्यांचा पाठीराखा किंवा आश्रयदाता असणार नाही. [१२४] सत्कर्म करणारा, मग तो पुरुष असो की स्त्री, तो श्रद्धावंत असेल तर त्याला स्वर्गात प्रवेश मिळेल. कुणावर किंचितही अन्याय होणार नाही. [१२५] ईश्वराला संपूर्ण समर्पण करणारा, सदाचाराने वागणारा आणि प्रामाणिक विश्वास ठेवणारा व ईश्वराने ज्याला मित्र म्हणून निवडले आहे अशा अब्राहामच्या धर्माचे अनुसरण करणारा यांच्यापेक्षा कुणाची श्रद्धा बलवान आहे? [१२६] पृथ्वीवर आणि आकाशात जे काही आहे ते सगळे ईश्वराचे आहे. ईश्वराला सगळ्या गोष्टींचे ज्ञान आहे.

[१२७] ते तुमच्याकडे स्त्रियांविषयी सल्ला मागतील त्यांना सांगा, ईश्वराने तुम्हाला त्यांच्याविषयी मार्गदर्शन दिले आहे. ज्या अनाथ मुलींना तुम्ही निर्धारित हक्क देत नाही, तरीही त्यांच्याशी विवाह करू इच्छिता. त्यांच्याविषयीचे तसेच निराधार बालकांविषयीचे आदेश ईश्वराने तुम्हाला आपल्या ग्रंथातून दिले आहेत. त्याने तुम्हाला अनाथांबरोबर न्यायाने वागण्याची सूचना

दिली आहे. तुम्ही केलेल्या सगळ्या सत्कर्मांची ईश्वराला जाणीव आहे.
१२८ एखाद्या स्त्रीला पतीकडून गैरवर्तणूक मिळण्याची किंवा उपेक्षा होण्याची
शंका वाटत असेल आणि म्हणून तिने समेट साधण्याचा प्रयत्न केला तर
यात तिचा दोष नाही, कारण समेट सर्वोत्तम आहे. पण लोक स्वार्थी
लोभाला सरावले आहेत. सत्कर्म करा आणि ईश्वराची भीती बाळगा. निः
संशय ईश्वराला तुमच्या कर्माची जाण आहे. १२९ कितीही इच्छा असली
तरी तुम्ही तुमच्या सगळ्या पत्नींना एकसमान वागणूक देऊ शकणार नाही,
(पण विवाह आणि घटस्फोट यांच्यामध्ये अधांतरी ठेवून) त्यांच्यापैकी
एखादीकडे संपूर्ण दुर्लक्ष करू नका. आपल्या वागण्यात सुधारणा केली आणि
सदाचाराने वागलात तर ईश्वर नक्कीच अतिशय दयाशील, क्षमाशील आहे.
१३० पती-पत्नींनी विभक्त होण्याचा निर्णय घेतला तर ईश्वर आपल्या
विपुल भांडारातून त्या दोघांची भरपाई करेल. ईश्वर दानशूर आणि
बुद्धिमान आहे.

१३१ आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे ईश्वराचे
आहे. तुम्हाला आणि तुमच्या आधीच्या ग्रंथधारकांना आदेश आहे,
की ईश्वराला घाबरून रहा. ईश्वराला नाकारत असाल तर लक्षात ठेवा,
आकाश आणि पृथ्वी ईश्वराचीच आहे. तो स्वयंपूर्ण आणि स्तुत्य आहे.
१३२ आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते ईश्वराच्या मालकीचे
आहे. त्याच्याइतका विश्वासू अन्य कुणी नाही. १३३ त्याच्या मनात आले
असते तर त्याने तुम्हाला हटवून त्याजागी इतरांना आणले असते. असे
करण्याचे सामर्थ्य त्याच्याकडे एकवटले आहे. १३४ ऐहिक मोबदल्याची
अभिलाषा बाळगणाऱ्यांनो, इहलोकातील आणि परलोकातील मोबदला
ईश्वर देणार आहे. तो खरोखर सर्व ऐकणारा, सर्व पाहणारा आहे.

१३५ श्रद्धावंतांनो! काटेकोरपणे न्यायाची कास धरा आणि ईश्वरासाठी

साक्षीदार बना; मग ती साक्ष खुद्द तुम्ही, तुमचे पालक, नातलग यांच्याविरुद्ध जाणारी का असेना. ते गरीब असोत की श्रीमंत, ईश्वराइतके चांगले त्यांना कुणीच ओळखत नाही. तेव्हा स्वतःच्या इच्छेप्रमाणे वागून न्यायापासून किंचितही ढळू नका. सत्य लपवून ठेवलेत किंवा उघड करण्याची टाळाटाळ केलीत, तर लक्षात ठेवा ईश्वर तुमचे सगळे कर्म चांगलेच जाणतो.

[१३६] श्रद्धावंतांनो! ईश्वरावर, त्याच्या प्रेषितावर, प्रेषिताबरोबर पाठवलेल्या पवित्र ग्रंथावर त्याचप्रमाणे पूर्वी त्याने प्रकट केलेल्या पवित्र ग्रंथावर श्रद्धा ठेवा. ईश्वराला, त्याच्या दूतांना, त्याच्या पवित्र ग्रंथांना, त्याच्या प्रेषितांना आणि निवाड्याच्या अंतिम दिवसाला नाकारणारा निश्चितच सन्मार्गापासून भरकटलेला आहे. [१३७] ईश्वराने प्रकट केलेल्या ग्रंथावर कधी विश्वास तर कधी अविश्वास दाखवणाऱ्यांना आणि सरतेशेवटी सत्य नाकारण्याचा दृढनिश्चय करणाऱ्यांना ईश्वर ना कधी माफ करेल, ना कधी मार्गदर्शन करेल. [१३८] अशा ढोंग्यांना इशारा द्या की वेदनादायी शिक्षा त्यांच्यासाठी सज्ज आहे. [१३९] श्रद्धावंतांना सोडून अश्रद्धावंतांना जवळ करणाऱ्यांना त्यांच्या सोबत्याकडून सन्मान मिळेल का? निःसंशय, सन्मान फक्त ईश्वरासाठीच आहे.

[१४०] ईश्वराने आपल्या ग्रंथातून इशारा दिला आहे की, ईश्वराचे साक्षात्कार अमान्य करणाऱ्यांना किंवा त्यांची खिल्ली उडवणाऱ्यांच्या संगतीत थांबू नका किंवा त्यांच्याशी अन्य विषयावर बोला, नाहीतर तुम्हीही त्यांच्यासारखे अश्रद्धावंत व्हाल. ईश्वर सगळ्या ढोंग्यांना आणि सत्य नाकारणाऱ्यांना नरकात एकत्र आणेल. [१४१] ढोंगी लोक तुमच्याबाबतीत काय घडते याची वाट पहात असतात. ईश्वराने तुम्हाला (श्रद्धावंतांना) विजय देऊ केला तर ते विचारतात, "आम्ही तुमच्याबरोबर

नव्हतो का?" आणि अश्रद्धावंतांचा विजय झाला तर त्यांना विचारतात, "श्रद्धावंतांविरुद्ध जिंकण्यात आम्ही तुम्हाला मदत केली नाही का? श्रद्धावंतांपासून आम्ही तुमचे रक्षण केले नाही का?" पुनर्निर्माणाच्या दिवशी ईश्वर तुम्हा सगळ्यांचा निवाडा करेल आणि अश्रद्धावंतांकडून श्रद्धावंतांना कधीही अपाय होऊ देणार नाही.

१४२ ढोंगी लोक ईश्वरावर मात करू पाहतात; खरे तर ईश्वराने त्यांच्यावर मात केली आहे. नमाज़ पठण करतानाही ते नाखुशीने, इतरांनी पहावे म्हणून उभे असतात. यावेळी त्यांच्या मनात ईश्वराचे किंचितही स्मरण नसते. १४३ श्रद्धा आणि अश्रद्धा यांच्या दरम्यान ते हेलकावत असतात, ना या बाजूला जातात ना त्या. पण ज्याला ईश्वर भरकटवतो त्याला कुणीही सन्मार्गावर आणू शकत नाही. १४४ श्रद्धावंतांच्याऐवजी (तुमच्यासोबत युद्धाच्या स्थितीत असलेल्या) सत्य नाकारणाऱ्यांशी मैत्री करू नका. असे करून ईश्वराला स्वतःच स्वतःविरुद्ध स्पष्ट पुरावा देणार आहात का? १४५ ढोंगी लोक खात्रीने खोल अग्निविवराच्या तळाशी असतील आणि त्यांना कुणीही मदतनीस असणार नाही. १४६ पण पश्चातापपूर्वक जे आपला मार्ग बदलतील, ईश्वरावर दृढ विश्वास ठेवतील आणि प्रामाणिकपणे उपासना करतील ते श्रद्धावंतांच्या मेळ्यात सामील होतील आणि ईश्वर श्रद्धावंतांना भरघोस मोबदला देईल. १४७ तुम्ही ईश्वराप्रती कृतज्ञ असाल आणि त्याच्यावर विश्वास ठेवत असाल तर तो तुम्हाला का शिक्षा देईल? तो दाद देणारा, जागरूक आहे.

१४८ अत्याचार पीडितांव्यतिरिक्त इतरांनी अपशब्द उच्चारलेले ईश्वराला आवडत नाहीत. तो सगळे ऐकतो, सगळे जाणतो. १४९ तुम्ही सत्कर्म लपवून ठेवा की उघड करा किंवा एखाद्याचे दुष्कृत्य माफ करा. ईश्वर क्षमाशील आणि सर्वशक्तिमान आहे. १५० काहीजण ईश्वराला

आणि त्याच्या प्रेषितांना नाकारतात आणि त्यांच्यामध्ये भेदभाव करू पाहतात. ते म्हणतात, "आम्ही काही प्रेषितांवर विश्वास ठेवतो, तर काही प्रेषितांवर अविश्वास दाखवतो." हे लोक अधांतरी अवस्थेत राहू इच्छितात. [१५१] हे लोक निःसंशय सत्य नाकारणाऱ्यांपैकी आहेत आणि आम्ही त्यांच्यासाठी अपमानास्पद शिक्षा सज्ज ठेवली आहे. [१५२] जे ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितांवर विश्वास ठेवतात व त्यांच्यात भेदभाव करत नाहीत, त्यांना आम्ही नक्कीच चांगला मोबदला देऊ. ईश्वर अतिशय क्षमाशील, दयाशील आहे.

[१५३] पूर्वी ग्रंथ दिले गेलेले लोक तुमच्याकडे स्वर्गातून ग्रंथ आणण्याची मागणी करतात. मोझेसकडे त्यांनी यापेक्षाही मोठी गोष्ट मागितली होती. त्यांनी मागितले होते, "ईश्वराला आमच्यासमोर हजर कर." या पापापायी त्यांच्यावर विजेचा लोळ आदळला. यानंतर सत्याचा धडधडीत पुरावा मिळाल्यावरही त्यांनी (सोन्यापासून बनवलेल्या) वासराची पूजा करायला सुरुवात केली, तरीही त्यांचा हा अपराध माफ करून मोझेसला सत्याचे स्पष्ट पुरावे आम्ही देऊ केले. [१५४] त्यांच्यावर पर्वत तोलून धरला असताना आम्ही त्यांच्याकडून शपथ घेतली व आम्ही त्यांना सांगितले, "दारातून विनयपूर्वक आत या." या वेळेस आम्ही त्यांना शब्बाथचे नियम न तोडण्याचा आदेशही दिला व तसे दृढ वचनही घेतले.

[१५५] पण त्यांनी हे वचन मोडले आणि ईश्वराचे संकेत नाकारले व अन्यायाने प्रेषितांची हत्या केली. यावर त्यांचे म्हणणे होते, "आमची अंतःकरणे बंद झाली आहेत." सत्य नाकारल्यामुळे ईश्वरानेच त्यांची अंतःकरणे मिटवून टाकली आहेत. फार थोडेजण वगळता त्यांच्यापैकी बहुतेकांची श्रद्धा नाही. [१५६] त्यांनी सत्य नाकारले आणि मेरीची घृणास्पद शब्दात निंदा केली. [१५७] त्यांनी जाहीरपणे सांगितले, "आम्ही मेरीचा पुत्र,

ईश्वराचा प्रेषित, मसीहा येशूची हत्या केली आहे." ना त्यांनी येशूची हत्या केली, ना त्याला सुळावर चढवले. तो त्यांचा निव्वळ भ्रम होता. याविषयी निरनिराळी मते व्यक्त करणारे नक्कीच शंकित अवस्थेत आहेत. त्यांच्याकडे ठोस माहिती नसून ते फक्त तर्क लढवत आहेत. त्यांनी येशूची हत्या केली नाही, हेच सत्य. [१५८] ईश्वराने त्याला स्वतःकडे बोलावून घेतले होते. तो सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहे.

[१५९] आधीच्या ग्रंथांना अनुसरणाऱ्यांपैकी असा कोणीही नाही, जो आपल्या मृत्युसमयी (येशूसंबंधाने जे सत्य आहे) त्यावर विश्वास ठेवणार नाही आणि पुनर्निर्माणाच्या दिवशी तो (येशू स्वत:) त्यांच्याविरुद्ध सत्याची ग्वाही देईल. [१६०] यहूदींनी केलेल्या अनेक अपकृत्यांमुळे पूर्वी मान्यता दिलेल्या काही चांगल्या गोष्टींची आम्ही त्यांना मनाई केली होती. कारण त्यांनी लोकांना वारंवार ईश्वराच्या मार्गापासून दूर नेले होते. [१६१] व्याज घ्यायला प्रतिबंध केला असतानाही त्यांनी भरमसाठ व्याज उकळले आणि अन्यायाने इतरांची संपत्ती हडप केली. त्यांच्यापैकी सत्यावर अविश्वास दाखवणाऱ्यांसाठी आम्ही यातनामय शिक्षा सज्ज ठेवली आहे. [१६२] पण त्यांच्यापैकी ज्याच्या ज्ञानाचा पाया पक्का आहे, जे श्रद्धावंत तुमच्यासमोर आणि तुमच्याआधी प्रकट झालेल्या सत्यावर विश्वास ठेवतात, नियमित प्रार्थना करतात (नमाज़ पढतात), ज़कात (निर्धारित दानधर्म) देतात आणि ईश्वरावर व अंतिम दिवसावर विश्वास ठेवतात, त्यांना आम्ही निःसंशय भरघोस मोबदला देऊ.

[१६३] (हे मोहम्मद!) आम्ही तुम्हाला, त्याचप्रमाणे नोहाला व त्यांच्यानंतर आलेल्या प्रेषितांना; अब्राहाम (इब्राहीम), इश्माएल (इस्माईल), इसहाक, याकोब आणि त्यांच्या वंशजांना, तसेच येशू (ईसा), ईयोब (अय्यूब),

योना (युनूस), अहरोन (हारून) व शलमोन (सुलेमान) यांना आमचे साक्षात्कार दाखवले आणि दावीदाला (दाऊदला) ज़बूर (स्तोत्र संहिता) नावाचा पवित्र ग्रंथही दिला. १६४ तुमच्या पूर्वी पाठवलेल्या प्रेषितांपैकी काहींविषयी आम्ही तुम्हाला सांगितले, तर काहींविषयी सांगितले नाही. मोझेसशी ईश्वराचे प्रत्यक्ष संभाषण झाले. १६५ ते आमचे प्रेषित होते. प्रेषितांचे आगमन झाल्यानंतर ईश्वराला सबब सांगण्यासाठी मानवजातीकडे काही कारण असू नये म्हणून सुवार्ता व सावधानतेचा इशारा यांच्यासह आम्ही त्यांना पाठवले होते. ईश्वर सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहे.[अ]

१६६ पण ईश्वराने तुमच्याकडे जे काही पाठवले आहे त्याचा तो स्वतः साक्षीदार आहे. आपले बुद्धिसामर्थ्य वापरून त्याने ते तुमच्याकडे पाठवले आहे. त्याचे दूतही याचे साक्षीदार आहेत. एकटा ईश्वरही याचा साक्षीदार म्हणून पुरेसा आहे. १६७ सत्यावर अविश्वास दाखवण्याचा आणि इतरांना ईश्वराच्या मार्गावरून दूर नेण्याचा निश्चय करणारे सन्मार्गावरून भरकटले आहेत. १६८ सत्यावर अविश्वास दाखवणाऱ्यांना आणि अत्याचार करणाऱ्यांना ईश्वर ना माफ करेल, ना मार्गदर्शन करेल. १६९ तो त्यांना नरकाचाच रस्ता दाखवेल, जिथे त्यांना कायम वास्तव्य करावे लागेल. असे करणे ईश्वराला फार सोपे आहे. १७० लोकहो! ईश्वराच्या प्रेषिताने हे सत्य तुमच्या पालनकर्त्याकडून आणले आहे.

[अ] ईश्वराने माणसाची निर्मिती केली आणि मग त्याने स्वर्ग आणि नरक निर्माण केले. मनुष्य नंतर पृथ्वीवर स्थायिक झाला. इथे माणसाला त्याच्या इच्छेनुसार वागण्याचे स्वातंत्र्य आहे. पण हे स्वातंत्र्य कायमचे नाही. ते तात्पुरते आहे आणि माणसाच्या चाचणीसाठी आहे. हे असे आहे की चांगले आणि वाईट एकमेकांपासून वेगळे केले जातील. ज्यांना स्वातंत्र्य मिळूनही जे वास्तववादी वृत्ती अंगीकारतात आणि ईश्वराच्या इच्छेला शरण जातात, त्यांना ईश्वर पाहत असतो.

तेव्हा स्वतःच्या कल्याणासाठी त्यावर विश्वास ठेवा. त्यावर अविश्वास दाखवाल तर खबरदार, पृथ्वीवर आणि आकाशात जे काही आहे त्या सगळ्यावर ईश्वराचीच सत्ता आहे. ईश्वर सर्वज्ञ व प्रज्ञावंत आहे.

१७१ ग्रंथधारकांनो! धर्माचा अतिरेक करू नका. ईश्वराविषयी सत्य तेवढेच बोला. मेरीचा पुत्र येशू हा ईश्वराचा प्रेषित होता. आपल्या वचनाची पूर्तता करण्यासाठी ईश्वराकडून मेरीकडे आलेले ते चैतन्य होते. तेव्हा ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितावर विश्वास ठेवा आणि "देव तीन आहेत" असे कदापि म्हणू नका. असे न म्हणण्यातच तुमचे भले आहे. त्याला पुत्र असावा यापेक्षा त्याचे पावित्र्य फार उच्च कोटीचे आहे. आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सर्व ईश्वराचेच आहे. सृष्टीचे पालन करण्यास तो समर्थ आहे. १७२ येशूला निश्चितच स्वतःला ईश्वराचा सेवक म्हणवण्यात कमीपणा वाटणार नाही. त्याच्या निकटच्या देवदूतांनाही तसे वाटणार नाही. ईश्वराच्या उपासनेला तुच्छ मानणाऱ्या आणि अहंकाराने वागणाऱ्या सगळ्यांना काही झाले तरी ईश्वर आपल्यासमोर एकत्र (जमा) करेल. १७३ जे ईश्वरावर विश्वास ठेवतात आणि सत्कर्म करतात, त्यांना याचा परिपूर्ण मोबदला मिळेल. याशिवाय ईश्वर त्यांच्यावर कृपेचा भरघोस वर्षाव करेल. अहंकाराने आणि तुच्छतेने वागणाऱ्यांना तो यातनामय शिक्षा देईल. मदतीसाठी किंवा ईश्वरापासून बचाव करण्यासाठी त्यांना कुणीही मिळणार नाही.

१७४ लोकहो! तुमच्या पालनकर्त्याकडून तुम्हाला सत्याचा निःसंदिग्ध पुरावा मिळाला आहे. आम्ही तुमच्यासाठी सत्याचा उज्ज्वल प्रकाश पाठवला आहे. १७५ ईश्वरावर निष्ठा आणि दृढ विश्वास ठेवणाऱ्यांना त्याच्या दयेचा आणि कृपेचा लाभ होईल. तो त्यांना सन्मार्गाने स्वतःकडे घेऊन येईल. १७६ ते तुम्हाला अप्रत्यक्ष वारसदारांविषयी सल्ला विचारतात त्यांना

सांगा, ईश्वराने त्यांच्याविषयी सूचना दिलेली आहे. विनापत्य स्थितीत मृत्यू येणाऱ्याला बहीण असेल तर तिला त्याच्या संपत्तीतला अर्धा हिस्सा मिळेल, तर विनापत्य अवस्थेत मृत्यू येणाऱ्या बहिणीचा वारसदार तिचा भाऊ असेल. बहिणी दोन असतील तर भावाच्या माघारी त्यांना त्याच्या संपत्तीतला दोन तृतीयांश हिस्सा मिळेल. मयताला भाऊ व बहिणी असतील तर भावाला बहिणीच्या दुप्पट हिस्सा मिळेल. तुमच्याकडून आगळीक होऊ नये यासाठी ईश्वराने सगळ्या गोष्टी तुमच्यासमोर स्पष्ट केल्या आहेत. ईश्वर सर्वज्ञ आहे. ईश्वराकडे सगळ्या गोष्टींचे ज्ञान आहे.

प्रकरण ५ : अन्नाने भरलेले ताट (अल्-माइदा)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ भाविकांनो! तुमच्यावरील मर्यादांचे काटेकोर पालन करा. पुढे याद्वारे जाहीर केलेल्या प्राण्यांव्यतिरिक्त इतर प्राणी तुमच्यासाठी वैध केले आहेत. हज यात्रेदरम्यान शिकार करणे निषिद्ध आहे. ईश्वर त्याची आज्ञा देतो जे त्याच्या इच्छेला येते. २ भाविकांनो! ईश्वराचे संकेत, पवित्र महिना, काबागृहाच्या परिसरात बळी देण्यासाठी आणलेले पशु, (ईश्वराला अर्पण केल्याची खूण म्हणून) हार घातलेले पशु, आपल्या पालनकर्त्याच्या मर्जीच्या आणि कृपेच्या शोधात पवित्र मशिदीकडे (काबागृहाकडे) निघालेले यात्रेकरू यांचे पावित्र्य अबाधित ठेवा. हज यात्रा पार पडल्यावर यात्रेचा पोशाख उतरवून तुम्ही शिकार करू शकता. (एकेकाळी) तुम्हाला पवित्र प्रार्थनास्थळी (काबागृहात) जाण्यास रोखणाऱ्यांचे शत्रुत्व तुम्हाला पापास प्रवृत्त न करो. सदाचारात आणि धर्माचारात एकमेकांना मदत

करा. दुराचारात आणि मर्यादा ओलांडण्यात एकमेकांना मदत करू नका. ईश्वराची भीती बाळगा, शिक्षा देण्यात तो फार कठोर आहे.

[३] स्वतःहून मेलेल्या प्राण्याचे मांस, रक्त आणि डुकराचे मांस तुमच्यासाठी निषिद्ध आहे. ईश्वराशिवाय अन्य कुणासाठी बळी दिलेला प्राणी, गुदमरल्याने, मार लागल्यामुळे किंवा उंचावरून पडल्याने मृत झालेला प्राणी, वन्य पशूंच्या हल्ल्यात मृत झालेला, इतर पशूंनी अर्धवट कुरतडलेला प्राणीही तुमच्यासाठी निषिद्ध आहे. तुम्ही स्वतः उचित रीतीने (ईश्वराचे नाव घेत जिवंत प्राप्त करून) बळी दिलेला प्राणी भक्षण करणे तुमच्यासाठी वैध आहे. ज्या प्राण्याचा बळी वेदीवर देण्यात आला तोही तुमच्यासाठी निषिद्ध आहे. भविष्य सांगणाऱ्या बाणांचा वापर करून (मांसाची) विभागणी करण्यास तुम्हाला मनाई केलेली आहे. हे पापकृत्य आहे. सत्य नाकारणाऱ्यांमुळे तुमच्या धर्माचे कधीही नुकसान होत नसल्याचे पाहून ते निराश झाले आहेत, तेव्हा त्यांना भिऊ नका. फक्त माझेच भय बाळगा. आज मी तुमच्यासाठी तुमचा धर्म परिपूर्ण केला आहे आणि माझी कृपा परिपूर्ण केली आहे. धर्म म्हणून तुमच्यासाठी मी इस्लामची निवड केली आहे. एखाद्याने आज्ञाभंग करण्याच्या हेतूने नाही, तर भुकेने व्याकुळ होऊन निषिद्ध पदार्थांचे सेवन केले, तर ईश्वर क्षमाशील, दयाशील असल्याचे त्याला दिसून येईल.

[४] कुठल्या गोष्टी त्यांच्यासाठी कायदेशीर आहेत असे त्यांनी विचारले तर त्यांना सांगा, सगळ्या चांगल्या गोष्टी तुमच्यासाठी कायदेशीर ठरवल्या आहेत. तुमच्या पाळीव पक्ष्यांना आणि प्राण्यांना तुम्ही ईश्वराच्या शिकवणीनुसार शिकारीसाठी प्रशिक्षित केले आहे. तेव्हा त्यांनी तुमच्यासाठी पकडलेले भक्ष्य तुम्ही सेवन करा. पण ते खाण्यापूर्वी ईश्वराचे नामस्मरण करा. ईश्वराचे भय बाळगा. तुम्ही केलेल्या प्रत्येक

कृत्याची दखल घेण्यात तो तत्पर आहे. ५ आज सगळ्या चांगल्या गोष्टी
तुमच्यासाठी कायदेशीर केल्या आहेत. ग्रंथधारकांचे अन्न तुमच्यासाठी
कायदेशीर आहे आणि तुमचे अन्न त्यांच्यासाठी कायदेशीर आहे. पवित्र
श्रद्धाळू स्त्रिया आणि तुमच्या आधीच्या ग्रंथधारकांच्या पवित्र श्रद्धाळू
स्त्रिया तुमच्यासाठी कायदेशीर आहेत. पण तुम्ही व्यभिचाराने न वागता,
अनैतिक संबंध न ठेवता, महरची रक्कम चुकती करून त्यांच्याशी विवाह
केला पाहिजे. सत्य नाकारणाऱ्यांची कृत्ये निष्फळ ठरतील आणि
मृत्यूनंतरच्या जगात ते पराभूतांपैकी असतील.

६ श्रद्धावंतांनो! प्रार्थनेस उभे राहण्यापूर्वी मस्तक, चेहरा, कोपऱ्यापर्यंत
हात आणि घोट्यापर्यंत पाय स्वच्छ धुऊन घ्या. अशुध्द स्थितीत
असाल तर संपूर्ण आंघोळ करा. आजारी असताना, प्रवासात असताना,
शौच करून आल्यावर किंवा पत्नीशी शारीरिक जवळीक केल्यानंतर
स्वच्छतेसाठी पाणी नसेल तर स्वच्छ वाळू घेऊन ती चेहऱ्यावर, हातांवर
चोळून स्वच्छता करा. ईश्वराला तुमच्यावर कुठलेही ओझे लादायचे
नाही. त्याला तुमची शुद्धी करून तुमच्यावर परिपूर्ण कृपा करायची आहे.
त्याच्या या उपकाराची तुम्ही जाणीव ठेवली पाहिजे.

७ ईश्वराने केलेल्या उपकारांची जाणीव ठेवा. "आम्ही तुझे आदेश
ऐकतो आणि त्याचे पालन करतो," असे दृढ वचन त्याला दिले होते
याचे स्मरण करा. ईश्वराची भीती बाळगा. ईश्वराला माणसाच्या
अंतरंगातले सगळे विचार ज्ञात आहेत. ८ श्रद्धावंतांनो! अविचलपणे
ईश्वरी कार्य करत रहा आणि साक्ष देताना न्यायाला धरून रहा. इतरांचे
शत्रुत्व तुम्हाला न्यायापासून दूर न नेवो. न्यायाने वागा. हे जवळपास
ईश्वराची भीती बाळगण्यासारखे आहे. ईश्वराची भीती बाळगा, तुमची
प्रत्येक कृती त्याला ज्ञात आहे. ९ सत्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना आणि

सत्कर्मे करणाऱ्यांना ईश्वराने क्षमा करण्याचे आणि घसघशीत मोबदला देण्याचे वचन दिले आहे. १० पण सत्यावर अविश्वास दाखवणाऱ्यांच्या आणि आमचे संकेत नाकारणाऱ्यांच्या भाळी नरकवास लिहिला आहे. ११ विशिष्ट शत्रू तुमच्यावर आक्रमण करण्याच्या बेतात असताना ईश्वराने त्याला रोखले होते. श्रद्धावंतांनो! त्याच्या या कृपाशीर्वादाचे स्मरण करा. श्रद्धावंतांनी ईश्वराचे भय बाळगावे आणि त्याच्यावर भरवसा ठेवावा.

१२ ईश्वराने इस्राएलच्या संततीकडून दृढ वचन घेतले आणि त्यांच्यातून बारा नेते उभे केले. त्याने त्यांना सांगितले, "नक्कीच मी तुमच्याबरोबर आहे. तुम्ही नियमित प्रार्थना केली (नमाज़ पठण केले), निर्धारित दानधर्म केला, माझ्या प्रेषितांवर विश्वास ठेवून त्यांना पाठिंबा दिला, उदारपणे ईश्वरी कार्यासाठी तुमची संपत्ती वापरली तर मी नक्कीच तुमचे अपराध माफ करेन, झुळझुळत्या नद्या असणाऱ्या बगीच्यांमध्ये तुम्हाला दाखल करेन. इतके सांगितल्यावरही तुमच्यापैकी जे लोक सत्य नाकारतील ते सन्मार्गावरून भरकटतील." १३ त्यांनी पवित्र वचनाचा भंग केल्याने आम्ही त्यांचा धिक्कार केला आणि त्यांची अंतःकरणे कठोर केली. आम्ही अवतरीत केलेल्या वचनांचा त्यांनी विपर्यास केला, त्यांचा संदर्भ बदलून टाकला आणि त्यांना आग्रहपूर्वक दिलेली शिकवण ते विसरून गेले. फार थोडेजण वगळता त्यांच्यापैकी बहुतेकांनी विश्वासघात केल्याचे तुम्हाला सातत्याने दिसून येईल. पण त्यांना क्षमा करा, त्यांच्याशी संयमाने वागा. ईश्वराला परोपकार करणारे आवडतात.

१४ "आम्ही ख्रिस्ती आहोत" असे म्हणणाऱ्यांकडून आम्ही दृढ वचन घेतले होते. पण तेही आग्रहपूर्वक दिलेली बहुतांश शिकवण विसरले. त्यामुळे निवाड्याच्या दिवसापर्यंत आम्ही त्यांच्यात शत्रुत्व आणि द्वेष पेरून ठेवला आहे. ते काय करत आहेत हे ईश्वर लवकरच त्यांच्यासमोर जाहीर करेल.

१५ ग्रंथधारकांनो! पवित्र ग्रंथातील तुम्ही लपवत असलेल्या बहुतांश
गोष्टी उघड करण्यासाठी आणि तुम्हाला क्षमा करण्यासाठी आमचा प्रेषित
तुमच्याकडे आलेला आहे. त्याच्यामार्फत ईश्वराकडून तुमच्यापर्यंत आता
सत्य स्पष्ट करणारा ग्रंथ आणि (सन्मार्ग दाखवणारा) दैदिप्यमान प्रकाश
आला आहे. १६ ईश्वराची मर्जी संपादण्यासाठी झटणाऱ्यांना या ग्रंथाद्वारे
ईश्वर स्वेच्छेने शांतीच्या मार्गावर आणेल, अंधारातून उजेडात आणेल
आणि सन्मार्गावर घेऊन जाईल. १७ "मेरीचा पुत्र येशू ईश्वर आहे," असे
म्हणणारे खरोखर ईश्वराची निंदा करत आहेत. त्यांना सांगा, ईश्वराने
मेरीपुत्र येशू, त्याची माता आणि या भूतलावरील प्रत्येकाला नष्ट करायचे
ठरवले तर त्याला कोण रोखू शकेल? आकाश, पृथ्वी आणि त्यांच्या
दरम्यानच्या प्रत्येक गोष्टीवर त्याचेच साम्राज्य आहे. त्याच्या इच्छेला
येईल ते तो निर्माण करतो. या चराचरावर त्याचीच सत्ता आहे.

१८ यहूदी आणि ख्रिस्ती म्हणतात, "आम्ही ईश्वराची लेकरे आहोत,
त्याचे लाडके आहोत." त्यांना विचारा, असे असेल तर तुमच्या
अपराधांना तो शिक्षा का करतो? खरेतर तुम्हीही त्याने निर्माण केलेल्या
मनुष्यमात्रांपैकीच आहात, (कुणी विशेष नाही). त्याच्या इच्छेला येईल
त्याला तो क्षमा करतो आणि इच्छेला येईल त्याला शिक्षा देतो. आकाश,
पृथ्वी आणि त्या दरम्यानच्या सगळ्या गोष्टींवर त्याचीच सत्ता आहे,
सगळ्यांना त्याच्याकडेच परतायचे आहे. १९ ग्रंथधारकांनो! आमच्या
प्रेषिताच्या आगमनात बराच खंड पडल्यानंतर सत्य तुमच्यासमोर स्पष्ट
करण्यासाठी आमचा आणखी एक प्रेषित तुमच्याकडे आला आहे.
त्यामुळे "शुभवार्ता देणारा आणि सावध करणारा कुणीही आमच्याकडे
आला नाही" असे तुम्हाला म्हणता येणार नाही. यासाठी शुभवार्ता देणारा
आणि सावध करणारा हा प्रेषित तुमच्याकडे आला आहे. ईश्वराकडे
काहीही करण्याचे सामर्थ्य आहे.

२० मोझेसने आपल्या लोकांना सांगितले होते, "लोकहो! ईश्वराने
केलेल्या उपकारांची जाणीव ठेवा. त्याने तुमच्यामधून प्रेषित उभे केले,
तुम्हाला सत्ताधीश बनवले आणि तुमच्यावर असे उपकार केले, जसे त्याने
जगात कुणावरही केलेले नाहीत, याचे स्मरण करा. २१ लोकहो! ईश्वराने
नेमून दिलेल्या या पवित्र भूमीत प्रवेश करा. माघार घेऊ नका, नाहीतर
पराभूत होण्याची नामुष्की तुमच्यावर येईल." २२ यावर त्याच्या लोकांनी
उत्तर दिले, "मोझेस! त्या भूमीत बलवान लोक राहतात. ते तिथून बाहेर
पडल्याशिवाय आम्ही तिथे कधीच प्रवेश करणार नाही. ते तिथून बाहेर
पडले तर आम्ही नक्की तिथे प्रवेश करू." २३ ईश्वरी कृपेचा लाभ झालेले
आणि ईश्वराला भिऊन राहणारे त्यांच्यापैकी दोन सद्गृहस्थ म्हणाले, "या
नगराच्या प्रवेशद्वारातून तुम्ही आत जा. आत गेल्याक्षणी तुम्ही विजयी
होणार, हे नक्की! खरे श्रद्धावंत असाल तर ईश्वरावर भरवसा ठेवा."
२४ यावर ते म्हणाले, "मोझेस! शक्तिवान लोक तिथे असेपर्यंत आम्ही
त्या नगरात कधीच पाय ठेवणार नाही. हवे तर तुम्ही आणि तुमचा
पालनकर्ता आत जा आणि त्यांच्याशी लढा. आम्ही इथेच थांबतो."

२५ हे उत्तर ऐकून मोझेसने ईश्वराला विनंती केली, "हे पालनकर्त्या!
माझी सत्ता फक्त माझ्यावर आणि माझ्या भावांवर चालते, बाकी
कुणावर नाही. तेव्हा या अवज्ञाकारी लोकांपासून आम्हाला वेगळे कर."
२६ ईश्वराने त्यांना सांगितले, "या भूमीत प्रवेश करायला त्यांना चाळीस
वर्षांसाठी मनाई केली आहे. या काळात निराश होऊन ते जगभर सैरावैरा
फिरतील. या दुष्ट लोकांसाठी तुम्ही दुःखी होऊ नका."

२७ हे प्रेषिता! त्यांना आदमच्या दोन पुत्रांची (हाबेल आणि काइन
यांची) खरीखुरी कथा सांग. या दोघांनी ईश्वराला बलिदान अर्पण केले
असता, ईश्वराने त्यांच्यापैकी एकाचे बलिदान स्वीकारले तर दुसऱ्याचे
नाकारले. हा दुसरा पुत्र आपल्या भावाला म्हणाला, "मी तुझा जीव

घेईन.” पहिल्याने त्याला उत्तर दिले, “ईश्वर फक्त सदाचारी लोकांच्याच भेटी स्वीकारतो. २८ तू मला मारायला हात उगारलास तरीही मी तुझ्यावर हात उचलणार नाही. कारण मी ईश्वराची, या जगाच्या पालनकर्त्याची भीती बाळगतो. २९ माझी अशी इच्छा आहे की तुझ्या स्वतःच्या आणि माझ्या पापांचा भार तुझ्या शिरावर येईल, तुला नरकात खितपत पडावे लागेल. अपराध्यांना त्यांच्या कर्माचे असेच फळ मिळते!”

३० तुच्छ स्वार्थाने त्याला स्वतःच्या भावाला मारायला प्रवृत्त केले आणि त्याने त्याची हत्या केली व तो पराभूतांपैकी एक बनला. ३१ यानंतर ईश्वराने एका डोमकावळ्याला पृथ्वीवर पाठवले. आपल्या भावाचे शव कसे लपवावे हे त्याला दाखवण्यासाठी हा डोमकावळा जमीन उकरू लागला. यावर तो शोक करू लागला. “अरेरे! भावाचे शव कसे लपवावे याची या डोमकावळ्याइतकीही अक्कल मला नसावी?” आणि तो शोक करू लागला.

३२ यावरून आम्ही इस्राएलच्या संततीला असे उदाहरण घालून दिले की, खुनाची किंवा जगात अनाचार माजवण्याची सजा सोडून जो कोणी एखाद्याचा जीव घेईल, त्याला समस्त मानवजातीचा खुनी मानले जाईल, तर जो कुणी एक जीव वाचवेल त्याला समस्त मानवजातीचा रक्षक मानले जाईल. आमचे प्रेषित निःसंदिग्ध संकेत घेऊन त्यांच्याकडे आले, पण त्यांच्यापैकी अनेकांनी जगात अनाचार सुरूच ठेवले. ३३ ईश्वर आणि त्याच्या प्रेषिताविरुद्ध युद्ध छेडणाऱ्यास मृत्युदंड दिला जाईल किंवा सुळावर चढवले जाईल किंवा त्यांचे विरुद्ध बाजूचे हात-पाय छाटले जातील किंवा त्यांना देशातून हद्दपार केले जाईल. या जगात त्यांची नाचक्की होईल आणि नंतर मृत्युनंतरच्या जगात त्यांना कठोर सजा मिळेल. ३४ तुम्ही त्यांच्यावर ताबा मिळवण्यापूर्वी जे पश्चाताप करतील त्यांना या

शिक्षेतून वगळले जाईल, कारण ईश्वर क्षमाशील आणि दयाशील आहे. याची जाणीव तुम्हाला असलीच पाहिजे.

[३५] श्रद्धावंतांनो! ईश्वराची भीती बाळगा, त्याच्या समीप जाण्याचे मार्ग शोधा आणि त्याच्या कार्यात स्वतःला झोकून द्या म्हणजे तुम्ही यशस्वी व्हाल. [३६] श्रद्धेला नाकारणाऱ्यांकडे पृथ्वीवरील प्रत्येक गोष्ट असेल, त्यात आणखी दुपटीने भर पडली आणि पुनर्निर्माणाच्या दिवशी मिळणाऱ्या यातनांपासून बचाव करण्यासाठी भरपाई म्हणून त्यांनी ती सगळी संपत्ती देऊ केली, तरीही त्यांच्याकडून ती स्वीकारली जाणार नाही; त्यांना वेदनादायी शिक्षाच मिळणार. [३७] त्यांना नरकाग्नीतून बाहेर पडायचे असेल पण ते तसे करू शकणार नाहीत; त्यांना चिरकालीन शिक्षाच मिळेल. [३८] चोरी करणारे स्त्री असो की पुरुष, त्यांनी केलेल्या कुकर्माची ईश्वराने दिलेली (प्रतिबंधक) शिक्षा म्हणून त्यांचे हात छाटून टाका. ईश्वर सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान आहे. [३९] अपराध केल्यानंतर पश्चातापदग्ध होऊन स्वतःमध्ये सुधारणा करणाऱ्यांवर ईश्वर नक्कीच दया करेल. ईश्वर नक्कीच अतिशय क्षमाशील आणि सदैव दयाळू आहे. [४०] आकाशाचे आणि पृथ्वीचे अधिराज्य ईश्वराचे आहे, हे तुम्हाला माहीत नाही का? त्याच्या इच्छेला येते त्याला तो शिक्षा देतो आणि त्याला आवडेल त्याला तो माफ करतो. सगळ्यांवर ईश्वराचीच सत्ता आहे.

[४१] हे प्रेषित! चढाओढीने सत्य नाकारणाऱ्यांमुळे दुःखी होऊ नका. "आमचा सत्यावर विश्वास आहे," असे ते तोंडाने म्हणतात. पण त्यांच्या मनात विश्वासाचा लवलेश नसतो. खोटेनाटे मोठ्या उत्सुकतेने ऐकणाऱ्यांमध्ये यहूदीही आहेत. आपल्या धार्मिक नेत्यांपर्यंत तुमचे बोलणे पोचवण्यासाठी तुमचा उपदेश ते लक्षपूर्वक ऐकतात. (अहंकारामुळे आणि आढ्यतेमुळे) हे धर्मप्रमुख कधीच तुमच्यासमोर येत नाहीत. तुमच्या

उपदेशाचा संदर्भ बदलून ते त्याचा विपर्यास करतात आणि लोकांना सांगतात, "हे तुम्हाला दिले गेले तर त्याचा स्वीकार करा, पण नाही दिले तर त्यापासून सावध रहा." ईश्वराला एखाद्याची कसोटी घ्यायची असेल तर त्याचा बचाव करण्यासाठी ईश्वरासमोर तुमचा टिकाव लागणार नाही. ज्यांची अंतःकरणे शुद्ध करण्याची ईश्वराची इच्छा नाही, त्यांना या जगात मानहानी सोसावी लागेल आणि मृत्युनंतरच्या जगात कठोर शिक्षेचा सामना करावा लागेल.

४२ खोट्यानाट्या गोष्टी ते उत्साहाने ऐकतात आणि मनाई केलेल्या
गोष्टींवर आधाशीपणाने तुटून पडतात. ते तुमच्याजवळ आले तर त्यांचा
निवाडा करा किंवा त्यांना टाळा. त्यांना टाळलेत, तर ते तुमचे काही
नुकसान करू शकणार नाहीत, पण निवाडा करायचा असेल तर तो न्यायाने
करा. न्यायबुद्धीने वागणारे ईश्वराला आवडतात. ४३ पण त्यांच्याकडे
तोराह हा ग्रंथ असताना, ज्यात ईश्वराच्या स्वतःच्या कसोट्या जतन
केल्या असताना, ते निवाड्यासाठी तुमच्याकडे का येतात? त्यांच्याकडे
असा ग्रंथ असला तरीही ते त्याकडे पाठ फिरवतात आणि नक्कीच ते
विश्वास ठेवणार नाहीत.

४४ आम्ही तोराह ग्रंथ प्रकट केला आहे, ज्यात मार्गदर्शन आणि सत्याचा
प्रकाश आहे. आमचे आज्ञाधारक प्रेषित या दोहोंच्या सहाय्याने यहूदींचा
निवाडा करत. ईश्वराचा ग्रंथ जतन करण्यासाठी ज्यांच्या हाती विश्वासाने
सोपवला आहे असे विद्वान आणि धर्मगुरूही त्याच्या मदतीने लोकांचा
निवाडा करत. ते याचे (या ग्रंथाचे) साक्षीदारही होते. तेव्हा लोकहो!
माणसांना न घाबरता मला घाबरून रहा आणि तुच्छ स्वार्थासाठी माझ्या
साक्षात्कारांचा सौदा करू नका. ईश्वराने पाठवलेल्या ग्रंथानुसार निवाडा न
करणारे लोक सत्य नाकारणारे आहेत. ४५ (तोराहमधून) आम्ही लोकांसाठी

असे ठरवून दिले होते: प्राणासाठी प्राण, डोळ्यासाठी डोळा, नाकासाठी नाक, कानासाठी कान, दातासाठी दात आणि जखमेसाठी जखम. पण एखाद्याने आपल्या अपराध्याला माफ केले तर ते त्याचे प्रायश्चित असेल. ईश्वराने पाठवलेल्या ग्रंथानुसार निवाडा न करणारे अपराधी आहेत. ४६ तोराहमधून प्रकट केलेल्या सत्याची पूर्तता करण्यासाठी आम्ही मेरीपुत्र येशूला त्याच्या आधी होऊन गेलेल्या प्रेषितांच्या पावलावर पाऊल ठेवायला लावले. आम्ही त्याला बायबल हा ग्रंथ दिला, ज्यात मार्गदर्शन आणि सत्याचा प्रकाश होता, ज्यामुळे त्यापूर्वी तोराहमध्ये साक्षात्कारीत झालेल्या ज्ञानाची सत्यता सिद्ध झाली. बायबलमधून आम्ही ईश्वराला भय बाळगणाऱ्यांसाठी मार्गदर्शन आणि सावधानतेचा इशारा दिला होता. ४७ त्यामुळे बायबलचे अनुसरण करणाऱ्यांनी ईश्वराने त्यात प्रकट केलेल्या ज्ञानानुसार निवाडा करावा. ईश्वराच्या साक्षात्कारानुसार निवाडा न करणारे बंडखोर आहेत.

४८ आम्ही तुमच्याकडे सत्यासह हा ग्रंथ पाठवला आहे. ज्यातून पूर्वी प्रकटलेल्या ग्रंथातील (प्रेषित आगमनाचे भाकीताला) पुष्टी मिळते आणि सत्याचे रक्षण केले जाते. तेव्हा ईश्वराने प्रकट केलेल्या ज्ञानानुसारच त्याचा निवाडा करा आणि तुमच्याकडे आलेल्या सत्याकडे पाठ फिरवणाऱ्या त्यांच्या तुच्छ इच्छेनुसार वागू नका. ईश्वराने तुम्हा प्रत्येकासाठी एक नियम, एक जीवनपद्धती ठरवून दिली आहे. ईश्वराची इच्छा असती तर त्याने तुम्हा सगळ्यांचा एकच समाज बनवला असता. पण त्याची तशी इच्छा नव्हती, कारण त्याने तुम्हाला जे दिले आहे त्यावरून तुमची पारख करायची होती. म्हणूनच चढाओढीने सत्कर्मे करा. तुम्हा सगळ्यांना ईश्वराकडेच परतायचे आहे. तिथे गेल्यावर तो तुमच्यातल्या मतभेदांचे निराकरण करेल.

४९ ईश्वराने पाठवलेल्या ग्रंथानुसार त्यांचा निवाडा करा, त्यांच्या
इच्छेनुसार वाहवत जाऊ नका. ईश्वराने तुमच्यासमोर प्रकट केलेल्या
ग्रंथाच्या एका भागापासून ते तुम्हाला दूर नेणार नाहीत याची खबरदारी
घ्या. त्यांनी तुमचा निवाडा नाकारला तर लक्षात घ्या, ईश्वराला त्यांनी
केलेल्या पापांची सजा द्यायची आहे. खरोखर, बहुसंख्य लोक आज्ञा
न पाळणारे आहेत. ५० त्यांना विश्वास न ठेवणाऱ्यांच्या कायद्यानुसार
निवाडा हवा आहे का? दृढ विश्वास ठेवणाऱ्यांसाठी ईश्वराशिवाय चांगला
न्यायाधीश कोण आहे?

५१ श्रद्धावंतांनो! यहूदी आणि ख्रिस्ती लोकांशी युती करू नका.
ते एकमेकांचे मित्र आहेत. तुमच्यापैकी जो त्यांच्याशी मैत्री करेल तो
त्यांच्यातलाच होऊन जाईल. ईश्वर अशा अपराध्यांना मार्गदर्शन करत
नाही. ५२ ज्यांची मने विकृतीने ग्रासली आहेत ते लोक यांच्यापाशी
घाईघाईने जाऊन म्हणतील, श्रद्धावंतांच्या संगतीत आमच्यावर एखादे
संकट कोसळेल की काय याची भीती वाटते? पण ईश्वर नक्कीच तुम्हाला
विजयी करेल किंवा तुम्हाला अनुकूल निर्णय घेईल. यानंतर त्यांनी अंतः
करणात गुप्तपणे लपवून ठेवलेल्या विचारांचा त्यांना पश्चाताप होईल. ५३
अशावेळी श्रद्धावंत तुम्हाला विचारतील, "ईश्वराच्या शपथा घेऊन आम्ही
तुमच्याबरोबर आहोत, असे ठासून सांगणारे ते हेच लोक आहेत का?"
त्यांची कृत्ये निष्फळ ठरतील आणि ते सर्वस्व हरवून बसतील.

५४ श्रद्धावंतांनो! तुम्हापैकी कुणीही ईश्वरावरील श्रद्धेचा त्याग केल्यास
ईश्वर त्यांच्याजागी इतरांना आणेल, ज्यांना ईश्वर प्रिय आहे आणि तेही
ईश्वराला प्रिय आहेत, जे श्रद्धावंतांशी सहृदयतेने, आपुलकीने वागतील
आणि सत्य नाकारणाऱ्यांशी कठोरपणे, ठामपणे वागतील. ते ईश्वरी
कार्यासाठी खडतर परिश्रम करतील आणि दोष शोधणाऱ्या निंदकांकडे

संपूर्ण दुर्लक्ष करतील. ईश्वर असा असीम कृपाळू असून त्याच्या मर्जीला येईल त्याच्यावर तो कृपा करतो. ईश्वर उदार, सर्वज्ञ आहे. ५५ फक्त ईश्वर, त्याचे प्रेषित आणि नियमित प्रार्थना करणारे, निर्धारित दानधर्म करणारे, ईश्वरासमोर उपासनेसाठी लीन होणारे श्रद्धावंतच तुमचे मदतनीस आहेत. ५६ ईश्वराची, त्याच्या प्रेषिताची आणि श्रद्धावंतांची संगत करणाऱ्यांनी खुशाल समजावे की ईश्वराचा पक्ष नक्कीच विजयी होणार आहे.

५७ श्रद्धावंतांनो! तुमच्या आधीच्या ग्रंथधारकांशी किंवा अश्रद्धावंतांशी मैत्री करू नका, जे तुमच्या धर्माचा उपहास करतात आणि त्याची खिल्ली उडवतात. सच्चे श्रद्धावंत असाल तर ईश्वराचे भय बाळगा. ५८ तुम्ही प्रार्थनेसाठी बोलावले, तर ते त्यास थट्टेचा आणि करमणुकीचा विषय बनवतील. याचे कारण म्हणजे त्यांच्याकडे असलेला ज्ञानाचा अभाव. ५९ त्यांना विचारा, "ग्रंथधारकांनो! आम्ही ईश्वरावर, तसेच आमच्यासमोर आणि आमच्याआधी इतरांसमोर प्रकट झालेल्या सत्यावर विश्वास ठेवतो, एवढ्यासाठी तुम्ही आमच्यावर संतापता का? आणि तुमच्यापैकी बहुतेकजण ईश्वराचा आदेश न पाळणारे आहात?" ६० त्यांना विचारा, "ईश्वराकडून सगळ्यात वाईट मोबदला कुणाला मिळेल हे तुम्हाला सांगायला हवे का? त्याने धिक्कारलेल्यांना आणि त्याच्या क्रोधाला बळी पडलेल्यांना असा मोबदला मिळेल. सैतानाची उपासना करणाऱ्यांवर, त्यांचे वर्तन माकड आणि डुकरासारखे असल्याची टीका केली जाईल.[अ]

[अ] हे शाब्दिक अर्थाने नव्हे तर त्यांच्या नैतिक अध:पतनाचे वर्णन करणारे प्रतिकात्मक शब्द आहेत. त्यांचे शारीरिक अर्थाने अशा प्राण्यांमध्ये रूपांतर झाले नाही तर त्यांचे चारित्र्य आणि वर्तन माकड आणि डुकरांसारखे झाले.

त्यांची दुरावस्था सगळ्यात वाईट असेल आणि ते सन्मार्गावरून खूप भरकटलेले असतील.''

६१ तुमच्यासमोर आल्यावर ते म्हणतात, ''आमचा सत्यावर विश्वास आहे.'' पण ते सत्य अमान्य करण्याच्या निर्धाराने येतात आणि त्याच स्थितीत निघून जातात. त्यांनी मनात लपवलेल्या गोष्टी ईश्वर चांगल्याच जाणतो. ६२ त्यांच्यापैकी पुष्कळजण कुकर्मे करताना, ईश्वरी आज्ञेचे उल्लंघन करताना आणि बेकायदेशीर कृती करताना एकमेकांपेक्षा वरचढ आहेत. त्यांचे हे आचरण खरोखर लज्जास्पद आहे. ६३ त्यांचे धर्मगुरू आणि विद्वान त्यांना अपशब्द उच्चारण्यापासून, बेकायदेशीर वस्तुंचा उपभोग घेण्यापासून रोखत का नाहीत? त्यांच्या कृती खरोखर किळसवाण्या आहेत.

६४ यहूदी लोक म्हणतात, ''ईश्वराचे हात बांधलेले आहेत.'' त्यांचेच हात बांधले जावोत आणि त्यांच्या बोलण्याचा तळतळाट त्यांना लागो! अजिबात नाही; ईश्वराचे दोन्ही हात संपूर्ण फैलावलेले आहेत. त्याच्या इच्छेला येईल त्या पद्धतीने तो कृपा करतो. तुमच्या पालनकर्त्याने तुमच्यासमोर जे प्रकट केले आहे त्यामुळे निश्चितच त्यांच्यापैकी बहुतेकांचा हट्टी दुराग्रह आणि सत्याला नकार निश्चितच वाढेल. पुनर्निर्माणाच्या दिवसापर्यंत आम्ही त्यांच्यात वैरभाव आणि व्देष पेरून ठेवला आहे. जेव्हा जेव्हा ते युद्धाचा अग्नी प्रज्वलित करतात, तेव्हा ईश्वर तो शमवतो. ते या भूमीत दुराचार पसरवतात. पण दुराचार करणारे ईश्वराला आवडत नाहीत.

६५ ग्रंथधारकांनी फक्त सत्यावर विश्वास ठेवला आणि ईश्वराची सजग जाणीव ठेवली तर आम्ही त्यांचे अपराध माफ करू आणि त्यांना अपार आनंदाच्या उद्यानात दाखल करू. ६६ त्यांनी तोराहचे, बायबलचे आणि त्यांच्या पालनकर्त्याकडून त्यांच्यावर प्रकट झालेल्या इतर ग्रंथांचे

काळजीपूर्वक अनुसरण केले असते तर त्यांचे संपूर्ण आत्मिक पोषण झाले असते. त्यांच्यापैकी काहीजण योग्य मार्गावर आहेत, पण अनेकजण फक्त कुकर्मेच करत आहेत.

६७ हे प्रेषित! पालनकर्त्याकडून तुमच्यापर्यंत जे काही आले आहे ते लोकांसमोर मांडा. असे केले नाही तर तुम्ही ईश्वराचा संदेश लोकांपर्यंत पोहोचवणार नाही. मनुष्यजातीपासून ईश्वर तुमचे रक्षण करेल, कारण सत्य नाकारणाऱ्यांना ईश्वर मार्गदर्शनाचा लाभ देत नाही.

६८ लोकांना सांगा, "ग्रंथधारकांनो! पालनकर्त्याकडून तुमच्यासमोर प्रकट झालेले ग्रंथ 'तोराह' आणि 'बायबल' प्रत्यक्ष आचरणात आणेपर्यंत तुम्हाला वैध अधिकार मिळणार नाही." तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यावर जे साक्षात्कारीत झाले आहे त्यामुळे त्यांच्यापैकी अनेकांच्या विद्रोहात आणि सत्याच्या नकारात नक्कीच वाढ होणार आहे. पण सत्य नाकारणाऱ्यांसाठी दुःखी होऊ नका. ६९ श्रद्धावंत (मुस्लिम), यहूदी, साबी आणि ख्रिस्ती– जे कुणी ईश्वरावर, अंतिम दिवसावर विश्वास ठेवतील आणि योग्य तेच करतील त्यांना ना कशाचे भय राहील ना कशाचा शोक राहील.

७० आम्ही इस्राएलच्या संततीला दिलेला शब्द पाळला आणि त्यांच्यातील एका प्रेषिताला त्यांच्याकडे पाठवले. पण त्यांना न आवडणारा संदेश घेऊन जेव्हाही एखादा प्रेषित त्यांच्याकडे गेला, तेव्हा त्यांच्यापैकी काहींनी खोटारडेपणाचा दोष त्याच्या माथी मारला, तर इतरांनी त्याची हत्या केली. ७१ यामुळे आपले काही बिघडणार नाही असे त्यांना वाटले आणि त्यामुळे ते (मनाने) मुके आणि आंधळे झाले. तरीही त्यांना ईश्वराची कृपा लाभली, पण त्यानंतरही त्यांच्यापैकी अनेकजण (आत्मिकरित्या) मुके व आंधळे झाले. ईश्वर त्यांच्या कृत्यांविषयी संपूर्ण सजग आहे.

७२ "मेरीचा पुत्र येशू हा ईश्वर आहे," असे म्हणणारे खरोखर सत्य
नाकारणारे आहेत. कारण खुद्द येशूने म्हटले आहे, "इस्राएलच्या मुलांनो!
ईश्वराची सेवा करा. तो तुमचा आणि माझा पालनकर्ता आहे." कुणालाही
ईश्वरतुल्य मानले तर तो त्यांना स्वर्गीय उद्यानातील प्रवेश नाकारेल आणि
नरकाग्नीत वास्तव्य करायला लावेल. अपराध्यांना कुणीही वाली असणार
नाही. ७३ "ईश्वर तिघांपैकी एक आहे," असे म्हणणारे सत्य नाकारणारे
आहेत. पण ईश्वर एकमेव आहे. ते असेच म्हणत राहिले तर अशा
सत्य नाकारण्याकडे झुकलेल्यांसाठी वेदनादायी शिक्षा वाट पहात आहे,
कारण सत्य नाकारण्याकडे त्यांचा कल आहे. ७४ ते ईश्वरासमोर जाऊन
क्षमायाचना का करत नाहीत? ईश्वर क्षमाशील आणि दयाशील आहे.
७५ मेरीचा पुत्र येशू हा फक्त एक प्रेषित होता. त्याच्याआधी अनेक
प्रेषित होऊन गेले. त्याची माता एक सदाचारी स्त्री होती आणि ते दोघेही
इतर सजीवांप्रमाणे अन्नाचे सेवन करत. पहा, आम्ही त्यांच्यासमोर हे
संकेत कसे स्पष्ट केले होते! तरीही कशी त्यांनी त्याकडे पाठ फिरवली!
७६ तुम्ही ईश्वराशिवाय ज्याच्याकडे तुमचे भलेबुरे करण्याचे सामर्थ्य नाही
अशा कुणाची तरी उपासना करता का? ईश्वरच सगळे ऐकणारा, सगळे
जाणणारा आहे.

७७ त्यांना सांगा, "ग्रंथधारकांनो! धर्माचा अतिरेक करू नका आणि
तुमच्याआधी होऊन गेलेल्यांपैकी सन्मार्गावरून दूर जाणाऱ्यांच्या
दुष्प्रवृत्तीचे अनुसरण करू नका. त्यांनी इतरांना भरकटवले आणि
सन्मार्गापासून स्वतःही भरकटले."

७८ इस्राएलच्या संततीपैकी जे सत्य नाकारण्यावर अडून राहिले, त्यांना
दावीदने व मेरीपुत्र येशूने धिक्कारले. कारण त्यांनी अवज्ञा केली होती,
ईश्वराज्ञेचे उल्लंघन केले होते. ७९ स्वतः केले तसे अपराध करण्यापासून

ते एकमेकांना थांबवत नव्हते. त्यांची कृत्ये खरोखर निंद्य होती. ८० त्यांच्यापैकी अनेकजण सत्य नाकारणाऱ्यांच्या संगतीत रमलेले दिसतात. त्यांच्या अंतरात्म्याने त्यांच्यापुढे जे पाठवले आहे ते तिरस्करणीय आहे. त्यांनी ईश्वराचा कोप ओढवून घेतला आहे. त्यांना चिरकालीन वेदना सोसावी लागेल. ८१ त्यांनी ईश्वरावर, प्रेषितावर आणि त्यांच्यासमोर प्रकट झालेल्या ज्ञानावर श्रद्धा ठेवली असती तर ते सत्य नाकारणाऱ्यांच्या साथसंगतीत राहिले नसते. पण त्यांच्यापैकी अनेकजण आज्ञापालन न करणारे आहेत.

८२ यहूदी आणि अनेकेश्वरवादी लोक श्रद्धावंतांविषयी सगळ्यात कडवट वैरभाव बाळगताना दिसतील, तर "आम्ही ख्रिस्ती आहोत" असे म्हणणारे ख्रिस्ती लोक त्यांच्या सगळ्यात जवळचे दिसतील. याचे कारण म्हणजे त्यांच्यात धर्मगुरू आणि ज्ञानी लोक आहेत आणि ते अहंकारहीन आहेत. ८३ ईश्वराने आपल्या प्रेषिताकडे प्रकट केलेले (ग्रंथ) ऐकून त्यांचे डोळे आनंदाश्रूंनी भरून आलेले दिसतील, कारण त्यातील सत्य त्यांनी ओळखलेले असते. ते ईश्वराला विनवतात, "हे पालनकर्त्या! आमचा सत्यावर विश्वास आहे तेव्हा तुझ्या साक्षीदारांच्यात आम्हाला सामावून घे." ८४ आम्ही ईश्वरावर आणि आमच्याकडे आलेल्या सत्यावर विश्वास का ठेवू नये? आमच्या पालनकर्त्याकडे आम्ही याचना करतो की सदाचारी लोकांच्यात आमची गणना व्हावी. ८५ त्यांच्या या प्रार्थनेमुळे ईश्वर त्यांना वाहत्या नद्या असणाऱ्या बगीच्यांचा मोबदला देईल, जिथे त्यांचे कायमचे वास्तव्य असेल. सत्कर्मे करणाऱ्यांचा हा मोबदला आहे. ८६ पण सत्य आणि आमचे संकेत नाकारणारे नरकात खितपत पडतील.

८७ श्रद्धावंतांनो! ईश्वराने तुमच्यासाठी वैध ठरवलेल्या आरोग्यदायी गोष्टींपासून वंचित राहू नका. ईश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन करू नका. असे

अपराधी ईश्वराला आवडत नाहीत. ८८ ईश्वराने ठरवलेल्या वैध आणि आरोग्यदायी गोष्टींचे सेवन करा. त्या एका ईश्वराची भीती बाळगा, ज्याच्यावर तुमची दृढश्रद्धा आहे. ८९ तुमच्या निरर्थक शपथांसाठी ईश्वर तुम्हाला जबाबदार धरणार नाही, पण गंभीरपणे घेतलेल्या शपथांसाठी तुम्हाला जबाबदार धरेल. घेतलेली शपथ मोडल्यास त्याचे प्रायश्चित्त म्हणून तुम्ही कुटुंबिय घेता ते भोजन दहा भुकेलेल्यांना द्या किंवा दहा गरजूंना वस्त्र दान करा किंवा एका गुलामाला मुक्त करा. असे प्रायश्चित्त घेण्याची ऐपत नसेल तर तीन दिवसांचा उपवास करा. घेतलेली शपथ मोडली तर त्याचे हे प्रायश्चित्त आहे. पण घेतलेली शपथ कटाक्षाने पाळा. अशा रीतीने ईश्वराने आपल्या आज्ञा स्पष्ट करून सांगितल्या आहेत, यासाठी तुम्ही कृतज्ञ असले पाहिजे.

९० श्रद्धावंतांनो! मादक द्रव्य, जुगार, मूर्ती आणि मंत्रसिद्ध बाण या सगळ्या सैतानाने निर्माण केलेल्या घृणास्पद गोष्टी आहेत. त्यांना टाळा म्हणजे तुमची प्रगती होईल. ९१ दारू आणि जुगाराच्या सहाय्याने सैतान तुमच्यात शत्रुत्व आणि वैर पेरू इच्छितो आणि ईश्वराच्या स्मरणापासून व प्रार्थनेपासून तुम्हाला दूर ठेवू इच्छितो. तेव्हा त्याच्यापासून परावृत्त होणार नाही का? ९२ ईश्वराच्या आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञेचे सतत पालन करा आणि दुष्ट प्रवृत्तींपासून स्वतःचे रक्षण करा. पण याकडे पाठ फिरवलीत तर लक्षात ठेवा, आमचा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचवणे एवढेच आमच्या प्रेषितांचे कर्तव्य आहे. ९३ जे ईश्वरावर श्रद्धा ठेवतात आणि सत्कर्मे करतात, त्यांना त्यांच्या (भूतकाळातील) अपराधांसाठी दोषी धरले जाणार नाही. जोपर्यंत ते ईश्वरावर श्रद्धा ठेवतात, त्याची भीती बाळगतात आणि सत्कर्मे करतात, तोपर्यंत त्यांना दोषी धरले जाणार नाही, कारण ईश्वराला सत्कर्मे करणारे प्रिय असतात.

९४ श्रद्धावंतांनो! तुम्ही ईश्वराला पाहू शकत नसला तरीही तुमच्यापैकी
कोण ईश्वराचे भय बाळगून आहे हे ओळखण्यासाठी, तुमच्या हाताच्या व
भाल्याच्या टप्प्यात येईल अशा शिकारीवरून ईश्वर तुमची परीक्षा घेईल.
यानंतर जे मर्यादांचे उल्लंघन करतील त्यांना निश्चितच यातनामय शिक्षा
मिळेल. ९५ श्रद्धावंतांनो! हज यात्रेत असताना कुठल्याही प्राण्याची शिकार
करू नका. जो कुणी जाणूनबुजून अशी शिकार करेल त्याने मारलेल्या
प्राण्याच्या समतुल्य प्राणी देऊन त्याची भरपाई करावी. हा प्राणी कुठला
असावा हे तुमच्यातील दोन न्यायी व्यक्ती ठरवतील. बळी देण्यासाठी
हा प्राणी काबागृहात आणला जावा किंवा याचे प्रायश्चित्त म्हणून त्याने
भुकेलेल्यांना जेवू घालावे किंवा समतुल्य उपवास करावा. असे प्रायश्चित्त
घेऊन त्याला आपल्या कृत्याचे परिणाम भोगावेच लागतील. भूतकाळात
झालेल्या चुका ईश्वर माफ करेल, पण पुन्हा पुन्हा त्याच चुका करणाऱ्यांना
तो त्याची शिक्षा देईल. ईश्वर तुमचा पालनकर्ता आहे, तो सर्वशक्तिमान
आहे, बदला घेणारा आहे.

९६ समुद्रातील माशांची शिकार करून त्यांचे सेवन करणे हे तुमच्यासाठी
वैध केले आहे. ही तुमची समुद्रमार्गे केलेल्या प्रवासातील तरतूद आहे.
पण हज यात्रेत असताना जमिनीवरील प्राण्याची शिकार करायची तुम्हाला
मनाई आहे. ईश्वराची भीती बाळगा, त्याच्यासमोरच तुम्हा सगळ्यांना
एकत्र यायचे आहे. ९७ ईश्वराने तुम्हाला आधार देणारे साधन म्हणून
पवित्र गृहाची म्हणजे काबागृहाची, त्याचप्रमाणे पवित्र महिन्याची आणि
गळ्यात माळ घातलेल्या पवित्र बळीच्या प्राण्याची निर्मिती केली आहे.
आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे त्या सगळ्याचे ईश्वराला संपूर्ण
ज्ञान आहे आणि तो सगळ्यांविषयी सजग आहे, याची जाणीव तुम्हाला
व्हावी यासाठी त्याने ही निर्मिती केली आहे. ९८ ईश्वर शिक्षा देण्यात

कठोर आहे, त्याचबरोबर तो अतिशय क्षमाशील आणि दयाशील आहे, हे लक्षात ठेवा. ९९ प्रेषिताचे एकमेव कर्तव्य म्हणजे ईश्वराचा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचवणे. तुम्ही काय लपवता आणि काय उघड करता ते सगळे ईश्वर जाणतो. १०० त्यांना सांगा, "वाईट गोष्टींची विपुलता तुम्हाला आनंददायी वाटू शकेल. तरीही चांगल्या आणि वाईट गोष्टी एकसमान नाहीत. तेव्हा हे बुद्धिमान माणसा! ईश्वराला घाबरून रहा, यानेच तुझी भरभराट होईल."

१०१ श्रद्धावंतांनो! ज्या गोष्टी तुमच्यासमोर उघड झाल्या तर फक्त डोक्यावरच्या ओझ्यासारख्या वाटतील, त्याविषयी प्रश्न विचारू नका; पण कुरआन प्रकट होताना याची विचारणा केली तर त्या तुमच्यासमोर उघड केल्या जातील. ईश्वराने त्याविषयी मौन राखले आहे. ईश्वर अतिशय क्षमाशील आणि संयमी आहे. १०२ तुमच्या आधीच्या लोकांनीही अशा गोष्टींची विचारणा केली होती. पण त्या उघड केल्यावर त्यांनी त्यांचे पालन करायला नकार दिला. १०३ ज्या प्राण्यांचे वर्णन बहिरा किंवा साइबा किंवा वसीला किंवा हाम असे केले जाते, (मूर्त्यांच्या नावाने वाहिलेले हे प्राणी होते.) त्यांना ईश्वराने तुमच्यासाठी पवित्र म्हणून नेमलेले नाही, असा ईश्वराचा आदेश आहे. सत्य नाकारणारे ईश्वराविषयी अशा असत्य गोष्टी शोधून काढतात त्यापैकी बहुतेकजण बुद्धीचा वापर करत नाहीत. १०४ "ईश्वराने जे प्रकट केले आहे त्याकडे आणि प्रेषिताकडे या" असे सांगितले असता, ते म्हणतात, "आमच्या पूर्वजांनी वारसाने दिलेल्या श्रद्धा आमच्यासाठी पुरेशा आहेत." जरी त्यांच्या पूर्वजांना कसलेही ज्ञान नव्हते आणि त्यांना मार्गदर्शन लाभले नव्हते, तरीही ते असे म्हणतात. १०५ श्रद्धावंतांनो! आपल्या अंतरात्म्याची काळजी घ्या. जोपर्यंत तुम्ही सन्मार्गावर राहाल,

तोपर्यंत वाममार्गाला लागलेले लोक तुमचे काही नुकसान करू शकणार नाहीत. त्यांच्यापैकी सगळे ईश्वराकडे परत जातील. तिथे गेल्यावर ते कसे वागत होते, याची तो त्यांना जाणीव करून देईल. १०६ श्रद्धावंतांनो! मृत्यूची चाहूल लागल्यावर मृत्युपत्राची तजवीज करताना तुमच्यातील दोन निःपक्ष लोकांना साक्षीदार म्हणून बोलावून घ्या. जमीनमार्गे प्रवासात असताना मृत्यू समोर दिसू लागला तर इतर जमातीतील दोघांना साक्षीदार नेमा. त्यांच्या प्रामाणिकपणावर शंका येत असेल तर प्रार्थनेनंतर त्यांना थांबवून त्यांच्याकडून ईश्वराची अशी शपथ वदवून घ्या, "अगदी जवळच्या नातलगांचे हितसंबंध असतील तरीही क्षुल्लक स्वार्थासाठी साक्ष बदलणार नाही आणि ईश्वरासाठी घेतलेली साक्ष लपवणार नाही. असे केले तर आम्ही खरोखर वाईट कर्माचे पापी असू." १०७ हे दोन्ही साक्षीदार अप्रामाणिक निघाल्यास, ज्यांचे हक्क हिरावले गेलेत त्यांच्यापैकी दोघांनी यांची जागा घेऊन ईश्वराची शपथ घ्या, "या दोघांपेक्षा आमची साक्ष खरोखर सच्ची आहे. आम्ही एकही चुकीचे विधान केलेले नाही, कारण तसे झाले तर आम्ही ईश्वराचे अपराधी असू." १०८ असे झाल्यास लोक खरी साक्ष देण्याची शक्यता वाढेल. कारण खोटे बोललो तर इतरांच्या शपथा आपल्या शपथेच्या विरुद्ध जातील अशी भीती त्यांना वाटेल. तेव्हा ईश्वराला घाबरून रहा आणि लक्षपूर्वक ऐका. विद्रोही व अवज्ञाकारी लोकांना ईश्वर मार्गदर्शन करत नाही.

१०९ ईश्वर ज्या दिवशी आपल्या प्रेषितांना बोलावून विचारेल, "लोकांकडून तुम्हाला कसा प्रतिसाद मिळाला?" तेव्हा ते सांगतील, "आम्हाला त्याचे समग्र ज्ञान नाही. जे अज्ञात आहे ते फक्त तूच जाणतोस." ११० यानंतर ईश्वर सांगेल, "हे मेरीपुत्र येशू! मी तुझ्यावर आणि तुझ्या मातेवर केलेल्या उपकारांचे स्मरण कर. मी पवित्र चैतन्याने

तुझे सामर्थ्य वाढवले, त्यामुळे बालपणी (आईच्या कुशीत) व प्रौढपणी तू लोकांशी संवाद साधू शकलास. मी तुला कायदा आणि विवेक यांची शिकवण दिली म्हणजे तोराह आणि बायबल. माझ्या परवानगीने तू मातीचा पक्षी बनवून त्यात फुंकर मारलीस आणि माझ्या मर्जीने तो सजीव झाला. माझ्या परवानगीने तू जन्मजात अंध व महारोग्यांना पूर्ववत केलेस. मृतांना नवजीवन दिलेस. आमचे सुस्पष्ट संकेत घेऊन तू इस्राएलवासीयांकडे गेला असता त्यातील सत्य नाकारून त्यांनी "हा निव्वळ जादूटोणा आहे" अशी टीका केली. तेव्हा तुला इजा करण्यापासून आम्ही त्यांना थोपवले. या सगळ्याचे स्मरण कर."

[१११] मी शिष्यांना माझ्यावर आणि माझ्या प्रेषितावर श्रद्धा ठेवण्यासाठी प्रेरित केले असता त्यांनी शब्द दिला होता, "आमची श्रद्धा आहे, आम्ही ईश्वराला समर्पित झालो आहोत याची साक्ष ठेवा." (याचे स्मरण कर.) [११२] येशूच्या शिष्यांनी येशूला विचारले, "हे मेरीपुत्र येशू! तुमचा पालनकर्ता स्वर्गातून आमच्यासाठी खाद्यपदार्थ वाढलेली जेवणाची ताट पाठवू शकेल का?" यावर येशूने सांगितले, "खरे श्रद्धावंत असाल तर ईश्वराचे भय बाळगा." [११३] यावर त्याचे शिष्य म्हणाले, "आम्हाला त्यातून भोजन घ्यायचे आहे, म्हणजे आमच्या मनाचे समाधान होईल आणि तू आम्हाला सत्य तेच सांगितलेस याची खात्री पटेल आणि आम्ही याचे साक्षीदार बनू." [११४] हे ऐकून येशूने ईश्वराकडे प्रार्थना केली, "हे ईश्वरा! हे पालनकर्त्या! स्वर्गातून आम्हा सगळ्यांसाठी खाद्यपदार्थाने भरलेली ताट पाठव म्हणजे आम्हाला त्यातून मेजवानी मिळेल. आमच्यातल्या पहिल्या आणि शेवटच्या माणसासाठी तो तुझा संकेत असेल. अर्थात, तू आमच्या उदरनिर्वाहाची सोय कर. तू सर्वश्रेष्ठ पालनकर्ता आहेस, उत्कृष्ट तरतूदकर्ता आहेस." [११५] ईश्वराने उत्तर दिले, "मी नक्कीच आकाशातून असे ताट

पाठवेन. पण त्यानंतरही तुमच्यापैकी जे सत्य नाकारतील त्यांना मी अशी कठोर शिक्षा देईन, तशी आजपर्यंत या जगात कुणाला दिली नाही.”

११६ जेव्हा ईश्वर येशूला विचारेल, “हे मेरीपुत्र येशू! माझ्या व्यतिरिक्त तुला आणि तुझ्या मातेलाही ईश्वराचा दर्जा द्या असे तू लोकांना सांगितलेस का?” तेव्हा यावर येशू उत्तर देईल, “तुझा महिमा अपार आहे! मला ज्याचा अधिकार नाही अशी गोष्ट मी कधी कशी सांगेन? मी कधी असे बोललो असतो तर ते तुला नक्कीच कळले असते. माझ्या मनात काय आहे हे तू जाणतोस. तुझ्या मनातले मला काहीही कळत नाही. अदृश्य गोष्टी जाणारा फक्त तूच आहेस. ११७ मी फक्त तू दिलेला आदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवला होता: ‘लोकहो! ईश्वराची उपासना करा. तो माझा आणि तुमचा पालनकर्ता आहे.’ मी त्यांच्यात असेपर्यंत त्यांच्या वर्तणुकीचा मी साक्षीदार होतो आणि तू माझे प्राण घेतल्यानंतर ते तुझ्याच नजरेखाली होते. तू या सगळ्याचा साक्षीदार आहेस. ११८ तू त्यांना शिक्षा दिलीस तर ते नक्कीच तुझे सेवक आहेत. तू त्यांना क्षमा केलीस तर तू सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहेस.” ११९ ईश्वर म्हणेल, “आजच्या दिवशी सत्यप्रिय लोकांना सत्यप्रियतेचा लाभ मिळेल. आजपासून त्यांचे वास्तव्य वाहत्या नद्या असलेल्या स्वर्गीय उद्यानामध्ये असेल.” ईश्वर त्यांच्यावर संतुष्ट आहे आणि ते ईश्वरावर संतुष्ट आहेत. हा त्यांचा सर्वोच्च विजय आहे. १२० आकाशाचे आणि पृथ्वीचे साम्राज्य ईश्वराचे असून त्यातल्या सगळ्या गोष्टी त्याच्याच आहेत; सगळ्यावर ईश्वराचीच सत्ता चालते.

प्रकरण ६ : पशुधन
(अल्-अनआम)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ईश्वर स्तुत्य आहे ज्याने आकाशाची आणि पृथ्वीची निर्मिती
केली, अंधार व उजेडाला अस्तित्व दिले. तरीही सत्य नाकारणारे इतरांना
ईश्वराच्या बरोबरीचे स्थान देतात. २ मातीपासून तुम्हाला निर्माण करणारा
आणि तुमचे आयुर्मान निश्चित करणारा – ज्याचे ज्ञान त्यालाच आहे, तो
ईश्वरच आहे. तरीही तुमच्या मनात शंका आहे. ३ आकाश आणि पृथ्वी
या दोघांचा तो ईश्वर आहे. तुम्ही काय लपवता ते सर्व आणि काय उघड
करता ते सर्व तो जाणतो. तुम्ही काय करता याचे परिपूर्ण ज्ञान त्याला
आहे.

४ तरीही त्यांच्या पालनकर्त्याकडून त्यांच्याकडे आलेल्या संकेतांकडे
ते प्रत्येक वेळी पाठ फिरवतात. ५ जेव्हाही सत्य त्यांच्याकडे आले, त्यांनी
त्याचा स्वीकार करण्यास नकार दिला. ते ज्या गोष्टीची थट्टा करीत होते,
त्या शिक्षेविषयीची वार्ता लवकरच त्यांच्याकडे येणार आहे. ६ त्यांच्या
आधीच्या किती पिढ्या आम्ही उध्वस्त केल्या, त्यांनी पाहिले नाही का?
त्यांना आम्ही या पृथ्वीवर तुमच्याहीपेक्षा अधिक भक्कमपणे स्थापित केले.
त्यांच्यावर मुबलक जलवर्षाव करण्यासाठी काळ्या ढगांची पाठवणी केली
आणि त्यांच्या पायाशी वाहत्या नद्यांची तरतूद केली. तरीही, त्यांनी
केलेल्या अपराधांमुळे आम्ही त्यांचा नाश केला आणि त्यांच्या नंतरच्या
पिढ्या उभ्या केल्या.

७ हे प्रेषिता! चर्मपत्रावर लिहिलेला ग्रंथ आम्ही तुमच्याकडे पाठवला
असला आणि त्यांनी त्याला स्वतःच्या हातांनी स्पर्श केला असला तरी

सत्य नाकारणारे अजूनही म्हणतील, "ही निव्वळ जादू आहे." [८] ते विचारतील, "ईश्वराने प्रेषितांकडे आपल्या देवदूताला दृश्य स्वरूपात का पाठवले नाही?" आम्ही आमच्या देवदूताला प्रेषिताकडे पाठवले असते तर सर्व गोष्टींचा निर्णय झाला असता आणि त्यांना आपल्या कृत्याचा पश्चाताप करायची संधी मिळाली नसती. [९] खरोखर, आम्ही आमच्या दूताला प्रेषित म्हणून पाठवले असते, तर त्याला माणसाच्या रूपातच पाठवले असते. याने त्यांच्या मनातला गोंधळ आणखीच वाढला असता. [१०] त्यांनी तुमच्या आधीच्या प्रेषितांची थट्टा उडवली. पण ही थट्टा त्यांच्या अंगलट आली. [११] त्यांना सांगा, "सगळीकडे फिरून पहा, सत्य नाकारणाऱ्यांचा कसा शेवट झाला होता हे तुम्हाला कळेल."

[१२] त्यांना विचारा, "आकाशाची आणि पृथ्वीची मालकी कुणाची आहे?" त्यांना सांगा, "ईश्वराची!" तुमच्यावर दया करायची जबाबदारी त्याने स्वतःहून स्वीकारली आहे. पुनर्निर्माणाच्या दिवशी तो तुम्हा सगळ्यांना त्याच्यासमोर जमवेल, यात तीळमात्र शंका नाही. ज्यांनी आपले स्वत्व भ्रष्ट केले आहे ते ईश्वरावर कधीच श्रद्धा ठेवणार नाहीत." [१३] दिवस आणि रात्रीच्या अंतरंगात जे काही सामावले आहे ते त्याचेच आहे. तो सगळे ऐकणारा, सगळे जाणणारा आहे. [१४] त्यांना विचारा, "आकाश आणि पृथ्वी निर्माण करणाऱ्या, सगळ्यांचे भरणपोषण करणाऱ्या आणि कुणाकडूनही भरणपोषण करून न घेणाऱ्या ईश्वराव्यतिरिक्त इतर कुणाला मी माझा त्राता का मानू?" त्यांना सांगा, "ईश्वरला समर्पित होणाऱ्यांचा अग्रणी हो, असा आदेश मला मिळाला आहे. तुम्हीही अनेकेश्वरवाद्यांपैकी होऊ नका." [१५] त्यांना सांगा, "मी माझ्या पालनकर्त्याची आज्ञा कधीही मोडणार नाही. कारण त्या भयानक दिवसाच्या (अंतिम दिवसाच्या) शिक्षेची मला भीती वाटते."

१६ अंतिम दिवशी ज्याची शिक्षा टळेल, त्याला ईश्वराची असीम कृपा
लाभली असेल. ही त्याची सर्वश्रेष्ठ प्राप्ती आहे.
१७ ईश्वराने तुमचे नुकसान करायचे ठरवले तर त्याच्याशिवाय कुणीही
तुम्हाला त्यापासून वाचवू शकणार नाही. पण त्याने तुमचे कल्याण
करायचे ठरवले तर लक्षात ठेवा, आपल्या इच्छेला येईल ते सगळे
करायचे सामर्थ्य त्याच्याकडे आहे. १८ त्याच्या सेवकांवर त्याचीच सत्ता
चालते. तो सर्वज्ञानी, सर्व जाणणारा आहे. १९ त्यांना विचारा, "साक्षीदार
म्हणून सगळ्यात खात्रीशीर कोण आहे?" त्यांना सांगा, "तो ईश्वर
आहे. तो तुमचा आणि आमचा साक्षीदार आहे." त्यांना हेही सांगा, "या
माध्यमातून तुम्हाला आणि ते ज्यांच्यापर्यंत पोहोचेल त्यांना सावधानतेचा
इशारा देण्यासाठी हे कुरआन माझ्यावर अवतरले आहे. ईश्वराव्यतिरिक्त
अन्य कुणी त्याच तोलामोलाचे आहे याचे तुम्ही साक्षीदार आहात का?"
त्यांना सांगा, "मी काही याचा साक्षीदार नाही." त्यांना हेही सांगा,
"ईश्वर एकमेव आहे आणि तुम्ही अन्य कुणाला त्याचा दर्जा देत असाल
तर ते मला मान्य नाही."
२० ज्यांना आम्ही हे ग्रंथ दिले होते, ते त्यांना आपल्या मुलासारखे
ओळखतात. पण स्वतःशी प्रतारणा करणारे त्यावर विश्वास ठेवणार
नाहीत. २१ ईश्वराचे संकेत नाकारून त्याच्याविषयी खोट्या गोष्टी
फैलावणाऱ्यांपेक्षा जास्त अपराधी कोण आहे? हे पापी कधीही यशस्वी
होणार नाहीत, हे नक्की! २२ आम्ही सगळ्यांना एकत्र जमवून त्या दिवशी
अनेकेश्वरवाद्यांना विचारू, "तुम्ही दावा केला होता ते आमचे समतुल्य
कुठे आहेत?" २३ यावर "हे पालनकर्त्या! तुझी शपथ! आम्ही कधीही
अनेकेश्वरवादी नव्हतो" असे म्हणण्यावाचून त्यांच्याकडे पर्याय असणार
नाही. २४ पहा, ते स्वतःशीच कसे अप्रामाणिक आहेत आणि त्यांनी
शोधलेल्या दैवतांनी त्यांना कसे अडचणीत आणले आहे.

२५ त्यांच्यापैकी काहीजण तुमचे बोलणे लक्षपूर्वक ऐकतात, पण
आम्ही त्यांच्या अंतःकरणावर आवरण चढवले आहे, त्यांचे कान बहिरे
केले आहेत. यामुळे तुमच्या बोलण्याचा अर्थ त्यांना समजू शकत नाही.
ईश्वराचे सगळेच संकेत पाहिले तरीही ते त्यावर विश्वास ठेवणार नाहीत.
सत्य नाकारणारे तुमच्याशी वाद घालताना म्हणतील, "या तर फक्त प्राचीन
कथा आहेत." २६ ते स्वतःही त्यावर श्रद्धा ठेवत नाहीत आणि इतरांनाही
ठेवू देत नाहीत. असे करून ते स्वतःचाच विनाश ओढवत आहेत.
पण त्यांना याची जाणीवही नाही. २७ त्यांना नरकाग्नीसमोर आणल्याचे
तुम्ही पहाल तेव्हा ते म्हणतील, "आम्हाला इथून माघारी पाठवले तर
आम्ही आमच्या पालनकर्त्याचे संकेत नाकारणार नाही, त्यावर श्रद्धा
ठेवणाऱ्यांपैकी असू." २८ यावेळी ते जे लपवत असत, त्यांच्यासमोर ते
स्पष्टपणे उघड होईल. पण त्यांना इथून माघारी पाठवले तरी ते त्यांना
मनाई केलेल्या गोष्टींकडेच परततील, कारण ते खरोखर खोटारडे आहेत.
२९ ते म्हणतात, या जगातील आमच्या जीवनापलीकडे काहीही नाही.
मेल्यानंतर आम्हाला पुन्हा उभे केले जाणार नाही. ३० मृत्युनंतर त्यांच्या
पालनकर्त्यासमोर उभे केले असता त्यांची काय अवस्था होते? तुम्ही पाहू
शकाल तर ईश्वर त्यांना विचारेल, मृत्युनंतरचे हे दुसरे जीवन सत्य नाही
का? ते उत्तर देतील, आमच्या पालनकर्त्याची शपथ, हे सत्य आहे. यावर
ईश्वर त्यांना सांगेल, तर मग सत्य मानायला नकार दिल्याची शिक्षा भोगा!
३१ ईश्वराबरोबर होणारी भेट नाकारणाऱ्यांनी खरोखर नुकसान ओढवून
घेतले आहे. अचानक ती वेळ पुढे ठाकल्यावर ते शोक करतील. अरेरे!
आम्ही या दिवसाकडे दुर्लक्ष का केले! आपल्या या अपराधांचे ओझे
त्यांना पाठीवर वहावेच लागेल. हे ओझे अतिशय दुसह्य असेल. ३२ या
जगातले जीवन हा फक्त एक खेळ आणि करमणूक आहे. ईश्वराचे भय

बाळगणाऱ्यांसाठी खात्रीपूर्वक सर्वोत्तम निवारा म्हणजे मृत्युनंतरचे जग. हे तुम्ही समजावून घेणार नाही का?

३३ त्यांच्या बोलण्याने तुम्ही दुःखी होता, आम्ही समजू शकतो. हे अपराधी तुम्हाला नाकारत नाहीत, तर ते जे नाकारत आहेत ते ईश्वराचे संकेत आहेत. ३४ तुमच्या आधीच्या प्रेषितांनाही त्यांनी नाकारले आहे. आमची मदत पोहोचेपर्यंत त्यांचा नकार आणि छळ त्यांनी संयमाने पचवला. ईश्वराच्या वचनात बदल घडवू शकेल असा कोणीही नाही. तुमच्या आधी होऊन गेलेल्या काही प्रेषितांची माहिती तुम्हाला मिळालेलीच आहे. ३५ त्यांचा नकार सोसणे कठीण वाटत असेल, तर एखादे भूमिगत भुयार किंवा आकाशातील शिडी शोधून काढा आणि शक्य झाल्यास त्यांच्यासाठी संकेत आणा. ईश्वराच्या मनात आले असते, तर खरोखर त्याने सगळ्यांना आपले मार्गदर्शन दिले असते. तेव्हा तुम्ही अज्ञानांपैकी होऊ नका. ३६ ईश्वराची हाक लक्षपूर्वक ऐकणारे त्याला प्रतिसाद देऊ शकतात. मृतांविषयी सांगायचे तर ईश्वर त्यांना पुन्हा जीवित करेल आणि त्या सगळ्यांना त्याच्याकडे परत आणले जाईल.

३७ ते विचारतात, "प्रेषिताच्या पालनकर्त्याने त्याच्याकडे एखादी ओळखीची खूण का पाठवली नाही?" त्यांना सांगा, "अशी खूण पाठवण्याचे सामर्थ्य फक्त ईश्वराकडे आहे." पण त्यांच्यापैकी बहुतेकजण हे समजू शकत नाहीत. ३८ पृथ्वीवर संचार करणारे प्राणी, आकाशात आपल्या दोन पंखांनी उडणारे पक्षी आणि तुमच्यासारखी माणसे ही सगळी आमचीच निर्मिती आहे. आम्ही ग्रंथातून काही सांगायचे बाकी ठेवले नाही. (शेवटी) सगळ्यांना त्यांच्या पालनकर्त्यासमोर एकत्र आणले जाईल. ३९ आमचे संकेत नाकारणारे आणि अंधारात चाचपडणारे मुके, बहिरे आहेत. ईश्वराच्या मर्जीला येईल त्याला तो भरकटू देतो आणि त्याच्या मर्जीला येईल त्याला सन्मार्गावर ठेवतो.

४० त्यांना विचारा, ईश्वराची शिक्षा तुमच्यावर आली किंवा शेवटची वेळ ओढवली, तर सत्यप्रिय असाल तर ईश्वराशिवाय अन्य कुणाचा धावा कराल? ४१ खरोखर, अशावेळी तुम्ही फक्त त्याचाच धावा कराल आणि त्याची इच्छा असेल तर तो त्यासाठी कारणीभूत असलेले संकट दूर करेल. यानंतर मात्र तुम्ही ज्यांना (खोट्या देवांना) त्याच्या बरोबरीचा दर्जा दिला होता त्यांना विसरून जाल.

४२ तुमच्याआधी अनेक प्रेषितांना आम्ही अनेक समाजांमध्ये पाठवले. त्यांनी विनम्र व्हावे यासाठी त्याच्या लोकांवर हालअपेष्टा आणि खडतर परिस्थिती आणली. ४३ आम्ही फर्मान काढलेली संकटे ओढवल्यावर विनम्र होण्याऐवजी त्यांची मने जास्त कठोर झाली. कारण त्यांची सगळी कृत्ये योग्य आहेत, अशी जाणीव त्यांना सैतानाने दिली. ४४ आम्ही दिलेल्या सक्त ताकीदीचा त्यांना विसर पडल्यावरही आम्ही त्यांना हवी असलेली प्रत्येक गोष्ट देऊ केली. पण तिच्या उपभोगात दंग असतानाच त्यांच्यावर अचानक संकट आणून आम्ही त्यांना नैराश्यात लोटून दिले. ४५ अशा रीतीने अपराध्यांचा आम्ही संपूर्ण विनाश केला. सगळी स्तुती ईश्वरासाठी आहे, जो जगाचा पालनकर्ता आहे.

४६ त्यांना विचारा, "ईश्वराने तुमची दृष्टी, श्रवणशक्ती हिरावून घेतली आणि तुमची अंतःकरणे मोहोरबंद केली तर ईश्वराशिवाय कुठला देव तुम्हाला पूर्ववत करू शकेल? पहा, आम्ही किती वेगवेगळ्या प्रकारे आमचे संकेत त्यांच्यासमोर स्पष्ट करतो, तरीही ते त्याकडे पाठ फिरवतात." ४७ त्यांना विचारा, अचानक किंवा पूर्वसूचना देऊन तुमच्यावर ईश्वराची शिक्षा ओढवली तर पाप्यांशिवाय कुणाचा विनाश होईल? ४८ आम्ही फक्त सुवार्ता आणि सावधानतेचा इशारा देण्यासाठी आमच्या प्रेषितांना पाठवले आहे. तेव्हा श्रद्धा ठेवून स्वतःमध्ये सुधारणा

करणाऱ्यांना कसली भीती नसेल, कसली चिंता नसेल. ४९ आज्ञा मोडून
जे आमचे संकेत नाकारतील त्यांच्यावर आमची शिक्षा ओढवेल.
५० त्यांना सांगा, "माझ्याकडे ईश्वराचा खजिना आहे किंवा मला अदृश्याचे
ज्ञान आहे किंवा मी देवदूत आहे, असे काही मला म्हणायचे नाही. मी
फक्त माझ्यासमोर प्रकट झालेल्या गोष्टींचे अनुसरण करतो, त्यांचे पालन
करतो." त्यांना विचारा, "अंध आणि डोळस एकसमान आहेत का? मग
तुम्ही विचार का करत नाही?"

५१ त्यांच्या पालनकर्त्यासमोर एकत्र आणण्याची भीती वाटणाऱ्यांना
या साक्षात्काराद्वारे इशारा द्या, त्या दिवशी ईश्वराशिवाय ना कुणी रक्षक
ना कुणी मध्यस्थ असेल. तेव्हा ईश्वराची भीती बाळगा. ५२ सकाळ-
संध्याकाळ त्याचा धावा करणाऱ्यांना स्वतःपासून दूर करू नका.
तुमच्यावर त्यांची कसली जबाबदारी नसेल आणि त्यांच्यावर तुमची
कसली जबाबदारी नसेल. त्यांना दूर कराल तर तुम्हीही अन्यायींपैकी
व्हाल. ५३ अशा प्रकारे आम्ही इतरांकरवी काहींची परीक्षा घेतो, ज्यामुळे
त्यांनी विचारले, "ईश्वराने आमच्यातून काहीना निवडून त्यांच्यावर कृपा
केली आहे ते हे लोक आहेत का? कोण कृतज्ञ आहे हे ईश्वर चांगले
ओळखत नाही का?"

५४ आमच्या साक्षात्कारांवर विश्वास ठेवणारे जेव्हा तुमच्याकडे येतील
तेव्हा त्यांना सांगा, तुम्हाला शांतीचा लाभ होवो! तुमच्या पालनकर्त्याने
स्वखुशीने तुमच्यावर दया दाखवण्याची जबाबदारी घेतली आहे, तेव्हा
तुमच्यापैकी कुणी अजाणतेपणी कुकर्म केले आणि नंतर पश्चातापपूर्वक
स्वतःमध्ये सुधारणा केली (तर ईश्वर त्याला नक्कीच माफ करेल.) तो
अतिशय क्षमाशील आणि दयाशील आहे. ५५ अशा प्रकारे अपराध्यांचे
मार्ग (प्रवृत्ती) उघडे पाडण्यासाठी आम्ही आमचे संकेत स्पष्ट करतो.

५६ त्यांना सांगा, तुम्ही ईश्वराशिवाय ज्याचा धावा करता, त्याची
उपासना करायला मला मनाई आहे. मी तुमच्या लहरीप्रमाणे आणि
इच्छेप्रमाणे वागणार नाही. तसे केले तर मी भरकटेन, अचूक मार्गदर्शनाला
वंचित राहीन. ५७ त्यांना सांगा, माझ्या पालनकर्त्याकडून आलेल्या स्पष्ट
पुराव्याच्या बाजूने मी उभा राहतो, तरीही तुम्ही तो अमान्य करता. तुम्ही
घाईघाईने जे मिळवू पाहता, ते माझ्या अधिकारात नाही. निवाड्याचा
हक्क फक्त ईश्वराचा आहे. तो सत्याची घोषणा करतो. तो सर्वोत्तम
न्यायाधीश आहे. ५८ त्यांना सांगा, तुम्हाला जे मिळवायची घाई झाली
आहे, ते माझ्या अधिकारात असते तर हा प्रश्न तुमच्या-माझ्यातच
सुटला असता. ईश्वर अपराध्यांना चांगलेच ओळखतो. ५९ अदृश्याच्या
किल्ल्या त्याच्या अधिकारात आहेत, त्याच्याशिवाय कुणीही ते जाणत
नाही. सागर आणि भूमीवर जे काही आहे त्या सगळ्याचे ज्ञान त्याला
आहे. त्याला कळल्याशिवाय झाडावरचे पानही गळत नाही, पृथ्वीच्या
काळोखात दडलेला एखादा धान्य कण किंवा प्रत्येक ओली-सुकी गोष्ट
त्याच्या नोंदवहीत स्पष्ट नोंदवलेली आहे.

६० तो तुम्हाला रात्री जमवतो आणि तुम्ही दिवसभरात काय केले ते
सगळे तो जाणतो. दिवसभराची ठरवलेली कामे पार पाडण्यासाठी प्रातः
काळी तो तुम्हाला जागे करतो, ज्याद्वारे तुमचे आयुष्यमान पूर्ण व्हावे.
मृत्युनंतर जेव्हा तुम्ही त्याच्याकडे परताल तेव्हा तुम्ही कसे वागत होता ते
सगळे तो जाहीर करेल. ६१ ईश्वराचे आपल्या सेवकांवर परिपूर्ण नियंत्रण
आहे. मृत्यूची वेळ येईपर्यंत तुमची देखरेख करण्यासाठी तो आपल्या
रक्षकांना (देवदूतांना) तुमच्याकडे पाठवतो. मृत्यूचा समय येताच ते तुमचे
प्राण हरण करतात. आपल्या कर्तव्यात ते कधीही कसूर करत नाहीत.
६२ यानंतर तुम्हा सगळ्यांना ईश्वराकडे, तुमच्या खऱ्या पालनकर्त्याकडे

आणले जाईल. इथे निवाडा फक्त त्याचा असतो. हिशेब करण्यात तो अगदी तत्पर आहे.

६३ त्यांना विचारा, "जमिनीच्या काळोखात किंवा सागरतळाशी संकटात सापडल्यावर सुटकेसाठी नम्रपणे तुम्ही मनातल्या मनात कुणाचा धावा करता; ईश्वराने इथून आमची सुटका केली तर अगदी खात्रीने आम्ही कृतज्ञांपैकी असू!" ६४ त्यांना सांगा, "या आणि इतर प्रत्येक संकटातून तुमची सुटका करणारा ईश्वर आहे, तरीही तुम्ही इतरांना त्याच्या समतुल्य ठरवता." ६५ त्यांना सांगा, "शिक्षा करण्यासाठी आकाशातून किंवा जमिनीतून तुमच्यावर संकट पाठवायचे किंवा पंथांमध्ये तुमचे विभाजन करून एकमेकांच्या हिंसेची चव चाखायला लावायचे सामर्थ्य ईश्वराकडे आहे." पहा, त्यांना समजावे म्हणून आम्ही आमचे साक्षात्कार कसे निरनिराळ्या मार्गांनी स्पष्ट करतो. ६६ तुमच्यामार्फत आम्ही पाठवलेला संदेश सत्य असला तरी तुमच्या लोकांनी तो नाकारला आहे. त्यांना सांगा, "मी तुमच्यावर पहारेकरी नाही." ६७ प्रत्येक भाकीत परिपूर्ण होण्याची वेळ ठरलेली असते आणि लवकरच तुम्हाला कळेल.

६८ आमच्या साक्षात्कारातले दोष शोधण्यात दंग असलेले लोक भेटल्यास ते दुसऱ्या विषयाकडे वळेपर्यंत त्यांच्यापासून दूर रहा. सैतानाने तुम्हाला याचा विसर पाडल्यास कालांतराने त्याची आठवण होताक्षणी त्यांच्यापासून दूर जा. ६९ ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांना अपराध्यांसाठी अजिबात जबाबदार धरले जाणार नाही. अपराध्यांनी ईश्वराला घाबरून रहावे यासाठी त्यांना सतत ईश्वराची आठवण करून देणे एवढेच त्यांचे कर्तव्य आहे. ७० ज्यांच्यासाठी धर्म फक्त पोरखेळ आणि करमणुकीचे साधन आहे आणि ज्यांना या जगातील जीवनाने फसवले आहे, त्यांच्यापासून दूर रहा. पण कुरआनचा दाखला देऊन उपदेश करा, प्रत्येकाने केलेल्या

वाईट कर्मासाठी त्यालाच जबाबदार धरले जाईल आणि ईश्वराशिवाय कुणी मदतनीस किंवा मध्यस्थ असणार नाही, याची त्यांना सतत आठवण करून द्या. याची भरपाई करण्यासाठी त्यांनी कितीही मोबदला दिला तरी तो स्वीकारला जाणार नाही. हे असे लोक आहेत जे त्यांच्या स्वतःच्या कृत्यांमुळे धिक्कारले गेले आहेत. सत्य नाकारल्याची सजा म्हणून त्यांना उकळते पाणी प्यावे लागेल आणि वेदनादायी शिक्षा भोगावी लागेल.

७१ त्यांना विचारा, आपण अशा कुणाचा धावा करायचा का जो आपला ना फायदा करू शकत ना नुकसान? ईश्वराचे मार्गदर्शन मिळाल्यानंतरही, सैतानाने भरकटवल्याने वाळवंटात सैरावैरा भटकणाऱ्यासारखी आणि "ये, आमच्याबरोबर ये" असे ज्याचे सोबती योग्य मार्गावर येण्यासाठी बोलावत आहेत त्याच्यासारखी, त्याकडे पाठ फिरवायची का? त्यांना सांगा, ईश्वराचे मार्गदर्शन हेच एकमेव मार्गदर्शन आहे. या विश्वाच्या पालनकर्त्याला शरण जाण्याची आज्ञा आम्हाला मिळाली आहे. ७२ नियमित प्रार्थना करण्याची आणि ईश्वराचे भय बाळगण्याची आज्ञा आम्हाला मिळाली आहे. त्याच्यासमोरच तुम्हा सगळ्यांना एकत्र आणले जाईल. ७३ सद्हेतूने आकाश आणि पृथ्वी निर्माण करणारा ईश्वर आहे. निवाड्याच्या दिवशी तो म्हणेल "अस्तित्वात ये" त्या दिवशी गोष्टी अस्तित्वात येतील. त्याचा शब्द सत्य आहे. निवाड्याच्या दिवशी जेव्हा तुतारी फुंकली जाईल त्या दिवशी संपूर्ण सार्वभौमत्व त्याचे असेल. तो दृश्य-अदृश्याचा माहीतगार आहे. तो बुद्धिमान, जाणकार आहे. ७४ अब्राहामने आझरला-आपल्या पित्याला काय सांगितले होते याचे स्मरण करा: "तुम्ही मूर्तींना ईश्वर मानता का? मला तुम्ही आणि तुमचे अनुयायी स्पष्टपणे सन्मार्गापासून भरकटलेले दिसता."

७५ अशाप्रकारे अब्राहामची श्रद्धा दृढ व्हावी म्हणून आम्ही

त्याला आमचे आकाश आणि पृथ्वीवरचे साम्राज्य दाखवले. ७६ जेव्हा त्याच्यावर रात्र उतरली तेव्हा आकाशात त्याला एक तारा दिसला. तो म्हणाला, "हा माझा पालनकर्ता!" त्या ताऱ्याचा अस्त झाल्यावर तो म्हणाला, अस्ताला जाणाऱ्या गोष्टी मला आवडत नाहीत. ७७ जेव्हा त्याने चंद्र उगवून त्याचा प्रकाश पसरलेला पाहिला तेव्हा तो म्हणाला, "हा माझा पालनकर्ता!" पण त्याचा अस्त होताच तो म्हणाला, माझ्या पालनकर्त्याने अचूक मार्गदर्शन केले नाही तर मी दिशाभूल झालेल्यांपैकी असेन. ७८ त्यानंतर आकाशात तळपणारा सूर्य पाहून तो म्हणाला, "हा माझा पालनकर्ता! हा सर्वश्रेष्ठ आहे!" जेव्हा त्याचा अस्त झाला तेव्हा तो म्हणाला, "लोकहो! तुम्ही ईश्वराशिवाय इतर कुणाची उपासना करता, त्या सगळ्यांचा माझ्याशी काही संबंध नाही." ७९ "मी निष्ठापूर्वक त्याच्याकडे वळून त्याला समर्पित झालो आहे, ज्याने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली आहे आणि मी अनेकेश्वरवाद्यांपैकी नाही." ८० यावरून त्याचे लोक त्याच्याशी वाद घालू लागले. त्यांना समजावताना त्याने सांगितले, "ईश्वराने मला मार्गदर्शन दिले आहे, तरीही तुम्ही त्याच्यावरून माझ्याशी वाद घालता? मी त्यांना अजिबात भीत नाही, ज्यांना तुम्ही ईश्वरातुल्य ठरवता; होय, जर माझ्या पालनकर्त्यानेच इच्छिले तर मात्र मला अवश्य नुकसान पोचू शकते. माझ्या पालनकर्त्याने सगळ्या गोष्टीचे ज्ञान सामावून घेतले आहे. तुम्ही त्यावर जाणीवपूर्वक विचार करणार नाही का?

८१ ईश्वराने अधिकार दिलेला नसतानाही तुम्ही इतरांना त्याच्या बरोबरीचा दर्जा देताना घाबरत नाही, तर मी त्या इतरांना का घाबरावे? सत्याची जाण असेल तर मला सांगा, कुठल्या बाजूला सुरक्षित वाटण्याचा जास्त अधिकार आहे? ८२ ज्यांची श्रद्धा आहे आणि जे श्रद्धेत दुष्कृत्यांची सरमिसळ करत नाहीत, ते सुरक्षित आहेत आणि त्यांना योग्य मार्गदर्शन

मिळाले आहे." [८३] अब्राहाम याच्या समाजातील लोक त्याच्याशी वाद घालत असताना त्याला आम्ही हा युक्तिवाद सांगितला – आमच्या इच्छेला येते त्यांचा दर्जा आम्ही उंचावतो– तुमचा पालनकर्ता बुद्धिमान आणि सजग आहे. [८४] आम्ही अब्राहाम याला इसहाक आणि याकोबची सोबत मिळवून दिली. पूर्वी आम्ही नोहाला जसे मार्गदर्शन दिले होते, तसे त्यांनाही दिले. नोहाच्या वंशजांमध्ये दावीद, शलमोन, ईयोब, जोसेफ, मोझेस आणि अहरोन समाविष्ट आहेत. अशा प्रकारे आम्ही सद्वर्तन करणाऱ्यांना मोबदला देतो.

[८५] जकरिया, योहाना (याह्या), येशू आणि एलीया (इलियास)– यांपैकी प्रत्येकजण सद्वर्तनी होता. [८६] इश्माएल, अलयसआ, योना (यूनुस) आणि लूत– यांपैकी प्रत्येकावर आम्ही इतरांपेक्षा जास्त कृपा केली. [८७] आणि त्यांच्या काही पूर्वजांवर, वंशजांवर आणि बांधवांवर आम्ही इतरांपेक्षा जास्त कृपा केली. त्यांना आम्ही निवडले आणि सन्मार्गावर आणले. [८८] हे ईश्वराचे मार्गदर्शन आहे. त्याच्या सेवकांपैकी त्याच्या इच्छेला येईल त्यांना तो मार्गदर्शन देतो. त्यांनी इतरांना ईश्वराच्या बरोबरीचा दर्जा दिला असता तर निश्चितच त्यांचे सगळे कर्म निष्फळ ठरले असते. [८९] या सगळ्यांना आम्ही पवित्र ग्रंथ, शहाणपण आणि प्रेषित्वपद दिले. त्यांनी (मक्कावासीयांनी) ते नाकारले तर, जे त्याचे श्रेष्ठत्व मान्य करायला कधीच नकार देणार नाहीत अशांकडे आम्ही ते विश्वासाने सोपवू. [९०] हे (पूर्वीचे प्रेषित) असे लोक होते ज्यांना ईश्वराचे मार्गदर्शन लाभले होते. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे आचरण करा आणि लोकांना सांगा, "हे फक्त संपूर्ण मानवजातीसाठी स्मरणपत्र आहे; याच्या मोबदल्यात मला तुमच्याकडून काहीही नको." [९१] "ईश्वराने एकाही माणसासमोर काहीही प्रकट केले नाही" असे म्हणणाऱ्यांना ईश्वराच्या प्रचंड महानतेचा अंदाज आलेला

नाही. त्यांना सांगा, मोझेसने ज्या ग्रंथाद्वारे लोकांसाठी सत्याचा प्रकाश आणि (अचूक) मार्गदर्शन आणले, तो ग्रंथ त्याच्यासमोर कोणी प्रकट केला? तुम्ही त्या ग्रंथाचे अनेक भागात विभाजन केले, त्यातील काही भाग उघड केला, तर उरलेला भाग लपवून ठेवला. त्यातून तुम्हाला अशी शिकवण मिळाली, ज्याचे ज्ञान ना तुमच्याकडे होते ना तुमच्या पूर्वजांकडे. हा ग्रंथ ईश्वराने पाठवला आहे, इतके सांगून त्यांना त्यांच्या तर्क लढवण्याच्या खेळात सोडून द्या.

९२ हा पवित्र ग्रंथ असून आम्ही तो प्रकट केला आहे, यातून आधी प्रकट केलेले सत्य प्रमाणित केले आहे. तेव्हा त्याद्वारे तुम्ही प्रमुख शहरातील लोकांना (म्हणजे मक्कावासीयांना) आणि त्याच्या सभोवार राहणाऱ्या सर्व लोकांना सावधानतेचा इशारा देऊ शकाल आणि जे मृत्युपश्चात जीवनावर विश्वास ठेवतात ते त्यावर विश्वास ठेवतील आणि त्यांच्या प्रार्थनेच्या बाबतीत संपूर्ण जागरूक असतील. ९३ ईश्वराविरुद्ध बनावट गोष्टी रचणारे किंवा त्यांच्यासमोर काहीही प्रकट झाले नसताना, "हे माझ्यासमोर प्रकट झाले" म्हणणारे किंवा "ईश्वराने जे पाठवले आहे तसेच मीही पाठवेन," म्हणणारे; यांच्यापेक्षा मोठे अपराधी कोण आहेत? त्यांच्याभोवती मृत्युपाश आवळल्यावर त्यांचे हात ओढत आमचे दूत त्यांना म्हणतील, "तुमचे प्राण सोडा. ईश्वराविरुद्ध बनावट गोष्टी रचण्याची आणि त्याच्या संकेतांविषयी उद्धटपणे प्रतिसाद देण्याची परतफेड म्हणून तुम्हाला मानहानीकारक शिक्षेला सामोरे जावे लागेल."

९४ आता तुम्ही आमच्याकडे परतला आहात एकाकी, जसे आम्ही तुम्हाला सुरुवातीला बनवले होते तसे आणि आम्ही दिलेल्या सगळ्या गोष्टी मागे सोडून तुम्ही जे ईश्वरासमान असल्याचा दावा करत होता, ते मध्यस्थही तुमच्यासोबत आम्हाला दिसत नाहीत. इहलोकातले तुमचे

सगळे बंध तुटले आहेत आणि तुम्ही केलेल्या अंदाजांनी तुम्हाला पराभूत केले आहे. ९५ धान्यबिया आणि फळांच्या गुठळ्या फोडणारा ईश्वरच आहे. तो निर्जीवातून सजीवाची आणि सजीवातून निर्जीवाची निर्मिती करतो, तरीही तुम्ही कसे चुकलात, सत्यापासून दूर गेलात?

९६ त्याने (रात्रीच्या काळोखातून) दिवसाची निर्मिती केली आणि विश्रांतीसाठी रात्रीची योजना केली. त्याने चंद्र-सूर्याला नेमकी कक्षा दिली. सर्वशक्तिमान व सर्वज्ञ असणाऱ्याने हे परिमाण ठरवून दिले आहे. ९७ भूमी आणि सागरावरच्या घनदाट काळोखातून मार्गदर्शन मिळावे यासाठी त्याने ताऱ्यांची स्थापना केली. ज्यांना समजून घ्यायचे आहे त्यांच्यासाठी आम्ही आमचे संकेत स्पष्ट केले आहेत.[अ] ९८ सर्वप्रथम एका जीवापासून तुमची निर्मिती करणारा, या जगात रहायला तुम्हाला जागा देणारा आणि मृत्युपश्चात विश्रांतीस्थान देणारा ईश्वरच आहे. सुज्ञ लोकांसाठी आम्ही आमचे साक्षात्कार स्पष्ट केले आहेत.

९९ आकाशातून जलवर्षाव करणारा ईश्वर आहे. त्याच्या साह्याने आम्ही सर्व प्रकारची वनस्पती फुलवतो, हिरव्या पानांच्या डहाळीतून कणसे निर्माण करतो. खजूर वृक्षाच्या गाभ्यातून खजुराचे घोस लगडवतो. द्राक्ष, जैतून आणि डाळिंबाच्या बागा फुलवतो, काहींची फळे एकसारखी आहेत, तर काहींची वेगळी आहेत. त्या फळांची वाढ करून आम्ही त्यांना परिपक्व करतो, त्याकडे पहा. श्रद्धावंतांसाठी यात संकेत आहेत.

[अ] विश्वाची अवाढव्य व्यवस्था इतक्या अचूकतेने चालते की लाखो वर्षांनंतरही त्यात कोणतीही विसंगती निर्माण झालेली नाही. यावरून ज्याच्या शक्ती अमर्यादित आहेत, अशा अस्तित्वाचा खरेपणा सिद्ध होतो.

१०० ईश्वराने जिन्न [अ] निर्माण केले, तरी ते त्यांना ईश्वराचे तुल्यबळ मानतात. अज्ञानामुळे ते ईश्वराला मुले आणि मुली आहेत असे म्हणायलाही धजावले. ईश्वराचा महिमा अपार आहे, ते ज्याच्याशी त्याचा संबंध जोडतात (ते त्याचे जे वर्णन करतात), त्यापेक्षा तो उदात्त आहे.

१०१ तो आकाश आणि पृथ्वीचा प्रारंभकर्ता आहे. त्याला जीवनसाथी नाही तर मुले कुठून असणार? त्याने सगळे निर्माण केले आणि त्याला सगळ्याची जाण आहे. १०२ ईश्वर तुमचा पालनकर्ता आहे. त्याच्याशिवाय कुणीच पूजनीय नाही. सगळ्या सृष्टीचा तो निर्माता आहे. तेव्हा त्याची उपासना करा. तो सगळ्या गोष्टींचा रक्षक आहे. १०३ तो कुणाच्याही दृष्टीत सामावत नाही, पण त्याच्या दृष्टीत सगळे जग सामावते. तो अथांग, सर्वज्ञ आहे. १०४ तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्याकडे सूक्ष्मदृष्टी आलेली आहे, (म्हणजेच ईश्वरी ग्रंथाद्वारे तुमच्या मार्गदर्शनाची व्यवस्था करण्यात आली आहे.) त्यामुळे जो पाहण्याची निवड करेल तो आपले कल्याण करेल. जो अंध राहण्याची निवड करेल तो आपले नुकसान करेल. त्यांना सांगा, "मी इथे तुमचा पहारेकरी नाही." १०५ अशा प्रकारे वेगवेगळ्या मार्गांनी आम्ही आमचे साक्षात्कार स्पष्ट केले आहेत, ज्यायोगे त्यांनी म्हणावे, "हे तुम्ही आम्हाला सांगितले आहे." सत्य जाणून घ्यायला उत्सुक असणाऱ्यांसाठी आम्ही ते स्पष्ट केले आहे.

[अ] कुरआनमध्ये काही विशिष्ट निर्मितींचा उल्लेख आला आहे : १) मालायका (फरिश्ते, देवदूत, Angels) २) जिन्न ३) मानव आदि. जिन्न: अग्निज्वाळेपासून ही अदृश्य निर्मिती. मानवाप्रमाणे ते त्यांच्या कृत्यांसाठी जबाबदार आहेत. ते ईश्वराचे मार्गदर्शन स्वीकारतात की नाही यावर अवलंबून, त्यांच्यात श्रद्धावंत किंवा अश्रद्धावंत जिन्न असू शकतात.

१०६ तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यासमोर जे प्रकट झाले आहे
त्याचे अनुसरण करा. एकमेव ईश्वराशिवाय कुणी उपास्य नाही आणि
अनेकेश्वरवाद्यांकडे दुर्लक्ष करा. १०७ ईश्वराची इच्छा असती तर
अनेकेश्वरवाद्यांनी इतर कुणाला ईश्वराचा दर्जा दिला नसता. आम्ही
तुम्हाला त्यांचे पहारेकरी म्हणून नेमले नाही, की तुम्हाला त्यांच्या
कार्यांसाठी जबाबदार धरले जाणार नाही. १०८ पण ईश्वराऐवजी ते ज्यांचा
धावा करतात, त्यांची निंदा करू नका अन्यथा अज्ञानापोटी सूडभावनेने
प्रेरित होऊन ते ईश्वराची निंदा करतील. अशा रीतीने प्रत्येक समाजातील
लोकांना आम्ही त्यांची कृती योग्य आहे, असे भासवले. सगळ्यांना
त्यांच्या पालनकर्त्याकडेच परतायचे आहे आणि त्यांचे वर्तन कसे होते
हे तो सगळ्यांना जाहीरपणे सांगेल. १०९ ते ईश्वराची दृढ शपथ घेऊन
सांगतील की, ईश्वराची एखादी खूण त्यांना दिसली तर ते त्यावर विश्वास
ठेवतील. त्यांना सांगा, "अशा खुणा फक्त ईश्वर प्रकट करतो." त्यांना
आम्ही एखादी खूण दाखवली तर ते खरंच त्यावर विश्वास ठेवतील असे
तुम्ही कसे सांगू शकता?

११० आम्ही त्यांची मने आणि दृष्टी सत्यापासून दूर नेऊ, कारण त्यांनी
पहिल्या वेळेस यावर विश्वास ठेवायला नकार दिला. आम्ही त्यांना
त्यांच्या या उर्मटपणात अंधपणे सैरावैरा भटकायला लावू. १११ आम्ही
त्यांच्याकडे आमच्या दूतांना पाठवले, मृतांना जीवित करून त्यांच्याशी
बोलायला लावले आणि प्रत्येक गोष्ट त्यांच्यासमोर एकत्र आणली,
तरीही ईश्वराची इच्छा झाल्याशिवाय त्यांनी आमच्यावर विश्वास ठेवला
नसता. त्यांच्यापैकी बहुतांश लोक अज्ञानी असल्यासारखे वागतात.
११२ अशाच प्रकारे माणसामधून आणि जिन्नमधून प्रत्येक प्रेषितासाठी
आम्ही विरोधक व सैतान नेमले आहेत. फसवणूक करण्याच्या उद्देशाने

ते एकमेकांना वैशिष्ट्यपूर्ण शब्दांच्या साह्याने गैरसल्ले देतात. तुमच्या पालनकर्त्याची इच्छा असती तर ते असे वागले नसते. तेव्हा त्यांना कटकारस्थान रचण्यात मग्न राहू द्या.

११३ म्हणजे मृत्युपश्चात जीवनावर विश्वास न ठेवणाऱ्यांचे मन त्या गैरसल्ल्यांकडे वळेल आणि त्यात संतुष्ट राहून ते गैरमार्गावर टिकून राहतील. ११४ त्यांना विचारा, पवित्र ग्रंथ प्रकट करणारा व स्पष्टपणे समजावून सांगणारा ईश्वर असताना, न्यायदाता म्हणून मी ईश्वराशिवाय अन्य कुणाचा शोध का घेऊ? तुमच्या आधी ज्यांना हा ग्रंथ दिला गेला ते जाणतात, की हा ग्रंथ म्हणजे तुमच्या पालनकर्त्याकडून प्रकट झालेले सत्य आहे, तेव्हा त्यावर शंका घेऊ नका.

११५ तुमच्या पालनकर्त्याचे शब्द सत्य आणि न्यायाने परिपूर्ण आहेत. त्याच्या शब्दांत कुणीही फेरफार करू शकत नाही. तो सर्व ऐकणारा, सर्व जाणणारा आहे. ११६ तुम्ही पृथ्वीवरच्या बहुतांश लोकांच्या आज्ञेनुसार वागाल तर ते तुम्हाला ईश्वराच्या मार्गापासून दूर नेतील. ते फक्त तर्कानुसार वागतात. ते फक्त अंदाज करतात. ११७ कोण ईश्वराच्या मार्गदर्शनाचे अनुसरण करतो आणि कोण त्यापासून दूर जातो, हे तुमचा पालनकर्ता चांगलेच जाणतो. ११८ तेव्हा त्याच्या साक्षात्कारांवर खरा विश्वास ठेवत असाल, तर ज्यावर ईश्वराचे नाव घेतले जाते तेवढेच खा.

११९ परिस्थितीवश झाला नसाल, तर कुठल्या पदार्थांचे सेवन करायला मनाई आहे हे त्याने अगोदरच स्पष्ट केले असताना, त्याचे नाव घेतलेल्या पदार्थांचे सेवन करायला तुमचा नकार का आहे? निःसंशय, अनेकजण अज्ञानापोटी आपल्या कल्पनेनुसार इतरांची दिशाभूल करतात. पण तुमचा पालनकर्ता अशा अपराध्यांना चांगलेच ओळखतो. १२० सर्व पापकर्मापासून लांब रहा. मग ते उघड असो की गुप्त. पाप्यांना त्यांच्या कुकर्मांची योग्य

सजा भोगावी लागेल. [१२१] ज्यावर ईश्वराचे नाव घेतले नसेल असे काहीही खाऊ नका. कारण ही त्याची अवज्ञा आहे. सैतान आपल्या अनुयायांना तुमच्याविरुद्ध वाद घालायची प्रेरणा देतात. तुम्ही त्यांच्या सूचनेप्रमाणे वागलात तर अनेकेश्वरवाद्यांपैकी बनाल. [१२२] मृत झाल्यानंतर जीवन देऊन ज्यांना आम्ही त्यांच्यासारख्या लोकांबरोबर चालता यावे, यासाठी प्रकाश दाखवला ते काळोखाच्या गर्तेतून कधीही बाहेर पडू न शकणाऱ्यांसारखे कसे असतील? अशा रीतीने सत्य अमान्य करणाऱ्यांना आम्ही त्यांची कृत्ये योग्य आहेत असे वाटायला लावतो.

[१२३] अशाप्रकारे दुष्कृत्य करणाऱ्यांच्या प्रमुखांना कारस्थाने रचण्यासाठी आम्ही गावोगावी नेमले आहे. ते जी कारस्थाने रचतात ती फक्त त्यांच्या विरुद्धच असतात, पण अजून त्यांना याची जाणीव नाही. [१२४] एखादा संकेत त्यांच्याकडे आल्यास ते म्हणतात, "ईश्वराच्या दूताला जे दिले गेले ते आम्हाला देईपर्यंत आम्ही त्यावर विश्वास ठेवणार नाही." पण आपले प्रेषित म्हणून कुणाला नेमायचे हे ईश्वर चांगले ओळखतो. दुष्कृत्य करणाऱ्यांची त्यांच्या कारस्थानांमुळे ईश्वरासमोर मानहानी होईल आणि त्यांना कठोर शिक्षेचा सामना करावा लागेल. [१२५] ईश्वर ज्यांना सन्मार्गावर नेऊ इच्छितो, त्यांचे मन इस्लामसाठी खुले करतो. तर ज्यांना त्यापासून दूर नेऊ इच्छितो, त्यांचे मन संकुचित करतो, जणू हे आकाशाला गवसणी घालण्याइतके कठीण कर्म आहे असे त्यांना वाटायला लावतो. अशा रीतीने सत्यावर विश्वास ठेवायला नकार देणाऱ्यांची ईश्वर अपरिमित बदनामी करतो.

[१२६] हा तुमच्या पालनकर्त्याकडे घेऊन जाणारा सरळ मार्ग आहे. चिंतन करणाऱ्यांसाठी आम्ही संकेत स्पष्ट केले आहेत. [१२७] शांतीच्या निवासस्थानी त्यांच्या पालनकर्त्यांबरोबर त्यांचे वास्तव्य

असेल. त्यांनी केलेल्या सत्कर्मांच्या मोबदल्यात तो त्यांचा रक्षक असेल. [१२८] पुनर्निर्माणाच्या दिवशी सगळ्यांना एकत्र केल्यावर ईश्वर म्हणेल, "जिन्नच्या सोबत्यांनो! मनुष्यजातीतील अनेक अनुयायांना तुम्ही आपल्याकडे वळवले आहे." माणसांमधील त्यांचे अनुयायी म्हणतील, "हे पालनकर्त्या! एकमेकांपासून आम्हाला अनेक लाभ मिळाले आहेत, पण आता तू ठरवून दिलेल्या जीवनाचा शेवट आला आहे." यावर ईश्वर त्यांना सांगेल, "नरकाग्नी हे तुमचे घर असेल आणि कायम तिथेच तुम्हाला राहावे लागेल. आमची इच्छा असणाऱ्यांचीच तिथून सुटका होऊ शकेल. निःसंशय तुमचा पालनकर्ता बुद्धिमान, सर्वज्ञ आहे."

[१२९] आणि अशाप्रकारे दुराचाऱ्यांना त्यांच्या कुकर्मांची सजा म्हणून आम्ही इतर दुराचाऱ्यांच्या सान्निध्यात ठेवू. [१३०] "हे जिन्न व मानवसमाज! तुम्हाला माझे साक्षात्कार ऐकवण्यासाठी आणि अंतिम दिवस येण्याचा (धोक्याचा) इशारा देण्यासाठी तुमच्यातले प्रेषित आले नव्हते का?" यावर ते म्हणतील "आम्ही आमच्याविरुद्ध साक्षीदार आहोत." या जगातील जीवनाकडून फसवणूक झाल्याने त्यांनी सत्य नाकारले होते, अशी साक्ष ते स्वतःविरुद्ध देतील. [१३१] समाजातील लोकांना जोपर्यंत त्यांच्या दुष्कृत्यांची जाणीव होत नाही, तोपर्यंत तुमचा पालनकर्ता तो समाज नष्ट करणार नाही. [१३२] तुमचा पालनकर्ता त्यांच्या कुठल्याही कर्माविषयी अनभिज्ञ नाही. तो प्रत्येकाला त्याच्या कर्मानुसार दर्जा देतो.

[१३३] तुमचा पालनकर्ता स्वयंपूर्ण, कृपाळू आहे. त्याच्या मनात आले तर, इतर समाजाच्या वंशजांमधून त्याने जसे तुम्हाला उभे केले तसे तुम्हाला हटवून त्या जागी त्याच्या इच्छेला येईल त्याला आणू शकतो. [१३४] तुम्हाला ज्याचे वचन दिले आहे तो निवाड्याचा दिवस नक्कीच समोर येणार आहे आणि तुम्ही तो थोपवू शकत नाही. [१३५] त्यांना सांगा,

लोकहो! तुम्ही तुमच्या पद्धतीने वागत रहा, मी माझ्या पद्धतीने वागत राहतो. कुणाचे मृत्युपश्चात जीवन उत्कृष्ट असेल ते तुम्हाला लवकरच कळेल. पापी लोक यशस्वी होणार नाहीत यात काही शंका नाही. १३६ ईश्वराने निर्माण केलेल्यातला काही भाग जसे की पिके आणि पशुधन– ते ईश्वरासाठी बाजूला काढून ठेवतात. "हा भाग ईश्वरासाठी आणि हा आमच्या देवीदेवतांसाठी" असा दावा ते करतात. त्यांच्या तथाकथित देवीदेवतांचा भाग ईश्वरापर्यंत पोहोचत नाही, पण ईश्वराचा भाग त्यांच्या देवीदेवतांपर्यंत पोहोचू शकतो? किती दुर्दैवी मत आहे त्यांचे!

१३७ आणि अशाच प्रकारे अनेकेश्वरवादी लोकांच्या दृष्टीत, त्यांच्या ठरवलेल्या उपास्यांनी आपल्याच अपत्यांची हत्या करण्याला, योग्य कृत्य असे भासवले आहे, यामागे त्यांचा विनाश करण्याचा आणि धर्माच्या बाबतीत त्यांच्या मनात गोंधळ निर्माण करण्याचा हेतू होता. ईश्वराच्या मनात असते, तर त्यांनी असे केले नसते. तेव्हा त्यांना त्यांच्या बनावट शोधांमध्ये सोडून द्या! १३८ ते असेही म्हणतात, या वनस्पती आणि हे प्राणी निषिद्ध आहेत. आमच्या परवानगीशिवाय त्यांचे कुणीही सेवन करू नये, असा दावा करतात. काही प्राणी असे आहेत ज्यांना ते श्रमांमधून सूट देतात आणि काही प्राण्यावर ईश्वराचे नाव घेत नाहीत. यासाठी ते ईश्वराचे अपराधी आहेत. त्यांनी रचलेल्या या बनावट गोष्टींची ईश्वर लवकरच परतफेड करेल.

१३९ ते म्हणतात अमुक एका प्राण्याच्या गर्भात असणारा जीव निरपवादपणे फक्त आमच्या पुरुषांसाठी आहे आणि आमच्या स्त्रियांसाठी तो निषिद्ध आहे. पण तो मृतावस्थेत जन्मला तर त्यांना त्यातला हिस्सा मिळू शकतो. या खोट्या गोष्टी बोलल्याबद्दल ईश्वर त्यांना लवकरच सजा देईल. तो बुद्धिमान आणि सर्वज्ञ आहे. १४० अज्ञानाने आणि मूर्खपणाने

पोटच्या मुलांची हत्या करणारे आणि ईश्वराने त्यांच्या उदरनिर्वाहासाठी ज्यांची तरतूद केली आहे त्या प्राण्यांना निषिद्ध मानणारे खरोखर पराभूत आहेत. हा त्यांनी ईश्वराविरुद्ध रचलेला बनाव आहे. ते सन्मार्गापासून भरकटले आहेत आणि ईश्वराने अचूक मार्गदर्शनासाठी त्यांची निवड केलेली नाही. [१४१] मांडवाची गरज असणाऱ्या आणि नसणाऱ्या बागा, खजूर व पाम हे वृक्ष आणि वेगवेगळ्या चवीची अन्नधान्ये हे सगळे पिकवणारा ईश्वरच आहे. एकाच वेळेस एकसारख्या आणि वेगवेगळ्या दिसणाऱ्या जैतून आणि डाळिंबाची निर्मिती करणाराही तोच आहे. या वनस्पतींना फळे लागली की त्यांचा आस्वाद घ्या. त्यांच्या कापणीच्या हंगामात योग्य हिस्सा गरजूंना द्या. काही वाया घालवू नका. वाया घालवणारे लोक ईश्वराला आवडत नाहीत.

[१४२] पशुधनापैकी काही ओझे वाहण्यासाठी आहेत तर काही खाद्यान्न आहेत. ईश्वराने तुमच्यासाठी ज्याची तरतूद केली आहे ते खा. सैतानाचे अनुकरण करू नका, कारण तो तुमचा उघड शत्रू आहे. [१४३] पाळीव प्राण्यांच्या चार जोड्या; दोन शेळ्यांच्या आणि दोन मेंढ्यांच्या. त्यांना विचारा, "यापैकी कुणाला ईश्वराने निषिद्ध ठरवले आहे? दोन नरांना, दोन माद्यांना की माद्यांच्या गर्भात असणाऱ्या जीवांना? सत्यप्रिय असाल तर आपल्या ज्ञानाचा आधार देऊन याचे उत्तर या."

[१४४] यासोबत उंटांच्या दोन जोड्या आणि बैलांच्याही दोन जोड्या: त्यांना विचारा, "यापैकी कुणाला ईश्वराने निषिद्ध ठरवले आहे? दोन नरांना, दोन माद्यांना की माद्यांच्या गर्भातील जीवांना? ईश्वराने हा आदेश दिला तेव्हा तुम्ही उपस्थित होता का?" ज्ञान नसतानाही ईश्वराविरुद्ध बनावट गोष्टी रचणारा आणि अज्ञानी असूनही लोकांना सन्मार्गापासून दूर नेणारा, यांच्यापेक्षा अधिक अन्यायी तो कोण? निःसंशय, ईश्वर अपराध्यांना

मार्गदर्शन करत नाही. [१४५] हे प्रेषिता! लोकांना सांगा, माझ्यासमोर प्रकट झालेल्या ज्ञानानुसार मृत जनावरे, वाहते रक्त आणि डुकराचे मांस याव्यतिरिक्त काहीही खायला मनाई असल्याचे मला आढळले नाही. कारण या सगळ्या गोष्टी अस्वच्छ आहेत किंवा ज्यांच्यावर ईश्वराशिवाय इतर कुणाचे तरी नाव घेतले आहे, त्यांचे मांस खायलाही मनाई आहे. ते अपवित्र आहे. पण एखाद्याने आज्ञाभंग करण्याच्या किंवा मर्यादा सोडण्याच्या हेतूने नाही, तर (जीवघेण्या) भुकेने व्याकुळ झाल्याने त्याचे सेवन केले तर तुमचा पालनकर्ता निःसंशय अतिशय क्षमाशील, दयाशील आहे. [१४६] आम्ही ज्यूंसाठी नखदार पंजे असणारे प्राणी आणि शेळ्यांची व बैलांची पाठ, आतडे आणि हाडे याव्यतिरिक्त इतरत्र असलेली चरबी निषिद्ध ठरवली होती. त्यांनी केलेल्या अवज्ञेमुळे आम्ही लादलेली ही शिक्षा होती आणि आम्ही आमच्या शब्दाला ठामपणे खरे ठरलो.

[१४७] तेव्हा ते तुमच्यावर खोटारडेपणाचा आरोप करत असतील तर त्यांना सांगा, "तुमच्या पालनकर्त्याची कृपा अथांग आहे, पण पापी लोक त्याची शिक्षा टाळू शकत नाहीत." [१४८] इतरांना ईश्वराच्या बरोबरीचे स्थान देणारे नक्कीच म्हणतील, "ईश्वराची मर्जी असती तर आम्ही आणि आमच्या पूर्वजांनी ईश्वराशिवाय कुणाची उपासना केलीच नसती किंवा आमच्या हातून बेकायदेशीर कृत्य घडलेच नसते." त्यांच्याप्रमाणे त्यांच्या आधी होऊन गेलेले लोक आमच्या शिक्षेची चव कळेपर्यंत असाच खोटा युक्तिवाद करत असत. त्यांना विचारा, तुम्हाला काही ज्ञान आहे का? असेल तर ते आमच्यासमोर सादर करा. तुम्ही फक्त अनुमानानुसार चालत आहात, फक्त अंदाज बांधत आहात.

[१४९] त्यांना सांगा, फक्त ईश्वराकडेच निर्णायक पुरावा आहे. त्याच्या मनात असते तर तो तुमच्यापैकी प्रत्येकाला योग्य मार्गदर्शन देऊ शकला

असता. [१५०] त्यांना सांगा, चला, ईश्वराने या गोष्टी निषिद्ध ठरवल्याची साक्ष देणारे तुमचे साक्षीदार पुढे आणा. त्यांनी बनावट साक्ष दिली तरी त्यांची साक्ष मानू नका. आमचे संकेत नाकारणाऱ्यांचे, मृत्युपश्चात जीवनावर विश्वास न ठेवणाऱ्यांचे आणि इतरांना ईश्वराच्या बरोबरीचा दर्जा देणाऱ्यांचे सांगणे मान्य करू नका. [१५१] त्यांना सांगा, चला, ईश्वराने तुमच्यासाठी खरोखर काय निषिद्ध ठरवले आहे, ते मी तुम्हाला सांगतो: अन्य कुणालाही ईश्वराचे स्थान देऊ नका, तुमच्या आई-वडिलांशी चांगले वागा, दारिद्र्याच्या भीतीपायी पोटच्या अपत्यांचा जीव घेऊ नका. आम्ही तुमच्या तसेच त्यांच्याही उदरनिर्वाहाची तरतूद करू. उघड उघड किंवा गुप्तपणे असभ्य कृत्य करण्यापासून दूर रहा आणि न्याय्य नसेल तर ईश्वराने दिलेल्या पवित्र जीवनाचा अंत करू नका. तुम्हाला समज यावी म्हणून त्याने तुम्हाला ही आज्ञा दिली आहे.

[१५२] अनाथ मुले सज्ञान होईपर्यंत त्यांच्या संपत्तीपासून दूर रहा, हेतू उचित असेल तरच त्याचा विनियोग करा. न्यायानुसार योग्य मोजमाप द्या. आम्ही कुणावरही सहनशक्तीपेक्षा जास्त भार टाकत नाही. जवळच्या नातलगांशी संबंधित असले तरी बोलताना न्यायाचे पालन करा आणि ईश्वराला दिलेले शब्द पाळा. ही तुम्हाला दिलेली आज्ञा आहे, तेव्हा ती लक्षपूर्वक ऐका!

[१५३] (ईश्वराने आदेश दिला आहे) हा माझा सरळ मार्ग आहे, त्यावरूनच चाला. इतर मार्गांवरून चालू नका. ते तुम्हाला त्याच्या मार्गापासून दूर घेऊन जातील. तुम्हाला (वाईट मार्गापासून) स्वतःचे रक्षण करता यावे यासाठी त्याने तुम्हाला हा आदेश दिला आहे. [१५४] नंतर सदाचारी असणाऱ्यांवर परिपूर्ण कृपा करण्यासाठी आम्ही मोझेसला पवित्र ग्रंथ दिला आणि मार्गदर्शन म्हणून प्रत्येक गोष्ट स्वच्छपणे स्पष्ट केली.

यावरून आपल्याला आपल्या पालनकर्त्याला भेटायचे आहे याची त्यांना खात्री पटावी.

१५५ आमच्या कृपेचा लाभ व्हावा यासाठी आम्ही हा ग्रंथ प्रकट केला आहे, त्याचे पालन करा आणि तुमच्या पालनकर्त्याचे भय बाळगा म्हणजे तुम्हाला त्याच्या दयेचा लाभ होईल. १५६ "हा ग्रंथ आमच्या आधी फक्त दोन समुदायांकडे पाठवला होता, आम्ही त्यातील शिकवणींपासून खरोखर अनभिज्ञ होतो," असे तुम्ही म्हणू नका. १५७ असेही म्हणू नका, "हा ग्रंथ आमच्याकडे पाठवला असता तर त्यातील मार्गदर्शनाचे पालन आम्ही नक्कीच त्यांच्यापेक्षा उत्तम रीतीने केले असते." आता तुम्हाला तुमच्या पालनकर्त्याकडून सुस्पष्ट पुरावा, मार्गदर्शन आणि दया लाभली आहे. तर मग आता आमचे संकेत नाकारून त्याकडे पाठ फिरवणाऱ्यापेक्षा जास्त अन्यायी कोण असेल? आमच्या संकेतांकडे पाठ फिरवण्याचा मोबदला म्हणून आम्ही त्यांना यातनामय शिक्षा देऊ. १५८ तुमचा पालनकर्ता, त्याचा दूत किंवा त्याचे काही संकेत त्यांच्यासमोर प्रकट व्हावे, यांच्या प्रतीक्षेत ते आहेत का? पूर्वी ज्यांनी आमच्या संदेशांवर विश्वास ठेवला नाही किंवा त्यावर श्रद्धा ठेवून एकही सत्कर्म केले नाही. त्यांना ज्या दिवशी आमचे काही संकेत येतील तेव्हा त्याचा फायदा होणार नाही. त्यांना सांगा, "वाट पहात रहा, आम्हीही वाट पहात आहोत." १५९ ज्यांनी आपला धर्म अनेक पंथात विभागला त्यांच्याशी तुमचा काहीही संबंध नाही. तो विषय ईश्वराकडे सोपवला आहे. ते कसे वागत होते, हे तो त्यांना सांगेल.

१६० सत्कर्म करणाऱ्यांना दहापट मोबदला मिळेल, पण कुकर्म करणाऱ्यांना फक्त तितक्याच तोलामोलाचा मोबदला मिळेल आणि त्यांच्यावर अन्याय केला जाणार नाही. १६१ त्यांना सांगा, "ईश्वराने

मला सन्मार्गावर आणले आहे, सचोटीच्या, धर्माच्या मार्गावर प्रामाणिक असलेल्या अब्राहाम याच्या धर्माच्या मार्गावर आणले आहे. जो अनेकेश्वरवाद्यांपैकी नव्हता.''

१६२ त्यांना सांगा, ''माझी प्रार्थना (नमाज़), माझे समर्पण, माझे जीवन, माझा मृत्यू सगळे काही ईश्वरासाठीच आहे, जो जगाचा पालनकर्ता आहे. १६३ कुणीही त्याच्या बरोबरीचे नाही. मला तसा आदेश मिळाला आहे आणि मी त्याला समर्पित होणाऱ्यांचा अग्रणी आहे.'' १६४ त्यांना विचारा, ''ईश्वर सगळ्या गोष्टींचा पालनकर्ता असताना मी त्याच्याशिवाय इतर पालनकर्त्याला का शोधू?'' प्रत्येकाला त्याच्या कर्माचा परिणाम भोगावाच लागेल आणि ओझे वाहणारा कुणी इतरांचे ओझे वाहू शकणार नाही. यानंतर तुम्हाला तुमच्या पालनकर्त्याकडे परतावे लागेल आणि तो तुम्हाला तुमच्यातल्या विवादांचा निवाडा करेल. १६५ तुम्हाला या पृथ्वीतलावर (इतरांचे) वारसदार बनवणारा (वारसा पद्धतीने मानवी वंशाला पुढे चालवणारा) आणि तुमच्यापैकी काहींना श्रेष्ठ दर्जा देऊन उंचावणारा ईश्वर आहे. त्याने तुम्हाला देऊ केलेल्या गोष्टींवरून त्याला तुमची परीक्षा घ्यायची होती. तुमचा पालनकर्ता शिक्षा देण्यात तत्पर आहे. तरीही तो क्षमाशील आणि दयाशील आहे.

प्रकरण ७ : उंच ठिकाण
(अल्-आराफ)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अलीफ लाम मीम सॉद. २ हा ग्रंथ तुमच्यासमोर प्रकट केलेला आहे त्याविषयी तुमच्या मनात शंका असू नये म्हणजे त्याद्वारे तुम्ही

लोकांना सावधानतेचा इशारा द्याल, श्रद्धावंतांना (ईश्वराचे) स्मरण करून द्याल. ३ तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्याकडे आलेल्या ग्रंथाचे अनुसरण करा. त्याच्याशिवाय अन्य कुणालाही रक्षणकर्ता मानून त्याचे अनुसरण करू नका. पण तुम्ही क्वचित त्याकडे काळजीपूर्वक लक्ष देता. ४ आम्ही कित्येक नगरे बेचिराख केली आहेत. मध्यरात्री किंवा भरदुपारी ते आराम करत असताना त्यांच्यावर आमची शिक्षा कोसळली. ५ आमची शिक्षा त्यांच्यावर कोसळली तेव्हा त्यांचा एकच आक्रोश होता, आम्ही खरोखर अपराधी होतो. ६ ज्यांना आम्ही आमचा संदेश पाठवला आणि ज्यांच्यामार्फत त्या संदेशाची पाठवणी केली (म्हणजे प्रेषित), त्यांना आम्ही जाब विचारू. ७ पूर्ण माहितीनिशी ते कसे वागले हे आम्ही त्यांना सांगू, कारण आम्ही कधीच त्यांच्यापासून लांब गेलो नव्हतो. ८ त्या दिवशी फक्त सत्य वजनदार असेल. ज्यांचे पारडे जड आहे, ते यशस्वी होतील. ९ ज्यांची सत्कृत्ये कमी आहेत, ते स्वतःला पराभूत करणाऱ्यांपैकी असतील. कारण त्यांनी चुकीच्या पद्धतीने आमचा संदेश नाकारला होता.

१० आम्ही तुम्हाला पृथ्वीवर वसवले आणि तुमच्या उदरनिर्वाहाची साधने पुरवली, तरीही तुम्ही क्वचित कृतज्ञ असता. ११ आम्ही तुम्हाला निर्माण केले, नंतर तुम्हाला आकार दिला आणि नंतर ईशदूतांना सांगितले, "आदमसमोर नतमस्तक व्हा." इब्लीस (याची निर्मिती अग्नीपासून झाली पण कर्माने सैतान ठरला) सोडून बाकी सगळे आदमसमोर नतमस्तक झाले. तो नतमस्तक होणाऱ्यांपैकी नव्हता. १२ ईश्वराने त्याला विचारले, "माझा आदेश असतानाही त्याच्यासमोर नतमस्तक होण्यापासून तुला कुणी रोखले?" त्याने उत्तर दिले, "मी त्याच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. मला तू अग्नीपासून निर्माण केलेस, तर त्याला मातीपासून." १३ ईश्वराने हुकूम

दिला, "इथून चालता हो! तुझ्यासारख्या उद्धटाची ही जागा नाही. चालता हो! तू निंद्य आहेस!" १४ तो सैतान म्हणाला, "पुनर्निर्माणाच्या दिवसापर्यंत मला सवड दे." १५ ईश्वराने उत्तर दिले, "दिली तुला सवड." १६ सैतान म्हणाला, "तू मला चुकीचे ठरवले आहेस तर मीही तू दाखवलेल्या सन्मार्गावर त्यांच्यासाठी दबा धरून बसेन. १७ नंतर मी नक्कीच त्यांना वरून, खालून, डावीकडून, उजवीकडून असे चारही बाजूंनी घेरून टाकीन आणि मग तुला कळेल, त्यांच्यापैकी बहुतेकजण कृतघ्न आहेत." १८ ईश्वराने आज्ञा दिली, "इथून चालता हो! तुला मी धिक्कारले आहे, नाकारले आहे. तुझे अनुसरण करणाऱ्या सगळ्यांना मी नरकात लोटून देईन."

१९ ईश्वराने आदमला सांगितले, "तू आणि तुझी पत्नी या उद्यानात वास्तव्य करा. तुमच्या मर्जीला येईल ते खा, प्या. पण या झाडाच्या आसपास फिरकू नका. तसे केल्यास तुम्ही दुराचारी ठराल." २० पण सैतानाने त्यांना मोहात पाडले. त्यांच्यापासून लपून राहिलेल्या नग्नतेची त्यांना जाणीव करून दिली. त्याने सांगितले, "तुमच्या पालनकर्त्याने तुम्हाला या झाडाजवळ जायला मनाई केली, कारण तुम्ही ईशदूत किंवा अमर होऊ नये असे त्याला वाटते." २१ आणि त्याने शपथपूर्वक सांगितले, "निःसंशय! मी तुमचा हितचिंतक आहे."

२२ अशा प्रकारे सैतानाने धूर्तपणे त्यांना चुकीचे पाऊल उचलण्यास प्रवृत्त केले. त्या झाडाची फळे चाखल्यावर त्यांना त्यांच्या नग्नतेची जाणीव झाली आणि ते बागेतील पाने त्यांच्या शरीराभोवती गुंडाळू लागले. तेव्हा त्यांच्या पालनकर्त्याने त्यांना विचारले, "मी तुम्हाला त्या झाडाजवळ जायला मनाई केली नव्हती का? निःसंशय! सैतान तुमचा उघड शत्रू असल्याचे सांगितले नव्हते का?" २३ त्यांनी (आदम व हव्वा यांनी)

उत्तर दिले, "हे पालनकर्त्या! आम्ही आमच्याशीच प्रतारणा केली आहे. तू क्षमा करून आमच्यावर दया दाखवली नाहीस, तर आम्ही पराभूत झालेल्यांपैकी असू." २४ ईश्वराने (आदम आणि सैतानला) सांगितले, "एकमेकांचे शत्रू म्हणून तुम्ही इथून खाली जा. काही काळ पृथ्वीवर तुमचे वास्तव्य असेल आणि तुमच्या उपजीविकेची तरतूद असेल. २५ तिथे तुम्ही जीवन व्यतीत कराल, तिथे तुम्हाला मृत्यू येईल आणि त्यानंतर पुन्हा एकदा तुम्हाला उभे केले जाईल."

२६ हे आदमच्या मुलांनो! आम्ही तुमची नग्नता झाकण्यासाठी आणि डोळ्यांना सुखवण्यासाठी तुम्हाला वस्त्रे देऊ केली. पण सदाचार हे उत्कृष्ट वस्त्र आहे! हा वृत्तांत ईश्वरी संकेतांपैकी एक आहे, तेव्हा त्यापासून लोकांनी धडा घ्यावा. २७ आदमच्या मुलांनो! सैतानाने तुमच्या आई-वडिलांना स्वर्गातून बाहेर काढले. तसे त्याला तुम्हाला मोहात पाडायची संधी देऊ नका. त्याने त्यांना त्यांच्या नग्नतेविषयी सजग करण्यासाठी ते वस्त्रहीन असल्याची जाणीव करून दिली. सैतान आणि त्याचे साथीदार जिथून तुमच्यावर नजर ठेवतात, तिथून तुम्ही त्यांना पाहू शकत नाही. सैतानांना आम्ही श्रद्धा न ठेवणाऱ्यांचे मित्र बनवले आहे.

२८ त्यांच्या हातून असभ्य वर्तन घडते तेव्हा ते म्हणतात, "आमचे पूर्वज असेच वागत. ईश्वराने आम्हाला तसा आदेश दिला आहे." त्यांना सांगा, "ईश्वर तुम्हाला असभ्य वर्तनाचा आदेश देत नाही. तुम्हाला माहीत नसलेल्या गोष्टींचा संबंध ईश्वराशी जोडाल का?" २९ त्यांना सांगा, "माझ्या पालनकर्त्याने तुम्हाला न्यायाने वागण्याचा आदेश दिला आहे. प्रत्येक वेळी आणि प्रार्थनेच्या प्रत्येक ठिकाणी त्याच्याकडे वळा. त्याच्या धर्माशी प्रामाणिक राहून त्याचा धावा करा. जसे त्याने तुम्हाला निर्माण केले तसे तुम्हाला त्याच्याकडे परत आणले जाईल." ३० त्याने काहींना

योग्य मार्गदर्शन दिले, तर काहींनी गैर (चुकीचे) मार्गदर्शन मिळवले. त्यांनी आपला संरक्षक म्हणून ईश्वराऐवजी सैतानाची निवड केली. कारण आपल्याला योग्य मार्गदर्शन मिळाले आहे असे त्यांना वाटले.

[३१] आदमच्या मुलांनो! ईश्वराची उपासना करताना योग्य पोषाख परिधान करा. खा, प्या, पण कशाची नासाडी करू नका. नासाडी करणारे लोक ईश्वराला आवडत नाहीत. [३२] त्यांना विचारा, "ईश्वराने आपल्या सेवकांसाठी तरतूद केलेल्या शोभेच्या वस्तुंना तसेच चांगल्या व स्वच्छ खाद्यपदार्थांना निषिद्ध ठरवणारे कोण आहे?" त्यांना सांगा, "श्रद्धावंतांसाठी या गोष्टी या जीवनात कायदेशीर आहेतच. पण पुनर्निर्माणच्या दिवशी त्या फक्त त्यांच्यासाठीच असतील." अशा प्रकारे ज्ञानी लोकांसाठी आम्ही आमचे संकेत स्पष्ट केले आहेत. [३३] त्यांना सांगा, "माझ्या पालनकर्त्याने छुपे आणि उघड असे दोन्हीही प्रकारचे अश्लील कृत्य, पाप व जुलमी छळ यांना मनाई केली आहे. त्याच्या संमतीविना, कोणत्याही पुराव्याशिवाय काहींना त्याच्या समतुल्य ठरवता आणि ज्ञान नसताना त्याच्याविषयीचे बोलता, यालाही त्याने मनाई केली आहे."

[३४] आम्ही प्रत्येकाचे आयुर्मान ठरवून दिले आहे. जेव्हा त्यांचे आयुर्मान पूर्ण होते, तेव्हा ते ना त्यात क्षणभराचा विलंब करू शकतात, ना क्षणभराची घाई. [३५] आदमच्या वंशजांनो! आमचे साक्षात्कार सांगण्यासाठी तुमच्यातील प्रेषित तुमच्याकडे आले तर त्यातून बोध घेऊन जो आपल्या वागणुकीत सुधारणा करेल त्याला ना कसला शोक उरेल ना कसले भय. [३६] पण जे आमचे साक्षात्कार अमान्य करून त्याकडे पाठ फिरवतील त्यांना नरकवासी व्हावे लागेल. जिथे त्यांना कायम (नरकाग्नीत) रहावे लागेल. [३७] ईश्वराविरुद्ध बनावट गोष्टी रचणाऱ्यांपेक्षा किंवा त्याचे साक्षात्कार नाकारणाऱ्यांपेक्षा मोठा अपराधी कोण? अशा लोकांसाठी नेमून दिलेले

भोग त्यांना भोगावे लागतील. त्यांचे प्राण घेण्यासाठी जेव्हा आमचे दूत त्यांच्याजवळ जाऊन त्यांना विचारतील, "तुम्ही ईश्वराशिवाय ज्यांचा धावा करत होता ते कुठे आहेत?" ते म्हणतील, "ते आमच्यापासून हरवले आहेत," आणि ते अश्रद्धावंत होते, अशी स्वतःविरुद्ध साक्ष ते देतील.

३८ ईश्वर त्यांना सांगेल, "नरकाग्नीत प्रवेश करा आणि तुमच्या आधी गेलेल्या जिन्न व मानव यांच्या ताफ्यात सामील व्हा." नरकाग्नीत प्रवेश करणारा प्रत्येक समुदाय आपल्याबरोबर असलेल्या समुदायांना तळतळाट देईल. तिथे सगळे एकत्र जमल्यावर, शेवटी जाणारा समुदाय प्रथम जाणाऱ्या समुदायाविषयी (म्हणजे आपल्या पूर्वजांविषयी) म्हणेल, "हे पालनकर्त्या! इतरांनी आम्हाला मार्गभ्रष्ट केले ते हे होते. नरकाग्नीत त्यांना दुप्पट शिक्षा द्या." ईश्वर त्यांना सांगेल, "तुम्हाला प्रत्येकाला दुप्पट शिक्षा मिळेल. तुम्हाला याची जाणीव नसली तरी." ३९ त्यानंतर तिथे आधी जाणारे, त्यांच्यानंतर येणाऱ्यांना म्हणतील, "तुम्ही आमच्यापेक्षा चांगले नाही आहात, स्वतः कमावलेली शिक्षा भोगा."

४० आमचे संदेश नाकारणाऱ्यांसाठी आणि उद्धटपणे त्यांचा अवमान करणाऱ्यांसाठी स्वर्गाचे दरवाजे उघडले जाणार नाहीत. त्यांचा स्वर्गप्रवेश हे सुईच्या छिद्रातून उंट जाण्याइतके अशक्य आहे. अपराध्यांना आम्ही असा मोबदला देतो. ४१ त्यांच्यासाठी नरकाचा बिछाना आणि नरकाग्नीचे पांघरूण असेल; पाप्यांना आम्ही असाच मोबदला देऊ. ४२ पण ईश्वरावर विश्वास ठेवून सत्कर्मे करणारे स्वर्गाचे वारसदार असतील, ते कायम तिथे राहतील. आम्ही कुणावरही त्याच्या सहनशक्तीपेक्षा जास्त ओझे लादत नाही. ४३ त्यांच्या अंतःकरणात काही अशुद्धी असेल तर ती आम्ही दूर करू. तिथे त्यांच्या पायाशी वाहत्या नद्या असतील. ते म्हणतील,

"सगळी स्तुती ईश्वरासाठी आहे, ज्याच्या मार्गदर्शनामुळेच आम्ही इथे आलो. ईश्वराने आम्हाला मार्गदर्शन केले नसते तर आम्हाला ही वाट कधीच मिळाली नसती. आमच्या पालनकर्त्याच्या प्रेषितांनी आमच्याकडे सत्य आणले आहे." एक आवाज त्यांच्या कानी पडेल, तुम्ही कष्ट घेतल्यामुळे या बगीच्याचे वारसदार बनला आहात.

४४ स्वर्गीय बगीच्यात राहणारे लोक नरकाग्नीत राहणाऱ्यांना विचारतील, "आमच्या पालनकर्त्याने जे वचन दिले होते ते सत्य असल्याचे आम्हाला आढळले आहे. तुमच्या पालनकर्त्याने तुम्हाला दिलेले वचन सत्य असल्याचे तुम्हालाही आढळले का?" ते म्हणतील, "हो, आम्हाला तसे आढळले आहे." नंतर त्यांच्यापैकी रडवेला झालेला एकजण ओरडेल, "अपराध्यांना ईश्वराचा शाप लागला आहे, ४५ ज्यांनी लोकांना ईश्वराच्या मार्गावरून दूर नेले व तो वाममार्ग असल्याचे भासवले आणि मृत्युपश्चात जीवनावर अविश्वास दाखवला."

४६ एका सीमाभिंतीमुळे हे दोन गट विभागले जातील. या दोन्ही गटांत विशिष्ट खुणांनी ओळखणारे लोक या उंच सीमाभिंतीवर असतील. स्वर्गीय बगीच्यात राहणाऱ्यांना ते म्हणतील, "तुम्हाला शांती लाभो." त्यांना अद्याप तिथे प्रवेश मिळाला नसेल, पण तो मिळावा अशी त्यांची इच्छा असेल. ४७ जेव्हा ते नरकवासीयांकडे नजर वळवतील तेव्हा म्हणतील, "हे पालनकर्त्या! आम्हाला या अपराध्यांमध्ये समाविष्ट करू नकोस." ४८ उंच सीमाभिंतीवर जमलेले लोक त्या लोकांना विचारतील ज्यांना ते त्यांच्या खुणांनी ओळखून घेतील, तुमची प्रचंड संख्या आणि खोटा अभिमान यांचा काय उपयोग झाला? ४९ पहा! ज्यांना कधीही ईश्वरी कृपा लाभणार नाही असे तुम्ही ठामपणे सांगत होतात, तेच हे लोक नाही आहेत का? या स्वर्गीय बगीच्यामध्ये प्रवेश करा. इथे तुम्हाला ना कसली भीती असेल, ना कसला शोक.

५० नरकाग्नीत राहणारे लोक स्वर्गवासीयांना विनंती करतील,
"आमच्यावर थोडे पाणी ओता किंवा ईश्वराने तुम्हाला दिलेल्या
गोष्टींपैकी काहीतरी आम्हाला द्या." पण ईश्वरी कृपेचा लाभ झालेले
म्हणतील, "ज्यांनी सत्य नाकारले होते त्यांच्यासाठी ईश्वराने या सगळ्या
गोष्टींना मनाई केली आहे." ५१ आणि ज्यांनी धर्माकडे करमणुकीचे साधन
आणि पोरखेळ म्हणून पाहिले आणि ज्यांना ऐहिक जीवनाने फसवले,
निवाड्याच्या दिवशी ईश्वराला तोंड द्यायचे आहे याचा त्यांना जसा विसर
पडला आणि आमचे साक्षात्कार त्यांनी जसे नाकारले तसेच त्या दिवशी
आम्ही त्यांना विसरून जाऊ.

५२ आमच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी आम्ही निश्चितच ज्ञान,
मार्गदर्शन आणि दया यांनी परिपूर्ण असलेला ग्रंथ आणला आहे. ५३ या
ग्रंथातून ज्याचा इशारा दिला आहे, तो प्रत्यक्षात उतरण्याची ते वाट पहात
आहेत का? निवाड्याच्या दिवशी जेव्हा तो प्रत्यक्षात उतरेल त्या दिवशी,
पूर्वी त्याकडे दुर्लक्ष करणारे म्हणतील, "आमच्या पालनकर्त्याच्या
प्रेषितांनी खरोखर सत्य आणले होते. आज ईश्वराकडे आमची शिफारस
करणारा कुणी मध्यस्थ मिळेल का? किंवा आम्हाला इथून माघारी
पाठवले जाईल का, म्हणजे पूर्वीच्या पद्धतीने न वागता आम्ही वेगळे
वागू?" त्यांनी खरोखर स्वतःचे नुकसान करून घेतले आहे आणि त्यांनी
ज्या बनावट गोष्टी शोधल्या होत्या, त्या त्यांना सोडून गेलेल्या आहेत.

५४ तुमचा पालनकर्ता ईश्वर आहे, ज्याने सहा कालखंडात आकाश व
पृथ्वीची निर्मिती केली आणि नंतर भक्कमपणे सिंहासनावर बसला. त्याने
दिवसावर रात्रीचे आवरण चढवले. दिवस आणि रात्र एकापाठोपाठ वेगाने
येतात. सूर्य, चंद्र व ताऱ्यांची निर्मिती करणारा आणि ते सर्व ईश्वराच्या

आज्ञेचे आधीन आहेत आणि संपूर्ण निर्मिती त्याची आहे, सगळ्यांवर सत्ता त्याचीच आहे. विश्वाचा पालनकर्ता असलेल्या ईश्वराची महिमा अपार आहे. ५५ नम्रपणे आणि एकांतात ईश्वराचा धावा करा. अवज्ञा करणारे त्याला आवडत नाहीत. ५६ पृथ्वीची नीट व्यवस्था लावल्यानंतर तिथे अनाचार पसरवू नका. ईश्वराची भीती आणि आशा बाळगून त्याची प्रार्थना करा, त्याच्या कृपेची आशा करा. त्याची दया सत्कर्मे करणाऱ्यांच्या जवळ आहे.

५७ आपल्या दयेची शुभवार्ता घेऊन वाऱ्याची पाठवणी करणारा ईश्वरच आहे. हे वारे जेव्हा काळ्या ढगांना एकत्र करतात. तेव्हा आम्ही त्यांना मृत जमिनीवर घेऊन जातो आणि तिथे पाऊस पाडायला लावतो. त्यामुळे जमिनीतून हरत-हेची फळे मिळतात; असेच आम्ही मेलेल्यांना परत जिवंत करू. कदाचित तुम्ही यावरून बोध घ्याल. ५८ सुपीक जमिनीतून तिच्या पालनकर्त्याच्या इच्छेने मुबलक वनस्पती उगवते तर नापीक जमिनीतून तुरळक वनस्पती उगवते. अशा प्रकारे कृतज्ञ असणाऱ्यांसाठी आम्ही वेगवेगळ्या मार्गांनी आमचे संकेत स्पष्ट करतो.

५९ आम्ही नोहाला त्याच्या समाजातील लोकांकडे पाठवले. तो त्यांना म्हणाला, "समाजबांधवांनो! ईश्वराची उपासना करा. तुमच्यासाठी तो एकमेव आराध्य आहे. अन्य कुणी नाही. त्या भयंकर दिवशी तुम्हाला शिक्षा मिळेल याची मला भीती वाटते." ६० पण त्याच्या समाजातील प्रमुखांनी त्याला सांगितले, खरोखर आमच्या मते तुम्ही नक्कीच वाट चुकून हरवले आहात. ६१ नोहाने उत्तर दिले, "लोकहो! मी वाट चुकलेलो नाही. मी जगाच्या निर्मात्याकडून आलेला प्रेषित आहे. ६२ मी माझ्या पालनकर्त्याचा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचवत आहे आणि तुम्हाला प्रामाणिक सल्ला देत आहे. मला ईश्वराने अशा गोष्टी सांगितल्या आहेत

ज्या तुम्हाला माहीत नाहीत. ६३ तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यातील एका माणसामार्फत तुमच्याकडे संदेश यावा आणि त्याद्वारे त्याने तुम्हाला सावध करावे. ज्यामुळे तुम्ही ईश्वराला घाबरून रहावे आणि त्याच्या दयेची अपेक्षा करावी. हे तुम्हाला फार चमत्कारिक वाटते का?" ६४ पण त्यांनी आमचा संदेश नाकारला, तेव्हा आम्ही नोहाला आणि त्याच्याबरोबर नौकेत असणाऱ्यांना जीवदान दिले आणि आमचे संकेत नाकारणाऱ्यांना बुडवले. ते खरोखरच आंधळे लोक होते.

६५ 'आद' या समाजातील लोकांकडे आम्ही हूद या त्यांच्या भावाला पाठवले. तो त्यांना म्हणाला, "लोकहो! ईश्वराची उपासना करा. तुमच्यासाठी तो एकमेव आराध्य आहे. तरी तुम्ही त्याची भीती बाळगणार नाही का?" ६६ हे सत्य मान्य करायला नकार देणारे त्याच्या समाजातील प्रमुख म्हणाले, "आमच्या मते तू मूर्ख आहेस. खोटे बोलत आहेस." ६७ हूदने उत्तर दिले, "माझ्या समाजबांधवांनो! मी अजिबात मूर्ख नाही. मी तर या विश्वाच्या पालनकर्त्याकडून आलेला प्रेषित आहे. ६८ मी माझ्या पालनकर्त्याचा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचवत आहे. मी तुमचा सच्चा व प्रामाणिक सल्लागार आहे. ६९ तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यातील एका माणसामार्फत तुम्हाला सतर्क करण्यासाठी ईश्वरी संदेश यावा हे तुम्हाला चमत्कारिक वाटते का? त्याने तुम्हाला नोहाच्या समाजाचे वारसदार बनवले आणि तुमचे सामर्थ्य प्रचंड वाढवले, याचे स्मरण करा. ईश्वराच्या उपकारांचे स्मरण करा, म्हणजे तुमची प्रगती होईल."

७० त्यांनी हूदला विचारले, "आम्ही फक्त एकाच ईश्वराची भक्ती करावी आणि आमचे वाडवडील ज्यांची भक्ती करत त्यांना सोडून द्यावे, हे सांगायला तू आला आहेस का? सत्यप्रिय असशील तर तू आम्हाला ज्या आस्मानी प्रकोपाची धमकी देतोस तो प्रत्यक्षात आण." ७१ हूदने उत्तर

दिले, "तुमच्यावर ईश्वराचा कोप आणि धिक्कार अगोदरच कोसळला आहे. ईश्वराने प्रकट केलेला नसताना तुम्ही आणि तुमच्या वाडवडिलांनी शोधलेल्या पोकळ नावांवरून माझ्याशी वाद घालणार आहात का? तर मग वाट पहा, मीही तुमच्याबरोबर वाट पाहत आहे." ७२ नंतर आम्ही हूदला आणि त्याच्या सोबत्यांना आमच्या दयेने सुरक्षित ठेवले तर आमचे संकेत नाकारून त्यावर अविश्वास दाखवणाऱ्यांचा समूळ नायनाट केला.

७३ समूद समाजाकडे आम्ही सालेह या त्यांच्या बांधवाला पाठवले. त्याने सांगितले, "समाजबांधवांनो! ईश्वराची उपासना करा. त्याला सोडून तुमचा कुणीही आराध्य नाही. तुमच्यासाठी तुमच्या पालनकर्त्याकडून सत्याचा धडधडीत पुरावा आला आहे. ही ईश्वराची सांडणी आहे, हा तुमच्यासाठी एक संकेत आहे. ईश्वराच्या या भूमीत तिला मनमुराद चरू द्या. कसलीही इजा करू नका. तिला काही इजा कराल तर वेदनादायी शिक्षेने तुम्ही दडपले जाल. ७४ त्याने तुम्हाला 'आद' चे वारसदार बनवले आणि या भूमीत वसवले, याचे स्मरण करा. इथल्या पठारांवर तुम्ही महाल बांधले आणि डोंगर कोरून (आलिशान) घरे बांधली. ईश्वराने केलेल्या उपकारांचे स्मरण करा आणि त्याच्या भूमीत अनाचार माजू नका."

७५ पण या समाजातील उर्मट नेत्यांनी ज्यांना दुबळे समजले जाई अशा श्रद्धावंतांना विचारले, "सालेहला त्याच्या पालनकर्त्याने पाठवले आहे याची तुम्हाला खात्रीशीर माहिती आहे?" त्यांनी उत्तर दिले, "त्याच्याद्वारे पाठवलेल्या संदेशावर आमचा भक्कम विश्वास आहे." ७६ यावर त्या उर्मट नेत्यांनी सांगितले, "तुमचा ज्यावर विश्वास आहे ते आम्ही नाकारतो." ७७ नंतर त्यांनी त्या सांडणीची हत्या केली आणि निर्दयीपणे ईश्वराच्या आज्ञेचा अपमान करून सालेहला सांगितले, "हे सालेह! तू खरोखर ईश्वराचा प्रेषित असशील तर ज्याची आम्हाला धमकी देत होतास ती

शिक्षा आमच्यावर आणून दाखव.” ७८ तेव्हा त्यांच्यावर भूकंपाचे संकट कोसळले आणि सकाळी ते त्यांच्या राहत्या घरात दीनवाण्या अवस्थेत आढळले. ७९ त्यांना त्याच अवस्थेत सोडून देत सालेहने सांगितले, “समाजबांधवांनो! मी माझ्या पालनकर्त्याचा संदेश तुम्हाला पोहोचवला आणि प्रामाणिक सल्ला दिला. पण तुम्हाला प्रामाणिक सल्लागार आवडत नाहीत.”

८० लूतला आम्ही पाठवले. त्याने त्यांच्या समाजातील लोकांना विचारले, “जगात कुणीही केले नसेल असे तिरस्करणीय कृत्य करायला तुम्ही कसे धजावलात?” ८१ “कामवासनेच्या पूर्तीसाठी तुम्ही स्त्रियांऐवजी पुरुषांकडे गेलात! तुम्ही सगळ्या मर्यादा सोडून दिल्या.” ८२ त्याचे समाजबांधव इतकेच उत्तर देऊ शकले, “ते स्वतःला अतिशय शुद्ध समजतात. पण त्यांना या शहराबाहेर घालवा.” ८३ तेव्हा आम्ही लूतच्या पत्नीला वगळून त्याला आणि त्याच्या कुटुंबाला सुरक्षित ठेवले. त्याची पत्नी मागे राहणाऱ्यांपैकी होती. ८४ आम्ही त्यांच्यावर (विनाशकारी) पावसाचा वर्षाव केला. नंतर या अपराध्यांचा अंत कसा झाला पहा!

८५ मदियन जमातीकडे आम्ही त्यांचा बांधव शुऐब याला पाठवले. त्याने सांगितलं, “समाजबांधवांनो! एका ईश्वराची उपासना करा. तुमच्यासाठी तो एकमेव उपास्य आहे. तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्याकडे सत्याचे स्पष्ट पुरावे आलेले आहेत. तेव्हा मोजमाप पूर्णपणे द्या. त्यात काही कमी करू नका. सुव्यवस्था स्थापित केल्यानंतर या भूमीवर भ्रष्ट आचरण करू नका. खरे श्रद्धावंत असाल तर यात तुमचे स्वतःचे हित आहे. ८६ श्रद्धावंतांना धमकावण्यासाठी, ईश्वराच्या मार्गात अडथळा आणण्यासाठी, आणि तो (ईश्वरी) मार्ग वाकडा असल्याचे भासवण्यासाठी

प्रत्येक मार्गावर दबा धरून बसू नका. तुम्ही संख्येने कमी असताना त्यानेच तुमची संख्या वाढवली, याचे स्मरण करा. भ्रष्ट आचरण करणाऱ्यांची कशी दुर्दशा झाली होती, लक्षात घ्या! ८७ तुमच्यापैकी एक गट माझ्यावर प्रकट झालेल्या संदेशावर विश्वास ठेवणारा आणि दुसरा गट त्यावर अविश्वास ठेवणारा असेल तर ईश्वर आमच्यात निवाडा करेपर्यंत संयमाने रहा. तो सर्वोत्कृष्ट न्यायाधीश आहे.''

८८ त्याच्या समाजातील उद्धट नेत्यांनी त्याला सांगितले, ''शुऐब! तू आणि तुझे अनुयायी आमच्या श्रद्धेकडे परत आला नाहीत तर आम्ही तुम्हाला या शहराबाहेर घालवून देवू.'' शुऐबने विचारले, ''आम्हाला ते पसंत नसेल तरीही आम्ही तसे का करावे? ८९ ईश्वराने आम्हाला त्यापासून मुक्त केले असताना तुमच्या श्रद्धेकडे परतलो तर आम्ही त्याच्याविरुद्ध बनावट गोष्टी रचणारे ठरू. आमचा पालनकर्ता असलेल्या ईश्वराची इच्छा होईपर्यंत आम्ही तुमच्या श्रद्धेकडे परतणार नाही. आमच्या पालनकर्त्याच्या ज्ञानात सगळ्या गोष्टी सामावल्या आहेत. आम्ही ईश्वरावर भरवसा ठेवला आहे. हे पालनकर्त्या! आम्ही व आमचे समाजबांधव यांच्यातील सत्य (निवाडा) उघड कर. तू उत्कृष्ट न्यायाधीश आहेस.'' ९० सत्य नाकारण्यावर ठाम राहिलेल्या त्याच्या समाजातील उद्धट प्रमुखांनी सांगितले, ''तुम्ही शुऐबचे अनुकरण कराल तर पराभूत असाल.'' ९१ नंतर भूकंप झाला आणि सकाळी ते त्यांच्या घरात पालथ्या अवस्थेत आढळले. ९२ शुऐबला नाकारणाऱ्यांची अशी अवस्था झाली, जणूकाही ते तिथे राहातच नव्हते. शुऐबला नाकारणारे स्वतःच पराभूत झाले. ९३ त्यांच्यापासून दूर जात शुऐब म्हणाला, ''समाजबांधवांनो! मी तुम्हाला माझ्या पालनकर्त्याचा संदेश

पोहोचवला आणि प्रामाणिक सल्ला दिला. तर मग श्रद्धा ठेवायला नकार देणाऱ्या लोकांसाठी मी का शोक करावा?"

९४ जेव्हाही आम्ही एखाद्या नगरात प्रेषित पाठवला तेव्हा तिथल्या लोकांनी ईश्वरासमोर लीन व्हावे म्हणून आम्ही त्यांना प्रतिकूल परिस्थितीचा व हालअपेष्टांचा सामना करायला लावला. ९५ त्यानंतर त्यांची भरभराट होईपर्यंत त्यांची कठीण परिस्थिती आम्ही सुसह्य केली. यावर त्यांचे म्हणणे होते, "आमच्या वाडवडिलांनीही अशी प्रतिकूलता आणि श्रीमंती अनुभवली." ते बेसावध असताना अचानक आम्ही त्यांना नामोहरम केले. ९६ त्या नगरांमधील लोकांनी श्रद्धा ठेवून ईश्वराचे भय बाळगले असते, तर आकाशातून आणि पृथ्वीवरून आम्ही त्यांच्यावर कृपेची बरसात केली असती. पण त्यांनी सत्य नाकारले. त्यांनी केलेल्या गैरकृत्यांमुळे आम्ही त्यांचा सूड घेतला. ९७ या नगरांमधील लोक गाढ झोपेत असताना आमची शिक्षा चाल करून येणार नाही अशी सुरक्षितता त्यांना वाटते का? ९८ किंवा दुपारच्या वेळी कार्यमग्न असताना आमची शिक्षा कोसळणार नाही याबद्दल ते बिनघोर आहेत का? ९९ ईश्वराच्या युक्तीपासून आपण सुरक्षित आहोत असे त्यांना वाटते का? ज्यांचा विनाश अटळ आहे, ते सोडून इतर कुणाला ईश्वराच्या युक्तिपासून सुरक्षित वाटू शकत नाही.

१०० त्या लोकांना काही बोध लाभला नाही का, जे पूर्वी होऊन गेलेल्या लोकांच्या जागी जमिनीचे वारस बनले की, आम्ही इच्छिले तर त्यांच्या पापांच्या शिक्षेपोटी आम्ही त्यांना तावडीत घेऊ. पण आम्ही त्यांच्या हृदयाची कवाडे अशाप्रकारे बंद करू शकतो, ज्यामुळे त्यांना मार्गदर्शनाचे बोल ऐकू येणार नाहीत. १०१ आम्ही तुम्हाला त्या नगरांच्या कथा ऐकवल्या आहेत. त्यांचे प्रेषित त्यांच्याकडे सत्याचे स्पष्ट पुरावे

घेऊन आले. पण त्यांनी अगोदरच जे नाकारले त्यावर ते कधीच विश्वास ठेवणारे नव्हते. ईश्वर सत्य नाकारणाऱ्यांची अंतःकरणे अशा रीतीने मिटवून टाकतो. १०२ त्यांच्यापैकी बहुतेकजण दिलेल्या शब्दाला जागणारे नव्हते असे आम्हाला आढळले आहे. खरोखर त्यांच्यापैकी बहुतेकजण विद्रोही असल्याचेही आम्हाला आढळले आहे.

१०३ यानंतर आम्ही मोझेसला आमचे संदेश देऊन फारो (Pharaoh) व त्याच्या प्रमुख नेत्यांकडे पाठवले. पण त्यांनी जाणीवपूर्वक त्यांना नकार दिला. या अपराध्यांचा अंत कसा झाला, लक्षात घ्या. १०४ मोझेसने सांगितले, "फारो! मी विश्वाच्या पालनकर्त्याचा प्रेषित आहे. १०५ ईश्वराविषयी फक्त सत्य तेच सांगायला मी कर्तव्यबद्ध आहे. तुझ्या पालनकर्त्याकडून तुझ्याकडे मी स्पष्ट संकेत आणला आहे. तेव्हा इस्राएलच्या वंशजांना माझ्याबरोबर येऊ दे." १०६ फारोने त्याला आवाहन दिले, "संकेत घेऊन आला असशील आणि सत्यवचनी असशील तर तो आमच्यासमोर सादर कर." १०७ यावर मोझेसने हातातली लाठी जमिनीवर टाकली आणि अचानक ती हुबेहूब सापासारखी दिसू लागली. १०८ त्याने आपला हात पुढे करताच पाहणाऱ्यांना तो पांढरा चकचकीत दिसू लागला. १०९ फारोच्या समाजाचे प्रमुख नेते उद्‌गारले, "हा नक्कीच कुशल जादूगार आहे! ११० हा तुम्हाला तुमच्या भूमीतून हुसकावून लावू पाहत आहे." तेव्हा फारोने विचारले, "यावर तुमचा काय सल्ला आहे?" १११ प्रमुख नेत्यांनी उत्तर दिले, "त्याला आणि त्याच्या भावाला थोडा वेळ इथे थांबून घ्यावे आणि दवंडीवाल्यांना शहरात दवंडी पिटायची आज्ञा द्यावी, ११२ ते शहरातल्या प्रत्येक कुशल जादूगाराला तुमच्याकडे आणतील."

११३ आणि त्या जादूगारांनी फारोकडे येऊन विचारले, "आम्ही जिंकलो

तर बक्षीस मिळेल का?" [११४] "नक्कीच! तुम्ही माझे दरबारीही असाल!" फारोने सांगितले. [११५] "मोझेस! आधी तू आपली जादू दाखवणार का आम्ही दाखवू?" त्यांनी विचारले. [११६] मोझेसने उत्तर दिले, "तुम्हीच आधी दाखवा." जादूगारांनी आपली छडी फिरवली आणि नजरबंदी करून त्यांनी लोकांना भुरळ घातली आणि त्यांना भयचकीत केले. त्याच्यासमोर उत्कृष्ट जादू सादर केली. [११७] त्यांच्यानंतर आम्ही मोझेसला प्रेरित केले, "तुझी छडी टाक आता!" आणि ताबडतोब त्याच्या छडीने जादूगारांनी उभ्या केलेल्या आभासी वस्तू गिळून टाकल्या. [११८] अशा रीतीने सत्य प्रबळ ठरले आणि त्यांनी निर्माण केलेल्या वस्तू विरून गेल्या. [११९] फारो आणि त्याचे लोक पराभूत झाले आणि त्यांची प्रचंड मानहानी झाली. [१२०] आणि जादूगार (ईश्वरासमोर) नतमस्तक झाले. [१२१] आणि म्हणाले, "विश्वाच्या पालनकर्त्यावर आमचा विश्वास बसला आहे. [१२२] जो मोझेस आणि अहरोनचा पालनकर्ता आहे."

[१२३] फारोने विचारले, "मी परवानगी देण्याआधी तुम्ही विश्वास ठेवण्याचे धारिष्ट्य कसे दाखवता? सावधान! खरोखर नगरवासीयांना या शहरातून हुसकावून लावण्यासाठी रचलेले हे कारस्थान आहे. पण लवकरच तुम्हाला याचे परिणाम दिसतील. [१२४] तुमचे विरुद्ध बाजूचे हातपाय मी छाटून टाकीन आणि नंतर सगळ्यांना सुळावर चढवेन." [१२५] यावर त्यांनी उत्तर दिले, नक्कीच आम्ही आमच्या पालनकर्त्याकडे परत जाऊ! [१२६] आमच्या पालनकर्त्याचे संकेत आमच्याकडे आले तेव्हा त्यावर आम्ही विश्वास ठेवला, याच कारणासाठी तू आम्हाला शिक्षा देत आहेस. हे पालनकर्त्या! आमचा संयम कायम ठेव, तुला समर्पित झालेल्या अवस्थेत आम्हाला मृत्यू येऊ दे.

[१२७] फारोच्या समाजातील प्रमुखांनी त्याला विचारले, "तुम्ही मोझेस

आणि त्याच्या अनुयायांना या भूमीत अनाचार पसरवण्याची आणि तुम्हाला तुमच्या देवांपासून दूर नेण्याची अनुमती देणार आहात का?" फारोने त्यांना उत्तर दिले, "आम्ही त्यांच्या मुलांची हत्या करू आणि फक्त मुलींना जिवंत ठेवू. त्यांच्यावर आमची संपूर्ण सत्ता आहे." १२८ मोझेसने आपल्या समाजातील लोकांना सांगितले, "ईश्वराकडे मदतीची याचना करा आणि संयमाने रहा. ही पृथ्वी ईश्वराची आहे. त्याच्या सेवकांपैकी ज्यांना तो निवडतो त्यांना तो ती देतो आणि (परलोकात) भविष्यकाळ ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांसाठी असेल." १२९ त्यांनी सांगितले, "तुमच्या आगमनापूर्वीही आमचा छळ होत होता आणि अद्यापही होतो आहे." यावर त्याने सांगितले, "तुमचा पालनकर्ता शत्रूचा पूर्ण नाश करेल आणि तुम्हाला या भूमीचा वारसदार बनवेल. त्यानंतर तुम्ही कसे वर्तन करता हे तो बघेल."

१३० फारोच्या लोकांना धडा शिकवण्यासाठी आम्ही त्यांना दुष्काळाच्या आणि अन्नाच्या टंचाईचा सामना करायला लावला. १३१ नंतर जेव्हा त्यांचे चांगले झाले तेव्हा ते म्हणाले, "हे आमच्यासाठी अपेक्षित आहे." त्यांचे वाईट झाल्यावर मात्र त्याचा संबंध त्यांनी मोझेस आणि त्याच्या अनुयायांच्या अशुभपणाशी लावला. ईश्वराने त्यांच्या दुर्दैवाचे आदेश काढले होते. पण त्यांच्यापैकी बहुतेकांना याची जाणीव नव्हती. १३२ ते मोझेसला म्हणाले, "आमच्यावर भुरळ पाडण्यासाठी तुम्ही कसलीही जादू करा, आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवणार नाही."

१३३ यानंतर आमचे अनेक स्पष्ट संकेत त्यांच्या नजरेत आणून देण्यासाठी आम्ही त्यांना वादळी वारे, टोळधाड, उवा, बेडूक आणि रक्त अशी अनेक संकटे आणून दुःख दिले. पण ते उर्मटपणात बुडून गेले होते, कारण ते पापाच्या हवाली केलेले लोक होते. १३४ कोणतेही मोठे संकट कोसळल्यावर ते म्हणतील, "मोझेस! तुझ्या पालनकर्त्याने

दिलेल्या वचनाला अनुसरून त्याच्याकडे आमच्यासाठी प्रार्थना कर. तू आमच्यावरचे संकट दूर केलेस तर आम्ही नक्की तुझ्यावर विश्वास ठेवू आणि इस्राएलच्या वंशजांना तुझ्याबरोबर जाऊ देऊ.” १३५ पण त्यांच्यावरचे संकट दूर केल्यानंतर त्यांनी दिलेला शब्द पाळण्यासाठी पुरेसा वेळ देऊनही त्यांनी आपला शब्द मोडला.

१३६ त्यांच्या कुकर्माचे फळ म्हणून आम्ही त्यांना समुद्रात जलसमाधी दिली. कारण त्यांनी आमच्या संदेशांना खोटे ठरविले आणि त्यांची दखल घेतली नाही. १३७ समाजात दुबळ्या मानल्या गेलेल्यांना आम्ही या भूमीच्या पूर्व आणि पश्चिमेकडील भूप्रदेशाचे वारस बनवले, ज्या भूप्रदेशात आम्ही कृपेची बरसात केली होती. अशा प्रकारे इस्राएलच्या वंशजांनी संयम बाळगल्याने तुमच्या पालनकर्त्याने त्यांना दिलेल्या सद्वचनाची पूर्तता झाली. फारो व त्याच्या लोकांनी बांधलेले व उभे केलेले सगळे आम्ही उथ्वस्त करून टाकले.

१३८ आम्ही इस्राएलच्या वंशजांना समुद्र पार करून आणले आणि तिथे ते मूर्तीपूजेला समर्पित असलेल्या लोकांच्या संपर्कात आले. ते मोझेसला म्हणाले, “हे मोझेस! यांच्यासारखे आम्हालाही एक दैवत दे.” मोझेसने सांगितले, “तुम्ही खरोखर अज्ञानी लोक आहात. १३९ ते ज्यात मग्न आहेत त्याचा विनाश अटळ आहे आणि त्यांचे सगळे कर्म निष्फळ आहे.” १४० त्याने सांगितले, “तुम्हाला इतरांपेक्षा श्रेष्ठ दर्जा देणारा तो असताना मी ईश्वराशिवाय अन्य दैवत तुमच्यासाठी का शोधू? १४१ फारोच्या लोकांनी तुमचा भयंकर छळ केला. फक्त तुमच्या मुलींना जिवंत ठेवून मुलांची हत्या केली. त्यांच्या या छळापासून आम्ही तुमची सुटका केली. ती नक्कीच तुमच्या पालनकर्त्याकडून आलेली तुमची कसोटी होती.”

१४२ आम्ही मोझेससाठी तीस रात्री नेमून दिल्या. पुढे त्यात आणखी

दहाची भर घातली. त्याच्या पालनकर्त्याने त्याला नेमून दिलेला कालावधी चाळीस रात्रीत पूर्ण झाला. मोझेसने अहरोन या आपल्या भावाला सांगितले, माझ्या लोकांमधली माझी जागा घे, सदाचाराने वाग आणि अनाचार करणाऱ्यांचे अनुसरण करू नकोस. १४३ आम्ही ठरवून दिलेल्या वेळेत मोझेस त्याच्या पालनकर्त्याकडे आला आणि म्हणाला, "हे पालनकर्त्या! मला दर्शन दे, म्हणजे मी तुला पाहू शकेन." ईश्वराने उत्तर दिले, "तू मला पाहू शकणार नाहीस, पण या पर्वताकडे पहा. तो आपल्या जागी अविचल राहिला, तरच तू मला पाहशील." आणि जेव्हा त्याच्या पालनकर्त्याने आपले तेज पर्वतावर प्रकट केले तेव्हा मोझेस बेशुद्ध होऊन कोसळला. शुद्धीवर आल्यावर तो उद्‌गारला, "ईश्वरा! तुझा महिमा अगाध आहे. मी तुझ्याकडे वळलो आहे आणि तुझ्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यातला मी अग्रणी आहे."

१४४ ईश्वराने सांगितले, "मोझेस! माझे संदेश आणि उपदेश पोहोचवण्यासाठी सगळ्या मानवजातीतून मी तुला निवडले आहे. मी तुला जे प्रदान केले आहे, त्यावर दृढविश्वास ठेव आणि कृतज्ञ राहणाऱ्यांपैकी हो." १४५ आणि आम्ही त्याच्यासाठी शिलालेखांवर आमचे आदेश आणि सगळ्या गोष्टींचे तपशील लिहिले. आणि त्याला आदेशित केले, "यापासून विचलित होऊ नकोस आणि तुझ्या लोकांना याचे सर्वार्थाने पालन करायचा आदेश दे. लवकरच मी तुला दुष्ट लोकांचे निवासस्थान दाखवेन."

१४६ काही अधिकार नसताना जे या भूमीत उर्मटपणाने वागत आहेत, त्या सगळ्यांपासून मी माझे संकेत हिरावून घेईन. म्हणजे माझे संकेत दिले तरी ते त्यावर विश्वास ठेवणार नाहीत. सन्मार्ग दिसला तरी ते त्यावरून चालणार नाहीत. पण वाममार्ग दिसला तर आपला मार्ग म्हणून ते त्याची निवड करतील. कारण त्यांनी आमचे संकेत खोटे ठरवले आणि त्यापासून

बोध घेतला नाही. १४७ आमचे संकेत आणि मृत्युपश्चात जीवनातील आमची भेट नाकारणाऱ्यांचे कर्म निष्फळ ठरेल. त्यांना फक्त त्यांच्या कृत्यांनुसार परतफेड मिळेल.

१४८ मोझेसच्या अनुपस्थितीत त्याच्या समाजातील लोकांनी आपल्या दागदागिन्यांपासून वासराची प्रतिकृती तयार केली, ज्याच्या मुखातून हलकेच हंबरण्याचा आवाज येत असे. तो त्यांच्याशी बोलू शकत नव्हता किंवा त्यांना कसले मार्गदर्शन देत नव्हता. हे त्यांनी पाहिले नाही का? तरीही ते त्याची उपासना करू लागले. ते अपकृत्य करणारे होते. १४९ पश्चातापाने घेरून टाकल्यावर आपण खरोखर मार्गभ्रष्ट झाल्याची त्यांना जाणीव झाली. ते म्हणाले, "आमच्या पालनकर्त्याने दया दाखवून आम्हाला माफ केले नाही तर आम्ही पराभूत झालेल्यांपैकी असू." १५० आपल्या समाजात परतलेला मोझेस संतापाने व अतिशय दुःखाने म्हणाला, "माझ्या अनुपस्थितीत तुम्ही किती घृणास्पद पाप केलेत! तुमच्या पालनकर्त्याच्या आज्ञेची वाट न पाहता घाई का केलीत?" त्याने हातातील शिलालेख फेकून दिले व भावाच्या डोक्याला धरून स्वतःकडे खेचले. अहरोन त्याला म्हणाला, "हे माझ्या भावा! या लोकांनी माझा खूप छळ केला आणि मला जवळपास अर्धमेले केले. माझ्या या शत्रूंना माझी खिल्ली उडवण्याची संधी देऊ नकोस. माझी गणना या पाप्यांमध्ये करू नकोस." १५१ यावर मोझेसने ईश्वराकडे प्रार्थना केली, "हे पालनकर्त्या! मला आणि माझ्या भावाला माफ कर आणि आमच्यावर कृपा कर. तू दयावंतांमधला सगळ्यात दयाळू आहेस."

१५२ वासराची उपासना करणाऱ्यांवर त्यांच्या पालनकर्त्याचा रोष ओढवेल आणि ऐहिक जीवनात त्यांना मानहानी सोसावी लागेल. बनावट गोष्टी रचणाऱ्यांचा आम्ही असाच सूड घेतो. १५३ अपकृत्ये केल्यावर

ज्यांना पश्चाताप झाला आणि ज्यांनी ईश्वरावर श्रद्धा ठेवली, त्यांना तुमचा पालनकर्ता क्षमाशील आणि दयाशील असल्याचे दिसून येईल.

१५४ रागाचा आवेग ओसरल्यावर ज्यावर ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांसाठी मार्गदर्शनपर वचने आणि दयेचा संदेश कोरलेला होता ते शिलालेख मोझेसने गोळा केले. १५५ आणि आमच्या पूर्वनियोजित भेटीसाठी येताना मोझेसने त्याच्या समाजातील सत्तरजणांची निवड केली. तीव्र भूकंपाने त्यांना गाठले असता मोझेसने प्रार्थना केली, "हे पालनकर्त्या! तुझी इच्छा असती तर तू त्यांना आणि आम्हाला फार पूर्वी नष्ट करू शकला असतास. पण आमच्यातल्या मूर्खांनी केलेल्या कृत्यांसाठी तू आमचा नाश करणार आहेस का? ही फक्त तू घेत असलेली परीक्षा आहे. यानुसार तू तुझ्या मर्जीला येईल त्यांना वाममार्गाला लावतोस तर तुझ्या मर्जीला येईल त्यांना सन्मार्गावर आणतोस. तू आमचा संरक्षक आहेस. तेव्हा आम्हाला क्षमा कर आणि आमच्यावर दया कर. तू क्षमा करणाऱ्यांमधला उत्कृष्ट आहेस. १५६ या जीवनात आणि मृत्युपश्चात जीवनात, दोन्हीही ठिकाणी आम्हाला चांगल्या वस्तू देऊ कर. आम्ही फक्त तुलाच समर्पित झालो आहे." यावर ईश्वराने उत्तर दिले, "माझ्या शिक्षेबाबत सांगायचे तर माझ्या मर्जीला येईल त्याच्यावर मी तिचा प्रहार करतो. पण जे आपले कर्तव्य बजावतात, निर्धारित दानधर्म करतात आणि आमच्या संकेतांवर विश्वास ठेवतात, त्यांच्यावर मी भरघोस कृपा करतो. माझ्या दयेत सगळ्या गोष्टी सामावल्या आहेत.

१५७ त्याचप्रमाणे जे लोक आपल्या प्रेषितांचे अनुसरण करतात असे निरक्षर प्रेषित, ज्याचे वर्णन त्यांच्याकडे असलेल्या तोराह आणि बायबल या ग्रंथात आढळते, जो त्यांना सत्कृत्य करण्याचा आदेश देतात आणि अपकृत्य करण्यास प्रतिबंध करतो, जो त्यांच्यासाठी चांगल्या गोष्टी

वैध करतो, तर वाईट गोष्टी अवैध करतो, जो त्यांच्यावरील मनामनांचे ओझे दूर करतो आणि बेड्यांमधून मुक्त करतो, जे लोक त्याच्यावर विश्वास ठेवतात आणि त्याचा आदर करतात, त्याला मदत करतात आणि त्याच्याबरोबर पाठवलेल्या प्रकाशाच्या पायवाटेवरून चालतात, यश नक्की त्यांचाच आहे.”

१५८ त्यांना सांगा, “लोकहो! मी ईश्वराचा प्रेषित आहे. आकाश आणि पृथ्वीची सत्ता त्याच्याकडे आहे. त्याच्याशिवाय अन्य कुणीही ईश्वर नाही. तो जीवन देतो, तोच मृत्यू देतो. तेव्हा ईश्वरावर आणि त्याच्या निरक्षर प्रेषितावर विश्वास ठेवा. तो प्रेषित ईश्वरावर आणि त्याच्या संदेशावर विश्वास ठेवतो. त्याचे अनुसरण करा म्हणजे तुम्हाला अचूक मार्गदर्शन मिळेल.” १५९ अद्यापही मोझेसच्या समाजातील एक गट असा आहे जो सत्याचे मार्गदर्शन करतो आणि त्याला अनुसरून न्यायाने वागतो.

१६० आम्ही त्यांची बारा जमातीत विभागणी करून, प्रत्येक जमातीला संपूर्ण समाज बनवले. मोझेसच्या लोकांनी पाणी मागताच त्याच्यासमोर आमची इच्छा प्रकट करून आम्ही मोझेसला सांगितले, “तुझ्या काठीने या पाषाणावर प्रहार कर.” प्रहारासरशी त्या पाषाणातून पाण्याचे बारा कारंजे उसळले. प्रत्येक जमातीने आपली पाण्याची जागा नेमकी ओळखली. आम्ही त्यांच्यावर सावली धरण्यासाठी ढगांची तर मन्न व सलवा या खाद्यान्नाची व्यवस्था केली आणि त्यांना सांगितले, “तुम्हाला दिलेल्या आरोग्यदायी पदार्थांचे सेवन करा.” पण गैरवर्तन करून त्यांनी आमची नाही, तर स्वतःचीच फसवणूक केली आहे. १६१ आम्ही त्यांना सांगितले, “नगराच्या प्रवेशद्वारातून विनम्रतेने प्रवेश करा आणि या नगरात वास्तव्य करा. इथे तुमच्या मर्जीला येईल ते खा आणि ईश्वराकडे क्षमायाचना

करा. त्याची प्रार्थना करा. आम्ही तुमची पापं माफ करू आणि सत्कर्म करणाऱ्यांवर अधिक उपकार करू.” १६२ त्यांच्यापैकी अवज्ञा करणारे आमचे आदेश डावलून वेगळेच वागले. त्यांच्या अपराधांसाठी आम्ही आकाशातून शिक्षा पाठवली.

१६३ समुद्रकिनाऱ्यावरील नगराविषयी आणि तेथील नागरिकांनी ‘शब्बाथ’चा भंग केल्यावर त्यांच्यावर काय कोसळले याविषयी विचारा. शब्बाथच्या दिवशी मासळी पाण्याच्या पृष्ठभागावर यायची, पण इतर दिवशी नाही. त्यांनी अवज्ञा केल्याने आम्ही त्यांची परीक्षा घेतली. १६४ जेव्हा त्यांच्यापैकी काहींनी विचारले, “ईश्वर ज्यांचा नाश करणार आहे किंवा ज्यांना कठोर शिक्षा भोगायला लावणार आहे, त्यांना सावध राहण्याचा इशारा कशाला देता?” तेव्हा प्रेषितांनी उत्तर दिले, “तुमच्या पालनकर्त्यासमोर दोषमुक्त होण्यासाठी आणि त्यांनी कदाचित ईश्वराचे भय बाळगून रहावे यासाठी.”

१६५ त्यामुळे ज्याचे स्मरण त्यांना करून दिले होते त्या उपदेशांचा त्यांना विसर पडल्यावर त्यांच्यापैकी जे अपकृत्ये करण्यास प्रतिबंध करत होते, त्यांना आम्ही वाचवले, तर आमचा आज्ञाभंग करणाऱ्यांना कठोर शिक्षा दिली, कारण ते अपराधी होते. १६६ आणि त्यानंतरही ते प्रतिबंध केलेल्या गोष्टी पूर्ण शिरजोरीने करत राहिल्यावर आम्ही त्यांना सांगितले, माकडांसारखे तुच्छ व्हा!

१६७ यानंतर तुमच्या पालनकर्त्याने घोषणा केली, पुनर्निर्माणाच्या दिवसापर्यंत त्यांना (म्हणजे ज्यू लोकांना) तीव्र यातना सोसायला लावण्यासाठी तो इतरांना त्यांच्याविरुद्ध पाठवेल. तुमचा पालनकर्ता शिक्षा देण्याच्या बाबतीत तत्पर आहे, तरीही नक्कीच तो अतिशय क्षमाशील, अतिशय दयाशील आहे. १६८ पृथ्वीवर आम्ही त्यांचे अनेक भागात विभाजन केले. त्यांच्यापैकी काहीजण सदाचारी आहेत, तर काही दुराचारी आणि

त्यांनी सन्मार्गाकडे परतावे यासाठी आम्ही त्यांच्यावर अनुकूल आणि प्रतिकूल अशा दोन्ही परिस्थितीत त्यांची परीक्षा घेतली.

[१६९] त्यांच्यानंतर त्यांच्या अनेक पिढ्या आल्या, ज्यांना वारसाहक्काने पवित्र ग्रंथ मिळाला आणि ते ऐहिक जगातील क्षणभंगूर लाभ घेत, ईश्वर आम्हाला नक्की क्षमा करेल म्हणत राहिले. क्षणिक लाभ त्यांच्यापर्यंत पुन्हा आले तर ते पुन्हापुन्हा त्यांचा लाभ घेत राहतील. त्यांच्याकडून शपथ घेतली नव्हती का? जी ग्रंथात लिहिलेली आहे की ते ईश्वराविषयी फक्त सत्य बोलतील आणि त्यांनी ग्रंथात जे आहे त्याचा अभ्यास केला होता. ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांसाठी मृत्युनंतरचे निवासस्थान नक्कीच जास्त चांगले आहे. यापासून तुम्ही बोध घेणार नाही का? [१७०] या ग्रंथावर दृढ विश्वास ठेवून नियमितपणे प्रार्थना करणाऱ्या, सद्वर्तनी लोकांचा घसघशीत मोबदला आम्ही नाकारणार नाही. [१७१] जेव्हा आम्ही (सिनाई) पर्वत मंडपाप्रमाणे त्यांच्यावर (म्हणजे इस्त्राएलच्या संततीवर) तोलून धरला होता, आणि तो आपल्यावर कोसळेल याचे त्यांना भय वाटले होते; तेव्हा आम्ही त्यांना सांगितले, "आम्ही तुम्हाला जे (संदेश) दिले आहेत त्यावर दृढ विश्वास ठेवा आणि त्याचा आशय स्मरणात ठेवा म्हणजे तुम्ही ईश्वराविषयी सजग राहाल."

[१७२] आदमच्या संततीच्या जननसंस्थेमार्फत तुमच्या पालनकर्त्याने आदमच्या वंशजांना पुढे आणले आणि त्यांना स्वतःचे साक्षीदार बनवले आणि त्यांना विचारले, "मी तुमचा पालनकर्ता नाही का?" त्यांनी उत्तर दिले, "तुम्ही आमचे पालनकर्ता आहात, याचे आम्ही साक्षीदार आहोत." हे त्याने अशासाठी केले की पुनर्निर्माणाच्या दिवशी "आम्हाला हे माहीत नव्हते" असे त्यांनी म्हणू नये. [१७३] किंवा तुम्ही असेही म्हणू नये की, "आमच्या काळाआधी आमच्या

वाडवडिलांनी अनेकेश्वरवादावर विश्वास ठेवला आणि आम्ही फक्त त्यांच्या मागून आलेले वंशज आहोत. ज्या लोकांनी तुझ्याविरुद्ध बनावट गोष्टी रचल्या त्यांची शिक्षा म्हणून तू आमचा नाश करणार आहेस का?" १७४ आम्ही अशा प्रकारे आमचे संदेश सविस्तर स्पष्ट केले आहेत, म्हणजे कदाचित ते आमच्याकडे परत येतील.

१७५ एका माणसाला आम्ही आमचे संकेत दाखवले, पण त्याने ते दूर सारले आणि सैतानाने त्याचा कब्जा घेतला व तो मार्गभ्रष्ट झाला. या माणसाची गोष्ट तुम्ही त्यांना सांगा. १७६ आमची मर्जी असती तर या संदेशाद्वारे आम्ही त्याचा दर्जा उंचावला असता. पण त्याऐवजी तो ऐहिक जीवनाला चिकटून राहिला आणि आपल्या इच्छेनुसार वागत राहिला. तुम्ही कुत्र्याला हाकलून लावा की मोकळे सोडून द्या, तो धापा टाकतच राहतो; अशा कुत्र्यासारखा हा माणूस आहे. आमचे संकेत नाकारणारे असे आहेत. यावर चिंतन करावे यासाठी त्यांना ही गोष्ट सांगा. १७७ किती वाईट उदाहरण आहे त्या लोकांचे, ज्यांनी आमच्या संदेशांना खोटे ठरविले. त्यांनी स्वतःचे नुकसान ओढवून घेतले आहे. १७८ ईश्वर ज्याला मार्गदर्शन देतो त्यालाच अचूक मार्गदर्शन लाभले आहे तर तो ज्याला मार्गभ्रष्ट होऊ देतो त्याचे नक्कीच नुकसान झाले आहे.

१७९ अनेक जिन्न आणि अनेक माणसांना आम्ही नरकासाठी निर्माण केले आहे. त्यांना मन आहे, पण त्यामुळे त्यांना काही कळू शकत नाही. डोळे आहेत, पण त्याने काही पाहू शकत नाहीत. कान आहेत, पण त्याने ऐकू शकत नाहीत. ईश्वरी संदेशाकडे दुर्लक्ष करणाऱ्यांची अवस्था अशी आहे. हे लोक जनावरांसारखे आहेत, नव्हे तर त्यांच्याहीपेक्षा वाट चुकलेले आहेत. ते फारच बेसावध स्थितीत पडलेले आहेत. १८० ईश्वरासाठी अनेक सर्वोत्कृष्ट नावे आहेत. त्याच्या नावांनीच त्याचा

धावा करा आणि त्याच्या नावांचा विपर्यास करणाऱ्यांपासून दूर रहा. त्यांना त्यांच्या कर्माचा मोबदला मिळेल. १८१ आम्ही निर्माण केलेल्यांपैकी काहीजण योग्य मार्गदर्शन करतात आणि न्यायाने वागतात. १८२ आमचे संकेत नाकारणाऱ्यांना आम्ही हळूहळू विनाशाकडे नेऊ, त्यांच्या ते लक्षातही येणार नाही. १८३ कारण मी जरी काही काळासाठी लगाम त्यांच्याकडे दिला असला, तरी माझे डावपेच भक्कम आहेत.

१८४ आपला सोबती वेडा नाही याचा त्यांनी विचार केला नाही का? तो फक्त सावधानतेचा स्पष्ट इशारा देणारा आहे. १८५ आकाश, पृथ्वी आणि ईश्वराने निर्माण केलेल्या प्रत्येक गोष्टीच्या रचनेची त्यांनी पाहणी केली नाही का? आणि आपला अंतकाळ जवळ आल्याचे त्यांच्या लक्षात आले नाही का? त्यांचा यावर विश्वास नसेल तर मग कशावर आहे? १८६ ईश्वर ज्याला मार्गभ्रष्ट होऊ देतो त्याला कुणीही सन्मार्गावर आणू शकत नाही. तो त्यांना अहंकाराच्या धुंदीत मुक्त संचार करू देतो. १८७ हे प्रेषिता! ते तुला अंतिम दिवसाविषयी विचारतील, "तो दिवस केव्हा उजाडेल?" त्यांना सांगा, "याचे ज्ञान फक्त माझ्या पालनकर्त्याकडे आहे, योग्य वेळी तो ते उघड करेल. आकाश आणि पृथ्वीवर त्या दिवसाचा भार पडलेला तुम्हाला दिसेल, अचानक तो तुम्हाला गाठेल." तुम्हाला त्याविषयीचे समग्र ज्ञान असावे तसे ते तुम्हाला प्रश्न विचारतील. त्यांना सांगा, "याचे ज्ञान फक्त ईश्वराकडे आहे, पण बहुतेक जणांना ते कळत नाही." १८८ त्यांना सांगा, "ईश्वराची इच्छा नसेल तर स्वतःचे बरेवाईट करण्याची सत्ता माझ्याकडे नाही. मला अदृश्याचे ज्ञान असते तर मी माझे कोटकल्याण करून घेतले असते आणि नुकसान मला स्पर्शही करू शकले नसते. मी फक्त सतर्कतेचा इशारा देणारा आणि ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यांना शुभवार्ता देणारा (प्रेषित) आहे."

१८९ (ईश्वर) तो आहे ज्याने एका जीवापासून तुम्हाला निर्माण केले आणि त्याच्या सुखासाठी त्यापासून त्याचा जोडीदारही निर्माण केला. दोघांचे मिलन होताच तिला गर्भधारणा होते आणि गर्भभार लेवून ती वावरू लागते. गर्भभार जड झाल्यावर दोघेही ईश्वराची, त्यांच्या पालनकर्त्याची प्रार्थना करतात, "तू आम्हाला सुदृढ बालक देऊ केलेस तर आम्ही तुझ्या ऋणात राहू." १९० परंतु त्याने त्यांना सुदृढ बालक देऊ केल्यानंतर आपल्याला मिळालेल्या भेटीच्या श्रेयाचा वाटा ते इतरांना देऊ लागले. पण ते ज्यांना ईश्वरासम व ईश्वरतुल्य मानतात त्यापेक्षा तो खूप श्रेष्ठ आहे! १९१ ज्यांनी काही निर्माण केले नसून ते स्वतः निर्मित आहेत, त्यांना ते ईश्वरासमान दर्जा देतात का? १९२ ते ना त्यांना मदत करू शकतात, ना स्वतःला. १९३ तुम्ही त्यांना यासाठी आवाहन केलंत काय किंवा नाही काय, काही फरक पडणार नाही. तुम्ही त्यांना सन्मार्गावर यायचे आवाहन केले, तरी ते तुमचे अनुसरण करणार नाहीत. १९४ तुम्ही ईश्वराशिवाय ज्यांचा धावा करता ते तुमच्यासारखेच निर्मित आहेत. तुम्ही सांगता ते खरे असेल तर त्यांचा धावा करा आणि त्यांना तुमच्या हाकेला प्रतिसाद देऊ दे.

१९५ त्यांना चालायला पाय आहेत का? त्यांना वस्तू धरायला हात आहेत का? त्यांना पहायला डोळे आहेत का? त्यांना ऐकायला कान आहेत का? त्यांना सांगा, "ज्यांना तुम्ही ईश्वरतुल्य मानता त्यांचा धावा करा. तुम्ही सर्व मिळून माझ्याविरुद्ध कारस्थान आखा आणि मला सवडही देऊ नका. १९६ माझा रक्षक तो ईश्वर आहे, ज्याने हा ग्रंथ पाठवला. कारण तोच सदाचाराने वागणाऱ्यांचे रक्षण करतो. १९७ तुम्ही ईश्वराव्यतिरिक्त ज्यांचा धावा करता त्यांच्याकडे ना तुम्हाला मदत करायचे सामर्थ्य आहे, ना स्वतःला." १९८ तुम्ही त्यांना सन्मार्गावर बोलावले तर ते तुमची हाक

ऐकणार नाहीत. ते तुमच्याकडे पहात आहेत असे तुम्हाला वाटेल. पण
वस्तुत: ते काहीच पाहत नाहीत.
१९९ संयम बाळगा; योग्य असेल त्याचा आग्रह धरा आणि अज्ञानी
लोकांना टाळा. २०० सैतानाच्या एखाद्या गैर उत्तेजनेने तुम्हाला चिथावले,
तर ईश्वराच्या आश्रयाला जा. तो सगळे ऐकणारा, सर्वज्ञानी आहे.
२०१ सैतानाच्या वाईट सूचनेचा स्पर्श होताच, ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांना
ताबडतोब सतर्कतेचा इशारा मिळतो आणि ते सावध होतात. २०२ पण
सैतानाचे अनुयायी त्याच्याकडून निष्ठुरपणे चुकीच्या गोष्टीकडे खेचले
जातात. त्यापासून दूर राहत नाहीत.
२०३ तुम्ही ईश्वराचा एखादा संकेत त्यांच्याकडे आणला नाही तर ते तुम्हाला
विचारतात, "असा एखादा संकेत तुम्ही शोधत का नाही?" त्यांना सांगा,
"माझ्या पालनकर्त्याकडून जे प्रकट झाले आहे त्याचेच फक्त मी अनुसरण
करतो. हा ग्रंथ म्हणजे तुमच्या पालनकर्त्याकडून आलेले विवेकपूर्ण ज्ञान आहे
आणि सच्च्या श्रद्धावंतांसाठी मार्गदर्शनाचा आणि दयेचा आशीर्वाद आहे.
२०४ कुरआनचे पठण चालू असताना शांतता पाळून लक्षपूर्वक श्रवण करा,
म्हणजे त्याच्या दयेचा लाभ होईल. २०५ सकाळ-संध्याकाळ आवाज
न चढवता, नम्रपणे आणि ईश्वराचे भय बाळगून खोल अंत:करणातून
तुमच्या पालनकर्त्याचे स्मरण करा; याकडे गाफील असणाऱ्यांपैकी होऊ
नका. २०६ तुमच्या पालनकर्त्याच्या सानिध्यात राहणारे (देवदूतही) त्याची
उपासना करताना अहंकार दूर सारतात. ते त्याचे गुणगान गातात आणि
त्याच्यासमोर नतमस्तक होतात.

प्रकरण ८ : युद्धातील सामग्री (अल्-अनफाल)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ते तुम्हाला युद्धातून मिळालेल्या सामग्रीविषयी विचारतात. त्यांना
सांगा, "ही संपत्ती ईश्वर आणि त्याच्या प्रेषिताच्या मालकीची आहे."
तेव्हा ईश्वराची भीती बाळगा आणि आपसातले संबंध सुरळीत करा. सच्चे
श्रद्धावंत असाल तर ईश्वराच्या आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञेचे पालन
करा. २ ईश्वराचा उल्लेख होताच ज्यांच्या हृदयाचा आदरयुक्त भीतीने थरकाप
उडतो आणि त्याचे साक्षात्कार लक्षपूर्वक ऐकताच ज्यांची श्रद्धा बळकट होते,
ते खरे श्रद्धावंत आहेत. ते ईश्वरावर भरवसा ठेवतात. ३ ते नियमित प्रार्थना
करतात आणि आम्ही त्यांच्यासाठी केलेल्या तरतुदीतून दानधर्म करतात.
४ खरे श्रद्धावंत असे असतात, ईश्वर त्यांना उच्च दर्जा देतो, क्षमा करतो
आणि त्यांच्या उपजीविकेसाठी सन्माननीय सामग्री पुरवतो.

५ काही श्रद्धावंतांना रुचले नसेल तरीही तुम्हाला न्याय्य पद्धतीने
घरातून (युद्धभूमीकडे) काढणारा तुमचा पालनकर्ता होता. ६ आणि हे सत्य
उघड झाल्यावर त्यावरून त्यांनी तुमच्याशी वाद घातला. जणूकाही त्यांना
मृत्युकडे ढकलले जात होते आणि ते उघड्या डोळ्यांनी पहात होते.
७ ईश्वराने शब्द दिला होता की दोन पक्षांपैकी एक पक्ष तुमच्यावर हल्ला
करेल आणि तो नांगी नसलेला (निःशस्त्र पक्ष) असावा असे तुम्हाला
वाटले. पण ईश्वराला आपल्या वचनाने (आदेशाने) सत्य स्थापित
करायचे होते आणि सत्य अमान्य करणाऱ्यांना समूळ नष्ट करायचे होते.
८ यातून सत्य खरे असल्याचे आणि असत्य खोटे असल्याचे त्याला सिद्ध
करता येणार होते. पण बहुतांश पाप्यांना हे रूचले नाही.

९ तुम्ही मदतीसाठी तुमच्या पालनकर्त्याची प्रार्थना केल्यावर त्याने
उत्तर दिले, "तुमच्या मदतीसाठी मी एकापाठोपाठ एक हजार दूतांना
पाठवणार आहे." १० तुम्हाला शुभवार्ता द्यावी आणि त्यामुळे तुमच्या
मनाला शांती मिळावी एवढ्याचसाठी ईश्वराने हे केले, कारण मदत
फक्त ईश्वराकडूनच येते. ईश्वर नक्कीच सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहे.
११ (रणांगणात उतरण्यापूर्वी) तुम्हाला दिलासा देण्यासाठी त्याने तुम्हाला
झोपेची गुंगी आणली आणि सैतानाची मलीनता दूर करून तुम्हाला
शुद्ध करण्यासाठी आकाशातून पाण्याचा वर्षाव केला आणि त्याने तुमचे
मन कणखर व पाय बळकट केले. १२ तुमच्या पालनकर्त्याने आपल्या
दूतांना आज्ञा दिली, मी तुमच्याबरोबर आहे, तेव्हा श्रद्धावंतांना खंबीर
बनवा. सत्य नाकारणाऱ्यांच्या मनात मला भीती निर्माण करायची आहे.
(श्रद्धावंतांनो!) तेव्हा तुम्ही त्यांच्या मानेवर आणि बोटांच्या सांध्यांवर
आघात करा. १३ याचे कारण, त्यांनी ईश्वराची आणि त्याच्या प्रेषिताची
आज्ञा मानली नव्हती. ईश्वराची आणि त्याच्या प्रेषिताची आज्ञा न
मानणाऱ्यांना ईश्वर कठोर शिक्षा देईल. १४ ही तुमची शिक्षा आहे. त्याची
चव चाखा; आणि सत्य नाकारणाऱ्यांसाठी अग्नीची शिक्षा वाढून ठेवली
आहे, याची जाणीव ठेवा.

१५ श्रद्धावंतांनो! युद्धभूमीवर सत्य नाकारणाऱ्यांशी गाठ पडल्यावर
कधीही त्यांना पाठ दाखवू नका. १६ अशा प्रसंगी युद्धाची रणनीती किंवा
श्रद्धावंतांच्या दुसऱ्या गटाशी संधी करण्याचा प्रयत्न याशिवाय अन्य
कारणांनी पाठ दाखवणारा खरोखर ईश्वराचा रोष ओढवून घेईल आणि
त्यांना नरकात वास्तव्य करावे लागेल. किती गलिच्छ मुक्कामाचे ठिकाण
आहे हे!

१७ तुम्ही त्यांना मारले नाही तर त्यांना मारणारा ईश्वर होता. त्यांच्यावर

(वाळूचा) मारा करणारे तुम्ही नव्हे तर ईश्वर होता. कारण त्याला स्वतःहून श्रद्धावंतांवर प्रचंड कृपा करायची होती. नक्कीच ईश्वर सर्व ऐकणारा आणि सर्व जाणणारा आहे. १८ जे घडले ते असे होते –सत्य नाकारणाऱ्यांचे कारस्थान ईश्वर नक्कीच हाणून पाडेल. १९ तुम्हाला निवाडा हवा होता, तो तुमच्यावर आला आहे. तुम्ही गैरकृत्यांपासून दूर राहिलात तर तुमचे भले होईल. पण परत वैर पत्करलेत तर आम्हीही वैर पत्करू. तुमचा समुदाय संख्येने कितीही मोठा असला तरी तुम्हाला त्याचा काहीही फायदा होणार नाही. निश्चितच ईश्वर श्रद्धावंतांबरोबर आहे.

२० श्रद्धावंतांनो! ईश्वराचे आणि त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन करा आणि सगळे (ईश्वरी संदेश) ऐकल्यानंतर आता त्याकडे पाठ फिरवू नका. २१ काहीजण "आम्ही ऐकतो" म्हणतात, पण ऐकलेल्या गोष्टींकडे लक्ष देत नाहीत. त्यांच्यासारखे होऊ नका. २२ असे मुके, बहिरे, आपल्या बुद्धीचा उपयोग न करणारे ईश्वराच्या दृष्टीने सगळ्यात वाईट प्राणी आहेत. २३ ईश्वराला त्यांच्यात थोडाफार चांगुलपणा आढळला असता तर त्याने नक्कीच त्यांना ऐकण्याची सद्बुद्धी दिली असती. पण ते असे असल्यामुळे त्याने ऐकण्याची विवेकबुद्धी त्यांना दिली तरी तिरस्काराने ते त्याच्यापासून दूर जातील.

२४ श्रद्धावंतांनो! (ईश्वराचा) प्रेषित तुम्हाला जीवनदायी गोष्टींकडे बोलावेल तेव्हा त्याच्या आज्ञेचे पालन करा. माणूस आणि त्याचे मन या दोहांच्या दरम्यान ईश्वर उभा आहे आणि तुम्हा सगळ्यांना त्याच्यासमोरच जमायचे आहे, याची जाणीव ठेवा. २५ तुमच्यापैकी फक्त अपराध्यांवरच भयंकर संकटाचा प्रहार होईल, याविषयी सावध रहा आणि हे लक्षात घ्या की तो शिक्षा करण्यात कठोर आहे.

२६ तुम्ही संख्येने कमी होता, तुम्हाला दुबळे मानले जाई. शत्रू

केव्हाही हल्ला करेल या भीतीच्या सावटाखाली तुम्ही सतत वावरत होता. पण त्याने तुम्हाला आसरा दिला, मदतीचा हात दिला आणि चांगल्या वस्तू पुरवल्या, याचे स्मरण करा. ईश्वराविषयी कृतज्ञ रहा. २७ ईश्वराचा आणि त्याच्या प्रेषिताचा विश्वासघात करू नका. जाणूनबुजून आपली विश्वासार्हता धुळीस मिळू देऊ नका. २८ तुमची संपत्ती, संतती ही तुमची परीक्षा आहे तर ईश्वराकडे विपुल मोबदला आहे याची जाणीव ठेवा.

२९ श्रद्धांवंतांनो! ईश्वराचे भय बाळगाल तर तो तुम्हाला योग्य-अयोग्य यात भेद करण्याची शक्ती देईल, तुमच्या वाईट कृत्यांना तुमच्यापासून दूर करील, तुमच्या अपराधांना क्षमा करेल. ईश्वर अमर्याद कृपेचा सागर आहे.

३० सत्य नाकारण्यावर ठाम असणाऱ्यांनी तुम्हाला कैद करण्याचा किंवा हत्या करण्याचा किंवा हद्दपार करण्याचा डाव आखला होता, याचे स्मरण करा. त्यांनी गुप्त योजना आखली तर ईश्वरानेही गुप्त योजना आखली. योजना आखण्यात तो सर्वोत्कृष्ट आहे.

३१ आमचे साक्षात्कार ऐकवले असता ते म्हणतात, "आम्ही ते ऐकले आहेत. आमची इच्छा झाली तर आम्हीही तसे साक्षात्कार निर्माण करू. ते म्हणजे दुसरे काही नसून फक्त पूर्वजांच्या कथा आहेत." ३२ ते असेही म्हणतात, "ईश्वरा! हे खरोखर तुझ्याकडून आलेले सत्य असेल तर आकाशातून आमच्यावर दगडांचा वर्षाव कर किंवा आमच्यासाठी दुसरी एखादी वेदनादायी शिक्षा पाठव." ३३ पण हे प्रेषिता, जोपर्यंत तू त्यांच्यात आहेस तोपर्यंत किंवा ते क्षमायाचना करत आहेत तोपर्यंत ईश्वर त्यांना सजा देणार नाही. ३४ पवित्र मशिदीचे (काबागृहाचे) विश्वस्त नसतानाही ते लोकांना पवित्र मशिदीत जाण्यास रोखत असतात. ईश्वराने त्यांना शिक्षा का देऊ नये? ईश्वराची भीती बाळगणाऱ्यांना त्या मशिदीचे विश्वस्त

होण्याचा अधिकार आहे. पण त्यांच्यापैकी बहुतेकांना याची जाणीव नाही. ३५ पवित्र काबागृहात त्यांनी केलेल्या प्रार्थना म्हणजे फक्त शिट्या आणि टाळ्या आहेत. त्यांना सांगा, "आता सत्य नाकारल्याची शिक्षा चाखा."

३६ सत्य नाकारण्यावर ठाम अडून राहणारे आपली संपत्ती इतरांना ईश्वराच्या मार्गावरून रोखण्यासाठी खर्च करत आहेत. अखेरीस त्यांना तीव्र पश्चाताप होईपर्यंत ते असेच खर्च करत राहतील आणि नंतर त्यांना नामोहरम केले जाईल. आणि सत्य नाकारणाऱ्या सगळ्यांना नरकात एकत्र केले जाईल. ३७ म्हणजे ईश्वराला चांगल्यापासून वाईट वेगळे करता येईल. तो सगळ्या पाप्यांना एकावर एक रचेल आणि नरकात लोटून देईल. ते नक्कीच पराभूत झालेले असतील.

३८ सत्य नाकारण्यावर ठाम असलेल्यांना सांगा, ते यापासून परावृत्त झाले (त्यांनी सत्य नाकारायचे थांबवले) तर त्यांच्या भूतकाळातील चुका माफ होतील. पण ते सत्य नाकारतच राहिले, तर त्यांच्या आधी गेलेल्यांचे दुर्दैवी उदाहरण त्यांच्यासमोर आहे. ३९ (धार्मिक) छळाचा पूर्ण अंत होईपर्यंत आणि धर्म पूर्णपणे ईश्वराचा होईपर्यंत त्यांच्याशी लढा. त्यांनी छळ थांबवला तर ईश्वर नक्कीच त्यांच्या कृतीवर लक्ष ठेवून आहे. ४० पण त्यांनी (तुमच्या संदेशाकडे) पाठ फिरवली तर लक्षात घ्या, ईश्वर तुमचा रक्षक आहे; सर्वोत्कृष्ट रक्षक आणि सर्वोत्कृष्ट सहाय्यक!

४१ युद्धातून मिळालेल्या संपत्तीत पाचवा हिस्सा ईश्वराचा, त्याच्या प्रेषिताचा, त्याच्या जवळच्या नातलगांचा, अनाथांचा, गरजूंचा आणि वाटसरूंचा आहे हे लक्षात ठेवा. ज्या दिवशी दोन सैन्ये परस्परांना भिडतील, त्या निर्णायक दिवशी आमच्या सेवकासमोर आम्ही पाठवलेल्या

साक्षात्कारावर आणि ईश्वरावर विश्वास असेल तर हे लक्षात ठेवा. सगळ्या गोष्टींवर ईश्वराची सत्ता आहे.

४२ तुम्ही दरीच्या जवळच्या बाजूला होता, तर दुसरा गट दरीपासून लांब अंतरावर होता आणि तांडा खालच्या दरीत होता. परस्पर सहमतीने वेळ ठरवायला सांगितले असते तर वेळेवरून तुमच्यात नक्कीच मतभेद झाले असते. पण युद्ध झाले, कारण ईश्वराला सगळ्या घटना अगोदर ठरल्याप्रमाणे घडवून आणायच्या होत्या. त्यामुळे सत्याचा धडधडीत पुरावा मिळाल्यानंतर, ज्यांच्या जीवनाचा अंत व्हायचा तो व्हावा आणि जे जिवंत राहणार होते ते सत्याच्या धडधडीत पुराव्यासहित रहावेत अशी ईश्वराची योजना होती. ईश्वर नक्कीच सगळे ऐकणारा, सगळे जाणणारा आहे. ४३ स्वप्नात ईश्वराने तुम्हाला त्यांची संख्या कमी असल्याचे दाखवले. त्यांची संख्या प्रचंड दाखवली असती तर तुमचा धीर खचला असता आणि तुमचे आपसात वाद झाले असते. पण ईश्वराने तुम्हाला वाचवले. मानवी मनात जे आहे ते तो पूर्णपणे ओळखतो. ४४ रणांगणावर तुमची समोरासमोर गाठ पडल्यावर त्याने तुम्हाला त्यांची संख्या कमी भासवली, तर त्यांना तुमची संख्या कमी भासवली. पूर्वी आदेशित केलेले सगळे घडवून आणावे, यासाठी ईश्वराने हे केले. प्रत्येक गोष्ट ईश्वराकडे परत जाते.

४५ श्रद्धावंतांनो! रणांगणात शत्रूची गाठ पडल्यावर खंबीर रहा आणि सतत ईश्वराचे स्मरण करा म्हणजे तुम्ही यशस्वी व्हाल. ४६ ईश्वराचे आणि त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन करा आणि आपसातले मतभेद टाळा, अन्यथा तुमचा धीर खचेल आणि तुमचा दरारा राहणार नाही. संयम बाळगा. ईश्वर त्यांच्याबरोबर असतो जे संयमी असतात. ४७ मोठ्या घमेंडीने इतरांना भपका दाखवण्यासाठी घराबाहेर पडले त्यांच्यासारखे

होऊ नका. ते इतरांना ईश्वराच्या मार्गापासून रोखतात. पण ईश्वराने त्यांच्या सगळ्या कारवाया (आपल्या ज्ञानाने) वेढलेल्या आहेत.

४८ सैतानाने त्यांना त्यांची कृत्ये सत्कृत्ये असल्याचे भासवले आणि सांगितले, "आज कुणीही तुमच्यापेक्षा बलवान ठरणार नाही; मी तुमचा रक्षक असेन!" पण दोन्ही सैन्ये समोरासमोर आल्यावर त्याने पाऊल मागे घेतले आणि सांगितले, "इथून मी तुम्हाला सोडून जातोय: तुम्हाला जे दिसत नाही ते मला दिसते आणि मी ईश्वराला घाबरतो – ईश्वर शिक्षा देण्यात फार कठोर आहे." ४९ ढोंगी लोक आणि ज्यांच्या मनात विकृती भरलेली होती ते म्हणाले, "यांच्या धर्माने यांची (श्रद्धावंतांची) फसवणूक केलेली आहे!" पण जे ईश्वरावर भरवसा ठेवतात, त्यांना माहीत आहे ईश्वर सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहे.

५० (अंतकाळ जवळ येताच) ठामपणे सत्य नाकारणाऱ्यांची अवस्था काय होते, तुम्ही पाहू शकाल का? त्यांच्या चेहऱ्यावर आणि पाठीवर प्रहार करत देवदूत त्यांना सांगतील, "अग्नीच्या शिक्षेची चव चाखा! ५१ ही शिक्षा तुमच्या हातांनी केलेल्या कर्माची आहे. कारण ईश्वर आपल्या सेवकांवर तीळमात्रही अन्याय करत नाही." ५२ फारोच्या समाजातील लोकांनी आणि त्याच्या आधी होऊन गेलेल्यांनी ईश्वराचे संदेशाद्वारे प्रकट झालेले सत्य नाकारले आणि ईश्वराने त्यांनी केलेल्या पापकृत्याबद्दल त्यांच्या मुसक्या आवळल्या. ईश्वर शिक्षा देण्यात खंबीर आणि कठोर आहे. ५३ लोकांच्या मनातील श्रद्धेची जागा अश्रद्धेने घेतल्याखेरीज ईश्वर त्यांच्यावर धरलेले आपले कृपाछत्र हटवत नाही. (जाणून असा!) ईश्वर सगळे जाणणारा आणि ऐकणारा आहे. ५४ फारोच्या समाजातील लोकांप्रमाणे त्यांच्या आधी होऊन गेलेल्यांनी त्यांच्या पालनकर्त्याचे संदेश नाकारले होते. त्यांच्या या अपराधांमुळे आम्ही त्यांना नष्ट केले आणि फारोच्या लोकांना जलसमाधी दिली; ते सगळे पापी होते.

५५ जे ईश्वराला नाकारतात आणि विश्वास ठेवत नाहीत, ते ईश्वराच्या
नजरेत सगळ्यात वाईट जीव आहेत. ५६ ज्यांच्याशी तुम्ही करार केला
आहे आणि जे दरवेळी करार मोडतात आणि ईश्वराला घाबरत नाहीत.
५७ युद्धात त्यांची गाठ पडल्यास त्यांना असा धडा शिकवा, की
त्यांच्यामागून येणारे त्यांच्या योजना सोडून देतील आणि त्यापासून धडा
घेतील. ५८ कुठल्याही समाजाकडून विश्वासघाताची जाणीव झाल्यास
त्यांचा करार त्यांच्याकडे भिरकावून द्या म्हणजे ते आणि तुम्ही करारमुक्त
होऊन जाल. ईश्वराला असे विश्वासघातकी आवडत नाहीत.

५९ सत्य नाकारणाऱ्यांनी आपली सहीसलामत सुटका होईल असे
कधीही मानू नये. ते ईश्वरी हेतू निष्फळ करू शकत नाहीत. त्यांच्याकडे
तसे करण्याचे सामर्थ्य नाही. ६० ईश्वराच्या आणि तुमच्या स्वतःच्या
शत्रूवर आणि त्याशिवाय तुम्हाला माहीत नसलेल्या, पण ईश्वराला
माहीत असलेल्या शत्रूच्या मनात भय निर्माण करण्यासाठी शक्य तेवढे
सैन्य आणि शक्य तेवढे घोडदळ सज्ज ठेवा. तुम्ही ईश्वरी कार्यासाठी जे
धन खर्च कराल, त्याचा तुम्हाला परिपूर्ण मोबदला मिळेल. तुमच्यावर
अन्याय केला जाणार नाही. ६१ यानंतर त्यांनी शांततेचा तह करायची
इच्छा व्यक्त केली तर त्यांच्याशी शांतता करार करा आणि ईश्वरावर
भरवसा ठेवा. तोच सगळे ऐकणारा, सगळे जाणणारा आहे. ६२ त्यांनी
तुम्हाला फसवण्याचा प्रयत्न केला तर तुमची बाजू सावरायला ईश्वर पुरेसा
आहे. तुम्हाला मदतीचा हात देऊन तुमची ताकद वाढवणारा, श्रद्धावंतांना
तुमच्या भोवताली ठेवून आणि त्यांची मने एकत्र बांधून तुम्हाला बळकटी
देणारा तोच होता. ६३ पृथ्वीवरील प्रत्येक गोष्टीचा मोबदला देऊनही तुम्ही
त्यांना मनाने एकत्र ठेवू शकला नसता. पण ईश्वराने त्यांना एकत्र बांधून
ठेवले आहे. नक्कीच, तो सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान आहे.

६४ हे प्रेषिता! तुझ्यासाठी आणि तुझे अनुयायी असलेल्या श्रद्धावंतांसाठी
ईश्वर पुरेसा आहे. ६५ हे प्रेषिता! श्रद्धावंतांना लढाईसाठी प्रेरित कर.
तुमच्यापैकी वीस अढळ श्रद्धावंत असतील, तर सत्य नाकारणाऱ्या
दोनशेजणांना मात देतील आणि दोनशे अढळ श्रद्धावंत दोन हजारांना
मात देतील. कारण त्यांच्याकडे ज्ञानाचा अभाव आहे. ६६ ईश्वराने आता
तुमचा भार हलका केला आहे, कारण तुमची ताकद कमी झाल्याचे
त्याने ओळखले आहे. आता तुमच्यापैकी शंभर अढळ निष्ठावंत दोनशे
अश्रद्धावंतांना भारी पडतील आणि हजार अढळ निष्ठावंत दोन हजारांवर
भारी पडतील. ईश्वर अढळ निष्ठावंतांचा सोबती आहे.

६७ प्रेषिताने रणांगणावर तीव्र लढा दिला नाही तर कुठलाही बंदिवान
करण्याचा हक्क त्याला नाही. तुम्ही ऐहिक जीवनातील लाभाची आकांक्षा
ठेवता, तर ईश्वर तुमच्यासाठी मृत्युपश्चात जीवनाची आकांक्षा ठेवतो.
ईश्वर सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान आहे. ६८ ईश्वराचे विधीलिखित या
आधीच पुढे गेले नसते तर तुम्ही केलेल्या कृत्याची तुम्हाला कठोर शिक्षा
दिली गेली असती. ६९ तेव्हा युद्धात मिळालेल्या सामग्रीपैकी कायदेशीर
आणि चांगल्या वस्तूंचा उपभोग घ्या आणि ईश्वराचे भय बाळगा. ईश्वर
नक्कीच अतिशय क्षमाशील आणि अतिशय दयाशील आहे.

७० हे प्रेषिता! तू युद्धात ज्यांना कैद केले आहेस त्यांना सांग, "ईश्वराला
तुमच्या मनात थोडा जरी चांगुलपणा आढळला तरी तुमच्याकडून हिरावून
घेतलेल्यापेक्षा कितीतरी चांगल्या गोष्टी तो तुम्हाला देऊ करेल आणि
तुम्हाला क्षमा करेल आणि ईश्वर क्षमाशील आणि दयाशील आहे."
७१ त्यांनी तुमचा विश्वासघात केला असेल तर पूर्वी त्यांनी ईश्वराचाही
विश्वासघात केला आहे आणि त्याने तुम्हाला त्यांचा ताबा दिला आहे.
ईश्वर सजग आणि ज्ञानी आहे.

७२ ज्यांनी श्रद्धा ठेवल्याने आपल्या मायभूमीचा त्याग करावा लागला
आणि ईश्वरी कार्यासाठी लढा दिला ते आणि मायभूमी सोडून आलेल्यांना
ज्यांनी आसरा आणि मदतीचा हात दिला ते एकमेकांचे मित्र आणि रक्षक
आहेत. पण ज्यांनी श्रद्धा ठेवली, मात्र आपल्या मायभूमीचा त्याग केला
नाही, त्यांनी स्थलांतर करेपर्यंत तुम्हाला त्यांच्या रक्षणासाठी अजिबात
जबाबदार धरले जाणार नाही. त्यांनी धर्मकार्यात तुमची मदत मागितली तर
ज्यांच्याशी करार झाला आहे त्यांच्या विरोधात जाणे सोडून इतर बाबतीत
त्यांना मदत करणे तुम्हाला बंधनकारक आहे. तुम्ही कसे वागता हे ईश्वर
पाहतो. ७३ जे सत्य नाकारतात ते एकमेकांना आधार देतात. तुम्ही तसेच
वागला नाही तर पृथ्वीवर उपद्रव आणि अनाचार माजेल.

७४ ज्यांनी श्रद्धा ठेवली, आपल्या मायभूमीचा त्याग केला आणि
ईश्वरी कार्यासाठी खडतर कष्ट उपसले ते, त्याचप्रमाणे ज्यांनी त्यांना
आसरा दिला आणि आधार दिला ते सच्चे श्रद्धावंत आहेत. त्यांना क्षमेचा
आणि उपजीविकेसाठी सन्माननीय साधनांचा लाभ होईल. ७५ आणि
ज्यांनी उशीरा श्रद्धा ठेवली, आपल्या मायभूमीचा त्याग केला आणि
तुमच्या खांद्याला खांदा लावून ईश्वरी कार्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा
केली, तेही तुमच्यातलेच आहेत. पण ईश्वराच्या नजरेत रक्ताचे नाते
असणारे लोक एकमेकांच्या अधिक जवळचे आहेत. ईश्वराकडे सगळ्या
गोष्टींचे संपूर्ण ज्ञान आहे.

प्रकरण ९ : पश्चाताप
(अत्-तौबा)

१ तुम्ही ज्यांच्याशी करार केले होते त्या अनेकेश्वरवाद्यांना ईश्वराकडून
आणि त्याच्या प्रेषिताकडून करारमुक्तीची ही जाहीर सूचना आहे. २ तेव्हा

त्यांनी चार महिने या भूमीत मुक्त संचार करावा. पण हे लक्षात ठेवा, तुम्ही ईश्वराची योजना निष्फळ करू शकत नाही आणि सत्य अमान्य करणाऱ्यांची तो मानहानी करेल. ३ हज यात्रेच्या दिवशी ईश्वराकडून आणि त्याच्या प्रेषिताकडून सगळ्यांना जाहीर सूचना आहे की, ईश्वर आणि त्याचा प्रेषित अनेकेश्वरवाद्यांबरोबरच्या सगळ्या बंधनांमधून मुक्त आहेत. तुम्ही पश्चाताप व्यक्त कराल तर त्यात तुमचे हित आहे. पण त्याकडे पाठ फिरवाल तर लक्षात ठेवा, तुम्ही ईश्वराची योजना अयशस्वी करू शकत नाही. सत्य नाकारण्यावर ठाम राहिलेल्यांना कठोर शिक्षा जाहीर करा. ४ ज्यांनी तुमच्याबरोबर केलेले करार सन्मानपूर्वक निभावले आणि तुमच्याविरुद्ध कुणालाही मदत केली नाही, त्यांच्याबरोबरचे करार मुदत संपेपर्यंत पाळा. सदाचारी लोक ईश्वराला आवडतात.

५ (युद्ध) मनाई असलेले महिने उलटताच तुमच्याशी युद्ध छेडणाऱ्या अनेकेश्वरवाद्यांना जिथे सापडतील तिथे ठार करा. त्यांना कैद करा आणि त्यांना घेराव घाला आणि हल्ल्याच्या प्रत्येक ठिकाणी दबा धरून थांबा. पण त्यांनी पश्चाताप व्यक्त केला, नियमितपणे प्रार्थना केली (नमाज़ पठण केले) आणि निर्धारित दानधर्म केला तर त्यांना त्यांच्या वाटेने जाऊ द्या. ईश्वर क्षमाशील आणि दयाशील आहे. ६ अनेकेश्वरवाद्यांपैकी कुणी तुमच्याकडे आसरा मागितला, तर त्यांना तो द्या. म्हणजे ईश्वराची वचने त्यांच्या कानावर पडतील. नंतर त्यांना सुरक्षित स्थळी घेऊन जा. कारण हे असे लोक आहेत ज्यांना ज्ञान नाही.

७ पवित्र मशिदीत तुम्ही ज्यांच्याशी करार केला होता ते वगळता, ईश्वराचा आणि त्याच्या प्रेषिताचा अनेकेश्वरवाद्यांशी करार कसा होऊ शकतो? ते जोपर्यंत तुमच्याशी सरळ वागत आहेत, तोपर्यंत त्यांच्याशी सरळ वागा. सद्वर्तनी लोक ईश्वराला आवडतात. ८ तुमच्यावर नियंत्रण मिळाले तर (मग कसला आलाय करार?) ना ते

नातेसंबंधांचा विचार करतील, ना दिलेल्या शब्दाचा! तोंडाने ते तुम्हाला
खुश करतील, पण त्यांचे मन तुम्हाला नाकारेल. त्यांच्यापैकी बहुतेकजण
कपटी आहेत. ९ त्यांनी क्षुल्लक स्वार्थासाठी ईश्वराचे साक्षात्कार विकले
आहेत आणि इतरांना ईश्वराच्या मार्गापासून रोखले आहे. किती दुष्ट कर्म
करत आहेत ते! १० श्रद्धावंतांच्या बाबतीत ते कुठल्याही नातेसंबंधाचा
किंवा कराराचा आदर ठेवत नाहीत. ते असे लोक आहेत ज्यांनी सगळ्या
मर्यादा ओलांडल्या आहेत. ११ पश्चाताप होऊन त्यांनी नियमित प्रार्थना
केली (नमाज़ पठण केले) आणि निर्धारित दानधर्म केला तर श्रद्धेत तुमचे
बांधव आहेत. जाणण्याची इच्छा असणाऱ्यांसाठी आम्ही आमचे संदेश
स्पष्ट केले आहेत.

१२ पण शपथ घेतल्यानंतर त्यांनी ती मोडली आणि तुमच्या धर्माचा
अवमान केला, तर अश्रद्धेच्या या नेत्यांशी लढा द्या म्हणजे ते त्यापासून
परावृत्त होतील. कारण त्यांना त्यांच्या शपथेची कदर नाही. १३ ज्यांनी
त्यांच्या शपथा मोडल्या आणि प्रेषिताला हद्दपार करण्याचे कारस्थान
रचले, त्यांच्याविरुद्ध तुम्ही लढणार नाही का? तुमच्यावर हल्ला करणारे
ते पहिले होते. तुम्ही त्यांना घाबरता का? खरे श्रद्धावंत असाल तर
नक्कीच ईश्वर तुमच्या भीतीला जास्त पात्र आहे. १४ त्यांच्याशी लढा.
ईश्वर तुमच्या हातून त्यांना शिक्षा देईल आणि त्यांची मानहानी करेल.
त्यांच्यावर मात करायला तो तुमची मदत करेल आणि श्रद्धावंतांच्या अंतः
करणाला दिलासा देईल. १५ तो त्यांच्या अंतःकरणातला क्रोध दूर करेल.
ईश्वराच्या इच्छेला येईल त्याच्यावर तो कृपा करेल. ईश्वर सर्वज्ञ आणि
प्रज्ञावंत आहे.

१६ तुमच्यापैकी कुणी ईश्वरी कार्यासाठी जीवापाड प्रयत्न केले आणि
ईश्वर, त्याचा प्रेषित व श्रद्धावंत यांच्याशिवाय इतरांना आपले मित्र वा

रक्षक मानले नाही; हे ओळखल्याविना तुमची सुटका होईल असे वाटते का? तुमची सगळी कृत्ये ईश्वर पूर्णपणे ओळखतो.

१७ अश्रद्धावंत असल्याचे स्वतःच्या तोंडाने कबूल केले असताना
अनेकेश्वरवाद्यांना ईश्वराच्या प्रार्थनास्थळांना वारंवार भेट द्यायचा
अधिकार नाही. ते असे लोक आहेत ज्यांची सगळी कृत्ये निष्फळ ठरतील
आणि त्यांना नरकात वास्तव्य करावे लागेल. १८ जो ईश्वरावर आणि
अंतिम दिवसावर विश्वास ठेवतो, नियमित प्रार्थना करतो, दानधर्मावर
खर्च करतो आणि फक्त ईश्वराचेच भय बाळगतो, त्यानेच फक्त
ईश्वराच्या प्रार्थनास्थळांना नियमित भेट द्यावी. असे लोक योग्य मार्गदर्शन
लाभलेल्यांपैकी असल्याची अपेक्षा ठेवू शकतात. १९ हज यात्रेत पाणी देणे
आणि पवित्र मशिदीची (काबागृहाची) देखभाल करणे, ही कामे ईश्वरावर
आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवणाऱ्यांच्या आणि ईश्वरी कार्यासाठी
खडतर परिश्रम घेणाऱ्यांच्या कामाच्या बरोबरीची मानता का? ईश्वराच्या
नजरेत या गोष्टी एकसमान नाहीत. ईश्वर अशा अन्यायी लोकांना मार्गदर्शन
देत नाही. २० श्रद्धा ठेवून ज्यांनी आपल्या घरादाराचा त्याग केला, ईश्वरी
कार्यासाठी तन-मन-धनपूर्वक (संपत्ती आणि प्राणानिशी) कष्ट उपसले,
त्यांना ईश्वर श्रेष्ठ दर्जा देतो. (ईश्वरी परीक्षेत) विजयी होणारे हेच लोक
आहेत. २१ त्यांचा पालनकर्ता त्यांना त्याच्या दयेची, त्याच्या प्रसन्नतेची
आणि चिरंतन कल्याणाचा ठेवा असलेल्या स्वर्गाची सुवार्ता देतो.
२२ तिथे ते कायमचे वास्तव्य करतील. खरोखर तिथे त्यांच्यासाठी ईश्वराचा
भरघोस मोबदला आहे.

२३ श्रद्धावंतांनो! तुमच्या भावांनी आणि वडिलांनी सत्यावर विश्वास
ठेवण्याऐवजी ते अमान्य केले तर त्यांच्याशी आपुलकीचे संबंध ठेवू नका.
तुमच्यापैकी जे त्यांच्याशी आपुलकीचे संबंध ठेवतील, ते अपराधी आहेत.

२४ त्यांना सांगा, "तुमचे वडील, बंधू, पुत्र, जीवनसाथी, तुमचा परिवार,
तुम्ही कमावलेल्या ऐहिक वस्तू, ज्याच्या मंदीची तुम्हाला आशंका वाटते
तो व्यापार आणि प्रिय घरेदारे, हे सगळे तुम्हाला ईश्वरापेक्षा, त्याच्या
प्रेषितापेक्षा आणि त्याच्या कार्यात संघर्ष करण्यापेक्षा जास्त आवडत
असतील तर ईश्वर आपल्या आदेशाची पूर्तता करेपर्यंत थांबा. ईश्वर
अवज्ञा करणाऱ्या लोकांना मार्गदर्शन करत नाही."

२५ खरोखर, ईश्वराने तुम्हाला अनेक प्रसंगात मदत केली आहे.
हुनैनच्या दिवशी तुम्हाला आपण संख्येने प्रचंड असल्याचा गर्व होता.
पण हे बहुसंख्य तुमच्या कामी आले नाहीत. ही विशालकाय पृथ्वीही
जणू तुमच्यासाठी (अति) संकुचित झाली आणि माघार घेऊन तुम्ही पाठ
फिरवली. २६ यानंतर ईश्वराने आपल्या प्रेषितासाठी आणि श्रद्धावंतांसाठी
मनःशांती पाठवली आणि तुम्हाला दिसू शकले नाही असे सैन्य पाठवले.
सत्य नाकारणाऱ्यांना त्याने शिक्षा दिली. कारण सत्य नाकारणाऱ्यांना
मिळणारा मोबदला असा असतो. २७ आणि त्यानंतरही ईश्वराच्या मर्जीला
येईल त्याच्याकडे तो दयादृष्टी वळवेल. ईश्वर क्षमाशील आणि दयाशील
आहे. २८ श्रद्धावंतांनो! लक्षात ठेवा, अनेकेश्वरवादी (आध्यात्मिक
दृष्टीने) अपवित्र आहेत. तेव्हा या वर्षापासून त्यांना पवित्र मशिदीपर्यंत
(काबागृहापर्यंत) पोहोचू देऊ नका. तुम्हाला दारिद्र्याची भीती वाटली
तरी ईश्वराची इच्छा झाली तर त्याच्या औदार्याने तो तुम्हाला समृद्ध
करेल. ईश्वर सजग आणि बुद्धिवंत आहे.

२९ ग्रंथधारकांपैकी जे ना ईश्वरावर, ना अंतिम दिवसावर विश्वास
ठेवतात, ना ईश्वराने आणि त्याच्या प्रेषिताने बेकायदेशीर ठरवलेल्या
गोष्टी बेकायदेशीर मानतात, ना खऱ्या धर्माला अनुसरतात त्यांच्याशी
लढा. ते स्वखुशीने कर भरेपर्यंत आणि शरण जायला कबूल होईपर्यंत
त्यांच्याशी लढा द्या. ३० ज्यू म्हणतात, "उजैर (Ezra) ईश्वराचा पुत्र

आहे" आणि ख्रिस्ती म्हणतात, "येशू ईश्वराचा पुत्र आहे." हे त्यांचे फक्त पोकळ दावे आहेत. सत्य नाकारणाऱ्यांनी पूर्वीच्या काळी मांडलेल्या (अंधश्रद्धेवर आधारित) मतांचे ते अनुकरण करतात. ईश्वर त्यांचा नाश करो! सन्मार्गापासून किती दूर भरकटले आहेत ते! ३१ त्यांनी ईश्वराला सोडून त्यांच्यातल्या विद्वानांना आणि धर्मपंडितांना पालनकर्ता मानले आहे. एकाच ईश्वराची उपासना करायचा आदेश असतानाही त्यांनी मेरीपुत्र येशूलाही ईश्वर मानले आहे. एका ईश्वराशिवाय अन्य कुणी दैवत नाही. ज्यांना त्यांनी ईश्वराच्या बरोबरीचे मानले आहे, त्यांच्यापेक्षा ईश्वर खूप श्रेष्ठ आहे.

३२ आपल्या फुंकरीने ते ईश्वराचा दिवा विझवू पहातात. पण ईश्वर फक्त आपला प्रकाश परिपूर्ण करू इच्छितो. मग सत्य नाकारणाऱ्यांना हे कितीही तिरस्करणीय वाटो! ३३ इतर प्रत्येक धर्मावर (वैचारिक) वर्चस्व मिळवता यावे यासाठी मार्गदर्शन आणि सत्याचा प्रकाश घेऊन आपल्या प्रेषिताला पाठवणारा तो ईश्वर आहे. परंतु बहुतांश अनेकेश्वरवादी त्याचा तिरस्कार करतात.

३४ श्रद्धावंतांनो! अनेक धार्मिक विद्वान आणि पंडित अन्यायाने लोकांची संपत्ती हडप करतात आणि लोकांना ईश्वराच्या मार्गापासून दूर नेतात. त्यांना सांगा, "जे सोन्या-चांदीचा विनियोग ईश्वरी कार्यासाठी करण्याऐवजी त्याचा संचय करतात, त्यांना यातनामय शिक्षा मिळेल." ३५ निवाड्याच्या दिवशी त्यांचा खजिना नरकाग्नीच्या उष्णतेने तापवला जाईल. त्यांच्या कपाळावर, बाजूवर आणि पाठीवर त्याचे डाग दिले जातील आणि त्यांना सांगितले जाईल, "तुम्ही ज्याचा संचय केला होता ते हे आहे. चाखा आपल्या संचिताची चव."

३६ ज्या दिवशी ईश्वराने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली त्याच

दिवशी त्याने वर्षाचे महिने बारा असतील असा आदेश काढला. यापैकी चार महिने पवित्र आहेत. हा खरा धर्म होय. या महिन्यात तुमच्या आत्म्यावर अत्याचार करू नका. अनेकेश्वरवादी जसे एकत्रितपणे लढतात, तसेच तुम्हीही त्यांच्याशी एकत्रित होऊन लढा आणि लक्षात ठेवा, ईश्वर सद्वर्तनी लोकांबरोबर आहे. ३७ पवित्र महिने पुढे ढकलणे म्हणजे फक्त त्यांचे सत्य नाकारण्याचे आणखी एक उदाहरण. त्याद्वारे सत्य नाकारण्यावर अडून राहिलेले सन्मार्गापासून दूर जातात. ईश्वराने नेमून दिलेल्या महिन्यात हवे तसे बदल करता यावेत यासाठी ते हे महिने एका वर्षी पवित्र असल्याचे तर पुढच्या वर्षी निषिद्ध असल्याचे जाहीर करतात. अशा रीतीने ईश्वराने निषिद्ध ठरवलेल्या गोष्टी ते कायदेशीर बनवतात. त्यांची ही अपकृत्ये त्यांना योग्य वाटतात. जे सत्य नाकारतात त्यांना ईश्वर मार्गदर्शन करत नाही.

३८ श्रद्धावंतांनो! तुम्हाला काय झाले आहे? ईश्वरी कार्यासाठी बाहेर पडायला सांगितले असता, आळसून जमिनीला खिळून काय बसता? तुम्हाला मृत्युपश्चात जीवनापेक्षा हे जीवन आवडते का? पण मृत्युपश्चात जीवनाशी तुलना करता या जीवनातील सुख-समाधान फार कमी आहे. ३९ तुम्ही ईश्वरी कार्यासाठी घराबाहेर पडला नाहीत तर तो तुम्हाला कठोर शिक्षा देईल आणि तुम्हाला हटवून त्या जागी इतरांना आणेल. तुम्ही त्याचे किंचितही नुकसान करू शकत नाही. सगळ्या गोष्टींवर ईश्वराची सत्ता आहे. ४० तुम्ही त्याला (प्रेषित मोहम्मदला) पाठिंबा दिला नाहीत तर लक्षात ठेवा, ईश्वराने त्याला पाठिंबा दिलेला आहे. सत्य नाकारणाऱ्यांनी त्याला हद्दपार केले असताना जेव्हा दोघे एका गुहेत होते, तेव्हा प्रेषिताने आपल्या सोबत्याला सांगितले, "काळजी करू नकोस. कारण ईश्वर आपल्याबरोबर आहे." ईश्वराने त्यांच्यासाठी दिलासा पाठवला. तुम्हाला

दिसू न शकणारे सैन्य पाठवले आणि सत्य नाकारणाऱ्यांचा शब्द खाली पाडला. ईश्वराचा शब्द सर्वोच्च राहिला! ईश्वर सामर्थ्यवान आणि बुद्धिमान आहे.

४१ हलकी किंवा जड साधनसामग्री घेऊन पुढे जा आणि ईश्वरी कार्यासाठी (तन-मन-धनपूर्वक) संपत्ती व प्राणानिशी संघर्ष करा आणि लढा. समजत असेल तर पहा, यात तुमचे कल्याण आहे. ४२ फायदा ताबडतोब होणार असता आणि प्रवास थोडासा असता, तर ते (ढोंगी) तुमच्याबरोबर आले असते. पण अंतर त्यांना फारच जास्त वाटले. तरीही ईश्वराची शपथ घेऊन ते सांगतील, "शक्य असते तर आम्ही तुमच्याबरोबर आलो असतो." ते स्वतःचे नुकसान ओढवून घेत आहेत. ईश्वर जाणतो की ते नक्कीच खोटे बोलत आहेत.

४३ (पैगंबर!) ईश्वर तुम्हाला क्षमा करो! तुम्ही त्यांना (मागे राहण्याची) परवानगी का बरे दिली? (तुम्ही त्यांना परवानगी दिली नसती तर) तुमच्यासमोर या गोष्टीचा उलगडा झाला असता की, कोण खरे आहेत आणि कोण खोटे आहेत; त्यांचीही तुम्हाला (अवश्य) ओळख पटली असती. ४४ ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवणाऱ्यांनी संपत्तीनिशी व जीवानिशी (सर्वस्वानिशी) ईश्वरी कार्यासाठी कष्ट उपसण्यातून तुझ्याकडे सूट मागितली नसती. ईश्वर सद्वर्तनी लोकांना चांगले ओळखतो. ४५ ज्यांचा ईश्वरावर, अंतिम दिवसावर खरा विश्वास नाही आणि ज्यांची मने संशयग्रस्त आहेत तेच फक्त यातून सूट मागू इच्छितात. संशयामुळे ते अस्थिर झाले आहेत. ४६ त्यांना घराबाहेर पडायचे असते, तर त्यांनी नक्कीच काही तयारी केली असती. पण ईश्वराला त्यांचे बाहेर पडणे आणि ईश्वराच्या नजरेत दर्जा उंचावणे रुचले नाही. म्हणून त्याने त्यांना मागे धरून ठेवले. मागे राहणाऱ्यांबरोबरच राहायला त्यांना सांगितले गेले.

४७ तेही तुमच्याबरोबर पुढे आले असते तर फक्त दुर्दैवाचे कारण ठरले
असते आणि मागेपुढे पळून तुमच्यातला ताळमेळ बिघडवण्याचे प्रयत्न
केले असते. तुमच्यात काहीजण असे आढळले असते, ज्यांनी स्वेच्छेने
त्यांचे लक्षपूर्वक ऐकले असते. ईश्वर अशा अपराध्यांना ओळखतो.
४८ सत्य उघड होईपर्यंत, ईश्वरेच्छा प्रबळ ठरेपर्यंत त्यांनी तुमच्यात फूट
पाडायचा प्रयत्न केला आहे आणि तुमच्याविरुद्ध कारस्थान केले आहे.
खरे पाहता असे घडणे त्यांना अप्रियच होते.

४९ त्यांच्यापैकी काही म्हणतात, "आम्हाला मागे राहण्याची परवानगी
द्या आणि आम्हाला परीक्षेत लोटू नका." नक्कीच ते परीक्षेत अगोदरच
लोटले गेले आहेत. नक्कीच नरक त्यांचा घास घेईल जे सत्य नाकारतात.
५० तुमचे चांगले झाले, तर त्यांना वाईट वाटते आणि तुमच्यावर दुर्दैवी
परिस्थिती ओढवली तर ते म्हणतात, "आम्ही अगोदरच खबरदारी घेतली
होती" आणि आनंदात तिथून निघून जातात. ५१ त्यांना सांगा, "ईश्वराने
आमच्यासाठी जे आदेश दिले आहेत, त्याशिवाय अन्य काही आमच्या
बाबतीत घडणार नाही. तो आमचा सर्वोच्च पालनकर्ता आहे. श्रद्धावंतांनी
ईश्वरावर भरवसा ठेवावा." ५२ त्यांना विचारा, "दोन सर्वोत्कृष्ट गोष्टींपैकी
एक सोडून (या जगातील विजय किंवा पुढच्या जगातील स्वर्गप्राप्ती) अन्य
काही आमच्या बाबतीत घडेल याची तुम्ही वाट पहात आहात का? पण
आम्ही अपेक्षा करतो की ईश्वर आपली शिक्षा प्रत्यक्ष स्वतःकडून किंवा
आमच्या हातून तुमच्याकडे पाठवेल. तेव्हा इच्छा असेल तर वाट पहा.
आम्हीही तुमच्याबरोबर वाट पहात आहोत."

५३ त्यांना सांगा, "तुम्ही ईश्वराला काही स्वेच्छेने अर्पण करा की
नाराजीने, तो त्याचा स्वीकार करणार नाही. कारण तुम्ही खरोखर
अवज्ञाकारी लोक आहात." ५४ त्यांचे योगदान नाकारण्याचे कारण म्हणजे

त्यांनी ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितावर दाखवलेला अविश्वास. शिवाय प्रार्थनाही ते मनापासून करत नाहीत आणि दानधर्म राजीखुशीने करत नाहीत. ५५ त्यांच्या संपत्तीने आणि संततीने प्रभावित होऊ नका. कारण, सत्य नाकारलेल्या अवस्थेत त्यांचे आत्मे शरीरापासून अलग व्हावेत, यासाठी या गोष्टींमार्फत ईश्वर त्यांना या जगातल्या जीवनात शिक्षा देऊ इच्छितो. ५६ ते ईश्वराची शपथ घेऊन सांगतात, ते तुमच्यासारखे श्रद्धावंत आहेत. पण ते तसे नाहीत. (त्यांचे खरे स्वरूप दिसण्याला) ते घाबरले आहेत. ५७ एखादे आश्रयस्थान, गुहा किंवा अन्य एखादी लपायची जागा शोधू शकले तर ते वेडेपिसे होऊन घाईघाईने तिथे पळून जातील.

५८ त्यांच्यापैकी काहीजण असे आहेत, जे देणगीच्या वाटपावरून तुमच्या चुका शोधतील. त्यातला हिस्सा त्यांना दिला तर ते संतुष्ट होतात. पण काही मिळाले नाही तर संतापतात. ५९ ईश्वराने आणि त्याच्या प्रेषिताने त्यांना देऊ केलेल्यावर ते समाधानी राहिले असते आणि म्हणाले असते, "ईश्वर आमच्यासाठी समर्थ आहे. ईश्वर देईल आणि त्याचा प्रेषितही देईल. आशेने आम्ही फक्त ईश्वराकडेच पाहू." (तर किती चांगले झाले असते!) ६० दानधर्मातून मिळालेली रक्कम फक्त गोरगरिबांसाठी, गरजूंसाठी आणि दान गोळा करणाऱ्यांसाठी आहे. या दानाचा उपयोग ज्यांच्या मनात (सत्य धर्माविषयी) सलोख्याची भावना निर्माण करावयाची आहे अशा लोकांसाठी, गुलामांच्या मुक्तीसाठी, कर्जदारांचे कर्ज फेडण्यासाठी, ईश्वरी कार्यावर खर्च करण्यासाठी आणि गरजू वाटसरूंसाठी केला जावा. हा ईश्वराचा आदेश आहे. ईश्वर सर्वज्ञ आणि प्रज्ञावंत आहे.

६१ त्यांच्यापैकी काहीजण प्रेषिताला त्रास देण्यासाठी म्हणतात, "त्यांचे प्रत्येकाकडे लक्ष आहे." त्यांना सांगा, "त्यांचा हा गुण तुमच्यासाठी चांगला आहे. तो ईश्वरावर श्रद्धा ठेवतो आणि श्रद्धावंतांवर

विश्वास ठेवतो. तो श्रद्धावंतांसाठी ईश्वराकडून लाभलेली कृपा आहे. जे ईश्वराच्या प्रेषिताला त्रास देतात त्यांना वेदनादायी शिक्षा भोगावी लागेल." ६२ श्रद्धावंतांना संतुष्ट करण्यासाठी ते ईश्वराची शपथ घेतात. पण ते श्रद्धावंत असतील तर ईश्वराला आणि त्याच्या प्रेषिताला संतुष्ट करणे त्यांच्यासाठी अधिक योग्य असेल. ६३ ईश्वराला आणि त्याच्या प्रेषिताला विरोध करणाऱ्यांना कायमचे नरकाग्नीत वास्तव्य करावे लागेल हे त्यांना माहीत नाही का? ही त्यांची सर्वात मोठी मानहानी आहे.

६४ दांभिकांना नेहमी भीती वाटते, त्यांच्या मनातल्या गोष्टी उघड करणारा त्यांच्याविषयीचा एखादा अध्याय कुरआनातून पाठवला जाईल की काय? त्यांना सांगा, "तुम्ही थट्टा करत रहा. तुम्ही ज्याला घाबरताय त्या गोष्टी ईश्वर नक्कीच उजेडात आणेल." ६५ तुम्ही त्यांना विचारले तर ते सांगतील, "आम्ही फक्त थट्टा करत होतो आणि गप्पा मारत होतो." त्यांना विचारा, "तुम्ही ईश्वराची, त्याच्या साक्षात्कारांची आणि त्याच्या प्रेषिताची थट्टा करता काय?" ६६ काहीही सबब सांगू नका. सत्यावरील श्रद्धेचा स्वीकार करून नंतर तुम्ही ती नाकारली आहे. आम्ही तुमच्यापैकी काहींना क्षमा केली तर इतरांना सजा देऊ. कारण ते अपराधी आहेत.

६७ ढोंगी लोक : स्त्रिया आणि पुरुष, दोघेही एकसारखे आहेत. ते वाईटाचा आग्रह धरतात, चांगल्या गोष्टींना मनाई करतात आणि ईश्वरी कार्यासाठी खर्च करायची वेळ येताच कंजूषपणा करतात. ते ईश्वराला विसरले आहेत, म्हणून ईश्वर त्यांना विसरला आहे. ढोंगी लोक आज्ञा मोडणारे आहेत. ६८ ईश्वराने ढोंगी स्त्री-पुरुषांना आणि सत्यावर अविश्वास दाखवणाऱ्यांना नरकाग्नीचे वचन दिले आहे. त्यांना कायम तिथे वास्तव्य करावे लागेल. एवढी शिक्षा त्यांच्यासाठी पुरेशी आहे. ईश्वराने त्यांना

नाकारले आहे. त्यांना चिरंतन शिक्षा मिळेल. [६९] तुमच्या आधी होऊन गेलेले लोक तुमच्यापेक्षा ताकदवान होते. त्यांच्याकडे तुमच्यापेक्षा जास्त संपत्ती आणि संतती होती. त्यांनी जसा या जीवनातला त्यांचा वाटा उपभोगला, तसा तुम्ही तुमचा वाटा उपभोगला. त्यांच्याप्रमाणे तुम्हीही निरर्थक वादविवाद करण्यात मग्न आहात. हे असे लोक आहेत ज्यांची या जगातली आणि आगामी जगातली कर्मे निष्फळ ठरणार आहेत आणि ते पराभूत झालेले असतील. [७०] त्यांनी त्यांच्या पूर्वजांचा वृत्तांत : नोहाच्या लोकांचा, आद व समूद या जमातींचा, अब्राहामच्या लोकांचा, मदियनच्या लोकांचा आणि उध्वस्त झालेल्या नगरांचा वृत्तांत कधी ऐकला नाही का? त्यांच्या प्रेषितांनी त्यांच्याकडे सत्याचा स्पष्ट पुरावा आणला होता. त्यांच्यावर अन्याय करणारा ईश्वर नव्हता. त्यांनीच स्वतः वर अन्याय केला आहे.

[७१] श्रद्धावंत स्त्रिया आणि पुरुष हे एकमेकांचे मित्र आहेत. ते चांगल्याचा आग्रह धरतात. वाईटाला मनाई करतात, नियमित प्रार्थना करतात, दानधर्म करतात आणि ईश्वराची व त्याच्या प्रेषिताची आज्ञा पाळतात. त्यांच्यावर ईश्वर दया करेल. कारण ईश्वर सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान आहे. [७२] श्रद्धावंत स्त्री-पुरुषांना ईश्वराने त्यांना असे बगीचे द्यायचे वचन दिले आहे जिथे नद्या वाहत असतील. या बगीच्यात ते कायम निवास करतील आणि या चिरंतन बगीच्यात त्यांची शानदार घरे असतील. पण ईश्वराची अनुकूल संतुष्टी याहून महान आहे. ती सर्वोच्च उपलब्धी आहे.

[७३] हे प्रेषिता! सत्य नाकारणाऱ्यांविरुद्ध व ढोंग्यांविरुद्ध लढा द्या आणि त्यांच्याविरुद्ध ठाम रहा. नरकासारखे गलिच्छ ठिकाण त्यांचे निवासस्थान असेल. [७४] ईश्वराची शपथ घेऊन ते असे केले नसल्याचे सांगतात. तरीही इस्लाम स्वीकारल्यानंतर त्यांनी सत्य नाकारणारे शब्द उच्चारले.

त्यांनी कट रचला होता पण तो ते अमलात आणू शकले नाहीत. ईश्वराने आपल्या कृपेने त्यांना समृद्ध केले असले तरी ईश्वरासाठी आणि त्याच्या प्रेषितासाठी त्यांचा प्रतिसाद फक्त द्वेषपूर्ण होता. त्यांनी पश्चाताप व्यक्त केला तर खरोखर त्यांचे कल्याण होईल. पण त्यांनी पाठ फिरवली तर ईश्वर त्यांना या जगात आणि मृत्युपश्चात जगात हालअपेष्टांची शिक्षा देईल आणि पृथ्वीवर त्यांच्या रक्षणासाठी किंवा मदतीसाठी कुणी नसेल.

७५ त्यांच्यापैकी काहीजण असे आहेत जे ईश्वराची शपथ घेऊन
म्हणतात, "ईश्वराने आपल्या कृपेने आम्हाला धन दिले, तर आम्ही
नक्कीच दानधर्म करू आणि सदाचारी होऊ." ७६ पण जेव्हा त्याने कृपेचा
लाभ दिला तेव्हा ते कंजूष बनले आणि तिरस्काराने त्यांनी पाठ फिरवली.
७७ ते खोटे बोलले आणि ईश्वराला दिलेला शब्द मोडला, यासाठी ईश्वराने
त्याची भेट होण्याच्या दिवसापर्यंत (निवाड्याच्या दिवसापर्यंत) त्यांच्या
अंतःकरणात ढोंगाला वसवले. ७८ ते जे उघड करत नाहीत आणि गुप्तपणे
जे बोलतात ते आणि लपवलेले सगळे ईश्वर जाणतो. हे त्यांना माहीत
नाही का? ७९ ईश्वरी कार्यासाठी मुक्तहस्ते दानधर्म करणाऱ्या श्रद्धावंतांची
खिल्ली उडवणाऱ्यांची आणि ज्यांच्याकडे दानधर्मासाठी परिश्रमपूर्वक
कमावलेल्या धनाव्यतिरिक्त काहीही नाही, त्यांना टोमणे मारणाऱ्यांची
थट्टा ईश्वर त्यांच्यावरच उलटवेल. त्यांना कठोर शिक्षा भोगावी लागेल.
८० (प्रेषित!) तुम्ही त्यांच्यासाठी क्षमायाचना केलीत काय आणि नाही
काय, सारखेच आहे. तुम्ही त्यांच्यासाठी सत्तर वेळा जरी क्षमा याचना
केलीत तरी ईश्वर त्यांना माफ करणार नाही, कारण त्यांनी ईश्वराला
आणि त्याच्या प्रेषिताला नाकारले आहे. ईश्वर अपराध्यांना मार्गदर्शन
देत नाही.

८१ जे घरात राहिले ते ईश्वराच्या प्रेषिताने मागे राहून दिल्याने आनंदित

झाले होते. सर्वस्वानिशी (धन व प्राणानिशी) ईश्वरी कार्यासाठी कठोर परिश्रम करण्याचा त्यांना तिरस्कार वाटतो. ते म्हणाले, "या उन्हात घराबाहेर पडून पुढे जाऊ नका." त्यांना सांगा, "नरकाग्नी यापेक्षा खूप दाहक आहे! पण त्यांना हे समजले तर!" ८२ त्यांना थोडे हसू द्या आणि त्यांच्या दुष्कृत्यांच्या मोबदल्यात प्रचंड शोक करू द्या. ८३ तेव्हा हे प्रेषिता! ईश्वराने त्यांच्या एका गटाला पुन्हा तुमच्यासमोर आणले आणि त्यांनी तुमच्याबरोबर येण्याची परवानगी मागितली तर त्यांना सांगा, "तुम्ही कधीही माझ्याबरोबर येऊ शकणार नाही आणि माझ्याबरोबर शत्रूशी लढणार नाही. पहिल्या वेळेस तुम्हाला घरी थांबायचे होते तेव्हा आताही मागे थांबणाऱ्यांबरोबर घरातच रहा." ८४ आणि (हे मोहम्मद!) त्यांच्यापैकी कुणाचा मृत्यू झाला, तर त्यांच्यासाठी प्रार्थना करू नका, की त्यांच्या थडग्यापाशी थांबू नका. त्यांनी ईश्वराला आणि त्याच्या प्रेषिताला नाकारले आहे आणि सत्याचे विरोधक म्हणून त्यांचा मृत्यू झाला आहे.

८५ त्यांच्या संपत्तीने आणि संततीने दिपून जाऊ नका. ईश्वरालाच या जगात या गोष्टींच्या मार्फत त्यांना शिक्षा द्यायची आहे. सत्य नाकारलेल्या स्थितीतच त्यांचा प्राण यांना सोडून जाऊ दे. ८६ ईश्वरावर श्रद्धा ठेवा आणि त्याच्या प्रेषिताबरोबर ईश्वरी कार्यासाठी लढा, असा आदेश देणारा अध्याय प्रकट झाल्यावर त्यांच्यातले धनाढ्य तुमच्याकडे सूट मागतात, "मागे राहणाऱ्यांबरोबर आम्हाला घरात राहू द्या." ८७ घरी राहिलेल्यांबरोबर (स्त्रियांबरोबर) मागे राहणे त्यांना पसंत होते; त्यांची मने मोहोरबंद झाली होती. म्हणून ते सत्याचा संदेश ग्रहण करू शकणार नाहीत. ८८ पण प्रेषित आणि त्याच्याबरोबरीने श्रद्धा ठेवणारे श्रद्धावंत ईश्वरी कार्यासाठी संपत्ती आणि प्राणानिशी (सर्वस्वानिशी) झटले. हे असे लोक आहेत ज्यांचे सर्व

प्रकारे कल्याण होईल. [८९] आणि ईश्वराने त्यांच्यासाठी खळाळत्या नद्या असलेले बगीचे सुसज्ज ठेवले आहेत. जिथे त्यांचा कायमचा वास असेल. हा सर्वोच्च विजय आहे.

[९०] वाळवंटातील काही अरबही सबबी सांगण्यासाठी आणि तुमच्याकडे सूट मागण्यासाठी आले होते. ईश्वराशी आणि त्याच्या प्रेषिताशी खोटे बोलणारे मागे राहून घरात थांबले होते. त्यांच्यापैकी ज्यांनी सत्य नाकारले, त्यांना वेदनादायी शिक्षेला सामोरे जावे लागेल. [९१] पण जे दुर्बल, आजारी आणि निर्धन आहेत त्यांना दोष लागणार नाही, जर ते ईश्वराशी आणि त्याच्या प्रेषिताशी प्रामाणिक असतील तर. सत्कर्मे करणाऱ्यांना घाबरायचे काही कारण नाही; ईश्वर अतिशय क्षमाशील आणि दयाशील आहे. [९२] काहीजण प्रवास करण्यासाठी प्राण्यांची सोय करायला तुम्हाला सांगतात. तुम्ही त्यांना सांगितले, "तुमच्या प्रवासासाठी मी काही व्यवस्था करू शकत नाही." तेव्हा ईश्वरी कार्यात योगदान देण्याचा कुठला मार्ग न मिळाल्याने डोळ्यात दुःखद अश्रू घेऊन ते माघारी फिरतात. त्यांनाही कसला दोष लागणार नाही. [९३] दोषपात्र ते आहेत जे धनाढ्य असून सूट मागतात. घरात राहिलेल्या (स्त्रियांबरोबर) मागे राहण्यात ते संतुष्ट आहेत. ईश्वराने त्यांची मने बंद (कठोर) केली आहेत. त्यामुळे त्यांना काही कळत नाही.

[९४] (श्रद्धावंतांनो!) तुम्ही त्यांच्याकडे परत गेल्यावर ते तुम्हाला अनेक सबबी सांगतील. त्यांना सांगा, "काहीही सबबी सांगू नका, आम्ही तुमच्यावर विश्वास ठेवणार नाही. ईश्वराने अगोदरच आम्हाला तुमची माहिती दिली आहे. ईश्वर तुमची कृत्ये बघेल, तसेच त्याचा प्रेषितही बघेल. त्यानंतर दृश्य आणि अदृश्याची जाण असणारा जो एकमेव आहे त्याच्याकडे तुम्हाला परत नेले जाईल आणि तुम्ही कसे वागत होता, हे तो

तुम्हाला सांगेल.” ९५ तुम्ही परत आल्यावर, त्यांना सोडून द्यावे यासाठी ते तुमच्यासमोर ईश्वराची शपथ घेतील, तेव्हा त्यांना सोडून द्या. ते अशुद्ध आहेत आणि त्यांच्या कर्माचा मोबदला म्हणून नरक हे त्यांचे घर असेल. ९६ तुम्हाला खुश करण्यासाठी ते तुमच्यासमोर शपथ घेतील. पण तुम्ही खुश झालात, तरी दुराचारी लोकांमुळे ईश्वर खुश होणार नाही.

९७ वाळवंटातले अरब सत्य नाकारण्याच्या बाबतीत आणि ढोंगीपणाच्या बाबतीत जास्त दुराग्रही आहेत. ईश्वराने त्याच्या प्रेषितासमोर प्रकट केलेल्या मर्यादांविषयी ते कमीत कमी सजग आहेत. ईश्वर सर्वज्ञ आणि बुद्धिवंत आहे. ९८ काही वाळवंटातील अरब ईश्वरी कार्यासाठी जे देतात ते त्याला दंड मानतात आणि ते तुमच्यावर दुर्दैवी प्रसंग ओढवण्याची वाट पहात असतात. त्यांच्यावरच दुर्दैवी प्रसंग ओढवो! ईश्वर सगळे ऐकतो आणि सगळे जाणतो. ९९ त्यांच्यापैकी काहीजण असेही आहेत जे ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवतात व ईश्वरी कार्यासाठी जो खर्च करतात त्याला ईश्वराच्या जवळ जाण्याचे आणि त्याच्या प्रेषिताच्या प्रार्थनेला पात्र बनण्याचे साधन मानतात. हे त्यांच्यासाठी नक्कीच ईश्वराच्या जवळ जाण्याचे साधन असेल. ईश्वर त्यांच्यावर दयादृष्टी ठेवेल; तो खरोखर अतिशय क्षमाशील, दयाशील आहे.

१०० मातृभूमीचा त्याग करून ईश्वरी कार्यासाठी पहिल्यांदा स्थलांतर करणाऱ्यांवर, त्यांना पाठिंबा देणाऱ्यांवर, त्याचप्रमाणे उमदेपणाने त्यांचे अनुसरण करणाऱ्यांवर ईश्वर अगदी संतुष्ट आहे आणि तेही ईश्वरावर अगदी संतुष्ट आहेत. ईश्वराने त्यांच्यासाठी वाहत्या नद्या असणारे बगीचे सज्ज केले आहेत. तिथे त्यांचे कायमचे वास्तव्य असेल. ही सर्वोच्च उपलब्धी आहे. १०१ तुमच्या आजूबाजूला वावरणारे वाळवंटातील काही अरब, काही मदिनावासी ढोंगी आहेत. त्यांच्या ढोंगीपणात ते दुराग्रही

आहेत. त्याचप्रमाणे तुम्ही त्यांना ओळखत नाही, पण आम्ही ओळखतो. आम्ही त्यांना दुप्पट हालअपेष्टा सोसायला लावू आणि त्यानंतर भयंकर शिक्षा भोगायला लावू.

१०२ काहीजण असे आहेत, ज्यांनी आपल्या अपराधाची कबुली दिली आहे. ज्यांनी काही सत्कृत्ये केली आहेत, तर काही दुष्कृत्ये केली आहेत. ईश्वर त्यांच्याकडे दयादृष्टी वळवण्याची अपेक्षा आहे. नक्कीच ईश्वर अतिशय क्षमाशील आणि दयाशील आहे. १०३ त्यांना शुद्ध करण्यासाठी त्यांच्या संपत्तीतले दान स्वीकारा आणि त्यांना पवित्र करा आणि त्यांच्यासाठी प्रार्थना करा. तुमची प्रार्थना त्यांच्यासाठी मनःशांतीचे साधन ठरेल. ईश्वर सगळे ऐकणारा आणि सगळे जाणणारा आहे. १०४ ईश्वर त्याच्या सेवकांचा पश्चाताप मान्य करतो आणि त्यांचे दान स्वीकारतो आणि ईश्वर क्षमाशील, दयाशील आहे हे त्यांना माहीत नाही का? १०५ त्यांना सांगा, "तुम्हाला हवे तसे वागा. ईश्वर तुमच्या वागण्याचे निरीक्षण करेल आणि त्याचा प्रेषित आणि श्रद्धावंतही तुमच्या वागण्याचे निरीक्षण करतील. लवकरच तुम्हाला त्याच्याकडे परत आणले जाईल, जो लपवलेले काय आहे आणि उघड काय आहे हे जाणतो. तुमच्या वर्तनातले सत्य तो तुम्हाला दाखवेल." १०६ अद्यापही काहीजण असे आहेत, ज्यांचे खटले ईश्वराने स्थगित केले आहेत. त्याच्या इच्छेला येईल तेव्हा तो त्यांचा निवाडा करेल. तो त्यांना शिक्षा देईल किंवा त्यांच्यावर दया करेल; तो सर्वज्ञ आणि प्रज्ञावंत आहे.

१०७ शिवाय त्यांच्यापैकी काही असे आहेत, जे उपद्रव देण्यासाठी धर्मत्यागाचा प्रसार करण्याच्या आणि श्रद्धावंतांच्यात फूट पाडण्याच्या हेतूने प्रार्थनास्थळाची उभारणी करतात. सुरुवातीपासूनच ईश्वर आणि त्याच्या प्रेषिताविरुद्ध पुकारलेल्या युद्धासाठी मोक्याचे ठिकाण म्हणून ते

या इमारतीचा वापर करत होते. "आमचा हेतू चांगलाच होता" असे ते शपथपूर्वक सांगतात. पण ते खोटे बोलत असल्याचा ईश्वर साक्षीदार आहे. [१०८] त्या प्रार्थनास्थळात पाऊल ठेवू नका. आरंभापासून ईश्वरनिष्ठेच्या पायावर उभे राहिलेले प्रार्थनागृहच तुम्ही पाय ठेवण्याच्या योग्यतेचे आहे. इथे असे लोक आहेत, ज्यांना स्वत:ला शुद्ध करून घ्यायला आवडते आणि स्वतःला शुद्ध करून घेणारे लोक ईश्वराला आवडतात. [१०९] कोण अधिक चांगला आहे? ईशभय आणि त्याची अनुकूल प्रसन्नता यांच्या पायावर इमारत उभी करणारा की तुटक्या कड्याच्या डळमळीत काठावर उभी असलेली, कोणत्याही क्षणी नरकाग्नीच्या खाईत कोसळण्याच्या बेतात असलेली इमारत उभी करणारा? ईश्वर पाप्यांना मार्गदर्शन देत नाही. [११०] पाप्यांनी बांधलेली इमारत त्यांच्या अंत:करणाच्या ठिकऱ्या उडेपर्यंत त्यांच्या मनात तीव्र अस्वस्थता माजवायचे थांबवणार नाही. ईश्वर सर्वज्ञ आणि बुद्धिवंत आहे.

[१११] ईश्वराने स्वर्गाच्या मोबदल्यात श्रद्धावंतांच्या आयुष्याचे आणि संपत्तीचे मोल घेतले आहे. ते ईश्वरी कार्यासाठी लढतात आणि शत्रूला ठार करतात आणि स्वतःचे बलिदान देतात. तोराह, बायबल व कुरआन या ग्रंथांमधून ईश्वराने या बांधिलकीचे वचन दिले आहे आणि वचनाला जागण्यात ईश्वरापेक्षा सच्चा कोण आहे? तेव्हा तुम्ही केलेल्या व्यवहाराचा आनंदोत्सव साजरा करा. ही सर्वोच्च प्राप्ती आहे. [११२] (श्रद्धावंत ते आहेत जे) पश्चातापपूर्वक ईश्वराकडे वळतात, त्याची उपासना आणि स्तुती करतात, त्याच्या कार्यासाठी भूमीत भ्रमण करतात, ईश्वरासमोर नमन करतात, त्याच्यापुढे नतमस्तक होतात, चांगल्याची आज्ञा देतात आणि वाईटाला मनाई करतात आणि ईश्वराने नेमून दिलेल्या मर्यादांचे पालन करतात, ते खरे श्रद्धावंत. त्यांना सुवार्ता द्या!

[११३] अनेकेश्वरवाद्यांनी नरकवासाची शिक्षा ओढवून घेतली आहे, हे

स्पष्ट झाल्यावर ते जवळचे नातलग असले तरी त्यांच्यासाठी ईश्वराकडे क्षमायाचना करणे प्रेषितासाठी आणि श्रद्धावंतांसाठी योग्य नाही. ११४ अब्राहामने आपल्या पित्यासाठी क्षमायाचना केली याचे एकमेव कारण म्हणजे त्याने पित्याला दिलेले वचन. पण आपला पिता ईश्वराचा शत्रू आहे हे स्पष्ट झाल्यावर त्याने त्यांच्याबरोबरचे संबंध तोडून टाकले. निःसंशय, अब्राहाम अतिशय मृदू मनाचा आणि संयमी होता. ११५ आपले मार्गदर्शन दिल्यानंतर आणि कशापासून स्वतःचे रक्षण करावे हे स्पष्ट केल्यानंतर ईश्वर लोकांना सन्मार्गापासून कधीही दूर जाऊ देणार नाही. ईश्वराला सगळ्या गोष्टीचे ज्ञान आहे. ११६ नक्कीच आकाशाचे आणि पृथ्वीचे साम्राज्य ईश्वराचे आहे. तो जीवन आणि मृत्यू देतो. तुम्हाला त्याच्याशिवाय कुणी रक्षक आणि सहाय्यक नाही.

११७ ईश्वराने प्रेषितावर, कठीण परिस्थितीत त्याला साथ देणाऱ्यांवर (अन्सार)[अ] आणि मायभूमीचा त्याग करणाऱ्यांवर (मुहाजिर)[ब] दयादृष्टी ठेवली आहे. त्यांच्यापैकी एका गटाची मने जवळपास डळमळीत झाल्यावर त्याने त्यांच्याकडे दयादृष्टी वळवली. कारण त्याला त्यांच्याविषयी करुणा आणि दया वाटली. ११८ ज्या तिघांचा निवाडा त्याने लांबणीवर टाकला होता, त्यांच्याकडेही त्याने दयादृष्टी वळवली. पृथ्वीचा प्रचंड अवकाश त्यांच्यासाठी बंद झाल्यावर आणि त्यांचे आत्मे त्यांना

[अ] [ब] अन्सार व मुहाजिर: अन्सार म्हणजे मदत करणारे. ज्यावेळी मक्केतील मूर्तिपूजकांचा दहा वर्षांपासून चाललेला छळ असहनीय झाला होता, त्यावेळी पैगंबर व त्यांच्या सहकाऱ्यांनी मक्केहून मदिनेला स्थलांतर केले. अशा कठीण काळात पैगंबर व त्यांच्या साथीदारांना आश्रय देणारे आणि त्यांची सर्व प्रकारे मदत करणारे जे होते ते म्हणजे मदिनेतील श्रद्धावंत. त्यांच्या या अभूतपूर्व कार्यामुळे इतिहासात ते अन्सार म्हणून ओळखले गेले. स्थलांतर करून आलेले मुस्लिम म्हणजे मुहाजिर.

संकुचित झाल्यासारखे वाटू लागल्यावर आणि ईश्वरापासून वाचण्यासाठी ईश्वराशिवाय दुसरे आश्रयस्थान नाही. त्यांनी ईश्वराकडे वळावे यासाठी त्याने त्यांच्याकडे दयादृष्टी वळवली. ईश्वर सदा दयाशील आणि अतिशय क्षमाशील आहे.

[११९] श्रद्धावंतांनो! ईश्वराचे भय बाळगा आणि सत्यप्रिय लोकांना भक्कम आधार द्या. [१२०] मदिनावासीयांसाठी आणि त्यांच्या आजूबाजूच्या वाळवंटातील अरबांसाठी ईश्वराच्या प्रेषिताचे अनुसरण करण्याकडे पाठ फिरवणे आणि त्याच्या जीवनापेक्षा आपल्या जीवनाला प्राधान्य देणे योग्य नव्हते. कारण ईश्वरी कार्यात जेव्हाही त्यांना तहान, भूक, थकवा यांचा सामना करावा लागेल, सत्यावर विश्वास नसणाऱ्यांना चिथावण्यासाठी ते एखादे पाऊल उचलतील किंवा जेव्हाही शत्रूला नुकसान पोहोचवतील, तेव्हा ईश्वराच्या नजरेतून ते सत्कृत्य ठरेल. सद्वर्तनी लोकांना त्यांचे प्रतिफळ द्यायला ईश्वर कधीही नकार देणार नाही. [१२१] आणि जेव्हाही ते ईश्वरी कार्यासाठी पृथ्वीवर प्रवास करतील, जेव्हाही ईश्वरी कार्यासाठी संपत्तीचा विनियोग करतील, तेव्हा त्यांच्या या सत्कृत्याची नोंद केली जाईल आणि ते करत असलेल्या सगळ्याचा ईश्वर त्यांना सर्वोत्कृष्ट मोबदला देईल.

[१२२] (युद्धकाळात) सगळ्या श्रद्धावंतांनी एकत्र जाणे योग्य नाही. मग असे का घडले नाही की, त्यांच्या प्रत्येक गटातील एका तुकडीने धर्माचे सखोल ज्ञान मिळवण्यासाठी प्रेषिताकडे जावे आणि अपप्रवृत्तींपासून स्वतःचा बचाव करण्यासाठी आपल्या लोकांना सावध करावे?

[१२३] श्रद्धावंतांनो! तुमच्याजवळच्या सत्य नाकारणाऱ्यांविरुद्ध लढा. त्यांच्याशी ठामपणे वागा. लक्षात ठेवा, ईश्वर त्यांच्याबरोबर आहे, जे त्याला घाबरतात. [१२४] जेव्हाही एखादा अध्याय प्रकट होतो तेव्हा

ते विचारतात, "यामुळे तुमच्यापैकी कुणाची सत्यावरची श्रद्धा वाढली
का?" पण जे विश्वास ठेवतात त्यांची श्रद्धा वाढते आणि प्रकटीकरणामुळे
ते आनंदित होतात. १२५ पण यामुळे ज्यांच्या मनात विकृती आहे, त्यांच्या
अपवित्रतेत भर पडली आहे आणि सत्य नाकारलेल्या अवस्थेत त्यांना
मृत्यू येतो. १२६ दरवर्षी एकदा किंवा दोनदा त्यांची कसोटी बघितली
जाते हे ते पहात नाहीत का? तरीही ना ते पश्चाताप व्यक्त करतात, ना
यापासून काही बोध घेतात. १२७ जेव्हाही एखादा अध्याय प्रकट होतो तेव्हा
ते एकमेकांकडे पहात विचारतात, "याकडे कुणी लक्ष देत आहे का?"
आणि नंतर ते त्याकडे पाठ फिरवतात. ईश्वराने त्यांची मने सत्यापासून दूर
नेली आहेत. कारण हे असे लोक आहेत ज्यांना समजत नाही.

१२८ तुमच्याकडे तुमच्यातील एक प्रेषित आला आहे. तुमच्या
हालअपेष्टांमुळे तो दुःखी होतो. त्याला तुमच्या कल्याणाची मनापासून
चिंता आहे. श्रद्धावंतांसाठी त्याच्या मनात खूप आपुलकी आणि करुणा
आहे. १२९ पण त्यांनी पाठ फिरवली तर त्यांना सांगा, "ईश्वर माझ्यासाठी
पुरेसा आहे. त्याच्याशिवाय अन्य कुणीही ईश्वर नाही. मी त्याच्यावर
भरवसा ठेवला आहे. तो वैभवशाली सिंहासनाचा अधिपती आहे."

प्रकरण १० : यूनुस
(यूनुस)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अलीफ लाम रा. ही सुज्ञपणाच्या गोष्टींनी ओतप्रोत ग्रंथातील
वचने आहेत. २ "माणसाला सावधगिरीचा इशारा द्या आणि ईश्वराच्या
सानिध्यात तुमच्यासाठी आदराचे स्थान आहे ही सुवार्ता श्रद्धावंतांना

द्या," असे सांगून त्यांच्यातील एका व्यक्तीवर आम्ही आमचा साक्षात्कार प्रकट केला हे लोकांना चमत्कारिक वाटते का? त्याला पाहून सत्यावर अविश्वास दाखवणारे म्हणतात, "हा माणूस निव्वळ जादूगार आहे."

३ निःसंशय! तुमचा पालनकर्ता हा एकच ईश्वर आहे, ज्याने सहा कालखंडात (सहा टप्प्यांमध्ये) आकाशाची आणि पृथ्वीची निर्मिती केली, त्यांची व्यवस्थित मांडणी केली आणि नंतर सिंहासनावर आरूढ झाला. त्याच्या परवानगीशिवाय कुणीही त्यात हस्तक्षेप करू नये. असा हा ईश्वर तुमचा पालनकर्ता आहे, तेव्हा फक्त त्याचीच उपासना करा. याकडे तुम्ही लक्ष देणार नाही का? ४ तुम्हा सगळ्यांना त्याच्याकडेच परतायचे आहे. ईश्वराचे वचन सत्य आहे. तो निर्मिती अस्तित्वात आणतो. सत्कर्मे करणाऱ्यांना व सत्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना योग्य मोबदला देण्यासाठी तिची पुनर्रचना करतो. ज्यांनी सत्य नाकारले आहे त्यांना नकारापोटी उकळते पाणी प्यावे लागेल आणि वेदनादायी शिक्षा सोसावी लागेल.

५ त्यानेच सूर्याला तेजस्वी प्रकाश उत्सर्जित करायला लावला, तर चंद्राला सौम्य, शीतल प्रकाशाची पखरण करायला लावली. तुम्हाला कालगणना शिकता यावी म्हणून त्याने चंद्रकला निर्माण केल्या. त्याने हे सगळे निश्चित हेतूशिवाय निर्माण केलेले नाही. ज्ञानी व्यक्तींसाठी त्याने आपले साक्षात्कार स्पष्ट केले आहेत. ६ दिवस रात्रीच्या अदलाबदलीत आणि आकाशात आणि भूतलावर ईश्वराने केलेल्या सगळ्या निर्मितीत ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांसाठी संकेत आहेत.

७ ऐहिक जगातील आयुष्याने संतुष्ट झाल्यामुळे जे आमचे संदेश असलेल्या संकेतांकडे दुर्लक्ष करतात आणि जे आमच्या भेटीवर विश्वास ठेवत नाहीत, ८ त्यांना त्यांच्या या कृत्यांच्या मोबदल्यात नरकात निवास

करावा लागेल. ९जे विश्वास ठेवून सत्कर्मे करतात, त्यांना त्यांच्या श्रद्धेमुळे
त्यांच्या पालनकर्त्याच्या मार्गदर्शनाचा लाभ होईल. सर्व सुखांनी भरलेल्या
स्वर्गात खळाळत्या नद्यांचे सानिध्य लाभेल. १० यामुळे हर्षभरीत होऊन
ते उद्‌गारतील, "हे ईश्वरा! तुझा गौरव असो!" एकमेकांना पाहताच ते
अभिवादन करतील: "शांती! (तुम्हाला शांतीचा लाभ होवो!)" त्यांच्या
प्रत्येक संभाषणाचा शेवट असेल, "सर्व स्तुति ईश्वरासाठी आहे, जो
विश्वाचा पालनकर्ता आहे."

११ ईश्वर ज्या तत्परतेने कल्याण करतो त्या तत्परतेने त्याने शिक्षा दिली
असती, तर त्यांचे आयुष्य केव्हाच संपून गेले असते. आमच्या भेटीची
आशा न करणाऱ्यांना आम्ही अहंभावाच्या दलदलीत चाचपडायला सोडून
देतो. १२ लोकांवर संकट ओढवताच उठता, बसता, झोपता, सदासर्वदा ते
आमची प्रार्थना करतात. पण त्यांच्यावरचे संकट दूर करताच ते आपल्या
मार्गाने निघून जातात. जणू संकट दूर करण्यासाठी त्यांनी कधी आमची
प्रार्थना केलीच नव्हती. अशा रीतीने अपराध्यांना त्यांची कृत्ये योग्य
आहेत असे भासवले जाते.

१३ तुमच्या आधीच्या पिढ्यांनी सतत दुष्कृत्ये केली तेव्हा आम्ही
त्यांचा सर्वनाश केला. त्यांचे प्रेषित त्यांच्याकडे आमचे स्पष्ट संकेत
घेऊन आले होते. पण त्यांनी विश्वास ठेवला नाही. अपराध्यांचा बदला
आम्ही असा घेतो. १४ यानंतर तुम्ही कसे आचरण करता, याचे निरीक्षण
करता यावे यासाठी आम्ही या भूमीवर तुम्हाला त्यांचे वंशज बनवले.

१५ आमचे स्पष्ट संदेश त्यांना ऐकवले असता आम्हाला भेटायची
अपेक्षा न ठेवणारे म्हणतात, "आमच्यासाठी वेगळे कुरआन आणा किंवा
यात काही फेरफार करा." त्यांना सांगा, "माझ्या इच्छेने यात बदल
करायची मला परवानगी नाही. मी फक्त माझ्यासमोर जे प्रकट झाले आहे,

त्यानुसार वागतो. मी माझ्या पालनकर्त्याची आज्ञा मोडली तर त्या भयंकर
दिवशी मिळणाऱ्या शिक्षेची मला भीती वाटते." १६ त्यांना सांगा, ईश्वराची
इच्छा असती तर ना मी हे तुम्हाला ऐकवले असते, ना त्याने तुम्हाला
याचे ज्ञान करून दिले असते. खरोखर, हे सत्य माझ्याकडे येण्यापूर्वी
सगळे आयुष्य मी तुमच्याबरोबर जगलो आहे. तुम्ही तुमच्या बुद्धीचा
वापर करत नाही का? १७ ईश्वराविषयी बनावट गोष्टी रचणाऱ्यांपेक्षा
किंवा त्याचे संकेत नाकारणाऱ्यांपेक्षा जास्त अन्यायी कोण आहे? नक्कीच
अपराध्यांची कधीही प्रगती होणार नाही.

१८ ईश्वराव्यतिरिक्त हे अशाची उपासना करतात, ज्याचा त्यांना ना
फायदा होतो ना तोटा; आणि म्हणतात, "हे ईश्वराकडे आमची शिफारस
करणारे आहेत." त्यांना सांगा, "आकाश आणि पृथ्वीची अशी काही
माहिती तुम्ही ईश्वराला देता का जी त्याला माहीत नाही? ईश्वराचा गौरव
असो! ते ज्यांना ईश्वराच्या बरोबरीचे मानतात त्याच्यापेक्षा तो कितीतरी
श्रेष्ठ आहे." १९ सुरुवातीला संपूर्ण मानवजात हा एकच समाज होता,
पुढे त्यांच्यात मतभेद झाले. तुमच्या पालनकर्त्याने ती वेळ आधीपासून
निश्चित केली नसती, तर त्यांच्यातले मतभेद मिटवले गेले असते.

२० ते विचारतात, "त्यांच्या पालनकर्त्याने त्याच्या प्रेषिताबरोबर
एखादी खूण का नाही पाठवली?" त्यांना सांगा, "फक्त ईश्वराकडेच
अदृश्याचे ज्ञान आहे. तेव्हा वाट पहा, मीही तुमच्याबरोबर वाट पहात
आहे." २१ संकट ओढवल्यावर जेव्हाही आम्ही लोकांना आमच्या दयेची
चव चाखवली, तिथून पुढे ते आमच्या संदेशांविरुद्ध खोटे युक्तिवाद रचू
लागले. त्यांना सांगा, "ईश्वर त्याचा डाव रचण्यात तत्पर आहे. आमचे
दूत तुमची कारस्थाने नोंदवत आहेत."

२२ तुम्हाला भूमीवरून आणि सागरातून प्रवास करायला सक्षम

करणारा ईश्वर आहे. तुम्ही जहाजातून समुद्रसफर करत असताना आणि अनुकूल वाऱ्याचा आनंद लुटत असताना, जहाजाच्या वरच्या मजल्यावर असणाऱ्यांवर लाटा उसळू लागतात आणि आपण वेढले गेलोय असे त्यांना वाटते. अशा प्रसंगी प्रामाणिकपणे ते ईश्वराला कळकळीची विनंती करतात, "यातून सोडवलंस तर आम्ही नक्कीच कृतज्ञ राहू." २३ पण ईश्वराने यातून त्यांची सुटका करताच, अन्यायाने ते या भूमीत दुर्वर्तन करू लागतात. लोकहो! तुमच्या दुर्वर्तनाने फक्त तुमचेच नुकसान होईल. वर्तमान जीवनाचा आनंद उपभोगून घ्या. त्यानंतर तुम्हाला आमच्याकडेच परतायचे आहे आणि आम्ही तुम्हाला तुमच्या सगळ्या कर्माची जाणीव करून देऊ.

२४ ऐहिक जगातले जीवन आम्ही आकाशातून करत असलेल्या जलवर्षावासारखे आहे. धरतीवरील वनस्पती हे पाणी शोषून घेतात आणि मानव, पशुपक्षी त्यांच्यापासून पोषण मिळवतात. पण धरती जेव्हा उत्कृष्ट पोषाख धारण करते, सुंदर दिसू लागते आणि लोकांना वाटते ती आपल्या नियंत्रणात आली आहे. तेव्हा अचानक एखाद्या दिवशी किंवा रात्री तिच्याकडे आमचा आदेश येतो आणि या धरतीला आम्ही उजाड वाळवंट करून टाकतो. जणूकाही आदल्या दिवशी तिथे काहीच नव्हते. अशा प्रकारे चिंतन करणाऱ्यांसाठी आम्ही आमचे संकेत सुस्पष्ट करतो.

२५ ईश्वर मानवाला शांतीच्या निवासस्थानाकडे बोलवतो आणि त्याच्या इच्छेला येईल त्याला तो सन्मार्गाचे मार्गदर्शन करतो. २६ सत्कृत्ये करणाऱ्यांना नेहमी चांगला मोबदला मिळेल, शिवाय आणखी लाभ मिळतील. त्यांच्या चेहऱ्यावर ना कधी दुःख दिसेल, ना कधी त्यांची अप्रतिष्ठा होईल. त्यांच्या नशिबी स्वर्ग लिहिला असून तिथे ते कायम वास्तव्य करतील. २७ पण ज्यांनी दुष्कृत्ये केली आहेत, त्यांना त्याच पटीतला मोबदला मिळेल. ईश्वरापासून कुणीही त्यांचा बचाव करणार

नाही. रात्रीने आपल्या काळोखाचा पडदा त्यांच्या चेहऱ्यावर धरावा, तशी अप्रतिष्ठा त्यांना घेरून टाकेल. हे असे लोक आहेत ज्यांच्या नशिबी नरकाग्नी असून तिथे त्यांना कायम वास्तव्य करावे लागेल.

२८ ज्या दिवशी आम्ही सगळ्यांना एकत्र जमवू तेव्हा अनेकेश्वरवाद्यांना सांगू, "तुम्ही आणि ज्यांना पूज्य मानलेले होते त्यांनी आपापल्या जागी थांबावे!" त्यानंतर आम्ही त्यांना एकमेकांपासून वेगळे करू आणि त्यांनी ज्यांना पूज्य बनवले होते ते म्हणतील, "तुम्ही ज्यांची उपासना करत होता, ते आम्ही नव्हे." २९ तुमच्या आमच्यातला साक्षीदार म्हणून ईश्वर पुरेसा आहे. तुम्ही आमची उपासना करत होता याची आम्हाला मुळीच जाणीव नव्हती. ३० यानंतर प्रत्येकाला आपल्या कर्माची जाणीव होईल. त्यांना त्यांच्या खऱ्या पालनकर्त्याकडे, ईश्वराकडे पाठवले जाईल आणि त्यांनी मानलेल्या खोट्या गोष्टी त्यांच्यापासून नाहीशा होतील.

३१ त्यांना विचारा, "आकाशातून आणि पृथ्वीवर तुमच्या उपजीविकेची तरतूद कोण करतो? तुमच्या कानावर आणि डोळ्यांवर कोण नियंत्रण ठेवतो? जन्मानंतर मृत्यू आणि मृत्युनंतर जीवन कोण देतो? सगळ्या घडामोडींचे नियमन कोण करतो?" ते म्हणतील, "ईश्वर!" यावर विचारा, "तरीही तुम्ही ईश्वराला भिऊन राहणार नाही का? ३२ तो ईश्वर आहे, तुमचा खरा पालनकर्ता आहे. कारण सत्याचा त्याग केल्यानंतर मार्गभ्रष्टतेशिवाय काय बाकी राहणार? मग तुम्ही (सत्यापासून) दूर कसे बरे जाऊ शकता?" ३३ अशा रीतीने अवज्ञा करणाऱ्यांविरुद्ध तुमच्या पालनकर्त्याचा शब्द खरा ठरला आहे. ते विश्वास ठेवणार नाहीत.

३४ त्यांना विचारा, "तुम्ही ज्यांना ईश्वरासमान मानले आहे ते शून्यातून नवनिर्मिती करू शकतात का? आणि त्याची पुनर्निर्मिती करू शकतात

का? शून्यातून नवनिर्मिती करणारा आणि त्याची पुनर्रचना करणारा ईश्वर आहे. तरीही तुम्ही इतक्या चुकीच्या मार्गाला कसे जाता?" ३५ त्यांना विचारा, "तुम्ही मानलेली ईश्वरतुल्य दैवते कुणाला सत्याचे मार्गदर्शन करतात का? सत्याचे मार्गदर्शन देण्यास ईश्वर आहे, तर मग अधिक अनुसरणपात्र कोण आहे? सत्याचे मार्गदर्शन करतो तो, की ज्याला इतरांच्या मार्गदर्शनाशिवाय वाट सापडत नाही तो? तुम्हाला काय झाले आहे? तुमचे विचार किती चुकीचे आहेत?" ३६ त्यांच्यापैकी बहुतेक तर फक्त अनुमानानुसार चालतात. पण सत्यासमोर अनुमानाचा टिकाव लागत नाही. त्यांच्या कर्माविषयी ईश्वर चांगला जागरूक आहे.

३७ हे कुरआन असे नाही जे ईश्वराशिवाय कुणी निर्माण केले आहे. ते आधीच्या ग्रंथातील (भाकितांची) पूर्तता करते आणि पूर्वी प्रकट झालेल्या साक्षात्कारांचे (खरे) स्पष्टीकरण देते. यात काहीच शंका नाही की, ते विश्वाच्या पालनकर्त्याने प्रकट केले आहे. ३८ ते विचारतात, "कुरआन ईश्वराने निर्माण केले आहे का?" त्यांना सांगा, "त्याच्यासारखा एखादा अध्याय माझ्याकडे आणा आणि तुमच्या बोलण्यात तथ्य असेल तर मदतीसाठी ईश्वराव्यतिरिक्त अन्य कुणाचाही धावा करा." ३९ खरोखर, ते अशा गोष्टी नाकारत आहेत ज्याची त्यांना अजून जाणीव झालेली नाही. त्यातील वस्तुस्थिती अद्याप त्यांना कळलेली नाही. त्यांच्या आधी होऊन गेलेल्यांनी असेच सत्य नाकारले होते. पण त्या अपराध्यांचा कसा दुर्दैवी अंत झाला ते पहा!

४० त्यांच्यापैकी काही यावर (कुरआनवर) विश्वास ठेवतील, तर काही ठेवणार नाहीत आणि तुमचा पालनकर्ता पाप्यांना पूर्ण ओळखतो. ४१ त्यांनी तुम्हाला नाकारले तर सांगा, "तुमचे कर्म तुमच्यापाशी अन् माझे माझ्यापाशी. ना माझ्या कर्माशी तुम्ही बांधील आहात, ना तुमच्या

कर्माशी मी.” ४२ त्यांच्यापैकी काही तुमचे बोलणे लक्षपूर्वक ऐकल्यासारखे
दाखवतात, पण काहीही समजू न शकणाऱ्या बहिऱ्यांना तुम्ही काही ऐकवू
शकाल का? ४३ त्यांच्यापैकी काही तुमच्याकडे टक लावून पाहतात.
पण नजरेचा अभाव असणाऱ्या अंधांना तुम्ही काही दाखवू शकाल का?
४४ निःसंशय! ईश्वर कुणावर अजिबात अन्याय करत नाही, पण लोक
स्वतःवर अन्याय करतात.

४५ ज्या अंतिम दिवशी तो त्यांना एकत्र करेल त्या दिवशी त्यांना
वाटेल, जणू ऐहिक जगात त्यांनी दिवसातल्या तासाभरापेक्षा जास्त वेळ
घालवला नाही. तिथे ते एकमेकांना ओळखतील. ईश्वराची भेट अटळ
आहे हे खोटे मानणारे आणि सन्मार्गाचे अनुसरण न करणारे खरोखर
पराभूत होतील. ४६ आम्ही ज्याचे वचन दिले होते त्यापैकी काही तुम्हाला
दाखवले किंवा त्यापूर्वी तुम्हाला मृत्यू आणला, तरी त्या सगळ्यांना
आमच्याकडेच परतायचे आहे. ईश्वर त्यांच्या सगळ्या कर्मांचा साक्षीदार
आहे. ४७ प्रत्येक समुदायाचा एक प्रेषित आहे. एकदा त्यांचा प्रेषित
त्यांच्याकडे आला की, संपूर्ण न्यायबुद्धीने त्यांचा निवाडा केला जातो
आणि त्यांच्यावर अन्याय केला जात नाही.

४८ ते (सत्य नाकारणारे) विचारतात, “तुमचे बोलणे खरे असेल तर
ते (आमच्यावर शिक्षा कोसळण्याचे) वचन कधी पूर्ण केले जाईल?”
४९ त्यांना सांगा, “ईश्वराची मर्जी असल्याशिवाय माझा स्वतःचा फायदा-
तोटाही माझ्या नियंत्रणात नाही. तथापि, प्रत्येक समाजासाठी एक
कालावधी निश्चित केलेला आहे. त्यांच्या कालावधीचा शेवट येताच,
ते त्यात क्षणाचाही विलंब किंवा त्वरा करू शकत नाहीत.” ५० त्यांना
विचारा, “रात्रीच्या काळोखात किंवा दिवसाच्या उजेडात ही शिक्षा
तुमच्यावर आली, तर अपराधी त्यापासून सुटका कशी करून घेणार

आहेत?'' ५१ ती लवकरात लवकर यावी अशी तुमची इच्छा होती, तरीही
शिक्षा तुमच्यावर कोसळल्यावरच तुम्ही त्यावर विश्वास ठेवणार का?
५२ यानंतर अपराध्यांना सांगितले जाईल, ''चाखा आता चिरकालीन सजा.
तुम्हाला तुमच्या कर्मासारखाच मोबदला मिळणार ना?''

५३ ते तुमच्याकडे चौकशी करतील, ''असे खरेच घडेल का?'' त्यांना
सांगा, ''हो, माझ्या पालनकर्त्याची शपथ! असे नक्कीच घडेल आणि तुम्ही
ते रोखू शकणार नाही.'' ५४ प्रत्येक अपराध्याकडे पृथ्वीवरची सगळी संपत्ती
असती, तरी आपल्या सुटकेच्या मोबदल्यात ती द्यायला ते तयार झाले
असते. जेव्हा ते शिक्षा बघतील तेव्हा एकांतात पश्चाताप व्यक्त करतील.
पण पूर्ण न्यायाने त्यांचा निवाडा केला जाईल आणि त्यांच्यावर अन्याय
केला जाणार नाही. ५५ निश्चितच, आकाशातली आणि पृथ्वीवरची प्रत्येक
गोष्ट ईश्वराच्या मालकीची आहे. निश्चितच, ईश्वराचे वचन सत्य आहे.
तरीही त्यांच्यापैकी बहुतेकांना ते कळत नाही. ५६ तो जीवन देतो आणि
मरण आणतो आणि त्याच्याकडेच तुम्हा सगळ्यांना परतायचे आहे.

५७ हे मानवांनो! तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्याकडे उपदेश आला
आहे, जो अंतःकरणातल्या विकृतीवरचा उपाय आहे आणि सच्च्या
श्रद्धावंतांसाठी मार्गदर्शन आणि कृपाशिर्वाद आहे. ५८ त्यांना सांगा,
''ईश्वराच्या दयेचा आणि कृपेचा लाभ झाल्याचा आनंदोत्सव साजरा
करा, कारण तुम्ही ऐहिक जीवनात ज्याचा साठा केला होता त्यापेक्षा
या गोष्टी चांगल्या आहेत.'' ५९ त्यांना विचारा, ''ईश्वराने तुमच्या
उपजीविकेची तरतूद केली आणि त्यातील काही गोष्टी तुम्ही अवैध
ठरवल्या तर काही वैध; याचा तुम्ही कधी विचार केला आहे का?''
त्यांना हेही विचारा, ''ईश्वराने तुम्हाला तसे करण्याची परवानगी दिली
आहे की तुम्ही त्याच्या नावावर खोट्या गोष्टी खपवत आहात?''

६० ईश्वराविषयी खोट्या गोष्टी रचणारे, पुनर्निर्माणाच्या दिवसाबद्दल काय
विचार करतात? ईश्वराचे मानवावर अनंत उपकार आहेत. पण बहुतेकजण
याविषयी कृतघ्न आहेत.
६१ तुम्ही कुठल्याही कार्यात गुंतलेले असा, कुरआनचा एखादा भाग
कथन करत असा, की अन्य काम करत असा; तुम्ही ते करत असताना
आम्ही साक्षीदार आहोत. आकाशातला आणि पृथ्वीवरचा सगळ्यात
लहानातला लहान कणही तुमच्या पालनकर्त्यापासून लपलेला नाही
आणि प्रत्येक लहान-मोठी गोष्ट एका सुस्पष्ट ग्रंथात नोंदवलेली आहे.
६२ ईश्वराच्या सान्निध्यात आहेत त्यांना ना कसली भीती असेल, ना
कसला शोक. ६३ कारण श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी आणि त्याची जाणीव
ठेवणाऱ्यांसाठी ६४ या जगात आणि मृत्युनंतरच्या जगात शुभवार्ता
आहे. ईश्वराचा शब्द कधीही बदलणार नाही. तो सर्वोच्च विजय आहे.
६५ अश्रद्धावंतांच्या बोलण्याने तुम्ही दुःखी होऊ नका. सगळे सामर्थ्य
आणि वैभव फक्त ईश्वराचे आहे; तो सगळे ऐकणारा आणि सगळे
जाणणारा आहे.
६६ नक्कीच, आकाशात आणि पृथ्वीवर जे आहे त्या सगळ्यावर
ईश्वराची मालकी आहे. जे ईश्वराऐवजी त्याला समतुल्य मानलेल्या
दैवतांचा धावा करतात, ते कुणाचे अनुसरण करत आहेत? ते फक्त
इतरांच्या भ्रामक कल्पनांचे अनुसरण करीत आहेत आणि ते फक्त
आपल्या तर्कानुसार चालतात. ६७ तुम्हाला विश्रांती मिळावी म्हणून त्याने
रात्र काळोखी केली, तर दिवसाला प्रकाशाचा उगम बनवले. निःसंशय!
प्रामाणिकपणे लक्ष देणाऱ्यांसाठी यात संकेत आहेत.
६८ ते म्हणतात, "ईश्वराला एक पुत्र आहे." "ईश्वर सन्माननीय
आहे. तो स्वयंपूर्ण आहे. आकाशातली आणि पृथ्वीवरची प्रत्येक वस्तू

त्याचीच आहे. तुमच्याकडे या वक्तव्यासंबंधाने कोणताच पुरावा नाही? तुम्हाला माहीत नसलेल्या गोष्टींचा संबंध तुम्ही ईश्वराशी लावता का?" ६९ त्यांना सांगा, "ईश्वराविषयी बनावट विचार मांडणाऱ्यांची भरभराट होणार नाही." ७० या जगातला उपभोग त्यांचा अल्पकालीन वाटा आहे; पण त्या सगळ्यांना आमच्याकडे आणले जाईल. मग आम्ही त्यांना तीव्र शिक्षेची चव चाखवू, कारण त्यांनी सत्य नाकारले आहे.

७१ त्यांना नोहासोबत काय घडले त्याचा वृत्तांत ऐकवा. त्याने आपल्या लोकांना सांगितले, "लोकहो! माझ्या तुमच्यातल्या उपस्थितीमुळे आणि ईशसाक्षात्काराच्या उपदेशामुळे तुम्ही दुखावले असाल तर लक्षात ठेवा, मी ईश्वरावर भरोसा ठेवतो. तेव्हा तुम्ही ज्यांना ईश्वरासमान मानले आहे, त्यांच्याबरोबर तुमचा एकत्रित कृती कार्यक्रम ठरवा आणि संकोचामुळे त्यापासून जराही विचलित होऊ नका. नंतर माझ्याविरुद्धची योजना अंमलात आणा आणि मला उसंत देऊ नका. ७२ माझ्याकडे पाठ फिरवाल तर लक्षात ठेवा, मी तुमच्याकडून मोबदला मागत नाही. फक्त ईश्वरच मला मोबदला देईल आणि ईश्वराला संपूर्ण समर्पित होण्याचा आदेश मला मिळाला आहे." ७३ नंतर त्यांनी नोहाला नाकारले. आम्ही नोहाची आणि त्याच्याबरोबर नौकेत असणाऱ्यांची सुटका केली आणि त्यांना या भूमीचे वारसदार बनवले, तर आमचे संकेत नाकारणाऱ्यांना जलसमाधी दिली. ज्यांना सावधानतेचा पूर्व इशारा दिला होता, त्यांची कशी दुर्दशा झाली, पहा!

७४ त्याच्यानंतर इतर प्रेषितांना आम्ही त्यांच्या संबंधित समाजातील लोकांकडे पाठवले आणि त्यांनी लोकांना स्पष्ट पुरावे दिले. पण ते सत्यावर विश्वास ठेवणार नाहीत, कारण त्यांनी पूर्वी ते नाकारले होते. अशा प्रकारे अपराध्यांची मने आम्ही मोहोरबंद केली.

७५ आम्ही मोझेस आणि अहरोनला फारो व त्याच्या राजदरबारींकडे
पाठवले. पण ते त्यांच्याशी उद्धटपणे वागले, कारण ते दुष्ट लोक होते.
७६ आमच्याकडील सत्य जेव्हा त्यांच्याकडे आले, तेव्हा ते म्हणाले,
"ही शुद्ध जादू आहे." ७७ मोझेसने त्यांना उत्तर दिले, "तुमच्याकडे सत्य
आल्यावर त्याविषयी तुम्ही असे बोलता? ही जादू कशी असू शकते?
जादूगारांची कधीच भरभराट होत नाही." ७८ त्यांनी विचारले, "आमचे
वाडवडील ज्यांचे अनुसरण करत आले त्यापासून आम्हाला दूर नेण्यासाठी
तुम्ही आला आहात का? म्हणजे या भूमीत तुम्ही दोघे सर्वोच्च बनू
शकाल. आम्ही तुमच्यावर कधीही विश्वास ठेवणार नाही."

७९ नंतर फारोने आपल्या राजदरबारींना फर्मावले, "प्रत्येक कुशल
जादूगाराला माझ्यासमोर हजर करा." ८० कुशल जादूगार हजर झाल्यावर
मोझेसने सांगितले, "तुमच्या जादूची शक्य ती सगळी कमाल दाखवा."
८१ जादूगारांनी आपले कसब दाखवताच मोझेस म्हणाला, "तुम्ही जे
दाखवले ते सगळे आभासी आहे. ईश्वर ते निष्फळ ठरवेल. ईश्वर
खोडसाळांच्या कामाचे समर्थन करत नाही." ८२ ईश्वर आपल्या वाणीने
सत्य स्थापित करतो, मग त्याचा पाप्यांना कितीही तिटकारा असो!

८३ पण मूठभर तरुण वगळता इतर कुणीही मोझेसवरचा विश्वास
जाहीर केला नाही (तर इतरांनी पाठ फिरवली), कारण फारो आणि
त्याचे सरदार आपला छळ करतील, याची त्यांना भीती होती. फारो त्या
भूमीचा सर्वेसर्वा आणि प्रबळ होता आणि त्याने सगळ्या मर्यादा झुगारून
दिल्या होत्या. ८४ मोझेसने सांगितले, "लोकहो! तुमची ईश्वरावर श्रद्धा
असेल आणि त्याला समर्पित असाल, तर फक्त त्याच्यावरच भरवसा
ठेवा." ८५ लोक उत्तरादाखल म्हणाले, "ईश्वरावर आमचा भरोसा आहे.
हे पालनकर्त्या! जुलमींकडून आमचा छळ होऊ देऊ नकोस. ८६ तुझ्या
दयेने सत्य नाकारणाऱ्यांपासून आमची सुटका कर."

८७ आम्ही मोझेस आणि त्याच्या भावाकडे इच्छा प्रकट केली, "या
नगरातील काही घरांची निवड करा आणि तुमच्या लोकांसाठी तिथे
प्रार्थनागृहे बनवा आणि तिथे नियमित प्रार्थना करा. हे मोझेस! श्रद्धावंतांना
ईश्वरी कृपेची शुभवार्ता दे."

८८ मोझेसने ईश्वराकडे प्रार्थना केली, "हे पालनकर्त्या! फारो आणि
त्याच्या सरदारांना तू या जीवनात सत्तेचे व संपत्तीचे वरदान दिले आहेस,
ज्यायोगे त्यांनी लोकांना तुझ्या मार्गापासून दूर नेले आहे. हे पालनकर्त्या!
त्यांची संपत्ती नष्ट कर आणि त्यांची मने इतकी कठोर बनव की भयंकर
शिक्षेचा सामना करेपर्यंत ते तुझ्यावर विश्वास ठेवणार नाहीत." ८९ ईश्वराने
सांगितले, "तुमची प्रार्थना कबूल आहे. तेव्हा तुम्ही दोघे खंबीरपणे
सन्मार्गावरून चालत रहा. ज्ञान नसणाऱ्यांच्या मार्गाचे अनुसरण करू
नका."

९० आम्ही इस्राएलच्या संततीला समुद्र पार करून आणले. फारो
आणि त्याच्या सैन्यदलाने उद्धटपणे व आक्रमकपणे त्यांचा पाठलाग
केला. समुद्रात बुडण्याचा क्षण येताच फारो उद्‌गारला, "इस्राएलची संतती
ज्याच्यावर श्रद्धा ठेवते त्याच्याशिवाय अन्य कुणी ईश्वर नाही यावर
माझा विश्वास आहे आणि मीही ईश्वराला समर्पित झालेल्यांपैकी आहे."
९१ ईश्वराने विचारले, "फक्त आता? (आता तुझे डोळे उघडले का?) या
आधी कायम तू आमच्याविरुद्ध बंडखोरी करत, श्रद्धावंतांवर अत्याचार
करत राहिलास." ९२ तेव्हा आज आम्ही तुझे शरीर जतन करू, म्हणजे
तुझ्यामागून येणाऱ्यांसाठी तू संकेत बनून राहशील. कारण बहुतांश लोक
आमच्या संकेतांकडे दुर्लक्ष करतात.

९३ इस्राएलच्या संततीला आम्ही आमचा वरदहस्त लाभलेल्या
भूमीत वसवले आणि त्यांना उपजीविकेची उत्तम साधने पुरवली. ईश्वरी

साक्षात्कारांचे ज्ञान दिल्यानंतरही त्यांच्यामध्ये मतभिन्नता आढळून आली. पुनर्निर्माणाच्या दिवशी तुमचा पालनकर्ता त्यांच्यातील मतभेदांचे निराकरण करेल.

९४ आम्ही तुमच्याकडे पाठवलेल्या ग्रंथाविषयी काही शंका असेल तर तुमच्याआधी ग्रंथाचे वाचन करणाऱ्यांकडून तिचे निराकरण करून घ्या; सत्य तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्याकडे आले आहे, तेव्हा त्यावर शंका घेणाऱ्यांपैकी होऊ नका. ९५ ईश्वराचे संदेश व वचने नाकारणाऱ्यांपैकी होऊ नका, कारण त्यानंतर तुम्ही पराभूत झालेल्यांपैकी असाल.

९६ तुमच्यापैकी ज्यांच्याविरुद्ध तुमच्या पालनकर्त्याचा हुकूम निश्चित झाला आहे, ते कदापि विश्वास ठेवणार नाहीत. ९७ प्रत्येक संकेत त्यांच्याकडे आला असला तरी खडतर शिक्षा दिसेपर्यंत ते विश्वास ठेवणार नाहीत. ९८ ईश्वरावरील आपला विश्वास आपले कल्याण करेल, या श्रद्धेपायी यूनुसचा समाज वगळता इतरांनी विश्वास का ठेवला नाही? त्यांनी विश्वास ठेवताच, ऐहिक जीवनातील लज्जास्पद छळापासून आम्ही त्यांना मुक्त केले आणि थोडक्या काळासाठी आम्ही देऊ केलेल्या तरतुदींचा उपभोग घेऊ दिला.

९९ तुमच्या पालनकर्त्याची इच्छा असती तर जगातल्या सगळ्या लोकांनी निरपवादपणे त्याच्यावर विश्वास ठेवला असता. तर मग तुम्ही लोकांवर विश्वास ठेवण्याची जबरदस्ती करणार का? १०० ईश्वराची इच्छा असल्याखेरीज कुणीही त्याच्यावर विश्वास ठेवू शकणार नाही. बुद्धीचा वापर न करणाऱ्यांना तो शंकेच्या गर्तेत लोटून देतो.

१०१ त्यांना सांगा, "पृथ्वीवर आणि आकाशात जे काही आहे त्या सगळ्या गोष्टींकडे पहा. पण संकेत आणि सावधानतेचे इशारे अश्रद्धावंतांना लाभ देत नाहीत." १०२ त्यांच्या आधी होऊन गेलेल्यांना जी शिक्षा

भोगावी लागली, त्याशिवाय अन्य कशाची ते वाट पहात आहेत? त्यांना सांगा, "त्या दिवसाची वाट पहा, मीही तुमच्याबरोबर वाट पाहणाऱ्यांपैकी आहे." १०३ आम्ही प्रेषितांचे आणि श्रद्धावंतांचे रक्षण करू. श्रद्धावंतांना सुरक्षित ठेवणे आम्ही स्वतःसाठी बंधनकारक केले आहे.

१०४ त्यांना सांगा, "लोकहो! माझ्या धर्माविषयी तुमच्या मनात काही शंका असेल तर लक्षात ठेवा, तुम्ही ईश्वराव्यतिरिक्त ज्यांची उपासना करता त्यांची उपासना मी करत नाही. पण मी ईश्वराची उपासना करतो, जो तुम्हाला मृत्यू देईल. कारण मला आज्ञा मिळाली आहे की मी श्रद्धावंतांपैकी असावे." १०५ आणि तुमचा चेहरा पूर्ण प्रामाणिकपणे खऱ्या श्रद्धेकडे ठेवा आणि ईश्वराचा दर्जा अन्य कुणाला आहे, असे मानणाऱ्यांपैकी होऊ नका. १०६ आणि ईश्वराशिवाय अन्य कुणाचा धावा करू नका, जे ना तुमची मदत करू शकतात, ना तुमचे नुकसान करू शकतात. असे केलेत तर तुम्ही अपराध्यांपैकी असाल. १०७ ईश्वराने तुमच्यावर संकट आणले तर ते त्याच्याशिवाय कुणीही दूर करू शकत नाही आणि त्याने तुमचे भले करायचे ठरवले, तर त्याची कृपा कोणी रोखू शकत नाही. तो आपल्या सेवकांपैकी त्याच्या इच्छेला येईल त्याच्यावर आपल्या कृपेचा वर्षाव करतो. तो अतिशय क्षमाशील आणि अतिशय दयाशील आहे.

१०८ त्यांना सांगा, "लोकहो! सत्य तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्याकडे आले आहे! त्या मार्गदर्शनाचा स्वीकार कराल तर त्यात तुमचेच हित सामावले आहे आणि त्यापासून दूर जाईल तो स्वतःचे नुकसान ओढवून घेईल. मला तुमचा रखवालदार म्हणून नेमलेले नाही." १०९ तुमच्यासमोर प्रकट झाले आहे त्याचे अनुसरण करा आणि (हे प्रेषिता) ईश्वर आपला निवाडा देईपर्यंत संयमाने रहा. ईश्वर सर्वोत्कृष्ट न्यायाधीश आहे.

प्रकरण ११ : हूद
(हूद)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] अलीफ लाम रा. या ग्रंथात मूलभूत स्वरूपाची वचने असून ती सर्वज्ञ आणि सदैव सजग असणाऱ्या जाणकारांकडून सविस्तर स्पष्ट केली गेली आहेत. [२] (पैगंबर! त्यांना सांगा) तुम्ही फक्त एकाच ईश्वराची उपासना करावी याची शिकवण त्यातून दिलेली आहे. तुम्हाला सावध करण्यासाठी आणि शुभवार्ता देण्यासाठी त्याने मला तुमच्याकडे पाठवले आहे. [३] तुमच्या पालनकर्त्याकडे क्षमायाचना करा आणि पश्चातापपूर्वक त्याच्याकडे वळा. तो तुम्हाला ठराविक काळासाठी उदारपणे साधनसामग्री पुरवेल आणि त्या काळात आपली गुणवत्ता सिद्ध करणाऱ्यांवर कृपेचा वरदहस्त ठेवेल. पण तुम्ही त्यापासून दूर गेलात तर त्या भयंकर दिवशी तुम्हाला शिक्षा मिळण्याची मला भीती वाटते. [४] तुम्हा सगळ्यांना ईश्वराकडे परतायचे आहे आणि चराचरावर त्याचीच सत्ता आहे.

[५] पहा! त्यांचे विचार ईश्वरापासून लपवण्यासाठी ते स्वतःला कसे झाकून घेतात. पण त्यांनी कपड्यांनी अंग झाकले तरी ते काय लपवतात आणि काय उघड करतात, हे ईश्वर ओळखतो. तो त्यांचे अंतरंगातले विचार जाणतो. [६] या पृथ्वीवर असा एकही जीव नाही ज्याची उपजीविका ईश्वराशिवाय अन्य कुणी चालवतो. तो (पृथ्वीवरील) त्याच्या (जीवनकालाचा) निर्धारित अवधी आणि त्याचे अंतिम विसाव्याचे स्थान जाणतो. एका सुस्पष्ट ग्रंथात हे सगळे नोंदवले आहे.

[७] तो आहे ईश्वर, ज्याने आकाश व पृथ्वीची निर्मिती सहा कालखंडात केली. त्याचे सिंहासन पाण्यावर होते. (निर्मितीमागचा हेतू असा आहे

की), तुमची परीक्षा घ्यावी व पाहावे की कुणाचे वर्तन सर्वोत्कृष्ट आहे; आणि जेव्हा तुम्ही म्हणता की मृत्युनंतर तुम्हाला अवश्य पुन्हा जिवंत केले जाईल, तेव्हा सत्य नाकारण्यावर आग्रही असलेले लोक नक्की हे उत्तर देतील, "ही तर निव्वळ जादू आहे." ८ त्यांना मिळणारी शिक्षा आम्ही निर्धारित काळासाठी लांबणीवर टाकली तर ते विचारतील, "आमची शिक्षा कशामुळे रोखली आहे?" ज्या दिवशी ही शिक्षा त्यांच्यावर कोसळेल तेव्हा कुणीही ती रोखू शकणार नाही. ते जिची खिल्ली उडवत असत ती गोष्ट त्यांचा घात करेल.

९ जेव्हा आम्ही कृपा करतो आणि त्यानंतर जेव्हा ती काढून घेतो, तेव्हा माणूस निराश होतो आणि कृतघ्न बनतो. १० आणि प्रतिकूल परिस्थितीनंतर आम्ही चांगले दिवस दाखवले तर तो अत्यानंदित व बढाईखोर बनतो. तो म्हणतो, "माझा खडतर काळ आता संपला आहे." ११ संयमाने राहणारे, सत्कर्मे करणारे लोक असे नसतात. त्यांना क्षमेचा आणि श्रेष्ठ मोबदल्याचा लाभ होईल.

१२ तुम्हाला तुमच्यासमोर प्रकट झालेल्या ग्रंथाचा काही भाग सोडावासा वाटेल किंवा तुम्ही दुःखी व्हाल. कारण ते विचारतील, "त्याच्याबरोबर खजिना का नाही पाठवला? त्याच्याबरोबर देवदूत का नाही आला?" पण तुम्ही त्यांना फक्त सावध करण्यासाठी आहात. सगळ्यांचा सांभाळ करणारा ईश्वर आहे. १३ ते तुम्हाला म्हणतील, "पैगंबराने स्वत: हे कुरआन रचले आहे." त्यांना सांगा, "सत्यवचनी असाल तर यातल्यासारखी (म्हणजे अशाच गुणवत्तेचे) दहा प्रकरणांची रचना करून आणा आणि मदतीसाठी ईश्वराशिवाय अन्य कुणाचाही धावा करा." १४ पण त्यांनी तुम्हाला प्रतिसाद दिला नाही तर लक्षात ठेवा, ईश्वरी ज्ञान घेऊन हे

(कुरआन) तुमच्याकडे आले आहे आणि तुमचा ईश्वर एकच आहे. तर मग तुम्ही ईश्वराला शरण जाणार ना?

[१५] जे या जगातल्या जीवनाची आणि त्यातल्या सगळ्या सुखसुविधांची अभिलाषा बाळगतात, त्यांना या जगात त्यांच्या कृत्यांचा परिपूर्ण मोबदला दिला जाईल. त्यांना काहीही नाकारले जाणार नाही. [१६] हे असे लोक आहेत ज्यांना मृत्युनंतरच्या जगात फक्त नरकाग्नीचा मोबदला मिळेल आणि ऐहिक जगातले त्यांचे कर्म निष्फळ ठरेल.

[१७] ज्यांच्याकडे आपल्या पालनकर्त्याकडून आलेला स्पष्ट पुरावा त्याचबरोबर त्याच्याकडून आलेली साक्ष आहे, मार्गदर्शन आणि दयादृष्टी म्हणून मोझेसचा ग्रंथ देण्यात आला होता, अशा लोकांची तुलना त्या श्रद्धाहीन लोकांशी कशी करता येईल? या लोकांनी त्यावर विश्वास ठेवला, तर ज्यांनी त्यातील सत्यावर अविश्वास दाखवला, त्यांना नरकाग्नीचे वचन दिले गेले. तेव्हा त्यावर शंका घेऊ नका. हे तुमच्या पालनकर्त्याकडून आलेले सत्य आहे. पण बहुतांश लोक त्यावर विश्वास ठेवत नाहीत.

[१८] ईश्वराविरुद्ध बनावट गोष्टी रचणाऱ्यांपेक्षा मोठे पाप कोण करतो? अशा लोकांना त्यांच्या पालनकर्त्यासमोर आणले जाईल आणि साक्षीदार साक्ष देईल, "हे असे लोक आहेत ज्यांनी ईश्वराविरुद्ध खोट्या गोष्टी पसरवल्या होत्या." नक्कीच असे लोक ईश्वराकडून धिक्कारले जाण्याच्या पात्रतेचे आहेत. [१९] त्याचप्रमाणे जे इतरांना ईश्वराच्या मार्गापासून दूर नेतात आणि तो वाममार्ग असल्याचे भासवू पाहतात, ते मृत्युपश्चात जीवन नाकारणाऱ्यांपैकी आहेत. [२०] हे लोक ईश्वरी योजना कधीही उधळून लावू शकत नाहीत आणि त्यांना ईश्वराशिवाय कुणी रक्षकही नसतो. कारण (सत्याचा संदेश) ऐकण्याची योग्यता ते गमावून बसले होते, तसेच (ईश्वरी

संकेत) त्यांना दिसत नव्हते. त्यांना दुप्पट शिक्षेचा सामना करावा लागेल.
[२१] हे असे लोक आहेत ज्यांनी विनाश ओढवून घेतला आहे आणि त्यांनी
रचलेल्या बनावट गोष्टी त्यांना पराभूत करतील. [२२] मृत्युपश्चात जीवनात
त्यांना फार मोठा पराभव पत्करावा लागेल.

[२३] ज्यांनी विश्वास ठेवला आणि सत्कर्मे केली आणि जे ईश्वरासमोर
(पूर्ण समर्पण भावाने) लीन झाले, त्यांच्या नशिबी स्वर्ग लिहिला आहे
आणि ते कायम तिथे वास्तव्य करतील. [२४] एका बाजूला ऐकू व पाहू
शकणारे तर दुसऱ्या बाजूला बहिरे व अंध, अशा दोन गटांची तुलना
करायची असेल तर हे दोन्हीही गट बरोबरीचे कसे असू शकतील? तरीही
(या उदाहरणांपासून) तुम्ही बोध घेणार नाही का?[अ]

[२५] आम्ही नोहाला त्याच्या समाजात पाठवले. त्याने लोकांना
सांगितले, "मी तुमच्याकडे (निवाड्याच्या दिवशी भोगाव्या लागणाऱ्या
परिणामांपासून) सावधानतेचा स्पष्ट इशारा घेऊन आलो आहे."
[२६] फक्त ईश्वराची उपासना करा अन्यथा त्या भयानक दिवशी तुमच्यावर
शिक्षा कोसळण्याची मला भीती वाटते. [२७] त्याच्या समाजातील प्रमुखांनी
सत्य जाणायला नकार दिला. ते म्हणाले, "तू आम्हाला आमच्यासारखाच
एक माणूस वाटतोस. आमच्यातल्या फक्त कनिष्ठ दर्जाच्या, अपरिपक्व
बुद्धीच्या लोकांशिवाय कुणी तुझे अनुसरण करताना दिसत नाही. आम्हाला
तुझ्या अंगी श्रेष्ठ गुणवत्ता दिसत नाही. खरेतर तू खोटारडा आहेस, यावर
आमचा विश्वास आहे."

[अ] विश्वास, विनम्रता आणि नीतिमान कृत्ये- हे तिन्ही एकाच वास्तवाचे वेगवेगळे
पैलू आहेत. विश्वास हा ईश्वर आणि त्याच्या परिपूर्ण गुणधर्मांचा जाणीवपूर्वक
शोध आहे. विनम्रता ही हृदयाची स्थिती आहे, जी ईश्वराच्या शोधाच्या परिणामी
मनुष्यामध्ये आवश्यकपणे निर्माण होते. परिणामस्वरूप तो सद्वर्तनी बनतो.

२८ नोहाने त्यांना विचारले, "लोकहो! मला सांगा, माझ्याकडे माझ्या
पालनकर्त्याकडून आलेला स्पष्ट पुरावा आहे आणि त्यांनी आपल्या कृपेने
माझ्यावर उपकार केले आहेत. पण हे तुम्ही ओळखू शकला नाहीत तर
तुमच्या इच्छेविरुद्ध मी ते तुमच्यावर कसे लादू शकतो? २९ लोकहो!
याच्या मोबदल्यात मला तुमच्याकडून एका पैचीही अपेक्षा नाही. मला
मोबदला फक्त ईश्वराकडूनच मिळतो. सत्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांना मी
कधीही दूर करणार नाही. ते नक्कीच त्यांच्या पालनकर्त्याला भेटतील.
तरीही तुम्ही अज्ञानापायी चुकीचे वागत आहात. ३० मी त्यांना माझ्यापासून
दूर केले तर ईश्वराविरुद्ध जाऊन कोण मला आधार देईल? तरीही तुम्ही
अज्ञानामुळे दुर्लक्ष करताना दिसत आहात. ३१ माझ्याकडे ईश्वराचा खजिना
आहे किंवा मला अदृश्याचे ज्ञान आहे किंवा मी (मनुष्य नसून) देवदूत
आहे, असेही मी तुम्हाला सांगत नाही. तुम्ही ज्याच्याकडे तुच्छतेने पाहता
त्याचे ईश्वर काही भले करणार नाही, असेही मी म्हणत नाही. त्यांच्या
मनात काय आहे हे ईश्वर चांगलेच ओळखतो. मी असे केले तर नक्कीच
अपराध्यांपैकी असेन."

३२ त्यांनी उत्तर दिले, "नोहा! तू आमच्याशी वाद घातलास,
अतिवाद घातलास. आता खरे बोलत असशील तर आम्हाला
ज्याची भीती घालत होतास ते आमच्यावर आणून दाखव."
३३ नोहाने सांगितले, "ईश्वराची इच्छा असेल तर तोच ती शिक्षा
तुमच्यावर आणेल; तुम्ही त्यातून सुटू शकणार नाही. ३४ ईश्वराने तुम्हाला
वाममार्गाला जाऊ दिले तर कितीही प्रामाणिकपणे तुम्हाला सल्ला देण्याची
माझी इच्छा का असेना, त्या सल्ल्याचा तुम्हाला फायदा होणार नाही.
तो तुमचा पालनकर्ता आहे आणि तुम्हाला त्याच्याकडे परतायचे आहे."

३५ जर ते म्हणाले, "त्याने स्वतःच हा बनाव रचला आहे." तर त्यांना

सांगा, "मी हा बनाव रचला असेल तर त्या पापाची शिक्षा मला मिळेल.
पण तुम्ही जे पाप करत आहात त्यापासून मी मुक्त आहे."
३६ ईश्वराने नोहासमोर आपली इच्छा प्रकट केली, ज्यांचा तुझ्यावर
आधीच विश्वास बसला आहे त्यांच्याशिवाय तुझ्या समाजातील कुणीही
तुझ्यावर विश्वास ठेवणार नाही. तेव्हा ते जे करत आहेत त्याने दुःखी होऊ
नकोस. ३७ आम्ही प्रकट केलेल्या मार्गदर्शनानुसार आमच्या नजरेखाली
एका नौकेची उभारणी कर. या अपराध्यांसाठी माझ्याकडे विनवणी करू
नकोस. नक्कीच त्यांना बुडवले जाईल. ३८ तेव्हा नोहाने नौकेची उभारणी
करायला सुरुवात केली. त्याच्या समाजातील नेते त्याच्या जवळून जाताना
त्याची खिल्ली उडवत. ते पाहून नोहा म्हणाला, "आमची खिल्ली उडवताय,
पण अशीच आम्ही तुमची आणि तुमच्या अज्ञानाची खिल्ली उडवू.
३९ कुणाला अपमानास्पद शिक्षा मिळेल आणि कुणाची चिरकालीन
शिक्षेतून सुटका होणार नाही, हे तुम्हाला लवकरच कळेल."
४० जेव्हा आमची आज्ञा आली आणि सर्व बाजूंनी पाण्याचे वेगवान
प्रवाह उसळू लागले, तेव्हा आम्ही नोहाला सांगितले, "तुझे कुटुंबिय,
सगळे खरे श्रद्धावंत आणि प्रत्येक प्रजातीच्या प्राण्यांची एक जोडी
यांच्यासह नौकेत चढ. ज्यांच्या शिक्षेचा हुकूम अगोदरच निघाला आहे
त्यांना सोबत घेऊ नकोस." पण त्याच्याबरोबर श्रद्धेचा अंगीकार करणारे
फार थोडे होते. ४१ नोहाने त्यांना सांगितले, "या नौकेत चढा. ईश्वराच्या
नामस्मरणाने ती पाण्यातून चालू लागेल आणि सुरक्षित ठिकाणी नांगरली
जाईल. खरोखर माझा पालनकर्ता दयाशील आणि क्षमाशील आहे."
४२ नौका त्यांना घेऊन पर्वताएवढ्या उंचीच्या लाटांमधून पुढे सरकू लागली.
दूर उभ्या असलेल्या आपल्या पुत्राला हाक मारून नोहाने सांगितले,
"मुला! आमच्याबरोबर नौकेत ये आणि सत्य नाकारणाऱ्यांपैकी होऊ

नकोस." ४३ त्याने उत्तर दिले, "मी एका पर्वतावर आसरा घेईन, जो माझे पाण्यापासून रक्षण करेल." नोहाने दुःखाने आक्रोश केला, "ईश्वराने ज्यांच्यावर दया केली आहे ते सोडून आज कुणालाही आसरा मिळणार नाही." एवढ्यात त्यांच्या दरम्यान अतिप्रचंड लाट उसळली आणि त्या लाटेने इतरांसह नोहाच्या मुलालाही गिळून टाकले. ४४ यानंतर एक आदेश झाला, "हे वसुंधरा! तुझ्या पृष्ठभागावरचे पाणी शोषून घे. आकाशा! तुझा जलवर्षाव थांबव." लगेचच पृथ्वीवरचे पाणी ओसरले. ईश्वरी आज्ञेची पूर्तता झाली. नौका जूडी या पर्वतापाशी येऊन थांबताच आदेश झाला, "अपराध करणाऱ्यांपासून दूर रहा."

४५ नोहाने ईश्वराचा धावा केला, "हे पालनकर्ता! माझा पुत्र माझ्या कुटुंबाचा घटक होता. तुझे वचन निःसंशय खरे होते. तू सगळ्या न्यायाधीशांमधला सगळ्यात न्यायी आहेस." ४६ ईश्वराने त्याला सांगितले, "नोहा! तो तुझ्या कुटुंबाचा घटक नव्हता. कारण, खरोखर त्याचे वर्तन सदाचारी नव्हते. तुला ज्याचे ज्ञान नाही, त्याविषयी मला प्रश्न विचारू नकोस. तुला ताकीद देतो, अज्ञानी लोकांसारखे वागू नकोस." ४७ नोहाने ईश्वराची आज्ञा मानली, "हे पालनकर्त्या! मला माहीत नसलेल्या गोष्टींविषयी तुला प्रश्न विचारण्यापासून माझे रक्षण कर. तू मला क्षमा केली नाहीस आणि माझ्यावर दया दाखवली नाहीस, तर मी पराभूत झालेल्यांपैकी असेन."

४८ ईश्वराने सांगितले, "नोहा! आता शांतपणे नौकेतून खाली उतर, तुला शांती, समृद्धी लाभेल. तुझ्यावर, तुझ्याबरोबरच्या लोकांवर आणि त्यांच्या संततीपैकी काहीजणांवर आमची कृपा राहील. (दुर्वर्तनी असणाऱ्यांनाही) ठराविक काळासाठी आम्ही सगळ्या गोष्टी पुरवू. पण नंतर त्यांच्यावर महाभयंकर संकट कोसळवू." ४९ हे प्रेषित! अदृश्याच्या

अशा वार्ता आम्ही तुझ्यासमोर प्रकट करत आहोत, ज्या पूर्वी ना तुला माहीत होत्या, ना तुझ्या लोकांना. तेव्हा संयमाने रहा; भविष्यकाळ ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांचा आहे.

५० आद समाजाकडे आम्ही त्यांचा बांधव हूद यास पाठवले. त्याने सांगितले, "लोकहो! एकाच ईश्वराची उपासना करा. तुम्हाला त्याच्याशिवाय दुसरा कुणी ईश्वर नाही. तुम्ही फक्त खोट्यानाट्या गोष्टी रचत आहात." ५१ या निरोपाच्या बदल्यात माझे तुमच्याकडून कसलेही मागणे नाही. माझा मोबदला त्याच्याकडे आहे, ज्याने मला निर्माण केले. तुम्ही तुमच्या बुद्धीचा वापर का करत नाही? ५२ "लोकहो! तुमच्या पालनकर्त्याकडे क्षमायाचना करा आणि उपरती होऊन त्याच्याकडे वळा. तो आकाशातून तुमच्यावर पाण्याचा मुबलक वर्षाव करेल. तुमच्या सामर्थ्यात भर घालेल. कुकर्म करणाऱ्यांसारखे त्याच्यापासून दूर जाऊ नका."

५३ यावर त्यांनी उत्तर दिले, "हूद! तू आमच्यासमोर कुठलाही स्पष्ट पुरावा आणलेला नाहीस. फक्त तुझ्या बोलण्यावर विसंबून आम्ही आमच्या दैवतांचा त्याग करणार नाही की तुझ्यावर विश्वास ठेवणार नाही. ५४ आमच्या दैवतांपैकी एखाद्याने तुझ्यावर ही दुर्दैवी वेळ आणली असावी." त्यावर हूदने सांगितले, "ईश्वर माझा साक्षीदार आहे आणि तुम्ही ज्याला ईश्वराचा दर्जा देता त्याच्याशी माझा काहीही संबंध नाही, याचे तुम्ही साक्षीदार आहात. ५५ तेव्हा तुम्ही सगळे मिळून माझ्याविरुद्ध कट आखा आणि त्यापासून बचाव करण्याची मला सवड देऊ नका. ५६ मी ईश्वरावर भरोसा ठेवला आहे, जो माझाही स्वामी आहे आणि तुमचाही. कारण असा कुठलाही जीव नाही, ज्याची सूत्रे त्याच्या हातात नाहीत. माझा पालनकर्ता सरळमार्गावर आहे.

५७ तुम्ही याकडे पाठ फिरवाल तर लक्षात ठेवा, जो संदेश घेऊन मला
पाठवले होते तो मी तुमच्यापर्यंत पोहोचवला आहे. माझा पालनकर्ता
तुमच्या जागी दुसऱ्या समाजाला आणेल. त्याच्या योजनेला तुम्ही
किंचितही धक्का लावू शकत नाही. कारण माझा पालनकर्ता अवघ्या
विश्वाचा सांभाळ करतो." ५८ आमची आज्ञा अवतरताच आम्ही विशेष
कृपेने हूदची व त्याच्याबरोबरच्या श्रद्धावंतांची सुटका केली, कठोर
शिक्षेपासून त्यांना वाचवले. ५९ असे होते आद समाजातील लोक, ज्यांनी
त्यांच्या पालनकर्त्याचे संकेत नाकारले आणि त्याच्या प्रेषिताची अवज्ञा
केली आणि सत्याच्या प्रत्येक कट्टर शत्रूची आज्ञा पाळली. ६० या जगात
त्यांना शाप भोगावा लागला आणि पुनर्निर्माणाच्या दिवशीही त्यांची तीच
गत होईल. खरोखर, आद समाजाने त्यांच्या पालनकर्त्यावर अविश्वास
दाखवला होता; ईश्वरी कृपेपासून दुरावलेला असा हा हूदचा समाज आद
होता!

६१ समूद जमातीकडे आम्ही सालेह या त्यांच्या बंधूस पाठवले. त्याने
सांगितले, "लोकहो! ईश्वराची उपासना करा! तुमच्यासाठी तोच एकमेव
ईश्वर आहे. मातीपासून त्याने तुम्हाला निर्माण केले आणि पृथ्वीवर
वसवले. तेव्हा त्याच्याकडे क्षमेची याचना करा. पश्चातापपूर्वक त्याच्याकडे
वळा. माझा पालनकर्ता जवळच आहे, तो प्रतिसाद देणारा आहे."
६२ त्याच्या समाजबांधवांनी विचारले, "हे सालेह! आमच्या तुझ्याकडून
खूप अपेक्षा होत्या. पण आमचे वाडवडील ज्यांची उपासना करत आले
त्यांची उपासना करण्यापासून तू आम्हाला रोखत आहेस? तू आम्हाला
ज्याच्याकडे बोलावत आहेस त्याच्याविषयी आमच्या मनात खूप गोंधळ
आहे, शंका आहे." ६३ सालेहने विचारले, "लोकहो! माझ्याकडे माझ्या
पालनकर्त्याचा सुस्पष्ट पुरावा आहे आणि त्याने माझ्यावर दया केली

आहे. असे असताना त्याची अवज्ञा केली तर त्याच्या कोपापासून मला कोण वाचवेल? तुम्ही फक्त माझे नुकसान कराल.''

६४ माझ्या समाजबांधवांनो! ही ईश्वराची उंटीण हा तुमच्यासाठी एक संकेत आहे. ईश्वराच्या भूमीत तिला मुक्तपणे चरू द्या. तिला काही अपाय करू नका. अन्यथा तुमच्यावर ताबडतोब ईश्वराची शिक्षा कोसळेल. ६५ पण सालेहच्या समाजबांधवांनी त्या सांडणीच्या पायांच्या धोडशिरा कापून टाकल्या. सालेहने लोकांना सांगितले, ''पुढचे तीन दिवस तुमच्या घरांमध्ये मौजमजा करून घ्या. ईश्वराचा हा धोक्याचा इशारा खोटा ठरणार नाही.'' ६६ आमच्या कृपेने आमचा आदेश निघताच, सालेहचा आणि त्याच्याबरोबरच्या श्रद्धावंतांचे रक्षण केले तसेच त्या (भयंकर) दिवसाच्या अवहेलनेपासून आम्ही त्यांचा बचाव केला. निःसंशय, तुमचा पालनकर्ता सामर्थ्यवान आणि बलवान आहे. ६७ जीवघेण्या स्फोटाने अपराध्यांचा विनाश झाला, त्यांच्या घरांमध्ये ते मृत्युमुखी पडले. ६८ जणूकाही ते तिथे राहतच नव्हते. समूद जमातीच्या लोकांनी ईश्वराला नाकारले, त्यामुळे ते धिक्कारले गेले.

६९ शुभवार्ता घेऊन आमचे दूत अब्राहामकडे आले. त्यांनी अब्राहामला अभिवादन केले, ''तुम्हाला शांती लाभो!'' अब्राहामनेही त्यांना शुभेच्छा दिल्या, ''तुम्हालापण शांती लाभो!'' यानंतर अब्राहामने घाईघाईने त्यांना भोजनासाठी भाजलेले कालवडीचे मांस देऊ केले. ७० पण ते खाण्यासाठी त्यांच्याकडून काहीच हालचाल होईना, हे अब्राहामला विचित्र वाटले. त्याच्या मनात शंका आली. आमच्या दूताने त्याला सांगितले, ''घाबरू नका. (ईश्वराचे आदेश घेऊन) लूतच्या समाजात जाण्यासाठी आम्हाला त्याने पाठवले आहे.'' ७१ अब्राहामची पत्नीही त्याच्याजवळच उभी होती. आम्ही त्यांना इसहाकच्या आणि त्यानंतर त्याचा पुत्र याकोबच्या जन्माची

शुभवार्ता सांगताच तिला हसू फुटले. ७२ ती म्हणाली, "हे कसे शक्य आहे? मी व माझा पती वृद्ध झालेलो असताना या वयात आम्हाला मूल कसे होईल? हे खरोखर चमत्कारिक आहे!" ७३ दूताने सांगितले, "ईश्वराचा आदेश तुम्हाला चमत्कारिक वाटतो का? ईश्वर या घरातील लोकांवर दया दाखवो, तुमच्यावर कृपा करो. निःसंशय! तो स्तुत्य आणि गौरवशाली आहे."

७४ दूताकडून ईश्वराने पाठवलेली शुभवार्ता मिळताच अब्राहामची भीती पळून गेली आणि लूतच्या लोकांचा बचाव करावा, यासाठी तो आमची विनवणी करू लागला. ७५ कारण तो संयमी, कोमल मनाचा आणि ईश्वराभिमुख होता. ७६ आम्ही त्याला सांगितले, "अब्राहाम! त्यांच्यासाठी विनवणी करायचे थांबव. तुझ्या पालनकर्त्याचा आदेश याआधीच पुढे गेला आहे. त्यांच्यावर अशी शिक्षा कोसळणार आहे, जी कुणीही थांबवू शकत नाही."

७७ आमचे दूत लूतकडे जाताच तो अस्वस्थ झाला. आपण त्यांचे रक्षण करायला असमर्थ आहोत असे त्याला वाटू लागले. तो म्हणाला, "आजचा दिवस खूप कठीण आहे." ७८ अपकृत्ये करायला सरावलेले त्याच्या समाजातील लोक धावत त्याच्याकडे आले. लूतने त्यांना आवाहन केले, "लोकहो! माझ्या मुली आहेत (विवाहासाठी). त्या अगदी पवित्र, शुद्ध आहेत. ईश्वराचे भय बाळगा आणि पाहुण्यांसमोर मला मान खाली घालायला लावू नका. तुमच्यापैकी कुणीही सद्विचारी नाही का?" ७९ त्यांनी उत्तर दिले, "तुझ्या मुलींची आम्हाला गरज नाही हे तुला माहीत आहे. आम्हाला काय हवे आहे हेही तुला चांगलेच माहित आहे."

८० लूत उद्गारला, "तुम्हाला थांबवायची ताकद माझ्यात असती किंवा मला कुणाचा भक्कम आश्रय असता तर किती चांगले झाले

असते!” ८१ दूतांनी त्याला सांगितले, “लूत! आम्ही तुझ्या पालनकर्त्याचे
दूत आहोत. काहीही झाले तरी ते तुझ्यापर्यंत पोहोचू शकणार नाहीत.
रात्रीच्या अंधारातच तुझ्या लोकांपासून दूर निघून जा. जाताना अजिबात
माघारी वळून पाहू नकोस. पण तुझ्या पत्नीच्या वाट्यालाही इतरांसारखेच
दुर्दैव येईल. त्यांच्या शिक्षेसाठी सकाळची वेळ ठरलेली आहे; सकाळ
जवळच आहे, नाही का?” ८२ आमची आज्ञा अवतरताच हे शहर उध्वस्त
केले गेले. तिथे मातीच्या दगडांचा वर्षाव केला गेला. शहरात सगळीकडे
अशा दगडांचे थरांवर थर साचले. ८३ त्या दगडांवर तुमच्या पालनकर्त्याचा
आदेश कोरलेला होता. अन्यायी लोकांची शिक्षा फार दूर नव्हती.

८४ मदियन समाजाकडे आम्ही शुऐब या त्यांच्या बांधवाला पाठवले.
त्याने सांगितले, “लोकहो! ईश्वराची उपासना करा, तोच तुमचा एकमेव
ईश्वर आहे. लोकांना काही देताना मोजमापात कमी करू नका. आज मी
तुमची भरभराट बघतोय, पण त्या दुर्दैवी दिवशी तुम्हाला शिक्षा होईल
याची मला भीती वाटतेय. ८५ लोकहो! इतरांना देताना प्रामाणिकपणे
मोजमाप करा. हक्काच्या वस्तू देताना वजावट करून त्यांची फसवणूक
करू नका. या भूमीत भ्रष्ट आचरण करू नका. ८६ तुमची श्रद्धा असेल
तर ईश्वराने जे काही ठेवले आहे ते तुमच्यासाठी सर्वोत्कृष्ट आहे. मला
तुमचा रखवालदार नेमलेले नाही.”

८७ त्याच्या समाजबांधवांनी विचारले, “शुऐब! आमचे वाडवडील
ज्याची उपासना करत आले त्याचा आम्ही त्याग करावा आणि आपल्या
संपत्तीचा हवा तसा विनियोग करायचे थांबवावे अशी तुझी प्रार्थना तुला
सांगते का? खरोखर तूच एकटा बुद्धिमान आणि योग्य मार्गाने जाणारा
आहेस!”

८८ शुऐबने उत्तर दिले, “लोकहो! तुम्हाला काय वाटते? माझ्याकडे

माझ्या पालनकर्त्याचा निःसंदिग्ध पुरावा आहे आणि त्याने मला उपजीविकेची उत्तम साधने पुरवली आहेत. (तरीही मी तुम्हाला मार्गदर्शन करू नये असे का?) मी असे अजिबात इच्छित नाही की, मी स्वत: त्याच गोष्टी कराव्यात, ज्यापासून मी तुम्हाला रोखत आहे. मी तर केवळ शक्य तेवढी सुधारणा करू इच्छितो. मला सद्‌बुद्धी तर ईश्वराकडूनच प्राप्त होईल. मी त्याच्यावरच दृढ विश्वास ठेवतो आणि त्याच्याकडेच माझी नेहमी ओढ असणार. ८९ लोकहो! मला तुम्ही करत असलेल्या विरोधामुळे तुमच्यावरही नोहा, हूदच्या किंवा सालेहच्या समाजासारखी दुर्दैवी वेळ न येवो! लूतच्या समाजाला शिक्षा मिळूनही फार काळ लोटलेला नाही. ९० तुमच्या पालनकर्त्याकडे क्षमायाचना करा आणि पश्चातापदग्ध होऊन त्याच्याकडे वळा. माझा पालनकर्ता खरोखर दयाळू आणि प्रेमळ आहे.''

९१ उत्तरादाखल त्यांनी सांगितले, ''शुऐब! तुझ्या बोलण्यातले फारसे आम्हाला कळत नाही. खरे तर, तू आमच्यात दुबळा वाटतोस. आम्ही तुझ्याच जमातीचे नसतो, तर तुझ्यावर दगडांचा वर्षाव केला असता, आमच्यासमोर तुझी ताकद चालणार नाही.'' ९२ शुऐबने त्यांना विचारले, ''लोकहो! माझी जमात तुम्हाला ईश्वरापेक्षा प्रबळ वाटते का? तुम्ही त्याला मागे टाकताय. त्याच्याकडे पाठ फिरवताय. निःसंशय, माझा पालनकर्ता तुमच्या सगळ्या कृत्याची दखल घेतो. ९३ लोकहो! तुम्ही तुमच्या मर्जीप्रमाणे वागा आणि मी माझ्या मर्जीप्रमाणे वागेन. अवमान करण्याची शिक्षा कुणाला मिळेल आणि कोण खोटारडा आहे हे तुम्हाला नक्कीच कळेल. त्या दिवसाची वाट पहा, मीही तुमच्यासोबत वाट पहातोय.''

९४ आमचा आदेश निघताच आमच्या कोपाच्या उद्रेकाने सगळ्या पाप्यांचा घास घेतला. ते त्यांच्या घरांमध्ये मृतावस्थेत आढळले. आम्ही

दया दाखवून शुऐब आणि त्याच्याबरोबरच्या श्रद्धावंतांचा बचाव केला.
९५ (पाप्यांची अशी काही दुरवस्था झाली की त्यांच्या अस्तित्वाच्या
सगळ्या खुणा पुसल्या गेल्या.) जणूकाही ते कधी तिथे राहतच नव्हते.
समूदच्या जमातीप्रमाणेच मदियनची जमातही धिक्कारली गेली होती.
९६ आम्ही मोझेसला आमचे संदेश आणि स्पष्ट प्रमाण यांच्यासह
पाठवले. ९७ आम्ही त्यांना फारो व त्याच्या सरदारांकडे पाठवले, पण
त्यांनी फारोच्याच आदेशांचे पालन केले, जे आदेश सत्याला धरून
नव्हते. ९८ पुनर्निर्माणाच्या दिवशी तो त्याच्या समाजाच्या अग्रभागी असेल
आणि त्यांना नरकाग्नीकडे घेऊन जाईल. त्यांना जिथे नेले जाईल ती जागा
गलिच्छ आहे! ९९ या जगात धिक्कार त्यांचा पाठलाग करीत राहील आणि
पुनर्निर्माणाच्या दिवशीही त्यांची तीच अवस्था असेल. त्यांना किती वाईट
भेट मिळेल!
१०० आम्ही तुम्हाला पूर्वीच्या काही नगरांची अवस्था सांगतो; त्यापैकी
काही नगरे आजही उभी आहेत, तर काहींचे अस्तित्व संपले आहे.
१०१ आम्ही त्यांच्यावर अन्याय केला नाही, तर त्यांनीच तो स्वतःवर
ओढवून घेतला आहे. त्यांनी ईश्वराव्यतिरिक्त ज्यांचा धावा केला, ते
त्यांच्या काहीच कामी आले नाहीत. त्यांच्यावर ईश्वराचा आदेश येताच
त्यांच्या विनाशात अधिकच भर घातली गेली.
१०२ तुमचा पालनकर्ता जेव्हा पापकृत्यात बुडालेल्या नगरांचा समाचार
घेतो, तेव्हा त्याची शिक्षा अशी असते. त्याच्या शिक्षेची पकड जबरदस्त
आणि तीव्र असते. १०३ परलोकातील शिक्षेचे भय बाळगणाऱ्यांसाठी यात
संकेत आहे. या दिवशी सगळी मानवजात एकत्र आणली जाईल, या
दिवशी सगळे हजर असतील. १०४ आम्ही फक्त पूर्वी ठरलेल्या वेळेपर्यंत
हा दिवस पुढे ढकलू. १०५ जेव्हा हा दिवस उगवेल तेव्हा ईश्वराच्या

मर्जीशिवाय कुणीही बोलू शकणार नाही. त्यांच्यापैकी काहींना धिक्कारले जाईल, तर इतरांना ईश्वराचा आशीर्वाद लाभेल.

१०६ त्या दिवशी पापी लोक नरकाग्नीत आक्रोश करत, वेदनेने विव्हळत पडतील. १०७ आकाश आणि पृथ्वी अस्तित्वात असेपर्यंत ते कायमचे तिथे राहतील. फक्त तुमच्या पालनकर्त्याच्या इच्छेनुसारच यात बदल होऊ शकेल. तुमचा पालनकर्ता त्याच्या इच्छेला येईल ते अमलात आणतो. १०८ ईश्वराची कृपा लाभलेले बगीच्यात वास्तव्य करतील. आकाश आणि पृथ्वी अस्तित्वात असेपर्यंत ते कायमचे तिथे राहतील. फक्त ईश्वराच्या इच्छेनुसारच असे होऊ शकेल. ही देणगी अखंडितपणे चालू राहील. १०९ ते ज्यांची उपासना करतात त्यामुळे तुम्ही कोणत्याही शंकेत पडू नका. त्यांच्या पूर्वजांनी ज्यांची उपासना केली त्यांचीच उपासना ते करत आहेत. आम्ही निःसंशय त्यांना पुरेपूर मोबदला देऊ, त्यात त्यांना काहीही उणीव राहणार नाही.

११० आम्ही निःसंशय ईश्वरी ग्रंथ मोझेसला दिला होता. पण लोकांच्यात त्याविषयी मतभेद झाले. आधीच तुमच्या पालनकर्त्याचा आदेश पुढे गेला नसता तर खरोखर त्या दिवशी तिथल्या तिथे त्यांचा निवाडा झाला असता. तरीही त्यांच्या मनात त्याविषयी घोर शंका आहे. १११ तुमचा पालनकर्ता त्यांच्यापैकी प्रत्येकाला त्यांच्या कर्माचा पुरेपूर मोबदला देईल. तो त्यांची कृत्ये चांगलीच ओळखून आहे.

११२ ईश्वराकडे पश्चाताप व्यक्त करून तुमच्याबरोबर ईश्वरी मार्गावर आलेल्यांच्या बरोबरीने तुम्हाला मिळालेल्या आदेशांचे दृढपणे पालन करा. ईश्वराने घालून दिलेल्या मर्यादांचे उल्लंघन करू नका, कारण तुमच्या प्रत्येक कृत्यावर ईश्वराची नजर आहे. ११३ अपराध्यांकडे तुमचा कल असू नये, अन्यथा नरकाग्नी तुम्हालाही लपेटून टाकेल. त्या दिवशी ईश्वरी

प्रकोपापासून ना कुणी बचाव करेल, ना कुणी तुम्हाला मदत करेल. [११४] सकाळी, संध्याकाळी आणि रात्रीच्या निर्धारित वेळी प्रार्थना करा (नमाज़ पढा). चांगल्यामुळे वाईटाची नक्कीच भरपाई होते. बोध घेणाऱ्यांसाठी हे उपदेशग्रंथ आहे. [११५] संयम बाळगा, कारण सदाचारी लोकांचे कष्ट ईश्वर कधीच वाया जाऊ देत नाही.

[११६] ज्यांना आम्ही वाचवले ते मूठभर लोक वगळता, तुमच्या आधीच्या पिढ्यांमध्ये पृथ्वीवरील भ्रष्ट आचरणाच्या प्रसाराविरुद्ध आवाज उठवणारे सदाचारी लोक का नव्हते? पण अपराधी लोक ऐहिक आनंदाचा शोध घेत राहिले. त्यामुळे ते पापी बनले. [११७] एखाद्या समाजातील लोक आपल्यात सुधारणा करण्याचा प्रयत्न करत असताना, त्यांना तुमचा पालनकर्ता अन्यायाने कधीही नष्ट करत नाही.

[११८] तुमच्या पालनकर्त्याची इच्छा असती तर त्याने समस्त मानवजातीला एकच समाज केले असते. प्रत्यक्षात त्यांच्यातले वाद मिटणार नाहीत. (कारण त्याच्या योजनेनुसार त्याला मानवाची परीक्षा घ्यावयाची आहे). [११९] पण त्यामध्ये त्यांचा समावेश नसेल, ज्यांच्यावर तुझ्या पालनकर्त्याने कृपा केलेली असेल. त्याने सर्वांना यासाठीच निर्माण केले. (म्हणजे या परीक्षेसाठी की, कोण स्वत:ला त्याच्या कृपेस पात्र बनवतो व कोण बनवत नाही). "मी नरकात जिन्न आणि माणूस यांना एकत्र ठेवेन" या तुमच्या पालनकर्त्याच्या आदेशाची अंमलबजावणी केली जाईल.

[१२०] प्रेषितांच्या या वार्ता आम्ही तुमचे मन खंबीर करण्यासाठी सांगितल्या आहेत. या वृत्तांतातून सत्य तुमच्यासमोर आले आहे. श्रद्धावंतांना यातून उपदेशाचा आणि ईश्वराच्या स्मरणाचा लाभ होतो. [१२१] सत्यावर अविश्वास दाखवणाऱ्यांना सांगा, "तुम्ही तुमच्या पद्धतीने वागत रहा. आम्ही आमच्या पद्धतीने वागू. [१२२] आणि वाट पहात रहा,

आम्हीही वाट पहात आहोत.” [१२३] आकाशातले आणि पृथ्वीवरील गुपिताचे ज्ञान फक्त ईश्वराकडेच आहे आणि सगळ्या घटनांना त्याचेच संदर्भ आहेत. (या जगातील सगळे खटले तोच चालवणार आहे.) त्याचीच उपासना करा आणि फक्त त्याच्यावरच भरवसा ठेवा. तुमचा पालनकर्ता तुमच्या कृत्यापासून अनभिज्ञ नाही.

प्रकरण १२ : जोसेफ (अल्-यूसुफ)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] अलीफ लाम रा. सुस्पष्ट ग्रंथातील ही वचने आहेत. [२] तुम्हाला सुलभतेने समजावे यासाठी आम्ही हे कुरआन अरेबिकमध्ये पाठवले आहे. [३] हे कुरआन प्रकट करताना आम्ही तुमच्यासमोर सर्वोत्तम वृत्तांत साकार करत आहोत. यापूर्वी तुम्हाला त्याच्याविषयी ज्ञान नव्हते.

[४] जोसेफने आपल्या पित्याला सांगितले, “मी स्वप्नात अकरा तारे, चंद्र आणि सूर्य पाहिले. ते मला वंदन करताना दिसले.” [५] यावर पित्याने त्याला उत्तर दिले, “बाळा! तुझे स्वप्न आपल्या भावांना सांगू नकोस. नाहीतर ते तुझ्याविरुद्ध कारस्थान रचतील. सैतानाने माणसाचा शत्रू होण्याची शपथ घेतली आहे.” [६] तुझा पालनकर्ता तुझी निवड करेल आणि तुला घटनांचा खोलवरचा अर्थ समजावून देईल. यापूर्वी त्याने अब्राहाम आणि इसहाक या तुझ्या पूर्वजांवर जशी संपूर्ण कृपा केली तशीच संपूर्ण कृपा तो तुझ्यावर आणि याकोबच्या घराण्यावर करेल. खरोखर, तुझा पालनकर्ता सर्वज्ञ आणि प्रज्ञावंत आहे.

[७] निःसंशय, जोसेफ आणि त्याच्या भावाच्या या वृत्तांतामध्ये चौकशी

करणाऱ्यांसाठी ईश्वराच्या खुणा आहेत. ८ त्यांचे इतर बांधव आपसात
चर्चा करू लागले, आपण एकाच घराण्यातले असलो तरी जोसेफ आणि
बेंजामिन हे आपले भाऊ आपल्या पित्याला आपल्यापेक्षा प्रिय आहेत,
यात काही शंका नाही. नक्कीच ही आपल्या पित्याकडून झालेली उघड
चूक आहे. ९ तेव्हा आपण जोसेफला मारून टाकू किंवा दूरवर नेऊन
टाकून देऊ. म्हणजे आपल्या पित्याचे लक्ष फक्त आपल्यावरच राहील
आणि नंतर आपण सदाचारी बनू. १० यावर त्यांच्यातला एकजण म्हणाला,
"जोसेफला मारून टाकू नका. पण काही करायचे असेल तर त्याला
एखाद्या विहिरीत टाकून द्या. कुणीतरी वाटसरू त्याला तिथून बाहेर
काढतील."

११ त्यांनी आपल्या पित्याला विचारले, "जोसेफच्या बाबतीत तुमचा
आमच्यावर भरवसा नाही का? आम्ही खरोखर त्याचे हितचिंतक आहोत.
१२ उद्या त्याला आमच्याबरोबर पाठवा म्हणजे त्याला खेळता येईल.
मौजमजा करता येईल. आम्ही त्याची सर्वतोपरीने काळजी घेऊ."
१३ यावर याकोबने सांगितले, "त्याला तुमच्याबरोबर नेलेत तर मला
खूप दुःख होईल. तुमचे लक्ष नसताना एखादा भुकेला लांडगा त्याला
खाऊन टाकेल याची मला भीती वाटते." १४ त्यांनी आश्वासन दिले,
"आमचा समूह इतका भक्कम असतानाही त्याला लांडग्याने खाल्ले तर
आम्ही अगदीच निकम्मे ठरू!"

१५ यानुसार जेव्हा ते जोसेफला घेऊन दूर गेले, तेव्हा त्यांनी त्याला
काळोख्या विहिरीत टाकायचे ठरवले. त्यावेळेस आम्ही जोसेफसमोर
आमची इच्छा प्रकट केली, "जेव्हा तू कोण आहेस हे त्यांना कळणार
नाही, तेव्हा एके दिवशी तू त्यांना त्यांच्या कृत्याची जाणीव करून दे."
१६ रात्र पडताच आक्रोश करत ते पित्याकडे आले. १७ दुःखी स्वरात त्यांनी

पित्याला सांगितले, "आमच्या चीजवस्तूंजवळ जोसेफला बसवून आम्ही धावायची शर्यत लावली होती. तेव्हा त्याला एका लांडग्याने खाल्ले. तुमचा कदाचित आमच्यावर विश्वास बसणार नाही, पण आम्ही खरे तेच सांगतोय." १८ आणि त्यांनी खोट्या रक्ताने माखलेला जोसेफचा सदरा पित्याला दाखवला. आक्रोश करत पिता उद्‌गारला, "नाही! तुमच्या आत्म्याने तुम्हाला सैतानी कृत्य करण्याची भुरळ घातली आहे. या परिस्थितीतही संयमाने राहणेच इष्ट ठरेल. तुम्ही जे बोलताय ती हानी सोसायची ताकद मला फक्त ईश्वरच देऊ शकतो."

१९ काही वेळानंतर वाटसरूंचा एक जथ्था त्या विहिरीजवळ आला. विहिरीतून पाणी काढण्यासाठी त्यांनी आपल्या पाणक्याला विहिरीत उतरवले. बादली पाण्यात बुडवताच आश्चर्याने तो ओरडला, "आपण नशीबवान आहोत! तिथे एक मुलगा सापडलाय!" एखादी व्यापारी वस्तू हाताळावी तसे त्यांनी जोसेफला लपवून ठेवले. त्यांनी जे केले ते ईश्वराने चांगलेच ओळखले होते. २० पुढे त्यांनी त्याला अल्प किमतीत चांदीच्या काही नाण्यांच्या मोबदल्यात विकून टाकले. किती कमी किमतीत जोखले त्यांनी त्याला!

२१ त्याला विकत घेणाऱ्या इजिप्शियन व्यक्तीने आपल्या पत्नीला सांगितले, "याला सन्मानाने वागव. कदाचित आपल्याला लाभदायक ठरेल किंवा आपला पुत्र म्हणूनही आपण त्याला स्वीकारू शकतो." अशा प्रकारे जोसेफला आम्ही त्या भूमीवर स्थिरावले. त्यामुळे आम्ही त्याला घटनांचा खरा अर्थ शिकवू शकलो. सगळ्या गोष्टींवर ईश्वराची सत्ता असते. पण बहुतेकांना याची जाणीव नसते. २२ आणि तो सज्ञान होताच आम्ही त्याला योग्य निर्णय घेण्याची क्षमता आणि ज्ञानाची देणगी देऊ केली. सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही असा मोबदला देतो.

२३ परंतु तो रहायचा त्या घरातल्या स्त्रीला (गृहस्थाच्या पत्नीला)
जोसेफला मोहात पाडायची इच्छा झाली. एके दिवशी घराचे दार बंद
करून ती त्याला म्हणाली, "ये!" त्याने उत्तर दिले, "ईश्वरासाठी तरी
असे करू नका. तुमचा पती माझा मालक आहे. त्याने मला सन्मानाने
वागवले आहे. असले नीच कृत्य करणाऱ्याचे कधी भले होत नाही."
२४ तरीही ती त्याच्या रोखाने पुढे सरकू लागली. जोसेफने आपल्या
पालनकर्त्याचा संकेत पाहिला नसता तर तोही तिच्याकडे झेपावला
असता. दुष्कृत्य आणि असभ्यता यांच्यापासून त्याला दूर ठेवण्यासाठी
आम्ही हे केले. कारण खरोखर तो आम्ही निवडलेल्या सेवकांपैकी होता.
२५ त्या दोघांनीही दरवाजाकडे धाव घेतली. या झटापटीत तिने त्याचा
सदरा मागच्या बाजूने फाडला. दरवाजाबाहेर तिचा पती उभा असल्याचे
त्यांना आढळले. त्याला पाहताच ती रडू लागली. तुमच्या पत्नीचा
विनयभंग करू पाहणाऱ्याला तुरुंगात टाकले पाहिजे किंवा तशीच एखादी
कठोर शिक्षा दिली पाहिजे नाही का? २६ जोसेफने सांगितले, "तीच मला
मोहात पाडत होती." त्यांच्याच कुटुंबातील एकाने सूचकपणे साक्ष दिली,
"त्याचा सदरा पुढून फाटला असेल तर ती खरे बोलते आहे, तो खोटारडा
आहे. २७ पण त्याचा सदरा मागून फाटला असेल तर तो खरे बोलतो आहे,
ती खोटारडी आहे." २८ जोसेफचा सदरा पाठीमागून फाटल्याचे पाहताच
त्याचा मालक पत्नीला म्हणाला, "ए बाई! हा तुझा कावा आहे. तुझा
कावा खरोखर भयंकर आहे." २९ "जोसेफ तू तिच्याकडे दुर्लक्ष कर"
आणि आपल्या पत्नीला सांगितले, "पण तू याची क्षमा माग, कारण
अपराध तू केला आहेस."

३० नगरातल्या बायकांमध्ये कुजबुज सुरू झाली, "या उमरावाची पत्नी
आपल्या गुलामाला वश करू पाहते आहे! त्याच्या प्रेमाने तिचे हृदय

व्यापून टाकले आहे. खरेच, आम्ही पाहतो आहोत की ती तर उघडपणे वाममार्गाला लागली आहे.” ३१ आपल्याविषयीचा बोभाटा ऐकताच तिने त्यांना घरी यायचे आमंत्रण दिले आणि त्यांच्यासाठी मेजवानीची तयारी केली आणि त्या घरी येताच प्रत्येकीला तिने फळे कापायची सुरी दिली. आणि जोसेफला तिने सर्वांसमोर बोलावून घेतले. त्याला पाहून त्या सर्वांचे भान हरपले. “ईश्वरा! आमचे रक्षण कर! हा माणूस नसून तेजस्वी देवदूत आहे,” असे म्हणत अनवधानाने त्यांनी आपले हात कापून घेतले. ३२ यावर त्या उमरावाची पत्नी म्हणाली, “याच्यावरूनच तुम्ही मला बोल लावत होतात! होय, मी त्याला वश करायचा प्रयत्न केला, पण तो मला वश झाला नाही. आता जर तो माझ्या आज्ञेनुसार वागला नाही तर मी नक्कीच त्याला तुरुंगात पाठवेन, त्याची मानहानी करेन!” ३३ हे ऐकून जोसेफने ईश्वराकडे प्रार्थना केली, “हे पालनकर्त्या! या स्त्रिया मला ज्याचे आमंत्रण देत आहेत, त्यापेक्षा मी तुरुंगवास पत्करेन. तू त्यांचा कावा आवरला नाहीस तर मी कदाचित त्यांच्या काव्याला बळी पडेन आणि अज्ञानी लोकांपैकी एक होऊन जाईन.” ३४ तेव्हा त्याच्या पालनकर्त्याने त्याच्या हाकेला प्रतिसाद दिला आणि त्या स्त्रियांच्या कावेबाजपणाला आवर घातला. तो सर्व ऐकणारा आणि सर्व जाणणारा आहे.

३५ हा सगळा पुरावा पाहिल्यानंतरही जोसेफला काही काळासाठी तुरुंगवासात ठेवणे इष्ट ठरेल, असे त्यांना वाटले. ३६ त्याच्याबरोबर दोन तरुणांनी तुरूंगात प्रवेश केला. त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, “स्वप्नात मी फळांपासून दारू गाळत होतो.” दुसरा म्हणाला, “स्वप्नात मी डोक्यावरून अन्नपदार्थ वाहून नेत होतो आणि पक्षी त्यातील अन्न खात होते. आम्हाला या स्वप्नांचा अर्थ सांग, कारण तू सगळ्यांशी चांगले वागणारा दिसतोस!”

३७ जोसेफने त्यांना सांगितले, "भोजन तुमच्यासमोर येण्यापूर्वीच मी
तुम्हाला स्वप्नांचा अर्थ समजावून सांगेन. माझ्या पालनकर्त्याने मला ज्या
विषयांचे ज्ञान दिले आहे, त्याचाच हा एक भाग आहे. ईश्वरावर आणि
मृत्युपश्चात जीवनावर अविश्वास दाखवणाऱ्यांचा धर्म मी त्यागला आहे.
३८ अब्राहाम, इसहाक आणि याकोब या माझ्या पूर्वजांच्या धर्माचे मी
अनुसरण करतो आणि अन्य कुणालाही ईश्वरासमान दर्जा देणे, कोणाला
ईश्वरतुल्य मानणे, हे आपल्यासाठी योग्य नाही. ईश्वराची आपल्यावर
आणि मानवजातीवर असीम कृपा आहे आणि तरीही बहुतेकजण कृतज्ञ
नाहीत. ३९ तुरुंगातील माझ्या सहकाऱ्यांनो! निरनिराळे अनेक ईश्वर असणे
चांगले, की सर्वशक्तिमान असा एकच ईश्वर असणे चांगले? ४० तुम्ही
ईश्वराव्यतिरिक्त ज्यांची उपासना करता ती तुम्ही आणि तुमच्या पूर्वजांनी
शोधलेली फक्त काल्पनिक नावे आहेत. असे करण्याचा अधिकार ईश्वराने
दिलेला नाही. सगळ्यांवर फक्त ईश्वराची सत्ता आहे आणि इतर कुणाची
नाही, तर फक्त त्याचीच उपासना करावी हा त्याचा आदेश आहे. ही खरी
श्रद्धा आहे, पण बहुतेकांना याची जाणीव नाही.

४१ तुरुंगातील सहकाऱ्यांनो! तुमच्यापैकी एकजण आपल्या मालकाला
दारू पुरवेल तर दुसऱ्याला सुळावर चढवले जाईल. पक्षी त्याच्या
मस्तकावरचे मांस खात असतील. तुम्ही ज्या स्वप्नाविषयी माझे मत
विचारत आहात त्या घटना घडण्याचे पूर्वीच निश्चित झाले आहे."
४२ ज्याचा जीव वाचेल असे जोसेफला वाटले, त्याला त्याने सांगितले,
"तुझ्या मालकाकडे माझा उल्लेख कर." पण सैतानाने त्याला याचा विसर
पाडला. त्यामुळे जोसेफला बरीच वर्षे तुरुंगवास भोगावा लागला.

४३ एके दिवशी राजाने आपल्या राजदरबारींना विचारले, "रात्री मी
एक स्वप्न पाहिले. स्वप्नात सात दुबळ्या गायी सात धष्टपुष्ट गाईंना

खाताना दिसल्या. तसेच स्वप्नात मक्याची सात हिरवीगार कणसे आणि सात सुकलेली कणसेही दिसली. दरबारातील श्रेष्ठी! या स्वप्नांचा मतितार्थ स्पष्ट होत असेल तर तो मला सांगा.” ४४ राजदरबारींनी उत्तर दिले, “ही गोंधळून टाकणारी स्वप्ने आहेत. आम्हाला अशा स्वप्नांचे अर्थ कळत नाही.” ४५ तुरुंगवासातून सुटका झालेल्या दोघांपैकी एका कैद्याला बऱ्याच काळानंतर जोसेफची आठवण झाली. त्याने आपल्या राजाला सांगितले, “मी तुम्हाला या स्वप्नांचा अर्थ स्पष्ट करू शकतो. यासाठी मला तुरुंगात जाऊन जोसेफची भेट घेण्याची परवानगी मिळावी.”

४६ तुरुंगात जाऊन त्याने जोसेफला विचारले, “सत्यप्रिय जोसेफ! मला एका स्वप्नाचा अर्थ सांग. आपल्या मालकाने स्वप्नात सात धष्टपुष्ट गाई पाहिल्या, ज्यांना सात दुबळ्या गाई खात होत्या. शिवाय त्याने स्वप्नात मक्याची सात हिरवीगार कणसे आणि सात सुकलेली कणसे पाहिली. या स्वप्नाचा अर्थ सांग, म्हणजे माझ्या लोकांकडे जाऊन मी तो त्यांना सांगेन.” ४७ जोसेफने त्याला सांगितले, “सलग सात वर्षे तुम्ही नेहमीप्रमाणेच धान्याची पेरणी करा. काढणीच्या हंगामात त्यातले जरूरीपुरते धान्य काढून घेऊन उरलेले कणसातच राहू द्या. ४८ त्यानंतरची सात वर्षे फार हलाखीची असतील. तुम्ही साठवलेल्या धान्यांपैकी अगदी थोडे वगळता सगळे धान्य यावेळी तुम्हाला खाता येईल.” ४९ त्यानंतर असे वर्ष येईल जेव्हा मुबलक पाऊस पडेल आणि पुन्हा एकदा त्यांना भरपूर (तेल व मद्य) गाळता येईल.

५० राजाने आपल्या सेवकाला आज्ञा केली, “त्याला माझ्यासमोर हजर करा.” राजाचा दूत जोसेफकडे येताच जोसेफने सांगितले, “तुझ्या मालकाकडे परत जा आणि मला पाहून आपल्या हातांना कापल्याच्या

जखमा करून घेणाऱ्या स्त्रियांविषयी माहिती विचारून मला सांग. माझा पालनकर्ता त्यांचा कावा चांगलाच ओळखून आहे.” ५१ राजाने त्या स्त्रियांना विचारले, “तुम्ही जोसेफला भुरळ घालायचा प्रयत्न केलात, त्या प्रकरणातले सत्य काय आहे?” त्यांनी उत्तर दिले, “खोटे बोलल्याबद्दल ईश्वर आमचे रक्षण करो! आम्हाला त्याच्यात कुठलाही दुर्गुण दिसला नाही.” त्या सद्गृहस्थाच्या पत्नीनेही दुजोरा दिला, “सत्य आता प्रकाशात आले आहे, मीच त्याला आकर्षित करायचा प्रयत्न केला. पण तो खरोखर प्रामाणिक आहे.”

५२ यावर जोसेफ म्हणाला, “मी माझ्या मालकाच्या गैरहजेरीत त्याचा विश्वासघात केला नाही हे यावरून त्याच्या लक्षात येईल आणि विश्वासघात करणाऱ्यांना कधीही ईश्वराचे मार्गदर्शन लाभत नाही. ५३ मी स्वतःला संपूर्ण निर्दोष ठरवण्याचा प्रयत्न करत नाही. कारण माझ्या पालनकर्त्याची कृपा झाली नाही तर प्रत्येकाचा आत्मा दुष्कृत्यासाठी उत्तेजित करत असतो. खरोखर, माझा पालनकर्ता क्षमाशील आणि दयाशील आहे.”

५४ राजाने आदेश दिला, “त्याला माझ्यासमोर हजर करा. मी त्याला माझ्या विशेष सेवेत दाखल करून घेईन.” जोसेफशी बोलताना राजाने सांगितले, “आजपासून सन्माननीय आणि विश्वासू म्हणून तू आमच्याबरोबर राहशील.” ५५ जोसेफने राजाला विनंती केली, “माझ्यावर देशाच्या गोदामाची रखवाली करायचे काम सोपवावे. कारण मी माहीतगार रक्षक आहे.” ५६ अशाप्रकारे जोसेफला या भूमीत आम्ही स्थिरस्थावर केले आणि त्याला अधिकाराचे स्थान दिले. या देशात आता तो त्याच्या मनाला येईल तिथे राहू शकत होता. आमच्या इच्छेला येईल त्याच्यावर

आम्ही कृपावर्षाव करतो आणि सदाचाऱ्यांच्या सत्कृत्याचा मोबदला वाया जाऊ देत नाही. ५७ तरीही, ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी आणि त्याचे सतत स्मरण ठेवणाऱ्यांसाठी मृत्युपश्चात जीवनात मिळणारा मोबदला (या जगातील मोबदल्यापेक्षा) कितीतरी पटीने चांगला आहे.

५८ जोसेफचे सावत्र भाऊ धान्य खरेदीसाठी (इजिप्तमध्ये) आले असता त्यांची जोसेफशी भेट झाली. जोसेफने त्यांना ओळखले, पण त्यांनी जोसेफला ओळखले नाही. ५९ त्यांना हवे असलेल्या वस्तू देऊन झाल्यावर जोसेफने त्यांना सांगितले, "तुमच्या सावत्र भावाला माझ्याकडे घेऊन या. धान्य मोजताना मी माप पुरेपूर भरून दिले, तुम्ही पाहिलेत ना? तसाच मी उत्कृष्ट यजमानही आहे. ६० पण त्याला माझ्याकडे आणले नाही तर तुम्हाला माझ्याकडून धान्य मिळायचे नाही, त्याच्याशिवाय मला कधीच भेटू नका." ६१ त्यांनी उत्तर दिले, "आमच्याबरोबर पाठवण्यासाठी आम्ही त्याच्या पित्याचे मन वळवण्याचे प्रयत्न करू. त्यासाठी आम्हाला जमतील ते सगळे उपाय करू."

६२ जोसेफने आपल्या सेवकांना सांगितले, त्यांनी दिलेले धन त्यांच्या खोगीरात परत ठेवून द्या. घरी गेल्यावर कुटुंबियांसमवेत असताना त्यांना ते कळेल, म्हणजे ते धान्य खरेदीसाठी पुन्हा एकदा येतील. ६३ घरी पोचल्यावर त्यांनी पित्याला सांगितले, "पुढच्या वेळेस आमच्या भावाला (बेंजामिनला) बरोबर नेले नाही तर आम्हाला धान्याची पुढील खेप नाकारली जाईल, तेव्हा त्यालाही आमच्याबरोबर पाठवा म्हणजे आम्हाला आमच्या वाटणीचे धान्य मिळेल. आम्ही त्याचे रक्षणही करू." ६४ पित्याने उत्तर दिले, "याच्या भावाविषयी एकदा मी तुमच्यावर भरोसा ठेवला होता. तसाच आता याच्याविषयीही ठेवू का? पण ईश्वर सर्वोत्कृष्ट रक्षक आणि सर्वाधिक दयाळू आहे."

६५ धान्याच्या पिशव्या उघडल्यावर त्यांना कळले, त्यांचे धन त्यांना
परत करण्यात आले होते. हे पाहून त्यांनी पित्याला विचारले, "आपल्याला
यापेक्षा आणखी काय हवे आहे? हे धन आपल्याला परत मिळाले आहे.
आता आपल्या कुटुंबासाठी आणखी धान्य खरेदी करता येईल. आम्ही
आमच्या भावाचे रक्षण करू. आता आणलेले धान्य फार कमी आहे.
पुढच्या वेळेस आणखी एका उंटाच्या बोजाएवढे धान्य जास्त आणता
येईल." ६६ याकोबने त्यांना उत्तर दिले, "तुम्ही खरोखर त्याला माझ्याकडे
परत आणाल याची ईश्वरासमक्ष प्रामाणिक शपथ घेतल्याखेरीज मी त्याला
तुमच्यासोबत कधीही पाठवणार नाही. अचानकपणे तुमच्यावर एखादे
संकट कोसळले तर मात्र नाईलाज आहे." त्यांनी दृढ शपथ घेताच याकोब
म्हणाला, "ईश्वर आपल्या सगळ्या बोलण्याचा साक्षीदार आहे."

६७ त्याने आपल्या मुलांना सांगितले, "मुलांनो! नगरात सगळ्यांनी
एकाच दारातून प्रवेश करू नका, वेगवेगळ्या दारांमधून आत जा. त्याच्या
मर्जीविरुद्ध मी तुम्हाला काहीही मदत करू शकत नाही. अर्थात, निवाडा
फक्त ईश्वरच करू शकतो. मी त्याच्यावर भरोसा ठेवला आहे. श्रद्धावंतांनी
त्याच्यावर भरवसा ठेवावा." ६८ आपल्या पित्याच्या सांगण्यानुसार त्यांनी
सुरक्षितपणे नगरात प्रवेश केला. पण ईश्वरी आदेशाविरुद्ध जाऊन त्यांचे
रक्षण करण्याची ताकद याकोबकडे नव्हती. फक्त आपल्या मनातली
इच्छा त्याने बोलून दाखवली होती, इतकेच. तो ज्ञानसंपन्न होता. कारण
आम्ही त्याला तसेच ज्ञान दिले होते. इतर बहुतांश लोकांकडे ज्ञान नसते.

६९ ते सगळे मिळून जोसेफसमोर हजर झाल्यानंतर जोसफने त्याच्या
भावाला (बेंजामिनला) बाजूला घेऊन सांगितले, "मी तुझा भाऊ
आहे. ते जे करत आहेत त्यामुळे तू दुःखी होऊ नकोस." ७० त्यांना
धान्य देऊन झाल्यावर जोसेफने बेंजामिनच्या सामानात एक पेला ठेवून

दिला. नंतर एक निरोप्या धावत येऊन त्यांना म्हणाला, "काफिल्यातील लोकहो! तुम्ही चोरी केली आहे!" ७१ त्याच्याकडे वळून याकोबच्या मुलांनी विचारले, "तुमचे काय हरवले आहे?" ७२ "आमचे शाही माप हरवले आहे. तो शोधून देणाऱ्यास बक्षीसादाखल एका उंटाच्या बोजाइतका मका मिळेल. मी शपथपूर्वक तसा शब्द देतो." ७३ त्यांनी उत्तर दिले, "ईश्वरशपथ! आम्ही या देशात कोणतेही गैरकृत्य करायला आलेलो नाही, हे तुम्हाला माहीतच आहे. आम्ही चोर नाही आहोत." ७४ इजिप्शियन लोकांनी त्यांना विचारले, "तुम्ही खोटे बोलताना आढळला तर तुम्हाला काय शिक्षा द्यावी?" ७५ "तुमची वस्तू ज्याच्या सामानात सापडेल त्याला त्याच्या अपराधापायी (गुलाम बनवून) जबाबदार धरले जावे. अपराध्यांना आम्ही अशी शिक्षा देतो," त्यांनी सांगितले. ७६ निरोप्याने जोसेफसमोर त्यांच्या सामानाची झडती घेतली आणि बेंजामिनच्या सामानात त्याला तो पेला सापडला. अशाप्रकारे जोसेफमार्फत आम्ही आमची योजना राबवली. ईश्वराची इच्छा नसती तर राजाच्या हुकूमानुसार तो त्याच्या भावाला बंदिवान करू शकला नसता. आमच्या इच्छेला येईल त्याला आम्ही श्रेष्ठ दर्जा देतो. सर्व ज्ञानींवर ईश्वर एकमेव सर्वज्ञानी आहे.

७७ याकोबच्या मुलांनी सांगितले, "हा चोर असेल तर याच्या सख्ख्या भावानेही पूर्वी अशी चोरी केली होती." हे बोलणे ऐकूनही जोसेफने आपले गुपित तसेच ठेवले. त्यांच्यासमोर काही उघड केले नाही. मनातल्या मनात त्याने विचार केला, तुमचे ते कृत्य यापेक्षा वाईट होते. तुम्ही कशाविषयी बोलताय ईश्वर चांगलेच ओळखतो. ७८ बेंजामिनचे भाऊ म्हणाले, "हे मान्यवर! याचे वडील खूप वृद्ध झाले आहेत. याच्याऐवजी आमच्यापैकी एकाला राजासमोर घेऊन जा. तू आम्हाला परोपकारी दिसतोस." ७९ पण

त्याने उत्तर दिले, "आमची वस्तू याच्याकडेच सापडली आहे. त्याला सोडून इतरांना ताब्यात घेण्यापासून ईश्वर आमचे रक्षण करो. तसे केले तर आम्ही धडधडीत अपराधी ठरू."

८० जोसेफचे मन वळवण्याचे सगळे उपाय थकल्यावर त्यांनी माघार घेतली. ते आपसात चर्चा करू लागले. सगळ्यात मोठा भाऊ म्हणाला, "वडिलांनी आपल्याकडून ईश्वराची शपथ घेतल्याचे आपल्याला माहीत नाही का? जोसेफच्या बाबतीत आपण पूर्वी अशीच घोडचूक केली आहे. आपल्या वडिलांनी परवानगी दिल्याशिवाय किंवा ईश्वराने निवाडा केल्याशिवाय मी हा देश सोडणार नाही. ईश्वर हा सर्वोत्कृष्ट न्यायाधीश आहे." ८१ त्यांनी वडिलांना सांगितले, "तुमच्या मुलाने चोरी केली आहे. आम्हाला ज्ञान असलेल्या गोष्टींची शपथ आम्ही घेऊ शकतो. पण अज्ञात भविष्यापासून (बेंजामिनचे) रक्षण कसे करणार? ८२ आम्ही मुक्काम केला होता त्या शहरातील लोकांकडे चौकशी करा आणि आमच्याबरोबर प्रवास करणाऱ्या इतर काफिल्यांकडेही चौकशी करा. आम्ही खरे तेच सांगत आहोत."

८३ त्यांच्या तोंडून हा वृत्तांत ऐकून याकोब म्हणाला, "नाही! हा तुम्ही रचलेला बनाव आहे. पण या परिस्थितीतही संयमाने राहणेच उत्कृष्ट आहे. अखेरीस, ईश्वर माझ्या दोन्ही मुलांना सुखरूप माझ्याकडे परत आणेल. खरोखर, तो ज्ञानवंत, बुद्धिवंत आहे." ८४ आपल्या मुलांकडे पाठ करून याकोब आक्रोश करू लागला, "जोसेफ, असे कसे झाले?" अतिदुःखाने त्याचे डोळे पांढरे झाले. तो अतिशय दुःखीकष्टी झाला. ८५ पित्याची ही अवस्था पाहून त्याचे पुत्र म्हणाले, "देवाशप्पथ! तुमची तब्येत किती खालावली आहे! जोसेफची आठवण काढून मृत्यूला जवळ करणार आहात का?" ८६ याकोब म्हणाला, "माझ्या दुःखाचे आणि

त्रासाचे गाऱ्हाणे मी फक्त ईश्वरासमोर मांडतो. ईश्वराने मला अशा
गोष्टींचे ज्ञान दिले आहे, ज्या तुम्हाला माहीत नाहीत. ८७ तेव्हा माझ्या
पुत्रांनो! जा, जोसेफची आणि बेंजामिनची माहिती काढा. फक्त तेच लोक
ईश्वरी अवकृपेच्या विचाराने निराश होतात, जे सत्य नाकारतात.''
८८ त्याचे भाऊ जोसेफकडे जाऊन विनवू लागले, ''हे मान्यवर!
आमच्यावर आणि आमच्या कुटुंबियांवर निराशाजनक प्रसंग ओढवला
आहे. आम्ही धन फारच थोडे आणले आहे. पण तू दानशूरपणा दाखवून
आम्हाला भरपूर धान्य दे. निःसंशय, ईश्वर दानशूर व्यक्तींना उत्कृष्ट
मोबदला देतो!'' ८९ जोसेफने त्यांना विचारले, ''अज्ञानापोटी तुम्ही जोसेफ
आणि बेंजामिनशी कसे वागलात याची तुम्हाला जाणीव आहे का?''
९० चकित होऊन त्यांनी विचारले, ''तू खरेच जोसेफ आहेस का?'' त्याने
उत्तर दिले, ''हो! मी जोसेफ आणि हा माझा भाऊ बेंजामिन. ईश्वराने
खरोखर आमच्यावर कृपा केली आहे. सत्कर्मे करणाऱ्यांचा, सदाचाराने
वागणाऱ्यांचा आणि खंबीर असणाऱ्यांचा मोबदला ईश्वर कधी वाया जाऊ
देत नाही, हेच खरे!''
९१ जोसेफचे भाऊ म्हणाले, ''ईश्वराशपथ! ईश्वराने निःसंशय तुझा
दर्जा आमच्यापेक्षा खूप उंचावला आहे. आम्ही खरोखर अपराधी
आहोत!'' ९२ जोसेफने त्यांच्यासाठी प्रार्थना केली, ''ईश्वर तुम्हाला क्षमा
करो! आजच्या दिवशी तुम्हाला दोषमुक्त करो! तो दया करणाऱ्यांमधला
सर्वाधिक दयाळू आहे! ९३ माझा सदरा घेऊन जा आणि तो माझ्या
वडिलांच्या चेहेऱ्यावर टाका. याने त्यांची गमावलेली दृष्टी परत येईल.
मग सगळ्या कुटुंबियांसमवेत माझ्याकडे या.''
९४ जोसेफच्या भावांचा ताफा इजिप्तबाहेर पडू लागताच (कनानमध्ये
असलेले) त्याचे वडील म्हणाले, ''तुम्ही कदाचित मला वेडा म्हणाल,

पण मला नक्कीच जोसेफच्या अंगाचा गंध येतोय." [९५] ते म्हणाले,
"ईश्वराशपथ! तुम्ही अजूनही आपल्या भ्रमातच जगताय!" [९६] पण
लवकरच जोसेफची शुभवार्ता घेऊन एक दूत आला. त्याने जोसेफने
दिलेला सदरा वडिलांच्या चेहेऱ्यावर टाकताच त्यांची गमावलेली दृष्टी
परत आली. यावर ते म्हणाले, "मी म्हणालो नव्हतो, ईश्वराकडून
मला अशा गोष्टी कळल्या आहेत ज्या तुम्हाला कळलेल्या नाहीत."
[९७] यावर जोसेफचे भाऊ आपल्या पित्याला म्हणाले, "पिताश्री! ईश्वराकडे
आमच्यासाठी क्षमायाचना करा, आम्ही खरोखर चुकलो होतो."
[९८] वडिलांनी सांगितले, "मी नक्कीच माझ्या पालनकर्त्याकडे तुमच्यासाठी
क्षमायाचना करेन. तो अतिशय कृपाळू आणि दयाळू आहे."

[९९] ते जोसेफसमोर येताच त्याने आई-वडिलांना आपल्यासमोर बसवून
घेतले आणि म्हणाला, "इजिप्तमध्ये तुमचे स्वागत असो. ईश्वराची मर्जी
असेल तर इथे तुम्ही सुरक्षित रहाल." [१००] आपल्या आई-वडिलांना
जोसेफने उच्चासनावर बसवले तर त्याच्या भावांनी गुडघे टेकून त्याला
वंदन केले. यावर जोसेफ म्हणाला, "पिताजी! हा आहे माझ्या स्वप्नाचा
अर्थ. माझ्या पालनकर्त्याने ते प्रत्यक्षात आणले. मला तुरूंगवासातून
सोडवून आणि माझ्यात व माझ्या बांधवांच्यात सैतानाने नेहमी विसंवाद
निर्माण केला असता तो दूर करून, वाळवंटातून तुम्हा सगळ्यांना
माझ्याकडे आणून त्याने माझ्यावर फार मोठी कृपा केली आहे. आपल्या
इच्छेची अंमलबजावणी करणारा माझा पालनकर्ता उत्कृष्ट योजक आहे.
तो सर्वज्ञ आणि खरोखर बुद्धिवंत आहे."

[१०१] यानंतर जोसेफने प्रार्थना केली, "हे आकाशाच्या व पृथ्वीच्या
निर्मात्या! तू मला सत्ताधिकार दिलेस आणि स्वप्नांचा अर्थ लावायला
शिकवलेस. या जगात आणि मृत्युनंतरच्या जगातही तूच माझा पालनकर्ता

आहेस! तुला समर्पित झालेल्या अवस्थेत मला मृत्यू आण आणि सदाचारी लोकांमध्ये मला जागा दे.”

१०२ हे प्रेषिता! या अदृश्याच्या वार्ता आहेत, त्या आम्ही तुझ्यासमोर प्रकट करत आहोत. कारण त्यांनी कट रचला आणि त्यानुसार योजना आखली तेव्हा तू तिथे हजर नव्हतास. १०३ तू लोकांना उपदेश करायला कितीही उत्सुक असलास तरी बहुतांश लोक तुझ्यावर विश्वास ठेवणार नाहीत. १०४ या उपदेशाच्या मोबदल्यात तुझे त्यांच्याकडून काहीही मागणे असणार नाही. संपूर्ण मानवजातीसाठी हे कुरआन फक्त बोधपर उपदेश आहे.

१०५ आकाश आणि पृथ्वीवर ईश्वरी अस्तित्वाच्या असंख्य खुणा आहेत. ज्यांच्याजवळून ते जातात पण ते त्याकडे लक्ष देत नाहीत. १०६ आणि त्यांच्यापैकी बहुतेकजण ईश्वरावर श्रद्धा असल्याचे सांगतात. पण इतरांनाही त्याचे तुल्यबळ मानतात. १०७ ईश्वराची सर्वसमावेशक शिक्षा आपल्यावर कोसळणारच नाही किंवा ज्याची त्यांनी कल्पनाही केली नाही अशी अंतिम घटका त्यांच्यावर येणारच नाही, या विचाराने ते निश्चिंत झाले आहेत का? १०८ त्यांना सांगा, “हा माझा मार्ग आहे. जो शुद्ध ज्ञानावर आधारित आहे. मी आणि माझे अनुयायी तुम्हाला ईश्वरावर श्रद्धा ठेवण्याचे आवाहन करत आहोत. ईश्वर पवित्र आहे. मी अनेकेश्वरवाद मानणाऱ्यांपैकी नाही.”

१०९ हे मोहम्मद! तुझ्याआधी आम्ही पाठवलेले प्रेषित असे मानव होते, ज्यांना आम्ही आमचे साक्षात्कार दिले होते. त्यांच्या नगरवासीयांमधून आम्ही त्यांची निवड केली होती. सत्यावर विश्वास न ठेवणारे, सर्वत्र फिरून त्यांच्या आधी होऊन गेलेल्यांचा कसा अंत झाला होता हे पाहत नाहीत का? ईश्वराची जाण असणारे लोक (ऐहिक जीवनापेक्षा)

मृत्युपश्चात जीवनाला प्राधान्य देतात. त्यांना विचारा, तरीही तुम्ही लोक बुद्धीचा वापर करीत नाही का? [११०] तुमच्या आधीच्या प्रेषितांच्या सगळ्या आशा संपल्यावर आणि (सत्य नाकारणाऱ्यांना) आपण दिलेला शिक्षेचा इशारा खोटा ठरेल असे त्यांना वाटू लागल्यावर आमची मदत त्यांच्याकडे आली. आमच्या इच्छेला आले त्यांना आम्ही वाचवले, पण अपराध्यांपासून आमची शिक्षा रोखली जाणार नाही.

[१११] सुज्ञ माणसांसाठी पैगंबरांच्या कथांमध्ये शिकवण आहे. कुरआन म्हणजे कल्पित कथा नसून, त्यातून आधीच्या धर्मग्रंथातील सत्याचे प्रमाण दिले आहे. त्यातून सगळ्या घटनांचे व गोष्टींचे स्पष्टीकरण मिळते. त्याचबरोबर खऱ्या श्रद्धावंतांना त्यातून ईश्वरी मार्गदर्शनाचा आणि त्याच्या कृपेचा लाभही होतो.

प्रकरण १३ : मेघगर्जना (अर्-रअद)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] अलीफ लाम मीम रा. ही पवित्र ग्रंथातील वचने आहेत. तुमच्या पालनकर्त्याने तुमच्याकडे जे पाठवले आहे ते सत्य आहे, तरीही बहुतांश लोक त्यावर श्रद्धा ठेवत नाहीत. [२] अदृश्य आधारावर आकाश तोलणारा आणि त्याच्या सिंहासनावर आरूढ होणारा ईश्वरच आहे. चंद्र आणि सूर्य त्याच्याच नियंत्रणात आहेत, त्यामुळे ते निर्धारित मार्गानेच कालक्रमण करतात. तुमच्या पालनकर्त्याशी होणारी भेट अटळ आहे याची खात्री पटवण्यासाठी तो सगळ्या घटनांचे नियोजन करतो आणि आपले साक्षात्कार सुस्पष्ट करतो.

[३] पृथ्वीचा विस्तार करणारा आणि त्यावर पर्वतांची व नद्यांची

मांडणी करणारा आणि हरतऱ्हेच्या फळात नर-मादीची जोडी निर्माण करणारा ईश्वरच आहे. त्याने दिवसावर रात्रीचे आवरण चढवले. खरोखर चिंतनशील लोकांसाठी या सगळ्यात त्याच्या अस्तित्वाच्या खुणा आहेत.

४ पृथ्वीतलावर एकमेकांना लागून विविध प्रकारचे भूप्रदेश आहेत. त्यात द्राक्षबागा, अन्यधान्याची शेते, पामवृक्षांच्या रांगा आहेत. काही झाडांना एकएकटी फळे, तर काहींना फळांचे घोस लगडलेले आहेत. सगळ्या फळांची जोपासना एकाच पाण्यावर होते. पण आम्ही काहींची चव इतरांपेक्षा चांगली केली आहे. यातही सुज्ञ लोकांसाठी ईश्वरी अस्तित्वाच्या खुणा आहेत.

५ हे प्रेषिता! तू कशाने आश्चर्यचकित झालास तर त्यांच्या या प्रश्नाने नक्कीच चकित होशील, "काय? आमची माती झाल्यावर त्यातून आम्ही नव्याने निर्माण होऊ?" आपल्या पालनकर्त्यावर श्रद्धा न ठेवणारे हेच ते लोक आहेत. त्यांच्या मानेभोवती साखळदंड असतील. ते नरकाग्नीचे निवासी असतील आणि कायम तिथेच वास्तव्य करतील.

६ त्यांच्यासमोर शिक्षा मिळालेल्यांची असंख्य उदाहरणे असली तरी ते तुमच्याकडे चांगल्याऐवजी वेगाने वाईटाकडे नेणारी मागणी करतात. मानवाने कितीही अपराध केले तरी तुमचा पालनकर्ता ते माफ करतो. पण शिक्षा देण्यातही तो तितकाच कठोर आहे.

७ सत्यावर अविश्वास दाखवणारे विचारतात, "प्रेषिताबरोबर त्याच्या पालनकर्त्याने आपल्या अस्तित्वाचा संकेत का पाठवला नाही?" पण तू त्यांना फक्त सावधानतेचा इशारा देणारा आहेस. प्रत्येक समाजाकडे त्यांचा मार्गदर्शक आहे.

८ ईश्वर प्रत्येक स्त्रीचे अंतरंग जाणतो. तिच्या गर्भाशयातला प्रत्येक बदल जाणतो. प्रत्येक गोष्टीसाठी त्याच्याकडे योग्य प्रमाण आहे. ९ तो

महान आहे, सर्वोच्च आहे, दृश्य-अदृश्याचा माहीतगार आहे. [१०] तुम्ही
उघडपणे बोलता की गुप्तपणे, रात्रीच्या अंधारात तोंड लपून बसता की
दिवसाढवळ्या उजळ माथ्याने फिरता, याने त्याला काही फरक पडत
नाही.

[११] प्रत्येक माणसाच्या मागेपुढे (त्याला मार्गदर्शन करण्यासाठी) आम्ही
एका दूताला पाठवले, जो आमच्या आदेशानुसार त्याच्यावर देखरेख
करतो. समाजातील लोकांनी त्याच्या अंतःकरणात बदल केल्याखेरीज
ईश्वर त्यांच्या परिस्थितीत फार बदल करत नाही. पण ईश्वर जेव्हा
एखाद्या समाजाला शिक्षा द्यायचे ठरवतो, तेव्हा ते कुणी रोखू शकत नाही.
त्यांच्याकडे त्याच्याशिवाय दुसरा कुणी रक्षक नाही.

[१२] तोच तुम्हाला आकाशात विजांचा चमचमाट दाखवतो, ज्याने
तुमच्या मनात भीतीही उत्पन्न होते आणि आशाही. जलभाराने जडावलेल्या
ढगांना तोच एकत्र आणतो. [१३] मेघगर्जना स्तुतीपर कवने गाऊन त्याचे
गुणगान करते. ईशदूतही आदरयुक्त दराऱ्याने त्याची स्तुती करतात.
त्याच्या इच्छेला येईल त्याच्यावर तो विजेचा लोळ कोसळवतो. तरीही
लोक ईश्वराविषयी वादविवाद करतात, ज्याच्या शक्तीपुढे कुणाची मात्रा
चालत नाही.

[१४] मदतीची याचना फक्त ईश्वराकडे करणे खरे आहे. इतरांकडे अशी
याचना केली तर त्यांच्याकडून कधीही कसलाही प्रतिसाद मिळणार नाही.
तहानलेल्याने समोर पाणी पाहून ते मिळवण्यासाठी हात पुढे करावा, पण
पाणी काही त्याच्या मुखापर्यंत पोहोचू नये, अशी त्यांची अवस्था आहे.
सत्य अमान्य करणाऱ्यांचा धावा व्यर्थ आहे.

[१५] सकाळी-संध्याकाळी प्रत्येकाची सावली जशी त्याच्या पायाशी
लोळण घेते, तसेच आकाश आणि पृथ्वीवर राहणारा प्रत्येकजण स्वेच्छेने

वा अनिच्छेने ईश्वरचरणी लीन होतो. [१६] त्यांना विचारा, "आकाश आणि पृथ्वीचा मालक कोण आहे?" त्यांना सांगा, "फक्त ईश्वर!" त्यांना विचारा, "तुम्ही ईश्वराव्यतिरिक्त इतरांना रक्षक का मानता, जेव्हा ते खुद्द स्वतःचाही फायदा किंवा नुकसान करू शकत नाहीत. अंध आणि डोळस एकसारखे आहेत का? अंधार आणि उजेड एकसारखे आहेत का? ईश्वर जशी निर्मिती करतो, तशीच तुम्ही ईश्वरतुल्य मानलेले करतात आणि दोघांची निर्मिती एकसारखी आहे असे वाटून तुम्ही त्यांना ईश्वरासमान मानता का?" त्यांना हेही सांगा, "ईश्वर सगळ्यांचा निर्माता आहे, तो सर्वशक्तिमान आणि एकमेव आहे."

[१७] ईश्वराने आकाशातून केलेला जलवर्षाव नद्यांचे पात्र आपापल्या कुवतीप्रमाणे ग्रहण करतात आणि दुथडी भरून वाहू लागतात. वादळी प्रवाह स्वतःबरोबर उसळता फेस वागवू लागतो. दागिने, हत्यारे बनवण्यासाठी कच्चे खनिज वितळवले असता धातूरसाच्या पृष्ठभागावरही असे बुडबुडे येतात. हा फेस बाजूस सारला की मानवासाठी उपयुक्त धातू मागे राहतो. ईश्वर असेच सत्यापासून असत्य वेगळे करतो. तो दृष्टांतामधून आपल्याशी बोलतो.

[१८] ईश्वराला प्रतिसाद देणाऱ्यांना सर्वोत्कृष्ट मोबदला मिळेल तर त्याला प्रतिसाद न देणाऱ्यांची अवस्था अशी असेल. पृथ्वीवरची सगळी संपत्ती त्यांना मिळाली आणि त्यात दुपटीने भर पडली, तरीही निवाड्याच्या दिवशी नक्कीच ते ती भरपाई म्हणून देऊ करतील. निवाड्याच्या दिवशी त्यांना वाईटात वाईट शिक्षा मिळेल. नरक हेच त्यांचे भवितव्य असेल. किती गलिच्छ वास्तव आहे हे!

[१९] तुझ्या पालनकर्त्याकडून जे आले आहे, ते सत्य आहे हे जाणणारा आंधळ्यासारखा कसा असेल? दूरदृष्टीची देणगी लाभलेलेच या सत्याची दखल घेतात.

२० त्यांचे ईश्वराबरोबरचे अनुबंध सच्चे असतात आणि ते दिलेला शब्द
कधीही मोडत नाहीत. २१ तसेच जे (संबंध) ईश्वराने जोडण्याची आज्ञा
केलेली आहे ते जोडतात, ईश्वराला भिऊन राहतात आणि शिक्षेच्या
आसूडाची धास्ती बाळगतात. २२ जे संयमाने आपल्या पालनकर्त्याच्या
कृपेची वाट पाहतात, नियमित प्रार्थना करतात (नमाज़ पढतात),
आम्ही केलेल्या तरतुदीमधून उघड आणि छुपे दानधर्म करतात आणि
सत्कर्माने कुकर्माला बाजूस सारतात, परलोकातील निवासस्थान फक्त
त्यांच्यासाठीच असेल. २३ ते स्वर्गाच्या चिरंतन बगीच्यात प्रवेश करतील.
तिथे त्यांच्याबरोबर त्यांच्या पूर्वजांपैकी सदाचरणी लोक, त्यांच्या पत्नी
आणि त्यांचे वारसदार असतील. प्रत्येक प्रवेशद्वारापाशी ईश्वराचे दूत
त्यांचे स्वागत करून म्हणतील, २४ "तुम्ही धीरोदात्तपणे जे सहन केलेत
त्यासाठी तुम्हाला शांती लाभो! हे अंतिम निवासस्थान किती उत्कृष्ट
आहे!"

२५ ईश्वराबरोबर केलेल्या कराराला मान्यता देऊनही तो मोडणाऱ्यांना,
त्याचे आदेश झुगारून देणाऱ्यांना आणि या भूमीत भ्रष्ट आचरण
करणाऱ्यांना तळतळाट लागतील. त्यांना निकृष्ट निवासस्थान मिळेल.
२६ ईश्वराच्या मनाला येईल त्याला तो सुबत्ता देतो तर त्याच्या मनाला
येईल, त्याला वंचित ठेवतो. सत्य नाकारणारे या जगातला आनंद मनमुराद
लुटतात. तरीही मृत्युपश्चात जीवनाशी तुलना करता या जगातले जीवन
हा क्षणिक आनंद आहे.

२७ सत्य नाकारणारे विचारतात, "प्रेषिताच्या पालनकर्त्याने
त्याच्याबरोबर आपला एखादा संकेत का नाही पाठवला?" त्यांना सांगा,
"ईश्वराच्या इच्छेला येईल त्याला तो भरकटू देतो, तर त्याच्याकडे
वळणाऱ्याला तो मार्गदर्शन करतो, २८ जे त्याच्यावर श्रद्धा ठेवतात आणि

त्याच्या स्मरणाने ज्यांना दिलासा मिळतो त्यांना तो मार्गदर्शन देतो. ईश्वराच्या स्मरणाने निःसंशय मनाला दिलासा मिळतो. २९ जे ईश्वरावर श्रद्धा ठेवतात आणि सत्कर्मे करत राहतात, त्यांचा अंतही आनंददायी असतो.”

३० अशा रीतीने आम्ही तुझ्यासमोर प्रकट केलेले साक्षात्कार इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही तुला एका समाजाकडे पाठवले, ज्यांच्यापूर्वी असे अनेक समाज होऊन गेले. तरीही ते कृपाळू ईश्वराला नाकारत आहेत. त्यांना सांगा, “तो माझा पालनकर्ता आहे. एकमेव ईश्वर आहे. त्याच्यावर माझा भरोसा आहे आणि मला त्याच्याकडेच परतायचे आहे.”

३१ असे एखादे कुरआन प्रकट झाले असते ज्यायोगे पर्वत चालू लागले असते, पृथ्वीच्या ठिकऱ्या उडाल्या असत्या किंवा मृतात्मे बोलू लागले असते. तरीही त्यांनी त्यावर विश्वास ठेवला नसता. निःसंशय, सगळ्या गोष्टी ईश्वरी मर्जीनुसार घडतात. श्रद्धावंतांना याची जाणीव नाही का की ईश्वराची इच्छा असती तर त्याने समस्त मानवजातीला योग्य मार्गदर्शन केले असते? सत्य नाकारणाऱ्यांनी केलेल्या अपकृत्यांमुळे त्यांच्यावर आपत्ती कोसळण्याचे किंवा त्यांच्या घराजवळ तिचा प्रहार होण्याचे थांबणार नाही. ईश्वराने दिलेल्या वचनाची पूर्तता होईपर्यंत सातत्याने हे सुरूच राहील. ईश्वर आपल्या वचनाची पूर्तता करायला कधीही चुकणार नाही. ३२ तुमच्या आधीच्या प्रेषितांची त्यांनी अशीच खिल्ली उडवली होती. सत्य नाकारणाऱ्यांना आम्ही थोडीशी उसंत दिली असली, तरी अखेरीस आम्ही त्यांना संकटात घेरलेच. किती भयावह होती आमची शिक्षा!

३३ प्रत्येक प्राणीमात्रावर आणि त्याच्या प्रत्येक कृतीवर देखरेख ठेवणाऱ्या ईश्वरासारखा इतर कुणी असेल का? तरीही ते ईश्वराशिवाय

इतरांना त्याच्या समतुल्य मानतात. त्यांना सांगा, "त्यांची नावे सांगा! किंवा पृथ्वीवरच्या त्याला माहीत नसलेल्या गोष्टींची माहिती त्याला देता येईल असे तुम्हाला वाटते का? हे तुमचे निव्वळ पोकळ दावे आहेत." खरोखर, सत्य नाकारणाऱ्यांना त्यांचे डावपेच योग्य वाटतात. त्यांच्या या मानसिकतेने त्यांना सन्मार्गापासून दूर ठेवले आहे. ईश्वर ज्याला वाममार्गाला जाऊ देतो, त्याला कुणीही सन्मार्गावर आणू शकत नाही. ३४ वर्तमान जीवनात त्यांच्यासाठी शिक्षा वाढून ठेवलेलीच आहे. पण मृत्युपश्चात जीवनातली शिक्षा याहून भयंकर असेल. ईश्वरापासून त्यांचा कुणीही बचाव करणार नाही.

३५ सदाचरण करणाऱ्यांना आश्वासन म्हणून मिळालेला स्वर्ग असा असेल– तिथे पाण्याचे प्रवाह झुळझुळ वाहत असतील. तेथील वृक्षांची फळे व सावली शाश्वत असेल. सदाचाराने वागणाऱ्यांना असा मोबदला मिळेल. पण सत्यावर अविश्वास दाखवणाऱ्यांना नरकाग्नीचा मोबदला मिळेल.

३६ ज्याच्याकडे आम्ही पवित्र ग्रंथ पाठवला ते तुमच्यावर अवतरीत झालेले सत्य पाहून आनंदित झाले, तर काहींनी त्याच्या काही भागावर अविश्वास दाखवला. त्यांना सांगा, "मला फक्त ईश्वराचीच उपासना करण्याचा आणि इतर कोणालाही त्याच्याशी समरूप व समतुल्य न मानण्याचा आदेश मिळालेला आहे. मी फक्त त्याची प्रार्थना करतो आणि मला त्याच्याकडे परतायचे आहे." ३७ अशाप्रकारे आम्ही अरेबिक भाषेत हा सुस्पष्ट आदेश दिला आहे. हे सगळे ज्ञान तुम्हाला मिळाल्यानंतरही तुम्ही त्यांच्या इच्छेनुसार वागलात तर ईश्वरापासून कुणीही तुमचे रक्षण करणार नाही की तुम्हाला पाठीशी घालणार नाही.

३८ तुमच्या पूर्वीही आम्ही आमचे प्रेषित पाठवले होते व त्यांना पत्नी

आणि संतती दिली होती. तरीही त्यांच्यापैकी एकही प्रेषित आमच्या आज्ञेशिवाय आमचा संकेत आणू शकला नाही. प्रत्येक कालखंडाला त्याचे साक्षात्कार मिळाले आहेत. ३९ ईश्वराच्या मर्जीला येईल त्याचा तो नाश करतो तर त्याच्या मर्जीला येईल त्याचे जतन करतो. सगळ्या आदेशांचा उगम त्याच्याकडेच आहे.

४० आम्ही त्यांना जे वचन दिले होते त्याचा काही भाग आम्ही तुम्हाला दाखवू किंवा त्यापूर्वीच तुमचा मृत्यू घडवू. त्यांना (ईश्वरी शिक्षेपासून) धोक्याचा इशारा देणे एवढेच तुमचे जीवितकार्य आहे. त्यांचा हिशेब ठेवण्याची जबाबदारी आमची आहे. ४१ आम्ही त्यांच्या भूमीत आलो आणि तिच्या सर्व सीमांचा संकोच केला आहे हे त्यांना माहीत नाही का? ईश्वराने दिलेला निर्णय कोणीही रद्द करू शकत नाही आणि प्रत्येकाचा हिशेब ठेवण्यात, त्यानुसार मोबदला देण्यात तो फार तत्पर आहे. ४२ त्यांच्या पूर्वी होऊन गेलेल्यांनीही कारस्थान रचले. पण सरशी ईश्वराच्या योजनेचीच झाली. प्रत्येकाचे कर्म तो जाणतो. सत्यावर अविश्वास दाखवणाऱ्यांना लवकरच कळेल, अंतिम निवासस्थान कुणासाठी आहे. ४३ सत्यावर अविश्वास दाखवणारे म्हणतात, "तुम्ही ईश्वराचे प्रेषित नाही." त्यांना सांगा, "खुद्द ईश्वर आणि त्याच्या ग्रंथाची जाण असणारे लोक तुमच्या-माझ्या दरम्यानचे साक्षीदार म्हणून पुरेसे आहेत."

प्रकरण १४ : अब्राहाम (इब्राहीम)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अलीफ लाम रा. हा ग्रंथ आम्ही तुमच्यावर अवतरीत करत आहोत, ज्यायोगे लोकांना तुम्ही त्यांच्या अधिपतीच्या आदेशानुसार

अंधारातून उजेडात न्यावे. हा मार्ग शक्तिशाली, स्तुत्य ईश्वराकडे जातो.
२ आकाश आणि पृथ्वीवरील प्रत्येक गोष्ट त्याचीच अंकित आहे.
सत्यावर अविश्वास ठेवणाऱ्यांना कठोर शिक्षा भोगावी लागणार आहे.
३ मृत्युपश्चात जीवनापेक्षा ऐहिक जीवन प्रिय असणाऱ्यांवर ईश्वराचा मार्ग
हा वाममार्ग आहे असे भासवून लोकांना त्यापासून दूर नेणाऱ्यांवर अरिष्ट
कोसळणार आहे. ते सन्मार्गापासून दूर भरकटले आहेत.

४ आम्ही पाठवलेल्या प्रत्येक पैगंबराने आपल्या समाजबांधवांच्या
भाषेतच त्यांच्याशी संवाद साधला. यामुळे त्यांच्यापर्यंत आमचा संदेश
त्याला स्पष्टपणे पोहोचवता आला. पण ईश्वराच्या मर्जीला येईल त्याला
तो सन्मार्गावर आणतो तर त्याच्या मर्जीला येईल त्याला त्यापासून दूर
नेतो. तो सर्वशक्तिमान, सर्वज्ञ आहे.

५ आम्ही मोझेसला आमचा संदेश देऊन त्याच्या समाजात पाठवले,
"तुझ्या लोकांना अंधारातून प्रकाशात ने आणि त्यांना ईश्वराच्या दिवसांची
आठवण करून दे. प्रत्येक संयमी, कृतज्ञ व्यक्तीसाठी त्या (ईश्वराच्या
दिवसांमध्ये) संकेत आहेत."

६ मोझेसने आपल्या समाजातील लोकांना सांगितले, "फारोचे साथीदार
तुमच्याशी क्रूरपणे वागत होते, तुमच्या मुलांना ठार मारत होते तर मुलींना
जिवंत ठेवत होते. या कठीण प्रसंगातून ईश्वराने तुमची सुटका केली.
त्याच्या या भलेपणाचे स्मरण करा. या संकटाद्वारे ईश्वराने निःसंशय तुमची
सत्वपरीक्षा घेतली होती." ७ त्या प्रसंगाचीही आठवण करा जेव्हा ईश्वराने
घोषणा केली होती, "कृतज्ञ रहाल तर मी तुमच्यावर कृपेचा अधिकाधिक
वर्षाव करेन, पण कृतघ्न रहाल तर लक्षात ठेवा, माझी शिक्षा खरोखर
कठोर आहे." ८ मोझेसने आपल्या लोकांना सांगितले, "तुम्ही आणि या
विश्वात राहणाऱ्या प्रत्येकाने एकमुखाने सत्यावर अविश्वास दाखवला तरी
ईश्वराचे काही बिघडणार नाही. तो स्वयंपूर्ण, स्तुत्य आहे."

९ तुमच्या आधी होऊन गेलेला नोहाचा समाज, आद व समूद या
जमाती आणि त्यांच्यानंतरचे समाज यांच्याविषयीच्या बातम्या तुम्हाला
कळल्या नाहीत का? ते कसे होते ते फक्त ईश्वरच जाणतो. आमचे पैगंबर
त्यांच्याकडे सुस्पष्ट संकेत घेऊन गेले होते. पण त्यांनी पैगंबरांना ठामपणे
सांगितले, "तुम्ही आणलेल्या संदेशावर आमचा विश्वास नाही. तुम्ही
आम्हाला जे करायला सांगत आहात, त्याविषयी आमच्या मनात अनेक
शंकाकुशंका आहेत."

१० त्यांच्या प्रेषितांनी विचारले, "आकाश आणि पृथ्वीचा उद्गाता
असलेल्या ईश्वराविषयी तुमच्या मनात शंका आहे का? तुमच्या
किमान काही अपराधांना तरी क्षमा करावी आणि तुम्हाला थोडीशी तरी
सवड द्यावी यासाठी तो तुम्हाला आपल्याकडे बोलावत आहे." यावर
त्यांच्या समाजबांधवांनी उत्तर दिले, "तुम्ही ईश्वराचे प्रेषित नाहीत तर
आमच्यासारखीच माणसे आहात! आमचे वाडवडील ज्याची उपासना
करत आले, त्यापासून तुम्ही आम्हाला दूर नेऊ पहात आहात. तेव्हा
तुम्ही (हे सिद्ध करण्यासाठी) आमच्यासमोर स्पष्ट पुरावा आणावा."
११ यावर त्यांच्या प्रेषितांनी सांगितले, "खरेच, आम्हीही तुमच्यासारखीच
मर्त्य माणसे आहोत. पण ईश्वर त्याच्या मर्जीला येईल त्यांचीच निवड
करतो आणि त्यांच्यावरच कृपा करतो. ईश्वराची इच्छा असल्याशिवाय
आम्ही तुम्हाला चमत्कार दाखवू शकत नाही. खऱ्या श्रद्धावंतांनी ईश्वरावर
विश्वास ठेवावा. १२ आणि ईश्वराने आम्हाला योग्य मार्गावर आणले
असताना आम्ही त्याच्यावर का विश्वास ठेवू नये? तुम्ही आम्हाला
कितीही त्रास दिला तरी तो आम्ही नक्कीच संयमाने सहन करू. तेव्हा
ईश्वरावर विश्वास असणाऱ्यांनी त्याच्यावर भरोसा ठेवावा."

१३ सत्यावर अविश्वास दाखवणाऱ्यांनी आपल्या प्रेषितांना सांगितले,

"तुम्ही आमच्या मार्गावर आला नाहीत, तर तुम्हाला या भूमीतून हद्दपार करून टाकू." पण ईश्वराने आपल्या या संदेशाद्वारे प्रेषितांना संयमाने वागायला प्रेरित केले, "आम्ही या अपराध्यांना नष्ट करू. १४ त्यांच्यानंतर या भूमीचे वारसदार म्हणून तुम्हाला वसवू. आमची भेट घेण्याचे भय बाळगणाऱ्यांना आणि आम्ही दिलेल्या इशाऱ्याची दखल घेणाऱ्यांनाच हा मोबदला मिळेल."

१५ आमचा निवाडा होताच प्रत्येक शिरजोर अपराधी निराश झाला. १६ ईश्वराला अव्हेरले तर नरकवास सोसावा लागेल, दुर्गंधीयुक्त दूषित पाणी प्यावे लागेल. १७ दूषित पाणी त्यांना घोट-घोट करून प्यावे लागेल, पण ते गिळणे सोपे जाणार नाही. मृत्यू त्यांना चहूबाजूंनी घेरेल. पण ते मरणार नाहीत. त्यानंतर कठोर यातनामय परिस्थितीचा सामना करावा लागेल.

१८ आपल्या पालनकर्त्यावर विश्वास न ठेवणाऱ्यांचे कर्म वादळामुळे वाऱ्यावर विखुरल्या जाणाऱ्या राखेसारखे आहे. त्यांच्या कामाचा त्यांना काहीही लाभ होणार नाही, ते निष्फळ ठरेल. असे करणे म्हणजे चुका करून मार्गभ्रष्ट होण्यासारखे आहे. १९ ईश्वराने आकाश आणि पृथ्वीची निर्मिती विशिष्ट हेतूने केल्याचे तुम्हाला कळत नाही का? त्याच्या मनात आले तर तुम्हाला नष्ट करून तो इथे नवीन समाज आणू शकतो. २० असे करणे ईश्वरासाठी कठीण नाही.

२१ निवाड्याच्या दिवशी सगळ्यांना ईश्वरासमोर हजर केले जाईल. ऐहिक जीवनात अहंकाराने वागणाऱ्यांना त्या दिवशी दुर्बल विचारतील, "तुमच्या सांगण्याप्रमाणे आम्ही वागलो. आता ईश्वरी शिक्षेपासून तुम्ही आमचा बचाव करू शकाल?" यावर अहंकाराने वागणारे म्हणतील, "ईश्वराने आम्हाला सदाचाराचे मार्गदर्शन दिले असते तर आम्हीही ते

तुम्हाला दिले असते. आता आपण संयम दाखवला काय आणि संयम मोडला काय, शिक्षेपासून आता सुटका नाही!"

२२ ईश्वराचा निवाडा झाल्यावर सैतान या अपराध्यांना सांगेल, "ईश्वराने आपले वचन खरे केले. मीही तुम्हाला वचन दिले होते, पण ते आता मोडले आहे. मी तुम्हाला साद दिली आणि तुम्ही मला प्रतिसाद दिला. अन्यथा मला तसा काही अधिकार नव्हता. दोष मला देऊ नका तर स्वतःला द्या. मी तुम्हाला मदत करू शकत नाही की तुम्ही मला मदत करू शकत नाही. तुम्ही मला ईश्वराचा दर्जा दिलात या कृत्याचा आता मी धिक्कार करतो." अपराध्यांना अशीच वेदनादायी शिक्षा मिळेल.

२३ पण ईश्वरावर विश्वास ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना स्वर्गात प्रवेश मिळेल, जिथे वाहत्या नद्या असतील. त्यांच्या पालनकर्त्याच्या अनुमतीने ते तिथे कायम वास्तव्य करतील. "तुम्हाला शांती लाभो," या अभिवादनाने तिथे त्यांचे स्वागत केले जाईल.

२४ ईश्वराच्या वाणीची तुलना तो भक्कम वृक्षाशी करतो हे तुम्हाला माहीत आहे का? त्या पवित्र वृक्षाची मुळे जमीन घट्ट धरून ठेवतात आणि त्याच्या शाखा उंच आकाशात डोलतात. २५ ईश्वराच्या अनुमतीने त्याला प्रत्येक मोसमात फलधारणा होते. लोकांनी बोध घ्यावा म्हणून ईश्वर अशी तुलना करतो. २६ पण असत्यावर आधारित वाणी वाईट वृक्षासारखी असते, ती जमिनीतून उखडली जाते. त्याला भक्कम आधार नसतो.

२७ आपल्या खंबीर वाणीने ईश्वर श्रद्धावंतांना ताकद देतो, ऐहिक जीवनातही आणि मृत्युपश्चात जीवनातही. अपराध्यांना तो वाममार्गाने जाऊ देतो. त्याच्या मनात येईल ते तो करतो.

२८ ईश्वराने केलेल्या कृपेच्या मोबदल्यात सत्य नाकारून फक्त कृतघ्नपणे वागणारे आणि आपल्या सोबतींना विनाशाच्या घाईत लोटणारे

लोक तुम्हाला माहीत नाहीत का? २९ त्यांना नरकाग्नीचे चटके सोसावे
लागतील. किती गलिच्छ ठिकाण आहे हे! ३० लोकांना ईश्वरी मार्गापासून
दूर करण्यासाठी त्यांनी ईश्वराचे समतुल्य दैवत मानले आहेत. त्यांना
सांगा, "थोड्या वेळासाठी मजा लुटा, नंतर तुम्हाला नरकातच जायचे
आहे."
३१ माझ्या सेवकांना सांगा, "निवाड्याचा दिवस येईपर्यंत खऱ्या
श्रद्धावंतांनी नियमितपणे प्रार्थना करावी व आम्ही केलेल्या तरतुदीतून
उघड व गुप्त दानधर्म करावा. निवाड्याच्या दिवशी न कुणाची रदबदली
कामी येईल, ना कुणाची मैत्री."
३२ त्यानेच आकाश आणि पृथ्वी निर्माण केली. तोच आकाशातून
जलवर्षाव करतो, ज्यायोगे तुमच्या उपजीविकेसाठी फळे काढली जातात.
त्याने नौका तुमच्या अधीन केल्या, ज्या त्याच्या आदेशानुसार तुम्हाला
समुद्रपार घेऊन जातात. त्याने नद्यांनाही तुमच्यासाठी कामी लावले.
३३ त्याने चंद्र-सूर्याला तुमच्यासाठी नियमात बांधले, जे सातत्याने आपल्या
मार्गावर मार्गस्थ झाले आहेत. दिवस-रात्रीलाही त्याने तुमच्यासाठी असेच
नियमात बांधले, ३४ तुम्ही त्याच्याकडे जे जे मागितले ते ते त्याने तुम्हाला
दिले. त्याचे उपकार इतके अगणित आहेत की तुम्ही त्यांची कदापि
गणती करू शकणार नाही. खरोखर, माणूस अतिशय अन्यायी, अतिशय
कृतघ्न आहे.
३५ अब्राहामने केलेल्या ईशप्रार्थनेचे स्मरण करा, "हे पालनकर्त्या! हे
शहर शांतीचे माहेर बनव आणि मला व माझ्या संततीला मूर्तीपूजेपासून दूर
ठेव. ३६ हे पालनकर्त्या! या मूर्तींनी किती लोकांना मार्गभ्रष्ट केले आहे!
माझे अनुसरण करणारे माझ्याबरोबर आहेत. पण कुणी माझ्याविरुद्ध गेले
तरी तू त्यांना क्षमा कर. तू निःसंशय दयाशील, क्षमाशील आहेस.

३७ हे पालनकर्त्या! माझ्या संततीने तुझी नित्यनेमाने प्रार्थना करावी
यासाठी त्यांच्यापैकी काहींना मी तुझ्या पवित्र काबागृहाजवळ नापीक
खोऱ्यात वसवले. त्यांची मने तुझ्याविषयीच्या आदराने, भक्तिभावाने
भरून जाऊ देत. त्यांच्या उपजीविकेसाठी फळांची तरतूद कर, म्हणजे ते
तुझ्या उपकारांची जाणीव ठेवतील.

३८ हे पालनकर्त्या! आम्ही जे लपवतो आणि जे व्यक्त करतो,
ते सगळे तू ओळखतोस. आकाश आणि पृथ्वीवरील कुठलीही गोष्ट
तुझ्यापासून लपलेली नाही. ३९ वृद्धापकाळातही तू मला इश्माएल व
इसहाकरूपी पुत्रांचा लाभ दिलास. यासाठी आम्ही तुझी मनापासून
स्तुती करतो. माझा पालनकर्ता मनापासून केलेल्या प्रार्थनेचा निश्चित
स्वीकार करतो. ४० हे पालनकर्त्या! मला आणि माझ्या अपत्यांना तुझी
नियमित प्रार्थना करण्याची सद्‌बुद्धी दे. माझ्या प्रार्थनेचा स्वीकार कर.
४१ हे पालनकर्त्या! हिशेबाच्या दिवशी मला, माझ्या आईवडिलांना आणि
सगळ्या श्रद्धावंतांना क्षमा कर.”

४२ अपराध्यांची कृत्ये ईश्वराने ओळखली नाहीत असा विचार करू
नका. ज्या दिवशी त्यांचे डोळे भयाने विस्फारले जातील त्या निवाड्याच्या
दिवसापर्यंत तो त्यांना सवड देईल. ४३ त्या दिवशी भीतीने आपल्या माना
उंचावून (इकडेतिकडे) ते धावत सुटतील. सुन्न मनःस्थितीत ते समोरच्या
दृश्याकडे टक लावून पहात असतील.

४४ ज्या दिवशी त्यांच्यावर शिक्षा कोसळेल त्या दिवसाचा त्यांना इशारा
द्या. या दिवशी अपराधी ईश्वराची विनवणी करतील, “हे पालनकर्त्या!
आम्हाला थोडीशी उसंत दे. आम्ही तुझ्या हाकेला प्रतिसाद देऊ आणि
तुझ्या प्रेषितांचे अनुसरण करू.” यावर ईश्वर त्यांना विचारेल, “आम्ही
कधीही कमजोर पडणार नाही अशी शपथ घेणाऱ्यांपैकी तर तुम्ही नाही?”

४५ ज्यांनी स्वतःवर अन्याय ओढवून घेतला आहे अशांच्या निवासस्थानी
तुम्ही राहिलात. आम्ही त्यांच्याशी कसा व्यवहार केला होता हे असंख्य
उदाहरणे देऊन आम्ही स्पष्ट केले होते. ४६ त्यांनी ईश्वराविरुद्ध अनेक
कारस्थाने रचली, पण ती सगळी ईश्वराला माहीत होती. त्यांचे कारस्थान
पर्वत हलवण्याचे असले तरी ईश्वर ते निष्फळ करेल.

४७ ईश्वर आपल्या प्रेषितांना दिलेल्या वचनाची पूर्तता करणार नाही,
असा विचारही मनात आणू नका. तो बलवान असून शिक्षा करायला
समर्थ आहे. ४८ ज्या दिवशी पृथ्वी आणि आकाश नव्या रूपात सादर केले
जातील त्या दिवशी त्यांना एकमेव, सर्वोच्च ईश्वरासमोर हजर केले जाईल.
४९ त्या दिवशी सगळे अपराधी बेड्यांनी जखडलेले दिसतील. ५० त्यांचे
कपडे तेलाने माखलेले असतील आणि त्यांना ज्वाळांनी वेढलेले असेल.
५१ ईश्वर प्रत्येकाला त्याच्या कृत्यानुसार मोबदला देईल. ईश्वर मोबदला
देण्यात तत्पर आहे. ५२ हा समस्त मानवजातीसाठी पाठवलेला संदेश आहे.
लोकांना याद्वारे (ईश्वरी शिक्षेपासून) सावध करावे आणि ईश्वर एकमेव
असल्याचे त्यांनी ओळखावे. सद्सद्विवेक बुद्धी लाभलेल्यांनी यापासून
योग्य तो बोध घ्यावा.

प्रकरण १५ : खडकांचा प्रदेश (अल्-हिज्र)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अलीफ लाम रा. कुरआन या सुस्पष्ट ग्रंथातील ही वचने आहेत.
२ निश्चितच एक दिवस असा उगवेल ज्या दिवशी आग्रहपूर्वक सत्य
नाकारणारे म्हणतील, "आम्ही ईश्वराला शरण गेलो असतो तर चांगले

झाले असते.” ३ तेव्हा त्यांना मनमुराद खाऊ द्या, मौजमजा करू द्या
आणि व्यर्थ आशेत दंग राहू द्या. कारण लवकरच त्यांना सत्याची जाणीव
होईल. ४ पूर्वनियोजित आदेश काढल्याशिवाय आम्ही कधीही कोणते
शहर उध्वस्त केले नाही. ५ कोणताही समाज आपल्यावरचे अरिष्ट ना
नियोजित वेळेआधी आणू शकतो, ना पुढे ढकलू शकतो.
६ ते तुम्हाला म्हणतील, “तुमच्याबरोबर हा जो ईश्वराचा उपदेश
(कुरआन) पाठवला आहे, त्याने तुम्ही पुरतेच झपाटले आहात. ७ तुम्ही
सत्यवचनी असाल तर सांगा, तुमच्याबरोबर तुम्ही ईश्वराच्या दूताला
का आणले नाही?” ८ पण आम्ही फक्त न्याय करण्यासाठीच आमच्या
दूताला पाठवतो. तो आल्यानंतर तुमची शिक्षा तहकूब केली जाणार नाही.
९ (ईश्वराच्या निर्माण योजनेची) आठवण करून देणारा हा ग्रंथ
आम्हीच पाठवला आहे आणि निःसंशय, आम्ही तो (विश्वाच्या अंतिम
दिवसापर्यंत) सुरक्षित ठेवू.
१० तुमच्या पूर्वीच्या समाजामध्येही आम्ही अनेक प्रेषितांना पाठवले
होते. ११ पण असा एकही प्रेषित नव्हता, जो त्यांच्याकडे गेला आणि
लोकांनी त्याची खिल्ली उडवली नाही. १२ अशा प्रकारे आम्ही पाप्यांच्या
मनात प्रेषितांची खिल्ली उडवण्याच्या प्रवृत्तीचा शिरकाव होऊ दिला. १३ ते
यावर विश्वास ठेवणारच नाहीत, जरी त्यांच्यासमोर पूर्वी होऊन गेलेल्या
(अपराधी) लोकांची अशीच उदाहरणे आहेत. १४ आम्ही त्यांच्यासाठी
स्वर्गाचे दार जरी उघडले तरी त्यातून प्रवेश करताना ते म्हणतील, १५ “हा
तर आमचे डोळे दिपवण्याचा प्रकार आहे. आमच्यावर भुरळ घातली
गेली आहे.”
१६ आकाशात नक्षत्रांचे गुच्छ लावून प्रेक्षकांसाठी आम्ही ते सुशोभित

केले. १७ आणि हरएक दुष्ट सैतानापासून त्यांचे संरक्षण केले. १८ पण कुणी
तिथे लपूनछपून शिरायचा प्रयत्न केला तर धडाडता दाहक अग्नी त्यांचा
घास घेतल्याशिवाय राहणार नाही.
१९ आम्ही पृथ्वीचा विस्तार केला, तिच्यावर भक्कम पर्वत उभे केले
आणि तिथल्या प्रत्येक गोष्टीला योग्य प्रमाणात वाढण्यासाठी मुभा दिली.
२० आम्ही पृथ्वीवर मानवाला उदरनिर्वाहाची साधने दिली आणि अन्य
जीवसृष्टीसाठीही त्याची तरतूद केली, ज्यांची तरतूद करणे तुमच्यासाठी
अशक्य आहे.
२१ आमच्या खजिन्यात प्रत्येक गोष्टीचा मुबलक साठा आहे, पण
आम्ही त्या वाजवी प्रमाणातच तुमच्यासाठी पाठवतो. २२ आम्ही वाऱ्याला
वेगाने संचार करायला लावतो. आकाशातील ढगांमधून ते तुमच्यासाठी
पाण्याची व्यवस्था करतात. तुम्ही स्वतः होऊन आपल्यासाठी पाण्याचा
साठा करू शकत नाही.
२३ खरोखर, आम्हीच जीवसृष्टीला प्राण देतो आणि तिचे प्राणहरणही
करतो! आम्ही प्रत्येक गोष्टीचे वारसदार आहोत. २४ पृथ्वीवर तुमच्याआधी
कुणाचे वास्तव्य होते आणि तुमच्यानंतर कुणाचे वास्तव्य असेल हे आम्ही
जाणतो. २५ तुमचा पालनकर्ता निवाड्याच्या दिवशी तुम्हा सगळ्यांना
एकत्र करेल. तो सर्वज्ञ, प्रज्ञावंत आहे.
२६ आम्ही चिखलापासून व मातीच्या गोळ्यापासून मानवाची निर्मिती
केली. २७ आणि त्याच्यापूर्वी धगधगत्या अग्नीपासून जिन्नची निर्मिती
केली.
२८ तुमच्या पालनकर्त्याने आपल्या दूतांना सांगितले, "मी मातीपासून
मानवाची निर्मिती करणार आहे. २९ त्याला आकार देऊन त्यात माझ्या

चैतन्याचे प्राण फुंकल्यावर त्याच्यासमोर लीन होऊन तुम्ही त्याला वंदन करा.” ३० या आदेशानुसार सगळ्या ईशदूतांनी ईश्वराच्या या नवनिर्मितीला वंदन केले. ३१ पण इब्लीसने असे केले नाही. वंदन करणाऱ्यांमध्ये सामील व्हायला त्याने नकार दिला. ३२ ईश्वराने त्याला विचारले, “इब्लीस! तुझे काय बिनसले आहे? वंदन करणाऱ्यांमध्ये तू सामील का झाला नाहीस?” ३३ त्याने उत्तर दिले, “मातीच्या साच्यातून तू ज्याला निर्माण केलेस अशा माणसासमोर मी लीन होणार नाही.”

३४ ईश्वराने त्याला सांगितले, “तर मग इथून चालता हो, कारण तू अपराधी आहेस.” ३५ “निवाड्याच्या दिवसापर्यंत तू शापग्रस्त जीवन जगशील.” ३६ सैतानाने ईश्वराची विनवणी केली, “हे पालनकर्त्या! पुनर्निर्माणाच्या दिवसापर्यंत मला तू उसंत दे.” ३७ ईश्वराने सांगितले, “तुला सवड दिली जाईल. ३८ ठीक आहे! निवाड्याच्या दिवसापर्यंत तुला ही सवड दिली.”

३९ यावर सैतान म्हणाला, “हे पालनकर्त्या! तू मला मार्गभ्रष्ट होऊ दिले आहेस, तर मी पृथ्वीतलावर माणसाला चुकीचा मार्ग योग्य असल्याचे भासवेन. त्यांची दिशाभूल करेन. ४० तू निवडलेल्या सच्च्या सेवकांखेरीज इतरांना मी चुकीच्या मार्गाने घेऊन जाईन.”

४१ ईश्वराने त्याला सांगितले, “मी दाखवलेला मार्ग लोकांना थेट माझ्याकडे घेऊन येतो. ४२ माझ्या सच्च्या सेवकांसमोर तुझी काही मात्रा चालणार नाही. केवळ दिशाभूल झालेले लोकच तू दाखवलेल्या मार्गाने जातील. ४३ निःसंशय, त्यांच्यासाठी नरकवास अटळ आहे.” ४४ नरकाचे सात दरवाजे असतील आणि आत जाण्याचा दरवाजा प्रत्येकाला नेमून दिलेला असेल.

४५ ईश्वराचे भय बाळगणारे निःसंशय स्वर्गात वास्तव्य करतील, जिथे

पाण्याचे कारंजे असतील. ४६ तिथे त्यांचे स्वागत या शब्दात केले जाईल,
"सुस्वागतम! तुम्हाला सुरक्षित, शांतीपूर्ण जीवन लाभो!" ४७ आम्ही
त्यांच्या अंतःकरणातले सगळे वाईट विचार धुऊन काढून त्यांची शुद्धी
करू. तिथे सगळे बंधूभावाने राहतील. वैरभाव विसरून प्रसन्नचित्ताने
एकमेकांसमोर आसनांवर बसतील. ४८ ते कधीही नैराश्याने ग्रस्त होणार
नाहीत. त्यांना कधीही स्वर्गातून बाहेर पडावे लागणार नाही. ४९ माझ्या
सेवकांना सांगा, "मी एकमेव दयाशील आणि क्षमाशील आहे. ५० आणि
माझी शिक्षा यातनामय आहे."

५१ त्यांना अब्राहामकडे आलेल्या अतिथींची कथा सांगा.
५२ अतिथींनी त्याच्याकडे येऊन शुभचिंतन केले, "तुला शांतीचा
लाभ होवो!" अब्राहाम त्यांना म्हणाला, "मला तुमची भीती वाटते."
५३ त्यांनी त्याला आश्वस्त केले, "मुळीच घाबरू नकोस. आम्ही
तुझ्यासाठी शुभवार्ता आणली आहे. तुला असा पुत्र होईल ज्याला दिव्य
ज्ञान लाभलेले असेल." ५४ अब्राहामने विचारले, "वृद्धापकाळात तुम्ही
माझ्यासाठी ही शुभवार्ता आणली आहे? कसली शुभवार्ता आहे ही?"
५५ यावर अतिथी म्हणाले, "निःसंशय, आम्ही तुझ्यासाठी खरीखुरी
शुभवार्ता आणली आहे. तेव्हा तू असा निराश होऊ नकोस." ५६ अब्राहाम
नम्रपणे म्हणाला, "ईश्वराची कृपा लाभल्यावर फक्त वाट चुकलेलेच
निराश होऊ शकतील. मी त्यातला नाही."

५७ पुढे त्याने विचारले, "हे दूतांनो! तुमचा इथे येण्यामागचा हेतू
काय?" ५८ त्यांनी सांगितले, "अपराध्यांचा समाचार घेण्यासाठी
आम्हाला पाठवले आहे." ५९ लूतचे कुटुंबिय सोडून इतर सर्वांना आम्ही
ईश्वरी शिक्षेपासून वाचवू. ६० त्यांची पत्नी मात्र याला अपवाद असेल. ती
मागे राहणाऱ्या पराभूतांपैकी असेल, असा ईश्वराचा निर्णय झालेला आहे.

६१ ते देवदूत लूत आणि त्याच्या कुटुंबियांकडे आले. ६२ त्यांना
पाहून लूत म्हणाला, "मी आपल्याला ओळखत नाही." ६३ यावर दूतांनी
सांगितले, तू आम्हाला ओळखत नाहीस, पण आम्ही अशी बातमी
घेऊन आलो आहोत, ज्याविषयी लोकांच्या मनात शंका आहे. ६४ आम्ही
तुझ्याकडे सत्य घेऊन आलो आहोत. आम्ही सत्यवचनी आहोत. ६५ तेव्हा
मध्यरात्रीनंतर कुटुंबियांसमवेत या शहराबाहेर पडा. तुम्ही सगळ्यांच्या मागून
चाला. जाताना कुणीही माघारी वळून पाहू नका. तुम्हाला मिळालेल्या
आदेशानुसार नियोजित जागी पोहोचा." ६६ सकाळपर्यंत अपराध्यांचा नाश
होईल, हा आमचा निर्णय आम्ही देवदूतांमार्फत लूतपर्यंत पोहोचवला.

६७ शहरातले लोक अत्यानंदित होऊन अतिथींकडे धावत आले.
६८ हे पाहून लूतने त्यांना सांगितले, "हे माझे अतिथी आहेत, तेव्हा मला
शरमिंदे करू नका. ६९ ईश्वराचे भय बाळगा आणि मला लज्जित करू
नका." ७० यावर शहरवासीयांनी विचारले, "अपरिचितांचे आदरातिथ्य
करायला आम्ही तुम्हाला मनाई केली नव्हती का?" ७१ लूतने त्यांना
सांगितले, "तुमच्या मनातली इच्छा शमवायची असेल तर त्यासाठी
माझ्या मुली आहेत. (यांच्याशी वैध विवाहसंबंध ठेवा.)"

७२ तुमची शपथ, हे शहरवासी त्यांच्या रानटी विकारात हरवून गेले
आहेत. ७३ या अपराधापायी सूर्योदयाच्या वेळेस त्यांच्यावर आमच्या
शिक्षेचा विस्फोट झाला. ७४ आम्ही हे शहर उलथेपालथे करून टाकले
आणि त्यावर दगडांचा वर्षाव केला. ७५ बोध घेणाऱ्यांसाठी या घटनेत
निश्चितच संकेत आहेत. ७६ महामार्गावरील हे शहर आजही तिथे पहायला
मिळते. ७७ श्रद्धावंतांसाठी निश्चितच यात ईश्वरी संकेत आहेत.

७८ अरण्यात राहणारे लोकही (पैगंबर शुऐब यांचा समाज) खरोखर
अपराधी होते. ७९ तेव्हा आम्ही त्यांचाही सूड घेतला. या दोन्ही वस्त्या

आजही महामार्गाच्या दुतर्फा स्पष्टपणे पहावयास मिळतात. ८० अल्-हिज्रच्या समाजानेही आमच्या प्रेषितांना नाकारले. ८१ आम्ही त्यांना आमचे संकेत दिले, पण त्यांनी त्याकडे पाठ फिरवली. ८२ पर्वतांमध्ये गुहा करून त्यात ते सुरक्षितपणे राहू लागले. ८३ पण एके दिवशी भल्या पहाटे त्यांच्या वस्तीवर आमच्या शिक्षेचा स्फोट झाला. ८४ त्यांनी जे काही कमावले होते, त्याचा त्यांना काहीही फायदा झाला नाही.

८५ आकाश आणि पृथ्वी व त्यांच्या दरम्यानच्या सगळ्या गोष्टींची निर्मिती आम्ही सत्य आणि शहाणपणाशी सुसंगत असणारी आवश्यकता विचारात घेऊन केली. निवाड्याचा दिवस येणे अटळ आहे. तेव्हा मोठ्या मनाने, दिलदारपणे त्यांच्या चुकांकडे दुर्लक्ष करा. ८६ निःसंशय, तुमचा पालनकर्ता सर्वज्ञानसंपन्न निर्माता आहे.

८७ आम्ही तुम्हाला वारंवार पठण केली जाणारी सात वचने आणि कुरआनसारखा श्रेष्ठ ग्रंथ दिला. ८८ त्यांच्यापैकी काहींना आम्ही ऐहिक लाभ दिले आहेत, त्याकडे नजर वळवू नका की (तुमच्या उपदेशाकडे दुर्लक्ष करतात म्हणून) त्यांच्यासाठी शोक करू नका. श्रद्धावंतांना तुमच्या करुणेच्या पंखांची उब द्या. ८९ आणि त्यांना सांगा, "मी फक्त तुम्हाला सावध करायला आलोय." ९० विभाजन प्रवृत्तीच्या काहींनादेखील आम्ही पूर्वी हा ग्रंथ दिला होता. ९१ (भाष्य व अर्थनिष्पत्ती करताना) त्यांनी त्या ग्रंथाला पूर्णपणे भ्रष्ट केले. ९२ तुमच्या पालनकर्त्याची शपथ! आम्ही त्यांना याचा जाब विचारू. ९३ त्यांना आपल्या कृतीचे उत्तर द्यावेच लागेल.

९४ तुम्हाला जो आदेश मिळाला आहे तो जाहीरपणे सांगा आणि अनेकेश्वरवाद्यांपासून दूर रहा. ९५ तुमची खिल्ली उडवणाऱ्यांना शिक्षा करायला आम्ही समर्थ आहोत. ९६ ते एकमेव ईश्वराऐवजी अन्य कुणाला

तरी ईश्वर मानतात, पण लवकरच त्यांना अद्दल घडेल. [९७] हे प्रेषिता! त्यांच्या बोलण्यामुळे तुम्ही किती व्यथित होता ते आम्ही जाणतो. [९८] पण ईश्वराची स्तुती करून त्याचे गुणगान गा आणि त्याच्यासमोर नतमस्तक व्हा. [९९] अटळ असलेला मृत्यू येईपर्यंत तुमच्या पालनकर्त्याची उपासना करत रहा.

प्रकरण १६ : मधमाश्या
(अन्-नहल)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] ईश्वराचा आदेश लवकरच कळेल, त्यासाठी फार आतुर होऊ नका. तो पवित्र आहे. ते ज्यांना ईश्वराचा दर्जा देतात, त्यांच्यापेक्षा तो कितीतरी श्रेष्ठ आहे. [२] त्याच्या इच्छेला येईल त्या आपल्या सेवकाकडे तो आपल्या आदेशानुसार आपले साक्षात्कार घेऊन दूताला पाठवतो. त्या दूताबरोबर तो आपला संदेश पाठवतो, "मानवजातीला इशारा द्या, माझ्याशिवाय अन्य कुणी ईश्वर नाही. तेव्हा माझी भीती बाळगा." [३] त्याने निश्चित हेतूने आकाश आणि पृथ्वीची निर्मिती केली. ते ज्यांना ईश्वराच्या बरोबरीचे मानतात त्यांच्यापेक्षा तो श्रेष्ठ आहे.

[४] त्याने वीर्याच्या फक्त एका थेंबापासून मानवाला निर्माण केले आणि हाच माणूस आपण किती भांडकुदळ आहोत हे उघडपणे दाखवतो. [५] त्याने तुमच्यासाठी गुरेढोरे निर्माण केली; त्यांच्यापासून तुम्हाला अन्न, वस्त्र आणि इतर असंख्य फायदे मिळतात. [६] तुम्ही त्यांना सकाळी चरायला नेता आणि सायंकाळी परत घरी घेऊन येता, ते दृश्य तुमच्यासाठी फारच रमणीय दिसते. [७] तुमच्यासाठी ते दुर्गम ठिकाणीही ओझे वाहून नेतात. ही यातायात करायला तुम्हाला प्रचंड कष्ट करावे लागले असते. निःसंशय!

तुमचा पालनकर्ता कनवाळू, दयाळू आहे. ८ तुम्हाला त्यांच्या पाठीवरून प्रवास करता यावा यासाठी त्याने घोडे, खेचरे आणि गाढवे निर्माण केली. त्याने निर्माण केलेल्या सजीवांमुळे सृष्टीचीही शोभा वाढली. तुमच्या ज्ञानात नसलेल्या इतरही अनेक गोष्टी त्याने निर्माण केल्या.

९ सन्मार्ग थेट ईश्वराकडे घेऊन जातो, पण त्याच्या मार्गापासून दूर जाणारे इतरही मार्ग आहेत. त्याची इच्छा असती तर त्याने तुम्हा सगळ्यांना सन्मार्गावर जायचे मार्गदर्शन दिले असते.

१० तो आकाशातून तुमच्यासाठी पाण्याची तरतूद करतो. त्यातूनच तुम्हाला पिण्याचे पाणी मिळते आणि त्यापासूनच वनस्पतींची वाढ होते, ज्यात तुम्ही आपली गुरेढोरे चारता. ११ त्या पाण्यावरच तो तुमच्यासाठी अन्नधान्य, जैतून, खजूर, द्राक्ष यांसह सर्व प्रकारची फळे पिकवतो. निःसंशय, चिंतनशील व्यक्तींसाठी यात संकेत आहे.

१२ त्याने दिवस, रात्र, चंद्र, सूर्य या सगळ्यांना तुमच्यासाठी कामाला लावले. आकाशातील तारेही त्याच्या आज्ञेत आहेत. निःसंशय, यात सुज्ञ लोकांसाठी संकेत आहेत. १३ पृथ्वीवर त्याने तुमच्यासाठी विविधरंगी वस्तू तयार केल्या. त्यांची योग्य दखल घेणाऱ्यांसाठी त्यात निश्चितच संकेत आहे.

१४ त्याने सागरालाही तुमच्या स्वाधीन केले, ज्यायोगे तुम्हाला ताजे समुद्री खाद्य खायला मिळते आणि सुंदर अलंकार मिळतात. नौकाही सागरातून डौलाने प्रवास करताना दिसतात. त्याच्या या सगळ्या उपकारांसाठी तुम्ही त्याच्या कृपेची अभिलाषा धरावी आणि त्याच्याविषयी कृतज्ञ रहावे.

१५ तुमच्या पायाखालची जमीन कंपित होऊ नये यासाठी त्याने पृथ्वीवर भक्कम पर्वत रोवले. पृथ्वीवर संचार करण्यासाठी तुम्हाला मार्ग

मिळावेत म्हणून त्याने नद्या व रस्ते बनवले. १६ याशिवाय त्याने इतरही ओळखीच्या खुणा बनवल्या. त्यांच्या आणि आकाशातील ताऱ्यांच्या आधारे लोकांना आपल्या नियोजित मुक्कामाची दिशा निश्चित करता येते. १७ तर मग त्याच्यासारखा निर्माता काहीही निर्माण न करणाऱ्यासारखा कसा असेल? या वस्तुस्थितीवर तुम्ही चिंतन करणार नाही का? १८ तुम्ही ईश्वराच्या कृपेची मोजदाद करायचा प्रयत्न केला तर तुम्हाला ते कधीही जमणार नाही. ईश्वर अतिशय क्षमाशील, दयाशील आहे. १९ तुम्ही काय लपवता आणि काय उघड करता ते सगळे ईश्वर जाणतो.

२० ईश्वराव्यतिरिक्त तुम्ही ज्यांचा धावा करता ते काहीही निर्माण करू शकत नाहीत. ते स्वतःच इतरांनी निर्माण केलेले आहेत. २१ ते जीवित नाहीत, तर मृत आहेत. आपण परत कधी जिवंत होऊ हेही त्यांना माहीत नाही. २२ तुमचा ईश्वर हा एकमेव ईश्वर आहे. मृत्युपश्चात जीवनावर ज्यांचा विश्वास नाही, ते सत्य स्वीकारायला नकार देतात, ते उद्धट आहेत. २३ ते काय व्यक्त करतात आणि काय लपवतात ते ईश्वर निश्चितच जाणतो. असे उद्धट लोक ईश्वराला अप्रिय आहेत.

२४ जेव्हा त्यांना विचारले जाते, "तुमच्या पालनकर्त्याने तुमच्याकडे जे पाठवले आहे ते काय आहे?" ते उत्तर देतात, "प्राचीन काळातील कथा." २५ पुनर्निर्माणाच्या दिवशी त्यांच्या खांद्यावर स्वतःच्या अपकृत्यांचे ओझे तर असेलच, शिवाय अज्ञानापोटी त्यांनी ज्यांना वाईट मार्गाला लावले त्यांच्याही अपकृत्यांचे ओझे असेल. त्यांचे हे ओझे किती दुसह्य असेल!

२६ त्यांच्याआधी होऊन गेलेल्यांनी असेच कारस्थान रचले होते. पण ईश्वराने त्यांच्या निवासस्थानाच्या मुळावरच घाव घातला. आपसूकच त्याचे छतही त्यांच्यावर कोसळले. त्यांनी अपेक्षाही केली नव्हती तिथून त्यांच्यावर संकट कोसळले. २७ त्यानंतर पुनर्निर्माणाच्या दिवशी त्यांची

अवहेलना करून ईश्वर त्यांना विचारेल, "ज्यांच्यासाठी तुम्ही माझ्या मार्गदर्शनाला विरोध केलात, ते माझे भागीदार कुठे आहेत?" ज्यांना ज्ञान दिले गेले ते म्हणतील, "आजच्या दिवशी सत्य नाकारणाऱ्यांची नक्कीच मानहानी होईल, त्यांच्यावर शिक्षेचे संकट कोसळेल."

२८ देवदूत आपल्याच अंतरंगातील चैतन्यावर अत्याचार करणाऱ्यांचे प्राण हरण करू लागताच ते शरणागती पत्करून म्हणतील, "आम्ही कसलेही अपकृत्य करत नव्हतो!" देवदूत उत्तरादाखल म्हणतील, "खरे की काय! पण तुम्ही जे करताय ते ईश्वराने ओळखले आहे." २९ तेव्हा नरकाच्या प्रवेशद्वारातून आत जा, तुम्हाला तिथेच कायम वास्तव्य करावे लागेल. उद्धट लोकांचे हे वसतीस्थान किती गलिच्छ आहे!

३० ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांना जेव्हा विचारले जाईल, "तुमच्या पालनकर्त्याने तुमच्यासाठी काय पाठवले आहे?" यावर त्यांचे उत्तर असेल, "कल्याणकारी वस्तू." ऐहिक जीवनात सत्कर्मे करणाऱ्यांना चांगला मोबदला तर मिळेलच, पण मृत्युपश्चात त्यांचे जीवनातले निवासस्थान याहून कितीतरी चांगले असेल. सदाचार करणाऱ्यांचे निवासस्थान खरोखर उत्कृष्ट असते. ३१ ते शाश्वततेच्या स्वर्गात प्रवेश करतील, जिथे त्यांच्या पायाशी नद्या वाहत असतील. त्यांच्या इच्छेला येईल ते सगळे त्यांना तिथे मिळेल. सदाचारी लोकांना ईश्वर असा चांगला मोबदला देतो. ३२ चित्तशुद्धी झालेल्या अवस्थेत त्यांचे प्राण हरण करताना देवदूत त्यांचे स्वागत करतील, "तुमच्या आत्म्याला शांती लाभो! ऐहिक जगात केलेल्या सत्कर्माचे फळ म्हणून या स्वर्गात प्रवेश करा."

३३ सत्यावर अविश्वास दाखवणारे देवदूतांच्या आगमनाची वाट पहात आहेत की ईश्वरी इच्छेची पूर्तता होण्याची वाट पहात आहेत? त्यांच्याआधी होऊन गेलेलेही अगदी असेच वागले होते. ईश्वराने

त्यांच्यावर अन्याय केला नाही, तर त्यांनीच तो स्वतःवर ओढवून घेतला आहे. ३४ त्यांच्या अपकृत्यांच्या दुष्परिणामांनी त्यांचा घात केला आणि ते ज्या गोष्टीची खिल्ली उडवत होते, तिनेच त्यांचा घास घेतला.

३५ इतरांना ईश्वराचा दर्जा देणारे म्हणतात, "ईश्वराची मर्जी असती तर ना आम्ही आणि ना आमच्या पूर्वजांनी त्याच्याव्यतिरिक्त अन्य कुणाची उपासना केली असती, ना त्याच्या अनुमतीशिवाय कशाला प्रतिबंध केला असता." त्यांच्याआधीचे लोकही असेच म्हणाले होते. ईश्वराचा संदेश स्पष्ट शब्दात पोहोचवणे एवढेच प्रेषितांचे कार्य आहे.

३६ प्रत्येक समाजात आम्ही त्यांच्यातल्याच एकाला प्रेषित म्हणून उभे केले. त्यांनी आपल्या समाजबांधवांना आग्रहपूर्वक सांगितले, "एकमेव ईश्वराची उपासना करा आणि कुकर्मापासून दूर रहा." यानंतर काहीजण ईश्वरी मार्गदर्शनासाठी पात्र ठरले, तर काहीजण विनाशाच्या पात्रतेचे ठरले. तेव्हा प्रेषितांना नाकारणाऱ्यांचा शेवट कसा झाला हे पाहण्यासाठी भूतलावर सगळीकडे संचार करून पहा. ३७ प्रेषिता! तुम्ही त्यांना मार्गदर्शन करायला उत्सुक असला, तरी ईश्वर ज्यांना मार्गभ्रष्ट होऊ देतो त्यांना आपल्या मार्गदर्शनाचा लाभ देत नाही. (कारण त्यांनी सत्याला सकारात्मक प्रतिसाद द्यायचे नाकारले होते). त्यांना कुणाचाही आधार मिळणार नाही.

३८ ते ईश्वराच्या आणाभाका घेऊन ठामपणे सांगतात, "ईश्वर मेलेल्यांना कधीही जिवंत करत नाही," पण वस्तुस्थिती अशी आहे की या वचनाची पूर्तता करण्याची बांधिलकी ईश्वराने आपण होऊन जपली आहे. पण बहुतांश लोक हे ओळखत नाहीत. ३९ लोकांचे आपसात मतभेद कशावरून झाले हे त्यांना स्पष्टपणे कळावे आणि आपण खोटे बोलत होतो, हे ठामपणे सत्य नाकारणाऱ्यांनी जाणावे, यासाठी तो आपला शब्द खरा करतो. ४० आम्ही जेव्हा एखादी गोष्ट घडण्याची इच्छा करतो तेव्हा म्हणतो, "अस्तित्वात ये!" आणि ती गोष्ट प्रत्यक्षात घडते.

४१ छळ सोसावा लागल्याने ईश्वरी कार्यासाठी ज्यांनी स्थलांतर केले
त्यांना या जगात आम्ही उत्कृष्ट निवासस्थान देऊ. पण मृत्युपश्चात
जीवनातला मोबदला यापेक्षा खूप महान असेल. पण हे त्यांना कळले
असते तर किती चांगले झाले असते! ४२ मृत्युपश्चात जीवनात उत्कृष्ट
मोबदला मिळवणारे असे लोक आहेत जे ऐहिक जीवनात खंबीरपणे
वागले आणि ज्यांनी आपल्या पालनकर्त्यावर भरवसा ठेवला.

४३ तुमच्या आधीही आम्ही माणसाकडे आमचे प्रेषित पाठवले
होते, तेही (मर्त्य) मानव होते. आमचे साक्षात्कार आम्ही त्यांच्यावर
अवतीर्ण केले होते. तुम्हाला हे माहीत नसेल तर पूर्वीच्या ग्रंथधारक ज्ञानी
व्यक्तींना विचारा. ४४ आम्ही त्यांना सत्याचे सुस्पष्ट संकेत आणि पवित्र
धर्मग्रंथ घेऊन पाठवले होते. आता त्याचप्रमाणे हा उपदेशपर ग्रंथ आम्ही
तुमच्याबरोबर पाठवत आहोत. मानवजातीसाठी आम्ही काय प्रकट केले
आहे हे तुम्ही त्यांना स्पष्ट करून सांगा, म्हणजे ते त्यावर चिंतन करतील.

४५ ईश्वराविरुद्ध दुष्ट कारस्थाने रचणाऱ्यांना याची भीती वाटत नाही
का की, ईश्वर त्यांना धरतीच्या उदरात गडप करून टाकेल किंवा त्याची
अटळ शिक्षा कुठल्याही वेळेला अनपेक्षितपणे कोसळेल? आपण यापासून
सुरक्षित आहोत असे त्यांना वाटते का? ४६ किंवा ते आपल्या दैनंदिन
कामात व्यस्त असताना तो त्यांच्यावर अचानक मोठे संकट आणणार
नाही आणि ते त्याची योजना असफल करू शकतील असे त्यांना वाटते
का? ४७ (शिक्षेची चाहूल लागताच) ते चिंताग्रस्त असताना तो त्यांना
संकटात आणू शकणार नाही असे त्यांना वाटते का? खरोखर तुमचा
पालनकर्ता दयाळू आणि कृपाळू आहे.

४८ ईश्वराने निर्माण केलेली प्रत्येक गोष्ट आपल्या डाव्या-उजव्या
बाजूला सावली पाडत नम्रपणे ईश्वरासमोर लोळण घेते हे त्यांनी पाहिले

नाही का? [४९] आकाशातली प्रत्येक वस्तू आणि ईश्वराने पृथ्वीवर निर्माण केलेला प्रत्येक सजीव ईश्वरासमोर नतमस्तक होतो. देवदूतही अहंकाराने न वागता ईश्वरासमोर लीन होतात. [५०] ते त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ असलेल्या त्यांच्या पालनकर्त्याचे भय बाळगतात आणि आपल्याला मिळालेल्या आदेशानुसार वागतात.

[५१] ईश्वराचे सांगणे आहे, दोन ईश्वर मानू नका. ईश्वर एकमेव आहे. तेव्हा फक्त माझीच भीती बाळगा. [५२] आकाश आणि पृथ्वीवर जे काही आहे ते त्याच्याच मालकीचे आहे. फक्त तोच आज्ञापालनाच्या पात्रतेचा आहे. तरीही तुम्ही ईश्वराशिवाय अन्य कुणाला घाबरणार का?

[५३] तुम्हाला जी काही कृपा लाभली आहे ती ईश्वराकडूनच आणि दुःखाचा घाला पडल्यावर तुम्ही मदतीची याचना करता ती त्याच्याकडेच. [५४] तरीही त्याने तुमच्यावरचा दुःखाचा भार हलका केल्याबरोबर तुमच्यापैकी काहीजण इतरांना त्याच्या बरोबरीचं स्थान देऊ लागतात. [५५] आम्ही केलेल्या मदतीसाठी ते कृतज्ञताही व्यक्त करत नाहीत. त्यांना थोड्या वेळासाठी मजा करू द्या, पण लवकरच याची किंमत मोजावी लागेल. [५६] इतकेच नाही तर आम्ही त्यांना दिलेल्या गोष्टींमधला हिस्सा ते त्या खोट्या ईश्वरांसाठी राखून ठेवतात, ज्यांच्याबद्दल त्यांना काहीही माहिती नाही. तुम्ही ज्या बनावट गोष्टी रचत आहात त्याचा जाब तुम्हाला नक्कीच विचारला जाईल.

[५७] मुली ईश्वरासारख्या पवित्र आहेत असे ते मानतात– पवित्र आहे तो ईश्वर! (अगाध आहे त्याचा महिमा!) तरीही त्यांना स्वतःला मात्र मुलगाच हवा असतो. [५८] त्यांच्यापैकी कुणालाही मुलीच्या जन्माची बातमी कळताच, त्याचा चेहरा काळवंडतो, तो अतिशय दुःखी होतो. [५९] या दुःखद बातमीमुळे शरमिंदा होऊन तो लोकांपासून तोंड लपवून

ठेवतो. या मुलीला जीवित ठेवून लज्जास्पद जीवन जगावे, की तिला मातीत गाडून टाकावे असा दुष्ट विचार तो करू लागतो. किती गैरविचार आहे हा! ६० मृत्युपश्चात जीवनावर विश्वास नसणाऱ्यांच्या अंगी दुर्गुणांचे भांडार आहे, तर ईश्वराच्या अंगी सर्वोच्च सद्गुणांचा ठेवा आहे. तो सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहे.

६१ ईश्वराने लोकांना त्यांच्या दुष्कृत्यांची जबरी किंमत मोजायला लावली असती तर त्याने पृथ्वीतलावरच्या एकाही प्राण्याला मोकळे सोडले नसते. पण एका ठराविक वेळेपर्यंत तो त्यांना उसंत देतो. ती वेळ येऊन ठेपताच कुणी त्यात ना क्षणभराची त्वरा करू शकतो, ना क्षणभराचा विलंब.

६२ आपल्याला अप्रिय असलेल्या गोष्टी ते ईश्वराने नाकारल्याचे सांगतात आणि सगळ्या चांगल्या गोष्टी स्वतःसाठीच असल्याचे धादांत खोटे बोलतात. नरकाग्नी त्यांची वाट पहात असून लवकरच त्यांना त्यात लोटले जाईल, यात काही शंका नाही.

६३ ईश्वराशपथ! तुमच्यापूर्वी आम्ही विविध जनसमुदायांकडे त्यांचे प्रेषित पाठवले होते. पण सैतानाने लोकांना त्यांची दुष्कृत्ये सत्कृत्ये असल्यासारखी भासवली आणि आज तोच त्यांचा एकटा मित्र आहे. त्यांना यातनामय शिक्षा भोगावी लागेल. ६४ त्यांचे आपसातील मतभेदाचे मुद्दे तुम्ही त्यांना स्पष्ट करून सांगावेत, यासाठी आम्ही हा ग्रंथ तुमच्याबरोबर पाठवला आहे. त्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना ईश्वराचे मार्गदर्शन आणि कृपा लाभेल.

६५ आम्ही आकाशातून जलवर्षाव करतो आणि त्यामुळे मृतवत् धरती पुनरुज्जीवित होते. बोध घेणाऱ्यांसाठी यात खरोखर आमचा संकेत आहे.

६६ गाई-म्हशींपासूनही तुम्हाला धडा घेता येईल. त्यांच्या पोटात

रक्त आणि शेण असले तरी आम्ही तुम्हाला त्यांच्यापासून शुद्ध दूध उपलब्ध करून देतो. ते पिणाऱ्याला आनंदाचा लाभ होतो. ६७ खजूर आणि द्राक्षाच्या झाडांपासून तुम्हाला मादक द्रव्य आणि सकस आहार मिळतो. सुज्ञ लोकांसाठी यात नक्कीच आमचा संकेत आहे.

६८ तुमच्या पालनकर्त्याने मधमाशीला अंतःप्रेरणा देऊन सांगितले, डोंगरांवर, झाडांवर आणि माणसाने बांधलेल्या मांडवात आपले घरटे उभे कर. ६९ नंतर ईश्वराने नेमून दिलेल्या मार्गावर संचार करून विविध फळाफुलांपासून अन्न मिळव. तिच्या पोटातून मानवाला विविधरंगी मध मिळतो, जो त्याच्यासाठी आरोग्यदायी असतो. चिंतन करणाऱ्यांसाठी यात एक संकेत आहे.

७० ईश्वराने तुम्हाला निर्माण केले, तोच तुम्हाला मृत्यू देईल. काहींना दीर्घायुष्य देऊन लाचारीचे म्हातारपण दिले जाते. एकेकाळी ज्ञानसंपन्न असताना या दीन अवस्थेत मात्र त्यांना काहीच उमजत नाही. ईश्वर सर्वज्ञ, सामर्थ्यशाली आहे.

७१ ईश्वराने तुमच्यासाठी काहींना इतरांपेक्षा अधिक संपत्ती दिली आहे. आपल्या संपत्तीतला हिस्सा आपल्या नोकरचाकरांना दिला तर ते आपल्या बरोबरीला येतील या भयाने ते तसे करायला नाखुश असतात. ईश्वराने केलेले उपकार ते विसरणार का? ७२ ईश्वराने तुम्हाला मानवी प्रजातीतील पत्नी दिल्या. त्यांच्यापासून तुम्हाला मुलेबाळे आणि त्यानंतर नातवंडे झाली. त्याने तुम्हाला सगळ्या उत्कृष्ट वस्तू देऊ केल्या. तरीही ते बनावट गोष्टींवर विश्वास ठेवून ईश्वराचे उपकार विसरणार का? ७३ ईश्वराऐवजी ते अशांची उपासना करतात ज्यांना आकाश आणि पृथ्वीतून तुम्हाला पुरविल्या जाणाऱ्या गोष्टींवर ना कसले नियंत्रण आहे, ना तसे सामर्थ्य आहे. ७४ कुणाशीही ईश्वराची तुलना करू नका. ईश्वराला सगळ्याचे ज्ञान आहे, पण तुम्हाला नाही.

७५ ईश्वर तुम्हाला एक तुलनात्मक उदाहरण सांगतो: ईश्वराने गुलामगिरीत अडकलेल्या, कसलीही सत्ता नसणाऱ्या गुलामाची तुलना आमच्याकडून भरभरून संपत्ती लाभलेल्या आणि त्यातून गुप्त व जाहीररीत्या दानधर्म करणाऱ्याशी केली आहे. हे दोघे एकसारखे आहेत का? कदापि नाही. ईश्वर स्तुत्य आहे. पण बहुतांश लोकांना याची जाणीव नसते.

७६ ईश्वराने अशीच आणखी एक तुलना केली आहे. एक व्यक्ती मूक असून कोणतेही काम करू शकत नाही. तो आपल्या धन्यावर भार होऊन राहिला आहे. धन्याने कुठल्याही कामगिरीवर पाठवले, तर तो हात हलवत परत येतो. दुसरी व्यक्ती अशी आहे जी न्यायाने वागायचा आदेश देते आणि सन्मार्गाची कास सोडत नाही. अशा दोनजणांची तुलना होऊ शकते का?

७७ आकाश आणि पृथ्वीच्या अव्यक्त वस्तुस्थितीचे ज्ञान ईश्वराकडे आहे. त्याने निर्धारित केलेला निवाड्याचा दिवस पापणी लवायच्या आत किंवा त्यातूनही लवकर अगदी अचानकपणे येईल. निःसंशय, ईश्वराची सत्ता सगळ्या चराचरावर आहे.

७८ संपूर्ण अज्ञानी अवस्थेत ईश्वराने आईच्या गर्भाशयातून तुम्हाला या जगात आणले आणि तुम्हाला ऐकण्याच्या, पाहण्याच्या संवेदना व मन दिले. यासाठी तुम्ही कृतज्ञ राहिले पाहिजे.

७९ त्यांनी पक्ष्यांना आकाशात स्वच्छंद विहार करताना पाहिले नाही का? या अवस्थेत ईश्वराशिवाय कुणीही त्यांचा तोल सावरत नाही. ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी यात खरोखर संकेत आहेत. ८० ईश्वराने तुमच्या विश्रांतीसाठी घरे निर्माण केली. जनावरांच्या कातड्यापासून तुम्हाला तंबू बनवायला शिकवले. हे तंबू एका ठिकाणी रहायला सोयीचे पडतात आणि प्रवासात वाहून न्यायला हलके असतात. तो तुम्हाला

प्राण्यांची लोकर, (रेशमाचा) धागा आणि मऊ केस पुरवतो, ज्यापासून तुम्ही गृहोपयोगी वस्तू आणि (व्यावसायिक) सामान तयार करता. त्या तुम्हाला एका ठराविक काळासाठी उपयोगी पडतात.

८१ ईश्वराने निर्माण केलेल्या वस्तूंमधून त्याने तुमच्यावर छत्रछाया धरली आहे. त्याने पर्वतांमध्ये तुमच्यासाठी आश्रयस्थाने बनवली, वातावरणापासून संरक्षण करण्यासाठी कापड देऊ केले आणि युद्धात शत्रूपासून संरक्षण करण्यासाठी चिलखत देऊ केले. अशा रीतीने त्याने तुमच्यावर उपकार करण्यात कोणतीही कसर ठेवली नाही. तेव्हा तुम्हीही त्याच्यासमोर संपूर्ण शरणागती पत्करावी.

८२ पण तरीही काहीजण कृतघ्नपणे वागले तर तुम्हाला जबाबदार धरले जाणार नाही. आमचा संदेश स्पष्ट शब्दात त्यांच्यापर्यंत पोहोचवणे एवढेच तुमचे काम आहे. ८३ ईश्वराचे उपकार त्यांनी ओळखले आहेत, पण ते तसे मान्य करत नाहीत. त्यांच्यापैकी बहुतेकजण कृतघ्न आहेत.

८४ निवाड्याच्या दिवशी प्रत्येक जनसमुदायातून आम्ही एक एक साक्षीदार उभा करू. सातत्याने सत्य नाकारणाऱ्यांना त्या दिवशी ना कसली सबब देण्याची अनुमती मिळेल, ना वर्तनात सुधारणा करण्याची संधी मिळेल. ८५ अपराधी शिक्षेचा सामना करत असताना ना त्यांची शिक्षा सौम्य केली जाईल, ना क्षणभराची उसंत दिली जाईल.

८६ इतरांना ईश्वराच्या बरोबरीचे स्थान देणारे अनेकेश्वरवादी ईश्वराला म्हणतील, "हे पालनकर्त्या! यांना आम्ही तुझ्या बरोबरीचे स्थान दिले होते. संकटात सापडल्यावर आम्ही यांचा धावा करत असू." पण त्यांचे शब्द त्यांच्यावरच उलटवत ते म्हणतील, "खरोखर तुम्ही खोटे बोलत आहात." ८७ निवाड्याच्या दिवशी ते ईश्वरासमोर संपूर्ण शरणागती पत्करतील. त्यांनी रचलेले कारस्थान त्यांनाच उघडे पाडेल. ८८ सत्य

नाकारणाऱ्यांवर आणि इतरांना ईश्वराच्या मार्गापासून दूर नेणाऱ्यांवर आम्ही शिक्षेमागून शिक्षा लादू. त्यांनी केलेल्या भ्रष्ट आचरणाचा मोबदला म्हणून त्यांना ही शिक्षा मिळेल.

८९ त्या दिवशी प्रत्येक जनसमुदायातून आम्ही त्यांच्यातीलच एकाला त्यांच्याविरुद्ध साक्ष देण्यासाठी उभा करू आणि हे प्रेषिता! तुम्हालाही त्यांच्याविरुद्ध साक्ष देण्यासाठी बोलावू. प्रत्येक गोष्ट स्पष्ट करण्यासाठी आणि ईश्वराला समर्पित होऊन जीवन जगणाऱ्यांना शुभवार्ता, मार्गदर्शन आणि कृपाशीर्वाद देण्यासाठी आम्ही हा ग्रंथ तुमच्याबरोबर पाठवला आहे.

९० ईश्वर न्यायाचा, दयेचा आणि जवळच्या नातलगांना त्यांचा वाजवी हिस्सा देण्याचा आदेश देतो तर लज्जास्पद कृत्यांना, अन्यायाला आणि नियमांच्या उल्लंघनाला प्रतिबंध करतो. तुम्ही सावध रहावे यासाठी तो तुम्हाला सक्त ताकीद देत आहे.

९१ ईश्वराला एकदा का शब्द दिला, की त्याची पूर्तता करा. घेतलेली शपथ मोडू नका. खरोखर ईश्वर तुमचा जामीनदार आहे, कारण तुम्ही जे करता ते सगळे तो जाणतो. ९२ मोठ्या मेहनतीने विणलेले मजबूत वस्त्र स्वतःच्याच हाताने उसवणाऱ्या स्त्रीसारखे आपल्या शपथा फक्त एकमेकांची फसवणूक करण्यासाठी वापरू नका. आपला समाज इतर समाजापेक्षा महान ठरावा म्हणून असा वेडाचार करू नका. यातून ईश्वर तुमची पारख करत आहे. तुमचे ज्यावरून मतभेद झाले ते मुद्दे तो निवाड्याच्या दिवशी स्पष्ट करेल.

९३ ईश्वराच्या मर्जीला आले असते तर त्याने तुम्हा सगळ्यांचा एकच जनसमुदाय बनवला असता. पण त्याच्या मर्जीला येईल त्याला तो मार्गभ्रष्ट होऊ देतो, तर त्याच्या मर्जीला येईल त्याला योग्य मार्गदर्शन

देतो. तुम्हाला निःसंशय आपल्या सगळ्या कृत्यांचा जाब देण्यासाठी बोलावले जाईल.

९४ एकमेकांची फसवणूक करण्यासाठी खोट्या शपथा घेऊ नका. तुमच्या अशा कृत्यामुळे कुणाचा तरी सत्यावरचा दृढ विश्वास डळमळीत होण्याची शक्यता असते. इतरांना ईश्वराच्या मार्गापासून रोखल्याच्या बेजबाबदार कृत्यापासून तुम्हाला शिक्षेची चव चाखावी लागेल. ती शिक्षा अतिशय कठोर असेल. ९५ क्षुल्लक लाभासाठी ईश्वराच्या शपथेचा सौदा करू नका. ईश्वराने तुमच्यासाठी उत्कृष्ट मोबदला राखून ठेवला आहे; पण हे तुम्हाला कळले असते तर ना!

९६ तुमच्याकडे आज असलेल्या गोष्टी कदाचित उद्या तुमच्याकडे नसतील, पण ईश्वराचे जे आहे ते चिरंतन आहे. संयमाने वागणाऱ्यांना आम्ही निश्चितच त्यांच्या कृत्याचा उत्कृष्ट मोबदला देऊ. ९७ सत्यावर विश्वास ठेवणाऱ्या आणि सत्कर्मे करणाऱ्या स्त्री-पुरुषांना आम्ही निश्चितच चांगले जीवन देऊ; त्यांच्या कर्मानुसार त्यांना सर्वोत्कृष्ट मोबदला देऊ.

९८ कुरआनचे पठण करताना धिक्कारलेल्या सैतानापासून आपला बचाव करण्यासाठी प्रार्थना करा. ९९ आपल्या पालनकर्त्यावर श्रद्धा ठेवून त्याच्यावर भरवसा ठेवणाऱ्यासमोर नक्कीच सैतानाचे काहीही चालत नाही. १०० स्वेच्छेने त्याचे अनुसरण करणाऱ्यांवर आणि इतरांना ईश्वराचा दर्जा देणाऱ्यांवरच (अनेकेश्वरवाद्यांवर) त्याची सत्ता चालते.

१०१ आम्ही एका पाठोपाठ एक आमचे साक्षात्कार प्रकट करतो आणि आम्ही हे प्रकटीकरण आपल्या अगाध ज्ञानानिशी करतो. त्यावर अविश्वास दाखवणारे म्हणतात, "या तर तुम्ही रचलेल्या बनावट गोष्टी आहेत." पण त्यांच्यापैकी बहुतेकांना मुळात ज्ञानच नाही. १०२ त्यांना सांगा, "तुमच्या

पालनकर्त्याकडून त्याचे पवित्र चैतन्य सत्याच्या स्वरूपात तुमच्याकडे आले आहे. यातून तो श्रद्धावंतांची ताकद वाढवतो आणि ईश्वराला संपूर्ण समर्पण करणाऱ्यांना मार्गदर्शन आणि शुभवार्ता देतो."

१०३ ते म्हणतात, "प्रेषिताला या सगळ्या गोष्टी सांगणारा तर एक मर्त्य मानव आहे." पण ते ज्याचा निर्देश करतात, त्याची भाषा त्यांच्यासाठी परकी आहे, तर आमचा उपदेश शुद्ध अरेबिकमध्ये आहे याची आम्हाला पूर्ण जाणीव आहे. १०४ ईश्वराच्या संकेतांवर श्रद्धा न ठेवणाऱ्यांना तो योग्य मार्गदर्शन देणार नाही, तर यातनामय शिक्षा देईल. १०५ ईश्वराच्या संदेशांवर श्रद्धा न ठेवणारेच त्याच्याविषयी बनावट गोष्टी रचतात, ते खोटारडे आहेत.

१०६ ईश्वरावर दृढ विश्वास न ठेवणारे, खुल्या दिलाने सत्याचा स्वीकार करण्याऐवजी त्यावर अविश्वास दाखवणारे, ईश्वराचा प्रकोप ओढवून घेतील. त्यांना भयंकर शिक्षा भोगावी लागेल. पण मनातून ईश्वरावर दृढ विश्वास ठेवणाऱ्यांना बळजबरीने अविश्वास दाखवायला लावला तर त्यांना यातून सूट मिळेल. १०७ कारण ईश्वरावर अविश्वास दाखवणारे मृत्युपश्चात जीवनाऐवजी ऐहिक जीवनाला प्राधान्य देतात. सत्य नाकारणाऱ्यांना ईश्वर मार्गदर्शन देत नाही. १०८ त्यांची मने, श्रवणशक्ती आणि दृष्टी ईश्वराने मोहोरबंद केली आहे. त्यामुळे सत्य तिथे पोहोचू शकत नाही. पण ते याची दखल घेत नाहीत. १०९ मृत्युनंतरच्या जीवनात निःसंशय त्यांना खूप काही गमवावे लागेल.

११० अनन्वित छळ सहन केल्यानंतर ज्यांनी स्थलांतर केले, ईश्वरी कार्यासाठी कठोर परिश्रम केले आणि संयमाने राहिले, त्यांच्या बाबतीत तुमचा पालनकर्ता निश्चितच क्षमाशील, दयाशील आहे. १११ निवाड्याच्या

दिवशी प्रत्येकजण आपली बाजू मांडेल आणि प्रत्येकाला त्याच्या कर्मानुसार मोबदला दिला जाईल. कुणावरही अन्याय केला जाणार नाही.

११२ ईश्वराने एका शहराचे उदाहरण दिले आहे. हे शहर सुरक्षित आणि सुस्थितीत होते. सगळीकडून या शहराला जीवनावश्यक वस्तूंचा मुबलक पुरवठा होत असे. पण शहरवासीयांनी ईश्वराच्या या कृपेची जाणीव ठेवली नाही. तेव्हा ईश्वराने त्यांना उपासमार आणि भीती या संकटांचा सामना करवला. ११३ ईश्वराने त्यांच्याकडे त्यांच्यातीलच एका प्रेषिताला पाठवले. पण त्यांनी खोटारडे ठरवून त्याला नाकारले. या अपराधाची परतफेड म्हणून त्यांना कठोर शिक्षा सोसावी लागली.

११४ तेव्हा ईश्वराने दिलेल्या वैध आणि आरोग्यदायी गोष्टींचा उपभोग घ्या. त्याची उपासना करत असाल तर त्याने केलेल्या उपकारांची जाणीव ठेवा. ११५ त्याने तुम्हाला फक्त मेलेले प्राणी, रक्त आणि डुकराचे मांस तसेच बळी देताना ईश्वराव्यतिरिक्त अन्य कुणाचे नाव घेतलेल्या प्राण्यांचे मांस खायला प्रतिबंध केला आहे. पण कुणी अनिच्छेने आणि नाईलाजाने जीवघेणी भूक भागण्याइतपतच हे पदार्थ खाल्ले तर ईश्वर त्याला क्षमा करेल. त्याच्यावर कृपादृष्टी ठेवेल.

११६ "हे ईश्वराने वैध ठरवले आहे आणि याला मनाई केली आहे," अशी चुकीची व दिशाभूल करणारी घोषणा करू नका आणि ईश्वराविषयी खोट्या गोष्टी पसरवू नका. असे करणाऱ्यांची कधीही प्रगती होणार नाही. ११७ त्यांना ऐहिक जीवनात थोड्या काळासाठी आनंद लुटता येईल, पण मृत्युपश्चात जीवनात यातनामय शिक्षा भोगावी लागेल.

११८ आम्ही ज्यूंना कुठल्या गोष्टींना मनाई केली आहे, ते यापूर्वीच तुम्हाला सांगितले आहे. आम्ही त्यांच्यावर अन्याय केला नाही, तर त्यांनीच तो स्वतःवर केला आहे. ११९ अजाणतेपणी कुकर्मे करणाऱ्यांना

आणि त्यानंतर खराखुरा पश्चाताप व्यक्त करून स्वतःमध्ये सुधारणा करणाऱ्यांना ईश्वर नेहमी क्षमा करतो, त्यांच्यावर कृपेचे छत्र धरतो.

१२० अब्राहामच्या जनसमुदायाचा ईश्वराप्रतीचा समर्पण भाव फक्त त्याच्यातच एकवटला होता. त्याची श्रद्धा अस्सल होती, तो अनेकेश्वरवाद्यांपैकी नव्हता. १२१ ईश्वराने केलेल्या कृपेची त्याला जाण होती. आपल्या भक्तांमधून त्याची निवड करून त्याला त्याने सन्मार्गावर नेले. १२२ या जीवनात आम्ही त्याला कृपाशीर्वाद दिला आणि मृत्युपश्चात जीवनात तो सदाचारी लोकांच्यात गणला जाईल. १२३ "हे प्रेषिता! यानंतर आम्ही आमची इच्छा तुमच्यासमोर प्रकट केली, ज्याचा ईश्वरावर दृढ विश्वास होता आणि जो अनेकेश्वरवाद्यांपैकी नव्हता, त्या अब्राहामच्या धर्माचे अनुसरण करा."

१२४ त्याच्या धर्मावरून ज्यांच्यात मतभेद होते, फक्त त्यांच्यासाठीच 'शब्बाथ'चा हुकूम होता. ज्याच्यावरून त्यांच्यात मतभेद झाले त्या मुद्यांचा निवाडा ईश्वर पुनर्निर्माणाच्या दिवशी करेल.

१२५ बुद्धीचा वापर करून उचित उपदेशाद्वारे सुज्ञपणाने लोकांना ईश्वराच्या मार्गावर यायचे आवाहन करा. योग्य मार्गदर्शन लाभून कोण सन्मार्गावर जाते आणि कोण त्यापासून दूर जाते, हे ईश्वर चांगलेच ओळखून आहे.

१२६ सूड घ्यायचाच असेल तर तो तुम्हाला झालेल्या त्रासाच्या प्रमाणात घ्या, पण संयमाने वागलात तर तुमच्यासाठी जास्त चांगले आहे. १२७ संयमाने हालअपेष्टांचा सामना करा. खरोखर फक्त ईश्वराच्या साह्याने तुम्हाला ही सहनशक्ती लाभली आहे. त्यांच्यासाठी शोक करू नका की त्यांच्या कारस्थानांमुळे दुःखी होऊ नका. १२८ ईश्वर सत्कर्मे करणाऱ्यांची आणि सदाचाराने वागणाऱ्यांची साथ देतो.

प्रकरण १७ : रात्रीचा प्रवास (अल्-इसरा)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ईश्वराचा महिमा अगाध आहे, ज्याने आपल्या सेवकाला रातोरात उपासनेच्या (मक्का येथील) पवित्र स्थळापासून दूरवरच्या (जेरुसलेम येथील) उपासनागृहात नेले. या उपासनागृहाचे आवार आमच्या कृपेने भारलेले आहे. इथे आणून आमच्या सेवकासमोर आमचे संकेत प्रकट करावेत हा यामागचा उद्देश होता. निःसंशय, ईश्वर सगळे ऐकणारा आणि सगळे पाहणारा आहे.

२ आम्ही मोझेसला पवित्र ग्रंथ दिला आणि त्यातून इस्त्राएलच्या संततीसाठी हा संदेश दिला, "माझ्याशिवाय इतर कुणाला आपला पालनकर्ता मानू नका." ३ नोहाबरोबर ज्यांना आम्ही नौकेतून सुरक्षित ठिकाणी नेले त्यांचे तुम्ही वंशज आहात. नोहा आमचा सच्चा कृतज्ञ सेवक होता.

४ त्या ग्रंथाद्वारे आम्ही इस्त्राएलच्या संततीला हा आगाऊ इशारा दिला होता, "या भूमीत तुम्ही दोनदा प्रचंड अनाचार माजवाल. तुम्ही फार मोठे अपराधी बनाल." (तेव्हा दोन वेळा त्यांना ईश्वरी शिक्षा मिळाली) ५ यापैकी पहिल्या इशाऱ्याच्या पूर्ततेची वेळ येताच आम्ही तुमच्यावर आक्रमण करण्यासाठी आमच्या सेवकांना पाठवले. ते शक्तिशाली होते. त्यांनी तुमची घरेदारे उध्वस्त केली. अशारीतीने त्यांच्यावर पहिल्या (शिक्षेच्या) वचनाची पूर्तता झाली. ६ काही काळानंतर आम्ही पुन्हा एकदा तुम्हाला त्यांच्यापेक्षा बलवान केले. तुम्हाला भरपूर संपत्ती आणि संतती देऊन तुमची संख्या पुष्कळ वाढवली.

७ यानंतर आम्ही तुम्हाला सांगितले, "सत्कर्मे करत राहिलात तर
तुमचेच कल्याण होईल, पण दुष्कर्मे केलीत तर त्याचे दुष्परिणाम भोगावे
लागतील. दुसऱ्या इशाऱ्याच्या पूर्ततेची वेळ येताच आम्ही पुन्हा एकदा
शत्रूला तुमच्यावर आक्रमण करायला धाडले. तुमची मानहानी करून ते
पूर्वीसारखेच तुमच्या उपासनागृहात शिरले. तिथली हाती लागेल ती प्रत्येक
गोष्ट त्यांनी अक्षरशः उध्वस्त करून टाकली. ८ एवढी दुर्दशा झाल्यावर
आम्ही तुम्हाला सांगितले, "आताही तुमचा पालनकर्ता तुमच्यावर दया
करेल. पण तुम्ही पुन्हा पुन्हा अपराध करत राहिलात तर आम्ही तुमच्यावर
अशीच वेळ आणू; सत्य नाकारणाऱ्यांसाठी आम्ही नरकाचा तुरुंगवास
सज्ज ठेवला आहे."

९ हे कुरआन निश्चितच नेक मार्गावर घेऊन जाते आणि श्रद्धावंतांना
शुभवार्ता देते की सत्कर्मे करणाऱ्यांना महान मोबदला मिळेल, तर
१० मृत्युपश्चात जीवनावर अविश्वास दाखवणाऱ्यांना घोर शिक्षेचा इशारा
देते.

११ तरीही माणूस उत्सुकतेने चांगल्याच्या मागे धावण्यापेक्षा वाईटाच्या
मागे धावतो. खरोखर, माणूस फार उतावळा आहे.[अ] १२ आम्ही दिवस
आणि रात्र यांना दोन संकेत म्हणून निर्माण केले. ठराविक काळाने रात्रीचा
अंधार नाहीसा करून त्याजागी आम्ही प्रकाशमान दिवसाची स्थापना

[अ] जगातील क्षणभंगुर सुखसोयी मिळवण्यासाठी माणसाने संयम ठेवावा, अशी ईश्वराची इच्छा आहे. जेणेकरून त्याने परलोकाच्या प्रवासात योग्य मार्गावर अढळ रहावे. पण आपल्या उतावीळ स्वभावामुळे माणूस ऐहिक सुखसोयी मिळवण्याची घाई करतो. तो त्याच्या पुढील प्रवासात अडथळा ठरतो. तात्काळ लाभ मिळविण्याची माणसाची इच्छा त्याला मृत्युपश्चात जीवनात मिळणाऱ्या कृपेपासून वंचित राहण्यास कारणीभूत ठरेल.

करतो. तुम्हाला ईश्वराच्या कृपेचा मार्ग शोधता यावा, वर्षांची, ऋतूंची कालगणना करता यावी म्हणून आम्ही एकामागोमाग रात्र आणि दिवस आणतो. आम्ही सर्वकाही तपशीलवार मांडले आहे.

१३ माणसाच्या गळ्याभोवती आम्ही त्याच्या विधीलिखिताचा धागा बांधला असून निवाड्याच्या दिवशी आम्ही त्याच्या कर्माचा लेखाजोखा त्याच्यासमोर उघडा करू. १४ हा लेखाजोखा जणूकाही माणसाला सांगेल, "वाच तुझ्या कर्माचा पाढा; आज दुसऱ्या कुणाला नाही, तर तुलाच त्याचा जबाब द्यावा लागेल." १५ जीवनात जो सन्मार्गाची कास धरतो, तो आपले हित साधतो तर जो त्यापासून दूर जातो, तो आपलीच दुर्दशा ओढवून घेतो. जीवनात प्रत्येकाला आपल्याच कर्माचे ओझे वहावे लागेल, इतरांच्या नाही. माणसाला पूर्वसूचना देण्यासाठी प्रेषिताला पाठवल्याखेरीज आम्ही त्याला शिक्षा देत नाही.

१६ एखाद्या नगराचा विनाश करायचे ठरवल्यावर त्या शहरातील संपन्न लोकांपर्यंत आम्ही आमचा आदेश पोहोचवतो. पण त्यांनी त्या आदेशाचे उल्लंघन करताच आमचे शिक्षेचे फर्मान न्यायोचित ठरते आणि आम्ही ते नगर अक्षरशः बेचिराख करून टाकतो. १७ नोहाच्या काळापासून कित्येक पिढ्या आम्ही उध्वस्त केल्या आहेत. ईश्वर आपल्या सेवकांवर बारकाईने नजर ठेवतो. त्यांची पापकृत्ये तो चांगलीच ओळखतो.

१८ क्षणिक लाभांची अभिलाषा धरणाऱ्यांना आम्ही हवे ते देतो; पण त्यानंतर त्यांच्यासाठी नरकवास राखून ठेवतो. तिथे त्यांना अपमानित आणि धिक्कारलेल्या अवस्थेत प्रवेश करावा लागेल. १९ मृत्युपश्चात जीवनाची अभिलाषा धरून त्याच्या प्राप्तीसाठी आवश्यक ते परिश्रम घेणारे सच्चे श्रद्धावंत असल्याने त्यांना त्यांच्या परिश्रमाचा मोबदला म्हणून ईश्वरी कृपेचा लाभ होईल.

२० (ऐहिक जीवनाची व मृत्युपश्चात जीवनाची अभिलाषा धरणाऱ्या) प्रत्येकावर तो आपल्या कृपेचा वरदहस्त ठेवतो. ईश्वरी कृपा कोणापासूनही हिरावली जात नाही. २१ (ऐहिक जीवनात) काहीजणांना आपल्या कृपेने आम्ही इतरांपेक्षा जास्त संपन्नता देऊ केली. तरीही मृत्युपश्चात जीवनाचा दर्जा आणि श्रेणी सर्वोत्कृष्ट आहे.

२२ एकमेव ईश्वराव्यतिरिक्त अन्य कुणाला दैवी दर्जा देऊ नका. अन्यथा तुम्ही मानहानी ओढवून घ्याल आणि तुम्हाला निराधार केले जाईल. २३ ईश्वराची आज्ञा आहे की, त्याच्याशिवाय कुणाची उपासना करू नका आणि पालकांशी प्रेमळपणाने वागा. पालकांपैकी एकजण किंवा दोघेही वृद्ध झाले असतील तर भांडणतंटा न करता, उद्धटपणा न करता त्यांच्याशी सौजन्याने वागा. २४ त्यांच्याशी सहृदयतेने, मृदूपणाने संवाद साधा आणि ईश्वराकडे प्रार्थना करा, "त्यांनी मला लहानाचे मोठे केले आहे, तेव्हा त्यांच्यावर दया कर." २५ तुमच्या मनातल्या गोष्टी ईश्वर चांगल्याच ओळखतो. तुम्ही सदाचारी असाल, ईश्वराभिमुख असाल तर तो तुमचे सगळे अपराध माफ करतो.

२६ नातेवाईकांना, गरजूंना आणि वाटसरूंना (तुमच्या उत्पन्नातून) त्यांचा वाजवी हिस्सा द्या. तरीही उधळपट्टी करू नका. २७ उधळपट्टी करणारे सैतानाचे भाऊ आहेत आणि सैतान ईश्वराच्या उपकारांची जाणीव ठेवत नाही. २८ पण तुम्हीच ईश्वरी कृपेने संपत्ती मिळायची वाट पहात असाल आणि कुणाला काही देऊ शकत नसाल तर त्यांच्याशी किमान प्रेमळपणाने तरी वागा.

२९ कंजूषपणा करू नका, पण इतकेही उदारपणा करू नका की (तुमच्यावर विसंबून असणाऱ्या) लोकांनी तुम्हाला दोष द्यावा किंवा तुम्ही निर्धन व्हावेत. ३० तुमचा पालनकर्ता त्याच्या मर्जीला येईल त्याला

संपन्नता देतो, तर त्याच्या मर्जीला येईल त्याला वंचित ठेवतो. त्याला आपल्या सेवकांची चांगली जाण आहे आणि तो त्यांच्यावर नजर ठेवून आहे.

३१ हलाखीच्या भीतीने पोटच्या मुलांचा जीव घेऊ नका. त्यांना आणि तुम्हाला चरितार्थाची साधने पुरवणारे आम्ही आहोत. त्यांना मारणे हे फार मोठे पाप आहे. ३२ व्यभिचार कदापि करू नका, तो निर्लज्जपणा आहे आणि कुकर्माची वाट आहे.[अ]

३३ ईश्वराने प्रत्येकाला जगण्याचा हक्क दिला आहे. तो कुणापासूनही हिरावून घेऊ नका. तुम्हाला तसा अधिकार असेल तरच ते न्याय्य ठरेल. अन्यायाने एखाद्याची हत्या झाल्यास त्याच्या परतफेडीची मागणी करण्याचा हक्क आम्ही त्याच्या वारसदारांना दिला आहे. पण परतफेडीची अंमलबजावणी करताना त्यांनी मर्यादांचे उल्लंघन करू नये. मर्यादांचे भान ठेवल्यास त्यांना कायद्याची मदत मिळेल.

३४ अनाथ मुले सज्ञान होईपर्यंत चांगला हेतू असल्याशिवाय त्यांच्या संपत्तीला हात लावू नका. दिलेली वचने पाळा; कारण दिलेल्या प्रत्येक वचनाचा हिशेब देण्यासाठी तुम्हाला बोलावले जाईल. ३५ मापून देताना माप पूर्ण भरून द्या आणि वजन करताना बिनचूक, प्रमाणित तराजू वापरा. हे न्याय्य असून याचा शेवट चांगल्यात होईल.

३६ तुम्हाला ज्या गोष्टीचे ज्ञान नाही त्याचे अनुसरण करू नका. कारण

[अ] ईश्वराला ज्या वाईट गोष्टींचे समूळ उच्चाटन करायचे आहे, त्यापैकी एक व्यभिचार आहे. व्यभिचार हे एवढे मोठे दुष्कृत्य आहे आणि अशा निर्लज्जतेचा पुरावा आहे की मनुष्याने त्याच्या सुरुवातीच्या अवस्थेपासूनही दूर रहावे. येथे या विषयावर फक्त एक मूलभूत आज्ञा दिली आहे.

कान, डोळे आणि मन या संबंधाने (निवाड्याच्या दिवशी) प्रत्येकास जाब विचारण्यात येईल. ३७ भूतलावर अहंकाराने वागू नका. ना तुम्ही पृथ्वीला छेदू शकता, ना उंचीत पर्वतांशी स्पर्धा करू शकता. ३८ तुमच्या पालनकर्त्याच्या नजरेत अहंकार हा अपराध आहे आणि याचा त्याला तिटकारा आहे.

३९ तुमच्या पालनकर्त्याने तुमच्यासमोर प्रकट केलेल्या शहाणपणाचा हा भाग आहे. ईश्वराशिवाय अन्य कुणाला दैवी दर्जा देऊ नका. अन्यथा तुम्हाला अपमानित अवस्थेत नरकात लोटले जाईल.

४० काय? तुमच्या पालनकर्त्याने देवदूतांपैकी पुरुष तुम्हाला दिले आणि स्त्रिया स्वतः ग्रहण केल्या? किती धक्कादायक बोलणे आहे हे! ४१ त्यांनी योग्य तो बोध घ्यावा यासाठी कुरआनमधून आम्ही सत्य निरनिराळ्या प्रकारे स्पष्ट केले आहे. पण याने त्यांच्या विरोधाची धार आणखीच वाढली. ४२ त्यांना सांगा, "त्यांच्या दाव्याप्रमाणे ईश्वराच्या बरोबरीने आणखी दैवते असती तर त्यांनी विश्वाच्या पालनकर्त्याच्या सिंहासनाकडे जाण्याचा मार्ग शोधण्यासाठी नक्कीच प्रयत्न केला असता. ४३ ईश्वर कीर्तिमान आहे! ते ज्यांना ईश्वर मानतात त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे! ४४ सप्त आकाश, पृथ्वी आणि त्यांच्या मध्ये असलेले सगळे ईश्वराचे गुणगान करतात. आपल्या प्रार्थनेतून त्याची स्तुती न करणारा शोधूनही सापडणार नाही. पण त्यांची ईश्वरस्तुतीची रीत तुमच्या लक्षात येत नाही. खरोखर, तो संयमी आणि अत्यंत क्षमाशील आहे."

४५ तुम्ही कुरआनचे पठण करत असताना, मृत्युपश्चात जीवनावर विश्वास न ठेवणारे आणि तुम्ही यांच्यामध्ये आम्ही अदृश्य भिंत उभी करतो. ४६ त्यांना त्याचे आकलन होऊ नये यासाठी आम्ही त्यांच्या मनावर आवरण चढवतो आणि त्यांची श्रवणशक्ती काढून घेतो. कुरआनचे

पठण करताना जेव्हा तुम्ही एकमेव पालनकर्त्याचा उल्लेख करता, तेव्हा ते तिटकाऱ्याने त्याकडे पाठ फिरवतात.

४७ तुमचे बोलणे लक्षपूर्वक ऐकताना त्यांना तुमच्या तोंडून काय ऐकायचे असते आणि खाजगीत ते काय बोलतात हे आम्ही चांगलेच ओळखून आहोत. प्रेषिताच्या उपदेशानुसार वागणाऱ्याला हे कुकर्मी सांगतात, "तुम्ही तर जादू करणाऱ्याचे अनुसरण करत आहात." ४८ ते तुमची तुलना कुणाशी करतात पहा! पण हे मार्गभ्रष्ट झालेले लोक सन्मार्गापर्यंत पोहोचू शकत नाहीत.

४९ ते विचारतील, "काय? हाडे मातीत मिसळल्यावर आम्ही पुन्हा जिवंत होऊ शकतो?" ५० त्यांना सांगा, "हो, तुमचे शरीर पाषाणाचे किंवा लोखंडाचे झाले तरी तुम्ही पुन्हा जिवंत होऊ शकता. ५१ किंवा अगदी तुमचे शरीर कधीही सजीव न होणाऱ्या पदार्थाचे झाले तरीही तुम्ही पुन्हा जिवंत होऊ शकता." यावर ते विचारतील, "आम्हाला पुन्हा निर्माण करणारा असा हा कोण आहे?" त्यांना सांगा, "ज्याने तुम्हाला पहिल्यांदा निर्माण केले, तोच आहे हा." तुमचे उत्तर न पटल्याने मान हलवत ते विचारतील, "हे सगळे कधी घडेल?" त्यांना सांगा, "अगदी लवकरच घडेल." ५२ निवाड्याच्या दिवशी तो तुम्हाला संबोधित करेल आणि त्याची स्तुती करून त्याला सामोरे जाताना तुम्ही म्हणाल, "अरे! मला केवढेसे आयुष्य लाभले आहे?"

५३ माझ्या सेवकांना सांगा की त्यांनी नेहमी सत्य तेच बोलावे. सैतान लोकांच्यात विसंवाद घडवतो. निःसंशय, तो माणसाचा उघड शत्रू आहे.

५४ तुमचा पालनकर्ता तुम्हाला चांगले ओळखतो. त्याच्या मनास आले तर तो तुमच्यावर कृपा करेल. त्याच्या मनास आले तर शिक्षा करेल. आम्ही तुम्हाला मानवाचे राखणदार म्हणून पाठवलेले नाही.

५५ आकाश आणि पृथ्वीवरची प्रत्येक गोष्ट ईश्वर चांगली ओळखतो.
काही प्रेषितांना आम्ही इतरांपेक्षा अधिक ज्ञान देतो. दावीदला आम्ही
स्तोत्रसंहिता (Psalms, जबूर) हा ग्रंथ दिला होता.

५६ ईश्वराव्यतिरिक्त ज्याला तुम्ही दैवी दर्जा देता, त्यांची एकदा
आळवणी करून पहा. तुमच्या लक्षात येईल, त्यांच्याकडे ना तुमचे संकट
दूर करण्याची ताकद आहे, ना तुमच्या परिस्थितीत बदल घडवण्याची.
५७ ते ज्यांची आळवणी करतात ते स्वतःच त्यांच्या पालनकर्त्यापर्यंत
पोहोचण्याचा मार्ग शोधतात. त्याच्या सान्निध्यात जाण्याची चढाओढ
करतात. ते त्याच्या कृपेची अभिलाषा धरतात तर त्याच्या शिक्षेला
घाबरतात. तुमच्या पालनकर्त्याची शिक्षा भयंकर आहे.

५८ निवाड्याच्या दिवसापूर्वी आम्ही जे नगर उध्वस्त करणार नाही
किंवा ज्या नगरवासीयांना कठोर शिक्षा देणार नाही, असे नगर शोधूनही
सापडणार नाही. हे आमच्या आदेशनाम्यात आधीच लिहून ठेवले आहे.

५९ आमचे संकेत तुमच्यापर्यंत पाठवण्यापासून आम्हाला कुणीही रोखू
शकत नाही. वस्तुस्थिती अशी आहे की पूर्वीच्या लोकांनी आमचे संकेत
नाकारले. समूदच्या समाजाला आम्ही सांडणीच्या रूपाने स्पष्ट संकेत
दिला होता. तरीही त्यांनी तिला दुष्ट वागणूक दिली. आम्ही आमचे
संकेत फक्त सतर्क करण्यासाठीच पाठवत असतो.

६० संपूर्ण मानवजात तुमच्या पालनकर्त्याच्या आवाक्यात असल्याचे
आम्ही तुम्हाला सांगितले आहे. आम्ही तुम्हाला घडवलेल्या त्या अलौकीक
दर्शनात, त्याचप्रमाणे कुरआनमध्ये ज्याला शापित वृक्ष म्हटले जाते तो
वृक्ष माणसाची कसोटी पाहण्यासाठी आहे. आम्ही त्यांना सावधगिरीची
सूचना देतो, पण यातून त्यांच्या अहंभावात फक्त वाढच होते.

६१ आम्ही ईशदूतांना सांगितले, "आदमपुढे नमन करा," त्यानुसार

इब्लिस सोडून सगळे दूत ईश्वराला शरण गेले. इब्लिस म्हणाला, "ज्याला तू मातीतून निर्माण केलेस त्याला मी का शरण जाऊ?" ६२ त्याने पुढे असेही विचारले, "याला तू माझ्यापेक्षा श्रेष्ठ दर्जा दिलास? पुनर्निर्माणाच्या दिवसापर्यंत सवड दिलीस तर मी याच्या बहुतेक सगळ्या पिढ्यांना माझे अनुयायी बनवेन."

६३ ईश्वराने त्याला सांगितले, "चालता हो इथून! तुला आणि तुझे अनुसरण करणाऱ्यांना नरकाचाच मोबदला मिळेल; तिथे तुमच्या कुकर्माचे पुरेपूर प्रतिफळ मिळेल. ६४ तुझ्या बोलण्याने ज्यांना भुरळ पाडू शकशील त्यांना वाममार्गाला लाव. तुझे अनुसरण न करणाऱ्यांवर घोडदळ आणि पायदळासहित हल्ला चढव. त्यांच्या संपत्ती-संततीचा भागीदार हो आणि त्यांना खोटी वचने दे. सैतानाची वचने म्हणजे निव्वळ भूलथापा असतात. ६५ पण माझ्या सच्चा सेवकांवर तुझी सत्ता चालणार नाही. तुझा पालनकर्ता त्यांचा सर्वसामर्थ्यवान रक्षक असेल."

६६ तुमच्या पालनकर्त्याच्या कृपेने नौका समुद्रावर तरंगतात आणि तुम्हाला समुद्रपार घेऊन जातात. यावरून तुम्हाला त्याच्या कृपेचा थांग लावता येईल. त्याची तुमच्यावर अथांग कृपा आहे. ६७ समुद्रप्रवासात वादळाचे संकट आल्यावर तुम्ही त्याचाच धावा करता आणि इतरांचा धावा करायचे विसरून जाता. पण त्याच्या कृपेने सुरक्षितपणे जमिनीवर उतरताच तुम्ही त्याच्याकडे पाठ फिरवता. माणूस कायम कृतघ्न असतो.

६८ संकट पार करवून सुरक्षितपणे जमिनीवर आल्यावर तुम्हाला निर्धास्त वाटते आहे का? धरती तुम्हाला गिळून टाकणार नाही किंवा तो तुमच्यावर जीवघेणे वाळूचे वादळ पाठवणार नाही असे वाटते आहे का? अशा संकटात तुम्हाला कुणी तारणहार असणार नाही. ६९ तो तुम्हाला पुन्हा एकदा सागरात पाठवेल, अजस्त्र वादळी लाटा तुम्हाला घेरून

टाकतील आणि कृतघ्नतेचा प्रतिशोध म्हणून तो तुम्हाला जलसमाधी देईल, याची तुम्हाला भीती वाटत नाही का? आम्ही आणलेल्या या भयानक संकटातून तुम्हाला कुणीही वाचवणार नाही.

७० आम्ही आदमच्या संततीला सन्मान दिला आणि त्यांना पृथ्वीवर वसवले, सागरप्रवास करण्याचे कौशल्य शिकवले, त्यांना उदरनिर्वाहासाठी शुद्ध आणि उत्कृष्ट पदार्थ दिले. अशा रीतीने आम्ही निर्माण केलेल्या इतर सजीवांपेक्षा त्यांना उच्च दर्जा दिला.

७१ निवाड्याचा दिवस नक्कीच उगवेल, ज्या दिवशी आम्ही सगळ्या समाजांना त्यांच्या नेत्यांसह हजर रहायला सांगू. त्यानंतर ज्यांच्या उजव्या हातात त्यांच्या कर्माची नोंदवही दिली जाईल, ते ती उत्सुकतेने वाचू लागतील. त्यांच्यावर तीळमात्रही अन्याय होऊ दिला जाणार नाही. ७२ पण वर्तमान जीवनात जे आंधळे राहिले ते मृत्युपश्चात जीवनातही आंधळेच राहतील आणि सन्मार्गापासून अधिकच दूर जातील.

७३ आम्ही तुमच्यासमोर जे ज्ञान प्रकट केले आहे त्यापासून ते खरोखर तुम्हाला दूर नेऊ पाहतात. असे मार्गभ्रष्ट होऊन तुम्ही ईश्वराविरुद्ध खोट्या गोष्टी रचाव्यात अशी इच्छा ते बाळगतात. त्यांच्या इच्छेनुसार वागलात तर जवळचा मित्र म्हणून ते तुम्हाला स्वीकारतील. ७४ आम्ही तुमचे मन खंबीर केले नसते तर तुम्ही थोडेसे का होईना, त्यांच्या मनासारखे वागले असता. ७५ तसे झाले असते तर आम्ही तुम्हाला वर्तमान जीवनात दुप्पट शिक्षा दिली असती आणि मृत्युपश्चात जीवनातही. मग कुणीही तुमचे आमच्या शिक्षेपासून रक्षण केले नसते.

७६ तुम्हाला या भूमीतून हुसकावून लावावे यासाठी तुम्हाला इथून ते जवळपास निर्वासित करण्याच्याच बेतात होते. पण तसे झाले असते तर त्यांचाही इथे फार काळ टिकाव लागला नसता.

७७ तुमच्यापूर्वी पाठवलेल्या प्रेषितांशी वागण्याची आमची ही रीत होती आणि आताही त्यात फरक पडल्याचे तुम्हाला दिसणार नाही.

७८ सूर्यास्तापासून रात्र होईपर्यंत निर्धारित वेळी प्रार्थना म्हणा. पहाट प्रार्थना (सकाळचा नमाज़) जरूर म्हणा; खरोखर पहाट प्रार्थनेची साक्ष ठेवली जाते. ७९ रात्रीच्या वेळेस उठून अतिरिक्त प्रार्थना म्हणा; यामुळे ईश्वर तुम्हाला स्तुत्य आणि दिमाखदार अशा उच्च स्थानी उंचावेल.

८० ईशप्रार्थना करा, "हे पालनकर्त्या! या जगात मला सन्मानाने येऊ दे आणि सन्मानाने त्याचा निरोप घेऊ दे. या जगात तुझ्या सामर्थ्याने मला मदतीची साथ दे." ८१ त्यांना सांगा, "सत्याचे आगमन झाले आहे तर असत्याचे निर्गमन. खोटे नेहमी लयाला जाण्यासाठी असते."

८२ श्रद्धावंतांना (आत्मिक) आरोग्य मिळावे आणि आमचा कृपाशीर्वाद लाभावा, यासाठी आम्ही कुरआनची पाठवणी केली आहे. अपराध्यांच्या हानीत मात्र यामुळे भरच पडते.

८३ आम्ही जेव्हा मानवावर कृपेचा वर्षाव करतो, तेव्हा तो आमच्याकडे पाठ फिरवून त्यापासून दूर जातो. पण संकट कोसळताच धीर खचून तो निराश, हताश होतो. ८४ त्याला सांगा, "प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने वागतो आणि कुणाला योग्य मार्गदर्शन लाभले आहे, हे तुमचा पालनकर्ता चांगलेच ओळखतो."

८५ ते तुम्हाला आत्म्याविषयी विचारतात तर त्यांना सांगा, "आत्मा माझ्या पालनकर्त्याच्या आज्ञेत आहे आणि त्याने तुम्हाला कमी ज्ञान दिले आहे."

८६ आमची इच्छा झाली असती तर तुमच्यावर अवतरीत केलेले ज्ञान आम्ही तुमच्याकडून हिरावून घेतले असते. त्यानंतर आमच्या कोपापासून बचाव करणारा कुणीही तारणहार तुम्हाला मिळाला नसता. ८७ पण तुमच्या

पालनकर्त्याने तुमच्यावर अपार दया दाखवली आहे. त्याचे तुमच्यावर खरोखर महान उपकार आहेत. [८८] लोकांना सांगा, "कुरआनसारखा ग्रंथ निर्माण करण्यासाठी समस्त मानवजात आणि जिन्न एकत्र आले आणि त्यांनी एकमेकांना कितीही मदत केली तरी ते त्याची निर्मिती करू शकणार नाहीत."

[८९] या कुरआनमधून आम्ही लोकांसमोर सर्व प्रकारची उदाहरणे मांडली आहेत, तरीही त्यांच्यापैकी पुष्कळजण सत्य नाकारण्यावर ठाम आहेत. [९०] ते जाहीरपणे सांगतील, "तुम्ही जमिनीतून आमच्यासाठी झरा उत्पन्न करेपर्यंत आम्ही तुमच्यावर अजिबात विश्वास ठेवणार नाही. [९१] किंवा खजूर आणि द्राक्षांचे मळे फुलवून त्यातून विपुल पाण्याचे प्रवाह खेळवून दाखवा. [९२] किंवा तुम्ही दावा केल्याप्रमाणे आमच्यावर आकाशाच्या भंगलेल्या तुकड्यांचा वर्षाव करून दाखवा किंवा ईश्वर आणि त्याच्या दूताला आमच्यासमोर आणून दाखवा. [९३] किंवा स्वतः साठी सोन्याचे घर बनवून दाखवा किंवा आकाशावर आरूढ होऊन दाखवा. आकाशात जाऊन तिथून आमच्यासाठी ग्रंथ पाठवेपर्यंत आम्ही तुमच्या आकाशारोहणावर विश्वास ठेवणार नाही. वरील अटींची पूर्तता केल्याखेरीज आमचा तुमच्यावर विश्वास बसणार नाही." त्यांना सांगा, "माझा पालनकर्ता पवित्र आहे. त्याने दूत म्हणून पाठवलेला मी फक्त एक मर्त्य मानव आहे."

[९४] मानवाकडे आलेल्या ईश्वरी मार्गदर्शनावर विश्वास ठेवण्यापासून त्याला रोखणारा एकमेव मुद्दा म्हणजे "ईश्वराने एका मर्त्य मानवाला आपला प्रेषित म्हणून का पाठवले?" हा त्याला पडलेला प्रश्न होय. [९५] त्यांना सांगा, "पृथ्वीवर ईशदूतांचे वास्तव्य असते तर आम्हीही आमचा प्रेषित म्हणून स्वर्गातून ईशदूताला पाठवले असते."

९६ त्यांना हेही सांगा, "तुमच्या-माझ्यातला साक्षीदार म्हणून ईश्वर पुरेसा
आहे. त्याला आपल्या सगळ्या सेवकांची जाण आहे आणि तो त्यांच्यावर
बारकाईने नजर ठेवून आहे."
९७ ईश्वर ज्यांना मार्गदर्शन देतो त्यांनाच अचूक मार्गदर्शन लाभते.
ज्यांना तो मार्गभ्रष्ट होऊ देतो त्यांच्यासाठी निवाड्याच्या दिवशी
ईश्वराव्यतिरिक्त कुणीही मदतनीस असल्याचे तुम्हाला दिसणार नाही.
त्या दिवशी मुक्या, बहिऱ्या आणि आंधळ्या अवस्थेत तोंडघशी
फरफटत आम्ही सगळ्यांना आमच्यासमोर हजर करायला लावू.
नरक हेच त्यांच्या मुक्कामाचे ठिकाण असेल. तिथला अग्नी शमताच
त्यांना शिक्षा देण्यासाठी आम्ही तो पुन्हा पुन्हा प्रज्वलित करू.
९८ त्यांनी आमचे संकेत नाकारले आणि "आमची हाडे मातीत मिसळल्यावर
आमची खरोखरच पुनर्निर्मिती होईल का?" अशी शंका उपस्थित केली,
त्याचा हा प्रतिशोध असेल.
९९ ज्या ईश्वराने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली तो त्यांच्यासारखा
माणूस निर्माण करू शकणार नाही असे त्यांना वाटते का? ईश्वराने
प्रत्येकासाठी निश्चित आयुर्मान ठरवून दिले आहे, यात काही शंका
नाही. पण हे अपराधी सातत्याने सत्य नाकारण्याचा आग्रह धरत आहेत.
१०० त्यांना सांगा, "माझ्या पालनकर्त्याने दिलेला कृपेचा खजिना जरी
तुमच्याकडे असेल तरी तो खर्च होण्याच्या भीतीने तुम्ही हात आखडता
घ्याल. त्याबाबतीत माणूस खरोखर कंजूष आहे."
१०१ मोझेसकडे आम्ही आमच्या अस्तित्वाच्या नऊ स्पष्ट खुणा
दिल्या होत्या. इस्त्राएलच्या संततीला तुम्ही त्याविषयी विचारू शकता.
मोझेस त्यांच्याकडे जाताच फारो त्याला म्हणाला, "मोझेस! मला वाटते
तुझ्यावर कुणीतरी मोहिनी घातली आहे." १०२ मोझेसने त्याला उत्तर दिले,

"तुझे डोळे सताड उघडणारा पुरावा म्हणून आकाश आणि पृथ्वीच्या पालनकर्त्याने हे संकेत पाठवल्याचे तुम्ही पुरेपूर जाणता, तरीही त्यावर विश्वास ठेवत नाही. मला तुमचा सर्वनाश अटळ दिसतोय." १०३ म्हणून त्याने इस्राएलवासीयांना त्या भूमीतून हाकलून देण्याचा निश्चय केला. पण आम्ही त्याला आणि त्याची साथ देणाऱ्या सगळ्यांना जलसमाधी दिली. १०४ त्यानंतर इस्त्राएलवासीयांना आम्ही सांगितले, "आता या भूमीत वास्तव्य करा. मृत्युपश्चात जीवनाचा वायदा पूर्ण करण्याची वेळ येताच आम्ही तुम्हा सगळ्यांना एकत्र बोलावून घेऊ."

१०५ आम्ही हे कुरआन सत्यासह प्रकट केले आहे आणि सत्याच्या सोबतीने ते पृथ्वीवर पाठवले आहे. मानवजातीला (स्वर्गाची) शुभवार्ता आणि (नरकाग्नीच्या दंडापासून) सतर्कतेची सूचना देण्यापुरतेच आम्ही तुम्हाला त्यांच्याकडे पाठवले आहे. १०६ लोकांना तुम्ही कुरआन सावकाशीने सांगावे यासाठी आम्ही ते टप्प्याटप्प्याने प्रकट केले. ठराविक काळाने आम्ही आमचे साक्षात्कार प्रकट केले आहेत.

१०७ त्यांना सांगा, तुम्ही विश्वास ठेवा किंवा न ठेवा, पण ज्याला ईश्वराचा साक्षात्कार होतो तो त्याच्या पठणाने जमिनीवर कपाळ टेकवून त्याच्यासमोर नतमस्तक होतो. १०८ आणि प्रार्थना करतो, "आमचा पालनकर्ता स्तुत्य आहे! तो आपल्या वचनाची निःसंशय पूर्तता करतो." १०९ त्याची प्रार्थना करताना रडवेले होऊन ते जमिनीवर कपाळ टेकवतात आणि अशा रीतीने त्यांच्या विनम्रतेत वाढ होते.

११० त्यांना सांगा, "तुम्ही त्याला ईश्वर म्हणा की कृपासागर म्हणा, त्याची सगळीच नावे लोभसवाणी आहेत." त्याची प्रार्थना करताना आवाज फार कर्कश किंवा फार हळू ठेवू नका. मध्यम आवाजात त्याची अशी प्रार्थना करा, १११ "सगळी स्तुती केवळ त्या ईश्वरासाठीच आहे

ज्याला कधी अपत्य झाले नाही की ज्याच्या राज्यात कुणी भागीदार नाही. ना एखाद्या दुबळेपणामुळे त्याला कुणाची मदत घ्यावी लागते. अशा रीतीने त्याच्या महत्तेचा उद्घोष करा.''

प्रकरण १८ : गुहा
(अल्-कहफ)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ज्याने आपल्या सेवकावर हा ग्रंथ अवतरीत केला आहे तो ईश्वर
स्तुत्य आहे. हा ग्रंथ कोणत्याही संदिग्धतेपासून मुक्त आहे. २ या ग्रंथातून
स्पष्टपणे सांगितले आहे की दुराचार करणाऱ्यांना ईश्वराची कठोर शिक्षा
भोगावी लागेल, तर सदाचार करणाऱ्या श्रद्धावंतांना त्याच्याकडून उत्कृष्ट
मोबदला मिळेल. ३ ते सदैव त्याच्या कृपाछत्रात राहतील. ४ ''ईश्वराला
अपत्य झाले आहे,'' असे म्हणणाऱ्यांना त्यातून सावधानतेचा इशारा
दिला आहे. ५ ना त्यांना ईश्वराचे ज्ञान आहे, ना त्यांच्या पूर्वजांना ते होते.
ते बोलतात ते धक्कादायक आहे, धडधडीत असत्य आहे!

६ हे प्रेषिता! लोकांनी या संदेशावर विश्वास ठेवला नाही तर दुःखी
होऊन कदाचित तुम्ही स्वतःला संपवून टाकाल. ७ मानवापैकी कुणाचे
वर्तन सर्वोत्तम आहे याची पारख करण्यासाठी ही धरती आम्ही आकर्षक
गोष्टींनी सजवली आहे. ८ पण वेळ येताच आम्ही तिचे उजाड माळरान
बनवून टाकू.

९ गुहेत राहणारे लोक आणि तिथे कोरलेले शिलालेख हे आमचे अद्भुत
संकेत आहेत, असे तुम्हाला वाटते का? १० काही तरुण आसऱ्याच्या
शोधात जेव्हा गुहेत आले तेव्हा त्यांनी प्रार्थना केली, ''आमच्यावर

तुझी विशेष कृपा असू दे, जीवनाच्या प्रत्येक बाबतीत आम्हाला अचूक मार्गदर्शन दे.” [११] यानंतर कित्येक वर्षे आम्ही त्यांना गुहेत गाढ झोपेत राहू दिले. [१२] कालांतराने आम्ही त्यांना जागे केले. आपण गुहेत किती काळ वास्तव्य केले याची गणती त्यांच्या दोन गटांपैकी कुठला गट चांगल्या प्रकारे करू शकतो हे आम्हाला पहायचे होते.

[१३] त्यांची कथा वास्तवात जशी घडली तशी आम्ही तुम्हाला सांगू. गुहेत राहणारे हे लोक तरुण होते. त्यांचा त्यांच्या पालनकर्त्यावर विश्वास होता, त्यामुळे आम्हीही त्यांना योग्य मार्गदर्शन दिले. [१४] आम्ही त्यांची मने खंबीर केली. झोपेतून जाग आल्यावर त्यांनी जाहीर केले, “आकाश आणि पृथ्वीचा पालनकर्ता असलेला ईश्वर आमचा पालनकर्ता आहे. त्याच्याशिवाय कुणाचा आम्ही कधीच धावा करणार नाही; जर आम्ही असे केले तर ते पराकोटीचे दुष्कृत्य असेल.” [१५] आमच्यातील काहींनी त्याच्याव्यतिरिक्त अन्य कुणाला तरी ईश्वर मानले आहे. ते त्यांच्या अस्तित्वाचा स्पष्ट पुरावा सादर का करत नाहीत? ईश्वराविरुद्ध खोट्या गोष्टी रचणाऱ्यांपेक्षा दुष्ट कोण असेल?

[१६] यावर आम्ही त्यांना सांगितले, “तुम्ही त्यांच्यापासून तसेच ईश्वराव्यतिरिक्त ते ज्याची उपासना करतात त्यापासून दूर आलेले आहात. तेव्हा या गुहेत आसरा घ्या. तुमचा पालनकर्ता तुमच्यावर कृपा करेल आणि इथल्या परिस्थितीत योग्य ठरणारी चरितार्थाची साधने तुम्हाला पुरवेल.”

[१७] ते गुहेच्या प्रशस्त पोकळीत विसावलेले असतील आणि उगवतीचा सूर्य त्या गुहेच्या उजवीकडे झुकलेला असेल तर मावळतीचा सूर्य गुहेच्या डावीकडे झुकलेला असेल. हा ईश्वराच्या संकेतांपैकी एक संकेत आहे. ईश्वर ज्याला मार्गदर्शन देतो त्याला उचित मार्गदर्शन लाभते तर ज्याला

तो मार्गभ्रष्ट होऊ देतो त्याला कुणीही मदतनीस किंवा मार्गदर्शक लाभत नाही.

१८ ते जागे आहेत असे तुम्हाला वाटले असेल, पण ते गाढ झोपलेले होते. आम्हीच झोपेत त्यांना डाव्या-उजव्या कुशीवर वळवत राहिलो. गुहेच्या तोंडाशी कुत्रा तुम्हाला पाय ताणून पसरलेला दिसेल. वाकून गुहेत पाहिले असते तर भयभीत होऊन तुम्ही नक्कीच माघारी वळला असता.

१९ कालांतराने आम्ही त्यांना झोपेतून जागे केले. जागे झाल्यावर ते एकमेकांना विचारू लागले. त्यांच्यापैकी एकाने विचारले, "आपण इथे किती काळ झोपलो होतो?" इतरांनी उत्तर दिले, "कदाचित दिवसभर असेल किंवा दिवसाचा काही काळ असेल." त्यांच्यापैकी काही म्हणाले, "आपण इथे किती काळ राहिलो हे आपल्या पालनकर्त्यालाच चांगले माहीत आहे. आपल्यापैकी एकाने चांदीची नाणी घेऊन शहरात जावे, चांगले खाद्यपदार्थ कुठे मिळतात ते पहावे आणि ते घेऊन गुहेत परत यावे. पण आपण कुठे राहतो याची वाच्यता न करण्याची त्याने काळजी घ्यावी. २० कारण आपला ठावठिकाणा कळला तर ते आपल्याला दगडाने ठेचून मारतील किंवा बळजबरीने परत त्यांची श्रद्धा स्वीकारायला लावतील. त्यांची श्रद्धा स्वीकारली तर आपली कधीही प्रगती होणार नाही."

२१ अशाप्रकारे ईश्वराने दिलेला शब्द खरा असल्याचे कळावे आणि निवाड्याच्या दिवसाबाबत त्यांना काही शंका असू नये यासाठी सगळ्या गोष्टी आम्ही त्यांच्यासमोर उघड केल्या. गुहेत राहणाऱ्यांवरून लोक आपसात वाद घालत असत. त्यांच्यापैकी काही म्हणत, "त्यांचे काय झाले हे त्यांच्या पालनकर्त्याला चांगलेच माहीत आहे. या ठिकाणी आपण त्यांचे स्मारक उभे करू." त्याप्रसंगी ज्यांची सरशी झाली त्यांनी जाहीर केले, "इथे आपण नक्कीच उपासनागृह उभे करू."

२२ त्यांच्याविषयी चर्चा करताना काहीजण म्हणतील, "ते तिघे होते, चौथा त्यांचा कुत्रा होता." काहीजण म्हणतील, "ते पाचजण होते, सहावा त्यांचा कुत्रा होता." असेच त्यांचे तर्कवितर्क सुरू असतील. आणखी काहीजण म्हणतील, "ते सातजण होते, आठवा त्यांचा कुत्रा होता." हे प्रेषिता! त्यांना सांगा, "त्यांची संख्या किती होती हे माझ्या पालनकर्त्याला माहीत आहे." फार थोड्या लोकांना गुहेत राहणाऱ्यांची माहिती आहे. तेव्हा त्यांच्यावरून लोकांशी वाद घालू नका की त्यांना त्यांची काही माहिती विचारू नका.

२३ "उद्या मी हे नक्की करेन," असे कदापि म्हणू नका. २४ "ईश्वराची मर्जी असेल तर" याची त्याला जोड द्या. ईश्वराला कधीही विसरू नका, सतत त्याचे स्मरण ठेवा आणि प्रार्थना करा, "माझा माझ्या स्वामीवर संपूर्ण भरवसा आहे. तो मला यापेक्षा जवळच्या मार्गाने सन्मार्गावर नेईल."

२५ काहीजण म्हणतात, "तीनशे वर्षे गुहेत राहिले." तर काहीजण यात आणखी नऊ वर्षांची भर घालतात. २६ त्यांना सांगा, "त्यांचे तिथे किती काळ वास्तव्य होते हे ईश्वराला माहीत आहे." आकाश आणि पृथ्वीवरच्या अज्ञाताचे ज्ञान फक्त ईश्वराकडेच आहे. त्याची दृष्टी आणि श्रवणशक्ती सर्वश्रेष्ठ आहे. तोच एकमेव मानवाचा तारणहार आहे. त्याच्या स्वायत्तेत तो कुणालाही वाटा देत नाही.

२७ तुमच्या पालनकर्त्याच्या ग्रंथातून तुमच्यावर अवतरीत झालेल्या ज्ञानाचा जाहीर घोष करा. त्याच्या वचनात कुणीही फेरफार करू शकत नाही. तुम्हाला त्याच्याशिवाय कुणाचाही आसरा मिळणार नाही. २८ आपल्या पालनकर्त्याची मर्जी संपादन करण्यासाठी सकाळ-संध्याकाळ त्याचा धावा करणाऱ्यांच्या संगतीत रहा, ऐहिक जीवनातील आकर्षणाच्या

लोभापायी त्यांच्यावरून नजर हटू देऊ नका. त्यांना आम्ही आमचे विस्मरण घडवले आहे, जे आपल्याच इच्छा-आकांक्षांच्या मागे लागून अपराधी बनले आहेत. त्यांच्या आज्ञांचे पालन करू नका.

२९ त्यांना सांगा, "हे तुमच्या पालनकर्त्याकडून आलेले सत्य आहे. ज्यांच्या इच्छेला येईल त्यांनी यावर विश्वास ठेवावा, ज्यांच्या इच्छेला न येईल त्यांनी तो ठेवू नये." अशा पाप्यांसाठी आम्ही अग्नी सज्ज ठेवला आहे. वस्त्राप्रमाणे तो त्यांच्या सर्वांगाला वेढून टाकेल. अग्नीची दाहकता असह्य होऊन त्यांनी पाण्याची याचना केली तर त्यांना वितळलेल्या शिशासारखे उकळते पाणी दिले जाईल. त्यांचा चेहरा होरपळून जाईल. किती भयानक ते पेय आणि किती भयानक तो निवासस्थान!

३० सत्यावर विश्वास ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांचे श्रम आम्ही वाया जाऊ देणार नाही; त्यांना उत्कृष्ट मोबदला देऊ. ३१ शाश्वततेच्या बगीच्यात ते राहतील, जिथे मुबलक पाणी देणाऱ्या नद्या वाहत असतील. तिथे आराम करण्यासाठी उच्चासने असतील. त्यांना भरजरी जरीकाम केलेली हिरव्या रंगाची तलम रेशमी वस्त्रे आणि सुवर्णालंकारांनी सजवले जाईल. किती उत्कृष्ट परितोषिक आणि किती उत्कृष्ट निवासस्थान!

३२ त्यांना दोन माणसांची रूपककथा ऐकवा! दोघांपैकी एकाला आम्ही दोन द्राक्षांच्या बागा देऊ केल्या. त्यांच्या मधोमध धान्याचे शेत होते तर सभोवताली खजूर वृक्ष होते. ३३ या सगळ्या बागांमधून धान्याचे, फळांचे भरघोस उत्पन्न येई. त्यांच्यामधून आम्ही एक नदीही प्रवाहित केली होती. ३४ अशा रीतीने त्यांच्या मालकाला चांगले उत्पन्न मिळत असे. बोलता बोलता तो आपल्या सोबत्याला म्हणाला, "माझी संपत्तीही तुझ्यापेक्षा जास्त आहे आणि सहकाऱ्यांची संख्याही." ३५ असे बोलून आपले नुकसान करून घेत तो आपल्या बागेकडे पहात म्हणाला, "मला नाही वाटत ही बाग कधी नष्ट होईल. ३६ आणि निवाड्याचा दिवस कधी

येईल यावर माझा विश्वास नाही. मी माझ्या पालनकर्त्याकडे परत गेलो तरी यापेक्षा चांगले ठिकाण मला नक्कीच मिळेल.”

३७ हे संभाषण सुरू असताना त्याच्या सोबत्याने विचारले, “मातीपासून, वीर्याच्या एका थेंबापासून उत्पन्न करून हा मानवी देह देणाऱ्या निर्मात्यावरच तू अविश्वास दाखवतोस? ३८ पण माझे विचारशील तर ईश्वर हा माझा एकमेव पालनकर्ता आहे आणि मी कुणालाही त्याच्या बरोबरीचा मानत नाही. ३९ जेव्हा तू बागेत प्रवेश केलास, तेव्हा तू असे का म्हणाला नाहीस, त्याच्या मर्जीला येईल ते तो करणारच. त्याच्यासारखी ताकत कुणाकडेच नाही. आज तुला माझ्याकडे संपत्ती आणि संतती कमी असल्याचे दिसते आहे. ४० पण एके दिवशी माझा पालनकर्ता मला तुझ्या बागांपेक्षा उत्कृष्ट बागा देईल तर विजेचा लोळ पाठवून तुझ्या द्राक्षबागा उध्वस्त करेल, उजाड करेल. ४१ किंवा उद्या बागेतले पाणी असे काही आटून जाईल की परत शोधूनही सापडणार नाही.”

४२ आणि झालेही तसेच; तसेच त्याला उत्पन्न मिळायचे पूर्णतः थांबले. त्याच्या द्राक्षबागा मांडवांवर कोसळल्या. बागांवर केलेला खर्च वाया गेल्याचे पाहून त्यांचा मालक असहाय्यपणे हात चोळू लागला आणि स्वतःलाच म्हणाला, “मी इतरांना माझ्या पालनकर्त्याचा दर्जा दिला नसता तर किती चांगले झाले असते.” ४३ ईश्वरी प्रकोपापासून ना तो स्वतःचे रक्षण करू शकला, ना समाजातून कुणी त्याच्या मदतीला आले. ४४ संकटकाळी आधार मिळतो तो फक्त ईश्वराचा– खऱ्या ईश्वराचा. तोच सर्वोत्कृष्ट मोबदला देणारा आहे. तोच सर्वोत्कृष्ट अंतिम फलित देणारा आहे.

४५ त्यांना ऐहिक जीवनाचा एक दृष्टांत द्या. हे जीवन आम्ही आकाशातून पाडलेल्या पावसावर बहरणाऱ्या हिरवाईसारखे आहे. पाऊस

संपताच त्याचा शुष्क पाचोळा होतो, जो वाऱ्याबरोबर उडून जातो. प्रत्येक गोष्टीवर ईश्वराची सत्ता आहे. ४६ संपत्ती आणि संतती हे ऐहिक जीवनाची शोभा आहे. पण शाश्वत गुणवत्तेच्या कर्माला तुमच्या पालनकर्त्याकडून याहून चांगले प्रतिफळ मिळते. त्यातून स्व-कल्याणाची आशा करता येते.

४७ ज्या दिवशी आम्ही पर्वतांनाही आपली जागा सोडायला लावू त्या दिवशी सगळी पृथ्वी सपाट मैदान झालेली असेल. त्या दिवशी समस्त मानवजातीला आम्ही आमच्यासमोर एकत्र करू, कुणालाही मागे ठेवले जाणार नाही. ४८ तुमच्या पालनकर्त्यासमोर त्यांना शिस्तीत रांगेने उभे केले जाईल आणि तो त्यांना सुनावेल, "सुरूवातीला आम्ही तुम्हाला जसे बनवले होते, अगदी त्याच अवस्थेत तुम्ही आमच्यासमोर हजर झाले आहात. पण आम्ही तुम्हाला दिलेल्या वचनाची पूर्तता करायची वेळ निर्धारित केली नसेल, असे तुम्ही धरून चालला होता."

४९ त्या दिवशी त्यांच्यासमोर त्यांच्या कृत्याची नोंदवही ठेवली असेल. त्यातील नोंदींमुळे ते भयभीत झाले असतील. त्यांच्या मनात येईल, "किती दुर्दैवी आहोत आम्ही! किती भयानक दस्तऐवज आहे हा! आमच्या लहान-मोठ्या एकाही कृत्याची नोंद यातून वगळलेली नाही." त्यांनी आजवर केलेली प्रत्येक गोष्ट त्यांच्यासमोर मांडलेली असेल. तुमचा पालनकर्ता कुणावरही अन्याय करणार नाही.

५० आम्ही जेव्हा आमच्या दूतांना सांगितले, "आदमसमोर नतमस्तक व्हा." तेव्हा सैतान सोडून सगळे दूत त्याच्यासमोर नतमस्तक झाले. तो जिन्नपैकी एक होता, त्याने आपल्या पालनकर्त्याची आज्ञा धुडकावून लावली. त्याच्या मनात तुमच्याविषयी वैरभाव असला तरीही मला सोडून तुम्ही त्याला आणि त्याच्या वंशजांना आपला तारणहार मानणार का? अपराध्यांसाठी ही अदलाबदल फारच दुःखद आहे.

५१ मी त्यांना ना आकाश आणि ना पृथ्वीच्या निर्मितीचा साक्षीदार म्हणून बोलावले, ना त्यांना स्वतःच्या निर्मितीचा. इतरांना मार्गभ्रष्ट करणाऱ्यांना मी माझ्या सहाय्यकांचा दर्जा देत नाही.

५२ निवाड्याच्या दिवशी ईश्वर त्यांना म्हणेल, "माझ्या शिक्षेपासून बचाव करण्यासाठी ज्यांना माझे समतुल्य मानत होता, त्यांचा धावा करा." ते त्यांचा धावा करतील, पण त्यांची प्रार्थना ऐकली जाणार नाही. कारण आम्ही त्यांच्यात शत्रुत्वाची भिंत उभी करू. ५३ अपराध्यांना अग्नीचे दर्शन होईल आणि आपण त्यात पडणार असल्याची जाणीवही होईल. त्यातून सुटकेचा कुठलाही पर्याय त्यांच्याकडे असणार नाही.

५४ मानवाच्या कल्याणासाठी या कुरआनद्वारे आम्ही निरनिराळ्या प्रकारची असंख्य उदाहरणे स्पष्ट करून सांगितली आहेत. पण माणूस अतिशय हेकेखोर प्राणी आहे. ५५ सुस्पष्ट मार्गदर्शन मिळाल्यावर त्यावर विश्वास ठेवण्यात किंवा आपल्या पालनकर्त्याकडे क्षमायाचना करण्यात लोकांना काही अडचण येऊ नये. पण वस्तुस्थिती अशी आहे की पूर्वीच्या लोकांवर ओढवलेली दुर्दशा यांच्यावरही ओढवावी किंवा ईश्वरी शिक्षेचा सामना करायला लावायचा हेच त्यांच्या नशिबी आहे.

५६ आम्ही प्रेषितांना लोकांकडे फक्त (चांगल्यांना) शुभवार्ता देण्यासाठी आणि (वाईटांना) सावधानतेचा इशारा देण्यासाठीच पाठवतो. पण त्यांच्या उपदेशावर अविश्वास दाखवणारे माझ्या साक्षात्कारांना आणि सूचनांना हास्यास्पद ठरवून, सत्याला निष्प्रभ ठरवण्यासाठी भ्रामक मुद्यांचा आधार घेतात. ५७ आपल्या पालनकर्त्याच्या संदेशाद्वारे उपदेश मिळाल्यावरही त्याकडे पाठ फिरवणाऱ्यापेक्षा आणि आपल्याच हातांनी केलेल्या दुष्कृत्यांचा विसर पडणाऱ्यापेक्षा दुष्ट कोण असेल? आमच्या वचनांचे आकलन होऊ नये यासाठी आम्ही त्यांच्या अंतःकरणावर आवरण चढवले आहे आणि त्यांची श्रवणशक्ती हिरावून घेतली आहे.

तुम्ही त्यांना सन्मार्गावर बोलावून पहा, ते कधीही तुमचे मार्गदर्शन घेणार नाहीत.

५८ तुमचा पालनकर्ता क्षमाशील, दयेचा सागर आहे. अपराध्यांनी केलेल्या अपराधांना लगेचच जबर शिक्षा ठोठावायची असती तर त्याने केव्हाच त्यांच्याभोवती शिक्षेचा फास आवळला असता. पण त्यांच्यासाठी एक वेळ ठरवून दिली आहे. त्यानंतर त्यांची शिक्षेतून सुटका होणार नाही. ५९ या सर्व समाजांनी एका मागोमाग एक अपकृत्ये केल्यानंतर आम्ही त्यांचा विनाश केला. त्यांच्या विनाशाची वेळ आम्ही निश्चित केली होती.

६० मोझेस आपल्या सेवकाला म्हणाला, "किती का वर्षे लागेनात, दोन समुद्रांच्या संगमावर पोहोचेपर्यंत मी हार मानणार नाही." या प्रसंगाची आठवण करा. ६१ पण अखेरीस संगमावर पोहोचताच त्यांना माशाचा विसर पडला. मासा सुळकन सागरात दिसेनासा झाला. ६२ तिथून काही अंतर पुढे गेल्यावर मोझेस आपल्या तरुण सोबत्याला म्हणाला, "प्रवासाने खरेच खूप शीण आला आहे. मला माझी न्याहारी दे."

६३ सेवकाने त्याला उत्तर दिले, "आपण एका खडकावर विश्रांती घेत असताना मला माशाचा विसर पडला. सैतानानेच त्याचा विसर पाडला, त्यामुळेच माझे त्याच्याकडे लक्ष गेले नाही. अद्भुतरित्या सागरात नाहीसा झाला तो." ६४ मोझेस म्हणाला, "नेमके त्या ठिकाणीच तर मला जायचे होते!" पुन्हा एकदा दोघे माघारी फिरले. ६५ तिथे त्यांना आमचा एक निस्सीम भक्त भेटला, ज्याला आम्ही आमचा कृपाप्रसाद आणि आमचे ज्ञान दिले होते.

६६ मोझेसने त्याला विनंती केली, "मी तुमच्याबरोबर येऊ का, म्हणजे तुम्हाला मिळालेल्या शिकवणीनुसार तुम्ही मला मार्गदर्शन

करू शकाल.” ६७ उत्तरादाखल त्याने सांगितले, “माझ्याबरोबर तू संयमाने राहू शकणार नाहीस. ६८ तुझ्या ज्ञानाच्या कक्षेबाहेरच्या, आवाक्यात नसलेल्या गोष्टींत तू कसा संयम राखू शकशील?” ६९ मोझेसने त्याला आश्वासन दिले, “ईश्वराची इच्छा असेल तर मी संयम राखू शकेन. मी तुमची कुठल्याही बाबतीत अवज्ञा करणार नाही.” ७० यावर तो म्हणाला, “ठीक आहे! पण माझ्याबरोबर यायचे असेल तर मी स्वतः होऊन सांगेपर्यंत मला कशाबद्दलही प्रश्न विचारायचे नाहीत.”

७१ यानंतर दोघेही प्रवासाला निघाले. जलप्रवासासाठी नौकेत बसल्यावर त्या ज्ञानी माणसाने नौकेला छिद्र पाडले. न राहवून मोझेस उद्गारला, “नौकेत बसलेल्यांना जलसमाधी देण्यासाठी हे छिद्र पाडले आहे का? किती भयंकर गोष्ट आहे ही!” ७२ यावर त्या भक्ताने सांगितले, “मी म्हटले नव्हते! माझ्याबरोबर तू संयमाने राहू शकणार नाहीस.” ७३ मोझेसने क्षमायाचना करत म्हटले, “मला विसर पडला यासाठी मला रागावू नका. मी विचारलेल्या प्रश्नासाठी कठोरपणे वागू नका.” ७४ पुढे त्यांचा प्रवास चालू झाला. वाटेत त्यांना एक तरुण मुलगा भेटला. ज्ञानी गृहस्थाने त्याला मारून टाकले. मोझेसने थक्क होऊन विचारले, “याने कुणाचीही हत्या केलेली नसताना तुम्ही एका निष्पाप जीवाची हत्या केलीत? किती भयंकर गोष्ट आहे ही!”

७५ त्या गृहस्थाने विचारले, “म्हटले नव्हते, तू माझ्याबरोबर संयमाने राहू शकणार नाहीस?” ७६ मोझेसने परत गयावया करत म्हटले, “इथून पुढे एकही प्रश्न विचारला तरी मला तुमच्याबरोबर येऊ देऊ नका. तो माझ्या प्रश्नांचा अतिरेक झालेला असेल.” ७७ शहर लागेपर्यंत त्यांचा प्रवास चालू होता. गावकऱ्यांकडे त्यांनी भोजन व्यवस्थेविषयी विचारले, पण त्यांनी पाहुणचारास नकार दिला. शहरातील

एक भिंत अगदी मोडकळीस आली होती. ज्ञानी गृहस्थाने तिची डागडुजी केली. मोझेसने म्हटले, "तुमच्या मनात आले असते तर या श्रमाचा मोबदला घेता आला असता तुम्हाला!" ७८ त्या सदगूहस्थाने त्याला सांगितले, "या क्षणापासून तुला माझ्याबरोबर राहता येणार नाही. पण निरोप घेण्यापूर्वी तू ज्या बाबतीत संयम राखू शकला नाहीस त्यांचा अर्थ समजावून सांगतो."

७९ ती बोट एका गरीब कुटुंबाची होती, जे समुद्रावर आपला चरितार्थ चालवत असत. त्यांच्यामागोमाग एक सम्राट येत होता, जो बळजबरीने प्रत्येकाची नौका ताब्यात घेत होता. म्हणूनच मला ती नौका बिघडवून नादुरुस्त करायची होती.

८० त्या तरुण मुलाचे म्हणशील तर त्याचे आई-वडील श्रद्धावंत होते तर त्यांचा मुलगा उद्दामपणे वर्तन करून आणि सत्य नाकारून त्यांना त्रास देईल याची आम्हाला भीती वाटत होती. ८१ त्यांच्या पालनकर्त्याने त्याच्या जागी पवित्र मनाचा आणि प्रेमळ मुलगा द्यावा असे वाटल्याने मी त्याची हत्या केली.

८२ ती भिंत शहरातल्या दोन अल्पवयीन अनाथांची होती. त्यांचे वडील सदाचारी गृहस्थ होते. आपली संपत्ती त्यांनी त्या भिंतीखाली लपवून ठेवली होती. सज्ञान होताच अनाथांनी त्या जागी खणावे आणि ईश्वराचा प्रसाद म्हणून त्या संपत्तीचा स्वीकार करावा, ही त्यांच्या पालनकर्त्याची इच्छा होती. मी यापैकी एकही कृत्य माझ्या मर्जीने केले नव्हते. ज्या बाबतीत तू संयम दाखवू शकला नाहीस त्यांचे हे स्पष्टीकरण आहे.

८३ ते तुम्हाला जुलकरनैनविषयी विचारतील. त्यांना सांगा, "मी तुम्हाला त्यांचा सगळा वृत्तांत सांगेन." ८४ आम्ही त्यांना या भूमीवर सुस्थापित करून जीवनावश्यक वस्तू मिळवण्याचे सामर्थ्यही दिले होते.

८५ तो एका विशिष्ट मार्गाने प्रवास करू लागला. ८६ दिवस मावळू
लागताच त्याला दिसले की सूर्य एका गडद पाण्याच्या तलावात बुडू
लागला होता. तलावाशेजारीच काही जनसमूह वस्ती करून रहात होते.
आम्ही त्याला सांगितले, "जुलकरनैन! यांना शिक्षा दे किंवा सभ्यपणाची
वागणूक दे." ८७ यावर तो म्हणाला, "अपराध करणाऱ्यांना आम्ही
निश्चितच शिक्षा देऊ; नंतर त्यांना त्यांच्या पालनकर्त्याकडे परत आणले
जाईल, जो त्यांना अधिक कठोर शिक्षा देईल."

८८ पण श्रद्धावंतांना आणि सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही चांगला
मोबदला देऊ आणि त्यांच्याप्रति मवाळ भूमिका घेऊ.

८९ यानंतर तो दुसऱ्या मार्गाने प्रवास करू लागला. ९० सूर्योदयाच्या
वेळेपर्यंत तो अशा जनसमूहात पोहोचला ज्यांच्या निवाऱ्याची आम्ही
काहीही व्यवस्था केली नव्हती. ९१ त्याच्या बाबतीत जे घडले ते असे
होते. आम्हाला त्याची संपूर्ण माहिती होती.

९२ यानंतर तो आणखी एका वेगळ्या मार्गाने प्रवास करू लागला.
९३ दोन पर्वतांच्या मध्यभागी आल्यावर तो थांबला. तिथे असे लोक रहात
होते, ज्यांना त्याची भाषा अजिबात कळत नव्हती. ९४ मोडक्यातोडक्या
भाषेत त्यांनी जुलकरनैनला विनंती केली, "हे जुलकरनैन! याजूज आणि
माजूज यांनी या प्रदेशात फार अत्याचार माजवला आहे. त्यांच्या आणि
आमच्या दरम्यान अडथळा उभा करण्यासाठी आम्ही तुला या कामाची
किंमत द्यावी का?"

९५ जुलकरनैनने त्यांना समजावले, "माझ्या पालनकर्त्याने मला जे दिले
आहे, ते कसल्याही मोबदल्यापेक्षा श्रेष्ठ आहे. मी तुमच्या आणि त्यांच्या
दरम्यान विशालकाय भिंत उभी करतो, मला फक्त तुमच्या श्रमांची साथ
द्या. ९६ मला लोखंडी ठोकळे आणून द्या." ठोकळे मिळताच त्यांच्या

साह्याने त्याने दोन पर्वतांमधली पोकळी भरून घेतली. त्यानंतर त्यांना सांगितले, "आता अग्नी प्रज्वलित करण्यासाठी आपापले भाते फुंका." अग्नीमुळे लोखंडी ठोकळे लालबुंद होताच त्याने सांगितले, "आता यावर ओतायला मला वितळलेले तांबे आणून द्या." ९७ (अशारीतीने त्याने लोकसहभागातून लोखंडी भिंत उभी केली.) आता याजूज आणि माजूज ना त्यावर चढू शकत होते ना भक्कम भिंतीत छेद करू शकत होते. ९८ यानंतर त्याने सगळ्यांना सांगितले, "माझ्या पालनकर्त्याच्या कृपेमुळे मी हे करू शकलो. पण त्याचे वचन पूर्ण होण्याची वेळ येताच तो ही भिंत धुळीला मिळवेल. त्याचे वचन नेहेमीच खरे ठरते!"

९९ निवाड्याच्या दिवशी आम्ही त्यांना लाटांप्रमाणे एकमेकांशी टक्कर द्यायला लावू आणि त्यानंतर रणशिंग फुंकू. सगळ्यांना आमच्यासमोर एकत्र आणू. १०० त्या दिवशी सत्य नाकारणाऱ्यांसाठी आम्ही नरकाचे प्रवेशद्वार खुले करू. १०१ माझ्या उपदेशांबद्दल त्यांच्या डोळ्यांवर पट्टी बांधली होती तर ते ऐकताना जणू ते बहिरे झाले होते.

१०२ सत्य नाकारणाऱ्यांना असे वाटते का, की ते माझ्याऐवजी माझ्या सेवकांना आपले रक्षणकर्ते बनू शकतील? सत्य नाकारणाऱ्यांसाठी आम्ही नरकाचे निवासस्थान सज्ज ठेवले आहे.

१०३ त्यांना विचारा, "आपल्या कृत्यांमुळे जे सर्वस्व गमावून बसतात त्यांच्याविषयी मी तुम्हाला सांगितलेच पाहिजे का?" १०४ हे ते लोक आहेत ज्यांना वाटते आपण सत्कर्मे करत आहोत. पण वस्तुतः ऐहिक जीवनातील त्यांचे कर्म निष्फळ ठरते. १०५ या लोकांनी ईश्वराचे संकेत आणि त्याच्याशी होणारी भेट नाकारलेली आहे. त्यामुळे त्यांचे कर्म कुचकामी ठरले आहे. पुनर्निर्माणाच्या दिवशी आम्ही त्यांना

काहीही महत्त्व देणार नाही. १०६ त्यांनी सत्य नाकारले आणि माझ्या संकेतांची व माझ्या प्रेषितांची खिल्ली उडवली. यासाठी त्यांना नरकाचाच मोबदला मिळेल.

१०७ माझ्यावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना स्वर्गाचे निवासस्थान लाभेल. १०८ ते कायम त्या बगीच्यात वास्तव्य करतील. त्यांना तिथून बाहेर पडावेसे वाटणार नाही.

१०९ त्यांना सांगा, "माझ्या पालनकर्त्याची वचने लिहिण्यासाठी समुद्रातील पाण्याची शाई बनवली आणि त्यात आणखीन एका समुद्राची भर घातली तरीही माझ्या पालनकर्त्याची वचने लिहून होण्याआधी ती शाई संपून जाईल."

११० त्यांना सांगा, "मीही तुमच्यासारखाच मर्त्य मानव आहे. तुमचा ईश्वर हा एकमेव ईश्वर असल्याचा साक्षात्कार मला झाला आहे. तेव्हा ज्यांना त्याची भेट घ्यायची आहे त्यांनी सत्कर्मे करत रहावे आणि आपल्या पालनकर्त्याची उपासना करताना इतर कुणालाही त्याचा दर्जा देऊ नये."

प्रकरण १९ : मेरी (मरयम)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ काफ हा या ऐन सॉद. २ जकरिया या आपल्या सेवकावर तुमच्या पालनकर्त्याने केलेल्या कृपेचा हा वृत्तांत आहे. ३ हळू आवाजात पुटपुटत त्याने आपल्या पालनकर्त्याची आळवणी केली,

४ हे पालनकर्त्या! वयोमानामुळे माझी हाडे कमकुवत झाली आहेत. केस पिकले आहेत. पण तुझी प्रार्थना करताना आजवर मी कधीही निराश

झालो नाही. ५ पण माझ्यापश्चात माझे नातलग ईश्वरी कार्यात स्वतःला
समर्पित करतील असे वाटत नाही. माझ्या पत्नीला मूलबाळ नाही, तेव्हा
तुझ्याकडूनच मला एक वंशज दे. ६ तो माझाही वारसदार असेल आणि
याकोबच्या घराण्याचाही वारसदार असेल. तुझ्याकडून त्याचा स्वीकार
व्हावा अशी पात्रता त्याला मिळू दे.

७ ईश्वराने त्याला आश्वासन दिले, "जकरिया! आम्ही तुला
पुत्रजन्माची शुभवार्ता देतो. त्याचे नाव याह्या असेल. याआधी हे नाव
आम्ही कुणालाही दिलेले नाही." ८ जकरियाने चकित होऊन विचारले,
"हे पालनकर्त्या! माझी पत्नीही वांझ आहे आणि मीही वयोवृद्ध झालो
आहे. मग हे कसे शक्य आहे?"

९ तो म्हणाला, "हे असेच घडेल. तुझ्या पालनकर्त्याने सांगितले
आहे, तू काहीच नसताना मी तुला निर्माण केले आहे. तेव्हा हे मला सहज
शक्य आहे." १० जकरियाने विनंती केली, "हे पालनकर्त्या! या शुभवार्ते
चा एखादा संकेत दे." ईश्वराने सांगितले, "तुझी प्रकृती उत्तम असेल,
पण तीन दिवस आणि तीन रात्री कुणाशीही बोलू शकणार नाहीस. हाच
आमचा संकेत असेल." ११ यानंतर जकरियाने प्रार्थनागृहाबाहेर येऊन
आपल्या खाणाखुणांनी आपल्या कुटुंबियांना सकाळी आणि सायंकाळी
(सतत) ईशस्तुती करायला सांगितले.

१२ बालपणापासूनच आम्ही याह्याला तल्लख बुद्धिमत्ता दिली आणि
सांगितले, "ग्रंथावर दृढ विश्वास ठेव." १३ त्याचे अंतःकरण पवित्र,
निर्मळ होते. तो सदाचारी होता. १४ तो आपल्या पालकांप्रति कर्तव्यनिष्ठ
होता. उर्मटपणाचा, उद्धटपणाचा त्याच्यात लवलेशही नव्हता. १५ त्याच्या
जन्माच्या वेळी, मृत्यूच्या वेळी आणि नवनिर्मितीच्या वेळीही त्याला
शांती लाभेल.

१६ (पैगंबर!) या पवित्र ग्रंथात मेरीची आठवण करा: ती आपल्या
लोकांपासून वेगळी होऊन पूर्वेकडे निघून गेली. १७ तिथे ती सगळ्यांपासून
अलिप्त होऊन एकांतवासात राहिली. आम्ही तिच्याकडे आमच्या दूताला
पाठवले, जो तिच्यासमोर संपूर्ण मानवी आकारात प्रकट झाला. १८ "मी
ईश्वराला शरण गेले आहे, तो माझे तुझ्यापासून रक्षण करो. ईश्वराचे
भय वाटत असेल तर माझ्या जवळही येऊ नकोस." १९ देवदूत म्हणाला,
"मी तर तुझ्या पालनकर्त्याकडून आलेला दूत आहे. मी तुला एका
पवित्र पुत्राची भेट देणार आहे." २० मेरीने त्याला विचारले, "मी तर
अस्पर्श आहे, अनाघ्रात आहे, ना माझे चारित्र्य अशुद्ध आहे. मला
पुत्र कसा होईल?" २१ देवदूत म्हणाला, "हे असेच होईल, कारण
तुझ्या पालनकर्त्याने तुला निरोप दिला आहे, हे आमच्यासाठी अगदी
सहजसाध्य आहे. हा पुत्र म्हणजे लोकांसाठी आमचा कृपाशीर्वाद आणि
संकेत असेल. हे विधीलिखित निश्चित झाले आहे."

२२ पुढे तिला गर्भधारणा झाली आणि ती दूर एकांतवासात निघून गेली.
२३ प्रसूतिवेदना सुरू होताच ती एका खजूर वृक्षाच्या पायथ्यापाशी आली.
वेदना असह्य होऊन ती विव्हळू लागली, "या आधीच मला मरण आले
असते आणि मी लोकांच्या विस्मरणात गेले असते तर किती चांगले झाले
असते!"

२४ पण इतक्यात तिला एक आवाज ऐकू आला, "अशी निराश
होऊ नकोस. तुझ्या पायापाशी ईश्वराने पाण्याचा जिवंत झरा निर्माण
केला आहे. २५ या वृक्षाला धक्का दिलास की वरून ताज्या, पिकलेल्या
खजूरांचा सडा पडेल." २६ त्यावर आपली गुजराण करून समाधानात रहा.
जवळपास कुणी माणूस दिसलाच तर त्याला सांग, "कृपाळू ईश्वराच्या
स्मरणार्थ मी मौनव्रत धारण केले असून कुणाशीही बोलणार नाही."

२७ पुत्रजन्म झाल्यावर त्याला घेऊन ती आपल्या लोकांकडे परतली.
ते तिला म्हणाले, "मेरी! तू खरोखर भयंकर अपकृत्य केलेले दिसतेस.
२८ अहरोनच्या (हारूनच्या) भगिनी! ना तुझे वडील कुकर्मी होते, ना तुझी
आई चारित्र्यहीन होती."

२९ उत्तरादाखल तिने आपल्या पुत्राकडे बोट दाखवले. त्यांनी विचारले,
"या पाळण्यातल्या बाळाशी आम्ही काय बोलणार?" ३० तोच पाळण्यातले
बाळ त्यांना सांगू लागले, "मी ईश्वराचा सेवक आहे. त्याने मला पवित्र
ग्रंथ दिला आणि आपला प्रेषित बनवले. ३१ मी जिथे कुठे असेन तिथे
माझ्यावर त्याची कृपा झालेली असेल. त्याने मला जीवनभर प्रार्थना
करण्याची आणि दानधर्म करण्याची सक्त ताकीद दिली आहे. ३२ त्याने
मला आईप्रति कर्तव्यनिष्ठ बनवले आहे आणि दुष्टपणाला, उद्धटपणाला
माझ्यापासून दूर ठेवले आहे. ३३ जन्माच्या दिवशीही माझ्यावर त्याची
कृपादृष्टी होती आणि मरणाच्या आणि पुनर्निर्मितीच्या दिवशीही माझ्यावर
त्याची कृपादृष्टी असेल."

३४ मेरीपुत्र येशू हा असा होता. हे त्याच्याविषयीचे संपूर्ण सत्य आहे.
पण अद्यापही लोकांच्यात त्यावरून मतभेद आहेत. ३५ ईश्वराला पुत्र
असावा हे त्याच्या प्रतिष्ठेला शोभणारे नाही. ईश्वर स्तुत्य आहे! तो या
सगळ्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे. तो एखादी गोष्ट अस्तित्वात आणायचे
ठरवतो आणि म्हणतो 'अस्तित्वात ये' आणि ती गोष्ट अस्तित्वात येते.

३६ (येशू म्हणाला) "ईश्वर माझा पालनकर्ता आहे आणि तुमचाही,
तेव्हा त्याची एकट्याची उपासना करा. हा सन्मार्ग आहे." ३७ तरीही
वेगवेगळ्या गटांचे त्यावरून आपसात मतभेद झालेत. तो प्रलयाचा
भयानक दिवस येताच सत्य नाकारणाऱ्यांची अवस्था किती भयंकर
झालेली असेल! ३८ ते आमच्याकडे येतील तेव्हा त्यांची ऐकण्याची

व बघण्याची क्षमता किती तीक्ष्ण झाली असेल. पण आज हे कुकर्मी निश्चितच दुराचारात हरवलेले आहेत.

३९ त्यांना पश्चातापाच्या दिवसाच्या आगमनाचा इशारा द्या. आज त्यांचा त्यावर विश्वासही नाही आणि ते त्याची दखलही घेत नाहीत. ४० ही पृथ्वी आणि तिच्यावरच्या सगळ्या प्राणीमात्रांचे आम्हीच वारसदार असू; त्यांना आमच्याकडेच परतायचे आहे.

४१ ईश्वरी ग्रंथात दिलेल्या अब्राहामच्या कथेचेही स्मरण करा. तो सत्यप्रिय माणूस, ईश्वराचा प्रेषित होता. ४२ तो आपल्या पित्याला म्हणाला, "जो पाहू शकत नाही, ऐकू शकत नाही, तुम्हाला कुठल्याही प्रकारे मदत करू शकत नाही, त्याची उपासना का करता? ४३ पिताश्री! मला असे ज्ञान मिळाले आहे जे तुम्हाला मिळालेले नाही. तेव्हा माझे अनुसरण करा. मी तुम्हाला सन्मार्गावर नेईन. ४४ सैतानाची उपासना करू नका. कारण त्याने असीम कृपाळू ईश्वराविरुद्ध बंडखोरी केली आहे. ४५ पिताश्री! कृपाळू ईश्वराची शिक्षा तुमच्यावर कोसळेल आणि तुम्ही सैतानाचे सोबती बनाल, याची मला भीती वाटते."

४६ त्याचे वडील त्याला म्हणाले, "अब्राहाम! तू माझ्या दैवतांना नाकारतोस? हे थांबवले नाहीस तर मी तुला दगडांनी ठेचून मारेन. माझ्या मार्गातून तू बाजूला हो." ४७ अब्राहामने उत्तर दिले, "तुम्हाला शांती लाभो! मी माझ्या पालनकर्त्याकडे तुमच्यासाठी क्षमायाचना करेन. त्याची माझ्यावर कृपा आहे, यात काही शंका नाही. ४८ मी तुमच्यापासून आणि तुम्ही ईश्वराव्यतिरिक्त ज्यांचा धावा करता, त्यांच्यापासून दूर जात आहे. मी फक्त माझ्या ईश्वराचीच प्रार्थना करेन. मी माझ्या पालनकर्त्याचा धावा केला तर तो मला कधीच निराश करणार नाही."

४९ अब्राहामने स्वतःला आपल्या पित्यापासून आणि त्याच्या

उपास्यांपासून वेगळे करताच आम्ही त्याला इसहाक आणि याकोब देऊ केले. त्या दोघांनाही आम्ही प्रेषित बनवले. ५० आम्ही त्यांच्यावर आमच्या कृपेचे छत्र धरले आणि त्यांना खरा व श्रेष्ठ लौकिक दिला.

५१ या ग्रंथाद्वारे मोझेसचे स्मरण करा. तो खरोखर आम्ही निवडलेल्यांपैकी होता, आमचा निरोप्या होता आणि प्रेषित होता. ५२ आम्ही त्याला सिनाई पर्वताच्या उजव्या बाजूने हाक दिली आणि आमचा संदेश देण्यासाठी आमच्याजवळ बोलावून घेतले. ५३ आमच्या कृपेने आम्ही त्याला मदतनीस म्हणून हारून हा बंधू दिला आणि त्याला प्रेषित बनवले.

५४ या ग्रंथाद्वारे इश्माएलचे स्मरण करा. तो वचननिष्ठ होता, आमचा दूत होता आणि प्रेषित होता. ५५ त्याने आपल्या लोकांना प्रार्थनेसाठी आणि दानधर्मासाठी प्रेरित केले. त्याचा पालनकर्ता त्याच्यावर संतुष्ट झाला होता. ५६ या ग्रंथातून इदरीसचेही स्मरण करा. तो सत्यप्रिय होता आणि आमचा प्रेषित होता. ५७ आम्ही त्याला उच्च दर्जा दिला होता.

५८ हे महानुभाव ते आहेत ज्यांच्यावर ईश्वराची कृपा झाली आहे. आदमच्या वंशजातले आणि ज्यांना आम्ही नोहाबरोबर नौकेतून समुद्रपार केले त्यांच्या वंशजातले प्रेषित आणि अब्राहाम व इस्राएलच्या वंशजातले प्रेषित, ज्यांना आम्ही मार्गदर्शनासाठी निवडले त्यांच्या वंशजातले प्रेषित. ज्यावेळी कृपाळू ईश्वराचे साक्षात्कार त्यांना ऐकवले जात असत, ते पश्चातापदग्ध होऊन जमिनीवर लोटांगण घालत. अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी ईश्वरासमोर नतमस्तक होत.

५९ पण त्यांच्यानंतरच्या पिढ्यांनी प्रार्थनेकडे दुर्लक्ष केले. ते आपल्याच इच्छा-आकांक्षांमध्ये वाहत गेले, त्यांचा विनाश होणार यात काही शंका नाही. ६० पश्चातापदग्ध होऊन आमच्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांना आणि सत्कर्मे करणाऱ्यांना विनाशापासून वाचवले जाईल. त्यांना स्वर्गात प्रवेश मिळेल आणि त्यांच्यावर किंचितही अन्याय होऊ दिला जाणार नाही.

६१ सर्वकृपाळू ईश्वराने आपल्या सेवकांना वचन दिलेल्या आनंदाच्या
बागा श्रद्धावंतांसाठी असतील. भले त्यांनी त्या बागा कधी पाहिल्या
नसतील, पण ईश्वराने दिलेले वचन निश्चितच पूर्ण होणार. ६२ तिथे त्यांच्या
कानावर फक्त शांतीचे अभिवादन पडेल, इतर कुठल्याही निरर्थक गोष्टी
त्यांना ऐकू येणार नाहीत. सकाळ-संध्याकाळ तिथे त्यांना निर्वाहासाठी
लागेल त्या वस्तू दिल्या जातील. ६३ आमचे जे सेवक ईश्वराचे भय
बाळगतील त्यांनाच या बगीच्यात प्रवेश मिळेल.

६४ (देवदूत म्हणाले) तुमच्या पालनकर्त्याची आज्ञा मिळाल्याशिवाय
आम्ही कधीच (पृथ्वीतलावर) येत नाही. आमच्या मागे, पुढे आणि त्या
दरम्यान जे काही आहे ते त्याच्याच मालकीचे आहे. तुमचा पालनकर्ता
काहीही विसरत नाही. ६५ आकाशात, पृथ्वीवर आणि यांच्या दरम्यान जे
काही आहे त्या सगळ्याचा तो मालक आहे. तेव्हा फक्त त्याचीच उपासना
करा आणि ती अढळपणे करा. त्याचा दर्जा गाठणारा, त्याच्याबरोबरीचा
अन्य कुणी तुमच्या माहितीत आहे का?

६६ माणूस विचारेल, "एकदा मृत झाल्यावर मला पुन्हा जीवन मिळेल
का?" ६७ पण तो याआधी काहीच नव्हता तेव्हा त्याची निर्मिती झाली हे
त्याला आठवत नाही का? ६८ तुमच्या पालनकर्त्याची शपथ! निवाड्याच्या
दिवशी आम्ही निश्चितच त्यांना एकत्र करू आणि सैतानांनादेखील तिथे
आणू. गुडघ्यांवर रांगत आम्ही त्यांना नरकाजवळ आणू.

६९ प्रत्येक गटातील अशा लोकांना आम्ही वेगळे करू, जे कृपाळू
ईश्वराला विरोध करण्यात सर्वाधिक कडवे होते. ७० कुणाची नरकात
जायची पात्रता सगळ्यात जास्त आहे ते आम्ही चांगलेच ओळखतो.
७१ तुमच्यापैकी प्रत्येकाला या परीक्षेतून जावेच लागेल. हा तुमच्या
पालनकर्त्याचा आदेश आहे आणि त्याची पूर्तता झालीच पाहिजे.

७२ ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांना या प्रसंगातून आम्ही वाचवू, पण
कुकर्म्यांना गुडघे घासत तिथेच राहू दिले जाईल.
७३ आमचे सुस्पष्ट संकेत ऐकवल्यावर सत्यावर अविश्वास
दाखवणारे श्रद्धावंतांना विचारतात, "आपल्यापैकी कुठल्या गटाची
प्रतिष्ठा अधिक आहे आणि कुठला गट अधिक प्रभावी आहे?"
७४ त्यांच्या आधीच्या अशा कित्येक पिढ्या आम्ही गारद केल्या आहेत,
ज्यांचे भौतिक सामर्थ्य आणि धनसंपत्ती श्रद्धावंतांपेक्षा अधिक होती.
७५ त्यांना सांगा, "चुकीच्या मार्गावर असलेल्यांना ईश्वर थोड्या
काळाची उसंत देतो. पण त्यांना दिलेल्या वचनपूर्तीची वेळ येताच या
जगातील शिक्षेच्या रूपात किंवा अंतिम दिवसाच्या आगमनाच्या रूपात
त्यांना अरिष्टाचा सामना करावाच लागेल. कुणाची प्रतिष्ठा आणि भौतिक
सामर्थ्य जास्त आहे, हे त्यांना तेव्हाच कळेल."
७६ ईश्वराच्या मार्गदर्शनानुसार चालणाऱ्यांना तो अधिक मार्गदर्शन
देतो. चिरकालीन सत्कर्मे तुमच्या पालनकर्त्याच्या नजरेत श्रेष्ठ आहेत
आणि त्यांना तो भरघोस मोबदला देतो.
७७ त्या माणसाबद्दल तुम्ही कधी विचार केला आहे का, जो आमच्या
संदेशाद्वारे प्रकट होणारे सत्य नाकारण्यावर आग्रही आहे? तो म्हणतो,
"मला निश्चितपणे संपत्ती व संतती प्राप्त होणार." ७८ त्याने कधी अदृश्याचा
वेध घेतला आहे का किंवा कृपाळू ईश्वराने त्याला तसे वचन दिले आहे
का? ७९ मुळीच नाही. आम्ही त्याच्या बोलण्याची नोंद ठेवू आणि त्याच्या
शिक्षेत वाढ करू. ८० तो ज्याची मिजास मारतो त्याचे आम्हीच वारसदार
असणार आहोत. त्याला एकाकी अवस्थेत आमच्याकडे यावे लागेल.
८१ सामर्थ्याचा स्त्रोत म्हणून त्यांनी ईश्वराव्यतिरिक्त अन्य कुणाचा तरी
स्वीकार केला आहे. ८२ पण हे त्यांची उपासना नाकारतील आणि त्यांच्या
विरोधात जातील.

८३ अवज्ञेपोटी सत्य नाकारणाऱ्यांविरुद्ध आम्ही सैतानी शक्तींना
चिथवल्याचे तुम्हाला माहीत नाही का? ८४ तेव्हा त्यांच्यावर कारवाई
करण्याची घाई करू नका. त्यांचे दिवस भरत आले आहेत. ८५ ज्या
दिवशी आम्ही ईश्वराची भीती बाळगणाऱ्यांना सन्माननीय अतिथीसारखे
कृपावंत ईश्वरासमोर हजर करू, तो दिवस निश्चितच उगवेल. ८६ आणि
पाप्यांना आम्ही तहानलेल्या जनावरांच्या कळपासारखे नरकात लोटून
देऊ. ८७ या दिवशी कुणालाही मध्यस्थी करता येणार नाही. अपवाद फक्त
कृपेचा स्वामी असलेल्या ईश्वराकडून तशी परवानगी घेणाऱ्याचा.

८८ ते म्हणतात, "कृपाळू ईश्वराला पुत्र झाला आहे."
८९ निःसंशय त्यांचे हे बोलणे निखलास खोटे आहे. ९० या खोटेपणामुळे
आकाश फाटून जाईल, पृथ्वीच्या ठिकऱ्या उडतील आणि पर्वतांचे तुकडे
पडतील. ९१ कारण त्यांनी कृपाळू ईश्वराला पुत्र असल्याचे म्हटले आहे.
९२ त्या कृपावंताची ही शान नव्हे की, त्याने (एखाद्यास) पुत्र बनवावा.

९३ पृथ्वीतलावर किंवा आकाशात असा एकही प्राणीमात्र नाही
ज्याला संपूर्ण शरणागतीच्या स्थितीत कृपाळू ईश्वराकडे परतायचे आहे.
९४ त्याने त्यांची मोजदाद करून त्यांचा नेमका अनुक्रम ठरवला आहे.
९५ निवाड्याच्या दिवशी त्यांच्यातला प्रत्येकजण एकामागून एक ईश्वराला
सामोरा जाईल. ९६ ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना त्या
दयासागराकडून प्रेमाचा आशीर्वाद लाभेल.

९७ हे प्रेषिता! सदाचारी लोकांना शुभवार्ता देता यावी तर दुराग्रही
लोकांना धोक्याची सूचना देता यावी, यासाठी हे कुरआन आम्ही तुमच्या
भाषेत पाठवले आहे. ९८ त्यांच्या पूर्वीच्या किती पिढ्या आम्ही उध्वस्त
केल्या आहेत. त्यांच्यापैकी एकजण तरी जिवंत असल्याचे दिसते का
किंवा कुणाची तरी कुजबूज तुमच्या कानी पडते का?

प्रकरण २० : ता. हा.
(ता. हा.)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ता हा. २ आम्ही हे कुरआन तुम्हाला त्रास देण्यासाठी पाठवले नाही,
३ हा तर ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांसाठी पाठवलेला उपदेश आहे. ४ हा
अशा ईश्वराचा साक्षात्कार आहे, ज्याने पृथ्वी आणि सर्वोच्च आकाश
निर्माण केले. ५ तो असीम दयाळू ईश्वर विश्वाच्या सिंहासनावर विराजमान
झाला आहे. ६ आकाशात आणि पृथ्वीवर जे आहे ते, त्यांच्या दरम्यान
जे आहे ते आणि भूमीच्या उदरात जे लपले आहे ते सगळे त्याच्या
मालकीचे आहे.
७ तुम्ही मोठ्याने बोला की हळू आवाजात, तो सगळे काही ऐकतो.
तो तुमची गुपिते, तुम्ही लपवलेले सगळे जाणतो. ८ तो एकमेव ईश्वर
आहे. सर्वोत्कृष्ट नावे त्याची आहेत.
९ तुम्ही मोझेसची गोष्ट ऐकली आहे का? १० प्रवासादरम्यान विस्तव
दिसताच त्याने कुटुंबियांना सांगितले, "पुढे मला अग्नी दिसतो आहे.
तुम्ही इथेच थांबा. तिथून मी तुमच्यासाठी निखारा आणेन किंवा त्या
अग्नीजवळ काही मार्गदर्शन मिळवेन."
११ अग्नीच्या जवळ जाताच त्याला ऐकू आले, हे मोझेस!
१२ मी तुझा पालनकर्ता आहे! तू तुवाच्या पवित्र खोऱ्यात उभा आहेस,
तेव्हा पायातल्या वहाणा काढून ठेव. १३ मी तुला निवडले आहे. तेव्हा
तुला जो साक्षात्कार होत आहे त्याकडे लक्षपूर्वक पहा. १४ मी ईश्वर
आहे. माझ्याशिवाय अन्य कुणी ईश्वर नाही, तेव्हा फक्त माझीच उपासना
कर आणि माझे स्मरण करण्यासाठी प्रार्थना कर. १५ निवाड्याची घटिका

जवळ येते आहे. पण प्रत्येकाला त्याच्या कर्माचा योग्य मोबदला देता यावा यासाठी मी ती वेळ गुप्त ठेवायचे ठरवले आहे. १६ त्यावर विश्वास
न ठेवता आपल्या मर्जीनुसार वागणाऱ्यांमुळे तू त्यापासून दूर जाऊ नकोस
आणि स्वतःचा विनाश ओढवून घेऊ नकोस.''

१७ ईश्वराने विचारले, ''मोझेस! तुझ्या उजव्या हातात काय आहे?''
१८ त्याने उत्तर दिले, ''ही माझी काठी आहे. मी तिचा आधार घेतो,
तिच्या सहाय्याने माझ्या शेळ्यांसाठी झाडांचा पाला झोडपतो. इतरही
अनेक उपयोग आहेत तिचे.'' १९ ईश्वराने आज्ञा केली, ''फेकून दे ती
काठी.'' २० त्यानुसार त्याने हातातली काठी फेकून दिली आणि अचानक
तिचे रूपांतर एका वळवळणाऱ्या सापात झाले. २१ ईश्वराने पुन्हा आज्ञा
केली, ''हातात उचलून घे त्याला. घाबरू नकोस. आम्ही त्याला परत
पूर्वस्थितीत आणू. २२ तुझा पंजा काखेत दाबून ठेव. काही वेळाने तो
बिनडाग पांढराशुभ्र झालेला दिसेल. ही आमची दुसरी खूण असेल.
२३ आम्ही तुला आमचे काही महान संकेत दाखवू. २४ आता तू फारोकडे
जा. त्याने सगळ्या मर्यादांचे उल्लंघन केले आहे.''[अ]

२५ मोझेसने ईश्वराला विनंती केली, ''हे पालनकर्त्या! माझ्या मनाचे दरवाजे
उघड, २६ आणि ईश्वरी कार्यात मला सुलभता निर्माण कर, २७ माझी वाणी
निर्दोष कर, २८ म्हणजे लोकांना माझे बोलणे कळेल. २९ माझ्या कुटुंबियांपैकी
कुणाला तरी माझ्या मदतीला दे. ३० माझा बंधू अहरोन याला माझ्या

[अ] वस्तुस्थिती अशी आहे की या जगात जे काही आहे किंवा कोणत्याही घटना घडत आहेत, ते सर्व ईश्वराचे चमत्कार आहेत. मग ते जमिनीतून रोपटे निघणे किंवा काठी साप बनणे. ईश्वराने घडवलेल्या दैनंदिन चमत्कारांची मानवाला दखल घ्यायला लावण्यासाठी पैगंबरांद्वारे विलक्षण चमत्कार दाखवले जात होते.

मदतीला दे. ३१ त्याच्या मदतीमुळे माझी शक्ती वाढव. ३२ माझ्या कार्याला
त्याची साथ मिळू दे. ३३ म्हणजे आम्हाला तुझी भरपूर स्तुती करता येईल,
३४ आणि सतत तुझे स्मरण करता येईल. ३५ तू निश्चितच आमच्यावर
नजर ठेवून आहेस.” ३६ ईश्वराने सांगितले, “मोझेस! तुझी विनंती मान्य
झालेली आहे.”

३७ खरोखर, यापूर्वीही आम्ही तुझ्यावर उपकार केले आहेत.
३८ आम्ही आमची इच्छा तुझ्या मातेला सांगितली, ३९ या बालकाला एका
पेटीत ठेव आणि ती पेटी नदीपात्रात सोडून दे. नदी ती पेटी किनाऱ्याला
लावेल. माझा आणि त्या बालकाचाही शत्रू असलेली एक व्यक्ती ती
पेटी घेऊन जाईल. माझ्या दक्ष नजरेखाली तुझे संगोपन व्हावे यासाठी
मी तुझ्यावर माझ्या प्रेमाचा वर्षाव केला. ४० आठव, पेटीपाठोपाठ तुझी
बहीण तिथे येऊन म्हणाली, “या बालकाची योग्य देखभाल करू शकेल
अशा स्त्रीकडे मी त्याला नेऊ का?” अशा प्रकारे तुझ्या मातेचा शोध दूर
व्हावा आणि तुला पाहून तिचे डोळे निवावेत यासाठी आम्ही तुला पुन्हा
एकदा मातेकडे पाठवले. बरीच वर्षे तू मदियनच्या लोकांबरोबर राहिलास.
मोझेस! आता तू योग्य तो दर्जा गाठला आहेस.

४१ मी माझ्या कार्यासाठी तुझी निवड केली आहे. ४२ तू आणि तुझा
भाऊ माझे संकेत घेऊन लोकांकडे जा आणि मला कधीही विसरू नका.
४३ फारोने सगळ्या मर्यादांचे उल्लंघन केले आहे, तेव्हा माझा उपदेश घेऊन
त्याच्याकडे जा. ४४ पण त्याच्याशी सभ्यपणे बोला. तो कदाचित माझ्या
उपदेशाची दखल घेईल किंवा त्याला कदाचित (माझ्या शिक्षेची) भीतीही
वाटेल.

४५ दोघांनीही साशंक होऊन ईश्वराला विचारले, “हे पालनकर्त्या!

आम्हाला भीती वाटते, तो आमच्याशी अतिरेकाने वागेल, सगळ्या
मर्यादा सोडून वागेल." ४६ ईश्वराने त्यांना आश्वस्त केले, "घाबरू
नका, मी तुमच्यासोबत आहे. मी सगळे काही पाहतो आणि ऐकतो."
४७ त्याच्याकडे जाऊन सांगा, "आम्ही दोघे तुझ्या पालनकर्त्याचे दूत
आहोत. इस्त्राएलच्या संततीवर जुलूम करू नको, त्यांना आमच्याबरोबर
येऊ दे. आम्ही तुझ्या पालनकर्त्याकडून तुझ्यासाठी एक संकेत आणला
आहे. त्याच्या मार्गदर्शनानुसार वागणाऱ्यांना शांततेत जगू दे. ४८ त्याच्या
मार्गदर्शनाकडे दुर्लक्ष करून त्याकडे पाठ फिरवणाऱ्याला शिक्षेचा सामना
करावा लागेल. असा साक्षात्कार आम्हाला झाला आहे."

४९ त्यांचे बोलणे ऐकल्यावर फारोने त्यांना विचारले, "तुम्हा दोघांचा
पालनकर्ता कोण आहे?" ५० मोझेसने सांगितले, "आमचा पालनकर्ता तो
आहे, ज्याने प्रत्येक गोष्टीला तिचा आकार दिला आणि नंतर तिला योग्य
मार्गदर्शन दिले." ५१ फारोने विचारले, "आमच्यापूर्वी होऊन गेलेल्या
पिढ्यांचे काय होणार?" ५२ मोझेसने सांगितले, "याचे ज्ञान फक्त माझ्या
पालनकर्त्याकडे आहे. ते सगळे त्याने एका ग्रंथात नोंदवून ठेवले आहे.
माझा पालनकर्ता ना कसली चूक करतो, ना त्याला कशाचा विसर
पडतो."

५३ ईश्वरानेच तुमच्यासाठी पृथ्वीचा विस्तार केला. त्यावर रस्ते
बनवले आणि आकाशातून तुमच्यासाठी पाण्याची व्यवस्था केली. त्या
पाण्यावर आम्ही हरतऱ्हेची वनस्पती उगवतो. ५४ तेव्हा या पृथ्वीवरून
तुमच्या भोजनाची सामग्री मिळवा आणि तुमच्या पाळीव जनावरांसाठीही
चारा द्या. सुज्ञ माणसांसाठी ईश्वराच्या या योजनेत संकेत आहेत.

५५ मातीपासून आम्ही तुम्हाला तयार केले आणि तिच्याकडेच परत एकदा
सोपवू. त्यानंतर दुसऱ्यांदा तुम्हाला तिच्यामधून निर्माण केले जाईल.अ
५६ आम्ही फारोला आमचे सगळे संकेत दाखवले, पण त्याने त्यांचा
अव्हेर केला आणि त्यावर विश्वास ठेवायला नकार दिला. ५७ त्याने
विचारले, "मोझेस! जादू करून आम्हाला आमच्या भूमीतून हुसकावून
लावायला इथे आला आहेस का तू? ५८ आम्ही तुला याच तोडीची जादू
करून दाखवू. तेव्हा मोकळ्या जागी जादू दाखवण्यासाठी अशी वेळ
निश्चित करा, जी गाठायला आपल्या दोघांनाही काही अडचण येणार
नाही."

५९ यावर मोझेसने उत्तर दिले, "आपल्यातल्या या सामन्याचा दिवस
उत्सवाचा दिवस असेल. त्या दिवशी सूर्य उगवल्यावर मोकळ्या पटांगणात
सगळ्यांना बोलावून घ्या." ६० हे ऐकून फारो तिथून निघून गेला. आपले
डावपेच आखून काही वेळाने परत एकदा मोझेससमोर आला. ६१ त्याला
आणि त्याच्या साथीदारांना मोझेसने इशारा दिला, "तुमचा सर्वनाश
होईल! ईश्वराविरुद्ध बनावट गोष्टी रचू नका, अन्यथा संकट कोसळवून तो
तुम्हाला उध्वस्त करून टाकेल. त्याच्याविषयी बनावट गोष्टी रचणाऱ्याचा
पराजय ठरलेला आहे!"

६२ यानंतर फारोचे जादूगार कुजबुजत्या स्वरात एकमेकांशी वाद घालू
लागले. ६३ ते फारोला म्हणाले, "हे दोघे नक्की जादूगार आहेत. आपल्या
जादूच्या प्रभावाने त्यांना तुम्हाला या भूमीतून हुसकावून लावायचे आहे

अ पृथ्वीची निर्मिती, पर्जन्यमानाची संस्था, वनस्पती आणि हिरवळीची वाढ आणि इतर नैसर्गिक घटना ज्यांनी सध्याचे जग सजीवांसाठी राहण्यायोग्य केले आहे. हे अतिशय प्रचंड आहे आणि ईश्वरी सामर्थ्याचे प्रकटीकरण आहे.

आणि तुमच्या भव्य परंपरा उध्वस्त करायच्या आहेत. ६४ तेव्हा तुम्ही
आपले डावपेच आखा. आमच्या ठरलेल्या क्रमांकानुसार आम्ही जादू
दाखवायला पुढे सरसावू. आज जो वरचढ ठरेल तो विजयी होणार हे
निश्चित!''
६५ मोझेसला त्यांनी विचारले, ''तू तुझे फासे आधी टाकणार की
आम्ही टाकू?'' ६६ मोझेसने उत्तर दिले, ''आधी तुम्ही टाका.'' त्याबरोबर
एकाएकी जादूगारांच्या जादूच्या प्रभावाने त्यांचे दोरे आणि फासे वेगाने
हालचाल करत त्यांच्यासमोर अवतीर्ण झाले. ६७ हे पाहून मोझेस मनात
घाबरला. ६८ पण आम्ही त्याला सांगितले, ''घाबरू नकोस, मोझेस.
आज तूच यांच्यापेक्षा वरचढ ठरणार आहेस.'' ६९ तुझ्या उजव्या हातातला
फासा खाली टाकून दे, त्यांनी रचलेल्या गोष्टी तो गिळून टाकेल. कारण
त्यांनी जे काही उभे केले आहे, ती त्यांची हातचलाखी आहे. जादूगार
(सत्याच्या विरूद्ध) कधीही यशस्वी होऊ शकत नाही. मग तो कोणत्याही
मार्गाने येवो. ७० (सत्य समोर आल्यावर) ते जादूगार ईश्वराला शरण
गेले आणि म्हणाले, ''अहरोन आणि मोझेसच्या पालनकर्त्यावर आमचा
विश्वास बसला आहे.''
७१ फारोने त्यांना विचारले, ''मी परवानगी देण्यापूर्वीच मोझेसवर
विश्वास ठेवलात? तो नक्कीच तुमचा गुरू असेल, त्याच्याकडून तुम्ही
जादू शिकला असाल. मी तुमचे विरूद्ध बाजूचे हातपाय छाटून टाकेन
आणि पामवृक्षाच्या खोडावर तुम्हाला फासावर लटकवेन. मग तुम्हाला
कळेल, कुणाची शिक्षा जास्त कठोर आणि टिकाऊ आहे ते.''
७२ यावर जादूगारांनी उत्तर दिले, ''ना आमच्यासमोर आलेल्या
सत्याच्या पुराव्यापेक्षा, ना आम्हाला जीवन देणाऱ्या ईश्वरापेक्षा आम्ही
तुला प्राधान्य देऊ. तू काय निर्णय घ्यायचाय तो तू घेऊ शकतोस.

तुझे आदेश फक्त या जगातल्या जीवनापुरते मर्यादित आहेत. ७३ आम्ही आमच्या पालनकर्त्यावर विश्वास ठेवला आहे. आमच्या पापांसाठी आणि तू जबरदस्तीने करायला लावलेल्या जादूटोण्यासाठी तो आम्हाला माफ करेल. ईश्वर सर्वोत्कृष्ट आणि चिरंतन आहे.''

७४ खरोखर, जो अपराधी म्हणून ईश्वरासमोर जातो त्याची रवानगी नरकात केली जाते. तिथे ना तो धड जगू शकेल, ना त्याला मृत्यू येईल. ७५ पण जो श्रद्धावंत म्हणून ईश्वरासमोर जातो, त्याने सत्कृत्ये केली असल्याने उच्च स्थान देऊन त्याचा दर्जा उंचावला जातो. ७६ जिथून नद्या वाहत असतील अशा शाश्वत स्वर्गात त्यांना कायमचे वास्तव्य लाभते. स्वतःची शुद्धी करणाऱ्यांना असा घसघशीत मोबदला मिळतो.

७७ आम्ही आमचा साक्षात्कार अवतरीत करून सांगितले, ''रातोरात माझ्या सेवकांना इथून दूर घेऊन जा. त्यांना जाण्यासाठी समुद्रात कोरडा मार्ग तयार कर. हे कार्य करताना ना शत्रूकडून पराभूत होण्याची भीती बाळग, ना समुद्रात बुडण्याची.'' ७८ आपल्या सैन्यासह फारोने त्यांचा पाठलाग केला. पण समुद्राने त्यांना गिळून टाकले. ही दैवगती त्यांच्यावर ओढवणारच होती. ७९ कारण फारोने आपल्या लोकांना योग्य मार्गदर्शन करण्याऐवजी त्यांना मार्गभ्रष्ट केले होते.

८० इस्त्राएलच्या वंशजांनो! आम्ही शत्रूपासून तुमची सुटका केली आणि सिनाई पर्वताच्या उजव्या बाजूला तुमच्याशी एक करार केला. तुमच्यासाठी मन्न आणि सलवाचे खाद्य पाठवले. ८१ आम्ही देऊ केलेल्या आरोग्यदायी वस्तूंचे सेवन करा, पण माझ्या आज्ञेचे उल्लंघन करू नका. अन्यथा माझा रोष ओढवून घ्याल. माझ्या रोषाला बळी पडणाऱ्यांचा निश्चितच सर्वनाश होतो. ८२ पण पश्चाताप करत जो माझ्याकडे वळतो, माझ्यावर श्रद्धा ठेवून सदाचाराने वागतो आणि सन्मार्गाचे अनुसरण करतो, त्याला मी निश्चितपणे क्षमा करतो.

८३ मोझेस सिनाई पर्वतावर गेला असता ईश्वराने त्याला विचारले, "हे
मोझेस! इतक्या घाईने तुझ्या लोकांपासून दूर इथे का निघून आलास?"
८४ त्याने सांगितले, "ते माझ्या मागोमाग येत आहेत आणि हे प्रभू! तुला
प्रसन्न करून घेण्यासाठी मी इतक्या घाईने इथे आलो आहे." ८५ पण
ईश्वराने त्याला सांगितले, "तुझ्या गैरहजेरीत मी तुझ्या लोकांची परीक्षा
घेतली. सामरीने त्यांना सन्मार्गापासून दूर नेले आहे."

८६ मोझेस संतप्त आणि अतिशय दुःखी होऊन आपल्या लोकांकडे
गेला. त्याने त्यांना विचारले, "लोकहो! मी तुमच्यापासून दूर जाऊन
फार दिवस झाले का? तुमच्या पालनकर्त्याने तुम्हाला भरघोस आश्वासन
दिले होते ना? मला दिलेले वचन मोडून तुम्हाला त्याचा क्रोध ओढवून
घ्यायचाय का?"

८७ त्याच्या लोकांनी उत्तर दिले, "आम्ही आमच्या मर्जीने तुला दिलेले
वचन मोडले नाही तर आम्हाला तसे करावे लागले. आम्ही लोकांच्या
दागिन्यांचे ओझे वाहून नेत असताना सामरीने सुचवल्याप्रमाणे आम्ही ते
अग्नीला अर्पण केले." ८८ यानंतर सामरीने त्यांच्यासाठी वासराची प्रतिमा
तयार केली. त्या प्रतिमेतून हळूवार हंबरण्याचा आवाज येत होता. त्याने
लोकांना सांगितले, "हे तुमचेही दैवत आहे आणि मोझेसचेही. पण त्याला
याचा विसर पडला आहे." ८९ पण ते वासरू आपल्याला काहीच प्रतिसाद
देत नाही, आपल्याला नुकसान पोहोचवण्याचे किंवा फायदा करून देण्याचे
सामर्थ्य या प्रतिमेत नाही, हे त्यांच्या लक्षात आले नाही का?

९० अहरोनने त्यांना अगोदरच सावध करून सांगितले होते. "लोकहो!
या वासराच्या प्रतिमेवरून तुमची फक्त परीक्षा घेतली जात आहे. तुमचा
पालनकर्ता असीम कृपाळू आहे. तेव्हा माझ्याच आज्ञेचे पालन करा.
माझ्याच मार्गाचे अनुसरण करा." ९१ यावर त्यांनी उत्तर दिले, "मोझेस
येईपर्यंत आम्ही या वासराची उपासना करायचे थांबणार नाही."

९२ मोझेसने अहरोनला विचारले, "लोक भलत्या मार्गाला लागल्याचे
पाहूनही तू त्यांना का रोखले नाहीस? ९३ कोणत्या गोष्टीने तुला माझे
अनुसरण करण्यापासून परावृत्त केले? तू माझी अवज्ञा का केलीस?"
९४ अहरोन त्याच्यासमोर गयावया करू लागला, "हे बंधू! माझी दाढी व
माझ्या डोक्याचे केस धरून (मला जाब विचारू नकोस). मला या भयाने
घेरले होते की तू म्हणशील, तू माझ्या बोलण्याची दखल घेतली नाहीस.
इस्त्राएलच्या संततीत मतभेद होऊ दिलेस."

९५ यानंतर मोझेसने सामरीला विचारले, "तू हे काय केलेस, सामरी?"
९६ सामरीने उत्तर दिले, "लोकांना ज्याचे आकलन झाले नाही ते मला
कळले होते. म्हणून मी प्रेषिताच्या पाऊलखुणांवरची मूठभर माती घेतली
आणि ती त्या वासरावर फेकली. माझ्या अंतरात्म्याने मला तशी प्रेरणा
दिली होती." ९७ मोझेसने त्याला फर्मावले, "चालता हो इथून! मला
कोणी स्पर्श करू नका असे म्हणत तू आयुष्यभर वणवण करशील, हा
तुला शाप आहे. तसेच (मृत्युनंतरच्या जीवनात) तुझ्याबाबतीत आणखी
एका शिक्षेचे वचन आहे, त्यापासून तुझी कदापि सुटका होणार नाही.
ज्या दैवताची मनोभावे उपासना करत होतास त्याची मी काय अवस्था
करतो बघ. त्याला जाळून टाकून त्याची राख समुद्रात फेकून देतो.
९८ लोकहो! ईश्वर हा तुमचा एकमेव उपास्य! त्याच्याशिवाय दुसरे कुणीही
उपासनेयोग्य नाही. त्याला सगळ्या चराचराचे ज्ञान आहे."

९९ अशा प्रकारे आम्ही तुम्हाला गतकालीन घटनांचा वृत्तांत
ऐकवला आणि हा कुरआनरूपी उपदेशसंग्रह तुम्हाला दिला.
१०० त्याकडे पाठ फिरवणाऱ्याला निवाड्याच्या दिवशी अतोनात ओझे
वागवावे लागेल. १०१ त्यांना कायमसाठी हे ओझे वागवावे लागेल.
निवाड्याच्या दिवशी हे ओझे भेसूर रूप धारण करेल, त्यांच्या

दुःखाचे कारण बनेल. १०२ ज्या दिवशी शिंग फुंकले जाईल त्या दिवशी आम्ही सगळ्या पाप्यांना एकत्र करू. त्या दिवशी त्यांचे डोळे भीतीने पांढरेफटक पडतील. १०३ दबक्या आवाजात एकमेकांना म्हणतील, "तुम्ही पृथ्वीवर फक्त आठ-दहा दिवस राहिलात." १०४ ते एकमेकांशी काय बोलतील हे आम्ही चांगलेच ओळखून आहोत. त्यांच्यापैकी सगळ्यात चांगले आकलन असणारा म्हणेल, "तुम्ही पृथ्वीवर फक्त एकच दिवस राहिलात."

१०५ ते तुम्हाला पर्वतांविषयी विचारतात की पुनरुत्थानाच्या दिवशी त्यांचे काय होणार. त्यांना सांगा माझा पालनकर्ता पर्वतांना धुळीस मिळवून टाकेल. १०६ ही पृथ्वी सपाट, उजाड बनवून टाकेल. १०७ तिच्यावर उंच-सखलपणा अजिबात दिसणार नाही. १०८ त्या दिवशी सगळे हाक देणाऱ्याच्या हाकेला साद देतील. त्यांच्या प्रतिसादात कोणतेही वाकडेपण नसेल. कृपाळू पालनकर्त्यासमोर सगळे आवाज मंदावतील, फिके पडतील. पावलांच्या मंद आवाजाशिवाय दुसरे काही ऐकू येणार नाही.

१०९ त्या दिवशी कुणाचीही मध्यस्थी यशस्वी होणार नाही. अपवाद फक्त त्यांचा असेल ज्यांना कृपाळू ईश्वराची अनुमती मिळाली आहे आणि तो त्यांच्या बोलण्याची दखल घेतो. ११० तो प्रत्येकाच्या आगेमागे (खुल्या व छुप्या) असलेल्या गोष्टी जाणतो. पण आपल्या (अल्प) ज्ञानाने ते त्या गोष्टी पूर्णतः समजू शकत नाहीत. १११ निवाड्याच्या दिवशी सगळे त्या सचेतन, स्वयंपूर्ण ईश्वरासमोर विनम्र होतील. आपल्या दुष्कृत्यांचे ओझे वागवणारे त्या दिवशी व्यथित होतील. ११२ पण ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणाऱ्याला त्या दिवशी ना कसल्या अपायाची भीती असेल, ना अन्यायाची.

११३ अशा रीतीने आम्ही हे कुरआन अरेबिक भाषेत पाठवून त्यातून

सगळ्या प्रकारच्या सूचना दिल्या आहेत. त्यातील ज्ञान आत्मसात करून लोकांनी ईश्वराची भीती बाळगावी किंवा त्याच्या उपदेशाची दखल घ्यावी. ११४ ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे, विश्वाचा खरा अधिपती आहे. कुरआनचे अवतरण पूर्ण होईपर्यंत संयम सोडू नका आणि ईश्वराची प्रार्थना करा, "हे प्रभू! माझे ज्ञान वाढव."

११५ तुमच्यापूर्वी आम्ही आदमबरोबर एक करार केला होता, पण त्याला त्याचा विसर पडला. आम्हाला त्याच्याकडे मनाचा खंबीरपणा आढळला नाही. ११६ आम्ही जेव्हा आमच्या दूतांना सांगितले, "आदमसमोर नतमस्तक व्हा," तेव्हा सैतान सोडून बाकी सगळे त्याच्यासमोर नतमस्तक झाले. ११७ आम्ही आदमला सावध केले, "आदम! हा सैतान तुझा आणि तुझ्या पत्नीचा शत्रू आहे. त्याला तुम्हाला या स्वर्गातून बाहेर काढू देऊ नका आणि स्वतःला दुःखी करून घेऊ नका."

११८ इथे तुम्ही उपाशी राहणार नाही की तुम्ही नग्नावस्थेत राहणार नाही. ११९ तहान लागणार नाही की सूर्याची उष्णता जाणवणार नाही." १२० पण सैतानाने दुष्ट बातमी त्याच्या कानात सांगितली, "आदम! मी तुला अमरत्वाच्या झाडाकडे आणि कधीही नाश न पावणाऱ्या साम्राज्याकडे घेऊन जाऊ?" १२१ सैतानाच्या प्रेरणेने त्या झाडाजवळ जाऊन त्यांनी (आदम व हव्वा यांनी) त्याची फळे खाल्ली. त्याबरोबर त्यांना आपल्या नग्नतेची जाणीव झाली. स्वर्गातील झाडांची पाने घेऊन त्यांनी ते आपली शरीरे झाकू लागले. आदमकडून झालेली ही चूक होती. त्याने आपल्या पालनकर्त्याची अवज्ञा केली होती. १२२ पुढे ईश्वराने त्याच्या पश्चातापाचा स्वीकार केला, त्याला आपल्या कृपेचा आशीर्वाद दिला आणि त्याला मार्गदर्शन दिले.

१२३ ईश्वराने त्याला सांगितले, "तुम्ही दोघेही इथून खाली, पृथ्वीवर एकमेकांचे शत्रू बनून रहाल." तिथे माझ्याकडून तुमच्यासाठी

मार्गदर्शन पाठवले जाईल. जो कुणी माझ्या मार्गदर्शनाचे अनुसरण करेल, तो सन्मार्गापासून ढळणार नाही, त्याच्या वाट्याला दुःख येणार नाही. १२४ पण माझ्या उपदेशाकडे दुर्लक्ष करणाऱ्याला हलाखीचे जीवन जगावे लागेल. निवाड्याच्या दिवशी त्याची दृष्टी हिरावून घेतली जाईल. १२५ ते ईश्वराकडे विचारणा करतील, "हे पालनकर्त्या! माझ्याकडे आधी दृष्टी होती. ती तू हिरावून का घेतलीस?" १२६ ईश्वर सांगेल, "तुमच्याकडे आलेल्या माझ्या संकेतांकडे जसे दुर्लक्ष केलेत, तसेच दुर्लक्ष निवाड्याच्या दिवशी तुमच्याकडे केले जाईल." १२७ अशा प्रकारे आपल्या पालनकर्त्याच्या संदेशांवर विश्वास न ठेवणाऱ्यांना आम्ही तसेच प्रतिफळ देऊ. पण मृत्युनंतरच्या आयुष्यात त्यांना याहून भयंकर शिक्षा मिळेल आणि त्यांचे हे दुःख चिरकालीन असेल.

१२८ ते ज्या वाड्या-वस्त्यांमधून फिरतात, तिथल्या कित्येक पिढ्यांचा आम्ही सर्वनाश केल्याचे पाहूनही त्यापासून ते काहीच धडा घेत नाहीत का? सुज्ञ माणसांसाठी यात नक्कीच संकेत आहेत. १२९ तुमच्या पालनकर्त्याने त्यांना दिलेल्या सवडीचा कालावधी निश्चित केला नसता आणि हा कालावधी पूर्ण करायचा शब्द दिला नसता तर अटळपणे त्यांना तात्काळ शिक्षेला सामोरे जावे लागले असते. १३० तेव्हा ते काहीही बोलले तरी तुम्ही संयमाने रहा आणि दिवसा, रात्री, मध्यान्ह रात्री, तसेच सूर्योदयापूर्वी आणि सूर्यास्तापूर्वी ईश्वराच्या महतीचे गुणगान करून त्याला स्तुतीचे शब्दसुमन अर्पित करा. याने तुम्हाला दिलासा मिळेल, आत्मशांती मिळेल.

१३१ त्यांच्यापैकी काहींना आम्ही ऐहिक जगातले अनेक लाभ दिले आहेत. पण त्याकडे तुम्ही असूयेने पाहू नका. या गोष्टी त्यांना फक्त परीक्षा घेण्यासाठी दिल्या आहेत. तुमच्या पालनकर्त्याकडे

असलेल्या गोष्टी याहून चांगल्या आणि याहून शाश्वत आहेत. १३२ तुमच्या लोकांना ईशप्रार्थना करायला आणि सातत्याने त्याच्या उपदेशाचे पालन करायला आग्रहपूर्वक सांगा. आम्हाला तुमच्याकडून काहीही नको, तर आम्हीच तुम्हाला सगळ्या गोष्टी पुरवतो. सदाचाराने वागण्याला सर्वोत्कृष्ट फळ मिळते.

१३३ ते विचारतील, "या प्रेषिताने त्याच्या प्रभूकडून त्याच्या अस्तित्वाची एखादी खूण आमच्यासाठी का नाही आणली?" पूर्वीच्या ग्रंथातून दिलेला पुरावा त्यांना पुरेसा वाटत नाही का? १३४ यापूर्वी शिक्षा देऊन आम्ही त्यांचा सर्वनाश केला असता तर त्यांनी नक्कीच विचारले असते, "हे प्रभू! आमची मानहानी आणि नाचक्की होण्यापूर्वी प्रेषिताला आमच्याकडे का पाठवले नाहीस? तसे केले असतेस तर यापूर्वीच आम्हाला तुझ्या आज्ञेनुसार वागता आले असते." १३५ त्यांना सांगा, "प्रत्येकजण निवाड्याच्या दिवसाची वाट पहात आहे. तुमची इच्छा असेल तर तुम्हीही ती पहा. कुणी सन्मार्गाचा अवलंब केला आहे आणि कुणाला ईश्वराचे मार्गदर्शन लाभले आहे हे तुम्हाला लवकरच कळेल."

प्रकरण २१ : प्रेषित
(अल्-अंबिया)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ मानवजातीच्या हिशेबाचा दिवस जवळ येत चालला आहे, तरीही त्याची दखल न घेता मानवाने त्याकडे पाठ फिरवली आहे. २ त्यांच्या अधिपतीकडून त्यांच्याकडे जेव्हाही एखादी नवी आज्ञा येते, तेव्हा तो ती लक्षपूर्वक ऐकतो, पण गांभीर्याने घेत नाही. ३ त्यांची मने सत्याच्या

मार्गावरून विचलित झाली आणि विसराळू झाली. हे अपराधी एकत्र आल्यावर एकमेकांना विचारतात, "हा प्रेषित तुमच्या-आमच्यासारखा मर्त्य माणूसच आहे ना? उघड्या डोळ्यांनी पाहूनही तुम्ही त्याच्या जादूला फशी पडणार का?" ४ त्यांना सांगा, "आकाशात आणि पृथ्वीवर बोलला जाणारा प्रत्येक शब्द माझ्या अधिपतीला कळतो. तो सगळे काही पाहणारा, सगळे ऐकणारा आहे."

५ काहीजण म्हणतात, "ही त्याची अंधुक स्वप्ने आहेत." इतर काही म्हणतात, "ती त्याने स्वतःच रचली आहेत." तर अन्य काही म्हणतात, "तो एक कवी आहे. पूर्वीच्या प्रेषितांप्रमाणे यानेही आमच्याकडे ईश्वराचा संकेत आणावा." ६ त्यांच्यापूर्वी जे जे समाज आम्ही नष्ट केले, त्यापैकी एकाही समाजाने आमच्यावर विश्वास ठेवला नव्हता. हे तरी विश्वास ठेवतील?

७ तुमच्याआधी त्यांच्याकडे पाठवलेले पैगंबरही मर्त्य मानवच होते, ज्यांच्यावर आम्ही आमचे साक्षात्कार अवतरीत केले होते. तुम्हाला हे माहीत नसेल तर आधीच्या ग्रंथधारकांना विचारा. ८ ज्याला अन्नपाण्याची गरज नाही आणि जो अमर आहे असा प्रेषित आम्ही त्यांना दिला नव्हता. ९ यानंतर आम्ही प्रेषितांना आणि आम्हाला संतुष्ट करणाऱ्या त्यांच्या सहकाऱ्यांना वाचवून आमच्या वचनाची पूर्तता केली आणि सगळ्या मर्यादा ओलांडणाऱ्यांचा नाश केला.

१० आम्ही तुमच्यासमोर प्रकट केलेला ग्रंथ म्हणजे तुम्हाला दिलेली ताकीद आहे. तरीही तो समजावून घेणार नाही का? ११ त्यांच्यापूर्वी कित्येक अपराधी समाज आम्ही उध्वस्त केले आणि त्यांच्या जागी नवीन लोकांना आणले. १२ आमची शिक्षा त्यांच्यावर कोसळू लागताच ते त्यापासून पळ काढायचा प्रयत्न करू लागले. १३ यावर त्यांना सांगितले

गेले, "पळून जाऊ नका, तर जिथे तुम्ही सुखात, आरामात, अत्यानंदाने रहात होता, त्या आपापल्या घरामध्ये परत या, म्हणजे तुम्हाला तुमच्या कर्माचा जाब विचारता येईल." १४ उत्तरादाखल ते म्हणाले, "आमचा सर्वनाश झालाय! आम्ही खरोखर पापी होतो." १५ अशाप्रकारे शेतात कापून टाकलेल्या, बेचिराख झालेल्या पिकासारखी अवस्था होईपर्यंत त्यांनी आपला आक्रोश सुरू ठेवला.

१६ आकाश, पृथ्वी आणि त्यांच्या दरम्यानच्या सगळ्या गोष्टी आम्ही फक्त खेळ म्हणून निर्माण केल्या नाहीत. १७ फक्त रिकामपणाचा उद्योग म्हणून आम्हाला काही करायचे असते आणि आमची इच्छा झाली असती, तर आमच्याकडे जे काही आहे त्यातूनच आम्ही काहीतरी निर्माण केले असते. १८ आम्ही असत्यावर सत्याचा मारा करू म्हणजे असत्य चिरडले जाऊन अस्तंगत होईल. तुम्ही जे काही लबाड बोलता त्यासाठी तुमचा धिक्कार असो.

१९ आकाश आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे त्याच्याच अधिपत्याखाली आहे. त्याच्या सान्निध्यात राहणारे त्याची उपासना करण्यात अहंकार दाखवत नाहीत की त्यामुळे कष्टी होत नाहीत. २० न थकता अहोरात्र ते त्याची स्तुती करतात.

२१ या पृथ्वीतलावर त्यांनी अश्यांना उपास्य मानले आहे का, जे मृतात्म्यांना जिवंत करू शकतात? २२ आकाश आणि पृथ्वीवर ईश्वराशिवाय अन्य दैवते असती तर ही पृथ्वी कधीच नष्ट झाली असती. ज्याला ते ईश्वराचा दर्जा देतात, तो या विश्वाचा अधिपती असलेला ईश्वर त्यांच्यापेक्षा कितीतरी श्रेष्ठ आहे. २३ ईश्वर प्रत्येकाला त्याच्या कर्माचा जाब विचारू शकतो, पण ईश्वराला तुम्ही जाब विचारू शकत नाही.

२४ ईश्वराव्यतिरिक्त अन्य कुणाला ते दैवत मानतात का? तसे असेल

तर त्यांना सांगा, "त्याचा पुरावा द्या. माझ्याबरोबर असणाऱ्यांसाठी आणि माझ्या आधी होऊन गेलेल्यांसाठी हा ईश्वराचा उपदेश आहे." पण त्यांच्यापैकी बहुतेकांना सत्य माहीत नाही, त्यामुळे त्यांनी त्याकडे पाठ फिरवली आहे. २५ तुमच्यापूर्वीच्या सगळ्या प्रेषितांना आम्ही या साक्षात्कारासह पाठवले होते, "माझ्याशिवाय अन्य कुणी दैवत नाही. तेव्हा फक्त माझीच उपासना करा."

२६ ते म्हणतात, "कृपाळू ईश्वराने (देवदूतांना) पुत्र मानले आहे!" ईश्वराचा महिमा अगाध आहे. ते देवदूत आदरास पात्र असलेले कृपावंताचे सेवक आहेत. २७ तो बोलण्याआधी ते (स्वत:हून) बोलत नाहीत आणि ते अगदी तेच करतात ज्याची तो त्यांना आज्ञा करतो. २८ त्यांचा भूतकाळ, भविष्यकाळ तो जाणतो. त्याच्या परवानगीशिवाय ते त्यात हस्तक्षेप करू शकत नाहीत. खरोखर ते त्याच्यासमोर आदराने दबकून उभे राहतात. २९ "ईश्वराव्यतिरिक्त मीच दैवत आहे" असे म्हणणाऱ्याची रवानगी नरकात केली जाईल. अपराध्यांना आम्ही असाच मोबदला देतो.

३० आकाश आणि पृथ्वी सुरवातीला एकमेकांशी घट्ट गोळ्यासारखे जोडलेले होते. आम्हीच त्यांचे विभाजन केले. आम्हीच पाण्यापासून सगळ्या सजीवांना निर्माण केले. सत्य नाकारणाऱ्यांना हे कळत नाही का? तरीही ते त्यावर विश्वास ठेवणार नाहीत का?

३१ पृथ्वी स्थिर रहावी म्हणून आम्ही तिच्यावर दृढ पर्वत उभे केले आणि लोकांना त्यांचे मार्ग मिळावेत म्हणून मोकळ्या जागा ठेवल्या. ३२ आम्ही त्यांच्या डोक्यावर आकाशरूपी सुरक्षित छत घातले. एवढे करूनही त्यांनी आमच्या संकेतांकडे पाठ फिरवली आहे. ३३ दिवस, रात्र, चंद्र आणि सूर्य यांना निर्माण करणारा ईश्वरच आहे. यापैकी प्रत्येकजण आपापल्या कक्षेत भ्रमण करतो.

३४ आम्ही तुमच्या आधीच्या कुठल्याही मानवाला चिरंतन आयुष्य
दिलेले नाही. हे मोहम्मद! तुलाच जर मृत्यू येणार असेल तर इतरांना
चिरंतन आयुष्य मिळणार आहे का? ३५ प्रत्येक सजीवाला मृत्यूची चव
चाखावीच लागेल. तुमची पारख करण्यासाठी आम्ही तुम्हाला चांगल्या-
वाईट सगळ्या परिस्थितींचा अनुभव देतो. तुम्हा सगळ्यांना आमच्याकडेच
परतायचे आहे.

३६ सत्य नाकारणारे तुम्हाला पाहून थट्टा उडवतात आणि म्हणतात,
"आपल्याला आपल्या दैवतांविषयी सांगणारा हाच आहे नाही का?"
तरीही ते कृपाळू ईश्वराची दखल घ्यायलाच नकार देतात.

३७ माणूस हा अधीर स्वभावाचा प्राणी आहे. मी माझे संकेत लवकरच
दाखवेन, पण त्याबाबतीत तुम्ही मला घाई करण्याची विनंती करू नका.
३८ ते तुम्हाला विचारतील, "तुमचे बोलणे खरे असेल तर ईश्वराने दिलेल्या
वचनाची पूर्तता कधी होईल?" ३९ सत्य नाकारणाऱ्यांना ती वेळ कळली
तरीही ते चहूबाजूने वेढलेल्या आगीपासून सुटका करून घेऊ शकणार
नाहीत. त्यांना कुणाचीही मदत मिळणार नाही. ४० खरोखर, अचानकपणे
त्यांच्यावर शिक्षा कोसळेल आणि त्यांना गिळून टाकेल. ना ते त्याचा
प्रतिकार करू शकतील, ना त्यांना तशी सवड दिली जाईल. ४१ तुमच्या
आधीच्या प्रेषितांची त्यांनी अशीच थट्टा उडवली होती, पण त्यांनी
ज्याची थट्टा उडवली, त्याच गोष्टीने त्यांचा घास घेतला.

४२ त्यांना विचारा, "असीम कृपाळू ईश्वराच्या कोपापासून रात्रंदिवस
कोण तुमचा बचाव करेल?" तरीही ते त्यांच्या अधिपतीचे स्मरण
करण्याकडे दुर्लक्ष करतात. ४३ आमच्या कोपाविरुद्ध त्यांचा बचाव
करणारी इतर दैवते त्यांच्याकडे आहेत का? ही दैवते ना स्वतःला मदत
करू शकतात, ना आमच्या कोपापासून स्वतःचा बचाव करू शकतात.

४४ तरीही त्यांच्या वाडवडिलांना आम्ही जीवनातल्या उत्तमोत्तम वस्तू
दीर्घकाळपर्यंत दिल्या. पण आता आम्ही त्यांच्या सीमांचा संकोच करत
आहोत हे त्यांना दिसत नाही का? तरीही ते प्रबळ ठरतील असे त्यांना
वाटते का?

४५ त्यांना सांगा, या साक्षात्काराद्वारे मी तुम्हाला फक्त धोक्याचा
इशारा देत आहे. पण असा इशारा मिळाला तरी कर्णबधीरांना काहीही ऐकू
येणार नाही. ४६ तरीही त्यांच्या अधिपतीच्या शिक्षेची झुळूक जरी लागली
तरी ते म्हणतील, "आमचा धिक्कार असो! आम्ही खरोखर अपराध केला
आहे."

४७ पुनर्निर्माणाच्या दिवशी आम्ही न्यायाचा तराजू स्थापित करू, म्हणजे
कुणावर तीळमात्रही अन्याय होणार नाही. अगदी मोहरीच्या दाण्याएवढे
लहानसे कृत्यही त्यात जोखले जाईल. प्रत्येकाचा हिशेब करायला आम्ही
समर्थ आहोत.

४८ मोझेस आणि अहरोनला आम्ही सदाचारी लोकांना ईश्वराचा
उपदेश व सत्याचा प्रकाश देणारी, चांगले आणि वाईट यांचा निवाडा
करणारी कसोटी देऊ केली. (म्हणजे तोराह हे ग्रंथ पाठवले.) ४९ अदृश्य
ईश्वराचे भय बाळगणारे निवाड्याच्या दिवसालाही घाबरून राहतात.
५० आमच्या कृपेने समृद्ध झालेले हे उपदेशग्रंथ आम्ही तुमच्यावर प्रकट
केले आहे. तरीही तुम्ही ते अव्हेरणार का?

५१ याआधी आम्ही अब्राहामला आमच्या मार्गदर्शनाचा लाभ दिला
होता. आम्ही त्याला चांगले ओळखतो. ५२ त्याने जेव्हा आपल्या
वडिलांना आणि आपल्या समाजबांधवांना विचारले, "तुम्ही ज्यांची
उपासना करता, त्या मूर्ती कुणाच्या आहेत?" ५३ तेव्हा त्यांनी उत्तर दिले,
"आमच्या वाडवडिलांना आम्ही याच मूर्तींची उपासना करताना पाहिले

आहे.” ५४ यावर अब्राहामने सांगितले, “खरोखर तुमची आणि तुमच्या
वाडवडिलांची उघड दिशाभूल झालेली आहे.”
५५ त्यांनी विचारले, “तू आम्हाला सत्य सांगतो आहेस, की आमची
थट्टा करतो आहेस?” ५६ अब्राहामने उत्तर दिले, “तुमचा पालनकर्ता
हा आकाश आणि पृथ्वीचाही अधिपती आहे. त्यानेच त्यांची निर्मिती
केली आहे. मी याचा साक्षीदार आहे.” ५७ मनातल्या मनात तो म्हणाला,
“ईश्वराची शपथ! मी तुमच्या या दैवतांविरुद्ध योजना आखली आहे.
तुम्ही इथून दूर गेलात की मी त्याची अंमलबजावणी करणार आहे.”
५८ त्यांनी परत येऊन विचारणा करावी यासाठी त्याने सगळ्यात मोठी
असलेली एक मूर्ती शाबूत ठेवून अन्य मूर्तींचे तुकडे करून टाकले.
५९ हे पाहून तिथे आलेले लोक एकमेकांना विचारू लागले, “आमच्या
दैवतांची ही दुर्दशा कुणी केली? तो नक्कीच पापी असणार!” ६० काहीजण
म्हणाले, “अब्राहाम नावाच्या एका तरुणाला आम्ही या दैवतांविषयी
बोलताना ऐकले आहे.” ६१ लगेच इतरांनी मागणी केली, “त्याला इथे
सगळ्यांसमोर बोलावून घ्या, म्हणजे तुम्हाला त्याच्याविरुद्ध साक्ष देता
येईल.” ६२ अब्राहामला बोलावून घेऊन त्यांनी विचारले, “अब्राहाम!
आमच्या दैवतांची अशी अवस्था तूच केलीस का?” ६३ त्याने उत्तर दिले,
“या सगळ्यात मोठ्या मूर्तीने त्यांची अशी अवस्था केली असेल. तिला
बोलता येत असेल तर विचारा तिला.”
६४ यावर ते एकमेकांना म्हणू लागले, “नक्कीच आपलेच काहीतरी चुकते
आहे.” ६५ नंतर अब्राहामसमोर मान झुकवून ते म्हणाले, “अब्राहाम! तुला
माहीत आहे, मूर्त्या बोलत नसतात.” ६६ अब्राहामने त्यांना खडा सवाल
केला, “म्हणजे तुम्ही ईश्वराऐवजी अन्य कुणाची तरी उपासना करता तर,
जो ना तुमचा फायदा करू शकतो, ना तोटा. ६७ तुमचा आणि तुमच्या
त्या उपास्यांचा धिक्कार असो. आताही तुम्हाला हे कळणार नाही का?”

६८ ते म्हणाले, "आपल्याला याच्याविरुद्ध कारवाई करायचीच
असेल तर याला जाळून टाकू आणि आपल्या दैवतांना सहाय्य करू."
६९ पण आम्ही अग्नीला आज्ञा दिली, "तुझ्या उष्णतेचा त्याग कर आणि
अब्राहामची रक्षा कर." ७० त्यांनी अब्राहामला इजा पोहोचवण्याचा प्रयत्न
केला, पण आम्ही त्यांचा कट उधळून लावला.

७१ अब्राहामचे आणि लूतचे रक्षण करून त्यांना आम्ही अशा भूप्रदेशात
आणले, जो आम्ही कृपाशीर्वादाने सगळ्यांसाठी समृद्ध बनवला होता.
७२ आमचे वरदान म्हणून अब्राहामला पुत्र इसहाक आणि नंतर नातवाच्या
रूपाने याकोब यांची भेट दिली आणि त्यांना सदाचारी बनवले. ७३ आम्ही
त्यांना जननायक बनवले. आमच्या आज्ञेनुसार त्यांनी लोकांना मार्गदर्शन
दिले. या सद्पुरुषांना आम्ही सदाचाराचे, नियमित प्रार्थना आणि दानधर्म
करण्याचे आणि फक्त आमचीच उपासना करण्याचे साक्षात्कार दिले.

७४ लूतला आम्ही शहाणपणा आणि ज्ञान दिले आणि दुराचाऱ्यांच्या
भूमीतून त्याची सुटका केली. ते लोक खरोखर दुष्ट होते. ७५ तो सदाचारी
होता. त्याच्यावर आम्ही कृपेचे छत्र धरले.

७६ त्याच्याआधी नोहाने आमचा धावा केला होता आणि आम्ही
त्याची प्रार्थना ऐकली होती. एका मोठ्या संकटातून आम्ही त्याचे आणि
त्याच्या कुटुंबियांचे रक्षण केले होते. ७७ आमचे साक्षात्कार नाकारणाऱ्या
त्याच्या समाजबांधवांविरुद्ध आम्ही त्याला मदत केली. ते खरोखर दुष्ट
लोक होते. यासाठी आम्ही त्यांना जलसमाधी दिली.

७८ लोकांना दावीद आणि शलमोनची कथा सांगा. रात्रीच्या वेळेस
काहींच्या शेतात इतरांच्या मेंढ्या शिरून चरत होत्या. त्यावेळी या
दोघांनी योग्य निवाडा केला होता. आम्ही निवाड्याचे साक्षीदार आहोत.
७९ शलमोनला आम्ही त्या घटनेची योग्य समज दिली होती आणि

दोघांनाही शहाणपणा आणि ज्ञान दिले होते. दावीदबरोबर आम्ही पर्वतांना आणि पक्ष्यांनाही आमचे गुणगान करायला लावले होते. असे करण्याचे सामर्थ्य आमच्याकडे आहे. ८० युद्धात तुमचे रक्षण करण्यासाठी आम्ही दावीदला चिलखत बनवण्याची कला शिकवली होती. यासाठी तुम्ही धन्यवाद देणार का?

८१ वादळी वारे आम्ही शलमोनच्या स्वाधीन केले. त्याच्या आज्ञेने ते आम्ही समृद्ध केलेल्या भूप्रदेशावरून वाहू लागले. या सगळ्या गोष्टींचे ज्ञान फक्त आम्हालाच आहे. ८२ काही जिन्नही आम्ही त्याच्या स्वाधीन केले होते. त्याच्यासाठी ते समुद्रात बुड्या मारत असत आणि इतरही कामे करत असत. आम्ही त्यांच्यावर देखरेख ठेवून होतो.

८३ प्रेषित अय्यूबचेही स्मरण करा. त्याने आपल्या अधिपतीचा धावा करताना म्हटले होते, "माझ्यावर खूप मोठे संकट कोसळले आहे, पण तू सर्वाधिक दयाळू आहेस. मला या संकटातून तारशील." ८४ आम्ही त्याचा धावा ऐकला आणि त्याला संकटमुक्त केले. आमच्या कृपेचा लाभ म्हणून आणि उपासकांना उपदेश व्हावा म्हणून आम्ही त्याच्या कुटुंबियांना पूर्वपदावर आणले आणि त्यांची संख्या दुप्पट केली.

८५ इश्माएल, इदरीस आणि जुलकिफ्ल या प्रेषितांचे स्मरण करा. ते संयमी आणि खंबीर मनाचे होते. ८६ आम्ही त्यांच्यावर कृपादृष्टी ठेवली होती. ते सगळे सदाचारी होते.

८७ देवमाशाने ज्याला गिळले होते त्या यूनुसचे स्मरण करा. त्याच्यावर आमची काहीच सत्ता चालणार नाही असा विचार करून तो रागावून आमच्यापासून दूर निघून गेला होता. पण संकटाच्या काळोखात सापडल्यावर तो विलाप करू लागला, "तू एकमेव ईश्वर आहेस! तुझा महिमा असीम आहे! मी खरोखर चुकलो होतो." ८८ तेव्हा आम्ही त्याची

प्रार्थना ऐकली आणि त्याला दुःखमुक्त केले. खऱ्या श्रद्धावंतांना आम्ही असे संकटातून सोडवतो.

८९ जकरियाने आपल्या पालनकर्त्याची अशी प्रार्थना केली होती त्याचे स्मरण करा, "हे प्रभू! मला विनापत्य ठेवू नकोस! तू सर्वोत्कृष्ट वारसदार आहेस." ९० आम्ही त्याची प्रार्थना ऐकली आणि त्याच्या पत्नीला अपत्य-संभवासाठी सिद्ध केले. त्याला योहान (याह्या) रूपी पुत्राचा लाभ दिला. ते दोघे पती-पत्नी आमच्यासमोर नेहमी नम्रतेने वागत. (नम्रभावाने जीवन जगत होते.) सत्कर्मे करत आणि भीती व आशेने आमचा धावा करत.

९१ जिने आपले शील अबाधित ठेवले त्या मेरीचे स्मरण करा. ती शीलवान असल्याने आम्ही आमचे चैतन्य तिच्यात फुंकले आणि तिला व तिच्या पुत्राला संपूर्ण मानवजातीसाठी संकेत बनवले.

९२ संपूर्ण मानवजात हा एकच समाज आहे आणि मी तुमचा पालनकर्ता आहे, तेव्हा माझी उपासना करा. ९३ पण त्यांनी धर्माला वेगवेगळ्या पंथात विभागले. त्यांना सगळ्यांना माझ्याकडेच परतायचे आहे. ९४ जो श्रद्धावंत आहे आणि जो सत्कर्मे करतो त्याचे प्रयत्न आम्ही वाया जाऊ देणार नाही. आम्ही त्यांची नोंद ठेवू.

९५ जे समाज आम्ही नष्ट केले आहेत ते परत कधीही उदयास येणार नाहीत. ही त्यांची नियती आहे. ९६ पण जेव्हा याजूज व माजूज यांना मुक्त केले जाईल, तेव्हा ते प्रत्येक उंचवट्यावरून खाली घरंगळतील आणि (जमीन व सागरातील सगळे अडथळे दूर सारून) सगळीकडे पसरतील. ९७ ईश्वराने शब्द दिलेला निवाड्याचा दिवस उगवताच सत्य नाकारणाऱ्यांचे डोळे आश्चर्याने विस्फारित होतील. ते शोक करू लागतील, "आमचा धिक्कार असो! आम्ही या दिवसाची कधी दखलच घेतली नाही. आम्ही खरोखर अपराधी आहोत!"

९८ तुम्ही आणि ईश्वराव्यतिरिक्त ज्यांना तुम्ही उपास्य मानता ते सगळे
नरकाचे इंधन असाल; तुमचे नरकात जाणे अटळ आहे. ९९ ते खरोखर
उपास्य असते तर त्यांना नरकात आणले गेले नसते; पण तिथे त्यांना
कायम वास्तव्य करावे लागेल. १०० तिथे ते आक्रोश करत राहतील.
आक्रोशाशिवाय त्यांना काहीही ऐकू येणार नाही. १०१ पण ज्यांना आम्ही
भरघोस मोबदला देण्याचे वचन दिले आहे, त्यांना नरकापासून दूर ठेवले
जाईल. १०२ नरकातला किंचितसाही आक्रोश त्यांच्या कानी पडणार नाही.
ते सतत आनंदी अवस्थेत राहतील, इच्छित गोष्टी कायम त्यांच्या हाताशी
असतील. १०३ निवाड्याच्या दिवसाची महाभयंकर भीती त्यांच्या मनाला
स्पर्शू शकणार नाही. उलट आमचे दूत स्वागत करून त्यांना सांगतील,
"तुम्हाला ज्याचे वचन मिळाले होते, तो हा दिवस आहे. हा पूर्णपणे
तुमचा दिवस आहे."

१०४ निवाड्याच्या दिवशी एखादा लेखपट गुंडाळावा तशी आम्ही
आकाशाची गुंडाळी करून टाकू. निर्मितीच्या सुरुवातीला आम्ही जसा
शून्यातून आरंभ केला होता, त्याची पुनरावृत्ती करू. आमच्यावर
बंधनकारक असे हे एक वचन आहे आणि त्या वचनाची पूर्तता आम्ही
करणारच. १०५ (पैगंबर दावीदाला प्रदान केलेल्या) 'ज़बूर' या ग्रंथातही
मानवाला ताकीद देऊन आम्ही हे लिहून ठेवलेले आहे की, "माझे
सदाचारी सेवक पृथ्वीचे वारसदार असतील." १०६ सच्च्या उपासकांसाठी
यात नक्कीच एक संदेश आहे.

१०७ हे प्रेषिता! मानवजातीवर कृपा करण्यासाठी आम्ही तुझी पाठवणी
केली आहे. १०८ त्यांना विचारा, "मला असा साक्षात्कार झाला आहे
की तुमचा ईश्वर हाच एकमेव ईश्वर आहे. तर मग तुम्ही त्याला शरण
जाणार ना?" १०९ तुमच्या उपदेशाकडे त्यांनी दुर्लक्ष केले तर त्यांना

सांगा, "तुम्हाला ज्याविषयी ठामपणे सांगितले आहे तो अरिष्टकारक निवाड्याचा महाभयंकर दिवस जवळ येऊन ठेपला आहे की दूर आहे हे मला माहीत नाही. [११०] तुम्ही जे उघडउघड बोलता ते ईश्वर जाणतो आणि जे लपवून ठेवता तेही जाणतो. [१११] निवाड्याचा दिवस लांबणीवर पडणे ही तुमची कसोटी आहे की तुम्हाला दिलेली उसंत, तेही मला माहीत नाही." [११२] त्यांना सांगा, "माझा पालनकर्ता सत्याचा निवाडा करतो. तो कृपाळू आहे. तुम्ही त्याच्याविरुद्ध जे बोलता त्यासाठी आम्ही त्याच्या मदतीची याचना करतो."

प्रकरण २२ : हजयात्रा
(अल्-हज)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] लोकहो! तुमच्या पालनकर्त्याचे भय बाळगा. निवाड्याच्या दिवसाचे संकट खरोखर महाभयानक असेल. [२] तो दिवस येताच बाळाला पाजणारी प्रत्येक माता आपल्या बाळाला विसरून जाईल, प्रत्येक गर्भार स्त्रीचा गर्भपात होईल आणि मादक पदार्थांचे सेवन न केलेले लोकही नशेत असल्याप्रमाणे दिसू लागतील. ईश्वराची शिक्षा खरोखर तीव्र असेल. [३] तरीही लोक ज्ञानाच्या अभावामुळे ईश्वरावरून वाद घालतात आणि प्रत्येक विद्रोही सैतानाचे अनुसरण करतात. [४] त्याच्याशी मैत्री करणाऱ्याला तो गैरमार्गाला लावेल आणि नरकाग्नीच्या शिक्षेकडे घेऊन जाईल. त्याची ही नियती अटळ आहे.

[५] लोकहो! पुनर्निर्माणाविषयी तुम्हाला काही शंका असेल तर आठवा, आम्ही प्रथम तुम्हाला मातीतून निर्माण केले. नंतर वीर्याच्या थेंबापासून,

नंतर रक्ताच्या गुठळीपासून, नंतर मांसाच्या गोळ्यापासून निर्माण केले. ज्याला काहीअंशी आकार होता तर काहीअंशी आकारहीन होता. याचे स्मरण केल्यावर तुम्हाला आमच्या सामर्थ्याचा प्रत्यय येईल. आमच्या इच्छेला येईल त्याला आम्ही ठराविक काळासाठी मातेच्या गर्भाशयात राहू देतो आणि नंतर नवजात शिशूच्या रूपात या जगात आणतो. आम्ही तुम्हाला पूर्ण वाढीस लावून प्रौढ अवस्थेत नवसामर्थ्यानिशी पोहोचवितो. पुढे काहींचा अकाली मृत्यू होतो तर काही अतिवृद्ध होईपर्यंत जगतात. या अवस्थेत त्यांची स्मरणशक्ती नष्ट होते. ठराविक वेळी पृथ्वी तुम्हाला मृतवत्, उजाड झालेली दिसते. पण आम्ही पाऊस पाडताच ती सजीव होते, फुलून येते आणि हरतऱ्हेची नयनरम्य हिरवाई उधळू लागते. ६ याचे कारण म्हणजे ईश्वर सत्य आहे. जीवन आणि मृत्यू देणारा तोच आहे. कुठल्याही गोष्टीची इच्छा करण्याची शक्ती त्याच्याकडे आहे. ७ अंतिम घटिका येणारच यात काही शंका नाही. आपापल्या कबरीमध्ये असलेल्यांना ईश्वर जिवंत करून पुन्हा एकदा उभे करेल.

८ काहीजण असे आहेत जे कसलेही ज्ञान नसताना, कसलेही मार्गदर्शन नसताना, हाती कसलाही ज्ञानदायक ग्रंथ नसताना ईश्वराच्या अस्तित्वावरून वाद घालतात. ९ ते स्वतः उद्धटपणे ईश्वराकडे पाठ फिरवतात आणि इतरांनाही ईश्वरी मार्गापासून दूर घेऊन जातात. असे लोक ऐहिक जीवनात मानहानी ओढवून घेतील आणि निवाड्याच्या दिवशी नरकाग्नीच्या शिक्षेची चव चाखतील. १० ईश्वर त्यांना म्हणेल, "हा घ्या तुमच्या दुष्कृत्यांचा मोबदला. ईश्वर आपल्या सेवकांवर अन्याय होऊ देणार नाही."

११ काहीजण असे आहेत जे अंतःकरणापासून ईश्वराची उपासना करत नाहीत. काही चांगले वाट्याला आले तर ते ईश्वराला संतुष्ट होतात. पण

त्यांची सत्वपरीक्षा घेतली गेली तर पुन्हा आपल्या मूळ मार्गाकडे वळतात. या जगात आणि मृत्युनंतरच्या जगातही त्यांची हानी होते. हा सरळसरळ त्यांचा पराभव आहे.

१२ माणूस ईश्वराशिवाय असा कुणाचा तरी धावा करतो, जो त्याचा काही ना फायदा करू शकतो, ना तोटा. हे खरोखर सन्मार्गापासून दूरवर भरकटणे झाले. १३ तो अशा कुणाचा धावा करतो, जो त्याला मदत करण्याऐवजी त्याची हानी करतो. असा आश्रयदाता आणि असा सोबती खरोखर सैतान असतो. १४ ईश्वरावर विश्वास ठेवून सदाचाराने वागणाऱ्यांना ईश्वर प्रवाहित नद्या असणाऱ्या बगीच्यात दाखल करेल. ईश्वर त्याच्या मर्जीला येईल ते करतो.

१५ ईश्वर आपल्या प्रेषिताला या जगात आणि मृत्युपश्चात जगात मदत करणार नाही असे ज्याला वाटते त्याने आकाशाला टेकणारा एक दोर उभा करावा आणि नंतर तो कापून टाकावा आणि बघावे, त्याची ही युक्ती त्याच्या क्रोधाचे कारण दूर हटवू शकते का? १६ सत्याचा स्पष्ट पुरावा म्हणून आम्ही कुरआन पाठवले आहे आणि निश्चितच ईश्वराच्या मर्जीला येईल त्याला तो मार्गदर्शन करतो.

१७ निवाड्याच्या दिवशी ईश्वर श्रद्धावंत (म्हणजे मुस्लिम), ज्यू, साबी, ख्रिस्ती, मजूस (अग्निपूजक) व अनेकेश्वरवादी यांच्यातला निवाडा करेल. निःसंशय, तो प्रत्येक गोष्टीचा साक्षीदार आहे.

१८ आकाश आणि पृथ्वीवर असलेली प्रत्येक गोष्ट त्याचप्रमाणे सूर्य, चंद्र, तारे, पर्वत, वृक्ष, पशूपक्षी आणि असंख्य माणसे ईश्वरासमोर लीन होतात हे तुम्ही पहात नाही का? पण अनेकजण शिक्षा मिळण्याच्या योग्यतेचे झाले आहेत. ईश्वर ज्याची मानहानी करतो, त्याला कुणाकडूनही सन्मान मिळत नाही. निःसंशय, ईश्वर त्याच्या मर्जीला येईल ते करतो.

१९ (श्रद्धावंत आणि अश्रद्धावंत) हे दोन गट त्यांच्या पालनकर्त्यावरून
परस्परांशी झगडत आहेत. सत्य नाकारणाऱ्यांना (मृत्युपश्चात जीवनात)
अग्निवस्त्रे परिधान करावी लागतील. त्यांच्या मस्तकावर उकळते पाणी
ओतले जाईल. २० यामुळे त्यांच्या पोटातील अवयव आणि त्वचा वितळून
जाईल. २१ त्यांना लोखंडी हातोड्याने फटक्यांची शिक्षा दिली जाईल.
२२ जेव्हाही दुःखातून सुटका करून घेण्यासाठी ते नरकातून बाहेर पडू
पाहतील, तेव्हा त्यांना परत नरकात ढकलले जाईल आणि सांगितले
जाईल, "चाखा नरकाची शिक्षा!"

२३ ईश्वरावर विश्वास ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना ईश्वर वाहत्या नद्या
असणाऱ्या स्वर्गात प्रवेश देईल. तिथे त्यांना घालायला सोन्यामोत्याची
आभूषणे व ल्यायला रेशमी वस्त्रे दिली जातील. २४ कारण त्यांना शुद्ध
वाणीचे व असीम कृपाळू ईश्वराच्या मार्गाचे मार्गदर्शन लाभले होते.

२५ तर सत्य नाकारणारे, लोकांना ईश्वरी मार्गापासून व आम्ही सगळ्या
लोकांसाठी उभ्या केलेल्या पवित्र मशिदीत जाण्यापासून रोखणारे, जिथे
स्थानिक व अपरिचित एकसमान आहेत, भ्रष्ट आचरण करून त्याचे
पावित्र्य भंग करू पाहणारे, अशा सर्वांना आम्ही यातनामय शिक्षेची चव
चाखायला लावू.

२६ अब्राहामला आम्ही आमच्या पवित्र गृहाची जागा नेमून दिली
आणि सांगितले, "इतर कुणालाही माझा दर्जा देऊ नकोस. नेकीने
वागणाऱ्यांसाठी, नतमस्तक होऊन मला शरण येणाऱ्यांसाठी आणि पवित्र
काबागृहाभोवती प्रदक्षिणा घालणाऱ्यांसाठी आमचे निवासस्थान शुद्ध,
पवित्र ठेव."

२७ मानवजातीला तिथे हज यात्रेसाठी येण्याचे आमंत्रण द्या. ते
तुमच्याकडे पायी येतील किंवा दूरदूरच्या प्रदेशातून उंटावर स्वार होऊन

येतील. २८ पवित्र गृहात आल्यावर त्यांना हज यात्रेच्या फायद्याची अनुभूती येईल. त्यांच्याकडे असलेल्या प्राण्यासमोर निर्धारित दिवशी त्यांनी ईश्वराचे नाव घेऊन त्याचा बळी द्यावा. नंतर त्याचे मांस भक्षण करावे. गरजूंना, पीडितांनाही त्यातला वाटा द्यावा. २९ यानंतर हज यात्रींनी शुद्ध अंतःकरणाने नवस पूर्ण करावेत व प्राचीन प्रार्थनागृहाला प्रदक्षिणा घालावी.

३० ही ईश्वराची आज्ञा आहे. ईश्वराने ज्या गोष्टी पवित्र असल्याचे ठरवून दिले आहे, त्यांचा सन्मान करणारा त्याच्या पालनकर्त्याच्या नजरेतून चांगला माणूस ठरेल. ज्यांना स्पष्टपणे प्रतिबंध केला आहे असे प्राणी वगळता इतर सगळे प्राणी तुमच्यासाठी कायदेशीर आहेत. शिवाय मूर्तींची पूजा करण्यापासून आणि ईश्वराविरुद्ध खोट्या गोष्टी रचण्यापासून कटाक्षाने दूर रहा.

३१ ईश्वराला समर्पित व्हा. इतर कुणालाही त्याच्या बरोबरीचा दर्जा देऊ नका. इतरांना ईश्वरासमान मानणाऱ्यांची अवस्था आकाशातून कोसळलेल्या व्यक्तीसारखी आहे; ज्याला एकतर पक्षी हिसकावून नेतील किंवा वारा दूरवर वाहून नेईल.

३२ लक्षात ठेवा, ईश्वराने नेमून दिलेल्या संकेतांचा आदर करणारा त्याच्या मनात असलेली ईश्वरनिष्ठा प्रदर्शित करतो. ३३ तुम्ही निर्धारित काळासाठी प्राण्यांचा लाभ घेऊ शकता. त्यानंतर प्राचीन गृहाजवळ त्यांचे बलिदान दिलेच पाहिजे.

३४ प्रत्येक समाजासाठी आम्ही बलिदानाचा विधी ठरवून दिला आहे. त्यानुसार त्यांना देऊ केलेल्या प्राण्यावर त्यांनी ईश्वराचे नामोच्चार करावे. तुमचा ईश्वर एकमेव आहे. त्याला शरण जा आणि नम्रतेने वागणाऱ्यांना शुभवार्ता द्या. ३५ ईश्वराच्या नामोल्लेखाने ज्यांच्या मनात आदरयुक्त भीती निर्माण होते, प्रतिकूल परिस्थितीत जे धीराने राहतात, नियमितपणे प्रार्थना

करतात आणि आम्ही पुरवलेल्या संपत्तीतून दानधर्म करतात, त्यांना शुभवार्ता द्या.

[३६] बळीच्या उंटाला आम्ही तुमच्यासाठी ईश्वराचे प्रतिकांपैकी एक ठरविले आहे. यात तुमच्या हिताच्या अनेक गोष्टी आहेत. तेव्हा बळी देण्यासाठी रांगेत उभे केल्यावर त्यांच्यासमोर तुम्ही ईश्वराचे स्मरण करा. बळी दिल्यानंतर त्यांचे मांस भक्षण करा आणि गरजूंनाही खाऊ घाला; तशी मागणी करणाऱ्या गरजूंना आणि न करणाऱ्या गरजूंनाही. अशा रीतीने उंटांना आम्ही तुमच्या अधीन केले आहे. यासाठी तुम्ही कृतज्ञ रहा. [३७] उंटांचे रक्त आणि मांस ईश्वरापर्यंत पोहोचत नाही, तर तुमची ईश्वरनिष्ठा त्याच्यापर्यंत पोहोचते. ईश्वराकडून लाभलेल्या मार्गदर्शनासाठी तुम्ही त्याचे गुणगान करावे, म्हणून ईश्वराने त्यांना तुमच्या आधीन केले आहे. सत्कर्मे करणाऱ्यांना शुभवार्ता द्या.

[३८] ईश्वर निश्चितच श्रद्धावंतांचा बचाव करेल. दिलेला शब्द मोडणारे आणि कृतघ्न असणारे लोक ईश्वराला आवडत नाहीत. [३९] ज्यांच्यावर आक्रमण झाले आहे त्यांना लढायला परवानगी आहे. कारण त्यांच्यावर अन्याय झाला आहे. त्यांना मदत करायचे सामर्थ्य ईश्वराकडे नक्कीच आहे. [४०] हे असे लोक आहेत ज्यांना अन्यायाने घराबाहेर हुसकून लावले आहे. याचे कारण म्हणजे "ईश्वर आमचा पालनकर्ता आहे" हे त्यांचे प्रतिपादन. काहींचे आक्रमण ईश्वराने इतरांकरवी थोपवले नसते तर जिथे सतत ईश्वराचा नामोच्चार चालतो ते प्रार्थनागृह, चर्च, सिनेगॉग आणि मशिद निश्चितच उध्वस्त झाले असते. ईश्वरी कार्यात मदत करणाऱ्याला ईश्वर नक्कीच मदत करेल. ईश्वर खरोखर सर्वशक्तिमान, सामर्थ्यवान आहे.

[४१] हे असे लोक आहेत, ज्यांना आम्ही या भूमीत वसवले तर ते

नियमितपणे प्रार्थना करतील, दानधर्म करतील, चांगल्याचा आग्रह धरतील आणि वाईटाला प्रतिबंध करतील. सगळ्या गोष्टींचे अंतिम फलित ईश्वराच्या हाती आहे.

४२ हे प्रेषिता! विरोधकांनी तुमच्यावर विश्वास ठेवला नाही तर आठवा, त्यांच्यापूर्वी नोहाच्या समाजबांधवांनी, आद व समूदच्या जमातींनीही त्यांच्या प्रेषितांना असेच वागवले होते. ४३ अब्राहामच्या आणि लूतच्या समाजबांधवांनीही असेच केले होते. ४४ मदियनच्या रहिवाश्यांनीही प्रेषितांवर खोटारडेपणाचा आरोप केला होता. मोझेसही नाकारला गेला होता. सत्य नाकारणाऱ्यांना मी थोडीशी उसंत देतो, पण नंतर त्यांच्याभोवती संकटाचे पाश आवळतो. त्यांना मी दिलेली शिक्षा किती भयानक होती, विचार करा.

४५ पापकृत्यात दंग असलेली कित्येक शहरे आम्ही उध्वस्त केली. त्यातील कैक घरांची छपरे कोसळली, विहिरी कोरड्या पडल्या आणि उभे महाल जमीनदोस्त झाले. ४६ या गोष्टी कानांनी ऐकता याव्यात, मनाने जाणता याव्यात, म्हणून या लोकांनी सगळीकडे संचार केला नाही का? सत्य हेच आहे की त्यांचे डोळे आंधळे नाहीत, तर अंतरंगातले मनच आंधळे झाले आहे.

४७ हे लोक तुम्हाला शिक्षेची घाई करायला सांगतात, पण ईश्वर आपल्या वचनापासून कधीही माघार घेत नाही. तुमच्या गणतीतली हजार वर्षे म्हणजे ईश्वराचा एक दिवस आहे. ४८ कुकर्मे करणाऱ्या कित्येक शहरांना आम्ही थोडी सवड दिली आणि नंतर त्यांना फैलावर घेतले. प्रत्येक गोष्ट माझ्याकडेच परत येणार आहे.

४९ त्यांना सांगा, लोकहो! फक्त तुम्हाला सतर्कतेचा स्पष्ट इशारा देण्यासाठी मला पाठवण्यात आले आहे. ५० माझ्यावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे

करणाऱ्यांना माफ केले जाईल आणि त्यांना उपजीविकेची सन्माननीय साधने पुरवली जातील. ५१ याउलट आमच्या संकेतांविरुद्ध झगडणारे, त्यांचे हेतू पराभूत करू पाहणारे नरकाग्नीचे रहिवासी असतील.

५२ जेव्हाही आम्ही तुमच्याआधी निरोप्याला किंवा प्रेषिताला पाठवले आणि त्याने लोकांना आमचा उपदेश ऐकवला, तेव्हा सैतानाने त्यात हस्तक्षेप केला. पण ईश्वर सैतानाने आणलेले व्यत्यय हटवतो आणि आपले साक्षात्कार पुन्हा एकदा दृढपणे स्थापित करतो. तो सगळे जाणणारा आणि सर्वज्ञ आहे. ५३ ज्यांची मने दूषित किंवा कठोर झाली आहेत, अशांसाठी ईश्वर सैतानाच्या सूचनांना परीक्षेच्या कसोट्या बनवतो. असे अपराधी सन्मार्गापासून फार दूर भरकटलेले असतात. ५४ आणि म्हणूनच ज्यांना ज्ञान दिले आहे त्यांनी जाणावे, की हे त्यांच्या पालनकर्त्याकडून आलेले सत्य आहे आणि त्यावर विश्वास ठेवावा व विनम्रपणे मनःपूर्वक ईश्वराला शरण जावे. श्रद्धावंतांना ईश्वर नक्कीच सन्मार्गावर नेईल.

५५ अंतिम घटिका अचानकपणे समोर येईपर्यंत किंवा त्या भयानक दिवसाची शिक्षा कोसळेपर्यंत सत्य नाकारणारे त्यावर शंका घेतच राहतील. ५६ त्या दिवशी सगळे नियंत्रण ईश्वराच्या हातात असेल. तो त्यांचा निवाडा करेल. त्याच्यावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणारे आनंदाच्या बगीच्यामध्ये प्रवेश करतील. ५७ तर सत्य आणि आमचे संकेत नाकारणाऱ्यांना अपमानास्पद शिक्षा भोगावी लागेल.

५८ ईश्वरी कार्यासाठी घरादारांचा त्याग करणारे आणि नंतर ठार मारले गेलेले किंवा मरण पावलेले, या सर्वांना मृत्युपश्चात जीवनात ईश्वराकडून उत्तमोत्तम वस्तू मिळतील. तो सर्वोत्कृष्ट दाता आहे. ५९ तो त्यांना अशा ठिकाणी नेईल, जिथे ते खूप सुखात राहतील. ईश्वर सर्वज्ञ, संयमी आणि क्षमाशील आहे.

६० हे असेच असले पाहिजे: बदला घेणाऱ्याने त्याच्यावर झालेल्या
अन्यायाच्या प्रमाणातच बदला घ्यावा. (पण जर बदला घेताना) समोरच्या
पक्षावर अन्याय केला जात असेल तर ईश्वर निश्चितच त्याला साहाय्य
करेल. ईश्वर दयाशील आणि क्षमाशील आहे.
६१ ईश्वर दिवसामागून रात्र आणि रात्रीमागून दिवस आणतो. तो सर्व
ऐकणारा, सर्व पाहणारा आहे. ६२ याचे कारण म्हणजे ईश्वर सत्य आहे,
तर ईश्वराव्यतिरिक्त ज्यांचा धावा करतात ते निखालस खोटे आहे. निः
संशय, ईश्वर उदात्त आहे, महान आहे.
६३ ईश्वराने आकाशातून जलवर्षाव केल्यावर धरती हिरवीगार होते, हे
त्यांनी पाहिले नाही का? ईश्वर अथांग आहे, सर्वज्ञ आहे. ६४ आकाश
आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे त्याच्याच मालकीचे आहे. ईश्वर
स्वयंपूर्ण आहे, स्तुत्य आहे.
६५ ईश्वराने पृथ्वीवरची प्रत्येक गोष्ट तुमच्या अधीन केली आहे
हे तुमच्या लक्षात येत नाही का? त्याच्या आज्ञेनेच नौका सागरावर
तरंगतात. त्याने आकाशाला पृथ्वीवर कोसळण्यापासून रोखले आहे.
त्याच्या परवानगीनेच ते कोसळू शकते. मानवजातीसाठी ईश्वर अतिशय
प्रेमळ आणि अतिशय दयाळू आहे. ६६ तोच तुमचा जीवनदाता आहे.
तो तुम्हाला मृत्यू देईल आणि पुन्हा जीवित करेल. पण माणूस अतिशय
कृतघ्न आहे. यात काही शंका नाही.
६७ प्रत्येक जनसमूहासाठी आम्ही उपासनेच्या पद्धती ठरवून दिल्या
आहेत. तेव्हा लोकांनी यावरून तुमच्याबरोबर वाद घालू नये. हे प्रेषिता!
लोकांना तुमच्या पालनकर्त्याच्या मार्गावर येण्याची हाक द्या, कारण
निश्चितच तुम्हाला योग्य मार्गदर्शन लाभले आहे. ६८ ते तुमच्याशी वाद
घालू लागले तर त्यांना सांगा, "तुमच्या कर्माची ईश्वराला चांगली जाण

आहे.” [६९] पुनर्निर्माणाच्या दिवशी ईश्वर तुमच्या मतभेदांचे निराकरण करेल. [७०] ईश्वराला आकाश आणि पृथ्वीवरील सगळ्या गोष्टींचे ज्ञान आहे, तुम्हाला माहीत नाही का? हे सगळे एका पवित्र ग्रंथात नोंदवले आहे; ईश्वराला हे अगदी सहज शक्य आहे.

[७१] तरीही, ईश्वराऐवजी ते अशा कुणाची तरी उपासना करतात, ज्यांच्याविषयी त्याने कोणतेही प्रमाण पाठविलेले नाही आणि ज्याच्याविषयी त्यांना ज्ञान नाही. अशा अपराध्यांना कुणी मदतनीस मिळणार नाही. [७२] जेव्हाही आमचे सुस्पष्ट साक्षात्कार तुम्ही त्यांना ऐकवता, त्यांच्या चेहेऱ्यावर तुम्हाला तिटकारा दिसेल. हा तिटकारा इतका तीव्र असतो की आमचा संदेश ऐकवणाऱ्यावर त्यांना जणू हल्लाच चढवायचा असतो. त्यांना विचारा, “मी तुम्हाला याहून वाईट गोष्ट सांगू का? सत्य नाकारण्यावर ठाम असणाऱ्यांसाठी ईश्वराने वचन दिले आहे ते नरकाग्नीचे! किती ओंगळवाणे वस्तीस्थान आहे हे!”

[७३] लोकहो! ही एक दृष्टांत कथा आहे. ती काळजीपूर्वक ऐका. निःसंशय, ईश्वराऐवजी तुम्ही ज्यांचा धावा करता ते अगदी एक माशीही निर्माण करू शकत नाहीत. अगदी ते सगळे या कामासाठी एकत्र आले तरीही. आणि एका माशीने त्यांच्याकडून काही हिसकावून नेले तरी त्यांना ते परत मिळवता येत नाही. दोघेही किती दुबळे आहेत–ज्यांचा धावा केला जातो ते आणि जे धावा करतात ते. [७४] त्यांचे ईश्वराविषयीचे मत न्याय्य नाही. त्यांनी ईश्वराची खरी प्रतिष्ठा, त्याची खरी महानता ओळखलीच नाही. निश्चितच ईश्वर सामर्थ्यवान, ताकदवान आहे.

[७५] ईश्वर आपला दूत आणि माणूस या दोघांमधूनही त्याचे संदेश पाठवणारा निवडतो. तो सर्व ऐकणारा, सर्व पाहणारा आहे. [७६] ईश्वर त्यांच्यासमोर जे आहे आणि त्यांच्या पाठीमागे जे आहे ते सर्व तो जाणतो. सगळ्या गोष्टी त्याच्याकडेच परतणार आहेत.

[७७] तुमच्यापैकी जे सच्चे श्रद्धावंत आहेत, त्यांनी ईश्वरासमोर नतमस्तक व्हावे आणि त्याला शरण जावे. त्याच्या पालनकर्त्याची उपासना करावी आणि सत्कर्मे करावीत; यातच तुमचे यश सामावले आहे. [७८] ईश्वरी कार्यात प्रयत्नांची पराकाष्ठा पूर्ण निष्ठेने करा जशी ती पूर्ण निष्ठेने करायला हवी. त्याने तुमची निवड केली आहे आणि अब्राहाम या तुमच्या पूर्वजाच्या श्रद्धेविषयी, म्हणजेच तुमच्या धर्माविषयी तुमच्यावर काहीही ओझे लादलेले नाही. पूर्वीच्या ग्रंथासारखेच सध्याच्या ग्रंथातही त्याने तुम्हाला मुस्लिम हेच नाव दिले आहे. यामुळे ईश्वराचा प्रेषित तुमचा साक्षीदार राहील आणि तुम्ही मानवजातीचे साक्षीदार रहाल. तेव्हा नियमितपणे प्रार्थना करा, दानधर्म करा आणि ईश्वरावर दृढ निष्ठा ठेवा. तो तुमचा पालनकर्ता आहे, उत्कृष्ट पालनकर्ता आणि उत्कृष्ट मदतनीस!

प्रकरण २३ : श्रद्धावंत (अल्-मोमिनून)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] निःसंशय श्रद्धावंत लोक यशस्वी आहेत. [२] जे नम्रभावे प्रार्थना करतात, [३] निरर्थक गोष्टींपासून दूर राहतात, [४] दानधर्म करतात, [५] आपल्या शीलाची जपणूक करतात, [६] याला फक्त आपल्या पत्नींचा व दासींचा अपवाद करतात, त्यांना कसलाही दोष लागणार नाही. [७] पण या मर्यादांचे उल्लंघन करणारे अपराधी आहेत. [८] जे आपल्यावर ठेवलेल्या भरवशाला व दिलेल्या वचनाला जागतात, [९] नियमितपणे प्रार्थना करतात [१०] ते स्वर्गाचे वारसदार आहेत. [११] ते तिथे कायमचे वास्तव्य करतील.

[१२] माणसाला आम्ही मातीच्या सत्त्वापासून निर्माण केले. [१३] नंतर

वीर्याच्या थेंबाच्या रूपात त्याला एका सुरक्षित ठिकाणी ठेवले. १४ पुढे त्याला रक्ताच्या गुठळीचे स्वरूप दिले आणि त्यापासून मांसाचा गोळा बनवला. त्या गोळ्याच्या ठायी हाडे निर्माण केली आणि त्या हाडांवर मांसाचे आवरण चढवले. नंतर नवीन जीव म्हणून त्याला या जगात आणले. ईश्वराचा महिमा अगाध आहे. तो सर्वोत्कृष्ट निर्माता आहे! १५ यानंतर या जीवाला मृत्यू येईल. १६ पुनर्निर्माणाच्या दिवशी तुम्हाला पुन्हा एकदा जिवंत केले जाईल.

१७ आम्ही तुमच्यावर सप्त मार्ग निर्माण केले आहेत. आम्हाला आमच्या निर्मितीचा कधीही विसर पडत नाही. १८ आम्ही आकाशातून वाजवी प्रमाणात पाण्याचा पुरवठा करतो आणि ते भूमीत साठवून ठेवतो. पण आमच्या इच्छेला आले तर ते परत घेण्याची ताकदही आमच्याकडे आहे. १९ आम्ही तुमच्यासाठी पामवृक्षाच्या आणि द्राक्षांच्या बागा तयार केल्या. त्यात तुमच्यासाठी अगणित फळे आहेत. तुम्ही त्यांचे सेवन करता. २० आम्ही सिनाई पर्वतावर विशिष्ट प्रकारची वनस्पती उगवली. ही वनस्पती तेल निर्माण करते आणि सेवन करणाऱ्यांसाठी त्यापासून रस्सा मिळतो. २१ प्राणिमात्रांपासूनही तुम्हाला बोध घेता येतो. काही प्राण्यांचे मांस तुम्ही खाता. त्यांच्या पोटातून आम्ही तुम्हाला दुधाचा पुरवठा करतो. त्यांच्यापासून तुम्हाला इतरही अनेक लाभ होतात. २२ जहाजांप्रमाणे त्यांच्यावर स्वार होऊन तुम्ही प्रवास करता.

२३ नोहाला आम्ही त्याच्या समाजात पाठवले. त्याने आपल्या लोकांना सांगितले, "लोकहो! ईश्वराची आराधना करा. तुच्यासाठी तो एकमेव ईश्वर आहे. तुम्ही त्याची भीती बाळगणार नाही का?" २४ सत्य नाकारणारा त्यांच्यातला एक नेता त्यांना म्हणाला, "हा तर तुमच्यासारखाच एक माणूस आहे, ज्याला तुमच्यापेक्षा श्रेष्ठ व्हायचे आहे.

ईश्वराची मर्जी असती तर त्याने आपल्या दूताला आपल्याकडे पाठवले असते. आपल्या वाडवडिलांकडून याच्याविषयी कधी काही ऐकायला मिळालेले नाही. २५ मला तर हा निव्वळ वेडा वाटतो. याच्यावर विश्वास ठेवण्याआधी थोडी वाट पहा.''

२६ यावर नोहाने आपल्या ईश्वराची आळवणी केली, ''हे प्रभू! मला मदत कर! या लोकांनी मला नाकारले आहे!'' २७ आम्ही त्याच्यासमोर आमची इच्छा प्रकट केली, ''आमच्या सूचनेप्रमाणे आमच्या दक्ष नजरेखाली एका नौकेची बांधणी कर. आमची आज्ञा होताच भूमीवर पाण्याचे वेगवान प्रवाह उसळू लागतील. त्याबरोबर तुझे कुटुंबिय आणि प्राण्यांच्या प्रत्येक प्रजातीची एक जोडी घेऊन त्या नौकेत चढ. ज्यांची शिक्षा निश्चित झाली आहे अशांना मात्र बरोबर घेऊ नकोस. अपराध करणाऱ्यांसाठी माझ्याकडे विनंती करू नकोस. त्यांना जलसमाधी मिळणारच आहे.''

२८ तू आणि तुझे अनुयायी नौकेत चढल्यावर ईश्वराची प्रार्थना करा, ''दुष्ट लोकांच्या तावडीतून आमची सुटका करणारा ईश्वर स्तुत्य आहे.'' २९ आणि त्याला विनंती करा, ''हे प्रभू! तुझ्या कृपेने आम्हाला तुझे आशीर्वाद लाभलेल्या प्रदेशात घेऊन जा. अशा ठिकाणी फक्त तूच पोचवू शकतोस.'' ३० निःसंदेह! यात सुस्पष्ट पुरावे आहेत. अशा प्रकारे आम्ही लोकांची पारख करतो.

३१ यांतर आम्ही त्यांची दुसरी पिढी निर्माण केली. ३२ आणि त्यांच्यातल्याच एका प्रेषिताला त्यांच्याकडे पाठवले. या प्रेषिताने त्यांना सांगितले, ''फक्त ईश्वराचीच उपासना करा. तुमच्यासाठी त्याच्याशिवाय अन्य कुणी ईश्वर नाही. तर मग त्याची भीती बाळगणार ना?'' ३३ पण त्याच्या समाजातील प्रमुखांनी सत्य आणि मृत्युपश्चात जीवनात होणारी

ईश्वराची भेट नाकारली. कारण ऐहिक जीवनात त्यांना आम्ही सुखासीनता आणि समृद्धी दिली होती. त्यांनी आपल्या समाजबांधवांना सांगितले, "हा आमच्यासारखाच एक माणूस आहे. तुम्ही खाता तेच तोही खातो अणि तुम्ही पिता तेच पितो. ३४ तुमच्यासारख्याच माणसाच्या आज्ञेनुसार वागलात तर तुमचे फार मोठे नुकसान होईल.

३५ मृत्युनंतर तुमचे शरीर धुळीस मिळाल्यावर, त्याचा सापळा उरल्यावर तुम्हाला पुन्हा एकदा जिवंत केले जाईल, असा शब्द तो तुम्हाला देतो का? ३६ याचा हा शब्द खरा होणे निव्वळ असंभव आहे. ३७ वर्तमान जीवन हेच एकमेव जीवन आहे. आपण एकदाच जन्म घेतो आणि एकदाच मरतो. त्यानंतर कधीच पुन्हा जिवंत होत नाही. ३८ तो म्हणजे ईश्वराविरूद्ध खोट्या गोष्टी रचणारा फक्त एक माणूस आहे. आपण त्याच्यावर विश्वास ठेवणार नाही आहोत!"

३९ हे ऐकून प्रेषिताने ईश्वराला विनंती केली, "हे पालनहार! मला मदत कर. या लोकांनी मला नाकारले आहे." ४० ईश्वराने सांगितले, "लवकरच त्यांना याचा पश्चाताप हाईल." ४१ आम्ही केलेला स्फोट त्यांचा न्यायोचित आणि अटळपणे घास घेईल आणि त्यांना नष्ट करून टाकेल. अशा दुष्ट लोकांपासून दूर रहा!

४२ आम्ही त्यांच्या नंतरच्या पिढ्या उदयास आणल्या. ४३ कुठलाही समाज निर्धारित वेळेच्या आधी उदयास येऊ शकत नाही की (शिक्षेची) निर्धारित वेळ लांबवू शकत नाही. ४४ यानंतर एकापाठोपाठ एक प्रेषित आम्ही त्यांच्याकडे पाठवले. प्रत्येक प्रेषित आपल्या समाजाकडे गेला आणि प्रत्येक वेळी त्यांच्या लोकांनी त्याला नाकारले. या प्रत्येक समाजाला आम्ही एकामागून एक नष्ट केले. पुढे त्यांच्या फक्त कथा बनून राहिल्या. तेव्हा सत्यावर विश्वास न ठेवणाऱ्यांपासून दूर रहा.

४५ नंतर आम्ही मोझेसला व त्याचा भाऊ अहरोनला आमचे संकेत
आणि सुस्पष्ट पुरावे घेऊन पाठवले, ४६ फारो व त्याच्या सहकाऱ्यांकडे.
पण ते उद्दामपणाने वागले, कारण ते उद्धट होते. ४७ त्यांनी विचारले,
"आम्ही अगदी आमच्याचसारख्या असणाऱ्या दोघांवर विश्वास ठेवायचा
का, ज्यांचा समाज आमच्या अधीन आहे?" ४८ या कारणाने त्यांनी त्या
दोघांना नाकारले आणि नाश पावणाऱ्यांपैकी झाले. ४९ लोकांना मार्गदर्शन
लाभावे यासाठी आम्ही मोझेसला पवित्र ग्रंथ दिला.

५० मेरीपुत्राला व त्याच्या मातेला आम्ही आमचे संकेत बनवले आणि
उंचावरील एका निवांत ठिकाणी त्यांना आसरा दिला. तिथून ताज्या
पाण्याचा जिवंत झरा वाहत होता.

५१ हे प्रेषिता! आरोग्यदायी वस्तूंचे सेवन करा आणि सत्कर्मे करत
रहा. तुमच्या कर्माविषयी मी जागरूक आहे. ५२ तुमचा धर्म हा एकमेव
धर्म आहे आणि मी एकमेव तुमचा पालनहार आहे. तेव्हा माझे भय
बाळगून रहा.

५३ तरीही त्यांनी आपल्या धर्माला वेगवेगळ्या पंथात विभाजन केले
आणि आपल्याला जे मिळाले त्यावर प्रत्येक पंथ पोकळ अभिमान
बाळगतो. ५४ तेव्हा त्यांना थोड्या काळासाठी त्यांच्या आनंदात दंग राहू
दे. ५५ त्यांचा असा समज झाला आहे का, की आम्ही त्यांना जी संपत्ती
आणि संतती देऊ केली आहे, ५६ त्यामागे त्यांना भौतिक लाभ मिळवून
देण्याव्यतिरिक्त अन्य कुठलाही हेतू नाही. वस्तुस्थिती अशी नाही, पण
त्यांना याची जाणीव नाही.

५७ आपल्या पालनकर्त्याच्या विचाराने जे भयकंपित होतात,
५८ त्याच्या संदेशावर विश्वास ठेवतात, ५९ अनेकेश्वरवाद मानत नाहीत
६० आणि गरजूंना हव्या असलेल्या वस्तू देतात, त्यांची मने आपल्याला

आपल्या पालनकर्त्याकडे परतायचे आहे, या भयाने हादरून जातात. ६१ चढाओढीने सत्कर्मे करणारे आणि सदाचाराने वागणाऱ्यांचे अग्रणी असणारे हेच लोक आहेत. ६२ आम्ही कुणावरही त्याच्या क्षमतेपेक्षा जास्त ओझे लादत नाही. सत्याचे प्रमाण देणारी स्पष्ट नोंद आम्ही ठेवतो आणि त्यांच्यावर अन्याय होऊ देत नाही.

६३ पण त्यांची मने याची दखल घेत नाहीत. याशिवाय ते वेगळ्याच कामात मग्न आहेत. ६४ पण त्यांच्यातील धनाढ्य लोकांवर जेव्हा आम्ही आणीबाणीची वेळ आणू तेव्हा ते मदतीसाठी आक्रोश करू लागतील. ६५ पण त्यांना सांगा, "या दिवशी मदतीसाठी आक्रोश करू नका, तुम्हाला आमची मदत मिळणार नाही. ६६ माझे साक्षात्कार तुम्हाला ऐकवले गेले, पण तुम्ही त्याकडे पाठ फिरवली. ६७ आणि तुम्ही इतक्या उद्धटपणे वागलात, जणू एखाद्या गोष्टी सांगणाऱ्याकडे दुर्लक्ष करून तिथून दूर निघून जावे."

६८ त्यांच्या वाडवडिलांकडे नव्हती अशी गोष्ट त्यांच्याकडे आली होती का? या ईशवाणीवर ते चिंतन करणार नाहीत का? ६९ की त्याने त्यांच्या प्रेषिताला ओळखले नसल्याने नाकारले आहे? ७० तो वेडा आहे असे त्यांना वाटते का? खरे तर तो त्यांच्यासाठी सत्य घेऊन आला आहे, पण त्यांच्यापैकी बहुतेकजण सत्याचे विरोधक आहेत. ७१ त्यांच्या इच्छा-आकांक्षानुसार सत्य वाकले असते तर आकाश, पृथ्वी आणि त्यावरची प्रत्येक गोष्ट उध्वस्त झाली असती. खरेतर आम्ही त्यांच्याकडे उपदेश पाठवला आहे. तरीही ते तिची दखल घेण्याची टाळाटाळ करत आहेत.

७२ की तुम्ही त्यांच्याकडे आमच्या उपदेशाचा मोबदला मागत आहात? पण तुमच्या पालनकर्त्याचा मोबदला सर्वोत्कृष्ट आहे. तो सर्वोत्कृष्ट दाता आहे. ७३ आणि निःसंशय, तुम्ही त्यांना सन्मार्गावर येण्याचे आवाहन करत

आहात. ७४ पण जे मृत्युपश्चात जीवनावर विश्वास ठेवत नाहीत ते खरोखर
सन्मार्गापासून दूर गेले आहेत.

७५ आम्ही त्यांना दया दाखवली आणि संकटमुक्त केले तरीही ते
कुकर्मे करतच राहतील, आंधळ्यासारखेच भटकतच राहतील. ७६ आम्ही
त्यांच्याभोवती शिक्षेचा पाश आवळला, तरीही ते त्यांच्या पालनकर्त्याला
शरण गेले नाहीत, की त्याच्यासमोर विनम्र झाले नाहीत. ७७ याहून कठोर
शिक्षा देईपर्यंत ते असेच वागत राहतील, तेव्हा मात्र त्यांना निराशेचा
धक्काच बसेल.

७८ तुम्हाला कान, डोळे आणि मन देणारा तोच आहे. तरीही तुम्ही
क्वचितच त्याच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करता.[अ] ७९ पृथ्वीवर तुमची
संख्या वाढवणारा तोच आहे आणि त्याच्यासमोरच तुम्हा सगळ्यांना
एकत्र आणले जाईल. ८० तुमचा जीवनदाता आणि मृत्युदाता तोच आहे.
दिवस-रात्रीच्या फेऱ्यावर त्याचेच नियंत्रण आहे. तुम्ही यापासून काही
बोध घेणार की नाही?

८१ पण तेही त्यांच्या पूर्वजांप्रमाणे प्रतिसाद देतात: ८२ "मृत्युनंतर
आमच्या हाडांची माती झाल्यावर आम्हाला पुन्हा जिवंत केले जाईल का?

[अ] या विश्वात मानव ही एक विशेष निर्मिती आहे ज्याला ऐकण्याची, पाहण्याची आणि विचार करण्याची अपवादात्मक शक्ती देण्यात आली आहे. या क्षमता माणसाला जीवनाचे वास्तव समजून घेण्याच्या विशेष हेतूने दिल्या आहेत. सत्याचा आवाज ऐकण्यासाठी त्याने आपले कान वापरले पाहिजेत, त्याच्या डोळ्यांनी त्याने आपल्या सभोवताल पसरलेले ईश्वराचे संकेत पाहिले पाहिजेत. या सर्व गोष्टींचा सखोल अभ्यास करण्यासाठी त्याने आपली विचारशक्ती वापरली पाहिजे. खरे तर कान, डोळे आणि मन यांचे आभार मानण्याचा हा मार्ग आहे. जे या जगात अशा कृतज्ञतेचा पुरावा देत नाहीत, त्यांना या भेटवस्तूंचा हक्क कायमचा गमावण्याचा धोका असतो.

८३ आमच्या पूर्वजांनाही पूर्वी असेच वचन मिळाले होते. या तर प्राचीन
काळात लोकांनी रचलेल्या कथा आहेत.''
८४ त्यांना विचारा, ''पृथ्वी आणि त्यावरच्या सगळ्या गोष्टी कुणाच्या
मालकीच्या आहेत? याची माहिती असेल तर मला सांगा.'' ८५ ते
म्हणतील, ''ईश्वराच्या मालकीच्या!'' त्यांना विचारा, ''तर मग तुम्ही
याची दखल घेणार नाही का?'' ८६ त्यांना विचारा, ''सप्त आकाशांचा
आणि त्यांच्या वैभवशाली सिंहासनाचा अधिपती कोण आहे?'' ८७ ते
सांगतील, ''ते ईश्वराच्या मालकीचे आहे.'' त्यांना विचारा, ''तर मग
तुम्ही त्याची भीती बाळगणार नाही का?'' ८८ त्यांना विचारा, ''सगळ्या
गोष्टींवर कुणाची सत्ता आहे? सगळ्यांचे रक्षण करणारा कोण आहे?
कुणाविरूद्ध जाऊन माणूस आपला बचाव करू शकत नाही? याचे ज्ञान
तुमच्याकडे असेल तर मला सांगा.'' ८९ ते सांगतील, ''ही सगळी सत्ता
ईश्वराची आहे.'' त्यांना विचारा, ''तरीही तुम्ही कसल्या भ्रमात आहात?''
९० आम्ही त्यांच्यासमोर सत्य प्रकट केले आहे, पण ते निःसंशय
खोटारडे आहेत. ९१ ईश्वराला पुत्र झाला नाही, की त्याच्याशिवाय अन्य
कुणी ईश्वर नाही. अन्यथा प्रत्येक ईश्वर आपल्या निर्मितीसह वेगळा
झाला असता. निःसंदेह, त्यांनी परस्परांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न
केला असता. ते ज्यांना ईश्वरतुल्य मानतात, त्यापेक्षा एकमेव ईश्वराची
महानता श्रेष्ठ आहे. ९२ दृश्य-अदृश्याचा जाणकार असलेला तो ईश्वर,
त्यांनी रचलेल्या दैवतांपेक्षा महान आहे.
९३ ईश्वराकडे प्रार्थना करा, ''हे पालनहार! त्यांना ज्याचा
इशारा दिला आहे ती शिक्षा आम्हाला दाखवणार असशील, तर
९४ मला या अपराध्यांच्या संगतीत ठेवू नकोस.'' ९५ त्यांना ज्याचा इशारा
दिला आहे ती शिक्षा दाखवायला आम्ही नक्कीच समर्थ आहोत.

९६ दुष्टाचा सामना चांगुलपणाने करा. ते जे काही बोलत आहेत,
याची आम्हाला चांगल्याप्रकारे जाणीव आहे. ९७ आणि ईश्वराला प्रार्थना
करा, "हे ईश्वर! सैतानाच्या सूचनांपासून माझे रक्षण कर. ९८ सैतानापासून
माझा बचाव कर, म्हणजे तो माझ्या जवळपासही फिरकणार नाही."
९९ मृत्यूची चाहूल लागताच त्यांच्यापैकी प्रत्येकजण म्हणतो,
"हे पालनहार! मला परत पाठव. १०० म्हणजे मागे टाकून आलेल्या
जगात मला सत्कर्मे करता येतील." हे कदापि शक्य नाही ! या
त्यांच्या निव्वळ निरर्थक थापा आहेत. त्यांना पुनरूज्जीवित करेपर्यंत
त्यांच्यामागे अभेद्य अडथळा उभा केला जाईल. १०१ त्या दिवशीचे
शिंग फुंकले जाताच ना त्यांच्यातल्या नातेसंबंधांचे टिकाव लागतील,
ना ते एकमेकांची विचारपूस करतील. १०२ सत्कर्मे करत राहिल्याने
ज्यांचे पारडे जड झाले आहे, ते या दिवशी यशस्वी होतील.
१०३ पण ज्यांचे पारडे हलके आहे ते स्वतःचा विनाश ओढवून घेतील,
त्यांचा निवास नरकात असेल. १०४ नरकाग्नी त्यांचे चेहरे होरपळून काढेल
आणि विद्रुप चेहरे घेऊन ते नरकात वास्तव्य करतील.
१०५ ईश्वर त्यांना विचारेल, "माझे संदेश तुम्हाला ऐकवले नव्हते का?
आणि तुम्ही ते नाकारले नाहीत का?" १०६ ते सांगतील, "हे पालनहार!
दुर्दैवाने आमच्यावर मात केली आणि आम्ही चुकीचे वागू लागलो. १०७ हे
पालनहार! नरकातून आमची सुटका कर. त्यानंतर आम्ही पुन्हा गैरवर्तन
करू लागलो, तर नक्कीच अपराधी असू." १०८ ईश्वर त्यांना दरडावून
सांगेल, "मुकाट्याने तिथेच पडून रहा, माझ्याशी अवाक्षरही बोलू नका."
१०९ माझ्या सेवकांपैकी काही असे आहेत जे म्हणतात "हे प्रभू!
आमचा तुझ्यावर विश्वास आहे, तेव्हा आम्हाला क्षमा कर आणि
आमच्यावर कृपा कर. तू सर्वश्रेष्ठ कृपावंत आहेस." ११० पण तुम्हाला माझे

विस्मरण झाले आणि तुम्ही माझ्या या सेवकांची खिल्ली उडवू लागलात, त्यांची कुचेष्टा करू लागलात. १११ माझ्या सेवकांच्या या दृढ विश्वासाचा आज आम्ही त्यांना मोबदला दिला आहे. ते विजयी झाले आहेत.

११२ ईश्वर अपराध्यांना विचारेल, "तुम्ही पृथ्वीवर किती वर्षे राहिलात?" ११३ ते म्हणतील, "एखादा दिवस असेल किंवा दिवसातला थोडा वेळ असेल. ज्यांनी आमच्या आयुष्याचा हिशेब ठेवला आहे त्यांना विचारा." ११४ ईश्वर सांगेल, "तुम्हाला समजतेय का पहा, तुम्ही फारच थोडा वेळ पृथ्वीवर होता."

११५ तुम्हाला आम्ही कुठलाही हेतू नसताना निर्माण केले आणि तुम्हाला आमच्याकडे परत आणले जाणार नाही असे तुम्हाला वाटते का? ११६ ईश्वर सच्चा पालनकर्ता आहे, तो सर्वश्रेष्ठ आहे. त्याच्याशिवाय अन्य कुणीच तुमच्या उपासनेस पात्र नाही. तो वैभवशाली सिंहासनाचा अधिपती आहे. ११७ जो ईश्वराबरोबर अन्य दैवताचा धावा करतो असे दैवत, ज्याच्या दैवत्वाचा कुठलाही पुरावा नाही, त्याला त्याचा पालनकर्ता जाब विचारेल. निःसंशय, सत्य नाकारणाऱ्यांची कधीही प्रगती होणार नाही. ११८ ईश्वराकडे प्रार्थना करा, "हे पालनकर्ता! आम्हाला क्षमा कर, आमच्यावर कृपा कर. तू सर्वाधिक दयाळू आहेस."

प्रकरण २४ : प्रकाश
(अन्-नूर)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हा अध्याय आम्ही प्रकट केला आहे आणि तुमच्यासाठी अनिवार्य केला आहे. तुम्ही धडा घ्यावा यासाठी आम्ही यातून तुमच्याकडे स्पष्ट

साक्षात्कार पाठवले आहेत. ३ व्यभिचारी स्त्री आणि व्यभिचारी पुरूष
यांच्यापैकी प्रत्येकाला शंभर फटक्यांचा चोप द्या. ईश्वरावर आणि
अंतिम दिवसावर खरा विश्वास असेल तर ईश्वराच्या या आज्ञेचे पालन
करताना अपराध्यांवर दया दाखवू नका. असंख्य श्रद्धावंतांसमोर त्यांना
ही शिक्षा भोगायला लागू दे. ३ व्यभिचारी पुरूषाने व्यभिचारी स्त्रीशी
किंवा अनेकेश्वरवादी स्त्रीशीच विवाह करावा आणि व्यभिचारी स्त्रीशी
व्यभिचारी पुरूषाने किंवा अनेकेश्वरवादी पुरुषानेच विवाह करावा.
श्रद्धावंतांसाठी असे विवाह वर्ज्य आहेत.

४ जे शीलवान स्त्रियांची बदनामी करतात पण चार साक्षीदार सादर
करू शकत नाहीत, त्यांना ऐंशी फटक्यांची सजा द्या. त्यानंतर कधीही
त्यांची साक्ष ग्राह्य मानू नका, कारण ते अपराधी आहेत. ५ याला अपवाद
त्यांचा, जे नंतर पश्चाताप पावतात आणि स्वतःमध्ये सुधारणा करतात.
कारण ईश्वर दयाशील आणि क्षमाशील आहे.

६ आपल्या पत्नीवर व्यभिचाराचा आरोप करणारा स्वतःशिवाय अन्य
कुणी साक्षीदार आणू शकला नाही तर त्याने चारवेळा ईश्वराची शपथ
घ्यावी की त्याचा हा आरोप खरा आहे. ७ आणि पाचव्या वेळेस म्हणावे
की तो खोटे बोलत असेल तर त्याला ईश्वराचा शाप लागेल. ८ त्याच्या
पत्नीला शिक्षा मिळणार नाही, जर तिने चार वेळा ईश्वराची शपथ घेऊन
सांगितले की तिचा पती खोटे बोलत आहे ९ आणि पाचव्यांदा म्हटले की,
पती खरे बोलत आहे तर तिच्यावर ईश्वराचा कोप होईल. १० तुमच्यावर
ईश्वराची मेहेरबानी आणि कृपा नसती तर तुम्ही अडचणीत आला असता.
ईश्वर सुज्ञ आहे आणि पश्चातापाचा स्वीकारकर्ता आहे.

११ ज्यांनी अशी खोटी निंदानालस्ती केली आहे, तो तुमच्यातलाच
एक गट आहे. हे तुमचे दुर्दैव आहे असे समजू नका, तर ते तुमच्यासाठी

चांगलेच आहे. हे पापकर्म करणाऱ्या त्यांच्यातील प्रत्येकाला यासाठी जबाबदार धरले जाईल आणि ज्याने यात मोठी भूमिका पार पाडली त्याला कठोर शिक्षेचा सामना करावा लागेल.

१२ अशी अफवा ऐकताच श्रद्धाळू स्त्री-पुरूषांनी आपल्या लोकांविषयी
चांगला विचार का केला नाही आणि का म्हटले नाही, "हा तर निराधार
दोषारोप आहे!" १३ असा आरोप करणारे चार साक्षीदार सादर का करू
शकले नाहीत? ते साक्षीदार सादर करू शकले नाहीत तर ईश्वराच्या
नजरेत ते बेलाशक खोटारडे आहेत.

१४ या जगात आणि मृत्युपश्चात जगात तुमच्यावर ईश्वराची मेहेरबानी
आणि कृपा नसती तर तुम्ही अविचाराने ज्या निंदानालस्तीच्या प्रकरणात
गुंतला आहात, त्याची तुम्हाला कठोर शिक्षा मिळाली असती. १५ तुम्हाला
ज्याची माहिती नाही अशी अफवा जेव्हा तुम्ही तोंडाने बोलत होता आणि
जिभेने सगळीकडे पसरवत होता तेव्हा तुम्हाला ते क्षुल्लक वाटले, पण
ईश्वराच्या नजरेत ही फार गंभीर बाब होती. १६ ही अफवा ऐकताच तुम्ही
का म्हटले नाहीत, "असे बोलणे चांगले नाही. ईश्वर त्यापासून आमचे
रक्षण करो! हे भयंकर कारस्थान आहे!" १७ ईश्वर तुम्हाला ताकीद देत
आहे, खरे श्रद्धावंत असाल तर पुन्हा अशी चूक करू नका. १८ ईश्वर
त्याचे आदेश तुम्हाला स्पष्ट शब्दात सांगत आहे. तो ईश्वर सर्वज्ञ आणि
सुज्ञ आहे.

१९ श्रद्धावंतांमध्ये असभ्य अफवा पसराव्यात असे ज्यांना वाटते त्यांना
या जगात आणि मृत्युपश्चात जगात कठोर शिक्षा भोगावी लागेल. हे
ईश्वराला माहीत आहे, पण तुम्हाला माहीत नाही. २० पण तुमच्यावर
ईश्वराची मेहेरबानी आणि कृपा नसती आणि तो दयाळू, कृपाळू नसता
तर तुमच्यावर शोक करण्याची वेळ आली नसती का?

२१ श्रद्धावंतांनो! सैतानाच्या पावलावर पाऊल ठेवू नका. जो कुणी
त्याच्या मार्गाने जाईल त्यास तो अश्लील व वाईट कृत्ये करण्यास प्रेरित
करतो. तुमच्यावर ईश्वराची मेहेरबानी आणि कृपा नसती तर तुमच्यापैकी
कुणाचीही कधीही चित्तशुद्धी झाली नसती. पण ईश्वराच्या इच्छेला येईल
त्याचे चित्त तो शुद्ध करतो. तो सगळे ऐकणारा, सगळे जाणणारा आहे.
२२ तुमच्यापैकी ज्यांना सुबत्ता आणि विपुल संपत्ती लाभली आहे,
त्यांनी आपल्या नातलगांना, गरजूंना आणि ईश्वरी कार्यासाठी घरादारांचा
त्याग केलेल्यांना त्यातील वाटा न देण्याचा निर्धार करू नये. त्यांनी
त्यांच्या चुकांकडे दुर्लक्ष करावे आणि त्यांना माफ करावे. ईश्वराने
आपल्याला क्षमा करावी असे तुम्हाला वाटत नाही का? ईश्वर क्षमाशील
आणि दयाशील आहे.
२३ शीलवान, भोळ्याभाबड्या, श्रद्धाळू स्त्रियांवर दोषारोप करणाऱ्यांना
या जगात आणि मृत्युपश्चात जगात तळतळाट लागेल. कठोर शिक्षा त्यांची
वाट पहात असेल. २४ त्यांनी केलेल्या या गैरकृत्याबद्दल निवाड्याच्या
दिवशी त्यांच्या स्वतःच्याच जिभा, हात आणि पाय त्यांच्याविरूद्ध साक्ष
देतील. २५ या दिवशी ईश्वर त्यांना न्याय्य मोबदला देईल आणि त्यांना
कळेल ईश्वर सत्य आहे, तोच सत्य समोर आणतो.
२६ चारित्र्यहीन स्त्रिया चारित्र्यहीन पुरूषांसाठी आहेत तर चारित्र्यहीन
पुरूष चारित्र्यहीन स्त्रियांसाठी आहेत. सत्शील स्त्रिया सत्शील पुरूषांसाठी
आहेत तर सत्शील पुरूष सत्शील स्त्रियांसाठी आहेत. सत्शील स्त्री-पुरूष
सगळ्या आरोपापांसून दोषमुक्त आहेत. ईश्वराची क्षमाशीलता आणि
सन्माननीय उपजीविका त्यांची वाट पहात आहेत.
२७ श्रद्धवंतांनो! घरमालकाची परवानगी घेतल्याशिवाय आणि घरातील
माणसांना अभिवादन केल्याशिवाय इतरांच्या घरात प्रवेश करू नका. यात

तुमचे कल्याण आहे, तेव्हा या आदेशाचे दक्षतेने पालन करा. २८ घरात कुणी नसल्याचे आढळल्यास, परवानगी मिळेपर्यंत त्या घरात प्रवेश करू नका. तुम्हाला माघारी जायला सांगितले तर तिथून निघून जा. असे करणे तुमच्यासाठी अधिक योग्य आहे आणि तुम्ही जे करता ते ईश्वर जाणतो. २९ कुणाचेही वास्तव्य नसलेल्या घरात तुम्ही प्रवेश केलात आणि त्यातून चांगला हेतू साध्य होत असेल तर असे करण्यात काही गैर नाही. तुम्ही जे उघडपणे करता आणि जे लपवता ते सगळे ईश्वर जाणतो.

३० श्रद्धावंतांना नजर खाली वळवायला आणि शीलाची जपणूक करायला सांगा. याने तुमचे पावित्र्य अबाधित राहील. तुम्ही जे करता ते ईश्वर जाणतो.

३१ श्रद्धाळू स्त्रियांना सांगा, त्यांनी नजर खाली वळवावी, शीलाची जपणूक करावी आणि आपल्या साज-शृंगाराचे प्रदर्शन करू नये. सर्वसाधारणपणे जेवढे दृष्टीस पडते त्याला काही हरकत नाही. त्यांनी आपल्या छातीभोवती पदर गुंडाळून घ्यावा. त्या फक्त या लोकांना साज-शृंगार दाखवू शकतात: पती, त्यांचा पिता किंवा पतीचा पिता; किंवा त्यांचे पुत्र किंवा त्यांच्या पतीचे पुत्र (सावत्र पुत्र) किंवा त्यांचे भाऊ आणि भावांची मुले; किंवा बहिणीची मुले किंवा मोलकरीण आणि दास; किंवा लैंगिक इच्छा नसलेले पुरूष नोकर; किंवा स्त्रियांविषयीची लैंगिक माहिती नसलेली बालके. स्त्रियांनी आपल्या पायातील आभूषणांकडे लक्ष वेधून घेण्यासाठी हेलकावे देत चालू नये. श्रद्धावंतांनो! ईश्वराकडे वळा, तुमच्यापैकी प्रत्येकाने असे वागावे म्हणजे तुमची प्रगती होईल.

३२ तर तुमच्यात जे (विवाहयोग्य) अविवाहित आहेत, त्यांचे विवाह करून टाका. तसेच तुमच्या दास आणि दासींपैकी जे विवाहयोग्य असतील, त्यांचेही विवाह उरकून टाका. ते गरीब असतील तर ईश्वर

आपल्या कृपेने त्यांच्या उदरनिर्वाहाची सोय करेल. त्याची कृपा असीम आहे, तो सर्वज्ञ आहे.

[३३] विवाहोत्तर जीवनातील गरजा भागवण्याची साधने नसणाऱ्यांनी ईश्वर आपल्या कृपेने पुरेशी साधने पुरवेपर्यंत चारित्र्याची जपणूक करावी. तुमच्या गुलामांपैकी एखाद्याला स्वातंत्र्याचा करार करायचा असेल आणि स्वतंत्र जीवनात तो यशस्वी होण्याजोगा असेल तर त्याला तसा करार करून द्या आणि ईश्वराने देऊ केलेल्या धनापैकी काही धन त्याला द्या. ज्यांना आपल्या शीलाची जपणूक करायची आहे, अशा तुमच्या दासींना संपत्ती कमावण्यासाठी बळजबरीने व्यभिचार करायला लावू नका. पण कुणी त्यांच्यावर व्यभिचाराची जबरदस्ती केली तर त्यांना दोष लागणार नाही. ईश्वर त्यांना क्षमा करेल आणि त्यांच्यावर कृपा करेल. [३४] आम्ही तुमच्यासमोर सुस्पष्ट साक्षात्कार प्रकट केले आहेत आणि तुमच्याआधी होऊन गेलेल्यांची उदाहरणे समोर ठेवून ईश्वराचे भय बागळणाऱ्यांना ताकीद दिली आहे.

[३५] ईश्वर म्हणजे आकाश आणि पृथ्वी यांचा प्रकाश आहे. त्याच्या प्रकाशाची तुलना अशा पणतीशी करता येईल, जी सज्जात असलेल्या पारदर्शक कंदिलात ठेवलेली आहे. ही पणती दिव्य जैतून वृक्षापासून काढलेल्या तेलावर जळते आणि तिच्यापासून ताऱ्यासारख्या चमचमत्या प्रकाशाचा उगम होतो. हा जैतून वृक्ष ना पूर्वेकडचा आहे ना पश्चिमेकडचा आहे. हे तेल इतके तेजस्वी आहे की, जणू काही त्याला जळण्यासाठी कशाच्या स्पर्शाचीही गरज नाही. सगळीकडे प्रकाशच प्रकाश. ईश्वर त्याच्या मर्जीला येईल त्यालाच आपल्या प्रकाशाचा मार्ग दाखवतो.

माणसाने बोध घ्यावा म्हणून ईश्वर अशी तुलनात्मक उदाहरणे देतो. त्याच्याकडे प्रत्येक गोष्टींचे समग्र ज्ञान आहे.[अ]

[३६] सकाळ-सायंकाळ ईश्वराचे नामस्मरण करण्याच्या हेतूने ईश्वराने
जी उपासनागृहे उभी करण्याची परवानगी दिली आहे, अशा उपासनागृहात
श्रद्धावंत लोक उपासना करतात. [३७] व्यापारउदीमामुळे किंवा व्यवसायामुळे
जे ईश्वराच्या स्मरणापासून विचलित होत नाहीत, की प्रार्थना करण्यापासून
लांब राहत नाहीत, की दानधर्म करायला चुकत नाहीत, ज्या दिवशी
मन आणि डोळे ढवळून निघतील त्या निवाड्याच्या दिवसाचे जे भय
बाळगतात [३८] ईश्वर त्यांच्या सत्कर्माला अनुरूप असा मोबदला देतो
आणि त्यांच्यावर कृपेचा अतोनात वर्षाव करतो. त्याच्या मर्जीला येईल
त्याच्यावर तो अमाप कृपा करतो.

[३९] सत्य नाकारण्याबाबत आग्रही असणाऱ्यांची कर्मे वाळवंटातील
मृगजळासारखी आहेत. तहानलेल्या वाटसरूला तिथे पाणी असल्यासारखे
वाटते, पण जवळ जाताच काहीही नसल्यासारखे जाणवते. तिथे त्याला ईश्वर
दिसतो, जो त्याच्या कर्माचा पुरेपुर मोबदला देतो. ईश्वर हिशेब करण्यात
फार तत्पर आहे [४०] किंवा त्यांची कर्मे काळ्या ढगांनी आच्छादलेल्या,
प्रलंयकारी लाटांनी वेढलेल्या, खोल समुद्रातील काळोखासारखी आहेत.
सगळीकडे काळोखच काळोख. आपले बोट नाकासमोर आणले तरी

[अ] हे अर्थाचे अनेक थर असलेले रूपक आहे. प्रकाश सर्वशक्तिमान ईश्वराच्या मार्गदर्शनाचे प्रतीक आहे. सज्जा (कोनाडा) हे माणसाचे हृदय आहे आणि दिवा (पणती) हा त्याचा विश्वास आहे. हा विश्वास त्या कोपऱ्यात आश्रयाला आहे. या चित्राचे स्पष्टीकरण आणखी दोन संदर्भबिंदूंनी केले आहे: ताऱ्यासारखा चमचमता प्रकाश आणि तेजस्वी तेल.

काही दिसणार नाही असा. खरोखर, ईश्वर ज्याला आपल्या प्रकाशापासून वंचित ठेवतो त्याला कुठेही प्रकाशाचा किरण दिसणार नाही.

४१ हे प्रेषिता! आकाश आणि पृथ्वीवरील प्रत्येक गोष्ट ईश्वराचे स्तुतिगान गाते आणि पक्षीही पंख पसरवून त्याची स्तुती करतात. हे तुम्हाला दिसत नाही का? प्रत्येकाकडे ईश्वरस्तुतीचा आणि ईश्वर प्रार्थनेचा आपापला मार्ग आहे. ईश्वराकडे त्यांच्या कर्माचे समग्र ज्ञान आहे. ४२ आकाश आणि पृथ्वीचे साम्राज्य ईश्वरकडे आहे आणि प्रत्येक गोष्ट त्याच्याकडे परतणार आहे.

४३ ईश्वर कसे ढगांना वाहून आणतो, त्यांना एकत्र करतो, त्यांचे एकावर एक थर रचतो आणि त्यांच्या गाभ्यातून जलवर्षाव करतो, हे तुम्हाला दिसत नाही का? तो गोठलेल्या ढगांचा पर्वतच एकत्रित करून आकाशातून गारांची पाठवणी करतो आणि त्याच्या इच्छेला येईल त्यांच्यावर त्यांना बरसवतो तर त्याच्या इच्छेला येईल त्यांना त्यापासून दूर ठेवतो. त्याने पाठवलेल्या विजेच्या लोळाचा झोत इतका प्रखर, की पाहणाऱ्याची दृष्टी हरवून जावी. ४४ ईश्वर दिवसामागून रात्र आणि रात्रीमागून दिवस आणतो. निःसंशय, अंतर्दृष्टी लाभलेल्यांसाठी यात बोध आहे.

४५ ईश्वराने प्राण्यापासून प्रत्येक सजीवाला निर्माण केले. त्यापैकी काही आपल्या पोटावर रांगतात, काही दोन पायांवर चालतात, तर काही चार पायांवर चालतात. ईश्वर ते निर्माण करतो जे तो इच्छितो. त्या सगळ्यांवर तो आपली सत्ता गाजवतो. ४६ आम्ही सत्य निःसंदिग्धपणे दाखवणारे साक्षात्कार तुमच्यासमोर प्रकट केले आहेत. ईश्वराच्या मर्जीला येईल त्याला तो सन्मार्गावर नेतो.

४७ लोक म्हणतात, "आमचा ईश्वरावर, त्याच्या प्रेषितावर विश्वास

आहे आणि आम्ही त्यांचे आज्ञापालन करतो.'' पण तरीही त्यांच्यातला एक गट त्यापासून दूर जातो. निश्चितच ते श्रद्धावंत नाहीत. ४८ त्यांच्यातील मतभेदांचा निवाडा करण्यासाठी जेव्हा त्यांना ईश्वराकडे आणि त्याच्या प्रेषिताकडे बोलावले जाते, तेव्हा त्यांच्यातील काहीजण त्याकडे दुर्लक्ष करतात. ४९ पण सत्य त्यांच्या मनासारखे आहे असे वाटले तर अगदी चटकन त्याचा स्वीकार करायला धावतात. ५० त्यांच्या मनात काही विकृती आहे की ते शंकेने काठोकाठ भरले आहे? की ईश्वर आणि त्याचा प्रेषित आपल्यावर अन्याय करेल याची त्यांना भीती वाटते? सत्य हेच आहे की ते स्वतःच अपराधी आहेत.

५१ श्रद्धावंतांचा निवाडा केला जावा यासाठी त्यांना ईश्वराकडे आणि त्याच्या प्रेषिताकडे येण्याची हाक दिली असता प्रतिसाद म्हणून ते एवढेच बोलतात, ''आम्ही ही हाक ऐकली आहे आणि त्यानुसार वागणार आहोत.'' याच लोकांची भरभराट होणार आहे. ५२ जे ईश्वराचे आणि त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन करतात, ईश्वराचे भय बाळगतात आणि ईश्वराप्रतिच्या कर्तव्याविषयी सजग असतात, ते जेते होणाऱ्यांपैकी आहेत.

५३ तुम्ही त्यांना ईश्वरी कार्यासाठी निघण्याचा आदेश दिला, तर ते ताबडतोब त्याची अंमलबजावणी करतील असे ते दृढ वचन देतील, ईश्वराची शपथ घेतील. त्यांना सांगा, ''नुसत्या शपथा घेऊ नका. शपथांना नाही, तर प्रत्यक्ष आज्ञापालनाला महत्त्व आहे. ईश्वर तुमचे कर्म चांगलेच जाणतो.'' ५४ ईश्वराच्या आणि त्याच्या प्रेषिताच्या आज्ञेचे पालन करा. त्याकडे पाठ फिरवलीत तर प्रेषित त्याच्या कामासाठी जबाबदार असेल, तर तुम्ही तुमच्या अपराधासाठी जबाबदार असाल. प्रेषिताच्या आज्ञेचे पालन केलेत तर तुम्हाला सन्मार्गावर आणले जाईल. प्रेषिताला फक्त

ईश्वराचा संदेश तुमच्यापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी पार पाडावी लागेल.

५५ तुमच्यापैकी जे ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करतात, त्यांना ईश्वराने वचन दिले आहे की त्यांच्यापूर्वी होऊन गेलेल्यांना त्याने जशी या भूमीची सत्ता देऊ केली होती, तशीच सत्ता तो निःसंशय त्यांनाही देऊ करेल आणि त्यांच्यासाठी निवडलेला धर्म त्यांच्यासाठी निःसंशय प्रस्थापित करेल. तो त्यांच्या मनातली भीती घालवून त्या जागी सुरक्षिततेची भावना निर्माण करेल. त्यांनी फक्त माझी उपासना करावी आणि इतर कुणालाही माझे समतुल्य ठरवू नये. तरीही जो जाणीवपूर्वक सत्य नाकारेल, तो निश्चितच विद्रोही आहे.

५६ नियमितपणे प्रार्थना करा, निर्धारित दानधर्म करा आणि प्रेषिताच्या आज्ञेनुसार वागा, म्हणजे तुम्हाला ईश्वराची कृपा लाभेल. ५७ सत्य नाकारणारे पृथ्वीवरची आमची योजना बिघडवून टाकतील असा विचारही मनात आणू नका. त्यांना नरकात जावे लागेल. हे निःसंशय गलिच्छ निवासस्थान आहे.

५८ श्रद्धावंतांनो! तुमच्या दासदासींनी आणि अज्ञान बालकांनीही तुमच्या भेटीस येण्यापूर्वी तीन वेळा परवानगी घ्यावी – प्रातःकालीन प्रार्थनेपूर्वी, दुपारच्या उष्म्यात तुम्ही अंगावरची वस्त्रे उतरवलेली असताना आणि सायंप्रार्थनेनंतर. या तुमच्या खाजगी वेळा आहेत. या वेळांव्यतिरिक्त तुम्ही परवानगीशिवाय एकमेकांना भेटलात तरी त्यात काही गैर नाही. अशा रीतीने ईश्वराने आपले साक्षात्कार तुमच्यासमोर प्रकट केले आहेत. तो सर्वज्ञ आणि सुज्ञ आहे. ५९ तुमची मुले वयात आल्यावर त्यांनीही आपल्या वडीलधाऱ्यांप्रमाणे परवानगी घेऊन घरात प्रवेश करावा. अशा रीतीने ईश्वराने आपले साक्षात्कार तुमच्यासमोर सुस्पष्ट केले आहेत. तो

सर्वज्ञ आणि सुज्ञ आहे. ६० विवाहाचे वय उलटून गेलेल्या प्रौढ स्त्रियांनी आपल्या वस्त्रावरची आवरणे दूर केली तरी चालेल. पण यातून आपल्या साजशृंगाराचे प्रदर्शन करू नये. तरीही त्यांनी बाह्य आवरण चढवून आपले रक्षण करणे चांगले. ईश्वर सगळे ऐकणारा, जाणणारा आहेत.

६१ तुमच्यापैकी आंधळ्याने, लंगड्याने, रुग्णाने किंवा तुम्ही स्वतः आपल्या घरात किंवा वडिलांच्या किंवा आईच्या घरात किंवा बहिणीच्या किंवा भावाच्या घरात किंवा चुलत्याच्या किंवा आत्याच्या घरात किंवा मामाच्या किंवा मावशीच्या घरात किंवा तुमच्या ताब्यात असलेल्या घरात किंवा मित्राच्या घरात भोजन घेणे गैर नाही. तुम्ही एकत्रित किंवा वेगवेगळे भोजन करणेही गैर नाही. पण परस्परांच्या घरी गेल्यावर एकमेकांना शांतीचे अभिवादन करा, जे तुमच्या पालनकर्त्याच्या आशीर्वादाने व पावित्र्याने भारावलेले असेल. अशा प्रकारे तुमच्या माहितीसाठी ईश्वराने आपल्या आज्ञा स्पष्ट केल्या आहेत.

६२ तेच खरे श्रद्धावंत आहेत जे ईश्वरावर व त्याच्या प्रेषितावर श्रद्धा ठेवतात. जेव्हा ते सामाईक संबंध असणाऱ्या कार्याविषयी प्रेषितासोबत असतात तेव्हा त्यांनी त्याची परवानगी घेतल्याशिवाय तिथून निघून जाऊ नये. अशी परवानगी घेणारे ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितावर खरा विश्वास ठेवतात. हे प्रेषिता! त्यांनी वैयक्तिक कार्यासाठी तुमच्याकडे परवानगी मागितली तर योग्य वाटेल त्यांना तशी परवानगी द्या आणि ईश्वराकडे त्यांच्यासाठी क्षमायाचना करा. ईश्वर क्षमाशील आणि दयाशील आहे.

६३ प्रेषिताने दिलेली हाक म्हणजे तुम्ही एकमेकांना देता तशी सामान्य हाक मानू नका. एक-दुसऱ्याचा आडोसा घेत गुपचुपपणे (प्रेषितासोबत होत असलेल्या चर्चेतून) निसटणाऱ्यांना ईश्वर चांगले ओळखतो. त्याच्या आज्ञेविरुद्ध चर्चा सोडून जाणाऱ्यांनी लक्षात घ्यावे, त्यांना कठीण प्रसंगाला

तोंड द्यावे लागेल किंवा वेदनादायी शिक्षा भोगावी लागेल. ६४ निःसंदेह, आकाश आणि पृथ्वीवर जे काही आहे ते ईश्वराच्या मालकीचे आहे. ईश्वर तुमची परिस्थिती यथार्थपणे जाणतो. ज्या दिवशी त्यांना ईश्वराकडे परत नेले जाईल त्या दिवशी ईश्वर त्यांच्या कर्माचा जाहीर घोष करेल. ईश्वराकडे सगळ्यांचे संपूर्ण ज्ञान आहे.

प्रकरण २५ : निकष
(अल्-फुरकान)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ पृथ्वीवासीयांना सावध करण्यासाठी, चांगल्या-वाईटाचे निकष आपल्या सेवकासमोर प्रकट केले, तो ईश्वर स्तुत्य आहे. २ आकाश आणि पृथ्वीचा सत्ताधीश असलेल्या ईश्वराला ना संतान झाले आहे ना त्याच्या सत्तेत कुणी भागीदार आहे. त्याने सर्वस्व निर्माण केले आणि निर्मिलेल्या प्रत्येक गोष्टीचे काटेकोर मोजमाप केले. ३ तरीही लोकांनी त्याच्याव्यतिरिक्त अशांना दैवत मानले, जे काहीही निर्माण करू शकत नाहीत तर इतरांनी त्यांना निर्माण केलेले आहे. त्यांच्याकडे ना स्वतःच्या नफ्या-तोट्याचे सामर्थ्य आहे, ना जन्म-मृत्यू किंवा पुनर्निर्माण त्यांच्या हातात आहे.

४ सत्य नाकारणारे म्हणतात, "हा प्रेषिताने स्वतः रचलेला बनाव आहे, ज्यात त्याला इतरांनी मदत केली आहे." त्यांचे हे बोलणे अयोग्य, खोटारडे आहे. ५ ते म्हणतात, "या तर प्राचीन लोकांच्या कथा आहेत, ज्या त्याने लिहून घेतल्या आहेत. सकाळी आणि संध्याकाळी अनेकजण त्याला या कथांचा मजकूर सांगत असत." ६ त्यांना सांगा, "ज्याला

आकाश आणि पृथ्वीवरचे प्रत्येक गुपित ठाऊक आहे अशा ईश्वराने हे सत्य अवतीर्ण केले आहे. खरोखर, तो अतिशय क्षमाशील आणि अतिशय दयाशील आहे.''

७ ते लोक विचारतील, ''आपल्यासारखाच बाजारहाट करणारा आणि आपल्यासारखेच अन्न खाणारा असला कसला हा प्रेषित? आपल्याला सावध करण्यासाठी ईश्वराने याच्याबरोबर आपल्या एखाद्या दूताला का पाठवले नाही? ८ ईश्वराने याला भरपूर संपत्ती किंवा उदरनिर्वाहासाठी बागबगीचा का नाही दिला?'' हे पापी म्हणतील, ''तुम्ही नक्कीच जादूटोणा करणाऱ्या माणसाचे अनुसरण करत आहात.'' ९ ''हे प्रेषिता! हे तुझ्याविषयी काय काय बोलतात पहा. निःसंशय, यांची वाट चुकलेली आहे. यांना योग्य वाट कधीच सापडू शकणार नाही.''

१० ईश्वर महान आहे. त्याच्या मनात आले तर तो तुम्हाला यापेक्षा कितीतरी चांगल्या गोष्टी देऊ शकतो; वाहत्या पाण्याचे प्रवाह असणारे बगीचे देऊ शकतो आणि महालही देऊ शकतो. ११ पण निवाड्याच्या दिवसावर यांचा विश्वास नाही. निवाड्याच्या दिवसावर अविश्वास दाखवणाऱ्यांसाठी आम्ही धगधगते अग्नीकुंड सज्ज ठेवले आहे. १२ दुरून त्याचे दर्शन होताच त्याचा आवेश आणि गर्जना त्यांच्या कानी पडेल. १३ त्यांना एकत्र जखडून त्या अरुंद अग्नीकुंडात फेकताच यातना असह्य होऊन ते मृत्युयाचना करू लागतील. १४ पण त्यांना सांगितले जाईल, ''आज एका मृत्यूची याचना करू नका, तुम्हाला असंख्य मरणे भोगावी लागतील.'' १५ अशा वेळी त्यांना विचारा, ''कुठली जागा चांगली आहे? ही की सदाचाऱ्यांना ज्याचे वचन मिळाले आहे तो चिरंतन स्वर्ग? सदाचाराने वागणाऱ्यांचा तो मोबदला आहे आणि तेच त्यांचे कायमचे निवासस्थान आहे.'' १६ तिथे त्यांचे कायमचे वास्तव्य असेल, तिथे त्यांना

हवी असलेली प्रत्येक गोष्ट मिळेल. हा तुमच्या पालनकर्त्याने दिलेला शब्द आहे, जो पाळायला तो वचनबद्ध आहे.

१७ निवाड्याच्या दिवशी, लोकांनी ईश्वराव्यतिरिक्त ज्यांना उपास्य मानले त्यांच्यासहित सगळ्यांना ईश्वर एकत्र करेल आणि त्या उपास्यांना विचारेल, "तुम्ही माझ्या सेवकांची दिशाभूल केलीत की ते स्वतःहून सन्मार्गापासून दूर भरकटले?" १८ यावर उपास्य उत्तर देतील, "तुझा महिमा अपरंपार आहे! तुझ्याशिवाय अन्य कुणाला पालनहार मानणे आम्हाला योग्य वाटत नाही. पण तूच त्यांना आणि त्यांच्या वाडवडिलांना ऐहिक जगातले सगळे ऐषोआराम दिलेस. त्यामुळे तुझ्या उपदेशाचा त्यांना विसर पडला आणि त्यांनी आपला विनाश ओढवून घेतला." १९ ईश्वर त्यांना म्हणेल, "पण आता त्यांनी सगळा खोटारडेपणा तुमच्या नावे खपवला आहे. तेव्हा तुम्ही ना शिक्षेपासून बचाव करू शकता, ना कुणाची मदत घेऊ शकता. कारण तुमच्यापैकी ज्यांनी अपकृत्य केले आहे, त्यांना आम्ही आमच्या कठोर शिक्षेची चव चाखायला लावू!"

२० बाजारहाट न करणाऱ्या आणि इतरांसारखेच अन्नाचे सेवन न करणाऱ्या कुणाही प्रेषिताला आम्ही तुमच्याआधी पाठवलेले नाही. कठीण परिस्थितीला तुम्ही धीराने तोंड देऊ शकता की नाही हे पाहण्यासाठी आम्ही तुम्हाला एकमेकांची परीक्षा घेण्याचे साधन बनवतो. तुमचा पालनकर्ता सर्व पाहणारा आहे.

२१ आमच्या भेटीची अपेक्षा नसणारे विचारतील, "ईश्वराने आमच्याकडे आपले दूत का पाठवले नाहीत? किंवा आम्ही आमच्या पालनकर्त्याला का पाहू शकत नाही?" खरोखर, त्यांना स्वतःबद्दल फारच अहंकार आहे. त्यांनी सगळ्या मर्यादा ओलांडल्या आहेत. २२ ईश्वराच्या दूतांची भेट हा अपराध्यांसाठी शुभवार्तेचा दिवस नसेल. त्यांना पाहताच

ते ओरडतील, "वाचवा! वाचवा!" २३ आम्ही त्यांना त्यांच्या प्रत्येक कृत्याचा जाब विचारू आणि त्यांची प्रत्येक कृती निष्प्रभ ठरवू. २४ निवाड्याच्या दिवशी स्वर्गातील रहिवाशांना उत्कृष्ट निवासस्थान आणि अतिआकर्षक विश्रामस्थान लाभेल.

२५ ज्या दिवशी आकाशातील ढग दुभंगून ईश्वराच्या दूतांना एकापाठोपाठ पृथ्वीवर उतरवले जाईल २६ त्या दिवसावर केवळ असीम कृपाळू ईश्वराची सत्ता असेल. सत्य नाकारणाऱ्यांसाठी तो दिवस कठीण असेल. २७ त्या दिवशी हे अपराधी आपलेच हात कुरतडत निराशेने म्हणतील, "मी प्रेषिताच्या मार्गावरून गेलो असतो तर किती चांगले झाले असते." २८ "भलत्या माणसाला सोबती म्हणून कधीच निवडले नसते तर किती चांगले झाले असते! २९ ईश्वराचा उपदेश माझ्यापर्यंत पोहोचला असला तरी त्यांनी मला त्याचा विसर पाडला. खरंच, सैतान माणसाची किती फसवणूक करतो!" ३० त्या दिवशी प्रेषित ईश्वराला सांगेल, "हे पालनकर्त्या! माझ्या लोकांनी कुरआनचा त्याग केलाय." ३१ अशाच प्रकारे प्रत्येक प्रेषितासाठी आम्ही पापी लोकांपैकी एकाला शत्रू म्हणून नेमतो. तुमचा पालनकर्ता मार्गदर्शक आणि सहाय्यक म्हणून तुमच्यासाठी पुरेसा आहे.

३२ सत्य नाकारणारे विचारतात, "कुरआन एकाच वेळेस प्रेषितावर का प्रकट झाले नाही?" तुमच्या मनाचे सामर्थ्य वाढावे यासाठी आम्ही ते या प्रकारे अवतरीत केले. आम्ही ते क्रमाक्रमाने तुमच्यावर प्रकट केले. ३३ प्रत्येक साक्षात्कारानंतर लोक त्यावर आक्षेप घेतील. पण आम्ही प्रत्येक साक्षात्काराचे सर्वोत्कृष्ट स्पष्टीकरण देऊ आणि सत्य तेच त्यांच्यासमोर आणू. ३४ योग्य मार्गापासून दूर भरकटलेल्यांना तोंडावर पालथे करून फरफटत नरकाकडे नेले जाईल. किती गलिच्छ निवासस्थानी त्यांना रहावे लागेल!

[३५] मोझेसला आम्ही पवित्र ग्रंथ दिला होता आणि त्याचा सहाय्यक म्हणून त्याचा भाऊ अहरोन याला नेमले होते. [३६] त्यांना आम्ही आज्ञा दिली, "आमचे संकेत नाकारणाऱ्यांकडे एकत्र होऊन जा!" आणि अपराध्यांचा आम्ही सर्वनाश केला. [३७] आपल्या प्रेषिताला नाकारणाऱ्या नोहाच्या जनसमुदायालाही आम्ही जलसमाधी दिली आणि मानवजातीला धडा घालून दिला. अशा अपराध्यांसाठी आम्ही वेदनादायी शिक्षेची तरतूद केली होती. [३८] आद, समूद यांचे समुदाय आणि खंदकवासी व त्यांच्या दरम्यानच्या कित्येक पिढ्या आम्ही अशाच गारद केल्या होत्या. [३९] त्यांच्यापैकी प्रत्येकाला आम्ही आधी सावधानतेचा इशारा दिला होता आणि नंतर आम्ही त्यांचा सर्वनाश करून टाकला. [४०] ज्यावर दगडांचा वर्षाव झाला आहे अशा नगरात या पाप्यांनी जायलाच हवे. अशी नगरे त्यांनी पाहिली नाहीत का? आणि ते पाहूनही त्यांचा पुनर्निर्माणावर विश्वास नाही का?

[४१] जेव्हाही ते तुम्हाला पाहतात, तेव्हा ते तुमची थट्टाच उडवतात. ईश्वराने ज्याला आपला प्रेषित म्हणून पाठवले तो हाच आहे की काय? [४२] आम्ही आमच्या दैवतांवर दृढ विश्वास ठेवला नसता तर याने निःसंशय आम्हाला त्यांच्यापासून दूर नेले असते! शिक्षेला सामोरे जाताना त्यांना कळेल, सन्मार्गापासून कोण फार दूर गेले आहे ते!

[४३] ज्याने आपल्या इच्छा-आकांक्षांनाच ईश्वर मानले आहे, अशा माणसाला तुम्ही पहात आहात ना? प्रेषिता! त्याला सन्मार्गावर आणण्याची (किंवा त्याला सन्मार्गावर कायम ठेवण्याची) जबाबदारी तुम्ही घेऊ शकता? [४४] त्यांच्यापैकी बहुतेकजण तुमचे बोलणे ऐकून घेतात किंवा ते त्यांना कळते असे तुम्हाला वाटते का? ते तर जनावरांसारखे नव्हे, त्यांच्याहूनही जास्त भरकटलेले आहेत.

४५ चढत्या दिवसाबरोबर तुमचा पालनकर्ता तुमच्या सावल्या कशा
लांबवतो हे तुम्ही पाहिले नाही का! त्याच्या मनात आले असते तर
त्याने सावली स्थिर केली असती. पण आम्ही सूर्याला तुमच्या सावलीचे
प्रमाण बनवले. ४६ दिवस उतरणीला लागताच आम्ही तुमची सावली
हळूहळू आमच्याकडे ओढून घेतो, तिला लहान लहान करत नेतो.
४७ रात्रीला विश्रांतीचे साधन बनवणारा आणि झोपेला टवटवीत करण्याचे
माध्यम बनवणारा ईश्वरच आहे. दिवसाच्या सुरुवातीला ताजेतवाने करून
तोच तुम्हाला जागे करतो.[अ] ४८ आपल्या कृपेचे दूत म्हणून तोच वाऱ्याला
पाठवतो आणि आकाशातून पाण्याचा वर्षाव करतो. ४९ त्यायोगे आम्ही
मृतवत् धरतीला सजीव करतो आणि आम्हीच निर्माण केलेल्या असंख्य
सजीवांची तहान भागवतो. तसेच जनावरांची आणि माणसांचीसुद्धा तहान
भागवतो.

५० अशाप्रकारे आमचे उपदेश गांभीर्याने घ्यावेत यासाठी आमचे
संकेत आम्ही हरप्रकारे स्पष्ट केले आहेत. पण त्यांच्यापैकी बहुतेकजण
कृतघ्नपणेच वागत आहेत. ५१ मनात आणले असते तर आम्ही प्रत्येक
भूप्रदेशात लोकांना सावध करणारा प्रेषित पाठवला असता. ५२ तेव्हा तुम्ही
सत्य नाकारणाऱ्यांच्या इच्छेपुढे मान तुकवू नका तर या कुरआनच्या
मदतीने आमचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवण्यासाठी अत्यंत कठोर
परिश्रम करा.

५३ वाहत्या पाण्याचे दोन प्रवाह प्रवाहित करणारा ईश्वरच आहे. एक

[अ] पृथ्वीच्या या व्यवस्थेत अनेक धडे आहेत. दिवसाचा प्रकाश जसा रात्रीच्या अंधाराच्या मागे येतो, त्याचप्रमाणे सत्याला असत्यावर विजय मिळवणे आवश्यक आहे. रात्री झोपल्यानंतर सकाळी उठणे हे मृत्युनंतरच्या जीवनात पुनर्निर्माणाचे प्रतीक आहे.

प्रवाह आहे गोड आणि ताजा, तर दुसरा आहे खारट आणि कडू. दोघांच्या दरम्यान त्याने अभेद्य अडसर उभा केला आहे. ५४ त्यानेच पाण्यापासून मानवाला निर्माण केले आणि त्यांना रक्ताचे त्याचप्रमाणे विवाहाचे बंध देऊ केले. तुमचा पालनकर्ता सर्वशक्तिमान आहे.

५५ तरीही ते ईश्वराव्यतिरिक्त अशा कुणाची तरी उपासना करतात, जे त्यांची ना हानी करू शकत, ना फायदा. सत्य नाकारणारा आपल्या पालनकर्त्याविरुद्ध जाऊन सैतानाची मदत करणार आहे. ५६ हे प्रेषिता! आम्ही तुला फक्त सुवार्ता देणारा आणि सावध करणारा दूत म्हणून पाठवले आहे. ५७ लोकांना सांगा, "याच्या बदल्यात मला तुमच्याकडून कसलाही मोबदला नको. फक्त एवढीच अपेक्षा करतो की तुम्ही स्वेच्छेने तुमच्या पालनकर्त्याकडे नेणाऱ्या योग्य मार्गाचा अवलंब करावा."

५८ चिरंतन आणि अमर अशा एकमेव ईश्वरावर विश्वास ठेवा. त्याला आपल्या सेवकांच्या अपकृत्यांची चांगलीच जाण आहे. त्याच्या स्तुतीसह त्याच्या असीम महानतेचे वर्णन करा. ५९ सहा कालखंडात आकाश, पृथ्वी आणि त्यांच्या दरम्यानच्या सगळ्या गोष्टी निर्माण करणारा आणि त्याच्या सिंहासनावर आरूढ होणारा तोच आहे – एकमेव कृपाळू ईश्वर. एखाद्या ज्ञानी व्यक्तीला त्याच्याविषयी विचारा.[अ ६०] "कृपाळू ईश्वरापुढे नतमस्तक व्हा" असे त्यांना सांगितल्यावर ते उद्दामपणे विचारतात, "कोण आहे हा आमच्यावर कृपा करणारा? तू म्हणतो म्हणून आम्ही त्याच्यासमोर नतमस्तक होऊ का?" यामुळे त्यांचा तिरस्कार अधिकच वाढतो.

६१ अथांग आहे तो ईश्वर ज्याने आकाशात नक्षत्रसमूह स्थापित

[अ] येथे सहा कालावधीचा अर्थ ईश्वराचे सहा कालखंड आहेत. मानवाच्या भाषेत याला सहा टप्पे म्हणता येईल. विश्वाची निर्मिती सहा टप्प्यात झाली हे सूचित करते की ते सुनियोजित पद्धतीने झाले आहे. जे काही योजना आणि विशिष्ट व्यवस्थेच्या आधारे अस्तित्वात आणले जाते, ते व्यर्थ ठरू शकत नाही.

केले, ज्यात आहे सूर्यरूपी लखलखीत दिवा आणि शीतल प्रकाशदायी चंद्र. ६२ त्यानेच एकापाठोपाठ दिवस आणि रात्रीची योजना केली. बोध घेणाऱ्यांसाठी आणि ईश्वराप्रति कृतज्ञ राहणाऱ्यांसाठी यात एक संकेत आहे.

६३ कृपावंत ईश्वराचे सच्चे सेवक तेच आहेत जे धरतीवर नम्रतेने वावरतात आणि अज्ञानी लोकांनी डिवचले तरी, "तुम्हाला शांती लाभो" एवढाच प्रतिसाद देतात. ६४ जे सगळी रात्र ईश्वरासमोर नतमस्तक होऊन त्याची क्षमायाचना करण्यात घालवतात, ६५ जे ईश्वराची प्रार्थना करतात, "हे पालनकर्ता! नरकवासाच्या शिक्षेपासून आमचा बचाव कर, कारण ही शिक्षा म्हणजे भयंकर छळवाद आहे. ६६ खरोखर, ते गलिच्छ आणि सैतानी निवासस्थान आहे." ६७ ते असे लोक आहेत जे उधळेही नाहीत आणि कंजूषही नाहीत, तर दोघांचे संतुलन साधतात.

६८ जे कधीही ईश्वराव्यतिरिक्त अन्य दैवताचा धावा करत नाहीत. जे कधीही व्यभिचार करत नाहीत की तसा हक्क असल्याशिवाय ईश्वराने पवित्र बनवलेल्या जीवाची हत्या करत नाहीत. जो कोणी असे (पापकृत्य) करेल, त्याला त्यासाठी शिक्षा भोगावीच लागेल. ६९ पुनर्निर्माणाच्या दिवशी त्याची शिक्षा दुप्पट केली जाईल आणि त्याला कायम दुःखी अवस्थेत रहावे लागेल. ७० पश्चातापदग्ध होऊन जे ईश्वरावर विश्वास ठेवतील आणि सत्कर्मे करतील त्यांनाच यातून सुटका मिळेल. अशांची अपकृत्ये ईश्वर सत्कृत्यात बदलून टाकेल. तो अतिशय दयाशील, अतिशय क्षमाशील आहे. ७१ पश्चातापदग्ध होऊन जो सत्कृत्ये करू लागतो तो खऱ्या अर्थाने ईश्वराभिमुख आहे.

७२ ईश्वराचे खरे सेवक ते आहेत, जे खोटी साक्ष देत नाहीत आणि विवेकशून्य गोष्टींशी गाठ पडली तरी सभ्यपणे त्यापासून दूर निघून जातात. ७३ जे त्यांच्या पालनकर्त्याची आठवण करून दिल्यावर त्याकडे दुर्लक्ष

करत नाहीत की ऐकून न ऐकल्यासारखे करत नाहीत. ७४ जे ईश्वराची
प्रार्थना करतात, "हे पालनकर्त्या! आम्हाला आमच्या पत्नीत आणि
मुलाबाळांच्यात समाधान लाभू दे आणि सदाचारी लोकांसाठी आम्हाला
आदर्श बनव."

७५ हे असे लोक आहेत ज्यांना त्यांच्या संयमाच्या मोबदल्यात स्वर्गात
आलिशान महाल लाभतील आणि तिथे शांतीच्या सदिच्छेसह त्यांचे
स्वागत केले जाईल. ७६ तिथे त्यांचे कायमचे वास्तव्य असेल. ते ईश्वरी
कृपेने पावन झालेले निवासस्थान असेल. ७७ हे प्रेषिता! कृतघ्न लोकांना
विचारा, "तुम्ही ईश्वराचा धावा केला नाहीत तर त्याने तुमची काळजी
का घ्यावी? असे करून तुम्ही खरोखर सत्य नाकारले आहे. तुमच्यावर
त्याच्या शिक्षेचा घाला पडणार हे नक्की!"

प्रकरण २६ : कवी
(अश्-शुअरा)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ता सीन मीम २ सत्य स्पष्ट करणाऱ्या ग्रंथातील ही वचने आहेत.
३ कदाचित असेही होईल की लोकांनी त्यावर विश्वास न ठेवल्याने
दुःखातिरेकाने तुम्ही स्वतःला संपवून टाकाल. ४ पण आम्हाला वाटले
असते तर आम्ही आकाशातून असा संकेत त्यांच्यासमोर प्रकट केला असता
की निखालस नम्रतेने त्यांचे मस्तक झुकले असते. ५ जेव्हाही त्यांच्याकडे
कृपाळू ईश्वराकडून नवीन उपदेश येतो त्याकडे ते नेहमी दुर्लक्ष करतात.
६ त्यांनी खरोखर ईश्वराचा संदेश अव्हेरला आहे. पण त्यांनी ज्या गोष्टीची
खिल्ली उडवली त्यातील सत्य लवकरच त्यांच्यासमोर येईल.

७ पृथ्वीकडे आणि त्यावर आम्ही उगवलेल्या हरत-हेच्या उपयोगी

वस्तूंकडे त्यांचे लक्ष जात नाही का? ८ यात नक्कीच एक संकेत आहे,
तरीही त्यांच्यापैकी बहुतेकांचा त्यावर विश्वास बसत नाही. ९ निःसंशय,
तुमचा पालनकर्ता सर्वशक्तिमान, दयाळू आहे.

१० तुमच्या पालनकर्त्याने मोझेसला आज्ञा दिली होती, "अपकृत्य
करणाऱ्यांकडे जा." ११ म्हणजेच फारोच्या समाजबांधवांकडे जा. चुकीचे
वागताना त्यांना ईश्वराचे भय वाटत नाही का? १२ यावर मोझेसने त्याला
उत्तर दिले, "हे पालनकर्त्या! ते मला नाकारतील याची भीती वाटते.
१३ माझ्या छातीवर दडपण आले आहे, बोलताना जीभ अडखळते आहे.
तेव्हा अहरोनलाही माझ्याबरोबर पाठव. १४ शिवाय पूर्वी त्यांनी माझ्यावर
गुन्हा केल्याचा आरोप केला होता. त्यासाठी ते मला मृत्युदंड देतील
याचीही भीती वाटते आहे."

१५ यावर ईश्वराने त्याला धीर दिला, "ते तुला काही अपाय करणार
नाहीत याची खात्री बाळग. तुम्ही दोघे मिळून आमचे संकेत घेऊन
त्यांच्याकडे जा. आम्ही तुमच्याबरोबर आहोत. तुमच्या बोलण्यावर
लक्ष ठेवून आहोत." १६ फारोकडे जाऊन दोघे मिळून त्याला सांगा,
"आम्ही या जगताच्या पालनकर्त्याचे दूत आहोत. १७ तेव्हा इस्राएलच्या
वंशजांना आमच्याबरोबर येऊ दे!" १८ यावर फारोने मोझेसला विचारले,
"बालपणी आम्हीच तुला वाढवले नाही का? जीवनातली कित्येक वर्षे तू
आमच्याबरोबर घालवली आहेस. १९ तरीही तू चुकीचे वागलास. अगदी
कृतघ्न आहेस तू!"

२० यावर मोझेसने उत्तर दिले, "जेव्हा मी दिशाभूल झालेल्यांपैकी एक
होतो तेव्हा तुमच्याबरोबर होतो. २१ आणि मी तुमच्यातून पळून गेलो.
कारण मला भीती वाटत होती. इथून गेल्यानंतर माझ्या पालनकर्त्याने मला
विवेकशक्ती दिली आणि मला आपल्या प्रेषितांपैकी बनवले. २२ ज्या

उपकारासाठी तू माझा उपहास करत आहेस तो हाच ना की तू इस्राएलच्या
वंशजांना गुलामगिरीत ठेवले आहेस?"
२३ फारोने त्याला विचारले, "कोण आहे हा विश्वाचा पालनकर्ता?"
२४ मोझेसने सांगितले, "तुझा विश्वास असेल तर सांगतो. तो आकाशाचा,
पृथ्वीचा आणि त्यादरम्यान जे काही आहे त्या सगळ्यांचा स्वामी आहे."
२५ हे ऐकून फारोने आपल्या आजूबाजूच्या लोकांना विचारले, "ऐकले
का याचे बोलणे?" २६ मोझेसने पुढे सांगितले, "तो तुमचाही पालनकर्ता
आहे, तुमच्या पूर्वजांचाही." २७ फारो म्हणाला, "या ज्या प्रेषिताला
आपल्याकडे पाठवले आहे तो नक्कीच वेडा आहे." २८ मोझेस म्हणाला,
"तो पूर्वेचा, पश्चिमेचा आणि त्यादरम्यानच्या प्रत्येक गोष्टीचा मालक
आहे. पण हे तुम्ही कळवून घ्याल तर!" २९ फारोने त्याला तंबी दिली,
"माझ्याशिवाय कुणाला दैवत मानशील तर मी तुला तुरुंगात टाकेन."
३० यावर मोझेसने विचारले, "ईश्वराचा स्पष्ट संकेत दाखवला तरी?"
३१ फारो म्हणाला, "खरे बोलत असशील तर दाखवच त्याचा संकेत."
३२ मोझेसने आपल्या हातातली छडी जमिनीवर टाकून दिली. अचानक
त्या जागी वळवळता साप दिसू लागला. सगळ्यांना तो स्पष्टपणे दिसत
होता. ३३ मोझेसने त्याच्यासमोर हात पसरताच पाहणाऱ्यांना तो चमकदार
शुभ्र रंगाचा दिसू लागला. ३४ फारोने आपल्या भोवतालच्या राजदरबारींना
विचारले, "हा नक्की कुशल जादूगार दिसतोय. ३५ आपल्या जादूच्या
प्रभावाने तो तुम्हाला आपल्या भूमीवरून हुसकावून लावू पाहतोय.
त्याच्याविषयी तुमचा काय सल्ला आहे?"
३६ राजदरबारी म्हणाले, "याला आणि याच्या भावाला थोडा वेळ इथे
थांबवू या. तोपर्यंत नगरात आपले दूत पाठवा. ३७ नगरातल्या सगळ्या
कुशल जादूगारांना ते निरोप देतील." ३८ या सूचनेनुसार ठरलेल्या दिवशी

शहरातले सगळे जादूगार जमले. ३९ त्या ठिकाणी सर्व जनतेलाही येण्याचे
आमंत्रण होते. ४० म्हणजे या जादूगारांची जादू त्यांनाही पाहता आली
असती. कोण विजयी ठरतो ते त्यांनाही पाहता आले असते. ४१ सगळ्या
जादूगारांनी फारोला विचारले, "आम्ही जिंकलो तर काही बक्षीस
मिळेल ना?" ४२ फारोने सांगितले, "नक्कीच! तुम्हाला माझ्या जवळच्या
लोकांमध्ये स्थान मिळेल."

४३ मोझेसने जादूगारांना सांगितले, "दाखवा तुमच्या जादूची कमाल!"
४४ जादूगारांनी आपल्या हातातले दोर आणि छड्या हवेत फिरवल्या आणि
म्हणाले, "फारोच्या आशीर्वादाने आम्ही नक्कीच जिंकू!" ४५ त्यांच्यानंतर
मोझेसने आपल्या हातातली छडी हवेत फिरवली. जादूगारांनी निर्माण केलेल्या
गोष्टी तिने गिळून टाकल्या. ४६ हे पाहताच जादूगारांनी शरणागती पत्करली.
४७ ते म्हणू लागले, "जगाच्या पालनकर्त्यावर आमचा विश्वास बसला आहे.
४८ मोझेस आणि अहरोनचा पालनकर्ता हा जगाचा पालनकर्ता आहे."

४९ फारोने संतप्त होऊन विचारले, "मी परवानगी देण्याआधीच
त्याच्यावर विश्वास ठेवलात? तो नक्कीच तुमचा गुरू आहे, ज्याने तुम्हाला
जादूचे धडे दिले आहेत. थांबा मी तुम्हाला अद्दल घडवतो. मी तुमचे
विरुद्ध बाजूचे हातपाय कापून काढीन आणि तुम्हाला सुळावर चढवीन."
५० जादूगारांनी उत्तर दिले, "यात आमचे काहीच नुकसान नाही. आम्ही
तर आमच्या पालनकर्त्याकडेच परत जाऊ. ५१ आशा करतो की आमचा
पालनकर्ता आम्हाला माफ करेल. कारण त्याच्यावर सगळ्यात आधी
आम्ही विश्वास ठेवला आहे."

५२ त्यानंतर आम्ही मोझेसकडे आमची इच्छा व्यक्त केली, "माझ्या
सेवकांना घेऊन रातोरात इथून निघून जा. दिवसाउजेडी निघालात तर
नक्कीच तुमचा पाठलाग केला जाईल." ५३ आणि खरेच फारोने सर्व

नगरामध्ये दवंडी देणारे आपले दूत पाठवले. ५४ हे लोक संख्येने अगदीच
कमी आहेत. ५५ आणि त्यांनी आम्हाला संतप्त केले आहे. ५६ आमची
फौज अवाढव्य आणि दक्ष आहे. ५७ (या अपराध्यांना) आम्ही त्यांना
त्यांचे बगीचे आणि जलस्त्रोत सोडायला लावले, ५८ आणि त्यांच्या
संपत्तीचा व आलिशान निवासस्थानांचाही त्याग करायला लावला.
५९ त्यानंतर इस्त्राएलच्या वंशजांना आम्ही या वरदानांचे वारसदार बनवले.
६० सूर्योदय होताच फारो आणि त्याचे लोक मोझेसचा पाठलाग करू
लागले. ६१ दोन्ही गट एकमेकांच्या नजरेच्या टप्प्यात येताच मोझेसचे
सोबती म्हणू लागले, "आपण नक्कीच पराभूत होणार आहोत." ६२ मोझेसने
त्यांना धीर दिला, "नाही! माझा पालनकर्ता माझ्याबरोबर आहे. तो मला
मार्गदर्शन देईल." ६३ नंतर आम्ही मोझेसला हातातल्या छडीने समुद्रावर
प्रहार करायला सांगितले. तसे केल्याबरोबर समुद्र दुभंगला. त्याचा प्रत्येक
भाग महाकाय पर्वतासारखा होता. ६४ दरम्यान आम्ही दुसऱ्या गटालाही
त्या ठिकाणी यायला लावले. ६५ मोझेस आणि त्याच्या सोबत्यांची आम्ही
तिथून सुटका केली ६६ तर इतरांना जलसमाधी दिली. ६७ यात नक्कीच
संकेत आहे, पण त्यांच्यापैकी बरेचजण यावर विश्वास ठेवत नाहीत.
६८ खरोखर तुमचा पालनकर्ता सर्वशक्तिमान आहे, दयाळू आहे.
६९ हे प्रेषिता! लोकांना अब्राहामची कथा ऐकवा. ७० जेव्हा त्याने
आपल्या वडिलांना आणि समाजातील लोकांना विचारले, "तुम्ही कुणाची
उपासना करत आहात?" ७१ तेव्हा त्यांनी उत्तर दिले, "आम्ही मूर्तींची
उपासना करतो आणि आमचा त्यांच्यावर कायम दृढ विश्वास राहील."
७२ आब्राहामने त्यांना पुन्हा विचारले, "संकटकाळी जेव्हा त्यांचा धावा
करता तेव्हा ते तुमचा धावा ऐकतात का? ७३ ते तुम्हाला मदत किंवा

अपाय करू शकतात का?" ७४ लोकांनी उत्तर दिले, "पण आम्ही आमच्या वाडवडिलांना असेच करताना पाहिले आहे."

७५ अब्राहामने विचारले, "तुम्ही ज्यांची उपासना करता, त्यांचा कधी मनापासून विचार केला आहे का? ७६ तुम्ही आणि तुमचे पूर्वज ज्यांची उपासना करता, ७७ ते सगळे माझे शत्रू आहेत. या विश्वाचा पालनकर्ता मात्र माझा शत्रू नाही. ७८ त्याने मला निर्माण केले आणि तोच मला मार्गदर्शन देतो. ७९ तोच मला अन्नपाणी देतो. ८० आजारपणातून तोच मला बरे करतो. ८१ तोच मला मृत्यू देईल आणि पुन्हा जीवन देईल ८२ मी आशा करतो, निवाड्याच्या दिवशी तो माझ्या चुका माफ करेल.

८३ हे पालनकर्त्या! मला विवेक दे, सदाचारी लोकांची संगत दे. ८४ नंतर येणाऱ्या पिढ्यांमध्ये माझे चांगले नाव होऊ दे. ८५ तुझ्या आशीर्वादाने उपकृत झालेल्या स्वर्गात माझे वास्तव्य असू दे. ८६ माझ्या वडिलांना क्षमा कर, कारण त्यांची दिशाभूल झाली आहे. ८७ ज्या दिवशी सगळ्या लोकांना पुनरूज्जीवत केले जाईल त्या दिवशी माझी मानहानी करू नकोस. ८८ त्या दिवशी संपत्ती आणि संतती कामी येणार नाही. ८९ आणि प्रांजळ मनाने ईश्वरासमोर येणाराच त्या दिवशी सुरक्षित राहील."

९० त्या दिवशी ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांना स्वर्गाजवळ आणले जाईल. ९१ दिशाभूल झालेल्यांना नरक दाखवला जाईल. ९२ त्यांना विचारले जाईल, "तुम्ही ईश्वराव्यतिरिक्त ज्यांची उपासना करत होता ते कुठे आहेत?" ९३ ते तुम्हाला किंबहुना स्वतःला तरी मदत करू शकतात का? ९४ त्यांना आणि त्यांच्या उपास्यांना फरफटत नरकात आणले जाईल. ९५ सैतानाच्या सहकाऱ्यांनाही त्यांच्यासोबत नरकात ढकलले जाईल. ९६ नरकात एकत्र आल्यावर त्यांचे आपसात वाद होऊ लागतील. ९७ ते म्हणतील, "आमची धडधडीत दिशाभूल झाली होती.

९८ म्हणूनच आम्ही विश्वाच्या पालनकर्त्याची बरोबरी इतरांशी केली.”
९९ या पाप्यांनीच आम्हाला असा चुकीचा मार्ग दाखवला. १०० आता
आम्हाला कुणीही वाली उरला नाही. १०१ कुणीही प्रामाणिक मित्र
राहिला नाही. १०२ आम्हाला पुन्हा एकदा जगात आणले तर आम्ही
ईश्वरावर विश्वास ठेवू.” १०३ यात निश्चितच ईश्वराचा संकेत आहे, पण
बहुतेकजण त्यावर विश्वास ठेवत नाहीत. १०४ निःसंशय, तुमचा पालनकर्ता
सर्वशक्तिमान आहे, कृपाळू आहे.

१०५ नोहाच्या समाजानेही प्रेषितांना असेच अव्हेरले होते.
१०६ त्यांच्या बांधवाने, नोहाने त्यांना विचारले, “तुम्हाला ईश्वराचे भय
वाटत नाही का? १०७ मी तुमच्यासाठी त्याचा संदेश आणणारा विश्वासू
प्रेषित आहे. १०८ ईश्वराचे भय बाळगा आणि माझ्या आज्ञेचे पालन करा.
१०९ याच्या मोबदल्यात मला तुमच्याकडून काहीही अपेक्षा नाही. माझा
मोबदला फक्त या विश्वाचा पालनकर्ता देईल. ११० तेव्हा त्याचे भय
बाळगा आणि माझी आज्ञा मोडू नका.” १११ त्याच्या समाजबांधवांनी
त्याला विचारले, “आम्ही तुझ्या बोलण्यावर कसा विश्वास ठेवू, जेव्हा
की हीनाहूनही हीन लोक तुझ्या सांगण्याप्रमाणे वागत आहेत?” ११२ नोहाने
विचारले, “ते कसे वागतात हे मला कुठून माहीत असणार? ११३ माझा
पालनकर्ता सगळ्यांच्या वागण्याचा हिशेब ठेवतो. पण हे तुम्हाला कळेल
तर ना? ११४ मी कुणालाही त्याच्या श्रद्धेपासून दूर करायला आलेलो नाही.
११५ मी तर फक्त सावध करायला आलो आहे.”

११६ त्यांनी नोहाला सांगितले, “तू हे थांबवले नाहीस तर तुला दगडांनी
ठेचून मारू.” ११७ नोहाने ईश्वराकडे प्रार्थना केली, “हे पालनकर्त्या!
माझ्या लोकांनी मला नाकारले आहे. ११८ तेव्हा त्यांच्यात आणि माझ्यात
निवाडा कर आणि मला व माझ्याबरोबर असणाऱ्या श्रद्धावंतांना सुरक्षित

ठेव.” [११९] तेव्हा आम्ही त्याला सुरक्षित ठेवले आणि त्याच्याबरोबर
नौकेत असणाऱ्यांनाही सुरक्षित ठेवले [१२०] तर उरलेल्यांना जलसमाधी
दिली. [१२१] यात नक्कीच संकेत आहे, पण त्यांच्यापैकी पुष्कळजण त्यावर
विश्वास ठेवत नाहीत. [१२२] निःसंशय, तुमचा पालनकर्ता सर्वशक्तिमान
आहे, दयाळू आहे.

[१२३] आदच्या जनसमूहानेही (त्यांच्यासाठी ईश्वराचा संदेश घेऊन
आलेल्या) प्रेषितांना नाकारले. [१२४] त्यांच्या बंधूने, हूदने त्यांना विचारले,
“तुम्ही ईश्वराला घाबरून राहणार नाही का? [१२५] मी त्याचा विश्वासू
प्रेषित बनून तुमच्याकडे आलो आहे. [१२६] तेव्हा ईश्वराचे भय बाळगा
आणि माझे अनुसरण करा. [१२७] याच्या मोबदल्यात मला तुमच्याकडून
काहीही नको; माझा मोबदला फक्त या विश्वाचा पालनकर्ता देऊ शकतो.
[१२८] तुम्ही गर्वाने प्रत्येक उंच ठिकाणी स्मारके उभी करता [१२९] आणि
भव्य महाल उभे करता, जणूकाही तुम्ही तिथे कायमचे निवास करणार
आहात. [१३०] जेव्हा एखाद्यावर आपले हात टाकता, तेव्हा एखाद्या जुलमी
माणसाप्रमाणे त्याच्याशी वर्तन करता. [१३१] तेव्हा ईश्वराचे भय बाळगा
आणि माझ्या आज्ञेचे पालन करा. [१३२] ईश्वराचे भय बाळगा, त्यानेच
तुम्हाला सर्वकाही दिले आहे हे तुम्हाला माहीत आहे. [१३३] त्याने तुम्हाला
संतती आणि विपुल गुरेढोरे दिली. [१३४] बगीचे आणि त्यातून वाहणारे झरे
दिले. [१३५] खरोखर, निवाड्याच्या भयंकर दिवशी तुम्हाला भयानक शिक्षा
मिळेल, याची मला भीती वाटते.”

[१३६] त्यांनी उत्तर दिले, “तू आम्हाला उपदेश केलास काय, नाही काय,
आम्हाला काही फरक पडणार नाही. [१३७] प्राचीन काळापासून लोकांची ही
सवय आहे. [१३८] आम्हाला काहीही शिक्षा होणार नाही.” [१३९] अशारीतीने
त्यांनी आमच्या प्रेषिताला नाकारले तेव्हा आम्ही त्यांचा सर्वनाश केला.

यात नक्कीच एक संकेत आहे, पण त्यांच्यापैकी बहुतेकजण यावर विश्वास
ठेवणार नाहीत. १४० निःसंशय, तुमचा पालनकर्ता सर्वशक्तिमान आहे,
दयाळू आहे.
१४१ समूदच्या जमातीनेही त्यांच्या प्रेषिताला खोटे ठरविले होते.
१४२ सालेह या त्यांच्या समाजबांधवाने त्यांना विचारले, "तुम्ही ईश्वराला
घाबरत नाही का? १४३ खरोखर, मी ईश्वराचा विश्वासू प्रेषित म्हणून
तुमच्याकडे आलो आहे. १४४ तेव्हा ईश्वराची भीती बाळगा आणि माझ्या
आज्ञेचे पालन करा. १४५ याच्या बदल्यात माझे तुमच्याकडून काहीही
मागणे नाही. माझा मोबदला तर फक्त या विश्वाचा अधिपती देऊ शकतो.
१४६ तुम्ही चिरंजीव होणार आहात असे तुम्हाला वाटते का? १४७ या
बगीच्यांमध्ये आणि निर्झरांमध्ये, १४८ धान्य शेतांमध्ये आणि खजुरांनी
लगडलेल्या झाडांमध्ये कायमसाठी राहणार आहात का? १४९ अभिमानाने
कौशल्य पणाला लावून, पर्वतांना कोरून भव्य महाल कशासाठी बांधत
आहात? १५० ईश्वराची भीती बाळगा आणि माझ्या आज्ञेचे पालन करा.
१५१ मर्यादा सोडून वागणाऱ्यांचे बंधन मानू नका. १५२ जे समाजसुधारणा
करण्याऐवजी पृथ्वीवर भ्रष्ट आचरण करत आहेत."
१५३ यावर त्याच्या समाजबांधवांनी उत्तर दिले, "तू नक्कीच जादूटोणा
करणारा आहेस. १५४ तू तर आमच्यासारखाच मनुष्यप्राणी आहेस. खरे
बोलत असशील तर तुझ्या पालनकर्त्याचा एखादा संकेत आम्हाला
दाखव." १५५ तो म्हणाला, "हा पहा संकेत. ही एक उंटीण आहे. जशी
तुमची पाणी पिण्याची वेळ ठरलेली आहे, तशीच तिचीही एक वेळ
ठरलेली असेल. १५६ तेव्हा तिला काही अपाय करू नका, नाही तर
तुमच्यावर भयानक शिक्षा ओढवेल." १५७ तरीही त्यांनी त्या उंटिणीला
ठार केले. नंतर त्यांना या कृत्याचा पश्चाताप झाला, पण त्याचा काही

उपयोग नव्हता. १५८ ईश्वरी शिक्षेने त्यांना वेढून घेतले. यात नक्कीच एक संकेत आहे, पण त्यांच्यापैकी बहुतेकांचा यावर विश्वास बसणार नाही. १५९ तुमचा अधिपती सर्वशक्तिमान आहे, दयाळू आहे.

१६० यानंतर लूतच्या समाजानेही प्रेषितांना नाकारले. १६१ जेव्हा त्यांच्या लूत या बंधूने त्यांना विचारले, "तुम्ही ईश्वराचे भय बाळगत नाही का? १६२ मी त्याचा विश्वासू पैगंबर बनून तुमच्याकडे आलो आहे. १६३ तेव्हा ईश्वराची भीती बाळगा आणि माझ्या आज्ञेचे पालन करा. १६४ याच्या मोबदल्यात मला तुमच्याकडून काहीही नको. माझा मोबदला फक्त विश्वाचा अधिपतीच देऊ शकतो. १६५ तुम्ही वासनापूर्तीसाठी पुरुषांकडे जाता, १६६ आणि ईश्वराने तुमच्यासाठी निर्माण केलेल्या पत्नींपासून दूर राहता? तुम्ही तर सगळ्या मर्यादांच्या पलीकडे पोहोचले आहात."

१६७ त्यांनी लूतला सांगितले, "तुझा हा उपदेश थांबवला नाहीस तर नक्कीच तुला हद्दपार करून टाकू." १६८ लूत म्हणाला, "मी तुमच्या मार्गांचा तिरस्कार करणाऱ्यांपैकी आहे." १६९ "हे पालनकर्त्या! यांच्या दुष्कृत्यांपासून माझा आणि माझ्या कुटुंबाचा बचाव कर." १७० आम्ही त्याला आणि त्याच्या सगळ्या कुटुंबियांना वाचवले. १७१ फक्त मागे राहिलेल्या एका वृद्धेला सोडून. (पैगंबर लूत यांची पत्नी सत्य नाकारण्यात ठाम राहिली होती.) १७२ त्यानंतर उरलेल्या सगळ्यांचा आम्ही पुरता विध्वंस करून टाकला. १७३ आम्ही त्यांच्यावर विनाशक पाऊस पाडला. सावधगिरीची पूर्वसूचना दिल्यानंतर पडलेला तो पाऊस किती वाईट होता. १७४ यात निःसंशय एक संकेत आहे, पण त्यांच्यापैकी बहुतेकांचा यावर विश्वास बसणार नाही. १७५ तुमचा पालनकर्ता सर्वशक्तिमान आहे, कृपाळू आहे.

[१७६] जंगलात राहणाऱ्या 'अयका' या जमातीनेही त्याच्या प्रेषिताला
असेच धिक्कारले होते. [१७७] शुऐबने त्यांना विचारले, "तुम्हाला ईश्वराचे भय
वाटत नाही का? [१७८] मी त्याचा विश्वासू प्रेषित बनून तुमच्याकडे आलो
आहे. [१७९] तेव्हा ईश्वराचे भय बाळगा आणि माझ्या आज्ञेचे पालन करा.
[१८०] याच्या मोबदल्यात मला तुमच्याकडून काहीही नको. माझा मोबदला
फक्त या विश्वाचा अधिपतीच देईल. [१८१] कुणालाही देताना पुरेपूर माप द्या,
कुणाचेही नुकसान करू नका. [१८२] मोजण्यासाठी अचूक तराजूचा वापर करा.
[१८३] लोकांच्या न्याय्य हक्काचे जे आहे, त्यासाठी त्यांची फसवणूक करू
नका. पृथ्वीवर अनाचार माजवू नका. [१८४] तुम्हाला आणि तुमच्या पूर्वजांना
निर्माण केलेल्या ईश्वराचे भय बाळगा."

[१८५] त्यांनी उत्तर दिले, "तू भारावलेला आहेस. [१८६] तू आमच्यासारखाच
मनुष्यप्राणी आहेस. आम्हाला वाटतं तू खोटारडाही आहेस. [१८७] खरे
बोलत असशील तर आकाशाचा एक तुकडा आमच्यावर कोसळवून
दाखव." [१८८] शुऐबने उत्तर दिले, "तुमची सगळी कृत्ये माझा ईश्वर
चांगलीच ओळखून आहे." [१८९] त्यांनी शुऐबला नाकारले आणि त्यांना
अंधारलेल्या, कोंदटलेल्या दिवसाची शिक्षा भोगावी लागली. तो खरोखर
भयंकर शिक्षेचा दिवस होता. [१९०] यात निःसंशय एक संकेत आहे,
पण बहुतेकांचा यावर विश्वास बसणार नाही. [१९१] तुमचा पालनकर्ता
सर्वशक्तिमान आहे, कृपावंत आहे.

[१९२] हा निःसंशय विश्वाच्या पालनकर्त्याकडून आलेला साक्षात्कार
आहे. [१९३] हे प्रेषिता! एका विश्वासार्ह आत्म्याने हा साक्षात्कार, [१९४] तुझ्या
अंतःकरणात आणला आहे. हे यासाठी की तू लोकांना सावध करावेस,
[१९५] तू हे लोकांना शुद्ध अरेबिक भाषेत सांगावेस. [१९६] निःसंशय, प्राचीन

ग्रंथांमध्ये हे सांगितले आहे. [१९७] इस्त्राएलच्या संततीपैकी धर्माचे ज्ञान असणाऱ्यांना, सत्याचे आकलन व्हायला हा पुरावा पुरेसा नाही का?

[१९८] अरब नसणाऱ्या एखाद्या व्यक्तीवर आम्ही ते अवतरीत केले असते, [१९९] आणि त्यांनी ते अरबांना सांगितले असते तर त्यांनी त्यावर विश्वास ठेवला नसता. [२००] अशा रीतीने आम्ही पाप्यांच्या मनात सत्य नाकारण्याचा विचार आणवला. [२०१] कठोर शिक्षा समोर दिसेपर्यंत ते त्यावर विश्वास ठेवणार नाहीत. [२०२] त्यांच्या ध्यानीमनी नसताना अवचित त्यांच्यावर ही शिक्षा कोसळेल. [२०३] मग ते विचारतील, "आम्हाला थोडीशी उसंत मिळेल का?"

[२०४] आमची शिक्षा त्यांना लवकरात लवकर भोगायची आहे का? [२०५] हे प्रेषिता! विचार कर! काही वर्षे आम्ही त्यांना जीवनाचा उपभोग घेऊ दिला, [२०६] आणि त्यानंतर वचन दिलेली शिक्षा त्यांच्यावर कोसळवली, [२०७] तर मग हे सुखोपभोग त्यांच्या काय कामी येतील? [२०८] सावधानतेचा इशारा देण्यासाठी प्रेषिताला पाठवल्याशिवाय आम्ही कधीही कुठलीही वस्ती उध्वस्त केली नाही. [२०९] त्याची आठवण करून देण्यासाठी नेहेमी आम्ही आमचा प्रेषित पाठवतो. आम्ही कधीही कुणावर अन्याय केलेला नाही. [२१०] कुरआन पृथ्वीतलावर आणणारे सैतान नव्हते. [२११] त्यांची तेवढी कुवतही नाही आणि ते तेवढे सक्षमही नाहीत. [२१२] खरे तर ते ऐकण्यासही त्यांना अटकाव केला आहे.

[२१३] तेव्हा ईश्वराशिवाय अन्य कुठल्याही दैवताची उपासना करू नका, अन्यथा तुम्हाला त्याच्या शिक्षेचा सामना करावा लागेल. [२१४] तुमच्या जवळच्या नातलगांना त्याची सूचना द्या. [२१५] तुमचे अनुसरण करणाऱ्या श्रद्धावंतांवर दया दाखवा, प्रेम करा. [२१६] त्यांनी तुमचा आज्ञाभंग केला तर सांगा, "तुमच्या कृत्यांना मी जबाबदार नाही." [२१७] सर्वशक्तिमान,

कृपावंत ईश्वरावर भरवसा ठेवा. [२१८] तुम्ही प्रार्थनेसाठी उभे राहता, तेव्हा तुमचे जो अवलोकन करतो आणि [२१९] प्रार्थना करणाऱ्यांसोबत तुम्ही वावरत असतानाही तुमच्यावर लक्ष ठेवतो. [२२०] तो सर्व ऐकणारा, सर्व जाणणारा आहे.

[२२१] सैतान कुणाचा ताबा घेतो ते सांगू का? [२२२] प्रत्येक दुष्ट पाप्यांचा तो ताबा घेतो. [२२३] जे खोटे बोलतात आणि त्यांच्यापैकी बहुतेकजण खोटारडे आहेत. [२२४] कवींच्या बाबतीत सांगायचे तर, त्यांचे अनुसरण करणाऱ्यांची दिशाभूल झालेली आहे. [२२५] ते दऱ्याखोऱ्यातून कसे निरूद्देश भटकत आहेत, तुम्ही पाहिले नाही का? [२२६] ते अशा गोष्टींचे उपदेश करतात, जे स्वतः कधीच आचरणात आणत नाहीत. [२२७] याउलट सच्चे श्रद्धावंत सत्कर्मे करतात, कृतज्ञतापूर्वक ईश्वराचे स्मरण करतात आणि त्यांच्यावर हल्ला झाला तरच स्वतःचा बचाव करतात. अपराध्यांना लवकरच कळेल, त्यांची कुकर्मे कसे वाईट वळण घेतात ते!

प्रकरण २७ : मुंग्या (अन्-नम्ल)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] ता सीन. ही वचने कुरआनमधील आहेत, जो ग्रंथ सगळ्या गोष्टी उलगडून सांगतो. [२] यात श्रद्धावंतांसाठी मार्गदर्शन आणि सुवार्ता आहे. [३] ही सुवार्ता अश्यांसाठी आहे जे नियमित प्रार्थना करतात, बंधनकारक असलेला दानधर्म करतात आणि मृत्युपश्चात जीवनावर दृढ विश्वास ठेवतात. [४] मृत्युपश्चात जीवनावर विश्वास न ठेवणाऱ्यांना आम्ही त्यांच्या कृती चांगल्याच आहेत असे भासवतो, ज्यामुळे ते आंधळ्यासारखे

अज्ञानात चाचपडत राहतात. ५ हे असे लोक आहेत ज्यांना वाईटातली
वाईट शिक्षा मिळेल आणि जे मृत्युपश्चात जीवनात पराकोटीचे पराभूत
असतील. ६ हे कुरआन तुम्हाला अशा अस्तित्वाकडून लाभले आहे, जे
बुद्धिवंत आणि ज्ञानवंत आहे.

७ मोझेसची कथा आठवा. त्याने आपल्या कुटुंबियांना सांगितले होते,
"मी अग्नी पाहिला आहे. तिथून मी तुमच्यासाठी काही बातमी किंवा
ऊबदार ठेवण्यासाठी विस्तव घेऊन येतो." ८ विस्तव अग्नीजवळ जाताच
एक आवाज त्याच्या कानी पडला. या अग्नीजवळ आणि आसपास
असणारे पावन आहेत. ईश्वर गौरवशाली आहे, जो या विश्वाचा
पालनकर्ता आहे.

९ "हे मोझेस! मी सर्वशक्तिमान, सर्वज्ञ ईश्वर आहे. १० तू तुझ्या
हातातली छडी खाली टाकून दे." पण हातातून टाकलेली छडी
सापासारखी वळवळू लागताच घाबरून तो तिथून पळून जाऊ लागला.
या आवाजाने त्याला थांबवले, "घाबरू नकोस. मी असताना माझ्या
प्रेषिताला घाबरण्याची काहीच आवश्यकता नाही. ११ याचबरोबर अपराध
करणारे, जे कुकर्मे करून नंतर सत्कर्मे करतात, त्यांच्यासाठीही मी
अतिशय दयाळू, अतिशय कृपाळू आहे. १२ आता तुझा हात छातीपाशी
नेऊन समोर धर. तो डागविरहित, चमकदार पांढराशुभ्र झालेला दिसेल.
फारो आणि त्याच्या लोकांसाठी हा आमच्या नऊ संकेतांपैकी एक संकेत
असेल. कारण खरोखर ते विद्रोही आहेत." १३ पण जेव्हा आमचे निः
संदिग्ध संकेत त्यांच्यापर्यंत पोहोचले तेव्हा ते म्हणाले, "ही तर निव्वळ
जादू आहे!" १४ खरे तर मनातून त्यांची खात्री पटली होती, पण निष्ठूरपणे,
उद्धटपणे ते सत्य नाकारत राहिले. पहा, अशा अपराध्यांच्या नशिबी कसे
दुर्दैव आले!

१५ दावीद आणि शलमोनला आम्ही ज्ञानरूपी वरदान देताच ते दोघे
म्हणाले, "आपल्या अनेक निष्ठावंत सेवकांपेक्षा ईश्वराने आमचे स्थान
उंचावले यासाठी तो स्तुत्य आहे." १६ पाठोपाठ शलमोन म्हणाला,
"लोकहो! ईश्वराने आम्हाला पक्ष्यांची भाषा शिकवली आणि सगळ्या
चांगल्या गोष्टी देऊ केल्या. नक्कीच ही ईश्वराची उघड कृपा आहे."

१७ एके दिवशी शलमोनसमोर त्याची सेना जमा केली गेली. त्यात
जिन्न, पक्षी, माणसे या सगळ्यांचा समावेश होता. १८ मजल दरमजल
करत ही सेना मुंग्यांच्या खोऱ्यापाशी पोहोचताच एका मुंगीने इतरांना
सावध केले, "मुंग्यांनो! आपापल्या घरांमध्ये जा, नाहीतर शलमोन आणि
त्याच्या सेनेकडून नकळत चिरडले जाल." १९ हे ऐकून प्रसन्न हसून
शलमोन म्हणाला, "हे ईश्वरा! मला आणि माझ्या मातापित्यांना दिलेल्या
आशीर्वादासाठी सदैव तुझा ऋणी राहण्यासाठी, तुला संतुष्ट करणारी
सत्कृत्ये करत राहण्यासाठी मला सतत प्रेरित कर आणि तुझ्या कृपेने
सदाचारी लोकांमध्ये माझा समावेश कर."

२० त्यानंतर शलमोन आपल्या पक्ष्यांची पाहणी करू लागला. हुप्पी
पक्षी न दिसल्याने तो स्वतःशीच बोलला, "हुप्पी पक्षी कसा दिसत नाही?
तो इथे नाहीच आहे की काय? २१ गैरहजेरीचे योग्य कारण दिले नाही तर
मी त्याला कठोर शिक्षा करेन किंवा देहांत शिक्षा देण्याची आज्ञा करेन!"
२२ थोड्याच वेळात तो पक्षी परतला आणि शलमोनला सांगू लागला,
"तुम्हाला ठाऊक नसलेली एक बातमी मला कळली आहे. शेबा या
नगरातून मी एक खात्रीशीर खबर आणली आहे. २३ त्या नगरावर एका
स्त्रीचे राज्य आहे. ईश्वराने तिला सगळे काही दिले आहे. तिच्याकडे
मोठे सिंहासन आहे. २४ मला आढळले की ती आणि तिचे प्रजाजन
ईश्वराऐवजी सूर्याचे पूजन करत आहेत. त्यांना ईश्वरी मार्गदर्शन मिळू नये

म्हणून सैतानाने त्यांना योग्य मार्गापासून दूर नेले आहे. त्यांचे हे कृत्य चांगले असल्याचे तो भासवत आहे. २५ तुम्ही जे लपवता आणि जे उघड करता, त्याची जाण असलेल्या तसेच आकाश आणि पृथ्वीवरील सगळी गुपिते जाणणाऱ्या ईश्वराची उपासना त्यांनी करायला नको का? २६ ईश्वर एक आहे. प्रचंड मोठ्या सिंहासनाचा सम्राट असलेला त्याच्याशिवाय अन्य कुणी पूजनीय नाही.''

२७ शलमोनने त्याला उत्तर दिले, ''तू खरे बोलतोस की खोटे ते लवकरच कळेल. २८ माझा हा खलिता नेऊन त्यांच्यासमोर ठेव आणि तिथून दूर निघून जा. त्यावर त्यांच्याकडून काय प्रतिसाद मिळतोय, पहा.'' २९ शलमोनचा खलिता वाचून राणी आपल्या सल्लागारांना म्हणाली, ''हे सन्माननीय पत्र माझ्यापर्यंत पोहोचवले गेले आहे. ३० ते शलमोनचे आहे. यात म्हटले आहे, 'आरंभ ईश्वराच्या नावाने, जो अतिशय कृपाळू, अतिशय दयाळू आहे. ३१ स्वतःला माझ्यापेक्षा श्रेष्ठ समजू नका, तर मला शरण या.' ३२ तेव्हा आता मी काय करावे याचा सल्ला द्या. तुमच्याशी सल्लामसलत केल्याशिवाय मी कधीही कुठला निर्णय घेत नाही.'' ३३ सल्लागारांनी राणीला सल्ला दिला, ''आपण शक्तिशाली आहोत. आपली युद्धाची ताकदही मोठी आहे. पण निर्णय तुझ्या हातात आहे. तेव्हा काय आज्ञा द्यायची याचा विचार कर.'' ३४ राणीने सांगितले, ''शक्तिमान सम्राट एखाद्या प्रदेशावर हल्ला चढवतात तेव्हा ते बेशक तो मुलुख बेचिराख करतात आणि तिथल्या सन्माननीय रहिवाशांची मानहानी करतात; हे लोकही तेच करतील. ३५ पण मी त्यांच्याकडे एक नजराणा पाठवते आणि पाहते, दूत काय उत्तर आणतात ते.''

३६ नजराणा घेऊन आलेल्या दूताला शलमोनने विचारले, ''काय! तुम्ही मला संपत्ती देत आहात? पण ईश्वराने मला जे दिले आहे ते

तुम्हाला दिले आहे त्यापेक्षा कितीतरी चांगले आहे. तरीही तुम्ही त्याच्याकडून मिळालेल्या लाभातच संतुष्ट आहात. ३७ राणीकडे परत निघून जा. आम्ही निश्चितच अशा फौजेनिशी त्यांच्यावर तुटून पडू, जी त्यांच्या सहनशक्तीपलीकडे असेल. आम्ही त्यांना अपमानास्पद आणि लाचार स्थितीत त्यांच्या भूमीतून हिसकावून लावू.''

३८ पुढे शलमोनने आपल्या राजदरबारींना विचारले, ''ते लोक मला शरण येण्यापूर्वी तुमच्यापैकी कोण मला तिचे सिंहासन आणून देईल?'' ३९ जिन्नपैकी एका अवाढव्य जिन्नने उत्तर दिले, ''तुम्ही आपल्या आसनावरून उठण्यापूर्वी आम्ही ते तुमच्यासाठी घेऊन येऊ. मी तेवढा ताकदवान आणि विश्वासूही आहे.'' ४० पण ज्याला पवित्र ग्रंथाचे थोडे ज्ञान होते त्याने सांगितले, ''तुमची पापणी लवायच्या आत मी ते तुमच्यासमोर हजर करेन.'' ते सिंहासन प्रत्यक्ष आपल्यासमोर आल्याचे पाहताच शलमोन उद्‌गारला, ''मी कृतज्ञ आहे की कृतघ्न याची पारख करण्यासाठीच माझ्या पालनकर्त्याच्या कृपेने हे सिंहासन माझ्याकडे आले आहे. कोणी कृतज्ञ असेल तर त्यातच त्याचे भले आहे, पण कोणी कृतघ्न असेल तर त्याचा समाचार घ्यायला ईश्वर स्वयंपूर्ण आणि ताकदवान आहे.''

४१ शलमोनने आज्ञा केली, ''हे सिंहासनाचे स्वरूप बदलून टाका. पाहू तिला ते ओळखता येते का?'' ४२ ती शलमोनकडे येताच तिला विचारले गेले, ''तुझे सिंहासन यासारखे आहे का?'' तिने उत्तर दिले, ''ते अगदी याचसारखे दिसते. याआधीच आम्हाला तुमच्या ताकदीचा अंदाज दिला गेला आहे आणि आम्ही ईश्वराला शरण आलो आहोत.'' ४३ ती ईश्वराव्यतिरिक्त ज्याची उपासना करत असे, त्यांनी तिला विश्वास ठेवण्यापासून रोखले होते. कारण ती विश्वास न ठेवणाऱ्या लोकांमधली होती. ४४ पुढे तिला एका महालात जायला सांगितले गेले. तो महाल

तिला पाण्याच्या खोल जलाशयासारखा वाटला. त्यात प्रवेश करताना वस्त्र ओले होऊ नये म्हणून तिने ते वर उचलून धरले. पण शलमोनने स्पष्टीकरण दिले, "हा जलाशय नसून फक्त काचमहाल आहे." हे पाहून तिने ईश्वराची प्रार्थना केली, "हे पालनकर्त्या! तुझ्यावर अविश्वास दाखवून स्वतःवर अन्याय केला होता. पण आता मात्र मी शलमोनबरोबर विश्वाचा अधिपती असलेल्या ईश्वराला शरण आले आहे."

४५ समूद या जमातीकडेही आम्ही त्यांचा समाजबांधव सालेह याला पाठवले होते. त्याने त्यांना सांगितले, "ईश्वराची उपासना करा." पण त्यांचे दोन गट पडले आणि ते आपसात झगडू लागले. ४६ सालेहने त्यांना विनंती केली, "लोकहो! तुम्ही चांगल्याऐवजी वाईटाकडे का धाव घेत आहात? त्यापेक्षा ईश्वराची कृपा लाभावी म्हणून त्याच्याकडे क्षमायाचना का करत नाही?" ४७ त्यांनी उत्तर दिले, "तू आणि तुझे अनुयायी अपशकुनी आहात." सालेहने सांगितले, "नाही, तुमचा अपशकुन ईश्वराकडे आहे. सत्य हे आहे की तुमची परीक्षा घेतली जात आहे."

४८ या नगरात नऊजण असे होते, जे सतत अनाचार माजवत असत. त्यांना (समाज) सुधारणेत स्वारस्य नव्हते. ४९ त्यांनी आपल्या समाजबांधवांना सांगितले, "ईश्वराची साक्ष ठेवून आपण सालेह, त्याचे कुटुंबिय आणि त्याचा रक्षक (जो बदला घेण्यात सक्षम आहे) यांच्यावर रातोरात हल्ला करण्याची शपथ घेऊ. या प्रकरणाची चौकशी झाली असता आपण सांगू, त्यांच्यावर हल्ला झाला तेव्हा आम्ही तिथे नव्हतो. आम्ही खरे तेच सांगत आहोत." ५० अशा रीतीने त्यांनी एक योजना आखली आणि आम्हीही एक योजना आखली. पण त्यांना आमच्या योजनेची जाणीव नव्हती. ५१ पहा, त्यांच्या योजनेचा परिणाम काय झाला ते. आम्ही त्यांना आणि त्यांच्या साथीदारांना एकदमच अक्षरशः बेचिराख करून

टाकले. ५२ त्यांच्या कुकर्मांमुळेच त्यांची घरेदारे उध्वस्त झाली आहेत. ज्ञानी लोकांसाठी यात निश्चितच एक संकेत आहे. ५३ ज्यांनी ईश्वरावर विश्वास ठेवला आणि त्याचे भय बाळगले त्यांना आम्ही सुरक्षित ठेवले.

५४ लूतच्या कथेचे स्मरण करा. त्याने आपल्या समाजबांधवांना सांगितले, "जाणूनबुजून तुम्ही दुष्कृत्ये का करता?" ५५ वासनांध होऊन स्त्रियांऐवजी पुरुषांकडे का जाता? खरोखर, तुम्ही घोर अज्ञानी आहात." ५६ यावर त्याच्या समाजबांधवांनी एवढेच उत्तर दिले, "लूतला आणि त्याच्या कुटुंबियांना शहराबाहेर हाकलून द्या. स्वतः फार पवित्र असल्याचा आव आणत आहेत." ५७ तेव्हा आम्ही लूतची पत्नी सोडून त्याच्या इतर कुटुंबियांची मुक्तता केली. त्याच्या पत्नीला आम्ही मागे राहणाऱ्यांमध्ये ठेवले. ५८ इतर नगरवासीयांवर आम्ही तुफानी वृष्टी केली आणि त्यांना शिक्षा दिली. सावधगिरीची पूर्वसूचना मिळालेल्यांसाठी ही वृष्टी किती भयंकर होती! ५९ ईश्वराची प्रार्थना करा; ईश्वर स्तुतीचा अधिकारी आहे. त्याने ज्यांची निवड केली अशा त्याच्या सेवकांना शांती लाभो. ईश्वर श्रेष्ठ आहे की लोक ज्यांना त्याचा दर्जा देतात ते?

६० आकाश आणि पृथ्वी कुणी निर्माण केली आणि आकाशातून तुमच्यासाठी जलवर्षाव कुणी केला, ज्याच्या सहाय्याने तुम्ही दिमाखदार बागा फुलवता? पावसाविना तुम्ही झाडे उगवू शकला नसता. पाऊस पाडणारे ईश्वराशिवाय अन्य कुणी दैवत आहे का? खरे तर नाही. तरीपण असे काही लोक आहेत जे इतरांना ईश्वराच्या बरोबरीचे स्थान देतात. ६१ पृथ्वीला राहण्यासाठी योग्य कुणी बनवले? तिथे पाण्याचे प्रवाह कुणी खेळवले? त्यावर पर्वत कुणी रोवले आणि दोन सागरांमध्ये तटबंदी कुणी उभी केली? हे करणारे ईश्वराशिवाय अन्य कुणी आहे का? खरोखर बहुतेकांना याचे ज्ञान नाही.

६२ ईश्वराचा धावा केल्यावर पीडितांच्या हाकेला साद देणारा कोण
आहे? छळातून त्यांची मुक्ती करणारा कोण आहे? तुम्हाला या पृथ्वीचे
निवासी बनवणारा कोण आहे? हे सगळे करणारा ईश्वराशिवाय कुणी आहे
का? पण याकडे तुम्ही फक्त दुर्लक्ष करता. ६३ अंधारातही पृथ्वी आणि
सागरात तुम्हाला मार्गदर्शन देणारा कोण आहे? आपल्या कृपेची सुवार्ता
देण्यासाठी हवेची झुळूक पाठवणारा कोण आहे? ईश्वराशिवाय अन्य
कुणी दैवत आहे का? लोक ज्यांना ईश्वराचा दर्जा देतात त्यांच्यापेक्षा
तो श्रेष्ठ आहे. ६४ निर्मितीचा आरंभ करणारा, पुनर्निर्माण करणारा आणि
आकाश व पृथ्वीवरून तुमच्या उदरनिर्वाहाची सोय करणारा कोण आहे?
सांगा तर मग ईश्वराशिवाय अन्य कुणी दैवत आहे? तसे म्हणणाऱ्यांना
सांगा, "तुमचे म्हणणे खरे असेल तर तसे पुरावे सादर करा."

६५ त्यांना सांगा, "आकाश आणि पृथ्वीवर मिळून अदृश्याचे ज्ञान
ईश्वराशिवाय कुणालाही नाही." त्यांना पुन्हा केव्हा जीवित केले जाईल
याचे ज्ञान त्यांना नाही. ६६ खरोखर, सत्याच्या अभावी त्यांच्याकडे
मृत्युपश्चात जीवनाचे ज्ञान नाही. त्यातील तथ्याविषयी त्यांच्या मनात
नेहेमी शंका असते. वस्तुतः ते त्याबाबतीत अंध आहेत. ६७ सत्य
नाकारणारे विचारतात, "आमच्या पूर्वजांप्रमाणे आमची माती झालेली
असताना आम्हाला पुन्हा जिवंत केले जाईल का? ६८ आम्हाला आणि
आमच्या पूर्वजांना असेच वचन दिले होते, पण या निव्वळ जुन्या कथा
आहेत." ६९ त्यांना सांगा, "पृथ्वीवर फिरून पहा, अपराध्यांचा अंत कसा
झाला होता!"

७० त्यांच्यासाठी दुःख करू नका की त्यांच्या योजनांमुळे निराश होऊ
नका. ७१ ते विचारतील, "तुम्ही सांगता ते खरे असेल तर आम्हाला

दिलेल्या (शिक्षेच्या) वचनाची पूर्तता कधी होईल?'' ७२ त्यांना सांगा, ''तुम्ही ज्यासाठी एवढे उतावळे झाला आहात, त्याचा काही भाग कदाचित तुमच्या अगदी जवळ आला असेल.'' ७३ तुमचा ईश्वर मनुष्यजातीसाठी खरोखर दयाळू आहे. पण त्यांच्यापैकी पुष्कळजण कृतघ्न आहेत. ७४ ते आपल्या मनात काय लपवतात आणि उघड काय करतात हे ईश्वर चांगल्या प्रकारे जाणतो. ७५ आकाश आणि पृथ्वीवरची कुठलीही गोष्ट लपलेली नाही, तर एका सुस्पष्ट ग्रंथात नोंदवलेली आहे.

७६ इस्त्राएलच्या संततीत ज्यावरून मतभेद आहेत त्यावर कुरआनद्वारे प्रकाश टाकलेला आहे. ७७ श्रद्धावंतांसाठी यात निश्चितच मार्गदर्शन आणि आशीर्वाद आहेत. ७८ तुमचा पालनकर्ता नक्कीच सुज्ञपणे त्यांचा निवाडा करेल. तो सर्वश्रेष्ठ, सर्वज्ञ आहे. ७९ तेव्हा ईश्वरावर भरवसा ठेवा. तुम्ही नक्कीच उघड सत्याच्या मार्गावर आहात. ८० तुम्ही मृतांना आमचा संदेश ऐकवू शकत नाही की त्याकडे पाठ फिरवणाऱ्या बहिऱ्यांना तो ऐकवू शकत नाही. ८१ अपराधांमुळे अंध झालेल्यांनाही तुम्ही तो ऐकवू शकत नाही. आमच्या साक्षात्कारांवर विश्वास ठेवणाऱ्यांना आणि स्वतःला आमच्यापुढे समर्पित करणाऱ्यांनाच फक्त तुम्ही तो ऐकवू शकता.

८२ ईश्वराचा संदेश विवेकपूर्ण पद्धतीने त्यांच्यासमोर सादर केल्यानंतर पृथ्वीच्या गर्भातून आम्ही एक ''दाब्बह'' निर्माण करू. तो लोकांना सांगेल की, मानवजातीचा आमच्या संकेतांवर खरा विश्वास नव्हताच.[अ]

[अ] ज्यावेळी सर्वशक्तिमान ईश्वर पृथ्वीच्या वर्तमान इतिहासाचा अंत करण्याचा निर्णय घेतो त्यावेळी शेवटच्या टप्प्यात काही विलक्षण चिन्हे दिसू लागतील. या चिन्हांमधले एक चिन्ह म्हणजे ''दाब्बह'' प्रकट होईल. ईश्वराचा संदेश जो मानवाद्वारे आणला गेला आणि जो लोकांनी स्वीकारला नाही, हे दाब्बहद्वारे घोषित केले जाईल. आधुनिक संप्रेषण प्रणाली बहुधा येथे दाब्बह म्हणून सूचित केले आहे. परीक्षेचा कालावधी संपल्याची घोषणा करणारी ही घंटा असेल.

८३ निवाड्याच्या दिवशी आमचे साक्षात्कार खोटे भासवणाऱ्या समूहांमधून
आम्ही एक एक व्यक्ती वेगळी करू आणि त्यांना एकत्र करून त्यांचा
एक समूह तयार करू. ८४ त्यानंतर त्यांना ईश्वरासमोर आणल्यावर
विचारले जाईल, "माझ्या साक्षात्कारांचे योग्य ज्ञान नसतानाही तुम्ही ते
का नाकारलेत? नाहीतर मग तुम्ही दुसरे काय करत होता?" ८५ ईश्वराचा
निवाडा त्यांच्या विरोधात जाईल कारण त्यांनी अपराध केला होता.
याप्रसंगी ते निःशब्द होऊन जातील. ८६ त्यांना विश्रांती मिळावी म्हणून
आम्ही रात्रीची योजना केली तर प्रकाश मिळावा म्हणून दिवसाची योजना
केली. हे त्यांना दिसत नाही का? विश्वास ठेवणाऱ्यांसाठी यात निश्चितच
संकेत आहे.

८७ निवाड्याच्या दिवसाची तुतारी फुंकल्यावर आकाश आणि पृथ्वीवर
जो कुणी असेल तो भीतीने कंपित होऊन जाईल. ज्यांना ईश्वराने वाचवायचे
ठरवले आहे त्यांचा याला अपवाद असेल. त्या दिवशी नम्रपणे सगळे
ईश्वरासमोर जमतील. ८८ तुम्ही पर्वत पाहता ते एका जागी भक्कमपणे उभे
आहेत असे तुम्हाला वाटते. पण निवाड्याच्या दिवशी ढग चालावेत तसे
ते चालू लागतील. ईश्वराचे कार्य हे असे आहे. त्याने प्रत्येक गोष्टीचा
परिपूर्ण आदेश दिला आहे. तुमच्या कृतीची त्याला संपूर्ण जाणीव आहे.
८९ सत्कर्मे करणाऱ्याला निवाड्याच्या दिवशी चांगला मोबदला मिळेल
आणि तो निवाड्याच्या दिवसाच्या भीतीपासून सुरक्षित असेल. ९० तर
कुकर्म करणाऱ्यांना त्या दिवशी पालथे फरफटत आणून अग्निज्वाळेत
लोटले जाईल. तुम्हाला तुमच्या वागण्यानुसार फळ मिळणार नाही का?

९१ त्यांना सांगा, "मला या शहराच्या पालनकर्त्याची सेवा करण्याचा
आदेश मिळालेला आहे, ज्याने हे स्थान पवित्र बनवले आहे आणि
येथील प्रत्येक गोष्ट ज्याच्या मालकीची आहे. मला त्याला समर्पित

झालेल्यांपैकी एक होण्याचा आदेश मिळालेला आहे. [१२] हे कुरआन लोकांना ऐकवण्याची आज्ञा मला प्राप्त झाली आहे." जो कुणी याचे अनुकरण करेल तर त्यामुळे त्याचेच भले होईल. जो त्याकडे पाठ फिरवेल त्यांना एवढेच सांगा, "मी फक्त सावध करायला आलो आहे." [१३] आणि त्यांना हेही सांगा, "ईश्वर स्तुत्य आहे! तो तुम्हाला त्याचे संकेत दाखवेल आणि तुम्ही ते ओळखाल. तुम्ही जे करता ते त्याला कळल्याशिवाय राहत नाही."

प्रकरण २८ : कथानक (अल्-कसस)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] ता सीन मीम [२] सगळ्या गोष्टी स्पष्ट करणाऱ्या ग्रंथातील ही वचने आहेत. [३] श्रद्धावंतांसाठी आम्ही मोझेस आणि फारोच्या कथेचा काही सत्य भाग सांगत आहोत. [४] फारो भूतलावर अतिशय उद्धटपणे वागे आणि लोकांचे अनेक घटकांमध्ये विभाजन करत असे. काही घटकांना दुबळे बनवण्यासाठी तो त्यांच्या मुलांना मारून टाके तर मुलींना जिवंत ठेवत असे. तो भ्रष्टाचार पसरवणाऱ्यांपैकी एक होता. [५] आम्ही पीडितांवर कृपा करायचे ठरवले आणि त्यांना नायक बनवायचे व पृथ्वीचे वारसदार बनवायचे ठरवले. [६] आम्हाला भूतलावर सत्ताधिकार त्यांच्याकडे द्यायचे होते आणि फारो, हामान व त्यांच्या सेनेला ते दाखवायचे होते ज्याला ते घाबरत असत.

[७] आम्ही मोझेसच्या आईला प्रेरणा दिली, "तू तुझ्या पुत्राचे पालनपोषण करत रहा. जेव्हा तुला त्याच्या जीविताची भीती वाटेल, तेव्हा त्याला नदीच्या प्रवाहात सोडून दे. त्याच्या मृत्यूच्या विचाराने

घाबरू नकोस की शोक करू नकोस. कारण आम्ही त्याला परत तुझ्याकडे सोपवू आणि त्याला प्रेषितांपैकी एक बनवू.” ९ पुढे फारोच्या कुटुंबियांनी त्याला नदीबाहेर काढले. पुढे जाऊन तो त्यांचा शत्रू आणि त्यांच्या दुःखाचे कारण बनणार होता. यात मुळीच शंका नव्हती की, फिरऔन व हामान व त्यांचे सैन्य हे सर्व अपराधी लोक होते. १० त्याला पाहून फारोची पत्नी म्हणाली, “त्याला ठार मारू नका. याचे खेळणेबागडणे आपल्या नजरेला सुख देईल. तो आपल्या उपयोगी पडेल किंवा आपण त्याला दत्तक घेऊ या.” पण आपण काय करतोय हे त्यांना कळलेच नाही.

११ मोझेसच्या आईला इकडे खूपच हुरहूर लागली होती. आमचे वचन नक्कीच खरे ठरेल यावर विश्वास बसावा म्हणून आम्ही तिचे मन खंबीर बनवले नसते तर तिने सर्वांसमोर आपल्या पुत्राची ओळख उघड केली असती. १२ तिने मोझेसच्या बहिणीला सांगितले, “त्याच्या मागोमाग जा.” ती एखाद्या अपरिचिताप्रमाणे दुरून त्याच्यावर नजर ठेवून होती, हे कुणाच्या लक्षातही आले नाही. १३ आम्ही मोझेसला सगळ्या दूधमातांना नाकारायची प्रेरणा दिली. तेव्हा त्याची बहीण फारोच्या कुटुंबियांना म्हणाली, “त्याचे पालनपोषण करेल, त्याची चांगली काळजी घेईल, अशा एका कुटुंबाचे नाव मी तुम्हाला सांगू का?” १४ अशा रीतीने आम्ही मोझेसला पुन्हा एकदा त्याच्या आईच्या हवाली केले. यामुळे ती निश्चिंत झाली. तिचे दुःख संपले. ईश्वराने आपला शब्द खरा केल्याचे तिने जाणले. पण बहुतेकांना याची जाणीव होत नाही. १५ मोझेसची पूर्ण वाढ होऊन तो परिपक्व झाल्यावर आम्ही त्याला विवेक आणि शहाणपण देऊ केले; सत्कर्म करणाऱ्यांना आम्ही मोबदला देतो तो असा.

१६ मोझेसने आपल्या नगरात प्रवेश केला पण हे कोणा नगरवासीयांच्या

लक्षात आले नाही. तिथे दोन माणसे आपसात लढत असल्याचे त्याला दिसले. त्यापैकी एक त्याच्या समाजाचा होता तर दुसरा शत्रूपक्षाचा होता. त्याच्या समाजबांधवाने शत्रूविरुद्ध लढण्यासाठी मोझेसकडे मदतीची याचना केली. मोझेसने त्याला मुठीने एक ठोसा लगावला. यात त्याचा मृत्यू झाला. मोझेस म्हणाला, "हे निश्चितच सैतानी कृत्य आहे. तो माणसाचा उघड शत्रू आहे, जो माणसाला गैरमार्गाला लावतो." [१६] त्याने प्रार्थना केली, "हे प्रभू! मला क्षमा कर. मी स्वतःवरच अन्याय केला आहे." ईश्वराने त्याला क्षमा केली, कारण तो क्षमाशील, दयाशील आहे. [१७] मोझेसने ईश्वराला शब्द दिला, "हे प्रभू, तू माझ्यावर फार मोठी कृपा केली आहेस. मी तुला वचन देतो, मी कधीही अपराध्यांना मदत करणार नाही."

[१८] दुसरे दिवशी सकाळी मोझेस घाबरलेल्या स्थितीत सावधपणे त्या नगरातून फिरत होता. आदले दिवशी ज्याने मदतीची याचना केली होती तोच आजही त्याच्याकडे मदत मागू लागला. मोझेस त्याला म्हणाला, "तुझी उघडउघड दिशाभूल झालेली आहे." [१९] दोघांचाही शत्रू असलेल्या त्या माणसाला मोझेस पकडण्याच्या बेतात होता. तोच तो माणूस म्हणाला, "मोझेस! काल जसे तू त्या माणसाला मारलेस तसेच आज मलाही मारणार आहेस का? तुला इथे काही सुव्यवस्था निर्माण करायची नाही, तर फक्त जुलूम करायचा आहे." [२०] इतक्यात नगरातून धावत येऊन एकाने सांगितले, "मोझेस! सत्ताधीश लोक तुला मारायचा कट आखत आहेत. तू हे नगर सोडून जा. मी तुझा हितचिंतक आहे." [२१] हे ऐकून मोझेसने घाबरून जाऊन सावधपणे ते नगर सोडले. त्याने ईश्वराची प्रार्थना केली, "हे पालनकर्त्या! या अन्यायी लोकांपासून माझा बचाव कर."

[२२] मदियनच्या दिशेने मार्गस्थ झाल्यावर मोझेस म्हणाला, "माझी

खात्री आहे, माझा पालनकर्ता मला योग्य मार्गावर नेईल.” २३ मदियन येथील एका विहिरीजवळ काही लोक त्याला आपल्या मेंढरांना पाणी पाजत असलेले दिसले. त्यांच्यापासून थोड्या अंतरावर दोन स्त्रियाही आपल्या कळपाला घेऊन उभ्या होत्या. मोझेसने त्यांना विचारले, “तुम्ही इथे का थांबला आहात?” त्यांनी उत्तर दिले, “हे गुराखी आपल्या मेंढरांना घेऊन गेल्याखेरीज आम्ही आमच्या जनावरांना पाणी पाजू शकत नाही. आमचे वडील फार म्हातारे झाले आहेत.” २४ हे ऐकून मोझेसने त्यांच्या जनावरांना पाणी पाजले आणि तो आपल्या खोपटात परतला. त्याने प्रार्थना केली, “हे पालनकर्त्या! तू जी कृपा पाठवशील मला खरोखर तिची गरज आहे.”

२५ यानंतर त्या दोन स्त्रियांपैकी एकजण लाजत येऊन त्याला सांगू लागली, “तुम्ही आमच्या जनावरांना पाणी पाजलेत यासाठी आमचे वडील तुम्हाला बक्षीस देऊ इच्छितात. त्यासाठी त्यांनी तुम्हाला घरी बोलावले आहे.” मोझेसने त्यांच्या घरी जाऊन त्यांच्या वडिलांना आपली ओळख सांगितली. ते म्हणाले, “घाबरू नकोस! त्या अपराध्यांच्या तावडीतून तू सुटला आहेस.” २६ त्याच्या दोन मुलींपैकी एक त्यांना म्हणाली, “याला आपल्याकडे कामाला ठेवून घ्या. त्यासाठी आपल्याला जसा ताकदवान आणि विश्वासू माणूस हवा आहे, तसाच हा दिसतोय!” २७ त्यांचे वडील म्हणाले, “मला या दोघींपैकी एकीचा विवाह तुझ्याबरोबर लावून द्यायचा आहे. त्यासाठी माझी एक अट आहे. आठ वर्षे तुला माझ्याकडे काम करावे लागेल. हवे असेल तर दहा वर्षेही राहू शकतोस. मी तुला फार काबाडकष्ट करायला लावणार नाही. ईश्वराची मर्जी असेल तर मी योग्य माणूस असल्याचे तुझ्या लक्षात येईल.” २८ मोझेसने उत्तर दिले, “तुमच्या माझ्यात हा करार ठरला आहे, तुमच्या दोन अटींपैकी कुठलाही एक

कालावधी पूर्ण केला, तर मला काही दोष लागणार नाही. ईश्वर आपल्या या बोलण्याला साक्षी आहे.''

२९ नियोजित कालावधी संपल्यानंतर मोझेस तिथून जायला निघाला. प्रवासात तूर पर्वताच्या दिशेला त्याला अग्नी पेटलेला दिसला. मोझेस आपल्या कुटुंबियांना म्हणाला, ''तुम्ही इथेच थांबा. मी त्या अग्नीच्या जवळ जातो. तिथून तुमच्यासाठी काही बातमी किंवा विस्तव घेऊन येतो. म्हणजे तुम्हाला त्याची ऊब घेता येईल.'' ३० तो तिथे पोहोचताच दरीच्या उजव्या बाजूच्या एका पवित्र ठिकाणी त्याला ईशवाणी ऐकू आली, ''हे मोझेस! मी ईश्वर आहे, या जगताचा पालनकर्ता आहे. ३१ तुझ्या हातातली छडी खाली फेकून दे.'' छडी खाली टाकताच मोझेसला ती सापासारखी वळवळताना दिसू लागली. हे पाहताच घाबरून जाऊन मागे वळूनही न पाहता त्याने तिथून पळ काढला. तोच त्याला पूर्वीचा आवाज ऐकू आला, ''हे मोझेस! पळून जाऊ नकोस. असा पुढे ये. तू अगदी सुरक्षित आहेस... ३२ तुझा हात छातीजवळ नेऊन पुढे आणून पहा. तुला तो डागरहीत, चमकदार पांढरा दिसेल. हात छातीजवळ नेऊन तुझी भीती शांत कर. तुझ्या पालनकर्त्याकडून फारो आणि त्याच्या राजदरबारींसाठी आलेले हे दोन पुरावे आहेत. ते लोक विद्रोही आहेत यात काही शंका नाही.''

३३ मोझेस म्हणाला, ''मी त्यांच्या एका माणसाला मारले आहे. तेव्हा ते मला मारतील याची भीती वाटतेय. ३४ माझा भाऊ अहरोन बोलण्यात माझ्यापेक्षा चतुर आहे. मला आधार देण्यासाठी, पाठिंबा देण्यासाठी त्यालाही माझ्याबरोबर पाठव. ते मला नाकारतील याचीही भीती वाटते आहे.'' ३५ ईश्वराने त्याला आश्वस्त केले, ''तुझ्या भावाच्या मदतीने आम्ही तुझे हात भक्कम करू आणि तुम्हा दोघांना असे सामर्थ्य देऊ की

कोणीही तुम्हाला अपाय करू शकणार नाही. तेव्हा आमचे संकेत घेऊन त्यांच्याकडे जा. तू आणि तुझे अनुसरण करणारे नक्कीच वर्चस्व प्राप्त करतील.”

३६ आमचे स्पष्ट संकेत घेऊन मोझेस आपल्या समाजबांधवांकडे
गेला असता ते म्हणाले, “ही तर फक्त फसवी जादू आहे.
आमच्या वाडवडिलांकडून असले काही कधी ऐकले नाही आम्ही.”
३७ यावर मोझेसने उत्तर दिले, “कुणाला ईश्वरी मार्गदर्शन लाभले आहे
आणि मृत्युपश्चात जीवनात कुणाला स्वर्गीय निवासस्थान लाभणार आहे
हे माझा पालनकर्ता जाणतो. अपराधी कधीही विजयी होणार नाहीत.”
३८ हे ऐकून फारोने आपल्या सरदारांना आज्ञा दिली, “माझ्या सरदारांनो!
तुमच्यासाठी माझ्याशिवाय अन्य कुणी ईश्वर नाही हे मी जाणतो. हामान,
भाजलेल्या विटांपासून तू माझ्यासाठी उंच मनोरा उभा कर. मला तर तो
खोटारडाच वाटतोय, पण पाहू उंचावरून त्याचा ईश्वर दिसतो का!”

३९ फारो आणि त्याचे सरदार कोणतेही योग्य कारण नसताना भूमीवर
भ्रष्ट आचरण करत राहिले. त्यांना वाटले जणू त्यांना आमच्यासमोर
कधी आणलेच जाणार नाही. ४० तेव्हा आम्ही त्याला आणि त्याच्या
सैन्याला एकत्र करून भर समुद्रात टाकून दिले. अपराध्यांच्या वाट्याला
कसे दुर्दैव येते पहा. ४१ आम्ही त्यांना नेता बनवले, पण त्यांनी प्रजाजनांना
नरकाग्नीकडे नेले; निवाड्याच्या दिवशी त्यांना कुणाचीही मदत
मिळणार नाही. ४२ या जगात आम्ही त्यांना शाप भोगायला लावला
तर निवाड्याच्या दिवशी ते वंचित अवस्थेत असतील. ४३ अशा रीतीने
आधीच्या (अपराधी) पिढ्यांचा नायनाट केल्यानंतर लोकांना अंतर्दृष्टी,
मार्गदर्शन आणि आमचा आशीर्वाद मिळावा म्हणून आम्ही मोझेसला
पवित्र ग्रंथ दिला. तेव्हा लोकांनी यापासून योग्य तो बोध घ्यावा.

४४ हे प्रेषिता! आम्ही मोझेसला आमची आज्ञा ऐकवली तेव्हा तुम्ही
तूर पर्वताच्या पश्चिमेलाही उपस्थित नव्हता की साक्षीदारांमध्येही नव्हता.
४५ प्रदीर्घ आयुष्य लाभलेल्या अनेक पिढ्या आम्ही अस्तित्वात आणल्या.
तेव्हाही तुम्ही मदियनच्या लोकांमध्ये रहात नव्हता की आमचे साक्षात्कार
त्यांना ऐकवत नव्हता. या सर्व प्रेषितांना पाठवणारे आम्हीच आहोत.
४६ आम्ही मोझेसला आमचा संदेश ऐकवला तेव्हा तुम्ही तूर पर्वताजवळ
उपस्थित नव्हता. तुझ्या पालनकर्त्याची कृपा म्हणून आम्ही तुला या
लोकांकडे पाठवले आहे. तुमच्याआधी ज्यांच्याकडे कुणी सावध करणारा
पाठवला नव्हता, त्यांना तो मिळावा म्हणून आम्ही तुम्हाला पाठवले
आहे. तरी लोकांनी आमच्या उपदेशापासून योग्य बोध घ्यावा.

४७ त्यांनी केलेल्या दुष्कृत्यांच्या मोबदल्यात शिक्षा कोसळली असता,
"हे पालनकर्त्या! तू तुझ्या प्रेषिताला आमच्याकडे पाठवले असतेस, तर
आम्ही तुझ्या संदेशाप्रमाणे वागलो असतो, श्रद्धावंत बनलो असतो" असे
म्हणण्याची संधी मिळू नये म्हणून आम्ही तुम्हाला पाठवले आहे. ४८ पण
आमचे सत्य त्यांच्यासमोर अवतीर्ण होताच ते म्हणतात, "मोझेसला दिला
होता तसा संकेत याच्याकडे का दिला नाही?" पण यापूर्वी मोझेसला
दिलेला संकेतही यांनी नाकारला नव्हता का? ते तर म्हणतात, "मोझेस
आणि मोहम्मद दोघेही एकसारखेच जादूगार आहेत, एकमेकांचे मदतनीस
आहेत." शिवाय असेही म्हणतात, "आम्ही त्या दोघांनाही नाकारले
आहे."

४९ त्यांना सांगा, "या दोघांपेक्षा चांगला मार्गदर्शक असणारा ग्रंथ
ईश्वराकडून आणून दाखवा. तुमच्या म्हणण्यात तथ्य असेल तर मी त्या
ग्रंथानुसार वागेन." ५० त्यांनी तुम्हाला प्रतिसाद दिला नाही तर ओळखा,
ते फक्त स्वतःच्या मनाप्रमाणे वागत आहेत. ईश्वराचे मार्गदर्शन नाकारून

फक्त आपल्या आवडी-नावडीच्या मागे धावणाऱ्यापेक्षा वाट चुकलेला कोण असू शकेल? ईश्वर अशा पाप्यांना मार्गदर्शन करत नाही. ५१ त्यांनी बोध घ्यावा म्हणून आम्ही एकामागून एक संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवले आहेत.

५२ ज्यांना आम्ही यापूर्वीचा ग्रंथ दिला होता त्यांच्यापैकी काहीजण या ग्रंथावर (कुरआनवर) विश्वास ठेवणारे आहेत. ५३ त्यातील संदेश ऐकवताच ते म्हणतात, "आमचा त्यावर विश्वास आहे. खरोखर हे आमच्या पालनकर्त्याकडून आलेले सत्य आहे. ते येण्यापूर्वीच आम्ही त्याला समर्पित झालो होतो." ५४ यासारख्या लोकांना दुप्पट मोबदला मिळेल, कारण ते संयमी आहेत. ते वाईटाचा प्रतिकार चांगल्याने करतात आणि आम्ही दिलेल्या उपजीविकेतून दानधर्म करतात. ५५ निष्फळ गोष्टी कानावर पडताच त्यापासून दूर जात ते म्हणतात, "आम्ही आमचे काम करतो, तुम्ही तुमचे काम करा. तुम्हाला शांती लाभो. तुमच्यासारख्या अज्ञानी लोकांशी आमचा काहीही संबंध नाही." ५६ हे प्रेषिता! तुमच्या इच्छेला येईल त्याला तुम्ही मार्गदर्शन करू शकत नाही. कुणाला मार्गदर्शन करायचे ते ईश्वर ठरवतो. कोण मार्गदर्शन स्वीकारेल हे तो चांगलेच जाणतो.

५७ ते विचारतात, "आम्ही तुमच्या मार्गदर्शनानुसार वागलो तर आमच्या भूमीतून उखडले जाणार नाही का?" पण जिथे उपजीविकेसाठी सर्व तऱ्हेची फळे पुरवली जातात अशा सुरक्षित ठिकाणी (मक्केत) आम्ही त्यांना स्थापित केलेले नाही का? पण त्यांच्यापैकी बहुतेकांना हे कळलेले नाही.

५८ संपन्नतेमुळे उन्मत्त बनलेल्या कित्येक वस्त्या आम्ही उध्वस्त करून टाकल्या आहेत. तेव्हापासून त्या वस्त्यांमध्ये क्वचितच कुणी राहते. आम्ही

त्यांचे वारसदार बनलो आहोत. ५९ आमचे साक्षात्कार ऐकवण्यासाठी
त्यांच्या प्रमुख शहरांमध्ये प्रेषित पाठवल्याशिवाय किंवा तेथील लोक
अपराधी बनल्याशिवाय आम्ही कधीच कुठलीही वस्ती उध्वस्त करत
नाही.

६० या जीवनात तुम्हाला जे काही दिले जाते ते या जीवनाची तात्पुरती
तरतूद आणि त्याची क्षणभंगुर शोभा आहे. तरी ईश्वराकडे जे आहे ते
यापेक्षा चांगले आणि चिरंतन आहे. तुम्हाला हे समजणार नाही का?
६१ ज्याला आम्ही आमच्या कृपेचे वचन दिले आहे आणि ज्याची पूर्तता
झालेली तो बघणार आहे. त्याची तुलना अशाशी करता येईल का,
ज्याला आम्ही ऐहिक जीवनातील तात्पुरते ऐषोआराम देऊ केले आहेत.
पण पुनर्निर्माणाच्या दिवशी त्याच्या कृत्याचा जाब विचारण्यासाठी त्याला
ईश्वरासमोर आणले जाईल.

६२ निवाड्याच्या दिवशी त्यांना बोलावणे पाठवून ईश्वर विचारेल,
"ज्यांना तुम्ही देवत्वात माझे सोबती मानत होतात ते कुठे आहेत?"
६३ ज्यांना शिक्षा जाहीर झाली आहे ते त्या दिवशी ईश्वराला सांगतील,
"हे पालनकर्त्या! हे ते लोक आहेत ज्यांनी आम्हाला वाईट मार्गावर नेले.
आम्ही स्वतः जसे स्वेच्छेने मार्गभ्रष्ट झालो तसेच आम्ही यांनाही मार्गभ्रष्ट
केले. आता आम्ही तुमच्यासमक्ष त्यांच्याबरोबरचे संबंध तोडून टाकत
आहोत. ते ज्यांची उपासना करत असत ते आम्ही नव्हतो."

६४ अनेकेश्वरवाद मानणाऱ्यांना सांगितले जाईल, "तुम्ही ईश्वर
मानलेल्या देवीदेवतांना बोलवा." ते त्यांचा धावा करतील, पण त्यांना
काही उत्तर मिळणार नाही. त्यांना शिक्षेला सामोरे जावे लागेल. त्यांनी
आमच्या प्रेषिताचे मार्गदर्शन घेतले असते तर चांगले झाले असते.
६५ निवाड्याच्या दिवशी बोलावणे करून ईश्वर त्यांना विचारेल, "आमच्या

प्रेषिताला तुम्ही काय उत्तर दिले होते?" ६६ पण या दिवशी त्यांची बोलती
बंद झाली असेल आणि ते एकमेकांशी चर्चाही करू शकणार नाहीत.
६७ पण पश्चातापदग्ध होऊन जो ईश्वरावर विश्वास ठेवू लागेल आणि
सत्कर्मे करेल, तो यशस्वी लोकांमध्ये मोजले जाण्याची आशा ठेवू शकेल.
६८ तुमचा पालनकर्ता त्याच्या मनास येईल ते निर्माण करतो आणि
त्याच्या मनात येईल त्याची निवड करतो. लोकांच्या हाती याची निवड
नसते. ईश्वर स्तुत्य आहे. लोक ज्यांना ईश्वराचा दर्जा देतात त्यांच्यापेक्षा
तो श्रेष्ठ आहे. ६९ ते आपल्या मनात काय लपवतात आणि उघड काय
करतात हे तुमचा पालनकर्ता जाणतो. ७० ईश्वर एक आहे; त्याच्याशिवाय
अन्य कुणी उपास्य नाही. ऐहिक जीवनातील आणि मृत्युपश्चात जीवनातील
सर्व स्तुतीवर त्याचाच हक्क आहे. निवाडा त्याचाच आहे आणि तुम्हाला
त्याच्याकडेच परतायचे आहे.
७१ लोकांना विचारा, "निवाड्याच्या दिवसापर्यंत ईश्वराने तुमच्यावर
कायम रात्रच करून टाकली असती तर ईश्वराशिवाय अन्य कोणते दैवत
आहे, ज्याने तुमच्यासाठी प्रकाशमान दिवस आणला असता? तुम्ही हे
लक्षपूर्वक ऐकणार नाहीत का?" ७२ लोकांना विचारा, "निवाड्याच्या
दिवसापर्यंत ईश्वराने तुमच्यावर कायम दिवसच करून टाकला असता
तर अन्य कोणती शक्ती आहे जिने तुमच्या विश्रांतीसाठी रात्र आणली
असती? तुम्ही या संकेताकडे लक्ष देणार नाही का?" ७३ आपल्या
कृपेने त्याने तुमच्यासाठी दिवस आणि रात्र बनवली आहे, ज्या काळात
तुम्ही विश्रांती घेऊ शकता. त्याची कृपा मिळवण्याचा प्रयत्न करा आणि
ईश्वराविषयी कर्तज्ञता बाळगा.
७४ निवाड्याच्या दिवशी लोकांना बोलावून घेऊन ईश्वर विचारेल,
"कुठे आहेत ते ज्यांना तुम्ही माझे भागीदार मानत होता?" ७५ त्या दिवशी

प्रत्येक समाजातून मी एका व्यक्तीला पुढे आणून हुकूम देईन, "दाखवा तुमचा पुरावा!" या दिवशी त्यांना कळेल, सत्य केवळ ईश्वरापाशीच आहे आणि त्यांनी ज्यांचा शोध लावला होता ते त्यांच्यापासून दुरावले आहेत.

७६ कारून मोझेसच्या समाजातील होता, पण आपल्या समाजबांधवांशी तो उद्धटपणे वागत असे. आम्ही त्याला इतकी संपत्ती देऊ केली होती की त्याच्या किल्ल्या वागवायला कित्येक धट्टीकट्टी माणसे लागत असत. त्याचे समाजबांधव त्याला सांगत, "संपत्तीचा फार माज करू नकोस, ईश्वराला असा माज करणारे आवडत नाहीत." ७७ ईश्वराने आपल्या कृपेने जे काही दिले आहे त्यातून मृत्युपश्चात जीवनातील निवासस्थानाचा शोध घे. या जगातूनच मृत्युपश्चात जीवनाचा हिस्सा मिळवायचा आहे याचा विसर पडू देऊ नकोस. ईश्वर जसा तुझ्याशी भलेपणाने वागला तसाच तूही इतरांशी भलेपणाने वाग. या भूमीवर अनाचार करू नकोस. ईश्वराला असे अनाचारी लोक अप्रिय आहेत.

७८ पण तो त्यांना उत्तर देई, "केवळ माझ्याकडे असलेल्या ज्ञानाच्या जोरावरच ईश्वराने मला हे सगळे दिले आहे." त्याला हे ठाऊक नाही का की ईश्वराने त्याच्यापूर्वी अशा लोकांचा सर्वनाश केला आहे जे त्याच्यापेक्षाही बलवान आणि धनवान होते? दोषी व्यक्तींना त्यांच्या अपराधांची स्पष्टीकरणे देण्याची गरज नाही.

७९ कारून नेहेमी आपल्या लोकांसमोर थाटामाटाचे प्रदर्शन करत असे. ऐहिक जीवनासाठी उत्सुक असणारे त्याला पाहून म्हणत, "किती नशीबवान आहे कारून! आम्हालाही त्याच्यासारखे नशीब लाभले असते तर...!" ८० पण ज्ञानी लोक त्याला पाहून म्हणत, "तुझा धिक्कार असो! ईश्वरावर विश्वास ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना ईश्वराकडून कितीतरी चांगला मोबदला मिळतो, आणि हा मोबदला त्यांनाच मिळतो जे संयमाने राहतात."

८१ पुढे आम्ही भूमीला कारून आणि त्याचे घर गिळंकृत करायला
लावले. ना त्याला ईश्वराविरुद्ध मदत करणारे कुणी होते, ना तो स्वतःचा
बचाव करू शकला. ८२ हे पाहून कालपर्यंत त्याच्या नशिबाची अभिलाषा
बाळगणारे म्हणू लागले, "खरेच! ईश्वरच त्याच्या मर्जीला येईल त्याला
सुबत्ता देतो तर त्याच्या मर्जीला येईल त्याला वंचित ठेवतो. आमच्यावर
ईश्वराची कृपा नसती तर त्याने आम्हालाही गिळंकृत व्हायला लावले
असते. अरेरे! खरोखरच, सत्य नाकारणारे कधीच यशस्वी होत नाहीत!"

८३ मृत्युपश्चात जीवनातले स्वर्गीय निवासस्थान आम्ही त्यांनाच देऊ
करतो जे या जीवनात ना स्वतःचा मोठेपणा मिरवतात, ना भ्रष्ट आचरण
करतात. सदाचारी लोकांचा शेवट चांगला होईल. ८४ सत्कर्म करणाऱ्यांना
चांगला मोबदला मिळेल. पण कुकर्म करणाऱ्यांना त्यांच्या कृत्यानुसारच
मोबदला मिळेल.

८५ ज्याने तुमच्यावर कुरआनची जबाबदारी विश्वासाने सोपवली
आहे तो नक्कीच तुम्हाला यशस्वी शेवटाकडे घेऊन जाईल. त्यांना सांगा,
"कुणाला योग्य मार्गदर्शन लाभले आहे आणि कोण चुकीच्या मार्गाने
जात आहे, हे माझा पालनकर्ता जाणतो." ८६ हा ग्रंथ तुमच्यावर अवतरीत
केला जाईल असे तुम्हाला कधीही वाटले नव्हते. तरीही, तुमच्या
पालनकर्त्याच्या आशीर्वादाने तो तुम्हाला प्राप्त झाला आहे. तेव्हा सत्य
नाकारणाऱ्यांना पाठिंबा देऊ नका. ८७ ईश्वराचे साक्षात्कार तुमच्यापर्यंत
पोहोचल्यानंतर कुणामुळेही त्यापासून विचलित होऊ नका. ईश्वर अनेक
आहेत असे मानणाऱ्यांपैकी कधीही होऊ नका. ८८ ईश्वराव्यतिरिक्त अन्य
कुणाचा धावा करू नका, कारण त्याच्याशिवाय अन्य कुणी ईश्वर नाही.
त्याच्याशिवाय अन्य गोष्टींचा नाश अटळ आहे. निर्णय त्याच्यापाशीच
आहे आणि तुम्हाला त्याच्याकडेच परतायचे आहे.

प्रकरण २९ : कोळी
(अल्-अन्कबूत)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अलीफ लाम मीम २ लोकांना असे वाटते का, "आमचा ईश्वरावर
विश्वास आहे" असे म्हटल्यावर त्यांना मोकळीक दिली जाईल आणि
त्यांची परीक्षा घेतली जाणार नाही? ३ आम्ही त्यांच्या आधी होऊन
गेलेल्यांचीही परीक्षा घेतली आहे. त्यामुळे कोण सत्यवचनी आहेत आणि
कोण खोटारडे आहेत हा फरक ईश्वर निश्चितच करेल.

४ अपकृत्ये करणाऱ्यांचा असा समज झाला आहे का, की ते
आमच्यापासून सुटका करून घेऊ शकतील? किती दुर्दैवी समज आहे
त्यांचा! ५ ईश्वराच्या भेटीची अपेक्षा बाळगणाऱ्याने हे जाणावे की
ईश्वराला भेटायची नियत वेळ नक्की येणार आहे. तो सर्व ऐकणारा, सर्व
जाणणारा आहे. ६ जो कुणी ईश्वरी कार्यात प्रयत्नांची पराकाष्ठा करतो, ते
तो स्वतःच्या कल्याणासाठीच करतो. ईश्वर आपल्या निर्मितीवर मुळीच
अवलंबून नाही. ७ आमच्यावर श्रद्धा ठेवून जे सत्कर्मे करतात, त्यांच्या
अपकृत्यांपासून आम्ही नक्कीच त्यांना पवित्र करू आणि त्यांना त्यांच्या
सत्कर्मांच्या आधारावर योग्य मोबदला देऊ.

८ आपल्या मातापित्यांशी सहृदयतेने वागण्याचे बंधन आम्ही
माणसाला घातले आहे. पण ज्याचे तुम्हाला ज्ञान नाही अशा गोष्टींचा
संबंध आमच्याशी लावायची जबरदस्ती त्यांनी केली तर त्यांचे ऐकू नका.
तुम्हा सगळ्यांना माझ्याकडेच परतायचे आहे आणि तुम्ही ऐहिक जीवनात
जे काही केले आहे ते मीच तुम्हाला सांगेन. ९ सत्यावर विश्वास ठेवून
सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही निश्चितच सदाचारी लोकांच्या संगतीत ठेवू.

१० काहीजण ईश्वरावर विश्वास असल्याचा दावा करतात, पण ईश्वरी
कार्यात हालअपेष्टांचा मुकाबला करावा लागल्यावर माणसाच्या छळाचा
संबंध ईश्वरी शिक्षेशी लावतात. पण ईश्वराकडून तुमच्याकडे मदत येताच
म्हणतात, "आम्ही नेहमीच तुमच्याबरोबर आहोत." ईश्वरानेच निर्माण
केलेल्या माणसाच्या अंतरंगात काय आहे हे ईश्वर चांगले जाणत नाही
का? ११ कोण विश्वास ठेवतात आणि कोण ढोंगी आहेत यांच्यातला
फरक ईश्वर निश्चितच करेल.

१२ सत्य नाकारणारे श्रद्धावंतांना म्हणतात, "आमच्या मार्गाने चला,
तुमच्या पापांची जबाबदारी आम्ही घेऊ." पण ते किंचितही जबाबदारी
घेणार नाहीत. ते नक्कीच खोटारडे आहेत. १३ त्यांच्यावर त्यांच्या पापांचे
ओझे तर आहेच, शिवाय अन्य ओझेही आहे. पुनर्निर्माणाच्या दिवशी
त्यांना त्यांच्या खोट्या विधानांचा जाब विचारला जाईल.

१४ नोहाला आम्ही त्याच्या समाजबांधवांकडे पाठवले असता नऊशे
पन्नास वर्षे तो त्यांच्यासोबत राहिला. अखेरीस जलप्रलयाने त्यांचा
घास घेतला, कारण ते खरोखरच अपराधी होते. १५ पण आम्ही नोहाला
आणि त्याच्या सोबत्यांना एका नौकेत जीवदान दिले आणि हा प्रसंग
मानवजातीसाठी संकेत म्हणून स्थापित केला.

१६ अब्राहामचे स्मरण करा, जेव्हा त्याने आपल्या समाजबांधवांना
सांगितले, "ईश्वराची उपासना करा आणि त्याचे भय बाळगा. यातच
तुमचे भले आहे. पण हे तुम्हाला कळेल तर ना? १७ तुम्ही ईश्वराऐवजी
मूर्तींची उपासना करता आणि बनावट गोष्टी रचता. ईश्वराऐवजी ज्यांची
उपासना करता त्यांच्याकडे तुम्हाला उपजीविका पुरवण्याचे सामर्थ्य
नाही. तेव्हा ईश्वराकडेच उपजीविकेची याचना करा, त्याची उपासना
करा आणि त्याच्याविषयी कृतज्ञता बाळगा. तुम्हाला त्याच्याकडेच परत

जायचे आहे. १८ तुमच्याआधीच्या समाजांनीही सत्य नाकारले होते, तसेच
कदाचित तुम्हीही सत्य नाकाराल. ईश्वराचा संदेश तुमच्यापर्यंत स्पष्टपणे
पोहोचवणे एवढीच त्याच्या प्रेषिताची जबाबदारी आहे.''
१९ ईश्वर नवनिर्माणाची सुरुवात करतो आणि त्याचे पुनर्निर्माण करतो,
हे लोक पहात नाहीत का? ईश्वरासाठी हे काम निश्चितच सोपे आहे.
२० त्यांना सांगा, ''पृथ्वीवर फिरून पहा, त्याने कसे नवनिर्माण साधले
आहे. असेच ईश्वर त्यांची पुनर्निर्मिती साधेल. ईश्वर सर्वशक्तिमान आहे.
२१ त्याच्या मर्जीला येईल त्याला तो शिक्षा देतो तर त्याच्या मर्जीला
येईल त्याला दया दाखवतो. तुम्हाला त्याच्याकडेच परत जायचे आहे.
२२ पृथ्वीवर किंवा आकाशात तुम्ही त्याचा हेतू निष्फळ ठरवू शकत नाही,
की त्याच्याशिवाय तुम्हाला अन्य कुणी मित्र किंवा मदतनीस नाही.''
२३ ईश्वरी साक्षात्कार आणि त्याची भेट नाकारणारे माझ्या कृपेपासून
वंचित राहणार आहेत. त्यांना कठोर शिक्षा भोगावी लागेल
२४ अब्राहामचे बोलणे ऐकताच लोकांचा प्रतिसाद एवढाच होता,
''त्याला मारून टाका किंवा जाळून टाका!'' पण ईश्वराने अग्नीपासून
त्याला वाचवले. श्रद्धावंतांसाठी यात नक्कीच एक संकेत आहे.
२५ अब्राहामने त्यांना सांगितले, ''या जगातील जीवनात मैत्री वाढवण्यासाठी
तुम्ही ईश्वराऐवजी मूर्तींना उपास्य मानत आहात, त्यांची उपासना करत
आहात. पण निवाड्याच्या दिवशी तुम्ही एकमेकांशी असलेले संबंध
तोडून टाकाल, एकमेकांना दूषणे द्याल. अग्नी हे तुमचे निवासस्थान
असेल आणि तुम्हाला कुणी मदतनीस असणार नाहीत.'' २६ अब्राहामवर
विश्वास ठेवणारा लूत एकमेव होता. तो त्याला म्हणाला, ''माझ्या
पालनकर्त्यासाठी मी इथून दुसऱ्या ठिकाणी स्थलांतर करायला तयार
आहे. तो सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहे.'' २७ आम्ही त्याला मुलगा

व नातवाच्या रूपात इसहाक आणि याकोब दिले आणि त्याच्या या वंशजांना प्रेषित्वपद आणि पवित्र ग्रंथ देऊ केला. या जीवनात आम्ही त्याला त्याचा मोबदला दिला आणि मृत्युनंतरच्या जीवनात तो सदाचारी लोकांमध्ये राहील.

२८ लूतला आम्ही त्याच्या समाजबांधवांकडे पाठवले असता तो त्यांना म्हणाला, "खरोखर तुम्ही असे घृणास्पद कृत्य करत आहात जे याआधी कुणीही कधीही केलेले नाही. २९ कामवासनेच्या पूर्तीसाठी तुम्ही पुरुषांकडे जाता, रस्त्यावर दबा धरून लोकांवर हल्ला करता आणि एकमेकांना भेटल्यावरही गैरकृत्य करता." पण त्याच्या लोकांनी त्याला इतकेच उत्तर दिले, "खरे बोलत असशील तर आमच्यावर ईश्वराची शिक्षा आणून दाखव." ३० हे ऐकून लूतने ईश्वराकडे प्रार्थना केली, "हे प्रभू! या दुष्ट लोकांपासून माझा बचाव कर."

३१ आमच्या दूतांनी अब्राहामला इसहाकच्या जन्माची शुभवार्ता दिली आणि हेही सांगितले, "या नगरातले लोक खरोखर अपराधी आहेत. आम्ही खरेच त्यांचा नाश केल्याशिवाय राहणार नाही." ३२ अब्राहाम त्यांना म्हणाला, "लूत तर याच नगरात राहतो." दूतांनी उत्तर दिले, "इथे कोण कोण राहतात ते आम्ही चांगलेच जाणून आहोत. आम्ही त्याला आणि त्याच्या संपूर्ण कुटुंबाला नक्कीच सुरक्षित ठेवू. त्याची बायको मात्र याला अपवाद असेल. ती मागे राहणाऱ्यांपैकी असेल." ३३ आमचे दूत लूतजवळ जाताच तो त्रासला, हताश झाला. पण दूतांनी त्याला सांगितले, "लूत, तू घाबरू नकोस की शोक करू नकोस. तुला आणि तुझ्या कुटुंबियांना आम्ही नक्कीच वाचवू. तुझी पत्नी मात्र मागे राहणाऱ्यांमध्ये असेल." ३४ "या नगरातल्या लोकांवर आम्ही आकाशातून शिक्षा आणू यात काही संशय नाही. कारण त्यांनी गैरकृत्य केले आहे." ३५ आपल्या

बुद्धीचा वापर करणाऱ्यांसाठी या नगराच्या उध्वस्त अवशेषांमध्ये नक्कीच संकेत असतील.

३६ मदियन समाजाकडे आम्ही त्यांचा बंधू शुऐबला पाठवले. त्यांनी त्यांना सांगितले, "ईश्वराची उपासना करा, अंतिम दिवसाची जाणीव ठेवा, अपकृत्ये करू नका आणि भूमीत अनाचार माजवू नका." ३७ पण त्यांनी त्याला नाकारले. याचमुळे भूकंपाने त्यांना गिळंकृत केले. भूकंपानंतर घरांमध्ये ते मृतावस्थेत पालथे पडलेले आढळले.

३८ आद आणि समूद यांच्या जमातीच्या बाबतीतही असेच घडले; त्यांच्या दुरवस्थेवरून हे तुम्हाला स्पष्ट होईल. सैतानाने त्यांना त्यांच्या कृती चांगल्या आहेत असे भासवले आणि त्यांना सन्मार्गापासून दूर नेले. खरे तर ते बुद्धिमान लोक होते, तरीही त्यांच्याबाबतीत असे घडले.

३९ कारून, फिरऔन (फारो) व हामान यांच्याकडेही आमचे स्पष्ट संकेत घेऊन मोझेस गेले होते, पण ते या भूमीत उद्दामपणे वागले. आमच्यापासून त्यांची सुटका होऊ शकली नाही. ४० त्यामुळे त्यांच्यापैकी प्रत्येकजण आपल्या दुष्कृत्याने आमच्या कचाट्यात सापडला. त्यांच्यापैकी काहींना उग्र वादळाचा सामना करायला लावला. काहीजणांना एकाएकी स्फोट करून गारद केले, काहींना भूमीने गिळंकृत केले तर काहींना जलसमाधी दिली. आम्ही त्यांच्यावर अन्याय केला नाही, तर त्यांनीच स्वतःवर अन्याय करून घेतला.

४१ ईश्वराव्यतिरिक्त अन्य कोणाकडून तरी संरक्षण घेणाऱ्याची तुलना कोळ्याशी केली आहे. तो आपले जाळे विणतो, पण त्याचे घरटे सगळ्यात तकलादू असते. पण त्यांना याची जाणीव नसते. ४२ ते ईश्वराव्यतिरिक्त कुणाचा धावा करतात हे ईश्वर नक्कीच ओळखतो. तो सर्वशक्तिमान, बुद्धिमान आहे. ४३ लोकांसाठी आम्ही अशी तुलना करतो,

पण ज्ञानी लोकच ते समजू शकतात. ४४ आकाश आणि पृथ्वीची निर्मिती ईश्वराने एका हेतूने केलेली आहे. सच्च्या श्रद्धावंतांसाठी यात निश्चितच संकेत आहे.

४५ हे प्रेषिता! या ग्रंथातील जे ज्ञान तुमच्यावर अवतीर्ण झाले आहे, ते लोकांना कथन करा आणि नियमित प्रार्थना करा. प्रार्थना निश्चितच तुम्हाला असभ्यतेपासून आणि कुकर्मांपासून थांबवते. ईश्वराचे स्मरण ही एक महान गोष्ट आहे. ईश्वर तुमचे सगळे कर्म जाणतो.

४६ श्रद्धावंतांनो! ग्रंथधारकांशी वादविवाद न करता सामोपचाराने प्रश्न सोडवा. भांडणतंटा करू नका. त्यांच्यापैकी जे अन्यायाने वागतील त्यांना सांगा, "आम्ही त्यावर विश्वास ठेवतो जे आमच्यावर अवतीर्ण झाले आहे आणि जे तुमच्यावर अवतीर्ण झाले आहे. आमचा आणि तुमचा ईश्वर एक आहे. आम्ही त्याला समर्पित झालो आहोत."

४७ तसाच हा ग्रंथ आम्ही तुमच्याकडे सोपवला आहे. ज्यांना याआधी हा ग्रंथ दिला ते आणि तुझ्या समाजातील काहीजण त्यावर श्रद्धा ठेवतात. फक्त सत्याला नकार देणारेच आमचे साक्षात्कार नाकारतात. ४८ हा ग्रंथ अवतीर्ण होण्यापूर्वी तुम्ही काही लिहू शकत नव्हता की वाचू शकत नव्हता. तसे झाले असते तर नेहमी सत्य नाकारणाऱ्यांनी त्यावर शंका घेतली असती. ४९ पण कुरआन हा असा ग्रंथ आहे, जो ज्ञानाची देणगी लाभलेल्यांची मने निःसंदिग्धपणे जाणू शकतो. फक्त कुकर्मीच आमचे साक्षात्कार मान्य करायला नकार देतात.

५० हे प्रेषिता! लोक विचारतात, "या प्रेषिताकडे त्याच्या पालनकर्त्याने काही संकेत का दिले नाहीत?" त्यांना सांगा, हे संकेत फक्त ईश्वराच्या हाती आहेत. मी तुम्हाला फक्त सावध करायला आलो आहे. ५१ हा ग्रंथ आम्ही तुमच्याबरोबर पाठवला आहे आणि तुम्ही त्याचे कथन करत

आहात हे त्यांना पुरेसे वाटत नाही का? श्रद्धावंतांसाठी यात नक्कीच आमचे आशीर्वाद आणि सक्त ताकीद आहे. ५२ त्यांना सांगा, "तुमच्या माझ्यातला साक्षीदार म्हणून ईश्वर पुरेसा आहे. आकाश आणि पृथ्वीवर जे जे काही आहे ते सगळे तो जाणतो. असत्यावर विश्वास ठेवून ईश्वराला नाकारणारे नक्कीच पराभूत झालेले असतील."

५३ ते तुम्हाला ईश्वरी शिक्षा लवकरात लवकर आणायचे आव्हान देतात. ईश्वराने त्याची वेळ निर्धारित केली नसती तर ती शिक्षा त्यांच्यावर केव्हाच आली असती. खरोखर ती शिक्षा त्यांच्यावर एकाएकी येईल आणि त्यांना बेसावध पकडेल. ५४ ते तुमच्याकडे शिक्षा लवकर आणायची मागणी करतात, पण सत्य नाकारणाऱ्यांना नरकाने केव्हाच वेढा घातला आहे. ५५ एके दिवशी चहुअंगांनी शिक्षा त्यांच्यावर कोसळेल आणि सांगितले जाईल, "चाखा आपल्या कर्माची शिक्षा."

५६ माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सेवकांनो! माझी पृथ्वी महाविशाल आहे. तिथे माझी एकट्याचीच उपासना करा. ५७ प्रत्येक जीवाला मृत्यूची चव चाखायची आहे आणि प्रत्येकाला आमच्याकडेच परत आणले जाईल. ५८ आमच्यावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही कायम स्वर्गातील महालांमध्ये ठेवू, ज्यांच्या बाजूने पाण्याचे प्रवाह झुळझुळत असतील. सदाचाऱ्यांना किती उत्कृष्ट मोबदला मिळेल! ५९ आपल्या पालनकर्त्यावर विश्वास ठेवून संयमाने वागणाऱ्यांनाही असाच उत्कृष्ट मोबदला मिळेल. ६० कित्येक सजीव स्वतःची काळजी घेऊ शकत नाहीत. ईश्वर त्यांच्या आणि तुमच्याही उदरनिर्वाहाची सोय करतो. तो सर्व ऐकणारा, सर्व जाणणारा आहे.

६१ तुम्ही त्यांना विचारले की आकाश आणि पृथ्वी कुणी निर्माण केले आणि चंद्र-सूर्य कुणाच्या आज्ञेत आहेत? तर त्यांचे उत्तर असेल,

"ईश्वर!" तरीही ते त्याच्याकडे पाठ कशी फिरवतात? ६२ ईश्वर त्याच्या मर्जीला येईल त्याला संपन्नता देतो तर त्याच्या मर्जीला येईल त्याला कमतरता देतो. त्याच्याकडे सगळ्या गोष्टींचे समग्र ज्ञान आहे. ६३ आणि तुम्ही त्यांना विचारले की पृथ्वीवर आकाशातून जलवर्षाव कोण करतो आणि मृत धरतीला नवजीवन कोण देतो तर त्यांचे उत्तर निःसंशय हेच असेल, "ईश्वर!" असा हा ईश्वर स्तुत्य आहे. पण त्यांच्यापैकी पुष्कळांना हे कळत नाही.

६४ ऐहिक जीवनातील आयुष्य म्हणजे निव्वळ खेळ आणि करमणूक आहे. खरे आयुष्य म्हणजे मृत्युपश्चात जीवन. पण हे त्यांना कळेल तर ना! ६५ जहाजातून प्रवास करताना संकट आले असता प्रामाणिकपणे, दृढ विश्वासाने ते फक्त ईश्वराचा धावा करतात. पण त्याने सुरक्षितपणे जमिनीवर आणताच त्याला भागीदार आहेत असे म्हणू लागतात. ६६ अशा रीतीने आम्ही केलेल्या उपकारांच्या बदल्यात ते फक्त कृतघ्नता दाखवतात. त्यांना ऐहिक जीवनात थोड्या वेळासाठी मौजमजा करू दे. पण लवकरच त्यांना त्याची किंमत कळून चुकेल.

६७ त्यांच्या आजूबाजूची माणसे खेचून नेली जात असताना आम्ही त्यांना मात्र सुरक्षित स्थान देऊ केल्याचे त्यांना कळत नाही का? तरीही ते असत्यावर विश्वास ठेवून ईश्वराने केलेले उपकार विसरणार का? ६८ ईश्वराबद्दल बनावट गोष्टी रचणाऱ्यापेक्षा किंवा त्याच्याकडे आलेले सत्य नाकारणाऱ्यापेक्षा अधिक अपराधी कोण आहे? नरक हेच निवासस्थान सत्य नाकारणाऱ्यांसाठी योग्य नाही का? ६९ ईश्वरी कार्यासाठी जिवापाड प्रयत्न करणाऱ्यांना आम्ही नक्कीच आमच्या मार्गाकडे नेऊ. निःसंशय ईश्वर सदाचारी लोकांबरोबर आहे.

प्रकरण ३० : रोमन्स
(अर्-रूम)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अलीफ लाम मीम २ रोमन लोकांचा पराभव झाला आहे.
३ जवळच्या प्रदेशात रोमन लोकांचा पराभव झाला आहे. आपल्या
पराभवाचे रूपांतर ते विजयात करतील. ४ काही वर्षातच ते विजयी
होतील. कारण सुरुवातीपासून शेवटपर्यंत निर्णयशक्ती ईश्वराच्या हाती
सामावलेली आहे. त्या दिवशी श्रद्धावंत आनंदित होतील. ५ ईश्वर त्यांना
विजय मिळवण्यात मदत करेल. त्याच्या इच्छेला येईल त्यांना तो मदत
करतो. तो सर्वशक्तिमान आहे, दयाळू आहे. ६ हे ईश्वराचे वचन आहे.
ईश्वर आपल्या वचनाची पूर्तता करायला कधीही चुकत नाही, पण पुष्कळ
लोकांना हे कळत नाही. ७ ते फक्त ऐहिक जीवनातला बाह्य देखावा
पाहतात, तर मृत्युपश्चात जीवनाविषयी बेफिकीर आहेत.

८ ते आपल्या स्वतःच्या निर्मितीवर सखोल चिंतन करत नाहीत का?
आकाश, पृथ्वी आणि त्यादरम्यानच्या सगळ्या गोष्टींची निर्मिती ईश्वराने
एका विशिष्ट हेतूने आणि विशिष्ट कालावधीसाठी केली आहे. तरीही
आपल्या पालनकर्त्याशी आपली भेट होईल याचा ते इन्कार करतात.
९ त्यांनी पृथ्वीभ्रमण करून पाहिले नाही का, त्यांच्या पूर्वजांचा शेवट
कसा झाला ते? ते त्यांच्यापेक्षा ताकदवान होते. त्यांनी त्यांच्यापेक्षा
जास्त जमिनीवर लागवड केली होती आणि जास्त सुबत्ता निर्माण केली
होती. आमचे स्पष्ट संकेत घेऊन त्यांच्यातले प्रेषित त्यांच्याकडेही गेले
होते. त्यांच्यावर ईश्वराने नव्हे, तर त्यांनी स्वतःच अन्याय केला होता.

१० त्यानंतर वाईट कर्म करणाऱ्यांचा शेवट वाईटच झाला. त्यांनी ईश्वरी
संकेतांवर विश्वास न ठेवता त्यांची चेष्टा केली.
११ ईश्वराने निर्मितीचे मूळ घातले आणि तो याची पुनरावृत्ती करेल.
तुम्हाला परत त्याच्याकडेच नेले जाईल. १२ निवाड्याच्या दिवशी ठरलेली
वेळ येताच निराशेने अपराध्यांच्या तोंडून शब्दही बाहेर पडणार नाही. १३ ते
ज्यांना ईश्वरतुल्य मानत होते त्यांच्याकडून त्यांची मध्यस्थी केली जाणार
नाही. त्यांनी मानलेल्या दैवतांना ते नाकारतील. १४ निवाड्याची घटका
भरताच ईश्वर त्यांचे वेगवेगळ्या गटात विभाजन करेल. (म्हणजे चांगले-
वाईट वेगवेगळे केले जातील.) १५ ईश्वरावर विश्वास ठेवून सत्कर्मे करणारे
स्वर्गात जल्लोष करतील. १६ तर सत्य नाकारून आमच्या संकेतांची आणि
मृत्युपश्चात जीवनाची अवहेलना करणाऱ्यांना दंड दिला जाईल. १७ तेव्हा
सकाळ-संध्याकाळ त्याचे स्तुतिगान करा. १८ आकाश आणि पृथ्वीवरच्या
स्तुतीचा तो हकदार आहे. माध्यान्हीस आणि दुपारनंतर त्याचे स्तुतिगान
करा.[अ]
१९ तो मृतांना जीवन देतो आणि सजीवांना मृत्यू देतो. धरतीला जसे तो
मृतावस्थेतून पुनरुज्जीवित करतो तसेच तुम्हालाही मृत्युनंतर नवनिर्मितीद्वारे
जीवन देईल. २० त्याच्या अनेक संकेतांपैकी एक म्हणजे त्याने मातीपासून
तुम्हाला निर्माण केले आणि पहा, त्यानंतर तुमच्या संख्येत वाढ होऊन
तुम्ही पृथ्वीभर निवास करू लागलात. २१ त्याचा दुसरा एक संकेत

[अ] प्रार्थनेद्वारे सतत ईशस्मरण करणे आणि सखोल चिंतन माणसाला ईश्वर
शोधण्याच्या दिशेने घेऊन जाते. सखोल चिंतनानेच माणसाला ईश्वर सापडतो.
सध्याच्या जगात ईश्वराने आपले संकेत सर्वत्र विखुरले आहेत - मानवी वातावरणात,
सभोवतालच्या विश्वात आणि पैगंबराच्या शिकवणीतदेखील. जे ईश्वराच्या या
संकेतांकडे गांभीर्याने विचार करतील त्यांना ईश्वर सापडेल.

म्हणजे त्याने तुमच्यामधून सहचरी निर्माण केल्या, तुम्हाला त्यांच्याकडून मनःशांती लाभावी यासाठी त्याने तुमच्यात आकर्षण व प्रेम निर्माण केले. चिंतनशील लोकांसाठी यात खरोखर संकेत आहे.

२२ त्याच्या संकेतांपैकी आणखी एक म्हणजे त्याने आकाश व पृथ्वी
निर्माण केले आणि तुमच्या भाषांमध्ये व रंगांमध्ये वैविध्य आणले.
जाणकारांसाठी यात खरोखर संकेत आहेत. २३ त्याच्या संकेतांपैकी आणखी
एक म्हणजे रात्रीच्या वेळेस किंवा दिवसा तुम्हाला येणारी झोप आणि
लाभणारी त्याची कृपा. ऐकणाऱ्या लोकांसाठी यात खरोखर संकेत आहेत.
२४ त्याच्या संकेतांमध्ये याचाही समावेश होतो: तो तुम्हाला विजांचा
कडकडाट दाखवतो, तुमच्या मनात भीती आणि आशा या दोहोंचा जन्म
होतो. पृथ्वी निर्जीव झाल्यावर आकाशातून पाण्याचा वर्षाव करून तो
तिला नवी उभारी देतो. पहा, आपल्या बुद्धीचा वापर करणाऱ्यांसाठी यात
खरोखर संकेत आहेत.

२५ त्याचा हाही एक संकेत आहे; आकाश आणि पृथ्वी त्याच्याच
आज्ञेने खंबीरपणे स्थिर आहेत. त्याने हाक देताच तुम्ही पृथ्वीवरून बाहेर
पडाल आणि त्याच्या दिशेने जाऊ लागाल. २६ आकाश आणि पृथ्वीवर जे
काही आहे ते त्याच्याच मालकीचे आहे. सगळे त्याच्याच आज्ञेत आहे.
२७ निर्मितीचा आरंभ करणारा आणि त्याची पुनरावृत्ती करणारा तोच आहे
आणि त्याला हे सहजशक्य आहे. आकाश आणि पृथ्वीवर त्याचे स्थान
सर्वश्रेष्ठ आहे. तो सर्वशक्तिमान आणि सुज्ञ आहे.

२८ तो तुमच्यासमोर तुमच्याच जीवनातील कृतींची उदाहरणे ठेवतो.
आम्ही तुम्हाला दिलेल्या संपत्तीतला समान हिस्सा देऊन तुम्ही तुमच्या
सेवकांना संपत्तीतले वाटेकरी बनवता का? तुम्ही एकमेकांना जसे घाबरता
तसे त्यांना घाबरता का? अशा प्रकारे आपल्या बुद्धीचा वापर करणाऱ्यांना

आम्ही आमचे संकेत स्पष्ट करून सांगतो. [२९] आणि तरीही अन्यायी लोक ज्ञानाच्या अभावी आपल्याच इच्छेप्रमाणे वागतात. तेव्हा ईश्वराने ज्यांना मार्गभ्रष्ट केले आहे त्यांना सन्मार्गावर कोण आणेल? त्याच्या मदतीसाठी कुणीही असणार नाही.

[३०] एकनिष्ठपणे धर्माला वाहून घ्या. ईश्वराने निर्माण केलेल्या सहजधर्माचे अनुसरण करा. असा धर्म, ज्यात ईश्वराने माणसाची निर्मिती केली. ईश्वराच्या निर्मितीत कुणीही बदल करू शकत नाही. तो योग्य धर्म आहे. पण पुष्कळ लोकांना हे कळत नाही. [३१] ईश्वराभिमुख व्हा, त्याची भीती बाळगा, नियमितपणे प्रार्थना करा आणि अनेकेश्वरवाद मानणाऱ्यांपैकी होऊ नका. [३२] धर्माचे विभाजन ज्यांनी निरनिराळ्या पंथांमध्ये केले, त्यांना आपापल्या पंथाविषयी अभिमान वाटतो.

[३३] माणसांवर एखादे संकट येताच पश्चातापदग्ध होऊन ते ईश्वराचा धावा करतात. त्याने आपल्या कृपेचे फळ चाखू दिल्यावर मात्र त्यांच्यापैकी काहीजण ईश्वराला भागीदार आहेत असे मानू लागतात. [३४] ईश्वराने देऊ केलेल्या मदतीबद्दल ते कृतघ्न होतात. तेव्हा काही काळ मौजमजा करून घ्या, पण लवकरच तुम्हाला याची शिक्षा मिळेल. [३५] ते अनेकेश्वरवाद मानतात. याच्या बाजूने बोलणारा एखादा अधिकार आम्ही त्यांच्याकडे पाठवला आहे का?

[३६] आम्ही लोकांना आमच्या कृपेची चव चाखू दिल्यावर ते आनंदित होतात. पण आपल्याच हातांनी ओढवून घेतलेल्या दुरवस्थेचे परिणाम समोर दिसताच निराश होतात. [३७] ईश्वराच्या इच्छेला येईल त्याला तो मुबलक देतो तर त्याच्या इच्छेला येईल त्याला कमतरता देतो. हे त्यांना कळत नाही का? ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी यात निश्चितच संकेत आहेत. [३८] तेव्हा जवळचे नातलग, गरजू, वाटसरू यांच्याशी संबंधित

कर्तव्य पार पाडा. ईश्वराची प्रसन्नता मिळवू इच्छिणाऱ्यांसाठी हे सर्वोत्कृष्ट आहे. अशा लोकांची निश्चितच भरभराट होईल. ३९ इतरांच्या संपत्तीद्वारे आपले धन वाढवण्यासाठी तुम्ही जे व्याज आकारता त्याने ईश्वराकडे तुमचे धन वाढत नाही. ईश्वराला प्रसन्न करण्यासाठी स्वेच्छेने दानधर्म केल्याने त्याच्याकडे तुमचे धन कैकपटींनी वाढते.

४० ईश्वर तुम्हाला निर्माण करतो, तुमच्या चरितार्थाची सोय करतो, तुम्हाला मृत्यू आणतो आणि पुन्हा पुनरुज्जीवित करतो. तुम्ही मानलेले एक तरी दैवत यापैकी एखादी गोष्ट करू शकतो का? आणि तुम्ही ज्यांना त्याचे भागीदार मानता त्यांच्यापेक्षा तो श्रेष्ठ आहे. त्याचा महिमा अगाध आहे. ४१ माणसाने आपल्या हाताने केलेल्या अपकृत्यांमुळे पृथ्वीवर अनाचार माजला आहे. त्यांनी अपकृत्यांपासून माघार घ्यावी यासाठी त्यांना तो आपल्या काही कृत्यांचे परिणाम भोगायला लावेल. ४२ त्यांना सांगा, "पृथ्वीवर संचार करून पहा, तुमच्या आधी होऊन गेलेल्यांचा कसा शेवट झाला ते! त्यांच्यापैकी पुष्कळजण अनेकेश्वरवादमानणाऱ्यांपैकी होते."

४३ हे प्रेषिता! कधीही परतवला जाणार नाही असा निवाड्याचा दिवस ईश्वराकडून येईपर्यंत योग्य धर्माचे पालन करा. त्या दिवशी मानवजात दोन गटांमध्ये विभागली जाईल. ४४ सत्य नाकारणारे त्या दिवशी आपल्या नकाराचे ओझे वागवतील तर सत्कर्मे करणाऱ्यांना चांगली उपजीविका मिळेल. ४५ ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना ईश्वर आपल्या कृपेचा आशीर्वाद देईल. सत्य नाकारणारे त्याला अप्रिय आहेत.

४६ हा त्याच्या संकेतांपैकी एक संकेत आहे: त्याच्या कृपेची चव चाखता यावी म्हणून तो शुभवार्ता वागवणारे वारे पाठवतो. त्याच्या कृपेचा लाभ घेता यावा म्हणून त्याच्या कृपेने सागरावर नौका तरंगतात. यासाठी

ईश्वराविषयी कृतज्ञता बाळगा. ४७ हे प्रेषिता! तुमच्या आधी आम्ही निः
संशय प्रत्येक समाजाकडे त्यांचा प्रेषित पाठवला होता आणि त्यांच्याबरोबर
सत्याचा स्पष्ट संकेत दिला होता. त्यानंतर आम्ही अपराध्यांचा सूड
घेतला. निःसंशय, श्रद्धावंतांना मदत करणे हे आमचे कर्तव्य आहे.

४८ ढगांना उंचावर नेण्यासाठी वारे पाठवणारा ईश्वरच आहे. नंतर तो
त्याला हवे तसे त्या ढगांना आकाशात पसरवतो आणि त्यांचे थरांवर थर
लावतो. त्यांच्या गाभ्यातून पाण्याचा वर्षाव होताना तुम्ही पाहता. त्याच्या
मर्जीला येईल त्यांच्यावर तो पाऊस पाडतो. पहा, त्यामुळे लोक आनंदित
होतात. ४९ पाऊस पाडण्यापूर्वी मात्र ते निराश होते. ५० मृतवत् झालेल्या
पृथ्वीला ईश्वर पुनरुज्जीवित करतो. त्याच्या कृपेच्या या संकेतांकडे
काळजीपूर्वक पहा. अशा प्रकारे तोच ईश्वर मृतांनाही पुन्हा जिवंत करेल.
त्याच्याकडे सगळ्याचे सामर्थ्य आहे. ५१ यानंतर आम्ही अवकाळी वारे
पाठवले आणि त्यांची पिके पिवळी पडली तर ते आमचे उपकार विसरून
जातील. ५२ हे प्रेषिता! मृतांकडे, बहिऱ्यांकडे आणि आमचे संकेत
नाकारून त्याकडे पाठ फिरवणाऱ्यांकडे तुम्ही आमची हाक पोहोचवू
शकत नाही. ५३ तसेच मनाने आंधळे झालेल्यांपर्यंतही तुम्ही ते पोहोचवू
शकत नाही. जे आमच्या साक्षात्कारांवर विश्वास ठेवू इच्छितात आणि
आम्हाला समर्पित होऊन आमच्या आज्ञेचे पालन करतात, त्यांच्यापर्यंत
तुमची हाक पोहोचवू शकता.

५४ तो ईश्वर आहे ज्याने तुम्हाला दुबळ्या अवस्थेत निर्माण केले.
दुबळेपणापाठोपाठ त्याने तुम्हाला ताकद दिली. त्यानंतर तुमची ताकद
कमी करून तुम्हाला अशक्तपण आणि म्हातारपण दिले. जे काही त्याच्या
इच्छेला येते ते तो निर्माण करतो. तो सर्वज्ञ आणि सामर्थ्यवान आहे.
५५ पुनर्निर्माणाच्या दिवशी अंतिम घटका आल्यावर अपराधकर्ते शपथपूर्वक

सांगतात, ते ऐहिक जीवनात फार काळ राहिले नाहीत. जीवनभर ते भ्रमात होते. ५६ पण ज्ञान आणि श्रद्धा लाभलेले लोक त्यांना सांगतील, "ईश्वराच्या आदेशानुसार तुम्ही पुनर्निर्माणाच्या दिवसापर्यंत जगले आहात आणि आज तो दिवस उगवला आहे. पण तुम्ही याविषयी अनभिज्ञ होता." ५७ त्या दिवशी त्यांना ना सबबी सांगण्याची संधी मिळेल, ना स्वतःमध्ये सुधारणा करण्याची.

५८ कुरआनमधून निःसंशय आम्ही लोकांपर्यंत सर्व प्रकारची उदाहरणे घालून दिली आहेत आणि खरोखर सत्य नाकारण्यावर ठाम असणाऱ्यांपर्यंत तुम्ही आमचे संदेश पोहोचवलेत तर ते म्हणतील, "तुम्ही फक्त खोटे दावे करत आहात!" ५९ अशा प्रकारे सत्य जाणण्याची इच्छा नसणाऱ्यांची अंतः करणे ईश्वर मोहोरबंद करतो. ६० हे मोहम्मद! तू संयमाने रहा. ईश्वराचे वचन खरे आहे. ज्यांना हे पटणार नाही, त्यांच्यामुळे खचून जाऊ नको.

प्रकरण ३१ : लुकमान
(लुकमान)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अलीफ लाम मीम. २ ही सुज्ञपणाच्या ग्रंथातील वचने आहेत. ३ सत्कर्मे करणाऱ्यांना यातून मार्गदर्शन आणि ईश्वरी कृपेचा लाभ होईल. ४ अशा लोकांना जे नियमित प्रार्थना करतात, दानधर्म करतात आणि जे मृत्युपश्चात जीवनावर दृढ विश्वास ठेवतात, ५ त्यांना त्याच्या पालनकर्त्याकडून योग्य मार्गदर्शन लाभले आहे आणि त्यांची प्रगती होणार आहे.

६ पण लोकांमध्ये काही असेही आहेत जे इतरांना ईश्वरी मार्गापासून दूर नेण्यासाठी फक्त निरर्थक करमणुकीत वेळ घालवतात, टिंगल करतात.

त्यांच्यासाठी अपमानास्पद शिक्षा राखून ठेवली आहे. ७ जेव्हाही आमचे
प्रेषित अशा व्यक्तीपर्यंत आमचे संदेश पोहोचवतात, या व्यक्ती उद्धटपणे
त्याकडे पाठ फिरवतात, ऐकले न ऐकलेसे करतात, जणूकाही त्यांचे कान
सीलबंद झाले आहेत. अशा लोकांना मृत्युनंतरच्या जीवनात मिळणाऱ्या
घोर शिक्षेची बातमी द्या. ८ मृत्युपश्चात जीवनावर विश्वास ठेवून जे
सत्कर्मे करतील ते निश्चितच आनंदाच्या स्वर्गात प्रवेश करतील. ९ तिथेच
ते कायमसाठी राहतील. हे ईश्वराचे सच्चे वचन आहे. तो सर्वशक्तिमान
आणि सुज्ञ आहे.

१० तुम्ही पाहू शकता, त्याने आधाराविना आकाश तोलून धरले आहे.
तुमच्याबरोबर पृथ्वी हेलकावू नये म्हणून तिच्यावर पर्वत भक्कमपणे रोवले
आहेत. त्याने पृथ्वीवर सर्व प्रकारच्या सजीवांची विपुल संख्या सर्वत्र
वाढीस लावली. तोच पाण्याची पाठवणी करतो ज्यायोगे हरत-हेच्या
वनस्पती बहरतात. ११ ही ईश्वराची निर्मिती आहे. त्याच्याव्यतिरिक्त तुम्ही
मानलेल्या दैवतांनी काय निर्माण केले आहे, ते मला दाखवा! अपराध्यांनी
उघडउघड चूक केली आहे.

१२ आम्ही लुकमानला शहाणपणाची देणगी देऊन सांगितले,
"ईश्वराविषयी कृतज्ञ रहा, जो कृतज्ञ असेल त्याचेच भले होईल. पण
कुणी कृतघ्न असेल तर ईश्वर नक्कीच स्वयंपूर्ण आणि स्तुत्य आहे."
१३ लुकमानने आपल्या मुलाला सल्ला दिला, "ईश्वर एक आहे. ईश्वर
अनेक आहेत असे मानू नकोस. अनेकेश्वरवाद ही भयंकर चूक आहे."

१४ माणसाला आम्ही आईवडिलांशी प्रेमाने वागण्याविषयी बजावून
सांगितले आहे. कितीही कठीण परिस्थिती आली तरी आई नऊ महिने
त्याला पोटात वागवते. दोन वर्षे त्याला आपले दूध पाजते. यासाठी माझे
आणि आईवडिलांचे आभार माना. तुम्हा सगळ्यांना माझ्याकडेच परतायचे

आहे. १५ पण ज्याविषयी तुम्हाला काही माहिती नाही अशा कुणाला तरी माझा दर्जा देण्याचा दबाव त्यांनी आणला तर त्यांची आज्ञा पाळू नका. तरीही ऐहिक जीवनात त्यांच्याशी प्रेमळपणाने वागा आणि माझ्या मार्गाचे पालन करणाऱ्याचे अनुसरण करा. अखेरीस तुम्हा सगळ्यांना माझ्याकडेच परतायचे आहे आणि तुम्ही केलेली प्रत्येक गोष्ट मी तुम्हाला सांगेन.

१६ पुढे लुकमानने मुलाला उपदेश केला, "माणसाचे कर्म मोहरीच्या दाण्याएवढे असो की खडकाखाली लपलेले असो, आकाशात असो की भूमीवर, ईश्वर ते उजेडात आणतोच. खरोखर, तो सगळ्या सूक्ष्म गोष्टी जाणतो आणि सगळ्याविषयी तो जागरूक आहे. १७ हे मुला! नियमितपणे प्रार्थना कर, चांगल्याचा आग्रह धर, वाईटाचा त्याग कर आणि कुठलीही परिस्थिती आली तरी धीराने तोंड दे. असे वागायला निश्चितच मनाचा ठाम निर्धार लागतो. १८ उर्मटपणे लोकांपासून तोंड वळवू नकोस की जगात गर्वाने वागू नकोस. लक्षात ठेव, उर्मट आणि गर्विष्ठ लोक ईश्वराला अप्रिय आहेत. १९ नम्रपणे वाग आणि सगळ्यांशी मृदू आवाजात बोल. लक्षात ठेव, गाढवासारखे खिंकाळणे हा सगळ्यात वाईट आवाज आहे."

२० आकाश आणि पृथ्वीवर जे काही आहे ते त्याने तुमच्यासाठी कामाला जुंपले आहे. हे तुम्हाला दिसत नाही का? दृश्य-अदृश्य असे अनंत उपकार त्याने तुमच्यावर केले आहेत हे लक्षात येत नाही का? तरीही असे काही आहेत जे ईश्वराच्या अस्तित्वावरून वाद घालतात. त्यांच्याकडे ना ज्ञान आहे, ना मार्गदर्शन, ना ज्ञानदायक ग्रंथ. २१ ईश्वराने पाठवलेल्या साक्षात्कारांचे अनुसरण करायला सांगितल्यास ते म्हणतात, "नाही! आम्ही आमच्या पूर्वजांच्या मार्गाचेच अनुसरण करू." होय, सैतान त्यांना जळत्या अग्नीच्या शिक्षेचे आमंत्रण देत असला तरीही!

२२ ईश्वराला संपूर्ण शरण जाऊन सत्कर्मे करणाऱ्याने निश्चितच

भक्कम आधार पकडला आहे, कारण सगळ्या गोष्टींचा अंतिम परिणाम ईश्वराच्याच हातात आहे. २३ पण कुणी ईश्वरावरील श्रद्धा नाकारलीच तर त्यांच्या नकारामुळे दुःखी होऊ नका. कारण या सगळ्यांना आमच्याकडेच परतायचे आहे आणि तेव्हा त्यांच्या कर्माविषयी खरे काय ते आम्ही त्यांना सांगूच. मानवी मनात जे काही आहे ते ईश्वर चांगलेच ओळखून आहे. २४ थोड्या वेळासाठी आम्ही त्यांना मौजमजा करू देऊ, पण नंतर कठोर शिक्षा भोगायला लावू.

२५ जर तुम्ही त्यांना विचारलेत, "आकाश आणि पृथ्वी कुणी निर्माण केले?" तर त्यांचे उत्तर नक्की हेच असेल, "ईश्वराने!" त्यांना सांगा, "यासाठी ईश्वराचे गुणगान करा." पण त्यांच्यापैकी कित्येकांना हे कळत नाही. २६ आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते ईश्वराच्या मालकीचे आहे. ईश्वर स्वयंपूर्ण आणि स्तुत्य आहे यात काहीच शंका नाही. २७ पृथ्वीवरील सगळ्या वृक्षांची लेखणी केली, सगळ्या सागरांची शाई केली आणि त्यात आणखी सात सागरांची भर घालून ईश्वराचा महिमा लिहिला, तरी तो मावला नसता. निःसंशय, ईश्वर सर्वशक्तिमान आणि बुद्धिमान आहे.

२८ तुम्हा सगळ्यांना निर्माण करणे आणि तुमचे पुनरुज्जीवन करणे हे ईश्वरासाठी एक सजीव निर्माण करण्यासारखे आहे. खरोखर ईश्वर सगळे ऐकतो आणि सगळ्यांवर नजर ठेवतो. २९ ईश्वरामुळेच दिवसानंतर रात्र आणि रात्रीनंतर दिवस होतो. सूर्य आणि चंद्र यांना त्याने आपले दास बनवले असून त्याने ठरवून दिलेल्या कालावधीत ते ठराविक मार्गाने जातात. त्याचप्रमाणे ईश्वर तुमच्या कर्माविषयी जागरूक आहे. हे सगळे तुम्हाला दिसत नाही का? ३० याचे कारण म्हणजे ईश्वर सत्य आहे आणि

ईश्वराव्यतिरिक्त ज्यांचा ते धावा करतात ते असत्य आहे. ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे, सर्वोच्च आहे.

३१ ईश्वरी कृपेने जहाजे सागरात तरंगतात. यात ईश्वराचे संकेत आहेत. ते तुम्ही पाहत नाही का? प्रत्येक संयमी, कृतज्ञ व्यक्तीसाठी यात नक्कीच संकेत आहेत. ३२ सागरी लाटांनी मृत्यूच्या सावलीसारखे चहुबाजूंनी वेढल्यावर ते ईश्वराचा धावा करतात. त्याक्षणी त्यांची प्रामाणिक श्रद्धा फक्त ईश्वरावर असते. पण त्याने सुरक्षितपणे किनाऱ्यावर आणले की त्यांच्यापैकी फार थोडे लोक योग्य मार्गाने जातात. कृतघ्न आणि दिलेला शब्द न पाळणारे सोडले तर कुणीही ईश्वराचे संकेत नाकारत नाही.

३३ लोकहो! तुमच्या पालनकर्त्याकडून संरक्षणाची अपेक्षा ठेवा आणि त्या अंतिम दिवसाची भीती बाळगा, जेव्हा ना बाप मुलाच्या कामी येईल ना मुलगा बापाच्या कामी येईल. ईश्वराचे वचन निःसंशय खरे आहे. तेव्हा ऐहिक जीवनामुळे हुरळून जाऊ नका की ईश्वरावरून फसवणाऱ्याकडून फसवले जाऊ नका. ३४ निःसंशय, फक्त ईश्वरालाच अंतिम घडीचे ज्ञान आहे. तोच पाऊस पाडतो आणि गर्भात काय वाढते आहे ते तोच जाणतो. उद्या कशाचा सामना करावा लागेल आणि आपला मृत्यू कुठे येईल हे कुणीच जाणत नाही. निःसंशय, ईश्वर सर्वज्ञ आणि सदैव जागरूक आहे.

प्रकरण ३२ : नतमस्तक (अस्-सजदा)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अलीफ लाम मीम २ निःसंशय, विश्वाचा अधिपती असलेल्या ईश्वराकडून हा ग्रंथ प्रकट झाला आहे. ३ ते म्हणतात, "प्रेषिताने स्वतःच

हा ग्रंथ रचला आहे का?" मुळीच नाही! हा तुमच्या पालनकर्त्याकडून आलेला ग्रंथ आहे. ज्यांच्याकडे पूर्वी कधी सावध करणारा आला नव्हता, त्यांना सावध करण्याच्या हेतूने तो पाठवलेला आहे. यातून कदाचित ते योग्य मार्गदर्शन घेतील.

४ सहा कालखंडात आकाश आणि पृथ्वीची निर्मिती करणारा आणि त्यांच्या सिंहासनावर स्वतःला प्रस्थापित करणारा ईश्वरच आहे. त्याच्याशिवाय तुम्हाला कुणी वाली नाही की मध्यस्थ नाही. तुम्ही याकडे लक्ष देणार नाही का? ५ तो आकाशापासून पृथ्वीपर्यंत सगळी सूत्रे हलवतो. एके दिवशी हे सगळे त्याच्याकडेच परत जाणार आहे. तो दिवस तुमच्या मोजमापाप्रमाणे एक हजार वर्षांचा असेल. ६ दृश्य, अदृश्य ज्ञात असणारा ईश्वर असा सर्वसामर्थ्यवान आणि दयाळू आहे. ७ त्याने दिलेली प्रत्येक गोष्ट परिपूर्ण आहे. त्याने मातीपासून माणूस निर्माण करायला प्रारंभ केला. ८ वीर्याच्या एका थेंबापासून त्याने त्याच्या पुढच्या पिढ्या निर्माण केल्या. ९ नंतर त्याने माणसाला आकार दिला. आपले चैतन्य त्याच्यात फुंकून त्याला ऐकण्याची, बघण्याची क्षमता आणि हृदय दिले. तरीही तुम्ही किती कृतघ्न आहात!

१० ते विचारतात, "एकदा मातीत मिसळल्यावर आमची पुनर्निर्मिती कशी होईल?" खरोखर त्यांच्या पालनकर्त्याशी होणारी भेट ते नाकारत आहेत. ११ त्यांना सांगा, "ज्यांच्याकडे तुमचा ताबा दिलेला आहे असे मृत्यूचे दूत तुमचे आत्मे एकत्र करतील आणि तुम्हाला तुमच्या पालनकर्त्याकडे परत आणले जाईल." १२ तुम्हाला पाहता आले असते तर ते अपराधी शरमेने ईश्वरासमोर मान झुकवून उभे राहिलेले दिसले असते. त्या दिवशी ते ईश्वराची प्रार्थना करतील, "हे प्रभू! आम्ही सगळे पाहिले आहे आणि ऐकले आहे. तेव्हा आम्हाला परत पाठव म्हणजे आम्ही

चांगले वागू. आम्ही आता श्रद्धावंत बनलो आहोत.'' १३ आताही आमची इच्छा असती तर प्रत्येक माणसावर आम्ही आमचे मार्गदर्शन लादले असते. पण माझा शब्द मला खरा करायचा आहे: ''नरकाला मी जिन्न आणि माणसांनी भरून टाकेन'' १४ आम्ही त्यांना सांगू, ''चाखा आता ही शिक्षा, कारण या दिवसाची गाठ पडेल हे तुम्ही विसरला होता. आम्हीही तुम्हाला विसरू. तुमच्या कुकर्मांच्या मोबदल्यात कायमची शिक्षा भोगा.''

१५ माझ्या संदेशांवर खराखुरा विश्वास ठेवणारे, त्या संदेशांद्वारे उपदेश केला असता जमिनीवर पडून (मला) नतमस्तक होतात. स्तुतीसह त्यांच्या पालनकर्त्याचे महिमागान करतात. ते उद्धट नसतात. १६ भीतीने आणि आशेने ईश्वराचा धावा करत ते शय्येचा त्याग करतात आणि आम्ही देऊ केलेल्या उपजीविकेतून ईश्वरी कार्यासाठी खर्च करतात. १७ आज केलेल्या सत्कर्मांच्या बदल्यात कुठला आनंद साठवलेला आहे हे कुणालाही ज्ञात नाही.

१८ ईश्वराची अवज्ञा करणाऱ्याची तुलना ईश्वरावर विश्वास ठेवणाऱ्याशी कशी होईल? नाही! ते दोघे एकसमान नाहीत. १९ ईश्वरावर विश्वास ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना त्यांच्या कर्मांच्या मोबदल्यात स्वर्गातील बगीच्यात निवासस्थान लाभेल. २० ईश्वराची अवज्ञा करणाऱ्याचे निवासस्थान अग्नी हेच असेल. जेव्हाही ते त्यातून बाहेर पडायला बघतील, त्यांना त्यातच ढकलले जाईल आणि सांगितले जाईल, ''तुम्ही सातत्याने जे नाकारत होता, त्या अग्नीचा छळ सोसा.'' २१ कदाचित पश्चातापपूर्वक त्यांनी आमच्याकडे वळावे म्हणून मोठ्या शिक्षेपूर्वी आम्ही त्यांना लहान शिक्षा भोगायला लावूच. २२ ईश्वरी साक्षात्कार ऐकल्यानंतर त्याकडे पाठ फिरवणाऱ्यांपेक्षा अधिक अपराधी कोण आहे? आम्ही अशा अपराध्यांचा बदला घेऊ.

२३ आम्ही मोझेसला ईश्वरी ग्रंथ दिला होता. "हे मोहम्मद! तुम्हाला
तो मिळतोय याबद्दल काही शंका बाळगू नका. इस्राएलच्या संततीलाही
आम्ही तो मार्गदर्शक म्हणून दिला होता." २४ आम्ही त्यांच्यापैकी काहींची
लोकनायक म्हणून नेमणूक केली होती. ते आमच्या आज्ञेने लोकांचे
मार्गदर्शन करत होते. ते संयमी होते आणि त्यांचा आमच्या संदेशांवर गाढ
विश्वास होता. २५ ज्याच्यावरून त्यांच्यात मतभेद होते, त्याचा निवाडा
ईश्वर पुनर्निर्माणाच्या दिवशी निश्चितच करेल. २६ आजूबाजूला फिरताना
त्यांना उध्वस्त झालेली घरेदारे दिसतील. त्यांच्या आधीच्या पिढ्या
आम्ही कशा नष्ट केल्या होत्या हा बोध ते त्यावरून घेत नाहीत का?
२७ उजाड जमिनीवर आम्ही पाण्याचा वर्षाव करतो आणि त्यातून
भूमीवर पिके उगवतात. ते स्वतः आणि त्यांची गुरेढोरे त्यावर उदरनिर्वाह
करतात हे त्यांनी पाहिले नाही का? ते यातून बोध घेणार नाहीत का?
२८ ते विचारतील, "तुम्ही खरे बोलत असाल तर निवाड्याचा दिवस
कधी उगवेल?" २९ कायम सत्य नाकारण्यावर आग्रही राहणाऱ्यांनी
निवाड्याच्या दिवशी श्रद्धा धारण केली तरी त्यांना काही लाभ होणार
नाही. त्या दिवशी त्यांना उसंत दिली जाणार नाही. ३० तेव्हा त्यांच्यापासून
दूर रहा आणि वाट पहात रहा. तेही वाट पहात आहेत.

प्रकरण ३३ : संघटना
(अल्-अहजाब)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हे प्रेषिता! ईश्वराची भीती बाळगा आणि ढोंग्यांच्या व सत्य
नाकारणाऱ्यांच्या मनासारखे वागू नका. ईश्वर सर्वज्ञ, सुज्ञ आहे.
२ तुमच्या पालनकर्त्याकडून तुमच्यावर जे अवतरीत झाले आहे त्यानुसार

वागा. तुम्ही जे काही करता ते ईश्वर जाणतो. ३ ईश्वरावर भरवसा ठेवा. पालनकर्ता म्हणून ईश्वर पुरेसा आहे.

४ ईश्वराने कुणाही माणसाच्या शरीरात दोन हृदये ठेवलेली नाहीत. त्याने तुमच्या पत्नींना तुमच्या खऱ्या मातेसमान बनवलेले नाही. "तू माझ्या आईच्या पाठीसारखी आहेस" असे म्हणून तुम्ही पत्नींपासून विलग होऊ शकत नाही. त्याने तुमच्या दत्तक मुलांना स्वतःच्या मुलासारखे बनवलेले नाही. हे फक्त तुमचे बोलायचे शब्द आहेत. ईश्वर फक्त सत्य तेच बोलतो आणि योग्य मार्गावरच नेतो. ५ दत्तकपुत्रांना त्यांच्या वडिलांच्या नावाने ओळखा. ते जास्तीत जास्त न्यायोचित आहे. त्यांचे वडील माहीत नसतील तर त्यांना धर्मबंधू किंवा मित्र माना. तुमच्या हातून नकळत चूक झाली तर तुम्हाला दोषी धरले जाणार नाही. पण मनापासून आणि जाणूनबुजून जे कराल त्यासाठी जबाबदार धरले जाईल. ईश्वर क्षमाशील आणि दयाळू आहे.

६ श्रद्धावंतांवर प्रेषितांचा खुद्द त्यांच्यापेक्षाही जास्त हक्क आहे आणि प्रेषिताच्या पत्नी त्यांच्या मातेसमान आहेत. ईश्वराच्या नियमानुसार रक्ताचे नातेवाईक श्रद्धावंतांपेक्षा व आपल्या मायभूमीचा त्याग करून आलेल्या श्रद्धावंतांपेक्षा जवळचे आहेत. याला अपवाद म्हणजे तुम्ही तुमच्या मित्रांशी प्रेमळपणे वागू शकता. पवित्र ग्रंथातील हा हुकूम आहे.

७ हे प्रेषिता! आम्ही तुमच्याकडून, नोहा, अब्राहाम, मोझेस आणि मेरीपुत्र येशू या सगळ्यांकडून पवित्र शपथ घेतली आहे. ८ या सत्यवचनी प्रेषितांना त्यांच्या सत्यप्रियतेला पृथ्वीवर कसा प्रतिसाद मिळाला हे विचारता यावे म्हणून आम्ही त्यांना अशी शपथ दिली आहे. पण सत्य नाकारणाऱ्यांसाठी वेदनादायी शिक्षा तयार ठेवली आहे.

९ श्रद्धावंतांनो! ईश्वराने तुमच्यावर केलेल्या उपकारांचे स्मरण करा.

तुमच्याविरुद्ध ताकदवान शत्रूसेना एकवटले असता आम्ही त्यांच्यावर तीव्र वादळी वारे आणि आमचे सैन्य पाठवले, जे तुम्ही पाहू शकला नाही. ईश्वर तुमच्या प्रत्येक कर्मावर नजर ठेवून आहे. १० शत्रूने चारही बाजूंनी वेढल्यावर तुमची नजर भयचकित झाली होती, घशाला कोरड पडली होती आणि मनात ईश्वराविषयी नाना तऱ्हेचे विचार येऊ लागले होते. ११ अशाप्रकारे श्रद्धावंतांची सत्वपरीक्षा घेतली गेली आणि भूकंप झाल्यासारखे त्यांना हादरून टाकले गेले.

१२ ढोंगी आणि मनात विकृती असलेले लोक म्हणू लागले, "ईश्वराने आणि त्याच्या प्रेषिताने दिलेली वचने म्हणजे निव्वळ भ्रम आहे." १३ आणखी काहीजण म्हणाले, "मदिनेच्या लोकांनो! शत्रूसमोर तुमचा टिकाव लागू शकणार नाही, तेव्हा तुम्ही परत जा." तर आणखी काहीजणांनी प्रेषिताकडून निघून जाण्याची परवानगी मागितली की "आमची घरे असुरक्षित आहेत, आम्हाला घरी जाऊ द्या." खरेतर त्यांची घरे असुरक्षित नव्हती, तर त्यांना पळ काढायचा होता. १४ त्यांचे शहर शत्रूने वेढले असते आणि त्यांना दगा देण्यास प्रवृत्त केले असते तर जराही मागेपुढे न पाहता त्यांनी तसे केले असते. १५ त्यांनी ईश्वराची शपथ घेऊन सांगितले आहे की ते कधीही सत्याकडे पाठ फिरवणार नाहीत आणि ईश्वराची साक्ष ठेवून घेतलेल्या शपथेचा जाब द्यावाच लागेल. १६ त्यांना सांगा, "इथून पळून जाण्याने तुमचे काही साधणार नाही. मृत्युपासून किंवा युद्धात ठार होण्यापासून दूर जाण्यात यशस्वी झालात तरी तुम्ही फार काळ जगू शकणार नाही." १७ त्यांना विचारा, "ईश्वराने तुम्हाला अपाय करायचे ठरवले असेल तर त्याच्यापासून तुमचा बचाव कोण करेल? आणि त्याने कृपा करायचे ठरवले असेल तर त्याला त्यापासून कोण रोखू

शकेल? ईश्वराशिवाय त्यांना कुणीही रक्षक नाही आणि कुणीही संकटातून बाहेर काढणार नाही.”

१८ तुमच्यापैकी कोण इतरांना युद्धापासून रोखतो हे ईश्वर नेमके जाणतो. असे लोक आपल्या बांधवांना सांगतात, “आमच्याबरोबर या.” ते स्वतः युद्धात कधीही भाग घेत नाहीत. १९ तुम्ही मदत मागितली तर ते तुमचा तिरस्कार करतात, पण स्वतःवर संकट येताच मृत्यूची मूर्च्छा आल्यासारखी त्यांची नजर गरगर फिरू लागते. त्यांची भीती दूर होताच धनाच्या लोभाने तुमच्याकडे येऊन ते वरकरणी गोड बोलू लागतात. अशा लोकांची ईश्वरावर श्रद्धा नसते. तेव्हा ईश्वराने त्यांची कृत्ये निष्फळ ठरवली आहेत. हे ईश्वरासाठी खरोखर सहजसोपे आहे. २० शत्रूसैन्याची कधी पिछेहाट होणारच नाही असे त्यांना वाटते. खरोखर शत्रूसैन्य परतलेच तर ते भटक्या अरब जमातींबरोबर वाळवंटात राहण्याचा पर्याय निवडतील. तिथे दूरवर बसून ते तुमची खबरबात काढतील. पण ते तुमच्याबरोबर असते तरीही त्यांनी युद्धात भाग घेतला नसता. २१ मोहम्मद! तू खरोखर ईश्वराचा प्रेषित आहेस. ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी आणि सदैव ईश्वराचे स्मरण करणाऱ्यांसाठी आदर्श आहेस. २२ शत्रूसैन्य पाहताच श्रद्धावंत म्हणतात, “ईश्वराने आणि त्याच्या प्रेषिताने आम्हाला याचेच वचन दिले होते.” त्यामुळे त्यांची श्रद्धा व त्यांचे समर्पण अधिकच वाढते.

२३ श्रद्धावंतांपैकी काही ईश्वराला दिलेले वचन पाळण्यावर ठाम आहेत. त्यांच्यापैकी काहींनी (ईश्वरी कार्यात आपले सर्वस्व पणाला लावण्याचे) आपले वचन पूर्ण केले आहे तर काहीजण दृढनिर्धार किंचितही न बदलता वचनपूर्तीच्या प्रतीक्षेत आहेत. २४ सत्यवचनी असणाऱ्यांना ईश्वर त्यांच्या सत्यप्रियतेचा मोबदला नक्कीच देईल आणि ढोंगींना शिक्षा करेल.

ईश्वराच्या मनात आले तर तो त्यांच्या पश्चातापाचा स्वीकार करेल. ईश्वर क्षमाशील आणि दयाशील आहे.

२५ सत्य नाकारण्यावर ठाम असणाऱ्यांना ईश्वराने परत पाठवले. या मोहिमेतून त्यांचा काहीच फायदा झाला नाही. युद्धात श्रद्धावंतांचे रक्षण करायला ईश्वर समर्थ होता. तो कणखर आणि ताकदवान आहे. २६ आक्रमकांना मदत करणाऱ्या ग्रंथधारकांना त्याने त्यांच्या हवेल्यांमधून बाहेर काढले आणि त्यांच्या मनात दरारा निर्माण केला. त्यांच्यापैकी काहींना तुम्ही युद्धात मारले तर काहींना युद्धकैदी बनवले. २७ ईश्वराने तुम्हाला त्यांच्या घरादारांचा, संपत्तीचा आणि अशा जमिनींचा वारसदार बनवले, ज्याच्यावर तुम्ही कधी पाऊलही ठेवले नव्हते. त्याची सत्ता सगळ्यावर चालते.

२८ हे प्रेषिता! तुमच्या पत्नींना सांगा, "ऐहिक जगातले जीवन आणि ऐषोआराम पाहिजे असतील तर चला, मी तुम्हाला ते सगळे देतो आणि सन्मानाने बंधनमुक्त करतो. २९ पण ईश्वर, त्याचा प्रेषित आणि मृत्युपश्चात जीवनाचे निवासस्थान मिळवायचा प्रयत्न करून सत्कृत्ये कराल तर लक्षात घ्या, ईश्वराने तुमच्यासाठी महान मोबदला तयार ठेवला आहे." ३० प्रेषितांच्या पत्नींनो! तुमच्यापैकी कुणी धडधडीत दुर्वर्तन कराल तर त्याची दुप्पट शिक्षा मिळेल. ईश्वराला ते अगदी सहज शक्य आहे.

३१ पण तुमच्यापैकी जे कुणी ईश्वराचे आणि त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन करतील आणि सत्कर्मे करतील त्यांना त्याचा दुप्पट मोबदला मिळेल. त्यांच्यासाठी आम्ही उत्कृष्ट उपजीविका राखून ठेवली आहे. ३२ प्रेषितांच्या पत्नींनो! तुम्ही इतर स्त्रियांसारख्या नाही आहात. ईश्वराची भीती बाळगत असाल तर इतरांशी फार मृदू संभाषण करू नका. असे केलेत तर वाईट हेतू बाळगणाऱ्यांच्या मनात लोभ निर्माण होईल. सगळ्यांशी योग्य पद्धतीने बोला.

३३ प्रेषितांच्या पत्नींनो! घरामध्ये शांतपणे रहा आणि पूर्वीच्या अज्ञान
काळाप्रमाणे आपल्या साजशृंगाराचे प्रदर्शन करू नका. नियमित प्रार्थना
करा (नमाज़ पठण करा), दानधर्म करा आणि ईश्वराचे व त्याच्या
प्रेषिताचे आज्ञापालन करा. प्रेषिताच्या घरातील स्त्रियांनो! ईश्वराला
तुमच्या मनातील मलीनता साफ करून ते पूर्ण निर्मळ करायचे आहे.
३४ तुमच्या घरांमध्ये ईश्वरी साक्षात्कारांविषयी आणि शहाणपणाविषयी
जे सांगितले जाते ते नीट लक्षात ठेवा. ईश्वर सर्वसमावेशक आणि सदैव
जागरूक आहे.

३५ ईश्वराला शरण आलेल्या, सत्यावर विश्वास ठेवणाऱ्या, ईश्वरी
आज्ञेचे पालन करणाऱ्या, सत्यप्रिय असणाऱ्या, संयमाने, नम्रतेने
वागणाऱ्या, दानधर्म करणाऱ्या, उपवास करणाऱ्या, चारित्र्य जपणाऱ्या
आणि सदैव ईश्वराचे स्मरण करणाऱ्या स्त्रियांनो आणि पुरुषांनो, ईश्वर
निःसंशय क्षमाशीलता आणि अफाट मोबदला घेऊन सिद्ध आहे.

३६ ईश्वराने आणि त्याच्या प्रेषिताने एखाद्या विषयात निर्णय घेतल्यावर
श्रद्धावंत स्त्री-पुरुषांनी त्या विषयात आपल्या मनाप्रमाणे वागणे योग्य
नाही. ईश्वराची आणि त्याच्या प्रेषिताची आज्ञा मोडणारा उघडपणे पापी
आहे.

३७ ईश्वराने आणि तुम्ही उपकृत केलेल्या माणसाला तुम्ही म्हणालात,
"तुझ्या पत्नीला तुझ्याजवळ ठेव आणि ईश्वराची भीती बाळग."
याप्रसंगी तुम्ही अशी गोष्ट लपवू पहात होता जी ईश्वराला प्रकट करायची
होती. तुम्ही लोकांना घाबरत होता, जेव्हा की ईश्वराला घाबरून राहणे
अधिक योग्य ठरले असते. ज़ैदने आपल्या पत्नीला घटस्फोट दिल्यावर
आम्ही तिचा विवाह तुमच्याबरोबर लावून दिला. आपल्या दत्तक मुलाचा
घटस्फोट झाल्यावर त्याच्या पत्नीशी विवाह करताना श्रद्धावंतांवर काहीही

निर्बंध राहू नये, यासाठी आम्ही हे उदाहरण घालून दिले. ईश्वराच्या आज्ञेचे पालन झालेच पाहिजे.

[३८] ईश्वराने मंजूर केलेली गोष्ट पार पाडल्यास प्रेषितांना काही दोष लागू नये. त्यांच्या आधी होऊन गेलेल्यांच्या बाबतीतही ईश्वराची हीच पद्धत होती आणि ईश्वराची आज्ञा हा अंतिम निर्णय असतो. [३९] जे जे ईश्वराचा संदेश वाहून नेतात आणि त्याचीच भीती बाळगतात त्यांचा हिशेब करायला ईश्वर समर्थ आहे. [४०] मोहम्मद हे कुणाचेही वडील नसून ईश्वराचे प्रेषित आहेत आणि ते अंतिम प्रेषित आहेत. ईश्वराकडे सगळ्या गोष्टींचे ज्ञान आहे.

[४१] श्रद्धावंतांनो! कायम ईश्वराचे स्मरण करा. [४२] सकाळ-संध्याकाळ त्याचे महिमागान करा. [४३] तुम्हाला कृपेचा आशीर्वाद देणारा तोच आहे. त्याचे प्रेषितही हेच करतात. त्यायोगे ते तुम्हाला अंधारातून उजेडात आणतात. श्रद्धावंतांसाठी तो अतिशय दयाळू आहे. [४४] निवाड्याच्या दिवशी ईश्वराची भेट झाल्यावर "तुम्हाला शांती लाभो" या शब्दांनी त्यांचे स्वागत केले जाईल. त्याने त्यांच्यासाठी सन्माननीय मोबदला तयार ठेवला आहे.

[४५] हे प्रेषिता! आम्ही तुला साक्षीदार म्हणून आणि (सदाचाऱ्यांना) शुभवार्ता व (दुराचाऱ्यांना) सावधानतेचा इशारा देणारा प्रेषित म्हणून पाठवले आहे. [४६] असा प्रेषित, जो ईश्वराच्या इच्छेने लोकांना ईश्वराकडे बोलावतो आणि चमचमत्या प्रकाशासारखे त्यांना मार्गदर्शन करतो. [४७] श्रद्धावंतांना शुभवार्ता द्या, की ईश्वराने त्यांच्यासाठी असीम कृपाशीर्वाद राखून ठेवला आहे. [४८] सत्य नाकारणाऱ्यांचे आणि दांभिकांचे म्हणणे ऐकू नका. त्यांच्या कडवट बोलण्याकडे दुर्लक्ष करा. ईश्वरावर भरवसा ठेवा. तुमचा पालनकर्ता म्हणून ईश्वर पुरेसा आहे.

४९ श्रद्धावंतांनो! तुम्ही श्रद्धावंत स्त्रियांबरोबर विवाह केलात आणि वैवाहिक जीवनाची सुरुवात होण्यापूर्वी लगेचच घटस्फोट घेतलात तर त्यासाठी प्रतीक्षा कालावधीचे पालन करण्यची गरज नाही. सन्माननीय तरतूद करून तुम्ही त्यांना आदराने बंधनमुक्त करू शकता.

५० हे प्रेषिता! ज्यांना तुम्ही महर दिला आहे त्या स्त्रिया व ईश्वराने युद्धात तुम्हाला दासी म्हणून दिलेल्या स्त्रिया आणि तुमच्याबरोबर स्थलांतर करून आलेल्या चुलत्याच्या व आत्याच्या मुली तसेच मावशीच्या व मामाच्या मुली तुमच्यासाठी विवाहाकरता वैध आहेत. एखादी श्रद्धावंत स्त्री स्वेच्छेने प्रेषितांच्या स्वाधीन होऊ इच्छित असेल तर ती त्यांच्यासाठी वैध आहे, जर प्रेषितांची तिच्याबरोबर विवाह करायची इच्छा असेल तर हा नियम फक्त तुम्हालाच लागू होतो, इतर श्रद्धावंतांना नाही. त्यांच्यासाठी आम्ही कुठल्या स्त्रिया व दासी वैध केल्या आहेत हे आम्ही चांगलेच जाणतो. प्रेषितांवर कुठलाही दोष येऊ नये म्हणून आम्ही हे स्पष्ट करत आहोत. ईश्वर अतिशय क्षमाशील, अतिशय दयाशील आहे.

५१ तुम्ही तुमच्या पत्नींपैकी हवे तिला आपल्यापासून दूर ठेवू शकता आणि हवे तिला आपल्याजवळ बोलावू शकता. बरेच दिवस तिच्याजवळ गेला नाहीत आणि कालांतराने तिला जवळ केलेत तर यात तुमचा दोष नाही. हे योग्यच आहे. याने त्यांचे डोळे निवतील, त्यांना दुःख होणार नाही आणि तुम्ही जे काही दिले आहे त्यात त्या समाधानी राहतील आणि तुमच्या मनात जे काही आहे ते ईश्वर जाणतो. तो सर्व जाणणारा आणि संयमी आहे. ५२ यानंतर इतर स्त्रियांच्या सौंदर्याने कितीही मोहित झालात तरी अधिक स्त्रियांशी विवाह करणे, त्यांच्याजागी नवीन पत्नी आणणे तुमच्यासाठी (प्रेषितांसाठी) वैध नाही. याला अपवाद तुमच्या दासींचा. ईश्वराचे तुमच्या वागण्यावर बारकाईने लक्ष आहे.

५३ श्रद्धावंतांनो! भोजनाचे आमंत्रण असल्याशिवाय प्रेषितांच्या घरी जाऊ नका. जरी आमंत्रण मिळाले तरी भोजन तयार होईपर्यंत त्यांच्या घराजवळ रेंगाळू नका. बोलावल्यावरच घरात जा आणि भोजन झाल्यानंतर लगेच बाहेर पडा. तिथेच गप्पागोष्टी करत बसू नका. याने प्रेषितांना त्रास होतो. पण संकोचाने प्रेषित हे सांगणार नाहीत. ईश्वर मात्र सत्य सांगायला संकोचत नाही. घरी गेल्यावर प्रेषितांच्या पत्नीकडे काही मागायचे असेल तर ते पडद्याआडून मागा. यामुळे तुम्हा दोघांचीही मने शुद्ध राहतील. खरोखर ईश्वराच्या प्रेषिताला त्रास देणे, त्यांच्यानंतर त्यांच्या पत्नीशी विवाह करणे तुमच्यासाठी कधीही योग्य नाही. ईश्वराच्या नजरेतून हा घोर अपराध असेल. ५४ कुठलीही गोष्ट तुम्ही उघड करा की मनात लपवा, ईश्वर ती जाणतोच.

५५ प्रेषितांच्या पत्नींनी आपल्या वडिलांसमोर, मुलांसमोर, भावांसमोर बहिणीच्या व भावाच्या मुलांसमोर, आपल्यासारख्या स्त्रियांसमोर किंवा दासींसमोर जाण्यात काही गैर नाही. स्त्रियांनो! ईश्वराला घाबरून रहा. त्याचे तुमच्या वर्तनावर बारकाईने लक्ष आहे.

५६ ईश्वर आणि त्याचे दूत प्रेषितावर कृपेचा वर्षाव करतात. श्रद्धावंतांनो! तुम्हीही प्रेषितासाठी कृपेची मागणी करा आणि त्याला शांतीच्या शुभेच्छा द्या. ५७ ईश्वराला आणि त्याच्या प्रेषिताला त्रास देणाऱ्यांना या जगात आणि मृत्युपश्चात जगात ईश्वर आपल्या कृपेपासून वंचित ठेवेल. ईश्वराने त्यांच्यासाठी अपमानास्पद शिक्षा तयार ठेवली आहे. ५८ श्रद्धावंत स्त्री-पुरुषांची काहीही चूक नसताना विनाकारण मानहानी करणाऱ्यांवर खोटी निंदानालस्ती करण्याचे आणि घोर अपराधाचे ओझे लादले जाईल.

५९ हे प्रेषिता! तुमच्या पत्नींना, मुलींना आणि भाविकांच्या पत्नींना सांगा की सार्वजनिक ठिकाणी जाताना त्यांनी डोक्यावर व छातीवर

बाह्यवस्त्राचा वापर करावा. त्यामुळे त्या कुलीन म्हणून ओळखल्या जातील आणि त्यांना कुणी अपाय करणार नाही. ईश्वर अतिशय क्षमाशील, अतिशय दयाशील आहे. ६० दांभिकांनी, विकृत मनोवृत्ती असणाऱ्यांनी आणि मदिनेत अफवा पसरवणाऱ्यांनी आपले अनाचार थांबवले नाहीत तर प्रेषिता, आम्ही तुम्हाला त्यांच्यावर कारवाई करण्याचे हक्क देऊ आणि शहरातल्या त्यांच्या वास्तव्याची उलटी गणती सुरू करू. ६१ ईश्वराकडून धिक्कारले गेलेले निंदनीय असे लोक जिथे सापडतील तिथे पकडून त्यांना ठार केले जाईल. ६२ तुमच्या आधी होऊन गेलेल्यांशी वागण्याची ईश्वराची रीत अशी होती. त्याची रीत कधीही बदललेली तुम्हाला दिसणार नाही.

६३ हे प्रेषिता! लोक तुम्हाला निवाड्याच्या वेळेविषयी विचारतात. त्यांना सांगा, "ती वेळ कधी येणार हे फक्त ईश्वर जाणतो. कदाचित ती वेळ अगदी जवळ आली असेल!" ६४ ईश्वराने सत्य नाकारणाऱ्यांना धिक्कारले आहे आणि त्यांच्यासाठी धगधगते अग्निकुंड सज्ज ठेवले आहे. ६५ तिथे त्यांना कायमसाठी रहावे लागेल आणि कुणी मित्र किंवा मदतनीस असणार नाही. ६६ निवाड्याच्या दिवशी अग्नीने उलटेपालटे केल्यावर ते म्हणतील, "आम्ही ईश्वराची आणि त्याच्या प्रेषितांची आज्ञा पाळली असती तर किती चांगले झाले असते." ६७ ते असेही म्हणतील, "हे ईश्वरा! आम्ही आमच्या समाजश्रेष्ठींचे आणि बुजुर्गांचे ऐकले, पण त्यांनी आम्हाला सन्मार्गापासून दूर नेले. ६८ हे पालनकर्त्या! त्यांना दुप्पट शिक्षा दे, त्यांना तुझे खूप तळतळाट लागू देत."

६९ भाविकांनो! मोझेसची नाहक निंदानालस्ती करणाऱ्यांसारखे वागू नका. ईश्वराने त्याच्यावरचे सगळे दोषारोप दूर केले होते. ईश्वराच्या नजरेत त्याला सन्माननीय स्थान मिळाले होते. ७० भाविकांनो! ईश्वराचे भय बाळगा आणि योग्य तेच बोला. ७१ तुम्ही केलेल्या सत्कर्मांच्या

मोबदल्यात तो तुमच्यावर कृपेचा वर्षाव करेल आणि तुमचे अपराध माफ करेल. ईश्वराचे आणि त्याच्या पैगंबराचे आज्ञापालन करणाऱ्यांना खरोखर महान यश मिळाले आहे.

७२ आम्ही स्वर्ग, पृथ्वी व आकाश यांना आमचा ठेवा (इथे अर्थ कर्मस्वातंत्र्य) देऊ केला. पण त्यांनी तो पेलायला नकार दिला. कारण ही जबाबदारी पेलायची त्यांना भीती वाटली. पण माणसाने त्याचा स्वीकार केला. स्वीकारल्यानंतर मात्र तो अन्यायी आणि उन्मत्त असल्याचे सिद्ध झाले आहे. ७३ दांभिक व अनेकेश्वरवादी स्त्री-पुरुषांना ईश्वर शिक्षा देईल तर श्रद्धावंत स्त्री-पुरुषांवर आपल्या दयेचा वर्षाव करेल. ईश्वर अतिशय दयाळू आणि अतिशय कृपाळू आहे.

प्रकरण ३४ : शेबा
(सबा)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ईश्वर स्तुत्य आहे. आकाश आणि पृथ्वीवर जे काही आहे ते त्याच्याच मालकीचे आहे. मृत्युपश्चात जगात तोच स्तुतीचा अधिकारी असणार आहे. तो सुज्ञ, सदैव सजग आहे. २ पृथ्वीच्या अंतरंगात जे काही जाते आणि तिथून जे काही बाहेर पडते ते तो जाणतो. तसेच आकाशात काय पोहोचते आणि तिथून खाली काय उतरते ते तो जाणतो. तो दयाशील, क्षमाशील आहे.

३ सत्य नाकारणारे घोषणा करतात, "अंतिम घटका आमच्यावर कधीही येणार नाही." त्यांना सांगा, "होय, अदृश्याचा जाणकार असलेल्या माझ्या पालनकर्त्याची शपथ, ती वेळ नक्कीच तुमच्यावर येणार आहे. आकाश आणि पृथ्वीवरचा सूक्ष्मसा कण किंवा त्यापेक्षाही लहान-

मोठी कुठलीही गोष्ट त्याच्या नजरेतून सुटलेली नाही. एका खुल्या ग्रंथात
त्याने ती नोंदवली आहे. [४] श्रद्धावंतांना तो नक्कीच त्यांच्या सत्कर्मांचा
चांगला मोबदला देईल. त्यांना त्याच्याकडून क्षमेचा आणि सन्माननीय
उपजीविकेचा लाभ होईल.” [५] पण आमच्या संकेतांविरुद्ध लढणाऱ्यांना,
संकेतांना पराभूत करू पाहणाऱ्यांना वेदनादायी शिक्षा भोगावी लागेल.
[६] ज्यांना ज्ञानप्राप्ती झाली आहे ते जाणतात की तुमच्या पालनकर्त्याकडून
तुमच्यावर जे अवतरीत झाले आहे ते सत्य आहे आणि ते सर्वशक्तिमान,
स्तुत्य ईश्वराकडे घेऊन जाते.

[७] सत्य नाकारणारे विचारतात, “तुमच्या देहाची माती झाल्यावर त्या
सूक्ष्म कणांपासून नवीन माणूस निर्माण होईल असे सांगणारी एक व्यक्ती
तुम्हाला दाखवू का? [८] ईश्वराविषयीचा हा शोध त्यानेच लावला आहे
की त्याला वेडाचा झटका आला आहे?” अजिबात नाही. मृत्युपश्चात
जीवनावर विश्वास न ठेवणाऱ्यांना शिक्षेला सामोरे जावे लागेल, कारण
वाट चुकून ते सन्मार्गापासून दूर भरकटले आहेत. [९] आकाशात आणि
पृथ्वीवर जे काही आहे त्याने ते चौफेर वेढले गेले आहेत हे त्यांना दिसत
नाही का? आमच्या मनात आले तर आम्ही पृथ्वीला त्यांना गिळंकृत
करायला लावू किंवा नभाचा तुकडा त्यांच्यावर कोसळायला लावू.
ईश्वराभिमुख असलेल्या आमच्या प्रत्येक सेवकासाठी यात निश्चितच
एक संकेत आहे.

[१०] आम्ही दावीदवर फार मोठी कृपा केली. आम्ही पर्वतांना व पक्ष्यांना
सांगितले, “आमची स्तुती करण्यात त्याला सामील व्हा.” त्याच्यासाठी
आम्ही लोखंडालाही मृदू बनवले व त्याला सांगितले, [११] “यापासून पूर्ण
लांबीची चिलखते बनव आणि योग्य मापाच्या कड्या बनव. तेव्हा तुम्ही
सत्कर्मे करा. नक्कीच तुमची सगळी कृत्ये मी पाहतो.”

१२ आम्ही वाऱ्याला शलमोनच्या अधीन केले. त्याचा सकाळचा
प्रवाह एक महिन्याचा होता तर संध्याकाळचा प्रवाह एक महिन्याचा.
आम्ही त्याच्यासाठी वितळलेल्या तांब्याचा झरा प्रवाहित केला. त्याच्या
पालनकर्त्याच्या आज्ञेने काही जिन्नना त्याच्यासाठी काम करायला लावले.
त्यांच्यापैकी कुणी आमची अवज्ञा केली तर आम्ही त्यांना धगधगत्या
अग्नीची शिक्षा भोगायला लावू. १३ शलमोनने जे जे इच्छिले ते त्यांनी
त्याच्यासाठी बनवले. मोठेमोठे महाल, पुतळे, पाण्यासाठी मोठाल्या
जलाशयांसारखे हौद आणि जागेवर पक्की बसवलेली मोठाली स्वयंपाकाची
भांडी इत्यादी. आम्ही दावीदच्या कुटुंबियांना सांगितले, "ईश्वराचे आभार
माना. माझ्या सेवकांपैकी फार थोडे लोक खऱ्या अर्थाने कृतज्ञ आहेत!"
१४ आम्ही जेव्हा शलमोनच्या मृत्यूचा निर्णय सुनावला तेव्हा जिन्नना
जमिनीतल्या एका किड्याव्यतिरिक्त कुणीही याची सूचना दिली नाही.
त्याची काठी कुरडत राहिलेला हा किडा जेव्हा खाली पडला, तेव्हा
जिन्नना स्पष्टपणे कळले की त्यांना अदृश्याचे ज्ञान असते तर त्यांना असे
अपमानास्पद काम करत रहावे लागले नसते.
१५ शेबाच्या लोकांना त्यांच्या मातृभूमीत आम्ही दोन संकेत दिले होते:
एक डाव्या बाजूला आणि उजव्या बाजूला असे दोन बगीचे. आम्ही त्यांना
सांगितले, "ईश्वराने तुम्हाला जे देऊ केले आहे त्यावर उदरनिर्वाह करा
आणि कृतज्ञ रहा. त्याने तुमच्याकडे चांगली जमीन दिली आहे आणि
तुमचा पालनकर्ता खूप क्षमाशील आहे." १६ तरीही त्यांनी सत्याकडे
पाठ फिरवली. तेव्हा आम्ही धरण उध्वस्त करून त्यांच्यावर जलप्रलय
आणवला. त्यांच्या बगीच्यांच्या जागी कडवट फळे देणारे बगीचे आणले,
ज्यात काटेरी झुडपे आणि जंगली बोरी होत्या. १७ त्यांच्या कृतघ्नतेपोटी

आम्ही त्यांचा असा बदला घेतला आहे. जे कृतघ्न असतात त्यांचाच आम्ही असा बदला घेतो.
१८ आम्ही त्यांच्या शहरांजवळ आमचा कृपाशीर्वाद लाभलेली आणखी
काही शहरे वसवली होती. त्यांच्या दरम्यानचे (प्रवासाचे) टप्पे निश्चित
करून त्यांना सांगितले होते, "दिवसा आणि रात्री येथून सुरक्षितपणे प्रवास
करा." १९ पण त्यांनी सांगितले, "हे प्रभू! आमच्या प्रवासाचा कालावधी
वाढव." अशा रीतीने त्यांनी स्वतःवर अन्याय करून घेतला आणि आम्ही
त्यांना इतिहासजमा करून टाकले. भूमीवर त्यांना सगळीकडे विखरून
टाकले. संयमी आणि कृतज्ञ असणाऱ्यांसाठी यात निश्चितच संकेत आहे.
२० सैतानाने अचूकपणे त्यांचे मूल्यमापन केले आणि ते त्याच्या
मागोमाग गेले; अपवाद फक्त खऱ्या सेवकांच्या गटाचा. २१ पण
सैतानाला असे करण्याचे अधिकार नव्हते. मृत्युपश्चात जीवनावर कुणाचा
विश्वास आहे आणि कुणाच्या मनात त्याविषयी शंका आहे यातला फरक
तेवढा आम्हाला उघड करायचा होता. तुमच्या पालनकर्त्याचे सगळ्यावर
बारकाईने लक्ष आहे.
२२ ईश्वराव्यतिरिक्त ज्यांना तुम्ही उपास्य मानतात त्यांचा धावा करा!
ना त्यांना आकाशात किंवा पृथ्वीवर अणूमात्र किंमत आहे, ना त्यांचा या
दोहोत काही वाटा आहे. ना त्यांच्यापैकी कुणी ईश्वराचा मदतनीस आहे.
२३ त्याच्यापुढे कुणाचीही शिफारस चालत नाही. अपवाद फक्त त्याची
परवानगी मिळवणाऱ्यांचा. त्यांच्या मनातील भीती कमी झाली की ज्यांना
अनुमती मिळाली आहे अशांना ते विचारतील, "तुमच्या पालनकर्त्याने
काय सांगितले होते?" त्यांचे उत्तर असेल, "त्याने सत्य तेच सांगितले
होते. तो सर्वश्रेष्ठ आहे, सर्वोच्च आहे."
२४ त्यांना विचारा, "पृथ्वीवरून आणि आकाशातून तुम्हाला

उपजीविका कोण पुरवतो?" त्यांना सांगा, "तो ईश्वर आहे. तुम्ही किंवा आम्ही (दोघांपैकी एक पक्ष) एकतर सन्मार्गावर आहे किंवा उघड चूक केलेली आहे." २५ त्यांना सावध करा, "तुम्हाला आमच्या पापांसाठी जबाबदार धरले जाणार नाही की आम्हाला तुमच्या पापांसाठी जबाबदार धरले जाणार नाही." २६ त्यांना हेही सांगा, "ईश्वर आपणा सगळ्यांना स्वतःसमोर बोलावून घेईल आणि आपल्यात निवाडा करेल. तो सत्याने आणि न्यायाने निर्णय देईल. तो सर्वज्ञ आहे, न्यायी निर्णयदाता आहे." २७ त्यांना विचारा, "ज्यांना तुम्ही ईश्वरतुल्य मानता त्यांच्यापैकी एकजण तरी दाखवू शकता काय?" खरोखर हे शक्यच नाही! कारण तो एकमेव ईश्वर आहे. तो सर्वशक्तिमान आहे, सुज्ञ आहे.

२८ आम्ही तुम्हाला समस्त मानवजातीसाठी शुभवार्ता आणि सावधानतेचा इशारा देणारा प्रेषित म्हणून पाठवले. पण त्यांच्यापैकी पुष्कळांना याची जाणीव नाही. २९ ते तुम्हाला विचारतात, "तुझे बोलणे सत्य असेल तर हे वचन कधी पूर्ण होणार आहे?" ३० त्यांना सांगा, "तुमच्यासाठी तो दिवस पूर्वीच निश्चित झालेला असून त्यात तुम्ही क्षणभरही मागेपुढे करू शकत नाही."

३१ सत्य नाकारणारे म्हणतात, "आम्ही या ग्रंथावरही विश्वास ठेवत नाही की याच्या आधीच्याही ग्रंथावर." हे प्रेषिता! तुम्ही पाहू शकला असता तर दिसले असते, हे अपराधी ईश्वरासमोर उभे राहून एकमेकांना दूषणे देत आहेत. त्या दिवशी दुर्बळ असणारे उद्धट असणाऱ्यांना म्हणतील, "तुम्ही आम्हाला भरीस घातले नसते तर आम्ही नक्कीच श्रद्धावंत झालो असतो." ३२ उद्धट असणारे त्या दिवशी दुर्बलांना विचारतील, "ईश्वराचे मार्गदर्शन तुमच्याकडे आल्यावर आम्ही तुम्हाला त्यापासून थोपवले होते का? अजिबात नाही! तुम्ही स्वतः होऊनच हा अपराध केला आहे."

३३ त्या दिवशी दुर्बल भासणारे त्यांच्यापेक्षा बलवान भासणाऱ्यांना
म्हणतील, "नाही! तुम्हीच रात्रंदिवस कारस्थाने करत होता. ईश्वराला
नाकारण्याची आणि त्याचे समकक्ष दैवत असल्याचे मानण्याची आज्ञा
तुम्हीच आम्हाला दिली होती." समोर शिक्षा पाहताच ते पश्चाताप व्यक्त
करू लागतील. सत्य नाकारण्यावर आग्रही राहणाऱ्यांच्या गळ्यात आम्ही
साखळदंड अडकवू. त्यांना त्यांच्या दुष्कृत्याच्या पटीतच शिक्षा मिळेल.
३४ आम्ही कुठल्याही समाजात आमच्या प्रेषिताला पाठवल्यावर हे
असेच घडले आहे. समाजातील समृद्ध पक्ष आमच्या प्रेषिताला म्हणत,
"तू आपल्याबरोबर जे आणले आहे ते आम्ही नाकारतो." ३५ ते म्हणत,
"आमच्याकडे भरपूर संपत्ती आणि संतती आहे. त्यामुळे आम्हाला शिक्षा
होणे शक्यच नाही." ३६ त्यांना सांगा, "माझ्या पालनकर्त्याच्या मनात
येईल त्याला तो संपन्नता देतो तर त्याच्या मनात येईल त्याला विपन्नता
देतो.फ पण यामागची योजना बहुतेकांच्या लक्षात येत नाही. ३७ तुमची
संपत्ती किंवा संतती तुम्हाला आमच्याजवळ आणणार नाही. सत्यावर
विश्वास ठेवणाऱ्यांना आणि सत्कर्मे करणाऱ्यांना दुप्पट मोबदला मिळेल.
श्रेष्ठ स्वर्गीय महालांमध्ये त्यांचा निवास असेल. ३८ या उलट आमच्या
संदेशांना विरोध करून त्यामागील हेतू पराभूत करू पाहणाऱ्यांना शिक्षा
सुनावली जाईल. ३९ त्यांना सांगा, "माझा पालनकर्ता त्याला हव्या त्या
सेवकाला संपन्नता देतो तर त्याला हव्या त्या सेवकाला विपन्नता देतो.
त्यातून तुम्ही ईश्वरी कार्यासाठी जो खर्च करता त्याचा तो मोबदला देतो.
तो सर्वोत्कृष्ट दाता आहे."
४० ज्या दिवशी तो सत्य नाकारणाऱ्यांना एकत्र करेल त्या दिवशी
ईशदूतांना विचारेल, "हे लोक तुमचीच उपासना करत होते का?"
४१ ते उत्तर देतील, "तू सन्माननीय आहेस! तूच आमचा रक्षक आहेस,

ते नाहीत. ते जिन्नची उपासना करत. त्यांच्यापैकी बहुतेकांचा जिन्नवर विश्वास होता!" ४२ आज तुमच्याकडे एकमेकांना हानी किंवा लाभ पोहोचवायचे सामर्थ्य नाही. आम्ही अपराध्यांना सांगू, "तुम्ही सातत्याने जे नाकारत होता त्या अग्नीची शिक्षा भोगा."

४३ जेव्हाही आमचे संदेश सुस्पष्ट रूपात त्यांच्यापर्यंत पोहोचवले जातात, ते म्हणतात, "हा असा माणूस आहे जो तुम्हाला तुमच्या पूर्वजांच्या उपास्यापासून दूर नेऊ इच्छितो." आणि कुरआनविषयी म्हणतात, "हा ग्रंथ म्हणजे निव्वळ याने रचलेला बनाव आहे." सत्य नाकारण्यावर ठाम राहणारे त्यांच्यापाशी सत्य येताच म्हणतात, "ही तर फक्त जादू आहे." ४४ आम्ही त्यांना ना अभ्यासण्यासाठी ग्रंथ दिला, ना तुमच्यापूर्वी कुणी सावध करणारा त्यांच्याकडे पाठवला. ४५ त्यांच्या पूर्वजांनीही सत्य नाकारले होते. आम्ही यांच्या पूर्वजांना जेवढे सामर्थ्य दिले होते त्याच्या एक दशांशही यांना दिलेले नाही. पण त्यांनी माझ्या प्रेषिताला नाकारले. त्यानंतर माझी शिक्षा किती भयानक होती!

४६ हे प्रेषिता! त्यांना सांगा, "मी तुम्हाला एकाच गोष्टीचा आग्रह धरत आहे, तो म्हणजे ईश्वरासमोर जोडीने किंवा एकट्याने उभे रहा आणि सखोल चिंतन करा म्हणजे तुमच्या लक्षात येईल, तुमच्या या मित्राला वेडाने झपाटलेले नाही. तो तर फक्त तुम्हाला सावध करायला आला आहे, तुम्हाला कठोर शिक्षेचा इशारा द्यायला आहे." ४७ प्रेषिता! त्यांना सांगा, "मी तुमच्याकडे काही मोबदला मागितला असेल तर तो तुमच्याकडेच ठेवा. मला मोबदला देणारा फक्त ईश्वर आहे. तो सगळ्याचा साक्षीदार आहे."

४८ त्यांना सांगा, माझा पालनकर्ता असत्यावर सत्याचा प्रहार करेल. तो लपलेल्या सगळ्या गोष्टींचा जाणकार आहे. ४९ त्यांना सांगा, "आता

सत्य आले आहे आणि ते चिरंतन टिकणार आहे. असत्याकडे ना काही चांगले निर्माण करण्याची, ना त्याचे पुनर्निर्माण करण्याची ताकद आहे.” ५० त्यांना ठामपणे सांगा, “मी चुकत असेन तर त्याचे ओझे माझ्या डोक्यावर असेल आणि मला जर योग्य मार्गदर्शन मिळाले असेल तर ते माझ्या पालनकर्त्याने माझ्यावर प्रकट केलेल्या सत्यामुळेच. खरेच तो सगळे ऐकतो. तो आपल्याजवळ असतो.”

५१ निवाड्याच्या दिवशी त्यांना पाहू शकाल तर ते अगदी घाबरलेल्या अवस्थेत असतील. त्यांना बाहेर पडायला काही वाव नसेल आणि सत्य नाकारणारे अगदी करकचून पकडले जातील. ५२ ही अवस्था झाल्यावर ते म्हणतील, “आता आमचा ईश्वरावर विश्वास बसला आहे.” पण त्यापासून इतके दूर गेल्यावर ते विश्वास कसा काय ठेवू शकतील? ५३ पूर्वी त्यांनी सत्य नाकारले होते. दूर राहून ते सत्याविषयी केवळ अंदाज बांधत असत. ५४ आता ते आणि त्यांच्या इच्छा-आकांक्षा यांच्यामध्ये असा अडथळा उभा करू, जसा त्यांच्यासारख्या त्यांच्या पूर्वजांमध्ये उभा केला होता. कारण तेही असेच अस्वस्थ करणाऱ्या शंकेने घेरलेले होते.

प्रकरण ३५ : निर्माता (फातिर)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ईश्वर स्तुत्य आहे. त्याने आकाश व पृथ्वी निर्माण केले. आपल्या दूतांना संदेशवाहक बनवून त्याने आपले संदेश त्यांच्याबरोबर पाठवले आणि त्यांना पंखांच्या दोन किंवा तीन किंवा चार जोड्या देऊ केल्या. आपण निर्माण केलेल्या सजीवांमध्ये तो कशाचीही भर घालू शकतो.

त्याच्याकडे कसलीही इच्छा धारण करण्याची ताकद आहे. २ ईश्वर
लोकांवर जी कृपा करतो ती कुणी रोखू शकत नाही की त्याने रोखून
धरलेली कुणी सोडवू शकत नाही. तो सर्वशक्तिमान आहे, सुज्ञ आहे.
३ लोकहो! ईश्वराने केलेल्या उपकारांचे स्मरण ठेवा. आकाशातून
आणि पृथ्वीवरून तुमच्यासाठी उपजीविका पाठवणारा त्याच्याशिवाय
अन्य कुणी निर्माता आहे का? त्याच्याशिवाय अन्य कुणीही ईश्वर
नाही. तरीही या सत्याकडे तुम्ही पाठ कशी फिरवता? ४ हे प्रेषिता!
त्यांनी तुम्हाला नाकारले तर लक्षात ठेवा, तुमच्या आधीच्या प्रेषितांनाही
त्यांनी नाकारले होते. सगळ्या गोष्टींचा निर्णय ईश्वराच्याच हातात आहे.
सगळ्या गोष्टी त्याच्याकडे परत जाणार आहेत.
५ लोकहो! ईश्वराचे वचन सत्य आहे. या जगातील जीवनाला भुलू
नका की ईश्वराविषयी बनावट गोष्टी रचणाऱ्यावर भुलू नका. ६ सैतान
निःसंशय तुमचा शत्रू आहे. त्याला शत्रूसारखी वागणूक द्या. त्याच्या
अनुयायांनी नरकाग्नीचे निवासी व्हावे यासाठीच त्यांना तो आपल्या
मागोमाग बोलावून घेतो. ७ सत्य नाकारण्यावर ठाम असणाऱ्यांना
कठोर शिक्षेला सामोरे जावे लागेल तर सत्यावर विश्वास ठेवून सत्कर्मे
करणाऱ्यांना त्याच्याकडून क्षमेचा आणि महान मोबदल्याचा लाभ होईल.
८ ज्याला त्याची अपकृत्ये सत्कृत्ये असल्यासारखे भासवले जाते,
त्याची बरोबरी योग्य मार्गदर्शन लाभलेल्याशी कशी करता येईल? ईश्वर
त्याच्या मर्जीला येईल त्याला सन्मार्गावर आणतो तर त्याच्या मर्जीला
येईल त्याला त्यापासून दूर नेतो. त्यांच्यासाठी दुःख करून स्वतःचा नाश
करून घेऊ नका. ईश्वराला त्यांच्या सगळ्या अपकृत्यांची चांगलीच
जाणीव आहे.
९ ढगांना उंचावर नेणारे वारे ईश्वरच पाठवतो. आम्ही त्यांना मृतवत्

जमिनीवर वाहून नेतो आणि मृत धरतीला पुन्हा एकदा टवटवी देतो. पुनर्निर्माण हे असे असते. [१०] कुणाला सन्मानाची अपेक्षा असेल त्याने लक्षात ठेवावे, सन्मानाचा हकदार फक्त ईश्वर आहे. चांगले शब्द त्याच्यापर्यंत पोहोचतात आणि सत्कृत्ये त्याच्या नजरेत उंचावतात. दुष्ट योजना आखणाऱ्यांना कठोर शिक्षा मिळेल आणि त्यांच्या योजना निष्फळ ठरतील.

[११] ईश्वराने आधी तुम्हाला मातीपासून निर्माण केले, त्यानंतर वीर्याच्या एका थेंबापासून आणि मग तुमच्या जोड्या बनवल्या. ईश्वराला कळल्याशिवाय कुणीही स्त्री गर्भ धारण करत नाही की बालकाला जन्म देत नाही. कुणाचेही आयुष्य वाढवले जात नाही की कमी केले जात नाही. हे सगळे एका ईश्वरी ग्रंथात नोंदवलेले आहे. ईश्वरासाठी असे करणे अगदी सहजशक्य आहे.

[१२] दोन समुद्र एकासारखे नाहीत. एकाचे पाणी आहे गोड, आल्हाददायक आणि तहान शमवणारे, तर दुसऱ्याचे आहे कडवट आणि खारट. तरीही दोहोंमधूनही तुम्हाला ताजी मासळी मिळते, दागिने बनवण्यासाठी मोती मिळतात आणि दोहोंचेही पाणी कापत नौका पुढे सरकतात. हे पाहून तुम्हाला ईश्वरी कृपेची जाणीव व्हावी आणि याविषयी तुम्ही कृतज्ञ रहावे. [१३] ईश्वराने दिवसामागून रात्रीची आणि रात्रीमागून दिवसाची योजना केली. त्याने सूर्य-चंद्राला आपल्या आज्ञेत ठेवले. ते आपल्या निर्धारित कक्षेत फिरतात. ईश्वर हा असा आहे. तो तुमचा पालनकर्ता आहे. हे साम्राज्य त्याचे आहे. खजुराच्या बीवरच्या टरफलाइतकी क्षुल्लक गोष्टही त्यांच्या मालकीची नाही, ज्यांचा तुम्ही ईश्वराव्यतिरिक्त धावा करता. [१४] तुम्ही त्यांचा धावा केला, तर तो त्यांच्या कानावर जात नाही आणि जरी गेला तरी ते त्याला प्रतिसाद देत नाहीत. पुनर्निर्माणाच्या दिवशी तुम्ही

त्यांना ईश्वराचा दर्जा दिला होता हे ते अमान्य करतील. सर्वज्ञ अशा ईश्वराशिवाय कुणीही तुम्हाला सत्य सांगू शकणार नाही.

१५ लोकहो! तुम्हाला ईश्वराची गरज आहे. ईश्वर स्वयंपूर्ण आहे आणि स्तुत्य आहे. १६ त्याने इच्छिले तर तो तुम्हाला पृथ्वीतलावरून हटवू शकतो आणि तुमच्या जागी नवीन निर्मिती (नवी मानवजात) आणू शकतो. १७ त्याच्यासाठी हे काम अवघड नाही. १८ कुणीही इतरांचे ओझे आपल्या शिरावर वाहू शकणार नाही. अति ओझ्याने थकल्यामुळे आपले ओझे हलके करण्यासाठी कुणाकडेही मदतीची याचना केली तरी त्याचे ओझे हलके होणार नाही. अगदी त्यांचे जवळचे नातेवाईक असले तरी. अदृश्य ईश्वराची भीती बाळगणाऱ्यांना आणि नियमित प्रार्थना करणाऱ्यांनाच तुम्ही सावधगिरीचा इशारा देऊ शकता. स्वतःची आत्मशुद्धी करण्यातच मानवाचे कल्याण सामावले आहे. सगळ्यांना ईश्वराकडेच परतायचे आहे.

१९ आंधळा आणि डोळस एकसारखे नाहीत, २० की अंधार आणि उजेड एकसारखे नाहीत. २१ ऊन आणि सावली एकसारखी नाही, २२ की जिवंत आणि मृत एकसारखे नाहीत. ईश्वराची इच्छा असेल त्यालाच तो ऐकण्याची शक्ती देतो पण कबरीमध्ये असणाऱ्यांना तुम्ही ऐकवू शकत नाही. २३ तुम्ही फक्त सावध करणारे आहात. २४ आम्ही तुम्हाला सत्याच्या साक्षीने शुभवार्ता आणि सावधानतेचा इशारा घेऊन पाठवले आहे. ज्यांच्याकडे सावध करणारा पाठवले नाही असा एकही समाज या भूतलावर नाही. २५ त्यांनी तुम्हाला नाकारले तर लक्षात घ्या, त्यांच्या पूर्वजांनीही त्यांच्या प्रेषितांना नाकारले. आमचे प्रेषित त्यांच्याकडे सत्याचे स्पष्ट संकेत, पवित्र ग्रंथ म्हणजे अज्ञाननिवारक ग्रंथ घेऊन गेले होते. २६ पण अखेरीस सत्य नाकारण्याबद्दल आग्रही असणाऱ्यांना आम्ही कोंडीत पकडले. माझी शिक्षा किती भयानक होती!

२७ ज्यामुळे विविधरंगी फळे फुलतात असा पाऊस आम्ही आकाशातून
पाठवतो. हे त्यांना दिसत नाही का? पर्वतांमध्ये लाल-काळया-पांढऱ्या
रंगच्छटांच्या शिळा असतात. यावर ते चिंतन करत नाहीत का?
२८ त्याचप्रमाणे माणसे, पशुपक्षी, गुरेढोरेही निरनिराळ्या रंगांचे दिसतात.
त्याच्या सेवकांपैकी जे ज्ञानी आहेत तेच त्याची भीती बाळगतात. ईश्वर
सर्वशक्तिमान आणि अतिशय दयाळू आहे.

२९ ईश्वरी ग्रंथ वाचणारे, नियमितपणे प्रार्थना करणारे आणि आम्ही
देऊ केलेल्या उपजीविकेतून खाजगी व सार्वजनिक दानधर्म करणारे अशा
व्यापारात गुंतवणूक करत आहेत, ज्यामध्ये त्यांचे कधीही नुकसान होणार
नाही. ३० ईश्वर त्यांना याचा यथायोग्य मोबदला देईल आणि त्यांच्यावर
कृपेची छत्रछाया धरेल. तो क्षमाशील आहे आणि दाद देणारा आहे.
३१ आम्ही तुमच्यावर अवतरीत केलेला ग्रंथ म्हणजे पूर्वीच्या पवित्र ग्रंथाला
पुष्टी देणारे सत्य आहे. ईश्वर सगळे जाणतो आणि आपल्या सेवकांवर
बारकाईने नजर ठेवतो.

३२ (प्रेषितांच्या) नंतर आम्ही ग्रंथाचा वारसा आमच्या भक्तांपैकी
त्यांना प्रदान केला, ज्यांची आम्ही निवड केली आहे. त्यांच्यापैकी
काहींनी स्वतःवर अन्याय केला आहे, काही मध्यममार्गी (चूक व बरोबर
यांच्या मध्यावर) आहेत तर काही ईश्वरी कृपेने सत्कर्मे करून आपला
दर्जा उंचावणारे आहेत. ही ईश्वराची फार मोठी कृपा आहे. ३३ त्यांना
चिरंतन बगीच्यात प्रवेश मिळेल. तिथे त्यांना घालायला सोन्यामोत्याची
आभूषणे व रेशमी वस्त्रे असतील. ३४ तिथे ते म्हणतील, "आमचे सगळे
दुःख दूर करणारा ईश्वर स्तुत्य आहे. आमचा स्वामी क्षमाशील आणि
चांगल्याची नोंद ठेवणारा आहे. ३५ आपल्या कृपेने त्याने आम्हाला अशा

चिरंतन स्वर्गात प्रवेश दिला आहे, जिथे दुःख आणि निराशा आम्हाला स्पर्शही करू शकत नाहीत.''

३६ सत्य नाकारणारे नरकाग्नीतच खितपत पडतील. त्यांचा छळ कधी कमी केला जाणार नाही की मृत्यूने सुटका करावी म्हणून त्यांच्या मरणाचा आदेश काढला जाणार नाही. प्रत्येक कृतघ्न माणसाला आम्ही असाच दंड देतो. ३७ तिथे ते आक्रोश करतील, ''हे पालनकर्त्या! आम्हाला इथून बाहेर काढ. आम्ही सत्कर्मे करू, पूर्वीपेक्षा वेगळे वागू.'' पण तो त्यांना उत्तर देईल, ''तुम्ही सत्कर्मेच करणार होतात तर सावधानतेचा इशारा मिळण्याएवढे दीर्घ आयुष्य तुम्हाला दिले नव्हते का? सावध करणारा तुमच्याकडे आला नव्हता का? तेव्हा चाखा आता शिक्षेची चव.'' या अपराध्यांना कुणीही पाठीराखे असणार नाहीत.

३८ आकाश आणि पृथ्वीवरची प्रत्येक गुप्त गोष्ट ईश्वर जाणतो. माणसाच्या अंतरंगातल्या गोष्टी तो चांगल्याच ओळखतो. ३९ तुम्हाला पृथ्वीचे वारसदार बनवणारा तोच आहे.[अ] त्याला नाकारणाऱ्याला आपल्या नकाराचे ओझे वागवावेच लागेल. सत्य नाकारल्याने नास्तिकांच्याप्रति ईश्वराच्या नाराजीत वाढच होईल. त्यांचे अधिकच नुकसान होईल.

४० त्यांना विचारा, ''तुम्ही ईश्वराव्यतिरिक्त ज्यांचा धावा करता त्यांचा कधी विचार केला आहे का?'' पृथ्वीवर त्यांनी काही निर्माण केले

[अ] या श्लोकात, पृथ्वीला वारसा म्हणून देण्यात आल्याचा अर्थ असा आहे की पूर्वीच्या राष्ट्रांच्या आगमनानंतर तुम्ही त्यांच्या जागी पृथ्वीवर स्थायिक झाला आहात. हा सर्वशक्तिमान ईश्वराचा मार्ग आहे की तो राष्ट्रांना पृथ्वीवर स्थायिक होण्याची आणि प्रगती करण्याची संधी देतो. नंतर जेव्हा ते स्वतःला असमर्थ ठरवतात, तेव्हा तो त्याच्या जागी दुसरे राष्ट्र उदयास आणतो.

असेल तर ते मला दाखवा किंवा आकाश निर्माण करण्यात त्यांचा काही वाटा आहे का? किंवा मी त्यांना असा एखादा ग्रंथ दिला आहे का ज्याचा पुरावा त्यांच्या कृतीला दिला जातो? खरोखर, या अपराध्यांनी एकमेकांना दिलेली वचने म्हणजे निव्वळ फसवणूक आहे. ४१ आकाश आणि पृथ्वी आपल्या स्थानावरून ढळू नयेत म्हणून त्यांना जागेवर धरून ठेवणारा निश्चितच ईश्वर आहे. ते आपल्या जागेवरून ढळलेच तर त्याच्याशिवाय कुणीही त्यांना परत जागेवर आणू शकत नाही. तो निःसंशय संयमी आणि अतिशय क्षमाशील आहे.

४२ ते ईश्वराची शपथ घेऊन सांगतात की, त्यांच्याकडे कुणी सावध करणारा आला असता तर त्याच्याकडून त्यांनी इतर समाजांपेक्षा चांगले मार्गदर्शन घेतले असते. पण असा सावध करणारा त्यांच्याकडे गेला असता त्यांच्या तिटकाऱ्यात भरच पडली होती. ४३ त्यांनी या भूमीत अनाचार केला आणि दुष्कृत्यांच्या योजना आखल्या. पण त्या आखणाऱ्यांवरच या योजना उलटल्या. त्यांच्या पूर्वीच्या अपराध्यांना जशी शिक्षा मिळाली त्याचीच त्यांना अपेक्षा आहे का? तुम्हाला ना कधी ईश्वराच्या पद्धती बदललेल्या आढळतील, ना कधी त्याचा निर्णय मागे फिरलेला आढळेल. ४४ पृथ्वीवर फिरून त्यांनी त्यांच्या पूर्वजांची झालेली दुर्दशा पाहिली नाही का? ताकदीने ते त्यांच्यापेक्षा कितीतरी वरचढ होते. आजपर्यंत कुणीही आकाश किंवा पृथ्वीवरील ईश्वराची योजना बिघडवू शकले नाही. तो सर्वज्ञ आहे, सर्वशक्तिमान आहे.

४५ लोकांनी केलेल्या दुष्कृत्यांबद्दल त्यांना धारेवरच धरायचे असते तर ईश्वराने भूतलावर एकालाही जिवंत ठेवले नसते. पण ठराविक वेळेपर्यंत तो त्यांना उसंत देतो आणि ठरलेली वेळ येऊन ठेपताच ते कळून चुकतात, ईश्वर खरोखर त्याच्या सेवकांवर नजर ठेवून आहे.

प्रकरण ३६ : या. सीन.
(या. सीन.)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ या सीन २ शहाणपणाने ओतप्रोत भरलेल्या कुरआनची शपथ.
३ तुम्ही खरोखर ईश्वरी प्रेषितांपैकी एक आहात. ४ तुम्ही सन्मार्गावर
आहात. ५ सर्वशक्तिमान, दयाळू ईश्वराने पाठवलेला साक्षात्कार
तुमच्याबरोबर आहे. ६ त्यायोगे तुम्ही अशा समाजाला सावध करू शकाल
ज्यांच्या पूर्वजांना सावध केले गेले नव्हते आणि त्यामुळे ज्यांना त्याची
माहिती नव्हती.

७ त्यांच्यापैकी पुष्कळजणांविरुद्ध आमचा शब्द खरा ठरला आहे. ते
सत्यावर विश्वास ठेवणार नाहीत. ८ आम्ही त्यांच्या माना हनुवटीपर्यंत
साखळदंडांनी जखडून टाकल्या आहेत. त्यामुळे त्यांना त्यांची डोकी
हलवता येत नाहीत. ९ आम्ही त्यांच्या मागेपुढे अडथळे उभे केले आहेत.
त्यांना काही दिसू नये यासाठी आम्ही ही योजना केली आहे. १० तुम्ही
त्यांना सावध केले काय अथवा नाही काय, त्यांना काहीही फरक पडणार
नाही. ते तुमच्यावर विश्वास ठेवणार नाहीत. ११ जे आमच्या संदेशांचे
अनुसरण करतात आणि अदृश्य कृपाळू ईश्वरावर विश्वास ठेवतात,
त्यांनाच तुम्ही सावध करू शकता. त्यांना ईश्वरी क्षमेची आणि श्रेष्ठ
मोबदल्याची शुभवार्ता द्या.

१२ आम्ही मृतांना निश्चितच पुन्हा एकदा जीवित करू आणि त्यांनी
जी कर्मे पुढे पाठवली व जी मागे ठेवली त्यांची नोंद ठेवू. एका स्पष्ट
ग्रंथात आम्ही हे सगळे नोंदवले आहे.

१३ ज्यांच्या नगरात आमचे प्रेषित गेले होते अशा समाजांचे उदाहरण

त्यांच्यासमोर ठेवा. १४ आम्ही त्यांच्याकडे आमचे दोन प्रेषित पाठवले
असता त्यांनी दोघांनाही नाकारले. तेव्हा आम्ही तिसऱ्या एका प्रेषिताला
पाठवून त्यांची ताकद वाढवली. त्यांनी आपल्या समाजबांधवांना
सांगितले, "खरेच! ईश्वराने आपला प्रेषित म्हणून आम्हाला तुमच्याकडे
पाठवले आहे." १५ यावर त्यांनी उत्तर दिले, "तुम्ही आमच्यासारखीच
मर्त्य माणसे असून ईश्वराने तुमच्यावर काहीही अवतरीत केलेले नाही.
तुम्ही नक्कीच खोटे बोलत आहात." १६ प्रेषितांनी त्यांना सांगितले,
"आम्ही तुमच्याकडे काय आणले आहे ते ईश्वर जाणतो." १७ "ईश्वराचा
संदेश स्पष्टपणे तुमच्यापर्यंत पोहोचवणे एवढेच आमचे कर्तव्य आहे."
१८ पण त्यांनी उत्तर दिले, "आम्हाला तर तुमच्यात दुष्ट सैतान दडलेला
दिसतो. तुम्ही आपल्या कारवाया थांबवल्या नाहीत तर आम्ही नक्कीच
तुमच्यावर दगडांचा मारा करू. आमच्या हातांनी तुम्हाला वेदनादायी
शिक्षा देऊ." १९ प्रेषित त्यांना म्हणाले, "तुमचे दुर्दैव तुमच्याबरोबर!
सत्याचे पालन करायची ताकीद दिली म्हणून असे बोलताय का?
निःसंशय, तुम्ही सगळ्या मर्यादा ओलांडलेले लोक आहात."

२० तेवढ्यात शहराच्या दूरच्या भागातून एक इसम धावत आला आणि
नगरवासीयांना सांगू लागला, "लोकहो! या प्रेषितांच्या सांगण्याप्रमाणे
वागा. २१ ज्यांना योग्य मार्गदर्शन लाभले आहे आणि जे कसलाही मोबदला
मागत नाहीत त्यांचे अनुसरण करा."

२२ ज्याने आपल्याला अस्तित्व दिले आणि ज्याच्याकडे आपल्याला
परत नेले जाईल त्याची उपासना मी का करायची नाही? २३ त्याच्याव्यतिरिक्त
इतरांना ईश्वर का मानायचे? कृपाळू ईश्वराने आपल्याला इजा करायचे
ठरवले तर त्यांची मध्यस्थी कुचकामी ठरेल. ते आपली त्यातून सुटकाही
करू शकणार नाहीत. २४ अशावेळी ती आपली उघड चूक ठरेल.

२५ खरोखर, मी या प्रेषितांच्या पालनकर्त्यावर विश्वास ठेवला आहे.
तेव्हा माझे सांगणे लक्षपूर्वक ऐका.” २६ त्या इसमाला आम्ही सांगितले,
“तू स्वर्ग प्रवेश कर.” यावर तो उद्‌गारला, “हे माझ्या लोकांना कळेल
का? २७ माझ्या पालनकर्त्याने मला क्षमा केली आहे आणि सन्माननीय
लोकांमध्ये मला स्थान दिले आहे हे त्यांना कसे समजेल?”
२८ त्यानंतर आम्ही स्वर्गातून त्याच्या समाजाकरिता सैन्य पाठवले नाही
(की त्यांनी सत्यावर विश्वास ठेवावा), कारण आम्ही तसे सैन्य पाठवत
नसतो. २९ फक्त एकच स्फोट झाला आणि ते सगळे निपचित पडले.
३० केवढे दुर्दैव मनुष्यजातीचे! आम्ही पाठवलेल्या प्रत्येक प्रेषिताची त्यांनी
थट्टा व हेटाळणीच केली. ३१ त्यांच्या पूर्वी कित्येक पिढ्या आम्ही नष्ट
केल्या हे त्यांनी पाहिले नाही का? त्यांच्याकडे ते कधीही परतून येणार
नाहीत. ३२ त्या सगळ्यांना एकत्र करून आमच्यासमोर नक्कीच आणले
जाईल.
३३ निष्प्राण झालेल्या धरतीत त्यांच्यासाठी एक संकेत आहे. तिला
पुन्हा एकदा टवटवीत करून तिच्यातून आम्ही अन्नधान्य उगवतो ज्यावर
त्यांचा उदरनिर्वाह चालतो. ३४ धरतीवर आम्ही द्राक्षाच्या, खजुराच्या
बागा फुलवल्या आणि त्यात पाण्याचे प्रवाह खेळवले. ३५ त्यांनी आपल्या
हातांनी उगवली नसली तरी त्याची फळे त्यांनी खावीत हा आमचा
त्यामागचा हेतू होता. याविषयी ते कृतज्ञ राहणार नाहीत का? ३६ सगळ्या
गोष्टींच्या ज्याने जोड्या निर्माण केल्या तो ईश्वर पवित्र आहे. पृथ्वीवर जे
काही उगवते त्याच्या, माणसाच्या स्वतःच्या आणि त्याला ज्याचे ज्ञान
नाही, अशा कित्येक गोष्टींच्या जोड्या आहेत.
३७ रात्र होण्यात मानवासाठी एक संकेत आहे. त्यातून आम्ही दिवसाचा
उजेड काढून घेतो आणि माणूस अंधारात ढकलला जातो. ३८ सूर्यदेखील

सर्वशक्तिमान, सर्वज्ञ ईश्वराने ठरवून दिलेल्या मार्गानेच जातो. ३९ आम्ही चंद्राच्याही कला ठरवून दिल्या असून अखेरीस तो खजुराच्या वाळलेल्या काठीसारखा होऊन जातो. ४० सूर्य चंद्रावर मात करू शकत नाही की दिवस रात्रीवर अतिक्रमण करू शकत नाही. प्रत्येकजण आपल्या स्वतःच्या कक्षेत फिरतो.

४१ त्यांच्यासाठी आणखी एक संकेत म्हणजे नौकेत भरून आम्ही त्यांच्या वंशजांना किनाऱ्यावर आणले. ४२ नौकेसारख्या इतर अनेक वस्तू आम्ही तयार केल्या, ज्यावर माणूस आरूढ होऊ शकतो. ४३ आम्ही इच्छिले असते तर त्यांना जलसमाधी दिली असती. अशा वेळी कुणीही त्यांना मदत केली नसती की वाचवले नसते. ४४ त्यांना ठराविक काळाची मुदत मिळाली आहे ती केवळ आमच्या दयेमुळे.

४५ लोकांना सांगितले जाते, "जे संकट तुमच्यावर मागून किंवा पुढून येते त्याची जाणीव ठेवून वागा म्हणजे तुमच्यावर दया केली जाईल." (पण त्यांनी त्याकडे पाठ फिरवली.) ४६ खरोखर, तुमच्या पालनकर्त्याकडून त्यांच्यापर्यंत आलेला एकही संकेत असा नाही ज्याकडे त्यांनी पाठ फिरवली नसेल. ४७ जेव्हा त्यांना सांगितले जाते, "ईश्वराने तुम्हाला जे काही दिले आहे त्यातील काही भाग गरजूंना द्या." तेव्हा सत्य नाकारणारे श्रद्धावंतांना म्हणतात, "ईश्वराची मर्जी असती तर त्याने ज्यांना पोसले असते त्यांना आम्ही का पोसावे? असे वागायला सांगून तुम्ही धडधडीत चूक करत आहात."

४८ ते विचारतात, "तू खरे बोलत असशील तर ईश्वराने दिलेले वचन कधी पूर्ण होईल?" ४९ ते फक्त एका स्फोटाची वाट बघत असतील. ते आपसात त्यावरून वाद घालत असतानाच अचानक त्यांच्यावर स्फोटाचा घाला पडेल. ५० त्यांना ना मृत्युपत्र बनवायची संधी मिळेल,

ना कुटुंबियांकडे परत आणले जाईल. ५१ शिंग फुंकताच एकाएकी त्यांना
कबरीतून उठवले जाईल आणि तातडीने ईश्वराकडे आणले जाईल.
५२ चकीत होऊन ते म्हणतील, "केवढे दुर्दैव आमचे! झोपेतून आम्हाला
कुणी उठवले? कृपाळू ईश्वराने जे वचन दिले होते ते हेच! ईश्वराचा
प्रेषित खरे तेच बोलत होता!" ५३ एकच स्फोटच होईल आणि त्या
सगळ्यांना एकत्र करून आमच्यासमोर आणले जाईल.

५४ त्या दिवशी कुणावरही अन्याय केला जाणार नाही. प्रत्येकाला
त्याच्या कर्मानुसारच मोबदला दिला जाईल. ५५ त्या दिवशी स्वर्गाचे
निवासी आनंदाने भारावून जातील. ५६ ते आणि त्यांच्या पत्नी सावलीतल्या
आसनांवर विश्रांती घेत असतील. ५७ तिथे त्यांना फळे आणि हवी
असलेली प्रत्येक गोष्ट मिळेल. ५८ दयाळू ईश्वर त्यांचे या शब्दांनी स्वागत
करेल, "तुम्हाला शांती लाभो!"

५९ त्या दिवशी ईश्वर त्यांना म्हणेल, "तुम्ही गुन्हेगार आहात, सदाचारी
लोकांपासून वेगळे व्हा. ६० आदमच्या पुत्रांनो! सैतान तुमचा उघड शत्रू
आहे. त्याची उपासना करू नका अशी ताकीद मी तुम्हाला दिली नव्हती?
६१ माझी उपासना करा, नक्कीच तो योग्य मार्ग आहे असे सांगितले नव्हते?
६२ तरीही सैतानाने मोठ्या संख्येने तुम्हाला मार्गभ्रष्ट केले. तुम्हाला तेव्हा
काही का कळत नव्हते? ६३ तुम्हाला ज्याचे वचन दिले गेले होते तोच
हा नरक आहे. ६४ सत्य नाकारल्याची शिक्षा म्हणून आज निवाड्याच्या
दिवशी त्यात प्रवेश करा. ६५ आज आम्ही त्यांची तोंडे शिवून टाकू. त्यांचे
हात आमच्याशी बोलतील तर त्यांचे पाय त्यांच्या दुष्कृत्यांची साक्ष
ठेवतील."

६६ आमची इच्छा असती तर आम्ही त्यांचे डोळे बाहेर काढले असते.
मग ते वाट शोधण्यासाठी चाचपडले असते, पण वाट कशी शोधू शकले

असते? ६७ आमची इच्छा झाली असती तर ते जिथे उभे आहेत तिथेच
आम्ही त्यांच्या पायातली शक्ती काढून घेतली असती, म्हणजे त्यांना
पुढे जाता आले नसते की मागे वळता आले नसते. ६८ आम्ही एखाद्याचे
आयुष्यमान वाढवले, तर त्याचा विकास उलट्या दिशेने करतो. तरीही
लोक आपल्या बुद्धीचा वापर करणार नाहीत का?

६९ आम्ही प्रेषिताला एखादे काव्य शिकवलेले नाही. त्याला ते
शोभणारही नाही. हे तर फक्त ईश्वराचे बोधग्रंथ आहे, स्पष्ट कुरआन
आहे. ७० हा खऱ्या अर्थाने जिवंत असणाऱ्यांसाठी दिलेला इशारा आहे
आणि सत्य नाकारणाऱ्यांविरुद्धच्या ईश्वरी निर्णयाला न्याय देणारी वचने
आहेत.

७१ आम्ही आमच्या हातांनी ज्या गोष्टी निर्माण केल्या आहेत त्यात
त्यांच्यासाठी गुरेढोरेही आहेत. हे त्यांना दिसत नाही का? या गुराढोरांचे
ते मालक आहेत. ७२ या प्राण्यांना आम्ही त्यांच्या स्वाधीन केले आहे.
काहींवर आरूढ होऊन ते प्रवास करतात तर काहींचा अन्न म्हणून वापर
करतात. ७३ काहींपासून दूध मिळवतात तर काहींपासून अन्य फायदे
मिळवतात. तरीही ते ईश्वराचे ऋणी राहणार नाहीत का? ७४ त्यांनी
मदत मिळवण्याच्या आशेने ईश्वराऐवजी इतरांना त्याचे स्थान दिले आहे.
७५ पण ते त्यांना काही मदत करू शकणार नाहीत तर त्यांनाच त्यांच्यासारखे
झुंडीतून ईश्वरासमोर आणले जाईल. ७६ हे प्रेषिता! त्यांच्या शब्दांनी दुःखी
होऊ नका. ते काय उघड करतात आणि आपल्या मनात काय लपवतात
ते सगळे ईश्वर जाणतो.

७७ वीर्याच्या एका थेंबापासून त्याने माणसाला निर्माण केले, हे तो
जाणत नाही का? आणि तरीही दुष्टपणे तो भांडखोर बनला आहे.
७८ ईश्वराने त्याला स्वतःलाही निर्माण केले आहे हे विसरून जाऊन

तो त्याच्याविरुद्ध वादविवाद घालत आहे. माणूस प्रश्न विचारू लागला आहे, "हाडे कुजून गेल्यानंतर कोण त्यांना परत एकदा नवजीवन देईल?" ७९ त्याला सांगा, "पहिल्यांदा त्यांना ज्याने अस्तित्वात आणले तोच परत एकदा त्यांना जीवन देईल. सर्व प्रकारच्या निर्मितीचे ज्ञान त्याच्याकडे आहे. ८० तो तुमच्यासाठी हिरव्या झाडांपासून अग्नी निर्माण करतो आणि त्यापासून तुम्ही अग्नी प्रज्वलित करता." ८१ ज्याने आकाश आणि पृथ्वी निर्माण केली तर याच्यासारखी दुसरी माणसे तो निर्माण करू शकणार नाही का? नक्कीच करू शकतो. खरोखर सर्वोच्च निर्माता आहे तो! सर्वज्ञ आहे! ८२ जेव्हा तो एखादी वस्तू निर्माण करायचे फर्मान काढतो तेव्हा फक्त म्हणतो, "अस्तित्वात ये!" आणि ती वस्तू अस्तित्वात येते. ८३ सगळ्या गोष्टींचे नियंत्रण ज्याच्याकडे आहे, तो ईश्वर पूजनीय आहे. त्याच्याकडेच तुम्हा सगळ्यांना परत नेले जाईल.

प्रकरण ३७ : पंक्तिबद्ध होणारे (अस्-साफ्फात)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ रांगेत सगळ्यांच्या पुढे असणाऱ्या देवदूतांची शपथ, २ दुष्ट शक्तींना पिटाळून देणाऱ्यांची शपथ, ३ या उपदेशाला पोहोचविणाऱ्यांची शपथ, ४ तुमचा ईश्वर एक आहे. ५ तो आकाशाचा आणि पृथ्वीचा आणि त्यांच्या दरम्यानच्या प्रत्येक गोष्टीचा अधिपती आहे. तो पूर्व दिशेचा अधिपती आहे.

६ सगळ्यात खालचा आकाश आम्ही नक्षत्रांच्या सौंदर्याने नटवला आहे. ७ सगळ्या विद्रोही सैतानांपासून तो सुरक्षित ठेवला आहे. ८ सर्व बाजूंनी वेढले गेल्याने सर्वोच्च दरबारात काय चालले आहे हे त्यांच्या

कानावर पडू शकत नाही. ९ त्यांना तिथून हुसकावून लावले आहे आणि त्यांना कायमसाठी शिक्षा दिली जाईल. १० कुणी तिथल्या संभाषणाचा एक शब्द जरी ऐकायचा प्रयत्न केला तरी धगधगती अग्निज्वाला त्याचा पाठलाग करेल.

११ तेव्हा सत्य नाकारणाऱ्यांना विचारा, "आम्ही निर्माण केलेल्या इतर वस्तूंपेक्षा त्यांना निर्माण करणे आमच्यासाठी कठीण होते का? आम्ही चिकणमातीपासून त्यांना निर्माण केले." १२ उपहासाने ते चेष्टा करू लागले तर आश्चर्यचकित होऊ नका. १३ त्यांना (सत्याचा अंगीकार करण्याबद्दल) उपदेश केल्यास ते लक्ष देत नाहीत. १४ जेव्हाही एखादा संकेत पाहतात, ते त्याची खिल्ली उडवतात. १५ आणि म्हणतात, "ही निव्वळ जादू आहे!" १६ "काय? मेल्यावर आमच्या हाडांची माती झाल्यानंतर आम्हाला परत जिवंत केले जाईल? १७ आमच्या पूर्वजांनाही जिवंत केले जाईल?" १८ त्यांना सांगा, "नक्कीच! आमच्याकडून तुम्हाला अपमानित केले जाईल."

१९ फक्त एकच स्फोट होईल आणि त्यांचे डोळे उघडतील. २० ते म्हणतील, "आमचा धिक्कार असो! हाच तो न्यायाचा दिवस आहे." २१ त्यांना सांगितले जाईल, "हा निवाड्याचा दिवस आहे जो तुम्ही नाकारत होता." २२ आम्ही आज्ञा करू, "इतरांना ईश्वराचा दर्जा देणाऱ्या सगळ्या अपराध्यांना आणि त्यांच्या साथीदारांना आणि ते ज्यांची उपासना करत त्यांना एकत्र करा. २३ ईश्वराव्यतिरिक्त इतरांची उपासना करणाऱ्यांना अग्निपथावर न्या. २४ तिथे थांबून त्यांना जाब विचारा. २५ "तुम्ही एकमेकांना मदत का करू शकत नाही?" २६ खरोखर त्या दिवशी ते शरणागती पत्करतील.

२७ एकमेकांकडे पाहून ते परस्परांना जाब विचारू लागतील. २८ त्यांच्यातील एक गट म्हणेल, "तुम्ही स्वत:ला हितचिंतक दाखवून

आमची फसवणूक करीत होता." [२९] दुसरा गट त्यांना म्हणेल, "नाही! सत्यावर श्रद्धा न ठेवणारे तुम्हीच होता. [३०] आमची तुमच्यावर काही सत्ता नव्हती, पण तुम्ही स्वतःच विद्रोही होता. [३१] पण ईश्वराने आमच्याविरुद्ध दिलेला शब्द आता खरा ठरला आहे. आम्हाला त्याने दिलेली शिक्षा भोगावीच लागेल. [३२] आम्ही जसे वाट चुकलो होतो तसेच तुम्हालाही आम्ही चुकीच्या वाटेने नेले." [३३] त्या दिवशी त्या सगळ्यांना शिक्षेतला आपापला वाटा उचलावा लागेल.

[३४] अपराध्यांशी आम्ही असेच वागतो. [३५] "ईश्वराशिवाय अन्य कुणी दैवत नाही," असे सांगितल्यावर उद्दामपणे त्यांनी त्याकडे पाठ फिरवली. [३६] आणि प्रश्न केला, "एका वेड्या कवीच्या सांगण्यावरून आम्ही आमच्या दैवतांना सोडून देऊ का?" [३७] नक्कीच तो असे सत्य घेऊन आला आहे, ज्यातून आधीच्या साक्षात्कारीत सत्याची पुष्टी मिळते. [३८] तुम्हाला वेदनादायी शिक्षेची चव चाखावीच लागेल. [३९] तुम्हाला तुमच्या कृत्यांना अनुसरूनच मोबदला मिळेल.

[४०] पण ईश्वराच्या निवडक भक्तांना [४१] ठरवून दिलेली तरतूद मिळेल. [४२] त्यांना हरतऱ्हेची फळे मिळतील व सन्मान मिळेल. [४३] आनंददायी बागांमध्ये [४४] एकमेकांसमोर ते आसनावर बसलेले असतील. [४५] त्यांच्यामधून वाहत्या झऱ्यातील पेयाचे प्याले फिरवले जातील. [४६] ते पेय पांढरेशुभ्र व चविष्ट असेल. [४७] त्यामुळे त्यांची शुद्ध हरपणार नाही की त्यांना झिंग चढणार नाही. [४८] त्यांच्याबरोबर त्यांच्या सहचारिणी असतील. त्या विनम्र, देखण्या व सुंदर डोळ्यांच्या असतील. [४९] त्या काळजीपूर्वक जतन करून ठेवलेल्या मोत्यांसारख्या असतील.

[५०] एकमेकांमध्ये ते चर्चा करू लागतील. [५१] त्यांच्यापैकी एकजण म्हणेल, "माझा एक मित्र होता. [५२] तो मला विचारायचा, तुझा खरोखर

विश्वास आहे का, ५३ की आपण मेल्यानंतर आपल्या हाडांची माती झाल्यानंतर आपला निवाडा केला जाईल?" ५४ पुढे तो म्हणेल, "आपण त्याला पाहून येऊ या का?" ५५ त्याचा शोध घेतल्यावर तो त्याला अग्नीने वेढलेल्या नरकात खितपत पडलेला दिसेल. ५६ त्याला पाहताच तो म्हणेल, "ईश्वरशपथ! तुझ्यामुळे मीही उध्वस्त झालो असतो. ५७ ईश्वराची कृपा नसती तर मलाही असेच नरकात आणले गेले असते." ५८ पुढे तो ईशकृपा लाभलेल्या आपल्या मित्रांना विचारेल, "आपल्याला आता मरण येणार नाही का? ५९ पहिल्या मृत्युनंतर परत आपला मृत्यू होणार नाही का? आपल्याला शिक्षा दिली जाणार नाही का? ६० खरेच! हा फार मोठा विजय आहे!"

६१ असा विजय मिळवण्यासाठी प्रत्येकाने कर्म केले पाहिजे. ६२ हा पाहुणचार चांगला आहे की जक्कुमचे वृक्ष चांगले आहेत? ६३ अपराध्यांची परीक्षा घेण्यासाठी आम्ही ते बनवले आहेत. ६४ नरकाच्या तळातून हा वृक्ष उगवतो. ६५ त्याची फळे सैतानाच्या चेहेऱ्यासारखी विद्रुप आहेत. ६६ ही फळे खाऊन अपराध्यांना आपली पोटे भरावी लागतील. ६७ त्यांना उकळते पाणी प्यावे लागेल. ६८ यानंतर पुन्हा एकदा निःसंशय त्यांना नरकात परतावे लागेल. ६९ त्यांचे पूर्वज असेच वाट चुकल्याचे त्यांना आढळले होते. ७० त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून ते चालले आहेत. ७१ त्यांच्या आधीचे त्यांचे पूर्वजही निःसंशय वाट चुकलेले होते. ७२ आम्ही त्यांना सावध करणारा प्रेषित पाठवला होता तरीही ते चुकीच्या वाटेने गेले. ७३ ज्यांना सावध केले गेले होते त्यांचा अंत कसा झाला पहा! ७४ ईश्वराने निवडलेल्या भक्तांचा मात्र असा दुर्दैवी अंत झाला नाही.

७५ नोहाने आमचा धावा केला होता आणि त्याला आम्ही कसा

उत्कृष्ट प्रतिसाद दिला! ७६ त्याला आणि त्याच्या लोकांना आम्ही
मोठ्या संकटातून वाचवले. ७७ आणि फक्त त्याच्याच वारसदारांना
आम्ही जिवंत ठेवले. ७८ नंतरच्या पिढ्यांनाही आम्ही नोहाची
नोंद द्यायला लावली. ७९ सर्व लोकांमध्ये नोहाला शांती लाभो!
८० सदाचारी लोकांना आम्ही असाच मोबदला देतो. ८१ खरोखर तो
आमच्या श्रद्धावंत सेवकांपैकी एक होता. ८२ उरलेल्या लोकांना आम्ही
जलसमाधी दिली.

८३ अब्राहामदेखील असाच श्रद्धावंत होता. ८४ प्रांजळ मनाने तो
त्याच्या पालनकर्त्याकडे गेला. ८५ आपल्या वडिलांना व समाजबांधवांना
त्याने प्रश्न विचारला, "तुम्ही ज्यांची पूजा करता, ते काय आहेत?
८६ ईश्वराला सोडून खोट्या उपास्यांची भक्ती करताय? ८७ या विश्वाचा
पालनकर्ता कोण आहे असे तुम्हाला वाटते?"

८८ नंतर त्याने आकाशातील तारकांकडे एक नजर टाकली आणि
म्हणाला, ८९ "माझी तब्येत बरी नाही." ९० यावर ते सगळे त्याला
एकट्याला सोडून तिथून निघून गेले. ९१ यानंतर त्यांच्या उपास्यांकडे
वळून त्याने विचारले, "तुम्ही खात का नाही? ९२ तुम्हाला असे काय
झाले आहे की तुम्ही बोलू शकत नाही?" ९३ यानंतर त्यांच्याकडे वळून
उजव्या हाताने तो त्यांच्यावर प्रहार करू लागला. ९४ हे पाहताच त्याचे
समाजबांधव धावतच त्याच्याकडे आले. ९५ पण त्याने त्यांना विचारले,
"स्वतःच्याच हातांनी बनवलेल्या वस्तूंची कसली उपासना तुम्ही करता?
९६ जेव्हा की ईश्वराने तुम्हाला आणि तुम्ही हातांनी बनवलेल्या वस्तूंना
निर्माण केले आहे." ९७ यावर त्याचे समाजबांधव म्हणाले, "धगधगती
भट्टी बांधून त्यात याला टाकून द्या." ९८ त्यांना त्याला इजा पोहोचवायची
होती. पण आम्ही त्या सगळ्यांना अपमानित केले. ९९ अब्राहामने त्यांना
सांगितले, "मी माझ्या पालनकर्त्याकडे जात आहे. तो मला सन्मार्ग

दाखवेल.” १०० त्याने ईश्वराला प्रार्थना केली, “मला एक सदाचारी पुत्र दे.” १०१ त्याला एक संयमी आणि धैर्यवान पुत्र मिळेल अशी शुभवार्ता आम्ही दिली.

१०२ अब्राहामचा पुत्र सज्ञान झाल्यावर एके दिवशी अब्राहाम त्याला म्हणाला, “हे मुला! मी तुझे बलिदान देत आहे, असे स्वप्न मी पाहिले. तुझा यावर काय विचार आहे सांग!” मुलाने उत्तर दिले, “पिताजी, तुम्हाला मिळालेल्या आज्ञेप्रमाणे वागा. ईश्वराची इच्छा असेल तर त्यावेळीही मी खंबीर राहीन.” १०३ दोघेही ईश्वराला समर्पित झाले आणि अब्राहामने मुलाला जमिनीवर पालथे ठेवले. १०४ हे पाहताच आम्ही अब्राहामला हाक दिली, “अब्राहाम! १०५ तू तुझे स्वप्न पूर्ण केले आहेस.” खरेच सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही असा मोबदला देतो. १०६ नक्कीच ही त्याची सत्वपरीक्षा होती. १०७ एका मोठ्या बलिदानाच्या बदल्यात आम्ही त्याची सुटका केली. १०८ नंतरच्या पिढ्यांमध्येही आम्ही त्याचे स्मरण कायम ठेवले. १०९ अब्राहामचे अभिनंदन! त्याला शांती लाभो! ११० सदाचारी लोकांना आम्ही असा मोबदला देतो. १११ खरोखर तो आमचा एक श्रद्धावंत सेवक होता. ११२ आम्ही अब्राहामला इसहाकच्या जन्माची शुभवार्ता दिली; तो एक प्रेषित आणि सदाचारी माणूस होणार होता. ११३ त्याच्यावर तसेच इसहाकवरही आमची कृपा होती. त्यांचे काही वारसदार चांगले होते तर काहींनी स्पष्टपणे स्वतःवर अत्याचार केला होता.

११४ मोझेस आणि अहरोनवरही आम्ही कृपा केली होती. ११५ त्यांना आणि त्यांच्या लोकांना आम्ही (धार्मिक छळ, क्रूर गुलामगिरी यांसारख्या) मोठ्या छळापासून वाचवले. ११६ आम्ही त्यांना मदत केली म्हणून ते विजयी ठरले. ११७ सगळ्या गोष्टी स्पष्ट करून सांगणारा ग्रंथ आम्ही त्यांना दिला ११८ आणि त्यांना सन्मार्गावर आणले. ११९ नंतरच्या

पिढ्यांमध्येही त्यांना अनुयायी मिळाले. अशा रीतीने आम्ही त्यांना यशस्वी केले. १२० मोझेस आणि अहरोन यांना शांती लाभो. १२१ सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही असाच मोबदला देतो. १२२ खरोखर ते आमच्या श्रद्धावंत सेवकांपैकी होते.

१२३ इलियासदेखील प्रेषितांपैकी होता. १२४ त्याने आपल्या लोकांना विचारले, "तुम्हाला ईश्वराची भीती वाटत नाही का? १२५ सर्वोत्कृष्ट निर्मात्याला सोडून तुम्ही 'बअल' नावाच्या मूर्तीचा धावा करत आहात? १२६ तुमच्या आणि तुमच्या वाडवडिलांच्या पालनकर्त्याचा तुम्हाला विसर पडला आहे का?" १२७ पण त्यांनी इलियासला नाकारले. त्यांना याचा जाब द्यावाच लागेल. १२८ ईश्वराच्या निवडक सेवकांना यातून वगळले जाईल. १२९ पुढच्या पिढ्यांमध्येही आम्ही त्याचे अनुयायी निर्माण केले आणि त्याला यशस्वी केले. १३० इलियास आणि त्याच्या लोकांना शांती लाभो. १३१ सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही निःसंशय असा मोबदला देतो. १३२ तो नक्कीच आमच्या श्रद्धावंत सेवकांपैकी होता.

१३३ लूतदेखील आमच्या प्रेषितांपैकी एक होता. १३४ आम्ही त्याला आणि त्याच्या सगळ्या लोकांना वाचवले. १३५ फक्त त्याच्या वृद्ध पत्नीला सोडून; तिला आम्ही मागेच ठेवले. (ती सत्य नाकारण्यात ठाम राहिली.) १३६ बाकी सगळ्यांना आम्ही नष्ट करून टाकले. १३७ त्यांच्या उद्ध्वस्त नगरांमधून तुम्ही सकाळ-संध्याकाळ फिरता. १३८ तरीही यातून काही बोध घेणार नाही का?

१३९ यूनुसदेखील पैगंबरांपैकी एक होता. १४० माणसांनी भरलेल्या नौकेकडे तो धावत गेला. १४१ नौकेवरील माणसांनी चिठ्ठ्या टाकल्या. त्यात तो हरला म्हणून नौकावाल्यांनी त्याला समुद्रात टाकून दिले. १४२ तो स्वतःला दोष देत असतानाच एका माशाने त्याला गिळले. १४३ तो

ईश्वराचे स्मरण करून स्तुतिगान करणारा नसता तर [१४४] पुनर्निर्माणाच्या दिवसापर्यंत तो माशाच्या पोटातच राहिला असता. [१४५] पण आम्ही त्याला समुद्रकिनाऱ्यावर फेकायला लावले. तिथे त्याची तब्येत बिघडली. [१४६] त्याच्यावर सावली धरण्यासाठी त्याच्याजवळ आम्ही भोपळ्याची वेल उगवली. [१४७] त्यानंतर लाखो लोकांकडे आम्ही त्याला प्रेषित म्हणून पाठवले. [१४८] त्यांनी त्याच्यावर विश्वास ठेवला, म्हणून आम्ही काही काळ त्यांना जीवनाचा आनंद लुटू दिला.

[१४९] आता त्यांना विचारा, "काय? त्यांच्या पालनकर्त्याला मुली आहेत, तर त्यांना मुले आहेत?" [१५०] आम्ही देवदूतांना स्त्री बनवले आहे याचे ते साक्षीदार होते का? [१५१] अजिबात नाही! हे त्यांनी ईश्वराविरुद्ध रचलेले कुंभाड आहे. [१५२] ईश्वराला मुले झाली आहेत असे खोटे ते बोलतात का? [१५३] ते म्हणतात, त्याने मुलांपेक्षा मुलींना प्राधान्य दिले आहे का? [१५४] तुम्हाला झाले तरी काय? तुम्ही असे मत कसे बनवू शकता? [१५५] तुम्ही यावर चिंतन करणार नाही का? [१५६] की तुमच्याकडे याचा स्पष्ट पुरावा आहे? [१५७] खरे बोलत असाल तर तुमचा ग्रंथ सादर करा.

[१५८] ईश्वराचे जिन्नशी नातेसंबंध असल्याचा पोकळ दावा ते करतात. पण स्वतः जिन्नला हे माहीत आहे की निवाड्यासाठी त्याला ईश्वरासमोर उभे केले जाईल. [१५९] ते ज्या गोष्टींचा संबंध ईश्वराशी लावतात, त्यांच्यापेक्षा ईश्वर कितीतरी श्रेष्ठ आहे. [१६०] ईश्वराचे सच्चे सेवक मात्र अशी चूक करत नाहीत. [१६१] ना तुम्ही, ना तुम्ही ज्यांची उपासना करता ते [१६२] कुणालाही ईश्वराविषयी खोट्यानाट्या गोष्टी सांगून त्याच्यापासून दूर नेऊ शकत नाही. [१६३] अपवाद फक्त नरकात जळून जाणे ज्यांच्या नशिबी आहे त्यांचा! त्यांना तुम्ही ईश्वरापासून दूर नेऊ शकता. [१६४] ईश्वराचे दूत

म्हणतात, "आम्हा प्रत्येकाला एक जागा नेमून दिलेली आहे. १६५ आम्ही शिस्तबद्ध रांगेत उभे आहोत. १६६ आम्ही ईश्वराची स्तुती करतो."

१६७ ते (सत्य नाकारणारे) म्हणतात, १६८ "पूर्वीच्या लोकांसारखा ग्रंथ आमच्याकडेही असता तर, १६९ आम्ही निःसंशय ईश्वराचे सच्चे सेवक झालो असतो." १७० पण त्यांनी हा ग्रंथ नाकारला आहे, त्यांना लवकरच अद्दल घडेल. १७१ निःसंशय, आमच्या सेवकांसाठी आणि प्रेषितांसाठी आमचा निवाडा पूर्वीच करून झाला आहे. १७२ त्यांना नक्कीच आमची मदत मिळेल. १७३ आमचे सैन्य निश्चितच विजयी होईल. १७४ तेव्हा काही काळ त्यांच्यापासून दूर रहा. १७५ त्यांचे निरीक्षण करा, लवकरच त्यांना आमच्या वचनाचा पडताळा येईल.

१७६ त्यांना शिक्षा भोगायची खरोखर खूप घाई झाली आहे का? १७७ ज्या दिवशी ती शिक्षा त्यांच्या अंगणात उतरेल, तो दिवस किती भयंकर असेल! त्यांना यापासून पूर्वी सतर्क केले गेले होते. १७८ तेव्हा काही काळ त्यांच्यापासून दूर रहा. १७९ त्यांना लवकरच अद्दल घडेल, पहात रहा. १८० तुमचा पालनकर्ता महिमावान आहेः स्तुतीचा हक्कदार असलेला पालनकर्ता, ते ज्यांचा संबंध ईश्वराशी जोडतात त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ आहे. १८१ प्रेषितांना शांती लाभो! १८२ सगळ्या जगाचा अधिपती असलेला तो ईश्वर प्रशंसनीय आहे.

प्रकरण ३८ : सॉद
(सॉद)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ सॉद. उपदेशाने पूर्ण भरलेल्या अशा कुरआनची शपथ. २ सत्य
नाकारणारे दुरभिमानात आणि वैरभावात गुंतून पडले आहेत. ३ त्यांच्या
आधीच्या कित्येक पिढ्या आम्ही नष्ट करून टाकल्या आहेत आणि
सुटका करून घ्यायला खूप उशीर झाल्यावर ते आक्रोश करू लागले होते.
४ त्यांच्यामधूनच एकजण सावध करणारा आल्याचे पाहून ते चकित
झाले आहेत. ते म्हणतात, "हा जादूगार आहे, खोटारडा आहे. ५ सगळ्या
दैवतांची हकालपट्टी करून हा एकच ईश्वर असल्याचे सांगतो काय? हे
फारच चमत्कारिक आहे." ६ त्यांचे समाजश्रेष्ठी असे म्हणत प्रेषितापासून
दूर निघून गेले: "चला इथून! तुमच्याच दैवतांवर दृढ निष्ठा ठेवा. हे
नक्कीच याचे कारस्थान आहे. ७ पूर्वीच्या जुन्या धर्मात आम्ही असे काही
ऐकले नव्हते. हा याने रचलेला बनाव आहे. ८ आपल्या सगळ्यांना सोडून
ईश्वराने याच्याकडेच आपला संदेश पाठवला आहे का?" खरे तर यांच्या
मनात माझ्या इशाऱ्यांविषयी शंका आहे. खरे तर अजूनपर्यंत यांनी माझ्या
शिक्षेची चव चाखलेली नाही.

९ सर्वशक्तिमान, महाकृपाळू अशा पालनकर्त्याच्या कृपेचा खजिना
ते बाळगतात का? १० आकाशात, पृथ्वीवर आणि त्यांच्या दरम्यानच्या
प्रत्येक गोष्टीवर त्यांचे नियंत्रण आहे का? तसे असेल तर त्यांनी सर्व शक्य
मार्गांचा अवलंब करून आकाशाकडे झेप घ्यावी. ११ इतर समुदायांप्रमाणे
या समुदायाचाही पराभव अटळ आहे. १२ त्यांच्या आधी नोहाच्या व
सादच्या लोकांनी तसेच मोठी फौज बाळगणाऱ्या फारोच्या लोकांनीही

सत्य नाकारले होते. १३ समूदच्या जमातीने, लूतच्या समुदायाने आणि
वनात राहणाऱ्या अयकावाल्यांनीही सत्यावर विश्वास ठेवला नव्हता. ते
संघटित समूह होते. १४ या प्रत्येक समूहाने त्यांच्या प्रेषिताला खोटारडे
ठरवले आणि माझ्या शिक्षेने त्यांच्यावर घाला घातला. १५ त्यांना माझ्या
शिक्षेच्या फक्त एकाच स्फोटापर्यंत थांबावे लागेल: त्यात क्षणभराचाही
उशीर होणार नाही. १६ ते म्हणतात, "हे पालनकर्त्या! हिशेब करण्याचा
दिवस येण्यापूर्वीच तातडीने आमचे दुर्दैव उतरू दे!"

१७ त्यांचे अपशब्द संयमाने सहन करा. दावीद या आमच्या सेवकाचे
स्मरण करा, जो कणखर आणि सदैव आमच्या स्मरणात बुडालेला होता.
१८ सकाळ-संध्याकाळ तो आमची स्तुती करत असताना पर्वतांनाही
आम्ही त्याला साथ द्यायला लावत असू. १९ पक्षीही त्याला सामील होत
असत. हे सगळे ईश्वरावर श्रद्धा ठेवणारे होते. २० आम्ही त्याचे राज्य
बळकट केले आणि त्याला सुज्ञपणा व न्यायदानाची हातोटी देऊ केली.

२१ भिंतीवर चढून दावीदच्या कक्षात शिरणाऱ्या दोन भांडखोरांची कथा
तुम्ही ऐकली आहे का? २२ ते दोघे दावीदजवळ पोहोचताच तो घाबरला.
पण त्यांनी त्याला धीर दिला, "घाबरू नका! आमच्यात भांडण झाले
आहे. आमच्यापैकी एकाने दुसऱ्यावर अन्याय केला आहे: आमच्यात
योग्य निवाडा करा. न्यायाची कास सोडू नका आणि आम्हाला योग्य
मार्ग दाखवा.

२३ या माझ्या भावाकडे नव्व्याणव मेंढ्या आहेत तर माझ्याकडे फक्त
एकच मेंढी आहे. तो माझ्याकडून तिचाही ताबा मागतो आहे. बोलण्यात
तो माझ्यापेक्षा हुशार आहे." २४ दावीद म्हणाला, "तुझी मेंढी त्याच्या
मेंढ्यांमध्ये सामील करायची मागणी करून त्याने तुझ्यावर अन्यायच केला
आहे. बरेच भागीदार एकमेकांवर असाच अन्याय करतात. ईश्वरावर श्रद्धा

ठेवून सत्कर्मे करणारेच असे वागत नाहीत, पण त्यांची संख्या खूपच कमी आहे!" एवढ्यात एकाएकी दावीदला जाणवले, आम्ही त्याची परीक्षा घेत आहोत. आपल्या पालनकर्त्याकडे त्याने आपल्या अपराधाची क्षमा मागितली. गुडघे टेकून तो ईश्वरासमोर पश्चाताप व्यक्त करू लागला. २५ आम्ही त्यास क्षमा केले. त्याचा मोबदला असेल ईश्वराचे सान्निध्य. परतण्याचे उत्कृष्ट ठिकाण.

२६ आम्ही सांगितले, "दावीद! आम्ही तुला या प्रदेशाची मालकी दिली आहे. येथील लोकांमध्ये न्याय्य पद्धतीने निवाडा कर. स्वतःच्या इच्छा-आकांक्षांनुसार वागू नकोस. तसे केल्याने ईश्वरी मार्गापासून दूर जाशील. त्याच्या मार्गापासून दूर भटकणाऱ्यांना कठोर शिक्षा भोगावी लागेल, कारण ते हिशोबाच्या दिवसाकडे दुर्लक्ष करत आहेत."

२७ आकाश, पृथ्वी आणि त्या दरम्यानच्या गोष्टी आम्ही विनाकारण निर्माण केलेल्या नाहीत. सत्य अमान्य करणाऱ्यांना तसे वाटते. सत्य अमान्य करणाऱ्यांचे केवढे दुर्दैव! त्यांना धगधगत्या अग्नीत फेकले जाईल. २८ ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही भूमीत अनाचार माजवणाऱ्यांसारखेच वागवू का? सदाचारी लोकांना दुष्टासारखे वागवू का? २९ हे मोहम्मद! यातील संदेशावर लोकांनी चिंतन करावे आणि सुज्ञ लोकांनी बोध घ्यावा, यासाठी आम्ही हा पवित्र ग्रंथ तुम्हाला दिला आहे.

३० दावीदला आम्ही शलमोन दिला. तो (ईश्वराचा) उत्कृष्ट सेवक होता. त्याला ईश्वराची ओढ होती. ३१ एके संध्याकाळी त्याने उत्तम पैदाशीच्या चपळ व वेगवान घोड्यांची मिरवणूक पाहिली. ३२ ते घोडे पाहून तो म्हणाला, "चांगल्या गोष्टी मला आवडतात. त्या मला ईश्वराचे स्मरण करून देतात." सूर्यास्तानंतर सूर्य ढगाआड गेला आणि घोडे

शलमोनच्या नजरेआड झाले. ३३ "घोड्यांना परत माझ्याकडे घेऊन या" असे त्याने आपल्या सहकाऱ्यांना सांगितले. तो त्यांच्या पाठीवरून, मानेवरून मायेने हात फिरवू लागला.

३४ एक निष्प्राण देह त्याच्या सिंहासनावर ठेवून आम्ही शलमोनची परीक्षा घेतली. या घटनेनंतर तो आमच्याकडे वळला. ३५ त्याने प्रार्थना केली, "हे पालनकर्त्या! मला क्षमा कर! मला अशी ताकद दे जशी माझ्यानंतर कुणालाही मिळणार नाही. तू सर्वोत्कृष्ट दाता आहेस!" ३६ यानंतर आम्ही वाऱ्याला त्याच्या अधीन केले. त्याच्या आज्ञेनुसार त्याला हवे तिथे तो वारा हळुवारपणे वाहत असे. ३७ इमारती बांधणारे तसेच पाणबुडे असणारे हरतऱ्हेचे जिन्नही आम्ही त्याच्या ताब्यात दिले. ३८ साखळदंडांनी जखडलेले इतर जिन्नही त्याच्या अधीन केले. ३९ आम्ही त्याला आज्ञा केली, "ही आमची भेट आहे. कोणताही हिशेब न ठेवता तुला हवा तसा याचा उपयोग कर." ४० आमचे सान्निध्य हा त्याचा मोबदला असेल. परतण्याचे किती चांगले ठिकाण आहे हे!

४१ या आमच्या आणखी एका सेवकाचे- ईयोबचे (अय्यूबचे) स्मरण करा. त्याने आपल्या पालनकर्त्याचा धावा केला, "सैतानाने मला खूप दुःख आणि हालअपेष्टा दिल्या आहेत." ४२ आम्ही त्याला सांगितले, "इथे तुझे पाऊल आपट! तिथून थंड पाण्याचा प्रवाह वाहू लागेल. त्यातून तुला पिण्यासाठी व स्नानासाठी पाणी वापर." ४३ आम्ही त्याचे कुटुंबिय त्याला परत दिले आणि आमच्या कृपेने त्यांची संख्या दुप्पट केली. अंतर्दृष्टी लाभलेल्यांनी यातून बोध घ्यावा व आमचे स्मरण ठेवावे. ४४ आम्ही त्याला सांगितले, "तुझ्या हातात मूठभर सुक्या काड्या घे आणि त्याने प्रहार कर. पण आपली शपथ मोडू नकोस." आम्हाला तो

संयमी असल्याचे आढळले. किती उत्कृष्ट सेवक आहे हा! तो सतत त्याच्या पालनकर्त्याचे स्मरण करायचा.[अ]

४५ अब्राहाम, इसहाक व याकोब या आमच्या सेवकांचे स्मरण
करा. त्यांना आंतरिक शक्ती व दूरदृष्टी लाभली होती. ४६ एका विशिष्ट
हेतूने आम्ही त्यांची निवड केली होती, मृत्युपश्चात जीवनाचा संदेश
जाहीरपणे देण्यासाठी. ४७ आमच्या दृष्टीने ते खरोखर निवडक, खऱ्या
अर्थाने चांगल्या भक्तांपैकी होते. ४८ इस्माईल (इश्माएल), अलयसआ व
जुलकिफ्ल या आमच्या भक्तांचेही स्मरण करा. त्यांच्यापैकी प्रत्येकजण
न्यायी होता.

४९ हे स्मरणपत्र आहे की सदाचारी लोकांना चांगल्या ठिकाणी
परतायचे आहे. ५० चिरंतनतेच्या बगीच्यात; ज्याचे दरवाजे त्यांच्यासाठी
सताड उघडे असतील ५१ तिथे ते आरामदायी आसनांवर रेलून बसलेले
असतील. त्यांच्यासाठी मुबलक फळे व पेये उपलब्ध असतील. ५२ तिथे
त्यांच्याबरोबर त्यांच्याच वयाच्या शुद्ध, नम्र पत्नी असतील. ५३ हिशेबाच्या
दिवशी तुम्हाला याचेच वचन देण्यात आले होते. ५४ तुमच्यासाठी आम्ही
केलेली तरतूद कधीही संपणार नाही.

५५ पण उर्मट लोकांना सगळ्यात वाईट परतावा मिळेल.
५६ त्यांना नरकात रहावे लागेल, तिथल्या आगीत होरपळावे लागेल. किती

[अ] ईयोब (अय्यूब) हा कदाचित ईसापूर्व ९ व्या शतकातील इस्त्राएली प्रेषित होता. बायबलनुसार, तो सुरुवातीला खूप श्रीमंत होता. शेते, गुरेढोरे, घरे, मुले इत्यादी ईश्वरी कृपाशीर्वादाने त्याला इतके मिळाले की संपूर्ण पूर्वेकडे कुणीही त्याच्या बरोबरीचा नव्हता. असे असूनही, संदेष्टा ईयोब खूप कृतज्ञ आणि प्रामाणिक व्यक्ती होता. प्रचंड संपत्ती आणि सन्मान मिळूनही एखादी व्यक्ती विनम्र कशी राहू शकते याचे त्याच्या जीवनाने एक आदर्श उदाहरण ठेवले आहे.

वाईट ठिकाण आहे ते वास्तव्याचे! ५७ तिथे त्यांच्या वाट्याला उकळते
पाणी आणि काळाशार दुर्गंधीयुक्त द्रव असेल. ५८ यासारख्या इतरही
अनेक यातना भोगाव्या लागतील. ५९ ते एकमेकांकडे पाहून म्हणतील,
"लोकांचा जथ्था तुमच्या दिशेने येत आहे. त्यांचे स्वागत करू नका.
कारण ते नरकाग्नीच्या रोखाने निघाले आहेत." ६० ते त्यांना म्हणतील,
"इथे कुणीही तुमचे स्वागत करणार नाही. तुम्हीच आमच्यावर ही वेळ
आणलीत. तुमच्यामुळेच आम्हाला या गलिच्छ ठिकाणी रहावे लागले."
६१ पुढे ते ईश्वराची प्रार्थना करतील, "हे पालनकर्त्या! आमच्यावर ही
वेळ आणणाऱ्यांना दुप्पट शिक्षा दे." ६२ पुढे म्हणतील, "ज्यांना आम्ही
दुष्ट समजत होतो ते लोक इथे कसे दिसत नाहीत? ६३ ज्यांना आम्ही
उपहासाचे लक्ष्य बनवले होते ते कुठे आहेत? की ते इथेच असूनही
आम्हाला दिसत नाहीत?" ६४ नक्कीच हे असे घडणार आहे. त्या दिवशी
नरकाग्नीतले लोक एकमेकांना अशाच पद्धतीने दोष देतील.

६५ हे प्रेषिता! त्यांना सांगा, "मी फक्त सावध करणार आहे." ईश्वर
एकमेव आहे, तो सर्वशक्तिमान आहे. ६६ तो आकाशाचा, पृथ्वीचा आणि
त्यांच्या दरम्यानच्या सगळ्या गोष्टींचा अधिपती आहे. तो सर्वशक्तिमान,
अतिशय दयाळू आहे. ६७ त्यांना सांगा, "ही दूरगामी परिणाम करणारी
फार महत्त्वाची वार्ता आहे. ६८ तरीही तुम्ही त्याकडे दुर्लक्ष करत आहात.
६९ माणसाच्या निर्मितीवरून (देवदूतांच्या) सर्वोच्च बैठकीत चाललेल्या
चर्चेचे ज्ञान मला नाही. ७० मला एवढाच साक्षात्कार झाला आहे की मी
फक्त तुम्हाला सावध करणारा आहे."

७१ तुमच्या पालनकर्त्याने देवदूतांना सांगितले, "मी मातीपासून
मानवाची निर्मिती करणार आहे. ७२ मानवाला निर्माण करून त्याच्यात माझे
प्राण फुंकल्यावर त्याच्यासमोर नतमस्तक व्हा." ७३ त्याच्या सांगण्यावरून

सगळे देवदूत एकत्रितपणे नतमस्तक झाले. ७४ पण सैतान मात्र नमला
नाही. तो अतिशय उन्मत्त होता. तो सत्य नाकारणाऱ्यांपैकी एक बनला.
७५ ईश्वराने त्याला विचारले, "हे सैताना! माझ्या हातांनी निर्माण
केलेल्या मानवासमोर नतमस्तक होण्यापासून तुला कुणी रोखले आहे?
तू उन्मत्तपणामुळे असे वागलास, की स्वतःला फार श्रेष्ठ समजतोस?"
७६ सैतानाने उत्तर दिले, "मी त्याच्यापेक्षा वरचढ आहे. तू मला अग्नीपासून
तयार केलेस, तर त्याला मातीपासून." ७७ ईश्वराने त्याला दरडावले,
"खबरदार! तू या स्वर्गाच्या परिसरातून चालता हो, तू माझ्या कृपेपासून
वंचित, धिक्कारलेला आहेस. ७८ निवाड्याच्या दिवसापर्यंत माझा हा शाप
तुला लागून राहील."

७९ पण सैतान म्हणाला, "हे पालनकर्त्या! पुनर्निर्माणाच्या दिवसापर्यंत
मला उसंत दे." ८० ईश्वराने त्याला संमती दिली, "दिली तुला तेवढी
उसंत. ८१ निर्धारित दिवसापर्यंत तुला उसंत मिळेल." ८२ सैतान उद्दामपणे
म्हणाला, "तुझ्या प्रतिष्ठेची शपथ! तोपर्यंत सगळ्यांना मी वाममार्गाला
लावेन. ८३ त्यांच्यापैकी तू निवडलेल्या सेवकांचाच फक्त याला अपवाद
असेल." ८४ ईश्वर म्हणाला, "हे सत्य आहे. मी फक्त सत्यच बोलतो,
८५ तुला आणि तुझे अनुसरण करणाऱ्यांना मी नरकात फेकून देईन."

८६ हे प्रेषिता! लोकांना सांगा, "मला याचा कसलाही मोबदला नको,
मी ढोंगीही नाही. ८७ हा तर मानवजातीसाठी उपदेश आहे. ८८ लवकरच
तुम्हाला याची सत्यता पटेल."

प्रकरण ३९ : लोकसमूह (अज्-जुमर)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ सर्वशक्तिमान, सुज्ञ ईश्वराने हा ग्रंथ पाठवला आहे. २ हे प्रेषिता! सत्य सामावलेला हा ग्रंथ आम्ही तुमच्याबरोबर पाठवला आहे. तेव्हा संपूर्ण समर्पित भावाने फक्त ईश्वराचीच उपासना करा. ३ प्रामाणिक आज्ञापालकाने फक्त ईश्वराचीच उपासना करावी. त्याच्या व्यतिरिक्त इतरांना आपला पालक मानणारे म्हणतात, "ईश्वराचे सान्निध्य लाभण्याच्या हेतूनेच फक्त आम्ही त्यांची आज्ञा पाळतो." ज्यावरून त्यांच्यात मतभेद आहेत त्याचा निवाडा ईश्वर निःसंशय करेल. खोटे बोलण्याची वृत्ती असणाऱ्याला, सत्यावर अविश्वास दाखवणाऱ्याला ईश्वर मार्गदर्शन करत नाही.

४ आपल्याला पुत्र असावा असे ईश्वराला वाटले असते तर आपण निर्माण केलेल्या मानवामधून त्याने एकाची निवड केली असती. त्याचा महिमा अगाध आहे. (तो अशा गोष्टींच्या पलीकडे आहे.) ईश्वर एकमेव आहे. स्वयंपूर्ण आहे. ५ एका अर्थपूर्ण हेतूने त्याने आकाश आणि पृथ्वी निर्माण केले. तो दिवसामागून रात्र आणतो आणि रात्रीनंतर दिवस आणतो. सूर्य आणि चंद्र त्याच्या आज्ञेत आहेत, म्हणूनच ते निर्धारित वेळेत नेमून दिलेल्या कक्षेतून फिरतात. तो खरोखर सर्वशक्तिमान आणि क्षमाशील आहे.

६ एका जीवापासून त्याने तुमची निर्मिती केली आणि त्यापासूनच तुमचा जोडीदारही निर्माण केला. गुराढोरांच्या आठ जोड्या त्याने तुम्हाला देऊ केल्या. मातेच्या गर्भाशयातील तिहेरी काळोखात टप्प्याटप्प्याने त्याने

तुम्हाला निर्माण केले. (हे सर्व करणारा) ईश्वर आहे तुमचा पालनकर्ता! सर्वत्र सत्ता त्याचीच आहे. त्याच्याशिवाय अन्य कुणी ईश्वर नाही. तरीही तुम्ही सन्मार्गापासून दूर का गेलात?

७ तुम्ही कृतघ्न असाल तर लक्षात ठेवा, ईश्वराला तुमची गरज नाही. आपल्या सेवकांनी कृतघ्न असणे त्याला पसंत नाही. तुम्ही कृतज्ञ असाल तर तुमच्यावर तो प्रसन्न होतो. कुणाही जीवाला दुसऱ्याचे ओझे वागवावे लागणार नाही. अखेरीस तुम्हाला तुमच्या पालनकर्त्याकडे परत नेले जाईल आणि तुम्ही ऐहिक जीवनात कसे वागलात हे तो जाहीर करेल. माणसाच्या मनातल्या गोष्टी तो चांगल्या ओळखतो.

८ माणसावर संकट कोसळले की तो संपूर्ण समर्पण भावाने त्याच्या पालनकर्त्याची प्रार्थना करू लागतो. पण ईश्वराने त्याचे संकट दूर करताच त्याला ईश्वराचा विसर पडतो आणि तो त्याच्याशी वैर घेतो. इतरांना ईश्वराच्या मार्गापासून दूर नेतो. त्यांना सांगा, "अविश्वासाची मजा थोडा काळ उपभोगा, लवकरच तुम्हाला नरकात मुक्काम करावा लागेल." ९ जो रात्रीच्या प्रहरी जागा राहून पूर्ण निष्ठेने ईश्वराची प्रार्थना करतो, भक्तिभावाने त्याच्यासमोर नतमस्तक होतो, मृत्युपश्चात जीवनाचे स्मरण करतो आणि ईश्वरी कृपेची आस बाळगतो, तो यापासून दूर असणाऱ्यासारखा कसा असेल? अज्ञानी माणूस ज्ञानी माणसासारखा कसा असेल? खरोखर, फक्त ज्ञानाची देणगी लाभलेलेच यापासून बोध घेतील.

१० त्यांना सांगा, ईश्वर म्हणतो की, "सत्यावर विश्वास ठेवणाऱ्या माझ्या भक्तांनो, तुमच्या पालनकर्त्याचे भय बाळगा. कारण या जगात सत्कर्मे करणाऱ्यांना चांगला मोबदला मिळेल आणि ईश्वराची भूमी विशाल आहे. संयमाने वागणाऱ्यांना अमाप मोबदला मिळेल."

११ हे प्रेषिता! त्यांना सांगा, "मला ईश्वरापुढे संपूर्ण शरणागती

पत्करण्याची आणि फक्त त्याचीच उपासना करण्याची आज्ञा मिळाली आहे. १२ त्याला शरण जाणाऱ्यांमध्ये अग्रणी राहण्याची आज्ञा मला मिळाली आहे.” १३ त्यांना सांगा, “मी ईश्वराच्या आज्ञेचे उल्लंघन केले तर त्या दिवशी मिळणाऱ्या शिक्षेची मला भीती वाटते.” १४ त्यांना सांगा, “मी ईश्वराला समर्पित झालो आहे. माझी प्रामाणिक श्रद्धा त्याच्यावरच आहे. १५ तुम्हाला त्याच्या व्यतिरिक्त ज्यांची उपासना करायची असेल ती करा! पण लक्षात ठेवा, पुनर्निर्माणाच्या दिवशी स्वत:च्या व आपल्या कुटुंबियांच्या वाट्याला नुकसान आणण्यास जे कारणीभूत ठरतील, ते खरोखर पराभूत झालेले असतील. त्यांची हानी होणे अटळ आहे. १६ ते चहुबाजूंनी अग्निज्वाळेने वेढले जातील.” ईश्वर आपल्या सेवकांच्या मनात अशी भीती निर्माण करतो. तेव्हा माझ्या सेवकांनो! माझी भीती बाळगून रहा.

१७ खोट्या दैवतांची उपासना करण्यापासून परावृत्त होणाऱ्यांसाठी आणि ईश्वराकडे वळणाऱ्यांसाठी एक शुभवार्ता आहे. तेव्हा माझ्या सेवकांना ही शुभवार्ता ऐकवा. १८ जे माझा उपदेश लक्षपूर्वक ऐकतात आणि त्यातील उत्कृष्ट अर्थाचे अनुसरण करतात, त्यांना ईश्वराचे मार्गदर्शन लाभले आहे, त्यांना सुज्ञपणाचे वरदान लाभले आहे.

१९ ज्यांच्याविरुद्ध शिक्षेचे फर्मान बजावले आहे, त्यांचे काय? जे अगोदरच नरकाग्नीत पडले आहेत त्यांची तुम्ही सुटका करू शकाल का? २० पण जे खरोखर त्यांच्या पालनकर्त्याला घाबरून राहतात त्यांना बहुमजली महालांमध्ये रहायला मिळेल. त्यांच्या महालांजवळून पाण्याचे प्रवाह वाहत असतील. हे ईश्वराचे वचन आहे आणि ईश्वर आपले वचन कधीच मोडत नाही.

२१ ईश्वर आकाशातून पाण्याचा वर्षाव करतो. त्या पाण्याला भूमीवरचे

प्रवाह बनण्याचे मार्गदर्शन देतो आणि नंतर त्यापासून निरनिराळ्या रंगांची वनराई बहरवतो. कालांतराने तुमच्या नजरेसमोर ती पिवळी पडते आणि पालापाचोळा होऊन उडून जाते. हे सगळे तुम्हाला दिसत नाही का? सुज्ञ लोकांसाठी यात खरोखर ईश्वराचा संदेश आहे.[अ] २२ ईश्वराने ज्याचे अंतःकरण इस्लामसाठी उघडले आहे त्याला त्याच्या पालनकर्त्याकडून ज्ञानाचा प्रकाश मिळतो. पण ज्यांचे अंतःकरण कठोर बनल्यामुळे ते ईश्वराचे स्मरण करूच शकत नाही ते किती दुर्दैवी आहेत! असे लोक नक्कीच अपराधी आहेत.

२३ ईश्वराने सर्वोत्कृष्ट संदेश पाठवला आहे. त्या पवित्र ग्रंथातील वचने एकमेकांना पूरक व पुन्हा पुन्हा येणारी आहेत. ईश्वराच्या दराऱ्यामुळे ती ऐकून सेवकांच्या अंगावर शहारा येतो. ईश्वराच्या स्मरणाने त्यांचे अंतःकरण मृदू होते. ईश्वराचे मार्गदर्शन असे आहे. त्याच्या मर्जीला येईल त्याला तो ते देतो. पण ज्याला ईश्वर मार्गभ्रष्ट करतो त्याला कोणीही मार्गदर्शन करू शकत नाही.

२४ पुनर्निर्माणाच्या दिवशी भयानक शिक्षेपासून बचाव करण्यासाठी ज्यांच्याकडे आपल्या उघड्या चेहेऱ्याशिवाय काही नसेल त्यांचे दुर्दैव काय वर्णावे? अशा अपराध्यांना त्या दिवशी सांगितले जाईल, भोगा आपल्या कर्माचे फळ! २५ त्यांच्यापूर्वी ज्यांनी सत्य नाकारले होते त्यांच्यावर शिक्षा अशा बाजूने कोसळली होती ज्याचा त्यांनी विचारही केला नव्हता.

[अ] पृथ्वीवरील पावसाची अद्भुत व्यवस्था, परिणामी हिरवाईची वाढ आणि कापणीची तयारी या सर्व घटनांमध्ये अगणित अर्थपूर्ण धडे आहेत. परंतु हे धडे फक्त त्यांनाच मिळतात जे स्वभावाने गोष्टींमध्ये खोलवर जातात. जे आपल्या नैसर्गिक क्षमता जिवंत ठेवतात आणि त्यांचा उपयोग करून जगाच्या गोष्टींचा सखोल विचार करतात. या लोकांचे मन ईश्वराच्या साक्षात्काराने भरले जाते.

२६ ईश्वराने ऐहिक जीवनात त्यांना अपमानाची चव चाखायला लावली.
पण मृत्युपश्चात जीवनातील शिक्षा याहून खूप मोठी आहे. पण हे त्यांना
कळेल का?
२७ लोकांनी बोध घ्यावा म्हणून आम्ही कुरआनमधून सर्व प्रकारची
उदाहरणे त्यांच्यासमोर सादर केली आहेत. २८ अरेबिक भाषेतील
कुरआनमध्ये कसलीही संदिग्धता नाही. तेव्हा लोकांनी ईश्वराचे स्मरण
करावे. २९ ईश्वराने एक उदाहरण समोर ठेवले आहे. एका गुलामाला
अनेक मालक आहेत, ज्यांचे एकमेकांशी कधीच पटत नाही. तर दुसऱ्या
गुलामाला एकच मालक आहे. तुलनेत हे दोघे एकसारखे आहेत का? सर्व
स्तुती फक्त ईश्वरासाठीच आहे. पण बहुसंख्य लोकांना (या वास्तवाची)
जाणीव नाही. ३० तुम्हालाही मरायचे आहे आणि त्यांनाही मरायचे आहे.
३१ नंतर पुनर्निर्माणाच्या दिवशी तुम्हाला आपसातला वाद पालनकर्त्यासमोर
ठेवावाच लागेल.
३२ ईश्वराविषयी बनावट गोष्टी रचणाऱ्यापेक्षा आणि त्याच्याकडे
आलेले सत्य नाकारणाऱ्यापेक्षा अन्यायी कोण आहे? तर सत्य
नाकारणाऱ्यांचे अंतिम निवासस्थान नरक नसावे का? ३३ सत्य सर्वांसमोर
घेऊन येणारे आणि ते सत्य मनापासून स्वीकारणारे असे लोक निःसंशय
ईश्वराची भीती बाळगतात. ३४ त्यांच्या पालनकर्त्याकडून जे काही हवे
असेल ते त्यांना मिळेल. सदाचाराने वागणाऱ्यांना असा मोबदला मिळेल.
३५ ईश्वर त्यांच्या हातून घडलेल्या वाईट गोष्टी पुसून टाकेल आणि सर्वो
त्कृष्ट कृत्यांना अनुसरून त्यांना मोबदला देईल.
३६ ईश्वर त्याच्या सेवकांसाठी पुरेसा नाही का? तरीही ते तुम्हाला
त्याच्या व्यतिरिक्त इतर दैवतांची भीती घालतात. ईश्वर ज्यांना मार्गभ्रष्ट
करतो त्यांना कुणीही मार्गदर्शक लाभू शकत नाही. ३७ पण ज्याला ईश्वर

सन्मार्गावर आणतो त्याला कुणीही मार्गभ्रष्ट करू शकत नाही. ईश्वर सर्वशक्तिमान आणि दंड घ्यायला समर्थ नाही का?

[३८] आकाश आणि पृथ्वी कुणी निर्माण केली असे विचारले तर त्यांचे उत्तर नक्कीच असे असेल, "ईश्वराने!" त्यांना सांगा, ईश्वराव्यतिरिक्त तुम्ही ज्यांचा धावा करता त्यांचा विचार करा आणि स्वतःलाच विचारा, ईश्वराने मला इजा करायचे ठरवले तर ते थांबवू शकतील का? किंवा ईश्वराने माझ्यावर दया करायची ठरवली तर ते थोपवू शकतील का? हे प्रेषिता! त्यांना सांगा, "ईश्वर माझ्यासाठी पुरेसा आहे. श्रद्धावंतांनी त्याच्यावर भरवसा ठेवावा." [३९] प्रेषिता! त्यांना इशारा द्या, तुम्ही करू शकता ते तुम्ही करा, मी करू शकतो ते मी करेन. लवकरच तुम्हाला कळून चुकेल, [४०] कुणाचा अपमानास्पद छळ होतो आणि कुणावर आमची चिरंतन शिक्षा कोसळते. [४१] हे प्रेषिता! सत्याच्या सोबतीने हा ग्रंथ आम्ही मानवजातीसाठी तुमच्याबरोबर पाठवला आहे. यानंतर जो सन्मार्ग आत्मसात करेल तर त्यात त्याचेच हित असेल. पण जो मार्गभ्रष्ट होईल तो स्वतःचेच अहित करून घेईल. तुम्ही त्यांचे रक्षक नाही आहात.

[४२] मृत्युनंतर माणसाच्या आत्म्याचा ताबा ईश्वराकडे जातो आणि झोपेत असताना सजीवांच्या आत्म्याचा ताबा ईश्वराकडेच असतो. ज्यांच्या मृत्यूचा आदेश निघाला असेल त्यांचा आत्मा तो रोखून धरतो. तर इतरांना निर्धारित काळासाठी परत एकदा जिवंत करतो. चिंतन करणाऱ्यांसाठी यात निश्चितच संकेत आहेत.

[४३] त्यांनी ईश्वराशिवाय इतरांना मध्यस्थ म्हणून निवडले आहे काय? त्यांना सांगा, "तुमच्याकडे ती ताकदही नाही आणि ती समजही नाही." [४४] त्यांना सांगा, "मध्यस्थी पूर्णपणे ईश्वराच्या हातात आहे. आकाश आणि पृथ्वीचे नियंत्रण त्याच्याच हातात आहे आणि तुम्हाला त्याच्याकडेच

परतायचे आहे.” ४५ ईश्वराचे नाव घेताच ज्यांचा मृत्युपश्चात जीवनावर
विश्वास नाही अशांची अंतःकरणे तिटकाऱ्याने संकोचून जातात तर
ईश्वराव्यतिरिक्त इतरांचे नाव घेताच त्यांची अंतःकरणे आनंदाने भरून
जातात. ४६ हे प्रेषिता! ईश्वराची प्रार्थना करा, “हे ईश्वरा! आकाश
आणि पृथ्वीचा उद्‌गाता! जे काही लपलेले आहे आणि जे काही उघड
आहे त्या सगळ्याचा जाणता! तुझ्या सेवकांमधील वादांचा तू निवाडा
कर.” ४७ अपराध्यांकडे भूतलावरची सगळी संपत्ती असेल आणि दुप्पटीने
त्यात वाढ झाली तरी पुनर्निर्माणाच्या दिवशी मिळणाऱ्या अवमानास्पद
शिक्षेपासून सूट मिळवण्यासाठी भरपाई म्हणून ती ते देऊ करतील. त्या
दिवशी ईश्वर त्यांना असे काही दाखवेल, ज्याची त्यांनी अपेक्षाही केली
नव्हती. ४८ त्यांच्या दुष्कृत्यांचा सैतान त्यांच्यासमोर उभा राहील आणि
जिची ते खिल्ली उडवीत त्या शिक्षेने ते दडपले जातील.

४९ संकट कोसळताच माणूस आमच्याकडे दयेची याचना करू लागतो.
पण त्याच्यावर कृपा करताच म्हणतो, “माझ्या ज्ञानामुळेच मला हे सगळे
मिळाले आहे.” अजिबात नाही, ही त्याची परीक्षा आहे. पण पुष्कळांना हे
कळत नाही. ५० त्यांच्या आधी होऊन गेलेले हेच म्हणत असत. पण त्यांच्या
कृत्यांचा त्यांना काहीही लाभ झाला नाही. ५१ त्यांच्या अपकृत्यांचा सैतान
त्यांच्यावरच उलटला. आजच्या या अपराध्यांच्या अपकृत्यांचा सैतानही
त्यांच्यावर उलटेल. ते आमची योजना निष्फळ करू शकणार नाहीत.
५२ ईश्वराच्या मर्जीला येईल त्याला तो संपन्नता देतो तर त्याच्या मर्जीला
येईल त्याला विपन्नता देतो हे त्यांना कळत नाही का? श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी
यात नक्कीच संकेत आहे.

५३ हे प्रेषिता! त्यांना सांगा, ईश्वर म्हणतो, “स्वतःवरच अन्याय
केलेल्या माझ्या सेवकांना ईश्वरी दयेचा लाभ होणार नाही म्हणून निराश

होऊ नका. ईश्वर नक्कीच तुमचे अपराध माफ करेल. तो अतिशय क्षमाशील, अतिशय दयाशील आहे. ५४ ईश्वराचे स्मरण करा आणि त्याच्या शिक्षेचा घाला पडण्यापूर्वीच त्याला शरण जा. कारण नंतर कुणाचीही मदत मिळणार नाही.''

५५ बेसावध असताना त्याच्या शिक्षेचे संकट कोसळण्यापूर्वी तुमच्या पालनकर्त्याने पाठवलेल्या ग्रंथातील सर्वोत्कृष्ट पैलूंचे अनुसरण करा. ५६ अन्यथा तुमच्यावर हे म्हणण्याची वेळ येईल, ''केवढे दुर्दैव माझे! मी ईश्वराविषयक कर्तव्यात कसूर केली आणि त्याची खिल्ली उडवणाऱ्यांपैकी झालो!'' ५७ किंवा ''ईश्वराने मला मार्गदर्शन केले असते तर मीही त्याची भीती बाळगणाऱ्यांमध्ये सामील झालो असतो.'' ५८ किंवा शिक्षा पाहून तुम्ही म्हणाल, ''दुसरी संधी मिळाली तर आम्ही सदाचरण करणाऱ्यांमध्ये होऊ.'' ५९ अजिबात नाही! माझे साक्षात्कार तुमच्याकडे आले होते, पण तुम्ही ते नाकारले, उन्मत्तपणा केलात आणि सत्य नाकारणाऱ्यांमध्ये सामील झालात. ६० पुनर्निर्माणाच्या दिवशी ईश्वराविषयी खोटे बनाव रचणाऱ्यांची तोंडे तुम्हाला काळी पडलेली दिसतील. अशा उद्दामांसाठी नरकात पुरेशी जागा नाही का? ६१ पण ईश्वराची भीती बाळगणाऱ्यांची सुटका करून तो त्यांना दिलासादायक ठिकाणी नेईल. ना त्यांना दुष्ट शक्तीचा स्पर्श होईल ना कसले दुःख होईल.

६२ ईश्वर प्रत्येक गोष्टीचा निर्माता आहे. प्रत्येक गोष्ट त्याच्याच ताब्यात आहे. ६३ आकाश आणि पृथ्वीची सूत्रे त्याच्याकडे आहेत. ईश्वरी साक्षात्कार नाकारणारे निःसंशय पराभूत होतील. ६४ त्यांना विचारा, ''अज्ञानी लोकहो! तुम्ही मला ईश्वर सोडून अन्य कुणाची उपासना करायची आज्ञा करता का?'' ६५ तुम्हाला आणि तुमच्या आधी होऊन

गेलेल्यांना हा साक्षात्कार आधीच झालेला आहे की, तुम्ही अनेक ईश्वर असल्याचे मानलेत तर तुमची सगळी कृत्ये निष्फळ ठरतील. तुम्ही निःसंशय पराभूतांपैकी असाल. ६६ तेव्हा तुम्ही फक्त ईश्वराचीच उपासना करा आणि कृतज्ञ राहणाऱ्यांपैकी व्हा.

६७ त्यांनी ईश्वराचे खरे मोल ओळखलेले नाही. पण पुनर्निर्माणाच्या दिवशी संपूर्ण पृथ्वी त्याच्या ताब्यात असेल तर आकाशाची गुंडाळी त्याच्या उजव्या हातात असेल. ईश्वर पूजनीय आहे, ते ज्यांना ईश्वराचा दर्जा देतात त्यांच्यापेक्षा तो श्रेष्ठ आहे. ६८ त्या दिवशी शिंग फुंकले जाईल आणि आकाशात व पृथ्वीवर असणारा प्रत्येकजण बेशुद्ध पडेल. ईश्वराने माफ केलेल्यांचीच फक्त यातून सुटका होईल. त्यानंतर आणखी एकदा शिंग फुंकले जाईल आणि ते उठून सभोवती पाहू लागतील. ६९ पृथ्वी तिच्या पालनकर्त्याच्या तेजाने उजळून निघेल. प्रत्येकाची कर्मवही उघडून ठेवली जाईल. प्रेषितांना आणि साक्षीदारांना बोलावून घेतले जाईल आणि न्याय्य पद्धतीने त्यांचा निवाडा केला जाईल. कुणावरही अन्याय होऊ दिला जाणार नाही. ७० प्रत्येकाला आपापल्या कर्माचा परिपूर्ण मोबदला मिळेल. त्यांच्या कर्माची ईश्वराला चांगली जाण आहे.

७१ सत्य नाकारणाऱ्यांना त्या दिवशी गटागटांनी नरकाकडे हाकलले जाईल. तिथे पोहोचताच नरकाचे दरवाजे उघडले जातील आणि रखवालदार त्यांना विचारतील, "तुमच्याकडे तुमच्यातील एक प्रेषित आला नव्हता का? त्याने ईश्वराचे साक्षात्कार तुमच्यापर्यंत पोहोचवले नव्हते का? त्याने तुम्हाला या दिवसाविषयी, ईश्वराच्या भेटीविषयी सावध केले नव्हते का?" ते उत्तर देतील, "हो! असे प्रेषित आमच्याकडे आले होते." पण सत्य नाकारणाऱ्यांविरुद्धच्या शिक्षेचे निर्णय सत्य असल्याचे

सिद्ध झाले आहे. ७२ त्यांना फर्मावले जाईल, "नरकाच्या दरवाजातून आत प्रवेश करा. तुम्हाला कायम इथेच रहायचे आहे! खोटा अहंकार बाळगणाऱ्यांसाठी किती गलिच्छ निवासस्थान आहे हे!"

७३ पण आपल्या पालनकर्त्याची भीती बाळगणाऱ्यांना त्या दिवशी गटागटांनी स्वर्गाकडे आणले जाईल. तिथे पोहोचताच स्वर्गाचे दरवाजे उघडले जातील आणि रखवालदार त्यांचे स्वागत करतील, "तुम्हाला शांती लाभो! तुम्ही सदाचाराने वागला आहात. तेव्हा स्वर्गात प्रवेश करा आणि कायम इथेच रहा!" ७४ ईश्वराचे सेवक कृतज्ञता व्यक्त करून म्हणतील, "आम्हाला दिलेले वचन पूर्ण करणारा, आम्हाला स्वर्गाचे वारसदार बनवणारा, या बगीच्यात हवे तिथे आम्हाला राहू देणारा ईश्वर स्तुत्य आहे." ईश्वरी कार्यासाठी परिश्रम घेणाऱ्यांचा मोबदला किती उत्कृष्ट आहे! ७५ त्या दिवशी ईश्वराचे दूत पालनकर्त्याच्या सिंहासनाभोवती जमून त्याचे स्तुतिगान करताना आढळतील. न्यायपूर्वक सगळ्यांचा निवाडा केला जाईल आणि त्याचा जयजयकार करून म्हटले जाईल, "विश्वाचा अधिपती असलेला ईश्वर स्तुतीचा हक्कदार आहे!"

प्रकरण ४० : क्षमादाता
(अल्-मोमीन)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हा मीम २ हा ग्रंथ सर्वशक्तिमान, सर्वज्ञ ईश्वराकडून अवतरीत झाला आहे. ३ हा ईश्वर अपराध्यांना क्षमा करणारा, पश्चातापाचा स्वीकार करणारा, शिक्षा देण्यात कठोर आणि कृपा करण्यात अमर्याद आहे. तो एकमेव ईश्वर आहे. सगळ्यांना त्याच्याकडेच परतायचे आहे.

४ फक्त सत्य नाकारणारेच ईश्वरी संकेतांवरून वाद घालतात. या
भूमीतल्या त्यांच्या कारवायांना तुम्ही भुलू नका. ५ नोहाच्या लोकांनी
आणि त्यांच्यानंतरच्या प्रत्येक समाजानेही प्रेषिताला त्रास देण्याच्या
उद्देशाने आम्ही पाठवलेल्या संदेशाविरुद्ध कट रचला. खोट्या दाव्यांनिशी
त्यांनी आमच्या संदेशांविरुद्ध वाद घातला. यामुळे सत्य खोटे पाडता येईल
असे त्यांना वाटले. म्हणून मी त्यांना संकटांनी घेरले. माझी शिक्षा किती
भयंकर होती! ६ अश्रद्धावंतांविरुद्धचा तुमच्या पालनकर्त्याचा शब्द अशा
तऱ्हेने खरा ठरला आहे. ते नरकाग्नीचे निवासी होतील.

७ जे सिंहासन वाहून नेतात आणि जे सिंहासनाच्या जवळपास आहेत
ते त्याच्यावर विश्वास ठेवतात आणि स्तुतीसुमने गाऊन त्याचे महिमागान
करतात. ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी ते ईश्वराकडे क्षमायाचना करतात,
"हे पालनकर्त्या! तुझ्या कृपेत आणि ज्ञानात सगळ्या गोष्टी सामावल्या
आहेत. जे तुझ्याकडे वळतात आणि तुझ्या मार्गाने जातात त्यांना क्षमा कर.
नरकाच्या शिक्षेपासून त्यांचा बचाव कर. ८ आणि हे पालनकर्त्या! त्यांना
वचन दिलेल्या चिरंतन स्वर्गात तू त्यांना दाखल करून घे. त्यांच्याबरोबर
त्यांचे सदाचारी पूर्वज, सहचारिणी आणि मुलेबाळे यांनाही सामावून घे. तू
एकमेव सर्वशक्तिमान, सर्वज्ञ आहेस. ९ सगळ्या वाईट गोष्टींपासून त्यांचे
रक्षण कर. दुष्कृत्यांच्या शिक्षेपासून ज्यांचे तू रक्षण करतोस त्यांना तुझ्या
दयेचा लाभ होईल. त्यांना मिळालेले हे सर्वोच्च यश असेल."

१० सत्य नाकारणाऱ्यांना सांगितले जाईल, "आज तुम्हाला स्वतःविषयी
जितका तिटकारा वाटतो त्यापेक्षा जास्त तिटकारा ईश्वराला तुमच्याविषयी
वाटत होता. तुम्हाला सत्यावर विश्वास ठेवायला सांगितले होते, पण
तुम्ही ते नाकारले." ११ ते म्हणतील, "हे पालनकर्त्या! तू आम्हाला दोनदा
जीवन दिलेस आणि दोनदा मृत्यू दिलास! आता आम्ही पापांची कबुली

देत आहोत. यातून सुटकेचा काही मार्ग आहे का?" [१२] त्यांना सांगितले जाईल, "याचे कारण म्हणजे तुम्हाला फक्त ईश्वराचा धावा करायला सांगितला, तेव्हा तुम्ही सत्य नाकारले. तर इतरांना ईश्वराचा दर्जा द्यायला कुणी सांगितले तर तुम्ही त्यांच्यावर विश्वास ठेवला. आता निवाडा सर्वश्रेष्ठ, महान ईश्वराच्याच हातात आहे."

[१३] ईश्वर तुम्हाला त्याचे संकेत दाखवतो आणि आकाशातून तुमच्यासाठी उपजीविका पाठवतो, पण पश्चातापदग्ध होणाऱ्यांखेरीज त्याकडे कुणी लक्ष देत नाही. [१४] म्हणून ईश्वराचा धावा करा. सत्य नाकारणारे त्याच्यावर विश्वास ठेवत नाहीत. पण तुम्ही त्याच्यावर शुद्ध विश्वास ठेवा. [१५] सिंहासनावर आरूढ झालेला ईश्वर सर्वश्रेष्ठ आहे. त्याच्या मर्जीला येईल त्या सेवकांकडे तो आपले चैतन्य पाठवतो. आपल्या संदेशातून तो त्यांना ईश्वराच्या भेटीची सूचना देतो. [१६] ज्या दिवशी त्यांना (कबरीतून) उठवले जाईल त्या दिवशी त्यांची कुठलीही गोष्ट ईश्वरापासून लपलेली नसेल. त्या दिवशी सगळीकडे कुणाचे राज्य असेल? अर्थातच एकमेव सर्वशक्तिमान ईश्वराचे! [१७] त्या दिवशी प्रत्येकाला त्याच्या कर्माचा मोबदला मिळेल. कुणावरही अन्याय केला जाणार नाही. ईश्वर हिशेब करायला तत्पर आहे.

[१८] हे प्रेषिता! निवाड्याचा दिवस जवळ येत असल्याची जाणीव त्यांना करून द्या. त्या दिवशी अपराध्यांना ना कुणी मित्र असेल, ना त्यांचे बोलणे ऐकून घेणारा कुणी मध्यस्थ असेल. त्यांची हृदये गळ्याजवळ येतील आणि त्यामुळे त्यांचा गळा दाटून येईल. [१९] त्या दिवशी ईश्वराला त्यांच्या मनातल्या सगळ्या गोष्टी आणि त्यांची चोरटी नजरही कळलेली असेल. [२०] ईश्वर सत्याला आणि न्यायाला धरून निवाडा करेल, पण ईश्वराव्यतिरिक्त ते ज्यांचा धावा करतात त्यांच्याकडे निवाड्याची

अजिबात ताकदच नसेल. ईश्वर निःसंशय सर्व पाहणारा, सर्व ऐकणारा आहे.

२१ त्यांच्या अगोदर होऊन गेलेल्यांचा कसा अंत झाला हे त्यांनी सर्वत्र संचार करून पाहिले नाही का? ते यांच्यापेक्षा ताकदवान होते आणि त्यांनी या भूमीवर यांच्यापेक्षा जास्त प्रभावही टाकला होता. तरीही त्यांनी केलेल्या पापांच्या मोबदल्यात ईश्वराने त्यांचा सर्वनाश केला. त्याच्यापासून कुणीही आपला बचाव करू शकले नाही. २२ याचे कारण म्हणजे त्यांचा प्रेषित त्यांच्याकडे स्पष्ट संकेत घेऊन आला होता, पण त्यांनी ते नाकारले. म्हणून ईश्वराने त्यांच्यावर संकट कोसळवले. तो सर्वसामर्थ्यवान आणि शिक्षा देण्यात कठोर आहे.

२३ आम्ही मोझेसला सत्य प्रकाशमान करणारे धडधडीत पुरावे आणि स्पष्ट अधिकारपद (प्रेषितपद) घेऊन पाठवले होते. २४ फिरऔन (फारो), हामान व कारून यांच्याकडे पाठवले असता त्यांनी त्याला खोटारडा, जादूगार ठरवले. २५ आमच्याकडून सत्य घेऊन तो त्यांच्याकडे गेला तेव्हा ते म्हणाले, "त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांच्या मुलांना मारून टाका आणि फक्त मुलींना जिवंत ठेवा." पण सत्य नाकारणाऱ्यांच्या योजना निष्फळ झाल्या.

२६ फारो म्हणाला, "मी मोझेसला मारून टाकतो. त्यापासून वाचण्यासाठी त्याने त्याच्या पालनकर्त्याचा धावा करावा. मला भीती वाटते, तो या भूमीत अत्याचार माजवेल, नाहीतर तुम्हाला तुमचा धर्म बदलायला लावेल." २७ मोझेसने उत्तर दिले, "हिशेबाच्या दिवसावर विश्वास न ठेवणाऱ्या प्रत्येक उद्दाम माणसापासून रक्षण करण्यासाठी मी माझ्या व तुमच्या पालनकर्त्याला शरण गेलो आहे."

२८ फारोच्या लोकांपैकी एका श्रद्धावंताची ईश्वरावर दृढ श्रद्धा होती.

ती त्याने लपवून ठेवली होती. तो म्हणाला, "एक माणूस 'ईश्वर माझा एकमेव पालनकर्ता आहे' असे म्हणतो. फक्त एवढ्याच कारणावरून तुम्ही त्याला ठार मारणार का? तो तुमच्या पालनकर्त्याकडून सत्याचे स्पष्ट पुरावे घेऊन आला आहे. तो खोटारडा असेल तर त्याच्या पापाचे ओझे त्याच्याच डोक्यावर येईल. पण तो सत्यवचनी असेल तर ज्याची सूचना देतो आहे त्या शिक्षेचा काही भाग तुमच्यावर नक्कीच कोसळेल." मर्यादांचे उल्लंघन करणाऱ्याला, खोटे बोलणाऱ्याला ईश्वर निःसंशय कधी मार्गदर्शन करत नाही. [२९] "लोकहो! आज या भूमीवर तुमचे राज्य आहे, तुमचे वर्चस्व आहे. पण ईश्वरी शिक्षा कोसळली तर आपल्या मदतीला कोण आहे?" पण फारोने उत्तर दिले, "मला बरोबर वाटते तेच मी तुमच्या नजरेस आणतो आणि तुम्हाला योग्य मार्गावरच नेतो."

[३०] तो श्रद्धावंत म्हणाला, "लोकहो! पूर्वीच्या लोकांसारखीच तुमचीही दुर्दशा होईल याची मला भीती वाटते. [३१] नोहाचे लोक, आद, समूदचे समाज आणि त्यांच्यानंतर होऊन गेलेल्यांचीही दुर्दशा झाली होती. ईश्वर आपल्या निर्मितीवर कधीही अन्याय करू इच्छित नाही. [३२] माझ्या बांधवांनो! निवाड्याच्या दिवशी तुम्ही एकमेकांसमोर आक्रोश कराल याची मला आशंका वाटते. [३३] त्या दिवशी ईश्वरापासून बचाव करणारा कुणीही नाही, हे पाहून पाठ दाखवून तुम्ही तिथून पळ काढाल. कारण ज्याला ईश्वर वाममार्गाला जाऊ देतो, त्यांना कधीच कुणी मार्गदर्शक लाभत नाही."

[३४] यापूर्वी जोसेफ तुमच्याकडे स्पष्ट संकेत घेऊन आला. पण त्याने आणलेल्या संदेशावर शंका घेणे तुम्ही कधीही थांबवले नाही. त्याला मृत्यू आल्यावर तुम्ही म्हणालात, "ईश्वर आता आणखी एखाद्या प्रेषिताला पाठवणार नाही." ईश्वर अशा अपराध्यांना आणि शंकेखोरांना

मार्गभ्रष्ट करतो. ३५ कुठलेही प्रमाण नसताना ईश्वरी साक्षात्कारांवर वादंग उठवणाऱ्यांच्या कृत्याचा ईश्वराला आणि श्रद्धावंतांना अतिशय तिटकारा आहे. प्रत्येक उद्दाम अत्याचाऱ्याचे मन ईश्वर असेच मोहोर बंद करतो.

३६ फारोने आपल्या सरदाराला आज्ञा दिली, "माझ्यासाठी एक उंचच उंच इमारत बांधून घ्या, ३७ म्हणजे मला स्वर्गापर्यंत पोहोचता येईल आणि मोझेसच्या ईश्वराला पाहता येईल. तो खोटे बोलत असल्याची माझी खात्री पटली आहे!" अशा रीतीने फारोला त्याची कुकर्मे चांगली भासवण्यात आली आणि तो सत्याच्या मार्गापासून दूर गेला. फारोच्या या योजनांमधून त्याचा नाश होण्याशिवाय काहीही निष्पन्न झाले नाही.

३८ त्या श्रद्धावंताने आपल्या समाजबांधवांना विनंती केली, "लोकहो! माझे अनुसरण करा. मी तुम्हाला योग्य मार्गावर नेईन. ३९ लोकहो! या जगातले जीवन ही तात्पुरती तरतूद आहे तर मृत्युपश्चात जीवन हे चिरंतन निवासस्थान आहे. ४० दुष्कृत्ये करणाऱ्याला दुष्परिणामांचाच मोबदला मिळेल तर सत्कृत्ये करणाऱ्यांना आणि ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यांना स्वर्गात प्रवेश मिळेल. तिथे त्यांना हवे ते सगळे अमर्याद पुरवले जाईल. ४१ लोकहो! मी तुम्हाला मुक्तीकडे नेतोय तर तुम्ही मला नरकाग्नीकडे नेताय? ४२ तुम्ही मला ईश्वराला नाकारायला, मला ज्यांचे ज्ञान नाही अशा उपास्यांची उपासना करायला सांगताय, तर मी तुम्हाला सर्वशक्तिमान, क्षमादात्या ईश्वराकडे बोलावतोय. ४३ तुम्ही मला ज्यांचा धावा करायला सांगताय त्यांना ना या जगात काही किंमत आहे, ना मृत्युपश्चात जगात. आपल्याला फक्त ईश्वराकडेच परत जायचे आहे. अपराधी लोक नरकाग्नीचे निवासी असतील. ४४ लवकरच तुम्हाला माझे सांगणे आठवेल. माझे भवितव्य ईश्वरावर सोपवले आहे, कारण तो आपल्या भक्तांवर बारकाईने नजर ठेवून आहे."

४५ त्या श्रद्धावंताच्या समाजबांधवांनी त्याच्याविरुद्ध रचलेल्या कुटील
कारस्थानांपासून ईश्वराने त्याची सुटका केली तर फारोचे सहकारी मात्र
भयंकर शिक्षेने घेरले गेले. ४६ सकाळ-संध्याकाळ त्यांना नरकाग्नीसमोर
आणले जाईल. निवाड्याच्या दिवसाची वेळ येऊन ठेपताच त्यांच्या
कानावर आवाज येईल, "फारोच्या लोकांना कठोरातली कठोर शिक्षा
द्या."

४७ नरकाग्नीत एकमेकांशी भांडताना त्यांच्यातले दुर्बल स्वतःला
शक्तिमान मानणाऱ्यांना विचारतील, "आम्ही तुमचेच अनुयायी होतो,
आता या अग्नीतून आमची सुटका कराल ना?" ४८ पण ते उद्दाम
म्हणतील, "आपण सगळे इथे एकत्र आहोत. ईश्वराने आपल्या
सेवकांचा निवाडा केला आहे." ४९ नरकाग्नीत होरपळणारे रखवालदारांना
म्हणतील, "एका दिवसापुरती तरी या छळापासून सुटका करण्याची
तुमच्या पालनकर्त्याला विनंती करा." ५० पण ते विचारतील, "तुमचा
प्रेषित तुमच्याकडे आला होता ना?" त्यांचे उत्तर असेल, "हो!" यावर
रखवालदार म्हणतील, "मग तुम्हीच स्वतःच्या सुटकेसाठी प्रार्थना करा."
पण सत्य नाकारणाऱ्यांची प्रार्थना निष्फळ ठरेल.

५१ ऐहिक जीवनात तसेच पुनर्निर्माणाच्या दिवशी जेव्हा सगळे साक्षीदार
उभे राहतील तेव्हा आम्ही प्रेषिताला आणि आमच्यावर श्रद्धा ठेवणाऱ्यांना
नक्कीच मदत करू. ५२ त्या दिवशी अपराध्यांच्या कुठल्याही सबबी ऐकून
घेतल्या जाणार नाहीत. त्यांच्या नशिबी आमचे शाप आणि निवासासाठी
नरकासारखे गलिच्छ स्थान असेल. ५३ आम्ही मोझेसला आमचे मार्गदर्शन
दिले आणि इस्राएलच्या संततीला या ग्रंथाचे वारसदार बनवले ५४ ज्यात
मार्गदर्शन आणि सुज्ञ लोकांसाठी उपदेश आहे. ५५ तेव्हा संयमाने रहा.
ईश्वराने जो शब्द दिला आहे तसे घडणारच आहे. ईश्वराकडे अपराधांसाठी
क्षमायाचना करा आणि सकाळ-संध्याकाळ त्याचे स्तुतिगान करा.

५६ कोणताही अधिकार नसताना ईश्वराच्या संदेशावरून हुज्जत
घालणाऱ्यांच्या मनात फक्त स्वतःच्या मोठेपणाची खोटी भावना असते.
त्यांना हा मोठेपणा कधीही मिळणार नाही. ईश्वराला शरण जा, कारण तो
सर्व ऐकणारा, सर्व पाहणारा आहे.

५७ निःसंशय, आकाशाची निर्मिती माणसाच्या निर्मितीपेक्षा महान
आहे. पण पुष्कळ लोकांना याचे ज्ञान नाही. ५८ जसे अंध आणि डोळस
एकसारखे नाहीत, तसेच ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कृत्ये करणारे आणि
अपकृत्ये करणारे एकसारखे नाहीत. पण यावर तुम्ही क्वचितच चिंतन
करता. ५९ अंतिम घडी येणार हे नक्की! त्यात काही संशय नाही. पण
बहुतांश लोकांचा यावर विश्वास नाही.

६० तुमचा पालनकर्ता तुम्हाला सांगतो, "माझा धावा करा, मी तुमच्या
प्रार्थनेला प्रतिसाद देईन." पण माझी उपासना करताना उद्दामपणा
दाखवणारे नक्कीच अपमानित होऊन नरकात प्रवेश करतील. ६१ विश्रांतीसाठी
रात्र देणारा आणि कामासाठी दिवस देणारा ईश्वरच आहे. ईश्वराचे
माणसावर अनंत उपकार आहेत. पण बरेच लोक त्याच्याविषयी कृतज्ञ
राहत नाहीत. ६२ सगळ्या गोष्टींची निर्मिती करणारा तुमचा पालनकर्ता
आहे, तुमचा ईश्वर आहे. त्याच्याशिवाय अन्य कुणी ईश्वर नाही. तरीही
तुम्ही त्याच्याकडे पाठ कशी फिरवता? ६३ अशा प्रकारे ईश्वराचे संकेत जे
नाकारतात, ते त्याच्यापासून खरोखर दूर जातात.

६४ ईश्वराने तुमच्या निवासासाठी पृथ्वी निर्माण केली तर तिच्यावर
आकाशाचे छत उभे केले. त्याने तुम्हाला आकार दिला, तुमची पूर्ण वाढ
केली आणि तुम्हाला उत्तमोत्तम वस्तू देऊ केल्या. असा हा ईश्वर तुमचा
पालनकर्ता आहे. त्याची स्तुती करा. तो विश्वाचा स्वामी आहे. ६५ तो
चैतन्यमय आहे. त्याच्याशिवाय अन्य कुणी आराध्य नाही. तेव्हा फक्त

त्याचीच प्रार्थना करा आणि धर्म शुद्ध ठेवा. विश्वाचा स्वामी असलेला ईश्वर स्तुतीचा हक्कदार आहे.

६६ हे प्रेषिता! त्यांना सांगा, "माझ्या पालनकर्त्याकडून माझ्याकडे स्पष्ट संकेत आले आहेत. विश्वाच्या अधिपतीपुढे समर्पित होण्याची आज्ञा मला मिळालेली आहे. असे असताना तुम्ही ईश्वराव्यतिरिक्त ज्यांची आराधना करता त्यांची आराधना करायला मला मनाई आहे." ६७ त्याने सुरुवातीला तुम्हाला धुळीकणापासून, नंतर वीर्याच्या एका थेंबापासून आणि नंतर गर्भाशयाला चिकटून राहणाऱ्या एका छोट्या आकारापासून तुम्हाला निर्माण केले. नंतर नवजात शिशु म्हणून तुम्हाला जन्म दिला, तुमची संपूर्ण वाढ केली. परिपूर्ण माणूस म्हणून तुम्हाला जगू दिले. निर्धारित काळासाठी तुम्हाला जीवन दिले. काहींना लवकर मृत्यू येतो तर काहीना उशिरा. हे माणसा! यावर चिंतन कर. ६८ तुम्हाला जीवन आणि मृत्यू देणारा तोच आहे. एखादी गोष्ट निर्माण करायचे ठरवल्यावर तो म्हणतो "अस्तित्वात ये" आणि ती गोष्ट अस्तित्वात येते.

६९ ईश्वरी संकेत नाकारणारे योग्य मार्गापासून भरकटल्याचे तुम्हाला दिसत नाही का? ७० ज्यांनी आमचा ग्रंथ आणि आमच्या प्रेषितासमवेत पाठवलेले संकेत नाकारले त्यांना लवकरच याची किंमत मोजावी लागेल. ७१ त्यांच्या मानेभोवती लोखंडी कडे आणि साखळदंड अडकवून त्यांना फरफटत नेले जाईल. ७२ त्यांना उकळत्या पाण्यात आणि त्यानंतर आगीत टाकले जाईल. ७३ नंतर त्यांना विचारले जाईल, "ज्यांना तुम्ही ईश्वराचा दर्जा दिला होता ते कुठे आहेत?" ७४ त्यांचे उत्तर असेल, "ते आमच्यापासून दूर गेले आहेत किंवा आम्ही ज्यांची आराधना करत होतो ते अस्तित्वातच नाही आहेत." अशा रीतीने सत्य नाकारणाऱ्यांना ईश्वर भरकटू देतो. ७५ याचे कारण म्हणजे या भूमीत तुम्ही सत्य-असत्याचे भान

न ठेवता आनंदोत्सव साजरा करत राहिलात आणि उद्दामपणे वागलात.
७६ तेव्हा कायमच्या वास्तव्यासाठी नरकात प्रवेश करा. अशा उद्दामांचे
निवासस्थान गलिच्छ आहे.

७७ तेव्हा हे प्रेषिता! संयमाने रहा. कारण ईश्वरी वचन खरे आहे.
तुमच्या हयातीत आम्ही वचन दिलेल्या शिक्षेचा काही भाग त्यांच्या
जीवनात येवो किंवा त्या आधीच तुम्हाला मृत्यू येवो, त्यांना परत
आमच्याकडेच आणले जाईल.

७८ हे प्रेषिता! तुमच्या पूर्वी आम्ही अन्य प्रेषितांना पाठवले होते.
त्यांच्यापैकी काहींची कथा आम्ही तुम्हाला सांगितली तर काहींची
नाही सांगितली. ईश्वरी इच्छेशिवाय कुणाही प्रेषिताला ईश्वराचे संकेत
आणणे शक्य नव्हते; पण ईश्वरी आज्ञेची अंमलबजावणी होताना प्रत्येक
विषयाचा निर्णय सत्याने व न्यायाने घेतला गेला. त्यानंतर असत्याच्या
पायावर उभे असणारे नामशेष झाले.

७९ तुम्हाला पशुधन देणारा ईश्वर आहे. काहींचा तुम्ही प्रवासासाठी
उपयोग करता तर काहींचा अन्नासाठी. ८० त्यांच्यापासून तुम्हाला अन्य
फायदेही मिळतात. त्यांच्यावर स्वार होऊन तुम्ही इच्छित स्थळी पोहोचू
शकता. तुम्हाला भू-प्रवासासाठी प्राण्यांचा तर सागरप्रवासासाठी जहाजांचा
उपयोग होतो. ८१ ईश्वर तुम्हाला त्याचे संकेत दाखवतो. त्यापैकी कुठले
संकेत तुम्ही नाकारणार?

८२ त्यांनी पृथ्वीवर सगळीकडे फिरून पाहिले नाही का, त्यांच्या
आधी होऊन गेलेल्यांची कशी दुर्दशा झाली ते? संख्येने, ताकदीने
ते अधिक होते आणि त्यांचा या भूमीवरचा प्रभावही अधिक होता.
तरीही त्यांनी जे काही कर्म केले त्यातून त्यांचा लाभ झाला नाही.
८३ आमचे प्रेषित जेव्हा त्यांच्याकडे स्पष्ट संकेत घेऊन गेले तेव्हा ते

त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानातच गुंग झाले होते. त्यामुळे ज्याची ते खिल्ली उडवत राहिले त्या शिक्षेने अखेर त्यांचा घास घेतला. ८४ आमची शिक्षा समोर दिसताच ते म्हणाले, "आमची ईश्वरावर -एकमेव ईश्वरावर श्रद्धा आहे. ज्यांना आम्ही ईश्वराचा दर्जा दिला होता त्यांना आता नाकारत आहोत." ८५ पण आमची शिक्षा पाहिल्यानंतर आमच्यावर विश्वास ठेवण्याचा त्यांना काहीही फायदा झाला नाही. ईश्वराने निर्माण केलेली जीवसृष्टी हाताळण्याचा हा ईश्वरी नियम आहे. अशा रीतीने अश्रद्धावंत पराभूत झाले.

प्रकरण ४१ : सुस्पष्ट साक्षात्कार (फुज्जीलात)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हा मीम २ अतिशय कृपाळू, अतिशय दयाळू अशा ईश्वराकडून हे साक्षात्कार अवतरीत झाले आहेत. ३ ज्ञानसंपन्न लोकांसाठी अरेबिक भाषेतले हे साक्षात्कार या ग्रंथातून अत्यंत स्पष्ट केलेले आहेत. ४ यातून श्रद्धावंतांना सुवार्ता तर अश्रद्धावंतांना सावधानतेचा इशारा दिलेला आहे. तरीही त्यांच्यापैकी पुष्कळजण त्यापासून दूर जातात. त्याकडे लक्ष देत नाहीत. ५ आणि ते म्हणतात, "तुम्ही आम्हाला ज्याच्याकडे बोलावत आहात त्याच्याविषयी आमच्या अंतःकरणावर पडदा पडला आहे. आमचे कान जडावले आहेत तर आपल्यामध्ये अदृश्य भिंत उभी आहे. तेव्हा तुम्ही तुमच्या मार्गाने जा, आम्ही आमच्या मार्गाने जातो."

६ हे प्रेषिता! त्यांना सांगा, "मी तुमच्यासारखाच माणूस आहे. तुमचा ईश्वर एकमेव असल्याचा साक्षात्कार मला झाला आहे. तेव्हा त्याच्याकडे

नेणारा सरळ मार्ग निवडा[अ] आणि त्याच्या क्षमेची याचना करा.” त्यांचा धिक्कार असो जे इतरांना त्याचा दर्जा देतात. ७ जे दानधर्म करत नाहीत आणि मृत्युपश्चात जीवनाला नकार देतात. ८ ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना असा मोबदला मिळेल जो त्यांच्यापासून कधीही हिरावला जाणार नाही.

९ त्यांना विचारा, “काय! दोन कालावधीत पृथ्वी निर्माण करणाऱ्या ईश्वराला तुम्ही नाकारत आहात? इतरांना ईश्वराच्या बरोबरीचे स्थान देत आहात? तो या विश्वाचा अधिपती आहे.” १० त्याने भूतलावर भक्कम पर्वत उभे केले आणि आशीर्वाद दिला. त्यानंतर चार कालावधीत प्रत्येकाच्या गरजेप्रमाणे उदरनिर्वाहाची योजना बनवली. ११ त्यानंतर वाफेच्या अवस्थेत असलेल्या आकाशाकडे वळून त्याने आकाशाला व पृथ्वीला विचारले, “स्वेच्छेने किंवा अनिच्छेने अस्तित्वात या.” दोघांनीही सांगितले, “आम्ही स्वेच्छेने हजर होत आहोत.” १२ त्यानंतर दोन कालावधीत त्याने सप्त आकाशांची उभारणी केली आणि त्यांना त्यांचे काम नेमून दिले. सगळ्यात खालचे आकाश तारकांचे तेजस्वी दीप लावून सुशोभित केले आणि त्याच्या रक्षणाची योजना बनवली. सर्वशक्तिमान, सर्वज्ञ ईश्वराची ही आज्ञा आहे.

१३ हे प्रेषिता! त्यांनी तुमच्या संदेशाकडे पाठ फिरवली तर त्यांना सांगा, “आद आणि समूद जमातींवर जसा आगीचा लोळ कोसळला त्याचाच इशारा मी तुम्हालाही देतो.” १४ असंख्य प्रेषितांनी त्यांच्याकडे जाऊन त्यांना सांगितले, “फक्त एकमेव ईश्वराची आराधना करा.” पण

[अ] त्याच्याकडे सरळ मार्गाने जा. याचा अर्थ असा की तुमची उपासना पूर्णपणे एका ईश्वरासाठी ठेवा. तुमचे संपूर्ण लक्ष ईश्वराकडे वळले पाहिजे. तुमच्या प्रार्थना आणि उपासनेचा एकमेव लक्ष्य हा एकच ईश्वर असावा.

त्यांनी उत्तर दिले, "आमच्या पालनकर्त्याची इच्छा असती तर त्याने ईशदूतांना आमच्याकडे पाठवले असते. तेव्हा आम्ही कदापि तुमच्या संदेशावर विश्वास ठेवणार नाही."

१५ आदच्या जमातीने या पृथ्वीवर नाहक उद्दाम वर्तन केले आणि बढाया मारल्या, "आहे का आमच्यापेक्षा कुणी ताकदवान?" ज्याने त्यांना निर्माण केले, तो ईश्वर त्यांच्यापेक्षा ताकदवान असल्याचे त्यांना कळले नाही का? तरीही ते आमचे संकेत नाकारत राहिले. १६ तेव्हा त्यांच्या दुर्दशेच्या काळात आम्ही त्यांच्यावर रोंरावते वादळ आणवले आणि त्यांना ऐहिक जीवनातल्या अवमानकारक शिक्षेची चव चाखवली. त्यांचा मृत्युपश्चात जीवनात होणारा छळ नक्कीच याहीपेक्षा अवमानकारक असेल. तिथे त्यांना कुणीही मदतनीस असणार नाही. १७ समूदच्या जमातीलाही आम्ही मार्गदर्शन दिले, पण ते जाणूनबुजून अंधपणाने वागले. त्यांनी केलेल्या या दुष्कृत्याच्या मोबदल्यात अवमानकारक शिक्षा विजेच्या लोळासारखी त्यांच्यावर कोसळली. १८ ज्यांनी श्रद्धेचा अंगीकार केला आणि ईश्वराची भीती बाळगली त्यांना आम्ही सुरक्षित ठेवले.

१९ निवाड्याच्या दिवशी ईश्वराच्या सगळ्या शत्रूंना एकत्र करून गटागटांनी नरकाग्नीकडे फरफटत नेले जाईल. २० अग्नीजवळ पोहोचताच त्यांची त्वचा, कान आणि डोळे त्यांच्याविरुद्ध दुष्कृत्यांची साक्ष देऊ लागतील. २१ ते आपल्या त्वचेला विचारतील, "तू आमच्याविरुद्ध साक्ष का देत आहेस?" यावर त्यांची त्वचा उत्तर देईल, "ज्या ईश्वराने सगळ्यांना वाचा दिली त्यानेच आम्हालाही दिली आहे." त्यानेच तुम्हाला पहिल्यांदा निर्माण केले आणि त्याच्याकडेच तुम्हाला परत आणले आहे. २२ तुम्ही तुमच्या त्वचेपासून, डोळ्यांपासून, कानापासून लपू शकत नाही की त्यांना तुमच्याविरुद्ध साक्ष देण्यापासून रोखू शकत नाही. ईश्वराला

तुमच्या कर्माची जाणीव होणार नाही असे तुम्हाला वाटले. २३ पण ईश्वराविषयीच्या या विचारांनी तुम्हाला उध्वस्त केले आहे. तुम्ही आता अक्षरशः संपूर्ण पराभूत आहात. २४ इथे जरी ते संयमाने राहिले तरी अग्नी हेच त्यांचे घर असेल. स्वतःमध्ये सुधारणा करण्यासाठी त्यांनी सुटकेची याचना केली तरी त्यांना तशी परवानगी दिली जाणार नाही.

२५ आम्ही त्यांना असे सहकारी देऊ केले जे त्यांना त्यांची कृत्ये योग्य असल्याचे भासवत राहिले. त्यांच्या आधी होऊन गेलेल्या जिन्नच्या आणि माणसाच्या समाजावर जशी शिक्षा बजावली गेली तशाच शिक्षेचा निर्णय त्यांच्यासाठीही झाला. ते नक्कीच पराभूत झालेल्यांपैकी होते.

२६ सत्य नाकारणारे म्हणतात, "कुरआनकडे लक्ष देऊ नका. ते ऐकवले जात असताना गोंधळ घाला म्हणजे तुमचे वर्चस्व कायम राहील." २७ तेव्हा सत्य नाकारणाऱ्यांना आम्ही जरूर कठोर शिक्षेचा सामना करायला लावू आणि त्यांच्या वाईटातल्या वाईट कृत्यांना अनुसरून त्यांना मोबदला देऊ. २८ ईश्वराच्या शत्रूंचा हाच मोबदला असेल. नरकाग्नी हे त्यांचे कायमचे निवासस्थान असेल. आमचे साक्षात्कार नाकारणाऱ्यांना असाच मोबदला मिळतो.

२९ सत्य नाकारणारे म्हणतील, "हे पालनकर्त्या! ज्यांनी आमची दिशाभूल केली ते जिन्न आणि माणसे आम्हाला दाखवा, आम्ही त्यांना पायदळी तुडवू. म्हणजे त्यांना अवमानितांपेक्षाही अवमानितांचे जीवन जगायला लावू." ३० "ईश्वरच आमचा पालनकर्ता आहे" असे ठामपणे सांगून निष्ठा जपणाऱ्यांसमोर देवदूत अवतरतील आणि म्हणतील, "कशालाही घाबरू नका आणि कसलाही शोक करू नका. तुम्हाला ज्याचे वचन दिले गेले त्या स्वर्गात राहण्याच्या शुभवार्तेने आनंदित व्हा. ३१ आम्ही या जीवनात तुमचे सोबती आहोत आणि मृत्युपश्चात

जीवनातही असू. तिथे तुम्हाला जे हवे ते सगळे असेल आणि जे मागाल ते सगळे मिळेल. ३२ सदा क्षमाशील आणि अतिशय दयाळू असलेल्या ईश्वराकडून तुमच्यासाठी संपन्न तरतूद केली जाईल.''

३३ सत्कर्मे करून ईश्वराचा धावा करणाऱ्यापेक्षा आणि ''मी नक्कीच ईश्वराला शरण गेलो आहे'' म्हणणाऱ्यापेक्षा मधुर वाणी कोणाची असेल? ३४ चांगली आणि वाईट कृत्ये एकसारखी नाहीत. वाईटाला चांगल्याने प्रत्युत्तर देऊन पहा, एकेकाळचा शत्रू तुमचा जिवलग मित्र झाल्याचे आढळेल. ३५ पण संयम आणि स्वनियंत्रण बाळगल्याशिवाय कुणालाही असा चांगुलपणा लाभत नाही. खरे नशीबवान असल्याशिवाय कुणालाही ही देणगी मिळत नाही. ३६ सैतानाच्या चिथावणीने डिवचले गेलात तर ईश्वराला शरण जा. तो सगळे ऐकणारा, सगळे जाणारा आहे.

३७ दिवस-रात्र, सूर्य-चंद्र हे सगळे ईश्वरी संकेत आहेत. ईश्वराचे खरे उपासक असाल तर चंद्र आणि सूर्यासमोर नतमस्तक होऊ नका तर ईश्वरासमोर नतमस्तक व्हा, ज्याने त्यांना निर्माण केले. ३८ हे प्रेषिता! ते उद्धटपणाने वागले तर लक्षात घ्या, ईश्वराबरोबर असणारे (देवदूत) रात्रंदिवस त्याचे स्तुतिगान करतात आणि त्याची स्तुती करताना कधीही थकणार नाहीत.

३९ हाही त्याचा एक संकेत आहे; तुम्ही शुष्क, उजाड धरती पाहता. आम्ही तिच्यावर जलवर्षाव करताच ती चेतवली जाते आणि फुलून येते. तिला नवसंजीवन देणारा ईश्वरच मृतांना जीवन देणारा आहे; निःसंशय सगळ्यावर त्याचीच सत्ता आहे. ४० आमच्या संदेशांचा विपर्यास करणारे आमच्यापासून लपलेले नाहीत. कोण अधिक चांगला आहे, पुनर्निर्माणाच्या दिवशी आगीत फेकला जाणारा की सुरक्षितपणे स्वर्गात

पोहोचणारा? तुमच्या इच्छेला येईल तसे वागा; तुमची सगळी कृत्ये तो पाहत आहे.

४१ आपल्याकडे आलेला बोधग्रंथ नाकारणारे पराभूत होणाऱ्यांपैकी आहेत. कुरआन हा खरोखर महान ग्रंथ आहे. ४२ या ग्रंथात असत्याला किंचितही जागा नाही. सुज्ञ, सर्व स्तुतीचा हक्कदार असलेल्या ईश्वराकडून तो अवतरीत झाला आहे. ४३ हे प्रेषिता! तुमच्या आधीच्या प्रेषितांना जे सांगितले गेले तेच तुम्हालाही सांगितले आहे. तुमचा पालनकर्ता निःसंशय क्षमाशीलतेचा स्वामी आहे. पण त्याचवेळेस तो कठोर शिक्षेचा स्वामी आहे.

४४ कुरआन आम्ही अरेबिकपेक्षा वेगळ्या भाषेत पाठवले असते तर ते म्हणाले असते, "यातील वचनांचे सुस्पष्ट स्पष्टीकरण का नाही? प्रेषित अरब आहे आणि हा ग्रंथ परक्या भाषेतला, हे कसे शक्य आहे?" त्यांना सांगा, "श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी यात मार्गदर्शन आणि आत्मिक आरोग्याचे साधन आहे तर श्रद्धा न ठेवणाऱ्यांच्या कानात बहिरेपणा आणि डोळ्यात आंधळेपणा आलेला आहे. जणूकाही त्यांना फार दूरवरून ईश्वराकडे पुकारले जात आहे."

४५ आम्ही मोझेसला हा ग्रंथ दिला, पण त्यावरून त्यांच्यात मतभेद झाले. ईश्वराचा निर्णय आधीच झाला नसता तर त्यांच्यातले मतभेद त्याच वेळेस दूर झाले असते. याविषयी निःसंशय त्यांच्या मनात घोर शंका आहेत. ४६ योग्य आणि न्यायाने वागण्यात वागणाऱ्याचेच भले आहे तर वाईट वागणारा स्वतःचाच नाश ओढवून घेतो. ईश्वर आपण निर्माण केलेल्या निर्मितीवर कधीही अन्याय करत नाही.

४७ फक्त ईश्वराकडेच निवाड्याच्या घडीचे ज्ञान आहे. त्याला कळल्याशिवाय कुठलेही फळ गाभ्यातून बाहेर पडत नाही की कुठलीही

स्त्री गर्भार राहून शिशुला जन्म देत नाही. निवाड्याच्या दिवशी तो विचारेल, "कुठे आहेत ते माझ्यासोबत मानलेले देव?" ते म्हणतील, "आमच्यापैकी कुणीही त्यांचे साक्षीदार नसल्याचे आम्ही जाहीर करत आहोत." ४८ पूर्वी ते ज्यांची आराधना करत ते उपास्य गायब झाले असतील आणि त्यांना कळून चुकेल, आता आपली सुटका नाही.

४९ माणूस जीवनातल्या चांगल्या गोष्टी मागायला कधीही कंटाळत नाही, पण एखादा दुर्दैवी प्रसंग ओढवताच तो सगळी आशा सोडून देतो, निराश होतो. ५० त्याच्यावर आलेली प्रतिकूल परिस्थिती आमच्या कृपेने दूर झाल्यास तो नक्कीच म्हणतो, "यावर माझा हक्कच होता. निवाड्याची वेळ कधी येईल असे मला वाटत नाही आणि मला माझ्या पालनकर्त्याकडे परत नेलेच, तर तो मला चांगलाच मोबदला देईल." पण त्या दिवशी सत्य नाकारणाऱ्यांसमोर आम्ही त्यांची दुष्कृत्ये ठेवू आणि त्यांना कठोर शिक्षा भोगायला लावू.

५१ माणसावर आम्ही कृपा करताच तो पाठ फिरवून दूर निघून जातो. पण तेच दुर्दैवी प्रसंग ओढवला तर अखंड आमची प्रार्थना करत राहतो. ५२ त्याला सांगा, "हे कुरआन ईश्वराकडून आल्याचे माहीत असूनही नाकारलेस तर याचा कधी विचार केला आहेस का, की सत्यापासून दूर गेलेल्यापेक्षा अधिक भरकटलेला कोण असेल?"

५३ कुरआनात दिलेले आमचे संदेश हे सत्य आहे, याची खात्री पटेपर्यंत आम्ही त्यांना आमचे संकेत या विश्वात आणि त्यांच्यामध्येही दाखवत राहू. या सगळ्या गोष्टींना तुमचा पालनकर्ता साक्षीदार आहे हे पुरेसे नाही का? ५४ तरीही ते कधी त्यांच्या पालनकर्त्याला भेटतील याची त्यांना शंका वाटते. निःसंशय, त्याला सगळ्या गोष्टींचे ज्ञान आहे.

प्रकरण ४२ : सामंजस्य सल्लामसलत (अश्-शूरा)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हा मीम २ अइन सीन क़ाफ ३ अशा रीतीने सर्वशक्तिमान, सुज्ञ ईश्वर तुमच्याकडे आपले साक्षात्कार पाठवत आहे जसे त्याने तुमच्या आधीच्या प्रेषितांकडे पाठवले होते. ४ आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते त्याच्याच मालकीचे आहे. तो सर्वश्रेष्ठ आहे, महिमावान आहे. ५ त्याची अवकृपा झाली तर आकाशही फाटून कोसळू शकते. देवदूत सतत त्याचे स्तुतिगान करतात आणि पृथ्वीवासीयांसाठी त्याच्याकडे क्षमायाचना करतात. ईश्वर खरोखर अतिशय क्षमाशील, अतिशय दयाशील आहे. ६ आणि जे ईश्वराशिवाय इतरांना आपले रक्षणकर्ते मानतात त्यांच्यावर ईश्वर लक्ष ठेवून आहे. हे प्रेषिता! तुला त्यांच्या कर्मांसाठी जबाबदार धरले जाणार नाही.

७ हे प्रेषिता! सगळ्या नगरांची माता असलेल्या मक्केला आणि तिच्या भोवतीच्या नगरांना सावधानतेचा इशारा देण्यासाठी हे कुरआन तुमच्यावर अवतरीत झाले आहे. ज्या दिवशी सगळ्यांना आमच्यासमोर एकत्र आणले जाईल, त्या दिवसापासून त्यांना सावध करा. तो अंतिम दिवस अटळ आहे. त्या दिवशी काहीजण स्वर्गात असतील तर काहीजण नरकाग्नीत असतील.

८ ईश्वराची मर्जी असती तर समस्त मानवजातीला त्याने एकच समाज बनवले असते. पण त्याच्या मर्जीला येईल त्यांनाच तो आपल्या कृपाछत्रात घेतो. अपराध्यांना ना कुणी रक्षक असेल, ना कुणी मदतनीस. ९ त्यांनी ईश्वराव्यतिरिक्त दुसऱ्यांना आपले रक्षक मानले आहे की काय? पण

खरा रक्षक तो ईश्वर आहे. तो मृतांना जीवित करतो, तो सर्वसामर्थ्यवान आहे. १० हे श्रद्धावंतांनो! तुमचे आपसात कितीही मतभेद असोत, निवाडा फक्त ईश्वराच्या हाती आहे. तेव्हा प्रार्थना करा, "ईश्वर माझा पालनकर्ता आहे. त्याच्यावर माझा भरोसा आहे आणि मी त्याच्याप्रति सदैव समर्पित आहे."

११ आकाश आणि पृथ्वीचा निर्माता असलेल्या ईश्वराने तुमच्यासाठी तुमच्यामधून सहचारिणी निर्माण केल्या. तसेच पशुपक्ष्यांच्याही जोड्या बनवल्या. अशा रीतीने तो आपण निर्माण केलेल्या जीवसृष्टीची संख्या अनेक पटीने वाढवतो. त्याची कुणाशीही तुलना होऊ शकत नाही. तो अतुल्य आहे. तो सर्व ऐकणारा, सर्व पाहणारा आहे. १२ आकाश आणि पृथ्वी पूर्णतः त्याच्या नियंत्रणात आहे. त्याच्या मर्जीला येईल त्याला तो संपन्नता देतो तर त्याच्या मर्जीला येईल त्याला कमतरता देतो. त्याला सगळ्या गोष्टींचे समग्र ज्ञान आहे.

१३ ईश्वराने तुमच्यासाठी तोच धर्म नेमून दिला आहे ज्याचा आदेश त्याने नोहाला दिला होता. आम्ही तुमच्यावर तोच धर्म अवतरीत केला आहे ज्याचा आदेश अब्राहाम, मोझेस आणि येशूला दिला होता. तेव्हा धर्मावर अढळ निष्ठा ठेवा. त्यावरून आपसात मतभेद करू नका. अनेकेश्वरवाद्यांना तुम्ही जे करायला सांगता ते त्यांच्यासाठी कठीण आहे. ईश्वराच्या मर्जीला येईल त्याचीच निवड तो स्वतःसाठी करतो. जे सदैव ईश्वराभिमुख असतात त्यांना तो स्वतःकडे येण्याचे मार्गदर्शन करतो.

१४ त्यांचे आपसात मतभेद झाले ते ज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचल्यानंतरच. याचे कारण म्हणजे आपापसातील मत्सर. त्यांना ठराविक अवधी देण्याचा ईश्वराचा निर्णय अगोदरच झाला नसता तर त्यांच्यातल्या मतभेदांचे निराकरण त्याचवेळेस झाले असते. त्यांच्यानंतर ज्यांना या ग्रंथाचा वारसा

मिळाला त्यांच्या मनात खरोखर त्याविषयी शंका होती, ते शंकेने ग्रासले होते.

१५ तेव्हा लोकांना ईश्वरावर श्रद्धा ठेवायचा उपदेश करा आणि तुम्हाला मिळालेल्या आज्ञेनुसार त्याच्यावर दृढ श्रद्धा ठेवा. त्यांच्या इच्छेनुसार वागू नका तर त्यांना सांगा, "ईश्वराने पाठवलेल्या या ग्रंथावर माझा विश्वास आहे. मला तुमच्यात न्यायपूर्वक निवाडा करण्याची आज्ञा मिळालेली आहे. ईश्वर तुमचा आणि आमचा पालनकर्ता आहे. आमच्या कृत्यांसाठी आम्ही जबाबदार आहोत तर तुमच्या कृत्यांसाठी तुम्ही जबाबदार आहात. आपले आपसात कोणतेही वाद नाहीत. ईश्वर आपणा सगळ्यांना एकत्र बोलावून घेईल, कारण आपल्याला त्याच्याकडेच परतायचे आहे." १६ आधी ईश्वराचा स्वीकार करून नंतर त्याच्यावरून वादविवाद करणाऱ्यांना ईश्वराच्या लेखी काही किंमत नाही. ते ईश्वराचा रोष ओढवून घेतील. कठोर शिक्षा त्यांच्यासाठी वाढून ठेवलेली आहे.

१७ सत्य आणि न्यायाचा तराजू घेऊन हा ग्रंथ पाठवणारा ईश्वर आहे. अंतिम घटका अगदी जवळ येऊन ठेपली असेल तरी तुम्हाला ते कसे कळेल? १८ ज्यांचा अंतिम घटकेवर विश्वास नाही त्यांना ती लवकरात लवकर यावी असे वाटते. पण तिच्यावर विश्वास ठेवणारे तिला घाबरून राहतात. कारण ते सत्य आहे हे त्यांना माहीत आहे. त्यावरून वादविवाद करणारे सन्मार्गापासून फार भरकटले आहेत.

१९ आपण निर्माण केलेल्या माणसाच्या बाबतीत ईश्वर फार कनवाळू आहे. त्याच्या मर्जीला येईल त्याला तो उपजीविका पुरवतो. कारण सर्वशक्तिमान, सर्वसामर्थ्यवान असा तो एकमेव आहे. २० जो मृत्युपश्चात जीवनाची भरभराट इच्छितो त्याला आम्ही संपन्नता देतो. पण जो फक्त ऐहिक जीवनाची भरभराट इच्छितो त्याला आम्ही

भले थोडीफार संपन्नता देऊ. पण मृत्युपश्चात जीवनातील आमच्या कृपेत
त्यांच्यासाठी काही वाटा असणार नाही.
२१ ते ईश्वराला असे भागीदार मानतात काय ज्यांनी त्यांना ईश्वरी
मर्जीविरुद्ध एखादा धर्म आखून दिला आहे? अंतिम निवाड्याचा
ईश्वराचा निर्णय अगोदरच झाला नसता तर ईश्वराने त्यांचा वाद कधीचाच
मिटवला असता. अशा अपराध्यांना नक्कीच वेदनादायी शिक्षा मिळेल.
२२ आपण केलेल्या कुकर्मांच्या दुष्परिणामांबद्दल अपराध्यांच्या मनात
भीती असल्याचे तुम्हाला जाणवेल. त्यापासून त्यांची सुटका कदापि
होणार नाही. याउलट ज्यांनी ईश्वरावर विश्वास ठेवून सत्कर्मे केली
आहेत ते स्वर्गातील हिरवळीवर असतील. त्यांना हवे असेल ते सगळे
तिथे त्यांना त्यांच्या पालनकर्त्याकडून मिळेल. ती ईश्वराची त्यांच्यावरची
सर्वोच्च कृपा असेल. २३ ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांसाठी
ईश्वराने दिलेल्या या सुवार्ता आहेत. त्यांना सांगा, "याच्या मोबदल्यात
माझी तुमच्याकडून काही अपेक्षा नाही. फक्त नात्यातील प्रेमापोटी मी
तुम्हाला ईश्वराकडे येण्याचे बोलावणे करत आहे. सत्कर्मे करणाऱ्यांचे
आम्ही अधिकाधिक कल्याण करू." ईश्वर अतिशय क्षमाशील आणि
तुमच्या सत्कर्मांना दाद देणारा आहे.
२४ ते असे म्हणतात का, "त्याने ईश्वराविषयी बनावट गोष्टी रचल्या
आहेत?" ईश्वराच्या मनात आले असते तर त्याने त्यांची अंतःकरणे
मोहोरबंद करून टाकली असती. ईश्वर असत्य पुसून टाकतो आणि
आपल्या वचनांनी सत्याला बळकटी देतो. माणसाच्या मनातल्या गोष्टी
तो चांगल्याच ओळखतो. २५ तो आपल्या सेवकांच्या पश्चातापाचा
स्वीकार करतो आणि त्यांच्या अपराधांना क्षमा करतो. तुमचे प्रत्येक कर्म
तो जाणतो. २६ ईश्वरावर श्रद्धा ठेवणाऱ्यांना आणि सत्कर्मे करणाऱ्यांना

तो प्रतिसाद देतो. त्यांना आपल्या कृपाप्रसादाचा लाभ देतो तर सत्य नाकारणाऱ्यांसाठी भयंकर शिक्षा तिष्ठत आहे.

२७ ईश्वराच्या मनात असते तर त्याने स्वतः निर्माण केलेल्या सगळ्यांनाच संपन्नता दिली असती. पण मग माणूस पृथ्वीवर बेफामपणे वागला असता. म्हणूनच त्याच्या मनाला येईल त्या योग्य प्रमाणात तो प्रत्येकाला संपन्नता देतो. आपल्या सेवकांविषयी तो पूर्ण जागरूक आहे आणि त्यांच्यावर लक्ष ठेवून आहे. २८ दुष्काळामुळे माणूस हताश बनल्यावर पाऊस पाठवणारा तोच आहे. त्यायोगे तो आपली कृपा सर्वदूर पोहोचवतो. तो माणसाचा रक्षणकर्ता आहे, सगळ्या स्तुतीचा हक्कदार आहे. २९ आकाश, पृथ्वी आणि त्यावरील सर्व सजीवांची निर्मिती व त्यांचे सर्वत्र विखुरले जाणे हे त्याचे संकेत आहेत. त्याच्या मनाला येईल तेव्हा त्या सगळ्यांना एकत्र करण्याची शक्ती त्याच्याकडे आहे.

३० जे काही दुर्दैव तुमच्यावर ओढवते ते तुमचेच कर्म असते. ईश्वर पुष्कळ बाबतीत तुम्हाला अमाप क्षमा करतो. ३१ पृथ्वीतलावर कुठेही त्याच्यापासून तुमची सुटका नाही. तुम्हाला ईश्वराशिवाय कुणीही रक्षक नाही की मदतनीस नाही.

३२ सागरात पर्वताप्रमाणे विहार करणाऱ्या नौका हे ईश्वराचे संकेत आहेत. ३३ ईश्वराच्या मनात आले असते तर तो वाऱ्याची गती काढून घेईल आणि निश्चल अवस्थेत वारा सागराच्या पृष्ठभागावर पडून राहील, जो संयमी आणि कृतज्ञ आहे. त्यांच्यासाठी यात खरोखर संकेत आहेत ३४ किंवा त्यांनी केलेल्या कुकर्मांच्या मोबदल्यात तो त्यांना समाप्त करू शकतो. तो त्यांच्यापैकी अनेकांना क्षमा करतो. ३५ आमच्या संकेतांना विरोध करणाऱ्यांना लवकरच कळेल, त्यांची आमच्यापासून सुटका नाही.

३६ तुम्हाला जे काही दिले गेले ती या जीवनातली तात्पुरती तरतूद

आहे. पण सत्यावर विश्वास आणि ईश्वरावर भरवसा ठेवणाऱ्यांसाठी ईश्वराकडे जे आहे ते अधिक चांगले आणि चिरकाल टिकणारे आहे. ३७ जे घोर अपराधांपासून व असभ्य कृत्यांपासून दूर राहतात, ते कुणाचा राग आला तरी त्याला माफ करतात. ३८ आपल्या पालनकर्त्याला प्रतिसाद देतात, नियमितपणे प्रार्थना करतात; परस्पर सल्लामसलतीने आपली कृत्ये पार पाडतात आणि आम्ही दिलेल्या उपजीविकेतून दानधर्म करतात ३९ आणि जे त्यांच्यावर हल्ला करतात त्यांच्यावरच ते प्रतिहल्ला करतात. त्यांनाही ईश्वराकडून चांगला मोबदला मिळतो. ४० तुमच्या झालेल्या नुकसानाच्या प्रमाणातच प्रतिपक्षाचे नुकसान करा. पण झालेले नुकसान माफ करून टाकणाऱ्यास आणि (गैरवर्तन सोडून) वर्तनात सुधारणा करणाऱ्यास ईश्वराकडून चांगला मोबदला मिळेल. ईश्वराला अपराधी अप्रिय आहेत. ४१ अन्याय झाल्यानंतर स्वतःचा बचाव करणाऱ्यांना दोषी धरले जाणार नाही. ४२ लोकांवर अन्याय करणारे आणि या भूमीवर कोणत्याही न्याय्य कारणाशिवाय अनाचार माजवणारे दोषी आहेत. त्यांना यातनामय शिक्षा मिळेल. ४३ संयमी आणि क्षमाशील असणारा मोठ्या धैर्याने आणि निर्धाराने वागतो.

४४ ईश्वर ज्यांना भरकटू देतो त्यांना त्यानंतर कुणीही संरक्षक मिळत नाही. शिक्षा समोर दिसल्यावर ते उद्गारतील, "परतीचा काही मार्ग नाही का?" ४५ अपमानास्पद स्थितीत त्यांना अग्नीजवळ आणले जाईल. भयभीत होऊन ते त्याकडे पाहत असतील. उलट ईश्वरावर श्रद्धा ठेवणारे म्हणतील, "पुनर्निर्माणाच्या दिवशी स्वतः वर आणि आपल्या लोकांवर दुर्दैवी वेळ आणणारे पराभूत आहेत. खरोखर, अपराध्यांना कायम छळ सोसत रहावे लागेल."

४६ ईश्वराविरुद्ध मदत करण्यासाठी त्यांना कुणीही मदतनीस असणार नाही.
ज्यांना ईश्वर मार्गभ्रष्ट करतो त्यांच्यासमोरचे सगळे मार्ग खुंटले आहेत.

४७ ईश्वरी इच्छेविरुद्ध जो दिवस परतवला जाणार नाही त्याच्या
आगमनापूर्वी ईश्वरी संदेशाला प्रतिसाद द्या. त्या दिवशी तुम्हाला ना
कुणाचा आसरा मिळेल ना अपराध नाकारण्याची संधी मिळेल. ४८ हे
प्रेषिता! तरीही त्यांनी त्याकडे पाठ फिरवली तर लक्षात ठेवा, आम्ही
तुम्हाला त्यांचे रखवालदार म्हणून पाठवलेले नाही. आमचा संदेश
पोहोचवणे, एवढीच तुमची जबाबदारी आहे. जेव्हा आम्ही माणसावर कृपा
करतो, तेव्हा तो खुश होतो. पण स्वतःच्याच कर्मामुळे दुर्दैव ओढवल्यास
तो अक्षरशः कृतघ्न बनतो.

४९ आकाश आणि पृथ्वीचे नियंत्रण ईश्वराकडे आहे. त्याच्या इच्छेला
येईल ते तो निर्माण करतो. त्याच्या इच्छेला येईल त्याला तो मुलगी देतो
तर त्याच्या इच्छेला येईल त्याला मुलगा देतो. ५० काहींना तो दोन्ही देतो
तर काहींना अपत्यहीन ठेवतो. तो सर्वज्ञ आणि सर्वशक्तिमान आहे.

५१ कुणाही मानवाला ईश्वराशी प्रत्यक्ष बोलण्याची मुभा नाही. तो
त्यांच्याशी आपल्या साक्षात्कारांच्या माध्यमातून किंवा पडद्यामागून
किंवा एखाद्या दूताबरोबर आपला संदेश पाठवून संवाद साधतो. त्याचे
प्रेषित ईश्वरी आज्ञेने ईश्वरी साक्षात्कार माणसासमोर प्रकट करतात.
खरोखर, ईश्वर सर्वश्रेष्ठ आणि सुज्ञ आहे. ५२ हे प्रेषिता! अशा रीतीने
आम्ही तुमच्यासमोर आमचे चैतन्य प्रकट केले आहे. तुम्हाला ना श्रद्धा
माहीत होती ना हा ग्रंथ माहीत होता. पण आम्ही तुम्हाला प्रकाशाची
वाट दाखवली. आमच्या इच्छेला येईल त्या सेवकांना आम्ही त्याद्वारे
मार्गदर्शन देतो. तुम्ही खरेच त्यांना सन्मार्ग दाखवता. ५३ तो ईश्वरी मार्ग
आहे. आकाश आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे ईश्वराचेच आहे.
सगळ्या गोष्टी अंतिमतः त्याच्याकडेच परततात.

प्रकरण ४३ : सुवर्ण अलंकार (अज्-जुखरुफ)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हा मीम २ सगळ्या गोष्टी स्पष्ट करणाऱ्या या पवित्र ग्रंथाची शपथ! ३ तुम्हाला समजावे म्हणून आम्ही तो अरेबिक भाषेत स्पष्ट केला आहे. ४ खरेच, आमच्याकडे सुरक्षित असलेला मूळ ग्रंथ हा याचा स्त्रोत आहे. तो उदात्त आणि शहाणपणाने समृद्ध आहे.

५ (सत्य नाकारणाऱ्यांनो!) तुम्ही मार्गभ्रष्ट होऊन वाममार्गाला लागला आहात म्हणून आम्ही हा उपदेश परत घ्यावा का? ६ पूर्वीच्या लोकांकडे आम्ही अनेक प्रेषित पाठवले होते. ७ पण जेव्हाही आमचा प्रेषित त्यांच्याकडे आला, तेव्हा त्यांनी त्याची चेष्टा केली. ८ त्यावेळेस त्यांच्याहीपेक्षा ताकदवान असलेल्या त्यांच्या पूर्वजांना आम्ही नष्ट केले. असे आहे पूर्वीच्या लोकांचे उदाहरण.

९ आकाश आणि पृथ्वी कुणी निर्माण केले? असा प्रश्न विचारलात तर निःसंशय त्याचे उत्तर असेल, "सर्वशक्तिमान, सर्वज्ञ ईश्वराने त्यांना निर्माण केले आहे." १० तो ईश्वर आहे ज्याने तुमच्यासाठी पृथ्वीचा बिछाना दिला आणि त्यावरील योग्य मार्ग तुम्हाला निवडता यावे म्हणून अनेक मार्ग उपलब्ध करून दिले. ११ योग्य प्रमाणात आकाशातून जलवर्षाव करणारा ईश्वर आहे. त्याच्या सहाय्याने आम्ही मृत धरतीला नवजीवन देतो. तुम्हालाही आम्ही असेच (थडग्यातून) पुन्हा जिवंत करू. १२ त्याने सगळ्या सजीवांच्या जोड्या निर्माण केल्या आणि जलविहारासाठी नौका व स्वार होण्यासाठी प्राणी दिले. १३ त्यांच्या पाठीवर तुम्ही घट्ट नियंत्रण ठेवू शकता. त्यांच्या पाठीवर स्वार झाल्यावर ईश्वरी कृपेचे स्मरण करून

प्रार्थना करा, "या प्राण्यांना आमच्या अधीन करणारा ईश्वर महान आहे. आम्ही स्वतः होऊन त्यांच्यावर नियंत्रण मिळवू शकलो नसतो. १४ आणि आमच्या पालनकर्त्याकडे आम्हाला निःसंशय परतायचे आहे."

१५ तरीही ते त्याच्या सेवकांपैकी काहींना त्याच्या देवत्वाचे भागीदार मानतात. माणूस सरळसरळ कृतघ्न आहे. १६ त्याने स्वतःच्या निर्मितीपैकी मुलींची निवड स्वतःसाठी तर मुलांची निवड तुमच्यासाठी केली असे तुम्हाला वाटते की काय? १७ जिचा संबंध ते कृपाळू ईश्वराशी जोडतात त्या मुलीच्या जन्माची बातमी कळताच त्यांचा चेहेरा काळवंडून जातो आणि ते अतिशय दुःखी होतात. १८ जिला लाडाकोडात वाढवले जाते आणि जिला समर्पक युक्तिवाद करता येत नाही तिचा संबंध तुम्ही ईश्वराशी जोडता? १९ ईश्वराच्या दूतांना ते स्त्रिया समजतात. त्यांच्या निर्मितीचे ते साक्षीदार आहेत का? त्यांचा हा दावा नोंदवून ठेवला जाईल आणि त्यांना त्याचा जाब विचारला जाईल.

२० ते म्हणतात, "ईश्वराची मर्जी असती तर आम्ही आमच्या दैवतांची आराधना केली नसती." खरे तर त्यांना कसलेही ज्ञान नाही. ते फक्त अंदाज बांधत आहेत. २१ या आधी आम्ही त्यांना असा एखादा ग्रंथ दिला आहे का, ज्याचे ते निष्ठेने अनुसरण करत आहेत? २२ अजिबात नाही. ते म्हणतात, "आम्ही आमच्या वाडवडिलांना विशिष्ट मार्गाने जाताना पाहिले आहे आणि त्यांच्याच मार्गदर्शनानुसार चालतो." २३ जेव्हाही आम्ही एखाद्या नगरात तुमच्या आधीचे प्रेषित पाठवले, तेव्हा तेथील धनाढ्यही असेच म्हणत, "आम्ही आमच्या वाडवडिलांना विशिष्ट रूढीपरंपरा पाळताना पाहिले आणि आम्हीही त्यांच्याच पावलावर पाऊल ठेवून चालतो आहोत." २४ प्रत्येक प्रेषिताने त्यांना विचारले, "तुमच्या वाडवडिलांपेक्षा चांगला मार्ग मी तुम्हाला दाखवला तर तुम्ही

काय कराल?'' यावर त्यांचे उत्तर असे, ''तू जो संदेश आणला आहेस तो आम्ही नाकारत आहोत.'' २५ तेव्हा आम्ही त्यांच्यावर आमचा सूड उगवला. सत्य नाकारणाऱ्यांचा अंत कसा झाला पहा.

२६ अब्राहाम आपल्या वडिलांना आणि लोकांना काय म्हणाला ते आठवा. त्याने त्यांना सांगितले, ''तुम्ही ज्यांची आराधना करता त्यांना मी मानत नाही. २७ मी फक्त त्याचीच आराधना करतो, ज्याने मला निर्माण केले. तो निश्चितच मला मार्गदर्शन करेल.'' २८ आपल्या वंशजांना ईश्वराकडे जाता यावे म्हणून त्याने हे शब्द त्यांच्यासाठी मागे सोडले. २९ माझा प्रेषित माझा संदेश स्पष्ट करेपर्यंत आणि सत्य त्यांच्याजवळ पोहोचेपर्यंत मी त्यांना आणि त्यांच्या पूर्वजांना ऐहिक जीवनातल्या चांगल्या गोष्टी दिल्या. ३० पण सत्य त्यांच्याजवळ येताच ते म्हणाले, ''ही जादू आहे. आम्हाला ती मान्य नाही.''

३१ त्यांनी विचारले, ''त्या दोन शहरांमधल्या एखाद्या प्रतिष्ठित व्यक्तीबरोबर हे कुरआन का पाठवले नाही?'' ३२ ईश्वरी कृपेचे वाटप ते करणार आहेत का? ऐहिक जीवनात त्यांना चरितार्थाचे वाटप करणारे आम्ही आहोत. त्यांनी एकमेकांच्या उपयोगी पडावे यासाठी त्यांच्यापैकी काहींना आम्ही इतरांपेक्षा श्रेष्ठ दर्जा देतो. ते जी संपत्ती जमा करतात, त्यापेक्षा त्यांच्या पालनकर्त्याची कृपा फार मोठी आहे. ३३ संपूर्ण मानवजात अश्रद्धावंतांचा एकच समाज बनण्याची शक्यता नसती तर आम्ही त्या दयासागराला नाकारणाऱ्या प्रत्येकाला अशी घरे दिली असती ज्यांचे छप्पर आणि वर चढायचे जिने चांदीचे आहेत. ३४ त्यांच्या घरांची दारेही चांदीची केली असती आणि आराम करण्याची आसनेही चांदीची बनवली असती. ३५ त्यांना सोन्याचे अलंकार दिले असते. पण या सगळ्या ऐहिक जीवनातल्या तरतुदी आहेत. ईश्वराची भीती बाळगणाऱ्यांसाठी तुमच्या पालनकर्त्याने मृत्युपश्चात जीवनातील तरतुदी राखून ठेवल्या आहेत.

३६ कृपाळू ईश्वराच्या स्मरणापासून दूर जाणाऱ्यासाठी आम्ही एका
सैतानाची नियुक्ती करतो, जो त्याचा जिवलग सोबती बनून जातो.
३७ सैतान माणसाला योग्य मार्गापासून विचलित करतात, जेव्हा की त्याला
वाटते आपण योग्य मार्गावरच आहोत. ३८ असा माणूस आमच्याजवळ
येताच आपल्या त्या दुष्ट सोबत्याला म्हणतो, "पूर्व आणि पश्चिम
यांच्यात जितके अंतर आहे, तितके आपल्यात असते तर किती चांगले
झाले असते! तू किती दुष्ट सोबती होतास." ३९ पण त्याला सांगितले
जाईल, "तू अपराध केला आहेस आणि शिक्षेत भागीदार असण्याचा
आज तुला काहीही फायदा होणार नाही."

४० हे प्रेषिता! तुम्ही बहिऱ्यांना ऐकवू शकता का? किंवा अंधांना
आणि जाणूनबुजून वाममार्गाला लागलेल्यांना मार्गदर्शन देऊ शकता
का? ४१ आम्ही जरी तुम्हाला या जगातून उचलून नेले तरीही त्यांचा
सूड घेऊच. ४२ किंवा आम्ही जे वचन दिले होते ती शिक्षा त्यांच्यावर
आणवून दाखवू. कारण ते पूर्णपणे आमच्या नियंत्रणात आहेत. ४३ तेव्हा
तुमच्यावर अवतरीत झालेल्या ग्रंथावर पूर्ण निष्ठा ठेवा. तुम्ही निःसंशय
योग्य मार्गावर आहात. ४४ हे तुमच्यासाठी आणि तुमच्या लोकांसाठी
उपदेश ग्रंथ आहेत. लवकरच तुम्हाला जबाबासाठी बोलावले जाईल.
४५ तुमच्या आधी पाठवलेल्या आमच्या प्रेषितांना विचारा, "परोपकारी,
एकमेव ईश्वराशिवाय आराधना करण्यासाठी आम्ही इतरांची नेमणूक केली
होती काय?"

४६ आम्ही आमचे संकेत घेऊन मोझेसला फारो आणि त्याच्या सरदारांकडे
पाठवले. प्रेषिताने त्यांना सांगितले, "मी या विश्वाच्या पालनकर्त्याचा
प्रेषित आहे." ४७ पण आमचे संकेत घेऊन जेव्हा तो त्यांच्याकडे गेला
तेव्हा त्यांनी त्याची खिल्ली उडवली. ४८ आम्ही दाखवलेला प्रत्येक संकेत

आधीच्या संकेतापेक्षा महान होता. तरीही त्यांनी सन्मार्गावर परत यावे
यासाठी आम्ही त्यांना छळाचा सामना करायला लावला. ४९ ते आमच्या
प्रेषिताला म्हणाले, "हे जादूगारा! आमच्यासाठी तुझ्या पालनकर्त्याचा
धावा कर. त्याच्या कृपेने आमच्यावरचे संकट टळले तर त्याची शपथ,
आम्ही तुझ्या मार्गदर्शनाचा स्वीकार करू." ५० पण आम्ही छळापासून
त्यांची मुक्तता करताच त्यांनी आपला शब्द मोडला.

५१ फारोने आपल्या लोकांना विचारले, "हे इजिप्तचे राज्य माझे नाही
का? त्यातून वाहणाऱ्या नद्या माझ्या नाहीत का? हे सगळे तुम्हाला
दिसत नाही का? ५२ ज्याला आपले बोलणे स्पष्टपणे सांगता येत नाही
अशा तुच्छ माणसापेक्षा मी मोठा नाही का? ५३ ईश्वराने त्याला सोन्याचे
कडे का दिले नाही? त्याच्याबरोबर आपल्या असंख्य दूतांचा ताफा
का पाठवला नाही?" ५४ अशा रीतीने त्याने आपल्या लोकांना मूर्ख
बनवले आणि ते त्याचे आज्ञापालन करू लागले. ते सगळे बंडखोर होते.
५५ त्यांनी आमचा रोष ओढवून घेताच आम्ही त्यांच्यावर सूड उगवला
आणि त्यांच्यापैकी प्रत्येकाला जलसमाधी दिली. ५६ नंतरच्या पिढ्यांसाठी
आम्ही त्यांना उदाहरण बनवले.

५७ मेरीपुत्र येशूचे उदाहरण समोर ठेवताच ते आरडाओरड करू लागले.
५८ याच्यापेक्षा आमचे दैवत चांगले नाहीत का? तुम्हाला आव्हान
देण्यासाठीच ते येशूचे उदाहरण देतात. ते भांडखोर आहेत. ५९ पण
येशू आमचा फक्त सेवक होता. आम्ही त्याच्यावर कृपा केली आणि
इस्राएलच्या संततीसमोर त्याचा आदर्श ठेवला. ६० आमची इच्छा असती
तर तुमच्यानंतर आम्ही देवदूतांना तुमच्या जागी आणले असते. त्यांना
पृथ्वीचे वारसदार बनवले असते. ६१ तो अंतिम घडीचा संकेत आहे.
त्याविषयी शंका घेऊ नका. माझे अनुसरण करा. हा सन्मार्ग आहे.

६२ सैतानाला तुमच्या मार्गातला अडथळा बनू देऊ नका. तो तुमचा उघड शत्रू आहे.

६३ येशू आमचे संकेत घेऊन त्यांच्याकडे गेला आणि म्हणाला, "ज्यावरून तुमच्यात वाद होतात, त्यापैकी काही गोष्टी स्पष्ट करायला मी तुमच्याकडे विवेकपूर्ण (ग्रंथ) घेऊन आलो आहे. तेव्हा माझ्या आज्ञेनुसार वागा आणि ईश्वराला घाबरून रहा. ६४ ईश्वर माझा आणि तुमचाही पालनकर्ता आहे. त्याची उपासना करा. हा सन्मार्ग आहे." ६५ (येशूनंतर) विविध गटांत आपसात मतभेद निर्माण झाले. यानंतर अपराध करणाऱ्यांचा धिक्कार असो. त्यांना वेदनादायी दिवसाची शिक्षा मिळेल.

६६ बेसावधपणे, अचानकपणे येऊन कोसळणाऱ्या दिवसाचीच ते वाट पहात आहेत का? ६७ त्या दिवशी सदाचाराने वागणारे सोडले तर उरलेल्यांपैकी एकमेकांचे मित्र असणारे शत्रु बनतील. ६८ पण हे माझ्या सेवकांनो! तुम्ही या दिवसाला घाबरायचे कारण नाही की कसला शोक करायचे कारण नाही. ६९ ज्यांनी आमच्या साक्षात्कारांवर विश्वास ठेवला आणि आमच्यासमोर शरणागती पत्करली. ७० त्यांनी त्यांच्या सहचारिणींसह आनंदाने स्वर्गात प्रवेश करावा. ७१ तिथे सोन्याची ताटे आणि प्याले, त्यांना जे हवे असेल त्यासह फिरविले जातील आणि ज्याने त्यांचे डोळे सुखावतील. (श्रद्धावंतांनो!) "या (सुखवनात) तुम्ही कायम वास्तव्य कराल. ७२ तुमच्या भूतकाळातील कृत्यांच्या आधारे तुम्हाला या स्वर्गात प्रवेश मिळेल. ७३ तिथे तुम्हाला खाण्यासाठी मुबलक फळे असतील."

७४ अपकृत्ये करणारे मात्र कायम नरकाग्नीच्या त्रासात राहतील. ७५ निराश अवस्थेत त्यांना तिथेच रहावे लागेल. त्यातून त्यांची सुटका

नाही. ७६ त्यांच्यावर अन्याय करणारे आम्ही नव्हतो तर त्यांनीच स्वतः
वर अन्याय ओढवून घेतला होता. ७७ तिथे ते आक्रोश करून देवदूताला
विचारतील, "तुमचा पालनकर्ताच आमचा हा छळ संपवू शकेल." पण
देवदूत म्हणतील, "नाही! तुम्हाला इथेच रहावे लागेल." ७८ आम्ही
निश्चितच सत्य तुमच्यापर्यंत आणले आहे. पण तुमच्यापैकी बहुतेकांना
सत्याविषयी तिटकारा आहे. ७९ त्यांनी काही योजना आखली आहे
का? तसे असेल तर आमचाही निर्णय झालेला आहे. ८० त्यांची खाजगी
खलबते आणि गुप्त बोलणी आम्ही ऐकत नाही असे त्यांना वाटते का?
उलट आमचे दूत त्यांच्याशेजारी थांबून त्यांच्या प्रत्येक गोष्टीची नोंद
ठेवत आहेत.

८१ हे प्रेषिता! त्यांना सांगा, "त्या असीम कृपाळू ईश्वराला एखादा पुत्र
असता तर सगळ्यात आधी मी त्याची उपासना केली असती." ८२ पण
आकाश आणि पृथ्वीचा स्वामी, सिंहासनाचा अधिपती सर्वोच्च आहे. तो
या वर्णनापेक्षाही खूप उच्च दर्जाचा आहे. ८३ तेव्हा त्यांना ज्या दिवसाचे
वचन दिले आहे तो दिवस येईपर्यंत त्यांना त्यांच्या वायफळ गप्पांमध्ये गुंग
राहू दे. त्यांना त्यांच्या शब्दांच्या खेळातून करमणूक करून घेत राहू दे.

८४ तो आकाश आणि पृथ्वीचा एकमेव ईश्वर आहे. तो सुज्ञ, सर्वज्ञ
आहे. ८५ आकाश, पृथ्वी आणि त्यांच्या दरम्यानच्या सगळ्या गोष्टी यांच्या
साम्राज्याचे सार्वभौमत्व असणारा ईश्वर स्तुत्य आहे. अंतिम घटकेचे ज्ञान
फक्त त्याच्याकडेच आहे आणि तुम्हा सगळ्यांना त्याच्याकडेच परतायचे
आहे.

८६ ईश्वराशिवाय ते ज्यांचा धावा करतात त्यांच्याकडे शिफारस
करण्याचा कोणताही अधिकार नाही. फक्त सत्याची साक्ष ठेवणारेच हे

जाणतात. ८७ तुम्हाला कुणी निर्माण केले असे विचारले तर ते निश्चितच म्हणतील, "ईश्वराने!" तरीही त्यांनी त्याच्याकडे पाठ कशी फिरवली? ८८ प्रेषित ईश्वराला म्हणतो, "हे पालनकर्त्या! हे लोक सत्यावर विश्वास ठेवत नाहीत." ८९ प्रेषिता! याही परिस्थितीत संयमाने रहा आणि त्यांना म्हणा, "तुम्हाला शांती लाभो!" लवकरच त्यांना सत्याची जाणीव होईल.

प्रकरण ४४ : धूर
(अद्-दुखान)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हा मीम. २ सुस्पष्ट अशा ग्रंथाची शपथ! ३ एका शुभ रात्री आम्ही हा ग्रंथ प्रकट केलाय. आम्ही नेहमी सावध करणाऱ्या सूचना पाठवत आलो आहोत. ४ त्या शुभ रात्री प्रत्येक सुज्ञ हुकूम निर्देशित करून सांगितला आहे. ५ आमच्या स्वतःच्या आज्ञेने आम्ही संदेश पाठवत आलो आहोत. ६ ही तुमच्या पालनकर्त्याची कृपा आहे. तो सगळे पाहतो, सगळे ऐकतो. ७ तो आकाशाचा, पृथ्वीचा आणि त्यांच्या दरम्यानच्या प्रत्येक गोष्टीचा अधिपती आहे. तुम्ही खरोखर यावर विश्वास ठेवाल तर किती चांगले! ८ त्याच्याशिवाय अन्य कुणी उपास्य नाही. जीवन आणि मृत्यू हे दोन्हीही देणारा तोच आहे. तो तुमचा तसेच तुमच्या वाडवडिलांचा पालनकर्ता आहे.

९ तरीही ते शंका-कुशंकांचा खेळ करत राहतात. १० तर मग आकाश स्पष्ट दिसणाऱ्या धुराचे ढग आणेल त्या दिवसाची वाट पहा. ११ हे ढग लोकांना वेढून टाकतील. ही त्यांच्यासाठी वेदनादायी शिक्षा असेल. १२ त्या दिवशी ते म्हणतील, "हे पालनकर्त्या! या छळापासून आमची

मुक्तता कर. आम्ही आता खरोखर तुझ्यावर श्रद्धा ठेवली आहे.” १३ या
अगोदरच प्रेषिताने त्यांच्याकडे जाऊन सगळ्या गोष्टी स्पष्ट केल्या असता,
त्यांनी त्यापासून बोध घेतला नाही. या शिक्षेपासून ते काय बोध घेणार?
१४ तेव्हा त्यांनी त्याकडे पाठ फिरवली आणि म्हटले, “हा वेडा आहे,
याला इतरांनी शिकवून पाठवले आहे.” १५ आम्ही थोड्या वेळासाठी जरी
यातनेतून सुटका केली तरी तुम्ही पुन्हा एकदा सत्य नाकारण्याकडे वळाल.
१६ त्या दिवशी सगळ्या पाप्यांवर आम्ही पूर्ण संकट लादू. त्यांना पुरेपूर
मोबदला देऊ.

१७ त्यांच्या आधी आम्ही फारोच्या लोकांना आजमावून पाहिले आहे.
त्यांच्याकडे एक सन्माननीय प्रेषित पाठवण्यात आला होता. १८ प्रेषिताने
फारोला सांगितले होते, “ईश्वराच्या सेवकांना माझ्या हवाली कर. मी
एक विश्वासू प्रेषित आहे. १९ स्वतःला ईश्वरापेक्षा श्रेष्ठ समजू नकोस. मी
सत्याचे स्पष्ट प्रमाण आणले आहे. २० मी माझ्या व तुझ्या पालनकर्त्याच्या
आश्रयाला गेलो आहे. तेव्हा तू मला दगडांच्या तडाख्याने मृत्यू देऊ शकत
नाहीस. २१ माझ्यावर विश्वास नसेल तर किमान माझ्यापासून दूर रहा.”

२२ प्रेषिताने ईश्वराकडे धावा केला, “हे सगळे पापी लोक आहेत.”
२३ ईश्वराने त्याला सांगितले, “माझ्या सेवकांना घेऊन रातोरात इथून निघ.
नक्कीच तुझा पाठलाग केला जाईल.” २४ तुझ्या मागे समुद्र दुभंगला जाईल
आणि या दुष्टांना जलसमाधी मिळेल.” २५ आपल्या मागे त्यांनी किती
बागा आणि कारंजे सोडले, २६ किती मक्याची शेते आणि भव्य इमारती
सोडल्या, २७ त्यांना आनंदित करणाऱ्या सगळ्या गोष्टी ते इथेच सोडून
गेले. २८ त्यांचा अंत असा झाला. त्यांनी जे मागे सोडले त्याचे वारसदार
आम्ही इतरांना नेमले. २९ ना त्यांच्यासाठी आकाशाने वा पृथ्वीने शोक
केला, ना त्यांना कसली उसंत दिली गेली.

३० अपमानास्पद शिक्षेपासून आम्ही इस्राएलच्या संततीचा बचाव
केला. ३१ फारोच्या लोकांकडून त्यांचा छळ होत असे. छळ करताना
त्याने सगळ्या मर्यादा पार केल्या होत्या. ३२ आम्ही जाणूनबुजून त्यांना
इतरांपेक्षा श्रेष्ठ दर्जा दिला, ३३ आणि त्यांना असे संकेत दाखवले ज्यात
त्यांची खरोखर परीक्षा होती.

३४ तरीही सत्य नाकारणारे म्हणतात, ३५ "आमच्या पहिल्या मृत्युच्या
पलीकडे काहीही नाही. आम्हाला पुन्हा जिवंत केले जाणार नाही.
३६ तुम्ही खरे बोलत असाल तर आमच्या पूर्वजांना परत आणून दाखवा."
३७ हे लोक 'तुब्बा' जमातीच्या लोकांपेक्षा आणि त्यांच्या पूर्वी होऊन
गेलेल्या लोकांपेक्षा चांगले आहेत का? कारण ते दुष्कृत्य करणारे पापी
होते. आम्ही त्यांचा सर्वनाश केला.

३८ आम्ही आकाश, पृथ्वी आणि त्याच्या दरम्यानच्या सगळ्या गोष्टी
विनाकारण निर्माण केल्या नाहीत. [अ] ३९ विशिष्ट हेतू असल्याशिवाय आम्ही
त्यांची निर्मिती केली नाही. तरीही पुष्कळ लोकांना हे माहीत नाही.

[अ] जर एखाद्याने संपूर्ण विश्वाच्या व्यवस्थेवर विचार केला तर हे स्पष्ट होईल की त्याची निर्मिती निश्चित उद्देशाने झाली होती. तसे झाले नसते तर या जगात मानवाला गौरवशाली संस्कृती निर्माण करणे अशक्य झाले असते. त्याचे संपूर्ण कार्य अर्थपूर्ण असणे हा एक संकेत आहे की तेदेखील अर्थपूर्ण आणि हेतूपूर्ण मार्गाने समाप्त होईल. त्याचा निरर्थक शेवट होऊ शकतो हे अकल्पनीय आहे. कारण या अर्थपूर्ण सृष्टीचा, अर्थपूर्ण मानवी अस्तित्वाचा अर्थशून्य अंत होणे शक्य नाही. प्रत्यक्षात त्याचा शेवट पुढील जीवनाच्या प्रारंभाची घोषणा करेल. परलोकावरील विश्वास हा सार्वत्रिक अर्थपूर्णतेचा विस्तार आहे. जगाचा सध्याचा टप्पा हा चाचणीचा आहे. म्हणून या जगाच्या सार्थकतेमध्ये प्रत्येकाचा वाटा आहे, परंतु परलोकात जे खरोखर ईश्वराच्या दृष्टीने पात्र आहेत त्यांनाच तेथील जीवनाच्या अर्थपूर्णतेत वाटा मिळेल.

४० खरोखर, निर्णयाचा दिवस ही त्या सगळ्यांसाठी ठरवून दिलेली वेळ
आहे. ४१ त्या दिवशी कुणीही मित्र कुणाच्या उपयोगी पडणार नाही की
कुणी कुणाला मदत करणार नाही. ४२ ईश्वरी कृपेचा लाभ झालेल्यांचीच
फक्त यातून सुटका होईल. निःसंशय, तो सर्वशक्तिमान, दयाळू आहे.

४३ नक्कीच जकुम वृक्षाची काटेरी फळे ४४ हे त्या अपराध्यांचे अन्न
असेल. ४५ उकळत्या तेलासारखे ते त्यांच्या पोटात उकळत राहील.
४६ उकळत्या पाण्यासारखी त्याला उकळी फुटेल, ४७ आणि एक आज्ञा
होईल, "त्यांना पकडून फरफटत नरकाच्या मध्यावर आणा. ४८ नंतर
शिक्षा म्हणून त्यांच्या डोक्यावर उकळते पाणी ओता. ४९ तुम्ही स्वतःला
फार ताकदवान, सन्माननीय समजत होता ना, चाखा त्याची फळे. ५० या
शिक्षेवरच तुम्ही शंका घेत होता ना?"

५१ पण ईश्वराला भिऊन जगणारे सुरक्षित ठिकाणी असतील. ५२ जिवंत
झरे वाहणाऱ्या बगीच्यांमध्ये ते असतील. ५३ रेशमी आणि सोन्याचांदीची
जरतारी वस्त्रे परिधान करून तिथे ते एकमेकांसमोर बसतील. ५४ विशाल,
काळ्याभोर डोळ्यांच्या कुमारिकांबरोबर आम्ही त्यांचे विवाह करून देऊ.
५५ तिथे त्यांच्यासाठी हरत-हेची फळे असतील. त्यांना शांत, सुरक्षित
वातावरण लाभेल. ५६ पहिल्या मृत्युनंतर तिथे त्यांना मृत्यू येणार नाही.
नरकाच्या छळापासून ईश्वर त्यांना सुरक्षित ठेवेल. ५७ त्याची त्यांच्यावर
कृपादृष्टी असेल. हा त्यांचा सर्वोच्च विजय असेल.

५८ लोकांना बोध घेता यावा म्हणून हे कुरआन समजायला सोपे केले
आहे. तुमच्या स्वतःच्या भाषेत मांडले आहे. ५९ तेव्हा प्रतीक्षा करा, तेही
प्रतीक्षा करत आहेत.

प्रकरण ४५ : गुडघे टेकून (अल्-जासिया)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हा मीम २ सर्वशक्तिमान, सुज्ञ अशा ईश्वराकडून अवतीर्ण झालेला
हा ग्रंथ आहे. ३ श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी आकाशात आणि पृथ्वीवर सर्वत्र
त्याचे संकेत आहेत. ४ सच्ची श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी त्यांच्या स्वतःच्या
निर्मितीत आणि सगळीकडे विखुरलेल्या सजीवांच्या निर्मितीत त्याचे संकेत
आहेत. ५ विवेकबुद्धी वापरणाऱ्यांसाठी दिवस-रात्रीच्या पालटण्यात,
ईश्वर आकाशातून पाठवत असलेल्या उपजीविकेच्या साधनांमध्ये, निर्जीव
पृथ्वीला टवटवीत करण्यासाठी तो पाठवत असलेल्या पावसामध्ये,
वाऱ्याच्या वाहण्यामध्येही ईश्वराचे संकेत आहेत. ६ हे ईश्वरी साक्षात्कार
आहेत, जे सत्य स्वरूपात आम्ही कथन करत आहोत. पण ते ईश्वराला
आणि त्याच्या साक्षात्कारांना नाकारत असतील तर कुठल्या संदेशावर
त्यांचा विश्वास बसेल?

७ प्रत्येक लबाड अपराध्याचा धिक्कार असो. ८ तो त्याला ऐकवले
जाणारे ईश्वरी साक्षात्कार ऐकतो, पण जणूकाही न ऐकल्यासारखे दाखवत
पूर्वीसारखाच उन्मत्त वागत राहतो. त्याला वेदनादायक शिक्षेबद्दल सावध
करा. ९ आमचे साक्षात्कार ऐकताच तो त्यांचा उपहास करतो. अशांना
अपमानास्पद शिक्षा भोगावी लागेल. १० ते नरकासमोर उभे असतील.
त्या दिवशी त्यांनी कमावलेले काहीही त्यांच्या कामी येणार नाही की
ईश्वराशिवाय ज्यांना त्यांनी रक्षक मानले आहे ते त्यांचे संरक्षण करणार
नाहीत. त्यांच्यासाठी भयंकर शिक्षा राखून ठेवली जाईल. ११ आमचे

मार्गदर्शन असे आहे. ईश्वराचे साक्षात्कार नाकारणाऱ्यांना त्रासदायक शिक्षेचा सामना करावा लागेल.

१२ त्याच्या आज्ञेने सागरात जहाजप्रवास करता यावा यासाठी त्याने सागराला तुमच्या अधीन केले. यातून तुम्ही त्याच्या कृपेचा लाभ घ्यावा आणि त्याच्याविषयी कृतज्ञता बाळगावी. १३ आकाश आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे त्याने तुमच्या अधीन केले आहे. हे सगळे लाभ त्याच्याकडून मिळाले आहेत. चिंतन करणाऱ्यांसाठी यात त्याचे संकेत आहेत.

१४ श्रद्धावंतांना सांगा, "ईश्वराची भेट होण्याच्या दिवसावर श्रद्धा न ठेवणाऱ्यांकडे दुर्लक्ष करा. त्यांनी जे काही केले आहे त्याचा आम्ही त्यांना पुरेपूर मोबदला देऊ." १५ जो न्यायाने, उचित वागतो त्यात त्याचेच भले आहे. जो अपकृत्ये करतो तो स्वतःचाच विनाश ओढवून घेतो. तुम्हा सगळ्यांना तुमच्या पालनकर्त्याकडे परत जायचे आहे.

१६ इस्त्राएलच्या संततीला आम्ही ग्रंथ, शहाणपण आणि प्रेषित्वपद दिले. आम्ही त्यांना चांगल्या गोष्टी देऊ केल्या. सर्व जगतवासीयांपेक्षा त्यांना प्रतिष्ठेचे पद बहाल केले होते. १७ धर्माच्या बाबतीत आम्ही त्यांना स्पष्ट मुद्दे दिले होते. ज्ञान त्यांच्यापर्यंत पोहोचल्यानंतरच परस्पर वैरामुळे त्यांचे आपसात मतभेद झाले. पुनर्निर्माणाच्या दिवशी ईश्वर त्यांच्यातील मतभेदांचा निवाडा करेल. १८ यानंतर आम्ही तुम्हाला धर्माचा सुस्पष्ट मार्ग आखून दिला. त्याचे अनुसरण करा. ज्यांना कसलेही ज्ञान नाही त्यांच्या इच्छेनुसार वागू नका. १९ ईश्वराविरुद्ध जाऊन ते तुमची काही मदत करणार नाहीत. अपराधी एकमेकांचे मित्र आहेत तर ईश्वर सदाचाऱ्यांचा मित्र आहे. २० या ग्रंथातून मानवजातीसाठी मार्गदर्शन आणि ज्ञान आणले आहे. दृढ श्रद्धा ठेवणाऱ्यांसाठी यात ईश्वरी कृपेचा प्रसाद आहे.

२१ अपकृत्ये करणाऱ्यांना असे वाटते का, की आम्ही त्यांच्याशी
त्यांच्यासारखेच वागू, ज्यांनी श्रद्धा धारण केली आहे आणि जे सत्कृत्ये
करत आहेत? त्यांचा जन्म आणि मृत्यू त्यांच्यासारखाच असेल का?
किती चुकीचा विचार आहे त्यांचा! २२ ईश्वराने एका सच्च्या हेतूने
आकाश आणि पृथ्वी निर्माण केले आहेत. प्रत्येकाला त्याच्या कृत्यानुसार
योग्य मोबदला मिळावा आणि कुणावरही अन्याय होऊ नये हा त्याचा
यामागचा हेतू आहे.

२३ हे प्रेषिता! ज्याने स्वत:च्या वासनेला (व्यर्थ इच्छांना) ईश्वर
मानले आहे तो असा आहे ज्याला त्याच्याकडे ज्ञान असतानाही मार्गभ्रष्ट
होण्यासाठी सोडून दिले आहे, ज्याचे कान आणि मन शिवून बंद केले
आहे, ज्याच्या डोळ्यांवर पडदा ओढला आहे, ज्याला ईश्वराने असे
मार्गभ्रष्ट केले आहे, त्याला कोण सन्मार्गावर आणू शकेल? तुम्ही
यापासून काही बोध घेणार नाही का?

२४ ते म्हणतात, "आमच्या या जगातल्या जीवनापलीकडे काहीही
नाही. आम्ही जगतो आणि विशिष्ट काळानंतर मरतो. काळच आम्हाला
नष्ट करतो." खरे तर त्यांना या गोष्टीचे काहीही ज्ञान नाही. ते आपल्या
अंदाजानुसार बोलत आहेत. २५ जेव्हाही त्यांना आमचे साक्षात्कार ऐकवले
जातात तेव्हा त्यांचा एकच मुद्दा असतो, "तुमचे बोलणे खरे असेल
तर आमच्या पूर्वजांना परत आणून दाखवा." २६ त्यांना सांगा, "ईश्वर
तुम्हाला जीवन देतो, मृत्यू आणतो आणि पुनर्निर्माणाच्या दिवसाकरता
तुम्हा सगळ्यांना एकत्र आणतो. याविषयी काहीही शंका नाही. पण
पुष्कळ लोकांना याचे ज्ञान नाही."

२७ आकाश आणि पृथ्वीचे राज्य ईश्वराच्या मालकीचे आहे. ज्या
दिवशी अंतिम घडी येईल त्या दिवशी असत्याचे अनुसरण करणारे पराभूत

असतील. २८ त्या दिवशी प्रत्येकजण गुडघ्यावर उभा असेल. प्रत्येकाला त्याची कर्मनोंद ऐकवली जाईल आणि सांगितले जाईल, "आज तुम्हाला तुमच्या कृत्याचा मोबदला मिळेल. २९ या नोंदीतून तुमच्याविषयीचे सत्य सांगितले जाईल. तुम्ही कसे वागता त्या सगळ्याची आम्ही नोंद ठेवत असतो."

३० ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कृत्ये करणाऱ्याला त्या दिवशी त्याच्या कृपेने लाभ होईल, तो त्याचा महान विजय असेल. ३१ पण सत्य नाकारणाऱ्यांना त्या दिवशी विचारले जाईल, "माझे साक्षात्कार ऐकवले जात असताना तुम्ही उद्दामपणे वागत राहिला नाहीत का? तुम्ही दुष्कृत्ये करत राहिला नाहीत का?" ३२ "ईश्वराचे वचन खरे ठरणार आहे. अंतिम घटका येणार याविषयी काही शंका नाही." यावर तुम्ही उत्तर दिले नाहीत का, "त्या घटकेचे आम्हाला काही माहीत नाही. हा फक्त एक अंदाज आहे आणि आमची त्याविषयी खात्री पटलेली नाही."

३३ त्यांच्या कुकर्मांचा सैतान त्या दिवशी त्यांच्यासमोर उभा राहील. ज्या शिक्षेची त्यांनी खिल्ली उडवली ती शिक्षा त्यांना वेढून टाकेल. ३४ त्या दिवशी त्यांना सांगितले जाईल, "एके दिवशी ईश्वराला भेटायचे आहे याचा जसा तुम्हाला विसर पडला तसाच आज मला तुमचा विसर पडेल. नरक हेच तुमचे निवासस्थान असेल आणि तिथे कुणीही मदतनीस असणार नाही. ३५ याचे कारण म्हणजे तुम्ही ईश्वरी साक्षात्कारांची खिल्ली उडवलीत आणि ऐहिक जगातल्या जीवनामुळे तुमची फसगत झाली." त्यामुळे त्यांना ना अग्नीतून बाहेर काढले जाईल, ना स्वतःमध्ये सुधारणा करण्याची संधी दिली जाईल.

३६ आकाशाचा अधिपती, पृथ्वीचा अधिपती आणि समस्त विश्वाचा अधिपती असणारा तो ईश्वर स्तुतीचा हक्कदार आहे. ३७ आकाश

आणि पृथ्वीवरील सगळी महानता त्याच्या ठायी एकवटली आहे. तो सर्वशक्तिमान आहे, सुज्ञ आहे.

प्रकरण ४६ : वाळूचे टेकाड (अल्-अहकाफ)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हा मीम २ सर्वशक्तिमान, सुज्ञ अशा ईश्वराकडून हा ग्रंथ अवतीर्ण झाला आहे. ३ आकाश, पृथ्वी आणि त्यांच्या दरम्यानच्या सगळ्या गोष्टींची निर्मिती आम्ही विशिष्ट हेतूने आणि विशिष्ट काळासाठी केली आहे. पण सत्यावर श्रद्धा न ठेवणारे त्यांना दिलेल्या ताकीदीकडे पाठ फिरवतात.

४ त्यांना विचारा, "ईश्वराव्यतिरिक्त ज्यांचा तुम्ही धावा करता त्यांचा कधी विचार केला आहे का? या पृथ्वीवर त्यांनी काय निर्माण केले आहे ते दाखवा किंवा आकाशाच्या निर्मितीत त्यांचा काही वाटा आहे का? तुमचे म्हणणे सत्य असेल तर त्यांच्या पुष्ट्यर्थ या आधी प्रकट झालेला एखादा ग्रंथ दाखवा किंवा प्रचलित ज्ञानाची एखादी चुणूक दाखवा." ५ त्यांच्यापेक्षा अधिक वाट चुकलेले कोण जे ईश्वराशिवाय इतरांचा धावा करतात, जे पुनर्निर्माणाच्या दिवसापर्यंत त्यांना उत्तर देणार नाहीत, किंबहुना ते धावा करतायत याची त्यांना जाणीवच नाही? ६ जेव्हा संपूर्ण मानवजातीला ईश्वरासमोर एकत्र केले जाईल तेव्हा हे त्यांचे शत्रू बनतील आणि त्यांची उपासना नाकारतील.

७ जेव्हा आमचे स्पष्ट साक्षात्कार ऐकवले जातात आणि सत्य त्यांच्यापर्यंत पोहोचवले जाते, तेव्हा ते म्हणतात, "ही वक्तृत्व कौशल्याची

निव्वळ जादू आहे.” [८] प्रेषिताने स्वतःच ईश्वराविषयीच्या खोट्या कथा रचल्या आहेत असे त्यांना म्हणायचे आहे का? हे प्रेषिता! त्यांना सांगा, “मी स्वतःच या कथा रचल्या असतील तर ईश्वरापासून माझा बचाव करण्यासाठी तुम्ही काहीही करू शकणार नाही. तुम्ही बेफामपणे काय बोलता हे तो चांगलेच जाणतो. आपल्यातला साक्षीदार म्हणून तो पुरेसा आहे. तो क्षमाशील, दयाशील आहे.”

[९] त्यांना सांगा, “मी ईश्वराचा पहिलाच प्रेषित नाही. माझे किंवा तुमचे पुढे काय होईल हे मलाही माहीत नाही. माझ्यासमोर प्रकट झालेल्या गोष्टींखेरीज मी कशाचेही अनुसरण करत नाही. मी तर फक्त धोक्याचा इशारा द्यायला आलो आहे.” [१०] त्यांना विचारा, “हे कुरआन खरोखर ईश्वराकडून आले असेल आणि तरीही तुम्ही ते नाकारलेत तर काय होईल याचा विचार केला आहे का?” पूर्वीच्या धर्मग्रंथाशी त्याचा असलेला सारखेपणा इस्राएलच्या वंशजांपैकी एकाने दाखवला आणि त्यावर विश्वास ठेवला, तरीही तुम्ही उन्मत्तपणेच वागणार का? ईश्वर अशा अपराध्यांना निश्चितच मार्गदर्शन करत नाही.

[११] सत्य नाकारणारे श्रद्धावंतांना म्हणतात, “या कुरआनमध्ये काही चांगले असते तर त्यावर इतरांच्याही आधी आम्ही विश्वास ठेवला असता.” त्यातून मिळणाऱ्या मार्गदर्शनाला नाकारल्याने ते म्हणतात, “हा बनाव प्राचीन काळापासून चालत आला आहे.”

[१२] मार्गदर्शन आणि ईश्वराचा कृपाप्रसाद म्हणून याआधी मोझेसचा धर्मग्रंथ प्रकट झाला होता. सध्याचा हा ग्रंथ अरेबिक भाषेत असून त्यातून पूर्वीच्या प्रेषितांनी आणलेल्या ग्रंथाला समर्थन मिळते. अपकृत्ये करणाऱ्यांना यातून धोक्याची सूचना मिळते तर सत्कृत्ये करणाऱ्यांना शुभवर्ता मिळते. [१३] “आमचा पालनकर्ता ईश्वर आहे” असे म्हणून

त्याच्या मार्गावर दृढ निष्ठा ठेवणाऱ्यांना कसली भीती उरत नाही की कसला शोक उरत नाही. १४ स्वर्गाचे निवासी म्हणून राहणारे हेच लोक आहेत. त्यांनी केलेल्या सत्कृत्यांच्या मोबदल्यात त्यांचे तिथे कायम वास्तव्य असेल.

१५ आम्ही माणसाला आई-वडिलांशी प्रेमळपणे वागायला आग्रहाने सांगितले आहे. आई त्याला पोटात वागवते, वेदना सोसून त्याला जन्म देते आणि तीस महिने त्याचे संपूर्ण पालनपोषण करते. अखेरीस परिपक्व वयाचे झाल्यावर आणि वयाची चाळीशी गाठल्यावर जो ईश्वराची प्रार्थना करतो, "हे प्रभू! तुझे माझ्यावर आणि माझ्या दोन्ही पालकांवर अनंत उपकार आहेत. तुझ्याविषयी कृतज्ञता बाळगण्यात आणि तुला आवडतील अशी सत्कृत्ये करण्यात मला मदत कर. माझी मुलेही सदाचारी होवोत. मी तुझ्याकडे वळलो आहे आणि तुला शरण आलो आहे." १६ अशा लोकांच्या सर्वोत्कृष्ट कृत्यांचा आम्ही स्वीकार करतो तर त्यांच्या अपकृत्यांकडे दुर्लक्ष करतो. ते स्वर्ग-निवासी असतील. त्यांना दिलेले हे वचन खरे ठरणार आहे.

१७ पण काहीजण असेही आहेत जे पालकांना म्हणतात, "तुमचा धिक्कार असो. मृत्यूनंतर पुन्हा एकदा कबरीबाहेर काढले जाईल अशी तुम्ही धमकी देता. आमच्या आधी कित्येक पिढ्या होऊन गेल्या आणि त्यापैकी कुणीही पुन्हा जिवंत झालेले नाही." त्यांचे पालक मदतीसाठी ईश्वराची याचना करून म्हणतात, "अरे अभाग्या, विश्वास ठेव! त्याचे वचन खरे ठरणार आहे." पण ते त्यांना दुरुत्तरे करतात, "या सगळ्या जुन्या कथा आहेत." १८ त्यांच्या आधी होऊन गेलेल्या माणसांच्या आणि जिन्नच्या कित्येक पिढ्यांविरुद्ध ईश्वराचा शब्द खरा ठरला होता. हे लोकही त्यांच्यासारखेच आहेत. ते निःसंशय पराभूत झालेले आहेत.

१९ प्रत्येकाला त्याच्या कृत्यानुसार दर्जा दिला जाईल. आम्ही प्रत्येकाला
त्याच्या कृत्याचा पुरेपूर मोबदला देऊ आणि कुणावरही अन्याय करणार
नाही. २० पुनर्निर्माणाच्या दिवशी सत्य नाकारणाऱ्यांना अग्नीसमोर आणले
जाईल आणि सांगितले जाईल, "ऐहिक जीवनात तुम्हाला उत्तमोत्तम
गोष्टी मिळाल्या आणि तुम्ही त्यांचा आनंद लुटला. आज या दिवशी
त्याचा मोबदला म्हणून तुम्हाला अपमानास्पद शिक्षा दिली जाईल. कारण
तुम्ही कुठल्याही न्याय्य कारणाशिवाय या भूमीत उन्मत्तपणे वागलात
आणि ईश्वराच्या आदेशांविरुद्ध बंडखोरी केलीत."

२१ त्यांना आदच्या भावाची (पैगंबर हूद) कथा सांगा. त्याने वाळवंटात
राहणाऱ्या आपल्या लोकांना सावध केले होते. धोक्याचा इशारा देणारे
प्रेषित त्याच्या आधी आणि नंतरही होऊन गेले. प्रत्येकाने त्यांना उपदेश
केला, "फक्त एकमेव ईश्वराची उपासना करा. त्या भयंकर दिवशी
तुम्हाला निश्चितच शिक्षा मिळेल, याची मला भीती वाटते." २२ पण
त्यांनी विचारले, "तुम्ही आम्हाला आमच्या उपास्यांपासून दूर न्यायला
आला आहात का? खरे बोलत असाल तर ज्याची धमकी देताय ती
शिक्षा आमच्यावर आणून दाखवा." २३ यावर त्याने सांगितले, "ती शिक्षा
कधी येईल हे फक्त ईश्वरच जाणतो. जो संदेश माझ्याबरोबर पाठवला
आहे तो मी तुमच्यापर्यंत आणला आहे. पण तुम्ही लोक मला अज्ञानी
वाटताय."

२४ ती शिक्षा जेव्हा त्यांना घनदाट ढगाच्या रूपात त्यांच्या दिशेने
येताना दिसली तेव्हा ते म्हणाले, "हा तर पाण्याने जडावलेला ढग
दिसतोय जो आपल्यासाठी पाऊस आणेल." पण हूदने त्यांना सांगितले,
"मुळीच नाही! ज्याची तुम्ही घाई करत होता, तीच ही शिक्षा आहे.
भयंकर यातना घेऊन आलेले वादळ आहे ते. २५ तुमच्या पालनकर्त्याच्या

अनुमतीने प्रत्येक गोष्ट ते उध्वस्त करेल!" आणि दुसऱ्या दिवशी सकाळी तिथे ओसाड घरांशिवाय काहीही नव्हते. अपराध्यांना आम्ही असाच मोबदला देतो.

२६ आम्ही त्यांना इतके सामर्थ्य दिले होते जितके त्यांच्या नंतरच्या लोकांना दिलेले नाही. आम्ही त्यांना ऐकण्याची, पाहण्याची शक्ती आणि खंबीर अंतःकरण देऊ केले होते. पण यापैकी एकही गोष्ट त्यांच्या कामी आली नाही. ते ईश्वराचे साक्षात्कार नाकारत राहिले आणि जिची खिल्ली उडवत राहिले त्याच शिक्षेने वेढले गेले. २७ तुमच्या आजूबाजूची भरभराटीला आलेली अनेक नगरेही आम्ही नष्ट केली आहेत. त्यांनी सन्मार्गावर परत यावे यासाठी आम्ही त्यांना हरत्‌हेचे संकेत दिले होते. २८ ईश्वराचे सान्निध्य मिळवण्यासाठी त्यांनी ईश्वराव्यतिरिक्त ज्यांचा धावा केला ते त्यांच्या उपयोगी का पडले नाहीत? अजिबात नाही! त्यांनी यांना अक्षरशः पराभूत केले. ते सगळे खोटे होते. त्यांनी स्वतःच रचलेला बनाव होता.

२९ कुरआन ऐकू इच्छिणाऱ्या जिन्नच्या एका समूहाला तुमच्याकडे पाठवले होते, याचे स्मरण करा. कुरआनचे पठण ऐकताना ते एकमेकांना म्हणाले, "शांत रहा आणि लक्षपूर्वक एका." कुरआनचे पठण संपताच आपल्या लोकांना सावध करायला ते त्यांच्याकडे गेले. ३० त्यांनी आपल्या लोकांना सांगितले "आमच्या बांधवांनो! आम्ही एका ग्रंथाचे पठण ऐकले आहे, मोझेसनंतर हा ग्रंथ अवतीर्ण झालेला असून त्यातून पूर्वीच्या ग्रंथातील भाकीतांची पुष्टी झालेली आहे. सन्मार्गाने सत्याकडे नेणारा हा ग्रंथ आहे. ३१ आमच्या बांधवांनो! तुम्हाला ईश्वराकडे बोलवणाऱ्याला प्रतिसाद द्या. त्याच्यावर विश्वास ठेवा. ईश्वर तुम्हाला माफ करेल आणि वेदनादायी शिक्षेपासून तुम्हाला वाचवेल. ३२ पण जो ईश्वराच्या हाकेला

प्रतिसाद देणार नाही तो या पृथ्वीवर ईश्वरापासून वाचू शकणार नाही. ईश्वरापासून कुणीही त्याचे रक्षण करणार नाही. असे लोक उघडपणे वाममार्गाला लागलेले आहेत.''

३३ आकाश आणि पृथ्वीची निर्मिती करणाऱ्या आणि त्यामुळे जराही न थकणाऱ्या ईश्वराकडे मृतांना जिवंत करण्याची ताकद आहे हे त्यांना कळत नाही का? होय! खरोखर सगळ्या गोष्टींवर त्याचीच सत्ता आहे. ३४ सत्य नाकारणाऱ्यांना पुनर्निर्माणाच्या दिवशी अग्नीसमोर आणले जाईल आणि विचारले जाईल, ''हे सत्य नाही का?'' ते म्हणतील, ''पालनकर्त्याची शपथ! हे सत्य आहे!'' यावर ईश्वर त्यांना म्हणेल, ''सत्य नाकारलेत, तेव्हा चाखा आता शिक्षेची चव.''

३५ तुमच्या आधीच्या दृढनिश्चयी प्रेषितांप्रमाणेच तुम्हीही संयमाने रहा. त्यांच्या (अश्रद्धावंतांच्या) बाबतीत काही घाई करू नका. ज्याची भीती वाटत होती ती शिक्षा पुनर्निर्माणाच्या दिवशी समोर पाहताच त्यांना वाटू लागेल, पृथ्वीवर आपण फारच थोडा वेळ राहिलो. हे प्रेषिता! आमचा संदेश त्यांच्यापर्यंत पोहोचवणे एवढीच तुमची जबाबदारी आहे. त्या दिवशी फक्त अवज्ञाकारी लोकांचाच नाश होईल.

प्रकरण ४७ : मोहम्मद
(मुहम्मद)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ सत्य नाकारण्यावर ठाम असणाऱ्यांची आणि इतरांना ईश्वराच्या मार्गापासून परावृत्त करणाऱ्यांची सत्कृत्ये ईश्वर निष्फळ ठरवेल. २ तर जे सत्यावर श्रद्धा ठेवून सत्कृत्ये करतात आणि मोहम्मदावर जे अवतीर्ण

झाले आहे त्यावर श्रद्धा ठेवतात, त्यांची पापे ईश्वर दूर करतो. त्यांच्या स्थितीत सुधारणा करतो. मोहम्मदावर जे अवतीर्ण झाले आहे ते त्यांच्या अधिपतीकडून आलेले सत्य आहे. ३ याचे कारण म्हणजे अश्रद्धावंत असत्याचे अनुसरण करतात तर श्रद्धा ठेवणारे त्यांच्या पालनकर्त्याकडून आलेल्या सत्याचे अनुसरण करतात. अशा रीतीने ईश्वराने मानवजातीसमोर एक उदाहरण घालून ठेवले आहे.

४ युद्धात सत्य नाकारणाऱ्यांची गाठ पडल्यास त्यांच्या माना कापून टाका. एकदा ते पूर्ण पराभूत झाले की त्यांना युद्धकैदी बनवा आणि युद्ध संपूर्ण संपल्यानंतर एकतर दया दाखवून त्यांना मुक्त करा किंवा त्यांच्याकडून युद्धदंड वसूल करून सोडून द्या. त्यांच्याशी तुम्ही असे वागा. ईश्वराच्या मनात आले असते तर त्याने नक्कीच त्यांना शिक्षा केली असती. पण काहींच्याद्वारे इतरांची परीक्षा घेतली जावी हा त्याचा हेतू होता. ईश्वरी कार्यात मारले गेलेल्यांची सत्कृत्ये तो वाया जाऊ देणार नाही. ५ तो त्यांना मार्गदर्शन देईल आणि त्यांच्या स्थितीत सुधारणा घडवेल. ६ तो त्यांना स्वर्गीय बगीच्यात प्रवेश देईल. याची ओळख ईश्वराने त्यांना अगोदरच करून दिलेली आहे.

७ श्रद्धावंतांनो! ईश्वराची (त्याच्या कार्यात) मदत कराल तर ईश्वर तुमची मदत करेल आणि तुमची पावले भक्कम करेल. ८ पण सत्य नाकारण्यावर ठाम असणाऱ्यांच्या नशिबी विनाश असेल. ईश्वर त्यांची कृत्ये निष्फळ ठरवेल. ९ याचे कारण म्हणजे ईश्वराने जे प्रकट केले आहे त्याला त्यांचा विरोध आहे. म्हणूनच त्याने त्यांची कृत्ये निष्फळ ठरवली आहेत. १० पृथ्वीवर संचार करून त्यांनी पाहिले नाही का, त्यांच्या आधी होऊन गेलेल्यांचा कसा शेवट झाला ते? ईश्वराने त्यांचा संपूर्ण विनाश केला. सत्य नाकारणाऱ्यांची अशीच दुर्दशा अटळ आहे. ११ कारण ईश्वर श्रद्धावंतांचा रक्षक आहे तर सत्य नाकारणाऱ्यांचा कुणीही रक्षक नाही.

१२ ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना ईश्वर अशा बगीच्यात
प्रवेश देईल जिथे नद्या वाहत असतील. सत्य नाकारणाऱ्यांनी या जगातला
आनंद जरूर उपभोगावा. येथे जनावराप्रमाणे चरावे, पण नरकाग्नी हेच
त्यांचे अंतिम निवासस्थान असेल. १३ तुम्हाला ज्या नगरामधून हुसकावून
लावले त्यापेक्षा कितीतरी शक्तिशाली असणारी कित्येक नगरे आम्ही
उध्वस्त केली. त्यांना तिथे मदत करणारा कुणीही नव्हता.

१४ आपल्या ईश्वराकडून आलेल्या सुस्पष्ट पुराव्यानुसार ईश्वरावर
श्रद्धा ठेवणाऱ्यांची तुलना त्यांच्याशी कशी होऊ शकेल, जे आपल्या
इच्छेनुसार वागतात आणि ज्यांची अपकृत्ये त्यांना चांगली असल्याचे
भासवले जाते. १५ सदाचाराने वागणाऱ्यांना ज्याचे वचन दिले गेले तो
बगीचा असा असेल: तिथे पाण्याच्या नद्या असतील ज्यांचे पाणी कायम
शुद्ध राहील. तिथे दुधाच्या नद्या असतील, ज्यांचा स्वाद कधीही बदलणार
नाही. तिथे मद्याच्या नद्या असतील ज्या पेय पिणाऱ्यांना आनंदी करतील
आणि तिथे शुद्ध व ताज्या मधाच्या नद्या असतील. तिथे त्यांना हरतऱ्हेची
फळे मिळतील. त्यांच्या प्रभूकडून त्यांना क्षमेचा लाभ होईल. असा
आनंद उपभोगणारे लोक त्यांच्यासारखे कसे असतील ज्यांचे निवासस्थान
नरकाग्नी हे असेल आणि ज्यांना आतडी फाडून टाकणारे उकळते पाणी
पिण्यासाठी दिले जाईल.

१६ त्यांच्यामध्ये अश्यांचा समावेश होतो जे तुमचे बोलणे लक्षपूर्वक
ऐकल्यासारखे करतात. पण तिथून निघून जाताच ज्ञानी (ग्रंथधारक)
लोकांना विचारतात, "हे आता काय सांगत होते?" अशा लोकांची अंतः
करणे ईश्वराने मोहोरबंद केली आहेत. त्यामुळे ते स्वतःच्याच मतानुसार
वागतात. १७ पण जे त्याच्या मार्गदर्शनानुसार वागतात त्यांना तो स्वर्गात
प्रवेश देतो आणि सन्मार्ग दाखवतो.

१८ अंतिम घटका लवकरात लवकर येण्याची ते वाट पहात आहेत
का? त्याची चिन्हे तर प्रकट झालेलीच आहेत. पण ती अंतिम घटका
प्रत्यक्षात उभी राहिल्यावर या उपदेशाचा त्यांना काय उपयोग? १९ लक्षात
ठेवा! एकमेव ईश्वराशिवाय कुणीही उपास्ये नाही. आपल्या अपराधांसाठी
आणि श्रद्धावंत स्त्री-पुरुषांसाठी त्याची क्षमायाचना करा. तुम्ही कुठे
फिरता आणि कुठे मुक्काम करता हे दोन्ही ईश्वर जाणतो.

२० श्रद्धावंत विचारतात, "युद्धासंबंधीचा एखादा अध्याय ईश्वराने का
पाठवला नाही?" पण जेव्हा युद्धाचा उल्लेख करणारा निर्णायक अध्याय
पाठवला जातो तेव्हा हे प्रेषिता! तुम्ही पहाल, ज्यांच्या मनात विकृती
आहे ते तुमच्याकडे मृत्यूच्या सावलीत उभे असल्यासारखे पाहू लागतील.
त्यांचा धिक्कार असो. २१ आज्ञापालन आणि न्यायोचित बोलणे हेच
त्यांच्यासाठी चांगले होते. एकदा निर्णय झाल्यानंतर ईश्वराशी प्रामाणिक
राहण्यात त्यांचे भले होते. २२ त्यानंतर त्यापासून दूर गेल्यास ते पृथ्वीवर
अत्याचार माजवण्याची आणि सगळे नातेसंबंध तोडून टाकण्याची शक्यता
आहे. २३ हे असे लोक आहेत ज्यांना ईश्वराने नाकारले आहे. त्यांना
कानांनी बहिरे आणि डोळ्यांनी आंधळे केले आहे.

२४ तरीही ते कुरआनवर चिंतन करणार नाहीत? की त्यांची मने
कुलूपबंद केली आहेत? २५ मार्गदर्शन मिळाल्यानंतरही त्याकडे पाठ
फिरवणाऱ्यांना नक्कीच सैतानाने खोटी आशा दाखवली आहे आणि
त्यांची कृत्ये चांगली असल्याचे भासवले आहे. ईश्वरानेही त्यांना थोडी
उसंत दिली आहे. २६ कारण ईश्वराने प्रकट केलेल्या सत्याचा तिरस्कार
करणाऱ्यांना हे म्हणतात, "काही बाबतीत आम्ही तुमचे अनुसरण करू."
ईश्वराला त्यांची गुपिते ठाऊक आहेत. २७ मृत्युदूत जेव्हा चेहऱ्यावर आणि
पाठीवर फटके मारून त्यांचे प्राण काढून घेतील तेव्हा त्यांची अवस्था

कशी असेल! २८ कारण त्यांनी ईश्वराचा क्रोध ओढवून घेणाऱ्या मार्गाचा
अवलंब केला तर ईश्वराला प्रिय असलेल्या मार्गाचा त्यांनी तिरस्कार
केला. म्हणूनच त्याने त्यांची कृत्ये निष्फळ ठरवली.
२९ आपल्या मनात विकृती जोपासणारे कल्पना करतात का, की ईश्वर
त्यांचा दोष उजेडात आणणार नाही? ३० आमच्या मनात आले असते
तर आत्ताच्या आत्ता त्यांचे पितळ तुमच्यासमोर उघडे केले असते आणि
त्यांच्या लक्षणावरूनच तुम्ही त्यांना ओळखले असते. (तरीही) त्यांच्या
बोलण्यावरून तुम्ही त्यांना नक्कीच ओळखाल. तुम्ही जे करता ते सगळे
ईश्वर जाणतो.
३१ आम्ही निःसंशय तुम्हाला तोपर्यंत आजमावू जोपर्यंत तुमच्यापैकी
ईश्वरी कार्यात खडतर परिश्रम घेणाऱ्यांचा आणि संयम बाळगणाऱ्यांचा
शोध लागत नाही. आम्ही तुमच्या प्रत्येक हालचालीची पारख करू.
३२ जे सत्य नाकारण्यावर ठाम आहेत, इतरांना ईश्वरी मार्गावर जाण्यापासून
रोखतात आणि जे ईश्वरी मार्गदर्शन करणाऱ्या प्रेषिताला विरोध करतात,
ते ईश्वराचे किंचितही नुकसान करू शकत नाहीत. तो त्यांचे सगळे कर्म
निष्फळ ठरवेल.
३३ श्रद्धावंतांनो! ईश्वराच्या आणि प्रेषिताच्या आज्ञेचे पालन करा
आणि तुमची कर्मे वाया जाऊ देऊ नका. ३४ जे सत्य नाकारतात, इतरांना
ईश्वरी मार्गापासून परावृत्त करतात आणि सत्य नाकारणारे म्हणून मृत्यू
पावतात, त्यांना निःसंशय ईश्वरी क्षमेचा लाभ होणार नाही. ३५ तेव्हा
खचून जाऊ नका आणि समेट घडवून आणण्यासाठी त्यांच्यासमोर विनंती
करू नका. तुम्हालाच वर्चस्व मिळेल. ईश्वर तुमच्या सोबत आहे. तो
तुमच्या योजना निष्फळ होऊ देणार नाही.
३६ ऐहिक जगातले आयुष्य हा फक्त एक खेळ आहे, मनोरंजन आहे.

पण तुम्ही ईश्वरावर श्रद्धा ठेवलीत आणि सदैव त्याचे स्मरण केले तर तो तुम्हाला पुरेपूर मोबदला देईल. तो तुमच्याकडून कधीही संपत्तीची मागणी करणार नाही. ३७ जर यदाकदाचित त्याने तुमच्या संपत्तीची मागणी केलीच, तसा आग्रह धरलाच आणि तुम्ही कंजूषपणा दाखवलात तर त्यातून तुमची मनोविकृती दिसून येईल. ३८ लक्षात घ्या! तुम्हाला ईश्वरी कार्यासाठी खर्च करायला सांगितले जाते. पण तुमच्यापैकी काहीजण कंजूषपणा करतात. असा कंजूषणा करणारा स्वतःचेच नुकसान करून घेत असतो. खरोखर, ईश्वर स्वयंपूर्ण आहे तर तुम्हाला त्याची गरज आहे. त्याच्याकडे पाठ फिरवलात तर तो तुमच्या जागी अशा लोकांना आणेल जे तुमच्यासारखे नसतील.

प्रकरण ४८ : विजय
(अल्-फत्ह)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ खरोखर, आम्ही तुम्हाला सुस्पष्ट विजय मिळवून दिला आहे. २ त्यामुळे ईश्वर तुमच्या भूतकाळातील व भविष्यातील पापांना क्षमा करेल आणि तुमच्यावर परिपूर्ण कृपा करेल. तो तुम्हाला सरळ मार्गावर नेईल. ३ तो तुम्हाला भरघोस मदत देऊ करेल.

४ श्रद्धावंतांच्या श्रद्धेत आणखी भर पडावी म्हणून त्याने त्यांना मनःशांती देऊ केली. आकाशातल्या आणि पृथ्वीवरच्या सगळ्या फौजा त्याच्याच मालकीच्या आहेत. तो सर्वज्ञ आणि सुज्ञ आहे. ५ श्रद्धावंत स्त्री-पुरुषांना तो अशा स्वर्गात प्रवेश देईल ज्यातून नद्या वाहत असतील. त्यांचे तिथे कायमचे वास्तव्य असेल. तो त्यांची पापे धुऊन काढेल.

ईश्वराच्या नजरेतून खरोखर हा त्यांचा सर्वोच्च विजय आहे. ६ ईश्वराविषयी
वाईट चिंतणाऱ्या दांभिक स्त्री-पुरुषांना आणि अनेकेश्वरवादी स्त्री-
पुरुषांना ईश्वर शिक्षा करेल. ईश्वराचा क्रोध ओढवून घेतल्याने त्यांच्यावर
दुर्दैवाचा फेरा येईल. ईश्वराने त्यांना नाकारले आहे आणि त्यांच्यासाठी
नरक सज्ज ठेवला आहे. हे असले निवासस्थान किती गलिच्छ आहे!
७ आकाश आणि पृथ्वीचे सगळे सैन्यबळ ईश्वराच्या मालकीचे आहे. तो
सर्वशक्तिमान आणि सुज्ञ आहे.

८ आम्ही तुम्हाला साक्षीदार म्हणून आणि सुवार्ता व सावध राहण्याची
सूचना देणारा प्रेषित म्हणून पाठवले आहे. ९ लोकहो! तुम्ही ईश्वरावर
आणि त्याच्या प्रेषितावर विश्वास ठेवा आणि त्याला मदत करा. त्याला
सन्मान द्या आणि सकाळ-संध्याकाळ ईश्वराचे गुणगान करा. १० हे
प्रेषिता! जे तुमच्या हातावर हात ठेवून निष्ठापूर्वक प्रतिज्ञा करत आहेत ते
खरे तर ईश्वराचीच प्रतिज्ञा घेत आहेत. जणूकाही ईश्वराचाच हात त्यांच्या
हातात आहे. त्यामुळे जो घेतलेली शपथ मोडतो तो स्वतःच्याच हाताने
नुकसान ओढवून घेतो. पण जो घेतलेली शपथ दृढतेने पाळतो त्याला
ईश्वराकडून महान मोबदला मिळतो.

११ वाळवंटातील मागे राहणारे अरब तुम्हाला म्हणतात, "आमची
संपत्ती आणि कुटुंबिय यातच आम्ही गुंतून राहिलो. यासाठी ईश्वराकडे
आमची क्षमायाचना करा." वास्तविक जे तोंडाने बोलत आहेत तेच
त्यांच्या मनात आहे असे नाही. त्यांना विचारा, "ईश्वराने तुमचे चांगले
किंवा वाईट करायचे ठरवले तर तुमच्यासाठी त्यात ढवळाढवळ करायची
ताकद कुणाकडे आहे?" खरोखर, तुमची सगळी कृत्ये तो चांगलीच
ओळखून आहे. १२ प्रेषित आणि श्रद्धावंत त्यांच्या कुटुंबियांकडे कधीही
येणार नाहीत असे तुम्हाला वाटले. या शक्यतेमुळे तुम्ही आनंदीत झालात

आणि त्यांच्याविषयी वाईट चिंतू लागलात. यामुळे तुमचा विनाश अटळ आहे. १३ जे सत्य नाकारतात, जे ईश्वरावर व त्याच्या प्रेषितावर विश्वास ठेवत नाहीत त्यांच्यासाठी आम्ही धगधगता अग्नी तयार ठेवला आहे. १४ आकाश आणि पृथ्वीचे साम्राज्य ईश्वराचे आहे. त्याच्या मनाला येईल त्याला तो माफ करतो आणि त्याच्या मनाला येईल त्याला शिक्षा करतो. तो अतिशय क्षमाशील आणि दयाशील आहे.

१५ श्रद्धावंतांनो! जेव्हा तुम्ही युद्धधन जमवण्यासाठी जायला निघता तेव्हा युद्धात मागे राहणारे म्हणतात, "आम्हालाही तुमच्याबरोबर येऊ दे." त्यांना ईश्वराच्या आदेशात बदल करायचा असतो. पण त्यांना सांगा, "तुम्ही आमच्याबरोबर येऊ शकत नाही. ईश्वराचा तसा निर्णय आधीच झाला आहे." यावर ते म्हणतील, "तुम्ही आमचा मत्सर करता." त्यांना किती कमी समज आहे!

१६ वाळवंटातील मागे राहणाऱ्या अरबांना सांगा, "शक्तिशाली लोकांविरुद्ध लढण्यासाठी तुम्हाला बोलावले जाईल. त्यांनी शरणागती पत्करेपर्यंत त्यांच्याशी लढा. तुम्ही आज्ञाधारक असल्याचे सिद्ध झाले तर ईश्वर तुम्हाला चांगला मोबदला देईल. पण पूर्वीसारखेच मागे फिरलात तर तो तुमच्यावर वेदनादायी शिक्षा लादेल. १७ अंध, अशक्त आणि आजारी असलेल्यांना यातून वगळले जाईल. त्यांना कसलाही दोष लागणार नाही." ईश्वराचे आणि त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन करणाऱ्यांना तो अशा बगीच्यात प्रवेश देईल ज्यातून नद्या वाहतात. पण (युद्धातून) मागे फिरणाऱ्याला त्याच्याकडून कठोर शिक्षा मिळेल.

१८ हे प्रेषिता! झाडाखाली थांबून निष्ठा व्यक्त करण्यासाठी श्रद्धावंत शपथ घेत होते. तेव्हा ईश्वर प्रसन्न झाला होता. त्याने त्यांच्या मनातल्या गोष्टी ओळखल्या होत्या. म्हणूनच त्याने त्यांना मनःशांती आणि आगामी

विजयाचा मोबदला दिला. १९ आणखीही संभाव्य लाभ मिळवून दिले. ईश्वर सर्वशक्तिमान आणि सुज्ञ आहे. २० ईश्वराने तुम्हाला भविष्यात अनेक लाभ देण्याचे वचन दिले आहे. त्यापैकी काही लाभ आगाऊ दिले आहेत. आणि तुम्हाला अपाय करणाऱ्यांचे हात रोखून धरले आहेत. त्यातून त्याला श्रद्धावंतांना संकेत दाखवायचा आहे आणि तुम्हाला सन्मार्गाचे मार्गदर्शन करायचे आहे. २१ त्याने दिलेले आणखी काही लाभ असेही आहेत जे तुमच्या आकलनापलीकडचे आहेत. पण त्याने ते तुमच्यासाठी राखून ठेवले आहेत. कारण सगळ्यावर ईश्वराची सत्ता आहे.

२२ सत्य नाकारणारे तुमच्याविरुद्ध लढले असते तर नक्कीच रणभूमीवर पाठ दाखवून पळून गेले असते. त्यावेळेस त्यांना ना कुणी रक्षक मिळाला असता, ना मदतनीस. २३ भूतकाळात ईश्वराचा कायदा असा होता आणि आजही तो बदललेला नाही. २४ मक्केच्या खोऱ्यात त्यांच्यावर विजय मिळवून दिल्यानंतर त्यानेच त्यांच्यापासून तुमचे आणि तुमच्यापासून त्यांचे हात रोखून धरले. तुमच्या सगळ्या कृत्यांवर ईश्वराचे लक्ष आहे.

२५ हे तेच लोक आहेत जे सत्य नाकारण्यावर ठाम होते. ज्यांनी तुम्हाला पवित्र मशिदीपासून रोखले आणि ज्यांनी तुमच्या बळीला बलिदान स्थळापर्यंत जाऊ दिले नाही. मक्केतील अनेक श्रद्धावंत पुरुष व स्त्रिया अनवधानाने तुमच्याद्वारे चिरडले जाण्याची शक्यता होती आणि अजाणतेपणे हा अपराध तुमच्या हातून घडल्याचा दोष तुमच्यावर आला असता. (असे नसते तर तुम्हाला त्यांच्याशी लढण्याची परवानगी देण्यात आली असती, पण त्याने असे यासाठी केले नाही) कारण ईश्वर ज्याला इच्छिल त्यास आपल्या कृपाछत्रात (म्हणजेच इस्लाम धर्मात) दाखल करून घेईल. जर ते (श्रद्धावंत व संभाव्य श्रद्धावंत लोक श्रद्धाहीनांपासून) वेगळे झालेले असते तर आम्ही सत्य नाकारण्यावर ठाम असलेल्या लोकांना कठोर शिक्षा केली असती.

२६ सत्य नाकारणाऱ्यांनी (मनातल्या मनात) हा मुद्दा प्रतिष्ठेचा केला होता. अज्ञानकाळात त्यांनी प्रतिष्ठेचे असे प्रदर्शन केले होते. अशा वेळेस ईश्वराने आपल्या प्रेषितावर व श्रद्धावंतांवर मनःशांती अवतीर्ण केली आणि त्यांच्या ठायी सदाचाराचे तत्त्व स्थापित केले. कारण ते यासाठी अधिक पात्र, अधिक योग्य होते. ईश्वराकडे सगळ्या गोष्टींचे संपूर्ण ज्ञान आहे.

२७ ईश्वराने प्रेषिताला सच्ची दृष्टी दिली होती ज्यात त्याने म्हटले होते, "ईश्वरी इच्छेने तुम्ही नक्कीच निर्भय अवस्थेत, सुरक्षितपणे पवित्र मशिदीत (काबागृहात) प्रवेश कराल. त्यावेळी तुमचे पूर्ण मुंडन केलेले असेल किंवा केस अगदी बारीक ठेवलेले असतील." तुम्हाला जे माहीत नाही, ते ईश्वराला माहीत आहे. त्याने या अगोदरच तुम्हाला एक विजय दिला आहे.

२८ मार्गदर्शनासह आणि खऱ्या धर्मासह आपल्या प्रेषिताला पाठवणारा ईश्वर आहे. प्रेषिताने हा धर्म इतर धर्मांपेक्षा प्रबळ करावा हा ईश्वराचा हेतू होता. याचा साक्षीदार म्हणून ईश्वर पुरेसा आहे.

२९ मोहम्मद ईश्वराचा प्रेषित आहे. त्याच्याबरोबर असणाऱ्यांची श्रद्धा दृढ असते. एकमेकांविषयी त्यांच्या मनात करुणा असते तर सत्य नाकारणाऱ्यांच्या बहकाव्यात न येता, त्यांच्याविरुद्ध ते खंबीर भूमिका घेतात. तुम्हाला ते ईश्वरी कृपा व सदिच्छा मिळवण्यासाठी त्याच्यासमोर नतमस्तक झालेले, त्याला समर्पित झालेले दिसतील. सतत नतमस्तक झाल्यामुळे त्यांच्या कपाळावर त्याच्या खुणा जाणवतात. तोराह आणि बायबल या ग्रंथांमधून त्यांचे वर्णन एका बीजासारखे केले आहे. जमिनीत पेरलेले बीज अंकुरते, या अंकुरांची ताकद वाढून ते झाड होत जाते आणि एके दिवशी आपल्या खोडावर ताठ उभे राहते. पेरणाऱ्याला आनंदित

करून टाकते. (अशा प्रकारे ईश्वर श्रद्धावंतांना दिवसेंदिवस उन्नती प्रदान करीत असतो) आणि त्यांना पाहून सत्य नाकारणाऱ्या अश्रद्धावंतांचा जळफळाट होतो. त्यांच्यापैकी जे श्रद्धा ठेवतील आणि सत्कर्मे करतील त्यांना त्याने क्षमाशीलता आणि महान मोबदला देण्याचे वचन दिले आहे.

प्रकरण ४९ : निवासस्थान (अल्-हुजुरात)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ श्रद्धावंतांनो! ईश्वराच्या आणि त्याच्या प्रेषिताच्या उपस्थितीत (त्यांचे आदेश झुगारून) स्वतःचे मत पुढे करत जाऊ नका. ईश्वराला घाबरून रहा. तो सगळे ऐकतो आणि सगळे पाहतो.

२ श्रद्धावंतांनो! प्रेषिताच्या आवाजापेक्षा तुमचा आवाज वाढवू नका. तुम्ही एकमेकांशी जसे चढ्या आवाजात बोलता तसे त्याच्यासमोर करू नका. अन्यथा तुमच्याही नकळत तुमची कृत्ये निष्फळ ठरतील. ३ ईश्वराच्या प्रेषितासमोर हलक्या आवाजात बोलणाऱ्यांची मने ईश्वराने आजमावली आहेत. तो त्यांना दया दाखवेल, क्षमा करेल आणि महान मोबदला देऊ करेल. ४ तुमच्या निवासस्थानाच्या बाहेरून मोठमोठ्याने हाका मारणाऱ्यांकडे समजुतीचा अभाव आहे. ५ तुम्ही बाहेर येऊन भेटेपर्यंत ते शांत राहिले असते तर त्यात त्यांचे भले होते. पण ईश्वर क्षमाशील आणि दयाळू आहे.

६ श्रद्धावंतांनो! एखाद्या लबाडाने तुमच्याकडे एखादी बातमी आणली तर त्यावर विश्वास ठेवण्यापूर्वी तिच्या सत्यतेचा पडताळा घ्या. नाहीतर अनवधानाने तुमच्याकडून एखाद्याचे नुकसान होईल. आणि तुम्हाला

आपल्या कृत्याचा पश्चाताप होईल. ७ ईश्वराचा प्रेषित तुमच्यात आहे
हे लक्षात ठेवा. त्याने तुमच्या अनेक गोष्टी ऐकल्या असत्या तर तुम्ही
संकटात पडला असता. पण ईश्वराने तुमच्या मनात श्रद्धा भरली असून
त्याने तुमचे अंतःकरण सुंदर बनले आहे. त्यानेच तुमच्या मनात सत्याचा
अस्वीकार, दुष्टपणा आणि अवज्ञा यांच्याविषयी तिटकारा निर्माण
केला आहे. अशा लोकांना योग्य मार्गदर्शन लाभले आहे. ८ ईश्वराच्या
औदर्यामुळे आणि कृपेमुळे त्यांना हे लाभ झाले आहेत. तो सर्वज्ञ आणि
सुज्ञ आहे.

९ श्रद्धावंतांचे दोन गट आपसात लढू लागले तर त्यांच्यात समेट
घडवून आणा. त्यानंतरही एका गटाने अन्याय केला तर तो गट ईश्वरी
आज्ञेपुढे नतमस्तक होईपर्यंत त्याच्याविरुद्ध लढा द्या. त्यानंतर तो गट
ईश्वरी मार्गाकडे वळला तर समानतेने वागवून दोन्ही गटांमध्ये समेट
घडवून आणा आणि न्यायाने वागा. खरोखर, ईश्वर न्यायप्रिय आहे.
१० निःसंशय, सगळे श्रद्धावंत बांधव आहेत. तेव्हा तुमच्या बांधवांमध्ये
समेट घडवून आणा आणि ईश्वराला घाबरून रहा. म्हणजे तुमच्यावर
त्याची कृपादृष्टी वळेल.

११ श्रद्धावंतांनो! एकमेकांची खिल्ली उडवू नका. असे न करणारे इतरांपेक्षा
चांगले आहेत. स्त्रियांनी इतर स्त्रियांना हसू नये. असे न करणाऱ्या स्त्रिया
इतरांपेक्षा चांगल्या आहेत. एकमेकांना नावे ठेवू नका, लागट बोलू नका
की अवमानकारक टोपणनावे देऊ नका. श्रद्धेचा अंगीकार केल्यानंतर
अशी अपकीर्ति कमावणे किती वाईट! ज्यांना याचा पश्चाताप होत नाही
ते अपराधीच आहेत.

१२ श्रद्धावंतांनो! एकमेकांवर संशय घेऊ नका. काही वेळा संशय घेणे
हा गुन्हा ठरतो. एकमेकांवर हेरगिरी करू नका की एकमेकांना पाठीमागे

नावे ठेवू नका. तुमच्यापैकी कुणाला आपल्या मृत भावाचे मांस खायला आवडेल का? नाही! तुम्हाला नक्कीच याचा भयंकर तिटकारा वाटेल. तेव्हा ईश्वराला भिऊन रहा. ईश्वर अतिशय क्षमाशील आणि दयाशील आहे.

१३ हे माणसा! स्त्री-पुरुषांच्या जोडीपासून आम्ही तुम्हाला निर्माण केले. तुम्ही एकमेकांना जाणावे म्हणून तुमच्या जमाती आणि समाज बनवले. ईश्वराच्या नजरेत तो सर्वाधिक सन्माननीय आहे, जो ईश्वराला सर्वाधिक घाबरून राहतो. ईश्वर सर्वज्ञ आणि सर्व जाणणारा आहे.

१४ वाळवंटातील अरब म्हणतात, "आमचा विश्वास बसला आहे." त्यांना सांगा, "तुम्ही अजूनही विश्वास ठेवलेला नाही." त्याऐवजी तुम्ही म्हणायला हवे, "आम्ही समर्पित झालो आहोत." कारण श्रद्धेने अजूनही तुमच्या मनात प्रवेश केलेला नाही. पण तुम्ही ईश्वराचे आणि त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन कराल तर तो तुमची कृत्ये निष्फळ जाऊ देणार नाही. तो अतिशय क्षमाशील आणि कृपाळू आहे. १५ श्रद्धावंत तेच आहेत जे ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितावर विश्वास ठेवतात. ईश्वरावर शंका न घेता त्याच्या कार्यात तन-मन-धन (सर्वस्व) पणाला लावून प्रयत्न करतात. सत्यवचनी लोक असेच असतात.

१६ त्यांना विचारा, "आकाशातील आणि पृथ्वीवरची प्रत्येक गोष्ट ईश्वराला माहीत असताना तुम्ही त्याला तुमचा धर्म शिकवू पाहता की काय? त्याच्याकडे सगळ्या गोष्टीचे ज्ञान आहे." १७ त्यांनी मुस्लिम बनून तुमच्यावर उपकार केले आहे असे त्यांना वाटते. त्यांना सांगा, "इस्लामचा स्वीकार हा माझ्यावर केलेला उपकार आहे असे मानू नका. तसे अजिबात नाही! सच्च्या श्रद्धेकडे येण्यासाठी तुम्हाला मार्गदर्शन

करून तुमच्यावर उपकार करणारा तो ईश्वर आहे. सत्यप्रिय असाल तर या वास्तवाचा स्वीकार करा." [१८] आकाशातल्या आणि पृथ्वीवरच्या अदृश्य गोष्टी ईश्वर जाणतो. तो तुमची सगळी कृत्ये पाहतो.

प्रकरण ५० : काफ.
(काफ.)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] काफ. महान कुरआनची शपथ! [२] त्यांच्यातल्याच एकाने त्यांना सावध करण्यासाठी यावे याने ते चकित झाले आहेत. त्यामुळे हे सत्य नाकारणारे म्हणतात, "हे फारच चमत्कारिक आहे." [३] आमचा मृत्यू झाल्यानंतर आणि देह धुळीस मिळाल्यानंतर आम्हाला परत जिवंत केले जाईल? हे अगदी अशक्य आहे. [४] या धरतीने त्यांच्याकडून काय काय हिरावून घेतले आहे ते आम्ही जाणतो. या सगळ्याची नोंद ठेवणारी एक नोंदवही आम्ही बाळगतो. [५] पण सत्य त्यांच्याकडे आल्यावर ते स्वीकारायला त्यांनी नकार दिला. त्यामुळे ते गोंधळून गेले आहेत.

[६] आपल्या डोक्यावरचे आभाळ पाहून आम्ही त्याची बांधणी कशी केली आहे, त्याचे सुशोभीकरण कसे केले आहे, त्यात कुठलाही दोष कसा राहिलेला नाही हे त्यांच्या लक्षात येत नाही का? [७] आम्ही या पृथ्वीचा विस्तार केला, तिच्यावर भक्कम पर्वत रोवले आणि त्यांच्यावर हरतऱ्हेची शोभादायी वनराई उगवली. [८] ईश्वराकडे वळणाऱ्या प्रत्येकासाठी यात एक धडा आणि ईश्वराचे स्मरणपत्र आहे. [९] आम्ही आकाशातून जलकृपेची बरसात केली आणि धरतीवर बगीचे व अन्नधान्य उत्पन्न केले. [१०] उंच खजूर वृक्षांना खजुराचे

घोस लटकावून दिले. [११] ही मानवजातीसाठी केलेली तरतूद आहे. मृत धरतीला आम्ही पुन्हा असे सचेतन करतो. तुमचे पुनर्निर्माणही असेच असेल.

[१२] त्यांच्या आधी नोहाच्या लोकांनी आणि रासवासीयांनी सत्य नाकारले. समूदच्या लोकांनीही तेच केले. [१३] आदच्या, फिरऔनच्या जमातीने आणि लूतच्या बांधवांनीही सत्याला नकार दिला. [१४] वनात राहणारे (अयकावाले) आणि तुब्बाच्या जमातीनेही असेच केले. यापैकी प्रत्येक समाजाने त्यांच्या प्रेषितांना नाकारले आणि म्हणून (शेवटी) माझ्या ज्या शिक्षेपासून त्यांना सावध करण्यात आले होते, ती शिक्षा त्यांच्यावर चालून आली. [१५] आमच्या पहिल्या निर्मितीमुळे आम्ही थकून गेलो होतो का? अजिबात नाही! तरीही दुसऱ्या निर्मितीविषयी त्यांच्या मनात शंका आहे.

[१६] आम्ही माणसाला निर्माण केले. त्याच्या मनाला ज्या ज्या विचारांचा स्पर्श होतो, ते सर्व आम्ही जाणतो. आम्ही त्याच्या मुख्य शिरेपेक्षाही त्याच्या जास्त जवळ आहोत. [१७] नोंदणी करणारे दोन दूत प्रत्येकाच्या डाव्या व उजव्या बाजूला थांबून नोंद करत आहेत. [१८] त्यांच्या तोंडून उच्चारला जाणारा प्रत्येक शब्द आमचे दक्ष रखवालदार नोंदवून ठेवत आहेत.

[१९] सत्य प्रकट करणारी मृत्यूची बेशुद्धी येईल; याचपासून सुटण्यासाठी तुमची धडपड होती. [२०] बिगुल वाजवला जाईल. तुम्हाला ज्या दिवसापासून सावध केले जात होते तोच हा दिवस आहे. [२१] त्या दिवशी प्रत्येक व्यक्तीबरोबर दोन दूत असतील. एक दूत त्याला ईश्वरासमोर घेऊन येईल तर दुसरा त्याचा साक्षीदार असेल. [२२] याविषयी तुम्ही बेसावध होता. तुमच्या डोळ्यांवरचा पडदा आज आम्ही दूर केला आहे. तुमची

नजर अगदी तीक्ष्ण बनली आहे. २३ त्यांच्याबरोबर असणारा दूत म्हणील,
"यांच्याविषयीची माझी नोंद तयार आहे." २४ ईश्वर आज्ञा देईल,
"प्रत्येक कृतघ्न, बंडखोर माणसाला नरकात लोटून द्या. २५ सत्याच्या
मार्गात अडथळा आणणाऱ्याला, नियमांचे उल्लंघन करणाऱ्याला, इतरांच्या
मनात शंका उत्पन्न करणाऱ्याला, २६ ईश्वराव्यतिरिक्त इतरांची उपासना
करणाऱ्याला कठोर शिक्षेत लोटून द्या." २७ त्यांचा सोबती असलेला
सैतान म्हणेल, "हे प्रभू! मी यांना बंडखोर बनवले नाही तर ते स्वतःच
वाममार्गाला लागले होते." २८ यावर ईश्वर सांगेल, "माझ्यासमोर भांडू
नका. मी या आधीच तुम्हाला धोक्याचा इशारा दिला होता. २९ माझा
आदेश (शब्द) कधीही बदलणार नाही की मी माझ्या सेवकांवर कधी
अन्याय करणार नाही."

३० त्या दिवशी आम्ही नरकाला विचारू, "तू भरून गेला आहेस
का?" तो म्हणेल, "नाही! आणखी कुणी आहेत का?" ३१ त्या दिवशी
स्वर्ग सदाचारी लोकांच्या अगदी जवळ आणला जाईल. त्यांच्यापासून
फार लांब नसेल. ३२ तुम्हाला ज्याचे वचन दिले होते ते हेच आहे; नेहमी
ईश्वराकडे वळणाऱ्या आणि त्याची सदैव आठवण ठेवणाऱ्या प्रत्येकासाठी
हे आहे. ३३ जो अदृश्य आहे, कृपेचा सागर आहे त्या ईश्वराची भीती
बाळगणाऱ्याने आणि संयमी मनाने त्याच्याकडे जाणाऱ्याने, ३४ शांतीपूर्वक
आत प्रवेश करावा. चिरंतन जीवनाचा हा दिवस उगवला आहे. ३५ तिथे
त्यांना हवे ते सगळेच मिळेल. त्यांच्यासाठी आमच्याकडे आणखी खूप
काही आहे.

३६ आम्ही त्यांच्या आधीच्या, त्यांच्याहीपेक्षा सामर्थ्यवान असणाऱ्या
कित्येक पिढ्या नष्ट केल्या आहेत. त्यांनी पृथ्वीवर सगळीकडे शोध
घेतला. पण त्यांना कुठेही आसरा मिळाला नाही. ३७ ज्याच्याकडे

अंतःकरण आहे, जो एकाग्रतेने लक्षपूर्वक ऐकतो, अशा प्रत्येकासाठी यात एक संदेश आहे.

३८ आम्ही आकाश, पृथ्वी आणि त्यांच्या दरम्यानच्या सगळ्या गोष्टी सहा कालावधीत निर्माण केल्या. त्याने आम्हाला जराही थकवा आला नाही. ३९ तेव्हा ते जे काही बोलतात, ते संयमपूर्वक सहन करा. सूर्योदयापूर्वी व सूर्यास्तापूर्वी तुमच्या पालनकर्त्याच्या स्तुतीसह त्याचे गुणगान करा. ४० रात्रीच्या वेळेस आणि प्रत्येक प्रार्थनेनंतर त्याचे स्तुतिगान करा.

४१ लक्षात ठेवा! त्या दिवशी (मृतांना) बोलवणारा अगदी जवळून हाक देईल. ४२ त्या दिवशी सगळ्यांना दुर्दैवी आक्रोश ऐकू येईल आणि प्रत्येकाला (कबरीतून) उठवले जाईल. ४३ खरोखर, जन्म आणि मृत्यू देणारे आम्हीच आहोत आणि प्रत्येकाला आमच्याकडेच परत यायचे आहे. ४४ त्या दिवशी पृथ्वी दुभंगून जाईल आणि त्यातून सगळे पटापट बाहेर पडतील. सगळ्यांना एकत्र करणे ही आमच्यासाठी अगदी सोपी गोष्ट आहे.

४५ सत्य नाकारणारे काय म्हणतात ते आम्ही चांगलेच जाणतो. तुम्ही त्यांच्यावर अजिबात जबरदस्ती करू नका: जे माझ्या इशाऱ्याला घाबरतात त्यांना या कुरआनद्वारे माझे स्मरण करून द्या.

प्रकरण ५१ : विखुरणारे वारे (अज्–जारियात)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ धूळ सर्वत्र विखरून टाकणाऱ्या वाऱ्याची शपथ! २ पावसाचे ओझे वागवणाऱ्या वाऱ्याची शपथ! ३ सहजपणे वेगाने जलप्रवास करणाऱ्यांची शपथ! ४ आणि ईश्वराच्या आदेशाने (तरतुदी, पाऊस आणि

इतर आशीर्वाद) वितरित करणाऱ्यांची शपथ! ५ तुम्हाला ज्याचे वचन
दिले आहे ते खरे ठरणार आहे. ६ निवाडा नक्कीच केला जाणार आहे.
७ निरनिराळ्या मार्गांनी व्यापलेल्या आकाशाची शपथ! ८ कशावर विश्वास
ठेवावा या संभ्रमात तुम्ही पूर्ण गुरफटलेले आहात. ९ सत्यापासून दूर जाणे
ज्याच्या नशिबी आहे तोच त्याच्यापासून दूर जातो.

१० (ईश्वराबद्दल) खोटे अनुमान लावणाऱ्यांचा नाश होवो!
११ अज्ञानाच्या अंधारात बुडालेल्यांच्या या अटकळी आहेत. १२ ते
विचारतात, "निवाड्याचा दिवस कधी येईल?" १३ त्या दिवशी त्यांना
नरकाग्नीच्या छळात लोटले जाईल, १४ आणि सांगितले जाईल, "चाखा
शिक्षेची चव. याचीच तुम्हाला घाई होती ना!" १५ ईश्वराला घाबरून
राहणारे त्या दिवशी नक्कीच अशा बगीच्यांमध्ये असतील ज्यातून पाण्याचे
प्रवाह वाहत असतील. १६ त्या दिवशी त्यांना ईश्वरी कृपेचा लाभ होईल.
कारण भूतकाळात त्यांनी सत्कृत्ये केली आहेत. १७ रात्री कमी झोप
घेऊन १८ पहाटेवेळी त्यांनी ईश्वराकडे क्षमायाचनेसाठी प्रार्थना केली आहे.
१९ निर्धनांना, वंचितांना आपल्या संपत्तीतला हिस्सा दिला आहे.

२० पृथ्वीवर आणि तुमच्या स्वतःमध्ये, २१ ईश्वरावर दृढ श्रद्धा
ठेवणाऱ्यांसाठी अनेक संकेत आहेत. तुम्हाला ते दिसत नाहीत का?
२२ आकाशात तुमच्या उपजीविकेचा मार्ग आहे आणि तुम्हाला ज्याचे वचन
दिले आहे तेही सगळे आहे. २३ आकाश आणि पृथ्वीच्या पालनकर्त्याची
शपथ! तुमच्याकडे वाचाशक्ती आहे हे जितके खरे आहे, तितकेच हे
कुरआन खरे आहे.

२४ अब्राहामच्या सन्माननीय पाहुण्यांची कथा तुम्ही ऐकली आहे का?
२५ त्याच्यासमोर जाताच ते म्हणाले, "तुला शांती लाभो!" यावर त्याने
म्हटले, "तुम्हालाही शांती लाभो!" आणि मनाशीच म्हणाला, "हे तर

अनोळखी आहेत.” २६ ताबडतोब घरात जाऊन त्याने एका धष्टपुष्ट
वासराचे मांस त्यांच्यासाठी आणले. २७ त्यांच्यासमोर ठेवून विचारले,
“आपण हे खाल का?” २८ तो मनातून घाबरला होता. पण त्यांनी त्याला
आश्वस्त केले, “घाबरू नकोस” आणि त्यांनी त्याला एका ज्ञानसंपन्न
पुत्राच्या जन्माची शुभवार्ता दिली. २९ त्याची पत्नी रडत, कपाळ पिटत
घरातून बाहेर आली आणि म्हणू लागली, “मी नक्कीच वांझ, वृद्ध स्त्री
आहे.” ३० यावर पाहुण्यांनी उत्तर दिले, “ही तुझ्या प्रभूची इच्छा आहे.
तो सुज्ञ आहे, सगळे जाणणारा आहे.”

३१ अब्राहामने त्यांना विचारले, “आता पुढे तुम्ही काय करणार
आहात?” ३२ दूतांनी उत्तर दिले, “अपराधी लोकांकडे आम्हाला
पाठवण्यात आले आहे.” ३३ आम्हाला त्यांच्यावर विटांचा वर्षाव करायची
आज्ञा मिळालेली आहे. ३४ मर्यादांचे उल्लंघन करणाऱ्या अपराध्यांना शासन
करण्यासाठी तुमच्या पालनकर्त्याकडून त्या विटांवर खुणा केल्या आहेत.”
३५ त्या शहरातल्या सगळ्या श्रद्धावंतांना आम्ही सुरक्षित ठेवले. ३६ तिथे
आम्हाला सच्च्या श्रद्धावंताचे एकच घर आढळले. ३७ वेदनादायी शिक्षेला
घाबरणाऱ्यांसाठी आम्ही तिथे एक संकेत ठेवला आहे.

३८ मोझेसच्या कथेतही असाच एक संकेत आहे. सत्याचा स्पष्ट पुरावा
घेऊन आम्ही त्याला फारोकडे पाठवले होते. ३९ पण त्याने आणि त्याच्या
सरदारांनी त्याकडे पाठ फिरवली. ते म्हणाले, “हा एकतर जादूगार आहे
किंवा वेडा आहे.” ४० यानंतर आम्ही त्या सगळ्यांना संकटात पाडले
आणि त्याला व त्याच्या सैन्याला समुद्रात बुडवले. याला खुद्द फारोच
जबाबदार होता. ४१ आदच्या जमातीतही असाच एक संकेत आहे. आम्ही
त्यांच्यावर उध्वस्त करणारे वादळ पाठवले. ४२ त्या वादळाने आपल्या
कक्षेत येणारे सगळे उध्वस्त करून टाकले, सगळे धुळीस मिळवून टाकले.

४३ समूदच्या कथेतही असाच एक संकेत होता. त्यांना सांगितले गेले,
"थोड्या वेळासाठी मौजमजा करून घ्या." ४४ पण त्यांनी त्यांच्या
पालनकर्त्याच्या आज्ञेविरुद्ध बंडखोरी केली. तेव्हा पाहता पाहता विजेच्या
लोळाने त्यांचा घास घेतला. ४५ त्यातून ते पुन्हा सावरू शकले नाहीत की
स्वतःचा बचाव करू शकले नाहीत. ४६ त्यांच्या आधी नोहाच्या लोकांना
आम्ही असेच नष्ट केले होते. ते नक्कीच अपराधी लोक होते.

४७ आम्ही आमच्या सामर्थ्याने विश्वाची निर्मिती केली. त्याचा विस्तार
प्रचंड वाढवला. ४८ पृथ्वीचा विस्तारही आम्ही दिमाखात केला. ४९ तुम्ही
चिंतन करावे म्हणून पृथ्वीवर प्रत्येक गोष्टींच्या जोड्या बनवल्या. ५० तेव्हा
ईश्वराकडे धाव घ्या. तुम्हाला सावधगिरीचा स्पष्ट इशारा देण्यासाठी त्याने
मला पाठवले आहे. ५१ इतरांना ईश्वराच्या बरोबरीचा दर्जा देऊ नका.
तुम्हाला फक्त सावधानतेचा इशारा देण्यासाठी मी त्याच्याकडून आलो
आहे.[अ]

५२ याचप्रमाणे पूर्वीच्या लोकांकडेही प्रेषित पाठवण्यात आले होते.

[अ] विश्वाच्या निर्मात्याने जोडीतील अर्धा भाग म्हणून हे जग निर्माण केले आहे. जन्मानंतर जेथे आपण जीवन जगतो ते विद्यमान जग या जोडीचा पूर्वार्ध आहे, तर मृत्यूनंतर आपण जेथे जाणार ते यापुढचे शाश्वत जग या जोडीचा उत्तरार्ध असेल. मानवाच्या निर्मात्याने अशा प्रकारे चिरंतन निर्मिती म्हणून माणसाला घडवले आणि त्याच्या जीवनाची दोन टप्प्यांमध्ये विभागणी केली– मृत्युपूर्व कालखंड (अर्थात या जगातले जीवन) आणि मृत्युपश्चात कालखंड (अर्थात मृत्यूनंतरचे जीवन). मृत्युपूर्वीचा मर्यादित कालावधी माणसाची कसोटी घेण्यासाठी आहे, तर या जीवनातील कसोटीत त्याने केलेल्या कामगिरीच्या आधारे त्याला मिळणाऱ्या पारितोषिकाचा किंवा शिक्षेचा कालावधी हा त्याचा मृत्यूनंतरचा कालखंड असेल. निर्मात्याने आखलेल्या या धोरणानुसार या जगाचे अस्तित्व आहे. स्वर्गीय जगत वास्तव्य करण्यासाठी योग्य असणाऱ्यांची निवड हा या निर्मितीचा खरा हेतू आहे.

तेव्हा ते म्हणाले, "हा जादूगार आहे किंवा वेडा आहे." [५३] त्यांनी आपल्या वंशजांना हाच वारसा दिला आहे का? या लोकांनी खरोखर सगळ्या मर्यादा ओलांडल्या आहेत. [५४] तेव्हा त्यांच्याकडे दुर्लक्ष करा. तुम्हाला त्याचा दोष लागणार नाही. [५५] पण त्यांना उपदेश करत रहा. उपदेशातून श्रद्धावंतांना लाभ मिळतो.

[५६] माणसाची आणि जिन्नची निर्मिती मी यासाठी केली की त्यांनी माझी आराधना करावी. [५७] मी त्यांच्याकडून ना उपजीविकेची अपेक्षा करतो, ना भरणपोषणाची अपेक्षा करतो. [५८] सगळ्यांना उपजीविका देणारा तो महान ईश्वर आहे. तो सर्वशक्तिमान, अपराजेय आहे. [५९] या दुराचाऱ्यांची अवस्थाही त्यांच्या पूर्वजांप्रमाणेच असेल. त्यांनी मला शिक्षा लवकर आणण्याची घाई करू नये. [६०] त्यांना वचन देण्यात आलेला दिवस उगवेल तेव्हा सत्य नाकारणाऱ्यांची परिस्थिती अगदीच वाईट असेल.

प्रकरण ५२ : सिनाई पर्वत
(अत्-तूर)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] सिनाई पर्वताची शपथ! [२] लिहिलेल्या ग्रंथाची शपथ! [३] जो खुल्या पटावर लिहिलेला आहे. [४] लोकांनी गजबजलेल्या काबागृहाची शपथ! [५] आकाशरूपी उंच छताची शपथ! [६] उधाणलेल्या सागराची शपथ! [७] तुमच्या पालनकर्त्याची शिक्षा नक्कीच कोसळणार आहे. [८] तिला रोखू शकेल असा कुणीही नाही. [९] त्या दिवशी आकाश हादरून जाईल. [१०] पर्वत जोरजोरात हलू लागतील, त्यांचा थरकाप उडेल. [११] सत्य नाकारणाऱ्यांवर त्या दिवशी दुर्दैव कोसळेल, [१२] जे निरर्थक चर्चा करण्यात व्यस्त राहिले.

१३ त्या दिवशी त्यांना निर्दयीपणे नरकाग्नीत ढकलून दिले जाईल. १४ हा
तोच अग्नी आहे जो तुम्ही नाकारत होता. १५ ही जादू आहे की तुम्हाला
काही दिसत नाही? १६ आता त्यात प्रवेश करा, तुम्ही संयमाने रहा की
आक्रोश करा. त्याने काही फरक पडणार नाही. तुम्ही जसे वागलात
त्याचा तुम्हाला फक्त मोबदला दिला जाईल.
१७ खरोखर, ईश्वराला भिऊन राहणारे त्या दिवशी स्वर्गाच्या आनंदात
असतील. १८ ईश्वराने त्यांना जे दिले आहे त्यामुळे ते आनंदाने जल्लोष
करतील. त्यांच्या पालनकर्त्याने त्यांचा नरकाग्नीच्या छळापासून बचाव
केला आहे. १९ तुमच्या चांगल्या कृत्यांचे प्रतिफळ म्हणून आनंदाने खा
आणि प्या. २० तिथे रांगेने मांडलेल्या आसनांमध्ये ते आराम करतील.
टपोरे सुंदर डोळे असणाऱ्या रूपवान तरुणींशी आम्ही त्यांचा विवाह करून
देऊ.
२१ श्रद्धेचा अंगीकार केलेल्यांच्या वंशजांनी आपल्या पूर्वजांचे
अनुसरण केले असेल तर तिथे आम्ही त्या सगळ्यांना एकत्र आणू.
त्यांचे एकही सत्कृत्य आम्ही वाया जाऊ देणार नाही. प्रत्येकाला त्याने
कमावलेल्या कर्माचा मोबदला देण्याचे वचन आम्ही दिले आहे. २२ त्यांना
हवी असलेली फळे, मांस आम्ही त्यांना मुबलक प्रमाणात देऊ. २३ तिथे ते
अशा मद्याचे पेले एकमेकांना देतील, त्यामुळे ना ते निरर्थक बडबड करू
लागतील ना अपकृत्य करतील. २४ शिंपल्यातल्या मोत्यांसारखे अमर्त्य
तरुण तिथे त्यांच्या सेवेसाठी तैनात असतील. २५ तिथे त्यांचा परस्परांशी
संवाद होईल, प्रश्नोत्तरे होतील, २६ "यापूर्वी जेव्हा आपण आपल्या
कुटुंबियांसमवेत राहत होतो तेव्हा ईश्वराच्या अप्रसन्नतेच्या भीतीने सतत
घेरलेलो होतो. २७ ईश्वराने आपल्यावर कृपा केली आहे आणि नरकाच्या
तीव्र आगीच्या छळापासून आपली मुक्तता केली आहे. २८ यापूर्वी आपण

कायम त्याची प्रार्थना करत असू. निःसंशय तो फार परोपकारी आहे, दयाळू आहे.''

२९ तेव्हा हे प्रेषिता! तुम्ही उपदेश करत रहा. कारण ईश्वराच्या कृपेने तुम्ही ज्योतिषी नाही आहात की वेडे नाही आहात. ३० जर ते म्हणाले, ''हा फक्त एक कवी आहे, याच्यावर संकट कधी कोसळते याचीच आम्ही वाट पहात आहोत.'' ३१ तर त्यांना सांगा, ''तर मग वाट पहा! मीही तुमच्याबरोबरच वाट पहात आहे.'' ३२ त्यांचे मन त्यांना अशा गोष्टी बोलायची प्रेरणा देते की ते निव्वळ बंडखोर आहेत? ३३ किंवा ते असे म्हणतात का, ''या सगळ्या याने रचलेल्या कथा आहेत...'' खरोखर, विश्वास ठेवायची त्यांची इच्छा नाही. ३४ ते सत्यवचनी असतील तर त्यांनी यासारखा एखादा ग्रंथ सादर करून दाखवावा.

३५ निर्मात्याशिवाय त्यांची निर्मिती झाली आहे काय? किंवा त्यांनी स्वतःच स्वतःला निर्माण केले आहे काय? ३६ आकाश आणि पृथ्वी त्यांनी निर्माण केली आहे काय? नाही! खरे तर त्यांचा कशावर विश्वासच नाही. ३७ त्यांच्याकडे तुमच्या पालनकर्त्याचे खजिने आहेत का? किंवा ते त्यांचे रखवालदार आहेत का? ३८ स्वर्गातला संवाद ऐकण्यासाठी त्यांच्याकडे स्वर्गापर्यंत पोहोचणाऱ्या शिड्या आहेत का? तसे असेल तर त्यांनी संवाद ऐकल्याचा पुरावा द्यावा. ३९ ईश्वरासाठी मुली आहेत आणि तुमच्यासाठी मुले आहेत?

४० किंवा तुम्ही त्यांच्याकडे काही मोबदला मागत आहात का, ज्यामुळे ते कर्जबाजारी होतील? ४१ त्यांच्याकडे अदृश्याचे ज्ञान आहे का, जे ते लिहून काढू शकतील? ४२ काही कट रचण्याचा त्यांचा डाव आहे का? सत्य नाकारणाऱ्यांचा हा डाव त्यांच्यावरच उलटेल. ४३ की ईश्वराशिवाय अन्य कुणी त्यांचा ईश्वर आहे? ते ज्यांना ईश्वराचे भागीदार (समतुल्य) समजतात त्यांच्यापेक्षा तो उच्च दर्जाचा आहे.

४४ आकाशाचा तुकडा कोसळताना दिसला तर ते म्हणतील, "ढगांचा
पुंजका कोसळत आहे." ४५ ज्या दिवशी त्यांची वाचा बसेल त्या
दिवसाला सामोरे जाईपर्यंत त्यांना एकटेच राहू द्या. ४६ त्या दिवशी ना
त्यांचे डावपेच काही कामी येतील, ना त्यांना कुणाची मदत मिळेल.
४७ या अपराध्यांसाठी खरोखर याशिवाय आणखीही शिक्षा आहे. पण
त्यांना याची जाणीव नाही.

४८ तेव्हा तुमच्या पालनकर्त्याच्या निवाड्यापर्यंत संयमाने रहा. तुम्ही
नक्कीच आमच्या दक्ष देखरेखीखाली आहात. झोपेतून जाग आल्यावर
आपल्या पालनकर्त्याचे महिमागान करून त्याची स्तुती करा, ४९ रात्रीच्या
वेळेस आणि तारे अस्ताला जाताना त्याचे स्तुतिगान करा.

प्रकरण ५३ : अस्ताला जाणारा तारा (अन्-नज्म)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अस्ताला जाणाऱ्या ताऱ्याची शपथ! २ तुमचा सोबती मार्गभ्रष्ट
झालेला नाही की त्याची दिशाभूल झालेली नाही, ३ की तो स्वतःच्या
मनाला येईल ते बोलत नाही. ४ कुरआन म्हणजे दुसरे काही नसून त्याच्यावर
अवतीर्ण झालेला साक्षात्कार आहे. ५ सामर्थ्यवान अशा एका दूताने त्याला
ही शिकवण दिली आहे. ६ जो प्रबुद्ध व विवेकशील आहे, जो प्रेषितासमोर
एकदा प्रकट झाला होता. ७ हा दूत क्षितिजाच्या सर्वोच्च बिंदूपाशी नम्रपणे
उभा होता. ८ नंतर तो खाली प्रेषिताजवळ आला. ९ दोघांमधले अंतर
धनुष्याच्या दोन कमानीइतके किंवा त्यापेक्षा कमी होईपर्यंत तो प्रेषिताच्या
जवळ आला. १० आणि त्याला मिळालेला साक्षात्कार त्याने ईश्वराच्या
सेवकाला दिला. ११ प्रेषिताने जे काही पाहिले त्यापेक्षा वेगळा बनाव

त्याने कधीही रचला नाही. १२ तरीही त्याने जे काही पाहिले त्यावरून
तुम्ही त्याच्याशी वाद घालणार का? १३ आणि निःसंशय त्याने दूताला
दुसऱ्यांदा अवतीर्ण होताना पाहिले. १४ सिदरतुल-मुन्तहाजवळ, ज्याच्या
पलीकडे कुणीही जात नाही. १५ चिरंतन, आनंददायी स्वर्ग त्याच्याजवळ
आहे! १६ बोरीचा वृक्ष दिव्य तेजाने झळाळून उठल्यावर, १७ प्रेषिताची
नजर विचलित झाली नाही की दिपून गेली नाही. १८ त्याने आपल्या
पालनकर्त्याचे काही महान संकेत पाहिले.

१९ तुम्ही खरोखर कधी लात व उझ्झा यांचा विचार केला आहे का?[अ]
२० त्यांच्यापैकी तिसरा असणारा मन्नात, त्याचा कधी विचार केला आहे
का? २१ काय? ईश्वरासाठी स्त्रिया आणि तुमच्यासाठी पुरुष? २२ किती
अन्यायी वाटणी आहे ही! २३ ही तर फक्त तुम्ही व तुमच्या पूर्वजांनी
रचलेली नावे आहेत. ईश्वराने त्यांना तसा कुठलाही अधिकार दिलेला
नाही. त्यांच्याकडे त्यांच्या अधिपतीचे मार्गदर्शन अगोदरच आलेले
असले तरीही ते स्वतःच्या अंदाजानुसार आणि इच्छेनुसार चालतात.
२४ माणसाला ज्याची हाव आहे त्या सगळ्या गोष्टी त्याला मिळाल्याच
पाहिजेत का? २५ पण या जगात आणि मृत्युपश्चात जगात जे काही आहे
ते सगळे ईश्वराच्या मालकीचे आहे.

२६ आकाशात अगणित देवदूत असतील. पण ईश्वराने ज्यांची निवड
केली आहे आणि त्यांचा स्वीकार केला आहे ते सोडून इतर कुणासाठीही
ईशदूतांची शिफारस उपयोगी पडणार नाही. २७ मृत्युपश्चात जीवनावर
विश्वास न ठेवणारे ईशदूतांना स्त्रियांची नावे देतात. २८ या त्यांच्या ज्ञानाला
कसलाही आधार नाही. ते फक्त अंदाज बांधत आहेत. जे सत्याची जागा

[अ] लात, उझ्झा आणि मन्नात प्राचीन अरबांचे दैवत होते.

कधीही घेऊ शकणार नाहीत. [२९] तेव्हा जे आमच्या साक्षात्कारांकडे पाठ फिरवतात आणि फक्त ऐहिक जीवनाखेरीज कशाचीही आकांक्षा बाळगत नाहीत त्यांच्याकडे दुर्लक्ष करा. [३०] तीच त्यांच्या ज्ञानाची परिसीमा आहे. कोण त्याच्या मार्गदर्शनानुसार चालतो आणि कोण त्यापासून दूर जातो हे ईश्वर नक्कीच जाणतो.

[३१] आकाश आणि पृथ्वीवरची प्रत्येक गोष्ट ईश्वराच्या मालकीची आहे. अपकृत्ये करणाऱ्यांना तो त्यांच्या कृतीनुसार मोबदला देईल तर सत्कृत्ये करणाऱ्यांना उत्कृष्ट मोबदला देईल. [३२] घोर अपराधांपासून आणि असभ्य कृत्यांपासून जे दूर राहतात त्यांचे किरकोळ अपराध ईश्वर माफ करतो. त्याच्या क्षमाशीलतेत कधीही फरक पडत नाही. त्याने जेव्हा तुम्हाला मातीपासून बनवले आणि जेव्हा तुम्ही मातेच्या गर्भाशयात भ्रूणावस्थेत होता, तेव्हापासून तो तुम्हाला ओळखतो. तेव्हा तुम्ही शुद्ध असल्याचा दावा करू नका. तुमच्यापैकी कोण खरा ईश्वरनिष्ठ आहे, तो चांगले जाणतो.[अ]

[३३] हे प्रेषित! तुझ्या संदेशाकडे पाठ फिरवणाऱ्यांचा कधी विचार केला आहेस का, [३४] जो सुरूवातीला अगदी थोडेसे देतो आणि नंतर हात आखडता घेतो? [३५] त्याच्याकडे अदृश्याचे ज्ञान आहे का ज्याच्या सहाय्याने तो पाहू शकतो? [३६] मोझेसच्या ग्रंथात लिहिलेल्या गोष्टींविषयी त्याला

[अ] माणसाने काय करावे आणि काय करू नये, याचे संपूर्ण मार्गदर्शन सर्वशक्तिमान ईश्वराने माणसाला केले आहे. पण भावनेच्या आहारी जाऊन त्याने काही किरकोळ स्वरूपाचे गैरकृत्य केले तर कदाचित ईश्वर त्याला माफ करेल. पण त्याला आपण केलेल्या कृत्याची लगेच जाणीव झाली पाहिजे आणि त्याने पश्चातापपूर्वक ईश्वराची माफी मागितली पाहिजे.

कधी सांगितले गेले नाही का? ३७ दिलेला शब्द पाळणाऱ्या अब्राहामच्या
ग्रंथातला उपदेशही त्याला सांगितला गेला नाही का? ३८ कुणालाही दुसऱ्याचे
ओझे व्हावे लागणार नाही, ३९ माणूस जेवढे परिश्रम करेल तेवढेच त्याच्या
वाट्याला येईल, ४० त्याच्या परिश्रमाचे फळ लवकरच पहायला मिळेल.
४१ आणि अखेरीस त्याला त्याच्या परिश्रमाचा परिपूर्ण मोबदला मिळेल.
४२ अखेर सगळ्या गोष्टी ईश्वराकडेच परतणार आहेत.

४३ आसू आणि हसू देणारा तो ईश्वरच आहे. ४४ तो जीवनही देतो
आणि मृत्यूही. ४५ स्त्री व पुरुष ही दोन्ही लिंगे त्यानेच निर्माण केली.
४६ गर्भात पडलेल्या वीर्याच्या एका थेंबापासून त्याने त्यांची निर्मिती केली.
४७ दुसरी निर्मितीही त्याने घडवून आणली. ४८ संपत्ती आणि समृद्धी तोच
देतो. ४९ तोच सर्वोत्तम प्रकाशमान तारा (सिरिअस) चा स्वामी आहे.

५० पूर्वीच्या आद जमातीचा संपूर्ण नाश त्यानेच केला. ५१ तसेच
समूद जमातीचाही सर्वनाश केला. ५२ त्यांच्या आधीच्या अधिक अन्यायी
आणि उन्नत असणाऱ्या नोहाच्या लोकांनाही त्याने नष्ट केले. ५३ आणि
त्याने (सदोम आणि अमोरा ही) विनाशाच्या उंबरठ्यावर असलेली
नगरे उध्वस्त केली. ५४ आणि त्यांना कायमचे दृष्टीआड करून टाकले,
५५ तर मग तुमच्या अधिपतीच्या कोणकोणत्या संकेतांवर तुम्ही शंका
घेणार आहात?

५६ हा संदेश म्हणजे पूर्वीच्या काळासारखाच धोक्याचा इशारा आहे.
५७ अंतिम घटका अधिकाधिक जवळ येत चालली आहे. ५८ ईश्वराशिवाय
कुणीही ती रोखू शकत नाही. ५९ या वार्ता तुम्हाला चमत्कारिक
वाटतात का? ६० तुम्ही शोक करण्याऐवजी हास्यविनोद काय करताय?
६१ अहंकारापोटी तुम्ही या संदेशाकडे दुर्लक्षच करत राहणार आहात का?
६२ ईश्वराला समर्पित व्हा आणि फक्त त्याचीच आराधना करा.

प्रकरण ५४ : चंद्र
(अल्-कमर)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ शेवटची घटका जवळ आली असून चंद्राला तडा गेला आहे. २ पण
सत्य नाकारणारे जेव्हाही एखादा संकेत पाहतात, त्याकडे पाठ फिरवून
म्हणतात, "हा जुनाच जादूचा प्रयोग आहे." ३ ते सत्य नाकारून आपल्याच
इच्छेनुसार वागतात. प्रत्येक गोष्टीची वेळ ठरलेली असते. ४ धडा देणाऱ्या
अनेक वार्ता त्यांच्याकडे आल्या आहेत. ५ त्यात शहाणपणाच्या अनेक
गोष्टी होत्या. पण त्याचा त्यांनी लाभ उठवला नाही. ६ तेव्हा हे प्रेषिता!
त्यांच्याकडे दुर्लक्ष करा. अंतिम दिवशी त्यांना एका भयंकर गोष्टीकडे
बोलावले जाईल. ७ नजरा खाली वळवून घोंघावणाऱ्या टोळांसारखे ते
आपल्या कबरींमधून बाहेर पडतील, ८ त्यांना बोलावणाऱ्यांकडे धावत
सुटतील. सत्य नाकारणारे त्या दिवशी आक्रोश करू लागतील, "किती
कठीण दिवस आहे हा!"

९ त्यांच्या आधी नोहाच्या लोकांनीही सत्य नाकारले होते. "हा तर
वेडा आहे," असे म्हणत त्यांनी आमच्या प्रेषिताला झिडकारले होते.
१० त्याने आपल्या अधिपतीकडे धाव घेतली आणि त्याला गाऱ्हाणे
सांगितले, "यांनी मला पराभूत केले आहे, मला मदत करा!" ११ तेव्हा
आम्ही मुसळधार पावसासाठी आकाशाची दारे उघडली. १२ उसळत्या
जलधारांनी आम्ही पृथ्वीला उधाण आणले. आम्ही केलेल्या जलवर्षावाने
नेमून दिलेले काम चोखपणे पार पाडले. १३ फळ्यांनी आणि खिळ्यांनी
बनवलेल्या एका नौकेवर आम्ही त्याला स्वार केले. १४ आमच्या नजरेसमोर
ती जलविहार करत होती. प्रेषिताला नाकारणाऱ्यावर घेतलेला तो सूड

होता. [१५] या रूपात आम्ही एक संकेत स्थापित केला. पण त्यापासून कुणी बोध घेईल का? [१६] माझी शिक्षा आणि माझा इशारा किती भयानक होता! [१७] कुरआनपासून धडे घेणे आम्ही अगदी सोपे केले आहे. त्यातील उपदेश स्वीकारणारा कुणी आहे का?

[१८] आद जमातीच्या लोकांनीही सत्य नाकारले होते. माझा इशारा आणि माझी शिक्षा त्यांच्यासाठी किती भयंकर होती! [१९] एका दुर्दैवी दिवशी आम्ही त्यांच्यावर रोरावते वादळ पाठवले. [२०] मुळापासून उखडलेल्या पामवृक्षांसारखे ते त्या वादळात भिरकावले गेले. [२१] माझा इशारा आणि माझी शिक्षा त्यांच्यासाठी किती जीवघेणी होती! [२२] कुरआनपासून धडे घेणे आम्ही अगदी सोपे केले आहे. त्यातील उपदेश स्वीकारणारा कुणी आहे का?

[२३] समूद जमातीनेही आमच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केले. [२४] ते म्हणाले, "आम्ही आमच्यातल्याच एकाचे अनुसरण करायचे? असे केल्याने आम्ही चुकीचे ठरू, वेडे ठरू. [२५] दैवी संदेश आम्हापैकी फक्त त्याच्यावरच अवतीर्ण झाला आहे का? नाही, तो चढेल आहे, खोटारडा आहे." [२६] आम्ही प्रेषिताला सांगितले, "उद्याच त्यांना कळेल, कोण चढेल आणि खोटारडा आहे? [२७] कारण आम्ही त्यांची परीक्षा घेण्यासाठी एक उंटीण पाठवणार आहोत. ते कसे वागतात ते पहा आणि संयमाने रहा. [२८] आणि त्यांना हेही सांगा, विहिरीतील पाण्याचे विभाजन करण्यात आले असून प्रत्येकाने आळीपाळीने पाणी प्यावे." [२९] पण त्यांनी त्यांच्या एका सोबत्याला बोलावून घेतले, ज्याने तलवारीने तिच्या मुख्य शिरा कापून टाकल्या. [३०] त्यांना मिळालेला इशारा आणि शिक्षा किती भयंकर होती! [३१] नंतर आम्ही त्यांच्यावर एकच स्फोट घडवून आणला. त्याने चिरडल्या गेलेल्या वाळल्या खुंटासारखी त्यांची वाताहत झाली.

३२ खरोखर कुरआनपासून धडे घेणे आम्ही खूप सोपे केले आहे. पण
त्यातील उपदेश स्वीकारणारा कुणी आहे का?
३३ लूतच्या लोकांनीही आमच्या इशाऱ्यांकडे दुर्लक्ष केले. ३४ आम्ही
त्यांच्यावर वाळूचे वादळ पाठवले ज्याने त्यांचा पुरता नाश केला. लूतचे
कुटुंब मात्र यातून बचावले. एका भल्या पहाटे आम्ही त्यांना जीवनदान
दिले. ३५ आमच्याकडून त्यांना मिळालेला हा कृपाशीर्वाद होता. कृतज्ञ
असणाऱ्यांनाच आम्ही असा मोबदला देतो. ३६ लूतने त्यांना आमच्या
शिक्षेचा इशारा दिला होता. पण त्यांनी त्यावरून वाद घातला. ३७ त्याच्या
पाहुण्यांवर अत्याचार करायचीही त्यांची इच्छा होती. पण आम्ही त्यांची
दृष्टी हिरावून घेतली आणि आज्ञा दिली, माझ्या इशाऱ्यांची खिल्ली
उडवलीत, आता चाखा शिक्षेची चव. ३८ भल्या पहाटे आम्ही ठरवलेल्या
शिक्षेने त्यांचा घास घेतला. ३९ आमच्या शिक्षेची खिल्ली उडवली, आता
चाखा शिक्षेची चव. ४० खरोखर, कुरआनपासून धडे घेणे आम्ही खूप सोपे
केले आहे. त्यातील उपदेश स्वीकारणारा कुणी आहे का?
४१ असेच सावध करणारे फारोच्या लोकांकडेही आले होते.
४२ त्यांनीही आमचे सगळे संकेत नाकारले. तेव्हा आम्हीही महाशक्तिमान,
महासामर्थ्यवान असणाऱ्या ईश्वराच्या तावडीत सापडण्यासारखे त्यांना
चहूबाजूंनी संकटाने घेरले.
४३ तुमचे सत्य नाकारणारे लोक त्यांच्यापेक्षा चांगले आहेत की काय?
का धर्मग्रंथांतून तुम्हाला सुरक्षित ठेवण्याचे वचन मिळाले आहे? ४४ का
ते असे म्हणतात, "आम्ही संघटित आहोत, त्यामुळे अटळपणे प्रबळ
ठरणार आहेत?" ४५ लवकरच हा लोकसमुदाय विनाशाच्या मार्गाला
लागेल आणि तिला पळ काढावा लागेल. ४६ निवाड्याची घटका ही
त्यांची नियत वेळ असेल आणि ती निवाड्याची घटका अतिशय कठीण,

अतिशय कटु असेल. [४७] हे दुराचारी खरोखर अपराधात बुडालेले आणि चुकलेले आहेत. [४८] जेव्हा त्यांना पालथ्या अवस्थेत फरफटत नरकाग्नीकडे आणले जाईल तेव्हा त्यांना सांगितले जाईल, "आता नरकाच्या स्पर्शाची अनुभूती घ्या."

[४९] प्रत्येक गोष्ट आम्ही योग्य प्रमाणात निर्माण केली. [५०] आम्ही फक्त एकदाच आज्ञा देतो. डोळा लवायच्या आत आमच्या आज्ञेची अंमलबजावणी होते. [५१] आम्ही खरोखर तुमच्यासारखे पुष्कळ लोक नष्ट केले आहेत. यापासून बोध घेणारा कुणी आहे का? [५२] त्यांची सगळी कृत्ये एका नोंदवहीत नोंदवली आहेत. [५३] त्यात त्यांच्या प्रत्येक लहानमोठ्या कृतीची दखल घेतलेली आहे. [५४] ईश्वराची जाणीव ठेवणारे लोक अशा बगीच्यांमध्ये राहतील जिथून नद्या वाहत आहेत. [५५] त्यांना सन्मानाचे स्थान आणि सर्वशक्तिमान, स्वायत्त ईश्वराचे सान्निध्य लाभेल.

प्रकरण ५५ : दयाळू ईश्वर (अर्-रहमान)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] ईश्वर दयाळू आहे, [२] ज्याने माणसाला कुरआन शिकवले. [३] त्याने मानवाची निर्मिती केली, [४] आणि त्याला वाचा दिली. [५] सूर्य आणि चंद्र त्याने नेमून दिलेल्या ठराविक कक्षेतून फिरतात. [६] तारे आणि वृक्ष त्याच्या इच्छेला समर्पित आहेत. [७] त्याने आकाश उंचावले आणि संपूर्ण सृष्टीत संतुलन व मर्यादा आखून दिल्या. [८] तेव्हा तुम्ही या मर्यादेचे उल्लंघन करू नका. [९] मोजमाप करताना नेहमी न्यायाने वागा आणि मोजमापात कमी करू नका.

१० आपण निर्माण केलेल्या जीवसृष्टीसाठी त्याने पृथ्वी निर्माण केली.
११ त्यावर नाना प्रकारची फळझाडे आणि कठीण कवचाच्या फळांच्या
घोसांनी लगडलेले वृक्ष आहेत. १२ टरफल असलेली धान्य पिके आणि
सुगंधित फुलझाडेही आहेत. १३ तुमच्या पालनकर्त्याचे कुठले उपकार
तुम्ही नाकाराल? १४ त्याने चिकणमातीपासून माणसाला निर्माण केले.
१५ अग्निज्वाळेपासून जिन्नला निर्माण केले. १६ तुमच्या पालनकर्त्याचे
कुठले चमत्कार तुम्ही नाकाराल? १७ तो सगळ्या दिशांचा मालक आहे.
१८ तुमच्या पालनकर्त्याचे कुठले संकेत तुम्ही नाकाराल? १९ त्याने
एकमेकांच्या जवळ येणारे दोन सागर प्रवाहीत केले. २० त्यांच्या दरम्यान एक
अडथळा असून तो ते कधीही ओलांडत नाहीत. २१ तुमच्या पालनकर्त्याचे
कुठले चमत्कार तुम्ही नाकाराल? २२ त्या दोन्ही सागरांमधून मोती आणि
प्रवाळ बाहेर निघतात. २३ तुमच्या पालनकर्त्याचे कुठले उपकार तुम्ही
नाकाराल? २४ पर्वताप्रमाणे सागरात रोवलेल्या महाकाय नौका त्याच्याच
आहेत. २५ तुमच्या अधिपतीचे कुठले उपकार तुम्ही नकाराल?

२६ पृथ्वीवरची प्रत्येक गोष्ट नाशवंत आहे. २७ तर तुमच्या पालनकर्त्याचे
स्वत्व मात्र कायम भव्य आणि तेजस्वी राहणार आहे. २८ तुमच्या
पालनकर्त्याचे कोणकोणते संकेत तुम्ही नाकाराल? २९ आकाश आणि
पृथ्वीवरचा प्रत्येकजण त्याच्यावर अवलंबून आहे. तो प्रत्येक दिवशी
वैभवाच्या अनेक रूपात स्वतःला पेश करतो. ३० तुमच्या अधिपतीचे
कुठले चमत्कार तुम्ही नाकाराल?

३१ आम्ही जिन्नचे आणि माणसांचे दोन विशाल समूह करून तुमचा
समाचार घेणार आहोत. ३२ तुमच्या पालनकर्त्याचे कुठले संकेत तुम्ही
नाकाराल? ३३ हे जिन्नच्या आणि माणसाच्या समुदायांनो! आकाश आणि
पृथ्वीच्या क्षेत्राबाहेर जाण्याची शक्ती तुमच्याकडे असेल तर त्या पलीकडे

जाऊन दाखवा. आमच्या परवानगीशिवाय तुम्ही ते ओलांडू शकत नाही.
३४ तुमच्या अधिपतीचे कुठले संकेत तुम्ही नाकाराल? ३५ तुमच्यावर
अग्निज्वाळा आणि वितळलेल्या धातूचा रस ओतला जाईल. त्यापासून
तुम्ही स्वतःचा बचाव करू शकणार नाही.[अ] ३६ तुमच्या अधिपतीचे कुठले
संकेत तुम्ही नाकाराल?

३७ जेव्हा आकाश फाटेल आणि लाल चामड्यासारखे लाल होईल. तेव्हा
तुमची काय अवस्था होईल! ३८ तुमच्या पालनकर्त्याचे कुठले संकेत तुम्ही
नाकाराल? ३९ त्या दिवशी ना माणसाला ना जिन्नला त्याच्या पापांविषयी
विचारले जाईल. ४० तुमच्या पालनकर्त्याच्या कुठल्या कृपेला तुम्ही
नाकाराल? ४१ त्या दिवशी अपराध्यांना त्यांच्या लक्षणांवरून ओळखले
जाईल आणि त्यांना त्यांच्या कपाळावरील केसांना आणि पायांना पकडून
फरफटत नेले जाईल. ४२ तुमच्या पालनकर्त्याच्या कुठल्या कृपेला तुम्ही
नाकाराल? ४३ हा तोच नरक आहे ज्याला अपराध्यांनी खोटे ठरवले होते.
४४ त्यांना अग्निज्वाळांमध्ये आणि उकळत्या पाण्यात रहावे लागेल.
४५ तुमच्या पालनकर्त्याच्या कुठल्या कृपेला तुम्ही नाकाराल?

४६ ईश्वरासमोर उभे राहून जाब द्यावा लागेल या विचाराने आपले उभे
आयुष्य जगणाऱ्यांसाठी दोन बगीचे असतील. ४७ तुमच्या पालनकर्त्याचे
कुठले उपकार तुम्ही नाकाराल? ४८ त्या दोन्ही बगीच्यांमध्ये डेरेदार वृक्ष

[अ] सध्याचे जग हे चाचणीचे ठिकाण आहे. जोपर्यंत परीक्षेचा कालावधी टिकून आहे, तोपर्यंत प्रत्येकाला त्याच्या इच्छेनुसार गर्विष्ठ होण्याची संधी असते. परंतु हे पूर्ण स्वातंत्र्य असूनही विश्वाच्या मर्यादेपलीकडे जाण्याची शक्ती कोणाही जिन्न व मानवामध्ये नाही. मनुष्य पूर्णपणे ईश्वराच्या पकडीत आहे हे सिद्ध करण्यासाठी ही वस्तुस्थिती पुरेशी आहे. परीक्षेचा कालावधी संपल्यावर जेव्हा ईश्वर लोकांना त्यांच्या कृत्यांसाठी जबाबदार धरेल, तेव्हा कोणालाही स्वतःला वाचवणे शक्य होणार नाही.

असतील. ४९ तुमच्या पालनकर्त्याच्या कुठल्या कृपेला तुम्ही नाकाराल?
५० या दोन्ही बगीच्यांमध्ये शुद्ध पाण्याचे झरे वाहत असतील. ५१ तुमच्या
अधिपतीचे कुठले उपकार तुम्ही नाकाराल? ५२ त्या बगीच्यांमध्ये
प्रत्येक फळाचे दोन प्रकार असतील. ५३ तुमच्या पालनकर्त्याचे कुठले
उपकार तुम्ही नाकाराल? ५४ उंची कलाकुसरीने नटलेल्या गालीचांवर ते
आराम करतील. तिथली सगळी फळे त्यांच्या अगदी हाताशी असतील.
५५ तुमच्या पालनकर्त्याच्या कुठल्या कृपेला तुम्ही नाकाराल? ५६ तिथे
लाजाळू नजरेच्या तरुणी असतील. त्यांना स्वर्गवासीयांपूर्वी ना जिन्नने, ना
माणसाने कधी स्पर्श केला असेल. ५७ तुमच्या अधिपतीचे कुठले चमत्कार
तुम्ही नाकाराल? ५८ तिथल्या तरुणी माणिक-मोत्यांसारख्या अप्रतिम
असतील. ५९ तुमच्या अधिपतीचे कुठले चमत्कार तुम्ही नाकाराल?
६० चांगुलपणाचा मोबदला दुसरे काही नाही तर चांगुलपणाच असेल.
६१ तुमच्या अधिपतीचे कुठले उपकार तुम्ही नाकाराल?

६२ या दोन बगीच्यांव्यतिरिक्त आणखी दोन बगीचे असतील.
६३ तुमच्या पालनकर्त्याचे कुठले उपकार तुम्ही नाकाराल? ६४ हे दोन्ही
बगीचे हिरव्यागार वृक्षराजीने नटलेले असतील. ६५ तुमच्या पालनकर्त्याचे
कुठले उपकार तुम्ही नाकाराल? ६६ या दोन्ही बगीच्यांमधून जिवंत झरे
वाहत असतील. ६७ तुमच्या पालनकर्त्याचे कुठले उपकार तुम्ही नाकाराल?
६८ त्या दोन्ही बगीच्यांमध्ये पामवृक्ष, डाळिंबवृक्ष व खजूरवृक्ष असतील.
६९ तुमच्या पालनकर्त्याचे कुठले उपकार तुम्ही नाकाराल? ७० तिथल्या
तरुणी चारित्र्यवान आणि रूपवान असतील. ७१ तुमच्या पालनकर्त्याच्या
कुठल्या कृपेला तुम्ही नाकाराल? ७२ ईश्वरी कृपाप्रसाद लाभलेले
स्वर्गनिवासी आपल्या शुद्ध सहचारिणींसमवेत तिथल्या कक्षांमध्ये
राहतील. ७३ तुमच्या पालनकर्त्याच्या कुठल्या कृपेला तुम्ही नाकाराल?

७४ त्यांना त्याच्यापूर्वी ना जिन्नचा ना माणसाचा स्पर्श झालेला असेल.
७५ तुमच्या पालनकर्त्याचे कुठले उपकार तुम्ही नाकाराल? ७६ स्वर्गात
त्यांना विसावा द्यायला उंची गालीचे आणि हिरव्या उशा असतील.
७७ तुमच्या पालनकर्त्याच्या कुठल्या कृपेला तुम्ही नाकाराल? ७८ तुमच्या
अधिपतीचे नाव सर्वश्रेष्ठ आहे. तो विजयी आणि सर्वशक्तिमान आहे.

प्रकरण ५६ : अटळ प्रसंग (अल्-वाकिआ)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ज्या दिवशी ती अटळ घटना घडेल २ त्या दिवशी ही अटळ घटना
नाकारणारे कुणीही नसेल. ३ त्या दिवशी काहींना अपमानित केले जाईल
तर काहींना सन्मानित केले जाईल. ४ ज्या दिवशी पृथ्वीचा भयंकर थरकाप
उडेल, ५ आणि पर्वतांच्या ठिकऱ्या होऊन ६ त्यांचे कण धुलीकणांसारखे
विखुरले जातील ७ त्या दिवशी तुम्ही तीन गटात विभागले जाल.[अ]

८ पहिला गट असेल उजव्या बाजूचा-हा गट किती सौभाग्यशाली

[अ] सध्याच्या जगात माणूस असा विचार करतो की तो आपल्या मर्जीनुसार वागायला स्वतंत्र आहे. त्यामुळे पुढील जगात जबाबदारीची भावना त्याच्या मनावर परिणाम करत नाही. पण दुसऱ्या जगाची निर्मिती सध्याच्या जगाच्या निर्मितीइतकीच शक्य आहे. जेव्हा ती वेळ येईल तेव्हा संपूर्ण व्यवस्था उलटली जाईल. जे लोक उच्च स्थानावर होते ते खाली जातील आणि जे खालच्या स्थानावर होते ते वरच्या स्थानावर दिसतील. त्यावेळेस माणसांची तीन गटात विभागणी केली जाईल: ईश्वरी कार्यात पुढाकार घेणारे, उजव्या हाताचे लोक (अर्थात नेहेमी सरळ वागणारे, ज्यांचे कर्मपत्र उजव्या हातात दिले जाईल) आणि डाव्या हाताचे लोक (अर्थात नेहेमी वाकडे वागणारे, ज्यांचे कर्मपत्र डाव्या हातात दिले जाईल).

असेल. ९ दुसरा गट असेल डाव्या बाजूचा–हा गट किती दुर्दैवी असेल. १० तिसरा गट या दोन्ही गटांच्या पुढे असेल. ११ या गटातील लोक ईश्वराच्या सगळ्यात समीप असतील. १२ ते ऐश्वर्यसंपन्न स्वर्गात राहतील. १३ तिथे आधीच्या श्रद्धावंतांपैकी अनेकजण असतील, १४ तर नंतरच्या पिढ्यांपैकी फार थोडे असतील. १५ सोन्याचा मुलामा दिलेल्या व उंची रत्नांनी मढवलेल्या आसनांवर ते आराम करतील. १६ रांगेत ठेवलेल्या आसनांवर समोरासमोर बसून ते आराम करतील. १७ चिरतरुण मुले तिथे त्यांची मेजवानीसाठी वाट पहात असतील. १८ शुद्ध मद्याने भरलेले घडे व पेले ते त्यांना पुरवतील. १९ त्या मद्याने त्यांना ना डोकेदुखी जडेल ना नशा चढेल. २० तिथे त्यांच्या निवडीची फळेही असतील. २१ त्यांना हव्या असलेल्या पक्ष्यांचे मांसही मिळेल. २२ टपोऱ्या डोळ्यांच्या तरुणी, २३ ज्या शिंपल्यातल्या मोत्यांसारख्या सुंदर असतील. २४ तो त्यांच्या सत्कृत्यांचा मोबदला असेल. २५ तिथे त्यांना कधीही व्यर्थ किंवा दुष्ट बोल ऐकावे लागणार नाहीत. २६ फक्त शांतीचे... अथांग शांतीचे शब्द त्यांच्या कानावर पडतील.

२७ उजव्या हाताला असणारे लोक किती सुदैवी आहेत! २८ त्यांच्या आसपास काटेरहित बोरीवृक्ष असतील २९ आणि घडांनी लगडलेल्या केळीच्या बागा असतील. ३० त्यांच्या वास्तव्याच्या ठिकाणी सावली पसरलेली असेल. ३१ तिथे वाहते पाणी असेल. ३२ तिथे सर्व प्रकारची फळे मुबलक प्रमाणात असतील. ३३ तिथे त्यांना चिरंतन, अनिर्बंध आनंद मिळेल. ३४ त्यांच्या विसाव्यासाठी शाही आसने असतील. ३५ आम्ही त्यांच्यासाठी परिपूर्ण तरुणी बनवल्या आहेत. ३६ आम्ही त्यांना कुमारिका बनवले आहे. ३७ या त्यांच्या सहचारिणी प्रेमळ व साजेशा वयाच्या असतील. ३८ हे सगळे उजव्या बाजूच्या लोकांसाठी असेल.

३९ त्यात आधीच्या काळातील लोकांचा मोठा गट असेल ४० आणि
नंतरच्या काळातील लोकांचा मोठा गट असेल.

४१ डाव्या बाजूचे लोक किती दुर्दैवी आहेत! ४२ त्यांना होरपळणाऱ्या
वाऱ्यात आणि उकळत्या पाण्यात रहावे लागेल. ४३ त्यांना काळ्या
धुराच्या सावटाखाली रहावे लागेल. ४४ त्यांच्या आजूबाजूचे वातावरण
ना थंड असेल ना ताजेतवाने. ४५ हे लोक यापूर्वी (केवळ) सुखसमृद्धीत
धुंद असे जीवन जगत होते. ४६ तेव्हा हट्टीपणाने ते दुराचार करत राहिले.
४७ ते विचारत असत, "काय! आमच्या मृत्यूनंतर आणि हाडे धुळीस
मिळाल्यानंतर आम्हाला खरेच पुन्हा जिवंत केले जाईल? ४८ आणि
आमच्या पूर्वजांनाही?" ४९ त्यांना सांगा, "खरेच, आधीच्या लोकांना
आणि नंतरच्या लोकांना पुन्हा एकदा जिवंत केले जाईल. ५० एका निर्धारित
दिवशी आणि निर्धारित वेळी त्यांना खरोखर एकत्र बोलावले जाईल.
५१ त्यावेळेस सत्य नाकारणाऱ्या आणि वाट चुकलेल्या तुम्हा लोकांना
५२ जक्कुम वृक्षाची काटेरी फळे खावी लागतील ५३ आणि त्याने आपले
पोट भरावे लागेल. ५४ त्यावर उकळते पाणी प्यावे लागेल, ५५ तहानलेल्या
उंटाने पाणी प्यावे तसे तुम्हाला ते पाणी प्यावे लागेल." ५६ निवाड्याच्या
दिवशी त्यांचा असा पाहुणचार केला जाईल.

५७ आम्ही तुम्हाला निर्माण केले आहे, हे सत्य तुम्ही का स्वीकारत
नाही? ५८ तुम्ही याचा कधी विचार केला आहे का, जे वीर्य तुम्ही
शरीराबाहेर टाकता ५९ त्याद्वारे (मानवाची) निर्मिती तुम्ही करता की त्याची
निर्मिती करणारे आम्ही आहोत? ६० तुमच्यासाठी मृत्यू अटळ ठरवणारे
आम्ही आहोत आणि आम्हाला त्यापासून कुणीही रोखू शकत नाही.
६१ तुमच्या जागी आम्ही तुमच्यासारख्याच इतरांना आणू शकतो किंवा
तुमचा आकार बदलून पुनर्निर्मिती करू शकतो, ज्याविषयी (सध्या) तुम्ही

अनभिज्ञ आहात. ६२ पहिल्या निर्मितीची तुम्हाला नक्कीच माहिती आहे. तरीही तुम्ही त्यापासून बोध का घेत नाही? ६३ तुम्ही जे पेरता त्या पिकाचा कधी विचार केला आहे? ६४ त्याची वाढ तुम्ही घडवता की आम्ही? ६५ आमची इच्छा झाली असती तर आम्ही तुमचे पीक वाळवले असते. त्यामुळे तुम्ही शोक करू लागला असता: ६६ "आम्ही उध्वस्त झालो आहोत, ६७ पुरते वंचित झालो आहेत." ६८ तुम्ही पिता त्या पाण्याचा कधी विचार केला आहे? ६९ ढगांमधून त्याचा वर्षाव तुम्ही घडवता की आम्ही? ७० आमची इच्छा असती तर आम्ही ते नक्कीच खारट केले असते. तरीही तुम्ही कृतज्ञ का रहात नाही? ७१ तुम्ही जो अग्नी प्रज्वलित करता त्याचा कधी विचार केला आहे? ७२ त्यासाठी इंधन म्हणून लागणाऱ्या झाडांची निर्मिती तुम्ही करता की आम्ही? ७३ झाडांना आम्ही तुमच्यासाठी बोधदायक आणि वाटसरूंसाठी लाभदायक बनवले आहे. ७४ तेव्हा सर्वश्रेष्ठ अशा तुमच्या पालनकर्त्याचे स्तुतिगान करा.

७५ मी ताऱ्यांच्या मावळतीची शपथ घेऊन सांगतो. ७६ ही खरोखर फार महान शपथ आहे, पण हे तुम्हाला कळेल तर ना... ७७ हे खरोखर थोर कुरआन आहे. ७८ ते सुरक्षितपणे या ग्रंथात जतन करून ठेवले आहे. ७९ मनाने पवित्र, शुद्ध असणारेच फक्त याला स्पर्श करू शकतात. ८० विश्वाच्या अधिपतीकडून साकार झालेला हा आविष्कार आहे. ८१ तुम्ही त्याची अवहेलना, अवमान कसा करू शकता? ८२ याला खोटे ठरवणे हे तुमच्या उदरनिर्वाहाचे साधन बनले आहे का?

८३ जेव्हा मरणाच्या दाराशी असलेल्याचा प्राण कंठाशी येतो, ८४ तेव्हा तुम्ही असहाय्यपणे इकडेतिकडे पाहत असता. ८५ तेव्हा तुम्हाला दिसत नसले तरी आम्ही तुमच्यापेक्षाही मरणाऱ्याच्या जास्त जवळ असतो. ८६ तुम्ही आमच्या आज्ञेचे ताबेदार नसाल, ८७ आणि तुमच्या या दाव्यात

तथ्य असेल तर मेलेल्याचे प्राण तुम्ही परत का आणू शकत नाही? ८८ मरणारी व्यक्ती ईश्वराभिमुख असेल तर ८९ तिला दिलासा लाभेल आणि आनंदाच्या बगीच्यात प्रवेश मिळेल. ९० ती उजव्या बाजूच्या लोकांमध्ये असेल तर ९१ त्या बाजूच्या लोकांकडून "तुम्हाला शांती लाभो!" या अभिवादनासह तिथे स्वागत होईल. ९२ पण ती व्यक्ती सत्य नाकारून मार्गभ्रष्ट झाली असेल तर ९३ उकळत्या पाण्याने तिचे स्वागत होईल. ९४ तिला नरकाग्नीत होरपळावे लागेल. ९५ हे अटळ सत्य आहे. ९६ तेव्हा सर्वश्रेष्ठ अशा तुमच्या अधिपतीचे गुणगान करा.

प्रकरण ५७ : लोह
(अल्-हदीद)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ आकाश आणि पृथ्वीवरची प्रत्येक गोष्ट ईश्वराचे स्तुतिगान करते. तो सर्वशक्तिमान, सुज्ञ आहे. २ आकाश आणि पृथ्वी एकाधिकाराने त्याच्या नियंत्रणात आहे. तो जीवन देतो आणि मृत्यू आणतो. सगळ्या गोष्टींवर त्याची सत्ता आहे. ३ या चराचर सृष्टीत तोच पहिला आणि तोच शेवटचा आहे. तो आत आहे आणि बाहेरही आहे. त्याला सगळ्या गोष्टींचे ज्ञान आहे. ४ सहा कालावधीत आकाश आणि पृथ्वी निर्माण करून त्यांच्या सिंहासनावर आरूढ होणारा ईश्वर आहे. पृथ्वीवर काय प्रवेशते आणि तिच्यातून काय बाहेर पडते हे तो जाणतो. तसेच आकाशातून खाली काय येते आणि खालून वर काय जाते हेही तो जाणतो. तुम्ही जिथे असाल तिथे तो तुमच्याबरोबर आहे. तुमची सगळी कृत्ये तो पाहतो. ५ आकाश आणि पृथ्वीची स्वायत्तता त्याची आहे. सगळ्या गोष्टी परत त्याच्याकडे

जाणार आहेत. ६ तो दिवसामागून रात्र आणि रात्रीमागून दिवस आणतो.
माणसाच्या मनातल्या गोष्टी तो जाणतो.

७ ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितावर श्रद्धा ठेवा आणि त्याने तुम्हाला
ज्या संपत्तीचे विश्वस्त बनवले आहे त्या संपत्तीतून दानधर्म करा.
तुमच्यापैकी जे दानधर्म करतील आणि श्रद्धा ठेवतील त्यांना उत्कृष्ट
मोबदला मिळेल. ८ तुम्ही ईश्वरावर श्रद्धा न ठेवायचे कारण काय आहे,
जेव्हा त्याचा प्रेषित तुम्हाला त्याच्यावर श्रद्धा ठेवायचे आवाहन करतो
आहे? या अगोदरच ईश्वराने तुमच्याकडून तसे वचन घेतले आहे. तुम्ही
सच्चे श्रद्धावंत आहात की नाही? ९ तुम्हाला अंधारातून प्रकाशाकडे
आणण्यासाठी सुस्पष्ट साक्षात्कारांसह आपल्या सेवकाला पाठवणारा तो
ईश्वर आहे. ईश्वर खरोखर तुमच्या बाबतीत कनवाळू, दयाळू आहे.
१० आकाशाचा आणि पृथ्वीचा वारसदार एकमेव ईश्वर असताना, तुम्ही
ईश्वरी कार्यासाठी का धन खर्च करत नाही? जे विजय मिळवण्यापूर्वी
ईश्वरी कार्यासाठी लढतात आणि धन खर्च करतात, त्यांचा दर्जा विजय
मिळाल्यानंतर ईश्वरी कार्यासाठी लढणाऱ्यांपेक्षा आणि खर्च करणाऱ्यांपेक्षा
वरचढ आहे. तरीही ईश्वराने तुम्हा सगळ्यांना चांगला मोबदला द्यायचे
वचन दिले आहे. तुमच्या सगळ्या कृत्यांविषयी तो जागरूक आहे.

११ ईश्वराला घसघशीत कर्ज कोण देईल? ईश्वर त्याच्या संपत्तीत
दुपटीने वाढ करेल आणि त्याला उत्कृष्ट मोबदला देईल. १२ हे प्रेषिता!
निवाड्याच्या दिवशी तुम्हाला श्रद्धावंत स्त्री-पुरुषांच्या समोर व उजव्या
बाजूला प्रकाशाची तिरीप दिसेल आणि त्यांच्या कानावर एक आवाज
पडल्याचे तुम्हाला ऐकू येईल, "आज तुमच्यासाठी शुभवार्ता आहे.
ज्यामधून नद्या वाहत आहेत अशा बगीच्यांमध्ये तुम्ही प्रवेश कराल आणि
तिथेच कायम वास्तव्य कराल. हा तुम्हाला मिळालेला सर्वोच्च विजय

आहे.” [१३] त्या दिवशी दांभिक स्त्रिया-पुरुष श्रद्धावंतांना विनंती करतील, “आमच्यासाठी थोडेसे थांबा, म्हणजे आम्हालाही तुमच्यातला थोडासा प्रकाश मिळेल.” पण त्यांना ऐकवले जाईल, “माघारी फिरा आणि इतरत्र प्रकाशाचा शोध घ्या.” त्यानंतर त्या दोन्ही गटांच्या मधोमध एक भिंत उभी केली जाईल. त्याला एक प्रवेशद्वार असेल-दरवाज्याच्या आत ईश्वरी कृपा व दया असेल तर बाहेर शिक्षा असेल. [१४] त्या दिवशी दांभिक श्रद्धावंतांना विचारतील, “आम्ही तुमच्या बाजूला नव्हतो का?” श्रद्धावंत उत्तर देतील, “होय, पण तुम्ही मोहाला बळी पडलात, श्रद्धेपासून दूर गेलात आणि ईश्वरी आज्ञेची अंमलबजावणी होईपर्यंत त्यावर शंका घेत आणि स्वतःच्या मनाप्रमाणे वागत स्वतःची फसवणूक करत राहिलात. त्यानंतर सैतानाने ईश्वराविषयी तुमची दिशाभूल केली.” [१५] तेव्हा आजच्या दिवशी ना तुमच्याकडून, ना सत्य नाकारण्यावर ठाम असणाऱ्यांकडून मुक्तिदंड स्वीकारला जाईल. नरकाग्नी हेच तुमचे निवासस्थान असेल. अग्नी तुमचा सोबती असेल आणि तुमच्या असहाय्य प्रवासाचा तो शेवट असेल.

[१६] श्रद्धावंतांसाठी ती वेळ आली नाही का, की विनम्र मनाने त्यांनी ईश्वराच्या स्मरणात आणि सत्याच्या प्रकटीकरणात रंगून जावे? त्यांच्या आधी ज्यांना हा ग्रंथ दिला गेला त्यांची मने कालांतराने कठोर बनली. त्यांच्यापैकी बरेचजण आज्ञा न पाळणारे होते. श्रद्धावंतांनी त्यांच्यासारखे होऊ नये. [१७] मृत धरतीला ईश्वर पुन्हा एकदा चैतन्य देतो याचे स्मरण ठेवा. आमचे संकेत तुम्हाला पूर्णपणे कळावेत म्हणून आम्ही ते सुस्पष्ट केले आहेत.

[१८] दानधर्म करणाऱ्या आणि ईश्वराला भरघोस कर्ज देणाऱ्या स्त्री-पुरुषांच्या संपत्तीत कैकपटींनी वाढ होईल आणि त्यांना सन्माननीय मोबदला मिळेल. [१९] ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितावर श्रद्धा ठेवणारे

ईश्वराच्या नजरेतून सत्यप्रिय आणि सत्याचे साक्षीदार आहेत. त्यांना त्यांचा मोबदला आणि त्यांचा प्रकाश मिळेल. पण सत्य नाकारणाऱ्यांच्या आणि आमचे संकेत खोटे ठरवणाऱ्यांच्या नशिबी नरक येईल.

२० याचा कधीही विसर पडू देऊ नका की ऐहिक जगातले आयुष्य हा फक्त एक खेळ, मनोरंजन आणि शोभेचा देखावा आहे. परस्परांवर बढाई मारण्याचा व संतती-संपत्तीत एकमेकांपेक्षा वरचढ ठरण्याचा प्रयत्न आहे. हे जीवन पावसानंतर उगवणाऱ्या शेतीसारखे आहे. शेती पाहून शेतकरी प्रसन्न होतो. पण कालांतराने ती सुकून जाते, पिवळी पडते आणि निर्जीव होते. मृत्युपश्चात जीवनात एक तर भयंकर शिक्षा आहे किंवा ईश्वराची क्षमाशीलता आणि दाद आहे. ऐहिक जीवन ही निव्वळ फसवणूक आहे. २१ तुमच्या पालनकर्त्याच्या क्षमाशीलतेसाठी आणि आकाश व पृथ्वीच्या एकंदर आकारमानाइतक्या विस्तीर्ण असलेल्या स्वर्गाच्या प्राप्तीसाठी एकमेकांशी चढाओढ करा. ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितावर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी स्वर्ग सज्ज ठेवलेला आहे. अशी आहे ईश्वराची कृपा! त्याच्या मनाला येईल त्याला तो आपल्या कृपेचा प्रसाद देतो. त्याची कृपा अमर्याद आहे.

२२ तुमच्यावर किंवा पृथ्वीवर कुठलाही दुर्दैवी प्रसंग तोपर्यंत ओढवत नाही जोपर्यंत तो अस्तित्वात येण्यापूर्वी आम्ही ग्रंथात आदेश नोंदवत नाही. हे करणे ईश्वरासाठी अगदी सोपे आहे. २३ तेव्हा तुमच्यापासून जे हिरावले गेले त्याचे दुःख करू नका की तुम्हाला जे मिळाले त्याने हुरळून जाऊ नका. ईश्वराला गर्विष्ठ, बढाईखोर लोक अप्रिय आहेत. २४ स्वतः दुःखी होऊन इतरांनाही दुःखी करणारे लोक त्याला अप्रिय आहेत. ईश्वराकडे पाठ फिरवणाऱ्याने लक्षात ठेवावे, ईश्वर एकटा स्वयंपूर्ण आणि स्तुतीचा हक्कदार आहे.

२५ आम्ही आमच्या प्रेषिताबरोबर सत्याचा पुरावा पाठवला आणि
लोकांनी न्यायाने वागावे यासाठी त्याच्याबरोबर हा ग्रंथ आणि न्यायाचा
तराजूही पाठवला. आम्ही लोह त्याच्या प्रचंड सामर्थ्यासह आणि
मानवजातीसाठी त्याच्या अनेक फायद्यांसह पाठवले. ईश्वराला न
पाहताही जे त्याला समर्पित होतात व त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन
करतात त्यांना ओळखता यावे म्हणून आम्ही ही सगळी कृपा पाठवली.
ईश्वर सर्वशक्तिमान आणि सर्वश्रेष्ठ आहे.
२६ आम्ही नोहाला व अब्राहामला प्रेषित म्हणून पाठवले आणि त्यांच्या
वंशजांना प्रेषित्वपद व पवित्र ग्रंथ दिला. त्यांच्यापैकी काहींना योग्य
मार्गदर्शन लाभले होते तर काहीजण आज्ञा मोडणारे होते. २७ त्यांच्यानंतर
त्यांच्या पावलांवर पाऊल ठेवून आम्ही आमचे इतर प्रेषित पाठवले आणि
त्यांच्यानंतर मेरीपुत्र येशूला पाठवले. आम्ही त्याला बायबल हा ग्रंथ दिला
आणि त्याचे अनुसरण करणाऱ्यांच्या मनात दया व करुणा जागवली.
पण आम्ही त्यांच्यासाठी वैराग्य नेमून दिले नव्हते. तो त्यांनी स्वतःच
लावलेला शोध होता, त्यायोगे त्यांना ईश्वराला प्रसन्न करून घ्यायचे
होते. पण त्यांनी त्याचे जसे हवे होते तसे पालन केले नाही. तेव्हा
त्यांच्यापैकी जे सच्चे श्रद्धावंत होते त्यांनाच आम्ही उत्कृष्ट मोबदला
दिला. त्यांच्यापैकी बरेचजण आज्ञा न पाळणारे होते.
२८ श्रद्धावंतांनो! ईश्वराला घाबरून रहा आणि त्याच्या प्रेषितावर
विश्वास ठेवा. तो तुमच्यावर दामदुप्पट कृपा करेल आणि चालायला
प्रकाशाची वाट दाखवेल. ईश्वर तुम्हाला क्षमा करेल. तो क्षमाशील आणि
दयाशील आहे. २९ ग्रंथधारकांनी हे लक्षात ठेवावे की ईश्वरी कृपा मिळणे
हा त्यांचा हक्क नाही. कृपा करण्याचा हक्क सर्वस्वी ईश्वराचाच आहे.
त्याच्या मनात येईल त्याच्यावर तो कृपा करतो. ईश्वराची कृपा खरोखर
असीम आहे.

प्रकरण ५८ : गाऱ्हाणे
(अल्-मुजादला)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हे प्रेषिता! त्या स्त्रीचे बोलणे आम्ही खरोखर ऐकले आहे जी
तुमच्यासमोर पतीचे गाऱ्हाणे मांडत होती आणि ईश्वराकडे तक्रार करत
होती. तुम्हा दोघांमधले बोलणे ईश्वराने ऐकले आहे. ईश्वर सगळे
ऐकणारा, सगळे पाहणारा आहे.
२ "तू माझ्या मातेसारखी आहेस" असे म्हणून जे आपल्या पत्नींपासून
विभक्त होतात त्यांनी हे लक्षात घ्यावे की माता म्हटल्याने त्या तुमच्या
माता ठरत नाहीत. ज्यांनी त्यांना जन्म दिला त्याच केवळ त्यांच्या माता
होत. ते खरोखर खोटे, अपशब्द उच्चारत आहेत. ईश्वर पापनिवारक,
क्षमाशील आहे. ३ पत्नीला मातेसमान लेखून जे तिला आपल्यापासून
वेगळे करतात आणि नंतर आपला निर्णय मागे घेऊ इच्छितात, तर त्या
जोडप्याने पुन्हा एकमेकांना स्पर्श करण्यापूर्वी एका गुलामाची मुक्तता
करावी. ही तुम्हाला दिलेली आज्ञा आहे. तुम्ही जे करता ते सगळे ईश्वर
चांगलेच जाणतो. ४ ज्यांना हे शक्य नसेल त्या जोडप्याने एकमेकांना पुन्हा
स्पर्श करण्यापूर्वी सलग दोन महिने उपवास धरावा आणि ज्यांना हेही
शक्य नसेल त्यानी साठ गरजू व्यक्तींना जेवू घालावे. हा आदेश तुमची
ईश्वरावरची व त्याच्या प्रेषितावरची श्रद्धा अधिक बळकट करण्यासाठी
आहे. या मर्यादा ईश्वराने घालून दिल्या आहेत. सत्य नाकारणाऱ्यांना
वेदनादायी शिक्षेला सामोरे जावे लागेल.
५ ईश्वराला आणि त्याच्या प्रेषिताला विरोध करणाऱ्यांना अपमानित
केले जाईल, जसे त्यांच्या पूर्वजांना केले होते. आम्ही तसे स्पष्ट

साक्षात्कार पाठवले आहेत. सत्य नाकारणाऱ्यांसाठी अपमानकारक शिक्षा वाढून ठेवलेली आहे. ६ त्या दिवशी ईश्वर मृतांना जिवंत करेल आणि त्यांना त्यांच्या कर्माची समज देईल. ईश्वराने प्रत्येक गोष्टीची दखल घेतलेली आहे, अगदी त्यांना विसर पडलेल्या त्यांच्या विचारांचीही. कारण ईश्वर सगळ्या गोष्टींचा साक्षीदार आहे.

७ आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे ईश्वर जाणतो हे तुम्हाला कळत नाही का? कुणाही तिघांच्यातली बातचीत गुप्त नसते, तो चौथा त्यात असतो. कुणाही पाचजणांच्यातली बातचीत गुप्त नसते, तो सहावा त्यात असतो. यापेक्षा कमी-अधिक जणांमधली बातचीतही गुप्त नसते. ते कुठेही असोत, ईश्वर त्यांच्यामधे असतो. अखेरीस निवाड्याच्या दिवशी तो त्यांना त्यांच्या वागणुकीतले सत्य दाखवून देईल. कारण सगळ्या गोष्टींचे समग्र ज्ञान त्याच्याकडे आहे. ८ हे प्रेषिता! तुम्ही त्यांना जाणत नाही का, ज्यांना गुप्त मसलत करायला मनाई केली असतानाही त्याच्या उलट वागतात आणि त्याच गोष्टी करतात? ते आपल्या अपराधांची, प्रेषिताबरोबरच्या आक्रमक वर्तनाची आणि त्याच्या अवज्ञेची गुप्त चर्चा करण्यात व्यस्त राहतात. तुमच्यासमोर येताच अशा शब्दात अभिवादन करतात, जे शब्द ईश्वर कधीही उच्चारत नाही आणि मनातल्या मनात आश्चर्य व्यक्त करतात, "आमच्या या बोलण्याबद्दल ईश्वर आम्हाला शिक्षा का करत नाही?" नरक हीच त्यांच्यासाठी योग्य शिक्षा असेल. तिथल्या आगीत ते होरपळतील. हे त्यांचे अटळ दुर्दैव आहे!

९ श्रद्धावंतांनो! आपसात चर्चा करताना अपराध, नियमांचे उल्लंघन आणि प्रेषिताची अवज्ञा यांचे समर्थन करणारे शब्द बोलू नका. तसे सदाचाराच्या सद्गुणाला प्रोत्साहित करणारी चर्चा करा. ईश्वराला घाबरून

रहा, ज्याच्यासमोर तुम्ही सगळ्यांना एकत्र यायचे आहे. १० दुष्ट हेतूने
केलेली कारस्थाने हे सैतानाचे काम आहे. याद्वारे तो श्रद्धावंतांना दुःख देऊ
इच्छितो. पण ईश्वराची इच्छा असल्याशिवाय तो त्यांना तीळमात्र अपाय
करू शकत नाही. तुम्ही जे करता ते सगळे तो जाणतो.
११ श्रद्धावंतांनो! तुमच्या सभेत एकमेकांना जागा करून द्यायला
सांगितले तर तसे करा, म्हणजे ईश्वर तुम्हाला जागा देईल. तुम्हाला उभे
रहायला सांगितले तर तसे करा, म्हणजे तुमच्यापैकी ज्यांना ज्ञान दिले गेले
आणि त्यावर ज्यांनी विश्वास ठेवला त्यांचा दर्जा ईश्वर उंचावेल. तुमचे
सगळे कर्म तो चांगलेच जाणतो.
१२ श्रद्धावंतांनो! प्रेषिताशी खाजगीत संभाषण करायला याल तेव्हा
आधीच काही दानधर्म करा. ते तुमच्यासाठी सर्वोत्तम असून याने तुमच्या
मनाची शुद्धी साधेल. पण तुमच्याकडे दानधर्म करण्यासाठी काही नसेल
तर लक्षात ठेवा, ईश्वर क्षमाशील आणि दयाशील आहे. १३ प्रेषिताशी
खाजगीत संभाषण करण्यापूर्वी दानधर्म करू शकणार नाही अशी भीती
वाटते का तुम्हाला? तुम्ही तसे करायला असमर्थ असाल तर लक्षात ठेवा,
ईश्वराने तुमच्यावर दया केली आहे. त्यानंतर प्रार्थना करत रहा, निर्धारित
दानधर्म करत रहा आणि प्रेषिताच्या आणि ईश्वराच्या आज्ञेचे पालन करत
रहा, ईश्वर तुमची सगळी कर्मे जाणतो.
१४ ज्यांनी ईश्वराचा रोष ओढवून घेतला आहे अश्यांशी मैत्री
करणाऱ्यांना तुम्ही पाहिले नाही का? ते ना तुमच्याबरोबर आहेत ना
त्यांच्याबरोबर. त्यांनी स्वेच्छेने खोटेपणाला आपलेसे केले आहे.
१५ ईश्वराने त्यांच्यासाठी कठोर शिक्षा तयार ठेवली आहे. त्यांनी जे काही
केले आहे ते नक्कीच अपकृत्य आहे. १६ आपल्या दुष्कृत्यांवर पांघरूण
घालण्यासाठी त्यांनी शपथांचा वापर केला आहे आणि इतरांना ईश्वराच्या
मार्गापासून दूर नेले आहे. अवमानकारक शिक्षा त्यांची वाट पहात आहे.

१७ ईश्वरी कोपापासून वाचवण्यासाठी ना त्यांची संपत्ती ना संतती
किंचितही कामी येईल. ते नरकाचे वारसदार आहेत, त्यांना कायम तिथेच
वास्तव्य करावे लागेल. १८ ज्या दिवशी ईश्वर त्यांना मृतावस्थेतून जिवंत
करेल त्या दिवशीही ते तशाच शपथा घेतील जशा तुमच्यासमोर घेत
असत. त्यांची बाजू भक्कम आहे असे त्यांना वाटत असेल, पण ते
पराभूत आहेत. १९ सैतानाने त्यांच्यावर वर्चस्व मिळवले आहे आणि
त्यांना ईश्वराचे विस्मरण घडवले आहे. त्यांनी सैतानाचा पक्ष घेतला
आहे आणि सैतानाचे सहयोगी झाल्याने ते पराभूत होतील. २० ईश्वराला
आणि त्याच्या प्रेषिताला विरोध करणारे निवाड्याच्या दिवशी अत्यंत
निंद्य अवस्थेत असतील. २१ ईश्वराचे फर्मान निघाले आहे, "मी आणि
माझे प्रेषित निश्चितच प्रबळ ठरणार आहोत." खरोखर ईश्वर सामर्थ्यवान,
सर्वशक्तिमान आहे.

२२ ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवणारे कधीही
ईश्वराला आणि त्याच्या प्रेषिताला विरोध करणाऱ्यांशी आपुलकीचे
संबंध ठेवणार नाहीत. ते त्यांचे पिता, पुत्र, बंधू किंवा जवळचे नातलग
असले तरीही. श्रद्धावंतांच्या मनावर ईश्वराने आपली श्रद्धा कोरून ठेवली
आहे आणि खुद्द स्वतःच्या चैतन्याने त्यांना सामर्थ्यशाली बनवले आहे.
ज्यामधून नद्या वाहत आहेत अशा बागांमध्ये तो त्यांना प्रवेश देईल. तिथे
त्यांचे कायमचे वास्तव्य असेल. ईश्वर त्यांच्यावर अगदी संतुष्ट आहे
आणि तेही ईश्वरावर अगदी संतुष्ट आहेत. ते ईश्वराच्या पक्षात आहेत.
ईश्वराचा पक्ष निश्चितच आनंददायी स्थितीत प्रवेश करेल.

प्रकरण ५९ : निर्वासित
(अल्-हश्र)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ आकाशातील आणि पृथ्वीवरील प्रत्येक गोष्ट ईश्वराचे स्तुतिगान
करते. तो सर्वशक्तिमान आहे, सुज्ञ आहे. २ सत्य नाकारणाऱ्या ग्रंथधारकांना
त्यांच्या घराबाहेर काढणारा ईश्वर होता. ही त्यांची पहिली हद्दपारी
होती. त्यांना घराबाहेर पडावे लागेल असे तुम्हालाही वाटले नव्हते आणि
आपले बालेकिल्ले आपले ईश्वरापासून रक्षण करतील असे त्यांनाही वाटले
होते. पण ईश्वराची शिक्षा त्यांच्यावर अशा ठिकाणाहून चालून आली
ज्याची त्यांनी अपेक्षाही केली नव्हती. अशा रीतीने ईश्वराने त्यांच्या
मनात आपला दरारा निर्माण केला. त्यामुळे त्यांनी आपल्या हातांनी स्वतः
ची घरे उध्वस्त केली. तसेच श्रद्धावंतांनीही त्यांची घरे उध्वस्त केली.
तुमच्याकडे सूक्ष्म बुद्धी असेल तर यापासून धडा घ्या.

३ ईश्वराने त्यांच्यासाठी हद्दपारीची शिक्षा निर्धारित केली नसती तर
त्याने नक्कीच त्यांना या जगात शिक्षा दिली असती. पण मृत्युपश्चात जगात
त्यांना नरकाच्या छळाला सामोरे जावे लागेल. ४ कारण ते ईश्वराच्या
आणि त्याच्या प्रेषिताच्या विरोधात गेले आहेत; ईश्वराच्या विरोधात
जाणाऱ्यांना शिक्षा करायला तो फार कठोर आहे. ५ त्यांचे जे खजूर वृक्ष
तुम्ही तोडून टाकले किंवा सुस्थितीत ठेवलेत ते सगळे ईश्वराच्या इच्छेनेच
घडले. कारण त्याला अपराध्यांना अपमानित करायचे होते.

६ ईश्वराने त्यांच्याकडून प्रेषितांना जे काही युद्धधन मिळवून दिले,
ती सगळी त्याचीच कृपा आहे. यासाठी त्यांनी उंटांवर किंवा घोड्यांवर
स्वार होऊन धावपळ केलेली नाही. ईश्वराच्या मनात येईल त्याच्यावर

तो आपल्या प्रेषिताला वर्चस्व मिळवून देतो. ईश्वर सर्वकाही करायला समर्थ आहे. ७ ईश्वराने नगरवासीयांकडून आपल्या प्रेषितांना जे काही मिळवून दिले ते ईश्वरासाठी, प्रेषितासाठी, त्यांच्या नातेवाईकांसाठी, अनाथांसाठी, गरजूंसाठी आणि वाटसरूंसाठी आहे. आधीपासूनच धनाढ्य असणाऱ्यांच्या संपत्तीत त्यामुळे भर पडू नये. प्रेषित तुम्हाला जे देईल ते घ्या, ज्याला मनाई करेल त्यापासून दूर रहा. ईश्वराला घाबरून रहा. शिक्षा देण्याच्या बाबतीत तो नक्कीच खूप कठोर आहे. ८ ज्यांना त्यांची घरेदारे व संपत्ती सोडून घराबाहेर हाकलून दिले त्या गरीब निर्वासितांसाठीही ते धन आहे. ईश्वराची कृपा व प्रसन्नता मिळवण्यासाठी त्यांनी हा त्याग केला. ते ईश्वराचे आणि त्याच्या प्रेषिताचे समर्थक आहेत. असे लोक त्याचे सच्चे सेवक असतात.

९ आधीपासूनच मदिनेत स्थायिक झालेले आणि ज्यांची ईश्वरावर दृढ श्रद्धा आहे असे लोक आसऱ्यासाठी आलेल्या स्थलांतरीतांवर प्रेम करतात आणि त्यांना मिळालेल्या लाभांची अपेक्षा धरत नाहीत. ते स्वतः जरी गरजू असले तरीही या निर्वासितांना स्वतःपेक्षा जास्त प्राधान्य देतात. लोभापासून मुक्त झालेले खऱ्या अर्थाने यशस्वी ठरतात. १० त्यांच्यानंतर श्रद्धेचा अंगीकार करणारे म्हणतात, "हे ईश्वरा! आम्हाला आणि आमच्या आधी श्रद्धा धारण करणाऱ्या आमच्या बांधवांना क्षमा कर. श्रद्धावंतांसाठी आमच्या मनात व्देष नसावा. हे प्रभू! तू खरोखर कनवाळू आणि दयाळू आहेस."

११ दांभिकपणे वागणाऱ्यांना तुम्ही पाहिले नाही का? ग्रंथधारकांपैकी आपल्या अश्रद्धाळू सोबत्यांना ते म्हणतात, "तुम्हाला नगराबाहेर हाकलून लावले तर आम्ही नक्कीच तुमच्याबरोबर येऊ. तुमच्याविरुद्ध जाऊन आम्ही कुणाचेही काही ऐकणार नाही. तुमच्याविरुद्ध युद्ध छेडले गेले तर आम्ही

तुम्हाला मदत करू.'' ते खोटारडे असल्याचा ईश्वर साक्षीदार आहे.
१२ पण त्यांना हाकलून लावले गेले तर ते त्यांच्याबरोबर असणार नाहीत.
त्यांच्यावर हल्ला झाला तर त्यांना मदतही करणार नाहीत. मदतीसाठी गेले
तरीही मदत न करता पाठ दाखवून युद्धातून पळ काढतील. तेव्हा त्यांनाच
कोणाकडूनही मदत मिळणार नाही.

१३ श्रद्धावंतांनो! त्यांच्या मनात ईश्वरापेक्षा तुमचे भय अधिक आहे.
कारण त्यांना सत्याची जाण नाही. १४ ते तुमच्याशी खुल्या मैदानात कधीही
युद्ध करणार नाहीत. फार तर अभेद्य तटबंदीआडून किंवा भिंतीआडून
तुमच्यावर हल्ला करतील. त्यांच्यात खूप वैमनस्य आहे. तुम्हाला ते
संघटित वाटतात, पण त्यांची मने विभागली गेली आहेत. याचे कारण
त्यांच्याकडे असलेला विवेकबुद्धीचा अभाव.

१५ त्यांच्या अगदी जवळच्या काळात ज्यांनी आपल्या कुकर्मांची फळे
चाखली त्यांच्यासारखीच यांचीही अवस्था होणार आहे. त्यांनाही तशीच
वेदनादायी शिक्षा मिळणार आहे. १६ ते त्या सैतानासारखे आहेत जो
माणसाला म्हणतो, ''सत्याला नकार द्या!'' पण माणसाने सत्य नाकारताच
म्हणतो, ''माझा तुमच्याशी काही संबंध नाही. मी ईश्वराला घाबरून
राहतो. तो या विश्वाचा पालनकर्ता आहे.'' १७ अशा रीतीने हे दोघेही
अखेरीस नरकाग्नीत जातील. तेच त्यांचे कायमचे निवासस्थान असेल.
कुकर्म करणाऱ्यांना असाच मोबदला मिळतो.

१८ श्रद्धावंतांनो! ईश्वराचे भय बाळगा आणि प्रत्येकाने भविष्यासाठी
आपण पुढे काय पाठवले आहे याविषयी जागरूक रहा. ईश्वराचे भय
बाळगा. तुमची कर्मे तो चांगलीच ओळखून आहे. १९ त्या लोकांसारखे
होऊ नका जे ईश्वराला विसरले आणि अखेरीस ईश्वराने त्यांना स्वतःचाच
विसर पाडला. ते बंडखोर आहेत. २० नरकातले लोक आणि स्वर्गातले
लोक एकसारखे नाहीत. स्वर्गनिवासी विजयी झालेले आहेत.

[२१] हे कुरआन आम्ही एखाद्या पर्वतावर अवतरीत केले असते तर ईश्वराच्या भयाने तुम्हाला त्याच्या ठिकऱ्या उडालेल्या दिसल्या असत्या. माणसाने चिंतन करावे यासाठी त्याच्यासमोर आम्ही असे उदाहरण ठेवतो. [२२] ईश्वर एकमेव आहे. त्याच्याशिवाय अन्य कुणीही आराध्य नाही. तो दृश्य, अदृश्य सगळे जाणतो. तो कनवाळू, दयाळू आहे. [२३] ईश्वर एकच आहे- त्याच्याशिवाय अन्य कुणीही आराध्य नाही. तो स्वायत्त, अतिशुद्ध, शांतीचा स्त्रोत, सुरक्षेचा दाता, रक्षक, सर्वशक्तिमान, ताब्यात ठेवणारा आणि सर्वोच्च असा आहे. त्यांनी ज्यांना ईश्वराचा दर्जा दिला त्यांच्यापेक्षा तो कितीतरी श्रेष्ठ आहे. तो स्तुतीचा हक्कदार आहे. [२४] तो ईश्वर आहे-तो निर्माता, उद्गाता आणि आकार देणारा आहे. त्याची नावे सर्वोत्कृष्ट आहेत. आकाश आणि पृथ्वीवरची प्रत्येक गोष्ट त्याचा स्तुतिघोष करते. तो सर्वशक्तिमान, सुज्ञ आहे.

प्रकरण ६० : जिची पारख झाली आहे (अल्-मुम्तहिना)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] श्रद्धावंतांनो! माझे आणि तुमचे शत्रू असलेल्यांशी मित्रत्वाचे संबंध ठेवू नका. तुम्ही ज्याचा स्वीकार केला ते सत्य नाकारणाऱ्यांना आणि तुम्ही तुमच्या पालनकर्त्यावर विश्वास ठेवलात, एवढ्याच कारणासाठी तुम्हाला हाकलून देणाऱ्यांना तुम्ही आपुलकीने वागवणार का? माझ्या कार्यात खडतर परिश्रम करण्यासाठी आणि माझी मर्जी संपादण्यासाठी तुम्ही आपली घरेदारे सोडलीत. असे असताना तुम्ही त्यांच्याशी गुप्तपणे मैत्री कशी करू शकता? तुम्ही काय लपवून ठेवता आणि काय प्रकट

करता ते सगळे मी जाणतो. तुमच्यापैकी जो कुणी असे वागेल तो नक्कीच सन्मार्गापासून फार दूर जाईल. [२] त्यांनी तुमच्यावर वर्चस्व मिळवले तर ते तुमच्याशी शत्रूसारखे वागतील आणि तुमच्याविरुद्ध आपले हात व जिभा परजतील. तुम्ही श्रद्धेचा त्याग करावा अशी त्यांची इच्छा आहे. [३] पुनर्निर्माणाच्या दिवशी ना तुमचे नातेवाईक ना तुमची मुलेबाळे तुमच्या मदतीला येतील. ईश्वरच तुमचा निवाडा करेल. तुमची सगळी कृती तो पाहत आहे.

[४] अब्राहाम आणि त्याचे अनुयायी यांच्यामध्ये तुमच्यासाठी खरोखर सर्वोत्कृष्ट आदर्श आहे. त्यांनी आपल्या लोकांना सांगितले, "तुमच्याशी आणि ईश्वराव्यतिरिक्त तुम्ही ज्यांची आराधना करता त्यांच्याशी आमचा काहीही संबंध नाही. आम्ही तुमचा त्याग करत आहोत. तुम्ही एका ईश्वरावर विश्वास ठेवेपर्यंत तुमच्या-आमच्यात कायम वैर आणि तिरस्कार राहील." याला अपवाद फक्त अब्राहामच्या बोलण्याचा होता. त्याने आपल्या वडिलांना सांगितले, "तुमच्यासाठी ईश्वराकडून काहीही मिळवायचे सामर्थ्य माझ्याकडे नसले तरीही तुमच्यासाठी मी ईश्वराकडे खरोखर क्षमायाचना करेन." त्यांनी ईश्वराकडे प्रार्थना केली, "हे प्रभू! आमचा तुझ्यावर भरवसा आहे. पश्चातापपूर्वक आम्ही तुझ्याकडे वळलो आहोत. अखेरीस आम्हाला तुझ्याकडेच परतायचे आहे. [५] हे प्रभू! सत्य नाकारणाऱ्यांसाठी आमच्याकडून प्रार्थना करवून घेऊ नकोस आणि आम्हाला क्षमा कर. तू एकमेव सर्वशक्तिमान, सुज्ञ आहेस." [६] ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर आशा ठेवणाऱ्यांसाठी त्यांच्यात निश्चितच चांगले आदर्श आहेत. ईश्वरापासून दूर जाणाऱ्याने लक्षात ठेवावे की ईश्वर स्वयंपूर्ण आणि स्तुत्य आहे. [७] ज्यांच्याशी तुमचे आता वैर आहे, त्यांच्या आणि तुमच्यादरम्यान ईश्वर सदिच्छा निर्माण करेल. ईश्वर सर्वशक्तिमान, अतिशय क्षमाशील आणि दयाशील आहे.

८ जे तुमच्या श्रद्धेवरून तुमच्याशी लढले नाहीत किंवा ज्यांनी
तुम्हाला तुमच्या मायभूमीतून हुसकावून लावले नाही त्यांच्याशी प्रेमाने
व न्यायाने वागायला ईश्वराने तुम्हाला मनाई केलेली नाही. ईश्वराला
न्यायप्रिय आवडतात. ९ ईश्वराने तुम्हाला फक्त त्यांच्याशी मित्रत्वाचे
संबंध ठेवायला मनाई केली आहे, जे तुमच्या श्रद्धेवरून तुमच्याशी लढले.
तुम्हाला तुमच्या मायभूमीतून काढले किंवा इतरांना त्यात मदत केली.
तुमच्यापैकी जे त्यांच्याशी मैत्रीचे संबंध ठेवतील ते खरोखर अवज्ञाकारी
आहेत.

१० श्रद्धावंतांनो! श्रद्धावंत स्त्रिया निर्वासित म्हणून तुमच्याकडे आल्यास
त्यांची पारख करा. ईश्वराला त्यांच्या श्रद्धेची पूर्ण जाणीव आहे. त्या
सच्च्या श्रद्धावंत असल्याचे आढळल्यास त्यांना सत्य नाकारणाऱ्यांकडे
पुन्हा एकदा पाठवू नका. या स्त्रिया त्यांच्यासाठी वैध नाहीत की ते
यांच्यासाठी वैध नाहीत. पण सत्य नाकारणाऱ्यांनी त्यांना दिलेली महरची
रक्कम त्यांना परत करून टाका. महरची रक्कम दिल्यानंतर तुम्ही त्यांच्याशी
विवाह केला तर तुम्हाला काही दोष लागणार नाही. सत्य नाकारणाऱ्या
स्त्रियांशी विवाहबंधन कायम ठेवू नका. त्यांना दिलेली महरची रक्कम परत
घ्या आणि अश्रद्धावंतांनीही त्यांच्यासाठी खर्च केलेली रक्कम परत मागावी.
हा ईश्वराचा न्याय आहे. तो न्यायपूर्वक तुमचा निवाडा करतो. ईश्वर
सर्वज्ञ आणि सुज्ञ आहे. ११ तुमच्या पत्नी तुम्हाला सोडून अश्रद्धावंतांकडे
गेल्यास आणि समोरच्या बाजूने एखादी महिला तुमच्याकडे आल्यामुळे
तुमच्यावर महरची रक्कम चुकती करायची वेळ आल्यास, ज्यांना त्यांच्या
पत्नींनी सोडले आहे त्यांनी महरसाठी जेवढी रक्कम आपल्या पत्नींना दिली
होती, तेवढी रक्कम तुम्ही त्यांना द्या. ज्या ईश्वरावर तुम्ही विश्वास ठेवता
त्याला घाबरून रहा.

१२ हे प्रेषिता! ज्या श्रद्धावंत स्त्रिया तुमच्याकडे येऊन अशी प्रतिज्ञा
करतील की त्या ईश्वराशिवाय अन्य कुणाची आराधना करणार नाहीत,
चोरी करणार नाहीत, व्यभिचार करणार नाहीत, त्यांच्या अपत्यांची हत्या
करणार नाहीत, जाणूनबुजून कुणाविरुद्ध कुभांड रचणार नाहीत आणि
योग्य त्या बाबतीत तुमची अवज्ञा करणार नाहीत तर त्यांच्या प्रतिज्ञेचा
स्वीकार करा. त्यांचे अपराध माफ करण्यासाठी ईश्वराकडे क्षमायाचना
करा. कारण ईश्वर क्षमाशील आहे आणि दयाशील आहे.
१३ श्रद्धावंतांनो! ईश्वराचा रोष ओढवून घेणाऱ्यांशी मित्रत्वाचे संबंध
ठेवू नका. अशा लोकांनी मृत्युपश्चात जीवनाची सगळी आशा सोडून
दिली आहे. जशी की सत्य नाकारणाऱ्यांनी आपल्या कबरींमध्ये राहून
मृत्युपश्चात जीवनाची आशा सोडून दिली आहे.

प्रकरण ६१ : रांगा
(अस्-सफ्फ)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ आकाश आणि पृथ्वीवरची प्रत्येक गोष्ट ईश्वराची स्तुती करते.
तो सर्वशक्तिमान आहे, सुज्ञ आहे. २ श्रद्धावंतांनो! तुम्ही बोलता एक
आणि करता दुसरेच, असे का? ३ तुमचे बोलणे आणि वागणे वेगवेगळे
असते याचा ईश्वराला अतिशय तिटकारा आहे. ४ ईश्वरी कार्यात परिश्रम
करण्यासाठी भक्कम भिंत असावी अशी रांग लावून उभे असणारे ईश्वराला
नक्कीच प्रिय आहेत.
५ मोझेस आपल्या लोकांना म्हणाला, "लोकहो! मी ईश्वराने
तुमच्यासाठी पाठवलेला प्रेषित आहे हे माहीत असूनही मला का दुःख

देता?" त्यांची श्रद्धा डळमळीत होताच ईश्वराने त्यांची मनेही विचलित करून टाकली. आज्ञाभंग करणाऱ्यांना ईश्वर मार्गदर्शन करत नाही.

[६] मेरीपुत्र येशू आपल्या लोकांना म्हणाला, "हे इस्राएलच्या मुलांनो! माझ्या आधी आलेल्या तोराह या ग्रंथातील सत्याला बळकटी देण्यासाठी ईश्वराने मला तुमच्याकडे पाठवले आहे. माझ्यानंतर तुमच्याकडे ङअहमदफ हा प्रेषित येईल, ही शुभवार्ताही तुम्हाला द्यायची आहे." तरीही जेव्हा तो स्पष्ट संकेत घेऊन त्यांच्याकडे आला तेव्हा ते म्हणाले, "ही निव्वळ जादू आहे." [७] ईश्वरापुढे समर्पित होण्याची आज्ञा मिळाली असता त्याच्याविषयी खोट्यानाट्या गोष्टी रचणाऱ्यांपेक्षा अधिक दुष्ट कोण असेल? ईश्वर अशा अपराध्यांना मार्गदर्शन करत नाही. [८] ते फुंकर मारून ईश्वराचा प्रकाश विझवू पाहतात. पण तो आपला प्रकाश परिपूर्ण केल्याशिवाय राहणार नाही. सत्य नाकारणाऱ्या बहुतेक लोकांना हे आवडणार नाही. [९] ईश्वरानेच आपल्या प्रेषिताला मार्गदर्शनासह आणि खऱ्या धर्मासह पाठवले हे यासाठी की तो धर्म इतर सगळ्या धर्मांपेक्षा प्रबळ ठरावा. पण बहुतेक सगळ्या अनेकेश्वरवाद्यांना हे रुचत नाही.

[१०] श्रद्धावंतांनो! वेदनादायी शिक्षेपासून वाचवणारा एक फायदेशीर मार्ग तुम्हाला सांगू का? [११] ईश्वरावर आणि त्याच्या प्रेषितावर विश्वास ठेवा व तन-मन-धनपूर्वक ईश्वरी कार्यासाठी झटा. यातच तुमचे कल्याण आहे. पण तुम्हाला याची जाण असेल तर! [१२] तो तुमचे अपराध माफ करेल आणि तुम्हाला अशा स्वर्गात प्रवेश देईल ज्यातून नद्या वाहतात. शाश्वत बागांमधल्या अप्रतिम निवासस्थानांमध्ये तो तुमचे वास्तव्य घडवेल. ही खरोखर तुमची सर्वोच्च उपलब्धी असेल. [१३] तुम्हाला हवी असलेली आणखी एक कृपाही तो तुमच्यावर करेल: ईश्वराची मदत आणि सुस्पष्ट विजय. हे प्रेषिता! श्रद्धावंतांना ही शुभवार्ता द्या.

१४ श्रद्धावंतांनो! मेरीपुत्र येशूप्रमाणे ईश्वराचे सहाय्यक बना. जेव्हा
त्याने आपल्या अनुयायांना विचारले, "ईश्वरी कार्यात मला कोण
मदत करेल?" त्यांनी उत्तर दिले, "आम्ही ईश्वराचे सहाय्यक बनू."
इस्राएलच्या संततीपैकी काहींनी त्याच्यावर विश्वास ठेवला तर काहींनी
सत्य नाकारले. श्रद्धावंतांच्या शत्रूपासून त्यांचे रक्षण केले आणि त्यांना
त्यांच्यावर विजय मिळवून दिला.

प्रकरण ६२ : साप्ताहिक प्रार्थनेचा दिवस (अल्-जुमुआ)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे ईश्वराचा
स्तुतिघोष करतात. तो स्वायत्त आहे, पवित्र आहे, सर्वशक्तिमान आहे
आणि सुज्ञ आहे. २ ईश्वराने या निरक्षर लोकांमधून त्यांच्यातीलच एक
प्रेषित घडवला. तो त्यांना ईश्वरी साक्षात्कार ऐकवतो, त्यांचे अंतःकरण
शुद्ध करतो व त्यांना या ग्रंथाची आणि शहाणपणाची शिकवण देतो.
कारण याआधी स्पष्टपणे त्यांची दिशाभूल झालेली होती. ३ (मक्केतील
लोकांशिवाय) इतर लोकांकडेही (हा संदेश पोचविण्याची त्याच्यावर
जबाबदारी आहे), ते लोक ज्यांचा (या मक्कावासीयांशी) अद्याप संबंध
आलेला नाही. ईश्वर सर्वशक्तिमान, सुज्ञ आहे. ४ ही ईश्वरी कृपा असून
ईश्वराच्या इच्छेला येईल त्याच्यावर तो ही कृपा करतो. ईश्वराची कृपा
अमर्याद आहे.

५ ज्यांच्यावर तोराह या ईश्वरी ग्रंथाची जबाबदारी सोपवली
गेली, पण त्यांनी ती पार पाडली नाही. पुस्तकांचे ओझे वाहणाऱ्या

गाढवांसारखे आहेत ते. ईश्वरी संकेतांना खोटे ठरवणारे किती
दुर्दैवी आहेत! ईश्वर अशा अपराध्यांना मार्गदर्शन करत नाही.
६ त्यांना सांगा, "हे ज्यू लोकांनो! तुम्ही ईश्वराला इतरांपेक्षा प्रिय आहात
असा तुमचा दावा असेल आणि तुम्ही सत्यप्रिय असाल तर मरणालाही
तयार रहा." ७ पण त्यांनी आपल्या हातांनी जी दुष्कृत्ये पुढे पाठवली
आहेत त्या कारणाने ते मरणाला कधीही तयार राहणार नाहीत. अशा
अपराध्यांना ईश्वर चांगलेच ओळखून आहे. ८ त्यांना सांगा, "तुम्ही
ज्याच्यापासून दूर पळत आहात तो मृत्यू लवकरच तुम्हाला गाठेल आणि
त्यानंतर तुम्हाला दृश्य-अदृश्याचे ज्ञान असलेल्या ईश्वराकडे परत आणले
जाईल. तो तुमची सगळी कर्मे जाहीर करेल."

९ श्रद्धावंतांनो! साप्ताहिक प्रार्थनेच्या दिवशी जेव्हा तुम्हाला प्रार्थनेसाठी
बोलावले जाईल, तेव्हा ईश्वराचे स्मरण करण्यासाठी सगळ्या ऐहिक
व्यापाराचा त्याग करून धाव घ्या. यातच तुमचे कल्याण आहे. पण हे
तुम्हाला कळेल तर ना! १० प्रार्थना संपताच ईश्वरी कृपेचा शोध घेण्यासाठी
सगळीकडे संचार करा म्हणजे तुमची प्रगती होईल. ११ हे प्रेषिता! तरीही
व्यापारउदीम किंवा करमणुकीचा एखादा प्रकार नजरेस पडताच तुम्हाला
तसेच तिष्ठत ठेवून जे त्याच्याकडे धाव घेतात त्यांना सांगा, "ईश्वराकडे
जो खजिना आहे तो या व्यापारउदीमापेक्षा किंवा करमणुकीपेक्षा श्रेष्ठ
आहे." ईश्वर सर्वोत्कृष्ट दाता आहे.

प्रकरण ६३ : दांभिक लोक (अल्-मुनाफिकून)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हे प्रेषिता! दांभिक लोक तुमच्याकडे येऊन म्हणतात, "तुम्ही
खरोखर ईश्वराचे प्रेषित आहात याचे आम्ही साक्षीदार आहोत." तुम्ही
खरोखर ईश्वराचे प्रेषित आहात हे ईश्वर जाणतोच. पण तो हेही जाणतो
की दांभिक लोक नक्कीच खोटारडे आहेत. २ आपल्या अपकृत्यांवर
पांघरूण घालण्यासाठी ते शपथांचा वापर करतात आणि अशा प्रकारे
इतरांना ईश्वरी मार्गापासून रोखतात. ते जे वागत आहेत ते दुष्कृत्य आहे.
३ कारण त्यांनी सुरुवातीला श्रद्धेचा स्वीकार केला आणि त्यानंतर तिचा
त्याग केला. ईश्वराने आता त्यांची मने जणूकाही मोहोरबंद करून टाकली
आहेत. त्यामुळे त्यात सत्याचा प्रवेश होऊ शकत नाही. पण त्यांना हे
कळत नाही.

४ तुम्ही त्यांना पाहता तेव्हा त्यांचे बाह्यरूप तुम्हाला चांगलेच
दिसते. ते बोलू लागताच तुम्ही लक्षपूर्वक त्यांचे बोलणे ऐकता. पण
ते भिंतीला टेकवलेल्या लाकडी ओंडक्यासारखे आहेत. ते तुमचे खरे
शत्रू आहेत. कोणताही मोठा हादरा त्यांनाच बसेल याची त्यांना भीती
वाटते. त्यांच्यापासून सावध रहा. त्यांना ईश्वराचा तळतळाट लागो! ते
किती मार्गभ्रष्ट आहेत! ५ जेव्हा त्यांना सांगितले जाते, "चला! प्रेषित
तुमच्यासाठी क्षमायाचना करेल!" तेव्हा ते माना फिरवून उद्धटपणे दूर
निघून जातात. ६ तुम्ही त्यांच्यासाठी क्षमायाचना करता काय किंवा नाही
काय, याने काहीही फरक पडत नाही. ईश्वर त्यांना क्षमा करणार नाही.
अशा विद्रोही लोकांना ईश्वर मार्गदर्शन करत नाही.

७ हे तेच लोक आहेत जे आपल्या बांधवांना म्हणतात, "ईश्वराच्या
प्रेषिताचे अनुसरण करणाऱ्यांना काहीही देऊ नका, जोपर्यंत ते प्रेषिताची
साथ सोडणार नाहीत." पण आकाश आणि पृथ्वीवरचे सगळे खजिने
ईश्वराच्याच मालकीचे आहेत; जरी दांभिकांना याची जाणीव नसली
तरीही. ८ आणि ते दांभिक (गरीब मुस्लिमांना उद्देशून बोलताना) म्हणतात,
"खरोखर, आम्ही मदिनेला परतल्यावर आमच्यासारखे सगळ्यात
सन्माननीय लोक आम्ही सगळ्यात तुच्छ लोकांना हाकलून देऊ." पण
सगळा सन्मान ईश्वरासाठी, त्याच्या प्रेषितासाठी आणि श्रद्धावंतांसाठी
आहे; पण दांभिकांना याची जाणीव नाही.

९ श्रद्धावंतांनो! तुमच्या संपत्तीमुळे किंवा संततीमुळे ईश्वराच्या
स्मरणापासून दूर जाऊ नका. असे करणारे पराभूत होणारे असतील.
१० मृत्यूची गाठ पडण्यापूर्वीच आम्ही तुम्हाला जे काही देऊ केले आहे
त्यातूनच ईश्वरी कार्यासाठी खर्च करा. अन्यथा तुम्ही म्हणाल, "हे
प्रभू! मला थोडीशी उसंत दिलीस तर मी दानधर्म करेन आणि सदाचारी
लोकांपैकी होईन." ११ पण निर्धारित वेळ येऊन ठेपल्यावर ईश्वर कुणालाही
क्षणभराचीही उसंत देत नाही. तुमचे कर्म ईश्वर चांगलेच ओळखून आहे.

प्रकरण ६४ : नफा आणि तोटा
(अत्-तगाबून)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते सगळे ईश्वराचा
स्तुतिघोष करतात. सगळीकडे त्याचीच सत्ता आहे आणि तोच सगळ्या
स्तुतीचा हक्कदार आहे. तो सर्वशक्तिमान आहे. २ तुम्हाला त्यानेच निर्माण

केले. तुमच्यापैकी काहीजण हे सत्य नाकारतात तर काहीजण त्यावर विश्वास ठेवतात. तुमच्या प्रत्येक कृतीवर ईश्वराचे लक्ष आहे. ३ त्याने एका विशिष्ट हेतूने आकाश आणि पृथ्वीची निर्मिती केली. त्यानेच तुम्हाला देह दिला आणि देहाला उत्तम आकार दिला. तुम्हा सगळ्यांना त्याच्याकडेच परतायचे आहे. ४ आकाशात आणि पृथ्वीवर जे काही आहे ते तो सगळे जाणतो. तुम्ही जे लपवता आणि उघड करता ते तो जाणतो. तुमच्या मनातल्या गोष्टीही तो ओळखतो.

५ तुमच्या आधीच्या ज्या लोकांनी सत्य नाकारले त्यांना त्यांच्या या दुष्कृत्याचे वाईट परिणाम भोगावे लागले, हे तुम्ही ऐकले नाही का? त्यांनाही अशीच वेदनादायी शिक्षा मिळेल. ६ याचे कारण म्हणजे त्यांचे प्रेषित सत्याचे सुस्पष्ट पुरावे घेऊन त्यांच्याकडे आले असता त्यांनी विचारले, "मर्त्य लोक आमचे मार्गदर्शक कसे होऊ शकतात?" या कारणाने त्यांनी सत्य नाकारले आणि त्याकडे पाठ फिरवली. ईश्वराला अशा लोकांची गरज नाही. तो स्वयंपूर्ण आणि स्तुत्य आहे.

७ सत्य नाकारणारे दावा करतात की त्यांना परत कधीही जिवंत केले जाणार नाही. त्यांना सांगा, "ईश्वराशपथ, तुम्हाला नक्कीच पुन्हा जिवंत केले जाईल आणि तुमच्या कृत्यांचा पाढा तुमच्यासमोर वाचला जाईल. ईश्वरासाठी हे फारच सोपे आहे." ८ तेव्हा ईश्वरावर, त्याच्या प्रेषितावर आणि त्याने पाठवलेल्या ज्ञानप्रकाशावर विश्वास ठेवा. ईश्वर तुमची कृत्ये चांगलीच ओळखून आहे. ९ ज्या दिवशी तो तुम्हा सगळ्यांना एकत्र करेल तो दिवस नफ्याचा आणि तोट्याचा असेल. ज्यांनी ईश्वरावर विश्वास ठेवून सत्कृत्ये केली त्यांचे अपराध माफ केले जातील आणि त्यांना अशा बगीच्यात प्रवेश दिला जाईल ज्यातून नद्या वाहतात, तिथे त्यांचा कायमचा निवास असेल. हा त्यांचा सर्वोच्च विजय असेल. १० पण सत्य

नाकारून ज्यांनी आमचे संकेत नाकारले ते नरकाग्नीचे निवासी असतील. तिथेच त्यांचा कायमचा निवास असेल. किती गलिच्छ निवासस्थान आहे हे!

११ ईश्वराच्या परवानगीशिवाय माणसावर कुठलेही संकट कोसळत नाही. त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांना तो योग्य मार्ग दाखवतो. त्याला सगळ्या गोष्टींचे ज्ञान आहे. १२ ईश्वराचे आणि त्याच्या प्रेषिताचे आज्ञापालन करा. पण त्याकडे पाठ फिरवलीत तर लक्षात ठेवा, आमचा प्रेषित फक्त आमचा संदेश पोहोचवायलाच जबाबदार आहे. १३ ईश्वर! त्याच्याशिवाय अन्य कुणी उपास्य नाही. तेव्हा श्रद्धावंतांनी त्याच्यावर भरवसा ठेवावा.

१४ श्रद्धावंतांनो! अगदी तुमच्या पत्नी आणि तुमची संतती यातही तुमचे शत्रू आहेत. तेव्हा त्यांच्यापासून सावध रहा. पण त्यांच्या अपराधांकडे दुर्लक्ष करून त्यांना क्षमा केलीत व दया दाखवलीत तर ईश्वर नक्कीच तुम्हा सगळ्यांसाठी क्षमाशील, दयाशील आहे. १५ तुमची संपत्ती व संतती ही तुमची कसोटी आहे. ईश्वराचा मोबदला यापेक्षाही महान आहे. १६ तेव्हा ईश्वराविषयी जास्तीत जास्त जागरूक रहा. त्याचा उपदेश लक्षपूर्वक ऐका, त्याच्या आज्ञेचे पालन करा आणि दानधर्म करा. यातच तुमचे कल्याण आहे. लोभावर विजय मिळवणाऱ्यांची नक्कीच भरभराट होईल. १७ ईश्वराला तुम्ही भरघोस कर्ज दिलेत तर तो कैकपटींनी मोबदला देईल. कारण तो गुणग्राहक आणि संयमी आहे. १८ ईश्वर दृश्य आणि अदृश्याचा ज्ञाता आहे. तो सर्वशक्तिमान आहे, सुज्ञ आहे.

प्रकरण ६५ : घटस्फोट (अत्-तलाक)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हे प्रेषिता! तुमच्यापैकी कुणाला आपल्या पत्नीला घटस्फोट द्यायचा असेल तर तो त्यांच्या स्वच्छतेच्या काळात द्यावा आणि त्या काळाची काळजीपूर्वक गणना करा. त्यांनी उघडपणे अनैतिक कृत्य केले नसेल तर घटस्फोटाची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्यांना घराबाहेर काढू नका व त्यांनीही आपण होऊन घर सोडून जाऊ नये. या मर्यादा ईश्वराने ठरवून दिल्या आहेत. ईश्वराने ठरवून दिलेल्या या मर्यादांचे उल्लंघन करणारा स्वतः वरच अन्याय करतो. (हे माणसा!) तू जाणत नाहीस की, ईश्वर त्यानंतर कदाचित काही नवीन (कल्याणकारी) स्थिती निर्माण करेल. २ आणि त्यांची प्रतीक्षेची मुदत संपताच सन्मानाने त्यांना ठेवून घ्या किंवा सन्मानाने स्वतःपासून दूर करा. तुमच्यातील दोन विश्वासू व्यक्तींना साक्षीदार म्हणून बोलावून घ्या आणि ईश्वराची जाण ठेवून खरी तीच साक्ष द्या. ईश्वरावर आणि अंतिम दिवसावर विश्वास ठेवणाऱ्यांसाठी हा उपदेश आहे. ईश्वराचे भय बाळगून राहणाऱ्याला तो संकटातून बाहेर पडायचा मार्ग दाखवेल. ३ ईश्वर त्याला अशा ठिकाणाहून उपजीविका देईल ज्याची त्याने कल्पनाही केली नसेल. ईश्वरावर भरवसा ठेवणाऱ्याची काळजी घ्यायला तो समर्थ आहे. ईश्वर आपली योजना नक्कीच यशस्वीपणे पार पाडेल. त्याने सर्व गोष्टींचे एक प्रमाण ठरवून दिले आहे.

४ तुमच्या पत्नींपैकी ज्यांचे मासिक पाळीचे वय सरले असेल आणि तुमच्या मनात त्यांच्याविषयी काही शंका असेल तर त्यांचा प्रतीक्षेचा कालावधी तीन महिन्यांचा आहे. ज्यांची मासिक पाळी अद्यापि सुरू

झालेली नाही त्यांची मुदतही तीन महिन्यांची आहे. गर्भवती स्त्रियांचा प्रतीक्षेचा कालावधी त्या प्रसूत होईपर्यंतचा आहे. ईश्वराची जाणीव बाळगणाऱ्यांसाठी त्याने या गोष्टी सोप्या करून ठेवल्या आहेत. ५ ईश्वराचा हा आदेश तुमच्यासमोर प्रकट झालेला आहे. ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांचे अपराध माफ केले जातील आणि त्यांना उत्कृष्ट मोबदला दिला जाईल.

६ प्रतीक्षेच्या काळात असलेल्या स्त्रियांनाही तुम्ही आपल्या ऐपतीप्रमाणे जसे राहता तसेच राहू द्या. त्रास देण्याच्या उद्देशाने त्यांचा छळ करू नका. त्या गर्भवती असतील तर प्रसूत होईपर्यंत त्यांची जबाबदारी घ्या. त्या तुमच्या अपत्याला स्तनपान देत असतील तर त्यांना त्याचा मोबदला द्या. अपत्याच्या बाबतीत सभ्यपणे परस्परांशी चर्चा करा. आपसात सहमत न झाल्यास दुसऱ्या एखाद्या स्त्रीकडून त्या अपत्याचे स्तनपान करून घ्या. ७ धनाढ्य पुरुषाने आपल्या ऐपतीनुसार खर्च करावा तर ज्याच्याकडे उत्पन्नाची साधने कमी आहेत त्याने ईश्वराने जे दिले आहे त्यातून त्याला जमेल तेवढा खर्च करावा. ईश्वराने एखाद्याला जेवढे दिले आहे त्यापेक्षा अधिक भार तो त्याच्यावर टाकत नाही. कठीण परिस्थितीनंतर ईश्वर लवकरच चांगले दिवस आणेल.

८ आपल्या पालनकर्त्याच्या आणि त्यांच्या प्रेषिताच्या आज्ञेविरुद्ध कित्येक नगरांनी विद्रोह केला. त्यांची आम्ही कठोरपणे दखल घेतली आणि त्यांना कठोर शिक्षा दिली. ९ त्यांना आपल्या वर्तनाच्या वाईट परिणामांना सामोरे जावे लागले. विनाश हाच त्यांच्या वर्तनाचा परिणाम होता. १० ईश्वराने त्यांच्यासाठी कठोर शिक्षा तयार ठेवली आहे. तेव्हा त्याची भीती बाळगा. विवेकी लोकहो! ज्यांची ईश्वरावर श्रद्धा आहे त्यांच्यासाठी ईश्वराने उपदेशग्रंथ पाठवले आहे. ११ ईश्वरावर श्रद्धा ठेवून

सत्कर्मे करणाऱ्यांना अंधारातून उजेडाकडे नेण्यासाठी आपला स्पष्ट संदेश घेऊन ईश्वराने आपला प्रेषितही पाठवला आहे. ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना तो अशा बगीच्यात प्रवेश देईल ज्यातून नद्या वाहतात. तिथेच त्यांचे कायमचे वास्तव्य असेल. खरोखर ईश्वराने त्यांच्यासाठी उत्कृष्ट मोबदला तयार ठेवला आहे.

१२ सात आकाश आणि सात पृथ्वी यांची निर्मिती करणारा ईश्वर आहे. सगळ्या गोष्टीवर ईश्वराची सत्ता आहे, हे तुम्हाला कळावे म्हणून त्याचे आदेश त्यांच्यावर अवतरीत होतात. सगळ्या गोष्टी त्याच्या ज्ञानाच्या कक्षेत येतात.

प्रकरण ६६ : प्रतिबंध (अत्-तहरीम)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हे प्रेषिता! तुमच्या पत्नींना प्रसन्न करण्यासाठी त्या गोष्टींवर प्रतिबंध का घालून घेता ज्या ईश्वराने तुमच्यासाठी वैध ठरवल्या आहेत? ईश्वर क्षमाशील आणि दयाशील आहे. २ अशा शपथांमधून मोकळे होण्याचा आदेश ईश्वराने तुम्हाला याआधीच दिलेला आहे. तो तुमचा आश्रयदाता आहे. तो सर्वज्ञ आहे, सुज्ञ आहे.

३ एकदा प्रेषिताने आपल्या पत्नींपैकी एकीला एक गोपनीय गोष्ट सांगितली. पण तिने ती गोष्ट गुप्त ठेवली नाही. ईश्वराने प्रेषिताला ही माहिती दिली. यावर प्रेषिताने तिला त्यातील काही भाग सांगितला तर काही भाग सांगायचे टाळले. ही गोष्ट कुणी सांगितली असे पत्नीने विचारताच त्याने उत्तर दिले, "सर्वज्ञ आणि सदैव जागरूक असणाऱ्या ईश्वराने

मला हे सांगितले." ४ प्रेषिताच्या पत्नींनो! तुम्ही दोघी पश्चातापदग्ध होऊन ईश्वराकडे वळाल तर किती चांगले! या अगोदरच तुमच्या मनाचा तसा कल झाला आहे. पण तुम्ही दोघी त्याच्याविरुद्ध एकमेकींना मदत कराल तर लक्षात ठेवा, ईश्वर त्याचा रक्षक आहे. त्याचबरोबर गॅब्रिएल (जिब्रील) हा ईशदूत तसेच श्रद्धावंतांपैकी सदाचाराने वागणारे लोक आणि इतर ईशदूतही त्याचे सहाय्यक आहेत. ५ प्रेषिताच्या पत्नींनो! प्रेषिताने तुम्हाला घटस्फोट दिला तर त्याचा पालनकर्ता त्याला तुमच्यापेक्षा चांगल्या पत्नी देईल. ज्या ईश्वरचरणी लीन झालेल्या, श्रद्धावंत, पवित्र, आज्ञाधारक, आराधनेत समर्पित झालेल्या, उपवास करणाऱ्या असतील. त्यात पूर्वीच्या विवाहितांचा किंवा कुमारिकांचा समावेश असेल.

६ श्रद्धावंतांनो! ज्याचे इंधन माणसे व दगड आहेत अशा नरकाग्नीपासून आपले आणि आपल्या कुटुंबियांचे रक्षण करा. कठोर आणि आडदांड ईशदूत त्याच्यावर नजर ठेवून असतील. ते कधीही ईश्वराची अवज्ञा न करता त्याच्या आज्ञेची तात्काळ अंमलबजावणी करतात. ७ तुमच्यापैकी सत्य नाकारण्यावर ठाम असणाऱ्यांनी आज कसलीही सबब पुढे करू नये. तुम्हाला तुमच्या कृत्यानुसारच मोबदला दिला जाईल.

८ श्रद्धावंतांनो! पश्चातापदग्ध होऊन प्रामाणिकपणे ईश्वराकडे वळा. म्हणजे तुमचा पालनकर्ता तुमच्या दुष्कृत्यांना क्षमा करेल आणि वाहत्या प्रवाहांनी युक्त अशा बगीच्यांमध्ये तुम्हाला प्रवेश देईल. निवाड्याच्या दिवशी ईश्वर प्रेषिताची आणि त्याचबरोबर श्रद्धा ठेवणाऱ्यांची अवहेलना करणार नाही. त्या दिवशी त्यांच्यासमोर आणि उजव्या बाजूला प्रकाश चमकत असेल. ते प्रार्थना करतील, "हे प्रभू! तुझा प्रकाश आमच्यासाठी परिपूर्ण होऊ दे. आम्हाला क्षमा कर. सगळ्यावर तुझीच सत्ता आहे."

९ हे प्रेषिता! सत्य नाकारणाऱ्यांविरुद्ध आणि दांभिकांविरुद्ध लढताना

प्रयत्नांची पराकाष्ठा करा (अधिक प्रयत्न करा.) त्यांच्याशी कठोरपणे वागा. नरकासारखे गलिच्छ ठिकाण त्यांचे निवासस्थान असेल. १० सत्य नाकारणाऱ्यांसाठी ईश्वराने नोहाच्या पत्नीचे आणि लूतच्या पत्नीचे उदाहरण दिले आहे. ईश्वराच्या दोन सदाचारी सेवकांशी त्या विवाहबद्ध झाल्या होत्या. पण त्यांनी आपल्या पतींचा विश्वासघात केला तेव्हा ईश्वराविरुद्ध जाऊन कुणीही त्यांची मदत करू शकले नाही, त्यांना सांगितले गेले, "इतरांबरोबर नरकाग्नीत प्रवेश करा."

११ सदाचारी लोकांसाठी ईश्वराने फारोच्या पत्नीचे उदाहरण दिले आहे. तिने ईश्वराकडे प्रार्थना केली, "स्वर्गात तुझ्या सान्निध्यात माझ्यासाठी एक घर बनव आणि फारोपासून व त्याच्या दुष्कृत्यांपासून माझे रक्षण कर. सगळ्या अपराध्यांपासून मला दूर ठेव." १२ ईश्वराने इमरानची मुलगी मेरी हिचेही असेच एक उदाहरण दिले आहे. तिने आपले पावित्र्य जतन केले होते. तिच्यात आम्ही आमचे प्राण फुंकले. तिने आपल्या पालनकर्त्याच्या उपदेशाचे आणि धर्मग्रंथाचे समर्थन केले. ती ईश्वराची सच्ची सेवक होती.

प्रकरण ६७ : साम्राज्य (अल्-मुल्क)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ज्याच्या हाती विश्वाचे साम्राज्य आहे तो दिव्य आहे. सगळ्यावर त्याचीच सत्ता आहे. २ तुमची पारख करता यावी, तुमच्यापैकी कोण सदाचारी आहे हे पाहता यावे म्हणून त्याने जन्म व मृत्यू यांची निर्मिती केली. ३ त्याने एकावर एक सात थर रचून सप्त आकाश निर्माण केले. असीम कृपाळू ईश्वराच्या निर्मितीत तुम्हाला कुठलाही दोष आढळणार

नाही. एकदा दोष न आढळल्यास पुन्हा एकदा पहा दिसतोय का कुठला दोष? ४ पुन्हा पुन्हा दोष शोधायचा प्रयत्न करा. तुमची नजर गोंधळून आणि थकून परत वळेल.

५ सगळ्यात खालचा आकाश आम्ही दिव्यांनी सुशोभित केला आहे. सैतानांना पिटाळून लावण्यासाठी आम्ही या दिव्यांची योजना केली आहे. धगधगत्या अग्नीची सजा आम्ही त्यांच्यासाठी सज्ज ठेवली आहे. ६ आपल्या पालनकर्त्याच्या अस्तित्वाला नाकारणाऱ्यांना नरकाग्नीची शिक्षा मिळेल. किती वाईट जागा आहे ती! ७ धगधगत्या नरकाग्नीत टाकले जाताच त्यांना तिची उसळती, रोरावती गर्जना ऐकू येईल. ८ जणूकाही तिच्या क्रोधाचा स्फोट होत आहे. प्रत्येक वेळेस एका गटाला आत टाकले जाईल आणि त्याचे रखवालदार विचारतील, "तुमच्याकडे सावध करणारा आला नव्हता का?" ९ ते म्हणतील, "अर्थात आला होता, पण आम्ही त्याला खोटे ठरवले आणि म्हटले, ईश्वराने काहीही प्रकट केलेले नाही. तू चुकीच्या मार्गाला लागला आहेस." १० आणि म्हणतील, "आम्ही त्यांचे म्हणणे ऐकले असते, समजावून घेतले असते तर आज नरकनिवासीयांमध्ये आलो नसतो." ११ अशा प्रकारे ते आपल्या पापाची कबुली देतील. ते ईश्वरी कृपेपासून दूर असतील. ते नरकनिवासी असतील.

१२ त्याचप्रमाणे जे अदृश्य ईश्वराची भीती बाळगतील त्यांना ईश्वराकडून क्षमेचा आणि उत्कृष्ट मोबदल्याचा लाभ होईल. १३ तुम्ही उघडपणे बोला की गुप्तपणे, तुमच्या मनातल्या गोष्टी तो जाणतो. १४ आपल्याच निर्मितीविषयी तो अजाण कसा असेल? तो एकमेव आहे, ज्याची बुद्धिमत्ता आणि जागरूकता सूक्ष्म आहे.

१५ पृथ्वीला तुमच्या अधीन करणारा तोच आहे ज्यामुळे तुम्ही

तिच्यावर संचार करू शकता आणि तिच्यावरील फळांचे, अन्नधान्याचे सेवन करू शकता. सर्वांचे पुनरुत्थान होऊन त्याच्याकडेच परत जायचे आहे. १६ आकाशात राहणारा ईश्वर पृथ्वीला भयकंपित करून त्याखाली तुम्हाला गाडून टाकणार नाही असे वाटते का? १७ स्वर्गात राहणारा ईश्वर तुमच्यावर दगडांचा वर्षाव करणारे तुफानी वादळ पाठवू शकणार नाही असे वाटते का? असे झाल्यावरच तुम्हाला कळेल, आमचा इशारा खरा होता ते. १८ त्यांच्या पूर्वीच्या समाजानींही सत्य नाकारले होते. नंतर आम्ही त्यांना दिलेला नकार किती कठोर होता पहा.

१९ डोक्यावर उडणारे पक्षी आपले पंख उघडतात आणि मिटून घेतात हे त्यांना दिसत नाही का? त्यांना थांबवून ठेवणारा ईश्वराशिवाय दुसरा कोणीच नाही. निःसंशय तो सगळ्यावर नजर ठेवून आहे. २० कृपावंत ईश्वराविरूद्ध जाऊन तुम्हाला मदत करणारी एखादी महासेना आहे का? सत्य नाकारणारे स्वतःची फसवणूक करून घेत आहेत. २१ ईश्वराने आपला हात आखडता घेतला तर तुम्हाला उपजीविका कोण देईल? तरीही हट्टीपणाने ते विद्रोह करत राहतात आणि सत्य टाळत राहतात.

२२ चांगला कोण आहे ज्याला पालथ्या अवस्थेत फरफटत नेले जाते तो, की ताठ मानेने सन्मार्गावरून चालतो तो? २३ त्यांना सांगा, "तुम्हाला अस्तित्व देणारा, कान, डोळे आणि मन देणारा तो ईश्वर आहे. तरीही तुम्ही कृतघ्न आहात." २४ त्यांना सांगा, "तुम्हाला पृथ्वीवर सर्वत्र विखुरणारा तोच आहे आणि पुनर्निर्माणाच्या दिवशी तुम्हा सगळ्यांना त्याच्याकडेच जायचे आहे."

२५ ते विचारतात, "तुम्ही खरे बोलत असाल तर या वचनाची पूर्तता कधी होईल?" २६ त्यांना सांगा, "फक्त ईश्वरालाच हे ठाऊक आहे. मी तर फक्त सावध करणारा आहे." २७ पण त्या वचनाची पूर्तता जवळ

येऊ लागल्याचे पाहताच सत्य नाकारणाऱ्यांचे चेहरे खिन्न होतात. त्यांना सांगितले जाते, "तुम्ही याच दिवसाची वाट पहात होतात." २८ त्यांना विचारा, "तुम्ही याचा विचार केला आहे का की ईश्वर मला आणि माझ्या अनुयायांना नष्ट करेल किंवा आमच्यावर दया दाखवेल. पण सत्य नाकारणाऱ्यांना वेदनादायी शिक्षेपासून कोण वाचवेल?" २९ त्यांना सांगा, "तो असीम कृपाळू आहे. आमचा त्याच्यावर विश्वास आहे आणि भरोसा आहे. चुकीच्या मार्गाला कोण लागले आहे हे तुम्हाला लवकरच कळेल." ३० त्यांना विचारा, "पृथ्वीवरचे सगळे पाणी तिच्या पोटात गडप झाले तर तुमच्यासाठी पेयजल कोण आणेल?"

प्रकरण ६८ : लेखणी
(अल्-कलम)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ नून. लेखणीची शपथ आणि लेखणीने लिहिल्या गेलेल्या मजकुराची शपथ! २ तुमच्या प्रभूच्या कृपेने तुम्ही वेडे नाही आहात. ३ निःसंशय तुम्हाला चिरंतन मोबदला मिळेल. ४ कारण तुमचे चारित्र्य खरोखर उदात्त आहे. ५ लवकरच तुम्हीही पहाल आणि तेही पाहतील, ६ तुमच्यापैकी कोण वेडेपणाला बळी पडला आहे ते, ७ कोण मार्गभ्रष्ट झालेला आहे आणि कोण सन्मार्गावर आहे, हे तुमचा अधिपती चांगलेच ओळखतो.

८ सत्य नाकारणाऱ्यांच्या प्रभावाखाली येऊ नका. ९ त्यांची इच्छा आहे की तुम्ही तडजोड कराल म्हणून तेही तडजोड करतील. १० सारख्या शपथा घेऊन बोलणाऱ्यांचे म्हणणे ऐकू नका. ११ निंदानालस्ती करणाऱ्यांचे किंवा अफवा पसरवणाऱ्यांचेही ऐकू नका. १२ चांगल्याच्या मार्गात अडथळे

आणणाऱ्याचे किंवा दृष्ट अवज्ञाकारीचेही ऐकू नका. १३ तो निष्ठुर आहे
आणि याशिवाय हीन चारित्र्याचा आहे. १४ याचे कारण त्याच्याकडे भरपूर
संपत्ती आणि संतती आहे १५ आमचे साक्षात्कार ऐकवले जातात तेव्हा
तो म्हणतो, "या तर प्राचीन कथा आहेत." १६ लवकरच आम्ही त्याच्या
नाकावर डाग देऊ.

१७ एका विशिष्ट फळबागांच्या मालकांची आम्ही जशी परीक्षा
घेतली तशीच यांचीही घेतली. पुढच्या दिवशी त्यांनी बागेतील फळांची
तोडणी करायचे ठरवले होते. १८ पण हे ठरवताना "ईश्वराची इच्छा
असेल तर" हे म्हणायचा त्यांना विसर पडला. १९ ते झोपेत असताना
तुमच्या पालनकर्त्याकडून त्या बागेवर एक आपत्ती आली. २० दुसऱ्या
दिवशीपर्यंत त्या बागेची अवस्था अशी झाली जणू कुणीतरी फळांची
तोडणी करून टाकली आहे. २१ दुसरे दिवशी पहाटे ते एकमेकांना हाका
मारू लागले. २२ म्हणू लागले, "सगळी फळे गोळा करायची असतील
तर लवकरात लवकर बागेत पोहोचले पाहिजे." २३ तेव्हा एकमेकांना
सांगत ते बागेकडे जाऊ लागले, २४ "आज कुणीही गरिबाला बागेत प्रवेश
द्यायचा नाही." २५ गरिबांना मनाई करायचे सामर्थ्य आपल्याकडे आहे या
विचारात पहाटेच ते घराबाहेर पडले. २६ पण बागांची अवस्था बघताच
म्हणाले, "आपण नक्कीच वाट चुकलेले दिसतोय. २७ आपला सत्यानाश
झालाय!" २८ त्यांच्यापैकी तुलनेने प्रामाणिक असणारा म्हणाला, "मी
तुला ईशस्तुती करायला सांगितले नव्हते?" २९ यावर त्यांनी ईशप्रार्थना
केली, "ईश्वराचा महिमा अगाध आहे. तोच आमचा अधिपती आहे.
आम्ही नक्कीच अपराध केला आहे." ३० पुढे ते एकमेकांवर आरोप-
प्रत्यारोप करू लागले. ३१ खेद व्यक्त करू लागले, "आमचा धिक्कार
असो! आमचे वागणे मर्यादेपलीकडे गेले होते. ३२ आम्ही आता ईश्वराकडे

वळलो आहोत. त्याने आम्हाला यापेक्षा चांगल्या बागा द्याव्यात." [३३] ही होती त्यांची या जीवनातली शिक्षा. पण मृत्युपश्चात जीवनातली शिक्षा याहून भयंकर असेल. त्यांना याची जाणीव होईल तर!

[३४] ईश्वराची जाणीव ठेवून वागणाऱ्यांना आनंदाच्या बागांचा मोबदला मिळेल. [३५] आम्ही सच्च्या श्रद्धावंतांना आणि अपराध्यांना एकसारखेच वागवावे का? [३६] तुम्हाला काय झाले आहे? किती वाईट निर्णय आहे तुमचा! [३७] तुमच्याकडे असे सांगणारा एखादा ग्रंथ आहे का, [३८] की तुम्ही ज्याची निवड कराल ते सगळे तुम्हाला मिळेल? [३९] किंवा पुनर्निर्माणाच्या दिवसापर्यंत तुम्ही ठरवाल ते सगळे तुम्हाला मिळेल असे बंधन घालणारे वचन आम्ही तुम्हाला दिले आहे का? [४०] त्यांना विचारा, "त्यांच्यापैकी कोण याची हमी देणारा आहे? [४१] की त्यांच्याकडे ईश्वराशिवायही अन्य कुणी सोबती आहेत? खरे बोलत असतील तर त्यांनी या सोबत्यांना समोर आणावे."

[४२] निवाड्याच्या दिवशी जेव्हा सत्य उघडे पडेल तेव्हा त्यांना ईश्वरासमोर नतमस्तक व्हायला सांगितले जाईल. पण ते नतमस्तक होऊ शकणार नाहीत. [४३] त्या दिवशी लज्जेने झाकोळलेल्या अवस्थेत त्यांच्या नजरा खाली वळलेल्या असतील. सुरक्षित आणि चांगल्या स्थितीत असताना त्यांना नतमस्तक व्हायची आज्ञा दिली होती, पण त्यांनी तसे केले नाही. [४४] तेव्हा हा संदेश नाकारणाऱ्यांना माझ्यावर सोडून द्या. आम्ही अशा टप्प्याटप्प्याने त्यांचा विनाश घडवून आणू, जे त्यांच्या कल्पनेच्याही पलीकडे असेल. [४५] मी त्यांना थोडी उसंत देत आहे, कारण माझी योजना शक्तिशाली आहे.

[४६] हे प्रेषिता! या कुरआनसाठी तुम्ही त्यांच्याकडे काही मोबदला मागत आहात की काय, ज्याने ते कर्जाखाली दबले जात आहेत? [४७] की

अदृश्याचे ज्ञान त्यांच्या कक्षेत असून ते लिहून घेत आहेत? ४८ हे प्रेषिता! तुमच्या पालनकर्त्याचा निवाडा होईपर्यंत संयमाने रहा. माशाने गिळलेल्या आणि त्यामुळे निराश होऊन आरडाओरड करणाऱ्या (प्रेषित यूनुससारखे) होऊ नका. ४९ त्याच्या पालनकर्त्याची त्याच्यावर कृपा झाली नसती तर तो दुःखी अवस्थेत निर्जन किनाऱ्यावर फेकला गेला असता. ५० पण ईश्वराने स्वतःसाठी त्याला निवडले आणि त्याला सदाचारी लोकांपैकी बनवले. ५१ सत्य नाकारणारे जेव्हा हा उपदेश ऐकतील तेव्हा आपल्या दृष्ट नजरांनी जणूकाही तुम्हालाही त्यापासून दूर करू पाहतील आणि म्हणतील, "हा नक्कीच वेडा आहे." ५२ हे कुरआन म्हणजे मानवजातीसाठीचा शुद्ध बोधग्रंथ आहे.

प्रकरण ६९ : अटळ वेळ (अल्-हाक्का)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अटळ वेळ! २ काय आहे ही अटळ वेळ? ३ अटळ वेळ काय आहे हे तुम्हाला कशामुळे कळेल? ४ समूद आणि आद जमातींनी त्यांच्यावर कोसळणाऱ्या दुर्दैवी प्रसंगाला नाकारले होते. ५ वादळ आणि विजांच्या एका भयानक वावटळीत समूद जमातीचा विध्वंस झाला. ६ आद जमातही एका भीषण वादळात नष्ट झाली, ७ जे ईश्वराने सतत आठ दिवस आणि सात रात्रींसाठी त्यांच्यावर पाठवले. तुम्हाला ते अशा अवस्थेत आडवे झालेले दिसतील जणूकाही खजुराच्या वृक्षांची पोकळ खोडेच पडली आहेत. ८ तुम्हाला आता त्यांचे काहीतरी अवशेष उरलेले दिसतात का? ९ फारो व त्याच्या आधीचे समाज आणि उलथवून टाकलेल्या नगरवासीयांनीही (प्रेषित लूत यांचा समाज) सातत्याने घोर अपराध केले

होते. १० त्यांनी त्यांच्या पालनकर्त्याच्या प्रेषिताची अवज्ञा केली आणि
म्हणून ईश्वराने त्यांच्यावरची पकड मजबूत करून त्यांच्यावर संकट
कोसळवले. ११ पण पाण्याची पातळी वाढताच आम्ही तुम्हाला नौकेतून
सुरक्षित ठिकाणी आणले. १२ ही घटना संस्मरणीय बनवण्यासाठी आणि
दक्ष कानांनी त्यापासून बोध घेऊन तो आपलासा करण्यासाठी आम्ही तसे
घडवून आणले.

१३ ज्या दिवशी एकदाच रणशिंग फुंकले जाईल १४ आणि पृथ्वी व
पर्वत उचलून एकाच फटक्यात चिरडले जातील १५ त्या दिवशी ती महान
घटना घडेल. १६ त्या दिवशी आकाश इतके दुर्बल होईल की ते फाटून
जाईल. १७ त्या दिवशी ईश्वराचे आठ दूत ईश्वराचे सिंहासन तोलून
धरतील. १८ त्या दिवशी तुमचा निवाडा केला जाईल आणि तुमचे कुठलेही
गुपित लपून राहणार नाही.[अ]

१९ ज्याच्या उजव्या हातात त्याचे कर्मपत्र दिले आहे तो त्या दिवशी
खुश होऊन इतरांना सांगेल, "हे पहा माझे कर्मपत्र! वाचा ते! २० माझ्या
कर्माचा हिशेब एक न एक दिवस नक्की पहायला मिळेल याची मला खात्री
होती." २१ त्याला सुखी व समाधानी आयुष्य लाभेल. २२ आलिशान स्वर्गात
त्याचे वास्तव्य असेल. २३ तिथले फळांचे घोस त्याच्या अगदी हाताशी
असतील. २४ आम्ही त्यांना सांगू, गतकाळात केलेल्या सत्कृत्यांच्या
मोबदल्यात आनंदात रहा, हवे ते खा, प्या." २५ पण ज्याच्या डाव्या

[अ] सध्याचे जग मानवाची परीक्षा घेण्याच्या दृष्टिकोनातून बनवले गेले आहे. ज्यावेळी चाचणीचा कालावधी संपेल, त्यावेळी हे जग उध्वस्त केले जाईल आणि नवीन आवश्यकता पूर्ण करण्यासाठी एक नवीन जग तयार केले जाईल. ईश्वराचा महिमा सध्या अप्रत्यक्षपणे प्रकट होतो. परंतु त्यावेळी ईश्वराचा महिमा प्रत्यक्षपणे प्रकट होईल.

हातात कर्मपत्र दिले आहे तो म्हणेल, "माझ्या हातात कधीच कर्मपत्र दिले
नसते तर किती चांगले झाले असते! २६ आणि माझा हिशेब मला कधी
कळलाच नसता तर किती चांगले झाले असते! २७ माझ्या मृत्यूने ते सगळे
संपवून टाकले असते तर! २८ माझी संपत्ती आता काही कामाची राहिलेली
नाही. २९ माझी सगळी ताकद हिरावली गेली आहे." ३० त्याला पकडून
गळ्यात साखळदंड घाला ३१ आणि त्या अवस्थेत त्याला नरकात प्रवेश
करू द्या. ३२ तिथे त्याला सत्तर हात लांबीच्या साखळीने जखडून ठेवा.
३३ कारण त्याचा सर्वशक्तिमान ईश्वरावर विश्वास नव्हता. ३४ गरजूंना
अन्नदान करायचीही त्याची इच्छा होत नव्हती. ३५ तेव्हा आज इथे
त्याला कुणीही मित्र नाही. ३६ त्याला फक्त कदान्नच खावे लागेल ३७ जे
अपराध्यांशिवाय कुणीही खात नाही.

३८ पण नाही, लोकहो! मी त्या सगळ्याची शपथ घेऊन सांगतो, जे
तुम्ही पाहता ३९ त्याचप्रमाणे जे तुम्ही पाहू शकत नाही, ४० ही नक्कीच
सन्माननीय प्रेषिताने आणलेली ईशवाणी आहे. ४१ ही कुणा कवीची रचना
नाही. पण तुम्ही किती अविश्वास दाखवता! ४२ ना ही कुणा ज्योतिषाची
भविष्यवाणी आहे. पण तुम्ही यावर चिंतनच करत नाही! ४३ विश्वाच्या
पालनकर्त्याने अवतीर्ण केलेला हा साक्षात्कार आहे. ४४ लोकहो! प्रेषिताने
आमच्याविरुद्ध खोटा बनाव रचला असता ४५ तर आम्ही त्याचे उजवे
मनगट धरले असते ४६ आणि खरोखर त्याची मुख्य शीर कापून टाकली
असती. ४७ तुमच्यापैकी कुणीही आम्हाला असे करण्यापासून रोखू शकले
नसते. ४८ ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांसाठी यात निःसंशय एक बोध आहे.
४९ आम्ही हे चांगलेच ओळखून आहे की तुमच्यापैकी काहीजण आमचे
संकेत नाकारतात. ५० सत्य नाकारणाऱ्यांचे हे कृत्य त्यांच्या पश्चातापाचे
कारण ठरणार आहे. ५१ हे कुरआन सत्य आहे यात काहीच शंका नाही.
५२ तेव्हा सर्वशक्तिमान अशा तुमच्या अधिपतीचे स्तुतिगान करा.

प्रकरण ७० : चढती शिडी (अल्-मआरिज)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ सत्यावर शंका घेणाऱ्याने एकदा मागणी केली की ती शिक्षा लवकरात
लवकर यावी. २ सत्य नाकारणाऱ्यांपासून तिला कुणीही थोपवू शकत
नाही. ३ त्यांना शिक्षा देण्यापासून ईश्वराला कुणीही रोखू शकत नाही.
तो त्या चढत्या शिडीचा अधिपती आहे. ४ ज्यावर चढून रोज ईशदूत
व आत्मा (चैतन्य) त्याच्याकडे जातात. त्यांचा हा दिवस पन्नास हजार
वर्षांचा असतो. ५ तेव्हा हे श्रद्धावंतांनो, सहनशीलतेचा अंगीकार करा
आणि ती सकारात्मक असावी. ६ निवाड्याचा दिवस फार लांब आहे,
असे त्यांना वाटते. ७ पण आम्हाला तो अगदी जवळ आलेला दिसतो.
८ आकाश त्या दिवशी वितळलेल्या तांब्यासारखे लालभडक होईल,
९ तर पर्वत लोकरीच्या पुंजक्यासारखे होतील. १० त्या दिवशी कुणीही मित्र
एकमेकांची विचारपूस करणार नाहीत. ११ एकमेकांच्या नजरेच्या टप्प्यात
असले तरी एकमेकांना ओळख देणार नाहीत. त्या दिवसाच्या छळापासून
बचाव करून घेण्यासाठी अपराधी अगदी कुणाचाही बळी द्यायला तयार
होतील. स्वतःची मुलेबाळे, १२ पत्नी, भाऊ १३ आसरा देणारे नातेवाईक,
१४ आणि पृथ्वीवरचे सगळे लोक यांच्या मोबदल्यात स्वतःची सुटका करू
इच्छितील.

१५ पण नाही! त्यांच्यासाठी धगधगता अग्नी तयार आहे.
१६ त्यात त्यांची त्वचा सोलवटून निघेल. १७ सत्याकडे पाठ फिरवलेल्या
आणि त्यापासून दूर गेलेल्या प्रत्येकाला हा अग्नी आपल्याकडे बोलावून
घेईल १८ आणि संपत्ती गोळा करून ती स्वतःजवळच साठवणाऱ्यालाही

तो बोलावून घेईल. १९ खरोखर, माणूस जन्मजात उतावळ्या स्वभावाचा आहे. २० दुर्दैव ओढवताच तो शोक करू लागतो. २१ पण सुस्थितीत येताच कंजूषपणाने वागू लागतो. २२ पण ईश्वराची उपासना करणारे असे वागत नाहीत. २३ ते नियमितपणे प्रार्थना करतात. २४ आपल्या संपत्तीतला योग्य वाटा (दान) देतात. २५ मागणाऱ्यांसाठी आणि ज्यांनी आपली संपत्ती गमावली आहे अशा संकटग्रस्तांसाठी (ज्यांचे जगण्याचे साधन कमी झाले आहे); २६ निवाड्याच्या दिवसावर ते विश्वास ठेवतात, २७ आणि ईश्वरी शिक्षेला घाबरून राहतात. २८ कारण आपल्या अधिपतीच्या शिक्षेपासून आपण सुरक्षित आहोत असे कुणीही मानू नये. २९ ते आपले चारित्र्य निष्कलंक ठेवतात. ३० याला अपवाद फक्त त्यांच्या पत्नींचा आणि विवाहबंधनात बांधल्या गेलेल्या दासींचा. तेव्हा यांच्या बाबतीत त्यांना कोणतेही दोष लागणार नाही. ३१ पण या मर्यादेपलीकडे जाणारे अवज्ञाकारी आहेत. ३२ जे त्यांच्यावर ठेवलेल्या भरवशाला आणि घेतलेल्या शपथांना जागतात, ३३ जे सत्याची साक्ष देण्यात अग्रेसर असतात, ३४ आणि नियमितपणे प्रार्थना करतात. ३५ त्यांना सन्मानाने चिरंतन आनंदाच्या स्वर्गात प्रवेश दिला जाईल.

३६ पण सत्य नाकारणाऱ्यांना काय झाले आहे? ते धावत तुमच्याकडे येत आहेत. ३७ तुमच्या डाव्या बाजूने, उजव्या बाजूने मोठा जमाव करून येत आहेत. ३८ त्यांच्यापैकी प्रत्येकाला आनंददायी बगीच्यात प्रवेश मिळवण्याची आकांक्षा आहे की काय? ३९ नक्कीच नाही! आम्ही त्यांना कशापासून बनवले आहे हे ते चांगलेच जाणतात.

४० पण नाही! पूर्व आणि पश्चिमेच्या अधिपतीची शपथ घेऊन सांगतो, आमच्याकडे सामर्थ्य आहे, ४१ त्यांच्याजागी त्यांच्यापेक्षा चांगली माणसे आणण्याचे; कोणीही आम्हाला त्यापासून रोखू शकत नाही. ४२ वचन

मिळालेला दिवस उगवेपर्यंत व्यर्थ चर्चेत आणि मनोरंजनातच त्यांना दंग राहू दे. ४३ त्या दिवशी जणूकाही शर्यत लागली असावी तसे आपापल्या कबरीबाहेर पडून ते धाव घेतील. ४४ त्यांच्या नजरा खाली झुकलेल्या असतील, चेहरे शरमिंदे असतील. त्यांना वचन देण्यात आलेला दिवस असा असेल.

प्रकरण ७१ : नोहा
(नूह)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ "तुझ्या लोकांवर कठोर शिक्षा कोसळण्यापूर्वी त्यांना सावध कर" असे सांगून आम्ही नोहाला पाठवले होते. २ तो आपल्या समाजबांधवांना म्हणाला, "लोकहो! मी तुम्हाला फक्त सावध करायला आलोय, ३ की तुम्ही त्या एकमेव ईश्वराचीच उपासना करावी आणि त्याची जाणीव ठेवावी. माझ्या बोलण्याकडे लक्ष द्या. ४ ईश्वर तुमचे अपराध माफ करेल आणि निर्धारित वेळ येईपर्यंत तुम्हाला उसंत देईल. ती वेळ पुढे ढकलली जाणार नाही, हे लक्षात घ्या!"

५ नोहाने ईश्वराकडे प्रार्थना केली, "मी माझ्या लोकांना रात्रंदिवस तुझ्याकडे येण्याची हाक देतो आहे. ६ पण माझ्या आवाहनाने फक्त त्यांच्या तिरस्कारात भरच पडते आहे. ७ ईश्वरी क्षमेचा लाभ मिळण्यासाठी सतत मी त्यांना तुझ्याकडे वळण्याचे आवाहन केले. पण प्रत्येक वेळी त्यांनी आपली बोटे कानात घातली, शरीर वस्त्रांनी झाकून घेतले आणि दुर्लक्ष करत हट्टीपणाचे, उद्दामपणाचे वर्तन केले. ८ नंतर मी त्यांच्याशी जाहीरपणे बोललो, ९ खाजगीत आणि सार्वजनिक ठिकाणी त्यांना उपदेश

केला.” १० आणि सांगितले, “ईश्वराकडे क्षमायाचना करा. निःसंशय
तो अतिशय क्षमाशील आहे. ११ तुमच्यासाठी तो आकाशातून भरपूर
पाऊस पाडेल. १२ तुमच्या संपत्तीत, संततीत वाढ करेल आणि तुम्हाला
अशा बगीच्यात प्रवेश देईल जिथून पाण्याचे प्रवाह वाहत आहेत.
१३ तुम्हाला काय झाले आहे? ईश्वराची थोरवी का नाकारता आहात?
१४ अस्तित्वाच्या निरनिराळ्या टप्प्यांमधून त्याने तुम्हाला निर्माण केले
असताना, १५ तुम्हाला हे दिसत नाही का, त्याने एकावर एक सप्त आकाश
निर्माण केले आणि १६ तिथे चंद्रप्रकाश देणारा चंद्र आणि तेज देणारा
देदीप्यमान सूर्य यांची निर्मिती केली. १७ मातीपासून तुमची निर्मिती करून
तुमची वाढ केली. १८ तो तुम्हाला आपल्याकडे परत नेईल आणि पुन्हा
एकदा जिवंत करेल. १९ ईश्वराने या पृथ्वीचा विस्तार केला २० आणि
तुमच्या मुक्त संचारासाठी प्रशस्त रस्ते बनविले; हे सगळे तुम्हाला दिसत
नाही का?”

२१ नोहा पुढे म्हणाला, “हे पालनकर्ता! त्यांनी माझी अवज्ञा केली
आणि अशांचे अनुसरण केले ज्यांच्या संपत्तीने व संततीने त्यांच्या
विनाशात भरत घातली. २२ त्यांनी एक कुटील कारस्थानही रचले आहे.
२३ ते आपल्या अनुयायांना सांगतात, तुमच्या दैवतांचा त्याग करू नका
की वद्द, सुवा, यागूस, याऊक, नस्र यांचा त्याग करू नका. २४ त्यांनी
अनेकांना ईश्वरी मार्गापासून दूर नेले आहे. तेव्हा त्यांच्या मार्गभ्रष्टतेत
आणखी वाढ कर.” २५ त्यांच्या दुष्कृत्यांच्या मोबदल्यात त्यांना
जलसमाधी दिली आणि त्यांना फरफटत नरकात नेले गेले. ईश्वराविरुद्ध
जाऊन त्यांना कुणीही मदत केली नाही.

२६ नोहाने ईश्वराकडे प्रार्थना केली, “हे पालनकर्ता! सत्य नाकारणाऱ्या
त्यांच्यापैकी एकालाही या भूतलावर ठेवू नकोस. २७ तू जर यांना सोडून

दिलेस तर ते तुझ्या सेवकांची दिशाभूल करतील आणि फक्त अपराध्यांना आणि सत्य नाकारणाऱ्यांनाच जन्म देतील. [२८] हे पालनकर्त्या! मला, माझ्या आई-वडिलांना, माझ्या घरात प्रवेश करणाऱ्या प्रत्येक सच्च्या श्रद्धावंताला, सगळ्या स्त्री-पुरुषांना क्षमा कर. दुसऱ्या कशात नाही तर अपराध्यांच्या विनाशातच भर घाल!"

प्रकरण ७२ : जिन्न
(अल्-जिन्न)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] हे प्रेषिता! लोकांना सांगा, मला ईश्वराने असा साक्षात्कार दिला आहे की एकदा जिन्नच्या एका समूहाने कुरआन ऐकले आणि ते म्हणू लागले, "आम्ही खरोखर अद्भुत ग्रंथ ऐकला आहे [२] जो सन्मार्गाकडे नेतो. आमचा त्याच्यावर विश्वास बसला असून इथून पुढे आम्ही कुणालाही ईश्वराचा दर्जा देणार नाही. [३] आमच्या अधिपतीची थोरवी फार महान आहे. त्याला ना पत्नी आहे ना पुत्र. [४] आता आम्हाला हे जाणवले आहे की आमच्यापैकी काही मूर्ख ईश्वराविषयी खोटे बनाव रचत आहेत. [५] आम्हाला वाटत होते की मनुष्य आणि जिन्न ईश्वराविषयी कधीही खोटे बोलणार नाहीत. [६] भूतकाळात काही लोकांनी जिन्नकडे आसरा मागितला होता. याने त्यांच्या उन्मत्तपणात भरच पडली होती. [७] तुमच्यासारखेच त्यांनाही वाटत होते की ईश्वर मृतांना कधीही परत जिवंत करणार नाही.

[८] आम्हाला स्वर्गात जायचे होते, पण त्याच्या मार्गावर शक्तिशाली रखवालदार आणि अग्निज्वाला असल्याचे आम्हाला जाणवले. [९] स्वर्गातील संभाषण ऐकू येईल असे स्थान मिळवायचा आम्ही प्रयत्न केला. पण असा प्रयत्न करणाऱ्यांसाठी अग्निज्वाला सज्ज ठेवलेली आहे.

१० या व्यवस्थेव्दारे भूतलावर राहणाऱ्या लोकांचे काही वाईट इच्छिले गेले
की त्यांच्या पालनकर्त्याने त्यांचे काही भले इच्छिलेले आहे, याविषयी
आम्ही काहीच सांगू शकत नाही. ११ आमच्यापैकी काही सदाचारी आहेत
तर काही नाहीत. आम्ही वेगवेगळ्या मार्गांचे अनुसरण करतो. १२ आम्हाला
हे उमगले आहे की पृथ्वीतलावर आम्ही ईश्वरी योजना खोटी ठरवू
शकत नाही की इथून पळून जाऊन त्याची योजना असफल करू शकत
नाही. १३ ईश्वरी मार्गदर्शनाची साद कानी येताच आम्ही त्यावर विश्वास
ठेवला. आपल्या पालनकर्त्यावर विश्वास ठेवणाऱ्याला ना हानीचे भय
उरते ना अन्यायाचे. १४ आमच्यापैकी काहीजण आज्ञा पाळणारे आहेत
तर काहीजण अपराधी आहेत. ज्यांना सन्मार्ग लाभला आहे, ते आज्ञा
पाळणारे आहेत. १५ पण जे अपराधी आहेत ते नरकाग्नीचे इंधन बनतील.''

१६ त्यांनी योग्य मार्गाचा अवलंब केला असता तर आम्ही त्यांना मुबलक
पाऊस देऊ केला असता. १७ त्यायोगे आम्हाला त्यांची परीक्षा घेता आली
असती. आपल्या पालनकर्त्याच्या स्मरणापासून दूर राहणाऱ्याला कठोर
शिक्षा सुनावली जाईल. १८ मशिदी ईश्वराच्या उपासनेसाठी आहेत. तिथे
ईश्वराबरोबर अन्य कुणाचा धावा करू नका. १९ ईश्वराचे सेवक त्याची
प्रार्थना करण्यासाठी उभे राहतात, तेव्हा सत्य नाकारणारे त्यांच्याभोवती
इतकी गर्दी करतात की त्यांचा श्वास कोंडला जावा. २० त्यांना सांगा, ''मी
फक्त माझ्या पालनकर्त्याचा धावा करतो आणि इतर कुणालाही त्याचे
समतुल्य मानत नाही.'' २१ सांगा, ''तुमचे चांगले किंवा वाईट करण्याचा
मला काहीही अधिकार नाही.'' २२ सांगा, ''ना ईश्वरापासून माझे कुणी
रक्षण करू शकते, ना मला त्याच्याशिवाय कुणी आसरा देऊ शकते.
२३ त्याच्याकडून मिळालेले संदेश तुमच्यापर्यंत पोहोचवणे एवढेच माझे
कर्तव्य आहे.'' ईश्वर आणि त्याच्या प्रेषिताची अवज्ञा करणाऱ्यांसाठी
नरकाग्नी सुसज्ज असून तिथे त्यांना कायमचे रहावे लागेल.

२४ ज्याचे वचन दिले गेले ती गोष्ट समोर येताच त्यांना कळेल,
कुणाचे सहाय्यक दुर्बल आहेत आणि कुणाची संख्या कमी आहे.
२५ त्यांना सांगा, "तुम्हाला ज्याचे वचन दिले गेले ती गोष्ट तात्काळ
घडणार आहे की ईश्वराने त्याची मुदत फार वाढवली आहे हे मला
माहीत नाही." २६ गुप्त गोष्टींचे ज्ञान फक्त त्याच्याकडेच आहे. ते तो
कुणासमोरही प्रकट करत नाही. २७ याला अपवाद फक्त प्रेषिताचा, ज्याला
त्याने निवडले आहे. ईश्वराने त्याच्या मागे-पुढे सुरक्षारक्षक तैनात केले
आहेत. २८ प्रेषिताने आपल्या पालनकर्त्याचा संदेश पोहोचवला आहे हे
त्याला यातून कळून येते. त्यांच्याबरोबरच्या सगळ्या गोष्टी तो जाणतो.
तो सगळ्याची नोंद ठेवतो.

प्रकरण ७३ : चादर गुंडाळलेले (अल्-मुज्जम्मिल)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हे चादर पांघरलेल्या प्रेषिता! २ रात्रीच्या वेळी उठून प्रार्थना कर.
३ तो रात्रीचा अर्धा भाग असेल किंवा त्यापेक्षा थोडा कमी, ४ किंवा
त्यापेक्षा थोडा जास्त. पण कुरआनचे पठण सावकाश व विचारपूर्वक
कर. ५ कारण लवकरच आम्ही लक्षणीय अर्थ असलेला संदेश तुमच्यावर
अवतरीत करणार आहोत.

६ रात्रीच्या वेळी उपासनेसाठी उठणे हा स्व-नियंत्रणाचा सगळ्यात
सक्षम उपाय आहे आणि ती प्रार्थनेसाठी सगळ्यात सुयोग्य वेळ आहे.
७ दिवसभर तुम्ही प्रेषित्व कार्यात सतत व्यस्त असता. ८ तुमच्या
पालनकर्त्याचे स्मरण करा आणि मनःपूर्वक त्याला शरण जा. ९ तो

पूर्वेचा आणि पश्चिमेचा सम्राट आहे. त्याच्याशिवाय अन्य कुणीही ईश्वर नाही. तेव्हा त्यालाच तुमचा पालनकर्ता माना. [१०] लोकांचे बोलणे संयमाने हाताळा आणि सभ्यपणे त्याकडे दुर्लक्ष करा. [११] सत्य नाकारणारे जे ऐषोआरामात जगत आहेत त्यांना आणखी थोडा काळ सहन करा. त्यांची हाताळणी माझ्यावर सोडून द्या. [१२] आम्ही त्यांच्यासाठी अवजड बेड्या आणि धगधगता अग्नी सज्ज ठेवला आहे. [१३] घशात अडकणारे अन्न आणि वेदनादायी शिक्षाही सज्ज ठेवली आहे. [१४] निवाड्याच्या दिवशी पृथ्वी आणि पर्वत हादरून जातील आणि पर्वत वाळूच्या ढिगाऱ्यासारखे विसविशीत होऊन जातील.

[१५] लोकहो! तुमच्या आधी फारोकडे जसे आम्ही प्रेषिताला पाठवले होते, तसाच एक प्रेषित आम्ही साक्षीदार म्हणून तुमच्याकडे पाठवला आहे. [१६] पण फारोने प्रेषिताविरुद्ध बंड केले म्हणून आम्ही त्याच्यावर मजबूत पकड जमवली आणि त्याच्यावर संकट कोसळवले. [१७] जर असेच सत्य नाकारत राहिलात तर ज्या दिवशी दहशतीने बालकेही वृद्ध होऊन जातील त्या दिवसापासून कशी सुटका करून घ्याल? [१८] त्या दिवशी आकाश फाटेल आणि ईश्वराचे वचन पूर्ण होईल. [१९] कुरआन हा निश्चितच उपदेश आहे. तेव्हा ज्याच्या इच्छेला येईल त्याने त्याच्या पालनकर्त्याकडे जाणाऱ्या योग्य मार्गाची निवड करावी.

[२०] हे प्रेषिता! ईश्वर जाणतो की तुम्ही प्रार्थनेसाठी जवळपास दोन तृतीयांश किंवा एक द्वितीयांश किंवा एक तृतीयांश रात्र उभे असता. तुमचे अनेक अनुयायी तसे करतात. ईश्वर रात्रीचे व दिवसाचे मोजमाप ठरवतो. तुम्ही वेळेचे मापन करू शकणार नाही हे त्याने ओळखले आणि म्हणूनच तुमच्याकडे कृपादृष्टी वळवली. तेव्हा तुम्हाला शक्य असेल तेवढे कुरआनचे पठण करा. तुमच्यापैकी काहीजण आजारी असतील,

काहीजण ईशकृपेचा शोध घेण्यासाठी प्रवासात असतील तर आणखी काहीजण ईशकार्यासाठी लढत असतील हे तो जाणतो. तेव्हा शक्य तेवढे जास्तीत जास्त कुरआनचे पठण करा, नियमितपणे प्रार्थना करा, दानधर्मासाठी खर्च करा आणि ईश्वराला घसघशीत कर्ज द्या. कारण तुम्ही स्वतःसाठी जी सत्कर्मे पुढे पाठवाल ती ईश्वरापाशी जाऊन पोहोचतील. तो त्यात वाढ करेल आणि उत्कृष्ट मोबदला देईल. ईश्वराकडे क्षमायाचना करा. तो अतिशय क्षमाशील, अतिशय दयाशील आहे.

प्रकरण ७४ : चादर पांघरलेला (अल्-मुद्दस्सिर)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हे चादर पांघरलेल्या प्रेषिता, २ उठ आणि लोकांना सावध कर, ३ तुझ्या पालनकर्त्याचा स्तुतिघोष कर, ४ आपली वस्त्रे स्वच्छ कर, ५ अपवित्रतेपासून दूर रहा, ६ परोपकार करताना अधिक मोबदला मिळण्याची अपेक्षा करू नकोस, ७ आणि तुझ्या पालनकर्त्याखातर संयमाने रहा.

८ जेव्हा रणशिंग फुंकले जाईल ९ तो दिवस कठीण आणि दुःखद असेल, १० सत्य नाकारणाऱ्यांसाठी तो दिवस सोपा नसेल. ११ ज्याला मी एकट्याने निर्माण केले आहे त्याची हाताळणी माझ्यावर सोडून द्या. १२ त्याला मी मुबलक संसाधने दिली, १३ अनेक पुत्रांची संगत दिली १४ आणि त्याचे जीवन सुकर करण्यासाठी सर्व सुखसुविधा देऊ केल्या १५ आणि तरीही त्याला अधिक मिळवण्याचा हव्यास आहे. १६ कदापि नाही! तो आमच्या साक्षात्कारांचा दुराग्रही शत्रू आहे. १७ मी त्याला अशा चढावर चढवेन जी चढण अतिशय कष्टप्रद असेल.

१८ कारण त्याने विचारपूर्वक डाव आखला १९ याबद्दल त्याचा धिक्कार
असो! २० त्याने बांधलेल्या अंदाजाबद्दल त्याचा सर्वनाश होवो! २१ नंतर
त्याने सभोवार पाहिले, २२ आठ्या घालत चेहरा वेडावाकडा केला,
२३ आणि आमच्या संदेशाकडे पाठ फिरवून उद्दामपणे वागला. २४ वर
म्हणाला, "हे दुसरे काही नसून प्राचीन काळापासून चालत आलेली जादू
आहे. २५ हे तर फक्त एका मर्त्य मानवाचे बोलणे आहे."
२६ लवकरच मी त्याला नरकात ढकलून देईन. २७ नरक काय आहे
हे तुम्हाला कसे पटवून देऊ? २८ तो कुणाला ना धड जगू देतो ना
मरू देतो. २९ नरकाग्नी माणसाची त्वचा सोलवटून काढतो. ३० एकोणीस
ईशदूत त्यावर पहारा देतात. ३१ आम्ही नरकाचे रखवालदार म्हणून फक्त
ईशदूतांनाच नेमले आहे. सत्य नाकारण्यावर ठाम असणाऱ्यांची परीक्षा
घेता यावी, श्रद्धावंतांच्या श्रद्धेत वाढ व्हावी, ज्यांना ग्रंथ दिला गेला त्यांची
श्रद्धा दृढ व्हावी आणि ग्रंथधारकांच्या व श्रद्धावंतांच्या मनात कोणतीही
शंका येऊ नये यासाठी आम्ही एकोणीस ही संख्या निश्चित केली आहे.
ज्यांच्या मनात विकृती असून जे सत्य नाकारतात ते कदाचित विचारतील,
"या उदाहरणावरून ईश्वराला काय सिद्ध करायचे आहे?" अशा रीतीने
ईश्वराच्या मनात येईल त्याला तो मार्गभ्रष्ट करतो तर त्याच्या मनात येईल
त्याला मार्गदर्शन करतो. एकमेव ईश्वराशिवाय कुणीही त्याच्या महासेनेला
जाणत नाही. हा मानवजातीसाठी ईश्वराचा उपदेश ग्रंथ आहे.
३२ नाही, त्या चंद्राची शपथ! ३३ सरत्या रात्रीची शपथ! ३४ उजळणाऱ्या
पहाटेची शपथ! ३५ खरंच, नरकाची आग ही सर्वात मोठ्या त्रासांपैकी एक
आहे. ३६ हा माणसासाठी इशारा आहे. ३७ तुमच्यापैकी प्रत्येक माणसाला
(भय दाखवणारा) जो पुढे जाऊ इच्छितो किंवा मागे राहू इच्छितो,
३८ प्रत्येकाला त्याच्या कर्मासाठी जबाबदार धरले जाईल. ३९ याला

अपवाद फक्त उजव्या बाजूच्या लोकांचा, [४०] जे आपल्या स्वर्गात राहून विचारपूस करतील [४१] त्या अपराध्यांची, [४२] त्यांना विचारतील, "कशामुळे तुम्हाला या नरकाच्या आगीत यावे लागले?" [४३] त्यांचे उत्तर असेल, "आम्ही प्रार्थना करणाऱ्यांपैकी नव्हतो. [४४] आम्ही गरिबांना अन्नदान केले नाही. [४५] व्यर्थ वादविवाद करणाऱ्यांमध्ये सामील होऊन आम्हीही तसेच करत राहिलो. [४६] न्यायाच्या दिवसाला नाकारत राहिलो [४७] आणि आज या अटळ शेवटाने (मृत्यूने) आमचा ताबा घेतला आहे." [४८] आज कुणाचीही शिफारस त्यांच्या कामी येणार नाही.

[४९] तेव्हा त्यांना काय झाले आहे की त्यांनी या उपदेशाकडे पाठ फिरवावी? [५०] त्यांची अवस्था भयभीत गाढवांसारखी आहे. [५१] जे सिंहाला घाबरून पळत सुटले आहेत. [५२] खरोखर, त्यांच्यापैकी प्रत्येकाला वाटते की साक्षात्कार आपल्यासमोर प्रकट व्हावेत. [५३] नाही! ते मृत्युपश्चात जीवनाला घाबरत नाहीत. [५४] पण हा खराखुरा उपदेश ग्रंथ आहे. [५५] ज्याला हवा असेल त्याने त्यापासून बोध घ्यावा. [५६] ईश्वराची इच्छा असेल तरच ते यापासून बोध घेतील. तो असा पालनकर्ता आहे ज्याची भीती बाळगावी. तो क्षमेचा सागर आहे.

प्रकरण ७५ : पुनर्निर्माणाचा दिवस (अल्-कियामह)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] पुनर्निर्माणाच्या दिवसाची शपथ! [२] पश्चातापाने स्वतःला कुरतडणाऱ्या मनाची शपथ! [३] आम्ही त्याची हाडे जुळवून त्याला पुन्हा एकदा निर्माण करू शकणार नाही असे वाटते का माणसाला? [४] खरोखर, आम्ही त्याच्या बोटाचे पेर न् पेर पुन्हा जागेवर आणू शकतो. [५] तरीही

माणूस पुढच्यात असलेल्या गोष्टी (जसे पुनर्निर्माण, स्वर्ग-नरक आदी.) नाकारू इच्छितो. ६ तो विचारतो, "पुनर्निर्माणाचा दिवस कधी येईल?" ७ पण त्या दिवशी मर्त्य मानवाची दृष्टी दिपून जाईल, ८ चंद्राला ग्रहण लागेल, ९ चंद्र आणि सूर्याला एकत्र आणले जाईल, १० त्या दिवशी माणूस विचारू लागेल, "यापासून कशी सुटका करून घेऊ?" ११ पण त्याला कुठेही आसरा मिळणार नाही. १२ त्या दिवशी आसरा फक्त तुमच्या पालनकर्त्याकडेच असेल, १३ त्या दिवशी माणसाने काय पुढे पाठवले आहे आणि काय मागे सोडले आहे हे त्याला सांगितले जाईल. १४ खरोखर, त्या दिवशी माणूस स्वतःविरुद्धच साक्ष देईल. १५ त्या दिवशी कुठलीही सबब पुढे केली तरी ती कामी येणार नाही.

१६ हे प्रेषिता! आमचे साक्षात्कार शिकण्यासाठी जीभ फार घाईने चालवू नका. १७ त्याच्या संकलनाचे आणि कथनाचे काम आम्ही स्वतः जातीनिशी करणार आहोत. १८ आम्ही कथन करताच दक्षतेने त्यातील उपदेशाचे अनुसरण करा. १९ त्यानंतर त्याचा अर्थ स्पष्ट करण्याची जबाबदारी आमची आहे.

२० खरेच, तुम्हाला तात्काळ फायदे प्रिय आहेत. २१ तर मृत्युपश्चात जीवनाकडे तुम्ही दुर्लक्ष करता. २२ त्या दिवशी काहींचे चेहरे तेजस्वी असतील, २३ ते आपल्या पालनकर्त्याकडे पाहत असतील, २४ तर काहींचे चेहरे निस्तेज, २५ भीतीने गारठलेले असतील. २६ जेव्हा माणसाचे प्राण कंठाशी येतील, २७ आणि विचारले जाईल, "कुठला तारक (मांत्रिक, वैद्य, जादूगार आदी) आता याला वाचवू शकेल?" २८ या जगाचा निरोप घेण्याची वेळ आली असल्याचे त्याला कळून चुकेल. २९ तो तडफडत टाचा घासू लागेल. (तेव्हा त्याच्यावर एकामागून एक संकटं येतील.) ३० त्या दिवशी त्याला तुमच्या पालनकर्त्याकडे आणले जाईल.

३१ जिवंतपणी त्याने ना कधी सत्यावर विश्वास ठेवला ना प्रार्थना केली.
३२ पण सत्य नाकारत आणि त्यापासून दूर जात राहिला. ३३ आपल्या समाजापुढे
जाऊन बढाई मारू लागला. ३४ माणसा, तुझा धिक्कार असो! धिक्कार असो!
३५ पुन्हा धिक्कार असो! पुन्हा पुन्हा धिक्कार असो! ३६ माणसा! तुला असे
वाटते का, की तुला हवे तसे वागायची मोकळी आहे? ३७ सुरुवातीला
माणूस म्हणजे गर्भाशयात टाकलेला वीर्याचा एक थेंब नव्हता का?
३८ ज्यापासून पुढे जळूसारखी गुठळी बनली. ईश्वराने त्याला आकार दिला
आणि प्रमाणबद्ध शरीर दिले. ३९ त्यापासून स्त्री आणि पुरुष निर्माण केले.
४० असे असताना तो मृतांना परत जिवंत करू शकणार नाही का?

प्रकरण ७६ : माणूस
(अल्-इन्सान)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ एक वेळ अशी नव्हती का जेव्हा माणसाचे अस्तित्व गौण अवस्थेत
होते? २ त्याची परीक्षा घेण्यासाठी आम्ही त्याला द्रव्य मिश्रणाच्या एका
थेंबापासून निर्माण केले आणि त्याला पाहण्याची व ऐकण्याची शक्ती
दिली. ३ आम्ही त्याला मार्ग दाखवला, आता त्याने कृतज्ञ रहावे किंवा
कृतघ्न.

४ आता सावध रहा, सत्य नाकारणाऱ्यांसाठी आम्ही साखळदंड,
गळ्यात घालायची लोखंडी कडी आणि धगधगती आग तयार ठेवली
आहे. ५ पण सदाचारी लोकांना मात्र कापराची थंडाई घातलेले पेय
प्यायला मिळेल. ६ त्या पेयाच्या झऱ्याचे अनेक प्रवाह असून ईश्वराचे
सेवक त्यातील पेयाचे सेवन करतात. ७ सदाचरणी लोक दिलेला शब्द

पाळतात आणि त्या दिवसाची भीती बाळगतात ज्या दिवसाचे भय सर्वदूर
पसरले आहे. ८ ईश्वराच्या प्रेमाखातर ते गरीब, अनाथ व बंदिवानांना
अन्नदान करतात ९ आणि म्हणतात, "आम्ही फक्त ईश्वरासाठीच
तुम्हाला खाऊ घालतो आहोत. त्या बदल्यात आम्हाला तुमच्याकडून
ना कसल्याही मोबदल्याची अपेक्षा आहे ना आभाराची. १० खरोखर,
आमच्या अधिपतीकडून येणाऱ्या त्या भयानक दुःखद दिवसाला आम्ही
घाबरून आहोत." ११ तेव्हा ईश्वर त्यांचे त्या दिवसाच्या मानहानीपासून
रक्षण करेल आणि त्यांना चैतन्य व आनंद देईल १२ आणि संयमाने
राहण्याचा मोबदला म्हणून त्यांना स्वर्गातले वास्तव्य व रेशमी वस्त्रे
मिळतील. १३ तिथे त्यांच्यासाठी आरामदायी आसने असतील. तिथे
त्यांना ना उन्हाचा तडाखा जाणवेल ना थंडीचा कडाका. १४ तिथल्या
वृक्षांच्या फांद्या त्यांच्यावर आच्छादन धरतील आणि त्यांचे फळांचे
घोस इतक्या खाली लगडलेले असतील की त्यांच्या हाती सहजी यावेत.
१५ चांदीची पात्रे व काचेचे पेले त्यांच्यामधून फिरवले जातील. १६ चांदीच्या
चमकदार पेल्यांमध्ये योग्य प्रमाणात पेय भरलेले असेल.

१७ प्याल्यांमधून त्यांना आल्याचा स्वाद असलेले पेय दिले जाईल.
१८ सलसबिल नावाच्या वाहत्या प्रवाहातले ते पेय असेल. १९ सदाबहार
युवकांकडून त्यांची देखभाल केली जाईल. हे युवक तुम्हाला विखुरलेल्या
मोत्यांसारखे दिसतील. २० जिथे पहाल तिथे तुम्हाला सुखसमृद्धी आणि
महासाम्राज्य दिसेल. २१ सुंदर कलाकुसर केलेली हिरव्या रंगाची उंची
रेशमी वस्त्रे त्यांना घालायला मिळतील. सुशोभीकरणासाठी त्यांना
चांदीची आभूषणे मिळतील. त्यांचा अधिपती त्यांना शुद्ध पेय प्यायला
देईल. २२ त्यांना सांगितले जाईल, "हे आहे तुमचे पारितोषिक. तुमच्या
परिश्रमाची परिपूर्ण दखल घेतलेली आहे."

२३ खरोखर, हे कुरआन आम्ही टप्प्याटप्प्याने साकार केले आहे.
२४ तेव्हा तुमच्या पालनकर्त्याची आज्ञा होईपर्यंत संयमाने रहा आणि
त्यांच्या मनासारखे वागू नका जे अपराधी व कृतघ्न आहेत. २५ सकाळ-
संध्याकाळ तुमच्या पालनकर्त्याचे स्तुतिगान करा. २६ रात्रीच्या वेळेस
त्याच्यासमोर नतमस्तक व्हा आणि रात्रीचा बराचसा वेळ त्याच्या स्तुतीचा
घोष करा. २७ ईश्वराचा विसर पडणारे लोक तात्काळ लाभाची आकांक्षा
ठेवतात, पण त्या कठोर दिवसाकडे दुर्लक्ष करतात. २८ त्यांना निर्माण
करणारे आणि कणखर शरीरयष्टी देणारे आम्ही आहोत, पण आमच्या
मनात आले तर आम्ही त्यांच्या जागी त्यांच्यासारखे दुसरे लोक आणू
शकतो. २९ हे ईश्वराचे उपदेश ग्रंथ आहे. ज्याची इच्छा असेल त्याने
आपल्या अधिपतीकडे जाणाऱ्या योग्य मार्गाची निवड करावी. ३० पण
ईश्वराच्या मनात येईपर्यंत तुम्ही तशी इच्छाही करू शकत नाही. ईश्वर
खरोखर सर्वज्ञ आणि सुज्ञ आहे. ३१ त्याच्या मनात येईल त्याच्यावर तो
कृपा करतो आणि अपराध्यांसाठी त्याने वेदनादायी शिक्षा तयार ठेवली
आहे.

प्रकरण ७७ : पुढे पाठवले गेलेले...
(अल्-मुरसलात)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ एकामागून एक हळुवारपणे पाठवल्या जाणाऱ्या वाऱ्याची शपथ!
२ जे नंतर पूर्ण ताकदीनिशी वादळाचा आवेग धारण करतात. ३ पाऊस
पाडणाऱ्या ढगांना ते सगळीकडे पसरवतात, ४ आणि एकमेकांपासून वेगळे
करतात. ५ ईश्वराचे उपदेश आपल्याबरोबर घेऊन येणाऱ्यांची शपथ!

६ ज्याद्वारे काहींना क्षमा केली जाते तर इतरांना सावधानतेचा इशारा दिला
जातो. ७ की तुम्हाला दिल्या गेलेल्या वचनाची पूर्तता होणारच आहे.

८ त्या दिवशी तारे निस्तेज होतील, ९ आकाश फाटून जाईल,
१० पर्वतांच्या ठिकऱ्या उडून जातील, ११ निर्धारित वेळेला प्रेषितांना एकत्र
आणले जाईल, १२ हे सगळे कुठल्या दिवसासाठी निर्धारित केले आहे?
१३ निर्णयाच्या दिवसासाठी! १४ निवाड्याचा दिवस म्हणजे काय हे
तुम्हाला स्पष्टपणे कसे कळेल? १५ सत्य नाकारणाऱ्यांचा त्या दिवशी
सर्वनाश होईल. १६ त्यांच्या आधीच्या लोकांना आम्ही नष्ट केले नव्हते
का? १७ यानंतरच्या लोकांनाही आम्ही त्यांच्याच मार्गाने जायला लावू.
१८ अपराध्यांशी आम्ही असेच वागतो. १९ सत्य नाकारणाऱ्यांचा त्या
दिवशी सर्वनाश होईल.

२० (लोकांनो!) आम्ही तुम्हास एका तुच्छ वीर्य बिंदूपासून निर्माण केले
नाही का? २१ नंतर एका सुरक्षित ठिकाणी म्हणजेच मातेच्या गर्भाशयात
ठेवले नाही का २२ निर्धारित काळासाठी? २३ अशा रीतीने आम्ही तुमच्या
विकासाचे टप्पे ठरवले. होय! आम्ही किती कुशल रचनाकार आहोत!
२४ सत्य नाकारणाऱ्यांचा त्या दिवशी सर्वनाश होईल. २५ आम्ही पृथ्वीला
सर्वसमावेशक बनवले नाही का? २६ सजीवांसाठी आणि मृतांसाठी?
२७ त्यावर उंच पर्वत उभे करून त्यांच्या कुशीतून तुम्हाला ताजेतवाने पाणी
प्यायला दिले नाही का? २८ सत्य नाकारणाऱ्यांचा त्या दिवशी सर्वनाश
होईल.

२९ तुम्ही जे नाकारत होता त्या दिशेने पावले टाकायला लागा. ३० तीन
टप्प्यात पडणाऱ्या अग्नीच्या सावलीच्या दिशेने चला. ३१ तिथे तुम्हाला
ना सावलीचा थंडावा मिळेल ना अग्निज्वाळांपासून संरक्षण. ३२ मोठ्या
प्रासादांएवढ्या उंचीच्या ठिणग्या त्यातून ओकल्या जातील. ३३ पिवळ्या

उंटांच्या कळपासारख्या त्या तेजस्वी असतील. ३४ सत्य नाकारणाऱ्यांचा
त्या दिवशी सर्वनाश होईल! ३५ सत्य नाकारणारे त्या दिवशी निःशब्द
होतील. ३६ त्यांच्या कुठल्याही सबबी ऐकून घेतल्या जाणार नाहीत.
३७ सत्य नाकारणाऱ्यांचा त्या दिवशी सर्वनाश होईल! ३८ हा आहे
निवाड्याचा दिवस, तुमच्या सगळ्या मागील पिढ्यांसह आज इथे तुम्हाला
एकत्र आणले आहे. ३९ आमच्याविरुद्ध तुमचा काही डावपेच असेल, तर
आता त्याची अंमलबजावणी करून दाखवा. ४० सत्य नाकारणाऱ्यांचा त्या
दिवशी सर्वनाश होईल.

४१ सदाचारी लोक त्या दिवशी थंडगार सावलीत, कारंजांच्या
सान्निध्यात राहतील. ४२ तिथे त्यांना हवी ती सगळी फळे मिळतील.
४३ त्यांना सांगितले जाईल, "ऐहिक जीवनात केलेल्या सत्कृत्यांच्या
मोबदल्यात खा, प्या, मजा करा. ४४ सत्कर्मे करणाऱ्यांना आम्ही असा
मोबदला देतो!" ४५ पण सत्य नाकारणाऱ्यांचा त्या दिवशी सर्वनाश होईल!
४६ अपराधात हरवून गेलेल्यांनो, थोड्या काळासाठी खा, प्या आणि
आयुष्याचा उपभोग घ्या. ४७ सत्य नाकारणाऱ्यांचा त्या दिवशी सर्वनाश
होईल! ४८ ईश्वरासमोर नतमस्तक व्हायला सांगितले असता ते तसे वागत
नाहीत. ४९ सत्य नाकारणाऱ्यांचा त्या दिवशी सर्वनाश होईल! ५० तर मग
सत्य नाकारणारे या कुरआनवर नाही तर कशावर विश्वास ठेवतील?

प्रकरण ७८ : सुवार्ता
(अन्-नबा)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ ते आपसात कशाची विचारणा करत आहेत? २ पुनर्निर्माणाच्या
त्या महाविनाशक वार्तेची, ३ ज्यावरून त्यांच्यात मतभेद आहेत! ४ पण

लवकरच त्यांना कळून चुकेल ५ निश्चितच, लवकरच त्यांना सत्याचा
पडताळा येईल. ६ आम्ही एखाद्या शय्येसारखा पृथ्वीचा विस्तार केला नाही
का? ७ तिला आधार देण्यासाठी पर्वतरूपी खांब उभे केले नाहीत का?
८ आम्ही तुमची निर्मिती जोड्यांमध्ये केली. ९ तुम्हाला झोपेचा विसावा
दिला, १० आणि रात्रीचे पांघरूण दिले, ११ उपजीविका कमावण्यासाठी
दिवस बनवला, १२ तुमच्या डोक्यावर सप्त आकाश निर्माण केले.
१३ त्यात सूर्यरूपी झळाळता दीप टांगला, १४ पाण्याने जडावलेल्या ढगांमधून
मुबलक पाऊस पाडला, १५ त्यायोगे अन्नधान्य आणि हरतऱ्हेची वनस्पती
उगवली, १६ घनदाट बागबगीचे उभे केले, १७ निःसंशय, निवाड्याच्या
दिवसाची वेळ ठरलेली आहे.

१८ ज्या दिवशी रणशिंग फुंकले जाईल, तेव्हा तुमच्या झुंडीच्या झुंडी
येऊ लागतील. १९ आकाशाचे असंख्य दरवाजे उघडले जातील. २० त्या
दिवशी मृगजळ नाहीसे व्हावे तसे पर्वत अदृश्य होतील. २१ निःसंशय,
नरक त्यांच्या प्रतीक्षेत आहे. २२ आज्ञा मोडणाऱ्यांचे ते निवासस्थान
असेल, २३ तिथे त्यांना युगानुयुगे वास्तव्य करावे लागेल. २४ तिथे त्यांना
ना थंडावा मिळेल ना एखादे पेय. २५ मिळेल तर फक्त उकळते पाणी
आणि दुर्गंधीयुक्त द्रव. २६ त्यांच्या दुष्कृत्यांना साजेसा असा मोबदला
असेल तो. २७ आपल्याला त्यासाठी जबाबदार धरले जाईल अशी त्यांनी
कधी अपेक्षा केली नव्हती, २८ आणि आमचे संकेत पूर्णतः नाकारले.
२९ पण आम्ही एका कर्मवहीत प्रत्येक गोष्ट नोंदवून ठेवली. ३० आता
आम्ही त्यांना सांगू, "चाखा आपल्या दुष्कृत्यांचे फळ! आम्ही तुम्हाला
दुसरे काही नाही तर अधिकाधिक हालअपेष्टा देऊ."

३१ ईश्वराला भिऊन जगणारे त्या दिवशी नक्कीच विजयी होतील.
३२ बगीचे आणि द्राक्षबागा त्यांच्या होतील. ३३ त्यांच्याच वयाच्या तरुणी

तिथे असतील. ३४ काठोकाठ भरलेले प्याले त्यांच्या हातात असतील. ३५ तिथे त्यांच्या कानावर एकही व्यर्थ, असत्य शब्द पडणार नाही. ३६ ही त्यांच्या अधिपतीकडून मिळालेली भेट असेल, मोबदला असेल. ३७ आकाशाचा, पृथ्वीचा आणि त्यांच्या दरम्यानच्या प्रत्येक गोष्टीचा तो पालनकर्ता आहे. अत्यंत कृपाळू आणि ईश्वरासमोर आवाज उंचावण्याचे सामर्थ्य कुणाकडेही नाही. ३८ ज्या दिवशी आत्मा (मुख्य दूत) आणि इतर दूत रांगेत उभे राहतील त्या दिवशी कुणीही काही बोलणार नाही. अपवाद फक्त त्यांचा ज्यांना त्या कृपेच्या असीम सागराने परवानगी दिली आहे आणि जे फक्त सत्य बोलतात. ३९ तो दिवस येणार हे निश्चित! तेव्हा ज्याच्या मनाला येईल त्याने ईश्वराकडे जाणाऱ्या मार्गाची निवड करावी. ४० आम्ही तुम्हाला अगदी जवळ आलेल्या शिक्षेपासून सावध केले आहे. ज्या दिवशी प्रत्येकाला आपल्या हाताने पाठवलेले कर्म पाहता येईल, सत्य नाकारणारे त्या दिवशी म्हणतील माझी माती झाली असती तर....!

प्रकरण ७९ : उखडणारे
(अन्-नाजिआत)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ त्या वाऱ्याची शपथ जे वाटेत येणारे सगळे वेगाने उखडून टाकतात, २ आणि जे हळुवारपणे वाहतात, ३ अलगदपणे तरंगणाऱ्या ढगांची शपथ, ४ जे आपसात चढाओढ करतात, ५ सगळ्या घटनांचे नियमन करणाऱ्या निर्मात्याची शपथ, ६ ज्या दिवशी एक प्रचंड भूकंप जग उलथेपालथे करून टाकेल, ७ आणि त्या पाठोपाठ आणखी हादरे बसतील. ८ त्या दिवशी लोकांची हृदये वेगाने धडधडू लागतील, ९ तर नजरा खाली वळलेल्या असतील. १० ते विचारतात, "काय? आम्हाला परत एकदा जिवंत केले

जाईल? ११ जेव्हा की आमची हाडे कुजून गेली आहेत?" १२ आणि म्हणतील, "ते परतणे फारच नुकसानकारक असेल." १३ पण हे सगळे एकाच स्फोटात घडून येईल, १४ आणि सावध असा! त्या सगळ्यांना मोकळ्या मैदानात आणले जाईल.

१५ तुम्ही मोझेसची कथा ऐकली आहे का? १६ तुवाच्या पवित्र खोऱ्यात त्याच्या पालनकर्त्याने त्याला हाक दिली आणि सांगितले, १७ "फारोकडे जा, त्याने सगळ्या मर्यादांचे उल्लंघन केले आहे." १८ आणि त्याला विचार, "तुला स्वतःमध्ये सुधारणा घडवायची आहे का? १९ ईश्वराला भिऊन जीवन जगावे म्हणून तुला तुझ्या पालनकर्त्याकडे घेऊन जाणारा मार्ग दाखवू का?" २० फारोकडे जाताच मोझेसने त्याला ईश्वराचा एक महान संकेत दाखवला. २१ पण त्याने तो नाकारला आणि सत्यावर श्रद्धा ठेवायलाही नकार दिला. २२ त्याने त्याकडे ताबडतोब पाठ फिरवली, २३ आणि त्याने आपल्या सर्व लोकांना बोलावले, २४ आणि त्याने घोषित केले, "मी तुमचा सर्वोच्च अधिपती आहे." २५ पण ईश्वराने त्याला संकटात घेरले आणि त्याला ऐहिक आणि मृत्युपश्चात अशा दोन्ही जगांची शिक्षा दिली. २६ ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांसाठी यात निःसंशय एक संकेत आहे.

२७ हे माणसा! ज्या ईश्वराने आकाश निर्माण केले त्याच्यासाठी तुला निर्माण करणे अधिक कठीण आहे का? २८ त्याने त्याचे उंच घुमट स्थापित केले आणि परिपूर्ण आकाशाची बांधणी केली. २९ त्याच्या रात्री अंधाऱ्या बनवल्या आणि त्यातून प्रकाशमान दिवस प्रकट केला. ३० त्यानंतर त्याने पृथ्वीचा विस्तार केला. ३१ पृथ्वीवर पाणी खेळवले आणि गवताळ कुरणे निर्माण केली. ३२ पृथ्वीच्या पृष्ठभागावर भक्कम पर्वत उभे केले. ३३ ज्यावर तुमचा आणि तुमच्या पाळीव प्राण्यांचा उदरनिर्वाह चालतो. (त्याच्यासाठी माणसाची निर्मिती करणे कठीण आहे का?)

३४ ज्या दिवशी महाभयानक प्रसंग घडेल ३५ त्या दिवशी माणसाला
त्याने केलेल्या कर्माची आठवण होईल. ३६ त्या दिवशी नरक त्यांच्या
दृष्टिपथात येईल. ३७ जे जे उन्मत्तपणे वागले, ३८ आणि ऐहिक जगातील
जीवनाला ज्यांनी पसंती दिली ३९ ते त्या दिवशी नरकात जाऊन पडतील.
४० पण ज्यांनी आपल्याला ईश्वरासमोर उभे रहायचे आहे, याचे भान
बाळगले आणि आपल्या वाईट इच्छांवर निर्बंध घातले, ४१ ते स्वर्गात
राहू लागतील, ४२ ते तुम्हाला निवाड्याच्या दिवसाविषयी विचारतील,
"तो दिवस कधी येईल?" ४३ त्यांना सांगा, "त्याच्याशी तुमचा काय
संबंध?" ४४ तो दिवस कधी येणार हे फक्त तुमचा पालनकर्ताच जाणतो.
४५ हे प्रेषिता! तुम्ही फक्त ईशभय बाळगणाऱ्यांना सावध करणारे आहात.
४६ ज्या दिवशी नरकाग्नीची शिक्षा समोर उभी राहील त्या दिवशी त्यांना
वाटू लागेल, जणूकाही या जगात आपण एखादी सकाळ किंवा संध्याकाळ
काढली आहे!

प्रकरण ८० : त्याने आठ्या घालून पाहिले (अबस)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ प्रेषिताने आठ्या घालून पाहिले व तोंड फिरवले, २ जेव्हा की
त्याच्याकडे आंधळा माणूस आला, तेव्हा ३ हे प्रेषिता! त्याला कदाचित
स्वतःमध्ये सुधारणा घडवायची असेल, ४ किंवा आमच्या उपदेशापासून
बोध घेऊन त्याचा लाभ करून घ्यायचा असेल. ५ ज्यांना तुमच्या उपदेशात
रस नव्हता, ६ त्यांची तुम्ही उत्सुकतेने दखल घेतलीत, ७ त्याने स्वतःमध्ये
सुधारणा केली नाही तर त्याचा दोष तुम्हाला लागणार नाही. ८ पण जे

तुमच्याकडे उत्सुकतेने येतात, [९] आणि ज्यांच्या मनात ईश्वराविषयी दरारा आहे. [१०] त्यांच्याकडे तुम्ही दुर्लक्ष करता. [११] खरोखर, हे कुरआन एक उपदेश ग्रंथ आहे. [१२] ज्याची इच्छा असेल त्याने त्यापासून बोध घ्यावा. [१३] सन्माननीय पानांवर ते लिहिले गेले आहे. [१४] ती पाने उच्च दर्जाची आणि पवित्र आहेत, [१५] ज्या हातांनी ते लिहिले गेले, [१६] ते हात पवित्र आणि सदाचारी आहेत.

[१७] माणसाचा धिक्कार असो! किती कृतघ्न आहे तो! [१८] ईश्वराने त्याला कशापासून निर्माण केले? [१९] वीर्याच्या एका थेंबापासून! नंतर त्याने त्याला प्रमाणबद्ध आकार दिला. [२०] ईश्वराने त्याच्या जीवनाचा मार्ग सुकर बनवला. [२१] त्यानंतर त्याला मृत्यू दिला आणि कबरीत पोहोचवले. [२२] पुढे त्याच्या मर्जीला येईल तेव्हा तो त्याला परत जिवंत करेल. [२३] तरीही माणूस त्याच्या आदेशाचे पालन करायला नकार देतो. [२४] माणसाने आपण सेवन करत असलेल्या अन्नाचे चिंतन करावे. [२५] आम्ही आकाशातून मुबलक पाऊस पाडतो. [२६] पृथ्वीला चिरून त्यातून वनस्पती उगवतो. [२७] त्यातून अन्नधान्य उगवतो. [२८] आम्ही द्राक्षे आणि भाजीपाला देतो. [२९] जैतून वृक्ष आणि खजूर वृक्ष उगवतो. [३०] घनगर्द सावल्या देणारे बगीचे निर्माण करतो. [३१] फळे आणि चारा उगवतो. [३२] यातून तुम्ही व तुमची पाळीव जनावरे उदरनिर्वाहाची मजा लुटता.

[३३] पण ज्या दिवशी कान सुन्न करून टाकणारा भयंकर नाद होईल [३४] त्या दिवशी माणूस आपल्या बांधवांपासून दूर पळेल [३५] आणि आई-वडिलांपासून, [३६] पत्नीपासून आणि मुलांपासून. [३७] त्या दिवशी त्यांच्यापैकी प्रत्येकाला फक्त स्वतःचीच चिंता असेल. [३८] त्या दिवशी काही चेहरे आनंदीत असतील, [३९] हसत, जल्लोष साजरा करत असतील. [४०] पण काही चेहरे धुळीने माखलेले असतील, [४१] आणि निराशेने काळवंडलेले

असतील. [४२] ते सत्य नाकारणाऱ्यांचे आणि घोर अपराध करणाऱ्यांचे असतील.

प्रकरण ८१ : गुंडाळला जाणारा (अत्-तकवीर)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] जेव्हा सूर्य गुंडाळला जाईल, [२] आणि तारे निस्तेज होतील, [३] पर्वतांना त्यांच्या स्थानावरून हलवले जाईल, [४] जेव्हा दहा महिन्यांच्या गर्भवती उंटिणींना मोकाट सोडले जाईल, [५] जेव्हा सगळ्या जंगली श्वापदांना एकत्र केले जाईल, [६] जेव्हा सागर खवळून उठेल, [७] तेव्हा माणसांचे वेगवेगळे गट केले जातील. [८] जेव्हा जिवंत गाडलेल्या तान्हुलीला विचारले जाईल की [९] कुठल्या अपराधासाठी तिला मारले होते, [१०] जेव्हा माणसाची नोंदवही सादर केली जाईल. [११] जेव्हा आकाशावरचे आवरण काढले जाईल. [१२] जेव्हा नरकाचा अग्नी प्रज्वलित केला जाईल. [१३] ज्या दिवशी स्वर्ग जवळ आणला जाईल. [१४] त्या दिवशी आपण काय कमावले आहे हे प्रत्येकाला कळेल.

[१५] मी अस्ताला जाणाऱ्या ताऱ्यांची शपथ घेतो, [१६] आणि आपल्या निर्धारित मार्गावर चालणाऱ्यांची आणि अस्ताला जाणाऱ्यांची (खगोलीय वस्तू), [१७] सरत्या रात्रीची [१८] आणि पहाटेच्या पहिल्या झुळकीची शपथ घेतो, [१९] की ही ईशवाणी एका सन्माननीय प्रेषिताने आणलेली आहे. [२०] ती सामर्थ्यवान असून सृष्टीच्या महासिंहासनाच्या अधिपतीने सन्मानाने सिद्ध केलेली आहे. [२१] ज्याच्या आज्ञेचे पालन केले जाते आणि तो भरवसा ठेवण्याच्या योग्यतेचा आहे. [२२] लोकहो! तुमचा हा सोबती वेडा

नाही. २३ त्याने हा ग्रंथ घेऊन येणाऱ्या मुख्य ईशदूताला (गॅब्रिएलला) स्वच्छ क्षितिजावर खरोखर पाहिले आहे. २४ या प्रेषिताकडे अदृश्याचे ज्ञान नाही. २५ की ही शापित सैतानाची वाणी नाही. २६ तर मग तुम्ही कुठे चालला आहात? २७ तो समस्त मानवजातीचा फक्त एक उपदेश ग्रंथ आहे. २८ तुमच्यापैकी प्रत्येकासाठी जो सन्मार्गावरून जाऊ इच्छितो. २९ पण ईश्वराची, या विश्वाच्या सम्राटाची इच्छा असल्याशिवाय तुम्हाला तशी इच्छाही होणार नाही.

प्रकरण ८२ : फाटलेले आकाश (अल्-इनफितार)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ जेव्हा आकाश फाटून जाईल, २ आणि तारे विखुरले जातील, ३ जेव्हा समुद्र तुडुंब भरून वाहू लागतील, ४ आणि जेव्हा कबरी उघडल्या जातील, ५ तेव्हा प्रत्येकाला कळेल त्याने पुढे काय पाठवले आहे आणि मागे काय सोडले आहे. ६ हे माणसा! कृपाळू ईश्वराविषयी फसवणूक करून कुणी तुला त्याच्यापासून दूर नेले आहे? ७ ज्याने तुम्हाला निर्माण केले, प्रमाणबद्ध आकार दिला, ८ त्याला हवे असेल ते रूप दिले, ९ आणि तरीही तुम्ही अंतिम निवाडा नाकारता? १० रखवालदार निश्चितच तुमच्यावर लक्ष ठेवून आहेत. ११ ते सन्मान्य नोंद ठेवणारे आहेत. १२ तुमचे सगळे कर्म ते जाणतात. १३ सदाचारी लोक सुखात राहतील, १४ तर दुष्ट लोक नरकात जातील. १५ निवाड्याच्या दिवशी ते त्यात प्रवेश करतील, १६ आणि त्यापासून कदापि त्यांची सुटका होणार नाही. १७ निवाड्याचा दिवस म्हणजे काय याची जाणीव तुम्हाला कशामुळे होईल? १८ पुन्हा एकदा विचारतो, निवाड्याचा दिवस म्हणजे काय याची

जाणीव तुम्हाला कशामुळे होईल? १९ हा तो दिवस असेल जेव्हा एक माणूस दुसऱ्याच्या अजिबात कामी येणार नाही. त्या दिवसावर फक्त ईश्वराचे नियंत्रण असेल.

प्रकरण ८३ : कमी माप देणारे (अल्-मुतफ्फिफीन)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ कमी माप देणाऱ्यांचा सर्वनाश होईल, २ जे इतरांकडून मागणी करताना परिपूर्ण मापाची करतात, ३ पण इतरांना मोजूनमापून देताना कमी देतात. ४ अशा लोकांना हे कळत नाही की मृतावस्थेतून त्यांना पुन्हा एकदा जिवंत केले जाईल. ५ त्या महाभयानक दुर्दैवी दिवशी, ६ ज्या दिवशी मानवाला विश्वाच्या सम्राटासमोर उभे केले जाईल, ७ खरोखर, दुष्ट लोकांच्या कर्माची नोंद सिज्जीनमध्ये केलेली आहे, ८ सिज्जीन म्हणजे काय हे तुम्हाला कसे कळेल? ९ ती एक लिहिलेली कर्मवही आहे. १० सत्य नाकारणाऱ्यांचा त्या दिवशी सर्वनाश होईल, ११ जे निवाड्याचा दिवस नाकारत राहतील. १२ दुष्ट अवज्ञाकारी सोडले तर इतर कुणीही ते नाकारत नाही. १३ आमचे साक्षात्कार त्यांच्यापर्यंत पोहोचताच ते म्हणतात, "या सगळ्या प्राचीन कथा आहेत." १४ नाही! त्यांच्या स्वतःच्या कृत्यांनीच त्यांच्या मनावर दुष्ट आवरण चढवले आहे. १५ खरोखर! त्या दिवशी ते आणि त्यांचा पालनकर्ता यांच्या दरम्यान एक भिंत उभी केली जाईल. १६ नंतर त्यांना नरकाग्नीत प्रवेश करावा लागेल, १७ आणि सांगितले जाईल, "हे तेच आहे ज्यावर तुमचा विश्वास नव्हता."

१८ पण सदाचारी लोकांचे कर्म इल्लियीनमध्ये जतन करून ठेवले आहे.

१९ इल्लियीन म्हणजे काय हे तुम्हाला कसे कळणार? २० ती एक लिखित
कर्मवही आहे. २१ ईश्वराच्या अगदी निकटचे ईशदूत त्याचे साक्षीदार
आहेत, २२ सदाचारी लोक निश्चितच सुखात राहतील, २३ आरामदायी
आसनांवर बसून थक्क होऊ आजूबाजूला पाहत राहतील, २४ त्यांच्या
चेहेऱ्यावर तुम्हाला सुखाचे तेज दिसेल, २५ त्यांना सीलबंद शुद्ध मद्य
पिण्यासाठी दिले जाईल. २६ त्याचे सील कस्तुरीच्या सुगंधाचे असेल,
तेव्हा इच्छुकांनी याची आकांक्षा बाळगावी. २७ त्या पेयात तसनीमचे
पाणी मिसळलेले असेल. २८ ईश्वराच्या निकटवर्तीयांसाठी तसनीमचा झरा
वाहतो. २९ दुष्ट लोक श्रद्धावंतांची खिल्ली उडवतात. ३० त्याच्याजवळून
जाताना ते एकमेकांकडे पाहून डोळे मिचकावतात, ३१ आणि आपल्या
लोकांमध्ये परतताच श्रद्धावंतांची खिल्ली उडवू लागतात. ३२ श्रद्धावंतांकडे
पाहून उपहासाने ते म्हणतात, "हे नक्कीच वाट चुकलेले लोक आहेत."
३३ त्यांना यांचे रखवालदार म्हणून पाठवलेले नव्हते तरीही ते असे
म्हणतात. ३४ तेव्हा आज श्रद्धावंत अश्रद्धावंतांकडे पाहून हसत असतील.
३५ आपल्या राजेशाही आसनांवर बसून अश्रद्धावंतांकडे पाहून म्हणतील,
३६ "सत्य नाकारणाऱ्यांना त्यांच्या कृत्याचा पुरेपूर मोबदला मिळाला
का?"

प्रकरण ८४ : फाटण्याचा आवेग
(अल्-इनशिकाक)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ जेव्हा आकाश आवेगाने फाटेल, २ आणि त्याच्या पालनकर्त्याच्या
आज्ञेचे पालन करेल, जे त्याच्यासाठी बंधनकारक आहे. ३ जेव्हा पृथ्वी
सपाट होऊन जाईल, ४ आणि तिच्यात सामावलेले सगळे फेकून रिकामी

होऊन जाईल. ५ आपल्या पालनकर्त्याच्या आज्ञेचे पालन करणे तिच्यासाठी बंधनकारक आहे. ६ हे माणसा! तुझा ईश्वराकडे जाणारा खडतर प्रवास सुरू आहे. तू त्याला नक्कीच भेटशील. ७ ज्याच्या उजव्या हातात नोंदवही दिली जाईल, ८ त्याचा हिशेब लवकरच आटोपला जाईल. ९ तो लवकरच आनंदाने आपल्या लोकांकडे परतेल. १० पण ज्याची नोंदवही पाठीमागच्या बाजूने दिली जाईल ११ तो त्याच्या संपूर्ण विनाशाची प्रार्थना करेल, १२ आणि त्याला धगधगत्या अग्नीत प्रवेश करावा लागेल. १३ आपल्या लोकांमध्ये असताना तो अगदी आनंदात असायचा. १४ कारण आपल्याला ईश्वराकडे परत आणले जाईल असे त्याला कधीच वाटले नव्हते. १५ पण त्याला ईश्वरासमोर यावेच लागले! त्याच्या पालनकर्त्याची त्याच्यावर कायम देखरेख होती. १६ मी मावळत्या सूर्याच्या तेजाची शपथ घेतो, १७ रात्रीची आणि तिच्या उदरात सामावलेल्या प्रत्येक गोष्टीची शपथ घेतो, १८ पूर्ण चंद्राची शपथ घेतो, १९ टप्प्याटप्प्याने तुमची प्रगती होईल. २० त्यांना झाले आहे तरी काय? ते का विश्वास ठेवत नाहीत? २१ त्यांना कुरआन ऐकवले जाते तेव्हा ईश्वरासमोर नतमस्तक का होत नाहीत? २२ खरोखर, सत्य नाकारण्यावर आग्रही असणारे त्याचा स्वीकार करायला नकार देतात. २३ त्यांच्या मनात काय चालले आहे ते ईश्वर चांगलेच ओळखून आहे. २४ तेव्हा त्यांना वेदनादायी शिक्षेची वार्ता कळवा. २५ पण जे सत्यावर विश्वास ठेवून सत्कर्मे करतात त्यांच्यासाठी निरंतर (कधीही न संपणारा) मोबदला आहे.

प्रकरण ८५ : तारकापुंज (अल्-बुरूज)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अनेक तारकापुंज धारण करणाऱ्या आकाशाची शपथ, २ वचन दिलेल्या निवाड्याच्या दिवसाची शपथ, ३ साक्षीदारांची आणि ज्यांची साक्ष दिली जाते त्यांची शपथ, ४ खंदकवाल्या लोकांचा सर्वनाश झाला होता. ५ जो खंदक इंधन भरलेल्या आगीने प्रज्वलित झाला होता. ६ खंदकाच्या आजूबाजूला बसून ७ श्रद्धावंतांवर केले जाणारे अत्याचार ते बघत होते. ८ त्यांनी सर्वशक्तिमान, स्तुत्य ईश्वरावर श्रद्धा ठेवली एवढ्याच कारणासाठी ते त्यांचा तिरस्कार करत होते. ९ आकाशाचे आणि पृथ्वीचे साम्राज्य ज्याच्या मालकीचे आहे तो ईश्वर सगळ्याचा साक्षीदार आहे. १० श्रद्धावंत स्त्री-पुरुषांचा छळ करून नंतर त्याबद्दल पश्चातापदग्ध न होणाऱ्यांना नक्कीच नरकाच्या छळाला सामोरे जावे लागेल आणि होरपळण्याच्या यातनाही भोगाव्या लागतील. ११ पण ईश्वरावर विश्वास ठेवून सत्कर्मे करणाऱ्यांना वाहत्या नद्यांनी युक्त अशा बगीच्यांचा मोबदला मिळेल. हा सर्वोच्च विजय आहे. १२ तुमच्या ईश्वराची पकड खरोखर जबरदस्त आहे. १३ निर्मितीचा आरंभ करणारा आणि त्याची पुनरावृत्ती करणारा तोच आहे. १४ तो क्षमाशील आणि प्रेमळ आहे. १५ तो तेजस्वी सिंहासनाचा सम्राट आहे. १६ आपली इच्छा साकार करणारा आहे. १७ तुम्ही त्या सैन्याच्या कथा ऐकल्या नाहीत का? १८ फिरऔन व समूद यांच्या सैन्यांच्या? १९ तरीही सत्य नाकारणारे आपल्या नकारावर ठाम आहेत. २० ईश्वराने त्यांना सगळ्या बाजूंनी घेरले आहे. २१ हे कुरआन खरोखर गौरवशाली आहे. २२ शिलालेखावर कोरून ते जतन करून ठेवले आहे.

प्रकरण ८६ : रात्री प्रकट होणारा (अत्-तारिक)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ आकाशाची शपथ आणि रात्री प्रकट होणाऱ्याची शपथ, २ रात्री प्रकट होणारा कोण आहे हे तुम्हाला काय माहीत? ३ तो तेजस्वी तारा आहे. ४ प्रत्येक मनुष्यमात्रावर पहारेकरी नेमून दिलेला आहे. ५ आपली निर्मिती कशापासून झाली यावर माणसाने चिंतन करावे. ६ उसळत्या पाण्यापासून (वीर्याच्या एका थेंबापासून) त्याची निर्मिती झाली, ७ जे पाठीचा कणा आणि छातीच्या फासळ्या यांच्यामधून येते. ८ माणसाला पुन्हा एकदा जिवंत करायचे सामर्थ्य त्याच्याकडे नक्कीच आहे. ९ ज्या दिवशी सगळी गुपिते उलगडली जातील. १० त्या दिवशी माणसाकडे ना कसली ताकत असेल ना कुणी मदतनीस असेल. ११ आकाशातील मेघांची शपथ जे सरीवर सरी वर्षितात. १२ दुभंगून नवीन कोंब उगवणाऱ्या पृथ्वीची शपथ, १३ कुरआन हे निःसंशय निर्णायक वचन आहे, १४ हे हलक्यात घेण्यासारखे नाही. १५ ते कुटील कारस्थान रचत होते. १६ म्हणून मीही तसेच केले. १७ तेव्हा सत्य नाकारणाऱ्यांना थोडा वेळ सहन करा, त्यांना थोडीशी उसंत द्या.

प्रकरण ८७ : परमोच्च (अल्-आला)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ आपल्या पालनकर्त्याचे स्तुतिगान करा, जो सर्वोच्च आहे. २ त्याने सगळ्या गोष्टी निर्माण केल्या आणि त्यांना प्रमाणबद्ध आकार

दिला. [३] तो प्रत्येक गोष्टीचे स्वरूप ठरवतो आणि त्यानुसार त्यांना मार्गदर्शन करतो. [४] तो सगळीकडे हिरवाई उगवतो, [५] आणि कालांतराने तिचा पालापाचोळा करून टाकतो. [६] हे प्रेषिता! तुम्हाला कुठल्याही गोष्टीचा विसर पडू नये, म्हणून आम्ही हे कुरआन तुम्हाला पुन्हा पुन्हा वाचायला लावू. [७] अपवाद फक्त ईश्वराच्या इच्छेला येईल त्याचा, जे उघड आहे आणि जे गुप्त आहे ते सगळे तो जाणतो. [८] आम्ही तुमचा मार्ग सुकर करू. [९] उपदेशापासून फायदा होतो आहे की नाही याचा विचार न करता तुम्ही लोकांना आमचा उपदेश करत रहा. [१०] ईश्वराचे भय बाळगणारा त्यापासून बोध घेईल. [११] पण अतिशय अभागी असणारे त्याकडे दुर्लक्ष करतील. [१२] त्यांना महाप्रचंड अग्नीत प्रवेश करावा लागेल. [१३] तिथे ना ते मरतील ना जिवंत राहतील. [१४] जो स्वतःची शुद्धी करतो, [१५] ईश्वराचे नामस्मरण करून प्रार्थना करतो, तो खरोखर यशस्वी ठरेल. [१६] पण तुम्ही ऐहिक जगातल्या जीवनालाच प्राधान्य देता, [१७] मृत्युपश्चात जग यापेक्षा चांगले आणि चिरंतन असले तरीही. [१८] पूर्वीच्या ग्रंथामधूनही याचीच शिकवण दिलेली होती. [१९] म्हणजेच अब्राहाम आणि मोझेस यांना दिलेल्या ग्रंथांमधून.

प्रकरण ८८ : महाभयानक घटना (अल्-गाशियह)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] तुम्ही त्या भयानक घटनेविषयी ऐकले आहे का? [२] त्या दिवशी काहींचे चेहरे उतरलेले असतील, [३] दुःखीकष्टी, थकलेले असतील. [४] त्यांना धगधगत्या अग्नीत प्रवेश करावा लागेल, [५] आणि उकळत्या झऱ्याचे पाणी पाजवले जाईल. [६] अन्न म्हणून त्यांना फक्त काटेरी

झुडपे मिळतील. ७ ज्यापासून त्यांना ना पोषण मिळेल ना भूक भागेल. ८ त्या दिवशी काहींचे चेहरे उजळलेले असतील. ९ आयुष्यभर घेतलेल्या खडतर परिश्रमांमुळे ते सुखावलेले असतील. १० त्यांना सर्वसुखसंपन्न स्वर्गीय बगीच्यात प्रवेश मिळेल, ११ जिथे त्यांच्या कानांवर व्यर्थ बडबड पडणार नाही, १२ जिथून पाण्याचे जिवंत प्रवाह वाहत असतील, १३ तिथे त्यांच्यासाठी उच्चासने असतील, १४ आणि हाताशी पेयाने भरलेले प्याले असतील, १५ त्यांच्यासाठी आरामदायी उशांची १६ आणि गालिच्यांची व्यवस्था असेल, १७ उंटांची आणि त्यांची स्वतःची निर्मिती कशी झाली, १८ आकाश कसे उंचीवर स्थापित केले, १९ पृथ्वीवर पर्वत कसे रोवले गेले, २० आणि पृथ्वीचा विस्तार कसा झाला यावर त्यांनी कधी चिंतन केले नाही का? २१ तेव्हा हे प्रेषिता! त्यांना उपदेश करा. त्यांना उपदेश करणे एवढेच तुमचे काम आहे. २२ तुम्ही त्यांचे रखवालदार नाही. २३ पण जो कुणी सत्याकडे पाठ फिरवून त्याला नकार देईल २४ त्याला ईश्वर कठोरात कठोर शिक्षा देईल. २५ निश्चितच सगळ्यांना आमच्याकडेच परतायचे आहे. २६ त्यानंतर आम्ही नक्कीच त्यांचा हिशेब करू.

प्रकरण ८९ : पहाट
(अल्-फज्र)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ पहाटेची शपथ! २ त्या दहा रात्रीची शपथ! ३ सम आणि विषम यांची शपथ! ४ आणि सरत्या रात्रीची शपथ! ५ सुज्ञ माणसांसाठी यात भक्कम पुरावा नाही का? ६ आदच्या जमातीचा ईश्वराने कसा समाचार घेतला हे तुम्ही ऐकले नाही का? ७ अनेक भव्य महाल असलेल्या नगरात राहणारी ती इरमची जमात होती. ८ त्यांच्यासारखी धिप्पाड जमात

जगात त्यांच्याआधी निर्माण झालेली नव्हती. ९ खोऱ्यांमध्ये भव्य पाषाण
कोरून त्यात राहणाऱ्या समूद जमातीचा १० आणि धनाढ्य फारोचा आम्ही
कसा समाचार घेतला हे त्यांनी ऐकले नाही का? ११ त्यांनी आपल्या
भूमीत अनाचार माजवला होता, १२ आणि प्रजेला उपद्रव दिला होता.
१३ तेव्हा तुमच्या पालनकर्त्याने त्यांच्यावर शिक्षेचे संकट कोसळवले.
१४ कारण खरोखर तुमचा पालनकर्ता तुमच्यावर सदैव लक्ष ठेवून असतो.
१५ माणसाचे कसे आहे, त्याचा पालनकर्ता जेव्हा सन्मान आणि आशीर्वाद
देऊन त्यांची पारख करतो, तेव्हा तो म्हणतो, "माझ्या पालनकर्त्याने
माझा सन्मान केला आहे." १६ पण जेव्हा तो उपजीविकेच्या साधनांची
कमतरता निर्माण करून त्याची पारख करतो तेव्हा तो म्हणतो, "ईश्वराने
माझा अवमान केला आहे." १७ खरोखर, तुम्ही अनाथांना दया दाखवत
नाही, १८ की गरिबांना जेवू घालण्यासाठी एकमेकांना प्रेरित करत नाही.
१९ दुर्बलांना वारसाहक्काने मिळालेली संपत्ती तुम्ही लोभापायी हडप करून
टाकता. २० तुमची संपत्तीची हाव कधीही भागत नाही. २१ ज्या दिवशी
पृथ्वीच्या ठिकऱ्या उडून जातील २२ आणि ज्या दिवशी तुमचा पालनकर्ता
आपल्या देवदूतांसह पृथ्वीवर अवतरेल आणि सगळीकडे देवदूतांच्या
रांगा लागल्या असतील २३ तेव्हा माणसाला ईश्वराचे स्मरण होईल. पण
या स्मरणाचा तेव्हा काय उपयोग? २४ त्या दिवशी माणूस म्हणेल, "मी
जीवनात चांगली कृत्ये पुढे पाठवली असती तर किती चांगले झाले
असते..." २५ त्या दिवशी ईश्वर अशी शिक्षा देईल जशी कुणीही देऊ
शकणार नाही, २६ आणि तो अपराध्यांना असे बंधनात टाकेल जसे कुणीही
टाकू शकणार नाही. २७ पण सत्कृत्ये करणाऱ्यांना ईश्वर म्हणेल, "हे शांती
लाभलेल्या आत्म्या! २८ तू आपल्या प्रभूकडे परतला आहेस, ज्याच्यावर
तू संतुष्ट आहेस आणि तोही तुझ्यावर संतुष्ट आहे. २९ माझ्या सेवकांमध्ये
सामील हो, ३० माझ्या स्वर्गात प्रवेश कर."

प्रकरण ९० : नगर
(अल्-बलद)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ मी या नगराची शपथ घेऊन सांगतो, २ या नगरात तुमचे वास्तव्य आहे, ३ माणसाच्या पालकांची (आदम व हव्वा) व त्यांच्या संततीची शपथ घेऊन सांगतो, ४ की आम्ही खडतर आणि कष्टप्रद जीवन जगण्यासाठी माणसाची निर्मिती केली आहे. ५ त्याच्यावर कुणाचे नियंत्रण नाही असे वाटते का त्याला? ६ तो म्हणतो, "मी प्रचंड धन खर्च केले आहे." ७ तर मग आपल्यावर कुणाचेही लक्ष नाही असे वाटते का त्याला? ८ आम्ही त्याला दोन डोळे दिले नाहीत का? ९ एक जीभ आणि ओठांची जोडी दिली नाही का? १० आणि त्याला दोन्ही मार्ग दाखवले नाहीत का? ११ पण त्याने (हिंमतीने) चढण पार करण्याचा प्रयत्न केला नाही. १२ खडतर चढण म्हणजे काय हे तुम्हाला कसे समजणार? १३ ती आहे गुलामाची गुलामगिरीतून मुक्तता करणे १४ किंवा दुष्काळात लोकांना अन्नदान करणे, १५ अनाथ नातेवाईकांना १६ किंवा संकटात सापडलेल्या इतर गरजूंना १७ आणि (सर्वात महत्त्वाचे) श्रद्धावंतांपैकी असणे, यांसह एकमेकांना संयमाने आणि सहृदयतेने वागण्यासाठी प्रेरित करणे, १८ असे वागणारे लोक उजव्या बाजूचे आहेत, १९ आणि आमच्या साक्षात्कारांमधले सत्य नाकारण्यावर ठाम असणारे डाव्या बाजूचे लोक आहेत. २० नरकाग्नी लवकरच त्यांच्याभोवतीचा पाश आवळेल.

प्रकरण ९१ : सूर्य
(अश्-शम्स)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ सूर्याची आणि त्याच्या चढत्या तेजाची शपथ! २ त्याच्या मागून
उगवणाऱ्या चंद्राची शपथ! ३ तेजोमय दिवसाची शपथ! ४ त्यावर पडदा
टाकणाऱ्या रात्रीची शपथ! ५ आकाशाची शपथ! ईश्वराने आकाश
कसे निर्माण केले! ६ पृथ्वीची शपथ! त्याने पृथ्वीचा विस्तार कसा
केला! ७ आत्म्याची शपथ! ईश्वराने त्याला कसे घडवले! ८ त्यानंतर
त्याने आत्म्याला चूक-बरोबर उमगण्याची प्रेरणा दिली. ९ आत्मशुद्धी
साधणारा नक्कीच यशस्वी होईल १० आणि आत्मा कलंकित करणारा
नक्कीच अयशस्वी होईल, ११ समूद जमातीने उद्दामपणे सत्य नाकारले.
१२ त्यांच्यातला सगळ्यात दुष्ट माणूस उंटिणीला मारायला सरसावला,
१३ ईश्वराच्या प्रेषिताने त्याला सांगितले, "ही ईश्वराची उंटीण आहे, तिला
पाणी पिऊ दे." १४ पण त्यांनी प्रेषिताला खोटे ठरवले आणि उंटिणीची
मुख्य शीर कापून टाकली. या अपराधापोटी ईश्वराने त्यांचा सर्वनाश केला
आणि त्यांचे नगर जमीनदोस्त करून टाकले. १५ तो परिणामांना घाबरला
नाही.

प्रकरण ९२ : रात्र
(अल्-लैल)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ पृथ्वीवर अंधाराचे आवरण चढवणाऱ्या रात्रीची शपथ! २ त्या पाठोपाठ
तेजस्वीपणे येणाऱ्या दिवसाची शपथ! ३ स्त्री-पुरुषांच्या निर्मितीची शपथ!

४ लोकहो! खरोखर तुम्ही अगदी वेगवेगळ्या उद्दिष्टांसाठी कष्ट उपसत आहात. ५ जो दान देतो आणि ईश्वराचे भय बाळगतो, ६ सत्यावर आणि चांगुलपणावर विश्वास ठेवतो, ७ आम्ही त्याचा मार्ग सुकर करू. ८ पण कंजूष आणि बेपर्वा असणाऱ्यांना ९ आणि सत्याला व चांगुलपणाला नकार देणाऱ्यांना १० खडतर हालअपेष्टांकडेच घेऊन जाऊ. ११ तो नरकात जाऊन पडेल तेव्हा त्याची संपत्तीही त्याच्या कामी येणार नाही. १२ आम्ही फक्त मार्गदर्शन देण्याचे काम करतो. १३ हे जग आणि मृत्युपश्चात जग आमच्याच मालकीचे आहे. १४ मी तुम्हाला धगधगत्या अग्नीचा इशारा दिला आहे. १५ अतिशय दुष्ट लोकच त्यात प्रवेश करतील, १६ ज्यांनी सत्य नाकारले आणि त्याकडे पाठ फिरवली. १७ ईश्वराचे भय बाळगणाऱ्याला त्यापासून दूर ठेवले जाईल. १८ जो आत्मशुद्धी साधण्यासाठी दानधर्म करतो १९ आणि इतरांवर केलेल्या उपकारांच्या परतफेडीची अपेक्षा ठेवत नाही, २० तर फक्त सर्वोच्च पालनकर्त्याच्या कृपेचा लाभ मिळण्यासाठी कर्म करतो. २१ त्यांना ईश्वर लवकरच संतुष्ट, समाधानी करेल.

प्रकरण ९३ : सकाळचा तेजस्वी प्रकाश (अज्-जुहा)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ सकाळच्या झळाळत्या प्रकाशाची शपथ! २ अंधार पसरवणाऱ्या रात्रीची शपथ! ३ तुमच्या पालनकर्त्याने तुम्हाला सोडून दिले नाही की तो तुमच्यावर असंतुष्ट नाही. ४ या जीवनापेक्षा मृत्युपश्चात जग तुमच्यासाठी खरोखर फार चांगले आहे. ५ लवकरच ईश्वराकडून लाभलेल्या देणगीमुळे तुम्ही संतुष्ट व्हाल. ६ अनाथ अवस्थेत असताना त्याने तुम्हाला सहारा

दिला नाही का? ७ तुम्ही सत्याच्या शोधार्थ भटकत असताना त्याने तुम्हाला मार्गदर्शन केले नाही का? ८ तुमची गरज हेरून त्याने ती पूर्ण केली नाही का? ९ तेव्हा अनाथांशी कठोरपणे वागू नका १० आणि मदतीची याचना करणाऱ्याला झिडकारू नका, ११ तर तुमच्या पालनकर्त्याच्या कृपेचे स्मरण करून त्याचे स्तुतिगान करा.

प्रकरण ९४ : दिलासा
(अल्-इनशिराह)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ आम्ही तुमचे मन हलके केले नाही का? २ आम्ही तुमच्यावरचे ओझे दूर केले ३ ज्याचे तुमच्या पाठीला ओझे झाले होते. ४ आम्ही तुम्हाला नावलौकिक दिला नाही का? ५ लक्षात ठेवा! खडतर हालअपेष्टानंतर सुख येते, ६ निश्चितच कठीण परिस्थितीनंतर चांगली परिस्थिती येते. ७ तेव्हा (ईश्वरी कार्यात) वेळोवेळी कठोर परिश्रम करा ८ आणि आपल्या पालनकर्त्याकडे संपूर्ण लक्ष केंद्रित करा.

प्रकरण ९५ : अंजीर
(अत्-तीन)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ अंजीर आणि जैतून यांची शपथ, २ सिनाई पर्वताची शपथ, ३ या सुरक्षित भूमीची शपथ, ४ आम्ही माणसाला खरोखर सर्वोत्कृष्ट मुशीतून घडवले, ५ आणि नंतर सगळ्यात खालच्या पातळीवर लोटून दिले. ६ अपवाद फक्त त्यांचा ज्यांनी आमच्यावर विश्वास ठेवला आणि

सत्कर्मे केली – त्यांच्यासाठी चिरंतन मोबदला असेल. [७] यानंतरही तुम्ही निवाड्याच्या दिवसाला नाकारत राहणार का? [८] ईश्वर सगळ्या न्यायाधीशांपेक्षा श्रेष्ठ नाही का?

प्रकरण ९६ : गुठळी
(अल्-अलक)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] वाच! त्या पालनकर्त्याच्या नावाने, ज्याने तुला निर्माण केले. [२] त्याने गर्भाशयात चिकटलेल्या रक्ताच्या एका गुठळीपासून मानवाची निर्मिती केली. [३] वाच! तुझा पालनकर्ता सर्वोत्कृष्ट दाता आहे. [४] ज्याने लेखणीच्या सहाय्याने तुला शिकवले, [५] आणि माहीत नसलेल्याचे ज्ञान करून दिले. [६] तरीही माणूस उद्दामपणे वागला, [७] कारण तो स्वतःला स्वयंपूर्ण समजतो. [८] खरोखर, सगळ्यांना त्यांच्या पालनकर्त्याकडे परतायचे आहे. [९] तुम्ही त्याला पाहिले आहे का जो परावृत्त करतो, [१०] प्रार्थना करणाऱ्या आमच्या उपासकाला? [११] त्याला योग्य मार्गदर्शन मिळाले आहे असे तुम्हाला वाटते का? [१२] की त्याला मार्गदर्शन लाभले आहे जो खऱ्या धार्मिकतेचा आग्रह धरतो? [१३] तुम्ही पाहिले आहे का, त्याने सत्य कसे नाकारले आहे आणि त्याकडे पाठ कशी फिरवली आहे? [१४] ईश्वर सगळ्यावर लक्ष ठेवून आहे हे त्याला माहित नाही का? [१५] त्याने सावध रहावे! त्याने चुकीचे वागणे थांबवले नाही तर मस्तकावरचे केस धरून आम्ही त्याला फरफटत नेऊ. [१६] त्या खोट्या व अपराधी कपाळावरचे (केस आम्ही पकडू). [१७] नंतर त्याने आपले मानलेल्या दैवतांचा धावा करावा. [१८] आम्ही नरकाच्या रखवालदारांना बोलावून

घेऊ. [१९] नाही! त्या दुष्टाची आज्ञा अजिबात पाळू नका, तर ईश्वरासमोर नतमस्तक होऊन त्याच्या निकट जा.

प्रकरण ९७ : भाग्यनिश्चितीची रात्र (अल्-कद्र)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] भाग्य निश्चितीच्या रात्री आम्ही हे कुरआन अवतीर्ण करायला सुरुवात केली. [२] भाग्य निश्चितीची रात्र म्हणजे काय हे तुम्हाला कसे कळेल? [३] हजार रात्रींपेक्षा ती रात्र चांगली आहे. [४] त्या रात्री सगळे ईशदूत आणि जिब्रिल (गॅब्रिएल) हा मुख्य ईशदूत त्यांच्या पालनकर्त्याच्या परवानगीने त्याचे सगळ्या बाबतीतले हुकूम घेऊन भूतलावर उतरतात. [५] त्या रात्री पहाट फुटेपर्यंत सगळीकडे नीरव शांतता असते.

प्रकरण ९८ : सुस्पष्ट पुरावा (अल्-बय्यिनह)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] ग्रंथधारकांपैकी सत्य नाकारणारे आणि अनेकेश्वरवादी तोपर्यंत अविश्वास दाखवायचे थांबवणार नाहीत जोपर्यंत त्यांच्याकडे सुस्पष्ट पुरावा येणार नाही. [२] पवित्र ग्रंथ वाचून दाखवेल असा ईश्वराचा एक प्रेषित त्यांच्याकडे येईल, [३] त्या ग्रंथात सत्याचे प्रामाणिक उपदेश असतील, [४] स्पष्ट पुरावा मिळाल्यानंतरच ग्रंथधारकांचे आपसात मतभेद झाले. [५] त्यांना ईश्वराची उपासना करण्याचा, प्रामाणिकपणे त्याला शरण जाण्याचा, खरी श्रद्धा ठेवण्याचा, नियमितपणे प्रार्थना करण्याचा आणि

दानधर्म करण्याचा आदेश देण्यात आला होता. कारण हाच खरा धर्म आहे. ६ ग्रंथधारकांपैकी सत्य नाकारणारे आणि अनेकेश्वरवादी कायम नरकाग्नीत राहतील. ते सगळ्यात निकृष्ट निर्मितीपैकी आहेत. ७ खरोखर, ईश्वरावर श्रद्धा ठेवून सत्कर्मे करणारे सर्वोत्कृष्ट निर्मितीपैकी आहेत. ८ ईश्वराने त्यांचा मोबदला राखून ठेवला आहे: ज्यातून नद्या वाहत आहेत असा चिरंतन बगीचा, तिथे त्यांचे कायमचे वास्तव्य असेल. ईश्वर त्यांच्यावर संतुष्ट असेल आणि ते ईश्वरावर संतुष्ट असतील. ईश्वराचे भय बाळगणाऱ्यांना असा मोबदला मिळेल.

प्रकरण ९९ : भूकंप
(अज्-जिलजाल)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ प्रलयंकारी भूकंपाने पृथ्वी जेव्हा हादरून जाईल, २ त्या दिवशी ती आपल्यावरचे सगळे ओझे झुगारून देईल, ३ तेव्हा माणूस एकमेकांना विचारू लागेल, "पृथ्वीला झाले आहे तरी काय?" ४ त्या दिवशी ती घडलेल्या सगळ्या घटनांचा वृत्तांत सांगू लागेल. ५ कारण ईश्वराकडून तिला तशी आज्ञा मिळालेली असेल. ६ आपल्या कर्माचे अवलोकन करण्यासाठी लोक त्या दिवशी गटागटांनी पुढे येतील. ७ ज्याने किंचितही सत्कर्म केले असेल तर त्याला ते पाहता येईल ८ आणि ज्याने किंचितही दुष्कर्म केले असेल तर त्यालाही ते पाहता येईल.

प्रकरण १०० : चौखूर उधळलेले घोडे (अल्-आदियात)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ फुरफुरणाऱ्या, धापा टाकणाऱ्या घोड्यांची शपथ! २ त्यांच्या टापेसरशी आगीच्या ठिणग्या उडत आहेत. ३ भल्या पहाटे अचानक हल्ला करण्यासाठी ते चौखूर उधळतात ४ आणि धुळीचे लोळ उठवत ५ शत्रूसैन्याच्या मधोमध घुसतात. ६ खरोखर, माणूस आपल्या पालनकर्त्याविषयी कृतघ्न आहे. ७ तो स्वतःच याचा साक्षीदार आहे, ८ निःसंशय तो संपत्तीच्या मोहात गुरफटलेला आहे. ९ त्यांना त्या वेळेची जाणीव नाही का जेव्हा कबरींमध्ये असलेल्यांना उठवून बाहेर आणले जाईल? १० आणि त्यांच्या मनात दडलेल्या गोष्टी उघड केल्या जातील? ११ त्या दिवशी त्यांना नक्कीच कळून चुकेल, ईश्वराकडे त्यांच्या सगळ्या कर्माची माहिती आहे.

प्रकरण १०१ : गर्जत येणारी आपत्ती (अल्-कारिआ)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ मोठी गर्जना करत आलेली ती आपत्ती! २ काय आहे ही कडकडाट करत आलेली आपत्ती? ३ सिंहगर्जना करत आलेली आपत्ती म्हणजे काय हे तुम्हाला कसे कळेल? ४ हा तो दिवस असेल जेव्हा मनुष्यजात विखुरलेल्या पतंगांसारखी झाली असेल, ५ आणि पर्वत लोकरीच्या विसविशीत ढगांसारखे झाले असतील. ६ या दिवशी ज्यांच्या सत्कर्मांचे पारडे जड होईल ७ त्याला अतिशय सुखासीन आयुष्य लाभेल. ८ पण

ज्यांच्या सत्कर्मांचे पारडे हलके होईल, [९] त्यांना अंतहीन खोल विवरात रहावे लागेल. [१०] अंतहीन विवर म्हणजे काय आहे, असे तुम्हाला वाटते? [११] ती धगधगती आग आहे.

प्रकरण १०२ : अधिकाची हाव
(अत्-तकासुर)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] अधिकाची हाव तुम्हाला ईश्वरापासून दूर नेते. [२] तुम्ही कबरीत पोहोचेपर्यंत ती तुम्हाला ईश्वरापासून दुरावत राहते. [३] पण लवकरच तुम्हाला कळून चुकेल. [४] होय! लवकरच तुम्हाला कळून चुकेल. [५] खरोखर, सत्य तुम्हाला खात्रीपूर्वक उमगेल. [६] तुम्हाला नरकाग्नीचे दर्शन होईल. [७] स्वतःच्या डोळ्यांनी पाहताच तुमची खात्री पटेल. [८] ऐहिक जगात ईश्वराने केलेल्या उपकारांविषयी त्या दिवशी तुम्हाला जाब विचारला जाईल.

प्रकरण १०३ : सरती वेळ
(अल्-अस्र)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] सरत्या वेळेची शपथ घेऊन सांगतो, [२] मनुष्य नक्कीच आपले नुकसान करून घेण्याच्या स्थितीत आहे. [३] याला अपवाद फक्त त्यांचा ज्यांनी श्रद्धेचा अंगीकार केला, सत्कर्मे केली, एकमेकांना सत्याची कास धरण्याची विनंती केली आणि एकमेकांना संयमाने राहण्याची विनंती केली.

प्रकरण १०४ : पाठीमागे निंदानालस्ती करणारे (अल्-हु -म-जह)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ पाठीमागे इतरांची निंदानालस्ती करणाऱ्यांवर फार मोठे अरिष्ट
येईल, २ जे धन गोळा करतात, त्यांची मोजदाद करतात ३ आणि विचार
करतात की त्यांची संपत्ती त्यांना कायमसाठी जिवंत ठेवेल. ४ अजिबात
नाही! त्यांना नक्कीच चिरडून टाकणाऱ्या छळगृहात टाकले जाईल.
५ चिरडून टाकणारे छळगृह म्हणजे काय हे तुम्हाला कसे कळेल? ६ ती
ईश्वराने प्रज्वलित केलेली आग आहे. ७ जी थेट माणसाच्या हृदयात
शिरते (आणि) ८ त्याला सगळ्या बाजूंनी लपेटून घेते, ९ जिच्या ज्वाळा
मनोऱ्यासारख्या उंचच उंच आहेत.

प्रकरण १०५ : हत्ती (अल्-फील)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हत्तीवर स्वार होऊन आलेल्या सैन्याची ईश्वराने कशी वाताहत केली
हे तुम्ही पाहिले नाही का? २ त्याने त्यांची योजना धुळीस मिळवली नाही
का? ३ ईश्वराने त्यांच्यावर पक्ष्यांचे थवे सोडले, ४ ज्यांनी त्या सैन्यावर
मातीच्या ढेकळांचा भडीमार केला. ५ अशा प्रकारे ईश्वराने त्यांची अवस्था
गुरांनी उध्वस्त केलेल्या पिकाच्या खुंटासारखी करून टाकली.

प्रकरण १०६ : कुरैश
(कुरैश)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ कुरैशांनी आपल्या सुरक्षिततेसाठी २ हिवाळ्यातील आणि
उन्हाळ्यातील प्रवासात सुरक्षितता लाभावी म्हणून ३ पवित्र गृहाच्या
पालनकर्त्याची उपासना करावी, ४ ज्याने भुकेजले राहू नयेत म्हणून त्यांना
अन्न पुरवले आणि भयमुक्त केले.

प्रकरण १०७ : लहानसहान गोष्टी
(अल्-माऊन)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ निवाड्याच्या दिवसाला नाकारणाऱ्यांना तुम्ही पाहिले नाहीत का?
२ जे अनाथांकडे पाठ फिरवतात, ३ आणि गरिबांना खाऊ घालण्याची
इच्छा बाळगत नाहीत? ४ त्यांचा सर्वनाश होईल जे प्रार्थना तर करतात,
५ पण त्यांचे मन त्यात नसते. ६ जे फक्त इतरांना पहावे म्हणून देखावा
करतात ७ आणि जे लहानशा गोष्टींचेही दान करत नाहीत.

प्रकरण १०८ : संपन्नता
(अल्-कौसर)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ आम्ही तुम्हाला संपन्नता देऊ केली, २ यासाठी तुमच्या पालनकर्त्याची
प्रार्थना करा आणि त्याच्याचसाठी त्याग करा. ३ त्यांच्याच वाट्याला
कमतरता येणार आहे जे तुमचा तिरस्कार करतात.

प्रकरण १०९ : सत्य नाकारणारे
(अल्-काफिरून)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ हे प्रेषिता! सत्य नाकारणाऱ्यांना सांगा, "हे सत्य नाकारणाऱ्यांनो!
२ तुम्ही ज्यांची उपासना करता त्यांची उपासना मी करत नाही. ३ मी
ज्याची उपासना करतो त्याची उपासना तुम्ही करत नाही. ४ तुम्ही ज्यांची
उपासना करता त्यांची उपासना मी कधीच करणार नाही. ५ मी ज्याची
उपासना करतो त्याची उपासना तुम्ही कधीच करणार नाही. ६ तुम्ही तुमचा
धर्म पाळा. मी माझा धर्म पाळतो."

प्रकरण ११० : मदत
(अन्-नस्र)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ जेव्हा ईश्वराची मदत मिळेल आणि विजयाची प्राप्ती होईल २ आणि
लोकांच्या झुंडीच्या झुंडी ईश्वरच्या धर्मात प्रवेश करताना दिसतील.

[३] (हे मोहम्मद!) तेव्हा तुम्ही आपल्या पालनकर्त्याची प्रार्थना करून त्याचे स्तुतिगान करा आणि त्याच्याकडे क्षमायाचना करा. पश्चाताप स्वीकारायला तो सदैव तत्पर आहे.

प्रकरण १११ : लहब
(अल्-लहब)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] अबू लहबचे दोन्ही हात तुटून जाऊ दे! त्याचा सर्वनाश होऊ दे! [२] ना त्याची संपत्ती, ना त्याची कमाई त्याच्या कामी येईल. [३] लवकरच तो धगधगत्या अग्नीत प्रवेश करेल. [४] इंधन वाहून नेणारी त्याची पत्नीही अग्निप्रवेश करेल. [५] तिच्या गळ्याभोवती पीळदार दोरांचे कडे असेल.

प्रकरण ११२ : एकमेवता
(अल्-इखलास)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

[१] सांगा, "ईश्वर एकमेव आहे. [२] तो स्वयंपूर्ण आहे. [३] तो कुणाला जन्म देत नाही की कुणापासून जन्माला आलेला नाही. [४] त्याच्यासारखे कुणीही नाही."

प्रकरण ११३ : दिवसाची सुरुवात
(अल्-फलक)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ म्हणा, "मी सूर्योदय घडवणाऱ्या त्या ईश्वराच्या आश्रयाला
जाऊ इच्छितो.२ त्याने निर्माण केलेल्या अपायांपासून माझे रक्षण होवो,
३ आणि रात्रीच्या अपायापासून, जेव्हा ती सर्वत्र (अंधार) पसरवते.
४ जनसमुदायावर फुंकर घालणाऱ्या दुष्टांपासून माझे रक्षण होवो, ५ मत्सर
करणाऱ्या मत्सरग्रस्तांपासून माझे रक्षण होवो."

प्रकरण ११४ : लोक
(अन्-नास)

आरंभ अल्लाहच्या नावाने, जो नितांत कृपाळू, नितांत दयाळू आहे.

१ प्रार्थना करा, "मी लोकांच्या पालनकर्त्याला शरण जाऊ इच्छितो,
२ तो लोकांचा सम्राट आहे, ३ तो लोकांचा ईश्वर आहे, ४ नाहक बडबड
करणाऱ्या उपद्रवींपासून आमचे रक्षण होवो, ५ जे लोकांच्या मनात
वेडेवाकडे विचार भरतात ६ ते जिन्नपैकी असतील किंवा माणसांपैकी
असतील."

कुरआनमध्ये उल्लेख झालेली प्रेषितांची नावे

अ. क्र.	अरेबिक (रोमन लिपी)	इंग्रजी	मराठी	हिन्दी
१)	Adam	Adam	ऐडम	आदम
२)	Idrees	Enoch	हनोख	इदरीस
३)	Hud	Eber (Hud)	ईबर	हूद
४)	Nuh	Noah	नोहा	नूह
५)	Saleh	Saleh	--	सालेह
६)	Ibrahim	Abraham	अब्राहाम	इब्राहीम
७)	Lut	Lot	लोट	लूत
८)	Ismail	Ishmael	इश्माएल	इस्माईल
९)	Ishaq	Issac	--	इसहाक
१०)	Yaqub	Jacob	याकोब	याकूब
११)	Yusuf	Joseph	जोसेफ	यूसुफ
१२)	Ayyub	Job	ईयोब	अय्युब
१३)	Shuaib	Jethro	--	शुऐब
१४)	Musa	Moses	मोझेस	मूसा
१५)	Harun	Aron	अहरोन	हारून
१६)	Dhual kifl	Ezekiel	--	जुल-किफ्ल
१७)	Dawud	David	दावीद	दाऊद
१८)	Sulaiman	Soloman	शलमोन सोलोमन	सुलेमान
१९)	Ilyas	Elijah	एलिया	इलियास
२०)	Alyasaa	Elisha	--	अल-यसआ
२१)	Yunus	Jonah	योना	यूनुस
२२)	Zakariyya	Zachariah	जखऱ्या	जकरिया
२३)	Yahya	John	योहान	याह्या
२४)	Isa	Jesus	येशू	ईसा
२५)	Muhammad	Mohammad	मोहम्मद	मुहम्मद

टिप : या अनुवादामध्ये आम्ही काही प्रेषितांची मराठीतील प्रचलित नावे घेतली आहेत (उदा. पैगंबर नूह यांना नोहा, पैगंबर ईसा यांना येशू आदि) आणि काही प्रेषितांची नावे अरेबिक देवनागरी मध्ये ठेवली आहेत (पैगंबर आदम, पैगंबर लूत, पैगंबर हूद आदि).

कुरआनमधील इतर नावे

अ. क्र.	अरेबिक (रोमन लिपी)	इंग्रजी	मराठी	हिन्दी
१)	Jibreel	Gabriel	गॅब्रिएल	जिब्रील
२)	Mikail	Michael	मिखाएल	मिकाईल
३)	Talut	Saul	शौल	तालूत
४)	Jalut	Goliath	गल्याथ	जालूत
५)	Yajuj	Gog	गोग	याजूज
६)	Majuj	Magog	मागोग	माजूज
७)	Maryam	Mary	मेरी	मरयम
८)	Saba	Sheba	शेबा	सबा
९)	Firaun	Pharaoh	फारो	फिरऔन

कुरआन ईश्वरीय ग्रंथ आहे. तो मूळ अरबी भाषेत पूर्णपणे सुरक्षित आहे. अशा ग्रंथाचे भाषांतर मूळ ग्रंथाशी कदापि बरोबरी करू शकत नाही. पण याचा अर्थ असा कदापि होणार नाही की, जो माणूस अरबी भाषा जाणत नाही, तो कुरआन समजू शकत नाही. कुरआन जरी अरबी भाषेत असले तरी, वस्तुतः ते मनुष्याच्या स्वाभाविक भाषेत आहे.

प्रत्येक ग्रंथाचा एक उद्देश असतो, कुरआनचा उद्देश मनुष्याला ईश्वराच्या निर्मिती योजेनेची जाणीव करून देणे आहे, जेणेकरून मनुष्यासमोर हे स्पष्ट होऊन जाईल की, ईश्वराने हे विश्व का निर्माण केले, मनुष्याला पृथ्वीवर वसवण्यामागे ईश्वराचा काय हेतु आहे, मृत्युपूर्वीच्या जीवनात ईश्वराला मनुष्याकडून काय अपेक्षित आहे आणि मृत्यूनंतरच्या जीवनात मनुष्याला कशाला तोंड द्यावे लागणार आहे. मनुष्य ईश्वराची शाश्वत निर्मिती आहे. मनुष्याचा जीवन-प्रवास मृत्युनंतर देखील कायमस्वरूपी सुरू असतो. कुरआन मनुष्याच्या समस्त जीवन-प्रवासासाठी मार्गदर्शक ग्रंथ आहे.

ISBN 978-93-5179-076-1

9 789351790761

www.goodwordbooks.com www.cpsglobal.org